'प्रबोधन'मधील प्रबोधनकार

प्रबोधन नियतकालिकातील
केशव सीताराम ठाकरे
यांचे लेख

संपादन : सचिन परब

खंड ३

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

‘प्रबोधन’मधील प्रबोधनकार

प्रबोधन नियतकालिकातील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख

खंड ३

संपादन : **सचिन परब**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

‘प्रबोधन’मधील प्रबोधनकार
प्रबोधन नियतकालिकातील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख
खंड ३

पहिली आवृत्ती : १६ ऑक्टोबर २०२१ (प्रबोधन शताब्दी)

संपादन : सचिन परब
संपादन समन्वय : अभिजित सोनावणे
मुखपृष्ठ चित्र : संजय मोरे
मुखपृष्ठ रचना आणि मांडणी : पुष्पराज पोपकर

प्रकाशक : सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५
© प्रकाशकाधीन

मुद्रक : व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४० ००१.

किंमत : रुपये ४८७.००

या पुस्तकात व्यक्त झालेली मते लेखक आणि संपादक यांची असून, या मतांशी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, तसेच महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

संपादन मार्गदर्शक

रणधीर शिंदे
ज्ञानेश महाराव
विश्वंभर चौधरी
सुनील कर्णिक

'मराठी बहुजन समाजाला आपल्या निधड्या लेखनाने आणि वक्तृत्त्वाने जागृत करण्याचे जे थोर सामाजिक कार्य केशव सीताराम ठाकरे यांनी केलेले आहे, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे महाराष्ट्रवासीयांचे कर्तव्य आहे. आजपर्यंत ठाकरे यांनी लिहिलेले सर्व प्रबोधक आणि तेजस्वी वाङ्मय एकत्रित करून ग्रंथरूपाने जर प्रकाशात आले, तर महाराष्ट्राची सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या कामी या बंडखोर ब्राह्मणेतराने एका कालखंडात केवढी तेजस्वी कामगिरी करून ठेवलेली आहे, हे महाराष्ट्राला कळून आल्यावाचून राहणार नाही. अशा मान्यतेचा आणि गौरवाचा मुजरा महाराष्ट्र या कलमप्रभूला मोठ्या आनंदाने करेल!'

- आचार्य प्रल्हाद केशव अत्रे,

साप्ताहिक नवयुग,

१६ सप्टेंबर १९४५

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मा. मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

शुभेच्छा संदेश

‘प्रबोधन’ विचारांचा वसा आणि वारसा जतन करूया

महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळी आणि त्यातील प्रबोधन परंपरा यांचा उल्लेख ‘प्रबोधन’च्या उल्लेखाशिवाय अपूर्णच राहील. या ‘प्रबोधन’मुळेच केशव सीताराम ठाकरे यांना प्रबोधनकार अशी ओळख मिळाली. ‘प्रबोधन’चे हे शताब्दी वर्ष आहे. या निमित्ताने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ‘प्रबोधन’मधील लेखांचा संग्रह प्रकाशित करीत आहे, याचे मोठे समाधान आहे.

‘प्रबोधन’चा शतकमहोत्सव साजरा करताना एक मोठा पटही डोळ्यांसमोरून तरळून जातो. प्रबोधनकारांसाठी ‘प्रबोधन’ हे केवळ एक नियतकालिक नव्हते. तर ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होते. त्यांचा जीवनमार्ग होते. प्रबोधनकारांची ‘प्रबोधन’ प्रकाशनामागची तळमळ आणि त्यासाठी त्यांनी केलेली धडपड विलक्षण प्रेरणादायी आहे. त्याविषयीच्या प्रबोधनकार आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या चर्चा, संवाद मी ऐकले आहेत. आम्हा सर्वांसाठी ही संस्कार शिदोरीच आहे. संपादक प्रबोधनकारांची ग्रंथसंपदा, लेखनशैली आणि त्यांची भूमिका महाराष्ट्राच्या पत्रकारितेचे वेगळेपण सांगणारी अशीच आहे. त्यांचे जीवन आणि लेखन यांची शैली एकरूप अशीच होती. ‘प्रबोधन’मधील अनेक विचार आजही

संदर्भनीय ठरतील, असे आहेत. प्रबोधनकारांच्या विचारांचा हा वसा आणि वारसा जतन करण्याची गरज आहे.

'प्रबोधन'मधील अप्रकाशित लेखांमुळे प्रबोधनकारांचे लेख आणि भूमिका नव्या पिढीसमोर येईल, अशी अपेक्षा आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या उभारणीत योगदान दिलेल्या महान विभूतींचे विचार, साहित्य आणि ग्रंथसंपदा वेगवेगळ्या निमित्तांनी तरुणांसमोर आणावे लागतील. यातूनच पुरोगामी विचारांचा जागर होईल. त्यासाठी 'प्रबोधन'च्या निमित्ताने सुरू झालेली मालिका यापुढेही सुरूच राहील, असा विश्वासही व्यक्त करतो.

प्रबोधनकारांच्या विचारांचा समृद्ध वारसा पुढच्या पिढीपर्यंत नेण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने घेतलेला पुढाकारही निश्चितच अभिनंदनीय आहे. मंडळाच्या पुढील उपक्रमांना तसेच 'प्रबोधन'मधील लेखसंग्रह ग्रंथनिर्मिती आणि त्याच्या प्रकाशनास मनःपूर्वक शुभेच्छा!

□□□

सुभाष देसाई
मा. मंत्री,
मराठी भाषा विभाग, उद्योग, खनिकर्म,
महाराष्ट्र राज्य

शुभेच्छा संदेश

विचारापाठोपाठ आसूड उगारणारे फक्त प्रबोधनकारच!

विसावे शतक उगवले तेच महाराष्ट्रात प्रबोधन युग घेऊन. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, न्या. महादेव गोविंद रानडे, पंडिता रमाबाई, म. जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, गोपाळ गणेश आगरकर आणि प्रबोधनकार ठाकरे. किती नावे घ्यावीत? या सर्वांनी प्रस्थापित व्यवस्थेला मुळापासून गदागदा हलवले. अन्यायाला वाचा फोडली. सत्यशोधक बनून 'बाबा वाक्यं प्रमाणम्' म्हणायला नकार दिला. या सर्वांना प्रस्थापित मुखंडांनी सुखाने जगू दिले नाही.

जसजसा समाज जागा होऊन या आधुनिक विचारांकडे कान टवकारून पाहू लागला, तसतसा समाजजीवनाच्या मानगुटीवर घट्ट बसलेला रूढीवाद मागे हटू लागला. राजा राममोहन रॉय यांच्या बंगालप्रमाणेच किंबहुना त्याहून सकस आणि रसरशीत असे हे परिवर्तन होते. हे सर्व महाराष्ट्रात घडले. युरोपात असेच घडले तेव्हा 'रेनेसान्स' म्हणून त्याला जागतिक इतिहासात चिरंतन स्थान मिळाले. ते भाग्य महाराष्ट्रपुत्रांच्या वाट्याला आले नाही. खरे तर ही क्रांती कोणत्याही कसोटीवर जागतिक महत्त्वाच्या घटनेहून कमी नव्हती. पण देशानेच जिथे महाराष्ट्राची यथोचित दखल घेतली नाही, तेथे जगाला कोण जाब विचारणार? असो.

वर नामोल्लेख केलेले समाजसुधारक थोर खरेच. पण या प्रभावळीत प्रबोधनकारांचे स्थान खास वेगळे. पुस्तकी पांडित्यापुरता त्यांचा सुधारकी बाणा थांबला नाही. मांडलेल्या प्रत्येक विचाराला दादांनी कृतीची जोड दिली. हे करताना त्याची पुरेपूर किंमत मोजली. हुंडाबंदीविरोधात त्याकाळी अनेकांनी विचार मांडले; पण प्रबोधनकार तेवढ्यावर थांबले नाहीत. वैचारिक पुरोगामित्वाला सगळेच माना डोलवत होते. पण त्याचवेळी हुंड्याची देवाणघेवाण सर्रास सुरू होती. प्रबोधनकार नुसत्या वैचारिक बदलावर संतुष्ट होण्याऱ्यांपैकी नव्हते. त्यांनी प्रत्यक्ष कृतीचा आसूड हातात घेतला. ज्या लग्नात हुंडा घेतला आहे, अशी माहिती मिळे तेथे त्यांचा आसूड कडाडलाच. अशी हुंडाग्रस्त लग्ने त्यांनी स्वतः मंडपात घुसून उधळून लावली. संख्येने या घटना कमी असतील; पण ती दहशत शेवटी कामी येत गेली. महाराष्ट्रात हुंडाबंदीचा पुरस्कार होऊ लागला.

अशा सुधारणांमुळेच आपला प्रदेश पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखला जाऊ लागला. आज तुम्ही आम्ही तसे अभिमानाने म्हणत असतो. ही ताकद प्रबोधनकारांनी दाखवून दिली. या शक्तीचा परिचय करून देण्याच्या उद्देशानं सचिन परब यांनी 'प्रबोधनकार डॉट कॉम' हे संकेतस्थळ सुरू केले आणि निष्ठेने चालविले. त्यांची साप्ताहिक 'मार्मिक'मधील लेखमाला हेच कार्य करीत आहे. 'प्रबोधन' नियतकालिक मोजकी वर्षेच प्रकाशित झाले. विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर तसे प्रबोधन मुंबई, पुणे, सातारा अशा जमेल त्या ठिकाणाहून प्रसिद्ध झाले. त्याचे एकूण ९५ अंक निघाले तरी आजमितीस ९१ अंक अभ्यासू मंडळींच्या हाती लागले. अजून चार अंकांचा शोध सुरूच आहे. १९२१ मध्ये डरकाळी फोडणाऱ्या 'प्रबोधन'चे हे शताब्दी वर्ष. राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाअंतर्गत येणाऱ्या 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ने प्रबोधन नियतकालिकामधील शतकापूर्वी प्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रह प्रकाशित करायचे ठरविले. ग्रंथ संपादनासाठी सचिन परब यांच्याखेरीज या विषयाचा ध्यास घेतलेली अन्य व्यक्ती कोण आढळणार?

आता हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. माझ्या मराठी भाषा विभागाचे हे मी भाग्य समजतो. प्रबोधनकारांचे नातू मुख्यमंत्रिपदी विराजमान असताना हे विचारधन नव्याने समोर येत आहे, हा विलक्षण योग. सुधारकांची मांदियाळी निर्माण करणारा महाराष्ट्र या ग्रंथाचे कसे स्वागत करतो, हे पाहाण्यास मी उत्सुक आहे.

□□□

डॉ. विश्वजित कदम
मा. राज्यमंत्री,
मराठी भाषा विभाग, सहकार, कृषी, सामाजिक न्याय,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ,
महाराष्ट्र राज्य

शुभेच्छा संदेश

मराठी पत्रकारितेतील 'प्रबोधन' हे सुवर्णपान

महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या 'प्रबोधन' मासिकाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'मार्फत त्यातील निवडक लेखांचा संग्रह प्रकाशित होणे हे समयोचित आहे.

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी संपादित केलेल्या 'प्रबोधन' नियतकालिकाचा पहिला अंक दिनांक १६ ऑक्टोबर १९२१ला प्रकाशित झाला होता. यंदा 'प्रबोधन'चे शताब्दी वर्ष साजरे होतेय. महाराष्ट्रातल्या पुरोगामी चळवळीत 'प्रबोधन' नियतकालिकाचे योगदान महत्त्वाचे आहे. 'प्रबोधन'च्या ६ वर्षांच्या कालावधीत ९५ अंक निघाले. ही संख्या कमी असली तरी ते महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने 'प्रबोधन पर्व' होतं. प्रबोधनकार ठाकरे यांनी 'प्रबोधन'च्या माध्यमातून जात आणि धर्माच्या नावावर सुरू असलेल्या विषमतेवर केलेला प्रहार आजही क्रांतिकारक आहे.

'प्रबोधन' मासिकाचे आणि सांगली-सातारा जिल्ह्याचे ऋणानुबंध वेगळे आहेत. सत्यशोधक चळवळीचे महत्त्वाचे विचारवंत म्हणून प्रबोधनकरांनी १०० वर्षांपूर्वी पूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला होता. त्यांचा प्रभाव पश्चिम महाराष्ट्रावर आणि त्यातही जुन्या सातारा जिल्ह्यावर होता. गावोगावी भाषणे

करून त्यांनी हा भाग पिंजून काढला होता. त्यामुळे त्यांची पुस्तके आणि 'प्रबोधन'चे अंक सांगली जिल्ह्यातल्या मिरज तालुक्यातल्या काकडवाडी गावात सापडले. 'प्रबोधन'चे तिसऱ्या वर्षातले १७ अंक हे सातारा रोड जवळच्या पाडळी या गावातून प्रसिद्ध झाले आहेत. याचे ऐतिहासिक महत्त्व माझ्या दृष्टीने वेगळे आहे. हे आमच्या परिसराशी असलेले प्रबोधनकारांचं शंभर वर्षांपूर्वीचे नाते या संग्रहातून वाचकांना कळणार आहे, याचा आनंद आहे.

शिक्षण क्षेत्रातले प्रेरणास्थान कर्मवीर भाऊराव पाटील हे प्रबोधनकार ठाकरे यांचा उल्लेख आपला गुरू म्हणून करत. 'रयत शिक्षण संस्थे'ला मदत उभी करून देण्यासाठी प्रबोधनकारांनी थेट महात्मा गांधी यांच्याकडे धाव घेतली होती. 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ने प्रबोधनकार ठाकरे यांची पुस्तके यापूर्वीच पाच खंडांत प्रकाशित केली आहेत. त्याच्या नव्या आवृत्त्याही मंडळानं आणल्या आहेत. त्यामुळे प्रबोधनकारांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहचत आहेत; मात्र प्रबोधनकारांच्या विचारांचा गाभा असलेल्या 'प्रबोधन' नियतकालिकातील लेख नव्या पिढीतील अभ्यासकांना उपलब्ध होणे, ही काळाची गरज आहे. ती या संग्रहामुळे पूर्ण होत आहे, याचा मला आनंद वाटतो. त्याग आणि संघर्षामुळे शब्दाला ताकद मिळू शकते. बहुजन समाजाला प्रेरणा आणि आत्मविश्वास देणारे 'प्रबोधन' हे समाजाभिमुख पत्रकारितेचे उदाहरण आहे. त्यामुळेच 'प्रबोधन' हे मराठी पत्रकारितेतील सुवर्णपान आहे.

प्रबोधनकारांचे नातू उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना या पुस्तकाचे प्रकाशन होणे, हा दुग्धशर्करा योग अनेक अर्थांनी महत्त्वाचा आहे. 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'च्या वतीने काढण्यात येणाऱ्या 'प्रबोधन'मधील लेखांच्या या संग्रहास माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा!

□□□

‘प्रबोधनकार डॉट कॉम’चं स्वप्न
ज्यांच्यामुळे पूर्ण झालं ते
खासदार **राहुल रमेश शेवाळे**
यांच्या मैत्रीला अर्पण

- संपादक -

|| अनुक्रमणिका ||

निवेदन : डॉ. सदानंद मोरे / १८

कृतज्ञता / १९

संपादकीय : सचिन परब / २१

वर्ष ५ : (जुलै १९२६ - १२ ऑक्टोबर १९२९)

अंक १ : संपादकीय आत्मनिवेदन / ६५

कालाय तस्मै नमः / ६७

कज्जेदलालांचे राजकारण आणि राजकारणांतले कज्जेदलाल / ७०

कायद्याशिवाय सुधारणाच नाहीं / ७६

अंक २ : राजकारण आणि मुत्सद्देगिरी / ८४

सत्यशोधक भाऊराव पाटील यांचा अल्प परिचय / ९०

पडलों, तरी माझेंच नाक वर! / १०२

श्रीयुत शिवराव महादेव परांजपे यांना जाहीर विनंती / ११६

अंक ३ : प. वा. रावबहादुर दत्तात्रय बळवंत पारसनीस यांचा जीवनवृत्तांत / ११७

सर मुडिमनचा मानमोडी कायदा / १२४

राणीच्या जाहीरनाम्याचा खरा अर्थ / १३५

अंक ४ : संपादकीय खुलासा / १४०

अंक ५ : देवळांचा धर्म आणि धर्माची देवळें / १४८

अंक ६ : केवळ धर्मासाठी! (अंक १ ला) / १६३

इतिहासाचार्य राजवाडे / १७२

अंक ७ : केमाल पाशाची सामाजिक सुधारणा / १९०

कलमबहाद्दरांस शेलापागोटें / १९३

अंक ८ : नेपोलियन बोनापार्टचीं सूत्रें / १९७

दगलबाज शिवाजी / २०२

सत्य चिरडलें जात नाहीं / २१५
अंक ९ : नांव शिवाजीचें घ्यावें । पुढें पाऊल टाकावें ।। / २१७
गोवेकरीण / २१९
स्पष्ट विचार विनिमय करा / २२५
कलमबहाद्दरांस शेलापागोटें / २२६
साभार स्वीकार / २२९
तात्पुरता खुलासा / २३०
गोव्यांतील मराठा गायक समाज / २३३
अंक १० : साप्ताहिक लोकहितवादी सुरू झाला / २५०
कलमबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / २५१
हिंन्दु आणि मुसलमान, इंग्रेजांच्या हातीं दोघांचेहि कान (लेखांक १ ला) / २५३
दादा, मला हीच ओवाळणी घाल / २५८
दिपावळीच्या फटाकड्यांचा कडकडाट / २६१
प्रबोधन-कार्यांतली विघ्ने / २६६
कालपटलाच्या आड! / २७२
जाहीर खुलासा / २७३
अंक ११-१२ : विजयादशमीचा संदेश / २७४
अज्ञातवासाची समाप्ती / २७७
इतिहासाच्या दुर्बिणीतून / २८०
हिन्दवी नीळकण्ठीझम आणि रशियन कम्युनिझम (लेखांक १ ला) / २९६
क्रान्तीचे कुलपी बाँब / ३०५
शिवशाहीची चिकित्सा / ३१४
राष्ट्रीय उत्सवाची चिकित्सा / ३२८
कलमबहाद्दरांस शेलापागोटे (पुस्तक परिचय) / ३३६
कृतज्ञतेचे अश्रू / ३४०

वर्ष ६ : (नोव्हेंबर १९२९ - ५ मार्च १९३०)

अंक १ : ''इडा पिडा टळो । बळीचे राज्य येवो'' / ३४५

जबरदस्ताचा टिकाव (लेखांक १ ला) / ३५२

राजर्षि शाहूमहाराजांची कामगिरी / ३५९

विचारक्रान्तीचे सागरमंथन / ३६४

अंक २ : जबरदस्ताचा टिकाव (लेखांक २ रा) / ३८१

हिन्दवी नीळकण्ठीझम आणि रशियन कम्युनिझम (लेखांक २ रा) / ३९५

हिन्दु विधवांचा प्रश्न / ४०१

संकीर्ण समालोचन / ४०८

अंक ३ : जबरदस्ताचा टिकाव (लेखांक ३ रा) / ४१४

धावत्या काळाचे धावरे देखावे / ४२५

अंक ४ : जबरदस्ताचा टिकाव (लेखांक ४ था) / ४४०

राजकारणी कल्पनांची उत्क्रान्ति / ४४६

फर्ग्युसन कॉलेजातील खेळखण्डोबा (लेखांक १ ला) / ४५५

कलमबहाद्दरांना शेलापागोटें (पुस्तक परिचय) / ४६२

अंक ५ : ब्लॅकहोलची कादंबरी / ४६९

लहान मुलामुलींच्या विवाहास प्रतिबंध करणारा कायदा ऊर्फ

'शारदा कायदा' कायद्याच्या ठरावाचा खुलासा! / ४७७

फर्ग्युसन कॉलेजातील खेळखण्डोबा (लेखांक २ रा) / ४८०

निवेदन

महाराष्ट्राच्या संदर्भात काही चर्चा सुरू असल्यास 'पुरोगामी महाराष्ट्र' हा शब्दप्रयोग हमखास केला जातो. हा पुरोगामी महाराष्ट्र आभाळातून पडला नाही. त्याला पुरोगामी बनवण्याच्या प्रक्रियेत काही विचारवंतांची आयुष्ये खर्ची पडली आहेत. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परंपरेत असणारे अखेरचे नाव म्हणजे अर्थातच केशव सीताराम ठाकरे हे होय. ठाकरे यांनी ज्या माध्यमातून हे कार्य केले त्याचे नाव 'प्रबोधन'. म्हणून तर ठाकरे यांची प्रबोधनकार ठाकरे अशी ओळखच निर्माण झाली. 'प्रबोधन' या नियतकालिकाचा पहिला अंक मुंबईहून २१ ऑक्टोबर १९२१ या दिवशी प्रसिद्ध झाला. म्हणजेच २०२०-२१ हे 'प्रबोधन'चे शताब्दी वर्ष होय. या शताब्दीच्या निमित्ताने सचिन परब यांनी संपादित केलेला 'प्रबोधन'मधील प्रबोधनकार' हा त्रिखंडात्मक ग्रंथ वाचकांना सुपूर्द करण्यात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभत आहे. 'प्रबोधन'चे एकूण ९५ अंक प्रकाशित झाले होते. त्यातील ९१ अंक सचिन परब यांनी परिश्रमपूर्वक उपलब्ध केले. संपादनाला दीर्घ प्रस्तावना लिहून 'प्रबोधन' व 'प्रबोधन'कार यांच्या गुणवैशिष्ट्यांवर प्रकाशझोत टाकला.

महाराष्ट्रामधील ब्राह्मणेतर चळवळीला बुद्धिप्रामाण्यवादी रूप मिळवून देण्यातही प्रबोधनकारांचा वाटा आहे. ही चळवळ 'प्रबोधन'सारख्या नियतकालिकांमुळेच यश प्राप्त करू शकली. त्यांच्यापैकी बडोद्याचे पत्रकार भगवंतराव पाळेकर यांच्या 'जागृति' साप्ताहिकातील लेखांचे संपादन मी केले असल्यामुळे असे काम किती जिकिरीचे असते, याचा मलाही अनुभव आहे. त्यामुळे सचिन परब यांचे विशेष अभिनंदन.

डॉ. सदानंद मोरे

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

कृतज्ञता

दहा वर्षांपूर्वी 'प्रबोधनकार डॉट कॉम'च्या निमित्ताने **शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे** यांच्याशी माझी तीनदा सविस्तर भेट झाली. पहिल्याच भेटीत त्यांनी प्रबोधनकारांविषयीचे खूप संदर्भ मला दिले. त्यात 'प्रबोधन'च्या पहिल्या दोन वर्षांच्या फायली होत्या. प्रबोधनकारांची पुस्तकं आधी वाचली होती; पण 'प्रबोधन'च्या अभ्यासाची ही माझी सुरवात होती. बाळासाहेबांशी प्रबोधनकारांविषयी झालेल्या चर्चेचे संदर्भ आता 'प्रबोधन'मधल्या लेखांचं संपादन करताना उमगत जात आहेत. त्यांनी दिलेली जबाबदारी आपल्या हातून काही अंशी तरी पूर्ण होत आहे, अशी भावना या क्षणी मनात आहे. यापुढेही प्रबोधनकारांविषयीचे इतरही सगळं अप्रकाशित लेखन असंच पुस्तक रूपाने वाचकांसमोर आणू शकलो, तर मी स्वतःला धन्य समजेन.

मुख्यमंत्री **उद्धव ठाकरे** यांनी माझ्यावर विश्वास ठेवून 'प्रबोधनकार डॉट कॉम'साठी संदर्भ मिळवून देण्यात वारंवार मदत केली. दहा वर्षांपूर्वीच्या या गोष्टींचं महत्त्व आता लक्षात येत आहे.

मराठी भाषा विभागाचे मंत्री **सुभाष देसाई** यांनी प्रबोधन शताब्दीच्या निमित्ताने प्रबोधनकारांच्या अप्रकाशित साहित्याचे खंड प्रकाशित करण्याची कल्पना मांडली आणि त्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली. प्रत्येक टप्प्यावर बारकाईने लक्ष घालून प्रोत्साहन दिलं, ते माझ्यासाठी फार महत्त्वाचं होतं.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे आभार. मंडळाचे अध्यक्ष **डॉ. सदानंद मोरे** यांनी माझ्यावर विश्वास दाखवला. काम करताना जिथे अडलो, तिथे मार्गदर्शन केलं. मंडळाच्या सचिव **मीनाक्षी पाटील** यांनी लक्ष घालून हे काम माझ्याकडून करून घेतलं.

साप्ताहिक चित्रलेखाचे संपादक **ज्ञानेश महाराव** यांनी त्यांच्याकडचे 'प्रबोधन'चे अंक दिलेच; पण त्यांचं प्रबोधनकारांविषयीचं लिहिणं आणि बोलणं नवी दिशा देणारं ठरलं. ते सोबत नसते, तर हे काम माझ्याकडून पूर्ण झालं नसतं.

राज्याच्या ग्रंथालय संचालक **शालिनी इंगोले** आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, भारत इतिहास संशोधन मंडळ आणि इतर ग्रंथालयांमधले 'प्रबोधन'चे अंक उपलब्ध करून दिले.

ज्येष्ठ पत्रकार **डॉ. अनंत गुरव** यांनी 'प्रबोधन'वर पीएचडीसाठी केलेल्या संघर्षाचा मी साक्षीदार आहे.

त्यांनी 'प्रबोधन'वर केलेलं संशोधन हे या विषयावरचं पहिलंच विद्यापीठीय संशोधन आहे, त्यामुळं त्याचं मोल या ग्रंथासाठी खूपच आहे. त्यांनी त्यांच्याकडचे 'प्रबोधन'चे अत्यंत दुर्मिळ अंकही मला दिले. ते मला इतक्या सहजपणे मिळाले नसते, तर कोरोनाकाळात त्या अंकांचा इतरत्र माग काढणं शक्य नव्हतं.

डॉ. विठ्ठल घुले, डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. मनीष देशमुख हे प्रबोधनकारांवर पीएचडी करणारे संशोधक आणि प्रबोधनकारांवर लेखन केलेले इतर अभ्यासक यांच्यामुळं माझं काम सोपं झालं. साधे पोस्टमन असूनही प्रबोधनकारांवर महत्त्वाचा दस्तावेज गोळा करणारे अभ्यासक **धर्मपाल कांबळे** यांची आठवण आज येणं स्वाभाविक आहे. **प्रा. महावीर मुळे** यांनी काकडवाडी, ता. मिरज, जि. सांगली येथील प्रबोधनकारांच्या साहित्याचा साठा जतन करून ठेवला, म्हणून आज ते आपल्याला वाचायला मिळालं. प्रबोधनकारांचे शिष्य **पंढरीनाथ सावंत** यांचे उपकार तर प्रबोधनकारांच्या अभ्यासकांना कधीच फेडता येणार नाहीत.

सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक **अमर हबीब** यांनी योग्य वयात माझी प्रबोधनकारांच्या साहित्याशी पहिली ओळख करून दिली. त्या साहित्याने मला माझ्या जगण्याचा रस्ता दाखवला.

अभिजित सोनावणे याने या ग्रंथासाठी हजारहून अधिक पानांच्या टायपिंगचा पसारा आवरला. **पुष्पराज पोपकर** यांनी पानांच्या लेआऊटचं किचकट काम वेळेत केलं. **संजय मोरे** यांनी कव्हरसाठी देखणं पोर्ट्रेट करून दिलं. दहा वर्षांपूर्वी 'प्रबोधनकार डॉट कॉम'साठी काम करताना मित्र **सिद्धार्थ मोकळे** याने 'प्रबोधन'चे अनेक अंक मिळवले होते. **दर्शन आंब्रे** याने अंकांचे फोटो काढण्याचं कठीण काम चिकाटीने केलं होतं.

या सगळ्यांविषयी, माझ्या कुटुंबाविषयी आणि या कामाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भाग असलेल्या प्रत्येकाविषयी मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो.

सचिन परब
१५ ऑगस्ट २०२१

संपादकीय

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे. महाराष्ट्राच्या इतिहास आणि भूगोलालाही वळण लावणारी थोर व्यक्तिमत्त्वं विसाव्या शतकात होऊन गेली, त्यातलं एक महत्त्वाचं नाव. महात्मा फुले यांच्या सत्यशोधनाचा विचार पुढं नेणारे आक्रमक विचारवंत, भिक्षुकशाहीचा कर्दनकाळ ठरलेले समाजसुधारक, हुंड्यासारख्या चालीरितींविरुद्ध उभे ठाकलेले सामाजिक कार्यकर्ते, मराठी पत्रकारितेला नवी दिशा देणारे संपादक, जातनिष्ठ इतिहास लेखनाचा फोलपणा दाखवून इतिहासाची नवी मांडणी करणारे इतिहासकार, महाराष्ट्रभर सातत्याने फिरून विद्रोहाची पेरणी करणारे ज्वलंत वक्ते, समाज सुधारणांना जनसामान्यांपर्यंत पोचवण्यासाठी सर्वस्व पणाला लावणारे नाटककार, दिग्दर्शक आणि निर्मातेही, मोजक्याच पण ठसकेबाज भूमिका करणारे लक्षवेधी अभिनेते, सार्वजनिक नवरात्रोत्सवाचे संस्थापक, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांचे गुरुतुल्य मार्गदर्शक, संयुक्त महाराष्ट्र प्रत्यक्षात आणण्यासाठी वयाच्या सत्तरीत तुरुंगवास भोगणारे आंदोलनाचे नेते, गेल्या अर्धशतकापेक्षाही जास्त काळ महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी असणाऱ्या ठाकरे कुटुंबाचे प्रेरणास्थान, याशिवाय लेखक, कवी, संगीतकार, सतारवादक, पटकथालेखक, चित्रकार, फोटोग्राफर, शिक्षक, उद्योजक, विक्रेते, जनसंपर्क अधिकारी अशा विविध भूमिकांत वावरलेल्या अफाट बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचं कर्तृत्व शब्दांत पकडणं कठीण आहे.

'प्रबोधन' शताब्दी वर्ष

प्रबोधनकारांचा जन्म १७ सप्टेंबर १८८५ आणि मृत्यू २० नोव्हेंबर १९७३चा. त्यांना ८८ वर्षांचं दीर्घायुष्य लाभलं. हा बहुरंगी माणूस एका आयुष्यात अनेक आयुष्यं जगला. पण त्यात त्यांची ओळख बनलं ते त्यांनी संपादित केलेलं 'प्रबोधन' हे नियतकालिक. २१ ऑक्टोबर १९२१ ला 'प्रबोधन' नियतकालिकाचा पहिला अंक मुंबईहून प्रकाशित झाला. त्याला २०२१च्या २१ ऑक्टोबरला शंभर वर्षं होतील. त्याला धरून २०२०च्या २१ ऑक्टोबरपासून 'प्रबोधन' शताब्दी वर्षं साजरं करण्याची कल्पना सर्वात आधी 'साप्ताहिक चित्रलेखा'चे संपादक ज्ञानेश महाराव यांनी मांडली. आदल्याच वर्षी साजऱ्या झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपादित 'मूकनायक' पाक्षिकाच्या शताब्दीची पार्श्वभूमी याला

होती. २६ ऑक्टोबर २०२०च्या 'चित्रलेखा'त प्रबोधन शताब्दीचं महत्त्व सांगताना महाराव लिहितात, 'प्रबोधनकारांचे विचार हे मानसिक प्रगतीला चालना देणारे आहेत. अत्याधुनिक विज्ञानाचं प्रतीक असलेला कम्प्युटर वापरण्याचा प्रारंभही फुलं वाहून - नारळ फोडून (सॉरी वाढवून... तेही श्रीफळ आहे ना!) करणाऱ्या आजच्या तरुणांना तर प्रबोधनकारांच्या विचारांची नितांत गरज आहे. प्रबोधनकारांचे ९०-१०० वर्षांपूर्वीचे विचार आजही आवश्यक वाटावेत, ही अभिमानाने सांगण्यासारखी बाब नाही. तथापि, स्वतःला हायफाय, सुधारणावादी, कट्टर धर्म-राष्ट्रवादी म्हणवणाऱ्यांनी आपल्या भूमिकेचा कस पाहण्यासाठी प्रबोधनकारांचे विचार अवश्य वाचावेत.'

मात्र हे वर्ष कोरोनाच्या जागतिक साथीमुळे काळवंडलेलं असल्यामुळं शताब्दी वर्ष उत्साहानं साजरं करण्यावर अनेक मर्यादा आल्या. तरीही काही प्रयत्न झाले. 'प्रबोधन' शताब्दी साजरी करण्यासाठी 'प्रबोधनकार डॉट कॉम' या वेबसाईटने १६ ऑक्टोबर २०२० पासून प्रबोधनकारांवरील ११ ऑनलाइन व्याख्यानं आयोजित केली. ज्येष्ठ पत्रकार हरीश केंची यांच्या प्रयत्नातून 'संवाद' या संस्थेने पुण्याच्या बालगंधर्व नाट्यमंदिरात २० ते २६ जानेवारी २०२१ या काळात 'प्रबोधन शतकोत्सवा'चं आयोजन केलं. त्यात विविध मान्यवरांची व्याख्याने, प्रदर्शन, लघुपटाचं प्रक्षेपण, नाट्यगीत गायन असे कार्यक्रम झाले. महाराष्ट्र सरकारच्या 'मराठी भाषा विभागा'चे मंत्री सुभाष देसाई यांनी १ डिसेंबर २०२० रोजी ऑनलाईन बैठक घेऊन हे वर्ष साजरं करण्याच्या सूचना एकत्र केल्या. त्यानुसार 'प्रबोधनमधील प्रबोधनकार- प्रबोधन नियतकालिकातील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख' हा ग्रंथ प्रकाशित होत आहे.

आजही 'प्रबोधन' महत्त्वाचं

'प्रबोधन' नियतकालिकाने घडवलेली जागृती हा महाराष्ट्राच्या समाज प्रबोधनाच्या, समाज सुधारणेच्या आणि पत्रकारितेच्या इतिहासाचा फार महत्त्वाचा भाग आहे. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीयुगाला सामोरं कसं जावं याविषयी महाराष्ट्र गोंधळलेला होता. त्याचबरोबर वेदोक्त प्रकरण आणि त्यातून निर्माण झालेला ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद टोकाला गेल्याने महाराष्ट्र हादरलेला होता. या पार्श्वभूमीवर 'प्रबोधन'चा जन्म झाला. त्यानंतरच्या म्हणजे १९२०च्या दशकातल्या जवळपास नऊ वर्षांतील महत्त्वाच्या नोंदी 'प्रबोधन'मधे आहेत. किंबहुना 'प्रबोधन' हा या सगळ्या सामाजिक आणि राजकीय घुसळणीचा एक भाग आहे. पहिल्या महायुद्धानंतर अमेरिका आणि जपान यांचा महासत्ता म्हणून होणारा उदय, असहकार आंदोलन, मोपल्यांचा मलबार येथील हिंसाचार, खिलाफत चळवळ या राष्ट्रीय पातळीवरच्या घडामोडी, तसंच १९२३च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका, त्यामुळं ब्राह्मणेतर चळवळीतल्या हालचाली, ब्राह्मणी वर्चस्ववाद्यांच्या कारवाया, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यांमुळे झालेले वाद, मुळशी सत्याग्रह, या महाराष्ट्रातल्या घडामोडींवर प्रबोधनकार ठाकरे यांच्यासारख्या महाराष्ट्रभर उत्तम जनसंपर्क असलेल्या अभ्यासू संपादकाने केलेली भाष्यं हा आज एक ऐतिहासिक दस्तावेज आहे.

तसंच लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे अशा या काळातील व्यक्तिमत्त्वांशी संबंधित ऐतिहासिक नोंदीही या लेखांमधे वाचता येतात. शिवाय स्वतः प्रबोधनकार ठाकरे यांचं चरित्रही

त्यांच्या साहित्यातून समोर येतं ते महत्त्वाचं आहे. १६ सप्टेंबर १९४५ मधे 'नवयुग' साप्ताहिकातल्या लेखात आचार्य प्र. के. अत्रे सांगतात, 'आजपर्यंत ठाकरे यांनी लिहिलेले सर्व प्रबोधक आणि तेजस्वी वाङ्मय एकत्रित करून ग्रंथरूपाने जर प्रकाशात आले तर महाराष्ट्राची सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या कामी या बंडखोर ब्राह्मणेतराने एका कालखंडात केवढी तेजस्वी कामगिरी करून ठेवलेली आहे, हे महाराष्ट्राला कळून आल्यावाचून राहणार नाही. अशा मान्यतेचा आणि गौरवाचा मुजरा महाराष्ट्र या कलमप्रभूला मोठ्या आनंदाने करील!'

महाराष्ट्रातल्या सामाजिक संघर्षाचा तपशीलवार पट 'प्रबोधन'मधून उभा राहतो, तो अधिक महत्त्वाचा आहे. 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या ग्रंथात रा. के. लेले म्हणतात, 'ठाकरे यांच्या 'प्रबोधन' पत्राची कारकीर्द अवघी पाच-सहा वर्षांचीच होती; पण तेवढ्या अल्पावधीत त्याने केलेली वृत्तपत्राच्या व सामाजिक चळवळीच्या क्षेत्रांतील कामगिरी न विसरता येण्यासारखी आहे. ठाकरे ह्यांच्या पत्राचे स्वरूप राजकीय प्रश्नांवर भर देणारे नव्हते. आगरकरांप्रमाणे सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करणारे हे पत्र होते. आगरकरांच्या सामाजिक सुधारणांचा पाया अत्यंत शास्त्रशुद्ध होता; पण त्यांनी ज्या सुधारणांचा पुरस्कार केला, त्या पांढरपेशा वर्गापुरत्याच मर्यादित होत्या. त्यांच्या सुधारणावादाचे आवाहन बहुजन समाजापर्यंत पोचले नाही. त्यांनी म. जोतीराव फुले यांनी प्रसृत केलेले विचार व केलेले कार्य ह्यांची दखल घेतल्याचेही आढळत नाही. या दृष्टीने पाहिले तर ठाकरे ह्यांनी 'प्रबोधना'द्वारा ज्या सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला त्या अधिक व्यापक होत्या... या दृष्टीने ह्यांचे 'प्रबोधन' आगरकरांच्या पुढे काही पावले गेलेले होते.'

'प्रबोधन'ने त्याच्या प्रकाशनकाळात महाराष्ट्रावर कसा प्रभाव टाकला, हे पुढे दिलेल्या समकालीन पत्रकारांचे दोन उतारे वाचून कळू शकेल. १९३०च्या दरम्यान नागपूरहून ॲड. गोविंदराव प्रधान, शांतारामपंत देशपांडे आणि गोपाळराव दळवी मिळून 'जनता' नावाचं नियतकालिक काढत. या 'जनता'ने ९ जानेवारी १९३०च्या अंकात 'प्रबोधन'विषयी आपला अभिप्राय दिलेला आहे, 'प्रबोधनाने पांच वर्षांत आपल्या निर्भीड व कल्पनारम्य लिखाणाने महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात खळबळ उडवून दिली. प्रबोधनकार ठाकरे व त्यांची तडफदार लेखणी महाराष्ट्राच्या चिरपरिचयाची आहे. त्यांची लिखाणे म्हणजे त्रस्त जिवांचे हाल पाहून भडभडून आलेल्या अंतःकरणाचे पडसाद आहेत. त्यांच्या लेखांतील प्रत्येक ओळींत व अक्षरांत धर्म व राजकारण ह्यांच्या नावाखाली छलवाद करणाऱ्या स्वार्थी सोद्यांचा निषेध दर्शविणारा जळजळीत संतापातिरेक दिसून येतो. मि. ठाकरे यांचे लिखाण म्हणजे डायनॅमिट. ते भटशाही, लाटशाही व भांडवलशाही यांच्या अभेद्य ठरलेल्या स्वार्थी तटांना आपल्या लेखणीच्या सुरुंगाने पार उडवून देते.'

आचार्य अत्रे 'प्रबोधन'विषयी लिहितात, 'अच्युतराव कोल्हटकर यांच्या 'संदेश' या पत्राने महाराष्ट्रात जी जागृती आणि खळबळ केली, तशाच प्रकारची खळबळ ठाकरे यांच्या प्रबोधनने करून सोडली, असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. सदर मासिकामध्ये पाच-सहा वर्षेपर्यंत निरनिराळ्या सामाजिक, राजकीय आणि ऐतिहासिक विषयांवर खळबळीत लेखमाला आणि निबंध लिहून ठाकरे यांनी बहुजन समाजाचे अक्षरशः प्रबोधन केले, यात संशय नाही. भिक्षुकी वृत्तीच्या आणि सनातनी दृष्टीच्या ब्राह्मण समाजावर अनेक निकराचे हल्ले त्यांनी आपल्या या पाक्षिकात चढविले, त्यामुळे 'कोदण्डाच्या

टणत्कारा'पासून ब्राह्मण विद्वानांत अप्रिय झालेले त्यांचे नाव अधिकच तीव्रतेने त्या समाजाच्या डोळ्यांत सलू लागले. तथापि, सनातनी भिक्षुक समाजात हे जितके अप्रिय ठरले, तितकेच ब्राह्मणेतर समाजामध्ये ते लोकप्रिय होऊन बसले.'

'प्रबोधन'कारांनी मराठी समाजातले अनेक दोष १०० वर्षांपूर्वी दाखवलेले आहेत, जे आजही जसेच्या तसे आहेत. हुंड्याच्या विरोधात त्यांनी आंदोलन केलं; पण आजही हुंडा थांबलेला नाही. भिक्षुकशाहीच्या विरुद्ध त्यांनी रणशिंग फुंकलं होतं; पण आज जुनीच भिक्षुकशाही नवे मुखवटे घालून तसंच शोषण करते आहे. महाराष्ट्रातील इतिहास अजूनही स्वजातिभिमानाच्या चिखलात रुतून बसलाय. महिला सक्षमीकरणाची प्रबोधनकार सांगत असलेली निकड अजूनही कायम आहे. पूर्वीइतकी तीव्र अस्पृश्यता उरली नसली तरी जातिभेदाचे दुष्परिणाम महाराष्ट्र अजूनही भोगतोच आहे. महाराष्ट्रातल्या तरुणाला 'मानसिक गुलामगिरीविरुद्ध बंड' करण्याची ताकद आजही प्रबोधनकारांचे हे लेख देऊ शकतात. बहुजनवाद, हिंदुत्ववाद, गांधीवादच नाही तर कम्युनिझमविषयी आजच्या संदर्भात विचार करताना त्यांचा दृष्टीकोन महत्त्वाचा ठरतो. मात्र हे प्रबोधनकारांचं 'प्रबोधन'मध्ये प्रकाशित झालेलं लिखाण आजच्या अभ्यासकांसाठी आणि वाचकांसाठी उपलब्ध नव्हतं. 'प्रबोधन'चे अंक अत्यंत दुर्मिळ झाले आहेत. त्यामुळं हे 'प्रबोधन' शताब्दीच्या निमित्ताने पुन्हा प्रकाशित करणं, ही काळाची गरज होती. नियतकालिकांमधे प्रकाशित लिखाण खूप महत्त्वाचं असलं तरी ते दीर्घकाळ टिकण्यात अडचणी असतात. त्या तुलनेत त्यातील लिखाण पुस्तकरूपाने एकत्र आणल्यास त्याचं जीवनमान वाढतं आणि आजच्या डिजिटल युगात तर ते कायमस्वरूपी चिरंतन होऊ शकतं.

लेख जसेच्या तसे वाचकांसमोर

'प्रबोधन'चा पहिला अंक १६ ऑक्टोबर १९२१ ला प्रकाशित झाला. पहिली दोन वर्षं म्हणजे १९२१-१९२२ आणि १९२२-१९२३ या प्रकाशन वर्षांत 'प्रबोधन' मुंबईतून पाक्षिक म्हणून नियमित प्रकाशित झालं आहे. दोन्ही वर्षी दर महिन्याच्या १ आणि १६ तारखेला 'प्रबोधन' प्रकाशित होत असे. या दोन वर्षांचे मिळून ४८ अंक उपलब्ध आहेत. तिसऱ्या प्रकाशन वर्षात 'प्रबोधन' सातारा रोडहून प्रकाशित होऊ लागलं. १९२३-१९२४ या प्रकाशन वर्षाचेही पाक्षिक म्हणून पहिले १८ अंक सलग निघाले आहेत. त्यानंतर 'प्रबोधन' दहा महिने प्रकाशित होऊ शकलं नव्हतं. चौथ्या वर्षापासून 'प्रबोधन' मासिक बनून पुण्याहून प्रकाशित होऊ लागलं. चौथ्या वर्षात एप्रिल १९२५ पासून मे १९२६ या १४ महिन्यांत 'प्रबोधन'चे १२ अंक प्रकाशित झाले. पाचव्या प्रकाशन वर्षातला पहिला अंक जुलै १९२६ चा आहे. तेव्हापासून नोव्हेंबर १९२७ पर्यंत दहा अंक प्रसिद्ध झालेत. त्यानंतर तब्बल दोन वर्षांचा खंड आहे. ऑक्टोबर १९२९ मधे पाचव्या प्रकाशन वर्षांचा ११-१२ वा जोडअंक प्रकाशित झालाय. सहाव्या प्रकाशन वर्षात नोव्हेंबर १९२९ पासून मार्च १९३० पर्यंत सलग पाच अंक प्रकाशित झाले आहेत. त्यानंतर कोणतीही घोषणा न करता 'प्रबोधन' बंद पडलं. अधिक नेमकेपणानं बोलायचं तर त्यानंतर 'प्रबोधन'चा कोणताही अंक आज उपलब्ध नाही.

याचाच अर्थ 'प्रबोधन'चे पहिल्या प्रकाशन वर्षांत २४, दुसऱ्या प्रकाशन वर्षात २४, तिसऱ्या प्रकाशन वर्षात १८, चौथ्या प्रकाशन वर्षात १२, पाचव्या प्रकाशन वर्षात १२ (एक जोडअंक असल्यामुळे खरंतर अकराच) आणि सहाव्या प्रकाशन वर्षात ५ अंक प्रकाशित झालेले आढळतात.

ऑक्टोबर १९२१ ते मार्च १९३० या ८ वर्षं ५ महिने कालावधीत 'प्रबोधन'चे ९५ अंक प्रकाशित झालेत. ग्रंथालयं आणि वैयक्तिक ग्रंथसंग्रहातून त्यापैकी ९१ अंक या ग्रंथासाठी उपलब्ध झाले. हे अंक कुठून आणि कोणाकडून मिळाले याची नोंद कृतज्ञता या शीर्षकाखाली प्रस्तावनेच्या आधी वेगळी केलेली आहे. मात्र तिसऱ्या वर्षातले १, २, ३ आणि ९ हे सातारा इथे प्रकाशित झालेले अंक उपलब्ध होऊ शकले नाहीत.

या उपलब्ध अंकांमधले प्रबोधनकार ठाकरे यांनी लिहिलेले लेख या संग्रहात समाविष्ट केलेले आहेत. यात या अंकांमधले सगळे अग्रलेख आहेतच. तो काळ संपादकाने एकहाती लेखन करण्याचा होता. प्रबोधनकारही प्रबोधनमधला बरासचा मजकूर स्वतःच लिहीत असत. त्यामुळं संपादक सोडून इतर लेखकानं लेख दिल्यास त्याचं नाव लेखाच्या वर किंवा खाली नोंदवलं जात असे. छोट्या स्फुटांना नाव देणं योग्य वाटत नसलं तरी लिहिणाऱ्याचं टोपण नाव किंवा निदान आद्याक्षरं तरी छापलेली असत. त्यामुळं असं कोणतंही नाव नसलेलं सगळं लिखाण हे संपादकानं लिहिलेलं असे. 'प्रबोधन'मधेही हा शिरस्ता पाळलेला दिसतो. सहसंपादकाचं टिपण असेल तरी त्याखाली सहसंपादक असं लिहिलेलं आढळतं. त्यामुळं एखादा सहसंपादक 'प्रबोधन'मधले अग्रलेख किंवा इतर नाव नसलेले लेख लिहीत असण्याची शक्यता कमीच असावी. त्यामुळं ज्यावर 'बायलाइन' नाही, ते सगळे लेख प्रबोधनकारांचे मानावे लागतात. या निकषानुसार प्रबोधनकारांचे असलेले लेख, स्फुट लेख, अनुवाद, श्रद्धांजलीपर टिपणं, पुस्तक परिचय, पोवाडा आणि वाचकांसाठी लिहिलेली निवेदनं या लेखसंग्रहात घेतलेली आहेत. थोडक्यात प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधे लिहिलेले जास्तीत जास्त लेख, कोणतीही निवड न करता जसेच्या तसे अभ्यासकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न यात केला आहे. त्यात कोणतेही बदल केलेले नाहीत. त्याचं वेगळं वर्गीकरणही केलेलं नाही. अंकांच्या प्रकाशनाच्या काळानुसार एकेका अंकातले लेख ओळीने मांडले आहेत. त्यातलं व्याकरण जुनंच ठेवलं आहे. कागद जुना झाल्यामुळं किंवा फाटल्यामुळं कुठं शब्द किंवा वाक्य वाचता आली नाहीत, तिथं तसं स्पष्टपणे नोंदवलेलं आहे. प्रबोधनकारांची भाषा जहाल आणि विचार टोकदार असल्यामुळं क्वचित ठिकाणी एखाद्याच्या भावना दुखावू शकतात. त्याऐवजी त्या काळाच्या आणि परिस्थितीचा संदर्भ लक्षात घेऊन या परिवर्तन घडवणाऱ्या विचारांचं महत्त्व लक्षात घ्यावं.

प्रबोधनकारांचं अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्याचा उद्देश या ग्रंथनिर्मितीमागे आहे. प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधल्या अनेक लेखांची पुस्तकं किंवा पुस्तिका छापल्या. त्यातली ज्यांची पुस्तकं आज उपलब्ध आहेत, ते 'प्रबोधन'मधले लेख या संग्रहात वगळलेले आहेत. एस. सी. मुकर्जी यांनी लिहिलेल्या 'द डिक्लाइन अँड फॉल ऑफ द हिंदूज' या इंग्रजी ग्रंथाचा प्रबोधनकार ठाकरे यांनी 'हिंदू धर्माचा ऱ्हास आणि अधःपात' या नावाने अनुवाद केला होता. तो ग्रंथ 'प्रबोधन'मधे टप्प्याटप्प्याने लेख स्वरूपात प्रकाशित झाला होता. 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'च्या प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मयाच्या चौथ्या खंडात हा संपूर्ण ग्रंथ दिलेला आहे. त्यामुळं ते लेख या संग्रहात घेतलेले नाहीत. शिवाय 'वैदिक विवाहविधीचे संशोधन', 'साताऱ्याचे दैव आणि दैवाचा सतारा', 'बजरंगी सोटा', 'टेम्प्ट्रेस', 'महामायेचे थैमान' या लेखांची झालेली पुस्तकं 'प्रबोधन प्रकाशन'ने गेल्या वर्षीच पुस्तकरूपाने उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळं त्याचाही समावेश या संग्रहात नाही. मात्र 'आई'

आणि 'देवळांचा धर्म, धर्माची देवळे' हे दोन लेख त्यातले विचार तसंच शैलीमुळे 'प्रबोधन'ची ओळख ठरले आहेत. त्यामुळे त्यांचं महत्त्व लक्षात घेता, ते लेख पुस्तकरूपाने उपलब्ध असूनही अपवाद म्हणून या संग्रहात ठेवणं आवश्यक वाटलं. 'दगलबाज शिवाजी' हा लेखही पूर्वी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला होता. मात्र तो आता वाचकांसाठी उपलब्ध नसल्याने या संग्रहात घेतलेला आहे.

डॉ. अनंत गुरव हे 'केशव सीताराम ठाकरे यांच्या 'प्रबोधन' या नियतकालिकाचा अभ्यास' या अप्रकाशित पीएच.डी. प्रबंधात लिहितात, 'प्रबोधन' नियतकालिकाची संपादकपदाची जबाबदारी सांभाळताना केशव ठाकरे यांनी अनेक टोपण नावांनी विविध विषयावर लिखाण केले आहे. केशव ठाकरे यांनी वापरलेले टोपणनाव आणि लेखाची नावे पुढीलप्रमाणे आहेत. **भारतभृत्य** - कृष्णचारित्र्यावरील दोन आक्षेप, हुंड्याची हुंडादी, **नूर** - शेवटी येळकोट केलाच पाहिजे, **ऐदी उद्योगी** - विचार तरंग, **निर्विकल्प** - ब्राह्मणांचा देव परशुराम, कालाय तस्मै नमः, चळवळ जरा गारठलेली दिसते, **हेमगर्भ** - हेमगर्भाच्या मात्रेचे वळसे, **सवाई दादोबा** - विनोदाचे पान, **हेमगर्भ सहाणपूरकर** - हेमगर्भाचे वळसे.' मात्र ही टोपणनावं प्रबोधनकारांचीच असल्याचा कोणताही भक्कम संदर्भ डॉ. गुरव देत नाहीत. ते सांगतात, 'या लेखातील टीकेचा रोख, त्यातील उपमा, समस्येवर सुचविलेल्या उपाययोजना, सरकारी नोकरांबद्दलचे मत लक्षात घेता हे केशव ठाकरे यांनी केलेले लिखाण आहे हे समजून येते.' डॉ. गुरव यांनी सांगितल्याप्रमाणे या लेखांत ठाकरे शैली आहेच. पण त्यामुळे हे लेख प्रबोधनकारांनीच लिहिल्याचं सिद्ध होत नाही किंवा गृहीतही धरता येत नाही. अनेकदा अंकातला बहुतेक मजकूर एकहाती लिहिणारे प्रबोधनकार या विषयांसाठी टोपण नाव का घेतील, याचं कारण सापडत नाही. त्यामुळं हे लेख या संग्रहात घेतलेले नाहीत.

पत्रकारितेच्या प्रबोधनाची पार्श्वभूमी

इंग्रजी शाळेत जात असताना प्रबोधनकारांनी मुंबईच्या रस्त्यावर विकत घेतलेल्या पॉकेट एन्सायक्लोपीडियातून दोन लेख मराठीत अनुवादित केले होते. त्यातला एक 'वृत्तपत्रांची उत्पत्ती' असा होता आणि तो त्या काळात लोकप्रिय असलेल्या 'करमणूक' साप्ताहिकात त्यांच्या नावासह प्रसिद्ध झाला होता. तो आज उपलब्ध नसल्यामुळे त्यात काय लिहिलं असेल याचा फक्त अंदाज बांधता येतो. प्राचीन काळातल्या ज्युलियस सीझरची ॲक्टा डायरना ही सरकारी पत्रकं, मध्ययुगातली न्यूजलेटर्स, छपाईच्या शोधानंतरच्या हॅण्डबिल, कोरंट आणि गॅझेट या वर्तमानपत्रांच्या पूर्वरूपांचा आढावा त्यात असू शकेल. १६२१ मधे इंग्लंडमधल्या अगदी प्राथमिक स्वरूपाच्या वृत्तपत्राची सुरुवात झाली, हा इतिहासही त्यात असू शकेल. ही पत्रकारितेची पार्श्वभूमी प्रबोधनची पार्श्वभूमी समजून घेतानाही उपयुक्त ठरते.

ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली तेव्हा तिने छपाईबरोबरच वर्तमानपत्रंही आणली. जेम्स ऑगस्टस हिकी या कंपनीच्या माजी नोकराने भारतातलं पहिलं वर्तमानपत्रं जन्माला घातलं. २९ जानेवारी १७८०ला 'बेंगाल गॅझेट' किंवा 'हिकीज जर्नल' हे इंग्रजी साप्ताहिक सुरू झालं. त्यानंतर १९ वर्षांनी म्हणजे १७८९ मध्ये मुंबईत 'बॉम्बे हेरॉल्ड' हे इंग्रजी पत्रं निघालं. पुढच्या वर्षी निघालेल्या 'बॉम्बे कुरियर' या इंग्रजी वृत्तपत्रात काही मराठी जाहिराती मोडी लिपीत होत्या. ही सगळी वृत्तपत्रं इंग्रजच काढत. कोलकात्यात गंगाधर भट्टाचार्य हे १८१६ मधे 'बेंगॉल गॅझेट' हे वृत्तपत्र सुरू करणारे पहिले

भारतीय ठरले. कोलकात्याजवळच्या श्रीरामपूर येथील बॅप्टिस्ट मिशनऱ्यांनी धर्मप्रसारासाठी 'समाचार दर्पण' हे बंगाली साप्ताहिक २३ मे १८१८ला सुरू केलं. ती भारतीय भाषेमधल्या पत्रकारितेची सुरुवात होती. राजा राममोहन रॉय यांच्या 'संवाद कौमुदी' आणि 'मिरात उल अखबार' यांनी या पत्रकारितेला देशी स्वरूप मिळवून दिलं.

इथे मुंबईतही इंग्रजी आणि त्यानंतर पारशांमुळे गुजराती वर्तमानपत्रं सुरू झाली होती. त्याची प्रेरणा घेऊन २० जुलै १८२८ला 'मुंबापूर वर्तमान' हे मराठी वर्तमानपत्र सुरू झालं. पण त्याच्याविषयी फारशी माहिती आज उपलब्ध नाही. विद्वान समाजसुधारक बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ला 'दर्पण' हे पाक्षिक सुरू केलं. त्यात मराठीबरोबरच इंग्रजी मजकूरही असायचा. चार महिन्यांनी ते साप्ताहिक रूपात सुरू झालं. जुलै १९४०मधे सुरू झालेलं 'मुंबई अखबार' हे साप्ताहिक पूर्ण मराठी असं पहिलं वर्तमानपत्रं ठरलं. त्यानंतर 'प्रभाकर', 'ज्ञानसिंधु', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश' अशा वर्तमानपत्रांनी मराठी वर्तमानपत्रांचा प्रवाह बळकट केला. तेव्हापासून 'प्रबोधन'च्या आरंभापर्यंतचा काळ 'इंदुप्रकाश', 'विविध ज्ञानविस्तार', 'नेटिव ओपिनियन' , 'सुबोधपत्रिका', 'दीनबंधु', 'केसरी', 'सुधारक', 'करमणूक' , 'काळ', 'दिनमित्र', 'भाला', 'राष्ट्रमत', 'संदेश', 'जागृती', 'विजय मराठा', 'मूकनायक', 'लोकमान्य' या वर्तमानपत्रांनी गाजवला.

सत्यशोधकी पत्रकारितेचा जोमदार प्रवाह

डॉ. जयसिंगराव पाटील आणि डॉ. रमेश जाधव यांनी 'निवडक विजयी मराठा' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत या काळातल्या मराठी वर्तमानपत्रांना पाच प्रवाहांमधे विभागलं आहे.

एक - केवळ लोकशिक्षण आणि मनोरंजनाचा वसा घेऊन सुरू झालेल्या बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण'पासून पहिला प्रवाह सुरू होतो.

दोन - ब्राह्मणेतरांची दुःखं अधिक प्रभावीपणे वेशीवर टांगण्याची सामाजिक बांधिलकी मानून अवतरलेला कृष्णराव भालेकरांचा 'दीनबंधु' आणि त्या परंपरेतली पत्रं.

तीन - त्याआधीचा ख्रिश्चन धर्माचा प्रसार आणि प्रचार हेच उद्दिष्ट समोर ठेवून अस्तित्वात आलेला 'ज्ञानोदय' आणि इतर ख्रिश्चन पत्रं.

चार - केवळ राजकीय स्वातंत्र्य हाच ध्यास घेऊन जन्मास आलेला लोकमान्य टिळकांचा 'केसरी' आणि त्या गटातली पत्रं.

पाच - पाचवा प्रवाह म्हणून भाऊ महाजन यांचा 'प्रभाकर' आणि गोपाळ गणेश आगरकरांचा 'सुधारक' यांचा उल्लेख करता येईल.

यात 'प्रबोधन' कोणत्या प्रवाहातलं नियतकालिक आहे? तर त्याला निर्विवादपणे यातल्या दुसऱ्या म्हणजे सत्यशोधकी प्रवाहातलं नियतकालिक मानायला हवं. पण त्याच बरोबर 'प्रभाकर' आणि 'सुधारक' यांच्या समाजप्रबोधन करणाऱ्या पत्रांच्या पाचव्या प्रवाहाशीही ते जोडलेले होते. प्रबोधनकारांवर सर्वाधिक प्रभाव असलेल्या लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांची गाजलेली शतपत्रे ही 'प्रभाकर'मध्येच प्रकाशित झाली होती आणि प्रबोधनकार आगरकरांचे कट्टर समर्थकही होते. त्याचबरोबर विदेशी ज्ञान देशबांधवांपर्यंत घेऊन जाण्यासाठी आग्रही असणाऱ्या दर्पणकारांच्या प्रवाहाचंही त्यांना वावडं नव्हतं. तसे लेख प्रबोधनमधे प्रकाशित झालेले आढळतात. मात्र 'प्रबोधन'

ख्रिश्चन पत्रांपासून फटकून राहतं आणि 'केसरी' गटाच्या प्रवाहाच्या विरुद्ध दोन हात करताना दिसतो.

महात्मा जोतीराव फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्माच्या तत्त्वज्ञानाची प्रेरणा घेऊन सत्यशोधकी नियतकालिकांचा जोमदार प्रवाह सुरू झाला. आजही या विचारांची नियतकालिके आणि अनियतकालिके प्रकाशित होत असतात. या प्रवाहाविषयी 'सत्यशोधकीय नियतकालिके' या ग्रंथात डॉ. अरुण शिंदे लिहितात, 'सत्यशोधक विचारांचा व चळवळीचा प्रचार, प्रसार करण्यासाठी १८७७ ते १९३० या काळात सुमारे साठहून अधिक नियतकालिके निघाली. 'दीनबंधु' , 'दीनमित्र', 'शेतकऱ्याचा कैवारी', 'विजयी मराठा', 'जागृति', 'राष्ट्रवीर', 'हंटर', 'प्रबोधन' , 'नवयुग', 'ब्राह्मणेतर', 'कैवारी', 'भगवा झेंडा' इत्यादी नियतकालिकांनी सत्यशोधकांचा लढा वैचारिक पातळीवर लढविला. तत्कालीन पांढरपेशांच्या नियतकालिकांपेक्षा सत्यशोधक चळवळीच्या नियतकालिकांची उद्दिष्टे, त्यांमधील लेखन, वाङ्मय व बातमीपत्रे पूर्णतः भिन्न होती. या नियतकालिकांमुळे बहुजन समाजाच्या पत्रकारितेची एक अत्यंत सकस व लोकनिष्ठ परंपरा मराठीत पहिल्यांदाच निर्माण झाली.'

या परंपरेची सुरुवात महात्मा फुलेंच्या हयातीतच झाली. त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर यांनी १ जानेवारी १८७७ ला 'दीनबंधु' हे सत्यशोधकी विचारांचं पहिलं नियतकालिक सुरू केलं. काही वर्षांचा खंड वगळता ते १९३३ पर्यंत सुरू राहिलं. १९०८ ते १९३३ या काळात तानुबाई बिर्जे या मराठा समाजातील विदुषींनी त्याचं संपादकपद भूषवलं. खुद्द जोतीरावांनी 'सत्सार' नावाच्या अनियतकालिकाचे दोन अंक प्रसिद्ध केले. त्यानंतर भालेकरांचे भाचे गणपतराव पाटील यांच्या 'दीनमित्र'ने ही लढाई पुढे नेली. पण गणपतराव यांचं अवघ्या सत्ताविसाव्या वर्षी निधन झालं. कृष्णराव भालेकरांनी आपला मुलगा गणपतरावांच्या पत्नीला दत्तक दिला. तेच दीनमित्रकार मुकुंदराव पाटील होत. भालेकरांनी गणपतरावांच्या मृत्यूमुळे बंद पडलेला 'दीनमित्र' सुरू राहावा म्हणून १९१०ला अहमदनगर जिल्ह्यातल्या सोमठाणे इथे छापखाना थाटला. पण त्या धावपळीतच त्यांचं निधन झालं. तेव्हा त्यांनी तरुण मुकुंदरावांकडून वचन घेतलं, की किमान बारा वर्षं तरी हे नियतकालिक सुरू ठेवशील. त्यानंतर अनेक संकटांना तोंड देत अत्यंत ध्येयनिष्ठेने त्यांनी १९६८ पर्यंत सलग ५७ वर्षं 'दीनमित्र' चालवलं. ज्या गावात एसटीही जात नव्हती त्या तरवडी या गावातून सर्वस्व पणाला लावून 'दीनमित्र' चालवताना विचारांवरची निष्ठा अढळ ठेवली. मृत्यूशयेवर वृत्तपत्र सुरू ठेवण्याचं वचन घेणाऱ्या आणि ते वचन पूर्ण करण्यासाठी एकहाती संघर्ष करणाऱ्या या बापलेकांचं मराठी पत्रकारितेतलं महत्त्व सर्वोच्च मानावं लागेल.

'दीनबंधु', 'सत्सार', 'दीनमित्र' पाठोपाठ आलेल्या सत्यशोधक चळवळीतल्या नियतकालिकांचा आढावा अरुण शिंदे यांच्या ग्रंथात आहे. त्यातली ऑक्टोबर १९२१ पर्यंत प्रकाशित झालेली नियतकालिकं अशी - गुलाबसिंह कौशल यांचं 'राघव भूषण' (स्थापना वर्ष १८८८), कृष्णराव भालेकरांचं 'अंबालहरी' (१८८९), दामोदर सावळाराम यंदे आणि संतुजी आवटे यांचं 'शेतकऱ्याचा कैवारी' (१८९२), भास्करराव जाधव यांचं 'मराठा दीनबंधु' (१९०२), बळवंत पिसाळ यांचं 'विश्वबंधु' (१९११), कृष्णाजी चौधरी यांचं 'सत्योदय' (१९१५), वा. रा. कोठारी यांचं 'जागरूक' (१९१७), भगवंतराव पाळेकर यांचं 'जागृति' (१९१७), अण्णासाहेब लठ्ठे यांचं 'डेक्कन रयत' (१९१६), नारायण विभुते यांचं 'सत्यप्रकाश' (१९१९), श्रीपतराव शिंदे यांचं 'विजयी मराठा' (१९२५), बाबूराव कैवारी

यांचं गरिबांचा 'कैवारी' (१९२०), दत्तोजीराव कुरणे यांचं 'भगवा झेंडा' (१९२०), सखाराम सावंत आणि दिनकरराव जवळकर यांचं 'तरुण मराठा' (१९२०), शामराव भोसले आणि सहकाऱ्यांचं 'राष्ट्रवीर' (मे १९२१). याचा अर्थ प्रबोधनची सुरवात होईपर्यंत सत्यशोधकी नियतकालिकांचा प्रवाह महाराष्ट्राच्या गावागावांत प्रभाव टाकू लागला होता. प्रामुख्याने छत्रपती शाहू महाराज आणि महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या राजाश्रयामुळे या नियतकालिकांची संख्या सतत वाढत होती.

महात्मा फुलेंच्या शिकवणुकीला अनुसरून ही नियतकालिकं समता, बंधुता आणि बुद्धिप्रामाण्य या तत्त्वांचा प्रसार करत होती. शेतकऱ्यांना सावकारांच्या, धर्माला पुरोहितशाहीच्या, देवाला पुजाऱ्यांच्या आणि समाजाला अंधश्रद्धेच्या जोखडातून सोडवण्यासाठी त्यांचा लढा होता. अस्पृश्यता आणि जातिभेदाचं उच्चाटन, धर्मचिकित्सा, इतिहासाचं पुनर्लेखन, स्त्रीपुरुष समानता असे अनेक महत्त्वाचे विचार ती मांडत होती. वैचारिक दृष्टीनं पाहता प्रबोधनकार याच प्रवाहातले होते; पण तरीही त्यांनी सत्यशोधकी विचारांपेक्षा वेगळी मतंही 'प्रबोधन'मधे मांडली. त्याचा संदर्भ घेऊन अरुण शिंदे सत्यशोधकी नियतकालिकांच्या प्रवाहामधलं 'प्रबोधन'चं स्थान निश्चित करताना सांगतात, 'हाडाचा पत्रकार असणाऱ्या के. सी. ठाकरे यांनी प्रबोधनमधून सत्यशोधक चळवळीस पूरक भूमिका घेतली. सत्यशोधक समाजाच्या विचारानुरूप लेखन केले. सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीतील दोषांवर कडक टीका करून चळवळ निकोप होण्यासाठी प्रयत्न केले. के. सी. ठाकरे व 'प्रबोधन' पूर्णतः सत्यशोधकी मतांचे नसले तरी त्यांची भूमिका व कार्य सत्यशोधक चळवळीला प्रेरक, प्रोत्साहक व दिशादर्शक ठरले, हे निर्विवाद!'

प्रबोधनकारांवरील अभ्यासाचे स्रोत

प्रबोधनकारांचं कर्तृत्व आणि विचार अभ्यासकांच्या दृष्टीने कायम दुर्लक्षित राहिले, अशी खंत नेहमी व्यक्त केली जाते. 'राजर्षि शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे' या ग्रंथात डॉ. जयसिंगराव पवार लिहितात, 'राजर्षि शाहू छत्रपतींवर आता उदंड साहित्य प्रकाशित होत आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांचीही मराठीत, इंग्रजीत अनेक चरित्रे प्रकाशित होत आहेत. त्या मानाने प्रबोधनकारांचे चरित्र मात्र उपेक्षित राहिले आहे. सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, वृत्तपत्रीय चळवळ अशा अनेक चळवळी गाजविणारे आणि समाजप्रबोधन, काव्यशास्त्रविनोद, इतिहाससंशोधन, ललितकला इत्यादी क्षेत्रांत लीलयेने संचार करणारे प्रबोधनकार महाराष्ट्रात अजूनही उपेक्षित का राहावेत, हा खरोखरच समाजशास्त्रीय संशोधनाचा विषय आहे.'

एका विचारधारेच्या चाकोरीत किंवा चौकटीत अडकणं प्रबोधनकारांना मान्य नव्हतं. त्यामुळं आजही कोणत्याही एका विचारधारेचे किंवा वादाचे चष्मे घालून त्यांच्या चरित्राकडे बघता येत नाही. ते एकाच वेळी बहुजनवादी असतात आणि त्याच वेळी हिंदुत्ववादीही असतात. प्रबोधनकार म्हणून आवडणाऱ्यांना त्यांचं ठाकरे असणं डाचत होतं आणि ठाकरे म्हणून प्रेमात असणाऱ्यांना त्यांच्या प्रबोधनकार असण्याचा विटाळ होता. त्यामुळं त्यांच्या स्वतंत्र विचारमार्गाचा अनुयायीवर्ग निर्माण झाला नाही. परिणामी महाराष्ट्राच्या प्रबोधनपर्वातल्या अभिजनी विचारवंतांप्रमाणे त्यांच्यावर अभ्यास झालेला दिसत नाही; पण सत्यशोधक परंपरेतले कृष्णराव भालेकरांपासून रा. ना. चव्हाणांपर्यंतचे अनेक विद्वान विचारवंत मोठं कर्तृत्व करूनही अभ्यासकांकडून पूर्णपणे दुर्लक्षित राहिले. तितकंही

दुर्लक्ष प्रबोधनकारांच्या बाबतीत झालं नाही. प्रबोधनकारांचे चिरंजीव शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे पुढच्या पिढ्यांपर्यंत त्यांचं नाव तरी पोहचत राहील. त्यातून त्यांच्यावर थोडाफार हा होईना पण अभ्यास होत राहिला. प्रबोधनकारांच्या विचारांचे महत्त्वाचे अभ्यासक ज्ञानेश महाराव याविषयी लिहितात, 'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे वडील, उद्धव व राज ठाकरे यांचे आजोबा, आदित्य ठाकरेंचे पणजोबा म्हणून त्यांचं नाव घेतलं जातं. ही ओळख खरीच आहे; पण पुरेशी नाही. प्रबोधनकारांच्या तडफेनेच सत्यशोधक पत्रकार म्हणून मुकुंदराव पाटील, खंडेराव बागल, श्रीपतराव शिंदे, दिनकरराव जवळकर, भगवंतराव पाळेकर, शामराव देसाई यांनी पत्रकारिता केली. पण त्यांच्या कार्याची नाही चिरा, नाही पणती अशी स्थिती आहे.'

प्रबोधनकारांच्या अभ्यासासाठी त्यांनी लिहिलेलं साहित्य हा सर्वांत महत्त्वाचा संदर्भ आहे. त्यातही त्यांचं 'माझी जीवनगाथा' हे आत्मचरित्र त्यांच्या आयुष्यातल्या साधारण १९४० पर्यंतच्या म्हणजे वाडिया मुविटोन कंपनीत नोकरीला लागेपर्यंतच्या घटना अगदी सविस्तर मांडतं. त्यात कौटुंबिक प्रसंगांची वर्णनं नाहीत, तर आठवणी सांगण्याच्या निमित्ताने महाराष्ट्राचा सामाजिक इतिहासच आहे. 'प्रबोधन'च्या प्रवासातल्या घडामोडींचं तपशीलवार वर्णन त्यात असल्याने 'प्रबोधन'च्या अभ्यासकांसाठी ते फारच महत्त्वाचं आहे. त्याशिवाय त्यांच्या 'शनिमहात्म्य' या पुस्तकात 'प्रबोधन'च्या प्रकाशन काळातल्याच घटनांचा इतिहास रंजकपणे नोंदवलेला आहे. शिवाय 'जुन्या आठवणी' या पुस्तकातही त्यांच्या आयुष्याचे काही कवडसे सापडतात.

प्रबोधनकार ठाकरे यांचं साहित्य दीर्घकाळ उपलब्ध नव्हतं. हे लक्षात घेऊन 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'ने १९९७ पासून २००७ पर्यंत प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मयाचे पाच खंड प्रकाशित केले. त्यात त्यांची महत्त्वाची पुस्तकं वाचकांना उपलब्ध झाली.

पहिला खंड - यात 'माझी जीवनगाथा', 'जुन्या आठवणी' ही आत्मचरित्रपर दोन पुस्तकं आहेत.

दुसरा खंड - 'प्रतापसिंह छत्रपति आणि रंगो बापूजी' हे महत्त्वाचं चरित्र या खंडात आहे.

तिसरा खंड - 'संगीत सीताशुद्धी', 'टाकलेलं पोर', 'संगीत काळाचा काळ', 'खरा ब्राह्मण', 'संगीत विधिनिषेध ही प्रबोधनकारांची पाच नाटकं यात आहेत.

चौथा खंड - या खंडाचं शीर्षक 'हिंदुत्व' असं आहे. 'हिंदुधर्माचे दिव्य आणि संस्कृतीचा संग्राम', 'हिंदुजनांचा ऱ्हास आणि अधःपात', 'देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे' ही तीन पुस्तकं या खंडात आहेत.

पाचवा खंड - 'ग्रामण्याचा साद्यंत इतिहास', 'भिक्षुकशाहीचे बंड', 'कोदण्डाचा टणत्कार अथवा भारत इतिहास संशोधक मंडळास उलट सलामी' हे तीन महत्त्वाचे संशोधनात्मक ग्रंथ या खंडात आहेत.

या खंडांची नवी आवृत्ती 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'ने उपलब्ध करून दिली आहे. 'प्रबोधन प्रकाशन'ने २०१९च्या प्रबोधनकार जयंतीच्या निमित्ताने सात पुस्तकांत प्रबोधनकारांचे अप्रकाशित ग्रंथ उपलब्ध करून दिलेत. त्या पुस्तकांमधे असलेली पुस्तकं - 'शनिमहात्म्य', 'वक्तृत्व कला आणि साधना', 'शेतकऱ्यांचे स्वराज्य', 'बजरंगी सोटा', 'टेम्प्ट्रेस', 'महामायेचे थैमान', 'श्रीसंत गाडगेबाबा', 'स्वाध्याय संदेश', 'कुमारिकांचे शाप', 'रायगड : यात्रा, दर्शन, माहिती', 'पावनखिंडीचा

पोवाडा', 'आई', 'सातारचे दैव का दैवाचा सतारा', 'पोटाचे बंड - माणसातले सुरवंट', 'वैदिक विवाह विधी'. याशिवाय 'दगलबाज शिवाजी' ही पुस्तिका 'नवता प्रकाशन' आणि 'सनय प्रकाशन' यांनी पुनर्प्रकाशित केली होती. प्रबोधनकारांचे संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या काळातील लेखांचा संग्रह प्रबोधन प्रकाशननेच 'घाव घाली निशाणी' या नावाने प्रकाशित केला आहे. शिवाय अजय कुदळे यांनी दैनिक मराठामधले प्रबोधनकारांचे लेख 'संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील प्रबोधन' या नावाने एकत्र केले आहेत. तसेच त्यांनी 'मार्मिक'मधे लिहिलेल्या लेखांचा संग्रह 'ऊठ मऱ्हाठ्या ऊठ' हा पुनर्प्रकाशित होऊनदेखील आता उपलब्ध नाही.

विद्यापीठीय संशोधनाच्या पातळीवर प्रबोधनकार ठाकरे यांच्यावर पीएचडीचे पाच प्रबंध झालेले आढळतात.

१. **डॉ. गोपाळ डिवरे** यांनी 'केशव सीताराम ठाकरे यांची साहित्यिक कामगिरी' या विषयावर अमरावती विद्यापीठातून १९९०ला डॉक्टरेट मिळवली.

२. परभणीच्या **डॉ. विठ्ठल घुले** यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून' 'प्रबोधनकार ठाकरे आणि त्यांचे सत्यशोधक चळवळीला योगदान' या विषयावर २००२ ला पीएचडी मिळवली. डॉ. घुले यांनी संपादित केलेले 'प्रबोधनकारांचे शनिमहात्म्य' हे पुस्तक २०१५ला प्रकाशित झालं आहे.

३. आजरा येथील **डॉ. नवनाथ शिंदे** यांनी 'शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर' इथून २००६ ला प्रबोधनकार ठाकरे यांचे 'महाराष्ट्रातील सामाजिक विचारांचे योगदान : एक समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयावर डॉक्टरेट मिळवली. त्याआधीच त्यांनी 'सत्यशोधक विचाराची तळपती तलवार प्रबोधनकार ठाकरे' हे पुस्तक लिहिलेले होते. ते आता 'प्रबोधनकार ठाकरे : कार्य आणि कर्तृत्व' या नावाने उपलब्ध आहे. शिवाय त्यांचा पीएचडीचा प्रबंध 'प्रबोधनकार ठाकरे : सामाजिक व सांस्कृतिक क्रांतीचा ज्वालामुखी' या नावाने प्रकाशित झालाय. तसंच त्यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्यावर लिहिलेला एक एकपात्री प्रयोग पुस्तकरूपाने प्रकाशित झाला आहे.

४. पत्रकार **डॉ. अनंत गुरव** यांनी 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा'तून 'केशव सीताराम ठाकरे यांच्या प्रबोधन या नियतकालिकाचा अभ्यास' या विषयावर २०१५ला पीएचडी केली आहे. हे प्रबोधन नियतकालिकावर झालेलं पहिलंच संशोधन आहे.

५. २०१७ ला **डॉ. मनीष देशमुख** यांनी 'संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठा'तून 'प्रबोधनकार उर्फ केशव सीताराम ठाकरे यांच्या कार्याचे ऐतिहासिक परीक्षण' या विषयावर डॉक्टरेट मिळवली आहे.

१९९५ च्या महाराष्ट्रातील सत्तांतरानंतर प्रबोधनकारांवरच्या अभ्यासाला अधिक चालना मिळालेली दिसते. समग्र साहित्याचे खंडही त्याच काळात प्रकाशित झाले. तर पुरोगामी पत्रकार आणि अभ्यासकांनी प्रबोधनकार उजेडात आणण्याचा प्रयत्न केला. त्यात ज्ञानेश महाराव संपादित 'प्रबोधनकारांचे ज्वलंत हिंदुत्व' हे पुस्तक विशेष गाजलं. त्याचं प्रकाशन बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते झालं. या पुस्तकात प्रबोधनकारांची दोन भाषणं आणि तीन पुस्तकं यातले उतारे संदर्भासह दिलेले आहेत. महाराव यांच्या 'ठाकरे फॅमिली' या पुस्तकातही प्रबोधनकारांविषयी बरीच माहिती आहे. प्रख्यात एकपात्री कलाकार रंगनाथ कुलकर्णी यांनी प्रबोधनकारांच्या साहित्यातले छोटे वेचे शोधून त्यांचा संग्रह 'प्रबोधनकार

ठाकरे यांच्या वैचारिक ठिणग्या' या नावाने संपादित केला. याशिवाय 'हिंदू ब्राह्मणी संस्कृतीचा मर्मभेदी दंभस्फोट' हे ज्येष्ठ पत्रकार मधू शेट्ये यांचं छोटेखानी पुस्तकही प्रबोधनकारांच्या विचारांची नव्याने ओळख करून देणारं आहे. एक साधे पोस्टमन असणाऱ्या धर्मपाल कांबळे यांनी 'प्रबोधनकार-व्यक्तित्व, कार्य, साहित्य' हे जवळपास ६०० पानांचं पुस्तक प्रबोधनकारांच्या बहुआयामी कर्तृत्वाचा तपशीलवार आढावा मांडतं. चांद शेख संपादित 'गस्त'चा २०१३चा दिवाळी अंक प्रबोधनकार ठाकरे विशेषांक होता. त्यात प्रबोधनकारांवर वेगवेगळ्या अभ्यासकांचे १५ लेख आहेत.

याशिवाय महावीर मुळे यांचं 'सत्यशोधक प्रबोधनकार आणि कर्मवीर' तसंच डॉ. जयसिंहराव पवार यांचं 'राजर्षि शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे' ही पुस्तकं प्रबोधनकारांच्या आयुष्यातला एक वेगळा तरीही महत्त्वाचा पैलू आपल्या समोर ठेवतात. 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' - रा. के. लेले, 'सत्यशोधकीय नियतकालिके' - अरुण शिंदे, 'सत्यशोधक साहित्याचा इतिहास' - श्रीराम गुंदेकर, 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' - य. दि. फडके, 'लोकमान्य ते महात्मा' - सदानंद मोरे या ग्रंथांमधे प्रबोधनकारांविषयी महत्त्वाची माहिती आणि मतं वाचता येतात.

प्रबोधनकारांचे चिरंजीव बाळासाहेब ठाकरे यांनी स्वतंत्रपणे प्रबोधनकारांविषयी लिहिलेलं नसलं तरी त्यांचं प्रबोधनकारांवरचं एक भाषण 'विचारांचं सोनं' या पुस्तकात उपलब्ध आहे. तसंच त्यांच्या 'फटकारे' या व्यंगचित्रसंग्रहाच्या सुरुवातीलाच 'मी व्यंगचित्रकार कसा झालो?' हे मनोगत छापलं आहे. त्यात प्रबोधनकारांविषयी वाचता येतं. ते अधिक तपशिलात प्रबोधनकारांचे दुसरे चिरंजीव श्रीकांत ठाकरे यांच्या 'जसं घडलं तसं' या आत्मचरित्रात आहे. तसंच प्रबोधनकारांसोबत दीर्घकाळ राहिलेले त्यांचे शिष्य पंढरीनाथ सावंत यांच्या आत्मचरित्रात 'मी पंढरी गिरणगावचा'मध्ये प्रबोधनकारांवर दोन हृद्य प्रकरणं आहेत. याशिवाय आचार्य अत्रे, धनंजय कीर यांच्या आत्मचरित्रात प्रबोधनकारांविषयी काही प्रसंग वाचता येतात. तसंच भाई माधवराव बागल, आचार्य अत्रे, वा. सी. बेंद्रे, श्री. शं नवरे, विद्याधर गोखले, य. दि. फडके, वि. वा. शिरवाडकर, नामदेव ढसाळ यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्याविषयी लेख लिहिले आहेत. त्यात काही महत्त्वाचे संदर्भ सापडतात.

प्रबोधनकार असे घडले

या सगळ्या संदर्भांमधून प्रबोधनकारांचं सापडणारं आयुष्य फारच अद्भुत आहे. ते 'प्रबोधन'मधले लेख वाचण्याआधी किंवा अभ्यासण्याआधी समजून घेणं आवश्यक ठरतं. ते इथं सविस्तर मांडता येणं शक्य नसलं तरी त्यांच्या विचारांची तसंच एक पत्रकार म्हणून जडणघडण कशी झाली, त्याचा गोषवारा दिलेला आहे.

प्रबोधनकारांची जन्मतारीख १७ सप्टेंबर १८८५. जन्मगाव पनवेल. तेव्हा हे काही मोठं शहर नव्हतं; पण खेडेगावही नव्हतं. रस्ते आणि समुद्री वाहतुकीचं केंद्र असल्यामुळे ते कोकणाचं प्रवेशद्वार होतं. त्यामुळे साधारण पेशवाईपासून तरी हे व्यापाराचं केंद्र बनलं होतं. विशेषतः तांदूळ, भाज्या, बैलगाडीची चाकं यासाठी ते प्रसिद्ध होतं. संत तुकारामही इथे मिरच्या विकायला आले होते, अशी एक कथा आहे. १८५२ सालापासून शहराला नगरपालिका आहे. ती महाराष्ट्रातल्या सर्वांत जुन्या नगरपालिकांपैकी एक आहे. तेव्हा पनवेलहून मुंबईला आतासारखं रस्त्याने जाता येत नसलं तरी पनवेल शहराजवळच्याच उलवे जेट्टीतून मुंबईतल्या भाऊच्या धक्क्याला समुद्र मार्गाने जाणं सोयीचं होतं.

प्रबोधनकारांचं पनवेल हे ना धड शहर ना धड गाव. प्रबोधनकारांचा बालपणीचा काळ ना धड एकोणिसाव्या शतकाच्या मानसिकतेचा ना धड विसाव्या शतकातला, ज्या समाजात जन्मले तो चांद्रसेनीय कायस्थ प्रभू हा पांढरपेशा असूनही ब्राह्मण किंवा ब्राह्मणांमधली पोटजात नसलेला. अशा सर्वच दृष्टीने स्थित्यंतराच्या, संक्रमणाच्या आणि सांध्यावरच्या वातारवणात ते लहानाचे मोठे झाले. आजोबा रामचंद्र ऊर्फ भिकोबा हे स्मॉल कॉज कोर्टात नोकरी करण्यासाठी पनवेलला आले आणि शेवटपर्यंत इथेच राहिले. ते देवीभक्त साधुपुरुष म्हणून प्रसिद्ध होते. पण सिद्धींच्या मागे लागून आधुनिक शाक्तांकडे सर्वसामान्यपणे आढळणारी उग्रता त्यांच्याकडे नव्हती. उलट बावीस वर्षं केलेल्या पंढरीच्या वारीमुळे निःस्पृह लोकसेवेचं व्रत त्यांनी पाळलं. त्या काळात काही लोकांनी पैसे कमावण्यासाठी प्लेगदेवी बनवली होती. ती रेड्यावर बसून गावोगाव फिरून पैसे गोळा करत असे. भिकोबा म्हणजे तात्या अंगण झाडताना ती समोर आली. त्यांनी तिचा खोटेपणा उघड करून पळवून लावलं. प्रबोधनकारांवर अंधश्रद्धेवर प्रहार करण्याचे संस्कार तेव्हाच होत होते. तात्या काशीला गेलेले असताना एका पंड्याने सांगितलं की मागतो तेवढी दक्षिणा देत नसाल तर मंत्र म्हणणार नाही. त्यामुळे तुमचे पूर्वज नरकात जातील. त्यावर तात्यांनी खड्ड्यात गेलं ते श्राद्ध म्हणत त्याला फटकारलं, 'आमच्या पूर्वजांच्या स्वर्ग नरकाच्या किल्ल्या तुझ्या हातात आहेत का?' मग पंड्याने त्यांच्यासमोर लोटांगणं घातली. हा प्रहार अंधश्रद्धेबरोबरच भिक्षुकशाहीवरही होता.

आजोबांपेक्षाही आजीने त्यांच्यावर जास्त प्रभाव टाकला. आजीला ते बय म्हणायचे. तिनं जात पात धर्म याच्या पलीकडे जाऊन साठ वर्षं सुईणीचं काम केलं. मी जन्मभर जातपात आणि हुंड्याचा विरोध केला, त्याची प्रेरणा ही बयच, असं प्रबोधनकार म्हणतात. शाळेतून परतताना एका महाराची सावली छोट्या केशवच्या अंगावर पडली. 'आता ठाकरे विटाळला', असं सोबतची ब्राह्मण मुलं ओरडू लागली. ते बयने ऐकलं. त्यांच्यातल्याच अभ्यंकर नावाच्या मुलाला पुढे ओढलं. त्याची सावली केशववर पाडली. 'महाराच्या सावलीने महार होतो, तर ब्राह्मणाच्या सावलीने आमचा दादा ब्राह्मण झाला', हे तिने त्या मुलांना सांगितलेलं तत्त्वज्ञान 'श्यामची आई'च्या आधी पंधरा वर्षं आणि दोन पावलं पुढं होतं. शिवाय तिच्या आग्रहामुळेच बलिप्रतिपदेला दिवाळी मागायला येणाऱ्या अस्पृश्य बायकांना ठाकरेंच्या घरात बोलावून त्यांच्या हातून मुलांना ओवाळलं जायचं. पुढं गावात एक महार जातीचे सुभेदार राहायला आले. इंग्रजी पाचवीत असलेले प्रबोधनकार त्यांच्या घरी जाऊन चहा पित. त्यामुळं गावात वादळ उठलं. तक्रार घेऊन येणाऱ्यांना बयने सुनावलं, 'माणसाच्या हातचा चहा पिण्यात धर्म कसा बुडतो? चहाच्या कपात बुडण्याइतका आपला धर्म म्हणजे काय टोलेगंड्याची कवडी आहे वाटतं?' धर्माची ही व्यापक संकल्पना प्रबोधनकारांना पुढं मार्गदर्शक ठरली. उतारवयात दादरला वस्तीला असताना बयचं निधन झालं. तेव्हा सगळ्या जातींचे हिंदू तसंच मुसलमान आणि ख्रिश्चनही खांदा द्यायला आले होते.

वडील सीताराम ऊर्फ बाळा असेच सगळ्यांच्या मदतीला धावून जाणारे. त्यांची नोकरी गेली तरी हरहुन्नरीपणा जपत छोटे उद्योगधंदे केले. त्याचा प्रभाव प्रबोधनकारांवर मोठा होता. त्यामुळे नऊ ते पाच मध्यमवर्गीय पांढरपेशा परोपजीवीपणाला प्रबोधनकारांनी आयुष्यभर चाट दिली. अनेक उद्योग केले. गावात आग लागली की सगळ्यात आधी सीतारामपंतच सर्वस्व विसरून धावून जायचे. गावात

प्लेग आला. तेव्हाही असेच धावून गेले; पण प्लेगने त्यांनाच गाठलं. वडील वारले तेव्हा प्रबोधनकार अवघे सोळा सतरा वर्षांचे होते; पण वडिलांपेक्षाही आई जानकीबाईंचा प्रभाव मोलाचा होता. तिने अभ्यासाचे आणि स्वाभिमानाचे संस्कार दिले. प्रबोधनकारांना एकदा लॉटरी लागली. तेव्हा वडिलांना १५ रुपये पगार असताना लॉटरीतून ७५ रुपये मिळणार होते; पण आईने ती रक्कम नाकारली. तिचा आग्रह होता की आपल्याला कष्टाचीच भाकरी हवी. पुढं प्रबोधनकारांनी राजकीय कार्यकर्ते बनून देणग्या गोळा करणाऱ्या फंडगुंडांना नेहमीच ठोकलं. हा संस्कार आजही हरामाचे हप्ते मागणाऱ्यांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी उपयोगी आहे.

ठाकरे सीकेपी असल्यामुळे लहानपणी एखाद्या ब्राह्मण शाळासोबत्याच्या घरी पाणी मागितलं की तो पाणी तपेलीतून आणायचा, ओटीच्या खाली उभा ठेवून ओंजळीत ओतायचा. मित्राची आई ती तपेलीही न धुता आत घेऊ द्यायची नाही. सुरुवातीला प्रबोधनकारांना हे कळायचं नाही. कळायला लागलं तेव्हा त्यांनी सोवळेपणाची टिंगल उडवायला सुरुवात केली. ती जन्मभर उडवली. वडिलांच्या कचेरीतल्या मंडळींनी एका ब्राह्मण बेलिफाच्या घरी धुंधुरमासानिमित्त सकाळच्या जेवणाचा कार्यक्रम होता. वडिलांसोबत केशवही गेला होता. तेव्हा ब्राह्मणांची एक पंगत. दुसरी या दोन ठाकरेंची. तर भालेराव आडनावाचे आणखी एक कारकून तिसरीकडेच बसले होते. वाढणाऱ्या बायका वरून टाकत. जेवण झाल्यावर वडील दोघांचं खरकटं स्वतःच स्वच्छ करू लागले, तेव्हा प्रबोधनकार चिडले. त्यांचा सवाल होता, 'हे ब्राह्मण आपल्याशी निराळेपणाने वागतात तर आपण त्यांना आपलेपणाने का वागवायचे?' तेव्हा त्यांचं वय होतं अवघं आठ वर्षं.

प्रबोधनकारांची पहिली चळवळ इंग्रजी शाळेत असतानाच सुरू झाली. गाडगीळ नावाचे उत्तम शिकवणारे अपंग शिक्षक होते. त्यांना हंगामी म्हणून काढून टाकण्यात आलं. त्यासाठी इंग्रजी पाचवीत शिकणाऱ्या केशवने विद्यार्थ्यांच्या सहीचा अर्ज म्युन्सिपाल्टीला केला आणि त्यांची नोकरी वाचवली. अगदी लहान असतानाच जरठ बाला विवाहाच्या पंगतीत जेवताना ते मुद्दामून 'म्हातारा इतुका न अवघे पाऊणशे वयमान' हे पद गात असत. दहा-बारा वर्षांच्या मंजू या बालमैत्रिणीचं लग्न पासष्ट वर्षांच्या म्हाताऱ्याशी लावलं म्हणून त्यांनी वयाच्या दहाव्या वर्षी लग्नाचा मांडव पेटवून दिला होता.

एक पत्रकार म्हणून जडणघडण

प्रबोधनकारांच्या आईने प्रबोधनकारांना वाचनाची आणि त्यातही वर्तमानपत्र वाचनाची सवय लावली. त्या शेजारपाजारहून वर्तमानपत्रं गोळा करून आणत. त्यात 'दैनिक मुंबई वैभव', 'इंदूप्रकाश', 'करमणूक', 'केरळ कोकीळ', 'जगत्समाचार' अशी नियतकालिकं असायची. ती सहा वर्षांच्या केशवला मोठमोठ्याने वाचावी लागत. वाचताना ताई कठीण शब्दांचे अर्थ सांगायची. शब्दोच्चार, आरोह अवरोह यावर तिचं लक्ष असायचं. उच्चार चुकला की डावा गाल लाल व्हायचा. प्रसिद्ध कादंबरीकार ह. ना. आपटे यांचं 'करमणूक' हे साप्ताहिक त्या काळात लोकप्रिय होतं. काशीबाई कानिटकर यांना लिहिलेल्या पत्रात हरिभाऊंनी 'करमणूक'चं वर्णन 'आबालवृद्ध घेतील असा पेपर' असं केलंय. त्यातच पुढं कंसात लिहिलंय ते महत्त्वाचं आहे, 'केसरी कितीही उत्कृष्ट असला तरी कुणबी, माळी घेतील असा नाही.' अशा साप्ताहिकात प्रबोधनकारांचे पहिले लेख छापून आले.

आजीबरोबर मुंबईत फिरताना फूटपाथवर त्यांना 'पॉकेट एन्सायक्लोपीडिया' नावाचं छान पुस्तक

सापडलं. त्यात खूप वेगवेगळ्या विषयांवरची मनोरंजक माहिती होती. त्यातल्या छत्र्यांची उत्पत्ती आणि वर्तमानपत्रांची उत्पत्ती अशा दोन प्रकरणांचा त्यांनी इंग्रजीतून मराठीत अनुवाद केला आणि 'करमणूक' साप्ताहिकाला पाठवून दिला. तो छापून आला आणि आपटेंनी त्यांना कौतुक करणारं पत्रही लिहिलं. इंग्रजी इयत्तांमधे शिकू लागल्यावर हे घडलंय. म्हणजे प्रबोधनकार वयाने मोठे नव्हतेच. त्या वयात त्यांचे लेख 'करमणूक'मध्ये प्रकाशित होत राहिले. प्रबोधनकारांनी या खटाटोपाचं वर्णन 'अखेर लागलीच हाताला छापशाई' असं केलंय. पण 'करमणूक'मध्ये लेख छापून येण्यावर त्यांचं समाधान झालेलं नव्हतं. त्या वयातही ते स्वतंत्र साप्ताहिक काढण्याचा विचार करत होते. ते छापायचं कसं याची कल्पना त्यांच्या हुनरबाज डोक्याला मामलेदार कचेरीत सापडली, 'मामलतदार कचेरीत नोटिसा, हुकूम, फर्माने छापण्याचे काम एक शिपाई करीत असे. कारकून जांभळ्या शाईने कागदावर हुकूम लिहायचा. ओल्या टीपकागदावर शिपाई तो कागद अलगद ठेवून लोखंडी दाबयंत्रात दाबायचा. लिहिलेला मजकूर उलटा टीपकागदावर उठायचा. मग त्यावर कोरे कागद भराभर ठेवून दाबयंत्रात दाबून तो भराभर पन्नास-पंचाहत्तर प्रती अस्सल बरहुकूम छापायचा.' हेच तंत्र वापरून प्रबोधनकारांनी एक घरगुती दाबयंत्र तयार केलं. स्वतः मजकूर लिहिला. त्याला चित्र आणि नक्षीने सजवलं. आणि 'साप्ताहिक विद्यार्थी' तयार झाला. त्याच्या पन्नास प्रती काढून शाळेत विद्यार्थी आणि शिक्षकांना वाटल्या. असे चार-सहा अंक काढले. पनवेलमधे पहिलं साप्ताहिक हे १९५०च्या सुमारास निघालं. तेही अल्पायुषी निघालं. १९६७ला 'किल्ले रायगड' हे दीर्घकाळ चाललेलं पहिलं साप्ताहिक पनवेलमधून सुरू झालं. हे लक्षात घेता एकोणिसाव्या शतकातच प्रबोधनकारांनी केलेल्या 'साप्ताहिक विद्यार्थी'च्या प्रयोगाचं मोल लक्षात येतं.

वडिलांची नोकरी सुटल्यावर प्रबोधनकार शिक्षणासाठी वडिलांच्या मामांकडे मध्य प्रदेशात देवासला राहिले. तिथल्या शाळेत परीक्षेसाठी आलेल्या शिक्षणाधिकारी आर. एच. गनियन साहेबाने त्यांना विचारलं की, 'तुला काय बनायचंय?' तेव्हा त्यांनी उत्तर दिलं होतं, 'एडिटर.' तेव्हा प्रबोधनकार १६ वर्षांचे असावेत, असा अंदाज बांधता येतो. त्या वयात त्यांचं संपादक बनणं नक्की झालं होतं. पुढं मुंबईत आल्यावर ते 'इंदुप्रकाश' या लोकप्रिय दैनिकात लिहीत होते. त्यांनी पहिली नीट नोकरी केली तीच तत्त्वविवेचक छापखान्यात असिस्टंट शास्त्री म्हणजे असिस्टंट प्रुफरीडर म्हणून. लक्ष्मण नारायण जोशी हे तेव्हाचे प्रसिद्ध कवी, लेखक, नाटककार या छापखान्यात हेडशास्त्री म्हणजे मुख्य प्रुफरिडर होते. त्यांनी प्रबोधनकारांना अल्पजीवी वर्तमानपत्रांसाठी नाव न देता लिहिण्याचं कौशल्य शिकवलं. ते काम त्यांनी पैशासाठी केलं; पण त्यातून त्यांना नियतकालिकं काढण्याची तांत्रिक अंगं समजत गेली.

आजोबांच्या मृत्यूमुळं प्रबोधनकारांना हे सोडून पनवेलला परतावं लागलं होतं. तिथं उपजीविकेसाठी त्यांना आधार मिळाला तो 'इंदुप्रकाश' छापखान्याचे दामोदरशेठ सावळाराम यंदे यांचा. साप्ताहिक 'इंदुप्रकाश'मधल्या लिखाणातून त्यांना थोडंफार उत्पन्न मिळालं. त्याच बरोबर ते ठाण्याच्या 'जगत्समाचार' या साप्ताहिकात तर अग्रलेखासह अंकातलं बहुतेक सगळं स्फुटलेखनही करत. त्यातून प्रबोधनकारांचा लेखनाचा रियाज होत होता, शिवाय बऱ्यापैकी कमाईही होत होती. पण त्यापेक्षीही मोठी कमाई होती ती म्हणजे 'केरळकोकीळ'कार कृष्णाजी नारायण आठल्ये यांचा सहवास. 'केरळकोकीळ' हे त्यांचं मासिक दीर्घकाळ लोकप्रिय होतं. आठल्ये फक्त संपादकच नव्हते, तर रसाळ

वक्ते, लोकप्रिय कवी आणि लेखक, पोर्ट्रेट चित्रकार, फोटोग्राफर अशी त्यांची बहुढंगी ओळख होती. या सगळ्याच गोष्टींचे हुन्नर त्यांनी प्रबोधनकारांना शिकवले. लोकहितवादींचं चरित्र, विवेकानंदांच्या साहित्याचा अनुवाद आणि ज्युलवर्नच्या 'टू द मून अँड बॅक' या दीर्घकथेचा अनुवाद करून विज्ञानकथा या साहित्यप्रकाराची मराठीला करून दिलेली ओळख, या तीन गोष्टी त्यांचं वेगळेपण दाखवून द्यायला पुरेशा आहेत. तितकंच प्रबोधनकार त्यांना गुरू का मानत, हे दाखवून द्यायलाही पुरेशा आहेत.

आठल्येंनी शिकवलेल्या कौशल्यांच्या जोरावर आपण आयुष्य यशस्वी करायचं, हे प्रबोधनकारांनी ठरवलं. ते त्यांनी तसं करूनही दाखवलं. आठल्ये यांनी दिलेला हा आत्मविश्वास ही गुरूने शिष्याला दिलेली सगळ्यात महत्त्वाची शिदोरी होती. 'केरळकोकीळ'चं जे वर्णन उपलब्ध आहे, त्यानुसार त्याचा प्रबोधनच्या रचनेवरही प्रभाव झाल्याचा निष्कर्ष काढता येतो. विशेषतः अनुवादित साहित्य आणि विषयाचं वैविध्य या बाबतीत तरी. आठल्ये 'केरळकोकीळ'मध्ये 'कलमबहाद्दरांस शेलापागोटे' नावाचं पुस्तक परीक्षणांचं सदर चालवायचे. त्याच नावाचं आणि स्वरूपाचं सदर प्रबोधनकारांनीही 'प्रबोधन'मध्ये लिहिलं. फेब्रुवारी १९२७च्या प्रबोधनच्या अंकात प्रबोधनकारांनी कृष्णाजी आठल्येंना श्रद्धांजली वाहिली. त्यात लिहिलंय, 'दादांची व आमची कांही विशिष्ट मते यावज्जन्म कधि जुळली नाहीत. अनेक वेळा दोघांत कडाक्याची चर्चा व भांडणेही होत. परंतु तेवढी लाट गेली की लगेच आमच्या परस्पर प्रेमादरांची गंगा पूर्ववत निर्मळ वाहू लागे... केवळ मते जुळत नाहीत किंवा दोन परस्परविरुद्ध दिशांनी विचारांचा प्रवाह वाहतो, एवढ्याच सबबीवर दक्षिणोत्तर तोंडे फिरविणाऱ्या आजकातल्या मताभिमानी बृहस्पतींना दादा आठल्ये आणि केशव ठाकरे या दोन ब्राह्मण ब्राह्मणेतर व्यक्तींतले प्रेमाचे रहस्य उलगडून दाखविणे फार कठीण काम आहे.'

याच काळात ते सांगलीकर नाटक मंडळीत कामाला लागले. तिथे त्यांचं काम तालीम मास्तरांना म्हणजे मुख्य दिग्दर्शकाला मदत करण्याचं होतं. तसंच कंपनीत आलेल्या नाटक आणि गीतांत आवश्यकतेनुसार बदल करून देण्याची जबाबदारीही होती. त्यांचं प्रसिद्ध झालेलं पहिलं पुस्तक एक नाटकच होतं, 'संगीत सीतास्वयंवर'. त्याच सुमारास त्यांनी 'ध्रुव' आणि 'मंगलतारा' ही दोन नाटकं लिहिली असल्याचं वा. सी. बेंद्रे यांनी नोंदवून ठेवलं आहे. वडिलांमुळे त्यांच्यावर नाट्यप्रेमाचे संस्कार झालेले होतेच. नाटक कंपनीत राहिल्याने त्यांच्यात नाटक मुरत गेलं. त्यातून ते एक उत्तम परफॉर्मर बनले. त्यांनी संपादकासह अनेक भूमिका आयुष्यात वठवल्या. त्या प्रत्येक ठिकाणी त्यांच्यातला परफॉर्मर जागा असायचा. क्षेत्र कुठलंही असो दणक्यात केलेलं नाट्यमय सादरीकरण हे त्यांचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य होतं. ते त्यांच्या साध्यात साध्या टिपणातही सापडतं आणि इतिहास संशोधनासारख्या रूक्ष मांडणीतही. त्यांच्या वक्तृत्वात तर ते होतंच पण नावीन्यपूर्ण आंदोलनांमधेही होतं.

सांगलीकर नाटक मंडळीत असतानाच्या पंढरपूर आणि विजापूर अशा दोन शहरांतल्या मुक्कामांचं वर्णन त्यांनी केलं आहे. विशेष म्हणजे त्या दोन्ही ठिकाणी अनोळखी असणारे त्यांचे चाहते वाचक त्यांना शोधत आल्याचे उल्लेख आहेत. म्हणजे त्यांच्या वेगवेगळ्या नियतकालिकांत लिखाणाचा एक चाहतावर्ग तयार झाला होता. ते एकाच नाटक कंपनीत राहिले नाहीत. सतत कंपन्या बदलत राहिले. या मधल्या काळात त्यांनी फेरीवाल्यांसारखे पैसे घेऊन ग्रामोफोनचे कार्यक्रम करण्याचा व्यवसायही

केला. त्यासाठी ते सहा ते सात महिने जळगावात होते. त्या काळात त्यांचा घरोबा 'प्रबोधचंद्रिका' साप्ताहिकाचे संपादक नारायण नरसिंह ऊर्फ नानासाहेब फडणीसांशी झाला. आजही १४० वर्षांपेक्षा जास्त काळ हे साप्ताहिक त्यांच्या पुढच्या पिढ्यांनी सुरू ठेवलं आहे. पण नानासाहेबांची ओळख 'काव्यरत्नावलीकार' हीच होती. कारण 'काव्यरत्नावली' मासिकाच्या ४८ वर्षांत ४५४ अंकांच्या १० हजार ४५ पानांमधे त्यांनी ६५० कवींच्या १ लाख ८३ हजार कविता प्रकाशित केल्या.

नानासाहेबांनी केलेली आणखी ऐतिहासिक गोष्ट म्हणजे त्यांनी प्रबोधनकारांमधला संपादक नेमका हेरला आणि त्यांना एक मासिक सुरू करायला लावलं. प्रबोधनकार म्हणतात तसं जळगाव ही त्यांच्या पत्रव्यवहाराची जन्मभूमी ठरली. तिथे त्यांनी 'सारथी' नावाचं मासिक सुरू केलं. प्रबोधनकार याचं श्रेय नानासाहेबांना देताना म्हणतात, 'माझ्या पत्रव्यवसायाचा श्रीगणेशा नानांनीच हात धरून काढविलेला आहे.' याचा अर्थ नानासाहेबांनी त्यांना अंक छापून तर दिलाच असेल. पण लेखन, संपादनाचे धडेही दिले असावेत. जळगावात असताना 'सारथी'चे चार-पाच अंक निघाले. त्यानंतर मुंबईत येऊन त्यांनी पुढे वर्षभर हे मासिक सुरू ठेवलं. प्रबोधनकारांच्या नोंदीनुसार हे सगळं १९०६-०७ मधे घडत होतं. याचा अर्थ प्रबोधनकार अवघ्या २१-२२व्या वर्षी संपादक बनले. सरकारच्या निर्बंधांमुळे 'सारथी' बंद करावं लागलं. त्यामुळे ते पुन्हा ग्रामोफोन आणि नाटकाच्या धंद्यात जात येत राहिले. त्याच काळात त्यांनी कोल्हापुरात काही महिने एक छापखानाही चालवला.

ही त्यांची धावपळ त्यांच्या लग्नानेच थांबवली. जानेवारी १९१० मधे त्यांचं लग्न अमरावतीतल्या अचलपूरमधील मंजुळा गुप्तेंशी झालं. संसारासाठी त्यांनी मुंबईत अनेक छोट्या-मोठ्या नोकऱ्या आणि धंदे केले. त्यात पहिल्या महायुद्धाच्या काळातल्या मंदीपुढे नाइलाज म्हणून सार्वजनिक बांधकाम खात्यातल्या इलेक्ट्रिक इंजिनिअरच्या ऑफिसात सरकारी नोकरी केली. ते करताना त्यांचे हरहुन्नरी व्यवसाय सुरूच होते. त्यात लिखाणाशी संबंधित कामं सांगायची तर 'कामगार समाचार' या साप्ताहिकात 'अगाध किती विधिकरणी' नावाची एक क्रमशः कथाही लिहिली. त्यांनी बरीच वर्षं मुंबईतल्या बातमीदारांसाठी भाषणाचं शब्दशः रिपोर्टिंग करून दिलं. त्यानंतर त्यांनी 'वक्तृत्वशास्त्र' हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. १३ मे १९१८ मधे प्रकाशित झालेला हा ग्रंथ या विषयावरचा मराठीतला पहिलाच ग्रंथ असल्यामुळे लोकमान्य टिळकांपासून अनेकांनी त्याचं कौतुक केलं. त्यानंतर काही महिन्यांनी त्यांनी समर्थ रामदासांचं छोटेखानी इंग्रजी चरित्र 'लाइफ अँड मिशन ऑफ रामदास' हे लिहिलं.

कोदंडाच्या टणत्काराचा टर्निंग पॉइंट

प्रबोधनकारांचं बुकबाजीचं व्यसन म्हणजे अफाट वाचन सुरूच होतं. पिंड आधीच चळवळ्या होता. त्यात घरातून क्रांतिकारी विचारांचे संस्कार झाले होते. त्यात लोकहितवादी, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर आणि रॉबर्ट इंगरसॉल यांच्या वाचनाने बंडखोरी अधिक पक्की झाली होती. ब्राह्मणांच्या ब्राह्मणेतरांवरच्या सामाजिक अन्यायाचा प्रतिकार करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. ती त्यांची मानसिकता पुढील शब्दांत व्यक्त झालीय, 'मी चांगला वक्ता आहे. खंबीर लेखक आहे. समाजातले अन्याय मी उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. बहुजन समाजाच्या बाजूने लिहिणारा बोलणारा खमक्या वक्ता लेखक कोणीही नाही. मी स्वस्थ का बसावे? याच सुमारास जातिवर्चस्वाच्या संदर्भाने

तर्र झालेल्या काही विद्वान ब्राह्मणश्रेष्ठींनी पांढरपेशा ब्राह्मणेतर जमातींना आणि काही ब्राह्मण जातींनाही क्षुद्रत्वाच्या किंबहुना शूद्रत्वाच्या खाईत ढकलून, त्यांना हिंदू समाजात बदनाम करण्याचा विद्वत्ताप्रचुर चंग बांधला.'

यात प्रबोधनकारांचा अंगुलीनिर्देश इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्याकडे आहे. तो काळ राजवाडेंच्या कारकिर्दीतला शिखराचा काळ होता. 'सत्यशोधकी साहित्याचा इतिहास'मधे डॉ. श्रीराम गुंदेकर लिहितात, 'वि. का. राजवाडे यांचा इतिहास आणि संशोधनावरील अधिकार सर्वमान्य होता. ते लिहितील आणि सांगतील तेच सत्य, असे मानले जात होते. त्यांच्या लेखनाचा प्रतिवाद सहसा केला जात नव्हता.' अशा राजवाडेंनी भारत इतिहास संशोधन मंडळाच्या चौथ्या वर्षाच्या अहवालात 'कायस्थदीप' या पुस्तकावर एक २२ पानी लेख छापला. त्यात चांद्रसेनीय कायस्थ प्रभू म्हणजे सीकेपी समाजाची कुळी हीन असल्याचा आरोप केला. शिवाय संभाजीराजांचा खून, पेशवा नारायणरावाचा खून, दुसऱ्या बाजीरावाच्या विरुद्ध इंग्रजांशी संगनमत आणि सातारच्या गादीचे शेवटचे छत्रपती प्रतापसिंह यांना सिंहासन सोडावं लागणं या चार गोष्टींसाठी सीकेपींना जबाबदार धरलं होतं. कायस्थ विरुद्ध चित्पावन या स्वराज्यापासूनच्या संघर्षाचा हा भाग आहे आणि त्यात कोणताही आधार नसताना सीकेपी समाजाची बदनामी केली जात आहे, हे प्रबोधनकारांच्या लक्षात आलं. त्याचा राग येऊन त्याचा प्रतिवाद करणारी भाषणं महाराष्ट्रभर दिली. त्यातून सीकेपी समाज जागा झाला. त्यांनी राजवाडेंचं संशोधन खोडून काढणारं पुस्तक लिहायचं ठरवलं. त्याचं कारण ते सांगतात, 'एका काळच्या सत्तामदाने शिरजोर झालेले ब्राह्मण पंडित, इतिहास संशोधनाच्या किंवा आखणी कसल्या तरी फिसाटाच्या पांघरुणाखाली कायस्थादी ब्राह्मणेतरांवर आणि अनेक चित्पावनेतर ब्राह्मणांवरही हल्ले चढवायला सवकलेले आहेत. त्यांचा एकदा कायमचा पुरा बंदोबस्त केलाच पाहिजे या हिरीरीने मी 'कोदण्डाचा टणत्कार हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले.' कोदण्डाचा टणत्कार अर्थात भारत इतिहास संशोधन मंडळास उलट सलामी' हे तडाखेबंद पुस्तक १७ नोव्हेंबर १९१८ला प्रकाशित झालं. आचार्य अत्रे सांगतात तसं 'राजवाडे यांच्या लिखाणाविरुद्ध किंवा त्यांच्या संशोधनाविरुद्ध ब्र काढण्याचीही त्यावेळी महाराष्ट्रातल्या विद्वानांची छाती नव्हती. पण ठाकरे यांनी ते धाडस करून राजवाडे यांच्यावर पहिले हत्यार उगारले आणि महाराष्ट्रावर एक बाँबगोळा टाकला.'

अत्यंत धारदार शैलीने आरोपांच्या चिंधड्या उडवतानाच आपल्या विधानांच्या समर्थनात आधारांची चळत उभी करायची, असं यातल्या प्रतिवादाचं स्वरूप होतं. त्यामुळे या टणत्काराने अनेकांची झोप उडाली. हा हल्लाच तसा तिखट होता. उदाहरणादाखल, 'राजवाड्यांच्या या बहुमोल कामगिरीचे त्यांच्या चित्पावनी हृदयाने पार मातेरे केले आहे, असे कष्टाने म्हणावे लागते. मेंढी दूध देते पण लेंड्यांनी घाण करते, असलाच हा प्रकार आहे. ते कष्टाळू संग्राहक आहेत, पण प्रामाणिक संशोधक नव्हेत. ते जेव्हा संशोधकी घमेंडीने संग्रहित कागदपत्रांतील मजकुराची ठरवाठरव करू लागतात आणि चिकित्सेच्या दिमाखाने विधानाची अंडी उबऊ लागतात, तेव्हा मोडतोड तांबापित्तलवाल्याने केमिकल अनालायझारयचे काम करण्याचा आव घालण्यासारखा मूर्खपणा त्यांच्या हातून घडत असतो.' या ग्रंथाच्या सहा हजार प्रती अवघ्या पंधरा दिवसात संपल्याचा दावा प्रबोधनकारांनी केला आहे. कारण प्रबोधनकारांचा हा प्रतिवाद फक्त सीकेपींचा उरलेला नव्हता, तर तो ब्राह्मणी संशोधकांच्या बदनामीमुळे

अस्वस्थ असलेल्या सगळ्याच ब्राह्मणेतरांचा झाला होता. प्रबोधनकार दुसऱ्या आवृत्तीच्या प्रास्ताविकात सांगतात तसं हे पुस्तक ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचं रहस्य अचूक पटवणारं हँडबुक बनलं होतं.

कोदण्डाच्या टणत्काराचा महाराष्ट्रावर काय प्रभाव पडला, याचं वर्णन आचार्य अत्रेंनी केलं आहे, 'या पुस्तकातील ठाकरे यांच्या बिनतोड पुराव्याला आणि कोटिक्रमाला उत्तर देण्याची खुद्द राजवाडे यांचीदेखील प्राज्ञा झाली नाही. मान खाली घालून त्यांना आपला पराभव मुकाट्याने कबूल करणे भाग पडले. सर यदुनाथ सरकार यांनी आपल्या शिवचरित्रात या पुस्तकाचा गौरवपर उल्लेख केलेला आहे. या पुस्तकाच्याच आधारावर भारत इतिहास संशोधन मंडळाची वार्षिक तैनात मुंबई सरकारने अगदी परवा-परवापर्यंत बंद केलेली होती. ठाकरे यांचा हा कोदण्डाचा टणत्कार सबंध महाराष्ट्रात कित्येक दिवस तरी गाजून राहिला होता. त्या पुस्तकाच्या हजारो प्रती महाराष्ट्रात घरोघर खपल्या आणि त्यांच्या प्रकाशाने महाराष्ट्रातील निद्रिस्त ब्राह्मणेतर जनता एकदम जागृत झाली. त्यामुळे एक निधड्या छातीचा लढवय्या लेखक आणि प्राणघातक प्रहार करणारा टीकाकार म्हणून ठाकरे यांचे नाव एकदम प्रामुख्याने महाराष्ट्रापुढे आले आणि द्रोणाचार्यांना आपल्या तेजस्वी शरसंधानाने कोदण्डधारी अर्जुनाने जसे हतवीर्य करून टाकले, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील मी मी म्हणणाऱ्या सुप्रतिष्ठित इतिहासाचार्यांना आणि संशोधकांना आपल्या कोदण्डाच्या टणत्काराने गर्भगळीत करून त्या कोदण्डधारी कायस्थ कलमबहाद्दराने त्यांच्यावर मात केली.'

राजवाडे प्रकरणाने प्रबोधनकारांच्या आयुष्यात मोठाच टर्निंग पॉइंट आणला. त्याने त्यांच्या सामाजिक क्रांतिकारक जीवनाला खऱ्या अर्थाने सुरुवात केली. महाराष्ट्रभरातल्या ब्राह्मणेतर चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी त्यांची भाषणं ठिकठिकाणी आयोजित केली. त्यांच्या कामाकडे प्रबोधनकार ओढले गेले. शिवाय त्याला छत्रपती शाहू महाराजांची प्रेरणाही होती. विशेष म्हणजे प्रबोधनकार सांगतात तसं, व्याख्यानांच्या दौऱ्यात प्रबोधनकारांना बहुजन समाजाच्या हलाखीचा आणि भिक्षुकशाही पिळवणुकीचा साक्षात्कार झाला. त्यातून आणखी दोन अभ्यासपूर्ण ग्रंथ पुढच्या काही महिन्यांत जन्माला आले. पहिला 'ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास अर्थात नोकरशाहीचे बंड' आणि दुसरा 'भिक्षुकशाहीचे बंड','कोदण्डाचा टणत्कार'मधे प्रामुख्याने ब्राह्मणी इतिहास लेखनाला धक्का दिला होता. तर या दोन ग्रंथांमध्ये बहुजनी इतिहास लेखनपद्धतीचा पाया रचला गेला.

'प्रबोधन'चा पहिला अंक

याच दरम्यान वेदोक्त प्रकरण गाजत होतं. जातवर्चस्ववादाचं हिडीस रूप महाराष्ट्र बघत होता. त्यातून प्रबोधनकारांचीही विचारचक्रं सुरू होती. त्यातून ते एका निष्कर्षापर्यंत पोचले, ब्राह्मणेतर समाजाची पहिली गरज ही भिक्षुकशाहीच्या सापळ्यातून मुक्तता ही आहे. दुसरीकडे छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेने सत्यशोधकी नियतकालिकं सुरू करण्याचा धडाका सुरू होता. प्रबोधनकारांचा तर छत्रपती शाहूंशी आत्मीय स्नेह निर्माण झाला होता. त्यातून प्रबोधनकारांनी १९२१च्या सप्टेंबर महिन्यात स्वतःचं वृत्तपत्र काढण्याचा निर्णय घेतला. सरकारी नोकरांना पुस्तक लिहिणं, छापणं किंवा वर्तमानपत्रं काढण्याची परवानगी नव्हती. त्यामुळे प्रबोधनकारांनी राजीनामा द्यायचं ठरवलं. ते तेव्हा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरच्या ऑफिसात रेकॉर्ड सेक्शनचे हेडक्लार्क म्हणून काम करत होते. ऑफिसमधले रेकॉर्ड नीट ठेवण्यात झालेला गोंधळ त्यांनीच निस्तरला होता.

त्यामुळे मुंबईचे चीफ इलेक्ट्रिकल इंजिनिअर विल्यम स्टूअर्ट मेंटिथ यांना त्यांना सोडायचं नव्हतं. त्यांनी त्यातून एक मार्ग शोधला. मुंबई इलाख्याचे चीफ सेक्रेटरी एल. रॉबर्टसन यांनी प्रबोधनकारांना भेटायला बोलावलं. त्यांच्याशी चर्चा करून चीफ सेक्रेटरींनी अपवाद म्हणून वर्तमानपत्र काढण्याची परवानगी दिली. प्रबोधनकार सांगतात, 'कर्दनकाळ ब्रिटिश सरकारच्या अमदानीत सरकारी नोकरी असताही वर्तमानपत्र काढण्याची खास परवानगी मिळविणारा मीच पहिला नि अखेरचा गव्हर्नमेण्ट सर्वण्ट आहे.'

'प्रबोधन'चा पहिला अंक १६ ऑक्टोबर १९२१ला प्रसिद्ध झाला. त्या पहिल्या अंकाचं वर्णन करायचं झालं तर ती साधारणपणे ए फोर आकाराची आठ पानं होती. पहिल्या पानावर 'प्रबोधन' असा ठसठशीत लोगो आहे. त्या अक्षरांच्या मागे सूर्य उगवताना दिसतोय. सूर्याच्या बरोबरच एका बाजूला शाईची दौत आणि लेखणी, तर दुसऱ्या बाजूला तलवार दाखवलीय. लोगोच्या खाली अगदी बारीक अक्षरात वैद्य अशी इंग्रजी सही आहे. वार्षिक वर्गणी अडीच रुपये आणि किरकोळ अंकाची किंमत दोन आणे आहे. लोगोच्या खाली इंग्रजीत प्रबोधनच्या स्वरूपाचं वर्णन केलेलं आहे. PRABODHAN - Fortnightly Journal Devoted to the Social, Religious and Moral Regeneration of the Hindu Society. त्याखाली स्वामी विवेकानंदांनी प्रसिद्ध केलेलं उपनिषदांमधलं सूत्र आहे, उत्तिष्ठित जाग्रत प्राप्य वरान्निबोधत. त्याखाली Vol. १. वर्ष १ले. No. 1. अंक १ला अशी नोंद आहे. छापण्याचं ठिकाण दादर - मुंबई असं लिहिलंय. तारीख अशी लिहिलीय. १६ ऑक्टोबर १९२१. श्रीशिवराज शक २४८. त्या काळात प्रचलित असणारा शालिवाहन शक आणि त्याची तिथी लिहिलेली नोंद मात्र केलेली नाही. पहिलं सगळं पान त्या वेळच्या पद्धतीनुसार जाहिरातींनी भरलेलं आहे. त्यात विशेष म्हणजे कोलकात्याच्या इंडियन रॅशनलिस्टिक सोसायटीची जाहिरात आहे. त्या जाहिरातीत संघटनेचं सदस्य बनण्याचं तसंच प्रकाशनं विकत घेण्याचं आवाहन आहे. त्याशिवाय परळच्या स्टार फार्मसीचं स्टार एग्युमिक्श्चर, दादरच्या मनोहर कंपनीचा निलगिरी चहा, त्याच कंपनीचा हनुमान बार सोप, राजाराम लिखिते यांनी छापलेली पुस्तकं यांच्या जाहिराती आहेत. तळाला प्रिंटलाईन आहे, Printed by C. S. Deole, at the Bombay Vaibhav Press, Servants of India Society's Home, Sandhurst Road, Girgaon, Bombay. Published by Keshav Sitaram Thackeray, 20, Miranda's Chawl, Lady Jamshetji Road, Dadar, Bombay.

दुसऱ्या पानापासून दोन उभ्या कॉलमातला मजकूर सुरू होतो. त्यात 'प्रबोधनाचे ध्येय' हा पहिला लेख एका पानापेक्षा थोडा मोठा आहे. लागूनच गो. म. चिपळूणकर यांचा 'विसाव्या शतकांतील सामाजिक व धार्मिक सुधारकांची कर्तव्ये' हा लेख आहे. त्याचा आकारही पहिल्या लेखाइतकाच आहे. त्यानंतर येणारा अग्रलेख 'उत्तिष्ठित जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' या ब्रीदवाक्यालाच मथळा करणारा आहे. तो साधारण अडीच पानांचा आहे. त्यानंतर कोणाचंही नाव नसलेले एकेका पानाचे दोन लेख आहेत. पहिल्या लेखात पार्वतीबाई आठवले यांच्या अमेरिका दौऱ्याचा गौरव आहे. त्या महर्षी कर्वेंच्या महिला शिक्षण संस्थेसाठी निधी गोळा करण्यासाठी अमेरिकेला गेलेल्या आहेत. पाठोपाठ 'विविधज्ञानविस्तारा'वर दमदार टीका केलीय. शेवटी वर्गणीदारांना वर्गणी आणि पोस्टाच्या व्यवहाराविषयी एक छोटं विनंतीवजा आवाहन केलेलं आहे. पहिल्याच अंकात प्रबोधनकारांनी आपली अंक काढण्यामागची भूमिका स्पष्ट केलीय. शिवाय महिला सक्षमीकरणासारखा विषय हाताळून

आपले अग्रक्रम सांगितलेत. तसंच ब्राह्मणी वर्तमानपत्रांना उत्तर देण्याची तयारीही दाखवून दिलीय. साधारणपणे पुढची दोन वर्षं प्रबोधनचं स्वरूप अशाच प्रकारचं आहे. त्यात पुढे स्वतंत्र कविता, अनुवाद, पुस्तक परिचय यांची भर पडलीय. तिसऱ्या अंकापासून पहिल्या पानावर जाहिरातींच्या बरोबर अंकातल्या लेखांची छोटी अनुक्रमणिकाही आहे.

'प्रबोधन' कशासाठी?

'प्रबोधन'च्या पहिल्या अंकात त्याची भूमिका स्पष्ट करणारे दोन लेख आहेत. पहिला 'प्रबोधनचे ध्येय' या नावाचा आहे. फक्त त्या लेखाचीच नाही, तर 'प्रबोधन'चीच सुरुवात कवी वसंतविहारी यांच्या कवितेने होते. त्यामुळे या कवितेशिवाय 'प्रबोधन'वरचं कोणतंही लिखाण पूर्ण होऊ शकत नाही. या कवितेत 'प्रबोधन'च्या ध्येयाचं सार आलं आहे.

समाजकार्यी स्वधर्मतत्वी सदा शिलेदार।
प्रजापक्षनवमतसंवादी राजस सरदार।
विशिष्टपंथप्रवर्तकांची व्यर्थ न करि पूजा।
व्यक्तीचा नच मिंधा, बंदा सत्याच्या काजा।।
विश्व निर्मिले जयें दयाळें त्या जगदीशाला।
भिउनी केवळ, नच अन्याला, लागे कार्याला।।

प्रबोधनकारांनी 'बुद्धिदाता आणि विघ्नहर्ता श्रीगणेशदेवाच्या चरणी अनन्यभावाने माथा ठेऊन' प्रबोधनची सुरवात केलीय. याचं काही जणांना आश्चर्य वाटू शकेल. त्याला कारण पुढच्या काळात सार्वजनिक गणेशोत्सवाला केलेला विरोध असू शकतो. प्रबोधनकारांनी अभ्यास आणि अनुभव याच्या आधारे आपली विकसित झालेली समज त्या त्या काळात मोकळेपणाने व्यक्त केली आहे. त्यामुळे एकच गोष्ट धरून ठेवणाऱ्या पोथीबाज मठ्ठ पत्रपंडितांसारखं जडत्व त्यांच्या लिखाणात नाही. उलट त्यांच्या लिखाणाला गतिमानता आहे. प्रबोधनकार अस्सल पत्रकारासारखं त्या त्या दिवसावरचं आपलं मत मांडत जातात. तापलेल्या लोखंडावर हातोडा मारून परिस्थितीला आकार देण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे ते विरोधाभासी वाटत असलं तरी महत्त्वाचं ठरतं. अर्थात त्यामुळे त्यात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखी समग्र विचारधारा सापडत नाही किंवा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि जागृतिकार भगवंतराव पाळेकरांसारखी विचारांची समतोल मांडणी मिळत नाही. तरीही प्रबोधनकारांच्या विचारांचं मोल तसूभरही कमी होत नाही. उलट परिवर्तनाच्या चळवळीत त्यांच्या विचारांनी आपलं काम चोख पार पाडलेलं दिसून येतं.

'आधी सामाजिक सुधारणा की आधी राजकीय स्वातंत्र्य', टिळक-आगरकर वादात हा मुद्दा ऐरणीवर आला. त्यानंतर महात्मा गांधींनी सामाजिक सुधारणांना स्वातंत्र्य चळवळीचा भाग बनवेपर्यंत प्रत्येक विचारवंताला त्यावर आपलं मत स्पष्टपणे मांडणं गरजेचं ठरत होतं. त्यानुसार प्रबोधनकारांनी आपलं स्पष्ट मत सामाजिक सुधारणांच्या पारड्यात टाकलेलं दिसतं. ते लिहितात, 'स्वराज्याची लॉटरी म्हणजे मूठभर मोठ्या माशांना बाकीच्या अनंत धाकट्या मासोळ्यांना गिळण्याचा सनदपट्टाच होय, यात आम्हाला संशय वाटत नाही. सामाजिक उच्चनीच भेदभाव, आपण व आपला समाज इतर सर्व समाजांपेक्षा उच्च दर्जाचा मानण्याची नाना फडणिशी आणि धार्मिक क्षेत्रांत भिक्षुकशाहीची

दिवसाढवळ्या चालविलेली भांगरेगिरी, या सर्व राष्ट्रविनाशक, समाजविध्वंसक व दास्यप्रवर्तक दोषांचा आमूलाग्र नायनाट झाल्याशिवाय स्वराज्याचे अमृत प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने जरी हिन्दुस्थानाच्या घशांत कोंबले तरी त्यापासून त्याचा लवमात्र उद्धार होणार नाही.' स्वकीयांचं राज्य आलं तरी सामाजिक धार्मिक गुलामगिरी संपत नाही, हे महाराष्ट्राचा इतिहासच सांगतो, असा दावा ते करतात. धार्मिक म्हणजेच सामाजिक गुलामगिरीचा विरोध याचा प्रबोधनचं एक महत्त्वाचं ध्येय म्हणून उल्लेख आहे.

'प्रबोधन' हा कट्टर नवमतवादी असल्याचं ते सांगतात. पुराणमतवाद्यांकडे दुर्लक्ष करण्याचा इरादा ते व्यक्त करतात. पण त्याचवेळेस हिंदू साम्राज्य उभं करण्याची महत्त्वाकांक्षाही लपवून ठेवत नाहीत. ते सांगतात, 'चालू घडीचा मामला असा आहे की सर्व भेदभावांचा सफाई संन्यास करून हिन्दुजनांनी निरलस भ्रातृभावाने आलेल्या व येणाऱ्या परिस्थितीशी तोंड देऊन आपले हिन्दुत्व, आपले आत्मराज्य, कायम ठेवून हिन्दु साम्राज्याच्या विशाळ आकांक्षांनी हिन्दी राष्ट्राचे विराट हृदय चबचबीत भिजवून सोडले पाहिजे.' त्यावेळेस 'प्रबोधन' हे कोणत्याही एका विचारधारेचा नसल्याचंही ते स्पष्ट करतात. 'प्रबोधन जितका कट्टा नवमतवादी आहे तितकाच तो पक्का स्वराज्यवादी आहे. जितका राष्ट्रीय वैभवाचा महत्त्वाकांक्षी आहे, तितकाच तो सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या पुरस्कर्त्यांचा कट्टा द्वेष्टा आहे. महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या कोणत्याही पक्षाचा प्रबोधन सांप्रदायिक नाही अथवा त्यांच्या मतांचा मिंधा गुलाम नाही. प्रबोधन सत्याचा भोक्ता आहे.' कळप कितीही उच्च ध्येयाने भारलेला का असेना, पण त्याचा भाग न बनण्याचा प्रबोधनचा निर्धार तेव्हाच्या इतर विचारवंतांपेक्षा वेगळा आहे. त्यांना विचारांनी जवळच्या असलेल्या ब्राह्मणेतर चळवळीवर किंवा हिंदू मिशनरी सोसायटीवरही ते टीका करायला मागेपुढे बघत नाहीत. त्यामुळे ते स्वतंत्रपणे एकांडे शिलेदार बनून लढत राहताना दिसतात. 'प्रबोधन'चं एक वर्ष पूर्ण झाल्यावर लिहिलेल्या लेखात ते या भूमिकेचा आढावाही घेतात. ते लिहितात, 'देशाच्या स्वराज्य मुमुक्षू अवस्थेत प्रचलित चळवळींकडे एका विशिष्ट चिकित्सक दृष्टीने पाहण्याची एक नवीन दिशा प्रबोधनाने दाखविली आहे. त्यासाठी स्वीकारलेला सत्य प्रतिपादनाचा निर्भीड बाणा महाराष्ट्रीय जनतेच्या पचनी कसा काय पडतो, याची प्रथमतः आम्हाला शंका वाटत होती. परंतु चार-पाच अंक निघतात न निघतात तोच आश्रयदात्यांच्या वाढत्या संख्येने त्या शंकेची पूर्ण निवृत्ति झाली. पुढच्या वाटचालीत प्रत्येक टप्प्यावर ते हेच विधान उद्धृत करतात आणि याचं आपण पालन करत असल्याची ग्वाही देतात. दुसऱ्या प्रकाशन वर्षाच्या शेवटच्या अंकात प्रबोधनच्या ध्येयाचा वेगळ्या शब्दांत पुनरुच्चार करताना ते लिहितात, 'देशाच्या कोनाकोपऱ्यात जरा कोठे फट झाले की त्यावर चुटकीसारखे डझनवारी कालमांचे लेख खरडण्याचे काम प्रबोधनाचे नव्हे. ठिकठिकाणची बातमीपत्रे किंवा वर्तमानसारे देण्यासाठी प्रबोधनाचा जन्म नव्हें. ते काम आमच्यापेक्षा आमची इतर भावंडे उत्कृष्टपणे पार पाडीत असतातच. देशाच्या परिस्थितीचे रंग आतांशा इतके झपाझप बदलत आहेत, की कोणता रंग खरा कोणता खोटा, हे निश्चयाने सांगणेसुद्धा धाडसाचे होऊन बसले आहे. अशा अवस्थेंत प्रत्येक महत्त्वाच्या परिस्थितीकडे चिकित्सक दृष्टीने पाहून निश्चित विचारांची निष्पत्ति कशी करावी याची दिशा दाखविण्याचे कार्यच आजपर्यंत प्रबोधन करीत आलेले आहे, आणि हेच त्याचे धोरण पुढेही अबाधित राहील.'

पहिल्या अंकातलं संपादकीय तर प्रबोधनकारांनी चांद्रसेनीय कायस्थ प्रभू म्हणजेच सीकेपी समाजाला

उद्देशूनच लिहिलेलं दिसतं. त्यांच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष काढत त्यांना देशहितासाठी उभं राहण्याचं आवाहन त्यांनी केलंय. महाराष्ट्रातल्या प्रत्येक समाजाने स्वतःची सुधारणा केली तर महाराष्ट्र सुधारेल आणि देशही सुधारेल, असं सूत्र त्यांनी मांडलंय. त्यानुसार त्यांनी मराठा समाजाने अल्प काळात केलेल्या प्रगतीचं उदाहरणही दिलंय. त्यात प्रत्येक समाजाने आपापली नियतकालिकं काढल्याचा संदर्भ त्यांनी दिलाय, 'एकट्या मराठा बांधवांनी चालविलेली साप्ताहिके व मासिके जवळजवळ २५ असून, त्यांचा लोकप्रिय 'विजयी मराठा' लवकरच दैनिक होणार आहे... त्याचप्रमाणे पांचकळशी, भंडारी, वंजारी, तेली, तांबट, लोहार, सुतार, यांनी, फार काय पण, धेड, महार, मांग यांसारख्या आमच्या अवनत देशबांधवांनी आज शेकडो वृत्तपत्रे व मासिके चालवून आपल्या ज्ञातीच्या संघशक्तीला बेसुमार थरारून सोडले आहे'. त्यात सीकेपी मागे पडला आहे आणि सीकेपी समाजातले दोष घालवून जागृती आणण्याचं काम प्रबोधन करणार असल्याचंही त्यांनी सांगितलंय. शेवटी ते सीकेपींनी आवाहन करतात, 'भरतभूमीच्या सौभाग्याकरितां, हे कायस्थ संघा, तूं जर खरा क्षत्रिय असशील तर पूर्व इतिहासाला स्मरून राष्ट्रीय कामगिरी करण्यासाठी उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत.'

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत, हे प्रबोधनचं ब्रीद असल्याचं इथे लक्षात घ्यायला हवं. प्रबोधनकार सांगतात त्याप्रमाणे सीकेपी समाजाची लोकसंख्या तेव्हा ५० हजार असावी. सीकेपी हे स्वतःला क्षत्रिय मानतात. तरीही ते पांढरपेशा आहेत. पत्रव्यवहार आणि कारकुनी हे त्यांचं परंपरागत काम आहे. पण त्यांनी शिवकाळात तलवारीनेही मोठा पराक्रम गाजवलेला आहे. अशा सीकेपी समाजात नवी जागृती निर्माण करण्याचं काम प्रबोधनकारांनी केलं. त्यासाठी त्यांना 'प्रबोधन'ची मोठी मदत झाली. 'प्रबोधन'च्या आधीही इंग्रजी बुलेटिन काढून ते सीकेपींना सुधारणांसाठी आवाहन करत होतेच. त्यांनी 'प्रबोधन'मधून सीकेपींच्या बदनामीच्या इतिहासाच्या बदनामीचा प्रत्येक प्रयत्न हाणून पाडला. त्यातून सीकेपींमध्ये पूर्वजांच्या इतिहासाविषयी स्वाभिमान उभा केला. दादाजी नरसप्रभू, बाजीप्रभू देशपांडे, रंगो बापूजी असे इतिहासातले अनेक आदर्श जवळपास शून्यातून उभे केले. शिवाय दरोडेखोरांशी सामना करताना मृत्युमुखी पडलेल्या प्रभाकर सुळे यांच्या स्मृती जपण्यासाठीही प्रयत्न केले. समाजाच्या संस्थांच्या भोंगळ कारभारावर टीका करून तो लोकाभिमुख करायला भाग पाडलं. लग्नात होणारा खर्च आणि हुंडा पद्धतीविरुद्ध आंदोलन करून त्याला आळा घातला. विधवाविवाह आणि आंतरजातीय विवाहांना चालना दिली. समाजातल्या उत्तम कवी, लेखकांना मंच मिळवून दिला. काही अपवाद वगळता देशभर पसरलेल्या सीकेपी समाजानेही त्यांना चांगला पाठिंबा दिल्याचं आढळतं. सीकेपी समाजातल्या अनेकांनी प्रबोधनचे वर्गणीदार, देणगीदार, जाहिरातदार, संपादनाच्या कामातले सहकारी, लेखक, पत्रलेखक म्हणून प्रबोधनच्या बऱ्यावाईट दिवसांत साथ दिली. असा एखाद्या समाजातला एकगठ्ठा वाचक नसताना नियतकालिक चालवणं त्या काळात व्यावहारिकदृष्ट्या शक्य नव्हतं. पूर्वायुष्यात प्रबोधनकारांना सीकेपी समाजाच्या संस्थांकडून वाईट अनुभव आलेले असतानाही त्यांनी या समाजाच्या प्रगतीसाठी लढा दिला. त्यांनी १९४५ पासून अखिल भारतीय चां. का. प्रभुहितवर्धक संस्थेसाठी 'समाजसेवा' हे मासिक पंधरा वर्षांपेक्षा जास्त काळ चालवल्याचा संदर्भ सापडतो. सीकेपींनी राजकारणात सक्रिय व्हावं, असा आग्रह त्यांनी प्रबोधनमधे सातत्याने मांडला आहे. तोच विचार बाळासाहेब ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबाने यांनी प्रत्यक्षात आणलेला

दिसतो. त्यांनाही सीकेपी समाजातून कार्यकर्ते अनेक मिळाले पण नेते फारच कमी मिळाले. त्यात उदाहरणादाखल डॉ. हेमचंद्र गुप्ते, सतीश प्रधान, आनंद दिघे किंवा सध्याचे आमदार विलास पोतनीस यांचा उल्लेख करता येईल. काँग्रेसचे माजी खासदार शरद दिघे हे आणखी एक उदाहरण.

'प्रबोधन'चा प्रवास : दादर ते सातारा

प्रबोधनकारांनी लग्न करून १९१०ला दादरमध्ये बिऱ्हाड थाटलं. तेव्हा दादर टुमदार गावच होतं. आज मुंबईचं केंद्र म्हणून दादरच्या झालेल्या विकासात प्रबोधनकारांचं महत्त्वाचं योगदान आहे. गरिबीमुळे प्रबोधनकारांना पनवेलनंतर बारामती, मध्य प्रदेशातलं देवास, कल्याण, कोल्हापूर, सातारा, पुणे, कर्जत, भिवंडी अशा निरनिराळ्या गावांत आपला संसार थाटावा लागला. शेवटी ते वांद्र्याला आले. पण दादर हीच त्यांची खरी कर्मभूमी होती. 'प्रबोधन'ची जन्मभूमीही दादर हीच होती. 'प्रबोधन'च्या कामासाठी प्रबोधनकारांनी दादरमधल्याच खांडके बिल्डिंगमध्ये एक ब्लॉक भाड्याने घेतला होता. तिथे अनेक तरुण प्रबोधनकारांकडे ओढले गेले. अभ्यास करण्यासाठी ते दिवसभर तिथेच असत. त्यातून 'स्वाध्यायाश्रम' नावाची संस्था सुरू झाली. त्यात प्रबोधनकार दर रविवारी वक्तृत्वशास्त्राच्या प्रशिक्षणाचे वर्ग घेत. शिवाय इतरही विद्वानांची भाषणं, कविता वाचन, गायन, असे कार्यक्रम आयोजित केले जात. 'स्वाध्यायाश्रमा'च्या तरुणांनीच 'गोविंदाग्रज मंडळ' स्थापन करून पाच पुस्तकंही काढली. त्यात प्रबोधनकारांच्या काही लेखांचा संग्रह असणारा 'स्वाध्याय संदेश'ही होता. शिवाय दर पंधरवड्याला प्रकाशित होणाऱ्या प्रबोधनच्या अंकांचं पॅकिंग करण्यासाठी २०-२५ तरुण रात्र जागवत. त्यातल्या चर्चा आणि वादविवादांमुळे 'प्रबोधन नाईट' गाजत असे.

या तरुणांनी 'हुंडा विध्वंसन संघ' स्थापन करून मुंबईत एक वादळच निर्माण केलं होतं. प्रबोधनकार तर वयाच्या २२ व्या वर्षापासून म्हणजे १९०७ पासून हुंडाविरोधी प्रचार करत होते. या संघटनेने प्रामुख्याने सीकेपी समाजातली हुंडा घेऊन होणारी लग्नं उधळून लावली. हुंडा निषेधाची गाणी गात मोठ्या मिरवणुका काढल्या. गाढवाच्या वराती घेऊन लग्नाच्या ठिकाणी हल्लाबोल केला. १९२२-२३च्या लग्नसराईत २०-२५ लग्नात 'हुंडा विध्वंसन संघा'ने धुमाकूळ घातला होता. या आंदोलनाला 'प्रबोधन'चा सक्रिय पाठिंबा होता. खरं तर 'प्रबोधन'च्याच नेतृत्वात हे सुरू होतं. हुंडा विरोधामागचा विचार 'प्रबोधन'नेच समजावून सांगितला होता. हुंडा घेऊन लग्न करणाऱ्यांची नावं 'प्रबोधन'मध्येच प्रसिद्ध होत. संघाच्या कारवायांच्या बातम्याही छापून येत. शिवाय हुंडा न घेता लग्न करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी 'वधू पाहिजे'च्या जाहिरातीही प्रबोधनमध्ये छापून येत. त्यात संपर्कासाठी प्रबोधन कचेरी असा पत्ता दिलेला असे. पुढे प्रबोधनकार अचानक साताऱ्याला गेल्यामुळे हे सगळे उपक्रम बंदच पडले. पण त्याची पुण्याई कायम राहिली. वा. सी. बेंद्रे सांगतात तसं त्यांनी आंदोलनं करून हुंड्याच्या व्यापारी मनोवृत्तीपासून सीकेपी समाजाला परावर्तित केलं. तर श्री. शं. नवरे सांगतात, 'पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काढलेल्या 'समाज समता संघा'ला निष्ठावंत कार्यकर्ते पुरविण्याचे काम मुख्यतः स्वाध्यायाश्रम याच संस्थेने केले.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत सुरुवातीच्या काळात अनेक सीकेपी तरुण सक्रिय दिसतात. त्याची तयारी प्रबोधनकारांनी करून घेतली होती.

याच काळात प्रबोधनकारांनी सरकारी नोकरी सोडली. त्यासाठी प्रबोधनकारांच्या आईचा विशेष आग्रह होता. त्या नेहमी सांगत की वेळ आली तर भीक माग पण इंग्रज सरकारची नोकरी करू नकोस.

सरकारने परवानगी दिल्यामुळे 'प्रबोधन' सुरू ठेवण्यात तांत्रिकदृष्ट्या अडचण काहीच नव्हती. पण प्रबोधनकारांच्या मनाला ते पटत नव्हतं. ते लिहितात, 'एकीकडे नोकरी नि दुसरीकडे बहुजन समाज जागृतीचे कार्य, अशा परस्परविरुद्ध दोन टोकांवरच्या डगरीवरचा कसरती खेळ माझ्या स्वभावाला पटेनासा झाला. सद्‌सद्विवेकबुद्धी सारखी टोचण्या देऊ लागली. सभांतून सरकारी धोरणांवर टीका करायची आणि प्रबोधनात मानसिक दास्याविरुद्ध बंड या विषयावर स्पष्टोक्तीची लेखमाला लिहायची, हे मला सहन होईना.' सरकारच्या नोकरीला लाथ मारून बहुजन समाजाच्या सेवेला वाहून घे, असं त्यांच्या स्वाभिमानी मातोश्री सांगत होत्याच. प्रत्यक्ष राजीनाम्याची तारीख 'शनिमहात्म्य' या पुस्तकात येते, ती अशी, '१६ डिसेंबर १९२१ पासून मानसिक दास्याविरुद्ध बण्ड ही लेखमाला सुरू झाली आणि तिचा ५ वा अग्रलेखांक ता. १ मार्च १९२२ ला प्रसिद्ध होण्यापूर्वीच ता. १० फेब्रुवारी १९२२ रोजी दुपारी बरोबर १२ वाजता, राहू, शनि आणि मंगळ या त्रिकुटाचे मेतकूट जमताच, अपमानाच्या क्षुल्लक सबबीवर मी ताडकन सरकारी नोकरीच्या दास्याची जाडजूड रौप्यशृंखला तोडून, तज्जन्य मानसिक दास्याविरुद्ध प्रत्यक्ष बंड केले.' केवळ आपले विचार आणि कृती यात तफावत राहू नये, यासाठी अडीचशे रुपये मासिक पगाराची नोकरी सोडून पुन्हा गरिबीत उडी घेणारा संपादक विरळाच. त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाने केलेल्या त्यागाची दखल मात्र इतिहासाने हवी तशी घेतलेली नाही.

'प्रबोधन'ला मिळणाऱ्या प्रतिसादामुळे त्यांना 'प्रबोधन'ची पानं आणि प्रती वाढवण्याची इच्छा होती. स्वतंत्र छापखाना नसल्यामुळे त्यांच्या या मनसुब्यात अडचणी येत होत्या. छत्रपती शाहूंनी त्यासाठी २० हजार रुपये देणगी आणि २० हजार रुपये बिनव्याजी कर्ज देण्याची तयारी दाखवली होती. पण त्यांच्या निधनामुळे ते होऊ शकलं नाही. त्यानंतर 'प्रबोधन'चे एक चाहते आत्माराम चित्रे यांनी काळबादेवी इथे छापखानाही उभारून दिला. तिथे कामही सुरू झालं. पण महिन्याभरातच चित्रेंचंही निधन झालं. त्यामुळे तोही प्रयत्न फोल ठरला. ही कहाणी प्रबोधनमध्ये छापून येताच साताऱ्यातील उद्योजक धनजीशेठ कूपर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना प्रबोधनकारांकडे पाठवले. कर्मवीरांना गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पैसे हवे होते. त्यासाठी किर्लोस्कर कंपनीतल्या अनुभवाच्या जोरावर त्यांनी कूपर यांच्या गुंतवणुकीच्या आधारे एक नांगरांचा कारखाना सातारा रोड स्टेशनजवळ पाडळी गावात उभारला होता. मॉण्टेंग्यू चेम्सफर्ड सुधारणांमुळे देशात १९२३ला लोकल कॉन्सिलच्या निवडणुका होणार होत्या. त्या कूपरना लढवायच्या होत्या. त्यासाठी प्रबोधनकारांसारखा हरहुन्नरी आणि प्रसिद्ध पत्रकार आपल्यासोबत असला तर उत्तम, असा विचार करून कूपर यांनी प्रबोधनकारांसमोर एक उत्तम प्रस्ताव ठेवला. हवा तसा छापखाना, हवा तितका पैसा, राहण्यासाठी घर, कारखान्याच्या जाहिरात खात्याची जबाबदारी, 'प्रबोधन'च्या धोरणात लुडबुड नाही, सन्मानवेतन म्हणून दरमहा १५० रुपये, शिवाय छापखान्याच्या निव्वळ नफ्यात अर्धा वाटा. त्याला भुलून प्रबोधनकारांनी प्रबोधनचा कारभार साताऱ्याला हलवण्याचा निर्णय घेतला.

निवडणुकीच्या दरम्यान प्रबोधनकारांनी कूपर यांच्या गटातले भास्करराव जाधव यांच्याविरोधात भूमिका घेतली. तसंच त्यांनी 'अस्पृश्यांनो, स्पृश्यांपासून सावधान' असं स्फुट 'प्रबोधना'त लिहून बॉम्ब टाकला. त्यापाठोपाठ कर्मवीरांनी नांगर स्वस्तात विकण्याचा आग्रह प्रत्यक्षात आणला होता. परिणामी या दोघांच्या विरोधात कूपर यांनी षड्‌यंत्र रचायला सुरवात केली. त्यात प्रबोधनकारांनी साताऱ्याच्या

छापखान्यातला माल पुण्याला नेऊन तिथे छापखाना काढल्याची कुजबुज कूपरच्या जवळचे लोक करू लागले. ते कानावर पडताच प्रबोधनकारांनी सगळा हिशेब देऊन कफल्लकपणे सातारा सोडला. प्रबोधनप्रेमी रामचंद्र उर्फ बापूसाहेब चित्रे यांनी पुण्यात कर्जात बुडालेला एक छापखाना विकत घेतला होता. त्याचा व्यवहार करण्यासाठी छापखान्याचा मालक, ज्याचा उल्लेख प्रबोधनकार 'गायतोंड्या भट' असा करतात, सातारा रोडला प्रबोधनकारांना भेटायला आला होता. तो आला त्याच दिवशी प्रबोधनकारांच्या एका मुलीचं डायरियाने अचानक निधन झालं. तिचे अंत्यसंस्कार करत असतानाच घाईत असलेल्या छापखाना मालकाशी जड हृदयाने व्यवहाराच्या गोष्टीही करत होते. ते बघून प्रबोधनकारांच्या पत्नीने त्यांना सुनावलं, 'प्रबोधनापुढे पोटच्या गोळ्याची सुद्धा यांना तिडीक येत नाही.' तो उद्वेग स्वाभाविक असला तरी ते एका अर्थाने प्रबोधनकारांच्या ध्येयनिष्ठेला अभिवादन होतं.

साताऱ्यात प्रबोधनकार साधारण नऊ महिने राहिले. या काळात 'प्रबोधन'ची दादरमध्ये बसलेली घडी पूर्ण विस्कटली. त्यांचं व्यावहारिक आणि कौटुंबिक नुकसानच झालं. पण याच काळात प्रबोधनकारांना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातल्या राजकारण आणि चळवळींचा जवळून अनुभव घेता आला. ब्राह्मणेतर चळवळीची मुंबईहून लांबवरून दिसली नसती अशी बाजू त्यांना पाहता आली. विशेष म्हणजे छत्रपती शाहूंच्या निधनानंतर या चळवळीला आलेल्या मर्यादा त्यांच्या लक्षात आल्या. साताऱ्यातून त्यांनी 'प्रबोधन'चे १७ अंक काढले. या सगळ्या अंकांची पृष्ठसंख्या पहिल्या दोन वर्षांपेक्षा दुप्पट म्हणजे १६ इतकी होती. त्यात चार ते सात पानं इंग्रजी मजकूर असे. लोगोचा एक भाग म्हणून संपादक केशव सीताराम ठाकरे असं छापायची सुरुवात पहिल्याच वर्षीच्या तिसऱ्या अंकापासून झाली होती. जुन्या लोगोसह तीच पद्धत नवीन अंकातही सुरू असलेली दिसते. 'उत्तिष्ठित... 'हे ब्रीदवाक्य लोगोच्या खाली असायचं, ते लोगोच्या वर करण्यात आलं. तर लोगोच्या खाली प्रबोधनची ओळख PRABODHAN - Fortnightly Journal Devoted to the Social, Religious and Moral Regeneration of the Hindu Society. इतकीच छापून येत असे. त्यात भर पडली ती अशी, A radically rational organ exposing the correct phases of Maharashtrian Movement. पण ही दोन्ही इंग्रजी वाक्यं तिसऱ्या वर्षाच्या सोळाव्या अंकापर्यंतच आहेत.

'प्रबोधना'चा पुण्यातला संघर्ष

साताऱ्यातून प्रकाशित झालेल्या तिसऱ्या वर्षाच्या १७व्या अंकातच पुढचा अंक पुण्यातून प्रकाशित होणार असल्याची घोषणा झाली. त्यानुसार प्रबोधनकारांनी सदाशिव पेठेत घर आणि बुधवार पेठेत छापखाना असा संसार थाटला. पण पुण्यातल्या सनातनी ब्राह्मणांनी मूळ मालकाला छापखाना प्रबोधनकारांना न देण्यासाठी उचकवलं. त्याला बळी पडून त्याने छापखान्याला टाळं लावलं. सनातन्यांनी प्रबोधनच्या नावाची पाटीही भररस्त्यात जाळली. वर पुण्यात 'प्रबोधन'ला जाळून खाक करू अशी शेखी मिरवली. त्यामुळे पुण्यातच 'प्रबोधन'चा छापखाना उभारण्याची प्रतिज्ञा प्रबोधनकारांनी केली. तोवर प्रबोधनचा तिसऱ्या वर्षाचा शेवटचा एकच अंक प्रकाशित होऊ शकला. प्रबोधनकारांनी नव्या छापखान्यासाठी कर्ज आणि देणग्या मिळवल्या. त्यातून सदाशिव पेठेत छापखाना उभा करण्याची तयारी झाली. पण प्रबोधनकारांनी मुंबईतून विकत घेऊन पाठवलेलं ट्रेडल मशीनचं चाक रेल्वेने पुण्यात पोहचेपर्यंत तुटलं. इतर पार्टही खिळखिळे झाले. तरीही धीर न सोडता प्रबोधनकारांनी भांडवल उभं

करण्यासाठी धावाधाव सुरूच ठेवली. त्यासाठी मुंबईत असताना धावपळीमुळे ते आजारी पडले. शरीराचा उजवा भाग प्रचंड वेदना देऊ लागला. त्याचबरोबर डेंग्यू, कावीळ आणि मूळव्याधीने हल्ला केला. त्यातून बाहेर यायला चार महिने लागले. अर्धी मशिनरी पुण्यात, उरलेली अर्धी मुंबईत दुरुस्त होतेय, कारागिरांचे पगार थकलेत, उपचारासाठीही पैसे नाहीत अशी भयंकर परिस्थिती होती. पण यातून बाहेर येत १९२५च्या जानेवारीत ते कसेबसे पुण्याला पोचले. पुन्हा 'प्रबोधन' उभं करण्याच्या प्रयत्नांना लागले. पुढच्या चार महिन्यांत मशीन सातवेळा तुटलं. इतरही अडचणी येतच राहिल्या.

या सगळ्या अडचणींतून मार्ग काढत ९ महिन्यांच्या खंडानंतर 'प्रबोधन' १९२५च्या एप्रिल महिन्यात पुन्हा एकदा सुरू झालं. 'प्रबोधनला देवाज्ञा झाली' अशी टीका करणाऱ्यांना 'प्रबोधन'ने नव्याने सुरुवात करून उत्तर दिलं. चौथ्या महिन्याचा पहिला अंक हा आता पाक्षिक नसून मासिक होता. पानांची संख्या ४० होती. पुढे नोव्हेंबर १९२७ पर्यंत ३२ महिन्यांत 'मासिक प्रबोधन'चे २२ अंक निघाले. त्याचसोबत प्रबोधनकारांनी ३१ ऑगस्ट १९२७ पासून 'लोकहितवादी' हे नवीन साप्ताहिकही सुरू केलं. त्याचा शेवटचा तेरावा अंक पुण्याहूनच डिसेंबर १९२७ला निघाल्याचा उल्लेख 'शनिमहात्म्य'मधे आहे. म्हणजे जून १९२४ ला पुण्यात आल्यापासून नोव्हेंबरमधे मुंबईत परतेपर्यंत प्रबोधनकार अनंत अडचणींवर मात करत आणि सनातन्यांच्या नाकावर टिच्चून 'प्रबोधन' जगवत राहिले. त्याचं श्रेय त्यांनी त्यांचे सहसंपादक बापूसाहेब चित्रे आणि प्रभाकर चित्रे, मारुती हराळे, बापूराव वझे, दिनकर सुरुडकर या छापखान्यातल्या कर्मचाऱ्यांना दिलं आहे. बापूसाहेब चित्रे यांचं मे १९२६ मधे क्षयरोगामुळे निधन झाल्याने प्रबोधनकारांना धक्का बसला होता. त्याच्याही फार आधी दत्ता देशमुख या त्यांच्या खंद्या सहकाऱ्याला वडिलांच्या मृत्यूमुळे 'प्रबोधन' कायमचं सोडावं लागलं होतं. 'प्रबोधन'च्या चौथ्या वर्षाच्या आठव्या अंकापासून 'प्रबोधन'चा लोगो बदलला. 'प्रबोधन'च्या नावामागचा सूर्य जाऊन त्याजागी तराजू आणि ग्रंथ यांची रेखाटणं आली. प्रबोधनकारांनी सातव्या अंकात 'कलम, समशेर आणि तागडी' असा लेख लिहून या बदलाची वैचारिक भूमिका आधीच मांडली होती. शिवाय 'प्रबोधन'चं आधीचं संस्कृत ब्रीदवाक्य आणि 'प्रबोधन'च्या स्वरूपाचं वर्णन करणारी इंग्रजी वाक्यं काढून त्या ठिकाणी 'लोकहितवादी पण स्वतंत्रमतवादी' असं मराठीतलं दणदणीत वाक्य दिसू लागलं.

प्रबोधनकार पुण्यात होते त्या काळात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद अगदी टोकाला पोहोचला होता. पुण्यात पुतळ्यांचं राजकारण सुरू होतं. आधी छत्रपती शिवाजी महाराज, पाठोपाठ लोकमान्य टिळक आणि नंतर महात्मा फुले यांचे पुतळे उभारण्यावरून वाद झाले होते. त्यातून गणेशोत्सवात मेळ्यांमधल्या गाण्यांमधून दोन्ही बाजूंनी होणाऱ्या दर्जाहीन टीकेने त्यात तेल ओतलं. त्यावर दिनकरराव जवळकर यांनी लिहिलेल्या 'देशाचे दुष्मन' या पुस्तिकेने एकच गोंधळ उडवला. त्यात लोकमान्य टिळकांच्या मुलांनी गायकवाड वाड्यातल्या गणपतीसमोर अस्पृश्यांचा मेळ्याचा कार्यक्रम करून भर टाकली. या काळात प्रबोधनकार पुण्यात असल्यामुळे केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर हे ब्राह्मणेतर पक्षाचे तरुण नेते त्यांना भेटण्यासाठी जवळपास दररोज 'प्रबोधन' कचेरीत येत. शिवाय लोकमान्य टिळकांचे सुपुत्र रामभाऊ आणि श्रीधरपंत हेही असत. त्यामुळे या सगळ्याचे सूत्रधार प्रबोधनकारच असल्याचा समज पुण्यात पसरला होता. विशेषतः 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक प्रबोधनकारांनीच लिहिलं

असल्याचं अनेकांना वाटत होतं. त्याविषयी य. दि. फडके लिहितात, 'जवळकरांची शब्दकळाही ठाकऱ्यांच्या शब्दकळेसारखी तिखटजाळ आणि वाचताना प्रतिपक्षीयांना ठसका लागावा अशी होती... ब्रह्मवांत्युत्पन्न टिळक - चिपळूणकर असा जवळकरांनी केलेला उल्लेख ठाकऱ्यांची आठवण करून देणारा होता. कारण ब्रह्ममुखोत्पन्नऐवजी ब्रह्मवांत्युत्पन्न हा शब्द म्हणजे प्रबोधनकारांनी मराठी भाषेत टाकलेली नवी भर होती. प्रबोधनकारांप्रमाणेच जवळकरांनीही कोकणस्थ पेशव्यांवर तुफान हल्ला चढवताना कायस्थ प्रभूंची तरफदारी केली होती. ठाकऱ्यांच्या प्रमाणेच जवळकरांनाही राम गणेश गडकऱ्यांच्या भरजरी भाषेने भुरळ घातली होती. देशाचे दुष्मन हे प्रकाशित झाल्यानंतर त्यावर दिनकर शंकर जवळकरांचे नाव असले तरी ते प्रबोधनकार ठाकरे यांनीच लिहिले आहे, अशी भालाकार भोपटकर वगैरे टिळक पक्षीयांची समजूत होती. त्यामुळे खुद्द प्रबोधनकारांनी ज्ञानप्रकाशमध्ये पत्र लिहून तो मी नव्हेच अशा आशयाचा खुलासा केला.'

प्रबोधनकारांचा छापखाना अगदी ब्राह्मणी वस्तीमध्ये असल्याने त्यांना या सगळ्याचा त्रास भोगावा लागत असे. धमकी देणारी पत्रं तर आधीपासून सुरूच होती. एका धनवडे आडनावाच्या तरुणाने सरदार बावडेकरांच्या मुलीची छेड काढल्याने १९२६च्या ऑगस्ट महिन्यात पुणे तापलं होतं. त्या घटनेच्या निषेधाच्या सभेवरून येणाऱ्या सनातन्यांनी प्रबोधनच्या छापखान्यावर जाऊन जवळपास दोन तास शिव्याशाप दिले. कारखान्याच्या नावाचा फलक खाली पाडला. त्यानंतर पुढच्याच आठवड्यात प्रबोधनकार पर्वतीजवळ फिरायला गेले असताना तीन चार जणांनी लाठीहल्ला केला. पण प्रबोधनकारांनी वॉकिंग स्टिकमधली गुप्ती बाहेर काढल्याने ते पळून गेले. खोटी निमंत्रणपत्रिका बनवून छापखान्याला पोलिसी प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्नही केला गेला. गोडबोले नावाचा एक गुंड प्रबोधनकारांना भेटायला आला. छापखान्यातल्या कामगारांमुळे तो काही करू शकला नाही. पुढे पोलिसांना सांगून त्याचा बंदोबस्त करावा लागला. त्यांच्या लिखाणाला प्रक्षोभक ठरवून कोर्टात जाण्याचेही प्रयत्न केले. छापखान्यात आगीचा गोळा टाकून कागदाच्या थप्प्यांना आगही लावण्यात आली. शिवाय मेलेली कुजलेली कुत्री दारासमोर फेकण्यात आली. एकदा तर मेलेलं गाढवही टाकण्यात आलं. अनेकदा पैसे देऊनही छपाईसाठी चांगला कागद मिळून दिला जात नसे. तसंच पुण्यातल्या ब्राह्मण एजंटांनी 'प्रबोधन'वर बहिष्कारही घालून बघितला. 'प्रबोधन'चे अंक विकाल तर 'केसरी', 'ज्ञानप्रकाश'चे अंक मिळणार नाहीत, असा दबाव त्यांनी विक्रेत्यांवर आणला. पण 'प्रबोधन' छापखान्यातल्या कामगारांनी चौकाचौकात विक्री करून त्यावर मात केली. तसंच चांगलं कमिशन दिल्याने विक्रेतेही नरम पडले. अनेकदा तर अंक वाचकांपर्यंत जाऊ नयेत यासाठी एकगठ्ठा विकतही घेतले जात.

या सगळ्या अडचणींवर मात करत प्रबोधनकार पुण्यात 'प्रबोधन' चालवत होते. कोणत्याही मोठ्या जातीचा, सत्ताधाऱ्याचा किंवा चळवळीचाही थेट पाठिंबा नसताना पुण्यात भिक्षुकशाहीच्या विरोधात संघर्ष करणं महाकठीण होतं. त्यासाठी प्रबोधनकारांसारखा वीर योद्धाच हवा होता. खुद्द सदाशिव पेठेत राहून ब्राह्मणेतरी विचारांचे 'प्रबोधन'चे २२ आणि 'लोकहितवादी'चे १३ अंक प्रकाशित करणं, यासाठीची हिंमत कळण्यासाठी तो काळ समजून घ्यावा लागेल. या काळामुळे प्रबोधनकारांना सनातनी ब्राह्मणी विचारांमधला जहरी विखार अनुभवता आला. त्याचे समाजावरचे दुष्परिणाम जवळून बघता आले. त्याचा खोलवर विचार करत त्याच्या मुळापर्यंत जाता आले. पुण्याने प्रबोधनकारांच्या

विचारांमधले विरोधाभास संपवत त्यांना महात्मा फुलेंच्या विचारांच्या अधिक जवळ नेलं. त्याचं दर्शन 'प्रबोधन'च्या पाचव्या वर्षांच्या अंकांमध्ये दिसू लागलं. 'देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे' या एका लेखाचा दाखला त्यासाठी पुरेसा आहे.

'प्रबोधन'चं शेवटचं पर्व : पुन्हा दादर

चौथ्या वर्षाच्या काळात प्रबोधनकारांनी इंदूरचे राजे तुकोजीराव होळकर यांना खुनी ठरवणाऱ्या बावला मुमताज प्रकरणावर आपली लेखणी जोरात चालवली. सगळी ब्राह्मणी वर्तमानपत्रे होळकरांना राजपदावरून खाली खेचण्यासाठी आक्रमक झाली होती. त्याला उत्तर देणारं कुणी नसल्यामुळे प्रबोधनकार होळकरांची बाजू घेऊन या वादात उतरले. त्यांच्या लेखांना तुफान प्रतिसाद मिळत असल्याने त्यांची पुस्तकंही काढली. तीदेखील हजारोंच्या संख्येने विकली गेली. त्यातल्याच 'टेम्प्ट्रेस' या इंग्रजी पुस्तकात 'द बॉम्बे क्रॉनिकल' या वर्तमानपत्राचे प्रख्यात ब्रिटिश संपादक बी. जी. हॉर्निमन यांच्यावर टीका केली होती. त्यामुळे चिडून त्यांनी प्रबोधनकारांच्या विरोधात मुंबईतल्या कोर्टात अब्रूनुकसानीचा खटला दाखल केला. त्यासाठी वकील द्यायला प्रबोधनकारांकडे पैसे नव्हते. त्यामुळे 'प्रबोधन'चे अनेक प्रेमी मदत करण्यासाठी पुढे आले. याच खटल्यासाठी ७ नोव्हेंबर १९२७ला मुंबईत आल्यावर प्रबोधनकार पुन्हा एकदा गंभीर आजारी पडले. ते एकटेच नाहीत तर पत्नी, मुली आणि मुलगा असं संपूर्ण कुटुंबच वेगवेगळ्या आजारांनी ग्रस्त झाले. त्यामुळे मुंबईत अडकलेले प्रबोधनकार पुन्हा 'प्रबोधन' चालवण्यासाठी पुण्यात जाऊ शकले नाहीत.

'प्रबोधन' जवळपास दोन वर्षं बंद होतं. त्यानंतर ते १९२९च्या दसऱ्याला पुन्हा सुरू झालं. त्या अंकाला क्रान्त्यंक असं नाव होतं. किल्ल्यातून बाहेर येणारा वाघ त्यावर दिसत होता. प्रबोधनकार नावाच्या वाघानेही नव्याने डरकाळी फोडली होती. पुण्याच्या दत्तात्रेय छापखान्याचे नारायण वैद्य यांनी छपाई आणि प्रकाशनाची जबाबदारी घेतली होती. तर प्रबोधनकार हे फक्त संपादक होते. नोव्हेंबर १९२९ पासून मार्च १९३० पर्यंत 'प्रबोधन'चे पाच अंक निघालेले दिसतात. त्यानंतर 'प्रबोधन'चा अंक सापडत नाही. 'प्रबोधन' बंद करण्यात येत असल्याची घोषणा केलेली नाही. 'माझी जीवनगाथा' या आत्मचरित्रात प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'शी संबंधित इतर घडामोडींची तपशीलवार चर्चा आहे. पण त्यात 'प्रबोधन' मुंबईतून पुन्हा कसं सुरू केलं आणि ते सहा अंकात कसं बंद पडलं, याच्याविषयी काहीही सांगितलेलं नाही. फक्त उदरनिर्वाहासाठी 'प्रबोधन'चा छापखाना आधी भाड्याने दिल्याचा आणि नंतर विकल्याचा उल्लेख आहे. पण या व्यवहारात मित्रांनी फसवल्यामुळे प्रबोधनकारांच्या हातात काहीच लागलं नाही. या काळात प्रबोधनकारांनी 'शनिमहात्म्य' आणि 'शेतकऱ्यांचे स्वराज्य' ही दोन महत्त्वाची पुस्तकं लिहिली. दोन्ही पुस्तकं त्या काळात अत्यंत लोकप्रिय झाली होती. शिवाय दादरमध्ये सार्वजनिक गणेशोत्सवातले ब्राह्मणी वर्चस्व मोडीत काढण्यासाठी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत चालवलेली चळवळ आणि त्यातून सार्वजनिक नवरात्रोत्सवाची सुरुवात या त्यांच्या सार्वजनिक जीवनातल्या महत्त्वाच्या घडामोडी 'प्रबोधन'च्या याच टप्प्यात झाल्यात.

'प्रबोधन'च्या शेवटच्या पर्वात म्हणजे नोव्हेंबर १९२७ ते मार्च १९३० या दरम्यान 'प्रबोधन'चे फक्त सहाच अंक निघालेले आहेत. पण त्यात वेगळे प्रबोधनकार दिसतात. 'प्रबोधन'ची सुरुवात ईशस्मरणाने करणारे 'प्रबोधन'कार नोव्हेंबर १९२९च्या अंकात नवी सुरुवात करताना लिहितात,

'कोणत्याही कार्याच्या प्रारंभी - मग ते बॉम्ब फेकण्याचे असो नाहीतर बोंब मारण्याचे असो - कोणत्या तरी देवदेवतेचे नामस्मरणपूर्वक वन्दन करण्याचा हिन्दुजनांचा शिष्ट संप्रदाय आहे. यापूर्वीच्या माझ्या प्रत्येक ग्रंथारंभी हा शिष्टाचार मी भक्तिपूर्वक इमानेइतबारे पाळलेला आहे... पण प्रागतिक मनुष्याने मतांच्या ठरावीकपणाला चिकटून बसण्याइतका मनाचा दुबळेपणा दाखविणे म्हणजे जगात जगण्याची आपली नालायकी सिद्ध करण्यासारखे आहे. कालपर्यंत मी देवदेवतांचे अस्तित्व मानणारा होतो. आज मी देवविषयक सर्व भावनांच्या छाताडावर बॉम्ब फेकणारा लालबुंद क्रान्तिकारक बनलो आहे.' मार्च १९३०च्या शेवटच्या अंकात ते लिहितात, 'प्रबोधन निरीश्वरवादी आहे. त्याचे सत्यशोधन सत्यशोधक समाजाच्याही पुढे गेलेले आहे. देव मानवात दलाल नको, या काथ्याकुटापेक्षा देवालाच उखडला तर दलाल उरतोच कोठे?' इथे 'प्रबोधन'च्या लिखाणाचं एक वर्तुळ पूर्ण होतं.

'प्रबोधन'नंतर प्रबोधनकार तब्येतीमुळे हवा बदलासाठी कर्जत इथे राहायला होते. तिथूनच त्यांच्या नाट्यव्यवसायातल्या दुसऱ्या इनिंगची सुरुवात झाली. त्यानंतर त्यांनी कधीच स्वतःचं नियतकालिक चालवलं नाही. १९३७-३८ साली त्यांनी मालती तेंडुलकर यांच्या 'प्रतोद' या साप्ताहिकाचं संपादन जवळपास वर्षभर केलं. त्या व्यतिरिक्त ते कधी संपादकही नव्हते. तरी प्रबोधनकारांनी कोल्हापूरच्या 'सेवक'पासून जळगावच्या 'बातमीदार'पर्यंत अनेक नियतकालिकांत लेख लिहिले. विशेषतः संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात त्यांच्यातला कार्यकर्ता पत्रकार वयाच्या सत्तरीतही महाराष्ट्राने बघितला. त्या वयातही त्यांचं लेखन प्रचंड गाजलं. शेवटी त्यांच्या चिरंजीवांनी काढलेल्या 'मार्मिक' या व्यंगचित्र साप्ताहिकात प्रबोधनकारांनी आपला अनुभव ओतलेला दिसतो. त्यात त्यांनी भरपूर लिहिलंदेखील. 'ऊठ मऱ्हाठ्या ऊठ' आणि 'माझी जीवनगाथा' ही त्यांची पुस्तकं त्यातूनच जन्माला आलीत. 'प्रबोधन'चा हा प्रवास बघताना महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदारांनी प्रबोधनकारांच्या साठीनिमित्त लिहिलेल्या दोन ओळी नोंदवाव्याशा वाटतात, 'आमचे केशवराव फिरले पुष्कळ, पण ठरले कोठेच नाहीत. यांतच त्यांचे सारे गुणहि आले आणि दोषही आले.'

'प्रबोधन'च्या तडाखेबंद भाषेची वैशिष्ट्यं

ठाकरी भाषा ही गोष्ट आज महाराष्ट्रात सगळ्यांना माहीत आहे. त्याला प्रबोधनकारांनी जन्म दिलेला आहे आणि 'प्रबोधन'च्या माध्यमातून ही ठाकरी भाषा महाराष्ट्रभर पसरली. त्या भाषेची सगळी वैशिष्ट्यं आपल्याला या संग्रहातल्या लेखांतून बघायला मिळतील. सडेतोड शब्दांमधून व्यक्त होणारी प्रामाणिक तळमळ हे त्यांचं खरं सौंदर्य आहे. त्यामुळे ज्यांना या भाषेचे तडाखे बसले, अशांनीही तिचं कौतुक केलेलं आढळतं. प्रबोधनकारांच्या भाषाशैली विषयीच्या अनेक अभिप्रायांची चिकटवही बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून मला मिळाली होती. त्यातले हे निवडक अभिप्राय इथे देणं आवश्यक वाटतं. त्यातून 'प्रबोधन'च्या भाषेची सगळी महत्त्वाची वैशिष्ट्य आपोआप नोंदवली जातात.

प्रबोध, धुळे : लेखणीच्या जबरपणात उभ्या महाराष्ट्रात रा. ठाकऱ्यांची बरोबरी क्वचितच कोणी करू शकतो, ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

भारत, गोवा : महाशय ठाकरे यांची विचारसरणी सर्वसंमत असते असें जरी म्हणता येत नसले, तरी त्यांच्या भाषासरणीत झळकत असलेले तेजस्वी ओज अद्वितीय असते, याविषयी दुमत असणे शक्य नाही.

केसरी, पुणे : प्रबोधनकारांची लेखणी म्हणजे ज्वालामुखीचा भडका. त्याच्यापुढे आपपर भेद काहीच नाहीत.

सेवक, कोल्हापूर : ठाकरे यांनी संपादन केलेली कीर्ती त्यांच्या विशिष्ट लेखनपद्धतीच्या पोटी जन्म पावलेली आहे. त्यांच्या भाषेत जोम आहे, तडफ आहे. त्यांच्या विचारसरणीत स्वतंत्रपणा आहे, ताजेपणा आहे, जिव्हाळा आहे, म्हणूनच त्यांच्या लिखाणाची पक्कड विचारी मनाला जाणवते.

मन्वंतर, यवतमाळ : रा. ठाकऱ्यांची लेखणी म्हणजे अश्वत्थाम्याची झणझणीत तरवार. जोरदार मराठी भाषा लिहिणारा त्यांच्यासारखा लेखक दुसरा आजकाल नाही.

जागृति, बडोदा : रा. ठाकरे यांचे लेखन अंतःकरणाच्या कळकळीचे असल्याने वाचकांच्या हृदयास जाऊन भिडते. रा. ठाकऱ्यांच्या भाषेत शब्दावडंबरापेक्षा जिवंतपणाच अधिक असल्याने वाचकांच्या मनोवृत्ती एकदम जाग्या होतात.

परीक्षक, बेळगाव : मे. ठाकरे यांच्याशी कोणाचे कितीही मतभेद असोत, आमचेही आहेत, पण त्यांच्या लेखांत जो अत्यंत वंदनीय गुण आहे तो त्यांच्या अंतःकरणांतील तीव्रतम खऱ्या कळकळीचा निस्पृहपणा, निर्भिडपणा किंबहुना निर्दयीपणा होय. आणि या त्यांच्या श्रेष्ठ गुणाच्या जोडीस शोभणारी अशीच त्याची अप्रतिम भाषासरणीही आहे. निर्भय निस्पृहपणा व सुंदर भाषाप्रभुत्व ही त्यांच्या लेखांत दृष्टीस पडतात.

ज्ञानप्रकाश, पुणे : रा. ठाकरे यांची आपली प्रगमनशील मते सणसणीत रीतीने मांडण्याबद्दलची प्रसिद्धी आज कित्येक वर्षे जनतेत दुमदुमीत आहे. सामाजिक अशी कोणतीही बाब असो, तीवरील त्यांची मते ठणठणीत रीतीने व्यक्त व्हावयाची, हे साधारणतः ठरल्यासारखेच आहे. त्यांच्या भाषेत जशी ओजस्विता असते तशीच वाचकांच्या मनास गंमत वाटेल अशी तिची घडणही असते. जुन्यापुराण्या कल्पनांबद्दल त्यांना जसा तीव्र स्वरूपाचा तिरस्कार वाटतो, त्याचप्रमाणे तो व्यक्त करण्यासंबंधांतही ते कशाचीही पर्वा बाळगीत नाहीत. स्वमतनिदर्शनार्थ त्यांच्या हातून होणारी शब्दयोजना कधीही सौम्य किंवा मिळमिळीत अशी आढळून येत नाही. प्रसंगवशात समर्पकता, संगति किंवा सद्भिरुची यांचा भंग झाला तरी त्यांची शब्दयोजना दणदणीत असते आणि त्यांचे लेखन सर्वसामान्य वाचकांस स्वादिष्ट वाटते.

ना. ह. आपटे, कोरेगाव, सातारा : श्री. ठाकरे यांची लेखणी जितकी तडफदार आहे तितकीच कटुतिक्त आहे. ती जितकी स्वयंप्रकाशी आहे, तितकीच मुर्दाडांचे डोळे दिपवणारी आहे. ती जितकी धडाडीची आहे तितकीच मेलेल्या मनाला पुनः जिवंत करणारी आहे. त्यांच्या लेखणीत गडकरी नाहीत, चिपळूणकर नाहीत, परांपजे नाहीत किंवा आणखी एखादा ज्ञात अज्ञात लेखक नाही. परंतु लोकहितवादींची कळकळ तिच्या कांडीत भरलेली आहे. चिपळूणकरांच्या भाषेचा जिवंतपणा तिच्या मुखांत आहे आणि आगरकरांचा सडेतोडपणा तिच्या अणकुचीत आहे.

आचार्य अत्रे, संपादक, नवयुग साप्ताहिक : अच्युतराव कोल्हटकरांप्रमाणेच ठाकरे यांची मराठी लेखनशैली तडफदार, तडाखेबंद आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. ठाकरे यांच्या प्रत्येक शब्दावर आणि वाक्यावर त्यांच्या वीरश्रीयुक्त व्यक्तिमत्त्वाचा ठणठणीत आणि दणदणीत ठसा उमटलेला आहे... मराठी साहित्यांतील शैलीबाज लेखकांमध्ये ठाकरे यांचा क्रम पुष्कळच वर लागेल यांत शंका नाही.

पां. वा. गाडगीळ, संपादक, दैनिक लोकमान्य : ठाकरे यांची लेखणी तिखट पण तडफदार असून ते मार्मिक व रसग्राही टीकाकार आहेत. प्रबोधन मासिकात व इतरत्रही त्यांनी लिहिलेले कित्येक टीकात्मक चर्चात्मक निबंध टिकाऊ वाङ्मयाच्या दर्जाचे आहेत.

प्रबोधनकारांनी हाताळलेल्या विषयांची विविधता

'प्रबोधन'मधील प्रबोधनकारांच्या लिखाणाची महत्त्वाची पार्श्वभूमी मांडण्याचा प्रयत्न आतापर्यंत केला आहे. त्याचा उपयोग प्रबोधनकारांचं लिखाण वाचताना होऊ शकतो. मात्र त्यांच्या लिखाणाचं परीक्षण करण्याची ही जागा नाही. आज शंभर वर्षानंतर प्रत्येक वाचकाने आणि अभ्यासकाने ते स्वतः करावं, अशी अपेक्षा आहे. मात्र प्रबोधनकारांनी हाताळलेल्या विषयांचा परिचय करून देताना काही निरीक्षणं पुढे मांडलेली आहेत. सर्व प्रकारच्या गुलामगिरीच्या विरोधात प्रचंड एल्गार पुकारण्याचं एक सूत्र धरून प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'च्या अंकांत विविध विषय हाताळले. भारतात धर्माने समाजाच्या सर्व पैलूंना घेरल्यामुळे सामाजिक चिकित्सेसाठी धार्मिक चिकित्सा महत्त्वाची होती. त्यामुळे प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधे केलेल्या लिखाणात धर्मचिकित्सा हे महत्त्वाचं सूत्र आढळून येतं. फक्त वा-वा करणारा तो वानर आणि का म्हणून प्रश्न विचारणारा तो माणूस, अशी व्याख्या करत ते सर्व प्रकारच्या चिकित्सेचा आग्रह धरतात. ब्राह्मण स्वतःचं वर्चस्व निर्माण करण्यासाठी धर्माचा उपयोग करत असल्याचा आरोप ते करतात. भटशाही, भिक्षुकशाही, पेशवाई, भटी थोतांड अशी भाषा वापरत ते त्यावर तुटून पडतात. ब्राह्मणांवर टीका करताना ते त्यांच्यातल्या लोकहितवादी, भागवत, आगरकर, गोखले अशा अनेकांचा गौरव करताना दिसतात. अश्वघोषकृत वज्रसूचीचा अनुवाद आणि संदर्भ देऊन ते उत्तम चारित्र्याच्या प्रत्येकाला ब्राह्मण ठरवतात. त्याचबरोबर सुरुवातीच्या लेखांमध्ये हिंदू मिशनरी सोसायटीच्या आणि महर्षी दयानंद यांच्या प्रभावात ते स्वतःला आर्य म्हणवून घेण्यात धन्यता मानतात; पण पुढे या सगळ्याच्या पलीकडे जाऊन देव, धर्म, वेद यांना उडवून लावतानाही दिसतात. विवेकवाद आणि विज्ञानाचा आग्रह धरत ते हिंदू धर्मातल्या अंधश्रद्धांवर कोरडे ओढतात. ते हे सारं उघडपणे आणि बिनधास्त करू शकतात. कारण हिंदू धर्माविषयी असणारा अत्यंत अभिमान ते कुठेच लपवत नाहीत. मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्मगुरूंनी घडवलेल्या धर्मांतरावर ते तुटून पडतात. या दोन्ही धर्मांतल्या अंधश्रद्धांवर आणि पुरोहितशाहीवर हिंदू धर्मातल्या कुप्रथांइतकेच हल्ले चढवतात. मोपल्यांचा हिंसाचार, खिलाफत चळवळ, स्वामी श्रद्धानंद यांची हत्या, गोव्यातील सेंट फ्रान्सिस झेवियर यांच्या प्रेताच्या दर्शनासाठी होणारी गर्दी अशा विषयांवरही त्यांची लेखणी जोरात चालते. त्यांच्या हिंदुत्वामुळे त्यांना एकप्रकारे हिंदू धर्मातल्या चुकीच्या गोष्टींवर टीका करण्याचा हक्क मिळतो. त्यातून बहुजनी हिंदुत्वाचं एक वेगळंच वैचारिक रसायन त्यांच्या लेखांतून बघायला मिळतं.

'ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी, धरावे पोटाशी बंधूपरी' या महात्मा जोतीराव फुलेंनी सत्यशोधक चळवळीच्या मुळाशी मांडलेल्या विचारांशी ते फारसे सहमत दिसत नाहीत. मात्र सहाव्या वर्षातल्या हिंदवी नीळकण्ठीझमच्या लेखांत त्यांचा सूर थोडा बदललेला दिसतो. 'माझी जीवनगाथा'मधे त्यांनी त्याचं सार सांगितलंय, 'सागर मंथनातून निघालेले हलाहल शिवशंकराने असूरपणे प्राशन केले म्हणून नीळकण्ठ नाम प्रसिद्ध झाले. शंकराने ही जी धडाडी दाखविली तिचे नीळकण्ठीझम. आजकाल हिंदुस्थानावर अनेक बहाद्दर आहे का त्याने आपल्या नीळकण्ठीझमने अनेक झम आपल्या पचनी पाडून

त्यांना हिंदुत्वाची दीक्षा दिलेली आहे... आक्रमणाला समोर येईल त्या संस्कृतीतले चांगले घ्यायचे आणि चोथा भिरकावून द्यायचा, हा नीळकण्ठीझमचा धर्म आहे. हिंदुस्थानावर अनेक परधर्मांची परचक्रे आली. त्या सगळ्यांना पचनी पाडून हिंदू धर्म आणि संस्कृती आजही आपापल्या पायांवर ताठ उभी आहे. यातले मर्म शोधणाऱ्यांना ते हिंदवी नीळकण्ठीझममध्येच सापडेल, इतरत्र नाही.' सुरुवातीला गजानन वैद्यांच्या हिंदू मिशनरी सोसायटीचा थेट प्रभाव सापडतो. त्यांच्याविषयी प्रबोधनकार लिहितात. ते त्यात सक्रियही आहेत. ते त्यांच्या वैदिक विवाहविधीत संशोधन करून प्रसिद्धही करतात, पण त्याचवेळेस सोसायटीच्या कारभारावर अगदी खरपूस टीका करतानाही दिसतात. मात्र बुद्ध धर्माविषयी त्यांचा सॉफ्ट कॉर्नर आहे. मात्र ते त्याला हिंदू धर्माचाच बंडखोर भाग मानतात. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धर्मात धर्मांतर करण्याची घोषणा केली, तेव्हा त्यांनी त्याचं समर्थन करणारा लेख 'साप्ताहिक संदेश'मध्ये लिहिलेला आहे. संतांच्या चळवळीलाही ते सनातन्यांच्या विरुद्ध केलेली बंडखोरी मानतात. संत तुकारामांची पालखी पुण्यात बघितल्यावर त्यांनी या एकीचा उपयोग देशाच्या उभारणीसाठी केला गेला पाहिजे, असं मत व्यक्त केलंय. समर्थ रामदास यांच्याविषयी ते इतर सत्यशोधकांप्रमाणे टीका करत नाहीत. उलट त्यांच्याविषयी आदर व्यक्त करतात. पण छत्रपती शिवरायांच्या स्वराज्य उभारणीत रामदास स्वामींच्या योगदानाविषयी त्यांची मतं बदलत गेलेली आढळतात.

सर्व प्रकारच्या जातिभेदाच्या विरोधात प्रबोधनकारांची लेखणी तलवारीपेक्षाही भेदक होते. अस्पृश्यतेला तर ते विरोध करतातच; पण अस्पृश्यांना ते राजकीय मार्गदर्शन करतात. ब्राह्मणी वर्तमानपत्रांतून होणाऱ्या जातिभेदाचा प्रतिवाद करताना ते कुणाचाही मुलाहिजा बाळगत नाहीत. महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाविषयीचं प्रबोधनमधलं लिखाणही वाचण्यासारखं आहे. ते ब्राह्मणेतर चळवळीची बाजू घेऊन ब्राह्मणांशी भांडतात. पण ब्राह्मणेतर चळवळीतल्या चुकांवर टीकाही करतात. ब्राह्मणेतर चळवळीने मिळवलेल्या यशात मराठ्यांनी इतर ब्राह्मणेतर जातींना सामावून घ्यावं, अशी त्यांची भूमिका आहे. त्यासाठी ते भास्करराव जाधवांसारख्या दिग्गजाचाही सामना करतात. इतकंच नाही तर छात्रजगद्गुरू पीठाच्या निमित्ताने याच मुद्द्यावरून ते छत्रपती शाहूंनाही दोष द्यायला मागेपुढे पाहत नाहीत. अर्थात छत्रपती शाहूंशी असलेला त्यांचा स्नेह आणि त्यांच्याविषयी असलेला आदर दाखवणारे लेख 'प्रबोधन'मध्ये आहेतच. मुळात 'प्रबोधन' उभं राहिलं ते शाहू महाराजांच्या प्रेरणेने. पण दुसऱ्याच अंकात ते त्यात 'अंबाबाईचा नायटा'सारखा ऐतिहासिक लेखही लिहितात. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या चरित्रपर लेखात आणि त्यानंतर झालेल्या वादातही शाहू महाराजांविषयीचं लेखन मुळातून वाचायला हवं. आपल्या समोर असलेल्या विषयात एखाद्याची चूक वाटली, तर ते त्यांच्याशी असलेली मैत्री किंवा आधीचं कर्तृत्व याचा कोणताही विचार करत नाही. जे चुकीचं आहे, ते चुकीचंच अशी त्यांची भूमिका असते. कर्मवीर प्रबोधनकारांना गुरूच मानत. रयत शिक्षण संस्थेची सगळी योजना दादरच्या प्रबोधन कार्यालयात बनली होती. त्यामुळे 'प्रबोधन'मधे कर्मवीरांविषयी केवळ आपुलकीचेच शब्द आहेत.

'प्रबोधन'ची सुरुवात होण्याआधीच लोकमान्य टिळकांचा मृत्यू झालेला होता, तरीही त्यांच्याच विचारांचं प्रभुत्व पुण्यावर होतं. त्यामुळे टिळक आणि केसरी हे प्रबोधनकारांच्या दांडपट्ट्याच्या

टप्प्यात वारंवार येतात. ते टिळकांचा उल्लेख लोकमान्य असा चुकूनही करत नाही. कै. (कैलासवासी), प. वा. (परलोकवासी), क्वचित लो. मा. (लोकमान्य) आणि बहुतेक वेळा नुसतं टिळक किंवा बाळ गंगाधर टिळक असंच ते म्हणतात. यावरून त्यांचा टिळकांकडे बघण्याचा दृष्टीकोन लक्षात येईल. महात्मा गांधींविषयीही त्यांना विशेष प्रेम नाही. असहकार आंदोलन, सत्याग्रह, अहिंसा यांचा मार्ग त्यांना पटत नाही. त्यांना गांधींजींची व्यक्तिपूजा होते, असं वाटतं. त्याचा ते विरोध करतात. पण गांधीजींनी राजकीय चळवळींमधलं ब्राह्मणांचं एकहाती वर्चस्व संपवून ब्राह्मणेतरांना संधी दिली, यासाठी एक ब्राह्मणेतर म्हणून गांधीजींविषयी त्यांना प्रेमही आहे. त्यामुळे ते टिळकांइतक्या पोटतिडकीने गांधीजींवर तुटून पडत नाहीत.

प्रबोधनकारांसमोरचा सर्वांत मोठा आदर्श हा लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचा आहे. त्यांच्यावर प्रबोधनकार संधी मिळेल तेव्हा भरभरून लिहितात. त्यांचे लेखही 'प्रबोधन'मधे पुनर्मुद्रित करण्यात आलेले आहेत. तसंच राजारामशास्त्री भागवतांच्या मांडणीविषयीही प्रबोधनकारांना प्रचंड आदराने व्यक्त होताना दिसतात. शिवाय त्यांचा एक लेखही प्रबोधनकारांनी शेवटच्या अंकांमध्ये पुन्हा छापला आहे. त्या तुलनेत प्रबोधनकार महात्मा फुलेंविषयी लिहिताना आढळत नाहीत. अर्थात त्यांच्याविषयी प्रबोधनकारांना आदर आहेच. एके ठिकाणी ते जोतिरावांचा उल्लेख पुरुषोत्तम असा करतात. सत्यशोधक चळवळीविषयीचा त्यांचा जिव्हाळाही लपून राहत नाहीत. पण ते तिच्यावर टीका करण्याचं स्वातंत्र्य राखून ठेवतात. मुकुंदराव पाटील यांनी सत्यशोधक समाज अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून केलेलं भाषण ते मागवून आवर्जून छापतात. रॉबर्ट इंगरसॉल या अमेरिकन तत्त्ववेत्त्याचाही त्यांच्यावर प्रभाव आहे. त्यांच्या विवेकवादाची पाठराखण प्रबोधनकार करतात. पण त्याच्या कर्तृत्वाची किंवा विचारांची सविस्तर ओळख करून देताना आढळत नाहीत.

इतिहास हा प्रबोधनकारांच्या आवडीचा विषय. 'प्रबोधन'मधल्या लिखाणाचा मोठा भाग इतिहासाने व्यापलेला आहे. 'प्रबोधन' सुरू होण्याआधी लिहिलेल्या ग्रंथांमुळे प्रबोधनकारांची ओळख बहुजनांच्या नजरेतून नवा इतिहास लिहिणारा इतिहासकार अशी झालेली आहे. त्यामुळे ते सूत्र पुढे नेत ते 'महाराष्ट्र सारस्वतकार' म्हणून प्रसिद्ध असलेले वि. ल. भावे यांनी केलेली सीकेपींच्या इतिहासाची बदनामी खोडून काढतात. छत्रपती शिवाजी महाराजांना ते परमेश्वर म्हणतात. शिवाजी महाराजांविषयी असलेलं आत्यंतिक प्रेम प्रबोधनच्या पानापानांवर पाहता येतं. पण तिथेही ते चिकित्सक वृत्ती सोडत नाहीत. शिवशाहीच्या कारभाराची चिकित्सा करताना ते शिवाजी महाराजांचे त्यांच्या दृष्टीने असलेले काही दोषही दाखवून देतात. अर्थात शिवाजी महाराजांच्या अमराठी टीकाकारांना ते सोडत नाहीत. पुढे याच संदर्भात त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरूंनाही सोडलेलं नाही. इतिहासकारांचे ब्राह्मणी कंपू छत्रपती संभाजी राजांच्या बदनामीचे डाव रचत असलेले प्रबोधनकार पाहत होते. त्यावर त्यांनी वा. सी. बेंद्रे आणि वि. स. वाकसकर या इतिहासकारांकडून त्या बदनामीला उत्तर देणारे अभ्यासपूर्ण लेख लिहून घेतले. कदाचित या विषयावरचे ते पहिलेच लेख असावेत. हे 'प्रबोधन'चं मराठी इतिहास लेखनामधलं एक महत्त्वाचं पण दुर्लक्षित योगदान आहे. त्यावर प्रबोधनकारांनी एक छोटी नाटिकाही लिहिली आहे. छत्रपतींचं स्वराज्य हे संभाजी महाराजांमुळे नाही, तर पेशवाईमुळे बुडालं, हा दावा त्यांनी सातत्याने केला आहे. प्रबोधनच्या इतिहासविषयक लिखाणाचे सगळ्यात मोठे नायक रंगो बापूजी हे आहेत.

'छत्रपती प्रतापसिंह आणि रंगो बापूजी' या त्यांच्या १९४८ साली प्रकाशित झालेल्या महान ग्रंथांची मुळं 'प्रबोधन'मध्ये आहेत. शाहू महाराजांच्या प्रेरणेने त्यांनी प्रतापसिंहांचा छळ आणि त्यांना राज्य मिळवून देण्यासाठी रंगो बापूजींनी दिलेला लढा हा इतिहास सातारा परिसरात भाषणांमधून सांगितला. त्याची दोन शब्दांकनं 'प्रबोधन'मध्ये आहेतच. शिवाय रंगो बापूजींविषयी पत्रं, भाषणं असं संदर्भ साहित्यही दिलंय. '१०० वर्षांपूर्वीचा इतिहास' म्हणून त्यांनी हा इतिहास मांडायला सुरुवातही केली होती. पण अडचणींमुळे त्यांना तो मांडता आला नाही. वीस वर्षांनंतर ते या विषयाला न्याय देऊ शकले.

हुंड्याची अन्यायी रूढी, बालविवाह आणि विधवाविवाह या विषयांवर प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधून सातत्याने लिखाण केलंय. फक्त लिहून शांत न बसता त्यासाठी आंदोलन उभारून दाखवलं. सक्षमीकरणासाठी महिलांनीच पुढं येऊन जुन्या चालीरितींची जोखडं फेकून द्यायला हवीत, असा आग्रह ते धरतात. शिवाय त्यांनी त्या काळात कुटुंब नियोजनाची आवश्यकता सांगणारा लेखही 'प्रबोधन'मध्ये छापलाय. पण प्रबोधनकारांना दहा अपत्यं होती, हेही नजरेआड करून चालणार नाही. गोव्यामधील देवदासींचा प्रश्न महाराष्ट्रासमोर मांडून 'प्रबोधन'ने एक मोठं योगदान दिलं. मोतीराम जांबवलीकरांसारख्या देवदासी समाजातल्या महत्त्वाच्या कार्यकर्त्यांना त्यासाठी 'प्रबोधन'ने लिहायला लावलं. प्रबोधनकार स्वतः या समाजाच्या परिषदेसाठी गोव्याला गेले. त्यांनीही या विषयावर लिहिलं. मुली देवाला अर्पण करण्याच्या शेषविधीवर बंदी घालण्याचा पहिला अर्ज प्रबोधनकारांनीच गोव्याच्या गव्हर्नरला दिला. प्रबोधनकारांनी तरुणांमधले न्यूनगंड घालवण्यासाठी, त्यांच्यात उद्योजकी मानसिकता निर्माण व्हावी यासाठी तसंच आत्मविश्वास मिळवण्यासाठी काही लेख लिहिले आहेत. जपान, अमेरिका, तुर्कस्थान, चीन, रशिया या देशांमधल्या घडामोडींवरही 'प्रबोधन'मध्ये लेख आहेत. अमेरिकेत शिक्षणासाठी गेलेल्या विष्णू विठ्ठल ओक यांचं लिखाण प्रबोधनकारांनी अग्रलेख म्हणून छापलं. याशिवाय मुळशी सत्याग्रहाविषयी प्रबोधनकारांनी काही स्फुटं लिहिली आहेत. ते सत्याग्रहाच्या विरोधात होते. मुळशी धरणात गेलेल्या जमिनीचा मोबदला जमीनदार आणि सावकारांना न मिळता शेतकऱ्यांना मिळायला हवा, अशी भूमिका त्यांनी घेतली होती.

तिसऱ्या वर्षांत 'प्रबोधन' साताऱ्यात प्रसिद्ध होत होता तेव्हा मराठीबरोबरच इंग्रजी लेखही प्रकाशित होऊ लागले. तसंच चौथ्या वर्षात बावला मुमताज प्रकरणातही काही इंग्रजी लेख 'प्रबोधन'मध्ये आले. त्यात प्रबोधनकारांचं इंग्रजीवरचं प्रभुत्व दिसून येतं. 'प्रबोधन'मधे प्रबोधनकारांच्याच तोडीचे अनेक लेख इतर लेखकांनीही लिहिलेले आहेत. त्यात गो. म. चिपळूणकर, वा. सी. बेंद्रे, कृष्णराव बाबर, नारायण वाळवेकर, बापूसाहेब चित्रे, मोरेश्वर देशमुख यांनी नावं घ्यायला हवीत. प्रबोधनकारांचे धाकटे भाऊ यशवंतराव यांनीही एक लेख लिहिला आहे. लोकमान्य टिळकांचे सुपुत्र श्रीधर टिळक यांनी 'हिंदू जनांचा ऱ्हास आणि अधःपात' या प्रबोधनकारांच्या अनुवादित ग्रंथाचं परीक्षण लिहिलं आहे. किसन फागुजी बनसोडे आणि पांडुरंग घटकर या नागपुरातल्या दोन महार समाजातल्या वक्त्यांची भाषणंही प्रबोधनकारांनी आवर्जून छापली आहेत. वसंतविहार ऊर्फ जोशीबुवा, विनायक बर्वे ऊर्फ कवी आनंद, गो. गो. अधिकारी ऊर्फ कमलावर, नारायण केशव बेहेरे आणि कुमार यशोद या कवींच्या कवितांना 'प्रबोधन'मधे भरपूर जागा मिळाली आहे. प्रबोधनकारांनी स्वतःही 'प्रबोधन'मधे दोन पोवाडे लिहिले

आहेत. चौथ्या वर्षाच्या चौथ्या अंकात 'वीररत्न बाजीप्रभू देशपांडे' या नावाने त्यांच्या शौर्यावरचा पोवाडा शाहीर केशव या नावाने प्रबोधनकारांनी लिहिलाय. तर १२ ऑक्टोबर १९२६च्या अंकात 'विजयादशमीचा संदेश' या नावाने प्रसिद्ध झालेला दुसरा पोवाडा रमाकांत या नावाने आहे. त्यात प्रबोधनकारांचा वादळी बाणा फार उत्कटपणे व्यक्त झालाय. वानगीदाखल एक कडवं,

देव धर्म हे भटी सापळे घातक झाले देशा ।
मोडा तोडा उलथुनि पाडा उखडा त्यांच्या पाशा ।।
धर्मावाचुनि प्राण न जाई देवाविण नच अडते ।
आत्मशक्ती खंबीर तयाच्या त्रिभुवन पाया पडते ।।

दोन वर्षांच्या खंडानंतर आलेल्या 'प्रबोधन'च्या अंकात छापून येऊनही हा लांबलचक पोवाडा तेव्हा गाजला होता. त्याची पुस्तिकाही बाजारात आली होती. प्रबोधनकारांनी वाचकांना केलेली निवेदनं हाही प्रबोधनमधला वाचनीय भाग आहे. प्रत्येक वर्षाच्या शेवटी प्रबोधनकारांनी वर्षाचा आढावा घेतलाय. तिसऱ्या वर्षापासून आलेल्या एकामागून एक संकटांबद्दलही त्यांनी वाचकांशी हितगुज केलंय. वर्गणी देण्याविषयीची निवेदनं तर अनेक आहेत. मदत देणाऱ्यांच्या याद्या आहेत तशाच वर्गणी बुडवणाऱ्यांही याद्या आहेत. इतर नियतकालिकांना भेट अंक पाठवण्यावरून स्पष्ट खुलासे आहेत, तसंच लेखकांनी लेख पाठवला त्यात जास्त उद्गारवाचक चिन्हं वापरू नयेत, असंही सांगितलंय. वाचकांच्या पत्रांनाही 'प्रबोधन'मध्ये स्थान आहे. त्यात मालवणपासून इंदूरपर्यंतचे वाचक आहेत. त्याला वाचकांचे पार्लमेंट, लोकमताच्या पार्लमेंटात, संपादकीय टपालाची पेटी अशी आकर्षक शीर्षकं दिलेली आढळतात. अनंत गुरव यांनी केलेल्या मोजणीनुसार 'प्रबोधन'मध्ये वाचकांची एकूण ८४ पत्रं प्रकाशित झालीत. तसंच त्यांनी 'कलमबहाद्दरांस शेलापागोटे' या शीर्षकाखाली वेगवेगळ्या अंकात एकूण १०२ पुस्तकांचे परिचय मोजलेत. वाचकांची दिशाभूल होऊ नये म्हणून या सदरासाठी प्रबोधनकार बरीच मेहनत घेत. प्रत्येक पुस्तक ३-४ चांगल्या वाचकांना वाचण्यासाठी पाठवत. त्यांच्या मतांची गोळाबेरीज करून 'प्रबोधन'चा अभिप्राय प्रसिद्ध होई. यातले बरेचसे परिचय हे प्रबोधनकारांनी स्वतः लिहिलेले आहेत. त्यात त्यांची सडेतोड शैली वाचायला मिळते. प्रसिद्ध लेखकांच्या पुस्तकांऐवजी चांगल्या पण दुर्लक्षित पुस्तकांचा परिचय करून देण्याकडे प्रबोधनकारांचा कल दिसून येतो. प्रबोधनमधल्या जाहिरातींमधून त्या काळातल्या जीवनशैलीतील बदलांचा अंदाज बांधता येतो.

'प्रबोधन' आणि शिवसेना

आजच्या संदर्भात विचार करतानाही 'प्रबोधन'चे विचार आणि शैली अद्याप ताजी असल्याचं जाणवतंच. परिस्थिती बदलली असली तरी जात धर्म पोथ्यांचा त्याग करून निव्वळ माणुसकीला आपलंसं करण्याचा विचार आजही तितकाच उपयुक्त आहे. त्याचबरोबर आजच्या महाराष्ट्राशी 'प्रबोधन'चा सांधा शोधताना महाराष्ट्रातला एक महत्त्वाचा पक्ष असणाऱ्या शिवसेनेवरचा 'प्रबोधन'चा प्रभाव लक्षात येतो. आमचं हिंदुत्व शेंडी जानव्याचं नाही, असं शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे नेहमी म्हणत असत. त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि नातू कॅबिनेट मंत्री आदित्य ठाकरे हेदेखील हे वाक्य भाषणांमधून सांगतात. बदललेल्या राजकीय परिस्थितीत या वाक्याचं महत्त्व महाराष्ट्राच्या एकंदर राजकारणाच्या दृष्टीनेही आहे. आता या शेंडी जानव्याच्या नसलेल्या हिंदुत्वाचं मूळ

आपल्याला प्रबोधनकारांमध्येच शोधत जावं लागतं. बहुजनी हिंदुत्वाचे मूळपुरुष म्हणून आपल्याला प्रबोधनकारांकडे बघता येतं. बहुजनवाद आणि हिंदुत्ववाद यांचा फारच क्वचित आढळणारा समन्वय त्यांच्या विचारांध्ये आहे. हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन या तिन्ही धर्मांतल्या पुरोहितशाहीला आव्हान देताना वेगळ्याच विचारांचं रसायन तयार झालेलं दिसतं. मुस्लिमांवर केलेली टीका ही 'प्रबोधन' आणि शिवसेना या दोघांचीही दीर्घकाळ ओळख होती. त्याशिवाय सर्वसामान्यांना लगेच आपली वाटेल, अशी ठाकरी भाषा आणि संवाद साधल्यासारखं पण ज्वलंत वक्तृत्व या गोष्टीही प्रबोधनकारांकडूनच शिवसेनेला मिळाल्यात. सीमोल्लंघनाचं महत्त्व सांगणारे प्रबोधनकारांचे 'प्रबोधन'मधले लेख वाचले की शिवसेनेचा मेळावा दसऱ्याला का होतो, हे लक्षात येतं. बाळासाहेब ठाकरेंची व्यंगचित्रं, श्रीकांत ठाकरेंचं संगीत आणि उद्धव ठाकरेंचा कॅमेरा या तिन्ही गोष्टी प्रबोधनकारांकडून आलेल्या आहेत.

प्रबोधनकारांचे दुसरे चिरंजीव श्रीकांत ठाकरे यांच्या आत्मचरित्रात आधी 'मार्मिक' आणि नंतर 'शिवसेना' या दोन्हींच्या जन्मकथा आहेत. त्या अशा, 'न्यूज डे' मधून आमचे बंधू बाहेर पडल्यावर काय करायचं हा प्रश्न उभा राहिला. पण प्रबोधनकारांनी एक मंत्र दिला होता की माणसाने कधीही हताश होऊन जाऊ नये. नव्या क्लृप्त्या काढाव्यात. त्याप्रमाणे बंधूंनी एक डमी तयार केली. शंकर्स विकली होतं, पण आपण दुसरं चांगलं काढलं तर. त्याचं नाव होतं, 'कार्टूनिस्ट'. मोठ्या बंधूंनी दादांच्या कानावर ही गोष्ट घातली. तेव्हा दादा म्हणाले, इंग्लिशमध्ये नको, कारण मजकुरासाठी साऊथ इंडियन लोकांच्या पाया पडावं लागेल. तुला अनुभव आलाच आहे. तेव्हा मराठीत काढा! बंधूंना हा विचार एकदम पसंत पडला. झालं. आमचं नावासाठी डोकं सुरू झालं. तिरंदाज ठेवावं की अंजन? भाऊ दादांकडे गेला. दादा स्वस्थ खुर्चीवर बसले होते, म्हणाले, 'मार्मिक!' मी बाहेर गेलो होतो. आल्यावर त्याने मला सांगितलं. दादांच्या तोंडातून ब्रह्मवाक्यच यायचं नेहमी. काय नाव मार्मिक! मर्मभेद करणारं व्यंगचित्र साप्ताहिक.'

'मार्मिक'ची रचना, भाषाशैली यावर प्रबोधनकारांचा थेट प्रभाव दिसून येतो. 'मार्मिक'मध्ये प्रबोधनकारांनी लिहिलंही खूप. ४०-५०च्या दशकात ते जळगावहून प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिक 'बातमीदार'मध्ये 'वाचकांचे पार्लमेंट' नावाचं सदर चालवायचे. लोकांचे प्रश्न आणि प्रबोधनकारांची नेमकी उत्तरं असं त्याचं स्वरूप होतं. तसंच एक सदर 'मार्मिक'मध्येही चाललं. 'कलमबहाद्दरांस शेलापागोटे' या पुस्तक परिचयाच्या प्रबोधनकारांच्या 'प्रबोधन'मधल्या सदरात श्रीकांत ठाकरेंच्या 'सिनेप्रिक्षान' या 'मार्मिक'मधल्या सिनेमाच्या परीक्षणाच्या सदराच्या लोकप्रिय शैलीची मुळं शोधता येतात. 'मार्मिक'मधून मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला जात होता. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळू लागला. बाळासाहेब ठाकरेंची भाषणंही होऊ लागली. त्यालाही तुफान प्रतिसाद मिळत होता. प्रबोधनकार स्वतः ती भाषणं ऐकायला जात. त्यापुढची गोष्ट श्रीकांत ठाकरे सांगतात, 'कुणी म्हणालं की साहेब, तुम्ही विचार दिल्याने मराठी मनं पेटून उठलीत. त्यांना तुम्ही अधिक जवळ आणण्यासाठी एखादा पक्ष स्थापन करा. पण बंधूंच्या डोक्यात एक निराळीच कल्पना होती. त्यांनी प्रबोधनकारांना ही कल्पना सांगितली. ते म्हणाले, 'तू असं कर. एक संघटना काढ!' बंधू म्हणाले नाव काय द्यायचं? दादा मागच्याप्रमाणे एक ब्रह्मवाक्य बोलले, शिवसेना!' शिवसेनेच्या स्थापनेच्या सभेतच प्रबोधनकार ठाकरेंनी माझा बाळ मी महाराष्ट्राला अर्पण करतो, असं म्हणत बाळासाहेबांना

महाराष्ट्राचा बनवलं. त्याच सभेत प्रबोधनकारांनी भाषणात सांगितलं होतं की माझा संप्रदाय वेगळा आहे आणि बाळासाहेबांचा वेगळा आहे. तरीही शिवसेनेच्या जडणघडणीत प्रबोधनकारांचं महत्त्वाचं योगदान होतंच.

सर्वांत महत्त्वाचं म्हणजे स्थानिय लोकाधिकारवाद हा शिवसेनेच्या विचारांचा प्राण मानायला हवा. स्थानिक मराठी माणसाला नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळायला हवं, ही शिवसेनेची कायम मागणी आहे. आश्चर्य वाटेल पण शिवसेनेच्या स्थापनेच्याही चार दशकं आधी 'प्रबोधन'मध्ये प्रबोधनकारांनी हीच मागणी केलीय. १६ जून १९२३च्या प्रबोधनमध्ये प्रबोधनकारांनी 'मद्राशांचा सुळसुळाट', 'स्थानिक रहिवाशांचा कोंडमारा', 'मद्राशी आणि महाराष्ट्रीय' आणि 'मद्राशांचा बोजा मुंबईवर का?' अशी एकाच विषयावरची चार स्फुटं लिहिली आहेत. ती मुळातून वाचण्यासारखीच आहेत. आणि ती एकदा वाचली की शिवसेनेची मुळं 'प्रबोधन'मध्ये कशी सापडतात, हे कळतं.

महाराष्ट्राचा ठेवा महाराष्ट्राला सादर

एका महान महाराष्ट्र सुपुत्राची ही विचारसंपदा पुन्हा एकदा महाराष्ट्राला सादर करताना मोठा आनंद होत आहे. शंभर वर्षं हा छोटा कालावधी नसतो. त्यातही वेगाने बदलणाऱ्या आताच्या जगात तर नाहीच नाही. असं असताना एका नियतकालिकात छापून आलेल्या शब्दांची ताकद काळाला पुरून टिकून राहते. किंबहुना काळाच्या आताच्या वळणावर अधिकच महत्त्वाची ठरते, ही थोरवी खूप आहे. महाराष्ट्राने जपून ठेवलेला महाराष्ट्राचा ठेवा महाराष्ट्राला सादर करण्यासाठी आपण निमित्त असणं, ही माझ्यासारख्या साध्या पत्रकारासाठी मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. संशोधनाचा आणि अशा प्रकारच्या संपादनाचा कोणताही अनुभव पाठीशी नसताना मी हे मोठं धाडस केलेलं आहे. प्रबोधन शताब्दीचा मुहूर्त गाठण्यासाठी काही महिन्यांच्या अवधीत जवळपास १४०० पानांचा ऐवज उभा करणं, हे मोठं आव्हान होतं. त्यात कोरोनाचा काळ परीक्षा बघणारा होता. छोटे छोटे संदर्भ मिळवण्यातही खूप अडचणी आल्या. टायपिंग, प्रूफरीडिंगसाठी बरीच धावपळ करावी लागली. कोरोनामुळे न सापडलेले चार अंक शोधण्यासाठी पुरेसे प्रयत्न करता आले नाहीत, याचीही चुटपुट आहे. आम्ही आमच्या परीने प्रयत्न केलेत. पण चुका राहून गेल्या असणारच. त्यासाठी आम्हाला माफ करा.

या ग्रंथांच्या संपादनाच्या धावपळीत प्रबोधनकार ठाकरे नावाचा डोंगराएवढा मोठा माणूस मला अधिक उमगत गेला. त्यांचा संघर्ष मला एक पत्रकार म्हणून ताकद देऊन केला. मी समृद्ध होत गेलो. त्यासाठी मी या ग्रंथाचा मनापासून ऋणी आहे.

सचिन परब

१५ ऑगस्ट २०२१

वाचण्याआधी

'प्रबोधन'चा पहिला अंक १६ ऑक्टोबर १९२१ला प्रसिद्ध झाला. मार्च १९३०ला 'प्रबोधन'चा शेवटचा अंक निघाला, तोही अंक थांबवण्याची कोणतीही अधिकृत घोषणा न होता. म्हणजे 'प्रबोधन' प्रसिद्ध होण्याचा एकूण कालावधी ८ वर्षं ५ महिने होता, असं म्हणता येईल. अर्थातच 'प्रबोधन' सलग प्रकाशित होत नव्हतं. त्यात पहिल्यांदा दहा महिन्यांसाठी आणि डिसेंबर १९२७ पासून दोन वर्षांसाठी 'प्रबोधन' बंद होतं. या कालावधीच्या दरम्यान प्रकाशन वर्षानुसार एकूण सहा वर्षं प्रबोधनचे अंक प्रकाशित झालेत. त्यात 'प्रबोधन'चे एकूण ९५ अंक प्रकाशित झालेत. त्यापैकी ९१ अंक या 'प्रबोधन'मधील प्रबोधनकार' प्रकल्पासाठी उपलब्ध झाले आहेत. त्यातील पुस्तकरूपाने सध्या उपलब्ध नसणारे प्रबोधनकारांचे सर्व लेख तीन खंडांमध्ये घेण्यात आलेत.

'प्रबोधन'च्या अंकामध्ये असणारा प्रबोधनकारांचा प्रत्येक लेख जसाच्या तसा या खंडात घेण्याचा प्रयत्न आहे. त्यात इतर कोणताही निकष लावलेला नाही. उपलब्ध लेख अंकांच्या प्रकाशन वर्षानुसार एकामागून एक सलग मांडण्यात आलेत. त्याचं विषयवार कोणतंही वर्गीकरणही केलेलं नाही. हे लेख काळाचा संदर्भ समजून घेऊन वाचावेत, अशी अभ्यासकांकडून अपेक्षा आहे. वाचनाच्या सोयीने सर्व छोट्या मोठ्या लेखांची तीन खंडांमध्ये मांडणी करण्यात आली आहे.

खंड १ :

'प्रबोधन'च्या पहिल्या दोन प्रकाशन वर्षांमध्ये पाक्षिक म्हणून प्रसिद्ध झालेल्या ४८ अंकांमधले प्रबोधनकारांचे लेख पहिल्या खंडात आहेत. हा काळ 'प्रबोधन'साठी स्थैर्याचा काळ होता. 'प्रबोधन'चं जन्मस्थळ दादरमध्येच यातले सगळे अंक प्रकाशित झालेत. त्यामुळे आपल्या ओळखीच्या परिसरात ओळखीच्या वाचकांपर्यंत 'प्रबोधन' पोहोचत होता. या काळात 'प्रबोधन'च्या कचेरीत येणाऱ्या दादरमधील तरुणांची एक संघटनाच उभी राहिली होती. तिच्यामधून 'प्रबोधन'ने हुंड्याविरुद्ध आंदोलन

चालवलं. सामाजिक, धार्मिक विषयांवर तिखट मतं मांडली. खोट्या इतिहासाविरुद्ध एलगार पुकारला. ते सगळं या खंडातल्या लेखांमध्ये आपल्याला वाचता येईल.

खंड २ :

स्वतःचा छापखाना हाती नसल्यामुळे 'प्रबोधन'च्या विस्ताराला मर्यादा येत असल्याचं प्रबोधनकारांच्या लक्षात आलं होतं. छत्रपती शाहू महाराजांच्या निधनामुळे स्वतंत्र छापखाना उभारण्याचं त्यांचं स्वप्न भंगलं होतं. त्यात सातारा येथील उद्योजक राजकारणी खानबहादूर धनजीशेठ कूपर यांनी छापखाना उभारून दिल्यामुळे त्यांनी 'प्रबोधन'चं स्थलांतर सातारा शहराजवळच्या पाडळी या गावी केलं. तिथे त्यांच्यासोबत कर्मवीर भाऊराव पाटील होते. कूपर यांच्याशी वाद होण्याआधी साताऱ्यातून 'प्रबोधन'चे १७ अंक निघाले. त्यापैकी ४ अंक आता उपलब्ध नाहीत. साताऱ्यानंतर चौथ्या वर्षी 'प्रबोधन' पुण्यातून प्रकाशित होऊ लागलं. आता ते मासिक स्वरूपात होतं. 'प्रबोधन'चे एप्रिल १९२५ ते मे १९२६ या चौथ्या प्रकाशन वर्षात १२ अंक प्रकाशित झाले. हा पुण्यातला काळ 'प्रबोधन'साठी प्रचंड संघर्षाचा गेला. त्या संघर्षाने प्रबोधनकारांना नव्याने लढण्याचं बळ दिलं. अत्यंत संघर्षमय असलेल्या तिसऱ्या आणि चौथ्या प्रकाशन वर्षांच्या अंकांमधले लेख या दुसऱ्या खंडात आहेत. त्यात प्रबोधनकारांचे काही इंग्रजी लेखही आहेत.

खंड ३ :

पाचव्या प्रकाशन वर्षातले १२ अंक आणि सहाव्या प्रकाशन वर्षातले ६ अंक अशा 'प्रबोधन'च्या एकूण १८ मासिक अंकांतले प्रबोधनकारांचे लेख या खंडात वाचता येतील. पुण्यातल्या वास्तव्याने प्रबोधनकारांना महाराष्ट्रातल्या समाजवास्तवाची खोल समज अनुभवता येत होती. त्यातून घडलेली विचारक्रांती या खंडांमधल्या लेखांमध्ये वाचता येते. त्यात 'देवळांचा धर्म धर्माची देवळें', 'दगलबाज शिवाजी', 'हिंदवी नीळकण्ठीझम', 'क्रांतीचे कुलपी बॉम्ब' हे लेख प्रबोधनकारांच्या विचारांचं दर्शन घडवणारे आहेत. त्यामुळे संख्येने कमी असूनही या खंडातले लेख महत्त्वाचे ठरतात.

काही सूचना

- 'प्रबोधन'मधील प्रबोधनकारांचे लेख सध्याच्या प्रचलित व्याकरणाऐवजी तेव्हाच्या म्हणजे १०० वर्षांपूर्वीच्या व्याकरणाप्रमाणेच इथे छापले आहेत, याची नोंद घ्यावी.

- 'प्रबोधन' सुरू असण्याच्या काळातही व्याकरणाचे नियम बदलले असण्याची शक्यता आहे किंवा प्रबोधनकारांनी स्वतःहून नवे भाषिक बदल अंकासाठी स्वीकारले असण्याची शक्यता आहे, त्यामुळे सुरुवातीच्या अंकांमध्ये असणारी अनुस्वाराची भाषा नंतरच्या काळात कमी होताना दिसते.

तसेच काही शब्दांचे उकार आणि वेलांटी यातही फरक आढळून येतो. अशा वेळेस मूळ प्रतींत जे आहे, ते आणि तेच ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, याचीही वाचकांनी नोंद घ्यावी.

- तसेच काही शब्द वेगवेगळ्या पद्धतीनं लिहिले गेले आहेत, असंही निरीक्षण आहे. उदाहरणार्थ म्हणून आणि ह्मणून, सामाजिक आणि सामाजीक. असं आढळलेल्या ठिकाणी मूळ अंक प्रमाण मानण्यात आला असून त्यात असलेल्या शब्दांप्रमाणेच ते पुस्तकात येईल, याची काळजी घेतली आहे.

- मूळ अंकात कदाचित टाइपसेटिंगच्या झालेल्या गोंधळामुळे किंवा अन्य काही कारणांमुळे काही शब्द चुकीचे छापले गेले आहेत, असं जाणवलं. त्या अत्यंत स्वाभाविक चुका झालेले शब्द फक्त बदलून घेतले आहेत, उदा. धोडा ऐवजी घोडा.

- काही ठिकाणी उपलब्ध अंकांमध्ये एखादा शब्द, काही शब्द, काही वाक्य किंवा काही पॅरेग्राफ वाचता येत नाहीत, तिथे तितका मजकूर तसाच रिकामा सोडला आहे. ✻ अशी खूण देऊन तिथे तसं स्पष्ट म्हटलं आहे.

- कोणताही लेख वाचण्याआधी शक्यतो, संबंधित लेख छापून आलेल्या अंकाचं वर्षं ध्यानात घ्यावं. त्यानुसार संबंधित काळाचा संदर्भ लावल्यास आशय आणि विषयाचं आकलन करणं सोपं जाईल, असं वाटतं.

- संपादक

प्रबोधन वर्ष ५

एकूण अंक १२

पहिला अंक : जुलै १९२६

बारावा अंक : ऑक्टोबर १९२९

निवेदन

संपादकीय आत्मनिवेदन

त्वमक्षरं परमं वेदितव्यम्। त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।।
त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता। सनातनस्त्वं पुरुषो मतो मे।।

जगद्गुरु श्रीकृष्ण भगवंताचें स्मरण करून प्रबोधन आपल्या पांचव्या वर्षाच्या जीवनक्रमास आज आरंभ करीत आहे. जनतारूप जनार्दनाचा त्याला आशीर्वाद असावा. संकटें उपहास निंदा छळ कारस्थानें हीं ईश्वरी कृपेच्या ध्वजा आहेत, ही भावना अचल ठेऊन, गेलीं ४ वर्षे प्रबोधनानें आपलीं लोकहितवादी स्वतंत्र मतें यथामति यथाशक्ति महाराष्ट्राला अर्पण केली, ती श्रीकृष्णार्पण असोत. सर्वांना एकसारखें संतुष्ट राखण्याचें काम मोठे कठीण आहे. 'एका आवडतें तेंचि दुजाला नावडतें' या मानवी प्रवृत्तीपुढे कोणाचा कांहीच इलाज चालणें शक्य नाहीं. विशेषतः दर क्षणाला मतांतरांची आणि पक्षभेदांची तुफानें जेथें भरंसाट बेहद्द बोकाळत आहेत. तेथें निश्चित तत्वप्रतिपादक प्रबोधनाच्या प्रवचनांचा कांहीं काळ तरी जनतेच्या मनोभूमिकेवर विपर्यस्त परिणाम होणें अगदीं क्रमप्राप्त आहे. 'तुका म्हणे नाहीं चालत तांतडी। प्राप्तकाळघडी आल्याविना' हा प्रबोधनाचा आत्मविश्वास असल्यामुळें

आहे विस्तीर्ण पृथ्वी विविध जन तसे काळ ना ज्यास अंत।
त्यामाजीं मद्वचांचा कुणितरि निपजे एक भोक्ता नितांत।।

या भवभूतीच्या लोकविश्रुत उक्तीला अनुसरून आपलें विहित कर्तव्यकर्म प्रामाणिकपणें बजावण्यापलीकडे तो कसलीच पर्वा करीत नाहीं. अशा परिस्थितींत ज्या आश्रयदात्यांनी आपला आश्रय कायम ठेवला, ज्यांनीं नव्यानें आश्रय दिला, इतकेंच नव्हे तर ४ वर्षांनंतर ज्यांनीं आपला आश्रय बंद केला, त्या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक मी आभार मानतो.

+++

मजवर हार्निमनी खटल्याचें भिक्षुकी कारस्थान चालूं होतांच अनेक सार्वजनिक संघ क्लब व संस्था आणि आश्रयदाते यांनीं सहानुभूतीचे व धीराचे संदेश पाठविले, त्याबद्दल मी त्यांचे प्रणिपातपूर्वक आभार मानतो. ज्यांना माझ्या सांपत्तिक स्थितीची आणि तत्वासाठीं स्वार्थत्यागपूर्वक कार्य करण्याची स्वभावप्रवृत्तीची स्पष्ट कल्पना होती, त्यांनीं माझ्या विनंतीची वाट न पहातां सांपत्तिक मदत केली,

त्यांची नांवें व रकमा मी कृतज्ञतापूर्वक येथे नमूद करीत आहे :-

(१) एक ब्राम्हण हितचिंतक मुंबई, रु. १०० (२) श्री. गजानन महादेव बोरकर, दाभोळ. रु. ६-०-० (३) श्री. व्ही. आर. चौबळ, विलेपार्ले. रु. ६-०-० (४) श्री. कृष्णाजी भाऊराव बाबर, पेठ. रु. ५-०-० (५) श्री. त्र्यंबक रावजी हर्णे अकोली, रु. ५-०-० (६) लेफ्ट. नाईक आनंदराव कदम, इडाक. रु. ५-०-० (७) श्री. बापूराव रामराव शिंदे, लोणी-काळभोर रु. ४-०-० (८) श्री. गजानन सखाराम मथुरे, दादर-मुंबई. रु. १-०-० (९) श्री. दत्तात्रय यशवंत गडकरी, मुंबई. रु. १-०-० (१०) श्री. राजाराम दगडू पाटील, धुळे रु. १-०-० (११) सौ. मनोरमाबाई एस. देवरुखकर. नाशिक, रु. १-०-०.

+++

या खटल्याच्या मुळांशीं कोणकोणाची प्रेरणा होती, या सगळ्या पराच्या कावळ्याचे रहस्य काय आणि तें किती सर्वव्यापी आहे, या विषयीं सध्यां मूकवृत्तीच धारण करणें श्रेयस्कर आहे. लवकरच महाराष्ट्रांत असा एक विलक्षण मुकाबला उत्पन्न होणार आहे कीं या नाटकांतली सर्व पात्रें त्या वेळीं सर्वांना त्यांच्या जातिवंत रंगांत स्पष्ट दिसूं लागतील. भविष्यकालीन परिस्थितीचा अभिप्राय प्रत्यक्ष पटल्यावर वर्तमानकालीन् अभिप्रायांचा हंगामी फोलकटपणा तेव्हांच चव्हाट्यावर येईल. तथापि, ज्याज्या हिंदु म्हणविणाऱ्या भटपुत्रांनी या खटल्यांत आपल्या जिवाचें नांव शिवा ठेऊन आमच्या विषयीं विरोधभक्तीचा नातूशाही कळवळा दाखविला, त्यांच्या या देशसेवेबद्दल व हिंदुत्वाच्या उत्कट अभिमानाबद्दल मी आजच जाहीर आभार मानून ठेवतो.

+++

प्रस्तुत प्रकरणीं अनेक आश्रयदात्यांकडून स्पष्टोक्तीची पत्रें प्रसिद्धीसाठीं आलीं आहेत. ती सध्यां तशीच गुलदस्तांत ठेऊन योग्य वेळींच प्रगट करू. म्हणजे त्यांतील विचारांचा पायाशुद्ध विवेकवाद भविष्य कालीं घडणाऱ्या उपरोक्त घटनेनें विशेष शोभून दिसेल.

+++

अनेक ग्रंथकार बंधूंचे ग्रंथ शेलापागोट्याच्या आहेरासाठी टेबलावर तिष्ठत बसले आहेत. विलंबाची क्षमा असावी. पुढील अंकी सर्वांचे आदरातिथ्य होईल.

+++

चालूं सालीं आमच्या आश्रयदात्यांना आग्रहाची एक विनंति आहे. आमच्या सांपत्तिक अडचणीची पूर्ण जाणीव ठेऊन त्यांनी आपापली वर्गणी हा अंक हातीं पडतांच मनीऑर्डरीनें बिनचूक रवाना करण्याची मेहरबानी करावी. आपल्या सर्वांच्या सक्रीय सहानुभूतीवरच प्रबोधनाची कार्यक्षमता अवलंबून आहे.

प्रबोधनाच्या कार्याला मदत करण्याचे अनेक मार्ग आहेत. आपण मनावर घ्याल तर त्यापैकी कोणत्याहि मार्गानें सहाय करूं शकाल. (१) नवीन वर्गणीदार पाठविणें. (२) ग्रंथालयांतील पुस्तकांची यादी या अंकासोबत आहे. त्यातील ग्रंथांची आपण व मित्रांकडून मागणी करणें. (३) प्रबोधन छापखान्यांत छपाईची कामे पाठविणें. आपण कराल तें सहाय या प्रसंगी प्रबोधनाला जीवनदानाइतकेंच चिरस्मणीय होईल.

केशव सीताराम ठाकरेपुणे

शहर, १५ जुलई १९२६

□□□

श्रद्धांजली

कालाय तस्मै नमः

प्रबोधनाचे सहसंपादक श्रीयुत रामचंद्र वामन उर्फ बापूसाहेब चित्रे बी.ए. यांचा मृत्यू

संकटांत ईश्वरी संदेश कांही असलाहि - आणि तो असतोच असतो ही आमची भावना आहे, - तरी संकटें येऊं लागली कीं ती एका मागून एक समुद्राच्या लाटांसारखी भराभर येतात. १९२६ साल प्रबोधनाला अत्यंत कष्टप्रद व संकटांचे चालले आहे. भटांच्या चिथावणीनें निर्माण झालेल्या हॉर्निमनी खटल्याला तोंड देत असतांनाच, आमचे सहकारी मित्र बापूसाहेब चित्रे ता. २८ मे १९२६ रोजी अनिमियाच्या विकाराने कल्याण येथें मृत्यु पावले. २६-२७ वर्षाच्या या पाणीदार विद्वान तरूणाचा मृत्यु म्हणजे अत्यंत हृदयविदारक ट्राजेडीच म्हटली तरी चालेल. एखाद्या कार्याची धुरा आत्मस्फूर्तीनें शिरावर घेणारा समानधर्मी सहकारी मित्र लाभणें, ही गोष्ट वर्तमान काळीं फार कठीण आहे. निदान, आमच्या प्रबोधनकार्यापुरतेंच म्हणावयाचें तर, अक्षरशः अशक्य आहे. प्रबोधन मुद्रणालयाच्या स्थापनेला व सुरवातीलाच त्यावर आलेल्या भटी गंडांतरांना तोंड देऊन त्याच्या जोपासनेला जर कोणाची शांत, विचारी धीरोदात्त आणि सहनशील वृत्ति खर्ची पडली असेल, तर ती एकट्या बापूसाहेबाचीच. व्यावहारिक बाबतींत आमच्या दोषांची स्थळें बापूसाहेबांनी आपल्या गुणांनी भरून काढलेली असत, इतके प्रांजळपणे व कृतज्ञ बुद्धीनें नमूद केलें की बापूसाहेबांच्या मृत्यूनें प्रबोधनाचा उजवा हातच तुटला, असें आमच्या प्रमाणेंच वाचकांनाहि खास वाटेल. एलेलबीचा अभ्यास करीत असतानाच त्यांची वाङमयप्रियता व जरनॅलिझमची आवड चांगली परिणत झालेली होती. त्यांचें वाचन चिकित्सापूर्ण आस्थेचे असें. बंगाली भाषा ते उत्तम शिकले होते आणि त्या भाषेंतल्या ललित वाङमयाचे व काव्यांचे ते मर्मज्ञ वाचक होते. १९२२ सालापासून ते स्वयंसेवेच्या स्फूर्तीने प्रबोधनाच्या संपादनकार्यात आमचे सहकारी बनले. 'विचार करण्यासारखे विचार' 'हिंदुजनांचा ऱ्हास व अधःपात' व कित्येक 'स्फुट विचार' बापूसाहेबांच्या मराठी भाषेवरील प्रभुत्वाची खास साक्ष पटवतील. या वर्षी त्यांनी कांही मित्रांच्या सहायानें पुण्यास 'वीणारव' नांवाचे एक उत्कृष्ट साप्ताहिकहि चालविलें होते. मृत्यूपूर्वी त्यांनी आपल्या आवडते पूज्य बंग कविराज डॉ. टागोर यांच्या चित्रा नामक काव्यनाटिकेला उत्कृष्ट व आकर्षक असा मराठी पेहराव चढविला. (ही 'चित्रांगदा' सुरस नाटिका प्रबोधन ग्रंथालयात ६ आणे

किमतीस विक्रीस तयार आहे.) आम्ही सातारा रोडला गेल्यावर पाठीमागे त्यानी प्रबोधनाचे ४ अंक स्वतःच्या संपादकीय हिमतीवर मुंबईस प्रसिद्ध केले, ही एकच गोष्ट त्यांच्या वृत्तपत्रीय चातुर्याची द्योतक होय. सातारा रोडलाहि वरचेवर येऊन ते प्रबोधनाच्या लेखन मुद्रण प्रकाशनापर्यंत पडेल ते काम मोठ्या हौशीनें करून पुण्यास परत जात. प्रबोधन पुण्यास आला तो एकट्या बापूसाहेबांच्या प्रेरणेनें आणि हिमतीवर. एलेलबीचा त्यांचा एकच पेपर राहिला होता. ''या परीक्षेच्या त्रासांतून मी मोकळा झालों कीं छापखाना व प्रबोधन या दोनहि जबाबदारींतून तुम्हांला मी मोकळा करीन. तुम्ही नुसतें लेखन करा. इतर कांहींहि पाहूं नका.'' असें ते नेहमी म्हणत. पण योगायोग! अखेर अवघ्या ५-६ महिन्यांत या उमलत्या जवानाची अनिमियानें बोलबोलतां आहुती घेतली. बापूसाहेब सुधारणेची प्रत्येक गोष्ट बोलण्यापेक्षां प्रत्यक्ष करीत असत. मॅट्रिकच्या वर्गांत असतांनाच ते श्री. माट्यांच्या बरोबर अस्पृश्यांच्या मुलांना शिकविण्यास नियमित जात असत. हा क्रम पुष्कळ वर्षे चालूं होता. अस्पृश्यांच्या प्रत्येक चळवळीत ते सक्रीय भाग घेत. परंतु सर्व मिटल्या तोंडी. पुण्यांतल्या गणेशोत्सवांत बापूसाहेबांची गडबड अस्पृश्यांच्या गणपतीजवळ. बापूसाहेब म्हणजे एक प्रेमळ मित्र, उमेदी लेखक, मनमिळाऊ व्यवस्थापक उत्तम मुद्देसूद वक्ता आणि अक्षरशः सभ्य असा तरूण गृहस्थ, अशी थोडक्यांत व्याख्या होते. नुकतांच संसार थाटत होता, तरुण पत्नी व दोन लहान बचडीं (एक मुलगा व एक मुलगी) उज्वल भविष्याच्या उषःकालाकडे टक लाऊन पहात होती, भावी कर्तबगारीच्या आत्मविश्वासाचीं बीजें थरारत होती, नवमतवादाचे व सामाजिक सुधारणेचे विचार हळुंहळूं प्रबोधनांतून व्यक्त होत होते, मुद्रणालयांतील अनुभवानें व जबाबदारीनें व्यवहाराची बाजू बळावत होती, पण-पण परमेश्वरा! या सर्व भविष्यावर एकदम काळाकुट्ट घनदाट काळोख पाडलास! छोटेखानी संसाराच्या उमेदीची निमिषार्धात राखरांगोळी केलीस. मानवांच्या हृदयाला हा सर्व ट्रान्सफर सीन कल्पनेंत आणणेंहि अत्यंत भयंकर. असो. तुझी इच्छा. तूं ठेवशील तसें राहणें आम्हां मर्त्य मानवांना भाग आहे बाबा. आतां केवळ डोळ्यांपुढे कल्पनेत वावरणाऱ्या बापू साहेबांच्या त्या शांत हासतमुख विनयशील पण कदरबाज मूर्तीवर प्रबोधनाची अश्रुधारा सतत वाहात राहील. महाराष्ट्राच्या आत्मप्रबोधन कार्यासाठी भगवान श्रीकृष्ण बापुसाहेबांना लवकरच पुनर्जन्म देवो!

वामनराव देशपांडे यांचा मृत्यू

प्रबोधनाच्या मागील अंकी या देशाभिमानी वीराचा फोटोग्राफ आम्ही वाचकांकडे पाठविला. प्रबोधनाचा अंक २६ मे रोजी पोष्टांत पडण्यापूर्वीच ता. १९ मे रोजी आतोर्णे मुक्कामी वामनराव देशपांडे इहलोक सोडून गेले. मरणसमयी त्यांचे वय १०२ वर्षांचे होते. यांचा जन्म १८२४ साली झाला. १८५७ बण्डांत त्यांचे वय ३३ वर्षांचे होते. दादजी नरसी प्रभूच्या वंशातला मऱ्हाठी स्वराज्याचा कडकडीत अभिमान बाळगणारा हा शेवटलाच देशपांडे. परमेश्वर वामनरावजीला चिरकाल शांती देवो!

सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक रावबहादुर पारसनीस यांचा मृत्यू

चालू सालीं कालवश झालेल्या देशसेवकांच्या यादींत रा. व. दत्तात्रय बळवंत पारसनीस या महाराष्ट्रेतिहास-सेवकाचा समावेश करण्याचा प्रसंग येईल, अशी कोणाचीच कल्पना नव्हती. परंतु कालाची करणीच कल्पनातीत असल्यामुळें, ३१ मार्च १९२६ रोजीं हृदयाची क्रिया एकाकीं बंद पडून रावबहादुरानीं सातारा येथें या मर्त्य लोकाला अखेरचा रामराम ठोकला. महाराष्ट्राच्या गत वैभवाची

चाड बाळगून, एकेका ठरावीक क्षेत्रांत स्वयंभू कर्तबगारीनें कर्तव्याची कसोशी करणारे जें काही अगदी थोडे लोक आहेत, त्यात पारसनीस यांची गणना प्रामुख्यानें करणें प्राप्त आहे. पारसनीस रावबहादुर झाले आणि त्यांचे इतिहास-संग्रहालय; केवळ महाराष्ट्रांतच नव्हे, तर अवघ्या हिंदुस्थानांत नामांकित झालें, यांत त्यांच्या चारित्र्याचें रहस्य नाहीं. त्यांच्या निष्काम कर्मयोगाचा तो परिणाम आहे. परिस्थिति अनुकूळ नाहीं, विद्यार्जनही बातास बेत, पदव्यांचा पाठिंबा नाही, हाती घेतलेल्या विषयाची लोकांत अभिरुची नाहीं, अशा अवस्थेंत पारसनीसांनी आपल्या स्वाध्यायाची, उद्योगाची, कार्यशैलीची आणि चारित्र्याची कमावणी कशी केली, याचा तपशील अभ्यासण्यांतच त्यांच्या कर्तबगारीचें खरें रहस्य सापडेल. श्रीयुत शंकरराव भाऊराव धावडे (सांगली) यानी रावबहादुरांचें संक्षिप्त चरित्र परिश्रमपूर्वक टांचण करून आमच्याकडें पाठविलें आहे. तें पुढील अंकी प्रसिद्ध करू. महत्त्वाकांक्षी तरूणांना तें प्रबोधक होईल, अशी खात्री आहे.

मृत्यूसमयी पारसनीसांचें वय ५६ वर्षांचे होतें. त्यांच्या मृत्यूमूळें महाराष्ट्राच्या इतिहास-संशोधक-क्षेत्रांतला एक निस्पृह व प्रामाणिक कार्यकर्ता दिवंगत झाला. ईश्वर रावबहादुरांना लवकरच पुनर्जन्म देवो!

ॐ शांतिः शांतिः शांतिः

□□□

अग्रलेख

कज्जेदलालांचे राजकारण आणि राजकारणांतले कज्जेदलाल

कोणतेंहि शास्त्र घ्या किंवा विद्या घ्या, ती केवळ ज्ञानलालसे खातर शिकण्यांतच तिची सारी मौज व आदर असतो. एकदा का ती विद्या पोट भरण्याचें साधन बनली, शास्त्राच्या उरावर शास्त्र्याचें पोट येऊन चिकटलें, कीं त्याची किंमत फुटकी कवडी! शास्त्रें किंवा विद्या यांचा उपयोग उदरंभरणासाठी करूच नये, असा कांहीं कोठें दण्डक नाहीं. पोटाचें बण्ड मिटविल्याखेरीज जगांतल्या इतर कोणत्याच बण्डांना तोंड देतां येणें शक्य नाहीं. तथापि शुद्ध ज्ञानप्राप्तीच्या इच्छेनें केलेला कोणत्याहि शास्त्राचा पायाशुद्ध स्वाध्याय शास्त्र्याच्या पोटाला अन्नपाण्याची ददात ठेवील असेंहि नाहीं. मात्र पोटासाठींच विद्या झाली कीं पोटासाठीं केलें सोंग, तेथें कैचा पाण्डुरंग या तुकोक्तीतलें सत्य तेव्हांच प्रत्ययाला येतें. प्राचीन नीतिकारांच्या दण्डकांकडे पाहिले तर वैद्यकी व वकिली या दोन शास्त्रांच्या शागीर्दांनी आपल्या व्यवसायाच्या क्षेत्रांत पोटाला रतिमात्र जागा न देतां, तेथें फक्त लोकहितवादाचीच मुख्यतः प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे, असा स्पष्ट आग्रह आहे. वैद्यकीवर अथवा वकीलीवर द्रव्य संपादन करणें, हें स्मृतिकारांनी पातक मानलेलें आहे. पण आज प्रकार काय आहे? केवळ पोटासाठींच डाकटरी वकिली करणारांची संख्या उकीरड्यावरील टाकळ्याप्रमाणे भरंसाट वाढली आहे, दररोज वाढत आहे. केवळ पोटाची खांच भरण्यासाठींच हाडांची काडे करून डागदारी व कज्जेदलालीच्या उंचउंच लांबरुंद परीक्षा देऊन जाडजूड पदव्यांची शिंगेशेपट्या पटकविणारांना वास्तवीक हे कळायला पाहिजे की परीक्षा न देतां किंवा पदव्या न मिळवितां कुत्रीं सुद्धां आपलीं पोटें ठाकठीक भरूं शकतात. महामाया युनिव्हर्सिटीच्या गिरणींतून दरसाल हजारों डागदार आणि वकील पैदास होतात. परंतु पुण्यामुंबई सारख्या शहरांत कुशल वैद्य किंवा वकील शोधूंच म्हटलें तर एक नाहीतर दोन. बाकी सगळे पोटभरू. असे कां? या प्रश्नाचें उत्तर या कलमाच्या प्रारंभीच वाचकांना आढळेल.

वैद्यकी आणि वकिली ही शास्त्रेंच अशा चमत्कारीक जबाबदारीची आहेत कीं ज्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा ओढा तिकडे असेल त्यानेंच वास्तवीक त्यांचा स्वाध्याय करून व्यवसायी बनावें. पण आजची स्थिति अगदीं उलट. जिकडे पाहाल तिकडे 'आधी कळस मग पाया.' प्रथम पदवी, नंतर

व्यवसाय आणि मग प्रवृत्तीचा व्यवसायाशीं ताळमेळ घालण्याची यातायात. यामुळें शेंकडा ९९ लोक सनदशीर पदवीधर असून पद्धतशीर पोटधरू बनलेले गांवोगांव दिसून येतात. याचा परिणाम-दुष्परिणाम-समाजावरहि किती भयंकर व घातुक होत आहे, हें सर्वजण उघड्या डोळ्यांनीं पहात आहेत; पण तोंडावाटें किंवा लेखणीवाटें शब्द काढण्याची कोणाला हिंमत होत नाही. पोटासाठींच शास्त्राध्ययनाची बळजबरी पत्करल्यामुळें डॉक्टराचा डागदार आणि वकीलाची कज्जेदलाल अथवा प्लीडराचा ब्लींडर बनला तर त्यात रडावें आणि हासावें तरी कोठे आणि कसें? वैद्यकी आणि वकीली या दोन शास्त्राध्ययनांत परोपकारी प्रवृत्तीचा केवढाहि पाया असला, तरी देशकालमानानें त्या पायावर धंदेबाजीच्या पोटार्थी प्रवृत्तीचा प्रादुर्भाव झाला असल्यामुळें, कारकुनी प्रमाणें त्यांत माणुसकीचे रंग अज्जीबात फिके पडत चाललेले आहेत. आधीं पदवी मग प्रवृत्ति असला उलटा क्रम पोटानें पाठीवर लादल्यामुळें, वैद्यकी आणि वकीली म्हणजे लोकांना भिकेस लाऊन आपल्या घरांवर सोन्याचीं कौलें चढविण्याचा राजरोज सनदशीर धंदा होऊन बसला आहे. सामान्य नियमांना अपवाद असतात, हें सनातन सूत्र लक्षांत ठेऊन, असा निष्कर्ष काढावयास कांहींच हरकत नाहीं कीं डागदारी आणि कज्जेदलाली हीं दोन राष्ट्रीय आणि सामाजिक संकटें होऊन बसलीं आहेत.

कायदेबाजी हा पोट भरण्याचा पगडबंदी धंदाच होऊन बसल्यामुळें, कज्जेदलालांची संख्या बेसुमार वाढली आहे. त्यामुळें कलहप्रियतेच्या व्यसनाचाहि फैलाव देशांत इतका मनस्वी माजला आहे की नवरा बायकोच्या लव्हाळ्यांत सुद्धां कज्जेदलालाच्या नोटीशीचें पोटीस लागल्याशिवाय म्होतुराच्या भटी मंत्रांना कायद्याचा वायदा लागूं पडत नाहीं. कलहप्रियता केव्हांही झाली तरी घातुकच. दारूबाजी रंडीबाजी इतकीच कायदेबाजी ही सुद्धा एक आत्मघातकी व सर्वस्वनाशक वाळवी आहे. गरतबाजी प्रमाणें हिचा व्यवहार वरवर जरी मोठ्या टाकमटिकल्याचा वाटतो, तरी अखेर तिच्या परिणामाचा मसाला दारू-रंडीबाजीच्याच मासल्याचा असतो. हिंदुस्थानासारखा भांडकुदळ देश अवघ्या दुनियेंत दुसरा नाहीं. कायदेबाजीच्या पायी येथें दरसाल लक्षावधि वाड्यांचे आणि घरदारांचे ओसाड उकीरडे बनत असतात. हजारों कुटुंबे भिकेस लागतात. शेकडों माणसें मित्राची शत्रू बनतात. कायदेबाजीची आम्हांला अशी विलक्षण चटक लागलेली आहे कीं कोर्टाची पायरी केव्हां आणि कां चढावी याचा कांहीं धरबंधच उरलेला नाहीं. शिवी दिली, जा कोर्टात. पांचदहा रुपये थकले, ठोक फिर्याद. मला 'गावांत घुसलेला ढ' म्हटले झाली बेअब्रू, लाव दिवाणी फौजदारींत दावा एकदम. सायकलचा धक्का लागला, दाखव फरासखाना. वाटपाच्या विहिरीवर पाणी भरलें, करा धक्काबुक्की, धावा कोर्टात हक्कासाठी. बापाची पडवी आणि माझे ओठाण; पडवींतला बाप ओठाणांत येऊन बसला, द्या त्याला नोटीस आणि खेचा त्याला कोर्टात. कुशीची ठुशी, आई बळकावते कशी? आणा तिला वारंटाने पकडून. वादी मुलगा, प्रतिवादी बाप आणि साक्षीदार आई. इत्यादि अनंत भांडकुदळपणाचे मासले आहेत. ते किती सांगावें? सोडत रेसिस जुगारादि व्यसनांप्रमाणेंच कायदेबाजी हे एक व्यसन कांही कांहीं माणसांना इतकें विलक्षण लागलेलें आढळतें कीं केव्हांहि पहा ही स्वारी बेटावरून खडकावर आणि खडकावरून विश्रामबागेत एकसारखी धावपळ करीत असावयाची. सारी हयात दिवाणी आणि फौजदारीत खतम्. मरायला फुरसत मिळायची नाहीं. पूर्वी फट् म्हटलें तर ब्रम्हहत्या होत असे म्हणतात. पण सध्यांच्या

कायदेबाजीच्या युगांत हट् म्हटलें तर कायदेबाजीचा कज्जेदलाल घरादाराचा लठ्ठ गोळा गट्ट करून अखेर आत्महत्येची पाळी आणतो.

६ ऑक्टोबर १९२० च्या यंग इंडीयांत महात्मा गांधींनीं 'न्यायमंदिराचें इंद्रजाल' मथळ्याचा एक चिकित्सक विचारांचा लेख लिहिला आहे. त्याची सुरवात महात्मा गांधी अशी करितातः- ''वकील आणि न्यायमंदिरें यांच्या जादूनें जर आह्मी भारले गेलों नसतो, कज्जेदलालीच्या खाड्यांत घुसण्याचा आणि पाशवी वृत्तींना चेतविण्याचा मोह पाडणारे वकीलांचे टाऊट (कज्जेदलाल गुमास्ते) जर नसते, तर आमचें जीवन सध्यापेक्षां खात्रीनें पुष्कळच सुखाचें राहिलें असतें.'' म. गांधी नेहमीं सूत्रबद्ध बोलतात व लिहितात. या एकाच सूत्रांत कायदेबाजी आणि कज्जेदलाली ही काय भयंकर चीज आहे आणि ह्या धंद्यांतल्या लोकांची मनोवृत्ति किती विकृत बनलेली असते, याची विचारवंतांना पुष्कळच कल्पना करतां येईल. म. गांधींचीं असहकारवादाचीं अनेक तत्वें व मतें देशकालवर्तमानाप्रमाणे कोणाला जरी पटली नाहीत, तरी त्यांच्या 'न्यायमंदीरांवर बहिष्कार' वादांतली सनातन सत्यें न्यायाधीशांना आणि वकीलांनाहि अझून खोटी पाडण्याची हिंमत झालेली नाही. कोर्टे कचेऱ्यांवरील बहिष्कार व्यवहारांत अशक्य होण्याची कारणे वकीलांच्या पोटांत आहेत. पाटणा येथील सुप्रसिद्ध वकील बाबू राजेंद्र प्रसाद M. A. M. L. यांनी यंग इंडियाच्या वरील अंकांतच 'कायदेबाजी आणि तिचा अर्थ' नामक जो स्पष्टोक्तीपूर्ण लेख लिहिला आहे, त्यांत एके ठिकाणीं ते म्हणतात कीं 'न्यायदानाच्या पद्धतींतच असा एक भयंकर दोष आहे कीं त्यामुळें सर्रास लोकांची नीतिमत्ता अज्जीबाद विकृत बनली आहे. लोकांचा सत्याविषयीचा आदर दिवसेंदिवस झपाट्याने ऱ्हास पावत आहे आणि त्याला विशेषतः कायद्याची कोर्टेच जबाबदार आहेत.'' इंग्रेजी अंमलांत कायेदबाजीचा सुकाळ झाल्यामुळें हिंदी लोकांत माणुसकीचा दुष्काळ पसरत चालला आहे. कोणाचा कोणाला विश्वास नाहीं, आदर नाहीं, सहानुभूति नाहीं, दोन डोळ्याची मुरबत नाहीं. वीस रुपड्याची पावती असली किंवा पांच पंचवीसाची परमेश्वरी (प्रामीसरी) नोट असली, तरी त्यावर एक आण्याच्या कायदेबाज टिकीटाचा चिकट-संस्कार केल्याशिवाय ऋणको धनकोची माणुसकी व्यवहारांत कोणी शहाणा मानीत नाहीं. पापभीरुत्व, प्रामाणिकपणा, सत्यप्रीति आणि विशेषतः माणुसकी या गुणांचे भोक्ते असलेले अनेक गोखले पूर्वी रास्ते बनल्याचीं उदाहरणें आहेत. परंतु सध्यां आम्ही आमची माणुसकी कायदेबाज कज्जेदलालांच्या भांडकुदळ पोटातच रिचवल्यामुळें, आम्हाला अब्रू आहे कीं नाहीं, मी माणूस का जनावर, जिता कीं मेला, कायदेशीर मुलगा का फायदेशीर नवरा, सही माझी का माझ्या बापाची, अन्न खातो कीं शेण खातो, असल्या गोष्टीसुद्धां न्यायमंदीरांत जाऊन आम्हाला ठरवून घ्याव्या लागतात. केवढी आमची ही स्वराज्याची लायकी?

कज्जेदलालांच्या ज्या पोटांनी जनतेच्या सामाजिक स्थैर्याचें आणि माणुसकीचेंहि तीनतेरा उडविले आहेत, त्याच पोटांचे ओठ आज स्वराज्यविषयक राजकारणांत लेक्चरबाजीच्या कसरतींत दंग आहेत. पूर्वीचा कायदेपंडीत कोण असे व कसा असे, याचें इतिहास-संशोधन केलें नाहीं, तरी आजचा वकील कोण आहे व कसा आहे, हें सर्वांना पूर्ण माहीत आहे. पोटासाठीं असो नाहीतर खंडाळ्याच्या घाटासाठीं असो, मनुष्य एकदां वकील बनला कीं त्याची एक विशेष प्रकारची वृत्ति बनतेच बनते. त्याचे वातावरण व परिस्थिति इतर व्यावहारीक वातावरणापेक्षा

इतक्या विलक्षण रंगाढंगाची असते की त्याला आपल्या हृदयाची माणुसकी जवळ जवळ बधीरच करून ठेवणें प्राप्त असते. द्रौपदीला पांच नवऱ्यांची मर्जी सांभाळायची होती, पण वकीलाला शेकडों यजमानांच्या हो ला हो करून पोट भरायचे असते. वकीलाचा आणि भिक्षुकाचा धंदा सामान्यतः एकजिनशी. दक्षिणांपांतुं समर्पयामीवर भिक्षुकाप्रमाणेंच वकीलहि आपल्या अशीलांच्या पापपुण्याचा बोजा मस्तकावर चढवून घेतो. बरें, ही पातके तरी एकरंगी असतात? मुळींच नाहीं. आपला एक मुकदमा चालत असला तर जीव मट्ट्यास येतो. पण शेकडो भिन्न भिन्न लहान मोठ्या, क्षुद्र भयंकर मुकदम्यांत दररोज वकील कढईतल्या वड्याप्रमाणे लोळत असतो, तरी त्याला घाम फुटत नाही कीं तो राम म्हणत नाहीं. अशील लोक आपापल्या चिंतांचे गाठोडे वकीलाच्या माथी आणून मारतात आणि त्यानें एकदां म्हटलें ''हे: यांत कांहीं काळजी करण्याचें कारण नाहीं. तुम्ही आतां निर्धास्त बसा.'' कीं अशीलांचा जीव बराच खाली पडतो. वकीलाच्या भोंवतीं कुंपण घालून बसलेल्या अशिलांच्या निरनिराळ्या गाऱ्हाण्यांचे निरनिराळे प्रकार नुसते ऐकत बसलो तर जीव भांबाऊन जातो. पोटगीसाठीं धडपडणारीं पळपुट्या नवऱ्याची कायदेबाज बायको, मोटरखालीं कोंबडी कुत्रीं माणसें चिरडणारा शॉफर, 'एतना मूदल ने एतना बेज' करणारा मारवाडी, दत्तविधान रद्द ठरवूं पाहाणारी श्रीमंत विधवा, बळजबरीच्या संभोगाची फिर्याद लावणारी वेश्या, खुनी माणसाचे नातेवाईक, बेअब्रूचे खटले झुंजविणारे काळे गोरे कोंबडे, खोट्या गहाणखताला खरें ठरवून नादारीनंतरच्या संसाराची बेगमी करणारा सज्जन, भरपाई झालेल्या परमेश्वरी नोटीवरहि पावतीच्या अभावाच्या सबबीची फिर्याद लावणारा परशुरामक्षेत्रस्थ, इत्यादि संतमहंत जेव्हां आपापल्या गाऱ्हाण्यांचा आणि डावपेचांचा वकीलापुढें पाढा वाचतात, आणि तोहि जेव्हां निर्विकार चेहऱ्यानें प्रत्येकाला तथास्तूची खैरात देत असतो, तेव्हां हे जग आहे का सैतानाचा सांपळा आहे, असा दाट संशय येऊं लागतो. वकील हा असा चमत्कारिक महात्मा असतो की खटल्यांत अशिल जिंकला काय किंवा मेला काय, त्याचें सुहेर सुतक मानण्याचें त्याच्या हृदयाला भानच नसते. किंबहुना त्याला हृदयच ठेऊन भागत नसते. अंत्यविधीचे मंत्र म्हणणाऱ्या ओंकारेश्वरावरच्या भटाला जसे आलेला मुर्दा राव किंवा रंक, वारशी का बेवारशी, बाई का बुवा, याची पर्वा राखण्याला फुरसद नसते, तसेच वकीलालाही खटल्याच्या बऱ्या वाईटाने आपल्या मनाची शांति ढळवून भागतच नाही. आला मुरदा, म्हणा मंत्र, घ्या दक्षणा, द्या जाळायची परवानगी, हा जसा भटाचा अव्याहत क्रम; तसा आला अशिल, घेतली फिर्याद, लढवला खटला, जिंकलास तर नशिब, हरलास तरीहि नशिब, माझी फी आगाऊ जमा, हा वकीलाचा क्रम. हरलास तर अपील आहेच. हायकोर्टात मेलास तरी प्रिवी कौन्सिलांत तुझ्या सरणाला पुष्कळ जागा आहे. तात्पर्य, वकीली मनोवृत्ति म्हणजे पाषाणाची मूर्ती. तुम्ही काकडआरती करा नाहींतर माकडआरती करा, टाळ वाजवा नाहीतर बेंडबाजा वाजवा, इंटूबा आपला कंटेवरी कर देऊन अठ्ठावीस युगे उभा आहेच. सगळ्यांच्याच कर्मकटकटींची रकटी न्यायकोर्टाच्या धोबीघाटावर धुण्याचा धंदा पत्करणाऱ्या वकील-धोब्यानें एक घाव आडवा आणि एक घाव उभा घालण्यापलीकडे अधिक सुखदुःख कशाचें आणि कां मानावें? रोज मरे त्याला कोण रडे? सकाळीं उठल्यापासून निजेपर्यंत जेथें कज्जेदलाली आणि कर्मकटकटी, तेथे कोणकोणाची विवंचना करायची? चिंता आणि चिता यांतल्या टिंबाचे महत्व अशिलाला उमजले नसले, तरी

वकीलाला चांगलें समजलेलें असते. वित्तासाठीं वेळी वकील पित्त भडकवील, पण चित्ताला तडकू देणार नाहीं. वकीलाची मनोवृत्ति म्हणजे ओगल्यांची चिमणी, भडकेल पण तडकेल काय?

वकीली मनोवृत्तीला व्यवसायप्राप्त कितीहि जाडजूड बधिरता आलेली असली, तरी वकीलीचा धंदाच कज्जेदलालीचा असल्यामुळें, त्याचा भांडकुदळपणा मात्र नेहमींच वाढता असतो. नव्हे, तो तर त्याचा ट्रेडमार्क. वकील जितका तोंडाळ व भांडाळ तितका त्याचा धंदा तेजी. कलहप्रियता म्हणजे वकीलीची जीवनज्योत. ही ज्योत संतत प्रज्वलीत राखण्याच्या कामी 'वकीलांचे टाउट' ही एक नवीन महात्म्यांची खास हिंदी अवलाद पैदा झालेली आहे. हे नारदाचे अवतार असावे, असा एका क्रिमिनॉलजिष्टांनें शोध लावल्याचें ऐकतों. या नारदी सैन्यांतल्या मंडळीत बहुतांशी गांवगुंड 'दादा'च फार असतात आणि वकीलांच्या चलतीचा प्राण त्यांच्या जिवावर अवलंबून असतो. विशेषतः बीए झाल्यानंतर 'काय करावे?' हा प्रश्न कसातरी सोडविण्यासाठीच जे कसेतरी एलेल्बी बनलेले असतात, त्यांच्या वकीली पोटाची विवंचना या नारदी दादांच्याच हातीं असते. त्यामुळें दादा दरवेशी आणि वकील आस्वल हा प्रकार शेकडां ९० वकीलांच्या चारित्र्यांत दिसून येतो. १३ आकटोबर १९२० च्या यंग इंडियांत पंडित मोतीलाल नेहरू या नामांकित कायदेपंडिताग्रणीचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत ते म्हणतातः- ''प्रस्तुतच्या राज्यपद्धतीचा आणखी एक भयंकर दोष आहे. त्यानें वकीलांचा आणि कज्जेदारांचा असा एक वर्ग निर्माण केला आहे कीं न्यायकोर्टांत अस्तित्वांत असलेल्या न्यायदानयंत्ररचनेचा जर त्यांना पाठिंबा नसता, तर कोणत्याहि इभ्रतदार समाजांत या लोकांना तेव्हांच हकालपट्टी मिळती. यांच्या कारवाया सर्वश्रुतच आहेत आणि यांच्या एजंटांनी (टाऊट दादांनी) एकूण एक कोर्ट डागळून टाकलेलें आहे.'' ''अदालतमे जो जिता सो हरा, जो हरा सो मरा'' हें पंडीतजींचे सूत्र वकील, दादा, न्यायदान इत्यादि संस्थांविषयीं काय निर्णय सुचवितें त्याचा विचारवंतांनीं विचार करावा. तात्पर्य, लोकहितवादी दृष्टीनें निष्कर्ष काढायचा झालाच तर असें स्पष्ट विधान करतां येणें शक्य आहे कीं वकील आणि वकीली या बिनकाळजाच्या दोन संस्था बनल्या आहेत आणि यांचा जेथें जेथें प्रवेश होतो तेथें तेथें कलह बेकी शत्रुत्व आणि अखेर सत्यानाश यांचा पगडा पडतो.

सध्या हिंदुस्थानांत स्वराज्यप्राप्तीच्या वल्गना जोरजोरानें चालूं आहेत. दर तासाला नवनवे राजकारणी पक्ष उत्पन्न होत आहेत. जुने पक्ष पगडीपालटामुळे इंद्रधनुष्यालाहि लाजवीत आहेत. हजारो चळवळी सुरू आहेत, व्याख्यानबाजीचे धबधबे धो धो कोसळत आहेत, परिषदांचा पूर वाहात आहे, ठरावांचा खच पडत आहे, टाळ्यांचा कडकडाट कानठाळ्या बसवीत आहे, परंतु कोणाचा कोणाशीं मेळ नाहीं. जिकडे पाहाल तिकडे तंटे निंदा शिव्या मत्सर कारस्थानें फाटाफूट! आणि हें म्हणे हिंदी राजकारण! सध्या पुढाऱ्यांचे इतकें उमाप पीक या देशांत आलेलें आहे कीं त्यापुढें चातुर्मासांतल्या घुल्यांचा काय पाड? याचें कारण हेंच दिसतें कीं राजकारणांत वकीलांचा उर्फ कज्जेदलालांचा वाजवीपेक्षां फाजील प्रमाणांत घुसडा झाल्यामुळें, आजचें राजकारण हें कज्जेदलालांचे राजकारण बनलें आहे. खरें पाहिलें तर हिंदुस्थानांत राजकारण कोठेंच कांहीं नाहीं; आणि हा कलह मत्सराचा कज्जेदलाली वणवा प्रस्तुतच्या खऱ्या खोट्या भल्या बुऱ्या राजकारणाच्या क्षेत्रांतच वावरता तर कोणालाहि

वकीली वृत्तीनें त्याचें सुहेर सुतक बाळगण्याचें कारणच पडलें नसते. परंतु शेतांतल्या अनाडी शेतकऱ्यापासून तो थेट लक्षाधीश व्यापाऱ्याच्या तिरकटी पगडीपर्यंत, फादर-इन-लॉ, ब्रदर-इन-लॉ, नात्याप्रमाणे फ्रेन्ड-इन-लॉ नात्याने वावरणाऱ्या कज्जेदलालांची नारदी कलहवृत्ति, राजकारणाच्या सबबीवर सामाजिक संघटनेलाहि जाचक होत असल्यामुळें, राजकारणातल्या कज्जेदलालांचे वास्तवीक स्वरूप काय आहे, याची स्पष्ट कल्पना जनतेपुढें मांडणे, हें आमचें कर्तव्य आहे. तें पुढील अंकी बजावण्यात येईल.

□□□

स्फुटलेख

कायद्याशिवाय सुधारणाच नाहीं

आमच्या सामाजिक आणि धार्मिक बाबतींत सरकारनें हात घालूं नये, आमच्या सुधारणा आम्ही करूं, अशा प्रकारची आग्रहवजा हट्टाची तक्रार कै. टिळक नेहमीं करीत. टिळकांचें हें सूत्र आतां प्रत्येक जीर्णमताभिमान्याच्या जिव्हेवर कायमचें खोदलें गेलेलें आहे. 'अन्यधर्मी भूपाल आर्यभूचा' असल्यामुळे तो 'आर्यधर्मा अनुकूल नसायचा' ही गोष्ट कांही खोटी नाही. त्याच प्रमाणें कोणतीहि सामाजिक अथवा धार्मिक सुधारणा आत्मस्फूर्तीनें घडवून आणण्याची हिंदु लोकांना मुळीं प्रवृत्तीच नाही, हीहि गोष्ट तितकीच सत्य आहे. प्राचीन काळचा इतिहास जाऊं द्या, पण देशांत इंग्रजी सुरू झाल्यापासून पाहिलें तरी सतीच्या प्रघातापासून तों कालच्या डॉ. गौरच्या विवाहनोंदणी कायद्याच्या बिलापर्यंत हिंदूंच्या पाठीवर कायद्याचा कोरडा कडाडल्याशिवाय कोणती सुधारणा त्यांनी आपखुशीनें आचरली आहे? सुधारणा तर झाली पाहिजे, होत नसेल तर केली पाहिजे, करण्याची प्रवृत्ति नसेल तर कायदाच झाला पाहिजे. आतां, कायदा करणारे राज्यकर्ते अन्यधर्मी आहेत, हा अखिल हिंदु जनांच्या आत्मद्रोहाचा निसर्गसिद्ध परिणाम आहे. त्याबद्दल आतां शंख करून काय उपयोग? राज्यकर्ते अन्यधर्मी असले, तरी कायदे सुचविणारे स्वधर्मीयच असतात ना? बसु-पटेल-गौर बिलांच्या वेळचा टिळकानुयायी जीर्णमतवाद्यांचा शिमगा हेंच सिद्ध करतो कीं यांना स्वतः कांही करायला नको आणि दुसरा कोणी कांही करील तर 'धर्म बुडाला. सरकारने धर्मांत हात घातला' अशी बोंबाबोंब मात्र मारायला हवी. हिंदूंच्या आत्मप्रबोधनार्थ होणारी प्रत्येक सुधारणा ज्या धर्माला बुडविण्यास कारण होते, तो हिंदुधर्मच एकदां थेट रसातळाला नेऊन पोहचवायला पाहिजे. जो धर्म लोकांना जगवीत नाहीं व स्वतःहि मरत नाहीं, त्याला मारल्याशिवाय लोकांनी जगावें तरी कसें?

हे विचार सुचण्याचे कारण कोल्हापुर संस्थानांत छत्रपति सरकारनीं अंमलांत आणलेला बालविवाह प्रतिबंधक कायदा. सामाजिक सुधारणेच्या दिशेने छत्रपतींचा हा उपक्रम अत्यंत अभिनंदनीय होय. या कामीं राजसत्तेचा पाठिंबा तर हवाच हवा, पण सामाजिक प्रबोधनाचा जिवंत जिव्हाळाहि असावा लागतो. परकी व परधर्मी राज्यकर्त्यांना गुलाम हिंदूंच्या घरांतील घाणेरड्या रूढींचा उकीरडा दिसत नाहीं असें नव्हे. पण हिंदु लोकच जर त्या उकीरड्यांत लोळण्यास राजी, तर सरकारला तरी

त्याची कां काळजी? लोकशाहीची पुराणें झोडणाऱ्या हिंदूंचा जोशी बिलासारख्या बिलालाहि जेथें विरोध, तेथे गर्भस्थ मुलांमुलींची लग्ने लागली तरी सरकारचे त्यांत काय जातें? तात्पर्य, प्राचीन परकी इस्लामी अंमलांत हिंदूंच्या सामाजिक सुधारणेला राज्यकर्त्यांचा कांहीहि विरोध असला, तरी ती स्थिती इंग्रेजी अंमलांत मुळींच नाही. नानाविध घाणेरड्या रूढींच्या उकीरड्यांचा हिंदूंनाच जर मनापासून चिळस उत्पन्न झाला असेल, तर स्वयंस्फूर्तिच्या सुधारणेची बाष्कळ बडबड बंद करून, त्या रूढीविरूद्ध सरकारी कायदेच करून घेतले पाहिजेत. सरकारी कायदा झाला नसता तर १९२६ सालापर्यंतहि सतीचा प्रघात हिंदुंच्या घरोघर बिनअटकाव खास चालूं राहता. परिस्थितीनें हिंदु कितीहि ठेचला गेला, तरी कायद्याच्या कैचींत त्याची मान पकडल्याशिवाय कोणत्याहि सुधारणा त्याने स्वयंस्फूर्तीने केल्याचे उदाहरण इतिहासांत नाही. हिंदूंना संघटित समाज म्हणून जगायचे असेल तर सध्यां निदान खालील कायदे त्यांनी पास करून घेतलेच पाहिजेत.

(१) हुंडेबाजी व देजबाजी प्रतिबंधक कायदा.

(२) विधवा केशवपन प्रतिबंधक कायदा.

(३) विधवा पुनर्विवाह सक्तीचा कायदा.

(४) विधुर-कुमारी-विवाह-प्रतिबंधक कायदा.

(५) निपुत्रिक श्रीमंतांनी अनाथ बालकाश्रमांतील मुलांनाच दत्तक घेण्याचा सक्तीचा कायदा.

कोल्हापूरच्या छत्रपतींना आमची अशी विनंती आहे कीं या दिशेनें त्यांनी आणखी पुढें पाऊल टाकून खालसांतील हिंदी स्वराज्यवाद्यांना आत्मप्रबोधनाचा व स्वराज्याच्या लायकीचा मार्ग दाखवून द्यावा.

सोनारानेंच कान टोचला!

मागें आम्ही वांईच्या प्राज्ञ पाठशाळेबद्दल कांही स्पष्टोक्तीचे उद्‌गार काढले होते. ते आमच्या अनेक समव्यवसायी भटबंधूंना रुचले नाहीत व पचलेहि नाहींत. त्यांनी शेलकी पुष्पांजली वाहून प्रबोधनाची पूजा बांधली. आमचे म्हणणें इतकेच होतें की वाईची प्राज्ञपाठशाळा फक्त भटांच्या मुलांकरतांच आहे, भटेतरांना तेथे मुळींच प्रवेश नाहीं, सबब या शाळेला मदत करण्याचे भटेतर जनतेला कांहीच प्रयोजन नाही. भटांनी खुशाल वाटेल ती मदत करावी. आमची कांही हरकत नाही. यांत भटी पत्रकारांना चिडण्यासारखे काय होतें? भटांच्या संस्थेला भटांनी मदत करावी, भटेतरांनी मुळींच करूं नये, कारण प्राज्ञपाठशाळा ही सार्वजनिक संस्था नव्हे. अशी खरी स्थिति स्पष्ट सांगतांच, आमच्यावर कडव्या ब्राम्हणद्वेषाचा आरोप झुगारला जातो. यावरून भटांची मनोवृत्ति अलीकडे फार नाजूक बनत चालली आहे असें दिसतें.

राष्ट्रीयब्रुव शिक्षणावर आणि त्याच्या पुरस्कर्त्यांवर आमचा कधीच विश्वास नव्हता. ज्यावेळीं पुण्यास टिळक महाविद्यालयाची नौबद झडूं लागली आणि त्याच्या कुलपति धनपति कार्यवाह वगैरे भारवाहकांच्या टिमक्या ठणठणूं लागल्या, त्यावेळी सुद्धां आम्ही महाराष्ट्रीय मेंढरी तरुणांना धोक्याच्या अनेक सूचना दिलेल्या होत्या. परंतु केसरी व तत्पक्षीय नगाऱ्यांच्या दणदणाटापुढें प्रबोधनाची टिमकी काय होय? आतां, इतर सर्व ठिकाणच्या राष्ट्रीय शाळांप्रमाणे टिळक महाविद्यालयाचेंहि टिंपाड वाजत आलें आहे. हे टिंपाड किती पोंकळ आहे हें चव्हाट्यावर आणून वाजविण्याचें काम भालाकार भोपटकर

यांनी बजावले. त्यांनी जर हा प्रश्न हातीं घेतला नसतां तर ही सव्वा लाखाची झांकली मूठ आणखी बरेच दिवस लोकांना झुलवीत राहिली असती. या टिंपाडाचा पोकळपणा आम्हांला माहीत नव्हता असे नाही. पण या बाबतींत आम्ही जर नुसता ब्र काढला असतां, तर साऱ्या भटी पत्रांनी काव काव केली असती. आतां भालाईत भटजीनेंच ढालाईत ढालगजांचे कान पिरगळल्यामुळे गप्प बसायला 'काय घ्याल असे विचारण्याचा प्रसंग या टिळकी संस्थेवर येऊन बितला आहे. ''राष्ट्रीय'' प्राण्यांनी काढलेल्या कोणत्या संस्थेचें टिंपाड वाजलेलें नाहीं?

जी. आय. पी. रेल्वेचा हिंदुधर्माभिमान

स्वार्थासाठी सैतान बायबलाचा पाठ करतो, अशी इंग्रजी भाषेत एक म्हण आहे. पण ख्रिस्ती भांडवलशाहीचा रेल्वे-सैतान सन १९२६ सालीं वारकऱ्यांच्या जिवासाठी येग येग विठाबाई म्हणून टाळ कुटूं लागेल असें कोणाला स्वप्नहि पडलें नसेल. पंढरपूरच्या यात्रेकरूंनाचसे काय, सर्रास तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची ज्यापी रेलवे काय बडदास्त ठेवते, हे सर्वश्रुतच आहे. इतर ठिकाणें सोडली तरी पुण्याच्या पुण्यवान स्टेशनवर या गरीब उतारूंचे जनावरांप्रमाणे हाल करण्यांत येतात, ते डोळ्यांनी बघवत नाहीत. पदरचे पैसे देऊन खुराड्यांतल्या कोंबड्यांच्या हालअपेष्टांचा कोणाला अनुभव घ्यावयाचा असेल तर त्यानें पुणे स्टेशनावरच घ्यावा. मोठमोठ्या जत्रांच्या वेळी तर वारकऱ्यांना मालगाडीच्या डब्यांतून जनावरांप्रमाणें कोंबून नेण्याचा ज्यापी रेलवेचा बेशरम प्रघात असे. पण यंदा ज्यापीला भक्तीरसाची मोठी उकळी अवचित फुटली आहे. यंदा तिला हिंदुधर्माच्या अभिमानाचा मोठा पान्हा फुटला आहे. एकजात सर्व लायनीवर प्रत्येक स्टेशनावर 'पंढरपुरची यात्रा' मथळ्याच्या रंगी बेरंगी मोठमोठ्या जाहीराती फडकल्या आहेत. 'पंढरपुरला जाणें प्रत्येक हिंदूचें कर्तव्य आहे, पवित्र चंद्रभागेचें स्नान करून पुण्य मिळवा, पुंडलिकाचें दर्शन घ्या, विठोबाचें दर्शन घ्या' इत्यादि आकर्षक वचनांनीं खुलविलेल्या सचित्र जाहीराती पत्रोपत्री प्रसिद्ध होत आहेत. 'खास यात्रेकरूंसाठी स्पेशल गाड्या सुटणार' असा डांगोरा पिटण्यांत येत आहे. या सर्व व्यापारी दक्षतेमुळें कदाचित् यंदाची पंढरी बडव्यांचे व रेल्वेचें उखळ पांढरे करण्या इतकी भरंसाट फुगण्याचा बराच संभव आहे. डांगोरा पिटल्याप्रमाणें काय स्पेशल व्यवस्थेचे दिवे लागतील ते दिसतीलच. परंतु बेळगांव धुळे व पुणे इतर ठिकाणच्या रेलवे मंडळांनी यात्रेच्या हंगामांत जातीनें हजर राहून या स्पेशल व्यवस्थेवर नीट नजर ठेवावी. धुळ्याचे बावडेकर, बेळगांवचे मराठे, पुण्याचे गाडगीळ यांनी स्वस्थ बसूं नये. रेलवे उतारूंचे हक्क काय असतात, सांखळी केव्हां ओढावी, टिकिट कलेक्टरांचा व इनस्पेक्टरांचा वास्तवीक अधिकार काय आणि त्यांच्या अरेरावीचा सक्रीय प्रतिकार कसा करावा, याचे प्रत्यक्ष उदाहरण जनतेला शिकविण्याची हीच वेळ आहे.

रिपोर्टर का पोर्टर?

देशी भाषांसाठी विश्वसनीय व शास्त्रशुद्ध ध्वनिलेखन पद्धत प्रचारांत नसल्यामुळे वाङमयाच्या व विचार-प्रसाराच्या दृष्टीने जनतेला अनंत अडचणी व अपघात भोगावे लागत आहेत. वृत्तपत्रांचा प्राण म्हणजे ध्वनिलेखन पद्धति. सरकारी गुप्तपोलीस खात्याचाहि प्राण तेथेंच. परंतु देशी पत्रकार किंवा सरकार यापैकी कोणीहि देशी-भाषा-ध्वनिलेखन-पद्धतीची आजपर्यंत दरकार केलेली नाहीं. म्हातारा नवरा कुंकवाला आधार या न्यायाने मुंबई सरकारच्या पोलीस खात्यांत मानकरांची एक अपक्व

(Crude) अशी मराठी शार्टहॅण्ड पद्धति गेली कांही वर्षे चालूं आहे. तिच्या शास्त्रशुद्धतेबद्दल आणि उपयुक्ततेबद्दल पोलीस रिपोर्टरांनींच छातीला हात लाऊन अभिप्राय द्यावा म्हणजे झालें. वास्तवीक ध्वनिलेखन पद्धतीसाठी वृत्तपत्रकारांनीच उत्तेजनाचे प्रयत्न या पूर्वीच करायला पाहिजे होते. परंतु जेथे आमचीं एडीटरेंच या शास्त्रांत संन्याशी, तेथे उत्तेजनाची अपेक्षा म्हणजे मुसळाला अंकूर असा प्रकार साहजिक आहे. इतकेंच नव्हे, तर या विषयावरील पुस्तकांवर अभिप्राय काय आणि कसा द्यावा, हेंच त्यांना समजत नाही; मग ध्ननिलेखनाचा प्रश्न हाती घेण्याची अक्कल आणि प्रेरणा तरी कोठली? मराठी वृत्तपत्रांचे बातमीदार पाहिले तर तेहि एडीटरांप्रमाणेच ध्वनिलेखनशास्त्रांत अडणीवरचे. सभास्थानी मोठ्या ऐटींत जायचे, कागदांच्या चिटोऱ्यावर कांहीतरी मोडी बालबोधींत किचमीड गिचमीड शब्द खरडायचे आणि एक कांहींतरी पाणचट सारांश लिहून 'गोम्या सोम्याचें व्याख्यान' म्हणून तें पातडें एडीटर महादेवाच्या टाळक्यावर हापटायचे, कीं या रिपोर्टरांची पोर्टरी संपली. खऱ्या खोट्याच्या निर्णयाचा प्रश्न उद्भवलाच, तर या चित्रगुप्तांना आपल्या चिटोऱ्यांपेक्षां कानांच्या प्रामाणिकपणाचा पुरावाच पुढें करावा लागतो. बाहेरगांवची गोष्ट सोडून दिली तरी असोशिएटेड प्रेसचे बातमीदार म्हणून पुण्यास मिरविणाऱ्या कोणकोणत्या चोपडीबहाद्दरांना स्टेनोग्राफीचे ज्ञान आहे, त्याचा पुरावा पुढें येईल तर बरें. सारांश, देशी भाषांसाठी पायाशुद्ध, सहजसाध्य व विश्वसनीय अशी ध्वनिलेखन पद्धती प्रचारांत आणल्याशिवाय वृत्तपत्रांना ग्रंथकारांना आणि वक्त्यांना आपले लोकशिक्षणाचे कार्य पूर्णत्वाने करतांच येणे शक्य नाही, इकडे त्यांचें लक्ष आतां तरी वेधलें जाईल, अशी आम्हांला आशा आहे.

प्रोफेसर बेन्द्रे यांचे प्रयत्न

लोकशिक्षणाची ही लंगडी बाजू विचारांत घेऊन देशी भाषांसाठी शास्त्रशुद्ध ध्वनिलेखन पद्धति शोधून काढण्याचें कार्य प्रो. वासुदेव सीताराम बेंद्रे मु. पुणे यांनी गेली १५ वर्षे खटपट करून सिद्धिस नेलें आहे. मराठी ध्वनिलेखन पद्धतीचा त्यांचा पहिला ग्रंथ सन १९२२ सालीं प्रसिद्ध झाला. त्यावर व्यक्त झालेल्या वृत्तपत्री अभिप्रायांचे 'लोक काय बोलतात?' नांवाच्या चोपड्याच्या शेंकडों प्रति लोकजागृतीसाठीं त्यांनी फुकट वाटल्या. पुण्याच्या व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें या ग्रंथाला ७५ रुपयांचे आणि इंदोरच्या मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीनें ५० रुपयांचे पारितोषिक देऊन प्रो. बेंद्रे यांचा गौरव केला. जे. जी. कॉव्हर्नटन (माजी डायरेक्टर शिक्षणखातें), ऑन. डॉ. परांजपे (माजी शिक्षणमंत्री), जे. ए. गायडर (माजी डे. इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, सीऐडी) इत्यादि सरकारी अधिकाऱ्यांनीहि या शीघ्र ध्वनिलेखन पद्धतीची तारीफ केली. बडोदे कोल्हापूर मध्यप्रांत वऱ्हाड व कांही देशी संस्थानांतल्या सरकारांनीं या ग्रंथाला लायब्ऱ्यांत आश्रय दिला. पण पुढें काय? वाहवा झाली, बक्षिसे दिली, खरेदी केली, आशीर्वाद दिले, पण पुढें काय? या नंतर प्रो. बेंद्रे यांनी गुजराथी व हिंदी भाषांसाठींहि आपल्या पद्धतीचे ग्रंथ तयार केले. (ते अझून छापले नाहीत.) बडोदे संस्थाननें तर प्रो. बेंद्रे यांच्या खास शिक्षणाखाली दोन नायब फौजदार गुजराथी ध्वनिलेखन पद्धतींत तरबेज करून नेले. याबद्दल अहमदाबादचे एज्यु. इनस्पेक्टर श्री. के. एस. वकील आपल्या २७-८-२५ च्या पत्रांत त्या नायब फौजदारांच्या गुजराथी ध्वनिलेखन प्राविण्याबद्दल (एका मिनिटाला १२५ शब्द बिनचूक) प्रो. बेंद्रे यांना शाबासकी देतात, आणि गुर्जर देशीय वृत्तपत्रें, मुन्सिपालट्या, डि. लोकल बोर्डे इत्यादींना ध्वनिलेखकांची संस्था तयार करण्याची शिफारस करतात. बडोद्याच्या एज्युकॅशनल कमिशनरनीं बेंद्रेकृत

मराठी व गुजराथी ध्वनिलेखन पद्धति कलाभुवन कमर्शल क्लासमध्यें मुक्रर केली आहे. पण पुढे काय? प्रो. बेंद्रे यांनीं आपल्या पद्धतींतच असें एक अजब तत्व ठेविलें आहे की त्यामुळे विद्यार्थ्याला अल्पश्रमांत एकाच चिन्हलेखनाने इंग्रजी सुद्धां वाटेल त्या देशी भाषेचे ध्वनिलेखन झपाट्यानें करतां यावें. नुकतांच त्यानीं Stenography for India नावांचा एक उत्कृष्ट चर्चेचा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. (किं. ८ आणे, न्यू किताबखाना, पुणे; व परचुरे पुराणिक, मुंबई.) वृत्तपत्रकार, वक्ते व ग्रंथकार यांनी तो अगत्य वाचावा. ध्वनिलेखन शास्त्राकडे या उप्पर तुंकाराने पहाण्यानें दिवस उरले नाहीत, हे ध्यानी आणून महाराष्ट्रानें प्रो. बेंद्रे यांच्या उद्योगाची चिकित्सापूर्वक संभावना करावी अशी विनंति आहे.

राजाश्रय नाहीं, लोकाश्रयहि नाहीं

असल्या प्रकारच्या उद्योगांना वास्तवीक प्रथम राजाश्रय पाहिजे. बरें, ध्वनिलेखन कलाहि अशाच प्रकारची आहे कीं तिला सरकारच्या गुप्तपोलीस खात्याचा आश्रय पहिल्या धडाक्यालाच मिळायला पाहिजे होता. त्यांना वास्तवीक या कलेची मुख्य जरूर. पण प्रकार पहावा, तो 'अच्छा है, बहोत खाशी, देखता है, चलना देव' वरच आज ५ वर्षे गुदरली. डायरेक्टर, शिक्षणमंत्री, सिऐडीचे डे. इंस्पेक्टर जनरल वगैरेंचे टोपलीभर आशीर्वाद मिळाले. मुंबई सरकार हिंदुस्थान सरकारपर्यंत शिफारसी झाल्या. पण व्यर्थ! 'तुमचे दोन इन्स्पेक्टर मी माझ्या ध्वनिलेखन पद्धतीनें मोफत शिकवितो, त्यांच्या प्राविण्याची तरी परीक्षा करून पहा.' म्हणून आग्रहाच्या विनंत्या केल्या. पण उपड्या घड्यावर पाणी. मग कोणाचे घोडें पेंडीत तोंड खुपसून बसले आहे पेंड जाणे!

राजाश्रयाची वाट अशी लागल्यावर, लोकाश्रयाकडे पहावें तों आधीं हा विषयच मुळीं लोकांना अपरिचित. लोकजागृतीचा मक्ता घेतलेल्या मराठी एडीटरांचीच आधीं समजूत पटायची पंचाईत. मराठी वृत्तपत्रांच्या क्षेत्रांत ध्वनिलेखनशास्त्राचा अभ्यास केलेला आमच्याशिवाय दुसरा एकही पत्रकार सांपडणें मुष्किलीचें आहे. (असल्यास त्यानें आपले नांव जाहीर करावें. आम्हांला आनंद होईल.) अर्थात त्यांना या विषयाचें महत्व समजत असलें तरी अधिकारी वाणीनें लोकमत जागृत करावें कसे हें उमजत नाही. कांहीहि असलें तरी या पुढें मराठी पत्रकारांना ध्वनिलेखनाच्या बाबतींत उदासीन राहून भागणार नाही. ध्वनिलेखक असल्याशिवाय नवीन बातमीदार अगर उपसंपादक नेमायचाच नाहीं असा त्यांनी दण्डकच घातला तर पुष्कळ उमेदवार या कलेंत प्राविण्य मिळविण्यास पुढें येतील. म्युनिसिपालट्या लोकलबोर्डे, व्याख्यानमाला, वकील, लेखक, कौन्सिलर्स वगैरे संस्थांनीं व लोकांनीं या कलेच्या प्रसारार्थ पुढे आले तर ध्वनिलेखनाचा धंदा करणाऱ्या उमेदवारांचीहि लवकर निपज होईल. मॅट्रिक आणि बीए होऊन कारकुनीसाठीं भयाभया करीत भटकणाऱ्या तरुणांचेंहि आम्ही या मराठी ध्वनिलेखनाच्या उज्वल भविष्याकडे लक्ष वेधतों. इंग्रजी प्रमाणेंच मराठी गुजराथी हिंदी इत्यादि देशी भाषांच्या ध्वनिलेखन कलेचें ज्ञान मिळविलेल्या उमेदवारांना स्वतंत्रपणें ध्वनिलेखकाचा धंदाहि चालवितां येईल. दुकान थाटलें की गिऱ्हाइकांची उणीव पडत नाहीं.

युरपियनांचे युद्धनीतिशास्त्र

युरपियन लोक म्हणजे साऱ्या जगांत अव्वल दर्जाचें शहाणे अशी समजूत सर्वत्र रूढ झालेली आहे. झालेली आहे की केलेली आहे, हा प्रश्न बाजूला ठेवला तरी कोणत्याहि बाबतींत नीतीचा ओनामा शिकण्यासाठीं युरपकडे पहण्याची पुष्कळांना संवयच लागली आहे. युरपनें सर्टिफिकेट दिल्याशिवाय

कोणत्याहि गोष्टीचे अस्तित्व किंवा रहस्य आम्हाला अलीकडे पटेनासें झाले आहे. गेलें शतकभर इंग्रेजांच्या पायाच्या पुण्याईने आम्हा हिंदी लोकांना युद्धांची दलामल मुळीच उरली नसली तरी आमच्या बापजाद्यांनी कित्येक शतके आचरलेला युद्धनीति अजून स्मृतिनष्ट झालेली नाही. मानसिक गुलामगिरीचा मनावर कितीहि पगडा पडलेला असला आणि इंग्रेजी सत्तेमुळें युरपस्थ क्रिस्ती राष्ट्रांचा आम्हाला केवढाहि वचक वाटत असला, तरी नीतिमत्तेचे धडे या क्रिस्ती अरेरावांपासूनच आम्ही शिकले पाहिजेत असे खास नाही. काळाची नजर फिरली, आमची अकीन बिघडली आणि आम्ही हिंदू हतप्रभ व गुलाम बनलो, तरी पण हिंदू या हिंदुस्थानांत राज्यकर्ते होते. त्यांनी राज्यें केली, युद्धें लढविली, जयापजयाचे उलट सुलट झोके अनुभवले; परंतु सध्यां युरपांत गाजणाऱ्या युद्धनीतीचा त्यांनीं कधींहि अवलंब केला नाहीं. समरांगणीं पडलेल्या वीरांना शत्रूपक्षांतले सेनानी व सैनिक मोठ्या आदराने मुजरा करून त्यांची प्रेतें सन्मानाने त्यांच्या छावणींत रवाना करीत. पराजित झालेल्या किंवा शरण आलेल्या शत्रूलाहि हिंदू नृपतींनीं अत्यंत सन्मानानेंच वागविलेले आहे. पौरस राजा अलेक्झांडरला शरण गेला व त्या ग्रीक जगज्जेत्यानें त्याला प्रेमालिंगन देऊन सन्मानपूर्वक आपला 'बिरादर' मानले. पृथ्वीराज चव्हाणाने महमद घोरीला युद्धांत पराजय पावतांच दोनदां सन्मानपूर्वक प्राणदान दिले अशीं शेकडों उदाहरणें देतां येतील. 'आला शरण, त्याला न मरण' ही हिंदूंची युद्धनीति, त्यांचें स्वातंत्र्य मेलें तरी, इतिहासांत चिरंजीव आहे.

परंतु साऱ्या जगाच्या अंतर्बाह्य सुधारणेचा मक्ता घेतलेल्या युरपियन राष्ट्रांनी अलीकडे नवीनच युद्धनीति पत्करली आहे. आम्हां हिंदुंना ती चमत्कारीक वाटते, म्हणूनच 'नवीन' म्हणायची; एरवी ती युरपियन राष्ट्रांच्या देहस्वभावापैकीच एक भाग आहे. अवघ्या युरपखंडांतल्या छोट्यामोठ्या नृपतींचे मुकूट केवळ आपल्या दृष्टीक्षेपानें भस्मसात करणाऱ्या पुरुषोत्तम नेपोलियन चक्रवर्तीची इंग्रज जेत्यांनी ठेवलेली बडदास्त फ्रेंच विसरले, इंग्रज विसरले, मानवता विसरली, तरी इतिहास विसरणार नाही. गेल्या महायुद्धांत सतत पांच वर्षे इंग्रज फ्रेंचांना आपल्या लष्करी धडाडीनें दे माय धरणी ठाय करणारा रणझुंझार विल्हेम कायझर सद्दीची लाट उलटतांच पोटाच्या बण्डाने पाठीवर पालथा पडला. पराजय पावला. हतप्रभ झाला. पाताळाधिपति विल्सनाचार्याच्या १४ नीतिरत्नांपैकीं फक्त चौदावें रत्नच इंग्रज फेंचांनी हातीं घेऊन आपल्या रणझुंझार प्रतिस्पर्ध्याचा मान कसा राखला तो सर्वांच्या स्मरणांत ताजा तडफडीत आहे. म्हणे, कायझरवर खटला करा. त्याला राष्ट्रसंघाच्या कोर्टात आरोपी म्हणून उभा करा. त्याच्या अपराधाची शहानिशा करून त्याला शिक्षा झाली पाहिजे. न्याय झाला पाहिजे. युरपस्थ बृहस्पतींच्या या न्यायनीतीच्या वल्गना ऐकल्या की त्यांच्या मनोवृत्तीला हासावे कीं रडावें हेंच समजेनासें होतें! या पेक्षां अवरंगझेब शतपटीनें अधिक न्यायी व नीतीमान. अफझुलखानाच्या झनान्याला चोळी लुगड्यांचा आहेर देऊन सन्मानाने परतवणी करणाऱ्या शिवाजीच्या संभाजीला त्यानें, अमानुष रीतीनेंच का होईना, पण ठार मारून मोकळें केलें. गेलीं दोन वर्षे रिफांचा पुढारी जवानमर्द अबदुल करीम फ्रेंच व स्पेन राष्ट्रांशी टक्कर देत होता. दुर्दैवानें या लढवय्या देशभक्तावर दैव फिरलें व तो या दोन युरपियन न्यायनीतीवाल्या राष्ट्रांना शरण गेला. युद्ध म्हणजे केवळ सोंगट्याचा खेळ. केव्हां उलटें दान पडेल याचा नेम नाहीं. उलटें पडले कीं गाडें उलटलें. म्हणून काय प्रतिस्पर्ध्याला चिलटापेक्षांहि क्षुद्र मानावयाचें? युरपियन लोक 'स्पोर्टस्मनशिप'ची जेव्हांतेव्हां मोठी मिजास मारतात.

फ्रेंच लोक म्हणे रसिकतेचे मुरंबे. पण त्यांची ही स्पोर्टस्मनशिप (दिलदार सरदारी बाणा) आणि रसिकता आज देशाभिमानी अबदुल करीमवर खटला भरावा, का एकदम बिनचौकशीचे मादागासकर किंवा कारसिका बेटांत नेऊन टाकावा, या विवंचनेंत चूर आहे. समोरासमोर दोन हात करून वर्षेच्या वर्षें चींचीं करायला लावणाऱ्या रणमस्त प्रतिस्पर्ध्यांविषयीं युरपस्थ नीतिमंतांची जर ही स्पोर्टस्मनशिप, तर इतरांविषयीं त्यांच्या कल्पना काय असाव्या? एकूण, स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढणें हा युरपियन नीतिकारांच्या दृष्टीने क्रिमिनल गुन्हाच म्हणावयाचा!

वाग्लेखन-स्वातंत्र्याचा इंग्रेजी प्रसाद

इंग्रेज लोक म्हणजे स्वातंत्र्याचे भास्कर. त्यांचा जेथे जेथें उदय झाला तेथें तेथें स्वातंत्र्याचा प्रकाशच प्रकाश. जीव द्यायला गुलामगिरीचे नखलाभर वीष मागितले तर मिळायचें नाही. विलायत म्हणजे तर काय, पुसूंच नये. न्यायनीतीची टांकसाळ. साऱ्या जगानें आपल्या दैवाच्या आणि करणीच्या चिपांचा कस या टांकसाळींत लाऊन घ्यावा. खऱ्या खोट्याचा निवाडा पूर्वी यमधर्माच्या कचेरींत चित्रगुप्त लावीत असे, असा आम्हां भोळ्या हिंदूंचा समज. पण आतां तो मामला इंग्रेजांच्या विलायतेकडेच यमधर्माने सोपविला आहे म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानांत इंग्रेजी झाल्यापासून भाषण-स्वातंत्र्याचा महामूर पूर येथें वाहात असतो. इतका की त्यांत आजपर्यंत शेकडों भाषक व लेखक कायद्याच्या धारेबरोबर जे वहात गेले ते गडप! तात्पर्य, वाग्लेखन-स्वातंत्र्याचा इंग्रेजी प्रसाद म्हणजे आम्हां हिंदी लोकांना कॅडबरीच्या चाकोलेट इतकाच चिकट गुळचट अतएव तात्काल जीवन्मुक्तीदायक वाटावा, यांत नवल तें काय? जे पूर्वी कधिं पाहिले नाही, कोणी ऐकलें नाहीं, तेच मोजके आमच्या खिशांत! मग आनंदाचें धरण बेफाम कां फुटूं नये?

पण वस्तुस्थिति खरोखर अशी आहे काय? हिंदुस्थानांत भाषण-लेखन-स्वातंत्र्याचा इंग्रेजी प्रसाद म्हणजे तलवारीवरची कसरत आहे. हे स्वातंत्र्य दिसतें तसें नसतें म्हणूनच माणूस फसतें. इंडियन पिनल कोडस्मृतींत असल्या निरनिराळ्या आडाखेबाज कलमांची यंत्रयोजना झालेली आहे कीं त्या सर्व चक्रव्युहांतून सुखरूप परत येणारा अभिमन्यु अझूनपर्यंत कोणाला आढळलेला नाही. बोलून चालून इंग्रेज राज्यकर्ते आणि हिंदीलोक त्यांचे गुलाम. अर्थात 'राज्यकर्ते ते राज्यकर्ते आणि दास ते दास' ही कीचकोक्ती पदोपदीं अनुभवास आल्यास त्यांत कांही नवल नाहीं.

१९२६ सालांत इतर कसलाहि दुष्काळ हिंदुस्थानांत पडलेला असला आणि बेकारीचा ब्रम्हराक्षस कितीहि बोकाळला असला, तरी यंदा अब्रुनुकसानीचे पीक बरेंच आलेले आहे. देश गुलाम झाला कीं तेथल्या गुलामांना कांही अब्रू असते, असा आमचा समज नव्हता. इतिहासहि हेंच सांगतो की लोकांच्या अब्रूचे दिवाळे निघाल्याशिवाय गुलामगिरीची दिवाळी साजरी होत नाहीं. पण यंदा पहावें तो अब्रूदार लोकांच्या टोळ्याच्या टोळ्या न्यायकोर्टात धरणी धरून बसलेल्या! हिंदुस्थान स्वतंत्र झाला कीं काय, कोण जाणें!

तथापि हिंदुस्थानांत भाषण-लेखन-स्वातंत्र्य मुबलक आहे. अडचण एवढीच कीं गाढवाला गाढव, चोराला चोर, जाराला जार आणि भटाला भट म्हटले नाहीं म्हणजे झालें. या कामीं नजरचूक सुद्धां कायद्याला खपायची नाहीं. लागलाच त्या चुकीचा न्यायकोर्टांत खिळा बनतो. 'नवा काळ' पत्रावरील बेअब्रूच्या खटल्यांत न्यायमूर्ती रांगणेकर यांनी दिलेल्या निकालांत एक मोठें महत्वाचे तत्व त्यांनीं

भाषक लेखकांच्या प्रबोधनार्थ हडसून खडसून पुनश्च उद्धृत केलें आहे. त्यांतला मतितार्थ असा आहे की, वृत्तपत्रकार लेखकांची अशी एक भावना झालेली दिसते कीं इतरेजनांपेक्षां आपणांस काही विशेष अधिकार आहेत. पण तसा कांहीं एक प्रकार नाहीं. सामान्य नागरिकांना लिहिण्या बोलण्याच्या जितक्या शिष्ट मर्यादा आहेत, त्यापेक्षां वृत्तपत्रकारांना विशेष कांहीहि अधिकार नाहींत. हिंदी वाग्लेखन-स्वातंत्र्याचा कायदा विलायती वाग्लेखन-स्वातंत्र्याच्या कायद्यापेक्षां अगदीं निराळा आहे.

असलाच पाहिजे. कारण राज्यकर्ते ते राज्यकर्ते आणि दास ते दास. हा भेद कोणत्याहि सत्ताधाऱ्यांना ठेवणेंच प्राप्त आहे. न ठेववील तर ते गा-! हॉल्ट, एकदम सबूर. फटकन् सिडिशन, नाहींतर डेफेमेशन झाली असती.

आम्हांला कायद्याचें फारसें ज्ञान नाहीं. निदान, कीस काढण्याइतकें वकीली चातुर्य नाही. हिंदी लोकांचे भाषण-लेखन-स्वातंत्र्य पहावें तर त्यांना चोराला चोरहि म्हणतां येत नाहीं. तेव्हां कायद्याचा हा वायदा टाळण्यासाठीं आणि प्रतिस्पर्ध्यांवर यथेच्छ तोंडसुख घेण्यासाठीं, हिंदी वृत्तपत्रांवर विलायती मुद्रणस्वातंत्र्याचा शेंदूर लागलेले गोरे बजरंगबली एडीटर नेमण्याचा संप्रदाय अस्तित्वांत आला की काय, अशी आम्हांला एक शंका येत आहे. कातडीच्या रंगाप्रमाणें कायद्याची झळ कमी अधिक लागण्याइतका लवचिकपणा कायद्यांतच असेल, तर पक्षभेदाचे वृत्तपत्री शिमगे बारामास खेळणाऱ्या देभ लोकांनी आपापल्या पत्रांसाठी गोऱ्या एडीटरांच्या फलटणींची पार्सलें विलायतेहून भडाभड मागवून घ्यावी, म्हणजे त्या महात्म्यांच्या धवल इभ्रतीखालीं वाटेल ती बातमी आणि वाटेल तें प्रवचन बिनबोभाट पचलें जाईल. ब्राम्हणेतर, सत्यशोधक, सुधारक वगैरे चळवळी ठार मारायच्या असतील तर 'राष्ट्रीय' प्राण्यांनीं हा विलायती गोपीचंदन-लेपनाचा प्रयोग करून पहावा.

राष्ट्रीय भटांचे राष्ट्रीय चाळे

दादर येथें १९२१ सालीं प्रबोधन पाक्षिक सुरू होतांच, तो दर पंधरवड्याला मुंबईस रस्त्यावर किरकोळ विक्रीला जात असे. दोन तीन महिन्यांतच लोकमान्य दैनिकाच्या भटी एजंटाने विक्री करणाऱ्या मुलांना दम भरला कीं 'प्रबोधन विकाल तर लोकमान्य विकायला मिळणार नाहीं.' अर्थात् प्रबोधनाची रस्त्यावरली विक्री बंद ठेवणेंच भाग पडले. हल्लीं पुण्यातहि भटी एजंटांनी हाच लोकमान्य खाक्या उचलला असून काहीं राष्ट्रीय भटहि त्यांना अतियोगी सहकारिता देत आहेत. प्रबोधन किंवा इतर कोणतेंहि भटेतरांचें वृत्तपत्र, पुस्तक किंवा हँडबिल विकणाऱ्या अगर वाटणाऱ्या न्यूजबॉयला (फेरीवाल्याला) हे भटी एजंट ५ ते १० रुपयापर्यंत दंड करतात. बरें, आमचा खास न्यूजबॉय विक्रीसाठीं नेमला तर त्याला राष्ट्रीय भट मार देण्याच्या धमक्या देतात. पोलीसाला सांगून कांहीतरी त्रास देण्याचा उपक्रम करतात. गंगाधरी बेळगांवास हाच अनुभव आला. भटांचे हे राष्ट्रीय चाळे पाहिले कीं राजकारणांत वा समाजकारणांत भटांच्या पायाचे तीर्थ पिणाऱ्या भटेतर प्राण्यांना कोणत्या कोटींत लेखावे हेंच समजत नाही. भटभटेतर वादाच्या ज्वाळा याच कारणांनी भडकत आहेत, इकडे लक्ष न देतां प्रतियोगी अतियोगी इलेक्षनचें जलसे नाचविणाऱ्या एकजात भटांना भटेतर दुनियेनें पुढील पांच दहा निवडणुकींत खराटा दाखविल्याशिवाय हा राष्ट्रीय ब्रम्हसमंध ताळ्यावर येणार नाही.

□□□

लेख

राजकारण आणि मुत्सद्देगिरी

राजकारण किंवा ज्याला पॉलिटिक्स असें म्हणतात, त्याला आज जो अर्थ आलेला आहे आणि तो शब्द उच्चारतांच ज्या भावना उत्पन्न होतात, तो अर्थ आणि त्या भावना हिंदुस्थानाला तरी अगदी नवीन आहेत. इंग्रेजांचे पॉलिटिक्स आणि शेकडों वर्षे हिंदुस्थानांत हिंदु मुसलमान साम्राज्यकर्त्यांनी रूढ केलेलें राजकारण या दोन गोष्टीं तत्वतः आणि सत्वतः अगदीं भिन्न आहेत. 'तो माणूस मोठा पोलिटिकल आहे' असे वाक्य उच्चारतांच, त्यातल्या 'पोलिटिकल' शब्दाचा अर्थ खोल मनाचा, कपटी, लुच्चा किंवा डांवपेचाचा असाच आपल्यावर होतो. 'महादजी शिंदे मोठा राजकारणी पुरुष होऊन गेला' असे म्हणतांच, आपल्याला त्या पुरुषाच्या अनेक सद्गुणांची कल्पना भासमान होऊ लागते. इंग्रेज जेते आणि आम्ही जित म्हणून हा विपर्यस्त भेद आमच्या द्वैतानें निर्माण केला आहे, असें सकृद्दर्शनी वाटण्याचा संभव आहे. पण असला आरोप हिंदुपणानें पत्करण्यापूर्वी किंवा लादण्यापूर्वी इंग्रेजी (किंवा सर्रास युरपस्थ) पोलिटिकल उलाढालींची हिंदी राजकारणी गतेतिहासाशीं तुलना करून पाहिली, तर या विपर्यासाचें मूळ इंग्रेजी राजनीतीच्या कुब्जेच्या मंदिरांतच आढळून येईल. गेल्या युरपियन महायुद्धामुळें पाश्चात्य लोकांच्या पॉलिटिक्सची सव्वा लाखाची झांकली मूठ हळुंहळूं उघडूं लागली आहे. इंग्रेज तत्वज्ञान्यांनी निरनिराळ्या ग्रंथांतून पॉलिटिक्सवर झोडलेलीं उदात्त विचारांची प्रवचनें आणि इंग्रेज लोक किंवा सर्रास युरपियन राष्ट्रें आचरीत असलेले पॉलिटिक्स, यांतला दक्षिणोत्तर विरोध म्हणजे जगापुढें पडलेलें एक कोडें किंवा 'क्रॉसवर्ड पझल' ओह. ब्रिटीश सिंहानें किंचित मिनतवारीनें विनंती करतांच गेल्या महायुद्धांत हिंदुस्थाननें पुढचा मागचा कांही एक विचार न करतां, आपल्या लक्षावधि लढवय्यांची आणि करोडो रुपयांची युरपच्या युद्धक्षेत्रावर कचाकच आहुति दिली. हिंदुस्थानच्या राजकारणांतला 'स्पोर्टस्मनशिप'चा-सरदारी दिलदार बाण्याचा-हा मासला पहा, आणि महायुद्ध जिंकल्यानंतर ब्रिटीश सिंहाने हिंदुस्थानच्या या कामगिरीबद्दल, या हिंदी राजकारणाला काय आणि कसला परत आहेर केला, त्याचा इतिहास पहा. म्हणजे ज्या इंग्रेजी पॉलिटिक्सच्या भुसावर आमचे राजकारणी हिंदी कज्जेदलाल आपल्या अकलेला जागवीत आहेत, त्याचें वास्तविक स्वरूप नीट ध्यांनी येईल. 'कामापुरतांच मामा' हीच युरपियन पॉलिटिक्सची जीवनजंत्री. त्यांचे निश्चित ध्येय एकदा साधले कीं युरपस्थ पॉलिटिशियन,

वकीलाप्रमाणेंच, साधनांच्या बरेंवाईटपणाबद्दल मनाला सुखदुःखाची लवमात्र आंच लागूं देत नाहीं. गरज सरो आणि वैद्य मरो, हीच त्याची पॉलिसी. गळ्याला भिडलेली फांसाची तात कांहीं तरी बरीवाईट खरीखोटी सभ्यअसभ्य उलाढाल करून तोडली, आजचें मरण उद्यांवर ढकलले, भुकेलेल्या काळाच्या जबड्यांत नगाला नग म्हणून गोम्याच्याऐवजीं सोम्या दिला कीं युरपियन पॉलिटिक्सचें घोडें गंगेला न्हातें. इंग्रेज पॉलिटिशियन दूरदृष्टी खरा. पण त्याच्या पॉलिटिक्सचें धोरण म्हणजे कशीबशी उशी मारून आलेली लाट आंगाला फारशी चाटूं न देतां लोटून द्यायची. 'रॅशनॅलिझम इन युरप' (युरोपांतील विवेकवाद) नामक ग्रंथात प्रो. लेकी याच मताचा पुरस्कार करतांना म्हणतातः-

"The object of the politician is expediency..... A disinterested love of truth can hardly co-exist with a strong political spirit. In all countries where the habits of thoughts have been mainly formed by political life, we may discover a disposition to make expediency the test of truth."

भावार्थ :- *आलेला प्रसंग कसातरी झटपट वाटेला लावायाचा हाच मुळी पॉलिटिशन लोकांचा उद्देश असतो..... सत्याची निर्लोभ चाड असल्या प्रकारच्या कडव्या पोलिटिकल स्पिरीटमध्यें राहणें शक्य नाहीं. पोलिटिकल धडपडीनेंच ज्या देशांतल्या लोकांच्या विचारांची कमावणी होत असते, त्या लोकांत 'झटपट रंगारी'पणा हीच सत्याची कसोटी मानण्याचा एक देहस्वभावच बनलेला आढळून येतो.*

युरपियन पॉलिटिक्सच्या सत्याच्या व्याख्या वेळोवेळीं इंद्रधनुष्याप्रमाणे बदलतात कशा, याचें एकमार्गी राजकारणी हिंदूंना मोठें कोडें पडतें. याचें कारण युरपियन लोक पॉलिटिक्ससाठीं सत्य निर्माण करतात, सत्यासाठीं पॉलिटिक्स खेळत नाहींत; हे होय. डोंगरा एवढ्या अनीतीनें त्यांच्या पॉलिटिक्सचा डाव जर चुटकीसरसा जिंकतां येत असेल, तर त्या डोंगरालाहि निर्भेळ नीतीचा सफेदा चढवायला, युरपियन पॉलिटिशियनची विवेकबुद्धी लवमात्र कचरणार नाहीं. विवेकाची फाजील प्रतिष्ठा ठेऊन, इंग्रेज लोक उद्यां जर 'सत्यान्नास्ति परोधर्मः'चे तत्ववेत्ते बनतील, तर २४ तासाच्या आंत त्यांच्या ब्रिटिश साम्राज्याचा पोलिटिकल अधःपात होईल. इंग्रेज लोकांचे सर्व जीवनच मुळी पोलिटिकल खटपटींनी बनत असल्यामुळें, त्यांच्या विचारांनाहि एक प्रकारची बधिरता विवेकशून्यता किंवा बेदरकारपणा आलेला असतो. हें पोलिटिकल बेदरकारपणाचे भूत त्यांच्या मोठमोठ्या तत्ववेत्त्यांनाहि गतीला नेतां आलें नाहीं. हरबर्ट स्पेन्सर - केवढें जाडी प्रस्थ! जॉन स्टुअर्ट मिलने the boldest thinker that English speculation has yet produced (इंग्रेजी तत्वज्ञान्यांतला शिरोमणी) असें याचें वर्णन केलें. पण या जाडी प्रस्थाच्या तत्वप्रतिपादनांत सुद्धां आंग्रेजी पोलिटिकल बेदरकारपणाची छटा उमटल्याशिवाय राहिलेली नाहीं.

एका क्रिस्ती विचारवंतानें Politics hath no conscience (पॉलिटिक्सला मुळी सदसद्विवेक बुद्धीच नसते.) असे म्हटले आहे; आणि ते अक्षरशः खरें आहे. हिंदु वेदान्तानें वाखाणलेली सदसद्विवेक बुद्धी पॉलिटिक्समध्यें महत्वाची मानली, तर खुद्द पॉलिटिक्सचेंच महत्व कवडीमोल व्हायचें. प्राचीन हिंदु साम्राज्यकर्त्यांना हाच कटु अनुभव आला. महायुद्धाचें भरतवाक्य गातांना पाताळाधिपति विल्सनाचार्यांनीं १४ सिद्धांतरत्नांची माळ जगांपुढे फलकावली. सदसद्विवेक बुद्धीची मातबरी मानणाऱ्या

हिंदूंना वाटले की आतां अशोक सम्राटाचे सुवर्णयुग पुनश्च सुरू होणार! पण तो सुद्धा पोलिटिकल हिकमतीचा (expediency) च एक क्रिस्ती प्रयोग होता, हे त्यांना उमजायला बराच वेळ लागला. तात्पर्य, क्रिस्ती लोकांचे पॉलिटिक्स आणि हिंदी लोकांचें राजकारण या दोघांत इतकाच फरक आहे की पहिल्याला काळीज नसतें, व दुसऱ्याचें तें फाजील फुगलेले असतें. बिनकाळजाच्या क्रिस्ती पॉलिटिक्सची दुसरी एक बाजू आहे. दगडाला दगड आणि हिऱ्याला हिरा तें आपण होऊन म्हणत नाही. कोणत्याहि पापपुण्याचें ओझें व्यक्तीपेक्षां समष्टीच्या माथीं लादण्याची त्याची खोड फार. प्रत्यक्ष आग लागलेली उघड्या डोळ्यांनी दिसत असली, तरी 'आग लागली किंवा नाही? लागली असल्यास कशी, कां, किती कुठें कोणी?' इत्यादि शंकोपशंकांचा कीस काढणारी एखादी कमेटी नेमल्याशिवाय क्रिस्ती पॉलिटिक्सचें समाधान व्हायचे नाहीं. कमिशनें आणि कमेट्या म्हणजे एक प्रकारच्या कंबक्त्याच होत. एखाद्या बाबीवर क्रिस्ती पॉलिटिक्सची कमेटी बसली कीं तिची कंबक्ती भरलीच म्हणून समजावी. कोणतीहि गोष्ट झटकन करण्याची त्याची बोलीच नसते. पण हा कांहीं भोळसटपणाचा भाग मात्र मुळीच नव्हे. क्रिस्ती पॉलिटिक्सला काळीज नसले, तरी त्याचें डोकें मोठें विलक्षण पाताळयंत्री असते आणि या पाताळयंत्रावरच क्रिस्त्यांचे पॉलिटिक्स चालत असतें. क्रिस्ती लोक जात्याच मारवाडी प्रवृत्तीचे असल्यामुळे, पॉलिटिक्सचे खेळ सुद्धां ते व्यापारी डावपेचांनींच खेळत असतात. इतके सांगितले म्हणजे त्यांच्या मुत्सद्यांविषयीं अधिक कांहीं लिहिणेंच नको.

युरपस्थ बृहस्पतींच्या बिनकाळजाच्या या राजकारणी उर्फ पोलिटिकल धडपडींची जाणीव खुद्द त्यांना किंवा इतरांना झालेली नाही, असा प्रकार नाही. युरपच्या खोडालाच फुटलेल्या अमेरिकन फांद्यांना ही जाणीव विशेष भासूं लागली आहे. इतकेंच नव्हें तर गेल्या महायुद्धांत अमेरिकन राष्ट्रानें ज्या उदात्त तत्वांवर आंग्रेज फ्रेंच ॲन्ड को नामक मित्रसंघाला जी लष्करी मदत देऊन महायुद्धाचा अमानुष संहार थोपविला, त्या तत्वांना सुद्धा जेव्हा युपरस्थ बनियांच्या व्यापारी हिकमतीची पोलिटिकल थप्पड मिळाली, त्यामुळें अमेरिकेंतहि या बिनकाळजाच्या लोकांच्या मनोवृत्तीविषयीं जोरदार विचारक्रांती सध्या सुरू झाली आहे. वास्तवीक, पॉलिटिक्स उर्फ राजकारण हा कांही एक निराळा स्वतंत्र विषय नाहीं. मानवी जीवनाच्या नियंत्रणाला जबाबदार असणाऱ्या सामाजिक नैतिक वगैरे सर्व विषयांची गोळाबेरीज म्हणजे राजकारण. ते सर्वव्यापी आहे. पण निराळें वेगळें काढून दाखवितां येणार नाही. अर्थात राजकारणी किंवा पोलिटिकल मनुष्य म्हणजे मानवी जीवनांतल्या सर्व लहान मोठ्यां दृश्यादृश्य आचारविचारांचा ज्ञाता असला पाहिजे, हे उघडच आहे. राजकारणाला सात्विक विवेकाचें बंधन घालावयाचे तर या आचारविचारांना प्रथम प्रगतिपर नीतिनियमांनी बद्ध केले पाहिजे. या उद्देशानें प्रेरीत होऊन, 'अमेरिकन ॲकाडमी ऑफ पोलिटिकल ॲन्ड सोशल सायन्स, ३९ स्ट्रीट ॲन्ड वुडलॅन्ड आवेन्यु, फिलाडेलफिया' या संस्थेने निरनिराळ्या उद्योगांचे व धंद्यांचे नीतिशास्त्र (The Ethics of the Professions and of Business) तयार केले आहे (Vol. cl,May 1922 मागवून वाचा.) व्यापारी, अडत्ये, दुकानदार, वकील, जज्ज, एंजिनियर, वृत्तपत्रकार, बातमीदार, जाहिरातवाले, मुद्रक, प्रकाशक, व्याख्याते, समाजसेवक, धर्मप्रचारक, अकौटंटस्, डॉक्टर, इत्यादि शेकडो धंद्यांतली नीतिमत्ता कशी असावी याचे सर्वमान्य नियम या ग्रंथांत विस्तृत विवेचनासह नमूद केलेले आहेत. हिंदी राजकारणांत कज्जेदलाली माजविणाऱ्या बिनकाळजाच्या नाटकी मुत्सद्यांनी या ग्रंथांचे एकवार पारायण करावे अशी

शिफारस आहे. या आरशांत त्यांनी आपली तोंडे पहावी, म्हणजे 'आपण कोण व कसे आहों?' याचा त्यांना आत्मसाक्षात्कार होईल. राष्ट्राचा सामाजिक आत्मा प्रबुद्ध झाल्याशिवाय त्याच्या राजकारणाला केव्हांहि यश येणार नाही, या विद्वन्मान्य सूत्रांतले सत्य या ग्रंथाच्या वाचन मनन निदिध्यासाने स्पष्ट कळेल.

हिंदुस्थानांत पूर्वी शेकडों राजकारणी पुरुष व स्त्रिया होऊन गेल्या. त्यांचा इतिहास अजरामर आहे. प्राचीन काळ सोडला तरी अर्वाचीन युगांत शहाजी राजे, जीजाबाई, शिवछत्रपति, दादोजी कोंडदेव, बाळाजी विश्वनाथ, खंडोबल्लाळ, सखाराम बापू, महादजी शिंदे, अहल्याबाई, नाना फडणवीस, रंगो बापूजी इत्यादि नावे राजकारणी मुत्सद्यांच्या यादीत प्रामुख्याने चमकत आहेत. वर्तमानयुगात गोखले, रानडे, फिरोझशा, वाच्छा दि. व. गोडबोले, ना. समर्थ, शाहू छत्रपति, माधवराव शिंदे इत्यादि मंडळी तर आपल्या डोळ्यादेखतची. मऱ्हाटशाहींतील राजकारणी वीर वीरांगनांना पाश्चिमात्य ज्ञानप्रकाशाचे किरण चुटपुटतेहि चाटून गेलेले नव्हतें, तरीहि त्यांच्या मुत्सदेगिरीनें महाराष्ट्राची एवढी कडेकोट तटबंदी राखली होती व हिंदूंच्या हाडीमासी खिळलेल्या भरंसाट द्वैतभावनांना तिनें इतक्या कदरेंत राखलें होतें की बिनकाळजाच्या युरपियन पॉलिटिक्सला महाराष्ट्रांत घरभेदाची पोखरण घालायला सतत २०० वर्षे झगडावे लागले. त्यानंतर महाराष्ट्रानें घरभेदाच्या गळ्याला मिठ्या मारून स्वतःच्या गळ्यांत युरपस्थ पॉलिटिक्सचा फांस राजीखुषीने व अक्कलहुशारीने चढवून घेतला. महाराष्ट्राचें सारें जीवन या पॉलिटिक्सवर पोसलें जाऊ लागलें. पिंडच त्याचा बनला. मग सारे ब्रम्हांड तरी युरपियन पॉलिटिक्स प्रमाणें बिनकाळजाचें व बेदरकार कां बनणार नाही? बेदरकारीच्या अशाहि परिस्थितींत गोखले प्रभृति मुत्सद्यांनीं ज्या राजकारणी उलाढाल्या केल्यां, त्यांचे महत्व व मर्म हिंदी लोकांना उमजण्याचा काळ अझून दूर आहे. चालूं घटकेला बोकाळलेल्या कज्जेदलाली राजकारणाशी पूर्वीच्या कोणत्याहि राजकारणाची तुलना करण्याचा यत्न शुद्ध कज्जेदलाली हट्टवादीपणाचा होय. कामापुरताच मामा मानणाऱ्या पॉलिटिक्सला निवळ सात्विक किंवा निवळ तामसी राजकारणाची आंच कधीहि लागणे शक्य नाहीं. काटा काट्यानेंच काढावा लागतो.

लीगल प्रोफेशन म्हणजे वकीलीचा धंदा मुळांत वाईट नाहीं. मूलतः कांहीच वाईट नसते. गंगेच्या उगमाजवळ ती कमाल शुद्ध असली, तरी पुढच्या प्रवाहांत तिच्यात भयंकर ढवळाढवळीचा संकर झालेला असतो. वकीलीविषयीं अमेरिकन स्मृतिकार म्हणतात कीं Law is a double profession. It has an objective and a subjective phase. In its subjective aspect it possesses a life of the spirit, a high and lofty ethic; higher than the gentleman's "noblesse oblige." It is equivalent to the ordination vow of a priest in the temple of Justice. It involves subjection to self-denying ordinances and domination by a spirit of unselfish service. How far below such a plane are those who would make it as well as call it, a business, a means of money-maning or of political preferment alone. (p. 16)... Theoretically, he (the pleader) should have a 'vocation' to the law as he is expected to have to the ministry. As St. Paul said, "Woe is me if I preach not the Gospel," and the ideal lawyer should be under the similar constraint of an all-else-excluding vocation. Otherwise he will soon find his level.

Mr. Wigmore had this in mind when he styled the profession a "priesthood of Justice." (p. 17.)

'अंतर्बाह्य कमाल शुद्ध मनोवृत्तीचे न्यायमंदीरांतील सर्वस्वत्यागी उपाध्याय' असल्या व्याख्येचे वकील कितीसे आढळतील? जवळजवळ नाहींच म्हटले तरी चालेल. एवढें मात्र खरें आहे की राजकारणांत प्राविण्य मिळविण्यासाठी मानवी जीवनाचा अथांग स्वाध्याय होण्याची वकीलीच्या अभ्यासक्रमांत व आचारात जितकी सोय आहे, तितकी दुसऱ्या कोणत्याहि शास्त्रांत अगर विषयांत नाही. जनतेची शैक्षणिक नैतिक सामाजिक औद्योगिक परिस्थिति काय आहे, याचे सूक्ष्म ज्ञान वैद्यापेक्षा वकीलालाच चांगले असण्याचा संभव फार. त्यामुळें राजकारणांत त्याला जनतेची बाजू यथातथ्य रेखाटता येणे सहज सुकर जाते. मुत्सद्दी म्हणजे एक प्रकारचा वरीष्ठ दर्जाचा वकीलच असल्यामुळें, वकीली धंद्याच्या वखारीतच त्याच्या बनावाचा कच्चा माल तयार होत असतो. या कारणामुळेंच आधुनीक राजकारणाच्या क्षेत्रांत वकीलांचा भरणा अधिक झालेला दिसतो. परंतु, चमकतें तें सर्वच जसें सोनें असूं शकत नाहीं, तद्वतच वकीलीची परीक्षा पास झालेला प्रत्येक घोट्याबहाद्दर कज्जेदलाल मुत्सद्दी होऊं शकत नाहीं; आणि हिंदुस्थानात वकीली हा सोनारी सुतारी लोहारी धंद्याप्रमाणें पोट भरण्याचा एक राजमान्य धंदा होऊन बसल्यामुळें एकजात सर्व वकीलोबांची मुत्सद्यांच्या सेनेंत रिक्रूटदडपी करणे म्हणजे मोठाच अनवस्था प्रसंग!

वकीलीचा धंदा मूलतः केवढाहि थोर आणि कितीहि सर्वस्पर्शी असला, तरी आमच्या विद्यमान वकीलांच्या फलटंणी राजकारणांत भाग घेण्यास सर्वस्वी नालायक आहेत. जनतेनें त्यांच्या पोटार्थी डोक्यावर राजकारणाची जबाबदारी टाकणें अनर्थावह आहे. जनता पूर्वी पदव्यांना बाचकत असे व त्यांचा त्यांना मोठा बाऊहि वाटत असे. पण पाश्चात्य बेदरकारी वृत्तीवर पोसलेले आजकालचे धंदेवाईक पोटार्थी वकील हे शुद्ध कज्जेदलाल असल्यामुळे, राजकारणासारखा महत्वाचा विषय त्यांच्या हाती निर्धास्त सोपवून ठेवणें बरेंच धास्तीचें आहे. इतर धंद्यांपेक्षा वकीलीच्या धंद्यांत थोडी अधिक स्वतंत्रता व फुरसद असते. त्यामुळें रिकाम्या न्हाव्याच्या भिंतीच्या तुंबड्याप्रमाणे वकील लोकांनी टेनीस पिंगपाँगप्रमाणेंच राजकारणी लेक्चरबाजी हाती घेण्याचा धूमधडाका सुरू ठेविला आहे. मुत्सद्यांची मुत्सद्देगिरी आणि या कज्जेदलालांची बेगडी तोंडपाटिलकी या दोनहि गोष्टींत दक्षिणोत्तर महदंतर आहे. पोट भरण्याचा ज्यांचा धंदाच मुळी बिनकाळजाचा, त्यांच्या हातून राजकारणी धकाधकीचे मामले किती काळजीने चोखाळले जात असतील, याचा विचारवंतांनी विचारच करावा. पोटापाण्याचा प्रश्न कज्जेदलालीच्या वंगणाने नीट बुळबुळीत सुटल्यावर केवळ फुरसदीसाठी, किंवा वकीलीच चालत नाही म्हणून जिवाला कांहीतरी विरंगुळा म्हणून राजकारण खेळणारे वकील कोणते आणि कायदेशास्त्रांत निःशंक पांडित्य पटकाऊन मानवी जीवनाच्या रहस्यांत प्रवीण म्हणून आत्मस्फूर्तीने राजकारणांत पडणारे मुत्सद्दी कोणते, हें चाणाक्ष बुद्धीनें अजमावण्याचें काम आज जनतेवर येऊन पडलें आहे. लवकरच इलेक्शनचा बाजार भरणार आहे. त्यावेळी जनतेने सावध राहून खऱ्या खोट्या नाण्याची नीट परीक्षा करावी.

सध्याचे आमचे राजकारण नाटकी आहे. त्यांत हृदयाची तळमळ किंवा जनतेच्या प्रबोधनाची कळकळ कोठेंच कोणाला नाही. इलेक्शनची उमेदवारांत वकीलांचा भरणा जास्त आहे. पोटापलीकडे

फारसे कोणी पहात नाही. पक्षपंथभेदांची युद्धे केवळ कज्जेदलाली आचरटपणाने चाललेली आहेत. अशा वेळी जनतेने बाह्य भपक्याकडे, वकीली लेक्चरबाजीकडे, पदव्यांच्या शिंगेशेपट्यांकडे, किंवा हाडारक्तामासाच्या नात्यागोत्याकडे लक्ष न देतां, जनसेवेच्या अस्सल जिव्हाळ्याचा शोध करून आपल्या मतदानाचा सदुपयोग करावा, एवढीच सूचना आहे.

□□□

लेख

सत्यशोधक भाऊराव पाटील यांचा अल्प परिचय

महाराष्ट्रांत भिक्षुकशाहीची सत्ता अझून बरीच वरचढ आहे. विशेषतः लोकशिक्षणाची दोन शस्त्रे - शिक्षणसंस्था व वृत्तपत्रें - ही सर्वस्वीं भिक्षुकांच्याच हातीं जोंपर्यंत आहेत, तोंपर्यंत या सत्तेपुढे कोणाचेंहि कांहीं शहाणपण चालणार नाहीं. गेलीं २५-३० वर्षे भिक्षुकी पृत्तपत्रांनी हजारों गारगोट्या हिरे म्हणून लोकांच्या गळ्यात बांधल्या. देशभक्त राष्ट्रसेवक देवर्षि महर्षि तपस्वी वीर पीर समाजभूषण शिक्षणालंकार इत्यादि नाना प्रकारचें शेंदूर माखून त्यानीं शेकडों दगडधोंडे देव म्हणून गावोगावच्या नाक्यानाक्यांवर थापलेलें आढळतात. या सवंग देवळ्याच्या गिरणींत शेंकडों स्वार्थी व लुच्या लोकांनी शिरकाव करून घेतला आहे व त्यावर त्यांनीं आपल्या पोटापाण्याच्या वंगणाचा प्रश्न अगदी बुळबुळीत रीतीनें कायमचा सोडविलेला आहे. गेल्या १५ वर्षांत फंडगुंडगिरी ही एक बिनचूक देशोद्धारक यक्षिणीची कांडी जोरावर झाल्यामुळे तर हजारों भिक्षुकी गांधिलमाशा मधमाशांची रूपें पांघरून या 'राष्ट्रीय' पोळ्यावर गांवोगांव घोंगावत असतात. भिक्षुकी वृत्तपत्रें म्हणजे वाटेल त्या क्षुद्राला कलमाच्या एकाच फटक्यानें देवकळा देणाऱ्या विश्वकर्म्याची मंदिरें बनली आहेत. भिक्षुकी पत्रांत मेलेला कोणता माणुस 'सार्वजनिक कामांत पडत' नसे? गांवोगांवच्या पोराटोरांना माहीत असलेले शेकडो कुऱ्हाडीचे दांडे भिक्षुकी कृपेने देशाचे देशपांडे म्हणून प्रतिष्ठितपणें मिरवत आहेत. बोलून चालून भिक्षुकशाही हाच मुळीं एक भयंकर गांधिलमाशांचा पोळा! मग त्याच्या घोंगावण्यानें जनतेची दिशाभूल कां होणार नाहीं? आणि हिऱ्याच्या भावानें गारगोट्या कां विकल्या जाणार नाहींत?

भगवंताने देशसेवेचा ताम्रपट भिक्षुकांनाच एकट्याला दिलेला नाहीं. त्यांच्या बऱ्यावाईट अभिप्रायावर जगण्या मरण्याची बळजबरी सुरू होणें शक्य नाहीं. त्यांच्या कारस्थानाला कोणी कितीहि बळी पडला, तरी तो जर अस्सल निष्ठावंत कर्मयोगी असेल, तर त्या कारस्थानानें त्याचा रोमहि वाकडा होणार नाहीं. भिक्षुकशाहीच्या हातीं शिक्षणप्रसार व वृत्तपत्रांचे प्रचंड शिंगाडे असल्यामुळें त्यांना आपल्या भिक्षुकी गुंडगिरीचा ध्वनि जबरदस्त घुमविता येतो. परंतु तेवढ्यामुळें असें समजण्याचें मुळींच कांहीं कारण नाहीं, की महाराष्ट्रात त्यांच्या कंपूशिवाय दुसरे कोणी मितभाषी एकनिष्ठ स्वार्थत्यागी देशसेवक व जनसेवक नाहींत. आहेत, ठिकठिकाणीं निश्चयानें, एकनिष्ठेनें आपापलीं विहित कर्तव्ये मिटल्या तोंडीं करणारीं

अनेक नररत्नें आहेत. तीं शोधून काढून त्यांच्या कर्तबगारीचा आणि शीलाच्या कमावणीचा परिचय विवेकी महाराष्ट्रीयांना करून देणें प्रबोधनाचें कर्तव्य आहे. भिक्षुकांना आणि त्यांच्या पायताणांचे नाल बनलेल्यांना ही रत्नें गारगोट्या वाटलीं, तर तीं त्यांच्या दृष्टीची पुण्याई समजून विवेकवादी जनांनी तिकडे दुर्लक्षच करणे श्रेयस्कर आहे.

सातारचे भाऊराव पाटील

हें नांव आजकाल भिक्षुकी कंपूंत मोठ्या अचक्यादचक्याचे झालें आहे. सातारा जिल्ह्यांतचसें काय, पण अवघ्या महाराष्ट्रांत हें नांव निघतांच ब्राम्हणेतर जनतेंत एका जोरदार चैतन्याचें वारें स्फुरण पाऊं लागते. टिळकी पुण्याईवर महाराष्ट्राच्या सर्वकारणी नेतृत्वाचें आसन फुकटफाकट पटकविणाऱ्या नरसोपंत केळकरापासून तों थेट टिळकी कारस्थानांना बळी पडून हतप्रभ झालेल्या अच्युतराव कोल्हटकरापर्यंत असा एकहि भिक्षुक सापडणार नाहीं कीं ज्याला भाऊराव पाटिलाची कर्मयोगी कदर आणि बहुजन समाजावरील त्यांचें जिव्हाळ्याचें वजन माहीत नाहीं. कृतज्ञतेला पारखा न झालेला असा कोणता अस्पृश्य आहे कीं जो हे नांव ऐकतांच या 'पाटील मास्तरा'विषयीं आदरयुक्त भावनेचे आनंदाश्रू ढाळणार नाहीं. सातारा जिल्ह्यांत असा एकहि शेतकरी नाहीं कीं भाऊरावानें ज्याच्या माजघरापर्यंत प्राथमिक शिक्षणाचें लोण नेऊन पोचविलेलें नाही. ब्राम्हणेतर बहुजन-प्रबोधनाची अशी एकहि संस्था, चळवळ, परिषद, सभा, जलसा, व्याख्यानमाला, जत्रा, किंवा शाळा आढळणार नाहीं की जींत भाऊराव पाटलाचे श्रम खर्ची पडलेले नाहींत. इतकी सर्वस्पर्शी व सर्वव्यापी चळवळ करणारी ही व्यक्ती कोण आहे, कशी आहे, कसल्या ध्येयाच्या मागें लागलेली आहे इत्यादि सर्व तपशील महाराष्ट्रापुढें मांडण्याचा मान प्रथमतः प्रबोधनालाच मिळत आहे, हें या कलमाचे भाग्य होय. भाऊरावचें चरित्र म्हणजे तरुण महाराष्ट्राला जितकें हृदयंगम तितकेंच तें आत्मप्रबोधक वाटेल, अशी आशा आहे. आमची अशी खात्री आहे कीं भाऊराव जर ब्राम्हण असते, निदान भटाळलेले असते, तर भिक्षुकशाहीनें त्यांना आजला आकाशापेक्षांहि उंच उचलून धरले असते!

घराणे आणि पूर्वसंस्कार

ऐतवडे बुद्रुक (सातारा जिल्हा) ही भाऊरावची जन्मभूमी. यांचें घराणें तेथले वतनदार पाटील. हे जैनधर्मी असून जात चतुर्थ. हे पाटील घराणें बरेंच मोठें असून यांच्या नातेवाईकांच्या शाखा उपशाखा विस्तृत पसरलेल्या आहेत. पिढ्यान् पिढ्या चालत आलेला मुख्य धंदा शेतकी. अर्थात् शेतकीशीं सहकार्यानें राहण्यास चटावलेल्या अक्षरशत्रुत्वाचाहि पगडा या ऐतवडेकर पाटलांवर बराच असे. परंतु भाऊरावचे वडील पायगोंडा पाटील यांनीं मराठी ७ यत्तेची परीक्षा देऊन सरकारी नोकरी धरली. साक्षर होऊन सरकारी नोकरींत प्रवेश करणारे हे जैनांतील पहिलेच गृहस्थ. हल्लीं यांना २० रुपये पेनशन मिळत असते. खुद्द भाऊरावच्या वंशावळींतले दोन पूर्वज सर्वज्ञानसंपन्न व सर्वसंगपरित्याग करून जिनसेन (जैनांचे जगद्गुरू) झाले होते. कमाल स्वार्थत्यागाची, शिक्षणज्ञानाची आणि बहुजनसेवेची भाऊरावची जी प्रवृत्ति आज पूर्णत्वाने परिणत झालेली स्पष्ट दिसत आहे, तिचा उगम या पूर्व संस्कारांतच आढळून येतो. भाऊरावचें शिक्षण तासगांव, दहीवडी, विटे व कोल्हापूर वगैरे ठिकाणी मॅट्रिकपर्यंत झालेलें आहे. विद्यार्थी दशेंतच त्यांना तालमीचा नाद लागला, व ते सर्व ठिकाणी बंडखोर विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध असत. लहान सहान हक्कासाठीं सामोपचाराचे सर्व प्रयत्न हरल्यावर गुंडगिरीची

लाठी फिरवण्याचा प्रसंग आलाच, तर पहिला रामटोल्या भाऊरावचा असे. अमूक गोष्ट अन्यायी आहे एवढें त्यांना पटलें कीं त्या विरुद्ध शक्य त्या रीतीनें दंडुकेशाही चालवितांना ते कोणाचीहि व कशाचीहि दरकार बाळगीत नसत. लहानपणापासूनच त्यांना लोकसंग्रहाची मोठी आवड आणि त्यांच्या सवंगड्यांत शेतकऱ्यांची व महार मांगादि अस्पृश्यांची मुलें यांचा भरणा विशेष असे. स्पृश्यास्पृश्य भेदाचा जुलमी वेदोक्तपणा त्यांनी आपल्या विद्यार्थी दशेंतच अटकळींत आणून त्याविरुद्ध शक्य तेवढा निकराचा विरोध करण्याचा उपक्रम चालू ठेवला होता. आपल्या अस्पृश्य मित्रांना सार्वजनिक विहिरीवर आणि पाणवठ्यावर लोक कां येऊन देत नाहीत, याचा बालभाऊरावला प्रथम प्रथम कांही उलगडाच होईना! पुढें खुलासा झाला कीं हिंदु धर्माची आज्ञाच तशी कडकडीत आहे. एका विहिरीवर ते आपल्या एका अस्पृश्य मित्रासह पाणी प्यावयास गेलें. लोकांनी मित्राला मज्जाव केला भाऊराव म्हणाले 'या विहिरीवर आम्ही दोघेहि पाणी पिणार. पिऊन देत नसला तर मी तुम्हालाहि पाणी काढूं देणार नाही.' गोष्ट हमरी तुमरीवर आली. तालीमबाज भाऊरावनें कडाड एका हिसक्याने विहिरीचे रहाटचाक उचकून मोडले आणि दिले दूर भिरकाऊन. 'काढा लेकाच्यानो कसे पाणी काढता तें! म्हणे आमचा हिंदुधर्म. उभा तिवाठ्यावर जाळला पाहिजे असला धर्म.' भाऊरावचा आजचा कडवा सत्यशोधक बाणा, अल्पवयांतल्या असल्या प्रत्यक्ष सत्यशोधनांनी बनलेला आहे. सन १९०२ ते १९०८ पर्यंत इंग्रजी शिक्षणासाठी ते कोल्हापूरास जैन बोर्डिंगमध्ये राहात असत. तेथेहि त्यांची बंडखोर प्रवृत्ति वाढत्या प्रमाणावर होती. विवेकाला ज्या गोष्टी पटायच्या नाहीत त्यांचा ठिकच्याठिकाणी निषेध करायला भाऊराव कधीच कचरत नसत. १९०६ सालापर्यंत कोल्हापूरची नेटिव जनरल लायब्ररी म्हणजे संपूर्ण भटाळलेली असे. मॅनेजिंग बॉडीत एकजात सगळे ब्रम्हपुत्र. ही गोष्ट भाऊरावच्या नजरेस यायची थातड. त्यांनी लागलीच आपल्या सवंगड्यांची सेना सज्ज करून, या भटी सवत्या सुभ्याला मोर्चे लावले व मॅ. बॉ. च्या इलेकशनाची संधी साधून गांवांत दांडगी चळवळ सुरू केली. शेकडो ब्राम्हणेतरांना लायब्ररीचे मेंबर करून, त्यांच्या बहुमताच्या जोरावर भटी सवत्या सुभ्याला कायमची मूठमाती दिली. या प्रसंगी भाऊरावच्या बरोबरीने रामभाऊ शिंदे या तरुणाने नेटाचा हल्ला चढविण्यांत पुढाकार घेतला होता. हे आता B.A. LL.B. वकील होऊन साताऱ्यास प्रॅक्टिस करीत असतात. याच वर्षी भाऊरावला आणखी एका विवेक-अमान्य गोष्टीबद्दल बंड करावे लागले. प्रो. आण्णासाहेब लठ्ठे हे जैन बोर्डिंगचे सुपरिटेंडंट होते. एका संध्याकाळी काही मुलांना दाढ्या करण्याची लहर आली. पण ते धर्मबाह्य कृत्य म्हणून बोर्डिंगच्या नियमा विरुद्ध होते. भाऊराव म्हणाले ''असला कसला हा नियम आणि हा धर्म? सकाळी दाढी केली तर पुण्य आणि संध्याकाळी केली तर पाप? काय या पापपुण्याचा आचरट कल्पना बुवा. बस्स. प्रथम मी दाढी करणार. नरकांत गेलो तरी बेहत्तर!'' भाऊरावबरोबर ५-६ मुलांनीहि दाढीविधी उरकला. सुप. लठ्ठे यांना ही गोष्ट कळतांच, त्यांनीं गुन्हेगारांना बोलाऊन त्यांची हजेरी घेतली व शिस्त मोडल्याबद्दल प्रत्येकाला चार चार आणे दंड ठोठावला. बाकीच्या सर्व मुलांनीं दंड भरला, पण भाऊरावने साफ नाकारलें. ''तुमच्या बोर्डिंगाची शिस्त मी मोडली असेल तर मला बोर्डिंगातून डिसमिस करा. संध्याकाळी दाढी केली म्हणून काय आकाश कोसळून पडलें? का धर्म बुडाला? दाढ्या केल्या आम्ही स्वतः, आणि त्याचा डबल चार्ज तुम्हाला काय म्हणून?'' सुप. लठ्ठे यांनीं अर्थात् भाऊरावची बोर्डिंगातून उचलबांगडी केली. तेथून निघताच, महाराजांचे मेहुणे मामासाहेब खानवीलकर यांनी आपले

चिरंजीव बाळासाहेब यांचे कंपॅनियन म्हणून भाऊरावंची राजवाड्यांत सर्व व्यवस्था लावली. तेथे ते दोन वर्षे होते. या अवधींत त्यांचा सारा आयुष्यक्रम सरदारांच्या मुलांच्या श्रीमंती सहवासात गेल्यामुळे, बाळपणांतील गोरगरीब मित्रांच्या जीवनाकडे तुलनेनें पाहाण्याची त्यांची सत्यशोधक प्रवृत्ति अत्यंत चिकित्सक व न्यायनिष्ठूर बनली. त्यावेळीं कोल्हापूरांत शेणोलीकर मास्तर असत. ते भाऊरावची तरतरीत बुद्धी, कडवा बाणेदारपणा आणि तत्वनिष्ठा पाहून फार खूष झाले. ते दररोज भाऊरावला खाजगी मोफत शिकवीत असत. त्यांच्या उपदेशाचा भाऊरावच्या शीलकमावणीवर दीर्घ परिणाम झाला. त्याच सुमारास शाहू महाराजांच्या प्रेरणेनें लठ्ठे जाधव डोंगरे प्रभूतींनी सत्यशोधक समाजाच्या पुनर्घटनेचे प्रयत्न चालू केले आणि महाराजांनीं खास अस्पृश्यांकरिता मिस क्लार्क होस्टेल सुरू केले. या सर्व चळवळींचा भाऊरावाच्या मनावर योग्य तोच परिणाम होऊन ते सत्यशोधक बनले आणि मागासलेल्या अस्पृश्य वर्गासाठीं आपलें तन मन धन वेचण्याची त्यांनीं हृत्प्रतिज्ञा केली. १९०८ सालीं हायस्कूलचा मॅट्रिकपर्यंतचा अभ्यास करून भाऊरावनें कोल्हापूर सोडले ते उरूण-इसलामपूरला आले. येथे त्यांचे वडील नोकरीवर होते. कोठेंतरी रेवेन्यू खात्यांत नोकरी धर असा त्यांनीं पुष्कळ आग्रह केला, पण भाऊरावला तो पसंत पडला नाही. ''मला नोकरी करायची आहे, पण त्याची जागा हें रेवेन्यू खाते नव्हे. जन्माला यावें आणि बूकर टी. वॉशिंगटन सारखें जगून अमर व्हावें. सेवावृत्तीच पत्करायची तर महाराष्ट्रांत लक्षावधि अस्पृश्य बांधव जनावरांच्या जिण्यानें जगत आहेत; त्यांना शिक्षणदान देऊन त्यांचा आत्मोद्धार केला तर ती सेवा देवाघरीं कितीतरी रुजूं होईल.'' व्यवहारदक्ष वडिलांना ही आपल्या चिरंजीवाची महत्वाकांक्षा एकपरी उत्तम वाटली, पण व्यावहारीक दृष्ट्या कशीसीच वाटली. बरे, भाऊराव म्हणजे एक नंबरचा हट्टी. म्हणेल ते करील. मान तुटेल पण हट्ट तुटणार नाहीं. तेव्हां तो जसा जाईल तसाच त्याल जाऊं देणें हाच मार्ग वडिलांनीं पत्करला.

पहिला अस्पृश्योद्धार

मागासलेल्या वर्गांत शिक्षणप्रसारांशिवाय आत्मप्रबोधन होणें शक्य नाहीं, आणि त्या दिशेनें आपण स्वतःच कांहीं तरी झिजलें पाहिजे, या एकच उदात्त हेतूनें भाऊरावचें चित्त व्यग्र झालें; आणि आज सुद्धा त्यांच्या सर्व धडपडी या एकाच दिशेनें चाललेल्या आहेत. उरूण-इसलामपूरला एक दिवस तरूण भाऊराव तेथील शाळेवरून जात असता, एक गरीबसा मुलगा पाटी पुस्तकें घेऊन वर्गाच्या बाहेर दरवाजाशीं पायरीजवळ बसला होता. मास्तर खोलीच्या दुसऱ्या टोकाला वर्ग शिकवीत होते. त्यांचे काही शब्द कानीं पडले तर पहावें, आली कांही विद्या तर ठीक, नाहींतर नशिब, ही विवंचना त्या दीनवाण्या मुलाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. ताबडतोब भाऊराव शाळेंत शिरले. नमस्कार चमत्कार झाल्यावर 'हा मुलगा एकटाच तिकडे बाहेर कां बसविला?' म्हणून मास्तरास विचारलें.

मास्तर - ते एक महाराचें पोर आहे. शिकायला येतें. त्याला आत कसें घ्यावें?

भाऊराव - इतर मुलांना आंत घेतां तसेंच घ्यावें. तो मुलगा माणूस नाहीं वाटतं? विद्येच्या मंदिरांत सुद्धां माणसांनीं माणुसकीचा मान राखूं नये, हें काय?

मास्तर - अहो पण तो महार आहे. त्याला आम्ही कसे शिवावें? कांही धर्मबिर्म आहे कीं नाहीं?

भाऊराव - बरं, इतक्या लांब पायरीजवळ बसून त्यानें शिकावें तरी कसें आणि काय?

मास्तर - आहे, ही महारड्यांची पोरं. काय कर्म शिकणार? सही करण्यापुरती अक्कल आली तर

आली.

भाऊराव संतप्त झाले. त्यांनीं त्या मुलाचा हात धरला आणि म्हणाले ''बाळ, तूं या धर्मवान शाळेत जन्मभर बसलास, तरी कांही फायदा होणार नाही. चल तूं माझ्या घरीं. मी तुला स्वतः शिकवून विद्वान करतो.'' अस्पृश्यांचा हा कोण कैवारी? आणि तो मज दीनावर अवचित कसा प्रसन्न झाला? इत्यादि अनेक कल्पनातीत भावनांनी त्या मुलाचे हृदय भरून आले. तो टपटपा अश्रू गाळू लागला. भाऊराव त्याला तेथूनच घरी घेऊन गेले. वडील मातोश्रींना हे हिंदुधर्माच्या लायकीचे व 'समत्वं योग उच्यते' चे जिवंत चित्र दाखविले. तेथून त्या मुलास कोल्हापुरास नेऊन मिसक्लार्क हॉस्टेलमध्ये घातले व त्याचे शिक्षण इंग्रेजी ६ यत्तेपर्यंत स्वार्थत्यागपूर्वक पूर्ण केले. वाचकहो, ते महाराचे गरीब महत्वाकांक्षी पोर कोण? माजी

आमदार ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप M.L.C.

हें होय. महाराष्ट्रीय अस्पृश्यांच्या विद्यमान चळवळींतला हाच पहिला कर्तबगार तरूण. यानी 'मूकनायक' नांवाचें एक उत्कृष्ट साप्ताहिक चालवून, आणि कौन्सिलांतहि अस्पृश्यांच्या उद्धारार्थ पुष्कळ परीश्रम केले व सध्यां करीत असतात. सांप्रत, साताऱ्यास ते डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डचे व स्कूलबोर्डचे मेंबर आहेत. हे उत्तम भाषक व लेखक आहेत. अलीकडे अस्पृश्यांमध्येंच जी भटी धाटणीची व्यक्तिद्वेषाची वावटळ सुरू झालेली आहे, तिला कंटाळून श्री. घोलपांनीं सध्यां भाषण लेखन तपश्चर्येत मूकवृत्ति धारण केलेली आहे. पण आम्हांला आशा आहे कीं अस्पृश्य समाज हिरा आणि गारगोटींतला भेद लवकरच जाणून, घोलपासारख्या स्वयंप्रकाशी पुढाऱ्याच्या कर्तबगारीचा आत्मप्रबोधनार्थ योग्य तो उपयोग करून घेईल.

भाऊरावचे शिक्षणदानाचें कार्य केवळ अस्पृश्य वर्गापुरतेच होते असें नव्हे. मराठे व तत्सम जातींतल्या अनेक मुलांनाहि त्यांनीं पदरमोडीनें शिक्षण कपडे पुस्तकें पुरवून आज चांगल्या प्रतिष्ठीत स्थितींत आणून ठेवले आहेत. कोणी पोलीस सब इन्स्पेक्टर, कोणी वकील, कोणी शिक्षक, कोणी कारकून अशा नानाविध व्यवसायांत ते आहेत. एका जैन परिषदेच्या प्रसंगी भाऊराव व्हॉलंटियरचे कॅपटन होते. त्यावेळीं त्यांची चलाखी शिस्त टापटीप वगैरे पाहून मुंबईचे सुप्रसिद्ध दानवीर शेट माणिकचंद पानाचंद यांनी दरमहा ३० रु. स्कॉलरशिप देऊन, हिऱ्या मोत्यांची परीक्षा कशी करावी, याचें शिक्षण देण्याकरितां मुंबईस स्वतःच्या पेढीवर नेले. त्याचवेळीं दावर्स कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये भाऊरावनीं अकौंटन्सीचाहि कोर्स घेतला होता. पुढें आजारी पडून १९११ सालीं परत साताऱ्यास आल्यावर भाऊरावनी एका वर्षात इंग्रेजी १ ते ३ इयत्ता शिकविण्याचा एक खासगी वर्ग उघडला. या वर्गात मागासलेले ब्राम्हणेतर व अस्पृश्यांची पुष्कळ मुले शिक्षण घेत असत. पण त्यांत बराचसा भरणा मोफत विद्यार्थ्यांचाच असे. कारण, गरजू विद्यार्थी आणि तो भाऊरावच्या दारात आला पुरे की त्याची सोय झालीच. मग त्या पायी वाटेल ते नुकसान झालें तरी त्याची भाऊरावला पर्वा काय? काले येथील बरेच विद्यार्थी या क्लासांत असत. त्यांची हुषारी पाहून कित्येक आय.सी.एस. अधिकाऱ्यांनीं त्यांना खासगी स्कॉलरशिपा दिल्या व ते परत विलायतेला गेले तरी तेथून परस्पर त्यांच्या विद्यार्थ्यांना मनीआरडरी येत असत. भाऊरावच्या प्रयत्नांमुळें सातारा जिल्ह्यांत काले हें एक सर्व उत्तम चळवळीचें केंद्र झालें आहे. या इंग्रजी क्लासामुळें पुष्कळ गरीब विद्यार्थी स्वावलंबनी झाले व आजहि आपल्या

'पाटील मास्तर'चे उपकार कृतज्ञतापूर्वक स्मरत असतात.

सन १९०९ सालीं वडिलांची बदली साताऱ्यास झाली. त्या वेळीं रुद्राजीराव राजे महाडीक मराठा समाजात जागृतीचे प्रयत्न करीत होते. त्यांच्याशीं भाऊरावनें सहकार्य करून व्याख्यानद्वारां पुष्कळच मदत केली. औद्योगिक व शेतकी संवर्धक संस्था काढून, त्यांतील फायद्यांवर मोफत शिक्षणाचें कार्य करतां येईल, ही एक नवीन कल्पना भाऊरावला या वेळी आली; आणि प्रयोगासाठी ऑ. कॅपटन रामचंद्रराव हरजीराव महाडीक, रा. सा. तात्या रावजी पाटील, पिलोजी राजे शिरके, रामभाऊ चिटणीस व बाबासाहेब चित्रे वकील, यशवंतराव प्रतापराव गुजर, दुधुस्कर मामलतदार इत्यादि मंडळींच्या सहायानें

कृषिकर्म सुधारणा मण्डळ

नांवाची एक संस्था रजिष्टर करून घेतली. मि. ब्रॅन्डन कलेक्टरनें मण्डळाच्या डेप्यूटेशनला सर्व प्रकारची मदत देण्याचें आश्वासन दिलें. कोरेगांवचे भाऊसाहेब बर्गे यांनी आपल्या मालकीची २०-२५ एकर जमीन लांब मुदतीनें व कमी दरानें मण्डळाला दिली. डॉ. मॅन साहेबानें पाणी व मातीचें ॲनालिसिस केलें. आग्रिकलचरल खात्याचें इंजिनियर परांजपे व शूट साहेब यांनी लिफ्ट इरिगेशनचा सल्ला दिला. शेअरच्या विक्रीसाठीं भाऊरावनें पंजाबांत कोहटपर्यंत प्रवास केला. पण इतक्यांत भाऊराववरच कोल्हापुरी राजकारणाचें प्राणघातक गंडांतर आल्यामुळें या मण्डळाला राम म्हणावा लागला.

कोल्हापुरी राजकारणी गण्डांतर

अर्धवट आणि किंचित अस्पष्टच कां होईना, पण १९१४ सालीं कोल्हापुरांत एडवर्ड बादशाहाच्या पुतळ्याला डांबर फासल्याचें जें एक भयंकर प्रकरण उपस्थित झालें होतें, त्याचा एक महत्वाचा भाग आजच प्रथमतः प्रबोधनात मुद्रणसंस्कार होऊन जगापुढें येत आहे. बोलून चालून तें राजकारण! तेव्हा त्याचे पापुद्रेहि फार हलक्या हातानें सोलण्याचा यत्न केला आहे. या प्रकरणीं घडलेल्या किंवा मुद्दाम घडविलेल्या अत्याचारांची मढी उकरण्यात अनर्थ नसला तरी अर्थ आहे. अनर्थ झाला तरी त्याची आम्हांला पर्वा नाहीं. खबरदारी एवढीच घेतली आहे कीं या अत्याचारांचे वणवे पेटविणाऱ्या कित्येक जिवंत नरपशूंचा नामनिर्देश अज्जीबात टाळला आहे. या पुतळा-डांबरीचे डांबीस प्रकरण प्रो. लठ्ठे यांनी आपल्या शाहूचरित्रांत अज्जिबात गाळून त्यातल्या अत्याचारांच्या अध्यायांचा पूर्ण स्वाहाकार केलेला आहे. कदाचित्, त्यांत त्यांचा स्वतःचा दुर्दैवी संबंध जोडण्याच्या कोल्हापुरी पोलीसांनी केलेल्या भानगडी या शुद्ध राजमान्य 'पोलिसी पॉलिसी' असल्यामुळें त्यांचे महत्व प्रो. लठ्ठे यांनीं भावी दिवाणपदप्राप्तीच्या मुत्सद्देगिरीनें डावलण्याची चलाखी दाखविली असावी, असें आम्हाला वाटतें. १९०७ सालच्या टिळकपंथी माथेफिरूंची अत्याचारी कारस्थाने कोल्हापुरांत सुरू झाली. त्यामुळें संस्थाननेंहि त्यांना पायबंद लावण्यासाठीं आपल्या उघड गुप्त पोलीस यमदूतांच्या सेनेला सर्वाधिकारांची शस्त्रसामुग्री भरपूर दिली. तेव्हांपासून कोल्हापुरी पोलीस म्हणजे प्रतिसृष्टीकर्त्या विश्वामित्राचे बाप आणि यमधर्माचे शिरजोर सावत्रभाऊच बनले होते. राज्यकर्त्यांचे कानच या महात्म्यांच्या हाती पडल्यावर वाटेल त्या सावा चोराची मान फांसावर लटकविणें म्हणजे विडीच्या झुरक्या इतकीच त्यांची सहजलीला होऊन बसली. असल्या नाजूक परिस्थितीत १९१४ सालीं कोणी माथेफिरू माणसानें कोल्हापूरच्या

बागेंतील एडवर्डच्या पुतळ्यावर डांबर ओतली. जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. पोलीशी ठार्णी गदगदा हादरलीं. गुप्तदूतांचीं नाकें व कान मैलमैल लांब वाढले. डांबऱ्या वेरड हुडफून काढण्याच्या तगाद्याचा महाराजांचा हंटर पो. सु. फरनांडीझच्या पाठीवर दिवसांतून चोवीस वेळ फडाडूं लागला. गांवांतील रिकामटेकड्या उपद्व्यापी लोकांनींहि पोलीशी गुप्तसेनेंत प्रवेश करून घेतला. असे करण्यात या हरामखोरांचा उद्देश निराळाच असतो. पोलीसांचें पाठबळ मिळाले म्हणजे अनेक सुष्ट दुष्ट व्यक्तींवरील आपल्या खासगी किंवा व्यावहारीक व्यक्तिद्वेषाचा सूड भरपूर उगऊन घेतां येतो.

या वेळीं लठ्ठे डोंगरे आणि जाधव या तीन विद्वानांचें तेज कोल्हापुरांत बरेंच होतें. प्रत्येक विवेकवादी चळवळीत हे पुढारी असत. जात्याच विद्वान बहुश्रुत व्यासंगी आणि चिकित्सक असल्यामुळे या तिघांपुढें कोल्हापुरांतील सर्व ब्राम्हणेतर शालशिष्ट तेजोहीन झाले होते. सामाजिक चळवळी बरोबरच राजकीय सुधारणेविषयीं त्यांच्या स्पष्टोक्ती राजसत्तेला जवळ जवळ डोईजड होऊं लागल्या होत्या. विशेषतः प्रो. लठ्ठे यांच्या वाग्लेखन शरचापल्यामुळें त्यांच्या हितशत्रूंच्या फलटणी कोल्हापुरांत बऱ्याच निर्माण झाल्या होत्या. जातींतीलहि बरेच उपद्व्यापी लोक यांच्या पाडावाचा प्रयत्न करीत होते. कित्येक कोल्हापुरी अधिकाऱ्यांना व पोलीस खात्यालाहि प्रो. लठ्ठे यांनीं वेळोवेळी टाइम्स वगैरेच्या कालमातून प्रतोदप्रहार लगावलेले असल्यामुळें, तेहि त्यांच्यावर मनांतून जळफळत असत. अशा लोकांना ही पुतळ्याची डांबर म्हणजे प्रो. लठ्ठ्यांविरुद्ध चालवायला एक उत्तम शस्त्रच सापडले. हितशत्रूंची अक्कल आणि पोलीशी शक्कल या दोन शक्ती एकत्र एकवटल्यावर काय घटना निर्माण होणार नाही? निश्चित नपूंसकावरहि जबरीसंभोगाचा आरोप सिद्ध होईल, मग सुविद्य सुसंस्कृत आणि विवेकी मनुष्यावर पुतळ्याची डांबर ओतणें, पोलीशी अकलेच्या हातचा मळ!

प्रो. लठ्ठ्यांना या प्रकरणात अडकवायचेंच इतकें निश्चित ठरल्यावर, मग पुराव्याला काय तोटा? पुराव्यानें आरोपी हुडकण्या ऐवजीं, आरोपीसाठीं पुरावा हुडकण्याचें काम फार सोपें असतें; आणि या कामीं बलीदानासाठीं निश्चित ठरविलेल्या अजापुत्राचे जातभाईच जर इतर हितशत्रूंसह अहमहमिकेनें पुढें सरसावले, तर चोर सोडून संन्याशाला फाशीं द्यायला पोलीसांच्या बापाचें काय वेचतें? पुराव्यासाठी प्रो. लठ्ठ्यांच्या विरुद्ध असणाऱ्या-निदान आहेत अशा दिसणाऱ्या-व्यक्ती शोधण्याची खटपट झटपट सुरू झाली. त्याचा एक सूक्ष्म धागा १९०६ सालच्या जैन बोर्डींगातल्या दाढीप्रकरणाला जाऊन भिडला आणि भाऊराव पाटील हा तरूण लठ्ठ्यांच्या विरुद्ध आहे, या (भ्रामक) भावनेने त्याला पुराव्याचा साक्षीदार म्हणून मथविण्याचा बेत ठरला. दाढीप्रकरणानंतर दुसऱ्याहि एका सामाजिक मतभेदाच्या प्रश्नांत भाऊरावनें आण्णासाहेब लठ्ठ्यांना मतभेदाची जोरकस टक्कर दिलेली होती. परंतु मतभेद म्हणजेच हाडवैर अशा समजुतीच्या उकीरड्यांत पिचणाऱ्या कावळ्यांना या दोन विवेकी तरुणांच्या आत्मीय जिव्हाळ्याची काय कल्पना असणार? आण्णासाहेबांच्या विरुद्ध जे कारस्थानी अ ब क ड मंडळ उभे राहिले, त्यांतल्या एका क नें भाऊरावला कोरेगांवास तार पाठविली कीं जरूरीचे काम आहे ताबडतोब येऊन भेटा. गरीब व गरजू मुलांना शिक्षणदान करण्यांतच आनंदमग्न असलेल्या भाऊरावला या कोल्हापुरी कोलदांड्याची काय कल्पना असणार? तार मिळतांच भाऊराव कोल्हापूरला गेले. दिवस इकडच्या तिकडच्या गप्पांत गेला. रात्रीं जेवण आटोपतांच हळूंच पोलीशी थाटांत विषय निघाला. 'दीड महिन्यापूर्वी येथल्या एडवर्डच्या पुतळ्याला डांबर फांसण्यांत आलेली आहे. पोलीसांनीं तपास

करून छेडा लावला आहे. त्यांत आण्णासाहेब लठ्ठ्यांचा हात आहे, अशी त्यांची खात्री झाली आहे. महाराजांनीं मला खास सांगितलें आहे कीं या बाबतींत भाऊराव पाटीलानें सरकारच्या बाजूनें साक्ष देऊन आण्णासाहेबांच्या विरुद्ध पुरावा केला पाहिजे. यांत तुमचें कल्याण आहे. असें न कराल तर काय प्रसंग ओढवेल त्याचा नियम नाहीं.' भाऊराव चकितच झाले. क्षणभर विचार करतांच त्यांना उमगलें कीं आपण एका भयंकर जाळ्यांत येऊन पडलों आहों. काय वाटेल तें करून आण्णासाहेबांना चिरडण्याचा हा राजमान्य कट आहे आणि त्या कामीं खाटकाचें काम बळजबरीनें आपल्या माथीं लादण्याचा हा नातूशाही पेंच आहे. भाऊरावने दोन्ही कानांवर हात ठेऊन 'क' च्या सूचनेचा शक्य त्या तीव्र शब्दांत निषेध केला. त्या गृहस्थाची पुष्कळ निर्भत्सना केली. परंतु उपयोग काय? प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पोलीशी पेच पडल्यावर नेहमीच्या व्यवहारांतली निषेधी सभ्यता किंवा माणुसकीचा सात्विक अथवा तामसी त्वेष म्हणजे पालथ्या घड्यावरील पाणी किंवा नपुंसकापुढे पद्मिणीचा शृंगारच ठरायचा! भाऊरावला मथविण्यांत कटवाल्यानें जान जान पछाडली. महाराजांच्या क्रोधाची धमकी घातली. सर्व कांही केले. पण तो कांही वळेना. रात्री १२ चा सुमार झाला. ज्या घराच्या माडीवर कं आणि भाऊराव यांची शाब्दिक झटापट चालली होती, त्याच्या तळमजल्यावर एकाकी आग लागली. लागली म्हणण्यापेक्षा लावली म्हणणेंच योग्य होईल. जिकडे तिकडे धावाधाव होऊन आग विझाली. त्याच गडबडींत 'क' नें पुकारा केला कीं 'माझ्या एक हजार रुपयांच्या नोटा चोरीस गेल्या.' पोलीसनें तक्रार टिपून घेतली. स्थिरस्थावर झाल्यानंतर 'क' भाऊरावला ठासून म्हणाला ''आतां वळणावर येतोस कीं हें आगीचें आणि चोरीचें त्रांगडें अडकऊं तुझ्या गळ्यांत?'' भाऊरावनें तितक्याच जोरानें उत्तर दिलें ''तुझी अवलाद जैनाची आहे कीं महाराची? मी फांसावर गेलो तरी बेहत्तर, पण खोटें काम कधिं करणार नाहीं. जा तुला वाटेल तें कर.'' या वेळीं पहाटेच्या ५ चा सुमार होता. थोड्याच वेळांत एकदम कांही पोलीस 'क' च्या माडीवर घुसले आणि भाऊरावला पकडून घेऊन गेले.

कोल्हापुरी पोलीसांचे अत्याचार

भाऊरावची अटक केवळ पोलीशी प्रेरणेचीच होती असें नव्हे, तर त्याची सूत्रें खुद्यांकडूनच हालत होती. वाटेल ती उलाढाल करून डांबर प्रकरणांत लठ्ठ्यांना लोळविण्याचा महाराजांचा निश्चयच होऊन बसला होता, मग त्याच्या मागें पोलीसांची कानचावणी असो, नाहींतर लठ्ठ्यांच्या हितशत्रूंची हातलावणी असो. भाऊरावला जामीनावर सोडविण्याचा कांहीं मित्रांनी प्रयत्न केला, पण अर्ज नामंजूर झाला. इतकेंच नव्हे, तर तसा यत्न करणारांना 'याद राखून ठेवा' या त्र्यक्षरी पदवीचें धमकीदान झालें.

कावळ्याचा बंगला हें एक कोल्हापुरांतले कुप्रसिद्ध स्थळ आहे. या एका बंगल्यात अत्याचाराचे जितके अमानुष प्रकार झाले आहेत तितके यमपुरीच्या देखाव्यांत सुद्धां पाह्यला मिळायचे नाहीत. 'तुला जरीमरी येवो' असा कोणी कोणाला शाप दिला तर मनुष्य त्याची हासण्यापलीकडे किंमत करणार नाही, पण १९०७ सालापासून कोल्हापुरांत कावळ्याचा बंगला हे नांव ऐकतांच शेकडो माणसें गारठून जात असत. आरोपीच्या तोंडून सत्याचा अर्क पिळून काढण्याचे पोलीशी घाणे या बंगल्यांत राजरोस रात्रंदिवस सुरू असत. अमक्या तमक्याला 'कावळ्याच्या बंगल्यावर नेला' इतकी बातमी कळली कीं खुशाल त्याची सर्वांनीं आशा सोडावी. परत आलाच तर पुनर्जन्म होऊनच यायचा. सत्यार्क पिळून काढण्याची सर्व आयुधें या बंगल्यात सज्ज असत आणि ती पद्धतशीर उपयोंगात आणणारे

कसाईहि त्या काळी कोल्हापुरी पोलीससेनेंत पुष्कळ असत.

भाऊराव जर डांबर-प्रकरणांत आण्णासाहेब लठ्ठे यांच्या विरुद्ध साक्षीचा पुरावा करता, तर सहज पांच सहा हजार रुपये खिशांत टाकून मोकळा सुटता. पोलीसांनीं मुस्कटमारी, उरधोंडी, बरगडफोडी वगैरे प्राथमिक समजुतीचे प्रयोग भाऊरावावर केले. पण तो कांहीं बने ना! अखेर त्याला कावळ्याचा बंगला दाखविला. तेथे तक्तपोशीच्या बहालाला भाऊरावचे हातपाय बांधून टाकीत आणि खालून पाठीवर व कुल्यावर चामड्याच्या हंटरचे तडाखे हाणीत. एक हंटऱ्या थकला कीं दुसरा, दुसऱ्या नंतर तिसरा, थोडी विश्रांति, पुन्हा 'मागील अंकावरून पुढें चालूं.' असा प्रकार रक्तबंबाळ होईपर्यंत चाले. भाऊराव शिवाय आणखीहि कांही तरूण या राजमान्य पद्धतीनें मथविण्यात येत होते. एकदा पोलिसच्या पहाऱ्यांत बहिर्विधीसाठीं बाहेर पडले असतांना, वाटेंत एक रिकामी विहीर भाऊरावला लागली. विहिरीत पाणी नव्हते. वर खालीं बाजूला काळा कडक फत्तर. क्लेशपूर्ण जीवाचा पूर्णविराम करण्याची ही संधी छान आहे, असा निश्चय करून, पोलीसांची नजर चुकवून, भाऊरावनें हिसक्यासरसे खालीं डोकें करून धाडकन विहीरींत उडी घेतली. कल्पना ही कीं डोके कातळावर हापटून चटकन प्राण जावा! परंतु, वेळ आली तरी काळ आला नव्हता. खालीं डोकें करून उडी मारली, तरी अखेर तळाच्या चिखलावर भाऊराव ढुंगणावरच सुखरूप येऊन आदळला. कोठें कांहीच दुखापत नाहीं. पूर्वी लहानपणी सर्पदंश झाला होता. त्यांतूनहि बचावला. त्यानंतर हा आत्महत्येचा प्रसंग विलक्षण चमत्काराने टळला. पोलीसांनी धामधूम करून आरोपीला वर काढले. मॅजिस्ट्रेट पुढें उभे केले. जबानी घेतली. आत्महत्येचा आरोप ठेवला. दवाखान्यात रवानगी झाली. येथून सुटल्यावरहि पुन्हा कावळ्याचा बंगला आणि शिक्षा आहेच. त्यापेक्षां पुन्हा एकदां या कष्टमय जीवाचा अंत करण्यासाठीं भाऊरावनें तावदानाची कांच फोडून त्याची मूठवर भुकटी खाल्ली. तास दीड झाला तरी कांही परिणाम होई ना, म्हणून वर एक बाटलीभर घ्यासलेट पिऊन टाकलें. पण काहींच परिणाम झाला नाहीं. पुढे, दवाखाना सुटल्यावर न्यायदान होऊन, आत्महत्येच्या प्रयत्नाबद्दल ८ महिन्याची साधी कैदेची शिक्षा ठोठावण्यांत आली. कैद साधा होती, तरी भाऊरावला बिलंद कटवाला दामू जोशाच्याच कोठडींत कोंडण्यांत आलें होतें.

प्रो. लठ्ठे यांना प्रत्यक्ष जरी अटक केली नव्हती, तरी त्यांच्यावर गुप्तपोलीसांची सक्त छाया ठेवण्यात आली होती आणि त्यांच्या टेबलांतून कांही 'राजद्रोही वाङमयहि कोल्हापुरी चित्रगुप्तांनी पैदा करून, त्याचें पुराव्याच्या बरणींत लोणचें घालून ठेवलें होतें. कावळ्याच्या बंगल्यांतून पुराव्याची प्रसूति होतांच लठ्ठ्यांना कड्याबेड्या ठोकण्याची जय्यत तयारी होती. पण पुरावाच तयार होई ना. कित्येक लाळघोट्या प्रतिष्ठित अधिकाऱ्यांनी जेलमध्ये जाऊन भाऊरावला 'सरकार म्हणतात तसे म्हणावे' म्हणून आग्रह केला. वकीलपत्रावरची सही कबूलीपत्रावर उमटविण्याची एका मराठा वकीलानेहि कारवाई केली; पण भाऊरावच्या आईच्या तात्कालिक दक्षतेनें ते पत्रक चुलींत गेलें. महाराजांनी तिला भेटीस बोलावून ''भाऊराव जर योग्य ती जबानी देईल तर तुला पांच हजार रुपये रोख व जमिन देऊं.'' असा गळ घातला. भाऊरावचीच आई ती! तिनें स्पष्ट करारानें उत्तर दिलें ''महाराज, मला चार मुलगे आहेत. त्यातला एक मेला म्हणून समजेन. पण मी खोटे काम करणार नाही, आणि भाऊरावहि करणार नाहीं.'' एक दिवस खास महाराजाकडून समजूत करून पहावी म्हणून पुन्हा भाऊरावला भेटीस नेले. पुष्कळसें व्याख्यान ऐकून घेतल्यावर भाऊरावने एकच उत्तर केलें. ''या जगांत मला आता जर कांहीं

आश्रयाचें व संरक्षणाचें ठिकाण असेल तर तें एकच-मरण. तेवढें आपण द्यावें म्हणजे झाले. मला जास्त बोलण्याची इच्छा नाहीं.''

जोपर्यंत भाऊरावावर निश्चित कांहीं आरोप जाहीर करण्यांत आलेला नव्हता, पोलीशी तपासाचेच फार्स चालत होते, तोंपर्यंत त्यांच्या वडिलांना मित्रांना आणि हितचिंतकांना कांहींच प्रयत्न करतां येई ना. अखेर मुख्य भानगडीचा मुद्दा बाजूस राहून जेव्हां आत्महत्येच्या प्रयत्नाबद्दल शिक्षा झाली, तेव्हा वडिलांनीं अपिल दाखल करण्याची खटपट सुरू केली.

इकडे कोल्हापुरी पोलिसांचे प्रयत्न मात्र बंद पडले नव्हते. त्यांनीं ब्रिटिश सरकारकडून दोन पटाईत गुप्तपोलीस मदतीला बोलावले होते. त्यांपैकीं एकाने भाऊरावच्या सातारच्या रहात्या घरांत राजद्रोही वाङमय पैदा करण्याचा विश्वामित्री घाट घालून, त्या खटपटींत सातारचे त्यावेळचे फौजदार कै. अनंतराव गणेश देशमुख यांच्या सहकार्याची याचना केली. भाऊराव पाटील ही व्यक्ती कोण आहे आणि तिचा सामाजिक दर्जा काय आहे, याची कल्पना सातारचे कलेक्टर मि. ब्रांडन पासून तों थेट एखाद्या अस्पृश्याच्या झोपडीपर्यंत सर्वांना स्पष्ट होती आणि भाऊरावावर उद्भवलेल्या निष्कारण गण्डांतराकडे सर्व काळजीपूर्वक नजर ठेऊन होते. भाऊरावच्या घरांत झडतीमध्यें पैदा करण्यासाठीं आणलेला कोल्हापुरी कोलदांड्याचा बनावट पुरावा देशमुख फौजदाराने प्रथम हस्तगत करून घेतला आणि त्या गुप्तपोलीसांना दम भरला ''या पुराव्याच्या जोरावर मी आतां तुम्हाला अटक करून बेड्या ठोकतो, तुम्ही काय समजलांत? हरामखोर, खोटें पुरावे तयार करता? लाज नाही वाटत तुम्हाला? आत्ताच्या आत्ता साताऱ्याची हद्द सोडून चालते व्हा, नाहींतर तुमच्यावर खटला भरल्याशिवाय सोडणार नाहीं.'' गुप्तपोलिसांना देशमुखांची पायचाटणी करतां करतां पुरे वाट झाली व त्यांनी तात्काल तेथून यःपलायते सजीवति केलें.

हा डाव फसल्यावर दुसरा प्रयत्न झाला. औंध प्रकरणांत प्रसिद्धीस आलेला सातारा जिल्ह्यांतील गणपति मांग याला भाऊराव विरुद्ध कोल्हापुरी राजद्रोहाची साक्ष देण्यासाठीं कोल्हापुरास नेले. त्याला पुष्कळ मथविलें आणि तोहि कबूल झाला. 'भाऊ पाटील' म्हणजे कोण प्राणी, ही त्याला प्रथम कल्पनाच येइना. असेल कोणी गोम्या सोम्या. माझ्या साक्षीनें मेला तर मरेना का. एवढीच त्याची समजूत. प्रत्यक्ष रुजुवात करून जबानी घेण्याची वेळ आली आणि कैदी भाऊराव गणप्या मांगापुढे आणून उभे केलें मात्र, तों त्याला एकदम विलक्षण गंहीवर येऊन त्यानें 'कोण पाटील मास्तर?' म्हणून आरोळी ठोकून भाऊरावच्या पायाला घट्ट मिठी मारली. तो मोठ्याने रडू लागला. कांही केल्या पाय सोडी ना. 'भाऊराव पाटील' म्हणजे मांगवाड्यात येऊन आपल्या मुलाला श्रीगपासून ते इंग्रजी ५ व्या यत्तेपर्यंत मोफत शिक्षण देणारा दीनांचा पुरस्कर्ता 'पाटील मास्तर'! हें पाहून गणप्या मांग ओकसाबोकसी रडूं लागला. तो कडव्या उच्चारांत पोलीसांना म्हणाला ''मला या पाटील मास्तरांच्या विरुद्ध साक्ष द्यायला सांगता काय? माझी मान तोडलीत तरी हा गणप्या मांग ही कसाबाची करणी करणार नाहीं. अरे, ज्यानें माझ्या मांगाच्या पोराला विद्या शिकवून माणुसकी दिली, त्याची मान मी कापू? जातीनें मी मांग आहे. मी पाटील मास्तरशीं बेमान नाहीं होणार.'' जातीवंत मांग सुद्धां जेव्हां पोलीसांपेक्षा विशेष माणुसकी दाखवूं लागला, तेव्हां त्याला आणला तसा परत रवाना केला. ब्रिटिश गुप्तपोलीसांपैकी रा. मडूरकर नांवाचे एक सभ्यवृत्तीचे सब इन्स्पेक्टर होते. त्यांनाहि देशमुख

फौजदाराप्रमाणें खोट्याची फार चीड असें. ते वरचेवर भाऊरावला जेलमध्ये भेटून धीर देत असत. इतकेंच नव्हे तर, असा स्पष्ट इशारा देत कीं ''कोणी वाटेल तें केले तरी खोटें कधीं सांगूं नकोस.''

इकडे भाऊरावचे अपील दाखल झालें. घडलेल्या सर्व प्रकारांचाहि गवगवा बाहेर फुटला. सातारचे कलेक्टर मि. ब्रांडना साहेबहि या प्रकरणाकडे सहानुभूतीनें पाहूं लागले. पोलिटिकल एजन्ट पर्यंत त्याची तक्रार गेली. त्यांनीहि खास चौकशी केली. तेव्हा होत असलेला साराच प्रकार शून्यांतून ब्रम्हांड निर्माण करणारा आहे, असे त्यांना प्रत्यंतर पटले. कैदी भाऊरावची त्यांनी आपल्या बंगल्यावर एकांती भेट घेऊन सर्व खुलासा काढला. त्याचा परिणाम अपीलावर होऊन भाऊराव माफींत सुटले. पण सुटेपर्यंत दीड महिन्याची शिक्षा मात्र भोगली. या अपीलांत सुटतांच, कोल्हापूरच्या पोलिस कमिशनरने नवा तोंडी हुकून काढला कीं डांबर प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत भाऊरावनें कच्च्या कैदेंत राहिलें पाहिजे. हा हुकूम भाऊरावला देऊन त्याला जेलकडे घेऊन जात असताना रेलवेच्या कंपौडांत त्यानें उडी घेतली. ''मी ब्रिटिश हद्दींत उभा आहे. खबरदार माझ्या अंगाला हात लावाल तर.'' इतक्यात रेलवेचा पोलीसहि तेथें आला. त्याला भाऊराव म्हणाले, ''तुला वाटेल तर मला पकड. मी रेलवेच्या किंवा ब्रिटिश पोलिसांच्या ताब्यांत जायला खुषी आहे. माझ्यावर कांहीं आरोप असेल तर ब्रिटिश कोर्टात होईल त्याचा निकाल.'' कोल्हापुरी पोलीस हात चोळीत गेले. रेलवे पोलीसानें विचारपूस करून भाऊरावला सोडून दिले. पुढें लागलेच वडिलांनी कोल्हापुरी कायद्याची भूक शमविण्यासाठीं जामीन दिला व येथेंच हें प्रकरण विझालें. या बाबतींत भाऊरावनें मुंबईगव्हर्नरला एक मोठा विस्तृत तपशिलाचा अर्जहि पाठविला होता. त्याची नक्कल अस्तित्वांत आहे. तब्बल सहा महिनें निष्कारण यमयातना भोगल्यामुळें भाऊरावच्या शरीर प्रकृतीवर एवढा भयंकर परिणाम झाला होता कीं कोणालाहि चटकन् ओळख पटली नाही. पुनर्जन्मच तो!

भाऊरावर निष्कारण आलेल्या या भयंकर गण्डांतराच्या इतिहासावरून वाचकांना पुष्कळ निर्णय काढता येतील. भाऊरावच्या शिलाची कमावणी किती खडतर तपश्चर्येची आहे आणि आज त्यांची जी त्यागी कंटक वृत्ति बनलेली आहे, त्यात जगातल्या कटु अनुभवाचा मसाला किती पडलेला आहे, याचा पुष्कळ उलगडा होतो. या कहाणींत रौद्र बीभत्स करूण आणि वत्सल रस अपरंपार भरले आहेत. जीव गेला तरी खोटें कर्म करणार नाहीं, या वृत्तीनें भाऊरावनीं हे एवढें भयंकर क्लेश ज्या आण्णासाहेब लठ्ठ्यांसाठीं भोगले, त्यांना प्रत्यक्ष त्रास किती झाला आणि डांबर-प्रकरणांत त्यांना हकनाहक लटकविण्यात शाहूमहाराजांचा डाव कोणता होता, इत्यादि माहिती लठ्ठेच सांगतील तेव्हां जगाला कळेल. त्यांनीं शाहूमहाराजांचें चरित्र उत्तम तपशीलांनी कितीहि रंगविले असले, तरी शाहू महाराजांच्या राजधानीने खुद्द आण्णासाहेबांचे चरित्र मात्र फार बहारीच्या कुतुहलानें रंगविलेलें आहें, यात मुळीच शंका नाहीं. एका काळीं ज्यांना राजद्रोहाचा शिक्का ठोकून रसातळाला नेण्यासाठीं ज्या रियासतीच्या राजकारणानें आपले जंगजंग पछाडले व एकदा प्रत्यक्ष अटकहि केली होती, त्याच रियासतीच्या कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् दिवाणगिरीवर त्यांचीच अचानक नेमणूक झालेली पाहून, करणीच्या काळापेक्षा काळाचीच करणी अगाध खरी, असा कोणाच्याहि तोंडून उद्गार निघेल. डांबर प्रकरणांत 'भिंतीचा निर्जिव हंस, त्याने गिळिले हारास' हा चमत्कार स्पष्टच होता. पण पुढें पहावें तों हातपाय तोडलेला विक्रम तेल्याचा घाणा हाकतो काय, दीपराग आळवतांच इलेक्ट्रीसिटीचे बटन दाबल्याप्रमाणें दिवे लागतात

काय, राजकन्येचें लक्ष त्या दीपोत्सवाकडें वेधते काय आणि विक्रमाचा भाग्योदय होतो काय! साराच चमत्कार. ज्या कोल्हापुरांतले सिऐडी एक वेळ आण्णासोहब लठ्ठ्यांवर कडव्या कदरीची टेहळ ठेऊन बसले होते, त्याच कोल्हापुरात तेच लठ्ठे त्याच सिऐडी ऑफीसरांवर दिवाणगिरीच्या करड्या हुकमतीचे कोरडे ओढीत असतांना, त्या पखालीच्या बैलांना काय बरें वाटत असेल? भाग्योदय व्हावा तर तो असा! क्षात्रजगद्गुरूंनी राजाराम महाराज छत्रपतींना वेदोक्त राज्याभिषेक केला. तो विधी संपतांक्षणीच एकट्या आण्णासाहेब लठ्ठ्यांनी पुन्हां उभे राहून आणखी एक कसलासा अभिषेक केला. ही बातमी वृत्तपत्रांत वाचता क्षणीच आम्ही तर्क केला कीं भिंतीच्या निर्जीव हंसाने गिळलेला हार तो 'आज सावकाश उगाळीत' आहे खास. पुढें थोड्याच अवधींत दिवाणगिरीची विचारणा! आण्णासाहेबांचे चरीत्र अशा प्रकारच्या नानाविध कुतुहलांनी रंगलेले पाहून विधिघटनेचे मोटें कौतुक वाटते.

शाहू महाराजांनीं भाऊरावचा एवढा छळ केला कीं त्यातून पुनर्जन्म होणें हा केवळ दैवयोगच मानला पाहिजे. इतकें असून सुद्धां भाऊरावची शाहू महाराजांवरील भक्ति तिळमात्र कमी झालेली नाहीं. ब्राम्हणेतर चळवळ सुरू झाल्यानंतर महाराज भाऊरावला अनेक वेळां भेटले, मसलती केल्या, पण सगळ्या ब्रिटीश हद्दीत. भाऊरावनी कोल्हापुरांत पाऊल ठेवलें नाही. मृत्यूपूर्वी काही दिवस, मिरज स्टेशनवर, सातारा जिल्ह्यांतल्या मागासलेल्या वर्गांत दुय्यम शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी फंड जमविण्याची एक योजना दोघांनी ठरविली होती. ती अशी. महाराजांच्या पदरीं पुष्कळ मल्ल आहेत. ते नुसते पोळांसारखे बसून असतात. महाराजांनी चार पाच जोड्यांचा खर्च चालवून त्या एका कमिटीच्या स्वाधीन कराव्या. लोकांना कुस्त्यांची आवड फार. गांवोगांव टिकीटें लाऊन मल्लांच्या कुस्त्या लढवायच्या आणि तें उत्पन्न शिक्षणप्रसारार्थ लावायचे. तात्पर्य, कोणी कितीहि छळ केला, निंदा केली, घातपात केलें, तरी भाऊराव म्हणतात, ''माझें ध्येयच इतकें उच्च आहे कीं त्यापुढे या लौकीकी गोष्टी विचारांत घ्यायला माझी लहरच लागत नाही. शाहू महाराजांकडे मी दोन दृष्टीनीं पहातों. एक राज्यकर्ते शाहू महाराज व दुसरे दीनोद्धारक राजर्षि. मी दुसऱ्या दृष्टीचा उपासक आहे. पहिल्याबद्दल मी कधिं विचारच करीत नाहीं.''

□□□

स्फुट विचार

पडलों, तरी माझेंच नाक वर!

भट लोकांत चिकाटी हा एक मोठा सद्‌गुण आहे. त्यांतल्यात्यांत टिळकपंथी भटांचा तो तर खास ट्रेडमार्कच आहे. कार्य खरें असो वा खोटें असो, लोकांना आवडो किंवा नावडो, तें एकदां यांनी हातीं घेतलें कीं त्यांचें तुणतुणें तार तुटली तरी ते वाजवीत बसतात. चरवी रिकामी असली तरी 'दूध घ्या हो दूध' म्हणून आरोळ्या ठोकीत दारोदार भटकायला त्यांना कांहींच दिक्कत वाटत नाही. या त्यांच्या विशेष प्रकृतीमुळे देशभक्ति, स्वार्थत्याग, राष्ट्र, राष्ट्रीय शिक्षण इत्यादि शेकडों शब्दांचे अर्थ आज उलटेपालटे होऊन बसले आहेत. असल्या उलट्या काळजाच्या लोकांचीं पावलें उलटी पडली तर त्यांत त्यांना फारसें चमत्करीक कांहींच वाटत नाहीं; परंतु सुलट दृष्टीच्या भोळ्याभाबड्या लोकांची मात्र 'जग चाललें उफराटें । कोण जाणें खरें खोटें' अशी फसगत होते. राष्ट्रीय शिक्षणाच्या दिमाखानें निघालेलें पुण्याचें टिळक महाविद्यालय हें एक वर्तमान भटी चळवळीतील 'सौथ सी बबल' सारखें चव्हाट्यावर फुटलेलें एक भयंकर 'फॅड' आहे, ही गोष्ट आतां जवळजवळ शिळी होत चालली आहे. परंतु भटी प्रवृत्तीच अशी चिकट असते कीं तिला शिळ्या कढीलाहि ऊत आणल्याशिवाय राहवत नाहीं. टिळकांच्या नांवानें निघालेल्या प्रत्येक संस्थेचा आणखी एक विशेष आहे. मरतां मरतां तंगड्या झाडण्याची खोड फार. उदाहरणार्थ 'लोकमान्य' दैनिकच घ्या. याचा प्राण कधीच निघून गेला होता, तरी त्याच्या मढ्यानें थडग्यांत जातां जातां एका हिंदु नृपतीला जिवंत गाडण्याच्या भटी कोटीलिंगार्चनाला हातभार लावल्याशिवाय सोडलें नाहीं.

असहकारितेच्या वणव्यांत शेकडों अल्लड तरूण विद्यार्थ्यांच्या आयुष्क्रमाचा होम झाला, ही गोष्ट आता विद्यार्थ्यांनाहि भयंकर रीतीने पटली आहे. जाणतेपणीं किंवा नेणतेपणीं 'राष्ट्रीय' शिक्षणाच्या चापांत शेपूट साफ तुटल्यामुळें विद्यार्थ्यांना व त्यांना फसविणाऱ्या संस्थांनाहि लांड्या कोल्ह्याच्या सबबीची कांस धरण्यापलीकडे कांहींच गत्यंतर उरलेलें नाही. न्यायकोर्टावर बहिष्कार टाकण्याची 'राष्ट्रीय' मिजास मारणारे एकूणएक वकीलडे पुन्हां पोट जाळण्यासाठीं कचेऱ्यांचे उंबरठे झिजऊ लागले. पण 'राष्ट्रीय' शिक्षणाच्या चापांत शेपट्या तुटलेल्या विद्यार्थ्यांची मात्र कायमची फसगत होऊन बसली. त्यांची वर्षे फुकट गेलीं, अभ्यासक्रमांत भेसळ व ढवळाढवळ झाली, मागले सहचरी पुढें गेले, चारित्र्याची एकतानता बिघडली, आणि यतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः अशा चमत्कारीक स्थितींत त्यांचा कोंडमारा झाला. धड ना पक्का धड ना

कच्चा अशा या भोपळ्यांना जगांत काय बाजारभाव येणार? देशभक्तांचा झाला खेळ आणि तरुणांचें झालें वाटोळे!

पण टिळक महाविद्यालयवाल्यांना हें 'वाटोळें' अझून चौकोनीच दिसत आहे. त्यांनी आपल्या त्रैमासिकांत (वर्ष ३ रें, अंक ३-४, माघ १८४७) विद्यालयांतील ३८ 'पदवीधरांचा परिचय' प्रसिद्ध करून, त्यांच्या कर्तबगारीचे व महाविद्यालयाच्या उपयुक्ततेचे पोवाडे गायले आहेत. अशा प्रकारचा उपद्व्याप न करतां, त्यांनीं आपली झाकली मूठ तशीच धरली असती, तर फार बरें झालें असते. हे सगळे विद्यार्थी टि.म.वि. चे 'वाङमयविशारद' बनल्यावर त्यांनी व्यवहारात काय काय पराक्रम गाजविले, याचा हा नांवनिशीवार पाढा वाचून, कौतुक वाटण्याऐवजी कोणालाहि त्यांची कींवच येईल. ७-८ जण विद्यालयांतच काम करीत राहिले; कोणी आचार्य, कोणी वैद्य, कोणी स्थापत्यविशारद, कोणी हिशोबे, कोणी व्यापारशास्त्री इत्यादि. एकजण प्राज्ञपाठशाळेला मिळाले. ५-६ जण किर्लोस्करांच्या कारखान्यांत गेले. एकानें कागदी पाकीटांचा (प्रचंड?) धंदा चालविला. कोणी वर्तमानपत्रें चालविली आहेत. दोघांनी 'कॉमर्स'चे क्लास उघडले. एक एका छापखान्यात पोट भरतो. एक किर्लोस्कर पंपाची एजंटी करतो. बऱ्याच जणांनी 'अराष्ट्रीय' पदव्या मिळवून झालेली चूक सुधारली आहे. एक आपल्या बापाच्या ग्रंथप्रकाशनाचा धंदा करतो. असे नाना प्रकार पाहून टि. म. वि. नें हा सवत्या सुभ्याचा सोंवळा कारभार काढून विशेष अलौकिक काय केलें, हें त्यांनीच सांगितलेलें बरें. हे ३८ लोक 'वाङमयविशारद' झाले नसते, तर काय उपाशी मेले असते? ते करूं लागलेले धंदे करायला टि.म.वी. ची पदवीच कशाला? वसंतराव कर्णिक हा उमदा तरूण 'अराष्ट्रीय' शिक्षणातल्या हायकोर्ट वकीलीच्या परीक्षेत पहिला आला व त्याला 'मकलौड प्राईझ' मिळालें, ही काय त्या टि.म.वी.च्या 'वाङमयविशारद' पदवीची पुण्याई? सारांश, या 'पदवीधरांच्या परिचया' वरून इतकाच निष्कर्ष निघतो कीं टि.म.वि., त्याचा शिक्षणक्रम आणि त्यांच्या पदव्या हीं नुसती ढोंगें आहेत. जगाच्या बाजारांत हा माल खपणें कठीण आहे. टि.म.वी. च्या चापांत शेपट्या तुटलेल्या तरुणांनी बनेल तसा आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविला आहे. त्यात मोठेसे काही अलौकिकत्व नाही. त्यात इंग्रेजी 'अराष्ट्रीय' शिक्षणापेक्षा विशेष अघटित घटना कांहीच नाहीं. विशेषतः टि.म.वी. नें टिऱ्या पिटण्याइतकें या परिचयांत विशेष लोकमान्यत्व काहींच नाहीं. मोठमोठ्या शाखांची नांवे घेतली म्हणजे लोक भुलतील ही कल्पना साफ चुकीची आहे. म्हणे, 'आमच्या टि.म.वि. च्या स्थापत्य शाखेचे अमूकतमूक प्रमुख आहेत.' कर्माचे तुमच्या स्थापत्य! विद्यालयाचीच इमारत बांधली, ती धड ना देऊळ, धड ना मशिद, धड ना चर्च! हेच तुमचे स्थापत्यप्राविण्य ना? आणि तुमच्या स्थापत्यविशारदाला जगानें ठेवावें तरी कोठें? आपलें हें पुणेरी 'भुलभुलय्याचें दुकान' बंद कराल, तर मूर्ख विद्यार्थ्यांवर फार मेहेरबानी होईल.

जनहिताच्या कळकळीचा पावसाळा

मुंबई कौन्सिलच्या अखेरच्या बैठका पुऱ्या झाल्या. त्रैवार्षिक लळीत आटोपलें आणि त्यांत भाग घेणाऱ्या सर्व महाभाग नटांना नेक नामदार इलाखाधिपतीच्या खास नजरेखालीं पंचारती होऊन 'गुड

बाय' चा सुंठवडा वाटण्यांत आला. कौन्सिल हॉलातली जाजमें सतरंज्या खुर्च्या ठेवले आता जी गुंडाळण्यांत आलीं, तीं नवीन निवडणूक होऊन त्यात नवजन्म किंवा पुनर्जन्म होऊन निपजणाऱ्या कोणशीलदारांच्या बूट पायतण जोड्यांचें आगतस्वागत करायला पुन्हा साफसूफ झाडून पसरण्यात येतील. आतां जनहिताच्या कळवळ्यानें प्रत्येक नवाजुना उमेदवार अगदीं ऊरफोडीपर्यंत आलेला दिसेल. या हंगामांत आत्मस्तुति नखरेबाज बुरख्यांत चव्हाट्यावर जरी नाचली तरी तिच्या पातिव्रत्याबद्दल कोणाला संशय यायचा नाहीं. हिंदुस्थानांत-विशेषतः महाराष्ट्रांत राजकार्य-धुरंधर, राजकारणपटू, जनहितदक्ष, कर्तबगार नरपुंगव किती व कोणकोण आहेत आणि त्यांनी आपल्या जिवाचें नांव शिवा ठेऊन, लोकांसाठी, स्वराज्यासाठीं, स्वातंत्र्यासाठीं, उन्नतीसाठीं, पक्षासाठीं, पार्टीसाठी आपण स्वतःस चंदनाच्या खोडाप्रमाणे किती झिजऊन घेतलें, हे याच हंगामात पाहून घ्यावे. मोटारच्या स्प्रिंगच्या गादीबाज आचक्यादचक्यांत डुलत उडत, आपल्याच कुर्त्यांत बेगुमान भराऱ्या मारणाऱ्या गर्भदर्भश्रीमंत लोकांना आता गरीब रयतेचा एवढा जिव्हाळा फुटेल, कीं ठिकठिकाणी मोटारी मुद्दाम उभ्या करून घोंगडीवाल्या शेतकऱ्यांशीहि शेतांच्या बांदावर बसून ते गुजगोष्टी सांगतील. एरवीं आपापल्या बंगल्यांच्या छपरावर बसणारे बडे लोक कौन्सिल समाप्तीचे घडे फुटल्यावर, नवीन निवडणुकीचें रडें रडायला रस्त्यावरील खडे सुद्धां कपाळाशीं घासतांना आतां दिसतील. आता जनकल्याणाच्या उमाळ्याचे वक्तृत्व-धबधबे गांवोगांव खेडोंपाडीं इतके कोसळतील कीं गेल्या तीन वर्षात बेदरकारीचे सांचलेले धुळीचे डोंगर पार धुवून जाऊन जुन्यापान्या ओळखीचे खडक सर्वत्र संशोधन होऊन बाहेर पडतील. माणुसकीला आणि मित्रप्रेमाला याच हंगामांत भरपूर भरघोस किंमत येते. छापखानेवाल्यांची आणि पोस्टखात्याची पोळी पिकते, पण पोस्टमनाची झोळी उतास जाईपर्यंत भरल्यामुळें त्याला नोकरी म्हणजे सुळाची पोळी वाटते. माणसांतल्या सुरवंटांचा आताच सुळसुळाट व्हायचा. उमेदवारांची भपकेबाज चरित्रें गाणारे भाट याच दिवसांत खेडोंपाडीं आपापले नंदीबैल घेऊन गुब्बुगुबू करीत फिरायचे. उमेदवाराची उमेद कायम ठेवून त्याच्या भोंक पडलेल्या किंवा पाडलेल्या खिशांतून बिनतक्रार वहाणाऱ्या गंगौघानें आपापली घरें भरून ठेवणारे सुरवंट सरवंटा पेक्षांहि विशेष कसोशीनें दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करून श्रमतांना आताच पाहून घ्यावे. खेडवळ शेतकरी कोथिंबीर हरभऱ्याच्या पिकवर्णीत कितीहि तरबेज असला, तरी कोथिंबिरीच्या शिडीनें हरभऱ्याच्या झाडावर चढण्याची जिव्हाळ्याची शिकवण तीन वर्षातून एकदां त्याला याच हंगामांत मिळायची. महार मांगादि अस्पृश्यांना धडाक्यानें धांवत जाऊन कवटाळण्याचा देशबंधूपणा, इतकेंच नव्हे तर खास महारवाड्यांत जाऊन स्वतःच्या पंक्तीला त्यांना पंक्तिपावन करण्याचा चित्तपावनपणा याच दिवसांत दिसायचा. पार्टीचें प्रेम, पक्षाची संघटना, क्रीडची चिकाटी, संघशक्तीचा प्रसार, देणग्यांचा धूमधडाका, खेड्यापाड्यांतील स्थानिक अडचणींची काळीजतोडी विवंचना, इत्यादि इत्यादि वगैरे वगैरे सर्व भानगडी या वेळी प्रत्येक उमेदवाराच्या मेंदूत रसरसत असतात. ठिकठिकाणच्या उमेदवारांचे जाहीरनामे एकत्र करून वाचणें हें सुद्धां मोठें मनोरंजक कर्म आहे. कोणी म्हणतो मी कौन्सिलांत एकहि दिवस गैरहजर राहिलों नाही. दुसरा म्हणतो कीं अमक्या तमक्या बिलाच्या वेळीं मी हात वर केला म्हणून तें पास झालें. तिसरा म्हणतो मी कौन्सिलांत सतराशे पावणे आठ प्रश्न विचारले. चवथा म्हणतो मी एकंदर साडेसात कमेट्यावर मेंबर होतो. पांचवा म्हणतो कीं मी त्या फलाण्या कमिशनपुढें साक्ष दिली. सहावा सांगतो मी शेतकऱ्यांबद्दलच्या

कळवळ्यानें इतका दाटलों कीं उभ्या तीन वर्षांत माझी दातखिळी उघडली नाहीं. असे शेकडों प्रकार आहेत. कित्येक धूर्त असल्या कागदी घोड्यांवर बसून मतदारांची शिकार करण्याऐवजीं थेट त्यांच्या काळजाच्या घडालाच हात घालतात. ते घरोघर जाऊन म्हणतात ''का रंगराव पाटील, अहो तुम्ही आणि मी काय तीन आहोत? असे वाचकूं नका. मी तुमचाच आहे. तुमची मिशी ती माझी मिशी. तुमच्या पोटरीचेच हाड माझ्या पोटरींत आहे. तुमच्याच रक्तावर मी जगत आहे. तुम्ही खावें आणि मी ढेकर द्यावा. तुम्ही मत द्यावे आणि मी कोणाशीलदार व्हावें. तुमचे वडील आम्ही बापासारखे मानले होते. इ. इ.'' कांहीं उमेदवार तर असे बहाद्दर असतात कीं त्यांच्या सुरवंटांची सर्वंटी नरवंटीप्रमाणे पोकळ ठरूं लागली तर शेवटचा शिलकी बाण म्हणून गांवोगांव बोकडांची कंदुरी आणि बेवड्याच्या बाटल्यांची सरबत्ती सोडून इलेकशनबत्तीची रोषनाई उडवितात. एखाद्या गांवचा म्होरक्या 'व्हट्टासाठीं भट्टावानी लयी अडून बस्ला' तर त्याला वठणीवर आणायला प्रथम टिळक किंवा शाहूमहाराजांच्या नावाचा मंत्रोपचार करण्यांत येतो. नंतर शंखभगिनीचा प्रयोग होतो. तेथेहि तो ताटला तर त्याच्या बोकांडी एक भरभक्कम वकील किंवा सावकार बसविला की काम फत्ते. सारांश, इलेकशन म्हणजे एक मोठें जंतरमंतर आहे खरें!

कोणशीलदारी म्हणजे धनाढ्यांची कायम मिरास

सरकारनें दयाळूपणानें अथवा पायाळूपणानें कौंसिल व असेंब्लीपुरते स्वयंनिर्णयाचे केवढेहि हक्क जनतेला दिलेले असले, तरी त्यांचा भरपूर उपयोग करून घेण्याची यंत्रे म्हणजे कोणशीलदारच. वरवर पहाणाराला हीं कोणशीलदारी जरी मतदारांच्या मतांच्या पुण्याईवर अवलंबून असलेली दिसली, आणि ती खरोखरच तशी असावी म्हणून सरकारी कायद्यानें कितीहि कडेकोट काटेरी कुंपणाचा बंदोबस्त केलेला असला, तरी पडद्यामागें इतके चमत्कारीक प्रकार घडत असतात कीं निवडणुकीच्या फंदात गडगंज धनाढ्याशिवाय दुसरा कोणी शहाणा पडूंच इच्छीत नाहीं. त्याला ते शक्यच नाही. यदाकदाचित केवळ आपल्या बुद्धिमत्तेवर व कर्तबगारीवर विश्वासून तो या इलेकशनी घोड्यांच्या शर्यतीत पाऊल ठेवील, तर सर्वस्वाला मुकून अन्नाला मोताद होईल. इलेकशन कोणाचें? ज्याच्या जवळ मुबलक पैसा त्याचें. आणि पैशाची ऊब असली म्हणजे सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते. गाढवांवर सुद्धां घोड्यांचे जीन चढून त्यांच्या पूर्वजाचा धागा अरबस्थानापर्यंत पोहचतों. अर्थात् धनाढ्यता हीच कोणशीलदारीची मूळमाया असल्यामुळें कौन्सिले व असेंब्ली म्हणजे ठरावीक धनाढ्यांच्या त्रैवार्षिक वारीची बिनचूक ठिकाणें होऊन बसलीं आहेत. हे धनाढ्य वारकरी मेल्याशिवाय इलेक्शनी चुलीवर इतर कोणाचीहि डाळ शिजणेंच शक्य नाही. दर इलेक्शनला तेच न् तेच उमेदवार निवडून येऊ लागले म्हणजे त्यांत जनहितापेक्षां स्वतःच्या बडेजावीची व श्रीमंती विरंगुळ्याचीच कल्पना अधिक बळावते आणि रयत मात्र आपल्या हक्काला सफाई मुकते. दुसराहि एक विचार उद्‌भवतो. प्रत्येक जिल्ह्यानें दर खेपेस तेच न् तेच उमेदवार निवडले, तर त्या जिल्ह्यांत त्यांच्याशिवाय इतर प्राणी म्हणजे नुसती भरताड लोकसंख्या

आहे कीं काय? हे ठरावीक वारकरी काय ते जिल्ह्याचे लायक प्रतिनिधी; इतर सगळे जिवंत लोक नालायक कीं काय? उद्यां हे ठरावीक वारकरी मेले म्हणजे तो जिल्हा काय करणार? हात जोडून स्वस्थ बसणार, का नाईलाज म्हणून नालायकांची कौन्सिलांत मोट बांधणार? आज जर दोन दोन तीन तीन निवडणुकीला ठरावीक झब्बूं शिवाय विशेष लायक प्रतिनिधी न प्रसविण्याइतकी जिल्ह्याची कूसच वांझोटी मानली, तर त्या वारकऱ्यांनीं उद्यां राम म्हणतांच झटकन् लायक नायकांची शीघ्र प्रसूति जिल्हा करणार कीं काय? या प्रश्नांचा प्रत्येक समंजस मतदारानें नीट काळजीपूर्वक विचार करून मिरासदार वारकऱ्यांच्या सुरवंटी प्रयत्नांना, द्रव्याच्या मोहाला, वकीली किंवा सावकारी धाकदपटशाला, गुळचट भाषणांना, मटण बेवड्याच्या मेजवान्यांना, काळ्यागोऱ्या वशिल्याला भीक न घालतां, त्यांना कायमची विश्रांति द्यावी आणि चौकसपणानें आपल्या जिल्ह्यांतील महत्वाकांक्षी बुद्धीवान कर्तबगार अशा तरुण उमेदवारांना सर्वतोपरी सहाय देऊन त्यांच्या जनसेवेची अगत्य परीक्षा पहावी. सरकारी कामदार, देवळांतला भट आणि कौन्सिलांतला ठरावीक वारकरी एकाच जागी बराच काळ राहिला म्हणजे तो काळच बनतो, हा त्रिकालबाधित सिद्धांत विसरणें, म्हणजे आपल्या हातानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखें आहे.

इलेकशनी जंतरमंतर?

रयतेच्या अशिक्षितपणाचा फायदा सरकार घेते आणि आपल्या तुंबड्या भरते, असा एक ठरावीक आरोप नेहमीं सरकारवर करण्यांत येतो. बोलून चालून सरकार पडलें परकी. तेव्हां वस्तुस्थिती कांहीहि असली तरी हा आरोप खरा मानण्याकडें पुष्कळांची प्रवृत्ति ओढ घेते. या पापाचा प्रतिकार कसा करावा? तर शिक्षणप्रसार झपाट्यानें केला पाहिजे. सरकारनें हें त व सक्रीय कबूल करून, शिक्षणखातेच लोकांच्या पदरांत टाकलें. पहिलें शिक्षणमंत्री डॉ. परांजपे. जातीनें भट. तेव्हां नावडतीचे हे आळणी मीठ दुसऱ्या निवडणुकींत बदलून त्या ऐवजी 'हाडारक्तामासाचें' जाधवरावांचें अस्सल खारटं मीठ आले. ब्राम्हणेतरांना-म्हणजेच मराठ्यांना-स्वर्ग अगदीं दोन बोटे उरला. त्यांची तीन वर्षांची कारकीर्द नुकतीच भरतवाक्यांत आली. त्यातूनच पुढील निवडणुकीची नांदी निपजण्यासाठी जाधवरावनीं एकदम आपला शिक्षणमंत्रीपणाचा खास दौरा सातारा जिल्ह्यांत काढून, एकाच धोंड्यानें शिक्षणप्रगतीची तपासणी आणि त्यातल्यात्यात पुढील निवडणुकीची विचारपुसणी असे दोन पक्षी मारण्याची कुशल मुत्सद्देगिरी दाखविली. दिवाणांचे दौरे ही काय चीज आहे आणि त्यांच्या तपासण्या ही काय मौज असते, हे सर्वांना माहीतच आहे. मात्र त्यापायीं होणारा खर्च वाजवी का गैरवाजवी याचा खुलासा सरकारजवळ मागण्याचा एकाहि कोणशीलदाराला धीर होत नाहीं, यातच या सर्व दौरानाटकाचें मर्म आहे. पानसुपाऱ्या, मानपत्रें, हारतुरे, अभिनंदन, नंतर दिवाणांचे थोडें ठरावीक साच्याचे भाषण, काही लोकांच्या भेटी, त्यांनाहि ठरावीक साच्याची मितशब्दी उत्तरें, यापलीकडे या दौऱ्यांत आणि तपासण्यांत विशेष काय असतें, तें सरकारनेंच सांगावें म्हणजे झाले.

नाम. जाधव सातारा जिल्ह्यातर्फे कोणशीलदारी करिता पुन्हा उभे राहणार असल्याचें जाहीर झाले आहे. याच धोरणानें त्यांचा जो नुकतांच त्या जिल्ह्यांत दौरा झाला, त्यावेळीं सातारा शहरीं १७ जुलई रोजीं दैवज्ञ समाजातर्फे त्यांना पानसुपारी करण्यांत आली. त्याचा वृत्तांत राष्ट्रवीर ता. ३ आगष्ट १९२६ च्या अंकात आला आहे. त्यात शंकरशेट क्लबचे सेक्रेटरी श्री. शामराव मिर्लेकर यांनी 'शिक्षणमंत्र्यांची ओळख करून देतांना' (जणू काय जाधवरावना सातारा अपरिचितच) त्यांच्या कारकीर्दीचें खालीलप्रमाणे रसभरीत वर्णन केले आहेः-

''नामदारसाहेबांचे आमदानींत ज्या अनेक महत्वाच्या उपयुक्त गोष्टी घडून आल्या त्यापैकीं सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास करून घेण्याच्या कामी व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे कामी अत्यंत चिकाटीचे प्रयत्न केले. बहुजन समाजांतील शिक्षणांत मागासलेल्या सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना दुय्यम व उच्च प्रतीचे शिक्षण सुलभ होण्याकरितां सरकार कडून स्कॉलरशिपांकरितां सुमारे एक लाख रुपये दरसाल मिळणेची मंजुरी मिळवून घेतली. ट्रेनिंग स्कूल्स व कॉलेजे यामध्यें सर्व जातींच्या विद्यार्थ्यांचा प्रवेश होईल असें केले. प्राथमिक शिक्षणाचे प्रसाराकरितां सातारा जिल्ह्यांत जास्त शाळा उघडण्याकरितां केलेला प्रयत्न अत्यंत प्रशंसनीय आहे. यांचे कारकीर्दीत या जिल्ह्यांत सुमारें ३०० शाळा नवीन स्थापन झाल्या व २१६ शिक्षक नवीन नेमिले. युनिव्हर्सिटीच्या सेनेटमध्ये मागासलेल्यांना मेंबर या नात्याने आत शिरण्याचा यत्न या पूर्वी झालेला नव्हता, तो यांनी यशस्वी केला. मागासलेल्यांना सरकारी उच्च प्रतीच्या नोकऱ्या व प्रत्येक खात्यांत शेकडा ५० जागा मिळाव्यात असा यशस्वी प्रयत्न यांनीच केला. पुण्याचे शिवाजी हायस्कूलचे इमारतफंडास एक मोठी रक्कम मंजूर केली. वगैरे राजकीय, शैक्षणिक व सामाजिक कामगिरीच्या योगाने आपल्या मागासलेल्या समाजाची सर्वांगीण उन्नति झाली आहे.''

श्री. मिर्लेकरांनी ही आश्चर्यकारक माहिती मिळवली तरी कोठून? ते दैवज्ञ असले तरी 'दैवज्ञ' कधीं झाले? बोलायचें म्हणूनच कांहींतरी बोलले, का कोणी झब्बूनें बोलायला भाग पाडले? ''आपल्या मागासलेल्या समाजाची सर्वांगीण उन्नति झाली आहे.'' झालें तर मग. आतां व्हायचें काय राहिलें? 'सरकारनें दैवज्ञ समाजाला पुढारलेल्या सदरांत घातल्यामुळें आमचें फार नुकसान होत आहे' असे उद्‌गार काढणाऱ्या श्री. मिर्लेकरांनीं दुसऱ्याच वाक्यांत सर्वांगीण उन्नति झाली' असा ठासून अभिप्राय द्यावा, हें कोडें अझून तरी आम्हांला उलगडत नाहीं. या कोड्याप्रमाणेच ना. जाधवरावांच्या कारकीर्दीचा श्री. मिर्लेकरांनी श्रोत्यांपुढे मांडलेला आणि खुद्द जाधवरावनीं निमूटपणें ऐकून घेतलेला आढावा म्हणजे आम्हाला तर इलेकशनी जंतरमंतरच वाटतें. सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा काय नाम. जाधवरावनीं पास करून घेतला? मुन्सिपालट्यांना प्रा. शिक्षण मोफत करण्याची परवानगी १९१८ सालीच कायद्यानें दिली. यांत जाधवरावचा काय संबंध? प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याप्रमाणें सर्व डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डांना शिक्षणप्रसाराचे अधिकार मिळाले, ते डॉ. परांजप्यांच्या कारकीर्दीत. जाधवरावनें काय केलें? बरें, जाधवरावनीं 'प्रत्यक्ष अंमलबजावणी' केली म्हणावी तर अझून कित्येक डि. लो. बोर्डांनी त्या अधिकारांचा स्वीकार का केला नाही? एवढें मोठें पुण्याचे डि. लो. बोर्ड, पण तेथेहि मोफत प्राथमिक शिक्षणाची बोंब कां? पण खरे म्हटले तर या बाबतीत सरकारच्याच हाती काय राहिलें आहे, तर त्यांच्या दिवाणानीं 'प्रत्यक्ष अंमलबजावणी'ची पुण्याई मिरवावी? उलट, सरकारी धोरणाचेच अनेक अडथळे डि. लो. बोर्डाच्या मार्गात अडथळे आणीत आहेत, म्हणूनच त्यांना

मिळालेल्या अधिकाराचा उपयोग करायला जड जात आहे. या बाबतींत ना. जाधवरावनी काय केले आहे? स्कॉलरशिपाबद्दल असेंच आहे. त्या तर डॉ. परांजप्यांनीच तयार केल्या; फक्त वाटणीचें पुण्य जाधवरावला द्यायचें तर खुशाल द्या. तेंहि काम डायरेक्टर ऑफ पब्लिक इंस्ट्रक्शनच्याच हाती असते; दिवाणाची तेथे फारशी लुडबूडच नसते. डॉ. परांजप्यांच्या कारकीर्दीतच ट्रेनिंग स्कूल्स व कॉलेजांत सर्व जातींच्या मुलांचा भरणा झाला. आणि पूर्वी तरी मज्जाव होता कधी? 'पुण्याचे शिवाजी हायस्कूलचे इमारतफंडास एक मोठी रक्कम मंजूर केली.' केली. पण त्यांत ना. शिक्षणमंत्र्यांचा संबंध काय? असल्या कामांकरिता सरकारची ठरीव ग्रँटच असते आणि तिचा बटवडा करण्याचे काम डायरेक्टरच्या हाती असते. तो अधिकार डायरेक्टरचा, शिक्षणमंत्र्याचा नव्हे. या ग्रँटमधून युरपियन लोक आपापल्या शाळांच्या इमारतीकरतां दरसाल जितका पैसा मागून नेतात, त्याच्या पावपट तरी हिंदी शाळांच्या नशिबीं लागतो काय? द्यावें. याचें नाम. जाधवरावनीच उत्तर द्यावें. आणखी काय? तर म्हणे ''यांच्या कारकीर्दीत या (सातारा) जिल्ह्यांत सुमारे ३०० शाळा नवीन स्थापन झाल्या व २१६ शिक्षक नवीन नेमले.'' पण त्याचे श्रेय जाधवरावच्या कारकीर्दीला, का सातारच्या डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाला? या बोर्डाने *चा लोकल फंड * वाढवूनच शिक्षणप्रसाराची ही प्रगती केली. शाळा किंवा शिक्षक वाढविणे हा अधिकार डि. लो. बोर्डाचा आहे. लोकलबोर्ड फंडाचा आणि प्रॉविनशियल फंडाचाच जर अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं, तर सातारा जिल्ह्यांतल्या शिक्षणविषयक प्रगतीचा तुरा श्री. मिर्लेकर जाधवरावांच्या मंदीलावर कोणत्या तोंडाने लावतात? का आपले मुखमस्तीति वक्तव्यं? तीन वर्षांपूर्वी रा. जोशी सातारा डि. लो. बोर्डाचे प्रेसिडेंट असतांना *चा लोकलफंड * केला. त्या ठरावाला रा. व. काळे यांनी अनुमति दिली. एवढ्याच कारणाने त्यांच्याविरुद्ध मागल्या इलेकशनी हंगामांत जाधव-कूपर कंपूतून निषेधाचें एक हॅन्डबिल साऱ्या जिल्हाभर वाटण्यात आलें होतें. त्याचा आणि शिक्षणप्रसाराच्या जाधवरावी श्रेयाचा ताळमेळ घालणें फार कठीण आहे.

वाचक म्हणतील कीं एका पानसुपारीच्या तोंडपुज्या प्रसंगीं एका तोंडपुज्याने ना. जाधवांची जरा थोडी फाजील स्तुति ती केली काय, त्याचा रिपोर्ट विश्वसनीय मानून, तुम्ही त्यावर टीका करता काय. खुद्द ना. जाधवराव असें कांहीं कोठें बोलले आहेत काय? ते विद्वान आहेत, धोरणी आहेत, ब्राम्हणेतर आहेत, सत्यशोधक आहेत, लेखक आहेत, वक्ते आहेत, मुत्सद्दी आहेत, दिवाण आहेत, आणि आता पुढच्या कौन्सिलच्या उमेदवारीच्या गर्दीत आहेत. ते असे कांहीं भलत्याच गोष्टी बरळणारे नव्हते. तीन वर्षांच्या दिवाणगिरींत आपण काय दिग्विजय लावला हें त्यांना जसें पूर्ण माहीत, तसें ते इतरांना काय कळणार? जोडा कोठें चावतो हें ज्याचें त्यालाच चांगलें कळतें. सातारा जिल्ह्यातल्या शिक्षणप्रसाराविषयीं त्यांनी कोठें असे उद्गार काढले आहेत ते दाखवा. एखादा पोरसवदा मिर्लेकर कांहीतरी बरळत सुटला म्हणून नाम. जाधवरावासारख्या विद्यमान महात्म्यावर टीका कां?

खरी गोष्ट. पुरावा द्यायचाच तर तो ना. जाधवांच्या भाषणाचाहि देणें सुरक्षित नाहीं. कारण त्यांची पगडीपालट इतकी जबरदस्त आहे कीं 'मी असें बोललोंच नाहीं.' किंवा 'माझ्या बोलण्याचा तसा मुळीं अर्थच होत नाहीं.' असें म्हणून ते चटकन् निसटतात. मद्रास येथें त्यांनी केलेल्या भाषणाचा कौन्सिली

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द नाही.

गोंधळ वाचकांच्या स्मरणांत ताजाच आहे. यासाठी लेखी अस्सल दस्तऐवजीच पुरावा पाहिजे.

हा घ्या दस्तऐवजी पुरावा

रा. रा.....

स्नेहांकित भास्करराव जाधव कृतानेक रामराम विनंती विज्ञापना. गेल्या सन १९२३ सालच्या निवडणुकीच्या वेळीं आपण माझा अभिमान धरून मला मतें दिलीं व दुसऱ्याकडूनही देवविलीं सातारा जिल्ह्यातील ब्राम्हणेतर विशेषत: मराठे मतदारांच्या जोरावर मी निवडून आलों. याचें बरेचसें श्रेय आपणासारख्यांकडे आहे. यापुढें काऊन्सिलांत व मिनिस्टरेचे जागीं काम करतांना सातारा जिल्ह्याचा अभिमान धरून कामगारी केली आहे हें आपल्या ध्यानीं आहेच. सातारा जिल्ह्यांत ३६० नवीन शाळा व ३०० नवीन मास्तर नेमल्यानें १५००० वर मुलांची शिक्षणाची सोय झाली आहे. अशी सोय दुसऱ्या कोणत्याही जिल्हाबोर्डाला करितां आली नाहीं. यावरूनच आपणांस माझ्या कामगारीची कल्पना होईल.

आपल्या जिल्ह्यातर्फे पुन्हा राहावें असें कांहीं पुढारी म्हणत आहेत या संबंधानें आपलें मत काय आहें तें मला कळविण्याची कृपा करावी. आपल्यासारख्यांच्या मदतीचें आश्वासन मिळाल्यास निवडणुकीस उभा राहण्याची माझी इच्छा आहे. आपली कृपा पूर्वीसारखीच आहे व आपण मन:पूर्वक मदत कराल या आशेवर हें पत्र लिहित आहे तरी पत्रोत्तरीं योग्य तें आश्वासन मिळावें अशी विनंती आहे.

आपल्या तालुक्यांतील प्रमुख प्रमुख मंडळीस अशींच विनंतिपत्रें पाठिवणें आहेत पण त्यांचीं नावें आठवत नाहींत. यासाठी आपणांस तसदी देत आहे. प्रमुख मंडळीचीं नावेंही कळविण्यात कृपा व्हावी. कळावें बहुत काय लिहिणें लोभाची वृद्धी व्हावी हे विनंती.

आपला
भास्करराव जाधव

अस्सल पत्राची ही नक्कल आहे. मूळपत्र सरकारी शिक्क्याच्या नोटपेपरवर सरक्युलर प्रमाणें लिहिलें असून जाड अक्षरें स्वत: ना. जाधवरावांनी लिहिलेली आहेत. पत्रावर तारीख नांहीं, तरी तें सातारा दौऱ्यानंतर लागलीच रवाना झालेलें आहे. ज्याला हें पाठविलें त्यांचे नांव तिसऱ्याच कोणाच्या हस्ताक्षरांत आहे. हें नांव आम्हीं गाळलें आहे. असलीं शिक्केबाज सरक्युलर पत्रें निरनिराळ्या अनेक लोकांना गेलेली असावी, यांत मुळींच संशय नाहीं. सरकारी शिक्क्याच्या कागदावर पत्रें गेली किंवा जातात, तेव्हां ना. जाधव ती शिक्षणमंत्री म्हणून पाठवितात का उमेदवार नात्यानें पाठवितात, हा प्रश्न सरकारी शिस्तीचा आहे. त्याची आम्हांला जरूर नाहीं. एवढें मात्र खरें कीं तांबडा पट्टा खांद्यावर टाकलेला शिपाई पुढें चालत असला म्हणजे त्याच्या मागोमाग चालणाऱ्या माणसाच्या कसल्या तरी सरकारी अलधिकाराचा लोकांना बाऊ वाटतो; तद्वतच सातारा जिल्ह्यांतील मतदारांच्या किंवा त्यांच्या

नायकांच्या मनावर या शिक्केबाज पत्रानें कांहींतरी अजब परिणाम घडविण्याची ना. जाधवांची ही शक्कल असल्यास नकळे. अज्ञानी लोक! शिक्का पाहूनच गार व्हायचे. पत्रावरच सरकारी शिक्का, मग आंतील मजकूर तरी कसा पडेल फिक्का?

नाम. जाधवरावनी केले तरी काय?

हाच प्रश्न सध्यां महत्वाचा आहे आणि त्याचा खुलासा खुद्द जाधवरावानींच जाहीर रीतीनें करून आपल्या मतदारांची व महाराष्ट्रीय जनतेची खात्री पटविणें प्राप्त आहे. वरच्या सारखी खाजगी पत्रें पाठवून कौन्सिल कामाचा ओ का ठो न जाणणाऱ्या मतदारांना उगाच भरंसाठ गप्पांनी भुरळ घालणें, म्हणजे शुद्ध फसवणूक होय. तिगस्त सालच्या प्रथम निवडणुकीच्या वेळी जाधवरावानीं सातारा जिल्ह्यांतल्या मराठा मतदारांना काही भरंसाट तोंडीं अभिवचनें दिली होती आणि त्या वचनांवर विश्वसून मतदारांनीं त्यांना भरपूर पाठिंबाहि दिला. तीं वचनेंच अशां स्वरूपाचीं होती कीं तीं फक्त जाधवरावानींच घ्यावी आणि भोळ्या रयतेनें मान डोलाऊन ऐकावी. या पलीकडे त्यांत विशेष तथ्य कांहींच नव्हतें. आपली निवडणूक यशस्वी करण्यासाठीं जाधवरावानीं सातारा जिल्ह्यांत केलेल्या तोंडी लेखी धडपडी सर्वश्रुतच आहेत. 'मराठा मराठेतर' भेदाचा उघडमाथ्याचा झेंडा जाधवरावानींच प्रथम त्या वेळीं उभारून, आपल्या ब्राम्हणेतरी तत्वनिष्ठेचें नागडें उघडें प्रदर्शन केलें. (पहा, प्रबोधन वर्ष ३ रें, अकं ५ वा, १६-१२-१९२३, पृ.७७) त्या वेळीं केवळ निवडणुकींतून निसटण्यासाठी जाधवरावानीं दिलेली भरंसाट वचनें आज कितपत सफळ झाली, हा प्रश्न वचनें देणारे व घेणारे खुशाल पाहून घेतील. आम्हांला त्याचें सुहेर सुतक कांहींच नाहीं. फक्त जाधवराव आपल्या दिवाणगिरीवर असतांना त्यांनीं रयतेसाठीं काय कामगिरी केली, एवढेंच आम्हांला पाहणें आहे.

३६० नवीन शाळा, ३०० नवीन मास्तर आणि १५००० मुलांची सोय, या गोष्टींचे श्रेय वास्तवीक सातारा जिल्ह्यांतल्या रयतेला आणि डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाला न देतां, ना. जाधव तें आपल्या खिशांत कोंबतात कसें, याचें आम्हाला खरोखरच आश्चर्य वाटतें ''अशी सोय दुसऱ्या कोणच्याहि जिल्हा बोर्डाला करितां आली नाहीं.'' खरी गोष्ट. कां करतां आली नाहीं? या प्रश्नाचें उत्तर जर पद्धतशीर मिळेल, तर यावरूनच आपणांस माझ्या कामगारीची कल्पना होईल.'' या जाधवोक्तींतलें खरें मर्म तरी बाहेर पडेल, किंवा प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याचे त्यांचें अगाध ज्ञान तरी प्रगट होईल. अस्पृश्यांच्या मुलांना सर्रास बिनतक्रार शाळांत बसविण्याविषयीं डॉ. परांजप्यांनी काढलेल्या सर्क्युलराची कडक अंमलबजावणी तर दूरच राहिली, पण ना. जाधवारावांच्या अमदानींत तें कोठें सांदीला पडलें त्याचा पत्ताच नाहीं. कित्येक शाळांतून मराठ्यांकडूनच अस्पृश्यांची कुचंबणा होत असल्याच्या तक्रारींकडेहि पाहण्याची त्यांना फुरसद झाली नाहीं सक्तीच्या शिक्षणाचा प्रश्न तरी त्यांनी काय सोडविला? उलट, तोहि सांदीला पडतो कीं काय, अशी भीति मात्र पडली आहे. मुंबई म्युनिसिपालटींत तर या प्रश्नावर रणें माजलीं. परवां कालें (जि. सातारा) येथें एका सभेंत हा प्रश्न निघाला असतां, ''सक्तीच्या शिक्षणामुळें शेतकऱ्यांच्या

मुलांना त्रास होईल.'' अशा स्पष्ट अर्थाचे उद्गार जाधवरावांनी काढल्याचें आम्हांला कळतें. ५० टक्के ब्राम्हणेतरी नोकऱ्यांच्या 'यशस्वी यत्ना'ची हीच रड शिक्षण खात्यांतील काही ठळक उदाहरणें जाहीर होतील तर बरें. पुष्कळ लोकांचा असा एक समज आहे कीं सातारचे डे. एज्यू इन्स्पेक्टर श्रीयुत तावडे (जाधवरावांचे जावई) यांना जाधवरावांच्या अंमदानींत नोकरी मिळाली. ही गोष्ट खोटी आहे. श्रीयुत तावड्यांना डॉ. परांजप्यांनींच शिक्षणखात्यांत लावले व नंतर ते जाधवरावचे जांवई बनले. तावड्यांचे कनिष्ठ बंधू डॉ. परंजप्यांनींच नोकरीवर घेतले. नोकऱ्यांच्या नवीन वर्ण्या लावण्याचें राहूं द्याच, पण जुन्या वर्णीचे खास मराठे शिक्षणखात्यांत टिकवून धरण्याचीहि 'कामगारी' जाधवरावकडून झाली नाहीं. या डायरेक्टच्या ऑफीसांतला चव्हाण नांवाचा एक तरतरीत ग्रॅज्युएट पेनच्या फटकाऱ्यासरसा डायरेक्टरनें उलथून पाडला, त्या वेळीं हे शिक्षणमंत्री काय करीत होते? कां नाहीं त्यांनी डायरेक्टरचा कान पकडला? पण 'अंदरकी बात' काही 'न्यारीच' असल्यामुळें या मुद्याचा अधिक भूस काढण्यांत कांही तथ्य नाहीं. डायरेक्टरापुढें दिवाणाची बिरयाणी शिजेल तेव्हां ना! अवघ्या मुंबई इलाख्यांत व्यापारी शिक्षणाचें एकुलतें एकच सिडेनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स. डॉ. परांजप्यांनीं तडाडदिशीं एका हिंदी इसमाची त्या कॉलेजच्या प्रिन्सिपालगिरीवर नेमणूक करून, कॉलेजांची प्रिन्सिपालशाही म्हणजे गोऱ्यांची मिरासदारी नव्हे, हें प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविलें. जाधवरावाच्या अमदानींत जूनिअर गोरी बाळें सिनिअर नेटीवांच्या डोक्यांवर जाऊन बसलीं आहेत. या सर्व गोष्टी सोडून दिल्या, तरी ना. जाधवरावांच्या कारकीर्दीत मराठी वाङमयाला कितीसें उत्तेजन मिळालें? यासाठीं सरकारची स्पेशल ग्रॅन्टच असते. त्यासाठी दिवाणाला विशेष उलाढालीची 'कामगारी' करण्याची जरूरच नसते. चण्याकुरमुऱ्याचें पोते भरलेलें असते; फक्त वाटणावळीचें आयतें पुण्य दिवाणानें घ्यायचें असतें. तें कितीसें घेतलें? वाङमयाच्या नावांनें बाजूला काढलेल्या रकमेपैकीं किती कवड्या त्याच्या कपाळीं लागल्या आणि उरला मलीदा कोणत्या सदराच्या पोटांत पचला, याचा जमाखर्च बाहेर पडला, तर या शिक्षणमंत्र्यांच्या ज्ञानवृद्धीची रसिकता स्पष्ट सिद्ध होईल. आंधळें दळतें आणि कुत्रें पीठ खांते, हाच ज्यांच्या कारकीर्दीचा वास्तवीक आढावा, त्यांनीं अज्ञान मतदारांना भलत्याच गप्पा मारून भुलविणें बरें नव्हे, एवढाच इषारा सध्या पुरें.

लाहोरची विधवा विवाह सहाय्यक सभा

महाराष्ट्रापेक्षां उत्तर हिंदुस्थानांतल्या हिंदु जनांनीं विधवाविवाहाचा प्रश्न विशेष नेटानें सोडविण्याचें कार्य चालूं ठेविलें आहे. विशेषतः आर्यसमाजाच्या विस्तृत व व्यापक चळवळीमुळें ह्या कार्याला तिकडे पुष्कळ जोर आहे. मुसलमान व क्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रयत्नांना हिंदु विधवा झटकन् बळी कां पडतात, याची कारणें स्पष्टच आहेत. या कारणांचे परिणाम किती भयंकर झाले, होत आहेत व होतील, याचीहि हिंदु पुढाऱ्यांनी चिकित्सक छाननी करून, विधवापुनर्विवाहाचा प्रश्न शुद्धिसंघटना इतक्याच नेटानें व कळकळीनें हाती घेतला आहे. महाराष्ट्रांत भिक्षुकशाही पुराणांच्या महात्म्याला सध्यां कितीहि शाब्दिक मोर्चे लागलेले असले, तरी विधवांच्या आणि त्यांच्या पालकांच्या मनांवरील पौराणिक पाजीपणाचा पेंच

अझून व्हावा तसा ढिला झालेला नाहीं. म्हणूनच आमच्याकडील बालविधवा व तरूण विधवा नाटकी संन्यासाच्या दिमाखांत रस्तोरस्तीं आत्मसंयमनाचीं कृत्रिम प्रदर्शनें करीत फिरत असतात. आमच्या या विधवाभगिनींना आमचा एकच स्पष्ट संदेश आहे. तुमचा उद्धार तुम्ही करून घेतला पाहिजे. या कामी बाप भाऊ काका मामा 'मनावर घेतील' ही अपेक्षा करणें मूर्खपणाचें आहे. विधवाविवाहाच्या कामी विधवांनीच हट्ट धरला पाहिजे. अशा कामीं विधवांचे मौनव्रत विनयाच्या सदरांत मोजण्याइतकी सामाजिक दृष्टी आज राहिलेली नाहीं. पुनर्विवाह हा विधवांचा निसर्गदत्त अधिकार आहे आणि तो मिळविण्यासाठी त्यांनीच खोट्या विनयाचा, नाटकी शालीन्याचा आणि अविश्वसनीय संन्यासवृत्तीचा छेद करून धाडसाने पुढें आले पाहिजे. या कामी तरूण विधुरांनीहि आपल्या न्यायबुद्धीला व माणुसकीला स्मरून विधवांच्या क्लेशविमोचनार्थ पुढे सरसावले पाहिजे. चालू वर्षी १ जानेवारी ते ३० जून १९२६ च्या सहामाहीत लाहोरच्या विधवा विवाह सहाय्यक सभेच्या ठिकठिकाणच्या शाखांतर्फे झालेल्या विधवाविवाहांचा जातवार व प्रांतवार रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. तो असाः-

जातवार		**प्रांतवार**	
ब्राम्हण	२६३	पंजाब आणि वायव्य प्रांत	९४०
खत्री	१७१	सिंध	४०
अरोरा	१८८	दिल्ही	४३
आगरवाल	१९४	संयुक्त प्रांत	२६३
कायस्थ	३५	बंगाल	४५
शीख	१५९	मद्रास	५
रजपूत	१२१	मुंबई	४
इतर	२३३	मध्य हिंदुस्तान	६
एकूण	१३६४	आसाम	४
		बिहार व ओरीसा	१४
		एकूण	१३६४

महाराष्ट्रातील सुधारकांचा वर्ग या एका बाबतींत तरी एकीने कांहीं संघटित कार्य करण्यास पुढें येईल काय? या एवढ्या बाबतींत तरी मनाचा एकोपा दाखवा. नुसते वर्ष अखेंर एकदां जमून विधवाविवाह कायद्याच्या स्मरणार्थ टाळकुटें भजन करण्यात अर्थ नाही.

सुशिक्षितांचा मूर्खपणा

कडू कारलें तुपांत तळलें आणि साखरेंत घोळलें तरी अखेर कडू तें कडूच! तद्वतच हिंदु म्हटला कीं तो

सहीच्या ऐवजीं आंगठा उठविणारा असों, किंवा मोठा एमे पीएचडी असो, त्याच्या हाडीमासी खिळलेला देवभोळेपणा मेला तरी जायचा नाहीं. या एकाच मर्मामुळें कामधेनू ताईतवाले, महातावीजवाले आणि गंडेदोरवाले सात सात मजल्यांच्या इमारती बांधू शकत आहेत. या धूर्त काफरांच्या पचनीं अशिक्षित हिंदूच पडतात असें नाहीं, तर चांगले सुशिक्षित विद्वान लोकहि त्यांच्या जाळ्यात आपण होऊन पडत असतात. दैववाद म्हटला कीं हिंदूंच्या पाठीच्या कण्याचे मणके फुरफुरू लागतात. अमूक करशील तर तुझे दैव मोटारगाडीपुढें भरधाव जाईल, इतकें कोणी सांगितलें पुरी की दैववादी बावळट हिंदू जनमनलज्जेची पर्वा न करतां, विवेक विचाराची क्षिति न बाळगतां किंवा आपल्या छोट्या मोठ्या विद्वत्तेची दखल न करतां, भर चव्हाट्यावर शेणसुद्धां खायला कमी करायचा नाही. कामधेनू ताईता प्रमाणेंच आणखी एक देव साधण्याचा पाजी प्रकार सुशिक्षित लोकांत चालत असतो. त्याचें नाव 'गुड लक लेटर.' एक कोणीतरी रिकामटवळा उठतो आणि नऊ किंवा सात इसमांना एक इंग्रजी पत्र लिहितो. त्याचा मासला अशा नमुन्याचा असतोः- ''श्रीयुत ओंकारेश्वर मसणराव सोनापुरे यांनी मला एक गुड लक (शुभ दैवी) पत्र पाठविले आहे. माझ्या ९ मित्रांनी त्याच्या प्रति पाठविण्याची त्यांनी मला इच्छा दर्शविली आहे. ही एक सुवर्णशृंखला आहे आणि ती साऱ्या जगभर ३ वेळा फिरत पसरत जावयाची आहे. ती मध्ये कोणी मोडता कामां नये. हिची सुरुवात अमेरिकेचे एक मोठे तत्वज्ञानी डॉक्टर फूलहार्ड A. B. C. D. & c. & c. यांनी केलेली आहे. २४ तासाच्या आंत या पत्राच्या ९ प्रति करून ९ लोकांना पाठवा म्हणजे २ दिवसाच्या आंत तुमचा भाग्योदय होईल. असे न कराल, ही साखळी तोडाल, तर तुमचें वाटोळें होईल. ही साखळी सुरूं झाल्यापासून कल्पनातीत दैवयोगाचें ठोकताळे हजारों लोकांना आलेले आहेत.'' नंतर या मजकुराखालीं या पत्राच्या प्रति करून पाठविणाऱ्या दीर्घशहाण्यांची नामावळी असते. या नामावळींत पुष्कळ मोठमोठ्या लोकांची नांवेहि असतात. गेल्या महिन्यांत आमच्याकडे असलीं पाच सहा पत्रें आली. एकांत कोल्हापूरच्या महाराजांचे नाव सुरवातीलाच टैप केलेलें आहे. ''H. H. the Maharaja of Kolhapur to Mr. D. V. Mule.'' नशिबाच्या उलट्या पडलेल्या कवट्या ४८ तासाच्या आंत सुलट्या करणारीं ही पत्रें म्हणजे सुशिक्षित लोकांचा मूर्खपणा आहे. यापेक्षां तीव्र निषेधाचा शब्द दुसरा काय योजावा? ९ पत्रांना ९ आण्याचे पोष्टेज, ९ प्रति लिहिण्याची दगदग किंवा टाईपणावळ, म्हणजे रुपया दीड रुपयाचा खर्च. बरें, असले पत्र एकच येतें, तर ४८ तासात भाग्योदय पाहाण्यासाठी रुपया दीड रुपया पोष्टखात्याच्या गंगाजळीत टाकायला कोण हिंदु माघार घेईल? पण एकामागून एक दोन चार सहा दहा पत्रांनी पाठपुरावा केला की सर्व धंदा बाजूला ठेऊन, या गुडलक पत्रांच्या नकलावणीतच मुरदा पडायचा! सारांश, ही गुडलक पत्रे म्हणजे रिकामटवळ्या मूर्ख लोकांचा एक फाजील उपदव्याप आहे. मोठमोठ्या लोकांची नावं असल्या पत्रात मुद्दाम खोडसाळपणाने दडपण्यात येतात. तरी असली पत्रें ज्यांच्या हाती येतील, त्यांनी त्यांना ताबडतोब चुलीत किंवा शेतखान्यांत फेकून द्यावी. या सूचनेमुळें आमचे दैव उलटे फिरले किंवा अज्जीबात उठून गेलें, तरी त्याची आम्हांला पर्वा नाहीं. मूर्ख सुशिक्षितांनों, असल्या कागदी चिठोऱ्यांनी दैव सुधारण्याचा बावळटपणा जोंपर्यंत तुम्ही चालवीत आहात, तोंपर्यंत तुम्हांला जगाच्या बाजारात पखालीच्या बैलांपेक्षा अधिक किंमत खास येणार नाहीं.

‘राष्ट्रीय’ शिमगा जवळ आला

महाराष्ट्रांत ‘राष्ट्रीय’ भटांचे प्रस्थ माजल्या दिवसापासून भाद्रपदाच्या शुद्ध पंधरवड्याला अधिक शिमग्याचें स्वरूप कसें आलेलें आहे आणि देवभक्ती व देशभक्ती यांच्या ढोंगाखालीं परस्परांच्या उण्यादुण्यांचा व उखाळ्यापाखाळ्यांचा संगीत रंगीत शिमगा कसा बोकाळतो, हें आतां सर्वांस पूर्ण परिचयाचें झालें आहे. हा शिमगा हिंदु लोकांच्या आंगवळणीं आतां इतका पडला आहे कीं त्यांतील घाणीची घाणच आतां कोणाला येईनाशीं झाली आहे. त्यामुळें निषेधकांचे प्रामाणिक निषेध म्हणजे तुफानी वावटळाच्या गर्जनेपुढं पिपारीची पिरपीर ठरले जातात. मुसलमानांचा मोहरम म्हणून हिंदूंचा मोरया आणि त्यांच्या हैदोसधुल्याला आमच्या ‘मोर्यामोर्या’ची तोडीसतोड, एवढीच मुत्सद्देगिरी या वार्षिक गणेशोत्सवाच्या शिमग्यानें साधावयाची असेल, तर त्यांत आणखी खास शिमग्यांतील धुळवडी शेणवडीचा प्रोग्राम जादा मिसळावा. शिमगा सुद्धां आम्ही धार्मिक भावनेनेंच साजरा करतो ना? मग भाद्रपदी शिमग्याच्या धर्मोत्सवांत फाल्गुनी शिमग्याचे कांही निवडक प्रोग्राम ढकलले, तर त्यांत धर्माचा डबल मान राखण्याची पुण्याई खास मिळेल. आजपर्यंत असें करतां आलें नाहीं तर नाहीं; यंदापासून हा ‘राष्ट्रीय’ उपक्रम सुरू करावा. विशेषतः यंदा कपिलाषष्टीचा योग आलेला आहे. भाद्रपदी शिमग्यांतच इलेकशनी डोले नाचणार आहेत. त्यामुळें भटी व भटाळलेल्या मेळ्याचा मालमसाला छप्पन रंगी रंगविण्यासाठीं शेकडों कवी आपल्या काव्यप्रसूतीच्या समाधिस्थ वेदनांत कण्हत आहेत. महाराष्ट्राच्या मेलेल्या धमन्यांत शिवाजीच्या राष्ट्राभिमानाचें वारें फुंकफुंकून भरण्यासाठी धंदेवाईक वाचाळ आतांपासूनच दमछाटीची कसरत करीत आहेत. गणेशदेवाच्या सोंडेच्या आधारानें धर्मकर्माची मीमासा आणि कर्मयोगाचें लोकमान्यत्व प्रवचित करीत असतांनाच, कट्टर-फत्तर खादी-वादी पगडी-टोपी पाटलूण धोतर पक्षांवर तोंडसुख घेण्याचीं यंत्रे साफसूफ करण्यांत कित्येक मग्न आहेत. पुरुषी पोरांटोरांकडून प्रतिपक्षांची टर उडविण्याचा लोकमान्य प्रघात आतांशी अळणी वाटूं लागल्यामुळें, आणि पुरुषांच्या जोडीनें स्त्रियांच्याहि खटपटींची फोडणी राष्ट्रकार्यांत समतोल फुरफुरली पाहिजे असा ‘नव्य प्रकाश’ पडल्यामुळें, पोरांच्या मामुली मेळ्यांना तोडीस तोड किंवा तोंडास तोंड देण्यासाठीं पोरींचे मेळे निघणार आहेत, या नवीन ‘राष्ट्रीय’ सोयीमुळे अनेक दर्भसमिधा बहाद्दरांना वाटेल त्या मगरूर प्रतिस्पर्ध्यावर बायकांच्या नथींतून तीर मारण्याची संधी सांपडणार आहे. अस्पृश्यांच्या गणपतीपुढें ‘सुकार्ता दुकार्ता’ करून स्वतःचें अस्पृश्योद्धारक स्तोम माजविण्याच्या खटपटींत कांही समाजशास्त्री गढून गेले आहेत. बोलून चालून गणेश म्हणजे वैदिक दैवत. सनातन्यांचा प्राण. त्याच्या उत्सवाच्या सनातन शिमग्यांतूनच महाराष्ट्राचा उद्धार होणार. अशा पवित्र धर्मकार्यांत नाठाळ भटेतरांनी जर रंगपंचमी खेळली तर त्याचा फायदेशीर नव्हे, तरी कायदेशीर बंदोबस्त कसा करावा? सनातन्यांच्या शिमग्याचा पावनपणा सरकारमान्य झालाच आहे. म्हणून त्याविरुद्ध जर सत्यशोधकी धर्मलंडांनी कांही अवचित त्रांगडें उठवून या महा-राष्ट्रीय ‘सार्वजनिक’ उत्सवांत विघ्न उपस्थित केलें तर काय करावें? विघ्नविनाशक गणोबाचे पाय धरावे, तर तो ‘कलियुगी बौद्ध.’ बौद्ध म्हणजे बद्ध-मुका. नुसता पुजेचा आणि मंत्रजागराच्या शंखध्वनीचा भोक्ता! सत्यशोधकांच्या धर्मलंडपणामुळें भक्तांच्या

धांवण्याला आताशा देव धांवतनासा झाला आहे. आतां देवाच्या धाव्याला भक्तांना धावाधाव करावी लागते. त्यासाठी शस्त्रास्त्रसंपन्न मायबाप दयाळू सरकारचे पाय धरण्यासाठी कित्येक भक्तांची आतांच नानाफडणिशी धांवपळ सुरूं आहे. गुदस्त सालीं विघ्नविनाशक गणरायाच्या पुणेरी एकनिष्ठ भगतांवर ओढवलेलें भयंकर संकट क्रिस्ती सरकारच्या कृपेनें पार पडले. दादरचा 'सार्वजनिक' गणपती नैवेद्य पूजेच्या दुष्काळामुळें उपासमारींतच ठिकच्या ठिकाणी गुप्त झाला. यंदा राष्ट्रीय भाद्रपदी शिमगा आणि इलेक्शनी डोले एकाच हंगामांत आल्यामुळें सनातन वैदिक धर्माभिमान्यांची आणि टाळकुट्या वारकऱ्यांची इभ्रत सांभाळण्यासाठी मायबाप सरकार साध्या शिपायापासून तों बोंबगोळ्यांचा वर्षाव करणाऱ्या आकाशयानापर्यंत कडेकोटपर्यंत बंदोबस्त पुण्यास ठेवील, अशी आशा आहे. पुणेकरांना तरी निदान सरकारचें हे एवढें लष्करी ऐश्वर्य या भाद्रपदी शिमग्यांत पाह्यला मिळते, ही वक्रतुंड लंबोदराची सोंडेएवढीच लांबलचक महाकृपा होय. सारांश, वार्षिक गणेशोत्सव म्हणजे एक मोठे भटी गंडांतर होय. त्यांतून जगणें किंवा मरणें ही गणरायापेक्षां सरकाररायाचीच कृपा मानणें प्राप्त आहे.

□□□

निवेदन

श्रीयुत शिवराव महादेव परांजपे यांना जाहीर विनंती

चित्रमय जगत् मधून आपण अलीकडे जे ऐतिहासिक विषयांवरील लेख लिहिले आहेत, त्यांत एक दोनदां आणि गेल्या जुलै १९२६ च्या अंकातील आसईच्या लढाईच्या लेखांत देशद्रोही लोकांच्या मालिकेंत बळवंतराव मल्हार चिटणीस यांना आपण ठळकपणें गोंविले आहे. या बाबद मजकडे अनेक लोकांनी पूर्वी तक्रारी पाठविल्या होत्या व आतां पुन्हां त्या तक्रारी निकराच्या स्वरूपानें येऊ लागल्या आहेत. राजवाडे प्रकरणाप्रमाणें निष्कारण वाद माजूं लागले नये, आपण कोणत्या मुद्यांवर व ऐतिहासिक आधारावर वरील निष्कर्ष काढून बळवंतराव मल्हार चिटणीसांना देशद्रोहीपणाचें सर्टिफिकीट देतां आणि ते पुरावे व मुद्दे सत्याऽसत्याला कितपत धरून आहेत, याची शंकीतांच्या शांतवनार्थ जाहीर चर्चा व्हावी, म्हणून माझी आपणांस ही विनंती आहे का येत्या चित्रमय जगत्च्या अंकी ''बळवंतराव मल्हार चिटणीसाचा देशद्रोह'' या विषयावरील सर्व मुद्दे पुरावे आपल्या विद्वत्तापूर्ण विवेचनासह प्रसिद्ध करावे. आशा आहे कीं या जाहीर विनंतीचा आपण स्वीकार कराल.

केशव सीताराम ठाकरे
संपादक प्रबोधन
प्रबोधन कचेरी.
ता. १० ऑगस्ट १९२६

□□□

लेख

प. वा. रावबहादुर दत्तात्रय बळवंत पारसनीस यांचा जीवनवृत्तांत

आत्मविश्वासाने स्वतःच्या जीवनध्येयाचें नीट संशोधन करून, परिस्थितीच्या उलटसुलट लाटांची दिक्कत न बाळगतां, आपल्या कर्तव्याचा निश्चित मार्ग चोखणारे जे स्वयंनिर्णयी (Self-made) वीर त्या वर्गातच रा. ब. पारसनीस यांची गणना होते. यांचा जन्म २७ नवंबर १८७० रोजी एका गरीब देशस्थ ब्राम्हण कुटुंबात झाला. लहानपणी हे शाळेंत न जाण्याचा फार हट्ट करीत आणि अभ्यासाकडेहि यांचे फारसें लक्ष नसें. शाळेंतील ठरावीक 'घोट्यां'त जरी त्यांनी फारसें प्रेम दाखविले नाही, तरी जगांतील थोर कर्तबगार पुरुषांचीं चरित्रें नीट मननपूर्वक वाचणें, आपल्या सभोवतालच्या विद्यमान मोठमोठ्या लोकांच्या विचार उच्चार आचारांचे चिकित्सक निरीक्षण करणें आणि 'आपणहि असेच कोणी तरी मोठे पुरुष झाले पहिजे.' या महत्वाकांक्षेची कमावणि करणें, इत्यादि तत्वे त्यांच्या हृदयांत एकसारखी परिणत होत होती. शाळेतील अभ्यासक्रमाच्या ठरावीक घोट्याचक्रांतून खडबडत जात असतांनाच, पारसनिसांनी आपल्या निसर्गदत्त अभिरुचीचा ठाव काढला. आपण कोण व्हावे, त्यासाठीं काय करावें, काय पहावें, कशाचें अनुकरण करावें, याचा ताळेबंद तक्ता नजरेपुढें ठेवला. 'नांव काढण्या'च्या लौकिकी समजुतीच्या मोहाला ते फसले नाहींत. शेकडा ९९ तरुणांनी अलीकडे मॅट्रिक बीए एलेल्बी होऊनहि आपल्या अभिरुचीचा थांग कळत नाहीं आणि ध्येयाची निश्चिति ठरवतां येत नाहीं. त्यामुळें सुकाणू नसलेल्या जहाजासारखी त्यांची स्थिति होऊन, परिस्थितीचा वारा जिकडें नेईल तिकडे त्यांच्या आयुष्याचें होडकें भटकतें आणि अखेर कोठल्या तरी स्थितीच्या चिखलांत रुतून पडतें किंवा एखाद्या खडकावर आपटून जायबंदी होतें. आजचा सर्व तरूण महाराष्ट्र याच अवस्थेत आहे. अभिरुची ओळखून कशी काढावी, आपल्या कर्तबगारीचा अंदाज कसा ठरवावा आणि भावी आयुष्यातील ध्येय स्पष्ट निश्चित करून, त्या धोरणानें स्वाध्यायाची, निरीक्षण मनन निदिध्यासाची कसोशी कशी करावी, हेच कोणाला कळत नसल्यामुळें आज सर्वांची सर्व बाजूंनी फसगत व मुस्कटदाबी झालेली आहे. अभिरुचीचा शोध ज्याचा त्यानेंच लावावयाचा असतो. त्या कामीं बाबा काका मामाची इच्छा किंवा लौकिकी समजुतींचा पिच्छा पुरवून कांही साधन नाही. 'वडिलांची इच्छा' म्हणून बीए एलेल्बी झालेले शेकडों भीकमाग्ये वकील गांवोगांव आढळतात; आणि हजामतीलाहि महाग झालेले

एमे शाळामास्तरकींत इरीरी पोपो दादा झ्यांझ्यां करीत पडलेले दिसतात. शाळेंतल्या वक्तृत्वोत्तेजक वादविवादाच्या सभांत पारसनीस मोठ्या आवडीने भाग घेत असत. बालवयांतच अभिरुचीचा व ध्येयाचे अचूक पत्ता लावल्यामुळें 'मी अखबारनवीस (जर्नालिस्ट होणार) या महत्वाकांक्षेचे पहिले दृश्य पारसनिसांनी विद्यार्थी दशेतच 'कीर्तिमंदीर' या नावाचे एक * मोठे कौतुक वाटले. सर साहेबांनी ताबडतोब एक उत्तम ग्रंथ बक्षिस व उत्तेजनपर एक पत्र पाठवून पारसनिसांची पाठ थोपटली. हे पत्र लांबलचक आहे. त्यांतील एकच उतारा आत्मप्रबोधनेच्छू साठी खाली उद्धृत केला आहे.

"Whatever you do, do it the best of your power. If you fall short of the perfection you are capable of, you do yourself injustice; you appear to be inferior to what you really are. A slovenly habit of doing work mars success in life. Maintain uniform good temper. Be courteous and obliging, judge men and measures charitably. Do not take offence unless it is gross and deliberately meant. These are among our old national characteristics. Let English education improve you... Be good citizens. Do as much good as you can to all around; and scrupulosly abstain from evil. Let your lives as educated men be examples to others and reflect credit on the school, which has educated and sent you forth into the world. Whoever fails in this respect is a traitor to the sacred cause of education. Spare some portion of your time to be dedicated to the good of your country. As educated men you are among the guardians of public welfare and promoters of public progress. Accordingly take interest in matters of public importance, whether political, social or any other. By the exercise of care, of judgment, and of moderation, make your influence felt."

* आपल्या जुन्याच राष्ट्रनीतीच्या आज्ञा आहेत. इंग्रेजी शिक्षणाने आत्मोन्नति करून घ्या..... उत्तम नागरीक व्हा. सभोवारच्या लोकांचें साधेल तितके हित करा; आणि दुष्ट वासनांचा त्याग करा. सुशिक्षित मनुष्याला साजेशोभेसा आपला आयुष्क्रम इतरांनां कित्त्याप्रमाणें गिरवता आला पाहिजे आणि त्यामुळें विद्यादान करून आपणांस जगांत धाडणाऱ्या विद्यामंदिराचाहि लौकीक वाढला पाहिजे. या कामी जो कुचराई करील तो शिक्षणाच्या पवित्र कार्याचा बदमाश द्रोही समजावा. देशहिताचा विचार करण्यासाठीं वेळांत वेळ काढला पाहिजे. तुम्ही सुशिक्षित लोक म्हणजे सार्वजनिक कल्याणाचे संत्री आणि लोकहितवादाचे पुरस्कर्ते आहां, हें लक्षांत ठेवा. या साठीं, बाब राजकीय असो, सामाजिक असो, किंवा कसलीहि असो, त्यात तुम्ही कळकळीनें भाग घेतलाच पाहिजे. प्रत्येक कृत्यांत दक्षता, न्यायबुद्धी आणि विवेक यांचे नियंत्रण राखून, आपलें अस्तित्व सर्वत्र भासमान होईल असें करा.

अर्वाचीन युगांत अशोकाच्या तोडीचा आणि ब्रिटीश बुद्धीमत्तेच्या जोडीचा एक अक्षरशः जगप्रसिद्ध हिंदु नृपति-श्रीमंत सयाजीराव गायकवाड-ज्या राजकारणी मुत्सद्दिश्रेष्ठानें स्वतः शिक्षण देऊन तयार केला, त्या सर टी. माधवरावचे लक्ष तरूण पारसनिसाच्या छोटेखानी 'कीर्तिमंदिर' मासिकाने वेधावे आणि त्याविषयी उत्तेजनपर त्यांचा वरील खास आशीर्वाद मिळावा, येथेंच वास्तवीक पारसनिसांच्या अखबारनविशी

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्ये दिसत नाही.

ध्येयाचा पाया भरभक्कम बसला. असले उत्तेजनाचे प्रसंग पुष्कळांना लाभतात, परंतु जेथें ध्येयाची आणि अभिरुचीचीच जमिन तयार नसते, तेथे उत्तेजनाची किंवा सूचनांची बीजें थरारणें अर्थात् अशक्य होतें.

पासरनिसांचा शाळेतला अभ्यास जेमतेम मॅट्रिकपर्यंत कसाबसा रेटला. शाळा सोडल्यावर सन १८८६-८७ मध्ये त्यांनी 'वक्तृत्व' नावाचे एक लहानसे पुस्तक * प्रसिद्ध केले. याच वर्षी त्यांनी 'महाराष्ट्र कोकिळ' नांवाचें एक भारदस्त मासिक सुरू केलें. या कामीं त्यांच्या तारुण्याच्या धडाडीला एक दोघां विद्वान् व अनुभवी युवकांनी सहाय दिल्यामुळे, 'महाराष्ट्र कोकिळा'चे कूजन महाराष्ट्रांत अनेक ठिकाणी कांही वर्षे ऐकूं येत असें. मध्यंतरी ते बंद पडलें असावें. कारण, १८९३ च्या आकटोबर पासून तें 'नवीन व्यवस्थे' खाली सातारच्या शुभसूचक छापखान्यात प्रसिद्ध होऊ लागले. हें मासिक केवळ एका ऐतिहासिक विषयासच वाहिलेले होतें, असें नव्हे. त्यांत ऐतिहासिक वीर वीरांगनांची मनोरम चरित्रें, सुरस काव्यें, सुप्रसिद्ध स्थलवर्णनें, वेदान्तशास्त्र, साहित्य शास्त्र, इत्यादि अनेक विषयांवर गंभीर व विचार क्रांतिकारक मजकुर येत असे. 'झांशी संस्थानचा इतिहास' पारसनिसांनीं प्रथम याच मासिकातून क्रमशः छापून प्रसिद्ध केला. लौकिकी ताजव्यांत पारसनिसांची विद्वत्ता जरी प्रॅजुएटगिरी इतकी जड बुडाची भरली नाही, तरी निश्चित अभिरुचीच्या व ध्येयाच्या दिशेनें त्यांच्या शीलाची आणि विद्वत्तेची भरभक्कम कमावणि व्हायला, या मासिकाच्या उद्योगाने पुष्कळच मदत झाली. निष्ठेंत निश्चयाचा जोर असला, म्हणजे लौकिकी पदव्यांची 'घोकी' विद्वत्ता कमाविणारांनांहि, बिनमॅट्रिक्या विद्वत्तेंत चारी मुंड्या चीत कसा करतो, हें पारसनिसांच्या चारित्र्यावरून खासें शिकतां येतें. ज्ञानवृद्धीचीं बीजे शाळेंत पेरलीं गेलीं, तरी त्यांचा वेलविस्तार फोफावण्यास बाह्य जगातल्या वातावरणाचीहि पुष्कळच जरूर असते.

आत्मप्रबोधन झालें, अभिरुचि सापडली, स्वाध्यायाची तपश्चर्या सुरळीत मार्गावर सुरू झाली, अंतर्बाह्य निरीक्षणाची हातोटी साधली, तरी ज्ञानयोगाची परिणति व्हायला संतसमागमाची जरूर लागतेच लागते. ज्ञानी जनांच्या स्वानुभवाच्या एकच वळशांत जी शक्ति असते, ती हजार ग्रंथांच्या वाचनांत नसते. म्हणून मुमुक्षू तरुणांनी संतसमागमाकडे दुर्लक्ष करू नये. संत म्हणजे गांवोगांव मठ थापून चमत्कारांच्या जाहीरातीवर गुरूमंत्र गंड्याताईतांचा व्यापार करणारे टगे नव्हते. आमची संताची व्याख्या 'ज्ञानी' अशी आहे. त्यांत अनेक विषयांतल्या सर्व कर्तबगार ज्ञानवंतांचा आम्ही समावेश करतो. १८९० च्या एप्रिलांत पारसनिसांना अशाच एका तपस्वी संताची भेट झाली. हे संत म्हणजे सुप्रसिद्ध आद्य नवमतवादी व लोकहितवादी सरदार गोपाळराव देशमुख. आधीच लोकहितवादी म्हणजे त्या काळचे महाराष्ट्राचे भीष्माचार्य. त्यांची मुलाखत म्हणजे एक जीवनक्रांतीतला अलभ्य चमत्कार. असल्या पुरुषोत्तमांची नुसती दृष्टीभेट झाली तरी विचारक्रांति व्हायची; मग हा तर काय प्रत्यक्ष विचारविनिमयाचा योग! लोकहितवादींनीं पारसनिसांच्या इतिहास-संशोधनाबद्दल कौतुकाचे उद्‌गार काढून, आग्रहपूर्वक सांगितलें कीं ''तुम्ही झांशी संस्थानचा इतिहास प्रसिद्ध करण्याचें मनावर घेतले आहे, हे पाहून मला फार संतोष वाटतो. तथापि तुम्हास दोन महत्वाच्या गोष्टी सांगितल्यावांचून मला राहवत नाहीं. त्या ह्याच कीं, तुम्हांस जर आपल्या देशातील सुप्रसिद्ध स्त्रियांची चरित्रें लिहावयाची असतील, तर

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्ये दिसत नाही.

तुम्ही दोन चरित्रें अवश्य लिहा. एक महाराणी अहिल्याबाई होळकर व दुसरी झांशीकर राणी लक्ष्मीबाई. हीं हिंदुस्थानांतील दोन अजब रत्नें आहेत.'' या सूचनेप्रमाणे पारसनिसांनी अहिल्याबाईच्या चरित्राचे साहीत्य जमविण्याची खटपट केली. पण ती फारशी यशस्वी झाली नाही. म्हणून ते लक्ष्मीबाईच्या चरीत्राकडे वळले. लक्ष्मीबाईंचे दत्तकपुत्र दामोदरपंत झांशीवाले यानीं साहित्याची वगैरे भरपूर मदत दिल्यामुळें सन १८९४ सालीं हा चरीत्रग्रंथ प्रसिद्ध झाला. तो इतका उत्तम वठला की त्याची सर्वत्र वाखाणणी होऊन, बंगाली हिंदी गुजराथी व कानडी भाषांत त्याची भाषांतरे झाली. १८९५ साली 'बुंदेल खंडातील मराठ्यांचे पराक्रम' हा ग्रंथ बाहेर पडला. पारसनिसांचा 'उत्तम इतिहासलेखक' असा सर्वत्र गौरव होऊं लागल्यामुळे, कै. जस्टिस रानडे यांचे या तरुणाकडे लक्ष गेले व लवकरच दोघांची भेटही झाली. या वेळी राजकीय चळवळींत पडून 'सवंग लोकमान्यता' मिळविण्यात * होईल. महाराष्ट्राला कार्यैकनिष्ठ तरुणांची फार जरूर आहे.''

पारसनिसांच्या चरित्रांतला विशेष म्हटला म्हणजे ते कोणत्याहि लहान मोठ्या संधीला पाठ दाखवीत नसत. पुढे येईल ते बरें वाईट काम उत्तम रीतीनें फडशा पाडायचें. नाही म्हणायचें नाही. नफ्यातोट्याची मारवाडी दृष्टी ठेवायची नाहीं. ओळखीपाळखी करण्याच्या बाबतींत पारसनीस म्हणजे 'चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः' करण्यात वाकबगार. पण कोणत्याहि कामांत अगर कोणाच्याहि भेटींत ते नेहमी आपल्या अकडीत आणि आत्मविश्वासाच्या ऐटींत असत. त्यामुळें ते जेथें जात तेथें त्यांचें वजन हमखास पडत असे. शिवाय, त्यांच्या काम करण्याच्या पद्धतींतहि विलक्षण प्रसंगावधानी धोरण असे. कोणत्यावेळी कोणतें काम हाती घ्यावें, आता कोणता ग्रंथ लिहिला तर त्याची महति वाढेल, त्यासाठीं कोणकोणाला भेट द्यावी, काय काय धोरणे पुढे मांडावी, इत्यादि गोष्टी चटकन् निश्चित ठरविण्यांत पारसनिसांचा मेंदू अत्यंत हूकमी असे. इतिहास-संशोधना सारख्या उदासीन कार्यक्षेत्रांत त्यांनी जे अक्षरशः न भूतो न भविष्यति यश संपादन केलें, त्याची गुप्त किल्ली याच त्यांच्या धोरणी बुद्धिमत्तेंत होती.

१८९५-९६ साली ज. रानडे व डॉ. भांडारकर यांच्या दीर्घ परीश्रमानें 'पेशवे दप्तर' चाळण्याची व तपासण्याची डे. व्ह. ट्रा. सोसायटीला सरकारनें परवानगी दिली. हें चाळणी पिसणीचे काम एकाग्रतेने करणार कोण? हा प्रश्न पुढें येतांच रानडे भांडरकरांनी चटकन् पारसनिसांकडे ते काम सोपविले. पारसनिसांनी सर्व दप्तरांची परिश्रमपूर्वक तपासणी करून अत्यंत महत्वाची अशी जवळजवळ दहा हजार पत्रे निवडून काढली. पेशवे दप्तराची खडा न् खडा माहिती असणारा पारसनिसाशिवाय दुसरा संशोधक निदान आमच्या * चिटणीसाचा मुलगा बहिरोबा याने मोंगलाची कैद पत्करून बापाची सुटका कशी केली आणि लवकरच मोंगलांच्या अमानुष अत्याचारांना 'केवळ देशासाठीं' आपला बळी कसा दिला, याचे हृदयद्रावक परंतु रसाळ वर्णन या पुस्तकांत आहे. ज. रानड्यांच्या प्रत्यक्ष प्रेरणेने डे. व्ह. ट्रा. सोसायटीने पेशवे व छत्रपति यांच्या रोजनिशा छापण्याचे काम हाती घेतलें. त्यांत काम करीत असतानाच पारसनिसाना तंजावरच्या सफरीचा योग आला. तेथल्या 'सरस्वती भांडार' मधून बरीच ऐतिहासिक माहिती गोळा करून त्यानी ज. रानड्यांना पाठविली. बृहदीश्वराच्या देवळावर खोदलेल्या मराठ्यांच्या इतिहासाच्या शिलालेखाची माहिती पारसनिसानीच ज. रानड्यांना प्रथम कळविली.

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्ये दिसत नाही.

तिकडून परत आल्यावर ज. रानड्यांच्या 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' या इंग्रेजी ग्रंथाची प्रुफे तपासणें, संदर्भांचे मूळ अस्सल लेख ताडून पहाणें वगैरे कामें करीत असतांनाच, अयोध्येचे नबाब, ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर, मराठे सरदार, इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध केले. १८९८ मध्यें डे. व्ह. ट्रा. सोसायटीच्या विद्यमानें भारतवर्ष मासिक पुस्तक पारसनिस व हरी नारायण आपटे यांच्या संयुक्त संपादकत्वाखालीं पुण्यास निघूं लागले. पुढें तें सातारा येथे 'सहस्त्रकर' छापखान्यात प्रसिद्धीस गेल्यापासून पारसनीस त्याचे एकटेच संपादक होते. या मासिकांतून 'बुसातिने सलातिन' या फारशी ग्रंथाचा मराठी तरजुमा, ग्रांट डफचे चरित्र, सोंडूरकर घोरपडे इत्यादि अनेक प्रकरणे व एक दोन बखरी प्रकाशांत आल्या. पुढें या मासिकाचे बरेंच अंक मागासल्यामुळें ज. रानड्यांच्या सूचनेवरून १९०० साली ते बंद ठेवले. याचें एकंदर २४ अंक बाहेर पडले. १९०२ साली बायजाबाई शिंदे यांचे चरित्र आणि पारसनिसानी १८९३ सालीं केलेल्या दिल्ली आग्र्याच्या आपल्या प्रवास वर्णनाची टिपणें वाढवून लिहिलेलें 'दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ' असे दोन आणखी नवीन ग्रंथ प्रसिद्ध केले. या सर्व धडपडीमुळे पारसनिसांचा खिसा गरमच रहात असे, असे मात्र नव्हे. सध्या * प्रयत्नांना महाराष्ट्रातल्या लोकांचा व धनिकांचा असलेला सुतकी उधार आश्रय विचारांत घेतला, तर त्या वेळीं असल्या संशोधनी कार्याची दशा काय असेल, याची चांगलीच कल्पना होईल. परंतु पारसनीस योगः कर्मसु कौशलम्‌चे कट्टे शागीर्द असल्यामुळें, त्यांनीं तूर्त दान महापुण्याच्या धोरणाचा कधि स्वीकारच केला नाही. कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषू कदाचन या भगवदुक्तीतलें रहस्य त्यांनी आरपार ताडलें होते. कर्म कर, पण फळाची आशा धरू नकोस; यांत भगवंताचें असें कोठें सांगणें आहे कीं तुझ्या कर्माला कधिं फळच येणार नाहीं, किंवा आलें तर त्याचा तूं स्वीकारच करूं नकोस म्हणून? ध्वनीला प्रतिध्वनि ठेवलेलाच. बऱ्या वाईट कर्मांची बरीं वाईट फळें भोगलींच पाहिजेत. तीं कोणाला चुकत नाहींत आणि चुकविताहि येणार नाहीत. मग मा फलेषू कदाचन याचे मर्म काय? मर्म हेच की फळाच्या आशेनें कर्म करण्यांत कर्महि हातून धड घडत नाहीं व फळहि अर्थात् पदरी पडत नाहीं. 'माझी परीक्षा पास होईल, तर मी सत्यनारायण करीन' असल्या नवसांतली कर्मबुद्धी ही बुद्धी नसून फळाशा आहे. देवांशीं सुद्धां आम्ही सौदागिरीची सौदेगिरी लढवितो. 'हातांत नारळ दे आणि दोन आणे घे' असल्या वृत्तीने कर्मयोगाची सिद्धी लाभत नसते. कार्यासाठीच कार्य करण्यांत कर्त्याच्या कर्मयोगाचे महत्व असतें, आणि हें कर्म सुद्धां फलाशेची लवमात्र भावना न ठेवतां, कुशलतेनें एकनिष्ठेनें उत्तम रीतीनें पार पाडण्यांतच, भगवंत म्हणतात, खरा कर्मयोग आहे. कोणत्याहि कार्याचें अविनाशी फळ मिळायचें, तर त्यासाठीं कर्माचरणाच्या तपश्चर्येची शिकस्त करणें प्राप्त आहे, हें अलीकडील तरूणांच्या गळीं मुळीच उतरलेलें नसल्यामुळें, त्यांची दामाप्रमाणें काम करण्याची भाडोत्री मनोवृत्ति आज त्यांच्या सार्वत्रिक मुस्कटदाबीला कारण होऊन बसली आहे.

महाराष्ट्रातल्या आब्राम्हण अस्पृश्यांच्या आत्मोद्धाराच्या धडपडींकडे आपल्या तीक्ष्ण गरुडाक्ष रोखून ठेवणाऱ्या कै. शाहू छत्रपतींचेंहि लक्ष पारसनिसांच्या इतिहासविषयक प्रयत्नांकडे पूर्वीपासून होते आणि त्या बाबतींत शक्य तो आश्रयहि पारसनिसांना वरचेवर राजर्षि देत असत. सन १९०२ सालीं छत्रपति विलायतेला निघाले. त्या वेळीं पारसनिसानाहि ते आग्रह करून बरोबर घेऊन गेले. छत्रपति म्हणाले

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्ये दिसत नाही.

''तिकडचे लोक ऐतिहासिक वस्तू, वास्तू आणि ग्रंथ संग्रहाच्या खटपटी कशा करतात, त्यांची व्यवस्था कशी ठेवतात, लोकांत इतिहासाची अभिरुची उत्पन्न करण्याचे त्यांचे मार्ग काय काय आहेत, इत्यादि अनेक गोष्टी आमच्या बरोबर विलायतेला येऊन शिका आणि तेथल्या अनुभवावर तुमच्या सर्व मनोरथाची मांडणी करा. आपल्या महाराष्ट्राच्या इतिहासाची पुष्कळ अस्सल सामग्री विलायतेच्या सफरीला रुसून गेलेली आहे; तिची समजूत करून परत आणण्याचें काम फक्त तुम्हीच करावें.'' छत्रपतींच्या धोरणी व उदार उत्तेजनानें आलेला विलायतेच्या सफरीचा योग पारसनिसांना विलक्षण विचार उच्चार व आचारक्रांतिकारक झाला आणि आज त्यांच्या इतिहास-मंदिराला जे एक जगप्रसिद्ध ठसकेबाज रूप प्राप्त झालें आहे, त्याच्या मुळांशीं पारसनिसांचा विलायतेचा अनुभव, तेथील विद्वानांचा परिचय, निरनिराळ्या संस्थांचे काळजीपूर्वक निरीक्षण यांचाच मसाला पडलेला आहे, हे विसरता कामा नये.

विलायतेस मिळालेल्या अनुभवाच्या धोरणानें पारसनिसांनी आपल्या इतिहास-संग्रहाला टापटिपीच्या संस्थेचें रूप देण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याशिवाय मोठमोठ्या प्रतिष्ठित संस्थांमार्फत व्याख्याने देणे आणि ग्रंथ लिहिणें हीं कामें अखंड सुरू होतीच. सन १९०८ साली निर्णयसागर छापखान्याच्या सहकार्यानें त्यांनीं 'इतिहास-संग्रह' मासिक सुरू केलें. त्याच्या ८७ अंकांच्या अजमासें ४००० पृष्ठांत महत्वाची शेंकडों ऐतिहासिक कागदपत्रें प्रसिद्ध झाली. पारसनिसांच्या इतिहास-मंदिराची सुरवात प्रथम त्यांनी आपल्या छोटेखानी रहात्या घरांत 'लायब्ररी' नांवानें केलीं. या लायब्ररीची व्यवस्था, * मिळविलेल्या बखरी व हस्तलिखितें, हिंदुस्थानविषयक जुनें दुर्मिळ नकाशे, प्राचीन रियासतीतील नाणीं, ऐतिहासिक संशोधनाला उपयुक्त असे नाना भाषेतील प्रचंड संदर्भ ग्रंथसंग्रह, वगैरे अनेक गोष्टींमुळें पारसनिसाच्या इतिहास-मंदिराची कीर्ती हिंदुस्थानसरकार, इंग्लंड, जर्मनी, अमेरिकेपर्यंत जाऊन भिडली. मुंबई सरकार तर पारसनिसांच्या प्रयत्नांकडे विशेष कळकळीनें पाहू लागले. सन १९१३ सालीं सरकारनें पारसनिसांना रावबहादुर पदवी देऊन त्यांचा गौरव केला. १९१४ सालीं इतिहास-मंदिरासाठीं इमारत बांधून देण्याची सरकारी योजना झाली. महायुद्धाच्या धरणीकंपानें ती जरी पुढें सांदीला पडली, तरी पासरनिसांच्या चिकाटीच्या प्रयत्नांमुळे १९२४ साली पूर्ण झाली. या ठिकाणी अनेक पौर्वात्य व पाश्चात्य विद्वान भेटी देऊन गेले. प्रो. जदूनाथ सरकारने पारसनिसांच्या इतिहास-मंदिराला ''दक्षिण हिंदुस्थानच्या इतिहासाची मक्का'' असें कौतुकदर्शक नांव दिलें. लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे सेक्रेटरी व इंडिया ऑफीसचे लायब्रेरीयन डॉ. एफ. डब्ल्यू. टॉमस यानीं हें संग्रहालय पाहून, "your beautiful house is a mine of treasure and the very skillful and tasteful arrangment of everything gives additional value to the collection. I am really astonished at the variety and multitude of the Chef-d' oeuvres, which you have brought together. Your museum is, I suppose, unsurpassed in artistic and historical interest by any thing of the kind in India, and I envy you the enjoyment of living among such delights" असे उद्गार काढले. आज पारसनिसांचें इतिहास-मंदीर म्हणजे सातारा येथील 'महाराष्ट्राचा ताजमहाल' होऊन बसले आहे.

पारसनिसांनी पुष्कळ इंग्रेजी व मराठी ऐतिहासिक महत्वाचे * कधीच केल्या नाहीत. म्हणूनच

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्ये दिसत नाही.

त्यांची ** व त्यांचे ऐतिहासिक वाङमय सरकार व लोक या दोघांच्याहि अकिल्मिष आदराला पात्र होऊन बसलीं आहेत. संघशक्तीची आणि लोकाश्रयाची मोठी मिजास मारणाऱ्या पुणेरी भटमंडळाकडून आजपर्यंत इतिहासाची जेवढी सेवा झाली आहे, त्याच्या शतपट महत्वाची कामगिरी एकट्या रावबहादूर पारसनिसांनी करून दाखविली, यातच त्यांच्या जीवनकार्याचें खरें रहस्य आहे. गुणदोषविवेचनाच्या बाबतींत पारसनीस अगदीच शेळपट होते असे नव्हे. उलट पुणेरी भटमंडळांच्या घमेंडखोर चिकित्सेपेक्षां त्यांची निस्पृहता विशेष सडेतोड व दणकट असे. म्हणूनच हे भटमंडळ सुद्धा पारसनिसांच्या चळवळीकडे सवतिमत्सराच्या चित्पावनी नजरेनें पहात असे.

"History makes a young man to be old without either wrinkles or grey hairs, privileging him with the experience of age without either the infirmities or inconveniences thereof." - Dr. Fuller.

"To cite the examples of history, in order to animate us to virtue, or to arm us with fortitude, this it is to call up the illustrious dead to inspire and improve the living." - Colton.

(डॉ. फुल्लर म्हणतात कीं इतिहासाच्या अध्ययनानें काय होतें? तोंडावर एकहि सुरकुति किंवा मस्तकावर एकहि पांढरा केस नसतांना मनुष्य वृद्ध (पोक्त) बनतो आणि काळाच्या उपाधीचा लवमात्र अपाय न भोगतां, शेंकडों शतकांच्या अनुभवांचा मनुष्य हक्कदार होतो. कोल्टन म्हणतो, इतिहास कशाला सांगायचा? तर मनुष्यांत सद्‌गुणांचा संचार व्हावा, त्यांच्या मनगटांत धैर्याची धडाडी यावी, आणि आपले जीवन स्फूर्तिदायक व प्रगमनशील बनावें, म्हणूनच आपण नामांकित मृतांच्या इतिहासाचे संशोधन करीत असतो.) पारसनिसांच्या वाङमयाचा स्वाध्याय करताना प्रत्येकाला हाच अनुभव येतो. त्यांच्या लेखनात पुण्याची नाकझरी कोठेंच आढळणार नाहीं. पारसनिसांच्या मृत्यूनंतर त्यांच्या इतिहास-मंदीराचा लोण्याचा आयता गोळा या नाकझरीच्या पदरांत टाकण्याबद्दल कांहीं भटी पत्रांत सूचना झाल्या होत्या. पण सरकारला अस्सल कमास्सलाची पुरी पारख असल्यामुळें; त्या सूचना जन्मल्या तशाच ठिकच्या ठिकाणी मेल्या.

पारसनिसांनी आपल्या वर्तनानें व कार्यशैलीनें 'नृपति जनपदांना दुर्लभः कार्यकर्ता' हा सिद्धांत खोटा पाडला. १९२१ साली प्रिन्स ऑफ वेल्स पुण्यास आल्या वेळी, त्यांना शनिवार वाड्याची व इतर ऐतिहासिक माहिती देण्यासाठीं, मुंबई सरकारनें रावबहादुरांची निवडणुक केली. त्या वेळी Poona in Bygone Days या इंग्रेजी पुस्तकाची प्रत नजर स्वीकारतांना प्रिन्स ऑफ वेल्सनी पारसनिसांच्या इतिहासविषयक कामगिरीचा आदरयुक्त गौरव केला. हीन दशेंतून स्वतःच्या कर्तबगारीनें एवढ्या नावलौकिकास चढणाऱ्या रावबहादुर पारसनिसांच्या चरित्रांतलें ''योगः कर्मसु कौशलम्'' हें कर्मयोगाचें दिव्य तत्व तरूण महाराष्ट्राला आत्मप्रबोधक होवो, इतकी आशा प्रदर्शित करून, हा लांबलेला चरित्रलेख पुरा करतो.

□□□

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही.

लेख

सर मुडिमनचा मानमोडी कायदा

इंग्रेजांचे राज्य हिंदी लोकांच्या बेकीवर उभारलें, थरारलें आणि आज चिरस्थाई होऊन बसले आहे, असे उद्‌गार पुष्कळ हिंदी व इंग्रेजी मुत्सद्यांच्या तोंडून आपण ऐकले आहेत आणि वाचले आहेत. हिंदी लोकांत जोंपर्यंत बेकी आहे, तोंपर्यंतच इंग्रेजी सत्ता येथें टिकणार, आणि बेकीची एकी होताच, एकतर ती सत्ता अज्जीबात उठून जाणार किंवा भावी भारतीय राष्ट्रसंघांत आत्मसात् होणार, असा कित्येक राजकारणपटूंचा अभिप्राय आहे. इंग्रेजी सत्तेच्या टिकावाचें मर्मच जर हिंदी लोकांच्या बेकीत आहे, 'फोडा आणि झोडा' हीच जिची इतिहासप्रसिद्ध पॉलिसी आहे, तीच सत्ता 'अहो हिंदु मुसलमानांनो, अहो ब्राम्हण ब्राम्हणेतरांनो, अहो स्पृश्य अस्पृश्यांनो, अहो सुधारक दुर्धारकांनो, एकमेकांच्या उरावर बसू नका, भांडू नका, रक्तपात करूं नका, तोंडीं लेखीं शिवीगाळ करूं नका, एकदिल व्हा, एकी करा.' अशा प्रकारचा टाहो फोडूं लागली, म्हणजे सामान्य बुद्धीच्या माणसाला इंग्रेजी सत्ता ही एक महामाया (great illusion) आहे कीं काय? असा भ्रम घरू लागतो. या भ्रमाचे निराकरण सामान्यतः असें करतां येईल. इंग्रेज राज्यकर्ते जन्मतः शिस्तीचे आणि शांतीचे मोठे भोक्ते आहेत. शिस्त आणि कायदा संभाळून हिंदी लोकांनीं शांतीचा बिघाड न करतां बेकीची धुळवड शेणवड कितीहि खेळली, तर माबाप दयाळू सरकार तिकडे कदाचित् कौतुकानें पाहील, अथवा ढूंकून सुद्धा पाहणार नाही. पण तुमच्या बेकीचा धुडगूस जर सार्वत्रिक शांतीच्या समाधीचा भंग करील, आणि शिस्त व कायद्याच्या बाटलीवरील कसरतींत तुमचें पाऊल रेलभर इकडे तिकडे ढळेल वळेल, तर राज्यकारभाराच्या इभ्रतीसाठीं आणि प्रजाजनांच्या माणुसकीच्या हक्कांच्या संरक्षणासाठीं, दयासागर सरकारला आपल्या कायद्याचा राजदंडुकां उचलणें प्राप्तच आहे. 'हिंदु मुसलमानांनो एकदिल व्हा, ब्राम्हण ब्राम्हणेतर * खटला भरला, तरी दोषी वाङमय (वृत्तपत्रे व पुस्तके) जप्त करून नष्ट करण्याची त्यात सवलत नव्हती. क्रिमिनल प्रोसीजरच्या १०८ कलमांतहि हीच अडचण भासे. मात्र ९९-अ कलमाने फक्त राजद्रोही वाङ्मयजप्तीची मुभा ठेवलेली होती. तीच मुभा समाजद्रोही वैमनस्य प्रवर्तक

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्ये दिसत नाही.

व दंग्यांची चिथावणी देणाऱ्या वाङ्मयावरहि असावी, अशी सुधारणा मुडिमन बिलाने केली आहे. क्रि. प्रो. कोडाचे ९९-अ कलम पुढीलप्रमाणे आहे-

(I) Where-(a) any newspaper, or book as defined in the Press and Registration of Books Act, or (b) any document, wherever printed appears to the Local Government to contain any seditious Matter, the Local Government may by notification in the Local Official Gazette, stating the grounds of its opinion declare every copy of the issue of the newspaper containing such matter and every copy of such book or other document to be forfeited to His Majesty and thereupon any Police officer may seize the same wherever found in British India and any Magistrate may by warrant authorise any police officer not below the rank of Sub-Inspector to enter upon and search for the same in any premises where any copy of such issue etc. may be reasonably suspected to be.

यांत Seditious matter याच्या पुढे "or any matter calculated or likely to promote feelings of enmity or hatred between different classes of His Majesty's subjects." असे शब्द जास्त जोडले गेले आहेत. या नवीन कायद्याबद्दल बेळगावचा राष्ट्रवीर

''वेताळ पूर्वस्थळावर आला''

या मथळ्याखाली म्हणतोः-

* वाङ्मय-हस्तपत्रके व पुस्तकें वगैरे क्रि. प्रो. कोडच्या ** कलमाखालीं जप्त करण्याचा सरकारास अधिकार असावा, अशा आशयाचें बिल चालू असेंब्लीच्या बैठकींत पास झालें, हें आम्ही मोठ्या उद्विग्न चित्तानें कळवीत आहों; कारण हें बिल म्हणजे आम्हासारख्या वृत्तपत्रकारांच्या मानेवरची लटकती तरवार होय. ती कधी मानेवर बसेल याचा आम्हांस बिलकूल अंदाज लागत नसल्यामुळें आम्हांस नेहमींच काळजींत राहावें लागणार व यामुळें योग्य विचार प्रसवणारी शक्ति कजाग सासूच्या सुनेसारखीच खुरटली जाणार; हा एकंदरींत राष्ट्रघात होय. सन १९१० च्या प्रेस ॲक्टाला गेल्या असेंब्लीने मूठमाती दिली तेव्हांपासून वाङ्मय सेवक थोडे निश्चिंत होते. परंतु नोकरशाहीला ही निश्चिंति कोठे बघवते? ती मेलेल्या प्रेस ॲक्टाचें भूत हिंदी जनतेच्या मानगुटीवर बसविण्यासाठी टपून बसलेली होती. त्यांत हिंदी लोकांच्या दुर्दैवामुळें हिंदुमुसलमानांत कलहाग्नि भडकला ही मोठी संधि सरकाराला मिळाली. ही संधि साधून सरकारनं हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षाचा विचार करणारे रॉयल कमिशन बिन मुदतीवर पुढे तर ढकललेंच, परंतु हिंदी लोकांना एवढेंच शासन पुरेसें न वाटून त्यांच्या मानेभोवती ९९-अ कलमाची तांत जखडून टाकण्याचें सरकारनें पुण्य संपादिले.

हिंदी लोकांना स्वयंनिर्णयाचे कसलेहि विशेष अधिकार नसले, तरी कायदे करण्या बदलण्यासाठी हात वरखालीं हलविण्याचें स्वराज्य त्यांना लाभलेलें आहे. पण याहि बाबतीत आमच्या हिंदी पुढाऱ्यांत हरघडी फदफदत असलेलें पक्षभेदाचें व जातिभेदाचें गजकर्ण या मानमोडी बिलाच्या वेळींहि भोवले. लोकहिताची वेळीं अवेळीं नारोशंकरी मिजास मारणारे 'स्वराजिष्ट' (म्हणजे सध्यां रिस्पॉनसिबिस्ट किंवा

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही. * उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्ये दिसत नाही.

प्रतिसहकारीत्वाची ओढणी घेतलेले स्वयंशिष्ट लोक) सिमल्यास हजर असूनहि या भयंकर बिलाच्या चर्चेच्या वेळी सुतक्याप्रमाणे मुद्दाम कौन्सिल हॉलच्या खालच्या मजल्यावर स्वस्थ बसले होते. सर हरिसिंग गौर, के.सी. नियोगी, लाला लजपतराय, सर पुरुषोत्तमदास, पंडित मालवीय, शामलाल नेहरू, जिना इत्यादि लोकनियुक्त मूठभर सभासदांनी या बिलाला शक्य तितका विरोध केला. पण पक्षाळू सुतकी स्वराजिष्ठांच्या जाणून बुजून गैरहजेरीमुळें सरकारी व इस्लामी होयबा सभासदांचा जोर अवस्थेत होते. अभिनव प्रजासत्ताक तुर्की राष्ट्र, हिंदुस्थानच्या नाकावर दाब ठेऊन बसलेला हिंदी मुसलमानांचा कट्टा अभिमानी अफगाणिस्थान, बोलशेविक रशियाची अफगाणिस्थानाशी सुरू असलेली विरादस्कीची लाडीगोडी, मोसलच्या तेलाच्या खाणींचा वाद, नेपाळच्या मनुस्मृति प्रासादिक भटाळलेल्या राजाच्या आंतरराष्ट्रीय संबंधाचा निर्णय, देशी संस्थानिकांच्या नात्यागोत्याची स्पष्ट छाननी, वगैरे शेंकडों प्रश्नांचा निकाल लागेपर्यंत ब्रिटिश सिंहाला हिंदु मुसलमानांच्या दंग्याची दलामल विचारांत घेण्याची विशेष अवश्यकता वाटली नाही. तसें त्याला करतांच येणें शक्य नव्हतें. इतक्या भानगडींच्या पाट्याखाली सापडलेला हात सफाईत सुटल्याशिवाय हिंदी चळवळ्यांना थप्पड लगावणें ब्रिटीश सिंहाला जरा जडच गेलें असतें. देशी संस्थानिक कोणत्या झाडाचे पाले आहेत, हे माजी व्हाईसरॉयने स्पष्ट उद्गारांत जाहीर करून नाभा व इंदोर संस्थानिकांची चटणी प्रत्यक्ष वाटून दाखविली, आणि हैद्राबादच्या निझामाला सुद्धां ब्रिटीश पाट्यावरवंट्याच्या दणदणीत अक्षता लाऊन निजधामीं गमन केलें. त्यानंतर शेकीप्रिय लॉर्ड आयर्विन साहेबांची कारकीर्द सुरू होतांनाच कलकत्त्याच्या दंग्याची त्यांना सलामी मिळाली. येथपर्यंत बऱ्याच राजकारणी घडामोडी झाल्या. १७ ऑगष्ट रोजीं व्हाईसरॉय साहेबांनीं लेजिस्लेटिव असेंब्लीचा 'ओपणिंग शिरोमणी करताना' या घडामोडीचा इतिहास याप्रमाणें निवेदन केलाः- ''नेपाळ अफगाणीस्थान आणि इतर शेजारी राष्ट्रांचे व हिंदुस्थानाचे हितसंबंध आतां खास दोस्तीचे झाले आहेत, हे सांगण्यास मला फार आनंद होत आहे. बादशाही सरकार व तुर्की सरकार यांच्यामध्ये मोसल प्रकरणीं जो ठळक वाद पडला होता, तोहि आतां साफ मिटून परस्परांची दिलसफाई झालेली आहे आणि त्यामुळें मुसलमान समाज व सामान्य हिंदी लोकमत यांनी आनंद व्यक्त केला आहे.'' याशिवाय इतर अनेक गोष्टींचा उल्लेख झाल्यावर, व्हाईसरॉयसाहेब हिंदुमुसलमानांच्या दंग्याकडे वळले. या क्षणापर्यंत मुग्ध व कुंद असलेल्या राजकारणी आकाशांत विद्युल्लतेची ही पहिलीच सलामी झडली व तात्काळ जबाबदार ढगांचा वातावरणांत संचार सुरूं झाला. हिंदुमुसलमानांच्या दंग्यांमुळे राजकीय सुधारणांचा दुसरा हप्ता लांबणीवर जाणार आणि सरकारला या दंग्यांची निवृत्ती करण्यासाठी कायद्याचे शस्त्र पाजळावें लागणार, या दोन सूत्रांचा उद्गार व्हाईसरायच्या मुखांतून निघतों न निघतो तोंच त्याच असेंब्लीच्या बैठकीत सरकारतर्फे सर मुडीमन यांचे लेखकांच्या मानमोडीचें बिल गुरगुरत दत्त म्हणून उभेच! ब्रिटीश सिंहाची कोणतीहि गर्जना काकतालीय न्यायाची नसते. सर्व कारभार घड्याळातल्या यंत्ररचनेप्रमाणे शिस्तवार व कदरबाजच असायचा. सर्व राज्यघटनाच मोठी कौतुकास्पद आहे. त्यांची मुत्सद्देगिरी कमालीची अंतर्मुख असल्यामुळें उघड्या हवेवर वाचाळ पंचविशीची व लेखनबत्तीशांची बहिर्मुख चळवळ करणारे हिंदी पुढारी वरचेवर तोंडघशी पडतात.

मागच्या लेजिस्लेटिव असेंब्लीनें प्रेस ॲक्ट रद्द ठरविल्यामुळें नोकरशाहीच्या क्रीडेला विरंगुळ्याचे एक साधन नाहीसें झालें होतें. तंरी सुद्धां छापखान्यांच्या खिळ्यांवर आणि वक्त्यांच्या जिभल्यांवर

बिब्बा घालणारे १२४-अ, १५३-अ, बेअब्रूचा कायदा इत्यादि शस्त्रास्त्रें पिनल कोडाच्या शस्त्रागारांत नेहमीच उजाळा देऊन झकफक तयार ठेवलेली आहेतच; नाहींत असें नाहीं. किंवा या शस्त्रांना वर्षांतून दसऱ्यांचे ऊन्ह एकदांच दाखविण्यांत येते, अशांतलाहि कांहीं प्रकार नाहीं. या शस्त्रांना साऱ्या वर्षभर पुरेल इतकें खाद्य पुरविण्यांत नोकरशाहीचे खंदे वीर एकापरीस एक मसलती आहेतच. पण तेवढ्यानें त्यांची सत्तामदाची तहान भूक भागत नाहीं म्हणा, किंवा आंग्रेज बहादूर सरकारका बादशाही दरारा हवा तसा भरारा गर्जन नाही म्हणून म्हणा, हिंदु मुसलमानांच्या दंग्याच्या निमित्तानें सर मुडिमन यांनी सरकार तर्फे 'सामाजिक द्वंद्वोत्तेजक द्वैतीवाङमयजप्तीचा कायदा (Bill for confiscation of documents inciting communal strife.) असेंब्लीपुढें मांडला, आणि लोकप्रतिनिधींच्या निषेधाची, सूचनांची, सुधारणांची, विनंतीची किंवा * गेली चार पांच वर्षे सर्व हिंदुस्थानभर हिंदुमुसलमानांचे रक्तपाताचे दंगे आणि महाराष्ट्रभर ब्राम्हण ब्राम्हणेतरांची वाचाळ लेखाळ युद्धें धूम धडाक्यानें चालूं आहेत. पैकीं दिल्ली राजधानींत व आसपासच्या सर्व उत्तर हिंदुस्थानांत हिंदु मुसलमानांची बंडाळी भयंकर मातलेली आहे. ही शोचनीय परिस्थिति एकाकी अवचित उत्पन्न झालेली नसून, तिची वाढ खिलाफतीच्या चळवळीपासून उघड माथ्याने होत होत आज तिला हे उग्र स्वरूप प्राप्त झालेलें आहे. मद्रासकडे मोपल्यांचे बंड झाले, कोहटला हिंदु रयत घरादाराला मुकून देशोधडीला लागली, खुद्द दिल्ली राजधानीहि अनेक वेळां रक्तपाताची रंगभूमी बनली, तरी सरकारनें या बंडाच्या उत्पत्ति स्थितीची दरकार केली नाहीं. मध्यप्रांतात व मुंबई इलाख्यांतहि नागपूर, आकोला, मालेगांव, सोलापुरांत इतिहासाच्या पुनरावृत्त्या ठणाणल्या, पण सरकारनें मामुली हडेलहप्पी व कोर्टातली खटलेबाजी यापेक्षा अधिक कांहीच हालचाल केली नाहीं. प्रत्येक मुकाबल्यांत मुसलमानांनी हिंदूंनाच नामोहरम केल्यामुळें आणि सरकारहि मौन सर्वार्थ साधनम्च्या समाधीत मग्न राहिल्यामुळें, मुसलमानांचा शिरजोरपणा प्रत्येक लहान मोठ्या बाबतीत हिंदूंना त्राहि भगवन् करू लागला. जबरीची बाटवाबाटवी, बायका मुलें पळविणें, घरेंदारें जाळणें, इत्यादि अनंत अत्याचारांच्या तोंडावरच हिंदूना जेव्हा अनाथ अपंग स्थितींत पडावें लागले, जेव्हा त्यांचे पुढारीहि दिवाणखानी राजकारणी भुसाड गप्पां पलीकडे पाऊल न टाकण्याइतके पावणेआठ ठरले, तेंव्हा आर्यसमाजाच्या जोरदार सक्रीय प्रेरणेने शुद्धी व संघटनाचा शांत मार्ग केवळ आत्मपरित्राणासाठी हिंदूंना आक्रमिणें अर्थात् भागच पडलें. पण हिंदूंची मजल येथवर येईपर्यंत इस्लामी पुढारी, पत्रकार, प्रवर्तक, वक्ते, लेखक यांनीं इतकी जोमदार ॲन्टीहिंदू (हिंदुविरोधी) संघटना केली की सरकारच्या पिनल कोडी कलमांना * मलिद्यावर पोसले जाऊं लागले. तरीहि आमच्या * वित्त-पित्ताचे पालक इंग्रेजसरकार आईस्क्रीमच! हिंदूंनी हा तोंड दाबून बुक्यांचा मार किती दिवस सहन करायचा? हिंदूंच्या सहनशीलतेलाहि कांही मर्यादा आहेच कीं नाही? मुसलमानी वृत्तपत्रें पॅम्फलेटे व व्याख्यानें यांतून हिंदूंवर हवा तसला वाक्प्रहार सुरू झाल्यावर, हिंदूंना तरी स्वस्थ कसे बसतां येणार? आमच्या गाढव आजापणजांनी इंग्रेजांच्या पिनलकोडावर विश्वास टाकून शस्त्रसंन्यास घेतला, पण आयाबहिणी बायकांच्या पळवापळवी, जबरीच्या बाटवाबाटवी आणि ऊठ सोट्या तुझे राज्य असली चीडखोर (provocative) ठोकाठोकी निमूट सहन करण्याइतकी त्यांची हृदये अझून मेल्या मुर्द्याची काळजे

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्ये दिसत नाही.

बनलेली नाहीत. अर्थात् बोलास बोल, टोलास टोला आणि डोळ्यास डोळा, असें या संग्रामाचें स्वरूप वाढत गेले आणि त्याचा कमाल कळस कलकत्त्याच्या दंग्यांत झाला.

या दुर्दैवी घटनेच्या क्षणापर्यंत हिंदुस्थानांतल्या व बाहेरच्या राजकारणात बऱ्याच घडामोडी झाल्या. आतापर्यंत ब्रिटिश सिंहाच्या मौनवृत्तीबद्दल सर्वांना बरेच आश्चर्य वाटत होते. ब्रिटिश सिंहाची मौनवृत्ती म्हणजे भावी गण्डांतराची कांहीं तरी एखादी निष्पत्ति असते. ब्रिटिश राजकारणाच्या आकाशात मेघांचा गडगडाट सुरू झाला की त्याविषयी फारशी कोणी दखल करावी लागत नाहीं. फार झाले तर कोठें महापूर येतो, दहापाच ठिकाणी विद्युत्पात होतो, आणि विजेच्या कडकडाटानें सारा हिंदुस्थान दणाणतो. पण धड ना पाऊस धड ना ऊन, धड ना गडगडाट धड ना उघाड, अशा रीतीनें आकाश कोंदाटलें कीं बेलाशक खूणगांठ बांधावी कीं हिंदी राजकारणांत काही तरी विलक्षण वज्राघाताची घडामोड ब्रिटिश मुत्सद्यांच्या मस्तकांत शिजून लवकरच बाहेर पडणार. ब्रिटिश मुत्सद्दी म्हणजे ''राजकारण बहुत करावें, परंतु कळोच नेदावें'' या रामदासी दण्डकांच कट्टे शागीर्द! पण रामदासाच्या अब्रूसाठी जीव टाकणारी कायदेबाज राजकारणी भटें पहावीं तों त्यांच्या खाकेंत फक्त झोळी आणि तोंडाची वटवट मात्र शिल्लक! कलकत्त्यास हिंदु मुसलमानांचा भयंकर दंगा होईपर्यंत ब्रिटिश राजकारणांचे परराष्ट्रीय संबंध किंचित शंकास्पद वाढला. अखेर सर हरीसिंग गौर निराशेनें म्हणाले ''लोकनियुक्त सभासदांनी आपलें कर्तव्य कमाल कसोशीनें केलें. पण आयत्या वेळीं या स्वराजिष्ठांनी आमचा गळा कापला.'' त्यावर कोणीसे उत्तर दिले ''अहो, ते तुमचे स्वराजिष्ठ खाली गप्पा मारीत बसले आहेत.''

तेहतीस कोटी नांवांनी जसा एकच देव ओळखला जातो, किंवा एकच कीटक जसा आज सुरवंट, तर उद्या फुलपांखरूं, तर परवां पतंग बनतो, तसेच हे स्वराजिष्ठ लोक होत. प्रथम हे टिळकी जहाल होते, नंतर राष्ट्रीय बनले. राष्ट्रीयाचे झाले असहकारी (मानकापरेटर!), असहकाऱ्याचे बनले कौन्सिलमोढे स्वराजिष्ठ. आता तेच स्वराजिष्ट लोकांच्या पुढे प्रतिसहकारी, रिस्पॉनसिबिस्ट असल्या नव्या रंगाढंगाने नाचू लागले आहेत. रंगढंग नव्या नावाचा असला तरी त्यांचा कावा जुनाच आहे. पूर्वीचाच जुना टिळकी जहाल धोंडा, पण वर शेंदूर मात्र नवीन थापलेला. मेलेला प्रेस ॲक्ट मुडीमनच्या मानमोडी बिलानें पुन्हा आपला सैतानी संचार नव्या रूपात भयंकर जोरानें चालूं करणार, हे स्वराज्यासाठी जीव टाकणाऱ्या या स्वराजिष्ठांना पूर्ण माहीत असूनहि त्यांनी केवळ पक्षाच्या मिजाशीसाठीं असेंब्लीत सुतक पाळण्याचे बदकर्म करावें, ही एकच ठळक गोष्ट त्यांच्या स्वराज्यविषयक वल्गनांचा पोकळपणा सिद्ध करणारी आहे. राष्ट्राच्या विचार व उच्चार स्वातंत्र्याच्या मानेला फास लागतो आहे, हें उघड्या डोळ्यांना दिसत असूनहि, ज्या सोंगाड्या स्वराजिष्ठांना उर्फ रिस्पॉनसिबिस्टांना क्षुद्र पक्षभेदाच्या इभ्रतीसाठी असेंब्लीत गैरहजेरीचे सुतक पाळण्याचा मोह आंवरतां आला नाहीं, व त्यामुळें सरकारपक्ष व होयबापक्ष शिरजोर बनून त्यांनी बहुमताच्या जोरावर मुडीमनची मानमोडी कुऱ्हाड बेशक राष्ट्राच्या मस्तकावर हाणली, त्या सोंगाड्या राष्ट्रद्रोह्यांना नवीन निवडणुकीत निवडून पाठविणारे मतदार एकतर महामूर्ख अजागळ तरी असतील, किंवा रिस्पॉनसिबिस्टांप्रमाणेच राष्ट्रद्रोही असतील, यापेक्षा तिसरी निराळी कल्पनाच संभवत नाहीं. गेल्या तीन वर्षांच्या अवधीत मुंबई मुनिसिपालटी, ठिकठिकाणची कायदे कौन्सिलें व असेंब्लीमध्यें या मिजासखोर स्वराजिष्ठांच्या सुतकी बाण्यामुळें सरकार, भांडवलवाले आणि होयबा या पक्षांनी लोकमतावर बहुसंख्यावाची मात करून लोकहितविरोधी कित्येक बिलें पास करून

टाकलेली आहेत. अर्थात् या सर्व पापाचे माप स्वराजिष्ठांच्याच माथीं आहे. पक्षाभिमानापुढें राष्ट्रहिताची ज्यांना दरकार नाही, त्यांच्या शहाणपणावर लोकांनी विश्वास टाकणें आत्मघातकीपणाचें आहे. मुडीमन कायद्याच्या फांसावर बळी जाणाऱ्या सर्व हिंदवासी बऱ्या वाईट लेखकांनी जीव जाण्यापूर्वी स्वराजिष्ट ऊर्फ रिस्पॉनसिबिस्ट चाणक्यांना आशीर्वाद देऊन मग सुखानें प्राण सोडावा, अशी शिफारस करण्यापलीकडे कोणाच्याच हाती कांहीं राहिलें नाहीं. कारण लोकमत-प्रातिनिधिक रिकाम्या खुर्च्यांचा फायदा घेऊन असेंब्लीत पास झालेल्या या मुडीमन बिलाला कौन्सिल ऑफ स्टेटचा एकमताचा आशीर्वाद मिळून तें कायमच्या कायद्याच्या स्वरूपात पिनल कोडाच्या देव्हाऱ्यांत विराजमान सुद्धां झालें.

कायदा आणि शिस्त यांची सरकार प्रमाणेंच प्रत्येक विवेकी नागरीकाला विवंचना व आवश्यकता वाटतच आहे. गेल्या पाऊणशें वर्षांत हिंदी नागरीक शस्त्रसंन्याशी झाल्यामुळें, शांतिब्रम्हत्वाचे ते इतके कट्टे भोक्ते बनले कीं एका गालावर चापट बसली तर दुसरा गाल पुढें करण्याची क्रिस्तस्मृति क्रिस्ती सरकारपेक्षा हिंदी-व विशेषतः हिंदु-लोकच अधिक अत्याग्रहानें, किंबहुना सत्याग्रहाने, अक्षरशः पाळीत आहेत. गुन्हे करण्याच्या मानवी प्रवृत्तीच्या अनंत उघड गुप्त प्रकारांची पिनल कोडात इतकी काटेकोर बडदास्त ठेवण्यात आलेली आहे कीं तेवढ्यावर सरकारी न्यायदानाचा व्यापार आणि कज्जेदलालांची अडत आयात निर्गत इतर व्यापारांच्या दसपट तरी निदान खास किफायतीने चांलू आहे. समाजा समाजात वैमनस्य वाढविणारया तोंडी लेखी विचारांना शिक्षा ठोठावणारे १५३-अ कलम पिनल कोडात होतेच. राजद्रोहाच्या १२४-अ कलमा प्रमाणें, या कलमाखाली गुन्हा करणारावर खटला भरून आरोप सिद्ध झाल्यास वैमनस्य-प्रवर्तक लेख जप्त करण्याचा कोर्टाला अधिकार होताच. परंतु हिंदु-मुसलमानांच्या बंडाळीच्या वणव्याचा पसारा पाहून, प्रत्येक लहान मोठ्या * करीत बसण्यापेक्षां, ९९-अ कलमालाच एका छोटेखानी पुस्तीचे कलम करून, दिसतील भासतील वाटतील तें आक्षिप्त लेख झटपट जप्त करण्याचा अधिकार मुडीमन बिलानें सरकारला मिळवून दिला आहे. याचा परिणाम साहजिकच असा होणार कीं लेखाचे आक्षिप्त-अनाक्षिप्तत्व ठरविण्याचा मामला पोलीस आणि मॅजिस्ट्रेटांकडे जाणार, नव्हे, गेला सुद्धां, आणि लेखकाला मात्र सत्याऽसत्याची छाननी करून घेण्याचा न्यायमंदीराचा दरवाजा बंद! या प्रकाराला मुस्कटदाबी शिवाय कोणतें दुसरें यथार्थ नांव देता येईल? आरोप खरा असों वा खोटा असो, कायदेबाजीच्या रबरी ओढाताणींत तो टिको वा तुटो, पण न्यायमंदीरांत चौकशीचा फार्स झाला म्हणजे आरोपीला कडक शिक्षा स्वीकारतांनाहि फारशी मळमळ उरत नाहीं. लोकांनाहि बरा वाईट न्याय झालेला पहावयास किंवा ऐकावयास मिळतो. इतकेच नव्हे, तर न्यायदानाच्या वेदोक्त पुराणोक्ताच्या बारीक सारीक वळणांचीहि खूणगांठ मनाशी बांधता येते. पण न्यायचौकशीचा दरवाजा बंद ठेऊन, झपकन् जप्ती आणि टपकन् ठपक्याचा हा मानमोडी कायदा म्हणजे स्वातंत्र्यप्रिय ब्रिटीश राज्यांतला मृत प्रेस ॲक्टा इतकाच शोचनीय अन्याय म्हटला तरी चालेल! कैलासवासी प्रेस आक्टाच्या अंमदानीत सिक्यूरिटीचे जप्तीचे दंडाचे आणि शिक्षेचे घडलेले अत्याचार जरी दृष्टीआड केले, तरी राजद्रोहाच्या व बेअब्रूच्या आजपर्यंतच्या खटल्यांत, आरोप सिद्ध करतांना, मराठी भाषेंतील शब्दप्रयोगांची झालेली ओढाताण, निरनिराळ्या वाक्यांचे व तुटक तुटक शब्दांचे

* उपलब्ध झालेल्या अंकात वाक्य दिसत नाही.

आरोपलेले अर्थ आणि त्या पार्यी सबंध लेखाचें पार उलटें पालटें केलेलें विद्रूप, हा इतिहास जोपर्यंत स्मृतीत ताजा आहे, तों पर्यंत ९९-अ कलमावर चढविलेल्या या नवीन मुडीमनी कलमाचा जालीमपणा म्हणजे पोलीस व मॅजिस्ट्रेटांच्या हातात एक निरंकुश जाज्वल्य शस्त्रच सांपडलें, असें म्हणणें प्राप्त आहे. इतकेंच नव्हें, तर जाती जातींतील वैमनस्याला आळा घालण्यासाठी जन्मास आलेल्या या कायद्याची अंमलबजावणी सुद्धा जातीवैमनस्याच्या मनोभूमिकेतूनच महाराष्ट्रभर थैमान घातल्याशिवाय राहणार नाही अशी आमची स्पष्ट कल्पना आहे. हीच शंका पंडित मालविय योनी ॲसेंब्लित बोलून दाखविली. ते म्हणाले "The power given to a police sub-Inspector to search any premises, where copies of a proscribed pamphlet may be or may reasonably be suspected to be might in the present state of communal tension, make such police officers search places on communal considerations." सरकारी अधिकारी झाले तरी ते सर्वच काही अद्वैत परब्रम्हाचे अवतार नव्हते. ते हिंदी आहेत, तोंपर्यंत त्यांच्या पिंडीं ते ब्रम्हांडी झोंबलेला जातीभेद त्यांना हृदयांतून हुसका तांच येणें शक्य नाहीं. त्यांतल्या त्यांत कायद्याचीच सवलत मुबलक असली तर त्याच्या जोरावर माबाप सरकारची सेवा बजावतानांच स्वजातीची सेवा करून, एका धोंड्याने दोन पक्षी मारणाऱ्या धोंडोपंतांचा हिंदुस्थानांत व विशेषतः महाराष्ट्रात मुळीच दुष्काळ नाहीं. पंडीत मालवीय यांनी अशीहि सूचना केली होती कीं एक तीन निस्पृह विद्वान लोकांचे मंडळ असावे, आणि जाति-वैमनस्याला चिथावणी देणारीं कोणती जहाल पॅम्फ्लेटें जप्त करावी, याचा सल्ला त्या मंडळाने स्थानिक सरकारास द्यावा. पण सरकारतर्फे या बिलाच्या वेळीं इतका ताठरपणा दाखविण्यांत आला की डॉ. गौर, के.सी. नियोगी, बॅरीस्टर जिना, लाला लजपतराय, पंडित मालवीय, श्रीयुत दास यांच्या सारख्या अनेक बुद्धिमंतांच्या अगदीं साध्या सर्व न्याय्य सूचनांचा पूर्ण धिःकार करण्यांत आला. जाति-वैमनस्य-प्रसारक वाङमयाला आळा घालण्याबद्दल कोणाचीच तक्रार नव्हती. आमची तर मुळीच नाही. उलट आम्ही चार पावले पुढें जाऊन म्हणतो कीं या वाङमया बरोबरच बीभत्स छिनाल अशा लव्हाळ्या वाङमयाचीहि जप्ती होऊन लेखकांना शिक्षा व्हाव्या. परंतु या गुन्ह्यांची नीट विचारपूर्वक चौकशी होऊन मग द्यावयाच्या त्या शिक्षा खुशाल न देतां, एकदम जप्ती धरपकडीचा सही केलेला कोरा चेक जर सरकारने पोलीस आणि मॅजिस्ट्रेटांच्या हवालीं केला, तर आंग्लाईतच मोंगलाई निपजायला काही अवकाश नाहीं. श्रीयुत शामलाल नेहरूंनी तर अशी सूचना केली की ''जातिवैमनस्याला जर आळाच घालायचा असेल, तर हें बिल परत घ्या, आणि दुसरे नवें बिल असेंब्लीपुढे मांडा. त्यांत अशी सोय ठेवा की जातिवैमनस्याचा गुन्हा करणाराची योग्य ती चौकशी होऊन गुन्हा शाबीत ठरला तर जास्तीतली जास्त शिक्षा त्याला ठोठावा. मी म्हणतो अगदीं फाशीची शिक्षा ठेवा. पण चौकशीशिवाय जप्ती हा अन्याय आहे.''

एखाद्या सावजावर वाघानें जशी नकळत अचानक झांप टाकावी, तसल्याच झांपेनें हें बिल अचानक असेंब्लीपुढे आलें. लोकांवर ज्या कायद्याचें नियंत्रण चालू व्हायचें, त्यांच्या विचारासाठीं मतासाठी किंवा सूचनांसाठीं कोणतेंहि बिल आधी प्रसिद्ध केले तर त्यांत सरकारची न्यायबुद्धी व राज्यनियंत्रणाचा प्रामाणिकपणा विशेष शोभून दिसतो. पण आमच्या दयाळू माबाप सरकारचा कचकाच कांहीं न्यारा! मुडीमन बिलानें लोकमताची पर्वाच केली नाहीं. बरें नाहीं तर नाहीं. या बिलाची चर्चा करायला एका छोटेखानी सिलेक्ट कमेटीला दोन तासांचा तरी अवधी द्या, म्हणून विनंती केली, तिचाहि सरकारतर्फे ताठरपणाने

धिक्कारच झाला. बॅरिस्टर जिना म्हणाले ''जातीजातीतलें तंटे काही जगाच्या अंतापर्यंत चालणारे नव्हते. त्या साठीं अधिकारी वर्गाला बेसुमार अधिकार देणाऱ्या या कायद्याची पिनल कोडांत कायमची स्थापना करण्याचें कारण नाहीं. याची मुदत फार फार तर ठेवा दोन वर्षाची. शिवाय, या कायद्याची भाषाच अशी लांबरुंद आहें कीं एखाद्या अन्यायपीडित मनुष्यानें स्थानिक सरकारच्या हुकमाविरुद्ध हायकोर्टाकडे फेरतपासणीचा अर्ज केला, तर तेथें सुद्धां त्याची डाळ शिजायची नाहीं. माझी सर मुडिमन साहेबांना कळकळीची विनंती आहे कीं केवळ बहुमताच्या जोरावर तुम्ही बेहोष होऊं नका.''

या सर्व लोकमत-उपमर्दक प्रकारावरून या कायद्याच्या मुळांशी सरकारची काय काय धोरणे असावी, याचा ज्याला जसा साधेल तसा कयास बांधावा. लोकमतजागृतीचें व स्वतंत्र विचारप्रदर्शनाचें कार्य प्रामाणिकपणें करणाऱ्या महाराष्ट्रीय लेखकसंघाच्या वतीनें आम्ही एवढेच म्हणूं शकूं कीं पोलीस व मॅजिस्ट्रेट यांच्या हाती चौकशी शिवाय जप्तीचा अधिकार देणारा हा मुडिमन कायदा, मूळ हेतूत किती उत्तम असला, तरी त्याच्या अंमलबजावणीचे स्वरूप अत्यंत बेजबाबदार होऊन, त्यांत सुक्या बरोबर ओल्याचीहि होळी होण्याचा पुष्कळ संभव आहे. अंमलबजावणी करताना डोकें (discretion) वापरण्याच्या सूचना सोडण्यांत येतील, या सरकारच्या दिवाणखानी वचनांवर आता कोणाचाहि विश्वास नाही. प्रेस ॲक्ट जन्माला आला, त्या वेळीं कै. नामदार गोखल्यासारख्या कट्ट्या विरोधकाचे तोंड याच सबबीवर बंद करण्यांत आलें. पण पुढें त्याच आक्टाने सर्व देशभर काय धिंगाणा घातला तो कोणाच्याहि स्मरणांतून जाणें नाहीं. फिर्यादी तोच न्यायाधीश आणि पोलीस तोच सेन्सॉर, अशा अवस्थेमध्यें स्पष्टोक्तीची किंवा कसल्याहि उक्तीची गळचेपीच होणार. परंतु तोंडावाटे किंवा लेखावाटे उद्‌गार निघण्याचे बंद झाले, अथवा सर्व मुद्रणालयांनीच आपले दरवाजे बंद केले, कीं तेवढ्यानें सर्वत्र दिसून येणारी मुग्धता व स्मशानशांतता म्हणजे जातिवैमनस्याचा समूळ निरास, असें सरकारला खरोखरच वाटत आहे काय?

मुडिमन कायद्याची मूळ प्रेरणा उत्तर हिंदुस्थानांतल्या हिंदु मुसलमानांच्या भरंसाट दंग्याने झाली. या दंग्याच्या चिथावणीचे भयंकर कार्य तिकडील इस्लामी पत्रकार व पॅम्फलेटे यांनीच केले. हिंदूंनाहि त्या पॅम्फलेटी हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठीं, म्हणजे ऑफेन्सिबला डिफेन्सिवची टक्कर देण्यासाठी, तोच प्रयोग हातीं घेणें भाग पडलें. अखेर, परराष्ट्रीय राजकारणी त्रांगड्यांतून आमच्या सरकारचा हात थोडा मोकळा होतांच त्यांनीं या दोघांहि भांडखोर समाजांना (कम्युनिटीज) तोंडबेडी व कलमबेडी चढविण्याचा प्रस्तुत उपक्रम केला. तो केला हे उत्तमच झाले. तो करायलाच पाहिजे होता. याबद्दल आमचे किंवा कोणाहि शांतिप्रिय विवेकी माणसाचे दुमत नाहीं. हा कायदा कम्यूनल स्ट्राईपर म्हणजे समाजासमाजांतले तंटे बंद पाडण्यासाठी झाला. कम्यूनिटी म्हणजे समाज; त्याचा अर्थ * करणें चमत्कारीक होईल. हिंदु आणि मुसलमान दोन समाज आहेत; या दोन कम्यूनिटी आहेत. क्लासेस आहेत; कास्टस नव्हेत; जाती नव्हत्या. मुसलमानांत कांही धर्मभेद असले, तरी जाती मुळींच नाहीत. त्यांच्यात अमीर व फकीर ताटी जेवतात. * कम्युनिटीत हजारो आहेत; आणि त्यांच्यामध्ये कोणत्याहि प्रकारची एकी, सामाजिक समता, धार्मिक मतैक्य, किंवा परस्पर सहानुभूती मुळींच नाहीं. बरे, ब्राम्हण आणि ब्राम्हणेतर अशा दोन कम्युनिटी मानाव्या, तरीहि मोठी अडचणच आहे. खुद्द ब्राम्हणांतहि भेद,

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही.

पोटभेद, धर्मभेद, प्रांतभेद व आचारभेद यांचा भयंकर सुळसुळाट असून, कोकणस्थ देशस्थ कऱ्हाडे सारस्वत दैवज्ञ गोवर्धन वगैरेचे तंटे आज शेकडो वर्षे चालतच आहेत. त्यांच्यातली वैमनस्याची त्रांगडीं घरोंघरीं रस्तोरस्तीं देवळोंदेवळीं ऑफीसोऑफीसीं आणि संस्थोसंस्थीं आसरकार धडशापर्यंत सर्वांना दिसत आहेत. ब्राम्हणांत जर असले शंभर जातीभेद, तर ब्राम्हणेतरांत निदान पन्नास हजार जातीभेद, जातीमत्सर व वैमनस्यें आहेत. या शिवाय, पुन्हा या बारभाई खेतीच्या जातभेदी व जातवैमनस्यी हिंदूहिंदूत स्पृश्य आणि अस्पृश्य हा ठळक जातिभेद आहेच. खुद्द अस्पृश्यांत सुद्धा उच्च नीचतेचे तंटे व स्पृश्याऽस्पृश्यत्वाचे वैमनस्य आहेच. तात्पर्य, जेथे प्रत्येक घरागणिक जातिभेद आणि माणसागणिक मतभेद, तेथे मुडिमनचा मानमोडी कायदा व्यक्तिमात्राच्या चुलीपर्यंत घुसून जातिभेद्या हिंदू समाजाला राष्ट्रैक्याचा गायत्री मंत्र शिकविणार कीं काय? छापखान्यांचे लेखकांचे आणि वक्त्यांचे दात पाडले, तरी ज्या हिंदूंचा पिंडच मुळी जातिभेदाचा आणि तज्जन्य जातिद्वेषाचा, त्यांच्या हजारो जातीजातींतलीं लहान मोठीं वैमनस्याचीं खेकटीं निपटण्याचें काम कायद्याच्या जोरावर सरकार करू म्हणेल, तर त्यांना हिंदूंच्या स्वभावाचें व प्रकृतीचें ज्ञानच नाही असें म्हणावें लागेल. अहो, जेथे आमचा हिंदु धर्मच मुळीं जातिभेदावर जगला आहे, त्या जातीभेदजन्य वैमनस्याची मान मोडतांच आमचा तो चातुर्वर्ण्यात्मक, ब्रम्हश्वासोत्पदा, सनातन हिंदुधर्म तडाक्यासरसा ओंकारेश्वरावर जळेल, त्याची वाट काय? भालाकार भोपटकरांच्या पवित्र वार्णीनेच सरकारला बजावून सांगायचें तर 'या पृथ्वीवर माती आहे तोवर जाती या राहणारच.' याचें पुढील पालुपद म्हणजे 'जोवर जाती राहणार, तोवर जातिभेद राहणार. जातीभेद हा सनातन धर्ममान्य. * जातिद्वेष हा हिंदूंचा जन्मसिद्ध हक्क आहे.' * देताना सरकार दमतें कीं जातिद्वेषाळू हिंदु भिक्षुकी धर्म दमतो, हें भविष्य काळानें पाहून घ्यावें.

जो कायदा समाजांसाठीं अंस्तित्वांत आला, त्याची अंमलबजावणी जातींच्या चुलीपर्यंत आणल्यास तें किती हास्यास्पद होईल, याची वाचकांना चांगली अटकळ आता आली असेल. कम्यूनल स्ट्राईपस म्हणजे कास्ट स्ट्राईपस मानणें चुकीचें आहे. प्रस्तुत कायद्याचा अंमल हिंदु-मुसलमान, मुसलमान-पारशी, अखिल हिंदीलोक-आंग्लो इंडियन्स, असल्या कम्युनिटींच्या वैमनस्याला लावला तर काही शोभून दिसेल. परंतु आत्मोद्धारासाठीं स्वयंनिर्णयाचा झगडा लढणाऱ्या हिंदु जातीजातींतील लहान मोठ्या जातीच्या तंट्यांना तो लावणें चुकीचें होईल. उदाहरणार्थ प्रत्येक हिंदु जातीची नाना प्रकारच्या सबबीखाली कुत्सित निर्भत्सना करण्यास सोकवलेल्या चित्पावनांच्या निष्कारण आगळिकी (offensive) विरुद्ध जर सारस्वत, देशस्थ, गोवर्धन, देवरुखे, दैवज्ञ इत्यादि ब्राम्हण समाजच प्रतिकाराची (defensive) तोंडी लेखी टक्कर देऊ लागले, तर प्रथम-अटकळवाल्यांच्या ऑफेन्सिवला पायबंद न लावता, सेन्सॉरी पोलीस व फिर्यादी मॅजिस्ट्रेट न्यायदेवतेच्या अंधत्वाच्या सबबीवर अन्यायपीडित डिफेन्सिववाल्यांनाच ठेचू म्हणेल, तर ते कितपत न्यायाचे होईल? हिंदु आणि मुसलमान या दोन महत्वाच्या हिंदी समाजातील वैमनस्याला गति देण्यासाठी ज्या सरकारला कायद्याचें शस्त्र पाजळावें लागले, त्याच शांतिप्रिय सरकारला सामाजिक वैमनस्याबरोबरच हिंदूहिंदूंतील जातिद्वेषालाहि नष्ट करावयाची खरी कळकळ असेल, तर नुसती कायदेबाज सोट्यांची पार्सले ठिकठिकाणच्या पोलीस मॅजिस्ट्रेटांच्या हाती देण्याचा संभावीत प्रयोग न करतां, या जातिद्वेषाची उत्पत्ति स्थिति शोधून काढण्यासाठी ताबडतोब एक

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही.

जबाबदार कमिशन बसवावें. म्हणजे महाराष्ट्रात जो ब्राम्हण-ब्राम्हणेतर वाद आज धुमसत आहे, त्याचे सर्व अंतर्बाह्य रहस्य सरकारला व साऱ्या दुनियेला कळून, या वादाच्या समाप्तीचे उपाय तरी एकदाचे निश्चित होतील. परंतु अशा प्रकारचा सत्यसंशोधनाचा जबाबदार यत्न हातीं न घेतां, केवळ १५३-अ आणि ९९-अ च्या दंडुक्याची दंडकेगिरी सरकार जर सर्रास चालू करील, तर असल्या मुस्कटदाबीमुळे होणारा अन्यायपीडित लक्षावधि लोकांचा कोंडमारा पुढे भयंकर अनर्थात पर्यवसान पावण्याचा जबरदस्त संभव आहे, एवढी सूचना वृत्तपत्रकार या नात्याने सरकारला करणें, आमचे कर्तव्य आहे.

जातीजातीत वैमनस्य प्रसूत करणाऱ्या वाङमयाचाच विचार केला, तर इंग्रेजी शिक्षण, इंग्रेजी अंमल व इंग्रेजी भाषा यांच्या द्वारें साऱ्या जगाच्या विवेकवादाशी होणारा दृढ परिचय आणि त्यामुळें हिंदुमात्रांत उत्पन्न झालेली तीक्ष्ण चिकित्सक वृत्ती या सर्व साधनसमुच्चयाचा परिणामच ब्राम्हण ब्राम्हणेतर वादाच्या मुळाशीं आहे. जावत्काल ब्राम्हणेतर जनता अज्ञानी होती आणि तिच्या पुढाऱ्यांचेहि आत्मप्रबोधन झालें नव्हतें, तोंपर्यंत धर्माच्या नांवाखालीं यच्चावत् ब्राम्हणेतर हिंदु जनतेला नीच लेखणारे, त्यांचा उपमर्द करणारे, त्यांच्या स्त्रियांची नैतिक विटंबना करणारे, त्यांच्या उत्पत्तीला क्षुद्र ठरविणारे, सामाजिक क्षेत्रांत त्यांना कवडीमोल लेखणारे, हजारों लेख, स्मृत्याज्ञा, सिद्धांत, प्रवचनें, गोष्टी, इत्यादिकांनी एकूण एक धर्मग्रंथ ब्राम्हणी धर्ममार्तंडांनी गच्च भरून ठेवलेले आहेत. इतकेंच नव्हे, तर स्वावलंबनाच्या जोरावर पुढे येऊन ब्राम्हणांच्या असल्या धर्मग्रंथप्रणित सर्वांगीण वर्चस्वाच्या व जन्मप्राप्त श्रेष्ठतेच्या मांडीला मांडी लाऊन बसण्याचा कोणी ब्राम्हणेतर प्रयत्न करील, तर त्याला भयंकर शिक्षाहि त्या ग्रंथांत नमूद करून ठेवल्या आहेत. इतकेंच नव्हे, तर पेशव्यांच्या अंमदानीत त्या अक्षरशः अंमलांतहि आणल्या जात असत, याचा ऐतिहासिक पुरावा जिवंत आहे. ब्राम्हणेतरांच्या सुदैवाने इंग्रेजी अंमल जर महाराष्ट्रांत चालूं न होता, तर आज येथल्या हिंदु समाजांत सर्वश्रेष्ठ ब्राम्हण आणि दासानुदास अस्पृश्य शुद्र या दोनच जाती फक्त शिल्लक उरल्या! ही स्थिति आज नसली, तरी त्या स्थितीला केव्हांहि निर्माण करणारें धार्मिक वाङमय आजहि अस्तित्वात आहे; आणि त्याचे धार्मिक व नैतिक महत्व किंवा श्रेष्ठता नाकबूल करणाऱ्या सुधारकांचा आणि निषेधकांचा आजहि अनेक उघड गुप्त प्रकारचा छळ होत असतो. आज ज्ञानप्रसारामुळें ब्राम्हणेतरांना सर्व गोष्टी स्पष्ट समजू लागल्या आहेत आणि सर्व धार्मिक * ग्रंथातून पेरलेल्या हजारो अपमानाकारक सिद्धांतांची व चिथावण्यांची त्यांना मनस्वी चीड येऊं लागली आहे. अर्थात् हिंदु समाजातील जातीजातींतील वैमनस्याचें मूळच उखडून टाकण्याची जर सरकारला खरोखर कळकळ असेल, तर ब्राम्हणेतरांच्या सर्वांगीण क्षुद्रत्वानें ब्राम्हणांचा जन्मप्राप्त श्रेष्ठपणा रंगविणारे सर्व धार्मिक ग्रंथ सरकारने प्रथम जप्त करून जाळले पाहिजेत. या कामी मनुस्मृति पुराणांपासून सुरुवात केली तर जातिवैमनस्याचे गुप्तकट ज्ञानकोश व भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या अहवालापर्यंतच काय, पण प्रत्येक ब्राम्हणी वृत्तपत्रापर्यंत आणून भिडवावे लागतील. ब्राम्हणेतरी वाङमय उघडाउघड डिफेन्सिवचे आहे. ऑफेन्सिवचीच पाळेमुळे खणून काढली कीं डिफेन्सिवला जगायला जगांत जागाच नाहीं. हा महत्वाचा प्रश्न सरकारनें हाती घेतांच, त्याला विरोध करण्यास एकहि शाबूत डोक्याचा ब्राम्हणेतर पुढें येणार नाहीं, ही त्यांनी खात्री बाळगावी. महाराष्ट्रातील ब्राम्हण ब्राम्हणेतर वादाचें

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही.

मूळ या चाण्डाल धर्मग्रंथात आहे आणि जोंवर या ग्रंथांचा नायनाट होणार नाही तोंवर सरकारची नुसती हंगामी कायदेबाजी जातीजातींतील वैमनस्याला मुळीच आळा घालूं शकणार नाही, असा आमचा स्पष्ट अभिप्राय आहे. कोणत्याहि क्षेत्रात मूठभर लोकांनी आपल्या जन्मप्राप्त किंवा सत्ताप्राप्त दिमाखानें कोट्यावधि लोकांच्या मतस्वातंत्र्यावर कुरघोडी करणें, हा देवाघरीं अन्याय आहे, याचा ब्राम्हणांनीं व सरकारनी नीट विचार करावा.

The Creator does not intend that the greatest part of mankind should come into the world with saddles on their backs and briddles in their mouths, and a few ready booted and spurred to ride the rest to death.

- Rembold

□□□

लेख

राणीच्या जाहीरनाम्याचा खरा अर्थ

१८५७चें बंड म्हणजे हिंदु आणि मुसलमान या दोन प्रमुख हिंदी समाजांनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं केलेला निष्कलंक ऐक्याचा शेवटचा कौतुकास्पद परंतु अपयशी प्रयत्न होय. याला शिपायांचे बण्ड असेहि म्हणतात. ईस्ट इंडिया कुंफणीच्या बेदरकार घाशीरामीचें पर्यवसान या बंडात झालें, अशी इतिहासाची साक्ष आहे. म्हणून बंड थंड होताच कुंफणीचा राज्यकारभार काढून घेऊन तो विलायती पार्लमेंटने महाराणी विकटोरियाच्या नावानें आपल्या हाती घेतला आणि तेव्हापासून 'कायद्यानें प्रस्थापित झालेली' ब्रिटिश लोकांची राज्यसत्ता या देशांत सुरू झाली. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनांत एका अननुभूत क्रांतीचा हा प्रसंग! अशा वेळीं महाराणी विक्टोरिया आणि तिचे सल्लागार यांना, खवळलेल्या हिंदी लोकमताची स्थिरस्थावर करण्यासाठीं, काहीतरी अजब 'डिपलोमॅटिक' जंतरमंतर करणें भागच होते. म्हणून या नव्या गोऱ्या मन्वंतराची सुरुवात महाराणीच्या सहीने एक बडा जाहीरनामा साऱ्या हिंदुस्थान देशात जाहीर करण्याचा बूट ठरला. हिंदी लोकांची खवळलेली मनोवृत्ती शांत व्हावी आणि त्यांनीं इंग्लंडच्या राजसत्तेला मान्य करावें, हाच या जाहीरनाम्याचा उद्देश होता आणि तो उद्देश रुपायाला सोळा आणे फलद्रुपहि झाला.

तारीख १ नवंबर १८५८ रोजीं हा जाहीरनामा सर्व हिंदुस्थानभर मोठ्या धुमधडाक्याच्या थाटामाटाने जाहीर करण्यांत आला. मुंबईस तर या थाटाची अगदीं कमाल झाली. कै. गोविंद नारायण कृत 'मुंबईचे वर्णन' नामक पुस्तकांत या थाटाचें वर्णन असें केलें आहेः-

''सदर्हू जाहीरनामा रा. रा. विनायकराव वासुदेव ओरिएंटल त्रान्सलेटर यांहीं वाचून दाखविला. तो ऐकून घेऊन सभासदांनी आनंदाचा एकच गजर करून सोडला.

''ह्या दिवशी मुंबईतील रयतेने दीपोत्साह करून व जागोजागीं निशाणें उभारून आपला आनंद प्रदर्शित केला. हा उत्साह यथासांग रयतेकडून घडावा म्हणून सरकारांतून लोकांस दोन दिवस एक सारखी सुटी मिळाली होती, सबब हा लोकांनी दोन दिवसपर्यंत मोठ्या हौसेने केला. ह्या प्रसंगी शहरांत सुमारे चार पाच लक्ष रुपये खर्च झाला असावा. फक्त खोबऱ्याचें तेल त्या दिवशीं साठ सत्तर हजार रुपयांचें जळले. गलासें तर इतकीं महाग झालीं होती कीं, दर शेकंड्यास दहा पंधरा रुपये

देऊन कित्येक व्यापारी लोकांनी भाड्याने आणिली होती. भर रस्त्यांत देखील मोठमोठाले झुंबर टांगले होते.'' -

- (पृ. १६३)

हिंदुस्थानांत 'नगर भवानी' (Queen of Cities) म्हणून गाजलेल्या मुंबईचा जर हा थाट, तर सर्व देशांत हा जाहीरनामोत्सव किती खणक्यादणक्यात साजरा केला गेला असेल, याची कल्पना सहज होते. हिंदुस्थानी (Indian) लोक आधीच मोठे उत्सवप्रिय. वाटेल त्या उत्सवमूर्तीने त्यांना उत्सवाची खैरात वाटून त्यांचा उलटा उत्सव केला, तरी त्याची त्यांना दिक्कत वाटत नाही. थोडे नाचा उडायला मिळालें, जंमत गंमत करायला मिळाली कीं हिंदी लोक खुष! जरा थोडा अद्‌भुत चमत्कार दिसला कीं हे भोळे लोक बेहोष होऊन नाचू लागतात. साता समुद्रापलीकडची महाराणी आणि जाहीरनामा काढून तीस कोट लोकांशी खेड्यापाड्यांत सुद्धा 'आत्मैव सर्व भूतेषू' चा वेदान्त खणखणीत भाषेंत प्रेमानें बोलते! केवढा हा अघटित चमत्कार! छत्रपति असे बोलले नाहीत, पेशवे असे बोलले नाहींत, मोंगल पातशहा असे कधीं बोलले नाहींत. असा उत्सवहि कधिं झाला नाहीं. आणि आश्वासनें तरी किती प्रेमाची, भूतदयेची आणि न्यायाची! खूष होऊन गेले सारे हिंदी लोक! या 'स्वातंत्र्याच्या सनदे'नें हिंदी मुत्सद्यांना तर जवळ जवळ हर्षवायूच झाला. 'महाराणीच्या एकछत्री अंमलाखालीं हिंदुस्थान स्वतंत्र झाला' हीच ज्याची त्याची भावना होऊन बसली. 'राज्य वाढविण्याची इच्छा नाही, कोणत्याहि धर्माच्या बाराबत्तल भानगडीला शिवणार नाही, रक्तपात करणार नाही व होऊंहि देणार नाहीं, सर्वांना न्याय सारखा, सर्वांचा दर्जा सारखा.' काय पाहिजे अधिक या पेक्षा? जणु स्वर्गाचि ये पृथ्वीला!

महाराणीचा जाहीरनामा म्हणजे हिंदुस्थानाला मिळालेली 'स्वातंत्र्याची व समतेची सनद' असा आपला भोळसट गैरसमज करून घेऊन, त्याच्या जोरावर हिंदी पुढाऱ्यांनीं समसमान अधिकार आणि हक्क मागण्याचे आजपर्यंत जे कांग्रेसी आणि डेप्यूटेशनी उपद्‌व्याप केले, त्यांचा इतिहास वाचला कीं या भोळ्या वेड्यापिरांच्या बुद्धिमाद्याची कींव येऊं लागते. आज पाऊण शतक झाले, तरी वेळीं अवेळीं राणीच्या जाहीरनाम्यांतल्या आश्वासनांवर समतेचा हट्टाग्रह धरणारे मुत्सद्दी मधून मधून हिंदी वातावरणांत लेक्चरबाजीचा फडफडाट करीतच असतात. असल्या बावळटांनी सुप्रसिद्ध आंग्रेज इतिहासकार मि. फ्रीमन यांचा इषारा आता तरी विचारांत घेतल्यास, त्यांना स्वतःची दिशाभूल नीट कळून येईल. मि. फ्रीमन म्हणतातः-

"...But when we come to manifestoes, proclamations.... here we are on the very chosen region of lies.... He is of childlike simplicity indeed who believes every act of Parliament, as telling us, not only what certain august persons did, but the motives which led them to do it; so is he who believes that the verdict and sentence of every court was necessarily perfect righteousness, even in times where orders were sent beforehand for the trial and execution of such a man." *Freeman's Methods of Historical Study. London, 1886, pp. 258-259.*

भावार्थ *:- प्रॅनिकेस्टो आणि प्रोक्लेमेशन (जाहीरनामे) यांचा आपण विचार करूं लागलो कीं ठाम कयास बांधावा कीं धडधडीत थापबाजीच्या क्षेत्रांत आपण आहों..... पार्लमेंटाच्या प्रत्येक कायद्याचा*

विचार करतांना, त्याच्यामागें असणाऱ्या थोर व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या उद्देशांनाच विचारात घेणारा माणूस भोळ्या पोरबुद्धीचाच समजावा. त्याचप्रमाणें, एखाद्या माणसावर खटला भरून त्याला फाशीची शिक्षा द्या, असल्या आगाऊ हुकूम सुटल्याच्या उदाहरणांत सुद्धां, न्यायमंदीरातला निर्णय आणि शिक्षा म्हणजे निर्दोष (perfect) न्याय मानणारा माणूसहि तितकाच अजागळ समजावा.

राणीच्या जाहीरनाम्याला 'स्वातंत्र्याची सनद' मानणाऱ्या बावळटांनीं त्याच्या कायदेशीरपणाबद्दल कधींच काही विचार केला नाहीं. इंग्लंडातील सुप्रसिद्ध न्यायमूर्ती सर जेम्स स्टीफन् यांनी राणीच्या जाहीरनाम्याचा खुलासा स्पष्ट केलेला आहे. "The Proclamation was merely a ceremonial document. It was not a treaty and so it did not impose any responsibility and obligation on the English people."

भावार्थ :- *राणीचा जाहीरनामा म्हणजे काय? शिष्ठसंप्रदाय म्हणून एका समारंभाच्या निमित्तानें प्रसिद्ध केलेला कागद. तो काय तहनामा होता कीं काय? मुळीच नाही. अर्थात् त्याची कसल्याहि प्रकारची जबाबदारी किंवा अवश्यकर्तव्यता इंग्लिश लोकांवर मुळींच नाही.*

लॉर्ड कर्झननें याच जाहीरनाम्याला 'स्क्रॅप ऑफ पेपर' - कागदाचे चिठोरें - म्हणून म्हटलें, तेव्हा निषेधाची एकच हुल्लड करणाऱ्या हिंदी मुत्सद्यांना, या जाहीरनाम्याचा पोकळ शिष्ठपणा अझून तरी उमगला आहे का नाहीं, देव जाणें! ब्रिटिश नोकरशाहीचा कोणीहि लहान मोठा अधिकारी, पुराव्याची भरपूर तयारी केल्याशिवाय, केव्हाहि कांहीं बोलत नाही. त्यांचा सर्व कारभार कायदेबाज व कदरबांजच असतो. अर्थात् लॉर्ड कर्झनचे उद्‌गार अक्षरशः खरेच होते.

हा जाहीरनामा कोणत्या परिस्थितींत बाहेर पडला? त्यात व्यक्त झालेले दिलदारपणाचे व जनहितवादाचे विचार कसे व कां आले? याचाहि विचार झाला पाहिजे. १८५७ च्या बंडाच्या सुरवातीपासूनच देशी लोकांनीं गोऱ्या लोकांवर अत्याचार केल्याच्या ज्या बातम्या विलायतेस गेल्या होत्या, त्यामुळें इंग्रेज लोक देशी लोकांचा सूड घेण्यासाठी अगदीं खवळलेले होते. हिंदी लोकांच्या हितासाठीं हिंदुस्थानचा राज्यकारभार चालवायचाच नाहीं, असे तिकडील लोकमत होते. जाहीरनामा १ नवंबर १८५८ रोजी बाहेर पडला. तत्पूर्वी १८५८ च्या मार्च महिन्यांत हाऊस ऑफ कॉमन्सने एक सिलेक्ट कमिटी नेमून, 'हिंदुस्थानात युरपियनांची वसाहत आणि कायम वसती वाढविण्याची उत्तम योजना काय, तिचा अंदाज काय, प्रगतीचे मार्ग काय, विशेषतः डोंगरी व हवाशीर प्रदेशात ही योजना कितपत शक्य आहे आणि यामुळे मध्य आशियात आपला व्यापार कोठवर वाढविता येईल' याची चौकशी चालविली होती. ("to inquire into the progress and prospects, and the best means to be adopted for the promotion of European colonization and settlement in India, especially in the Hill Districts and healthier climates of that country, as well as for the extension of our commerce with Central Asia.") एकंदर परिस्थितीचा विचार करतां, इंग्रेजांच्या या भावी धोरणांवर, उदात्त प्रजावात्सल्याचा जाहीरनामी पडदा घालणेच भाग होते.

महाराणी विकटोरियानें शुद्ध प्रजावात्सल्याच्या प्रेरणेनें हा जाहीरनामा लिहून प्रसिद्ध केला, असे जरी विधानार्थ गृहीत धरलें, तरी महाराणीला हें खास समजत होतें कीं आपण इंग्लंडच्या राणी असलों तरी आपली सत्ता कायद्याने नियमित झालेली आहे, (a constitutional sovereign) आणि जाहीरनाम्यातले

विचार आचारांत उमटविण्याची बळजबरी आपल्या दिवाणांवर आपणास कधीच करता येणार नाही. इंग्लंडचा राजा म्हणजे एक शोभीवंत बाहुलें. मानलेला देव. म्हणूनच इंग्रजीत एक सूत्र आहे की ""Kind and Queens can do no wrong" (राजे आणि राण्या कधीच कांहीं वाईट करूं शकत नाहीत.) त्यांची योजनाच कायद्याने' जेथें फक्त शोभेसाठी ठेवलेली आहे, तेथें वाईटाचें चांगले करण्याचीहि त्यांना शक्ती नाही, हे उघडच आहे. इंग्लिश जनतेच्या मताविरूद्ध त्यांना केव्हाच काही करता येत नाही.

राणीच्या एका प्रधानानें जाहीरनाम्याचा पहिला मसूदा तयार केला. तो तिला मुळीच पसंत पडला नाहीं. त्याची मनोरंजक हकिकत मि. डब्ल्यू. टी. स्टेड यांनी रिब्यू ऑफ रिब्यूज मासिकाच्या एप्रिल १८९७ च्या अंकात दिली आहे. त्याचा भावार्थ येणें प्रमाणेः-

जाहीरनाम्याचा पहिला मसुदा हातीं पडला, त्यावेळीं राणी इंग्लंडबाहेर फिरतीवर होती. हा मसूदा दरिद्री आणि रुक्ष भाषेंत होता. त्यांत ना कसला जिव्हाळा, ना धर्म. इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील चालीरीती व धर्म यांना आम्हीं सत्तेच्या जोरावर उखडून टाकू, असले वाह्यात आणि असदभिरुची दर्शक विचार त्यात गोवलेले होते. ते वाचून राणी भयंकर संतापली. ताडकन् राणीनें मसूदा रद्द करून त्यावर एक सणसणीत नोट लिहविली कीं ''आमच्या हाती 'हिंदी धर्म उखडून टाकण्याची शक्ती' आहे, अशा प्रकारच्या उद्‌गारांचा हुजूर सरकारकडून तीव्र निषेध करण्यात येत आहे. हुजूरची इच्छा आहे कीं जाहीरनाम्यात या कलमाऐवजीं असा मजकूर यावा कीं 'महाराणी सरकारची स्वतःच्या धर्मावर कितीहि श्रद्धा असली व त्यापासून आमच्या चित्ताला कितीहि सुख आणि समाधान होत असलें, तरी हिंदी लोकांच्या धर्मात ढवळाढवळ करण्याचे प्रयत्न केव्हाहि होणार नाहीत आणि आमच्या सर्व नोकरांना या बाबतीत कडक हुकूम देण्यात येतील.' मसुद्यांतल्या आक्षेपार्ह भागांवर टीका करूनहि महाराणीचें समाधान झालें नाहीं. तिने सर्व जाहीरनामा स्वतःच लिहून काढला आणि त्यावर लॉर्ड डर्बीला एक हुकूमाची नोट लिहिली.

""The Queen would be glad if Lord Derby would write it himself in his excellent language, bearing in mind that it is a female Sovereign who speaks to more than a hundred millions of Eastern people on assuming the direct government of them and after a bloody civil war, giving them pledges which her future reign is to redeem and explaining the principles of her government. Such a document should breathe feelings of generosity, benevolence, and religious toleration, and point out the privileges which the Indians will receive no being placed on an equality with the subjects of the British Crown, and the prosperity following the train of civilization."

भावार्थ *:- लॉर्ड डर्बी साहेब हा मसुदा आपल्या सुंदर भाषेंत लिहून काढतील तर आम्हाला फार आनंद होईल. लिहीतांना त्यांनी खालील मुद्यांकडे नीट अवधान ठेवावें. हा जाहीरनामा एक बादशाहीण-स्त्री-लिहीत आहे. पूर्वेकडील १० कोट लोकांवर रक्तपाताच्या बंडानंतर आमची राज्यसत्ता सुरू होण्याच्या प्रारंभीच तो वाचला जावंयाचा आहे. आमची राजसत्ता कोणत्या तत्वांवर चालणार आणि आम्ही दिलेलीं वचनें कशी पूर्ण करणार, याचें त्यांत उत्तम विवरण असावें. औदार्य, परोपकार*

आणि धार्मिक सहिष्णुता या भावनांचा परिमळ त्यांत उत्पन्न झाला पाहिजे. ब्रिटिश सत्तेखालीं ब्रिटिश प्रजानन या नात्यानें समतेचे कोणकोणते हक्क हिंदी लोकांना मिळतील, त्याचा खुलासा त्यांत असावा आणि संस्कृतीच्या वाढत्या प्रमाणावर होणाऱ्या भरभराटीचीहि त्यांना ओळख पटावी.

लॉर्ड डर्बीकडून राणीच्या इच्छेप्रमाणे मसुदा लिहून आला. तरी देखील तिचे समाधान होईना. अखेर खुद्द राणीनें शेवटीं एक कलम स्वतः हाताने लिहून जाहीरनामा पूर्ण केलाः-

"May the God of all power grant to us and those in authority under us strength to carry out these our wishes for the good of our people." (प्रजेच्या कल्याणाविषयीं आपल्या ज्या ज्या इच्छा आहेत, त्या सिद्धीस नेण्यास, सर्वशक्तीमान जो परमेश्वर तो आम्हांस व आमच्या अधिकाऱ्यांस सामर्थ्य देवो, अशी आमची प्रार्थना आहे.)

महाराणी विकटोरियाची धोरणी दृष्टी किती तीक्ष्ण असे, हें यावरून दिसून येईल. पहिलाच मसुदा जर बाहेर पडता, तर हिंदी लोकांची मने बिथरून, दिलजमाईचे काम अज्जीबात साधते ना. म्हणूनच राणीने चाणाक्षपणानें त्या मसुद्याला रद्द केलें. पण आमचे हिंदी लोक कसले बावळट! त्यांना हा जाहीरनामा म्हणजे 'स्वातंत्र्य समतेचा ताम्रपट' वाटला. पण वास्तविक पहाता, हिंदुस्थान धुवून नेण्याच्या १८५८ च्या सिलेक्ट कमिटीच्या धोरणाला झाकून ठेवणारा तो एक धोरणी आडपडदा होता, हे एवढ्या माहितीवरून स्पष्ट होण्यासारखें आहे. जाहीरनामे म्हणजे तहनामे नव्हत, तर अंमलबजावणीसाठी त्यांतल्या शब्दांचा गुलाम राष्ट्रानें कीस काढीत बसावें!

□□□

टिपण

संपादकीय खुलासा

सध्या पत्रकारांचा व्यवसाय मोठ्या जोखमाचा झाला आहे. वेळीं बाटल्यांवर किंवा तलवारविरहि हवी तशी कसरत करतां येईल, पण कायदेबाजीचे चाप चुकवून एखादें नियतकालीक चालविणे अशक्य होत चाललें आहे. कायद्याचे हात जसे लांबलचक आहेत, तसा त्याचा देह सुद्धां हवा तेवढा लांबरुंद ताणतां येतो, किंवा तिळा एवढा संकुचित करता येतो. पानी तेरा रंग कैसा? जिसमें मिलावे वैसा. कायद्याची स्थिति जवळ जवळ अशीच आहे. त्याची व्याप्ती हवी तेवढी ताणतां येते आणि त्यावर हवा तो रंग बेमालूम चढवतां येतो. वृत्तपत्रांच्या बाबतींत तर कायद्याची दृष्टी इतकी चमत्कारीक रंगेल आहे की त्याने एखाद्या मजकुरावर अमूक एका रंगाची नजर टाकण्याची खोटी का त्याचा रंग तसा पालटलाच पाहिजे. एखाद्या प्रेमाच्या मजकुराच्या लालभडक रंगावर कायद्यानें मत्सराची हिरवी नजर फेकली पुरे कां तांबडा रंग सुद्धां फटकन् हिरवा पडतो. दुर्बिणी लावा कीं सूक्ष्मदर्शक यंत्रे लावा, मग हिरव्या रंगापेक्षां दुसरा कोणताच रंग पहाणाराला दिसायचा नाहीं. इतर रोगांच्या साथी प्रमाणे कायद्याच्या दृष्टीच्याहि निरनिराळ्या साथी वृत्तपत्रांच्या क्षेत्रात येण्याचे हंगाम गेल्या ३०-३५ वर्षांत लोकांच्या आठवणींत असतील. राजद्रोहाची दृष्टी विकसित झाली कीं जिकडे पहाल तिकडे राजद्रोहच! जातीजातींतील वैमनस्याची नजर खुलली कीं सर्वत्र १५३-अ चा दरोबस्त थैमान! अब्रुबाजीच्या रंगाची लाट आली कीं सारी कोर्टे बेअब्रूच्या खटल्यानी गजबजून जायची! ब्राम्हण-ब्राम्हणेतर वाद उतास जाऊ लागला कीं मग काय? एखाद्या ऱ्हस्व दीर्घ वेलांटीतून सुद्धा 'त्राहि माम् त्राहि माम्' किंकाळ्या मारीत एखादा गणित्या भटजी गव्हरर्नर साहेबांच्या बुटापर्यंत लोळत जायचा! अशा या नाना प्रकारच्या साथींत पत्रकारांच्या लेखणीतून उतरणाऱ्या कोणत्या मजकुरावर कायद्याच्या कसल्या रंगाची छाया पडून, कोणत्या वेळीं त्याचा रंग कसा बदलला जाईल आणि त्या बरोबरच लेखकाच्या मूळ उद्देशाचा काय विपर्यास होईल, याचा या ब्रिटिश अमदानीत कांही नेम नाहीं. न्यायचौकशीचें सारेंच काम इंग्रेजी राजभाषेंत चालावयाचें असल्यामुळें, देशी भाषेतं लिहिलेल्या मजकुराची व त्यातील शब्दांची भाषांतराच्या भट्टींत जी कांहीं कुतरओढ होत असते, ती पाहिली की पट्टीच्या वैय्याकरणांचीहि मति अगदीं गुंग होऊन जाते. रेघांच्या धारीचा शर्ट परटाकडे धुवायला द्यावा आणि शर्ट धुवून आलेला पहावा तों आरपार पांढरा फेक! अरे, रेघा

काय झाल्या? कच्या रंगाच्या होत्या, भटींत खलास झाल्या! अशांतलाच प्रकार बहुतेक असतो. अलीकडे बीभत्स व बेअब्रूकारक वाङमयाचा शब्दकोश सताड फुगत चाललेला आहे. 'भट' हा शब्द म्हणे बीभत्स. 'आग्यावेताळ' म्हणे अब्रूनाशक. 'सूत्रधार' शब्दांचे भाषांतर म्हणे 'बायरपुलर'. दुर्दैव त्या मराठी भाषेचें आणि त्या भाषेतं लेखन करणारांचे!

'शनिदेव महाक्रूर' कितीहि असला, आणि त्याचा प्रताप 'जैसी का ते खड्गाची धार' असला, तरी तो सर्वांना सर्व काळीं सारखाच ठेचीत नाहीं. हिंवतापाप्रमाणें त्याच्या पाळ्या असतात. सध्यां भटी पत्रकारांवर त्याची मेहरनजर आहे. किंबहुना सध्या तो त्यांच्या उदरीच आला आहे, म्हटले तरी चालेल. आज त्यांनीं वाटेल तें लिहिलें छापले तरी परिस्थितीच्या जठरानलांत तें बिनबोभाट पचलें जात आहे. आतां शनीची संक्रांत भटेतरी लेखकांवर वळलेली आहे. त्यांतल्या त्यांत ती मराठेतर लेखकांवर विशेष टौकारून पाहूं लागली आहे. पंजाब बंगालकडे या संक्रांतीचा वरवंटा बऱ्याच जोरानें फिरत असला, तरी मुंबई इलाख्यांतल्या पेशव्यांच्या राजधानींत त्याला उत्तम प्ले ग्राऊंड सध्यां लाभली आहे. पुण्याचा भटेतरांवरील वरवंट्याचा लौकीक कांहीं आज कालचा नव्हे! तो तर त्याच्या बारशाचा गोपा! एवढी मोठी पेशवाई झाली; पण तिनें केलें काय? तर भटांचीं भोजनें आणि भटेतरांवर ग्रामण्ये! अखेर अखेर तर बेटावर चहाड्या चुगल्यांच्या कचऱ्याचे गाडे इतके जाऊन सांचले कीं पेशवाई कोठें व कशी खतम झाली याचा निश्चित ठावठिकाणा अझून एकाहि धडश्या संशोधकास लागलेला नाहीं. कवडी किंमतीचे जानवें तें काय, पण त्याच्यासाठीं पेशवाई पुण्यात भटेतरांचे रक्तपात झालेले आहेत. अर्थात् असल्या पुण्यवान् परंपरेच्या पुण्यपत्तनांत हव्या त्या पराचा कावळा होऊन, भटेतरी लेखनावर हव्या त्या कायद्याची हवा बिघडूं लागली, तर कोणी कोणाला बोल लावावा? कोणाचा तरी आब राखण्यासाठी विचारप्रदर्शनाच्या मैदानावर राब लावण्याचें निश्चित ठरल्यावर सुक्या बरोबर ओल्यालाहि मोक्ष मिळणारच.

आम्ही पुण्यास आल्या दिववसापासून आम्हांला एक मोठा फायदा झाला. महाराष्ट्रातल्या हिंदु समाजांची स्थिति काय आहे; भटभटेतर चळवळींतील खरीं वर्मे मर्मे काय आहेत; पुण्याबाहेर भरंसाट घोंगावणाऱ्या नानाविध चळवळींची खरी स्वरूपें व हेतू काय आहेत, बाहेरगांवी बृहस्पति, देशभक्त, अस्पृश्योद्धारक, शेतकऱ्यांचे कैवारी, शुद्धि संघटन पुढारी, म्हणून मिरवणाऱ्यांचा स्थानिक लौकिक व प्रत्यक्ष जीवनचर्या काय आहे; इत्यादि पुष्कळ मनोरंजक गोष्टींची प्रचीति येथें पडताळून पहाण्याचा आम्हाला सुयोग लाभलेला आहे. भटांच्या 'ब्राम्हणी' चळवळी आणि मराठ्यांच्या 'ब्राम्हणेतरी' चळवळी कोणत्या रोखानें चाललेल्या आहेत, याचाहि पायाशुद्ध अभ्यासाची येथे उत्तम संधी मिळाली. आमच्या बिऱ्हाडाच्या घरापासून तों थेट आमच्या लेखनांवर कायद्याच्या बहुरंगी दीपाचा-शोधनप्रकाश पाडण्यापर्यंत ब्रम्हसुखोत्पन्नांची आमच्यावर किती वेदोक्त महाकृपा आहे, हें वेळोवेळी निःसंदिग्ध शब्दांत आम्ही प्रगट केलेलेंच आहे. इतकेंच नव्हें तर, गेल्या ३-४ वर्षांच्या प्रत्यक्ष अनुभवावरून, ब्राम्हणेतरी छावण्या व त्यांचे सूत्रधार हे सुद्धां आमच्याकडे भटी दृष्टीने कधिं काळीं पहाणारच नाहींत, अशी कल्पना आम्हांला कधिं आलेलीच नव्हती, असाहि प्रश्न नाहीं. फक्त कल्पनेला व संशयाला प्रत्यक्ष अनुभवाच्या कसाला लावीत होतो. आतां तो अनुभव जवळजवळ सिद्धच होंऊ लागला आहे. स्पष्ट कोणी लिहीत बोलत नसेल तरी बऱ्याच जबाबदार 'ब्राम्हणेतरी' मराठ्यांच्या डोळ्यांत प्रबोधनकाराची कायस्थ प्रभू जात अलीकडे बरीच सलूं लागली आहे. यांत आम्हाला आता मुळीच संशय राहिलेला नाहीं. भट झाले काय किंवा भटेतर झाले काय, दोघांच्याहि

चळवळीत निखालस स्वजातीस्तोमाचें प्राबल्य वाढलेलें स्पष्ट दिसत आहे. अशा अवस्थेंत 'स्वतंत्रमतवादी' प्रबोधनाच्या 'लोकहितवादा'चा कार्यक्रम संशय, निंदा, गैरसमज, छळ, आणि अखेर शारीरीक हानी या निसर्गसिद्ध क्रमांतून प्रवास करतांना क्षणोक्षणी जागोजाग कितीहि ठेचाळला आणि जखमी झाला, तरी तेवढ्याने त्याची विचारक्रान्तीची तपश्चर्या बंद पडेल, अशी भीती बाळगण्याचें कारण नाही.

प्रत्येक लेखकाची, विशेषतः वृत्तपत्रकाराची हीच इच्छा असते कीं आपले प्रामाणिक विचार सर्वांनी विचारांत घ्यावे. विशेषतः सरकारनीं घ्यावेच घ्यावे. त्या साठीं सरकारचें एक स्वतंत्र खातेहि आहे. शिवाय कांही विशिष्ठ मतांच्या वृत्तपत्रकारांवर सरकारच्या गुप्त दूतांची पाठराखणीहि ठेवलेली असते. गेलीं २० वर्षे आम्ही लेखनव्यवसाय करीत आहों. १९१८ सालापासून स्वतंत्र ग्रंथलेखनाला व १९२१ पासून प्रबोधनलेखनाला सुरुवात केली. इतक्या वर्षांच्या अवधीत अनेक महत्वाचे विषय सरकारच्या नजरेला आणण्याचा आम्ही अट्टहास केला. पण तिकडे सरकारनें ढुंकूनहि पाहिलें नाहीं. आता दिडकी दमडी आणा किंमतीच्या क्षुद्र चोपड्यांवर कायद्याची कातर चालविणाऱ्या सरकारला १९१८ साली एका प्रबुद्ध समाजाची बेजबाबदार निर्भत्सना करणाऱ्या भटी संस्थेला नुसता जाब विचारायलाहि फुरसद झाली नाहीं. सरकारने अवश्य लक्ष पुरविण्याजोग्या प्रबोधनांतील विषयांची लांबलचक यादी देण्यात कांही स्वारस्य नाहीं. मराठींत लेख लिहिले तर ट्रॅन्स्लेटरच्या भट्टीत रेघांचा शर्ट पांढरा फेक धुतला जायचा, म्हणून कांही जनहिताच्या विशेष महत्वाचे लेख मुद्दाम इंग्रेजीत लिहिण्याचा परिपाठ सुरू ठेवला. तरीहि सरकार थंडच! कधीं विचारपूस नाहीं, चौकशी नाहीं, कानपिचकी नाहीं, कांहीं नाहीं! आमच्या काही प्रेमळ पुणेकर ब्रम्हबृहस्पतींनी आमच्या लेखणीचीहि उलटापालट व बदलाबदल करण्याची तोंडचलाखी गटार यंत्रामार्फत जाहीर केली. तरीसुद्धा पोलीस किंवा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट साहेबांचे लक्ष आमच्याकडे जाई ना! प्रबोधनाकडे सरकारी मेहेरनजर वळविण्याचें पवित्र ब्राम्हणांचे प्रयत्न जेव्हां अपयशी ठरले, तेव्हा मात्र आम्ही निराश झालों.

पण देवा घरचे योगायोग फार कल्पनातीत असतात! कोठें कशी काय घटना घडेल, याचा नेम लागत नाहीं. विशेषतः वृत्तपत्राच्या धंद्यांत, सध्याच्या चळवळींत, इलेक्शनच्या हंगामात, कसल्या विषयाला कोणता रंग चढेल, याचा अंदाज पंचांगबहाद्दरालाहि लागणें कठीण! उपरोक्त निराशेत, नेहमीच्या प्रामाणिक मतप्रसाराच्या 'एकांड्या शिलेदारी' उद्योगांत मग्न असतांना गेल्या ८ तारखेस अवचित पुण्याच्या

डि. मॅजिस्ट्रेट साहेबांचे आमंत्रण

येऊन धडकले. आनंद वाटला. २ वर्षे दादरला, १ वर्ष सातारा रोडला आणि २ वर्षे पुण्याला प्रबोधनाने काढलीं. या ५ वर्षात सरकारी आमंत्रणाचा हा पहिला योग. मोठा आनंद वाटला. पण आमंत्रण कोणत्या प्रकरणीं? म्हणून खलिता उघडून पहातों तों ''भाऊराव पाटील यांचे चरित्र'' प्रकरणीं. आश्चर्य वाटलें. मनांत म्हटलें कीं हा भाऊराव मोठ्या दैवाचा. याचें चरित्र सरकारनें सुद्धा वाचलें. ज्या वेळीं वाचायचें त्या वेळीं वाचलें नाहीं; पण आता वाचले. असो. डि. मॅ. साहेबांच्या आज्ञेप्रमाणे ता. १२ रोजी १२ वाजतां त्यांच्या भेटीस गेलो. साहेब बहादुरांनी १५ मिनिटे पर्यंत मुलाखत दिली. मोकळ्या मनानें विचारविनिमय चर्चा केली. आम्हीहि सर्व खुलासा अगदी खुल्या दिलानें करून साहेब बहादुरांची प्रणिपातपूर्वक रजा घेतली. असल्या प्रकारचे विचार विनिमय जर प्रत्येक महत्वाच्या बाबतींत घडून येतील, तर गैरसमजुतींचे बरेच निष्कारण कटु परिणाम टळून, शासित शास्त्यांतल्या विषमतेला पुष्कळच आळा बसेल, असे

आम्हाला वाटतें.

प्रस्तुत प्रकरणांतील आक्षेपार्ह भानगड म्हणजे भाऊराव पाटलांच्या चरित्रलेखांत आम्ही अप्रत्यक्षपणे (insinuation) असे ध्वनित केले म्हणतात की भाऊरावर पोलीसांनी केलेल्या अत्याचारांत कै. शाहु महाराजांचे आंग होतें. म्हणजे आम्ही शाहु महाराजांवर अत्याचाराचा आरोप करीत आहों. याला आधार कशाचा? तर खालील कलमाचाः-

कोल्हापुरी पोलीसांचे अत्याचार

भाऊरावची अटक केवळ पोलीशी प्रेरणेची होती असें नव्हे, तर त्याची सूत्रे खुद्दांकडूनच हालत होती. वाटेल ती उलाढाल करून डांबर प्रकरणांत लठ्यांना लोळविण्याचा महाराजांचा निश्चयच होऊन बसला होता, मग त्याच्या मागें पोलीसांची कानचावणी असो, नाहीतर लठ्यांच्या हितशत्रूंची हातलावणी असो.

या वेळी आमच्या पुढें ओरिएंटल ट्रान्सलेटरचें भाषांतर नाहीं. परंतु डि. मॅ. साहेबापुढे तें पाहिलें होतें. त्यांत 'सूत्रें हालत होती' याचें भाषांतर 'वायर पुलींग' असें केलेलें होतें. या एकाच शब्दयोजनेनें साऱ्या कलमाचाच अर्थ उलटा पालटा होऊन, त्याला एक निराळीच घाण येऊं लागली. 'वायर पुलींग' शब्द कोणत्या अर्थी वापरतात, कोणत्या ठिकाणीं लावतात, याचाहि भाषाशास्त्रांत काही विवेक आहे. 'मुंबई इलाख्याची सूत्रें गव्हर्नर साहेबांकडूनच हालत असतात' या वाक्याचे 'The wire-pulling of the Bombay Presidency is done by H. E. the Governor' असें कोणी भाषांतर केल्यास तें कितपत बरोबर होईल? 'सूत्र' म्हणजे 'वायर' आणि 'सूत्रधार' म्हणजे 'वायर पुलर' असें भाषांतर चुकीचें आहे. शिवाय 'वायर पुलींग' या इंग्रेजी शब्दांतच एक प्रकारचा 'बॅड सेन्स' (कुत्सित अर्थ) आहे. उपरोक्त कलमांत हा शब्द टाकतांच खाडकन् त्याचा रंग बदलला, अर्थ बदलला आणि लेखकाच्या हेतूचाहि विपर्यास झाला. वास्तवीक येथें 'कंट्रोल' या क्रियापदाचीच जरूरी आहे आणि 'त्याची सूत्रे खुद्दांकडूनच हालत होती' याचे भाषांतर "The affair was being controlled by the Maharaja himself" असेच करणे प्राप्त आहे; आणि तेच वस्तुस्थितीला धरून होतें. कारण, ते डांबर प्रकरणच इतके महत्वाचे होते की महाराजांवर त्यांच्या हितशत्रूंनी उठविलेल्या इतर गण्डांतरांच्या कटु अनुभवामुळें, तें तडीला लावण्यासाठीं त्यांना स्वतःच सर्व सूत्रांवर नजर ठेवून बसणें प्राप्त होतें. शब्दयोजना करताना शाहू महाराजांच्या पोझिशनचाहि विचार केला पाहिजे. महाराज आपल्या राज्यांत स्वयंनिर्णयी स्वतंत्र सत्ताधारी नृपति होते. इच्छामात्रें करून रावाचा रंक व रंकाचा राव करण्याची त्यांची शक्ती होती. मनांत आणतील त्याला फांसावर लटकवितांना त्यांचा हात धरणारा कोण होता? कोणत्याहि गोष्टीत असल्या सर्वसमर्थ छत्रपतीला 'वायर पुलींग' करण्याचें कारणच काय? अर्थात् या भाषांतरीत शब्दयोजनेत विवेक तर नाहींच नाहीं, पण त्यांतील अंतर्भूत 'बॅड सेन्स'मुळें साऱ्या संदर्भात खोडसाळ घाण मात्र उत्पन्न केली. एका शब्दयोजनेचा जर हा प्रताप, तर चार फूल्स्कॅप टाईप रिटन भाषांतरांत आणखी किती गोंधळ असतील तें हरी जाणें! सारांश, भाषांतराची भट्टी म्हणजे एक राजमान्य गण्डांतरच होय.

शिवाय, मागचा पुढचा संदर्भ विचारांत घेऊनच कोणत्याहि पुढील मागील वाक्यांतून अर्थनिष्पत्ति काढावयाची असते. ''भाऊरावची अटक (अत्याचार नव्हे हो!) केवळ पोलीशी प्रेरणेचीच होती असे नव्हे'' तर ''त्याची (अटक करण्याची वगैरे) सूत्रे खुद्दांकडूनच हालत होती.'' इत्यादि वाक्यांचा अर्थ लावतांना पूर्वीच्या पान ६० वर सुरू झालेल्या कलमांतील मजकूर संदर्भार्थ घेतल्याशिवाय कसे भागेल?

''या कार्मी बलीदानासाठीं निश्चित ठरविलेल्या अजापुत्राचे जातभाईच जर इतर हितशत्रूंसह अहमहमिकेनें पुढें सरसावले, तर चोर सोडून संन्याशाला फांशी द्यायला पोलीसांच्या बापाचें काय वेचते?'' (पृ. ६० रकाना १) या विचाराशीं ''मग त्याच्यामागें पोलीसांची कानचावणी असो, नाहीतर लठ्ठ्यांच्या हितशत्रूंची हातलावणी असो.'' (पृ. ६१ रकाना १) हे उद्‌गार संदर्भात घेतले, तर ''भाऊरावची अटक केवळ पोलीशी प्रेरणेची नसून, लठ्ठ्यांच्या हितशत्रूंच्या चिथावणीचीच होती'' हा स्पष्टार्थ साधारण बुद्धीच्या वाचकालाहि उमजण्यासारखा आहे.

कोणताहि दोष सिद्ध करण्यापूर्वी आरोपीच्या हेतूचेंहि संशोधन करणें अगत्य असते. गेल्या १० वर्षांत आमचें प्रसिद्ध झालेलें वाङमय वाचणारे आणि अनेक ठिकाणीं झालेलीं व्याख्यानें ऐकलेले हजारों लोक आहेत. गुदरत सालीं म. फुले पुण्यतिथीनिमित्त याच दिवसांत करवीरस्थ हजारो ब्राम्हण-ब्राम्हणेतर आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना पांच जाहीर व्याख्यानांच्या द्वारें आमच्या सर्व विचारांचा स्पष्टस्पष्ट परिचय झालेला आहेच. शाहू महाराजांच्या हितशत्रूंत विशेष प्रमुख वर्ग म्हटला म्हणजे जहाल चित्पावन ब्राम्हणांचा, ही गोष्ट म्हणजे कांहीं नवीन अपूर्व नव्हे. 'ठाकरे यांनी शाहूमहाराजांची बदनामी केली' अशी बातमी कोणी एखाद्या नाजूक आतड्याच्या प्राण्यानें एखाद्या कट्टर फत्तर चित्पावनाच्या कानांत फुंकली, तर तो सुद्धां 'स्वप्नांतहि ही गोष्ट मी खरी मानणार नाहीं' असे धडकाऊन उत्तर दिल्याशिवाय राहणार नाहीं; मग इतरांची काय कथा?

ठाकरे आणि शाहूमहाराज

यांचा परस्पर जिव्हाळ्याचा ऋणानुबंध काय होता आणि ते हयात असताना व दिवंगत झाल्यापासून आजपर्यंत त्यांच्या चारित्र्यावर हल्ले करणारांचा समाचार घेण्यांत ठाकरे यांच्या वाणी लेखणीने किती धडाडीच्या टकरा दिलेल्या आहेत, याची पूर्ण जाणीव नसणारा एकहि जहाल भट पत्रकार अवघ्या महाराष्ट्रात औषधाला मिळायचा नाहीं; मग इतरांविषयीं गोष्टच नको. १९१६ सालापासून शाहू छत्रपतीवर भिक्षुकी शापांचा ज्या वेळी उघड गुप्त मारा झाला, त्या त्या वेळीं ठाकऱ्यांच्याच लेखणीने, केवळ कोदण्डाचे टणत्कारच नव्हे तर, शरवर्षावाचा मुसळधार पाऊस पाडून, शाहूमहाराजांच्या वतीन निकराचा संग्राम केलेला आहे. विजयी मराठा व राष्ट्रवीर या मराठ्यांच्या जबाबदार मुखपत्रांच्या संपादकीय कॉलमांच्या मैदानावरून सुद्धां अनेक महत्वाच्या प्रसंगी ठाकऱ्यांचा तोफखाना दणाणलेला आहे. भटी पत्रांतून आणि व्याख्यानांतून होणाऱ्या उघड हल्ल्यांची गोष्टच काय, पण नुसता चुटपुटता खोडसाळ संदर्भ (insinuation) जरा कोठें आढळला, तरी त्याचाहि यथास्थित समाचार घेण्यास ठाकऱ्यांची लेखणी किती जागरूकतेनें आपली छत्रपतिनिष्ठा बजावीत असे, हें बेळगांवच्या राष्ट्रवीरांतील (२१ मे १९२२) 'केसरीचा बेशरमपणा', या अग्रलेखावरून पडताळून पहावें. मराठ्यांचा किंवा ब्राम्हणेतरांचा वृत्तपत्री 'आर्टिक्युलेट' (बोलके) पणा ही काल परवाची वाढ आहे. तत्पूर्वी शाहू छत्रपती वरील नानाविध गण्डांतरांच्या प्रसंगी कायस्थी लेखण्याच खर्ची पडलेल्या आहेत, आणि त्यांची सेवा निष्काम वृत्तीचीच झालेली आहे, ही गोष्ट म्हणजे मोठेसे कांही गौप्य नव्हे. याबद्दल सर्वांच्या बरोबर ठाकरे यांनीहि पुष्कळ लोकनिंदा व उपहास सहन केलेला आहे व आज करीत आहे. विद्यमान छत्रपति व त्यांच्या नव्या प्रभावळींतील नवथर मुत्सद्दी यांना या ऋणानुबंधाची पुसट सुद्धां कल्पना असणें शक्य नाहीं. तिची त्यांना अटकळहि कधिं व्हायची नाहीं. ती व्हावी अशी आमची इच्छाहि नाहीं. जुन्या ऋणानुबंधाचा धागा नव्या मन्वंतराला जोडून स्वार्थाचा किंवा मानमान्यतेचा भिक्षुकी लग्गा लाऊन ठेवण्याची भटगिरी आमच्या जातीच्याच रक्तांत नसल्यामुळें, शाहू

महाराजांच्या दुर्दैवी निधनकाळापासून तों आतांपर्यंत नवीन छत्रपति किंवा त्यांचे नवीन कारभारी यांच्या 'दर्शनाची' उठाठेव करण्याच्या फंदांत आम्ही मुळींच पडलो नाहीं. पडण्याची इच्छा नाहीं. शाहू महाराज गेले, त्यांच्या बरोबर आमच्या ऋणानुबंधाचे, परस्पर विश्वासाचे आणि इतर सर्व गोष्टींचे धागे दोरे गेले! त्याची ओढाताण नवीन पालवीच्या पायरीपर्यंत खेचण्याची लाळघोटी कलाच आम्हाला साधलेली नाहीं, त्याला काय इलाज?

परंतु व्यक्तीपूजेची एक विचित्र (Crude) भावना आम्हां महाराष्ट्रीयांच्या हाडीमासी खिळलेली आहे. एखादी व्यक्ती लोकांच्या आदरास पात्र झाली कीं मग ते त्या व्यक्तीच्या फक्त गुणांचेच स्तोम माजवितात, आणि दोषांवर दाट पांघरुण घालतात. त्यांची पूज्य व्यक्ती म्हणजे त्यांना सकलगुणालंकृत वाटते. कोणी दोषाविष्करण केल्यास त्यांच्या आदराचे नाजूक मानसिक तंतू तात्काळ दुखावतात. मनुष्य म्हणजे गुणदोषांची गोळाबेरीज हें तत्व ते साफ विसरतात. "Paint me as I am; don't leave even a small scar unpainted" या ऑलीवर क्रॉमवेलच्या उक्तींतलें रहस्य त्यांच्या अंध भक्तीला दिसत नाहीं. उदाहरणार्थ, टिळकच घ्या. टिळकांना कोणताहि विवेकी प्रतिस्पर्धी क्षुद्र लेखीत नाहीं. त्यांच्या गुणसमुच्चयाविषयीं सर्वत्र आदरच आहे. पण त्यांच्या बडव्यांनीं त्यांचे 'शेषशायी भगवान' रूपांत प्रदर्शन करतांच, प्रतिस्पर्ध्याच्या मनातील आदराचा लंबक थेट अनादराच्या बिंदूकडे खाडकन झोका खातो. टिळकांत जसे बरेच गुण होते, तसें बरेच दोषहि होते. पण दोषांचे नांवहि न काढतां गुणांचीच नुसती टाळकुटी आरती करण्याचा टिळकांच्या बडव्यांचा आग्रह कोणाहि विवेकी माणसाला चिळस आणल्याशिवाय रहात नाहीं. हीच गोष्ट शाहूभक्तांची होऊं लागली आहे. दोषाविष्करणानेच गुणांची किंमत वाढत असते, हें या आंधळ्या स्तुतिपाठकांना उमजणें कठीण आहे.

शाहू महाराजाकडे किंवा कोणाकडेहि असल्या अंधभक्तीनें पाहण्याची दृष्टी आम्हाला नाहीं. महाराजांनी तंजावर केससारख्या अनेक भानगडीच्या प्रसंगी आमचा सल्ला घेतलेला आहे, शेकडों बैठकींत नानाविध प्रश्नांवर चर्चा केल्या आहेत, परंतु कोणत्याहि मतभेदाच्या मुद्यावर त्यांनी आमच्या स्पष्टोक्तीनें नाराज होण्याचा राजेपणा दाखविला नाही. महाराज हयात असतांना सुद्धा त्यांच्यावर प्रबोधनांत दोन तीन वेळां कडक टीका करण्याचा आमच्यावर प्रसंग आला होता. (उदाहरणार्थ 'अंबाबाईचा नायटा' प्रबोधन १-११-२१ पहा.) पण तेवढ्यानें त्यांनीं, त्यांच्या अंधभक्तांप्रमाणे, नाक फेंदारलें नाहीं. उलट आम्हाला पन्हाळा लॉजमध्ये भेटीस बोलावून, त्या त्या बाबतीतल्या कारणांची व धोरणांची चिकित्सा केली. शाहू महाराज हयांत असतांना ज्या प्रबोधनकाराच्या स्पष्टोक्तींत त्यांच्या बदनामीचा inuendo, insinuation चा त्यांना कधीं वास सुद्धां आला नाहीं; मतभेदाच्या कडाक्याच्या वादविवादांत त्यांना आपली 'राजकीय इज्झत' जखमी झाल्याचा कधी संशय आला नाही, एखाद्या बाबतीत आम्ही मौन धरल्यास, "I say, now break the ice, or I will break your head" म्हणून विनोदानें आमच्या स्पष्ट अभिप्रायाला ते व्यक्त करायला लावीत, त्याच शाहू महाराजाविषयीं एका सत्यनिरूपणाच्या मजकुरांत, त्यांच्या मृत्यूनंतर, 'कोणाला तरी' पटकन् बदनामीचा वास यावा, हें बदललेल्या मनूच्या बदललेल्या घ्राणेंद्रियाचेंच चिन्ह नव्हे काय?

इतर एकलकोंड्या संस्थानिकांप्रमाणे शाहू महाराजांच्या चळवळी खास 'संस्थानी' नव्हत्या. त्यांच्या राजकारणाचा व्याप कोल्हापूरच्या टीचभर हद्दींत वावरत नव्हता. करवीरस्थ प्रजाजनांचे ते नृपति असले तरी अफाट महाराष्ट्रातल्या बहुजनसमाजाचेच ते स्वयंसेवा वृत्तीचे परिन्छिन्न (recognised) पुढारी होते.

त्यांच्या हयातीपर्यंत महाराष्ट्रीय ब्राम्हणेतरांचें नानारंगी राजकारण कोल्हापुरांत शिजत असे. त्या वेळीं कोल्हापुराविषयीं चिमुकली संस्थानी भावना माजी पडून, कोल्हापूर अवघ्या महाराष्ट्राचा रायगड समजला जात असे. अर्थात् असल्या सार्वजनिक महाराष्ट्रीय पुढाऱ्याच्या चारित्र्यावर वाटेल त्या दिशेने दृष्टी फेकण्याचा अखिल महाराष्ट्राला पूर्ण अधिकार आहे. अशा वेळीं संस्थानीकपणाच्या टीचभर कोंडाळ्यांत या महाराष्ट्रव्यापी महापुरुषाच्या चारित्र्याला व चरित्राला कोंबून, जरा कोणी कोठे फट् म्हटलें की प्रिन्सेस प्रोटेक्शन ॲक्टाच्या लावालावीची धावाधांव करण्याइतका मनाचा मवाळपणा, शाहू महाराजांच्या 'पावलांवर पाऊल' टाकून चालणारांच्या प्रकृतींत असेल, असा आमचा सध्यां तरी सूर वहात नाही. मग जुन्या डोळ्यांना नवीन तमाशे काय काय दिसतील, तें कोणी सांगावें?

भाऊराव प्रकरणीं कोल्हापुरी पोलीसांकडून घडलेल्या अत्याचाराचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष आरोप महाराजाकडे जाऊंच कसा शकतो? मथळा तर 'कोल्हापुरी पोलीसांचे अत्याचार' असाच आहे. 'शाहूमहाराजांचे अत्याचार' असा नाहीं. डांबर प्रकरणाचा तपास लावण्याची सर्व सूत्रें खुद्द महाराजांनी जरी हाती ठेवली होती, तरी सर्व लहानसान गोष्टी ते स्वतःच चोखाळीत होते कीं काय? त्यांच्या सत्तेखालच्या सर्व उच्च नीच दर्जाच्या अंमलदारांच्या रिपोर्टाप्रमाणें महाराज फक्त हुकूम देण्याची धनी. पण अंमलबजावणी कशी होते हें त्यांना काय समजणार? अंमलबजावणीच्या कामीं कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून विशेषतः पोलीसांकडून होणारे लहान मोठे अत्याचार वरीष्ठ अधिकाऱ्यांना आपोआप उमगण्याचें कर्णपिशाच्च यंत्र जर कोणी शोधून काढलेलें असतें, तर कोणत्याहि राज्यांत अत्याचाराचा मागमूसहि उरता ना, आणि बॅरिस्टर सावरकरांना सुद्धां आपल्या अन्दमानच्या हृदयद्रावक कहाण्या प्रसिद्ध करण्याचा प्रसंगच येतो ना!

गेल्या वर्षभर केसरींतून प्रसिद्ध होणारी सावरकरांची अंदमान-लेखमाला आणि कित्येक बंगाल्यांनी त्याच विषयावर लिहिलेली इंग्रेजी पुस्तकें प्रसिद्ध होईपर्यंत अन्दमानास प्रत्यक्ष यमपुरीपेक्षाहि राक्षसी अत्याचारांचा धुडघूस सुरू असतो, अशी कोणाचीहि कल्पना नव्हती. पण ती आता त्या यज्ञांतन होरपळून बाहेर पडलेल्या प्रत्यक्ष बळींच्याच तोंडून बाहेर पडल्यामुळें व खुद्द सरकारनेहि त्या अत्याचारांच्या खोटेपणाचा इनकार न केल्यामुळें, कोणालाहि शंका उरत नाही. परंतु, नाम. व्हाईसराय साहेब किंवा स्टेट सेक्रेटरी यांच्या हातीं आन्दमानचीं सूत्रें असतात, एवढ्याच सबबीवर, तेथल्या अंमलदारांच्या बेजबाबदार अत्याचारांचे माप कोणी या अधिकाऱ्यांच्या पदराला बांधील, तर ते कितपत शहाणपणाचें ठरेल? उलट, अशा वस्तुस्थितीच्या स्पष्ट स्फोटामुळेच व्हाईसरायादि अधिकाऱ्यांना अन्दमानी परिस्थितीची कस्सून चौकशी करण्याची प्रेरणा झालीं ना? सत्य स्थितीच्या स्फोटार्थ उपयोगिलेल्या स्पष्टोक्तीचा असाच उपयोग करून घेणें, यालाच राजकारणी न्यायबुद्धी असें म्हणतात. अलीकडे हिंदी वृत्तपत्रांवर सत्ताधाऱ्यांची केवढीहि करडी नजर असली, तरी असल्या न्यायबुद्धीला चालना देण्याचें कार्यच तीं असल्या स्पष्टोक्तीने घडवून आणीत असतात, हें विसरून भागणार नाहीं. सारांश, कोल्हापुरी पोलीसांच्या अत्याचाराचा संबंध महाराजांशीं जोडण्याचा अर्थ आमच्या वाक्यांतून मुळींच निघत नाहीं आणि तसा आमचा हेतूहि नव्हता व कधिं असणारहि नाहीं. महाराजांना या गोष्टी फार मागाहून कळल्या व त्या विषयीं काहीं कडक उपायहि त्यांनीं योजले होते. अत्याचाराच्या खरेखोटेपणाविषयीं शंकानिरसनार्थ सावरकराप्रमाणें भाऊराव पाटील ईश्वर कृपेनें प्रत्यक्ष जिवंत आहेत आणि त्यांत महाराजांचा कांहीं संबंध असल्याचे तेहि जर म्हणत नाहींत, तर आम्ही तरी कोठून विधान

करणार? सारांश, कोणत्याहि दृष्टीनें पाहिल्यास आमच्या विधानांत शाहू महाराजांच्या चारित्र्याला धक्का देण्याइतकें सूक्ष्म अथवा भरीव असें कांहींच नाहीं. मात्र, भलत्या कल्पनेची कांवीळ झालेल्या डोळ्यांना सगळा लेखच पिवळा दिसला, तर आम्हापाशी कसलाच उपाय नाही.

तक्रारीचा उगम कोठून?

या एका मुद्याची शहानिशा केली कीं आम्ही लेखणी खालीं ठेवणार. डि. मॅ. साहेबांना हा प्रश्न आम्ही स्पष्ट विचारला. ते म्हणाले ''ओरिएंटल ट्रान्सलेटरकडून हे भाषांतर आलेले आहे. अशा गोष्टी योग्य अधिकाऱ्यांच्या नजरेला आणणें हें त्याचे कर्तव्यच आहे. या पलीकडे मला कांही माहिती नाही.''

ओ. ट्रॅ. च्या या कर्तव्यदक्षतेबद्दल आम्ही प्रथमच आभार मानून ठेवतो, प्रश्न इतकाच सुचतो कीं ही त्यांची कर्तव्यदक्षता या एकाच बाबतीत एवढी जागरूक कां बनली? कोल्हापूर संस्थान आणि शाहू महाराज यांची हवी तशी बीभत्स व बेजबाबदार निर्भत्सना करण्यांत पुण्याच्या भटी पत्रांचा नंबर पहिला आहे. ही त्यांची अनेक वर्षांची परंपरा आहे. अझूनपर्यंत ती अखंड सुरू आहे. नुकत्याच घडलेल्या धनवडी अत्याचाराच्या मागें पुणेरी भटांना दिसणाऱ्या कटांतहि त्यांनी कोल्हापूरच्या महाराजांना गोंवण्याची नातुगिरी केलेली आहे. या सर्व प्रसंगी ओ. ट्रा. नें पुण्याच्या डि. मॅ. चे लक्ष वेधण्याची अशीच कर्तव्यदक्षता दाखविली होती काय? गुदस्त सालीं सर्रास भटी पत्रांतून होळकरांची बीभत्स विटंबना सुरू असतांना ओ. ट्रा. नें हीच कर्तव्यदक्षता गाजविली होती काय? देशी संस्थानांची सकारण निष्कारण विटंबना करणाऱ्या किती भटी पत्रकारांना सरकारनें आजपर्यंत जाब विचारलेला आहे? का भटांना सारे खून माफ करण्याचा मनुस्मृति अंमल अझुनहि चालूंच आहे? खालसा वृत्तपत्रांच्या टीकेपासून देशी संस्थानांचें संरक्षण व्हावे, म्हणून प्रिन्सेस प्रोटेक्शन ॲक्ट नावाचा कायदा अस्तित्वांत आहे. होळकर प्रकरणीं या ॲक्टाचा मुंबई सरकारनें उपयोग करावा, म्हणून प्रबोधनद्वारा आम्ही अट्टहासाची अनेक मराठी इंग्रेजी आर्टिकले खरडली. पण तिकडेहि ओ. ट्रा. चे लक्ष गेल्याचे दिसले नाही. पुढें तो आक्ट नीट वाचून पहांता, ज्या राजावर टीका टिपणी झाली असेल, त्यानी प्रत्यक्ष तक्रार केल्याशिवाय ब्रिटीश सरकार त्या कायद्याचा अंमल करू शकत नाहीं, अशी त्यांत मेख आढळली. प्रस्तुत प्रकरणी तशी तक्रार कोल्हापुराकडून झालेली आहे काय? असा स्पष्ट प्रश्न डि. मॅ. साहेबास विचारतां त्यांनी 'तें मला समजण्यास कांहीं मार्ग नाहीं' असें उत्तर दिलें. अर्थात् येथेंच सारा मार्ग खुंटला. तथापि, लेखी नसेल तर तोंडी, कांही तरी सूचनेचा प्रकार झाल्याशिवाय ही तक्रार जन्माला आली नसावी खास. कांहीहि असो आणि तक्रार करणारा 'कोणी' हि असो. आम्ही आमचा खुलासा स्पष्टपणें केला आहे. तेवढ्यानें 'कोणी' ची शंकानिवृत्ति खास होईल, अशी आम्हांला आशा आहे. कोणत्याहि बाबतींत प्रमादाक्षमत्वाची (infallibility) घमेंड आम्ही मारणे शक्यच नाही. ते माणसाला साधत नाहीं. ते माणुसकीचेंहि होणार नाहीं. अर्थात् वृत्तपत्रकाराचे सत्यनिरूपणाचे प्रामाणिक कर्तव्य बजावीत असतांना, एखाद्या शब्दानें, वाक्यानें, संदर्भानें, किंवा आणखी कशानेहि कोणाचीहि मनोवृत्ति दुखावली गेली असल्यास, केवळ शाहू महाराजांसाठी

एक सोडून लाख वेळां दिलगिरी

व्यक्त करण्याचा दिलदारपणा (chivalry) प्रबोधनकारांत खास आहे.

□□□

अग्रलेख

देवळांचा धर्म आणि धर्माची देवळें

कोणतीहि वस्तुस्थिति अथवा कल्पना प्रथमतः कितीहि चांगल्या हेतूच्या पोटीं जन्माला आलेली असली, तरी काळ हा असला इलमी जादूगार आहे कीं आपल्या धावत्या गतीबरोबर त्या हेतूचे रंग आरपार बदलून, त्या वस्तूला स्थितीला आणि कल्पनेला सुद्धां उलटी पालटी करून टाकतो. पूर्वी स्तुत्य वाटणारी गोष्ट आज सर्वथैव निंद्य कशी ठरते, याचेंच पुष्कळांना मोठें कोडें पडतें. पण तें उलगडणें फारसें कठीण नाहीं. काळ हा अखंड प्रगमनशील आहे. निसर्गाकडे पाहिले तरी तोच प्रकार. कालचें मूल सदा सर्वकाळ मूलच राहत नाहीं. निसर्गधर्मानुसार कालगतीबरोबरच त्याचेंहि अंतर्बाह्य एकसारखें वाढतच जातें आणि अवघ्या १८ वर्षांच्या अवधीत तेंच गोजीरवाणें मूल पिळदार ताठ जवानाच्या अवस्थेंत स्थित्यंतर व रूपांतर झालेलें आपणांस दिसतें. काळाच्या प्रगतीच्या तीव्र वेगामुळें झपाझप मागे पडणारी प्रत्येक वस्तुस्थिति आणि कल्पना, ती जर दगडा धोंड्याप्रमाणे अचेतन अवस्थेत असेल तर, प्रगमनशील डोळ्यांना ती विचित्र आणि निरुपयोगी दिसल्यास त्यांत कांहींच चुकीचें नाहीं. जेथें खुद्द निसर्गच हरघडीं नवनव्या थारेपालटाचा कट्टा अभिमानी, तेथे मनुष्याचा जीर्णाभिमान फोलच ठरायचा. जुनें तें सोंनें ही म्हण भाषालंकारापुरती कितीहि सोनेमोल असली तरी जुन्या काळच्या सर्वच गोष्टी सोन्याच्या भावानें आणि ठरलेल्या कसानें नव्या काळाच्या बाजारांत विकल्या जाणे कधीच शक्य नाहीं. उत्क्रांतीच्या प्रवाहांत वहाणीस लागलेल्या मानवांनीं काळाच्या आणि निसर्गाच्या बदलत्या थाटाबरोबर आपल्या आचारविचारांचा घाट जर शिस्तवार बदलला नाहीं, तर कालगतीच्या चक्रांत त्यांच्या चिंधड्या चिंधड्या उडाल्याशिवाय राहावयाच्या नाहींत. निसर्गाचा न्याय आंधळा असला तरी काटेकोर असतो. काळाची थप्पड दिसत नाहीं, पण त्याच्या भरधांव गतीपुढें कोणी आडवा येतांच छाटायला मात्र ती विसरत नाहीं. प्रवीण वैद्याची हेमगर्भ मात्रा वेळीं एखाद्या रोग्याला मृत्यू-मुखांतून ओढून काढील, पण निसर्गाचा अपराधी ब्रम्हदेव आडवा पडला तरी शिक्षेवाचून सुटायचा नाही. पूर्वी को काळी मोठ्या पुण्यप्रद वाटणाऱ्या किंवा असणाऱ्या गोष्टी आज जर पापाच्या खाणी बनलेल्या असतील, तर केवळ जुनें म्हणून सोने एवढ्याच सबबीवर त्या पापाच्या खाणीचे देव्हारे माजविणे म्हणजे जाणून बुजून काळाची कुचाळी करण्यासारखे आहे. अर्थात् असल्या कुचाळीचा परिणाम काय

होणार, हे सांगणें नकोच.

काळाच्या कुचाळ्या करण्यांत हिंदु जनांनीं दाखविलेला पराक्रम आज त्यांच्या सर्वांगीण अधःपातांत स्पष्ट उमटलेला आहे. आजचा हिंदुसमाज 'समाज' या नांवाला कुपात्र ठरलेला आहे. हिंदु धर्म हें एक भलें मोठें भटी गौडबंगाल आणि हिंदु संस्कृति म्हणजे एक बिनबुडाचें पिचकें गाडगे. यापेक्षां त्यांत विशेष असें कांहींच नाहीं. उभ्या हिंदुस्थानांत दुर्गादेवी दुष्काळ बोकाळला तरी भटांच्या पोटापाण्याच्या प्रश्नाला भटेतरांच्या फाजील उदारपणामुळें कसलाच चिमटा बसत नाहीं. त्यामुळे धर्म संस्कृति संघटन इत्यादी प्रश्नांवर पुराणें प्रवचनांची तोंडझोड उठविण्याइतकी त्यांची फुफ्फुसें अझून बरीच दणकट राहिलीं आहेत. म्हणून पुष्कळ बावळटांना अझून वाटतें कीं हिंदु समाज अझून जिवंत आहे. एकूण एक व्यक्ती द्वैतानें सडून गेलेली स्वच्छ दिसते, तरी 'द्वैतांतच अद्वैत आहे' म्हणून शंख करणारे तत्वज्ञानीहि काहीं कमी आढळत नाहींत. परंतु वास्तविक स्थिति विचारवंतांना पूर्ण कळलेली आहे. 'द्वैतांतच अद्वैत' अजमावण्याची भटी योगधारणा आमच्या सारख्या सुधारकांना जरी साधलेली नाहीं, तरी काळचक्राशी हुजत खेळणाऱ्या हिंदु समाजाचे भवितव्य अजमावण्यासाठी ज्योतिषीबुवांचे पायच कांहीं आम्हांला धरायला नको. सभोंवार परिस्थितीचा जो नंगा नाच चालू आहे, आत्मस्तोमाच्या टिकावासाठीं भिक्षुकशाहीचीं जीं कारस्थानें गुप्तपणानें सुरू आहेत आणि दिव्यावरच्या पतंगाप्रमाणे भटेतर लोक या कारस्थानांत जे फटाफट चिरडले जात आहेत, त्यावरून हिंदु समाजाचें भविष्य फारसे उज्वल नाहीं, असें स्पष्ट नमूद करायला या लेखणीस फार कष्ट होत आहेत. निराशाजनक अशाहि अवस्थेंत हिंदु समाज जगविण्याचे कांहीं राजमार्ग आमच्या धर्मबांधवांना सुचविणें, हेंच वास्तवीक प्रबोधनाचें आद्यकर्तव्य आहे. राजमार्गाच्या आमच्या सूचना इतर डळमळीत सुधारकांप्रमाणे 'मोहरी एवढी गोळी आणि बालदीभर पाणी' अशा नाजूक होमिओपथिक मासल्याच्या केव्हाहि नसणार. प्रबोधनाच्या सूचना म्हणजे थेट सर्जरीच्या (शस्त्रक्रियेच्या) पत्करल्या तर प्रयोग करून पहा. तात्काळ दुःखमुक्त व्हाल, नाहींतर होमिओपथिक गुळण्या, भटांचे संघटणी काढे निकाढे, पुराण प्रवचनांच्या लेक्चरबाजीच्या मलमपट्या आणि पक्षोपपक्षांची वातविध्वंसक नारायण तेलें आहेतच. बसा चोपडीत जन्मभर!

आमचा आजचा धर्म हा मुळीं धर्मच नव्हे. प्रचलित भिक्षुकशाही धर्म म्हणजे बुळ्या बावळ्या खुळ्यांना झुलवून भटांची तुंबडी भरणारें एक पाजी थोतांड आहे. या थोतांडाच्या भाराखाली अफाट भटेतर दुनिया माणूस असून पशूपेक्षांही पशू बनली आहे. त्यामुळें आमच्या सर्वांगीण हलाकीचे मूळ भटाच्या पोटांत आहे; त्याच्या गोडबोल्या ओठांत नव्हे, हें शेंकडां दहा लोकांना पटता पटतांच एक शतक काळाच्या उदरांत गडप झालें.

भटेतरांच्या धार्मिक गुलामगिरीच्या थोतांडांत देवळाचा नंबर पहिला लागतो. देवळांची उत्पत्ति ब्रम्हदेवाच्या बारशाला खास झालेली नाहीं. हिंदु धर्माची ही अगदी अलीकडची कमाई आहे. देऊळ हा देवालय या शब्दाचा अपभ्रंश आहे. देवाचें जें आलय-वसतिस्थान-तें देवालय. आमचें तत्वज्ञान पहावें तों देव 'चराचरा व्यापुनि' आणखी वर 'दशांगुले उरला'. अशा सर्वव्यापी देवाला, चार भिंतीच्या व कळसबाज घुमटाच्या घरांत येऊन राहण्याची जरूरच काय पडली होती? बोरीबंदरावर उतरलेल्या नवख्या प्रवाशाला सरदारगृहांत किंवा ताजमहालात जाण्याचा जसा प्रसंग येतो, तसा 'चराचर व्यापुनी

दशांगुलें उरलेल्या' देवाला सारें जग ओसाड टाकून हिंदूंच्या देवळांतच येऊन ठाणें देण्याचा असा कोणता प्रसंग ओढवला होता नकळे. बौद्ध धर्म हिंदुस्थानांतून परागंदा होईपर्यंत (म्हणजे इसवी सनाचा उदय होईपर्यंत) तरी भारतीय इतिहासांत देवळांचा कोठेच कांहीं सुगावा लागत नाहीं. मग तोपर्यंत आमचे हे हिंदु देव थंडी वाऱ्यांत कुडकुडत आणि उन्हातान्हांत धडपडत पडले तरी कोठें होतें? विद्वान संशोधकांच्या मते आर्यांच्या ऋग्वेदकाळाची गणना जास्तींत जास्तं इसवी सनापूर्वी ७००० वर्षे धरली, तर इतकी वर्षे हे आमचे मोक्षदाते देव देवळाशिवाय जगले तरी कसे आणि कोठें? आजचा त्यांचा देवळांतला थाट पाहिला, तर जिवंत माणसाला एक वेळच्या कोरड्या भाकरीची पंचाईत; पण या देवांना सकाळची न्याहारी, दुपारीं पंचपक्वान्नाचें भरगच्च ताट, पुन्हा तीन प्रहरीं टिफीण आणि रात्री जेवण! या शिवाय दिवस सुना जायचा नाहीं. या शिवाय काकड आरत्या, माकड आरत्या, धूपार्त्या, शेजार्त्या आहेतच. कोट्यवधि गोरगरीब हिंदूंना विशेषतः धर्मश्रद्धाळू हतभागी अस्पृश्यांना थंडीच्या भयंकर कडाक्यांत गोणपाटाचे ठिगळहि मिळण्याची पंचाईत; पण आमच्या देवांना छपरीपलंग मच्छरदाणी गाद्यागिरद्यांशिवाय भागायचेच नाहीं. खुशालचेंडू श्रीमंतांप्रमाणें असल्या अखंड ऐश्वर्यात लोळणाऱ्या देवांची स्थिति देवळे निर्माण होण्यापूर्वी कशी असावी, याची प्रत्यक्ष प्रदर्शने म्हणून तर भिक्षकशाहीच्या आद्य शंकराचार्यांनीं महारवाडे मांगवाडे धेडवाडे भंगीवाडे निर्माण करून ठेवले असावेत काय? आमची खात्री आहे कीं देवळे नव्हती तेव्हां आमच्या देवांच्या नशिबीं महारा मांगाप्रमाणेच मसणवटीची कर्मप्राप्त राहणी लागलेली असावी. या राहणीतून आपला उद्धार व्हावा आणि काकड माकड आरतीचें आणि घंटा नगाऱ्याचें ऐश्वर्य आपणांस लाभावें, म्हणून आमच्या देवळ्या देवांनीं भटांची खूप पायचाटी केली; तेव्हां भटांच्या वेदोक्त मेहरबानीनें त्यांना तुरुंगवजा देवळातली भटमान्य राजविलासी राहणी लाभली.

देवळें आणि देव यांची आज कशी विल्हेवाट लावावी याचा विचार करण्यापूर्वी, या दोन संस्था मूळ अस्तित्वात कशा आल्या, याची रूपरेषा वाचकांपुढे ठेवणें जरूर आहे. या साठीं आर्य संस्कृतीच्या जोडीनेंच इजिप्त आणि मेसापोटेमियाकडे परिणत होत असलेल्या सेमेटिक लोकांच्या संस्कृतीचा प्राचीन इतिहास आपण संक्षेपानें समालोचन केला पाहिजे. आर्यांप्रमाणेंच सेमेटिक लोक गुरेंढोरें पाळून, आज या ठिकाणीं तर उद्यां त्या ठिकाणीं वसाहत करणारे धाडशी भटक्ये होते, आर्यांनी ऋग्वेद-रचनेपर्यंत, म्हणजे निसर्ग-पूजनापर्यंत, आपल्या धर्मविषयक कल्पनेची काहीं तरी ठळक रूपरेषा आखली होती. पण सेमेटिक लोक धर्मविषयक कल्पनेंत इतके व्यवस्थित बनलेले नव्हते. आस्ते आस्ते ते निश्चित धर्मकल्पना बनविण्याच्या घटनेंत होते. तथापि, आर्य झाले काय किंवा सेमेटिक झाले काय, 'धर्म' शब्द उच्चारताच आज आपल्या ज्या काहीं भावना होतात, त्या भावनांचा त्या वेळीं दोघांनाहि काही थांग लागलेला नव्हता. आर्यांनी पंजाब सर केल्यावर आणि त्यानंतर अनेक शतकें त्यांच्या धर्मकल्पनेंत देवळें घुसलेली नव्हती. त्यांच्या संघव्यवस्थेंत राजन्याच्या (क्षत्रियाच्या) पाठोपाठ उपाध्यायाचा (भिक्षुक भटाचा) वर्ग जरी निर्माण झाला होता, तरी देवळाची कल्पना कोणालाच स्फुरण पावलेली नव्हती. या बाबतींत इजिप्तकडच्या सेमेटिक व सुमेरियन संघांनीच प्रथमतः पुढाकार घेतल्याचें इतिहासावरून दिसतें. इजिप्त आणि मेसापोटेमियांत शहरांची प्रथम वसती होऊं लागली, त्याच वेळीं प्रत्येक शहरांत एक किंवा अनेक देवळांचा प्रथम उगम झालेला आढळतो. हीं देवळें सामान्यतः

राजवाड्यानजिकच असत. मात्र देवळाचा घुमट राजवाड्याच्या घुमटापेक्षां विशेष उंच बांधण्यांत येत असे. देवळाचा हा प्रघात फिनीशियन, ग्रीक व रोमन शहरांतहि पुढें पसरत गेला. इजिप्त आणि सुमेर प्रमाणेंच आफ्रिका युरप आणि आशियाच्या पश्चिम भागाकडे जेथें जेथें प्राचीन संस्कृतीचे पाऊल पडत गेले, तेथें तेथें देवळांची उत्पत्ति प्रथमतःच ठळकपणें इतिहासांत दृष्टीस पडते. अखिल मानवांच्या उत्क्रांतीच्या व संस्कृतीच्या इतिहासांत देवळांची कल्पना ही अशी प्रथमच जन्माला आलेली आहे.

या सर्व देवळात आतल्या बाजूस एक देवघर किंवा गाभारा असे. त्यांत अर्धपशू व अर्धमानव अशा स्वरूपाची एक अक्राळविक्राळ अगडबंब मूर्ती बसविलेली असे. त्याच्यापुढें एक यज्ञकुंड असून देवाला द्यायच्या बळींची त्यावर कंदुरी होत असे. ही मूर्ती म्हणजे देव किंवा देवाचे प्रतिक म्हणून व देऊळ म्हणजे या देवाचे वसतिस्थान म्हणून मानण्यात येत असे. देऊळ नव्हते तोपर्यंत देव नव्हता. अर्थात् त्याच्या सेवेकऱ्यांचीहि गरज नव्हती व उत्पत्तीहि नव्हती. पण देवळांत देव येऊन बसल्यावर त्याच्या पूजाअर्चेसाठी शेकडों भट आणि भटणी, तेलबत्तीवाले, झाडूवाले, कंदुरीवाले, धूपार्ती शेजार्तीवाले, असे अनेक लोक निर्माण झाले. प्रत्येक जणाचा पेहराव निराळा. लोकांतले शिष्ट लोकमान्य काय ते हे. आर्यांप्रमाणें जो क्षत्रिय तोच 'ब्राम्हण, तोच गृहपति यजमान, वेळ पडेल तसे काम करणारा, ही पद्धत या लोकांत नव्हती. यांनीं आपआपला एक निरनिराळाच ठरावीक व्यवसायाचा संघ बनविला. भट म्हणजे भट, मग तो कंदुरी करायचा नाही; कंदुरीवाला निराळा, सारांश, प्रत्येकाने आपापली एक ठराविक धंद्याची जातच बनविली; आणि बहुजन समाजांतले पुष्कळ हुशार लोक देवळाच्या या बैठ्या परंतु किफायतशीर धंद्यांत घुसले.

भटाचें काम दगड्या देवाची पूजा आणि यज्ञांतल्या कंदुऱ्या यथासांग करावयाच्या. हे यज्ञयाग दररोज न होता कांहीं ठरावीक दिवशींच व्हायचे. लोकांची भटकी वसाहत प्रवृत्ति आता बरीच शिथिल होऊन, त्यांना शहरवासाची चटक लागत चालली होती. सहा दिवस काबाडकष्ट केल्यावर सातवा दिवस विश्रांतीचा असावा, त्याचप्रमाणें वर्षातले कांही दिवस सण मानावे, अशी प्रवृत्ति होत गेली; आणि हें विश्रांतीचे किंवा सणाचे दिवस कोणते हें ठरविण्याचा मामला देवळातल्या भटोबांकडे असे. तीथ वार सण खडाष्टक फडाष्टक इत्यादि भानगडी देवळांमधूनच लोकांना कळत असल्यामुळे, देऊळ म्हणजे त्या काळचे चालतें बोलतें कॅलेंडर ऊर्फ पंचांगच म्हटलें तरी चालेल.

पण आणखीहि बऱ्याच गोष्टी या प्राचीन देवळांत घडत असत. लिहिण्याची कला याच वेळी अस्तित्वात आलेली होती. त्यामुळे शहरांतली व खेड्यापाड्यांतली हरएक गोष्ट समारंभ किंवा बरा वाईट प्रसंग देवळांतच टिपून ठेवण्यात येत असे. देऊळ म्हणजे सार्वजनिक रिकार्ड हापीस. ज्ञानभांडारहि येथेच. सणांवारीच लोकांच्या टोळ्याच्या टोळ्या देवळांत जात असत असें नव्हे, तर वाटेल त्या दिवशी वाटेल ती व्यक्ती कामासाठीं तेथें एकेकटीहि जात असे. त्या काळचे भटजी वैद्यकी आणि छाछूंहि करीत असत. त्यांची प्रवृत्तीहि परोपकारी असे. त्यामुळे सर्वांना देऊळ म्हणजे एक मायघरच वाटे. काटा रुतला, जा देवळांत. नवरा रुसला, जा देवळांत बायको पळाली, जा देवळांत. दुखण्यातून उठला, जा नवस घेऊन देवळांत. अशा रीतीने देवळांत हजारों भानगडी चालत असत. बऱ्यासाठीहि देऊळ आणि वाईटासाठींहि देऊळच. असा प्रकार होता होतां राजांच्या राज्याभिषेकापासून तो नाठाळ नवतीच्या नाऱ्याचें नाळवार नकळत नापत्ता करण्यापर्यंत सगळ्या भानगडी देवळातच होऊं लागल्या.

आर्य संस्कृतीचा पगडा बसलेल्या हिंदुस्थांनात, इसवी सनाचा उदय होईपर्यंत, धार्मिक क्षेत्रांत नवजीर्ण मतांचे असंख्य झगडे झाले व विचारक्रान्तीचीहि वादळें अखंड चालूं होती. आपमतलबी भिक्षुकशाहीनें नवमतवादाच्या प्रत्येक लहान मोठ्या चळवळीला ठार मारण्याचा प्रयत्न एकसारखा सुंरूच ठेविला होता. (ब्राम्हणांची भिक्षुकशाही एवढ्याचसाठी भूतलावर अवतरलेली आहे.) सापडेल त्या पशूचा यज्ञ, सोमरसप्राशन व गोमांस-भक्षण येथपासून ऋग्वेदी आर्यांच्या आचार विचारांत क्रांती होत होत, बुद्धोत्तर काळीं बहुतेक हिंदु समाज 'अहिंसा परमो धर्म' वाला निवृत्तमांस बनला होता. धर्म आणि ईश्वरविषयक कल्पनाहि पार उलट्या झालेल्या होत्या. परंतु स्थूल मानानें इसवी सनाच्या २ ऱ्या ३ ऱ्या शतकापर्यंत हिंदु जनांत व हिंदुस्थानांत देवळे घुसलेली नव्हती. जीर्णमताभिमानी व आत्मवर्चस्वाभिमानी भटांच्या भिक्षुकशाहीनें नवमतवादी बौद्ध धर्माचा पाडाव करून, भटी वर्चस्वस्थापनेसाठीं इसवी सनाच्या २ ऱ्या शतकांत महाभारत रामायणाच्या जुन्या आवृत्त्या मनसोक्त घालघुसडीच्या फोडणीनें फुगविल्या आणि मनुस्मृतीला जन्म दिला. पण त्या काळच्या कोणत्याहि वाङमयात देव आणि देवळे आढळून येत नाहीत. नाही म्हणायला, बौद्धधर्मी अशोक सम्राटाच्या अमदानीपासून बौद्ध भिक्षूंच्या योगक्षेमासाठी आणि स्वाध्यायासाठी ठिकठिकाणी मोठमोठे विहार, लेणी, गुहा, संघमंदिरे ही अस्तित्वात आलेली होती. पुढे पुढे या संघमंदीरात महात्मा बुद्धाच्या मूर्ती स्थापन करून त्यांच्या पूजा अर्चा बौद्धांच्या हीनयान पंथाने सुरू केल्या. हिंदुस्थानात देव देवळांचा उगम शोधातच गेले, तर तो या बौद्ध विहारातच बिनचुक सापडतो. नंतर इसवी सनाच्या ७-८ व्या शतकात भिक्षुकशाहीचे उद्धारक आद्य शंकराचार्य यांचा अवतार झाला. त्यांनीं शुद्धी करून संघटनांत सामील करून घेतलेल्या सिथियनांच्या उर्फ रजपुतांच्या पाठबळानें बौद्धांच्या भयंकर कत्तली करविल्या. त्यांच्या विहारांची नासधूस केली. उरल्या सुरल्या बौद्धांना देशोधडीला लावले. लक्षावधि लोकांना मसणवटीत पार धुडकावले. या दुर्दैवी लोकांच्या नशिबाची माणुसकीहि हिराऊन घेण्यात आली. अशा रीतीने हिंदुस्थानांत हिंदू समाजात अगदीं पहिल्यानेच

आद्य शंकराचार्याने अस्पृश्यता निर्माण केली.

ठिकठिकाणच्या बौद्ध विहारांतल्या या पवित्र वस्तूंचा आणि बुद्ध-मूर्तीचा उच्छेद केला, आणि तेथें शंकराच्या पिंड्या थापल्या. कित्येक ठिकाणीं तर बुद्धाच्या मूर्तींनाच थोडा बहुत फरक करून, त्यांना शंकरमूर्तीचा बाप्तिस्मा दिला. अशा रीतीनें बौद्ध विहारांचे रूपांतर शंकराच्या देवळात झाले.

जोपर्यंत चिलीमच नव्हती, तोंपर्यंत गांजाची जरूर कोणालाच नव्हती. देवळांच्या चिलमी निघाल्यावर निरनिराळ्या देवांचा गांजा पिकवायला हिंदूंच्या तरळ कल्पनेला कसला आयास? शंकराची देवळे निघतात न निघतात, तोंच गणपति सोंड हालवीत, मारुती गदा झेलीत, बन्सीधर कृष्ण मुरली मिरवीत एका मागून एक हजर. समाज बहिष्कृत पडल्यामुळें अस्पृश्य ठरलेल्या लक्षावधि लोकांनीहि आपल्या जिवाच्या समाधानार्थ म्हसोबा खैसोबा चेडोबा असे अनेक ओबा देव साध्या दगडांना शेंदूर फांसडून निर्माण केले. आद्य शंकराचार्यांनी रक्तपाताच्या अत्याचारी पुण्याईवर पुनरुज्जीवित केलेली भिक्षुकशाही जसजशी बेफाम थरारूं लागली, तसतशी जातिभेदाची आणि देवळांची पैदास डुकरिणीच्या अवलादीला बरे म्हणवू लागली. हिंदूंच्या देवळांची उत्पत्ति ही अशी झालेली आहे.

शंकराचार्यांनी ब्राम्हणी धर्माच्या पुरस्कारासाठीं बौद्ध धर्माचा नायनाट केला. त्यांतल्या सुडाची नांगी

इतकी भयंकर जहरी व खुनशी होती कीं ती चालूं घटकेपर्यंत बौद्ध धर्माचा दिवसा ढवळ्या अपमान व उपहास करीत आहे. हिंदु जनांच्या मनात बौद्धद्वेषाचें पेरलेलें भिक्षुकशाही विष आज कसे थैमान घालीत असतें, हें वाटेल त्या बौद्ध लेण्यांत पाहून घ्यावे. वास्तविक या विहारात किंवा लेण्यात महात्मा बुद्धाचे बौद्ध भिक्षु 'अहिंसा परमो धर्मः'चे तत्वचिंतन आणि भूतदया क्षमा शांति या सात्विक गुणांचा परिपोष व प्रसार करीत असत. शंकराचार्याचा भिक्षुकी हात या विहारांवरून फिरतांच त्यांची खाडकन स्मशाने बनली. ते गरीब जनसेवक बौद्ध भिक्षु रसातळाला गेले. त्यांचा अहिंसावाद हवेंत वितळला. ताबडतोब प्रत्येक लेण्यांत एकेका उग्र देवाची अगर देवीची देवळें उगवली आणि त्यांना कोंबड्या बकऱ्यांच्या कंदुऱ्यांनी संतुष्ट करणाऱ्या भक्तजनांच्या टोळ्या लाखांनी मोजण्याइतक्या फुगल्या. या वेळीं आठरा पुराणांचीहि भटी पैदास झालेली असल्यामुळें, हिंदु समाजातल्या व्यक्तीमात्रांची नातीगोती जरी जातिभेदाच्या घरटांत वस्त्रगाळ भरडलेली गेली होती, तरी देवांच्या आणि देवींच्या गोतावळ्याची जाळी सताड मोकाट सुटली होती. माणसांप्रमाणें देवांच्याहि मागें बायका मुलांचीं लचांडे निर्माण झाल्यामुळे, पार्वती ही जरी जगन्माता-साऱ्या विश्वाची आई असली, तरी ब्राम्हण कवीच्या कल्पनेच्या मुर्वतीसाठीं, तिचे गजड शंकराशी लग्न लागून, कधीं स्मशानात तर कधीं हिमालयात, भैरव पिशाच्चादि सेवकगणांच्या संगतींत तिला संसार करणें भागच पडलें. सृष्टिविधात्या ब्रम्हदेवाला, सृष्टी उत्पन्न झाल्यावर, विष्णूच्या बेंबटांतून खेचून काढणाऱ्या भिक्षुकशाहीनें असलीं देव देवींची गोतावळ्यांची लफडीं इतकी निर्माण केलेलीं आहेत कीं त्यांच्या वंशवेलांत सद्धर्माचाहि थांग आज लागणे मुष्किलीचे होऊन बसलें आहे. फार दूर नको, लोनावळ्या जवळची कार्ला लेणी पहा. ही वास्तविक बौद्धांची. तेथल्या या ओऱ्या, ते दिवाणखाने, ते स्तूप, साऱ्या बौद्धांच्या स्वाध्यायाश्रमाच्या जागा. तेथे बाहेर एक देवी प्रगट झाली. तिचे नांव एकवीरा. हिला बेहेरची देवी असेंहि म्हणतात. ही म्हणे पांडवांची बहीण. हिच्यासाठी भीमानें एका रात्रीत हीं लेणी कोरून काढली. हिचा दुसरा इतिहास काय, तर ही रेणुका, परशुरामाची आई. स्वतः परशुरामच जेथे अमानुष क्रौर्याचा पुतळा व पुरस्कर्ता, तेथें त्याची ही एकवीरा मातोश्री बोकडाच्या कंदुरीशिवाय भक्ताला कशी प्रसन्न होणार? चैत्री पौर्णिमेची कार्ल्याची जत्रा मोठी दांडगी. हजारो मराठे, कोळी, बरेचसे कायस्थ प्रभू वगैरे भटेतर लोक या वेळीं तेथे नवस फेडायला जातात. नवसापायीं शेळ्यामेंढ्यांचे कळपच्या कळप फडशा पडून हीं कार्ला लेणी रक्तात न्हाऊन निघतात. जो प्रकार कार्ला येथें तोच इतर सर्व लेण्यांत. जेथें असलें बोकडखाऊ देव देवीचे देऊळ नाहीं, तेथें प्लेझर पार्टीसाठी जाणारे लोक सुद्धां कंदुरी केल्याशिवाय परत येत नाहींत. अहिंसावादी बौद्ध लेण्यांत अखंड सुरू असलेले हे 'देवळी' प्रकार म्हणजे बौद्धद्वेषाची परमावधीच नव्हे काय? सारांश, भिक्षुकशाहीचा प्रतिस्पर्ध्याविषयीचा द्वेष पिढ्यान् पिढ्या टिकणारा असतो. एकलहरी सापावर ताण! मात्र प्रत्येक देश 'परस्पर पावणेतेरा' पॉलिसीचा असतो, हें विसरता कामा नये.

मनुस्मृति पुराणें आणि देवळे असा तीनपेडी फांस हिंदु समाजावर लटकावून भिक्षुकशाही ब्राम्हणांनी आपल्या जातीच्या सवत्या सुभ्याचें सोंवळें वर्चस्व आजवर टिकवून धरलेलें आहे. ब्राम्हणांच्या अस्तित्वाचें नाजूक वर्म येथेंच आहे. या मर्मावर कोणी घाव घालतांच एकजात सुधारक दुर्धारक भटे सापासारखी कां फुसफुसतात, याचें अझून बऱ्याच बावळट शहाण्यांना आणि भोळसट भटेतरांना मोठे आश्चर्य वाटतें. मनुस्मृति पुराणें आणि देवळें या तीनच गोष्टींवर आज प्रत्येक भट जगत असतो. पण

या तीनच गोष्टी म्हणजे अखिल भटेतर दुनियेच्या उरावर तीन प्राणघातक धोंडी आहेत. या तीन गोष्टी नष्ट करा, जाळून पोळून खाक करा कीं भिक्षुकशाही रसातळाला गेलीच! प्रदर्शनासाठीं तिचा वाळवून ठेवलेला नमूनाहि हातीं लागणार नाहीं. पण हा सोन्याचा दिवस उगविण्यापूर्वी ब्राम्हणांनीं या तीन महापातकांबद्दल भटेतरांच्या मनावर डागलेली धार्मिक पापपुण्याची मोहनी नाहीशी करणे फार कठीण काम आहे.

देवळाचा उपयोग पूर्वी प्राचीन काळीं कदाचित् चांगला होत असेल. धर्मप्रसाराचें व धर्मरक्षणाचें कार्य या देवळांनीं किंवा त्यांतल्या धोंड्यादगड्या देवदेवांनी आजपर्यंत काय केले. ते इतिहासावरून दिसतच आहे. गिझनीच्या महंमदाचा सोट्याचा तडाका सोमनाथाच्या टाळक्यावर पडेपर्यंत हिंदूंचे देव म्हणजे इंपिरियल बँकेचे बाप असावे, अशी पुसट सुद्धां कल्पना कधिं इतिहासाला आलेली नव्हती. त्या वेळेपर्यंत लघुरुद्र महारुद्राची रात्रंदिवस अखंड बोंबाबोंब करणारे हिंदु आणि त्यांचे पराक्रमी राजे सोमनाथाच्या पिंडीखालच्या भुयारांत संपत्ति साठविण्याचा 'धर्मवान्' धंदा करीत असतील, हें महंमद गिझनीला जसें बिनचूक कळलें, तसें फुटक्या कपाळाच्या सोमनाथालाहि कळलें नसावें असें वाटतें. म्हणूनच महंमदाच्या बजरंगी सोट्याचे थाड थाड थाड एकामागून दोन तीन तडाके खाईपर्यंत त्याला आपल्या वरील प्रसंगाची कल्पना आली नाहीं. कल्पनेचें मंदीर टाळके. तेच कडाड फुटल्यावर कल्पना तेथे राहणार कशी? आणि प्रामाणिक वेश्येप्रमाणें राहिलीच तर ती सोमनाथाला कळणार कशी? महंमद गिझनीच्या वेळेपर्यंत हिंदूंची देवळे म्हणजे अनंत भल्याबुऱ्या त्रांगड्यांची पेवें बनलेली होती. हा वेळ पावेतो मुसलमानी स्वारीवाल्यांना देव किंवा देवळें फोडण्याची कल्पना खुमखुम किंवा वेड मुळीच माहीत नव्हतें. देव आणि देवळें फोडण्याची चटक मुसलमानांना सोमनाथाने लावलेली आहे. सोट्याच्या तीन दणक्यांत पिंडीखालीं जर अपंरपार द्रव्य आणि सगळ्या राजकारणी गुह्याचे कागदपत्र मिळाले, तर असल्या घसघशीत बोहाणीच्या जोरावर देवळें फोडण्याचा धंदा सर्रास चालूं न करायला ते धाडशी मुसलमान मूर्ख किंवा हिंदू थोडेच होते! चालू घडीचा मुसलमानांचा देवळे फोडण्याचा व देव बाटविण्याचा प्रघात 'पीछेसे आयी और आगे बढी' असल्या वृत्तीचा केवळ 'बं भोलानाथ' आहे. यापेक्षा त्यात विशेष कांही नाही.

भिक्षुकशाहीचा भट म्हणजे धर्माचा संरक्षक. त्याचा पालनकर्ता. भट जिवंत तर धर्म जिवंत. भट ओंकारेश्वरावर गेला की धर्म तेव्हाच जाणार सोनापुरांत. 'ब्राम्हण वर्गानेंच आजपर्यंत धर्म जगविला' ही भिक्षुकशाहीच्या प्रत्येक जहाल मवाळ गबाळ टवाळ भटाची आरोळी. देवळें म्हणजे धर्माची आगरें. धर्माची गंगा येथेंच उगम पावते. त्या उगमावरच भटाचें आसन. देवळांत तर प्रत्यक्ष देव. साऱ्या विश्वाचा स्वामी, 'चराचर व्यापुनी' आणखी वर जो 'दशांगुलें उरला' तो हिंदूंच्या देवळात जाऊन भरला. असल्या देवाचें कोण काय करणार? देव मनांत आणील अगर त्याचा कट्टा भक्त देव मानवातला जन्मसिद्ध सनदपट्टयाचा दलाल भट - त्याला मनांत आणायला लावील, तर डोळ्याची पांपणी लवते न लवते तोंच साऱ्या विश्वाची होळी होईल, असा ज्या देवाचा पराक्रम. युद्धक्षेत्राच्या आणि संसाराच्या लढाया लढण्यापूर्वी प्रत्येक वीर या देवापुढे कापराची पोती जाळून त्याचा व त्याच्या (पूज्य) दलालाचा आशीर्वाद घेत असे. अशा त्या जगच्चालक सर्वपराक्रमी कतुमकर्तुं अन्यथा कर्तुं सोमनाथावर ज्या वेळीं महमदानें सोटा उगारला, त्या वेळीं रजपूत राजांच्या घिसाड दक्षिणावर टोणन्याप्रमाणें चरणारे

हे देवधर्मसंरक्षक भट होते कोठें? ते सारे पंचा सावरून आर्धीच सूं बाल्या पळाले होते. सोमनाथ म्हणे मोठें जागृत कडकडीत दैवत. पण या दैवताचा कडकडीतपणा आणि जागृतपणा सुद्धां ऐन प्रसंगी वायबार ठरला. जेथें देवच स्वतःचें संरक्षण करूं शकला नाहीं, तेथें भटांनीं तरी का हकनाहक प्राण द्यावे आणि भट दलालांच्या मार्फत राजकारणापासून तों जनानखान्यापर्यंतची दलाली देवाशी किंवा देवाच्या नांवावर करण्यास सवकलेल्या हिंदु राजांनी देवासाठीं व देवळासाठी काय म्हणून शस्त्र उचलावें? सगळीच जेथें बडवेगिरी, तेथें धर्माच्या पोकळ नांवासाठीं आणि पापपुण्याच्या पाचकळ कल्पनेसाठी कोण कशाला आपला जीव धोक्यात घालतो? जोपर्यंत प्रसंग आला नाही, लघुरुद्र महारुद्र चालूं आहेत, गचगचीत तूपपोळीचे ढीग पानांवर आयते येऊन पडत आहेत, आणि दक्षणेच्या मोहरा पुतळ्यांनीं कडोसरी तट्ट फुगत आहे, तोंपर्यंत देवांचा आणि देवळांचा धार्मिक दरारा आणि भट दलालांच्या धर्मप्रवचनांचा खरारा! पण प्राणावरच बेतली तर देवाला कोण पुसतो आणि देवळासाठी कोण लेक रडतो! मानला तर देव नाहींतर धोंडा आणि मानलें तर देऊळ नाहींतर कुंटणखाना! देवाच्या मूर्तीसाठीं आणि देवळाच्या कीर्तीसाठीं प्राणार्पण करणारा एक तरी भटदलाल इतिहासांत कोणी दाखवून देईल, त्याला वर्षभर प्रबोधन मासिक फुकट. म्हणे, ब्राम्हणांनी धर्म जगविला!

आता, या आमच्या धर्माच्या देवळांत कसला धर्म वावरत असतो, हें पाहिलें पाहिजे मूर्तिपूजा अथवा प्रतिक पूजा 'अनादिमध्यांतमनंतवीर्यम्' अशा परमेश्वरचिंतनार्थ उपयोगी पडणारें एक सुटसुटीत साधन म्हणून कांही काळ क्षम्य ठरेल व आजपर्यंत ठरलेंहि. परंतु, देवळांतली ही मूर्ती म्हणजे देव नव्हे, केवळ धोंडा, भातकुलीच्या खेळांतल्या बाहुलीसारखी क्षुद्र वस्तू, ही वस्तुस्थिति पुजारी भटदलालापासून तों तिच्यापुढें कपाळें घासणाऱ्या भक्त भक्तिणीपर्यंत सर्वांना स्वच्छ माहीत असते. असल्या धोंड्यांची पूजा प्रार्थना करून आत्मोन्नति होणें शक्य नाहीं, आणि प्राणावर बेतली तर हा शृंगारलेला दगड स्वतः चें किंवा भक्तांचें मुळीच संरक्षण अगर तारण करूं शकत नाही, हें प्रत्येक हिंदुमात्राला कळत असूनहि देवळांतल्या घंटा बडवायला सांज सकाळ कोट्यवधि हिंदु काय म्हणून देवळांत जातात? बाप आजे पणजे गेले म्हणून जातात, का त्यांना एखादी गुप्त जादू अथवा मधुसुख विषघट असें कारस्थान तेथे ओढून नेतें? हिंदु लोकांची देवळ्या देवांविषयी भावना जर अस्सल आणि आत्यंतिक प्रेमाची असती, तर हिंदुस्थानांत मुसलमानी बडग्याला एकहि देऊळ व एकहि देव खास बळी पडला नसता. अर्थात् नाटके सिनेमा तमाशांचीं थेटरें हीं जशी क्षणभर विरंगुळ्याची ठिकाणे, करमणूकच्या करमणूक आणि पटला काही उपदेश तर पटला, नाहींतर जागच्या जागीं निसटला, या पेक्षा देवळांची विशेष किंमत हिंदु लोकांनी मुळींच बाळगलेली दिसत नाहीं. तरीहि देव देवळांविषयी शाब्दिक प्रेमाचा हिंदु जिव्हेचा धबधबा पहावा तों त्याच्या धडधडाटापुढें गिरसप्पा नायगाराच्या कानठळ्या बसतात! हें काय भटबंगाल आहे?

हे भटबंगाल हिंदुस्थानच्या नकाशात सापडणारें नसून, 'ते थेट भटांच्या पोटात आहे. देवळांचा धर्म म्हणजे भटांच्या पोटापाण्याचें गुप्त मर्म आहे. या मर्माचे वर्म अफाट भटेतरांना कधीच उमगू नये, म्हणून भटांनीं आठरा पुराणांची पैदास करून ठेवलेली आहे. गीता व उपनिषदादि आचारविचार क्रांतिकारक आणि सत्यशोधक ग्रंथ कितीहि असले, तरी देवळांवर देह जगविणाऱ्या या भूदेवांचा विशेष मारा पुराणांवरच असतो. पुराणांचा पाचकळपणा प्रगट करण्याचें येथें प्रयोजन नाहीं. पुराणांच्या पचनी

पडलेला प्रत्येक प्राणी ईश्वरविषयक कल्पनेत इतका पागल बनतो कीं दगड्या देवाच्या पायांऐवजी भटाच्या पायांवर टाळकीं घासतो आणि त्याचे पाय धुतलेलें पाणी 'पवित्र तीर्थ' म्हणून घटघटा पितो. देवळात कधी कीर्तने पुराणें प्रवचनें होतात. पण सर्वांची झांप छिनाल भगवंतावर आणि पाचकळ पुराणांवर. या पुराणांच्या श्रवण मनन निदिध्यासानें हिंदु स्त्रीपुरुषांच्या मनावर कसकसले घाणेरडे व विकृत परिणाम आजपर्यंत झाले, आज होत आहेत व पुढें होतील, याची नीटशी कल्पना राजकर्त्या इंग्रेजांना आणि अंमलबजावणी व न्यायचौकशी खात्यांवरच्या त्यांच्या ऐ. सी. एस. गोऱ्या बृहस्पतींना होणेंच शक्य नाहीं. म्हणूनच भटी पुराणांतून केलेल्या भटेतरांच्या बीभत्स नालिस्तीच्या दंशाच्या वेदना त्यांना भासत नाहींत आणि एखाद्या जागृत सुधारक भटेतराने त्या वेदना व्यक्त करण्यासाठी उघड उघड जोडेपैजार करून भिक्षुकशाहीची शेंडी गदगदा हालविली, तर त्याचें खरें रहस्य अजमावण्याची या परक्या गोऱ्या न्यायाधिशांना कांहीं भावनाच नसते. अर्थात् त्यांच्या न्यायाचा काटा, धोब्याच्या आडव्या उभ्या घावाप्रमाणें, पुराणमंडनावर, म्हणजेच भिक्षुक भटांच्या जानव्यांत बऱ्याच वेळा अडकून पडतो. देवळांचें महात्म्य पुराणांनीं वाढविलें. 'पुराणें म्हणजे शिमगा' असें पुष्कळ विचारवंतांचें म्हणणें आहे. पुराणें म्हणजे हिंदु धर्माचे शौचकूप असे आमचे मत आहे. पुराणांत कांही गोष्टी चांगल्या आहेत, असें कांहीं भेदरट सुधारकहि म्हणतात. असतील. शौचकूपांत पडलेल्या मोहरा पुतळ्या ज्यांना उचलायच्या असतील, त्यांनी खुशाल उचलाव्या. आम्ही त्यांचा हात धरू इच्छित नाहीं. पुराणें म्हणजे शौचकूप ठरल्यावर त्यांच्या जिवावर जगणाऱ्या देवळांत काय काय पातकांच्या गिरण्या सुरू असतात, याची कल्पनाच केलेली बरी.

देवळे म्हणजे भिक्षुकशाहीच्या जन्मसिद्ध वतनी जहागिऱ्या. देवळाशिवाय भट नाहीं आणि भटाशिवाय देऊळ नाहीं, असा एक सनातन नियमच ठरून गेला. त्यामुळें पुराणप्रसव्या भटांनी देवळांची संख्या भरंसाट वाढविण्यासाठी देवांचीहि देवसंख्या वाढवीत वाढवीत ३३ कोटींवर नेऊन भिडविली. त्यांत पुन्हा देवांमध्येहि श्रेष्ठ-कनिष्ठपणाच्या जाती उत्पन्न केल्या. विष्णुपुराणांत विष्णू श्रेष्ठ, बाकी देव लुच्चे. गणेशपुराणांत गणोबा श्रेष्ठ, बाकी देव कुचकामी. देवीपुराणात देवी श्रेष्ठ, बाकी पुल्लिंगी देव सारे बदमाश. अशी देवादेवातच लठ्ठालठ्ठी लाऊन दिली आणि प्रत्येक देवाच्या संप्रदायाचे निरनिराळे भक्तसंघ हिंदु समाजांत चिथावून दिले. त्यामुळें प्रत्येक देवांचें देऊळ, या अहमहमिकेनें साऱ्या हिंदुस्थानभर देवळांचा मुसळधार वर्षाव झाला. निरनिराळे देव आणि भक्त यांच्या संप्रदायांत जरी आडवा उभा विस्तव जाई ना, तरी सर्व देवळांत भट मात्र अभेद भावानें देवमानवातला दलाल म्हणून हजरच. बाप-भट जरी रामाचा पुजारी असला, तरी लेक-भट रावणाच्या पूजेला तयारच. शिवाय एकाच गांवांत एकाच देवाची अनेक देवळें निर्माण करण्याचाहि एक शिष्ठसंप्रदाय पाडला. शंकराची पिंडी जरी एकाच रंगाढंगाची असली, तरी सोमवार पेठेंत देऊळ म्हणून सोमेश्वर, भसाड्या तळ्यावर देऊळ म्हणून भसाडेश्वर, बाळोबा पगडवृंदाने बांधलें म्हणून बाळेश्वर, फांशीच्या वडाजवळ पिंडी सांपडली म्हणून फांसेश्वर असें शेंकडों ईश्वर भटांनी निर्माण करून देवळांपायी आपल्या पोटापाण्याचा प्रश्न चबचबीत वंगणावर सफाईत सोडवून घेतला. काकतालीय न्यायानें पुजारी बनलेल्या भटांची घराणीच्या घराणी त्या त्या देवळाचे वंशपरंपरा वतनदार बनले. पुराणांच्या गुलामगिरीनें पागल बनलेल्या हजारों भोळसट हिंदूंनीं देवाला गांवे जमिनी दागदागिनें आंदण द्यावी, ती आयतीच पुजारीं भटाच्या पदरी पडत. नांव देवाचे आणि गांव भटाचें.

एका भटी संस्थानांतल्या देवस्थानाला सालीना २०-१५ हजार रूपयांचे वर्षासन आहे. त्यातले जेमतेम ७-७।। हजार देवाच्या नांवानें कसे तरी कोठें तरी खर्ची पडतात. बाकीची रकम संस्थानाधिपतींच्या ढेकरांत गडप. देवस्थानचे दागदागिनें वार्षिक उत्सवाला मात्र देवळात दिसतात. तेवढा दिवस पार पडला कीं मग साऱ्या वर्षभर ते पट्टराण्या घट्टराण्यांच्या आंगावर पॉलीश होत असतात. कित्येक देवळांचा तर असा लौकीक आहे कीं देवाला भक्ताने वाहिलेला मोगऱ्याचा हार अर्ध्या तासाच्या आत गमनाजी जमनाजीच्या बुचड्यांत गजऱ्याच्या रूपानें अवतरतो. मारुतीच्या बेंबटांत टिळकांची मूर्ती दिसण्याइतका किंवा दत्ताला बेफाम घाम फुटण्याइतकाच हा लोकोत्तर चमत्कार, यात काय संशय? कित्येक देवळांतल्या देवांचे जमीनजुमल्याचें उत्पन्न कोट्यवधि रुपयांचे असून, वार्षिक यात्रेचा खुरदा लाखाच्या खालीं जात नाहीं. या मलिद्यावर किती लक्ष भटांची ऐदी पोटे रांजणासारखी फुगत असतात आणि त्यांच्या आपापसांतील यादवीमुळें कज्जेदलालीचा कसा धुडगूस चालत असतो, याची कमिशनद्वारां चौकशी केली, तर भयंकर विलक्षण प्रकार उघडकीस येतील. फौजदारी गुन्ह्यांची गेली ५० वर्षांची रिकार्डे तपासली तर लक्षावधि सामाजिक व नैतिक अत्याचारांच्या जन्मभूमीचा वा कर्मभूमीचा मान आमच्या हिंदूंच्या देवळांच्याच माथीं मारावा लागेल. सारांश, धर्माची देवळे धर्माची देवळे म्हणून हिंदु कितीहि नाच असले, तरी आजच्या देवळाचा धर्म असा चमत्कारीक व शिसारी येण्या इतका गलिच्छ बनला आहे कीं त्याच्यापुढें शंकराच्या पिंडीच्या उत्पत्तिची 'पवित्र पुराणोक्त' कथा पुष्कळच सभ्य ठरेल. या मुद्यावर विशेष स्पष्टोक्तीनें लिहिण्या बोलण्याचा प्रसंग एखाद्या तापट माथ्याच्या भटेतरांवर न येता, माबाप इंग्रेज सरकारच्या एकाद्या सरकारी कमिशनावरच येईल, तरच पवित्र भिक्षुकशाहीला सोनारानें कान टोचल्याचें सौभाग्य भोगायला मिळेल!

देवळांमुळें आणि त्यातल्या देवांमुळें हिंदु समाजाची आत्मिक उन्नति किती झाली, हें भटाभिक्षुकांच्या लठ्ठ दुलदुलीत पोटांवरूनच ठरवायचें असेल, तर आजचा हिंदु समाज आध्यात्मिक मोक्षाला पोचल्याचा थेटपावती द्यायला कांहीं हरकत नाहीं. असल्या जीवन्मुक्त समाजाला या स्वराज्याच्या आणि सहकार असहकाराच्या दलामली हव्या तरी कशाला? दहा वर्षांपूर्वी पर्यंत राजकारणी त्रांगड्यांच्या जोरावर हिंदुंचे सर्वांगीण पुनरुज्जीवन आणि एकजिनसी संघटन करण्याची मिजास मारणारे भटें सुद्धा आज सामाजिक सुधारणेच्या तुणतुण्यावर आपल्या भिक्षुकी अकलेच्या छकड्या गाऊं लागली आहेत. देवदेवळांनी थेट परमहंस स्थितीला नेऊन भिडविलेल्या हिंदु जनांना हे राजकारणी आणि समाजकारणी नसते उपद्व्याप हवेत कशाला? पण ज्या अर्थी हे उपद्व्याप चालूं आहेत, त्या अर्थी धर्म, नीति, न्याय आणि सामाजिक संघटनाच्या कामी हिंदूंची देवळें आणि त्यांतले देव म्हणून पूजलेले दगडधोंडे अखेर मातीमोल ठरल्याचेंच सिद्ध होत आहे. सोमनाथाच्या टाळक्यावर महंमद गिझनीचा लत्ताप्रहार पडल्या दिवसा पासूनचा हिंदू देवळांचा इतिहास पाहिला तर गंजड गोसावडे, ऐदी भिकारी, उनाडटप्पू गुंड आणि पोटभरू भट यांची चंगळ उडविण्यापलीकडे या देवळांनी हिंदुधर्म हिंदुसमाज आणि न्यायनीती यांच्या प्रगतीला सपशेल कुंठविण्याच्या कुंटणपणापेक्षा विशेष कांहींहि केलेलें नाहीं, हेंच दिसून येते.

हिंदुस्थान दरिद्री झाला, मातींतून अन्न काढणारा शेतकरी वर्ग भिकेला लागला, देशी धंदे ठार मेले, मध्यम वर्ग नामशेष झाला, सुशिक्षित पदवीधरांची उपासमार बोकाळली, इत्यादि इत्यादि वगैरे वगैरे आरडाओरडा करण्यांतच राजकारणी अकलेच्या कवायती करणाऱ्या ब्रम्हांडपंडितांनी हिंदुस्थानांतील

देवळांत केवढी अपार संपत्ति निष्कारण अडकून पडली आहे आणि तिचा उपयोग देशोद्धाराच्या कामीं न होतां, लुच्च्या लफंग्या चोर जार एदी हलकटांच्या चैनीसाठीं कसा होत आहे, इकडे आता कसोशीनें लक्ष देण्याची वेळ आली आहे. दुष्काळांने कोट्यवधि लोक देशांत अन्नान्न करून मेले, तरी देवळांतल्या दगडधोंड्यांना शिरा केशरीभाताचा त्रिकाळ नैवेद्य अखंड चालूंच आहे. हजारों उमेदवार ग्रॅज्युएट तरूण उदरभरणासाठी भयाभया करीत फिरत असले, तरी अब्जावधि रुपयांचे जडजवाहीर व दागदागिन्यांनी देवळांतल्या दगडाधोंड्यांचा शृंगारथाट बिनतक्रार दररोज चालूंच आहे. देशांतला शेतकरी कळणाकोंड्याला आणि घोंगडीच्या ठिगळाला महाग होऊन देशोधडीला लागला, तरी देवळांतल्या भटसेनेच्या पोटाच्या चढत्या कमानीला तिळाएवढाहि खळगा आजपर्यंत कधी पडला नाहीं. विद्येची चार अक्षरें शिकवा हो शिकवा, म्हणून शेंकडा ९६ जीवांचा सारखा कंठशोष चालूं असताहि, देवळातल्या घुमटाखालीं लाखों महामूर्ख भट गोसावडे गंजड आणि ठगे गंधभस्म रुद्राक्षांच्या पुण्याईवर पोट फुटून वांति होईपर्यंत पराधीवरी पल्ले धान्याचा बिनबोभाट फडशा पाडीत असतात. देवळांच्या छपराखालीं ब्रम्हचाऱ्याचे वंश किती वाढतात, पति नसतांनाहि किती पतिव्रता पुत्रवति होतात, किती गोसावडे सावकारी करतात, किती गुरुमहाराजांचे मठ गोकुळकाल्यात कटिबंध बुडतात, आणि किती पळपुट्या छंगीभंगी टग्यांचे थर तेथें खुशालचेंडू प्रमाणें जगतात, या गोष्टींची न्यायनिष्ठुरतेनें जर कसून तपासणी होईल, तर मुसलमानांनी देवळांवर घाव घालण्यापूर्वी किंवा बोलशेबिझमूवजा विचारांची वावटळ उठण्यापूर्वी, अभिनव विचारक्रांतीचा तरुण हिंदुसंघ निराशेच्या झटक्यांत या देवळांची राखरांगोळी करायला अस्तन्या वर सारून पुढें कधिं काळीं सरसावलाच, तर त्यांत आश्चर्य वाटायला नको.

धर्मासाठी उभारलेल्या देवळांचा धर्म आज इतक सैतानी बनलेला आहे कीं त्याचें उच्चाटन केल्याशिवाय हिंदु जनांचें अस्तित्व या पुढें बिनधोक टिकणें बरेच मुष्किलीचें आहे. देवळें जर हिंदु धर्माचीं मंदिरें, तर तेथें अखिल हिंदुमात्राचा प्रवेश अगत्य झालाच पाहिजे. परंतु, सामाजिक बाह्य प्रदेशांत भटांनीं माजविलेला जातिभेद व जातिद्वेष या धर्ममंदिरांतूनच उगम पावल्यामुळें, देवळें म्हणजे हिंदूंच्या जातिद्वैताचीं नरककुंडेंच म्हटलीं तरी चालतील. स्वजातिवर्चस्वासाठींच जेथें भिक्षुकांनीं देवदेवळांचे पर्वतप्राय दगडधोंडे आपल्या अचाट कल्पनेंतून प्रत्यक्ष प्रसविलें, तेथें देवळे 'हिंदूंची' म्हणून जरी जनात मिरवली, तरी ती 'भटांची खास मिरास' या भावनेनेंच आजपर्यंत चालूं आहेत. धर्माची गंगा देवळांत, देवळांचा गंगाराम भट आणि भट म्हणजे सर्व हिंदु समाजाचा जन्मसिद्ध पिता, गुरू, न्यायाधीश, मोक्षदाता आणि भूदेव. अखिल हिंदु जनांनीं आपलें सर्वस्व फुंकून देवळांच्या आणि देवांच्या पायावर ओतलें, तरी देऊळ आणि देव यांचा खरा मालक भटच. त्याच्या शिवाय देव कोणाचीच पूजा घेत नाहीं. कोणी आडदांड भटेतर बळेच करू म्हणेल तर देव ती मान्य करीत नाहीं. लागलाच तो भंगतो. त्याला दरदरून घाम फुटतो. त्याला इन्फ्लुएंझा होतो. मग तो नवसाला फळत नाहीं. शेजारतीला निजत नाहीं. काकड आरतीला उठत नाहीं. नैवेद्याचे ताट चाटीत नाहीं. पालखीत बसत नाही. देवाला एखादी देवी असली तर तिच्याहि रंगमहालांत जात नाही. विडा खात नाही. खाल्ला तर गिळीत नाहीं आणि थुंकतहि नाहीं. असा मोठा हाहाकार उडतो. पोटापाण्याची काळजी नसलेल्या भट दलालाच्याहि तोंडचे पाणी पळतें. कित्येक वेळां तुरुंगातून निसटलेल्या बिलंदर कैद्याप्रमाणें देवळांतून देव पटकन नाहींसा

होतो आणि पुनवडीचा पेटिश्वर एकदम पैठणच्या पटांगणांत फडेश्वर म्हणून उपस्थित होतो. असल्या माथेफिरू देवदेवींना ताळ्यावर आणण्याचें सामर्थ्य अवघ्या विश्वांत फक्त एकट्या भट-भूदेवांच्याच हातीं असल्यामुळें, भटेतर हिंदुजनांचा देव आणि देवळांशीं राहणारा संबंध किती जवळ आणि किती लांब असावा, हें ठरविण्याची मुखत्यारी देवळांच्या उत्पत्तिकाळापासून सर्वस्वी 'भटार्पण' च राहिली, यांत कांहीं नवल नसलें, तरी त्यांत भटेतर हिंदूंच्या गुलामी मनोवृत्तीचा इतिहास स्पष्ट चित्रित झालेला आहे. गोळीला तुम्ही आणि पोळीला आम्ही, हा भटांचा 'सनातन धर्म' त्यांनीं आजपर्यंत पोटापाड मेहनत करून टिकविला आहे. समाज क्षेत्रांत भिक्षुकशाही जगद्गुरूनीं हिंदुहिंदुतच स्पृश्य आणि अस्पृश्य अशी 'सनातनी' द्वैताची पोखरण घातल्यावर त्यांच्या दण्डधारकांनी आणि 'पवित्र' बडव्यांनी स्पृश्य भागांतहि भट-भटेतर रामरक्षा रांगोळी ओढून ठेवण्याचा जोरकस यत्न करण्यांत, या हिंदुबुव देवळांचाच प्रामुख्यानें उपयोग करून घेतलेला आहे. भट-भटेतर वादाची नरकनदी देवळांतूनच उगम पावलेली आहे आणि ज्यांना हा वाद अज्जीबाद समूळ नष्ट व्हावा, असें मनापासून वाटत असेल, त्या सर्व विवेकवादी स्पृश्याऽस्पृश्य हिंदुजनांनी आपल्या कडव्या निषेधाचा पहिला घांव या देवळांवरच घातला पाहिजे. देवळांचें महात्म्य सफाई नष्ट झाल्याशिवाय हिंदु समाजाच्या गुलामगिरीला कारण झालेल्या व होणाऱ्या द्वैतभावनेचा या हिंदुस्थानांतून बीमोड होणार नाहीं.

मूर्तिपूजा बरी का वाईट, खरी का खोटी, तारक का मारक इत्यादि मुद्दे जरी बाजूला ठेवले तरी, देवळातल्या देवात कांहीं तरी 'विशेष देवपणा असणें आणि तसा तो अकिल्मिष भासणें अगत्याचे आहे. 'देवाचिये द्वारीं। उभा क्षणभरीं। तेणें मुक्ती चारी। सांधियेल्या।।' अशा भावनेचे अभंग कवनांत तिहि गोड वाटले, तरी ते हिंदु देवळांच्या व देवांच्या बाबतीत शब्दशः भंगतात. शिवाय, 'द्वारी' 'क्षणभरीं उभा' राहणारा व राहण्याची शिफारस करणारा कवि मनाने 'भटी महात्म्याचा गुलाम'च असल्यामुळें, देवळाच्या आत देवांचे काय काय रंगढंग चालू असावे, याची त्या बावळटाला काय कल्पना असणार? आणि कोणी करून दिलीच तर ती त्याला काय पटणार? देवळात गेले की मन क्षणभर संसाराच्या तापांतून मुक्त व्हावें, शांत व्हावें, घटकाभर जगाला विसरावें, आणि देवाच्या चरणांवर मस्तक ठेऊन पारमेश्वरी सृष्टीच्या अनंतत्वांत विलीन व्हावें, असा अनुभव येण्याइतके या देवांच्या मूर्तीत काय असते. जो माणसांचा थाट तोच देवांचा थाट. ज्या माणसांच्या चैनीच्या गोष्टी, त्याच देवांच्या. माणसांच्या भावना, त्याच देवांच्या भावना. माणसांना थंडी वाजते, देवांना वाजते. गावांत कडक उन्हाळा कडकला की देवाला पंखा सुरू झालाच. शंकराच्या पिंडीवर गळणीचे गाडके लटकलेंच. माणसांचा जनानखाना, देवांचा जनानखाना. भोजनोत्तर माणसांना वामकुक्षी, देवांनाहि तीच सवय. माणसें रात्रीं निजतात, देवसुद्धां शेजारती होतांच पलंगीं पहुडतात. मग सकाळच्या काकड आरतीपर्यंत देव जागे व्हायचे नाहींत. सारांश, माणसांच्या सर्व भल्याबुऱ्या विचार विकारांचा आरोप या दगड्या देवांवर होत आल्यामुळें, देव आणि माणूस यांतल्या भेदाची रेषा युक्लीडच्या रेषे प्रमाणे 'रुंदीशिवाय लांबी' अशा 'समजून चाला' (take it for granted) धर्तीचीच झाली आहे. 'जसा भक्त तसा देव' हें सूत्र वाचाबोलायला छान सुटसुटीत खरें, पण त्यामुळे ईश्वरविषयक भावना, धर्मविषयक आदर आणि नीतिविषयक चाड यांत माणसांची मनोवृत्ति खिळखिळी होऊन बसली आहे, याकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं.

अशाहि खिळखिळ्या भावनांच्या अवस्थेंत, देव म्हणजे हिंदुजनांचे देव आणि देवळें म्हणजे हिंदुजनांची देवळें, त्यांत न हिंदूंचा संबंध नाहीं, हा सिद्धांत गृहीत धरला, तर 'हिंदु' म्हणविणाऱ्या प्रत्येक स्त्री पुरुषाला, मग ती ब्राम्हण क्षत्रिय वैश्य शूद्र असो, महार मांग धेड अस्पृश्य असो, नाही तर शुद्धीच्या मार्गानें परावर्तित झालेली असो, त्या प्रत्येकाला हिंदु देवळांत जाऊन, तेथल्या हिंदु देवांची यथाभाव यथासाहित्य स्वतः पूजा करण्याचा, निदान त्या मूर्तीच्या चरणांवर मस्तक टेकण्याचा धर्मसिद्ध अधिकार असलाच पाहिजे. हा अधिकार जेथें जेथें नसेल, लौकिकी व्यवहारांतले जातिभेद, मतभेद, आचारविचार भेद जर देवळांतहि धुडगूस घालीत असतील, आणि 'अनाथांचा नाथ होसी तू दयाळा' अशा देवापुढेंहि जर आमचा माणूसघाणेपणाचा उकीरडा सदैव पसरलेला रहात असेल, तर कोणाच्याहि मनोभावनांची पर्वा न करता, कडवे सुधारक (radical reformer) या नात्यानें, लोकशाहीची शपथ घेऊन, आम्ही स्पष्ट म्हणतों कीं हीं देवळें नसून सैतानखाने आहेत. हिंदुसंघातल्या माणसामाणसांतच असली दुस्मानी सुलतानी माजविणाऱ्या देवळांच्या पुरस्कर्त्यांच्या शुद्धि संघटनाच्या वल्गना किती दांभिकपणाच्या आणि लुच्चेगिरीच्या आहेत, याचा वाचकांनींच विचार करावा.

सध्या लोकशाहीचें वारें वाहत आहे. व्यक्तिमात्राच्या स्वातंत्र्याला विरोध करण्याची आज कोणाचीहि प्राज्ञा नाहीं. अशा वेळीं हिंदु देवळांतहि लोकशाहीची वावटळ घुसणें अगत्याचें आहे. राजकीय स्वातंत्र्याच्या वल्गना करणारांनीं इतर सर्व क्षेत्रांतल्या गुलामगिरीची आणि गुलामगिरीप्रवर्तक सर्व संस्थांची राखरांगोळीच केली पाहिजे. हिंदुसमाजात माणुसघाण पसरविणाऱ्या देवळांची विल्हेवाट लावण्याचे तीन मार्ग आम्ही हिंदुजनांना सुचवीत आहों.

पहिला मार्ग बहिष्काराचा. हा लिबरली बिरबलगिरीचा 'मवाळी' मार्ग आहे. हिंदूंच्या देवळांत भटाशिवाय, हिंदूंचा प्रवेशाचा व पूजनाचा धर्मदत्त अधिकार जर लाथाडला जात असेल, तर तीं देवळें 'हिंदूंची' नव्हत. तीं सैतानांचीं स्मशानमंदिरें समजून त्यावर बहिष्कार टाकावा. त्यांना आजपर्यंत फाजील दानधर्मावर जगविल्याच्या मूर्खपणाबद्दल एक सणसणीत तोंडांत मारून घ्यावी आणि यापुढें त्यांना जगविण्याचा किंवा नवीन देवळाच्या पैदाशीचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रयत्न न करण्याविषयीं 'आईची शपथ' घ्यावी हा उपाय खरा, पण त्यांतहि एक अपाय आहे. या उपायानें देवळांचे पापी डोल्हारे जमीनदोस्त होण्यास कालावधि लागेल, आणि तोपर्यंत हिंदूंच्या सामाजिक जीवनात अधिकाधिक किडे पडण्याचा क्रम मात्र मुळींच बंद पडणार नाहीं. दूरदृष्टी भटांनी प्रत्येक देवस्थानाची गंगाजळी इतकी तुडुंब ठेचून भरलेली आहे, कीं साऱ्या भटेतर दुनियेनें देवळांवर जरी बहिष्कार घातला, तरी देवळांचा 'वर्णाश्रमी सनातनी' सवता सुभा भटजात बिनबोभाट आणखीं दहा शतके चालवील. अखिल ब्राम्हणेतर दुनिया जरी निसर्ग धर्मानुसार आपल्या मातेच्याच उदरीं जन्मत असली, तरी एकटी ब्राम्हण जातच फक्त ब्रम्हदेवाच्या तोंडातून जन्मलेली असल्यामुळें, त्या चारतोंड्या सृष्टीविधात्याची सारी इलमबाजी ब्राम्हणजातीत बिनतोड धगधगत असते. अशा इलमी जातीच्या सवाई ब्रम्हदेवांना असा नाहीं तर तसा पेंच घालण्याच्या कामीं कोण मानवाचा कारटा विरोध करूं शकेल? जुने देव आणि जुनीं देवळें किफायतशीर होणार नाहीतं, या दूर धोरणानें त्यांनीं आतांपासूनच नव्या धर्तीच्या देवळांचा उपक्रम सुरू केला आहे. आज जे पुतळे दिसत आहेत, नवीन नवीन बनत आहेत, आणि त्या पायीं जनतेचे लक्षावधि रुपये कायदेबाजीच्या ठाकठीक चापांतून बिनबोभाट दडपले जात आहेत, त्यांकडे

किंचित विचारपूर्वक पहा, म्हणजे आमच्या शंकेची मख्खी उमजून येईल. आज मुंबईच्या बॅकबेवर दिसणारे साखळदंडाचे चार खांब थोड्याच वर्षांत टोलेजंग देवळांत रूपांतर पावतील, आणि बाबुलनाथी घुमटाच्या उंचीशी स्पर्धा करणाऱ्या त्या देवळांतला टिळकेश्वर भक्तांच्या नवसाला २४ तासांतून ४८ वेळ भसाभस प्रसन्न होऊ लागेल. तात्पर्य, बहिष्काराचा हा मार्ग दिसतो तितका खटकेबाज उपायाचा नव्हे.

दुसरा मार्ग वहिवाटीला धाब्यावर बसवून किंबहुना वहिवाटीचा चेंदामेंदा करून, हिंदुत्वाच्या ठळक सबबीवर अखिल हिंदुजनांनी देऊळ प्रवेशाचा आणि देवपूजेचा अधिकार धिटाईने बजवावा. वहिवाट ही रूढीचीच सख्खी बहिण. तिची पर्वा षंढ, गुलाम आणि मूर्ख यांनीच करावी. 'आम्ही हिंदु आहोत. आम्हांला देवळात शिरून देवदर्शन घेण्याची परवानगी देतां कां हो' म्हणून लेखी तोंडी आर्जव-वेंगाडणी करणाऱ्या उमरावतीच्या हिंदूंत आणि 'आम्हीं स्वराज्याला पात्र आहोंत, आम्हांला देता का हो स्वराज्य?' म्हणून काँग्रेस वेंगाडणी करणाऱ्या हिंदी लोकांत काय फरक? स्वराज्याचा प्रश्न माशाने गिळलेल्या माणकाचा, तर देवळाचा प्रश्न भटाने गिळलेल्या धर्माचा. धर्मांत सरकार हात घालीत नाहीं, अशी एक गैरसमजूत रूढ आहे. धिटाईनें देवळात प्रवेश करण्याच्या अगर देवपुजेच्या बाबतीत जर भटांच्या बाजूनें सरकारी कायदा आडवा येत असेल तर भटेतर अखिल हिंदुजनांच्या हिंदुत्वाचा तो अपमानच होय. असा अपमान सहन करण्यापेक्षा सत्याग्रह करून मेलेले काय वाईट. मात्र, हा निर्वाणीचा प्रश्न दगड्या देवदेवींची पूजा करण्यास हापापलेल्या अंधश्रद्धाळू हिंदूंचाच आहे. नवमतवादी सुधारकांना देवदेवळांची गुलामगिरी यापुढें साफ नको आहे.

कोणत्याहि गोष्टीचें प्राचीनत्व मानवी प्रेमाशी घट्ट चिकटून बसतें. ती गोष्ट त्याज्य असली तरी मग तिचा त्याग करणें माणसाच्या जिवावर येते, पण त्यागाशिवाय कोणत्याहि बाबतीत प्रगति होणें शक्य नाहीं, हा सनातन निसर्गधर्म आहे. अर्थात् हिंदु समाजाला 'हिंदु समाज' म्हणून इतर मानववंशाच्या चढाओढींत मर्दाप्रमाणें टिकाव धरावयाचा असेल, तर सामाजिक संघटनेंत द्वैताचें व द्वेषाचें विष कालविणाऱ्या देवळांचा प्रेमा दूर झुगारून देणेंच अगत्याचें आहे. देवळें आपल्या मूळ धर्मापासून कां चेंवली? तर ती भटांभिक्षुकांच्या एकमुखी सत्तेखालीं गेलीं म्हणून. देवळात भट का घुसला आणि शिरजोर झाला? तर देवळांत एक कोणीतरी दगड्या देव बसला म्हणून. देवामुळें भट आणि भटामुळें देवळें. अर्थात् देवाचीच उचलबांगडी केली, तर भटाला व त्याच्या एकमुखी सत्तेला कायमची गति मिळून, देवळांच्या इमारती व त्यांची उत्पन्ने हव्या त्या देशकार्यासाठी आज मोकळी होतील. हिंदुस्थानातल्या सगळ्या मूर्ति व पिंड्या जमा करून एखाद्या मोठ्या मध्यवर्ती शहरात त्यांचे एक कायम प्रदर्शन करावें म्हणजे भावी हिंदु पिढ्यांना आणि इतिहास संशोधकांना या प्रदर्शनामुळे हिंदु जनांच्या धार्मिक उत्क्रांतीचा इतिहास चांगला अभ्यासतां येईल. रिकामी पडलेली देवळें आणि त्यांचा कोट्यवधि रुपयांची उत्पन्नें यांचा हिंदु समाजाच्या सुधारणेसाठी व प्रगतिसाठीं कसकसा उपयोग करावयाचा, हें ठरविण्यासाठी एक अखिल भारतीय हिंदु मण्डळ नेमावे. अशी कांही योजना झाल्यास पंथ मत पक्षभेदांचा निरास होऊन, देवळांचा अनेक सत्कार्यांकडे उपयोग होईल. सार्वजनिक वाचनालयें, संशोधनशाळा, वेधशाळा, शास्त्रीय प्रयोगशाळा, दवाखाने, अनाथाश्रम, सोशल-क्लब्ज, व्याख्यानमंदिरें, तालीमखाने, सहभोजनशाळा इत्यादि नाना प्रकारच्या देशोद्धारक गोष्टींकडे देवळांचा

सदुपयोग अभेद भावानें करता येणें शक्य आहे. शुद्धी संघटनाचें कामहि तेथें उत्तम होईल. सारांश, हिंदु समाजात माणुसघाण पसरविणाऱ्या देवळांतला बागूलबोवा किंवा बागूलबाईच एकदां उचकून मध्यवर्ति प्रदर्शनात जाऊन बसली की हिंदु संघटनाचा मार्ग पुष्कळच मोकळा होईल. या कामी त्यागाची इतकीहि धडाडी हिंदुजनांना दाखवितां येत नसेल, तर स्वराज्यालाच काय, पण जगायलाहि ते कुपात्र ठरतील, यात मुळींच संदेह नाहीं.

तो सच्चिदानंद परमेश्वर अखिल हिंदु भगिनी बांधवांना देव-देवळांची धार्मिक गुलामगिरी रसातळाला नेण्याची प्रेरणा देवो, एवढी अनन्य भावानें प्रार्थना करून, हा बराच वाढलेला विचार आचारक्रांतीसाठी वाचकांच्या चरणीं रुजूं करतो.

□□□

नाटक

केवळ धर्मासाठी!

अंक १ ला

इतिहास-विषयक गद्य नाटक

(प्रबोधनांत थोडा तरी मनोरंजक विषयाचा भाग असावा, अशी बऱ्याच वाचकांची पुष्कळ दिवसांची मागणी आहे. तिला अनुसरून हें एक गद्य नाटक क्रमशः थोडथोडें प्रसिद्ध करण्याचें योजिले आहे. छत्रपति संभाजी महाराजांचें चरित्र सध्यां अत्यंत विकृत स्थितींत लोकांपुढें नाचत असते. पुराणवजा बखरीनीं या बाबतीत अनेक घोडचुका केल्या असल्या तरी त्यांच्याच आधार घेऊन, अनेक कादंबरीकारांनी व नाटककारांनी छत्रपति संभाजीला अतिशय वाईट रंगांत रंगविण्याची वाईट कामगिरी बजावलेली आहे, यांत संशय नाहीं. अलीकडे झालेल्या इतिहास-संशोधनाच्या आधारानें प्रस्तुत नाट्यकृति लेखकानें रंगविण्याची उमेद बाळगिली आहे. ती कशी काय सफल होते, हें यथाक्रम दिसून येईलच. ऐतिहासिक सत्यनिरूपण आणि त्याबरोबरच वाचकांचे मनोरंजन साधण्याचा हा उपक्रम वाचकांना पसंत पडेल, अशी उमेद आहे.

- संपादक.)

प्रवेश १ ला

(चिटणीस व आण्णाजी दत्तो बोलत प्र. क.)

चिटणीस - नाहीं. हें दुष्कर्म माझ्या हातून घडणार नाहीं. उगाच आग्रह करण्याचें काय प्रयोजन?

सचीव - पण बाळाजी, आज महाराष्ट्रावर कसला भयंकर प्रसंग गुजरला आहे, याचा तरी नीट विचार करा.

चिटणीस - खरोखर, आजच्यासारखा प्रसंग महाराष्ट्रावर कधींच गुजरला नसेल! सह्याद्रीच्या मुलुखमैदान धुरोळ्यांतून हिंदवी स्वराज्याची त्रिखंड निनादित सृष्टी निर्माण करणारा शिवछत्रपति दिवंगत होऊन आज ५ दिवस झाले, पण त्यांच्या मृत्यूनिमित्तानें त्याच्या पुण्य दिव्यात्म्यांचा आदर करणारी एक तोफसुद्धां तुम्हा अष्टप्रधानांना सोडण्याची बुद्धी होऊं नये; महाराजांच्या मृत्यूची बातमी गडाखालच्या पाचाडपर्यंत सुद्धां तुम्ही जाऊं देऊं नये; असला हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार म्हणजे

महाराष्ट्रावर भयंकर प्रसंगच नव्हे तर काय?

सचीव - बाळाजी, महाराजांनीं महाराष्ट्राच्या इभ्रतीसाठीं उभारलेल्या स्वराज्याच्या इभ्रतीसाठी तरी महाराष्ट्रानें हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार आणखी कांहीं थोडे दिवस सहन केलाच पाहिजे. हें राजकारण आहे, हें तुमच्यासारख्या मुत्सद्याला मी सांगावें असें थोडेंच आहे!

चिटणीस - राजकारण अं? या कमनशिबाच्या बाळाजीला आतां कसकसल्या राजकारणाचे धडे घटविण्याचें प्रारब्धीं आहे देव जाणे! सचीव, या नांगऱ्या दख्खनला ज्या प्रतापी शिवरायानें राजकारणी महाराष्ट्र केलें, त्याच्या मृत्यूची बातमी तुम्ही दडवून ठेवतां, त्याला त्याच्या नावाने गळा मोकळा करून पुरते रडूंहि देत नाहीं, हेंच तुमचें राजकारण असेल तर तें नामर्द राजकारण आहे, बायकी कारस्थान आहे. स्वराज्याच्या निखाऱ्यावर आपमतलबी स्वार्थाचे पापड भाजण्याच्या कामीं पुण्यात्मा शिवरायाचा कट्टा शागीर्द हा बाळप्रभू चिटणीस असल्या कटांचा पक्षपाती कदापि होणार नाहीं. महाराजांचा स्वर्गवास झाल्याला पुरता आठवडा लोटला नाही, तोच या गडावर घरगुती स्वार्थाला राजकारणाचे रूप यावे आणि रक्ताचे पाणी करून वाढवलेल्या स्वराज्याच्या दैवाचा झोला मिशाळ मर्दांच्या हातून निसटून जनानी नथणीत गुंतून पडावा, यावरून भावी विनाश काळ जवळ आल्याचा मला भास होत आहे.

सचीव - (स्व.) या कायस्थांची जातच मोठी इब्लीस. मेल्या मारल्या बघायची नाहीं. नुसता खर्डे घाशा कारकून, पण आज आम्हां अष्ट प्रधानांना आणि सोयराबाईसाहेबांना याच्या पायावर कपाळें झिजविण्याचा प्रसंग येऊन बितला आहे. पाहूं तर या. याच्या कलमबहाद्दरीची अक्कल आणि आमच्या धाडशी मुत्सद्देगिरीची शक्कल यांचा हा आतां सामनाच आहे म्हणायचा. थोरल्या महाराजांच्या खास मेहेरबानीच्या खुराकावर बळावलेलें हें सर धोपटमार्गी तटू आमच्या नागमोडी कारस्थानाच्या एखाद्या तरी वळणावर ठाणबंद करून अडकवल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. (उ.) बाळाजी, मी कांही ज्योतिषी नव्हे. तेव्हां महाराष्ट्राचा विनाशकाळ अगदीं माथ्यावर येऊन भिडला आहे, की अझून शंभर योजन दूर आहे, ते कांही मला समजत नाहीं. पण आपण जर शिवाजी महाराजांचे शागीर्द खरे, तर त्यांच्या अपमृत्यूनें पोरक्या बनलेल्या महाराष्ट्राची फुटती छाती आणि तुटतें काळीज आपल्या बुद्धिप्रभावानें सांवरून धरण्याची हीच वेळ आहे. महाराष्ट्राच्या दराऱ्याची चढती रती किंवा खाक माती, बाळाजी, आज तुमच्या हातीं आहे. शिवरायांच्या रिकाम्या पडलेल्या सिंहासनाची प्रतिष्ठा आज तुमच्या लेखणीच्या टोकांत सांठविलेलीं आहे.

चिटणीस - सिंहासनाचा अधिकार सिंहालाच असतो दिल्लीपतीसारख्या मदोन्मत्त रानटी हत्तीला ठिकठिकाणी गनिमी चापांत चेचून आजपर्यंत बराच घायाळ केला. पण आता ते गनिमी काव्याचे आणि तहनाम्यांतील शब्दांच्या उलटापालटीचे दिवस उरले नाहीत सचीव. आता शिवाजी महाराजांच्या मागे स्वराज्याची इज्जत राखायची असेल, तर एकाच गर्जनेने सह्याद्रीची शिखरे गदगदा हलविणाऱ्या संभाजीसारख्या नरकेसरीच्या पंजीच्या फटकाऱ्याने दिल्लीपतीच्या गंडस्थळाचे खडपे खडपे उडाले पाहिजेत.

सचीव - संभाजीचा पराक्रम आणि त्याची मर्दुमकी आज कोणीहि नाकबूल करणार नाहीं. पण

त्याच्या या सर्व सद्‌गुणांवर व्यसनातिरेकाचे पाणी पडल्यामुळेंच थोरल्या महाराजांना त्याला अखेर पन्हाळ्याच्या अटकेंत ठेवावे लागले. महाराजांच्या मृत्यूसमयीं आम्ही हतभागी त्यांच्या शेवटच्या दर्शनाला अंतरलों; पण ''संभाजी राजे वडील पुत्र जाणता आहे; परंतु बुद्धि फटकळ आहे. अल्पबुद्धि आहे. त्यास काय करावे? आपण तो प्रयाण करतों'' हे महाराजांनी काढलेले शेवटचे उद्गार आज गडावर ज्याच्या त्याच्या तोंडीं ऐकू येत आहेत.

चिटणीस - मृत माणसाच्या देहामध्यें प्राण घालण्याची कला जरी जिवंत माणसांना साधलेली नाही, तरी त्यांच्या तोंडीं वाटेल ती भाषणें घालून आपलीं कपटनाटकें रंगविणें वाटेल त्याच्या हातचा मळ आहे सचीव. दुर्गुणांकडे पाठ करून सद्‌गुणांचा उपयोग स्वराज्यस्थापनेंत कसा करता येईल, असल्या धोरणी भावनेनें एवढा मोठा लोकसंग्रह करणाऱ्या महाराजांनीं संभाजीच्या शौर्यवीर्यादि उत्तम गुणांचा काहींच का विचार केला नसेल? आण्णाजी दत्तो, महाराजांच्या अखेरच्या घटकेपर्यंत रात्रंदिवस तब्बल बत्तीस वर्षे या बाळाजीने त्यांच्या चरणांशीं बसून काढली आहेत.

(सोयराबाई व मोरोपंत पिंगळे प्रवेश करतात.)

सोयराबाई - बाळाजी, तुम्ही चरणांपाशी उभे होता खरे, पण अखेरच्या घटकेला मी महाराजांच्या उशाशीच बसले होते ना?

मोरोपंत - कान डोळ्यांत म्हणजेच खऱ्या खोट्यांत जर चार बोटांचे अंतर तर -

सचीव - उशा पायथ्यांत? अबबबब! केवढें तरी अंतर असणार?

चिटणीस - (स्व.) या त्रिकुटाच्या कारस्थानाची तयारी तर मोठी जबरदस्त दिसते.

सोयराबाई - आपल्यामागे राज्य चालावायला उग्र प्रकृतीचा संभाजीच महाराजांच्या मतें लायख असता, तर त्याला पन्हाळ्यास अटकेंत त्यांनीं ठेवला असतां काय? अंतकाळीं त्यांची भाषा काय होती न् काय नव्हती, याचा वाद जरी सोडून दिला, तरी ''संभाजीची प्रकृति उग्र, त्यात राज्य आवरणार नाहीं. सर्वांचा नाश करून आपणहि नाश पावतील. राजाराम सुबुद्ध. त्याचे हाते राज्यरक्षण होऊन सर्वांचे कल्याण घडेल.'' हे उद्गार महाराजांनीं जीवमान असतांना शेंकडों वेळां काढल्याचे काय कधि कुणी ऐकलेच नाहींत?

चिटणीस - मासाहेब, लहान तोंडी मोठा घास घेऊं नये, पण आज घेण्याची वेळ आली आहे. आपण पुण्यात्मा छत्रपतींच्या अर्धांगी. मी काय? बोलून चालून आपल्या चरणांचा चाकर, पायांतली वहाण -

सचीव - (स्व.) पण ही पायांतली वहाण आतां डोक्यावर चढून शिरजोर झाली आहे; ना!

चिटणीस - तेव्हां उशा पायथ्या इतका भेद त्यांत असणारच. मला संभाजी किंवा राजाराम काय, दोघेहि सारखेच. दोघांनीहि मी आवजी खंडूप्रमाणें कडी खांद्यावर खेळविले आहेत. पण, मासाहेब, स्वराज्य-संपादना प्रमाणेच स्वराज्यवृद्धीच्या कामांत व्यक्तीमाहात्म्याचें प्राबल्या वाढलें की

कार्याचा घात झालाच पाहिजे, ही गोष्ट दृष्टीआड करूं नका, एवढीच माझी प्रार्थना आहे. राज्यावर संभाजी बसला काय किंवा राजाराम बसला काय, साध्या भोळ्या माणसांना आपल्या दृष्टीचे पारणे सारखेंच फिटल्यासारखें वाटतें. पण प्रस्तुतचा राज्याचा वारसा म्हणजे भोसले घराण्याच्या खासगी मालमत्तेचा वारसा नव्हे. छत्रपतींच्या भवानीच्या कृपेनें जन्माला आलेल्या या हिंदवी स्वराज्याच्या पायांत हजारों इमानी माणसांचे बळी पडले आहेत. शेकडों कुटुंबातल्या तरण्या बांड जवानांनीं आपले आत्मसमर्पण केलें आहे आणि स्वराज्यासाठीं झालेल्या या आत्मयज्ञाच्या मंगलकार्यासाठीं, मासाहेब, आपल्या सारख्या अनेक पुण्यवान् मातांनी मोठ्या धैर्यानें आपल्या सुनांची मंगळसूत्रें कचाकच तोडून त्यांच्या कपाळाचीं कुंकवें स्वराज्याची गाणीं गात आपल्या हातांनी पुसलीं आहेत, हें विसरूं नका. छत्रपति हे छत्राचे पति असले, तरी छत्रपति म्हणून अखिल महाराष्ट्राला जबाबदार होते. छत्रपतींचे स्वराज्य म्हणजे भोसल्यांची जहागीर नव्हे; अवघ्या महाराष्ट्राची ती जहागीर आहे. स्वराज्याचा प्रश्न साऱ्या महाराष्ट्राच्या अब्रूचा प्रश्न आहे. रायगडावर विराजमान झालेली ही स्वराज्याची गादी, मासाहेब, महाराष्ट्राने स्वयंस्फूर्तीने बळी दिलेल्या सहस्त्रावधि वीरांच्या रक्तावर तरंगत आहे आणि याची साक्ष मराठशाहीच्या झेंड्यात भगव्या रंगाने उमटलेली आज सारी दुनिया पहात आहे. अखिल महाराष्ट्राने आपल्या मान्यतेचा आशीर्वाद दिल्याशिवाय, छत्रपतींच्या राजगादीला स्पर्श करण्याची जो कोणी धिटाई करील, त्याला त्या गादीच्या खालीं धमधमत असलेलें आत्मयज्ञाचें तेज जाळून खाक केल्यांशिवाय रहाणार नांहीं.

मोरोपंत - कबूल. बाळाजी, तुमची ही विचारसरणी आम्हाला अक्षरशः मान्य आहे. महाराष्ट्राच्या संमतीचाच विचार केला, तर आपल्या व्रात्यपणाने छत्रपतींच्या न प्रजाजनांच्या मर्जीतून उतरलेला संभाजी राज्याला लायक ठरेल, कीं आपल्या सद्‌गुणांनी सर्वांना प्यार झालेला राजाराम अधिक लायख ठरेल, ते तुम्हीच सांगा.

सचीव - वाटेल तर महाराष्ट्राची संमती मागवा.

सोयरा - महाराष्ट्राच्या संमतीची जरूर काय? स्वराज्यस्थापनेसाठीं महाराजांनी महाराष्ट्राला कधिं संमति नव्हती विचारली. जे जे ऐकावं ते आपलं नवलच. बाळाजी, प्रजेच्या संमतीनं राजांचा राजेपणा सिद्ध व्हावा, हें तुमचें म्हणणें कितीहि सुंदर असलं, तरी तो मनु अझून आला नाही. पुढं कधी येईल त्याची वाटाघाट आम्हांला आज काय करायची आहे? प्रजेच्या पायदळीं तुडविलेले मुकूट डोक्यावर चढवून, भाडोत्री राजेपणाच्या ऐश्वर्याचा दिमाख मिरविणारे छत्रपति कधिं काळीं निर्माण व्हायचेच असतील, तर या भोसल्यांच्या घराण्याचा, देवा, त्या वेळीं एकहि अस्सल वंशज जिवंत ठेऊं नकोस!

मोरोपंत - (एकीकडे) मासाहेब, प्रकरण असें चिडीला नेऊन कार्य साधणार नाहीं. आंजारून गोंजारूनच घेतलें पाहिजे.

चिटणीस - मासाहेब, कसूर माफ करा. दुर्दैवानें सगळ्याच गोष्टीचें होतें नव्हतें अवघ्या पाच वर्षांत झालें आणि पाच वर्षांत जे झालें तें या पांच दिवसांत विझालें. राज्यकारभारात थोरले महाराज प्रजेच्या प्रेमाला काय महत्व देत असत, त्याचें आज नुसतें कवित्व उरलें आहे. महाराजांना लोकमताची जर

पर्वा नसती, तर मासाहेब अष्टप्रधानांची संस्थाच त्यांनी निर्माण केली नसती.

मोरोपंत - बरोबर. अगदीं रास्त. बाळाजीचें बोलणें म्हणजे कधिं बेवाजवी नसायचे. 'बाळाजी माझा प्राण आहे' असें महाराज नेहमीं बोलत तें काय उगाच? अष्टप्रधानांनीं राजकारणी धागेदोरे कितीहि हालविले आणि सेनापतींनी केवढ्याहि लहान मोठ्या मोहिमा झुंजविल्या, तरी मासाहेब, त्या सर्वांचा आत्माराम म्हणजे आमचा बाळप्रभू चिटणीस.

चिटणीस - (स्व.) इतकी गोडबोली रसाळ जिभली काळ्याकुट्ट जहराने फणाणणाऱ्या कारस्थानी अंतःकरणाशी जाऊन भिडलेली आहे, हें कोणाला खरें सुद्धां वाटणार नाहीं.

सोयराबाई - चिटणीशी लेखणी आणि छत्रपतींची भवानी, असला कलमसमशेरीचा योग झाला म्हणून महाराष्ट्राला स्वराज्याचे भाग्याचे दिवस आले, ही गोष्ट जनजाहीर आहे. भवानीच्या जोडीलाच आज चिटणिशीं लेखणी आमच्या देवघरांत अग्रपूजेचा मान घेत असते. बाळाजी बाबांचे आमच्या भोंसले घराण्यावर झालेले उपकार शब्दांनीं नाहीं सांगतां येणार! त्यांनीं आपल्या जिवाचें रान केले नसतें तर आम्ही न् आमचे जातभाई मराठे शूद्रत्वाच्या काळीम्यांतून मुक्त झालें नसतो न् महाराष्ट्राला स्वतंत्र स्वराज्याचा राज्यारोहण प्रसंगहि लाभला नसता.

चिटणीस - मासाहेब, सेवकाचा गौरव करणे हा धन्याचा मोठेपणा असला, तरी छत्रपतींच्या अवतारकाळात घडून आलेल्या शेंकडों चमत्कारांच्या सिद्धींत व्यक्तीला महत्व देणें बरें नाहीं. भवानीची इच्छा होती म्हणून गुलाम महाराष्ट्र स्वतंत्र झाला आणि रायरीला रायगडाचें रूप येऊन राज्यारोहणाचा सोहळा जगाला दिसला, यांत माझ्या क्षुद्र लेखणीचे पोवाडे ते काय गायचे?

मोरोपंत - बाळाजी, तुमच्या स्वराज्यनिष्ठेने आज अखिल महाराष्ट्र इतका उपकृत होऊन बसला आहे कीं महाराजांच्या अकालीं मृत्यूनें त्यावर ओढवलेला बिकट प्रसंग बाळाजी आपल्या आलौकीक बुद्धीनें कसा काय सावरून धरतो, इकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत. चहूंकडे गनीम तर जोरावर. अशांत सैन्यांत बेदिली फैलाविल्यास स्वराज्याला धोका येईल आणि महाराजांचे मागें आपण सर्व निमकहराम ठरू, याचा काय तो विचार ठरवा.

चिटणीस - मोरोपंत, आपण आज कुलमुखत्यार. अष्ट प्रधानमंडळाचे अध्वर्यू. आपण आज म्हणाल ती पूर्व दिशा ठरणार आहे. पांचामुखी परमेश्वर! आपण अष्टप्रधान जो निर्णय ठरवाल तो खरा. माझे खर्डेघाश्याचें काय? धनि फर्मावतील त्या हुकमाचे खर्डे खरडून दिले कीं मी मोकळा.

सचीव - पण आज धनि कोण तेंच ठरवायचें आहे.

चिटणीस - त्यांत तुम्ही आम्ही ठरवणार कोण? आणि ठरवणार तरी काय?

सोयराबाई - छत्रपतींच्या शेवटच्या इच्छेप्रमाणें राजारामाला राज्याभिषेक करून या स्वराज्याचा धनि ठरवणार.

चिटणीस - ठरवणार कोण?

मोरोपंत व सचिव - आम्ही अष्टप्रधान.

चिटणीस - ठीक आहे. मग गाडें अडलें कुठं आता?

मोरोपंत - चिटणीस, सध्याचा घोटाळा तुम्ही जाणतच आहांत. महाराजांच्या मृत्यूची बातमी आज पाच दिवस दडवून ठेवण्यात आम्ही कृतघ्नपणा केला, निमकहरामी केली, असा आमच्यावर आप्रमाद आला आहे. राजकारणी क्षेत्रांत झगडणाऱ्यांना नेहमींच गैरसमजाची बक्षिसी मिळत असते. पण स्वराज्याची ही तरती नौका संभाजी सारख्या उग्र प्रकृतीच्या माणसाच्या हाती जाऊन बुडाली, तर त्याचें खापर तुमच्या आमच्या माथीं फुटणार आहे, याचा सर्वांनीं विचार केला पाहिजे. महाराजांनी या गोष्टीचा दूरवर विचार करून संभाजीला पन्हाळ्यास आधींच अटकेंत टाकला आहे. आता आपण एकदम पन्हाळ्याचा जर पक्का बंदोबस्त केला, तर ठिकठिकाणी पक्की नाकेबंदी करून राजाराम महाराजांचा राज्याभिषेक तात्काळ उरकून घेऊं.

चिटणीस - मोरोपंत, अष्टप्रधानांच्या या निश्चित राजकारणाला विरोध करण्याचें मला काहीच प्रयोजन नाहीं. पण पन्हाळ्याचा तो मूर्तिमंत वाघ जर उद्या या तुमच्या राजकारणानें चिडला, तर एका झापेंत या स्वराज्यरचनेचा उन्हाळा केल्याशिवाय मात्र राहणार नाहीं, हें लक्षांत ठेवा.

सोयराबाई - वाघांच्या नाकात लंगर अडकवून त्यांची कुत्री मांजरं करणं, भोसल्यांच्या या सिंहीणीची सहजलीला आहे. बाळाजी बाबा, महाराजांचे तुम्ही नेकदार मंत्री, समर्थ रामदासांचे दोघेहि पट्टशिष्य. या तमाम मराठी रियासतीत छत्रपतींचा मनोमन साक्षी बाळप्रभू चिटणीस. हा तुमचा लौकीक स्मरून, स्वराज्यासाठीं हे राजकारण तुम्ही सिद्धीला नेलंच पाहिजे.

चिटणीस - मासाहेब, समर्थांशी अहंता करण्याची माझी इच्छा नाहीं. सईबाईसाहेब जर आज हयात असत्या तर निवळ सापत्नभावाच्या सबबीवर संभाजीला डावलण्याचं हें राजकारण जन्मालाच आलं नसतं. छत्रपतींच्या मागें राजगादीचा वारसा जर राजाराम महाराजांच्या दैवात असतां, तर देवाने संभाजीस वडीलकीची संधि खास दिली नसती.

सोयराबाई - बाळाजी, हा सापत्नभाव नाहीं, ही स्वराज्यसंरक्षणाची विवंचना आहे. देवानें काय केलें किंवा दैव काय करणार नाहीं, हा वाद आतां नको आहे. देवाची करणी दैवाला सुद्धां उलथी पालथी घालता येते.

सचीव - देवापेक्षां देवाची एक मात्रा अधिकच आहे.

चिटणीस - असेल, पण दैवाच्या झोल्यावर राजकारणाचे डोंबारी खेळ खेळणारांनीं स्वराज्याच्या भवितव्येतेकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं.

सोयराबाई - हा तात्विक वाद बंद करा. बाळाजी मी एकच प्रश्न विचारते. तुम्हांला या स्वराज्याची जर खरीखुरी कळकळ असेल-

---

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही.

चिटणीस - तर मासाहेब तुमच्या या राजकारणाला काडीचाहि विरोध न करता मी अगदी मुक्याबहिऱ्याप्रमाणे स्वस्थ बसण्याची आपल्या पायाची शपथ घेऊन प्रतिज्ञा करतो. मग तर झालं ना? माझ्या रायगडच्या देवाने उभारलेली ही हिंदवी स्वराज्याची प्रतिसृष्टी खवळलेल्या दैवाच्या तुफानांत जर हेलकावे खाईल, तर या चिटणीस घराण्यांतला अस्सल बीजाचा प्रत्येक स्त्रीपुरुष त्या प्रत्येक हेलकाव्यात आपल्या प्राणाचा बळी दिल्याशिवाय खास रहाणार नाहीं.

मोरोपंत - (स्व.) सरळ आणि शुद्ध मनाचा भोळा सांभ आहे. पण या बदललेल्या अमदानीत हा भोळा सांभ अखेर नंदी बनणार!

चिटणीस - मासाहेब, आज माझ्या दैवानें * खाल्ला. आजपर्यंत खाबंद जबरदस्त, म्हणून सर्व प्रकारच्या कारस्थानांना पुरून उरलो आणि दाखविले निमकहलालीचें चीज झालें. पण आज दैवानें मोठा * बख्त आणला. परवापर्यंत या बाळाजीच्या स्वराज्यावर शंकेचा शिंतोडा उडविण्याची कोणाची मायव्याली नव्हती, पण माझी ती शिवराय माउली परलोकी जाऊन अवघे पांच दिवस होतात न होतात, तोच मासाहेब * साहेब-राणीसरकार, खुद्द आपल्यालाच माझ्या स्वराज्य निष्ठेचा संशय यावा काय? केल्या सत्कर्मांचा * वाचून नरकाचें साधन करण्याची मला इच्छा नाहीं. मासाहेब, या बाळाजीनें आणि त्याच्या प्रत्येक * जातभाईनें या हिंदवी स्वराज्यासाठीं केलेल्या * यज्ञाची बूझ राखणारी माता जिजाऊसाहेब न् * शिवराय हीं देवलोकीं गेलेली देवमाणसे, तुमच्या विषारी संशयी वृत्तीला शाप दिल्याविना खास रहाणार नाहीत.

सोयराबाई - बाळाजी बाबा, क्षमा करा. मी चुकून बोलू नये तें बोलले.

मोरोपंत - छत्रपतीची राणी झाली तरी, बाळाजी सोयराबाईसाहेब तुम्हा आम्हाला मुलीप्रमाणेंच. पोर सवदा वय, गेला शब्द चुकून.

सोयराबाई - खरंच. पोरबुद्धीनं शब्द चुकून पडला वडलांचा उपमर्द झाला. बाळाजी बाबा, छत्रपतींच्या मागें स्वराज्याची अब्रू आज तुमच्या हातीं आहे.

मोरोपंत - अष्टप्रधानांनी वाटेल त्या राजकारणात पाचपेच ठरविले, तरी बाळाजी तुमच्या पोक्त सल्ल्याशिवाय आम्हाला एक पाऊल पुढे टाकता येत नाही.

चिटणीस - अष्टप्रधानांच्या राजकारणांत * मी कसलाहि व्यत्यय आणणार नाही. खुशाल वाटेल ते करा, पण शिवशाहीची इभ्रत न् दरारा वाढवा म्हणजे झाले.

सोयराबाई - तर मग पन्हाळ्याच्या बंदोबस्ताची पत्रे द्या आत्ताच्या आत्ता लिहून. पन्हाळ्याचा बंदोबस्त झाल्याशिवाय स्वराज्यरक्षणाचा नवीन पाया आता बसत नाही.

चिटणीस - आम्ही दरखदार राजाचे. खावंद वडील संभाजी महाराज असता अशी पत्रे आम्ही लिहिणार नाहीं. उगाच या बाबतींत आग्रह करण्याचें कारण नाही.

---

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही.

मोरोपंत - तुमच्या हातचें पत्र नसल्यास लोकांस पत्रांचा विश्वास पडणार नाहीं.

सचीव - शिवरायी नाण्याप्रमाणें आज तमाम रियासतीत चिटणीशी लेखणीचा दरख राजमान्य होऊन बसला आहे. चिटणीशी मखलाशी शिवाय अष्टप्रधानांच्या नुसत्या अकलेची मखलाशी काय चाटायची आहे?

चिटणीस - सचीव, मोरोपंत, तुम्ही राजकारणी खरे, पण एका बाबतींत तुम्ही घसरला. आज तुमच्या कारस्थानाचं - नव्हे, राजकारणाचं घोडं - चिटणीशी लेखणीवर अडखळून पडत आहे. सहा वर्षांपूर्वी रघुनाथपंत पंडीतानं - तुमच्या त्या धर्ममार्तंडानं - माझ्या खंडूच्या मुंजीत मांडलेले घटकापात्र लाथ मारून छिन्नभिन्न केलं, त्याऐवजी त्याच वेळी चिटणीशी लेखणीचें टोकं ठेंचण्याची कारवाई तुम्ही सर्वांनीं केली असती, तर आजचा प्रसंग खास टळला असता.

सोयराबाई - बाळाजी बाबा, जे जे होतं ते ते आपल्या बऱ्याकरतांच होते. मंथरेच्या आंगात कली संचरला म्हणून राम वनवासाला गेले. पण पुढें रावणाचा वध होऊन सारी दुनिया सुखी झाली. रघुनाथपंताच्या आंगात खोडसाळ धर्माचा कली संचरून, तुमच्या घरच्या मंगल कार्याचा जर त्यांनी विध्वंस केला नसता, तर महाराजांनीं न् तुम्ही वेदोक्त राज्याभिषेकाची तयारी नेटानें केली असती काय? झालं तर मग. वाईटातून सुद्धां किती चांगलं निघालं बरं? रायगडाच्या राजगादीखाली चिटणीशी कलमानं आपल्या स्वराज्यनिष्ठेचं स्वस्तिक आधीं काढलं, म्हणूनच महाराष्ट्राला छत्रपति दिसले आणि भोसल्यांना पारखे झालेले उदेपूरकर शिसोदे आपल्या अस्सल रक्ताच्या भेटीसाठीं रजपुतान्यांतून या कोकणात आले. अशा पराक्रमी चिटणिशी लेखणीचें टोकं कुणि ठेंचूं म्हणेल, तर त्याच्या जिभेची चटणी करायला भोसल्यांचा कोणताहि औरस बीजाचा वंशज मागे पुढे पहाणार नाही. बाळाजी, आजचा प्रसंग तोच आहे. चिटणीशी कलमानेंच पन्हाळ्याचा बंदोबस्त करून ही विसकटलेली घडी पुनः नीट ठाकठीक बसविली पाहिजे. प्रत्येक भावी छत्रपतीच्या भवितव्यतेची रूपरेषा चिटणीशी लेखणी जशी आंखून देईल, तसा भवानीचा पराक्रम या हिंदुस्थानांत गाजणार आहे. हा दरख तुमचा, त्या अर्थी बरी वाईट पत्रें तुम्हीच लिहून दिली पाहिजेत.

चिटणीस - मासाहेब, कृपा करून या बाबतींत मला आग्रह करू नका.

मोरोपंत - करू नका म्हणजे काय? ज्याचा दरख त्यानें संभाळलाच पाहिजे.

सोयराबाई - हा तुमचा आंगचोरपणा म्हणजे शिवछत्रपतींशी शुद्ध बेइमानी आहे, असेच आतां मी म्हणते.

सचीव - तुम्हांला आमचें राजकारण पटत नसेल, पाप वाटत असेल, तर तुम्ही स्वतः नका लिहूं पत्रे. पण आम्ही आवजी जवळून लिहून घेतली तर तुमची हरकत आहे काय?

चिटणीस - चिटणीसाच्या सर्व कुटुंबाची मान छत्रपतींच्या मांडीवर ठेवलेली आहे. माझा आवजी तुमच्या स्वाधीन करतो. पाहिजे तसे करवा. (जातो.)

सोयराबाई - पण काय हो सचीव, आवजीचीं पत्रें कोण मान्य करणार.

सचीव - मासाहेब, आतां गारुडी खेळ खेळल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. चिटणीसाचे आणि त्यांच्या मुलाचे अक्षर इतके एकसारखे आहे कीं बापाचें कोणतें न् लेकाचें कोणतें हें उमगायला कठीण. दोघांची मखलाशी अगदीं एकजात एका वळणाची. अक्षरांच्या वळणाच्या बाबतींत बाळाजी आवजी न् आवजी बाळाजी दोघांचा एक टांक. या भोळ्या सांभाची एवढी परवानगी मिळाली, पुरे झालं. आता पुढची प्रतिसृष्टी मोरोपंत आणि मी बेमालूम उभारून देतो.

सोयराबाई - ठीक आहे.

(सर्व जातात.)

□□□

स्फुट लेख

इतिहासाचार्य राजवाडे

''श्रीयुत राजवाडे हे इतिहास-साहित्य-संग्राहक ह्मणून चांगली प्रख्यात पावलेले आहेत. 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' शोधून तीं संकलित करण्यांत राजवाडे यांनीं जे परिश्रम केले व स्वार्थत्यागाची जी परीसीमा गाठली, ती महाराष्ट्रांत अक्षरशः अद्वितीय व अत्यंत कौतुकास्पद आहे; आम्ही तर असेहि ह्मणतों कीं श्री. राजवाड्यांचे 'खंड' जर बाहेर पडले नसते तर महाराष्ट्रेतिहासाच्या क्षेत्रांत खरोखरच 'सर्व अंधार' पडला असता, राजवाड्यांनी ही कामगिरी बहुमोल आहे. इतकेंच नव्हे तर दुसरा राजवाडे प्रसवायला महाराष्ट्राला आणखी एक दोन शतकांचीहि तपश्चर्या अपुरी पडेल, असें आमचें प्रांजल मत आहे.''

- कोदण्डाचा टणत्कार. पृ. ५-६.

एका अत्यंत तीव्र व मनक्षोभकारक वादाच्या प्रसंगी ज्यांच्या विषयीं आम्ही वरील उद्गार काढले होते, ते विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, सुप्रसिद्ध महाराष्ट्रेतिहासाचार्य ३१ दिसेंबर १९२६ रोजी धुळे येथे आपल्या संशोधन कार्यात मग्न असतांच हृदयक्रिया बंद पडून कालवश झाले, हें नमूद करण्यात आम्हाला फार दुःख होत आहे. राजवाड्यांचा व आमचा 'कायस्थ धर्मदीप' नामक लेखावरून १९१८ साली मोठा खडाजंगी वाद माजला होता. हें महाराष्ट्रीयांस नव्याने सांगणे नको. 'अरे तर कारे' म्हणीप्रमाणें राजवाड्यांच्या अनेक विधानांच्या चिंधड्या उडवण्यासाठीं आम्ही प्रत्युत्तरांचे भयंकर बाण त्यांच्यावर सोडून, त्यांच्या पाठीराख्या भारत इतिहास संशोधक मंडळास दे माय धरणी ठाय करून सोडले होते. परंतु एवढ्या वादावरून राजवाड्यांच्या जीवनकार्या विषयी आम्हाला मुळीच कांही आदर नव्हता, किंवा आमच्या लेखन व्यवसायाबद्दल राजवाड्यांना आदर नव्हता, अशांतला प्रश्न मुळीच नाहीं. जात्याच ते बेदरकार वृत्तीचे असल्या मुळें, कोणी भलेबुरे बोलले लिहिले, तरी त्याची त्यांना खिसगणती नसे. त्यांनी केवळ इतिहासाचे क्षेत्र आक्रमण केंलें होतें असे नव्हे. तर त्याच्या अनुषंगाने जितक्या म्हणून विषयांवर त्यांची नजर फिरली, तितक्या विषयांचा त्यांनी - एखाद्या जिज्ञासू विद्यार्थ्याप्रमाणें - पायाशुद्ध स्वाध्याय केला. इतिहास, भाषा, समाज, इत्यादि अनेक शास्त्रांचा स्वाध्याय करून, त्यांचा तत्तद्विषयक आत्मविश्वास एवढा दांडगा फुरफुरलेला असे, कीं आपली निश्चित मते प्रतिपादन करतांना ते लोकमताची केव्हांहि कसलीहि पर्वा बाळगीत नसत. लोकमान्यता मिळविण्यासाठीं, किंवा आपल्या

ग्रंथांचा सपाटून विक्रा होण्यासाठीं, लोकरंजनाच्या फंदफिसाटांत राजवाडे कधींच पडले नाहींत. उलट, असल्या लोकरंजनी झब्बूंची ते निरर्गल कठोर भाषेंत झडती घेत असत. मनुष्य हा नेहमींच गुणदोषमिश्रित असतो. रसिकांनी फक्त गुणांचा स्वीकार करावा. तद्वत् राजवाड्यांत कितीहि स्वाभाविक दोष असले, तरी त्यांच्या अचाट व अद्वितीय इतिहास-वाङमय-तपश्चर्येनें त्यांना महाराष्ट्रेतिहासांत चिरंजीव करून ठेवलें आहे, यांत मुळींच शंका नाहीं. त्यांच्या मागें शिष्यत्वाची प्रौढी मिरवणारे लोक कितीहि असले, तरी राजवाड्यांची सर त्यांना यायची नाहीं. तसें कार्य त्यांना उरकायचें नाहीं. राजवाड्यांचा जीवनक्रम, त्यांची निस्पृह राहणी आणि इतिहास साहित्य संग्रहासाठीं त्यांनीं केलेली जाग्रणें व पायीं प्रवास, या सर्व गोष्टी एकमेवाद्वितीय अशाच आहेत. त्यांची नुसतीं कोणी नक्कल करूं म्हणेल, तरी साधणार नाहीं. मग कार्याची धुरा पुढें वाढवीत नेण्याची गोष्ट कशाला? शापित महाराष्ट्रांत आजपर्यंत एकाहि पुरुषोत्तमाची कार्यपरंपरा पुढें चालल्याचें उदाहरण इतिहासांत नाहीं. मग राजवाड्यांची परंपराच तेवढी अपवाद ठरत असेल, तर त्यांत आम्हांला आनंदच होईल. जगदीश राजवाड्यांना स्वर्गात चिरकाल शांति न देतां, लवकरच या महाराष्ट्रांत पुनर्जन्म देवो!

आमचे गुरुवर्य दादा आठल्ये

मऱ्हाठी सारस्वताच्या क्षेत्रांत अगदी पहिल्या प्रथम ज्यांनी आमचा हात धरून पाऊल टाकण्यास शिकविले आणि केरळकोकीळ मासिकांत आमच्या लहान लहान लेखांची प्रसिद्धी करून पितृवत् प्रेमाने सर्वतोपरी उत्तेजन दिलें, ते आमचे वंद्य गुरुवर्य 'महाराष्ट्रभाषाचित्रमयूर' कृष्णाजी नारायण उर्फ दादा आठल्ये ता. २९ नवंबर रोजीं पुणें येथें अंतर्गळाच्या आजारानें दिवंगत झाले, हें नमूद करतांना अंतःकरण शोकावेगाने व्याकूळ होत आहे. वृद्धापकाळीं मृत्यू निसर्गक्रमानुसार अनिवार्य तर खराच. परंतु जिव्हाळ्याच्या माणसाचा मृत्यू हा त्याच्या १०० व्या वर्षी सुद्धां हृदयाला शोकाग्नीचे भयंकर चटके देतो. 'माया' ही काय विलक्षण चीज आहे, याचें प्रत्यंतर अशाच प्रसंगीं अनुभवास येते. सन १९०४ साली पनवेल मुकामीं दादांचा व आमचा प्रथम ऋणानुबंध जुळून आला. तेव्हांपासून तो आजपर्यंत त्यांनी आणि त्यांच्या आबा आण्णांनी-दोघा सत्पुत्रांनी-या 'केशव' वर जें अकृत्रिम प्रेम वाढविले, तसले प्रेम स्वकुटुंबियांकडूनहि आम्हाला कधिं लाभलें नाहीं. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे दादांची व आमचीं कांही विशिष्ट मतें यावज्जन्म कधिं जुळली नाहीत. अनेक वेळां दोघांत कडाक्याची चर्चा व भांडणेहि होत. परंतु तेवढी लाट गेली की लगेच आमच्या परस्पर प्रेमादराची गंगा पूर्ववत् निर्मळ वाहूं लागे. तारुण्याच्या पहिल्या बेफाम अमदानींत आमच्या महत्वाकांक्षेचे नानाविध चोचले पुरविण्यांत दादांनी श्रमाकडे खर्चाकडे किंवा मानखंडनेकडेहि कधिं लक्ष दिलें नाहीं. 'केशव अमुक बाबतीत चिडला किंवा रुसला' इतकें कळतांच, पनवेल गांवाच्या बाहेर दोन मैलांवर असलेल्या एकांत बंगल्यावरून, रात्री बेरात्रीहि दादा धावून येऊन, आमची समजूत घालीत असत. काय लागेल ते देत असत. तात्पर्य, वयाच्या १७ व्या वर्षीच परमेश्वराने हिरावून नेलेलें आमचें पितृसौख्य दादांच्या रूपानें आम्ही आजपर्यंत उपभोगिले.

एवढ्यावरून वाचकांना आमच्या वैयक्तिक शोकावेगाची बरोबर कल्पना येईल. केवळ मते जुळत नाहीत किंवा दोन परस्परविरुद्ध दिशांनीं विचारांचा प्रवाह वाहतो, एवढ्याच सबबीवर दक्षिणोत्तर तोंडे फिरविणाऱ्या आजकालच्या मताभिमानी बृहस्पतींना दादा आठल्ये आणि केशव ठाकरे या दोन ब्राम्हण-ब्राम्हणेतर व्यक्तींतले प्रेमाचे रहस्य उलगडून दाखविणे फार कठीण काम आहे. दादांचे चरित्र हा एक स्वतंत्र लेखाचा प्रश्न आहे आणि तो यथावकाश वाचकांच्या सेवेला प्रबोधन रुजू करीलच करील. आज फक्त आमचे अश्रुसिंचनाचें काम या अंकी केलें आहे. परमेश्वर दादांना चिरकाल शांतिसौख्य देवो!

मृत्यूने चिरंजीव केले

जन्म आणि मृत्यू! दोनच शब्द. वरवर पहाणाराला आणि विचार करणाराला या दोन शब्दांतील स्थिती भिन्नता भासते. जन्मांत गोडी वाटते आणि मृत्यूंत कडू जहरीपणा वाटतो. मूल जन्माला आलें कीं आपण माणुस मोठ्या आनंदाने उत्सव करतो आणि एखादा स्नेहीसोबती किंवा कौटुंबीय आप्त मृत्यूवश झाला की आपण दुःखातिशयाने भयंकर आक्रोश करतो. अशा प्रसंगी ''मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ।। अकस्मात तोही पुढें जात आहे ।।'' हा रामदासी इषारा कोणीच विचारात घेऊ शकत नाही. मृत्यू का? तर जन्म झाला म्हणूनच ना? जन्मच नसता, तर मृत्यू तरी कशाचा आणि कां? अर्थात् जन्म हाच मुळीं मृत्यू, असें स्पष्ट सिद्ध होते. आपण संसारी माणसें दर वर्षाच्या प्रथम दिवशी एकमेकांस 'नवीन वर्ष सुखाचे जावो!' (Wish you a happy new year.) असे शुभेच्छेचे संदेश धाडतो. एखाद्याच्या जन्मदिवशी असेंच त्याचे अभिनंदन करतो, आणि 'शतायू भव' आशीर्वादाचा त्यावर वर्षाव करतो. राजे बादशाहांच्या जन्म तिथीच्या दिवसांचा थाट काय विचारता? तोफाची धडेबाजी सैन्याची हडलहप्पी, मिरवणुकीचा व दरबारांचा आटारेटा, पदवीदानाची रेळचेळ, मेजवान्यांचा सुकाळ, वगैरे धामधूम सर्वत्र माजते. पण या सर्व उत्सवाचें मूळ शोधून पाहिलें, तर एवढेंच प्रत्ययाला येतें कीं आम्ही माणसें जन्मगांठीचा उत्सव करीत नसून, अमूक एखादा सोम्या गोम्या अगर राजा बादशहा मृत्यूगांठीत अडकण्यासाठी किती वर्षे पुढें सरकला, याचीच जाहीर उत्सवाने मोजदाद करीत असतो. गर्भाशयाचे गांठ सोडून अथवा तोडून प्राणी जन्माला आला कीं एका पळाचाहि अवधी न लागता तात्काळ तो मृत्यूच्या गाठींत अडकतो. जन्म हीच मुळी जर मृत्यूची धण, तर या नश्वर जगांत जगला कोण आणि मेला तरी कोण? जन्माची घडी हीच जर मृत्यूमुखांत पहिली उडी, तर 'चिरंजीव' हा शब्द अस्तित्वांत आला तरी कसा? जन्माच्या रूपानेच काळाचें भक्ष्य बनणाऱ्या मानवाला चिरंजीवित्व प्राप्त होऊं शकते? अलबत! पंचतत्वांचा बनलेला देहाचा गोळा पंचतत्वांत समरस झाला, म्हणजे मनुष्य कालवश झाला, इहलोक सोडून गेला, असे आपण म्हणतो. परंतु मानवी जीवनाचे रहस्य त्याच्या देहांत नसते. जीवन रहस्याला परिणत करण्यासाठी देह हा एक माध्यम (मीडियम) आहे. देह हें एक इन्स्ट्रूमेन्ट आहे. या पलीकडे त्याची किंमत नाही. या भूतलावर शेकडों वीर वीरांगना होऊन गेल्या. मृत्यूनें त्यांचें नश्वर देह जरी मटकावले, तरी त्यांच्या लोकोत्तर

चारित्र्याच्या महिम्याचे तेज सर्वभक्षक काळाला यत्किंचितहि मंद करतां आलेलें नाहीं. उलट, कालगती बरोबर त्याची कला प्रतिपच्चंद्ररेखेव वृद्धिंगत होतच असते. जगला कोण आणि मेला कोण? 'स जातो एन जातेन याति वंशः समुन्नतिम्' असे नीतिकारांनीं या प्रश्नाला उत्तर दिलें आहे. जो जगाला जगविण्यासाठी मेला, कालवश झाला, तो 'मेला' म्हणण्यापेक्षा चिरंजीव होऊन जगला, असेंच म्हटलें पाहिजे. हिंदु धर्म आणि हिंदुत्व जगविण्यासाठी शिवराय अवतरले. ते निसर्गधर्मानुसार कालवश झाले. पण त्यांच्या लोकोत्तर हिंदुत्वामुळें ते यच्चावत हिंदुमात्राच्या हृदयांत चिरंजीव होऊन बसलेच ना? पावनखिंडीत बाजी प्रभू ठार झाले. पण मृत्यूनेंच त्यांना चिरंजीव केलें. सवाईशिव असा शंभू छत्रपति स्वदेहाचे तीळतीळ तुकडे झालेले पाहून अनुभवून मेला. धर्मांध औरंगझीबासमक्ष हिंदु धर्मासाठी ठार झाला. पण अखेर त्या अमानुष मरणानेंच तो चिरंजीव झाला. तद्वतच २३ दिसेंबर १९२६ रोजी महात्मा श्रद्धानंद स्वामींचा दिल्ली राजधानीत जो खून झाला, त्या खुनानें - त्या मृत्यूनेंच त्यांना चिरंजीव केले. असा मृत्यू कोणाला मरून मिळायचा नाही. असा मृत्यू देवाजवळ मागून मिळायचा नाही. श्रद्धानंदांचा मृत्यू हेवा करण्यासारखा (एनव्हिएबल) आहे. श्रद्धानंदांचा मृत्यू हिंदुत्वाच्या मृत्यूला टाळण्यसाठी झाला. हिंदुत्व जगावें म्हणून श्रद्धानंदजी मृत्युवश झालें. हिंदुत्वाचें रक्त परधर्मियांनीं अंतःपर शोषूं नये, म्हणून श्रद्धानंदजींनी आपल्या रक्ताच्या ओंझळी इस्लामधर्माच्या पायावर आतल्या. वेदानुयायी प्रामाणिक आर्यहिंदूंचे रक्त किती शुद्ध निर्मळ आणि विकल्पातीत असतें, याचें प्रत्यंतर आज अनेक वर्षांनी स्वामी दयानंदजींच्या शागीर्दानें पुन्हा एकवार इस्लाम धर्माच्या प्रत्ययाला आणून दिले. श्रद्धानंदांच्या खुनानें हिंदुत्वाचा खून टाळला. असा मृत्यू - असा खून - असा रक्तपात - असें हें नवमतवाद्याचें उज्वल लेणें - पांघरून स्वामी श्रद्धानंद देहानें नष्ट झाले, तरी कीर्तीनें अमर झाले. डॉक्टर सौदेची एक उक्ती आहे :- '"The most triumphant death is that of the martyr, the most aweful, that of the martyred patriot, the most splendid, that of the hero in the hour of victory." स्वामी श्रद्धानंदांनी या तीनहि भूमिका या जगद्‌गरंगभूमीवर उत्तम नटवून आपल्या चारित्र्याला भारतेइतिहासाच्या सुवर्ण पृष्ठांवर वज्रलेप चिरंजी केले. धन्य धन्य स्वामी श्रद्धानंद आणि धन्य त्यांचा मृत्यू!

नवमतवाद सिद्ध झाला

नवमतवादाचा इतिहास काळ नेहमींच रक्ताच्या अक्षरांनी लिहीत असतो. रक्तपाताच्या पाण्यानेंच आजपर्यंत नवमतवादाचीं रोपें थरारली आहेत. जगांत अशी एकहि सुधारणा नाहीं कीं जिच्या पायांत मानवी रक्ताचा सडा पडलेला नाही. क्रिश्चन धर्मच का घ्या ना. या धर्माने नवमतवादी क्रिश्चनांचे आजपर्यंत जितके बळी घेतलेले आहेत, तितके हिंदुस्थानांतील इस्लामी स्वारीवाल्यांनीं घेतलेले नाहींत. क्रिश्चन लोक हिंदुस्थानाला आणि हिंदु धर्माला माणुसकी शिकविण्याची, क्रिश्चन सरकारच्या पाठबळावर, मोठी मिजास मारतात. पण खुद्द त्यांच्या धर्मसंस्थापकाला - येशू क्रिस्ताला - त्यांच्या बापजाद्यांना

तिकाटण्यावर खिळे ठोकून ठार मारला, ही गोष्ट ते अज्जीबात विसरतात. सुप्रसिद्ध चिरंजीव मार्टीन लूथर व त्याचे नवमतवादी अनुयायी यांची 'दयाळू' व 'पायाळू' क्रिश्चन धर्माने काय बडदास्त ठेवली ती इतिहासांत नमूद आहे. क्रिश्चन लोकांचा 'इंडेक्स' चा धुडगूस म्हणजे नवमतवाद्यांच्या रक्ताच्या पाटांचा इतिहास. क्रिश्चन धर्माच्या नांवाखाली नवमतवाद्यांचे असंख्य खून पडलेले आहे. इस्लाम धर्म तर उघडउघड 'एका हातांत तलवार व दुसऱ्या हातांत कुराण' घेणारा, काफीराचा (मूर्तीपूजकांचा) खून तरी करणे किंवा त्याल इस्लाम धर्माची दीक्षा देणें हा इस्लामी धर्माचा प्रत्येक मुसलमानाला संदेश. सापडेल त्याला मुसलमान करावा, नाहींतर ठार मारावा, हाच ज्या इस्लामी धर्माचा दण्डक, त्या दण्डकाचा प्रामाणिक भक्त अबदुल रशिद यानें शुद्धी संघटनाचा नवमतवाद प्रसृत करणाऱ्या श्रद्धानंदजीचा खून पाडला, हें अगदीं रीतसर झालें. नवमतावाद्याला मिळणारें दिव्य पारितोषिक इस्लाम 'गाझी' अबदुल रशिद याच्या हस्तें श्रद्धानंदजीला मिळालें. त्यात मारत्याचा व मरत्याचा दोघांचाहि जयजयकार झाला. स्वामी श्रद्धानंदजी बरे होऊन उठत असलेल्या दुखण्यांतच जर मृत्यूवश होते, तर मामुली वहिवाटीला अनुसरून त्यांच्या 'शोचनीय मृत्यू' ची वृत्तपत्री बडदास्त आम्ही ठेवली असती. पण त्यांचा मृत्यू रक्तपातांत झाला. ते आपल्या नवमतवादाच्या कार्यासाठीं सर्वसंगपरित्याग करून संन्याशी झाल्यावर, नवमतवादाचें - शुद्धी संघटनाचें - विहित कर्तव्य बजावीत असतां जीर्णमताच्या रिवॉल्वरला बळी पडलें! भरतखंडाच्या दिल्ली राजधानींत त्यांच्या छातींतल्या रक्ताच्या चिळकांड्या उडून, ती युधिष्ठिराची तक्तभूमी सौभाग्यवति झाली. ती अशोकाची धर्मभूमी लाल चुनडी नेसली. हर्षाची ती धर्मसमन्वय - भूमिका त्यांच्या रक्ताच्या पिचकाऱ्यांनीं रंगपंचमी खेळली. अकबराची हि 'दिने इलाही' ची राजधानी मिनाबझाराच्या गुलालगोट्यांत रंगली. हिंदूंच्या भवितव्यतेच्या चक्राला क्रांतीचा विलक्षण झटका देणारी ही दिल्ली आपल्या रक्तांनीं चिंब भिजवून श्रद्धानंदांनीं आज अखिल हिंदुमात्राच्या हातांत त्यांच्या अस्तित्वाची गुरुकिल्ली दिली. केवढी ही थोर कामगिरी! केवढा हा स्वामी दयानंदांच्या आर्य नवमतवादाचा प्रताप! स्वामी श्रद्धानंदांचें रक्त हेंच सिद्ध करतें कीं आर्यसमाज - महर्षि दयानंदांचा आर्यसमाज - जीर्णमतावादी भिक्षुक शाहीकडून पेशव्यांच्या पुण्यांत गाढवाच्या वरातीने निंदिलेल्या दयानंदांचा सांप्रदाय - हा अस्सल शंभर नंबरी नवमतवाद आहे. कारण त्याची प्रगति त्याच्या थोर थोर पुढाऱ्यांच्या रक्तपातावर थरारत आली आहे. क्रिश्चन संप्रदायाच्या येशूक्रिस्त प्रवर्तका प्रमाणेंच स्वामी दयानंद जीर्णमतवाद्यांच्या विषप्रयोगाला बळी पडले. दुसरे वीर लेकीराम याच दिल्लीत रक्त सांडून चिरंजीव झाले. इजा झाला, बिजा झाला, आतां हा श्रद्धानंदांचा खून तिजा झाला. आर्य समाजाचा नवमतवाद सिद्ध झाला. धन्य महर्षि दयानंद आणि धन्य स्वामी श्रद्धानंद!

निषेध कसला? आणि संताप कां?

एका इस्लामभक्त मुसलमानानें एक धर्मवान पुढारी हिंदूचा खून केला म्हणून? म्हणून निषेध? आणि म्हणून संताप? मोठी आश्चर्याची गोष्ट! खुनी इसम कट्टा इस्लाम धर्मी आणि त्याच्या रिवॉल्वरला

बळी पडलेले स्वामीजी कट्टे आर्यधर्मी. खुनी इसमानें आपलें इस्लामप्रोक्त कर्तव्य चोख बजावलें आणि स्वामींनीहि आपले जीवनकर्तव्य यशासांग पार पाडले. यांत तुम्ही आम्ही निषेध करणारे आणि संतापाचे ठराव टाळ्या कुटून 'पसार' करणारे गोमागणेश पितळी दरवाजे कोण? तुमच्या निषेधाला आणि संतापाला पुसतो कोण? निषेध हिजड्यांनीं व्यक्त करावा आणि संताप नामर्दांनीं दाखवावा. खून झाला, इंग्रेज सरकारच्या कायद्यानें एक मोठा गुन्हा घडला, गुन्हेगार पकडला गेला, त्याची चौकशी न्याय वगैरे पद्धतशीर होऊन अखेर तो फांशी जाणार. हें सर्व रीतसर होणारच होणार. यांत शंका बाळगण्याची मुळींच जरूर नाहीं. न्यायचौकशीत निषेधाचा पुरावा आणि संतापाची पुरवणी विचारांत घेण्याची कोठेंच वहिवाट नाहीं. मग ही निष्कारण यातायात कशाला? निषेध करायचाच तर तो हिंदूंनी आपला स्वतःचाच केला पाहिजे. संताप व्यक्त करावयाचाच तर तो आपल्या बिघडलेल्या सामाजिक घटनेबद्दल आणि सडलेल्या अधर्मी धर्माबद्दल दाखविला पाहिजे. हिंदु जर एकजिनशी संघटित असते, त्यांचा हिंदु धर्म हा जयिष्णू राहिलेला असता, तर इस्लामियांची काय माय व्याली असती श्रद्धानंदासारख्या धर्मधूरिणाचा प्राण घेण्याची? पण जेथें श्रद्धानंदहि इस्लामियांना ढेकूण चिलटा इतकांच सहजवध्य वाटला व अखेर ठरला, तेथें इतर कोट्यवधि हिंदु जनांची त्यांना काय किंमत वाटत असावी, याची कल्पना तरी करून पहा. श्रद्धानंदजी वीराच्या मरणानें मेले, पण बाकीच्या हिंदूंना - ते अझूनहि एकजिनशी संघटित होणार नाहींत तर - कुत्र्याच्या मोतानें मरण्याचा काळ कांहीं फार लांब नाही, हा कटु इषारा प्रबोधन गेलीं ५ वर्षे जीव तोडतोडून देत आहे. सभा भरविणें, लांब लांब व्याख्याने झोडणें, टाळ्या पिटणें, ठराव पास करणें, या राणा भीमदेवी नाटकांना आतां फाटक्या पायतणांचीहि किंमत उरलेली नाहीं. सध्याच्या इंग्रेजी रियासतींत नेभळ्या व आत्मद्रोही हिंदूंना एवढाच मार्ग मोकळा आहे. त्या मोकळ्या मार्गावर गळा मोकळा करून रडायला इंग्रेजांचा कायदा मुळींच आडवा येत नाही. पण नुसत्या व्याख्यानबाजीनें हिंदुंच्या टिकावाचें मर्म आढळणार नाहीं. संघटन संघटन म्हणून कितीहि कंठशोष केला, तरी निषेधाचे ठराव टाळ्या कुटून पास करण्याइतकें संघटनाचें काम सोपें नाहीं. निदान महाराष्ट्रात तरी तें जवळजवळ अशक्य आहे, असें मागील चालूं अनुभवावरून स्पष्ट म्हणावें लागतें.

ही स्मशान-वैराग्याची धडाडी आहे

स्वामी श्रद्धानंदांचा खून होतांच महाराष्ट्र शुद्धी संघटनाची जी नारोशंकरी बोंब आज मारू लागला आहे, ती केवळ त्याची स्मशान वैराग्याची तात्पुरती धडाडी आहे. त्यांत प्रामाणिकपणाचा जिव्हाळा किंवा संघटनेची तळमळ मुळींच नाहीं. मागें कलकत्त्यास कुमारी स्नेहलतेची आत्महत्या होताच, हुंडाविध्वंसनाच्या निश्चयावर महाराष्ट्र असाच माथेफोड करूं लागला होता. जिकडे तिकडे मारे सभांचा आणि ठरावांचा महामूर पूर कोसळत होता. कॉलेजी विद्यार्थी तरूणांनी तर स्नेहलतेच्या फोटोची लॉकेटे व काळ्या रिबन्स छाताडावर लटकाऊन एक दोन महिने आपल्या महाराष्ट्रीय स्मशानवैराग्याचे नाटक भरंसाट नाचविलें. पण पुढें काय? पावसाळा संपताच ज्याप्रमाणें बेडकांचा बेपत्ता होतो, तद्वत् त्यांचा

तो स्मशान वैराग्याचा * झाला आणि स्नेहलतेचा आत्मयज्ञहि त्यांच्या हृप्तटलावरून पार धुतला गेला. आज तरूण महाराष्ट्राला स्नेहलतेची कसलीहि आठवण उरलेली नाहीं. हाच बेगडी कळकळीचा थाट आज श्रद्धानंदांच्या आत्मयज्ञाविषयी सर्वत्र गडगडत आहे. संघटन आणि शुद्धी हा विषय आजच कांहीं नव्यानें महाराष्ट्रापुढे आला, अशांतला प्रश्न नाहीं. गेली ५० वर्षे आर्यसमाज हें कार्य उत्तर हिंदुस्थानांत करीत आहे. या कार्याच्या आद्य प्रवर्तकाची - स्वामी दयानंद सरस्वतीची - महाराष्ट्राच्या केंद्रत्वाची मिजास मारणाऱ्या पुण्याने कशी बीभत्स विटंबना केली, ती माणसें विसरली तरी इतिहास विसरणार नाहीं. आर्यसमाजाच्या नवमतवादाला महाराष्ट्रात जो विरोध झाला, पेशवाई पुण्यानें या बाबतींत आपल्या जन्मजात मुर्दाडपणानें अखिल महाराष्ट्राच्या तोंडाला जे काळें फासलें, त्याचें थोडेसें परिमार्जन करवीरकर कै. शाहू छत्रपतींनी केलें. अपमानित आर्यसमाजाला त्यांनी सन्मानपूर्वक कोल्हापुरास आणून स्थापन केले. स्वामी श्रद्धानंदांची आर्यसमाजी चळवळहि कांहीं कालपरवाची नव्हे. आज २५ वर्षे ती दांडग्या धडाडीनें आसेतूहिमाचल तुफानी वावटळा प्रमाणे रोंरावत आहे. मध्यंतरी म. गांधींच्या असहकारवादांत श्रद्धानंदांनी प्रामुख्यानें भाग घेतला होता. त्यावेळीं आर्यसमाजाचें विहीत कर्तव्य कर्म स्पष्ट बाजूला ठेऊन ते राजकारणी धांगडधिंग्यात रममाण झाले. सामाजिक समतेची आणि धर्मक्रान्तीची श्रद्धानंदांची चळवळ थंड पडून, ते जेव्हा असहकारी राजकारणाची कडक भाषा बोलू लागले, तेव्हा राजकारणी - बोलघेवड्या महाराष्ट्रीय स्वयंमान्य पुढाऱ्यांची व त्यांची एकगट्टी जमली. तत्पूर्वी श्रद्धानंदांची व महाराष्ट्राची फारशी जानपछान कांहीच नव्हती. त्यांच्या आर्यसमाजी चळवळी विषयीं महाराष्ट्रानें केव्हांच कसलीहि क्षिति बाळगली नव्हती. महाराष्ट्रातल्या पुणेरी टायपाच्या पुढाऱ्यांना लाला लजपतराय प्रिय कां? तर राजकारणी जहालपणामुळे. त्यांच्या सामाजिक व धार्मिक समतावादामुळें मुळीच नव्हे. श्रद्धानंद तरी यांना प्रिय का? तर त्यांच्या थोड्याशा राजकारणी चळवळीमुळें. त्यांच्या अस्पृश्योद्धारामुळें नव्हे, किंवा त्यांच्या कडव्या समतावादामुळें नव्हे. महाराष्ट्राला श्रद्धानंदांची शुद्धी * असता, तर आद्य हिन्दु मिशनरी कै. गजाननराव वैद्यांची हिन्दु मिशनरी चळवळ महाराष्ट्रांत या वेळी सर्वत्र फोफावली असती. पण वैद्यांनी चळवळ सुरू करताच तिला महाराष्ट्राने कितीसें प्रोत्साहन दिलें? उलट सगळीं पुण्याची राजकारणी भटें आणि जगद्गुरू म्हणून मिरविणारे डागदार कूर्तकोटी या चळवळीला उघड गुप्त विरोध करीत होते, हें हिन्दु मिशनरीच्या जुन्या फावल्या चाळणारांना तेव्हांच दिसून येईल. एवढे मोठे शतावधानी 'राष्ट्रभक्त' टिळक. पण त्यांना सुद्धां हिंदु मिशनरी चळवळीची आवश्यकता व उपयुक्तता मरेपर्यंत पटली नाहीं. या बाबतींत 'बळवंतरावजींचें मत' घेण्यासाठी कै. वैद्यांनी कै. अनंतराव निळकंठ पिटकरांना मुद्दाम पुण्यास पाठविलें होतें. त्या वेळीं ''तुम्ही प्रयोग करून पहा. तो कसा काय यशस्वी होतो, हें पाहून मग मी आपलें मत कळवीन'' असला संदिग्ध व भ्याड जबाब टिळकांनी दिल्याचे प्रसिद्धच आहे. अस्पृश्योद्धारक जाहीरनाम्यावरील टिळकांच्या सहीचे स्मारक त्यांच्या पुतळ्यापेक्षाहि चिरंजीव होऊन बसलें आहे. खुद्द टिळकांची जर ही वृत्ती, तर त्यांच्या बडव्यांची काय असेल, याची स्पष्ट कल्पना कोणालाहि होईल. हिंदु मिशनरी सोसायटीने पहिलाच धडाडीचा जो प्रयोग केला, तो 'जन्माने मुसलमान' असणाऱ्या वहिदुद्दीनला 'हिंदु' 'गोपाळदास'

* उपलब्ध झालेल्या अंकात वाक्य दिसत नाही.

करण्याचा. संघटन आणि शुद्धी या दोन शब्दांना वैद्यांच्या मृत्यूनंतर जन्म लाभलेला आहे. त्यापूर्वीच संघटनाचा हा धाडशी प्रयोग करणाऱ्या आद्य हिन्दु मिशनरीला आज महाराष्ट्र कितीसा आठवीत आहे? अद्वैत फिलॉसफीचे प्रवर्तक डागदार कुर्तकोटी! वैद्य हयात असतांना त्यांना 'पतितपरावर्तनाचे तत्व' मान्य होते, पण 'तपशील अमान्य' होता. हा 'तपशील' संशोधन करणारांनी डागदारांच्या भिक्षुकी अहंमन्यतेची गाठ फोडली पाहिजे. ही भटी मनाची गांठ म्हणजे कै. वैद्यांचे 'ब्राम्हणेतरत्व.' एका ब्राम्हणेतरानें सुरूं केलेल्या चळवळीच्या झेंड्याखालीं आम्ही ब्रम्हवांत्युप्तन्न ब्राम्हणांनीं वावरावे? त्यानें संशोधिलेल्या विधीनें परावर्तनें करावी? त्याला आद्य हिंदु मिशनरीत्वाचा मान द्यावा? छे छे! यापेक्षां इन्फ्लुएंझा होऊन मेलेले काय वाईट! या पेक्षां आम्हा ब्राम्हण वर्गाचा निःपात पुरवला. अरे! आम्ही ब्राम्हण म्हणजे ब्रम्हदेवाच्या तोंडातून पडलो आजपर्यंत आमच्या पायधुणीचे पाणी पिणाऱ्या * ब्राम्हणेतरांचे वर्चस्व आम्ही जन्मसिद्ध पवित्र भूदेव मान्य करावें? सारा हिंदु समाज बेकीनें बेचिराख झाला तरी पर्वा नाहीं. पण केवळ 'तत्व मान्य' म्हणून ब्राम्हणेतर गजानन वैद्याचा 'तपशील' आम्ही मान्य करून मरूं पण असें करणार नाहीं. तपशीलाची ही काळी तोडी विवंचना अखेर डागदारद्वय कुर्तकोटी मुंजे * देवलस्मृतीनें निभावून नेली. देवलभटाची '* सांपडली तेव्हा कुर्तकोटीची 'कृति' थोडथोडी हवी तिकडे बागडूं लागली. 'हिं. मि. सोसायटीच्याच विध * परावर्तने करा.' असा वैद्यांचा तरी कोठे आग्रह होता आणि आर्य समाजाचा तरी कोठें आहे? पण प्रत्येक बाबतीत भटांचा वरचढपणा मिरवणाऱ्या पुणेरी टापाच्या दे. भ. लो. मा. भटांना वैद्यांचें हिन्दु मिशनरि किंवा लजपतराय श्रद्धानंदांचे आर्य समाजत्व उघडपणे मान्य करतांना बाप मेल्यासारखें दुःख व्हावें, यांत मुळी नवल नाही. तात्पर्य, महाराष्ट्राच्या शुद्धी संघटनांच्या बडबडींत हा 'भटी शिरजोरपणा' प्रमत्त असल्यामुळे त्यांच्या नकली समतावादाच्या पचनीं पडतांना अखिल ब्राम्हणतेर - विशेषतः अखिल चित्पावनेतर हिंदु समाजानें दहाच्या ऐवजीं शंभर अंक मोजावें, अशी आमची स्पष्ट सूचना आहे. आमची बालंबाल खात्री झालेली आहे कीं जोपर्यंत महाराष्ट्रांत चित्पावन लोक शिरजोर आहेत, तोपर्यंत चित्पावनेतर हिंदुसमाजाला संघटनाची व समतेची मुळींच आशा नाहीं. एक सोडून शंभर श्रद्धानंद ठार झाले, तरी हिंदु समाजाच्या संघटनेसाठी चित्पावन लोक आपल्या इतिहासप्रसिद्ध मुर्दाड मनोवृत्तीची नांगी लवमात्र बोथट करूं इच्छिणार नाहींत, सर्वांनीं लक्षांत ठेवावें.

कोठें गेली ती हिंदु मुसलमानांची एकी?

असहकारितेच्या हंगामांतच प्रबोधनाचा जन्म १३ ऑकटोबर १९२१ रोजीं दादरास झाला. त्या वेळीं हिंदु मुसलमानांच्या एकीच्या वराती रस्तोरस्ती मिरवण्यांत भटांनीं आपल्या जीवाचा आटारेटा चालवला होता. दादरच्या सहस्त्रबुद्ध्या सारखे कोऽपि प्राणी याच धांगडधिंग्यात देभ बनून लोकमान्यतेच्या

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही.

हळकुंडानें रंगले. भटांची शेकडों पोरें जमवून 'महमद्दलीकी जय, शौकत्तल्लीकी जय, खिलाफतकी जय' गर्जना करीत भटांनी 'हिंदु मुसलमान ऐक्या'च्या मिरवणुकीचा जिकडे तिकडे सुळसुळाट करून सोडला होता. कसलेहि बरें वाईट नाटक भटांना फार छान रंगवितां येते. ते आपली भूमिका इतक्या तादात्म्यानें नटून वठवितात कीं महात्मा गांधींसारखा चाणाक्ष व दूरदर्शी पुरुषोत्तम चुटकीसरसा बेभान फसतो, मग इतरांचीं कथा काय? जिकडे पहाल तिकडे हिंदु मुसलमानकी जय. त्याविरुद्ध ब्र काढणारा इसम देशद्रोही प्रबोधनाची त्या वेळीं नुकतीच कोठें सुरवात होतीं. जेमतेम सवाशें दीडशें वर्गणीदार. दादरास रस्त्यावर साधारण १००-१२५ किरकोळ अंक खपे. गांधीप्रणित आणि चित्पावन - प्रवचित या हिंदु-मुसलमान-ऐक्य पुराणावर आमचा मेल्या मारल्या मुळींच भरंवसा बसे ना. कारण, इतिहासांत या पुराणाच्या शाश्वतीचा आधारच मिळे ना. तत्कालीन लोकमताची पर्वा न करतां या ऐक्याच्या पुराणांना प्रबोधनानें १ ल्या वर्षाच्या २ ऱ्या अंकापासूनच धडाडीचा विरोध केला. त्याचा परिणाम असा झाला. एकदम ८० वर्गणीदारांनीं आमचा निषेधपूर्वक आश्रय बंद केला आणि मुंबईच्या दैनिक 'लोकमान्य' पत्राच्या बगलवच्चांनी प्रबोधनाची रस्त्यांवरील विक्री बंद पाडली. त्या नंतर मोपल्यांचे बंड, ठिकठिकाणी मुसलमानांचे रक्तपाती दंगे, गांधीचा उपवास, महमद्दलीचें गोप्रदान, आणि अलीकडे तंजिम तब्लघ या उठलेल्या वावटळी इत्यादि गेल्या ५ वर्षांतील ताजा इतिहास विचारांत घेतला, तर अखेर प्रबोधनाने अनेक अग्रलेखांत स्पष्ट व्यक्त केलेलीं भविष्येंच आज अक्षरशः खरी झाली आहेत, असाच निस्पृहांना अभिप्राय द्यावा लागेल. तात्पर्य, वारा वाहील तशी शिडें फडफडवून, लोकप्रीतीच्या कलाला आंजारीत गोंजारीत, आत्मप्रतिष्ठेच्या पगड्या सावरणारे महाराष्ट्रांतले दे. भ. भटजी कंपू लोकमताला वाईट वळण लावीत आहेत, याची लोकांनीच आतां दखल बाळगिली पाहिजे. कौन्सिल-बहिष्कार, कोर्टशाळा बहिष्कार, अस्पृश्योद्धार, खादी प्रसार, हिंदु-मुसलमान-एकी, खिलाफत पुरस्कार इत्यादि शेकडों भानगडी जनतेच्या माथी बळजबरीने लादण्यांत आणि प्रसंगानुरूप त्यांतून आपण मात्र सफाईने निसटण्यांत महाराष्ट्रांतल्या चित्पावन भटांनीच लोकमताचा विचका केला आहे, यांत मुळींच संशय नाहीं. आतां, वास्तवीक परिस्थिति काय आहे, ही पाहिली की यापुढे या चित्पावन भटांच्या बडबडीवर व वृत्तपत्री कलमकसायीपणावर जनतेने विश्वास ठेवतांना फार सावधगिरीनें वागणें जरूर आहे.

संघटनेच्या फोल वल्गना

श्रद्धानंदांविषयीं आदरभाव दाखविण्यासाठीं शुद्धी संघटनाचा कार्यभार सर्वांनीं उचलावा, असा आक्रोश आतां पुढारी भटांकडून ठिकठिकाणीं केला जात आहे. हिंदु-मुसलमानांच्या ऐक्य पुराणांचीच ही एक हंगामी आवृत्ति आहे. शुद्धीकार्य म्हणजे परधर्मांत गेलेल्या लोकांना परत हिंदु धर्मात घेण्याचे काम फारसें कठीण नाहीं. ते श्रद्धानंदांच्या रक्ताच्या पुण्याईनें आपोआप होईल. तें वाटेल त्याने करावे आणि करतीलहि. मुख्य अडचणीचा प्रश्न आहे तो संघटनेचाच. बेशिस्त बेदिल आणि बेदरकार बनलेल्या हिंदु समाजांत संघटना कशी काय होणार आणि हे संघटनवाले ती कशी घडवून आणणार, हा

एक मोठा विचाराचा प्रश्न आहे. (आम्हीं फक्त महाराष्ट्रापुरतेंच बोलत आहों.) हा प्रश्न लेक्चरबाजीने सुटण्यासारखा नाही. एकजिनसी रक्ताचा जिव्हाळा असल्याशिवाय संघटना कदापि होणें नाहीं. प्रत्येक सुधारणेंत रक्ताचें महत्व विशेष असते. हिंदु-समाजांतील हजारों जातींत आज कसला जिव्हाळा झणाणत आहे कीं त्याच्या बळावर हे संघटण्ये वाग्वीर संघटना घडवून आणणार? हिंदु धर्मांत तरी असें एकजिनशी जिव्हाळ्याचें काय मोठें सर्वव्यापी तत्व दाखविण्यासारखें आहे कीं त्यामुळें धर्मक्षेत्रांत सगळ्या हिंदूंचा एकोपा होईल? भटी पत्रांतील विचारांचा उडत उडत परिचय असणारांना सुद्धां हिंदू धर्मक्षेत्रांत भिक्षुकशाहीचे सुरूं असलेले खायचें दाखवायचे दात आतां अगदी स्पष्ट दिसत आहेत. जेथे दगड्या देवाच्या दर्शन पूजनाविषयीं भटेतरांविरुद्ध भटांची कावकावी, त्या धर्मांत अखिल हिंदु जनांच्या संघटनेविषयीं भटांच्या वल्गनांवर कोणाचा विश्वास बसणार? हिंदु धर्माला भिक्षुकशाहीने आणलेले आजचें स्वरूप इतकें किळसवाणें आहे कीं, त्याला धर्म हे नांव देण्यापेक्षा 'गुलामगिरीचा सांपळा' किंवा 'मृत्यूलोकचा नरक' हेंच नांव विशेष सार्थ ठरेल. हिंदूंची ज्या धर्मानेंच विघटना केली, त्या धर्माच्या क्षेत्रांत, त्या धर्माच्या नांवावर, तेच धर्मक्षेत्रांतले राघो भांगरे म्हणे अखिल हिंदूंची संघटना करणार! हें एक मोठें भिक्षुकी कोडेंच आहे! या कोड्यातल्या कोलदांड्यांत कोण कोण कावळे फसतील तें पाहणें आहे. आज शुद्धीच्या नांवाखालीं हिंदु धर्माच्या क्षेत्रांत परत येणाऱ्या लोकांमुळे हिंदूंच्या लोकसंग्रहाचे शरीर संख्येनें कितीहि फुगूं लागलेले दिसलें, तरी तेवढ्यानें हिंदु जनांच्या संघटनेचा प्रश्न सुटेल असें आम्हांला वाटत नाहीं. क्रिस्ती आणि मुसलमान समाजातल्या संघटनेशीं तोडीस तोड आणि तोंडास तोंड देणारी संघटना तितकीच एकजिनशी जिव्हाळ्याची व अभेदभावनेचीच असली पाहिजे. हिंदूंच्या प्रचलीत धर्मांत या जिव्हाळ्याला व अभेदभावाला कोठेच जागा नाहीं. बरें, सामाजीक क्षेत्राची पाहणी केली तरीहि हाच प्रकार! उलट, धर्मापेक्षा समाजाची विघटना अधिक घाणेरडी व तापदायक बनलेली आहे. ब्राम्हण ब्राम्हणेतर भेदासारखे ठळक भेदच काय, पण प्रत्येक जातींजातींत आणि प्रत्येक जातींतल्या व्यक्तीमात्र त द्वेषाचा भयंकर तुफानी वारा बोकाळत असतो. त्यातल्यात्यात, स्पष्टच सांगायचे तर, चित्पावनांसारखी अखिल चित्पावनेतर हिंदूंचा द्वेष करणारी जात उभ्या हिंदुस्थान देशांत सापडायची नाहीं. या मुद्यावर प्रबोधन वर्ष २ रें, अंक ४ था, ता. १ दिसेंबर १९२२ च्या अंकांत ''ब्राम्हण ब्राम्हणेतर वादाची चिकित्सा'' लेखांक ३ रा, यांत आम्हीं खालचे उद्गार काढले होते, ते वाचकांच्या पुनर्विचारार्थ येथे पुनर्मुद्रित करीत आहोंः-

''ब्राम्हण समाजांत सारस्वत देशस्थ कऱ्हाडे यजुर्वेदी दैवज्ञ चित्पावन वगैरे शेंकडों जाती मोडतात. त्या सर्वांच्या धार्मिक व सामाजिक जीवनांत कसलाहि एकोपा नाहीं, सहानुभूति नाहीं, कित्येकामध्यें तर आडवा उभा विस्तवहि जात नाहीं. सारस्वतांचा 'प्रेमा' तर इतका लोकविश्रुत आहे कीं त्याचे प्रत्यंतर पाहूं इच्छिणारांनी एक तर गोमांतकाची सफर करावी, नाहीं तर 'सरस्वति मण्डळ' हें एकच पुस्तक वाचावें. देशस्थ दैवज्ञ यजुर्वेदी गोवर्धनादि जाति आज जवळ जवळ दोन अडीच शतके चित्पावनांपासून बऱ्याच फटकून वागतात आणि धार्मिक सामाजिक बाबतीतील त्यांची कडवी चुरस फारशी लोकविश्रुत नसली तरी ग्रंथविश्रुत आहे. विशेष मननीय गोष्ट म्हटली म्हणजे पेशव्यांच्या सर्वसमर्थ बळजबरीमुळे देशस्थांनीं चित्पावनांशीं रोटीबेटी व्यवहाराचा मामला जरी सुरू केला, तरी त्यांना सुद्धां चित्पावनांकडून वरचेवर उपसर्ग पोहचतोच; नव्हे, नित्याच्या व्यवहारांत देशस्थाला वाटाण्याप्रमाणें बाजूला पडण्याचा

प्रसंग वरचेवर येतो. मग, पेशव्यांच्या सत्तेची लवमात्र क्षिति न बाळगतां त्यांच्या जातभाईशीं रोटीबेटी व्यवहारांत कस्सून विरोध करणाऱ्या शुक्ल यजुर्वेद्यांशी चित्पावनांचे कितीसे 'सूत' आहे आणि चालू घडीच्या 'राष्ट्रीय' विचार-विकासांत चित्पावन त्यांची काय बडदास्त ठेवतात, यांचें सप्रमाण पुराण आमचें ज्ञानवृद्ध तपस्वी मित्र डॉ. रा. ब. पुरुषोत्तमपंत जोशी कोणालाहि खुलासेवार सांगतील. रोटी खाल्ली, बेटी दिली, तरी देशस्थ तो देशस्थ आणि चित्पावन तो चित्पावन, हा चमत्कार पाहिला की 'पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम' या सूत्राची आठवण तर होतेच; परंतु जातिभेद-निर्मूलनाच्या कामीं सहभोजनें आणि मिश्रविवाह या सुचविल्या जाणाऱ्या दोन रामबाण उपायांवरचा विश्वास सुद्धा डळमळू लागतो. बिचारे दैवज्ञादि विश्वब्राम्हण चित्पावनांशी प्रसंग पाडण्यापूर्वी दहाच्या ऐवजी शंभर अंक अझूनहि मोजतात. ते स्वतःला 'ब्राम्हण' म्हणवितात एवढ्याच सबबीवर पेशवाई सैतानशाहींत त्यांच्यावर झालेल्या जुलमांच्या तिडका त्यांना अझून येत असतात. सारांश, खुद्द ब्राम्हणांत काय किंवा ब्राम्हणेतरांत काय, प्रत्येक जातीची चित्पावना विरुद्ध कशा ना कशा स्वरूपाची कुरकुर आहेच आहे, ही गोष्ट स्पष्ट उघड बोलायला कांही हरकत नाही.... चित्पावनी मनाची तेढ, त्यांच्या विशिष्ट संस्कृतीची आंतली गांठ, त्यांच्या प्रवृत्तीची वर्चस्वलालसेची कावेबाजी इतकी जबरदस्त आहे, की आज रोजच्या व्यवहारांत सुद्धा तिचा ताप प्रत्येक चित्पावनेतर व्यक्तीला भोगावा लागतो. एखाद्या वीस खोल्यांच्या चाळींत चित्पावनाचें एकच का बिऱ्हाड असेना, तेथली एकी बिघडून कधिं ना कधीं लाथाळीची धुसफूस सुरू व्हायचीच. सरकारी किंवा खासगी कचेऱ्यांत सुद्धा हाच प्रकार. क्लब लायब्ऱ्या जिमखाने येथे सुद्धा एकीची बेकी करायला एक चित्पावन व्यक्ती पुरेशी असते. सारांश, हा अनुभव सर्वांना अगदी बिनचूक येत असतो कीं ज्या कामांत चित्पावन भट पडला, तेथें बेकीचे लाथाळें माजून त्या कामाचे तीनतेरा झाले नाहीं असें उदाहरण क्वचित.''

हिंदु समाजांत द्वैताची घाण अनेक रीतीने पसरलेली असतांना नुसता शुद्धी संघटनाचा 'राष्ट्रीय' आक्रोश म्हणजे लोकांची शुद्ध भुलभुलावणी आहे. शुद्धीकार्य करणाऱ्याना आमची अशी सूचना आहे की तुम्हाला शुद्धीच करायची असेल तर प्रथम चित्पावनांच्या मनोवृत्तीच्या शुद्धीचे कार्य हाती घ्या. यांत तुम्ही यश मिळविले, तर हिंदूंच्या संघटनेची निराळी यातायात करायलाच नको.

जावई मिळाले तेहि तसे

ब्राम्हणांच्या भिक्षुकशाहीमुळें हिंदुसमाजाची विघटना झाली व अखेर त्याचा ऱ्हास व अधःपात झाला. हा ऱ्हास व अधःपात टळावा म्हणून ब्राम्हणेतर पक्ष निघाला. सुरवातीला या पक्षाचा कार्यक्रम विवेकवादी होता. त्याच्या ध्येयाची बडबड आकर्षक होती. पण अखेर तोहि ब्राम्हणांप्रमाणेच जातीभेदाच्या पचनीं पडला. 'ब्राम्हणेतर' या नांवाला पुष्कळांचे आक्षेप आहेत. पण नांवांत काय आहे? अभेद भावाने लोकहित साधण्यासाठीं निघालेला पक्ष कांहीं का नाव धारण करीना. ब्राम्हणांना

वगळल्या शिवाय ब्राम्हणेतर सर्व हिंदु जातींचें संघटन होणे नाहीं, असा सिद्धांत अनुभवानें पटल्यावर 'ब्राम्हणेतर' हें नांव आक्षेपार्ह मानण्यात अर्थ नाहीं. अर्थात् हा पक्ष आणि त्यानें आंखलेली कार्याची व्यापक दिशा, याविषयीं प्रबोधनाला मूळपासूनच सहानुभूति वाटत असे व आजहि ती समूळ नष्ट झालेली नाहीं. परंतु, आज हा पक्ष आपल्या लोकहितवादी व्यापक तत्वापासून च्युत झाला असून, क्षुद्र जातीवर्चस्वाच्या स्वार्थानें पूर्ण पछाडलेला दिसत आहे. सन १९२२ सालच्या 'ब्राम्हण ब्राम्हणेतर वादाची चिकित्सा' नामक लेखमालेत ज्या शंका आम्ही प्रदर्शित केल्या होत्या, त्या चालूं १९२७ सालांत अक्षरशः जशाच्या तशा प्रत्ययास आलेल्या आहेत. ब्राम्हणेतर चळवळीचा उगम कितीहि शुद्ध अशा हेतूंतून झालेला असला, तरी त्या चळवळींचे धूरिणत्व ज्या झब्बूंच्या हातीं आहे, त्यांनी त्या हेतूंचा केवळ विचका करून टाकला आहे. अर्थात् हिंदु समाज जगविण्यासाठी आज ज्या संघटनांची अत्यंत आवश्यकता आहे, आणि ज्यांत ब्राम्हणाची नालायकी ठसठशीत सिद्ध झाली आहे, त्या संघटनाच्या कामीं या ब्राम्हणेतर पक्षाचा कांहीं उपयोग होईल, असें सध्यां तर आम्हाला मुळींच वाटत नाहीं. उमरावतीच्या ब्राम्हणेतर काँग्रेसनें तर काय विश्वबंधुत्वाचे मोठेंच नाटक नटविलें आणि ब्राम्हण वगळून साऱ्या दुनियेच्या शाब्दिक संघटनेची एक प्रचंड मोट बांधली. हिंदुमुसलमान द्वैताचा प्रश्न आज गेली अनेक वर्षे धुमसत होता आणि त्याचा व्हायचा तो बांबस्फोट नुकताच दिल्लीस झाला. पण आमचे ब्राम्हणेतर काँग्रेसवाले म्हणजे कसले कसलेले वीरपीर! त्यांनीं जिभेच्या टकळीसरशी शेंडीदाढीची गांठ मारून पार मोकळे झाले. श्रीमंत भास्करराव जाधवांच्या अध्यक्षतेखालीं ताशे चौघडे वाजवून पुण्यास 'ओपनिंग शिरोमणी' झालेल्या ब्राम्हणेतर क्लबानें तर या शेंडीदाढीच्या एकीसाठीं विलक्षण कंबर कसली होती. मग ती एकाकी कां ढिली झाली आणि पुढे हा क्लब अज्ञातवासांत कोठें पडला, देव जाणे. सगळाच नाटकी प्रकार आणि नाचरे चाळे! गेल्या इलेक्शनमध्ये तर ब्राम्हणेतर पक्षाची सगळी गुपितें भर चव्हाट्यावर येऊन, या पक्षाच्या पुढारपणावर स्वतःच्या कपाळीं स्वार्थाचा मळवट फासणाऱ्या बहुतेक सर्व झब्बूत आज परस्पर वैमनस्याची अंतस्थ लाथाळी माजली आहे. ही लाथाळी प्रत्येक झब्बूचा निश्चित स्वार्थ साधला नाहीं म्हणून लागली आहे. तत्व किंवा मतभिन्नतेची लाथाळी ही नव्हे. 'ब्राम्हणेतर पक्षाच्या उमेदवारांचा अपूर्व विजय' म्हणून ब्राम्हणेतरी वर्तमानपत्रे कितीहि आक्रोश करून ओरडली, तरी हा विजय प्रत्येक यशस्वी उमेदवारानें कसकसल्या कसबांनीं कमावला आणि तो त्याला किती महाग पडला, हें एक प्रकट-गौप्य आहे. या बाबतींत अधिक कोणी कांहीं लिहूं बोलू नये हेंच चांगलें. तालुका कमेट्या, जिल्हा कमेट्या, इलेकशन बोर्ड, सेक्रेटरींचे दौरे वगैरे नाटके तर खूप रंगविली. पण जेथें प्रत्येक झब्बू उमेदवार आपापल्या गरम खिशाच्या जोरावर बेफाम आणि कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, तेथें इलेकशनी शिमगा गाजला असाच गाजायचा. झब्बूंची झब्बूगिरी आणि लोकमताची भुलभुलावणी. यंदा बहुतेक सारे ब्राम्हणेतर उमेदवार वीर दिवाणगिरीच्या स्वयंवरावर निशाण रोखून इलेक्शनची मोहीम झुंजत होते. अखेर पक्षाची शिस्तबिस्त पार लाथाडून जनहिताची दूरदृष्टी साफ फोडून, केवळ क्षुद्र स्वार्थाच्या अहमहमिकेनें एकाच्या ऐवजीं तीन नवरदेव लग्नमंडपात घुसले आणि एकमेकांशीच चुरशीची लढत लढूं लागले. यजमान गव्हरनर साहेबांनी या तीन मर्द वीरांना तसेच लढत ठेऊन, सौभाग्याकांक्षिणी दिवाणगिरीचा लाळघोट्या डागदार परांजप्यार्शी पुनर्विवाह उरकून घेतला! हा सर्व ब्राम्हणेतर पक्षांतल्या झब्बू पुढाऱ्यांच्या बेशिस्तीचा व आत्यंतिक स्वार्थाचा परिणाम. यांत सरकारकडे दोष नाहीं आणि भटांकडेहि नाहीं. सर जॉर्ज लॉईड

आणि विद्यमान सर लेस्ली विल्सन या दोघांहि गव्हर्नरांनीं १९२३ सालीं ब्राम्हणेतर पक्षाला बेशिस्तीचा इषारा स्पष्ट शब्दांत दिलेला होता. भटांचें काय! साधेल ते साधेल तेथे साधून घ्यायला ते सिद्धच! असल्या बेशिस्त ब्राम्हणेतर पक्षाकडून जेथें स्वपक्षाचीच झालेली संघटना बिघडली, तेथें त्याच्या हातून (ब्राम्हण वगळूनहि) अखिल ब्राम्हणेतर हिंदु जातींची संघटना होण्याची मुळीच आशा नको. 'इकडे असे, कारटें पिसें, जांवई मिळाले तेहि तसें' हें एका विनोदी गोष्टींतलें सार भुरकण्या पलीकडे हिंदु लोकांना संघटनेची सध्यां तरी कांहीं आशा दिसत नाही.

संघटनेचे मामुली रोदन

एक होता कोल्हा. थंडीचे दिवस. दिवसभर जंगलांत भटकून रात्रीं स्वारी घरीं यायची. थंडीचा कडाका फार. कोल्हीण म्हणाली 'अहो एक लालीमलीची घोंगडी तरी आणा. थंडीनें जीव जाण्याची वेळ आली.' कोल्हा म्हणाला 'उद्या सकाळ उजाडतांच पहिले हेच काम करतो. छे बुवा! भयंकर थंडी!' सकाळ उजाडली. कडकडीत ऊन पडले. कोल्होबा गेले रोजच्या सारखे भटकायला. रात्री परत घरी येतांच घोंगडी पुराण सुरू 'आईची शपथ घेऊन सांगतो कीं उद्या घोंगडी आणल्याशिवाय अन्न घेणार नाहीं.' पुन्हा सकाळ उजाडतांच रोजचाच क्रम आणि रात्री नुसत्या आई बापाच्या शपथा. सगळा हिवाळा गेला, पण घोंगडी काहीं आली नाहीं.

अशीच अवस्था सध्याच्या बेशिस्त ब्राम्हणेतर पार्टीची होऊन बसली आहे. जरा कोठे जबरदस्त थप्पड बसली की लागलाच संघटनेच्या पुराणांना एकदम मोठा जोर येतो. पण पुन्हा पहावे तो जिकडे तिकडे सामसूम! जो तो आपल्या स्वार्थसाधनांत गर्क. इलेकशन जवळ दिसूं लागले कीं पार्टीच्या हिताचे कळवळे पोट पिळवटून पिळवटून धो धो धो धो कोसळूं लागतात. तेवढी वेळ गेली की कोल्होबा आपल्या जंगल भटकींत मग्न! असे प्रकार आज गेली ६ वर्षे चालला आहे. याचा सारांश एवढाच निघतो कीं ब्राम्हणेतर पार्टीचा प्रत्येक झब्बू स्वार्थाच्या मागें मरत आहे. त्याला शिस्त नको आणि संघटनाहि नको. जोंपर्यंत लोक भोळसट आहेत, वाटेल तेव्हा बनलें जाण्याइतकें अजागळ आहेत, त्यांना थापबाजीचे गुंगारे देण्याइतकी आपल्या खिशाची ऊब गरम आहे आणि हाताखालीं आपल्या आत्मस्तोमाचे देव्हारे माजवायला माणसांतल्या सुरवंटाच्या सेनेला खंड नाहीं, तोंपर्यंत हे श्रीमंत झब्बू शिस्तीची मान मोडून संघटनेच्याहि नरड्याला नख देण्यास मुळींच कांकूं करणार नाहींत. आजची ब्राम्हणेतर पार्टी म्हणजे झब्बू लोकांचा सैतानखाना आहे. या झब्बूंची दृष्टी स्वार्थापलीकडे तिळमात्र गेलेली नाहीं. भटांना हासतां हासतां हे स्वतःच नवीन भट बनले आहेत; आणि जनतेला भुलभुलावणी दाखविण्याच्या कामीं तर हे झब्बू पुढारी सवाई दिढी भटगिरी गाजवूं लागले आहेत. अशा लोकांच्या हातून लोकहितवादाची अपेक्षा फक्त मूर्खांनीं आणि बावळटांनीच करावी. गेल्या इलेकशनमध्यें हे ब्राम्हणेतर झब्बू एकमेकांच्याच उरावर बसत होते. या दंगलीत कोणाचे ३६ हजार, तर कोणाचे २५ हजार, तर कोणाचे २० हजार रुपये खर्ची पडल्याच्या वदंता आहेत. या गोष्टी जर

खऱ्या असतील तर लोकांनीं आतां या झब्बूंविषयी कस्सून विचारच करण्याचीच वेळ आली आहे. पैशाच्याच जोरावर इलेकशनें लढवायची तर त्याला पार्टीची तरी बाशिंगे कशाला? शिक्षणप्रसारार्थ कोणी ५ रुपये मागितले तर ज्या झब्बूंचा चेहरा बाप मेल्यासारखा सुतकी बनतो, त्यांनीच इलेकशनच्या शिमग्यांत हजारों रुपयांचें शेण करावें, यावरून लोकांना कांहीच का बोध घेता येणार नाही?

लोकसंग्रह आणि जातिभेद

लोकसंग्रह आणि लोकहितवाद हे शब्द अलीकडे फार सवंग पिकले आहेत. या शब्दांच्या बडबडीने आज पर्यंत लक्षावधि लोक हुरळले आणि हव्या त्या लांडग्यांच्या मागे लागले. लोकहितवादाची खरीखुरी आच जर एखाद्या तरी ब्राम्हण किंवा ब्राम्हणेतर पुढाऱ्याच्या हृदयाला लागलेली असती तर आज महाराष्ट्राची परिस्थिति आहे त्यापेक्षा खास निराळी असती. केवळ नुसत्या तोंडच्या वल्गनांवरच सर्व कारभार चालते, तर आणखी काय हवें होतें? ओठांत हवे ते विचार उमटले तरी पोटांत जर त्यांचीं मुळेंच गेलेली नसली, तर कांहीहि कार्य घडून येणे शक्य नाहीं. महाराष्ट्रांत बोकाळलेल्या लेखाळ वाचाळपणाच्या शतांशान जरी लोकहितवादाची तिडीक पुढारीबुवांच्या आंतड्यांत झणाणती, तरी देखिल आज लोकसंग्रहाच्या बाबतीत महाराष्ट्राची संघटना पुष्कळच थरारलेली दिसती. पण प्रत्येक लोकसंग्रही प्रयत्नांत आमचा कडवा जातिभेद आजपर्यंत आडवा येऊन त्याने लोकहितवादाची माती केली आहे, आज करीत आहे आणि पुढें करीत राहील. थोडक्यात समारोप करायचा म्हणजे ब्राम्हण झाले काय किंवा ब्राम्हणेतर झाले काय, लोकहितवादाची त्यांनी कितीहि बडबड केली, तरी जातिस्वार्थाच्या संकुचित वृत्तीमुळें लोकसंग्रहाची त्यांची नालायकी आज स्पष्ट सिद्ध होऊन बसली आहे. ब्राम्हणी पुढाऱ्यांचा लोकहितवाद जर शंभर नंबरी कळकळीचा, व्यापक देशहितबुद्धीचा आणि जातिवर्चस्वरहित असा असता, तर ब्राम्हणेतर पक्षाचा जन्मच झाला नसता. ब्राम्हणेतर पक्षाचा जन्म म्हणजे ब्राम्हण पक्षाच्या जातिवर्चस्व बुद्धीचा जाहीर निषेधच होय. अर्थात् ज्या कुबुद्धीचा निषेध करण्यासाठीच ब्राम्हणेतर पक्ष काळाच्या उदरी जन्म पावला, तीच कुबुद्धी त्याच पक्षाच्या पिंडाला कधिं काळीं भोवेल, अशी शंका प्रदर्शित करणारा माणूस १० वर्षांपूर्वी मूर्ख किंवा माथेफिरू ठरला असता. परंतु पिंडीं तें ब्रम्हांडीं या निसर्गसिद्ध नियमानें ब्राम्हणेतर पक्षाची जातिवर्चस्वाची गुप्त लालसा आज अनेक रीतीनें व्यक्त होऊन, तिच्यामुळें या पक्षाच्या पुढाऱ्यांतच लाथाळी लागलेली आहे. या लाथाळीचीं चिन्हें आम्हाला पूर्वीपासूनच दिसत होती व अनेक वेळां आम्ही त्याबद्दल प्रत्यक्ष उदाहरणें देऊन स्पष्ट सूचनाहि केल्या होत्या. मराठा-मराठेतर भेद माजला तर भटांना तो पाहिजेच आहे; पण हा भेद भट माजवीत आहेत, या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हा भेद ब्राम्हणेतर पक्षाच्या नांवाखाली बहुतेक सर्व मराठे पुढारी माजवीत आहेत, असें आम्ही स्वानुभवाने सांगतो. एखादा पुढारी अपवाद निघालाच तर तो केवळ अपवादच म्हणून औषधाला उपयोगी पडला तर पडेल. मराठा-मराठेतर भेद मुळीच नसता, आणि ब्राम्हणेतर पक्षाचें धूरिणत्व ज्यांनीं आपल्या हाती ठेविले आहे, त्यांना जर

लोकसंग्रहाची खरी कळकळ असती, तर आज या पुढाऱ्यांच्या फलटणीत फक्त एकरकमी मराठेच आढळले नसते. नुसत्या विधानांची तोंडपुर्शी करण्यासाठी एखादा पारशी, एखादा शिंपी किंवा एखादा भंडारी पुढें करून या आक्षेपाचें खंडण होणार नाहीं. असलीं विधानें आणि असले पुरावे भटकंपूकडून आम्ही शेंकडो वेळां ऐकले आहेत आणि पाहिलेहि आहेत. त्यांनीं आम्हांला तरी फसविण्याचा कोणी प्रयत्न करू नये. ब्राम्हण वर्ग वगळल्यावर ब्राम्हणेतरांत काय थोड्या लहान मोठ्या जाती आहेत? त्यांची सक्रीय सहानुभूति मिळविण्याचा ब्राम्हणेंतरी झब्बूंनी आजपर्यंत कितीसा प्रयत्न केला आहे? मुळींच काही नाही. 'लोकहितवादी' झब्बूंची ही 'लोकसंग्रही' पॉलिसी मोठी विचार करण्यासारखी आहे. लोकसंग्रहाचा विवेक राहिला, पण चळवळ नियंत्रणाची तरी अशी काय शिस्त या झब्बूंनीं राखली आहे? हवा तो उठतो, वाटेल ते लिहितो बोलतो, परिषदांचा धुडगूस घालतो, डेप्युटेशने बनवितो आणि अखिल ब्राम्हणेतरांच्या भाडोत्री प्रतिनिधित्वावर हवें तें मागतो व बरळतो आणि भटी 'उष्ट्या युक्त्या' लढवून स्वतःचा तळीराम गार करतो आणि या सगळ्या उचापती ब्राम्हणेतर पार्टीच्या नांवाखाली खुशाल पचवितो! कोणी हटकता नाहीं कीं दटकता नाहीं. झब्बू म्हणतील ती पूर्व दिशा. ना कसलें नियंत्रण, ना नियम, ना शिस्त! पूर्वी लोकमत लोकमत म्हणून भटांनी आपल्या स्वार्थाचा धुडगूस घातला; आता हे ब्राम्हणेतरी झब्बू तोच लपंडाव खेळत आहेत. कोणीकडूनहि विचार केला, तरी जनता मात्र होती तशीच आहे त्या ठिकाणीं आणि पुढारी मात्र गोलांट्या उड्यांत दंग! आम्हाला तर सध्यांच्या ब्राम्हणेतर पार्टीची अवस्था म्हणजे टिळकी चळवळीची सुधारलेली आवृत्ति दिसते. टिळक-पक्षाची ब्राम्हणी चळवळ निदान राजकारणी क्षेत्रांत तरी सरकारच्या पचनीं पडली नाही. उलट, आज राजकारणाच्या क्षेत्रांत जे वाग्लेखनस्वातंत्र्य मिळालेलें आहे, त्याला याच पक्षाची तपश्चर्या कामी आलेली आहे. ब्राम्हणेतर पार्टी तर उघडउघड सरकारच्या कृपाकटाक्षासाठीं धडपडणारी! या पार्टीचा एकूण एक झब्बू सरकारी अधिकाऱ्यांची थुंकी झेलणारा! वर्तमानपत्रांतून मारे मोठा स्वतंत्र वृतीचा आव आणावयाचा, ण गव्हर्नमेंट हाऊसचे उंबरठे झिजवणाऱ्या आपल्या झब्बू पुढाऱ्यांना पायबंद लावणारी एखादी मध्यवर्ति शक्ति केली आहे का या पार्टीने निर्माण? जो पक्ष सदा न् कदा सरकारी अधिकाऱ्यांशी मिळतें गिळतें घेणारा, तो जनतेच्या कैवाराला अपात्रच नव्हे तर कुपात्र समजावा. मग तो ब्राम्हण पक्ष असो वा ब्राम्हणेतर पक्ष असो.

बायकांनीच थंड केले पाहिजे

जातिभेदाची दाट कुंपणें किंवा वॉटरटाईट कंपार्टमेंटें पडल्यामुळे हिंदु समाजांत माणसांची माणुसकी उकीरड्याच्या किंवा रद्दीच्या भावाने आज कोणी ओळखीत नाहीं. त्यांतल्या त्यांत या कुंपणानी स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक भावना व हक्क इतके दडपून टाकले आहेत आणि या दडपणाखाली हजारो तरूण तरुणीचीं आयुष्यें मातीमोल होत आहेत, कीं या सर्व प्रकारांचें तात्काळ निर्मूलन करायला सामाजिक क्रांतीच्या बंडाचा झेंडा हिंदु तरूण संघ अझून कसा उभारीत नाहीं, याचेंच मोठें आश्चर्य वाटतें. एरवीं वक्तृत्वोत्तेजक सभांत आणि लेखांत सामाजिक सुधारणा अशी करावी न् तशी करावी,

म्हणून वाचाळपणा करणारे लोकच, प्रत्यक्ष कृतीची वेळ आली की, जीर्णमतवादी शास्त्री पुराणिकांचे बाप बनतात! हुंड्याच्या भाडीचाचप्रघात घ्या. मोठमोठे पदवीधर जात-झब्बू सामाजिक परिषदेत हुंडानिषेधावर तासतास लेक्चरे झोडतात; पण वेळ आली कीं हुंड्याचे गाडाभर शेण खातात. हाच प्रकार येथून तेथून सर्व सामाजिक रूढींबद्दल. बोलायला सगळे, करायला कोणी नाही! प्रत्येक हिंदु जात इतक्या सामाजिक रूढींनीं नासून कुझून गेलेली आहे कीं प्रत्येक रूढीचा नायनाट करायला निदान एकेक पिढी बिनतक्रार बळी पडली पाहिजे. 'संघटना करा, शुद्धी करा', हे सध्या बोकाळलेले शब्द फार सहज बोलतां येतात आणि ते आज प्रत्येक हिंदु बरळतहि आहे. पण प्रत्येकाने आपापल्या जातींतील निदान एकाच रूढीचें विध्वंसन कार्य हातीं घेऊन पहावे म्हणजे हिंदु-संघटन ही चीज किती भयंकर आहे याची थोडीशी तरी कल्पना होईल. जाति भेद नको, तो मोडला पाहिजे, असें म्हणतात सगळे पण प्रसंग आला की बेटी देण्याची गोष्टच राहो, पण रोटी खावी की न खावी हाच मुळीं वादाचा जोर वाढतो, आज जातिभेदाच्या टीचटीचभर कोंडाळ्यांमुळे तरूण तरुणींच्या वधुवरशोधनाचा भयंकर कोंडमारा झालेला आहे. बळजबरीचे असंतुष्ट विवाह सर्रास लागत आहेत. आसंमत वैधव्याचा प्रश्न माजी पडून, असंमत पाणिदानाची प्रौढ कुमारिकांवर प्रतिष्ठित बळजबरी होत असते. हुंडा आणि देज या दोन शायलॉकी घाणेरड्या व्यसनांमुळें विषमविवाह म्हणजे हिंदु तरूण तरुणींचा जन्मप्राप्त झीजिया करच होऊन बसला आहे या असह्य परिस्थितीची पाळेमुळें खणून काढण्याच्या कामीं पुरुष सुधारकांची नालायकी २५ वर्षाच्या अनुभवाने स्पष्ट सिद्ध झालेली आहे. आतां बायकांनीच पुढें सरसाऊन बंड केल्याशिवाय, हिंदू समाज-सुधारणा व्हायची नाहीं आणि संघटनहि होणें शक्य नाहीं. या विषयावर तिसऱ्या वर्षी 'बायकांचे बंड' आणि 'रक्तशुद्धीच्या कल्पनेचें भूत' नामक अग्रलेख मालेत आम्ही स्पष्ट व विस्तृत विचार प्रगट केले आहेत. पुनर्वाचन मननार्थ वाचकांचें लक्ष त्यांकडे आम्हीं आज वेधीत आहों. आपल्या निसर्गप्राप्त हक्कांसाठी आणि भावनांच्या पावित्र्य-संरक्षणासाठीं तरूण कुमारिका व विधवाच जर रूढींच्या नरड्यावर पाय देण्यास सिद्ध होतील, तर हिंदु समाज-सुधारणेचा प्रश्न चुटकीसरसा सुटेल, ही आमची अगदी बालंबाल खात्री आहे.

ब्राम्हण-प्रभु संमिश्र विवाह

जातिभेदाचे पोलादी तट पायाखालीं तुडविण्याचें पुण्यकार्य आजपर्यंत ज्या कांहीं थोड्या हिंदु कुमारिकांनीं केलें, त्यांत नुकतीच कुमारी डॉ. हिराबाई त्रिलोकेकर या पाठारे प्रभु ज्ञातीय सत्यभामेनें मोठी कौतुकास्पद भर घातली. कु. हिराबाई यांचें पाणिग्रहण श्रीयुत जोशी (मुंबई फिनॅन्स डिपार्टमेंटचे असि. सेक्रेटरी) यांनी केले. वर वधु दोघेहि प्रौढ, सुविद्य, सुसंस्कृत आणि विवेकवादी. दोघांचीहि जीवनकर्तव्याची दृष्टी उत्तम विकास पावलेली. असे हे दोघे समानशील विवेकी जीव एकमेकांच्या सानिध्यांत येतांच, त्याचा परिपाक अखेर अभिनंदनीय अशा ब्राम्हण-प्रभु संमिश्र विवाहांत झाला. फार

उत्तम गोष्ट घडली. प्रबोधन हर्षभराने या नवदांपत्याला अनेक उत्तमोत्तम आशीर्वाद देत आहे. भगवान श्रीकृष्ण त्यांचा संसार व जनसंसार सुखपूर्ण व यशपूर्ण करो. जातिभेद नरकासुराला ठार मारतील, तर त्या आमच्या सत्यभामा भगिनीच! हा मान त्यांचाच आहे. या कामीं पुरुषांची नालायकी फार प्राचीन काळापासून कुप्रसिद्ध आहे. परंतु हा मिश्रविवाह होताच पाठारे प्रभु जातींत मोठा हाहाकार उडाला. ही एक अत्यंत अल्पसंख्य जाति आहे. हुंड्याच्या भयंकर रूढीनें या जातीचे सामाजिक स्थैर्य आणि प्रगति जवळ जवळ संशयास्पद स्थितीला येऊन भिडलेली आहे. सामान्यतः स्त्री पुरुष संस्कृतीने बरेच पुढारलेले दिसतात. परंतु मूलतःच ही जात संख्येने अत्यल्प असल्यामुळें, मुंबई बेटापलीकडे यांचे अस्तित्व फारसें कोणाला भासत नाही व दिसतहि नाहीं इतर जाती प्रमाणेंच या जातीची सांपत्तिक स्थिति आतां पूर्वीप्रमाणें सोन्याच्या धुराची राहिलेली नाहीं. परंतु हुंड्यासाठी मात्र शेराच्या मापाने सोनें मोजल्याशिवाय कुमारिकांच्या विवाहाचा प्रश्न सुटणें अत्यंत कष्टप्रद झाल्यामुळें, या चिमुकल्या परंतु संस्कृत जातीची टीचभर कोंडाळी विवाहेच्छु तरूण तरुणींना गेलीं अनेक वर्षे फार तापदायक होऊन बसली आहे. कायस्थ प्रभूंचा हुंडा शेंकड्यावर भडकतो, तर पाठारे प्रभूंचा शेरशेर सोन्याच्या लगड्यांवर गडगडतो. एरवी जातिभेदावर, हुंड्यावर, मिश्रविवाहावर निषेधाची व्याख्यानें झोडणारे मर्द या दोनहि जातींत हवे तेवढे मी मी म्हणून पुढें येतात. तेवढ्यावरून या हुंडाळू जातींवर त्यांच्या बाह्य भपक्या झपक्यावर प्रगमनशीलतेचा आरोप करणें बरेच उतावीळपणाचें ठरेल. हा त्रिलोकेकर-जोशी मिश्र-विवाह होताच मुंबईच्या 'प्रगमनशील' पाठारे प्रभु ज्ञातींत केवढा मोठा उल्कापात झाला, त्याची 'सुबोधपत्रिका' कार सुबोध भाषेत (३०-१-२७) अशी माहिती देतातः-

''थोड्या दिवसांपूर्वी येथील फायन्यान्स डिपार्टमेंटचे असिस्टंट सेक्रेटरी रा. रा. जोशी यांचा हिराबाई त्रिलोकेकर ह्यांच्याशी जो विवाह झाला तो झाल्यानंतर मुंबईच्या पाठारे प्रभु ज्ञातीत बरीच खळबळ उडून राहिली होती. पाठारे प्रभु ज्ञातीतील पुरुषांनी आपल्या ज्ञातीच्या बाहेर विवाह केल्याची जरी कांहीं उदारणें आहेत, तरी एका सुशिक्षित तरुण मुलांनें, मातापिता व इतर वडील माणसे ह्यांची संमति नसतांना, त्यांच्या इच्छेविरुद्ध, परजातींतील गृहस्थाशीं विवाह केला, ही गोष्ट आपल्या जातीस कमीपणा आणणारी आहे असे वाटून हा विवाह सर्वत्र टीकेचा विषय होऊन बसला. प्रभुज्ञातीच्या उन्नतीसाठीं प्रसिद्ध होणाऱ्या मासिकांत विवाहाविरुद्ध लेख आले. एका पदवीधर लेखकाला पाठारे प्रभूच्या पवित्र रक्तांत आतां भेसळ होणार म्हणून अत्यंत खेद झाला! दुसरें एक पदवीधर हिराबाईंनी रवज्ञातींतील कोणी लायक तरुण विवाहास पुढें आला नाहीं म्हणून परजातींतील वराची निवड केली, अशी कल्पना करून आपली समजूत करून घेतली व शिक्षणाचा जसजसा प्रसार होत जाणार तसतसे अशा प्रकारचे विवाह अधिक प्रमाणावर होणार असें भाकित केलें. तथापि झालेला विवाह ज्ञातीच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत अनिष्ट आहे असाही शेरा मारला.''

इतकी ही झालेली कावकाव काय सुचविते? वर श्री. जोशी यांच्या अफाट ब्राम्हण जातींत जरी या मिश्र-विवाहानें यत्किंचितहि गडबड उडविली नाही, तरी अत्यल्पसंख्य पाठारे प्रभु ज्ञातींत मात्र विचारांदोलनाचा, निषेधाचा आणि जाति-अस्तित्वाच्या चिंतेचा बॅकबे खवळला! याची कारणमीमांसा बरीच विस्तृत होईल. परंतु एक मात्र खरें की जातिभेद मोडण्याच्या कामी लहान लहान जातीनीच मोठ्या जातींत प्रथम समरस व्हावे, या सिद्धांताला लहान जातींचीच नाखुषी सिद्ध होत आहे. आम्हाला असें वाटते

कीं सामाजिक नानाविध अविवेकी रूढींनी ज्या चिमुकल्या जातीतील तरूण तरुणींच्या निसर्गदत्त हक्कांचा कोंडमारा होत असेल, त्यांनी जातीच्या पोलादी तटबंदीचा सौ. हिराबाई प्रमाणेच निश्चयाची धडाडी मारून चकणाचूर करावा. उदाहरणार्थ, हुंड्याच्या राक्षसी रूढीमुळें कुमारिकांच्या विवाहाविषयीं निराश झालेल्या कायस्थ प्रभू बापांनी पालकांनीं किंवा त्या प्रौढ कुमारिकांनीच खुशाल सौ. हिराबाईंचें अनुकरण करावें. विधवांनीं सुद्धा पुनर्विवाहार्थ जातीच्या कोंडाळ्याची पर्वा ठेऊं नये. जाति कृत्रिम आहेत. प्रेम निसर्गदत्त आहे. प्रेमाची आवडनिवड जातीच्या चरकांत आजपर्यंत चिरडली तेवढी पुरे!

□□□

लेख

केमाल पाशाची सामाजिक सुधारणा

सामाजिक आणि धार्मिक सुधारणेचे प्रश्न हिंदु समाजांतील सर्व लहान मोठ्या जातींपुढे गेलें अर्धशतक पडले आहेत. सामाजिक परिषदा आणि धर्मपरिषदांचे वार्षिक मामुली लळीतांचे जलसे चालूंच आहेत. वृत्तपत्रें, व्याख्यानें, नाटकें, प्रवचनें इत्यादि अनेक मार्गांनीं गुलाम हिंदू आत्म-प्रबोधनाचे प्रयत्न करीत आहेत. परंतु कोणत्याहि प्रयत्नाला यश नाहीं. तोंडाची नुसती वटवट मात्र भरंसाट वाढली आहे, पण प्रत्यक्ष कृति कोठेंच कांहीं. हिंदु समाज ५० वर्षांपूर्वी जसा जेथें होता, तसाच तेथेंच आहे. जपान राष्ट्रानें विद्यमान हिंदु पिढीच्या डोळ्यादेखत अवघ्या ३०-३५ वर्षांच्या अवधींत आपला सामाजिक पुनर्घटनेचा एवढा धडाडीचा प्रयोग केला कीं आज चिमुकला जपान म्हणजे साऱ्या जगाच्या साम्राज्यविषयक धडकीचा जबरदस्त मामला होऊन बसला आहे. तुर्कस्थानची १० वर्षांपूर्वी काय स्थिति होती? महायुद्ध संपेपर्यंत (१९१९ पर्यंत) तुर्कस्थान म्हणजे सामाजिक धार्मिक जीर्णमतवादाला बळी पडलेला आडदांड लोकांचा एक देश, यापेक्षां विशेष कांहींच कोणाची कल्पना नव्हती. तुर्कस्थानांत प्रत्यक्ष राहून तेथली परिस्थिति अभ्यासणाऱ्या लाला हरदयाळ सारख्या चाणाक्ष व चिकित्सक गृहस्थाला सुद्धां रानटीपणापेक्षां तुर्कस्थानांत विशेष कांहींच दिसून आलें नव्हतें. महायुद्धोत्तर काळीं मुस्तफा केमाल पाशाचा उदय झाला आणि त्यानें कलम-समशेरीच्या जोरावर तुर्कस्थानच्या सर्वांगीण पुनर्घटनेचा प्रश्न इतक्या सफाईत सोडविला कीं अवघ्या ३-४ वर्षांच्या अवधींत तुर्कस्थान म्हणजे प्रति-जपान होऊन बसलें आहे. केमाल पाशानें आपल्या तुर्की पुनर्घटनेचा पहिलाच प्रयोग खिलापतीच्या आमुलाग्र विध्वंसनावर करून, ही धार्मिक झब्बूशाही पार रसातळाला नेऊन गाडली. हिंदु समाजसुधारक मात्र अझून जगद्गुरूंची अंडीं उबवीत आहेत व हिंदी मुसलमान खिलापतींवर माथीं फोडीत आहेत ! त्यानंतर समाज धर्म नीति रीतिरिवाज शिक्षण वगैरे अनेक क्षेत्रांत केमालनें शेंकडों सुधारणा कायद्याच्या जोरावर घडवून आणल्या आहेत. ६ वर्षांपूर्वी तुर्कस्थानांत भटकलेल्या प्रवाशांनाहि आजचें त्याचें बदललेलें अंतर्बाह्य स्वरूप पाहून, 'तुर्कस्थान तो हाच काय?' असा मोठा अचंब्याचा प्रश्न पडतो. एकपत्नि व्रताचा कायदा करून केमालनें साऱ्या तुर्कस्थानांतले जनानखाने ओस पाडले आहेत. विवाहाविषयींहि अनेक विवेकी परंतु कडक कायदे अंमलांत आणले आहेत. स्त्रियांचा

बुरखा बेकायदेशीर ठरवून, चांदतारा खुणेची तुर्की फेज टोपी कायद्यानें मना करून, सर्व तुर्कांच्या माथ्यावर युरपियन हॅट बसविली आहे. युरोपियन धर्तीचे नाच सुरू करून, स्त्रिपुरुषांच्या संमेलनाच्या स्वातंत्र्यावरील जुनें पुराणें दडपण पार झुगारून दिलें आहे. असल्या या लोकोत्तर राष्ट्र-सुधारकाची मुलाखत एडीबे टेरिंग्टन नांवाच्या बाईनें नुकतीच घेतली. या बाई वृत्तपत्रकार असून त्यांचा जन्म इंग्लिश-टर्किश आईबापांच्या पोटीं झालेला आहे.

तुर्कानीं हॅट टोप्याच घातल्या पाहिजेत म्हणून मी जुन्या फेज टोपीच्या अभिमानी लोकांना कां फांशी देतों?

आणि बुरखा वापरणाऱ्या स्त्रियांना कां शिक्षा ठोठावतो?

याविषयीं केमालपाशाचे विचार या मुलाखतींत बाहेर पडले. ते त्याच्याच शब्दांत प्रबोधनाच्या वाचकांना आत्मप्रबोधनार्थ येथें नमूद करीत आहों.

मुस्तफा केमाल पाशाचा खुलासा

''तुर्की लोकशाहीच्या कायद्यान्वयें जी तुर्की स्त्री या पुढें बुरखा किंवा पडता वापरील, तिला कडक शिक्षा ठोठावण्यांत येईल. आधुनिक पद्धति आणि प्रागतिक कल्पनांचा आम्ही प्रस्ताव सुरू केल्यावाचून, या नवमतवादाला तुर्की पुरुषांपेक्षा तुर्की स्त्रियांपासूनच आम्हांला फार विरोध झाला. आमच्या राजधानींत स्वातंत्र्याच्या आणि प्रगतीच्या कार्याला बहुतेक सर्व स्त्रियांनीं, कांही बाबतींत तर पुरुषांपेक्षांहि अधिक उत्सुकतेनें मदत केली. परंतु कांहीं गांवांत, खेड्यांत, विशेषत: शेतकरी वर्गाच्या स्त्रियांनीं आमच्या नवमतवादी कार्याला पुष्कळच अडथळे आणले. स्त्रियांविरुद्ध कसलाहि कडक उपाय योजण्यापूर्वी पुष्कळ दिवस मी अगदी शांतपणा पत्करला होता. ऐनताव आणि ईशान्य प्रांतांतल्या कांहीं लोकांनीं तर फेज टोप्या ऐवजीं युरपियन हॅट्स वापरण्याच्या कायद्याला उघड उघड विरोध दाखविला.

तुर्की बायकांचा विरोध

''तुर्की लोकशाहीला मेल्या गेल्या भूतकाळाची व जुन्या पुराण्या रीतरिवाजाची मुळींच पर्वा नाहीं, त्यांचा कसलाहि संबंध तिला यापुढें साफ अमान्य आहे, आणि पाश्चिमात्य देशांत सुधारणेच्या जेवढ्या म्हणून गोष्टी आहेत त्या सर्वांचा तुर्की राष्ट्रांत परिपाक करण्याचा आमचा कृतसंकल्प झालेला आहे, हें या मगजफाट जीर्णमतवादी पिसाटांच्या मनावर बिंबविण्यासाठीं आम्हाला विरोधकांच्या पांच पुढाऱ्यांना फांसावर चढवावें लागले. आतां या तुर्कस्थानांत जुनी तांबडी फेज टोपी वापरणारे शंभर लोक सुद्धां तुम्हाला औषधाला मिळायचे नाहींत. स्त्रियांच्या बाबतींत बऱ्याच अडचणी उत्पन्न झाल्या. प्रथम आम्ही फार जोराची चळवळ केली. त्यामुळें थोडेफार पाऊल पुढें पडलें. नंतर आम्ही उदाहरणें दाखवून लोकमत वळविण्याचा प्रयत्न केला. दूरदूरच्या खेड्यांतून आणि गावांतून कांहीं तुर्की तरुणींना बुरखा टाकून देण्यास उद्युक्त केले. शेतकरी वर्गाकडून त्या तरुणींचीं निंदा कुचेष्टा होऊं लागली. कांही ठिकाणीं तर आमच्या या सुधारणा-प्रसारक तरुणींवर कांहीं माथेफिरू लोकांनीं हात टाकायलाहि कमी केलें नाही.

''कांही तरी शिरस्त्राण घालायचें म्हणून जर तुर्की लोक फेज टोपी घालते, तर कांही हरकत नव्हती. आहे कांहीं तरी एक भिकार अभिरुची म्हणून तिकडे दुर्लक्षहि केलें असतें. पण फेज टोपी म्हणजे 'पवित्र.' ती प्रत्येक मुसलमानानें व तुर्कानें घातलीच पाहिजे. तिचा प्राणान्तीहि त्याग करतां कामां नये. या खुळसट समजुतीला आम्ही कायद्यानेंच गचांडी दिली. कांहीं कांहीं खेड्यांत तर हॅट वापरणारांवर फ

जवाल्यांनीं हल्लेहि केले. कोणतें शिरस्त्राण उत्तम, प्रश्नाला या त्याचें 'हॅट', हेंच उत्तर साऱ्या जगाला आतां पटलेलें आहे.

''बुरख्यावाला बाईला मी मोठी सद्‌गुणांची आणि विनयाची अवतारी पुतळी असें वाटतें आणि बिनबुरख्याची बाई म्हणजे जिच्या दृष्टीनें उनाड वेसवा. बायकांचा बुरखा म्हणजे एक निवळ ढोंगधत्तुरा बनला आहे. मी त्याला टरटरा फाडून रसातळाला नेईन. आरोग्याच्या दृष्टीनेंहि बुरखा फार घाणेरडा. त्यामुळें तांबूस लालबुंद रंगाच्या फारच थोड्यघा तुर्की स्त्रिया दृष्टीस पडतात शतकानुशतकें बुरख्याआड चेहरा दडल्यामुळें त्यांचा नूर फिकट निरतेज असा बनला आहे.

''बुरख्याला बेकायदेशीर ठरविण्यांत माझा दुसरा उद्देश म्हणजे नीतिमत्ता. आपल्या घरांतील किंवा क्रिश्चन स्त्रियांपलीकडे आन्टोलियांत पुरुषांना कोणत्याहि स्त्रीचा चेहरा कधीं दृष्टीसच पडावयाचा नाहीं. तुर्कस्थानच्या युरोपियन वसतीच्या प्रांतांत मी राहिलों आहे. तेथें तुर्क पुरुषांना स्त्री जातीचा चेहरा थोड्या अधिक प्रमाणावर दृष्टीस पडतो. पाश्चिमात्य देशांत तर हरघडी स्त्रीपुरुष एकमेकांना पहातात. माझ्या पहाण्यांत असें आलें आहे कीं या तीन ठिकाणच्या तुर्क लोकांपैकीं आन्टोलिया प्रांतांतले लोक प्रवृत्तीनें विशेष विषयलंपट असतात. याचें कारण ते स्त्रियांच्या निकट साहचर्यांत कधीं येऊंच शकत नाहींत.

''बुरख्या विरुद्ध माझा तिसरा आक्षेप म्हणजे बुरख्यामागें आजपर्यंत पुष्कळ गुन्हेगार लोक दडून बसत. हजारों गुन्हेगार लोक बायकांप्रमाणे बुरखा पांघरून बोलबोलता बेपत्ता होत. बुरखा धेतला कीं बाई बुवाचा कांहीं पत्ताच लागत नसे. गेल्या कित्येक वर्षांत बुरख्यांत दडलेले कित्येक बिलंद टगे आम्ही हुडकून काढले आहेत. तुर्की लोकशाहीच्या तीन वर्षांच्या अमदानींत बायकांच्या बुरख्याआड दडलेले चार हजार बिलंद गुन्हेगार आम्ही उघडकीस आणले आहेत.

''आतां तुर्कस्थानांत बुरखा वापरणारी बाई आढळतांच तिच्यावर गैरवागणुकीचा [misconduct] आरोप लागू होऊन, तिला दण्ड ठोठावण्यांत येतो. दुसरा, दुराचाराचा आरोप होऊन कैद किंवा दण्ड अथवा दोनहि अशी शिक्षा होते; किंवा आततायी अत्याचारा [Felony] च्या आरोपावरून त्या गुन्हेगार बाईला फांशीचीहि शिक्षा ठोठावण्यांत येते.''

हिंदुस्थानांत केमालच्या तोडीचा राष्ट्रपुरुष जर पूर्वी कधिं काळीं निर्माण झाला असता, तर बाराबंदी बंडी, श्रावणीचें गोमुत्र शेण, टाळक्यावरील शेंडीचें प्रश्नचिन्ह, ती पागडी, तें निष्कारण उपरणें, तें साप्ताहिक विधवावपन, तें जानवें, ते दर्भ इत्यादि लाखों 'पवित्र' वस्तूंवर जगण्याचा हिंदूंवरील वेदोक्त प्रसंग खास टळला असता ! भविष्य काळाकडे दृष्टी ठेऊन, जिवंत राष्ट्रभिमानानें, राष्ट्रारच्या आत्माचें कळकळीनें प्रबोधन करणारा एकच राष्ट्रपुरुष निर्माण झाला कीं तो राष्ट्राला किती झटकन् कार्यक्षम करूं शकतो, हें वर्तमान तुर्कस्थान आणि केमालपाशा यांच्या चालूं दिग्विजयानें चांगलें प्रत्ययास येते. सध्यां केमालपाशानें सेक्शुऑलजीचा व सुप्रजाजनांचा प्रश्न हातीं घेतला असून, येत्या दहा वर्षांत 'साऱ्या जगाला भारी' अशी अजिंक्य तुर्काची 'रेस' पैदा करण्याचा त्याचा विचार आहे. यासाठीं कुमार, कुमारी, विधवा इत्यादि सर्व स्त्रिपुरुषांच्या वैवाहिक संमीश्रणाचे नवीन खातें व कायदे अंमलांत येऊं लागले आहेत. केमाल कमाल करीत आहे, यांत शंका नाहीं.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

मुरली-गीत

लेखक- रामकृष्ण वेडू रंगारी, शेंदुर्णी, पूर्व खानदेश. किंमत १० आणे

वीणाकाव्यमोलेचे हे १ लें पुष्प आहे. यांत निरनिराळ्या सात्विक व प्रबोधक विषयांवर लहान लहान ४१ कविता आहेत. कविता सरळ व सुबोध असून लहान विद्यार्थ्यांना मुखोद्गत करण्यालायक आहेत. पुस्तकाची छपाई बांधणीहि आकर्षक आहे. पुस्तक शाळाखात्याने मंजूर करण्यासारखे आहे.

गीत गुंजारव

कवयित्री श्रीमती लक्ष्मीबाई चितळे, सातारा रोड, प्रकाशक डी. के. बोकील, बीए. एल्टी. क्रॅडॉक टौन, नागपूर. किंमत १० आणे.

या कवयित्रीच्या 'कैवल्य गुंजारव' पुस्तकाचा ३ ऱ्या वर्षी वाचकांना परिचय करून दिलेला स्मरणांत असेलच. प्रस्तुत पुस्तकांत १०४ विविध विषयांवर लहान मोठी नवीन नवीन चालीवरचीं संगीत पदें आहेत. पदें रसाळ नसली, तरी निरस नाहीत. विशेष गोड नसली, तरी कडु आंबट मात्र खास नाहींत. प्रत्येक पदांत कांही तरी पारमार्थिक वेदान्ताचें एखादें तत्व गोंवण्याचा प्रयत्न केला आहे. गुरुभक्ती व गुरुसेवेवर बरीच झोड आहे. विषय जसजसे किंवा स्फुरले तसतसे पुस्तकांत ठेवले आहेत. त्या न् त्याच कल्पना, ती न् तीच विरक्ती आणि तो न् तोच गुरुमहिमा, यामुळे काव्यवाचनाचें कामसुद्धां कंटाळवाणेंच होते. शिवाय कविता-लेखनाचा धडाकाच सुरूं केल्यावर निर्माण होणाऱ्या सर्वच कविता सरस कशा निपजणार?

तीन शहाणे

ले. - पं. मा. कामतकर, बीए. प्रकाशक - वाग्भूषण प्रकाशक मंडळी, ३०२ नारायण पेठ, पुणे शहर, किंमत ८ आणे.

या पुस्तकांत ९ विनोदी भाषेची प्रकरणे व १ प्रहसन छापलेली आहेत. विनोदी वाङ्मय निर्माण करण्याकडे हल्लीं उमेदवार लेखकांची प्रवृत्ति बरीच वळत आहे. या दिशेने हा प्रयत्न बराच यशस्वी दिसतो. लेखकाची भाषेची शैलीहि सभ्य व प्रौढ आहे. अतिशयोक्तीच्या फोडणीशिवाय विनोदाची

पाकक्रिया खमंग बनत नाही. तथापि अतिशयोक्ती म्हणजे शुद्ध पाचकळपणा नव्हे, हें श्री. कामतकरांना उत्तम पटलेले दिसते. म्हणूनच त्यांचे हे विनोदी लेखांचे पुस्तक वाङ्मयप्रेमी स्त्रीपुरुषांच्या आदराला पात्र होण्यासारखे आहे.

उत्तर कोंकणाचा प्राचीन् इतिहास

ले. - रा. ब. पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी, पी. एचडी. इत्यादि प्रकाशक - रामराव पुरुषोत्तम जोशी, बीए. ऑनररी फेलो, विल्सन कॉलेज, मुंबई. किं. १ रुपया.

उत्तर कोंकणांत हिंदु मुसलमान पोर्तुगीज मराठे व इंग्रज या भिन्नभिन्न राज्यसत्तांच्या अंमदानीत शुक्ल यजुर्वेदी ब्राम्हण वर्गाचा इतिहास कसाकसा बनत व बदलत गेला, याचे सप्रमाण व मुद्देसूद विवेचन या ग्रंथांत आहे. अनेक अस्सल ऐतिहासिक कागदपत्रहि छापले आहेत व दोन अस्सल पत्रांचे फोटोहि दिले आहेत. कै. राजवाड्यांनी शुक्ल यजुर्वेद्यांवर महिकावतीच्या बखरींतून जो हल्ला चढविला होता, त्याला प्रत्युत्तर म्हणून हा ग्रंथ जरी निपजला आहे, तरी इतिहास-साहित्य-संग्रहाच्या दृष्टीने रा. ब. जोशी यांनी ही स्तुत्यर्ह कामगिरी बजावली आहे, असे म्हणावे लागते.

चितळेभट्ट प्रकरण

ले. रामकृष्ण सदाशिव पिंपुटकर, प्रकाशक - गणेश सदाशिव जोशी, बीकॉम. खांडके बिडींग, दादर, मुंबई १४. किं. १२ आणे.

वरवर पाहणारांना वाटतें की सारा महाराष्ट्र ब्राम्हण विरुद्ध ब्राम्हणेतर वादाने पेटला आहे. सारे ब्राम्हणेतर सर्व ब्राम्हणांना जिवंत हिरवे कच्चे खायला उठले आहेत. पण खुद्द ब्राम्हणां ब्राम्हणांतच केवढी 'अरे तुरे' ची लाथाळी माजलेली आहे, हे सहज कोणाच्या लक्षांत येत नाही. उत्तर कोंकणच्या इतिहासांत चित्पावन विरुद्ध शुक्ल यजुर्वेदी यांचा झगडा, तर प्रस्तुत पुस्तकांत चित्पावन विरुद्ध देवरुखे ब्राम्हणांचा झगडा. या शिवाय गोवर्धन ब्राम्हण चित्पावनांविरुद्ध तडफडत आहेतच. देशस्थ विरुद्ध कोंकणस्थ, कऱ्हाडे सारस्वत दैवज्ञ विरुद्ध चित्पावन ही भांडणे चालूंच आहेत. जिकडे पहाल तिकडे चित्पावनां विरुद्ध खुद्द ब्राम्हण म्हणविणाऱ्या सर्व जातींच्या कांहीं ना कांहीं तक्रारी सारख्याच चालूंच आहेत. संघटण्या चित्पावन वीरांनी थोडें शुद्धिवर येऊन या भानगडीच्या कुळामुळांचा अभ्यास लवकरच करावा अशी सूचना आहे. ब्राम्हण-ब्राम्हणेतरात आडवा उभा विस्तव गेला नाहीं, तर त्यांत काही चंद्राला खळे पडणार नाही. परंतु ब्राम्हण जातीतच जर चित्पावनांविरुद्ध सर्व चित्पावनेतर ब्राम्हण आदळ आपट करूं लागले, तर भविष्य काळचा इतिहास कसा रंगेल, याची चित्पावनांनी आतांच काळजी घ्यावी हें बरें.

प्रस्तुत पुस्तकाच्या जन्माला कै. राजवाड्यांचीच चित्पावनी कुचाळी कारण झालेली आहे. कुचाळीची जखम होण्याचीच थांतड, तो सुप्रसिद्ध ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनीं ज्ञानकोशांत त्या जखमेचें माकड खांडुक करून ठेवलेंच. त्यावर पुन्हां इसलामपूरच्या सुंडल्यांनी आणखी एका चिठोऱ्याचें मीठमिरपूड टाकलें. या सर्व कुचाळ्यांचा जो तीव्र भडका उडाला त्याला श्री. पिंपुटकर यांनी देवरुखे ब्राम्हणांच्या वतीनें प्रतिकाराची उलट सलामी दिलेली आहे. पुस्तकाचें लेखन, विवेचनाची पद्धत, पुराव्याची मांडणी आणि प्रतिपक्षाचें आरोप-खंडण सभ्य भारदस्त व प्रौढ रीतीनें केलेलें आहे. विवेकी व विचारी ब्राम्हण-ब्राम्हणेतरांनी हें पुस्तक मुद्दाम एकवार वाचावे, म्हणजे संघटनाची बोलघेवडी वावटळ

सुरू असतांनाच, खुद्द ब्राम्हण वर्गांतच कसकसल्या चित्पावनी भानगडींचा वारा वहात आहे, याची छान कल्पना होईल.

संघ-व्यायाम मराठी स्पष्टीकरण

लेखक प्रो. माणिकराव. प्रकाशकः- कृष्णाजी बळवंत महाबळ, श्री. यशवंत व्यायाम शाळा नाशिक किंमत १२ आणे.

आरोग्य ग्रंथमालेच्या या ९ व्या पुस्तकाचें जनकत्व प्रो. माणिकराव यांच्याकडे आहे. इतकें म्हटलें म्हणजेच त्याच्या उपयुक्ततेची आणखी तारीफ करणें नको. लष्करी धर्तीच्या कवायतीची आज सर्वत्र जागृति झालेली आहे. भारतीय कवायतीसाठी इंग्रजी शब्दांऐवजी हिंदी यथातथ्य उच्चारांची शब्दयोजना करण्याची कल्पना व प्रत्यक्ष कृति जाहीर करण्याचा प्रो. माणिकराव यांनीच मान मिळविलेला आहे. प्रस्तुत पुस्तकांत स्वयंसेवक, बॉयस्कौट आणि तरुण विद्यार्थी यांच्यासाठी 'भारतीय कवायतीच्या बोलाचें स्पष्टीकरण' क्रमवार, पद्धतशीर आणि विस्तृत विवेचनानें केलेलें असल्यामुळें, भारतीय कवायत शाळांचें हें एक अधिकारी टेक्स्ट बुकच म्हटले तरी चालेल. लेखी विवेचनाच्या विशेष स्पष्टार्थासाठी सचित्र तक्ते जोडल्यामुळें तर या पुस्तकाची उपयुक्तता विशेष वाढली आहे. शारिरीक बलवर्धनाची तरुण हिंदु विद्यार्थी संघांत आज तीव्र महत्त्वाकांक्षा उद्‌भुत झालेली आहे. अशा वेळी प्रत्येक संघाने या पुस्तकाप्रमाणें आपल्या कवायतींचा शिक्षणक्रम चालवावा, अशी शिफारस आहे.

यशस्वी धंद्याचा मार्ग

ले. - श्री. शं. वा. किर्लोस्कर. किर्लोस्कर खबर कचेरी, किर्लोस्कर वाडी, जि. सातारा.

किंमत ६ आणे.

यशप्राप्तीसाठी प्रत्येकजण भुकेलेला असतो. 'यत्ने कृते अपि न सित्यति कोऽत्र दोषः' या बुचकळ्यांतही पुष्कळ लोक निराशावादी बनलेले आढळतात. परंतु प्रयत्नवाद आणि यशप्राप्ती यांची बिनतोड सांगड जुळण्यासाठी आत्मोन्नतीचा मार्ग कसा चोखाळावा; बाह्य कृतीला अंतस्थ वृत्तीचा, म्हणजे मनोवृत्तीच्या कमावणीचा पाठिंबा कसा द्यावा; शाळा, कॉलेजातले पुस्तकी घोकंपट्टीचे ज्ञान आणि जगाच्या व्यवहारांतील धकाधकीच्या मामल्यांतील धक्कंपट्टीचा अनुभव यांचा समन्वय कसा करावा; चढाओढीच्या दंगलीत आपण आपले व्यक्तीत्व व अस्तित्व टिकविण्यासाठी ज्ञानाची व टक्केटोणपे अनुभवण्याची कसोशी कशी करावी; इत्यादि महत्त्वाच्या मुद्याची बहुतेक महत्त्वाकांक्षी तरूणांना कांही जाणीवच नसते. ही जाणीव सरळ सुबोध व आत्मत्वाच्या चटक्यानें करून देण्याची कामगिरी या छोटेखानी पुस्तकानें बजावली आहे.

सब्दोध चंद्रिका

संपादक श्री. परशुराम सदाशिव देसाई, मालवण. वार्षिक वर्गणी रु. १-३-०. किरकोळ अंकास १।। आणा.

'युगावतार श्रीरामकृष्ण परमहंस आणि धर्मध्वजी स्वामी विवेकानंद यांचा स्फूर्तिपद उपदेश व उद्बोधक वाङ्मय यांचा प्रसार करणे' हा या 'रामकृष्ण निकेतन पुष्पमाले'चा उद्देश आहे आणि तो उत्तम रीतीने पार पाडला जात आहे. श्री. देसाई यांची ही वाङ्मयसेवा पुण्यकारक व आत्मप्रबोधक खरी, पण तिची महाराष्ट्रीयांत कांही अभिरुचीच नसल्यामुळें सध्यां सांपत्तिक अडचणीच्या भोवऱ्यांत

ते सांपडले आहेत. तरीहि त्यांच्या प्रयत्नांत खंड नाहीं. वाङमयद्वारां जनसेवा करणाऱ्यांना सांपत्तिक फासाची तेढ किती ताठ बसते, हें जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे. आम्हीहि याच वंशातले असल्यामुळें श्री. देसायांची मनस्थिति पूर्ण जाणतो. पण काय करावें? सर्व सत्वप्रधान वाङमयभक्तांनीं या मालेला अवश्य आश्रय द्यावा अशी प्रबोधनाची खास शिफारस आहे.

विधवांचा कैवारी

लेखक - एकनाथ अमृतराव चौधरी, मु. पो. करजगांव, ता. एलीचपुर, जि. वऱ्हाड. ''या पुस्तकाला लागणारा खर्च हीच ३ आणे किंमत होय ट. ख. निराळा.''

'आजपर्यंत मराठी भाषेत असलें पुस्तक निपजलें नाही' असा शेरा जर या पुस्तकावर मारला, तर एका दृष्टीने चूक ठरणार नाहीं. क्रौन ८१ पानाचे हे चोपडें कव्हरापासून कव्हरापर्यंत वाचतानां वाचकाची जी कांही तिरपीट उडते ती लिहितां पुरवत नाहीं. या पुस्तकांत नाहीं काय? वेदान्त, धादान्त, वैराग्य, हसूं, रडूं, स्त्रीदाक्षिण्य, पुनर्विवाहोत्सुकता, फटके, पोवाडे, काव्य, जाहीरनामे, तळतळाट, शाप, सारे ब्रम्हांड ठेचून भरलें आहे. सोलापुरी किंवा कोल्हापुरी चिवड्यांत जर ५६ मसाले, तर या पुस्तकांत लसणीच्या तिखटापासून साखरपुड्याच्या सारखेपर्यंत एक लाख मसाले भरलेले आहेत. मुखपृष्ठावरील विचित्र शब्दचित्रापासून तों शेवटच्या 'अगत्याची सुचना :- वाचा व दाखवा. पत्रानी अभिप्राय मिळाल्या वाचून, पाहुणे घेऊन आमचे येथे कोणीच येऊं नये.'' या दमधाटी पर्यंत वाचक कसाबसा गेलाच, तर त्याला चक्करच येईल. या पुस्तकाचा जन्म फार चमत्कारीक अवस्थेत झालेला आहे. ले. श्री. एकनाथ अमृतराव चौधरी यांच्या एका मागून एक दोन पत्न्या मृत झाल्या. तेव्हां विधुरावस्थेच्या तिडकांनी त्यांना विधवांचा अवचित कळवळा फुटला; आणि आपण आतां त्रितीय विवाहाचा योग एखाद्या विधवेशींच जुळवून आणावा, हा त्यांचा निश्चय ठरला. योजनेसाठी विचारांची व अर्थात् विकारांची जी कालवाकालव उडाली, त्यांतून फट्दिशी या भरंसाट वरळणीच्या पुस्तकाचा निष्कारण जन्म झाला. लेखकाची एखादी जरी पत्नि जिवंत असती, तरी त्याला 'विधवांचा कैवारी' म्हणून पुढे येण्याची खास बुद्धी झाली नसती. कारण ''तरुण विधवांचे मानसिक दुःख ओळखण्याची सोपी रीत.'' हे विधवांचे कैवारी मुखपृष्ठावरच नक्षीदार बॉर्डरीत सांगतांना म्हणतात ''पुनर्विवाह नको म्हणणाऱ्यांनी आपापल्या साध्वी पत्न्या त्यांच्या आई बापांच्या येथें निधन पावल्या सारख्या पाठवून द्याव्या आणि स्वतः मात्र इकडे शेण खावूं नये, अशा प्रकारचा निदान पांच दहा वर्षे अनुभव तर घेऊन पहा. म्हणजे कदर समजेल.'' तात्पर्य, परिस्थितीची लाथ खाऊन शुद्धीवर आलेले हे समाजसुधारक लेखक आहेत. पुस्तकांत हवा तो मजकूर हवा तसा हव्या त्या भाषेत जणूं काय उधळून देऊन या नवथर अनभ्यस्त लेखकाने निष्कारण आपल्या शुद्ध हेतूंचा चिवडा केला आहे असे म्हणावें लागतें. पुनर्विवाहार्थ एखादी विधवाच पाहिजे होती, तर वर्तमानपत्रांत जाहिरात देऊन जें काम होतें, त्यासाठी या बाष्कळ पुस्तकाची जरूर काय? आधी करून मग सांगीतलें असतें, तर गोष्ट निराळी होती. विकारांनी मनुष्य बहकला म्हणजे उत्तम विचार सुद्धा तो किती बाष्कळपणानें बरळतो, याचे हे भिकार पुस्तक उत्तम नमुना होय.

□□□

लेख

नेपोलियन बोनापार्टचीं सूत्रें

या अंकांत 'दगलबाज शिवाजी'नामक अग्रलेखांत नेपोलियनबद्दल इंग्रेजी इतिहासकारांचा एक घाणेरडा अभिप्राय संदर्भ म्हणून इंग्रेजींतच नमूद केला आहे. त्यांत नेपोलियन हा माणूसघाण्या आणि क्षुद्र दर्जाच्या गुन्हेगारापेक्षां विशेष कोणी नव्हता; त्याच्यावर प्रेम करणारा कुत्रासुद्धां जगांत नव्हता; अशा प्रकारचे विचार व्यक्त झालेले आहेत. या खालीं नेपोलियनच्या चारित्र्याची दुसरी उज्वल बाजू दाखविणाऱ्या त्याच्या खास उक्तीची सूत्रें इंग्रजीतच देत आहों. प्रबोधनच्या वर्गणीदारांपैकीं जो कोणी या सूत्रांचें उत्तम मराठींत भाषांतर करून पाठवील. त्याला १ ते १० रुपयांपर्यंत किंमतीचे ग्रंथ बक्षीस देण्यांत येतील. ज्याचें भाषांतर उत्तम ठरेल त्याला, व त्या खालील ३ नंबरापर्यंत बक्षिसें प्रमाणांत मिळतील. स्त्री-वर्गणीदारास खास ५ रुपयांचे (पुस्तकरूपानें) निराळें बक्षिस ठेविलें आहे. हा अंक हातीं पडल्यापासून १५ दिवसांत प्रबोधन कचेरींत भाषांतर दाखल झालें पाहिजे. आम्ही देऊं तो निकाल कायम समजला जाईल. त्यावर अपील नाहीं.

- संपादक प्रबोधन.

MAXIMS OF NAPOLEON BANAPARTE

The following Maxims are translated from a book published in Holland in 1922 by a Dutch lawyer, Dr. K. J. Frederiks, who collected them from Napoleon's correspondence, official speeches, minutes, directions to Ministers and Departments, and from Memoris, Some of them may have been uttered for effect, but by far the greater number are taken from actual orders to civil subordinates. A glance at these maxims may persuade some critics of Napoleon to reconsider their judgements.

(1) I seek positive good and not the ideal best.

(2) I shall not fall into the error of men of modern systems and think that by myself alone and by my ideas I am the wisdom of nations. The true wisdom of nations is experience.

(3) Nations are not gofverned by words and by exponding principles.

(4) If there were a monarchy of granite the alities of economists would suffice to

reduce it to powder.

(5) The federal system is contrary to the interest of great States because it divides theirs strength; it is very favourable to small States because it leaves them all their natural vigour.

(6) Fifty men collected together at a time of crisis to make a constitution have not the right to alienate the rights of the people; its sovereignty is inalienable

(7) the world is governed by the imagination. The vice of our modern institutions is that they have nothing which speaks to the imagination. Men cannot be governed without it; lacking it, they are brutes.

(8) To make a stable Government the peopole must be really represented; then they will support institutions; otherwise they will remain hostile or indifferent.

\(9) Fontanes, do you know what I admire most in the world? The importance of force to organize anything. There are only two powers in the world, the sabre and the mind. In the end the sabre is always beaten by the mind.

(10) In all countries force yields to civil qualities. Bayonets are lowered before the priest who speaks in the name of heaven, and before the man who commands respect by his knowledge. I tole the military men that a military government could not exist in France unless the nation wee brutalized by fifty years of ignorance.

(11) Military qualities are only necessary in certain circumstances; the civil virtues, which characterize the true ruler, have at all times an influence upon public felicity.

(12) I mean to constitute civil order in France.

(13) Military authority is useless and misplaced in civil affairs; don't act like a corporal.

(14) A constitution should be short and obscure.

(15) Constitutions are the work of time; we cannot leave open too wide a path for amel orations.

(16) Where a Government is weak, the a my rules.

(17) Nothing is so tyrannical as a Government which pretends to be paternalya father's feelings are made for him, they cannot be limitated.

(18) Do not forget that weakness produces civil wars and that energy maintains traquility and prosperity in States.

(19) Under a weak Government every institution may become a dangerous instrument.

(20) Take care that authority is felt as little as possible and that it does not weigh unnecessarily upon the people.

(21) Not a centime is to be levied except by law.

(22) Human reason, its development, the development of our faculties, that is the social key, the whole secret of the legislator.

(23) The misfortunes of France are to be attributed to idealogy, to that tenebrous metaphysic which subtly inquires into first causes and tries to found the legislation of nations upon them, instead of fitting laws to a knowledge of the human heart and the lessons of history.

(24) A law must limit itself to laying down a general principle. It is useless to try to foresee all cases.

(25) The administration must act instead of deliberating.

(26) Military administration must not meddle with civil administration. If you continue

to govern your kingdom with no division of authority, the result will be chaos. (To Louis Bonaparte, King of Holland.)

(27) His Majesty looks upon the administration of the communes (i.e. Municipalities) as one of the most important for the well being of his people.

(28) The art of the poiice is not to see what it is useless to see.

(29) Let them say if they like that the sun goes round the earth, that the tides are produced by the melting of ice, that we are charlatans: there must be the greatest liberty.

(30) I want to censorship, because every publisher is responsible for the books he issues becasue I will not make myself responsible for the absurdities which are written, and because I will not allow an official to tyrannize over mind and to mutilate genius.

(31) Liberty of thought is the most important conquest of the age.

(32) I wish you to abolish the censorship of books completely. This country is already sufficiently narrow-minded without its being made narrower.

(33) [La Bourse] I wish to hinder no man's industry; but, as I am the head of tho present Government of France, I must not tolerate an industry for which nothing is sacred, whose habitual method is fraud and lying, whose object is a profit more immoral than that sought in gambling, which for the least profit would sell the secret and the honour of the Government itself it is could find a purchaser.

(34) Gambling must either be openly allowed or openly prohibited; the latter course is more in accordance with morals; it must be adopted.

(35) In a country where Justice compromises, there is no longer social order.

(36) The law is for the citizens and considerations of birth and wealth must never be a motive for making Justice swervo or for granting mercy.

(37) Good laws and impartial tribunals contribute more than anything else to the happiness of the people.

(38) I complain every day of the number of arbitrary acts committed in my name; they ought to emanate from a tribunal.

(39) Every day ought to be marked by a step towards the creation of a general system of finances.

(40) Finances have been the constant object of our meditations. The finances of a great empire should be able to meet extraordinary occasions, even the vicissitudes of the most bitter wars, without having recourse to new taxes, since they bring in little during the first years of their establishment. The most enlightened nations have thought that the only way to fulfil this object was a well-calculated system of borrowing. This method is both immoral and disastrous; it lays taxes in advance upon future generations; it sacrifices to the present men's dearest sentiment, the well-being of their children; insensibly it mines the public edifice and condemns a generation to the curses of those which follow it. We have adopted other principles. We have perceived that what is needed is a large number of taxes which weigh lightly upon our peoples in ordinary times because the amount will be very small, and which will be able to satisfy all the necessities of our treasury in extra ordinary times by a mere raising of the amount.

(41) The Emperor considers paper-money as the greatest scourage of nations; it bears the same relation to the moral that the plague does to the physical.

(42) I dislike this conflict of banks in competitively fabricating paper-money. Whatever

economists may say, this is not a case where competition can be useful.

(43) The budget is my law; it must be conformed to.

(44) With budgets one could create a world.

(45) Citizen Minister; I am directed by the First Consul to point out to you that the funds for the year IX. must be inviolably applied to the expenses of the year IX. that any diversion of these funds to liquidate expenses belonging to former years would be an illegal act which would make you liable to all the severities of responsibility.

(46) Every priest who meddles with political matters ceases to merit the regards due to his character.

(47) It the Government once intervenes in matters outside its scope, we shall be brought back to the disastrous times of billets de confession (i.e., certificates of orthodoxy), and to those miserable epochs when the parson had the right to scold a citizen for not going to mass.

(48) Our object is to conciliate the belief of the Jews with the duties for Frenchmen and to make them useful citizens.

(49) The Jews are the brothers of the nhabitants of all countries where they are granted not only tolerance but protection; where they are allowed to enjoy all the privileges attached to political and civil life.

(50) Public education, the necessary support of society, is demanded vigorously everywhere. All citizens feel that there is not happiness without enlightenment; that, without talents and without knowledge, there can be no equality but that misery and slavery.

(51) Only those who wish to deceive the peoples and to govern for their own profit can desire to keep them in ignorance; for, the more enlightened they are, the more persons will there be convinced of the necessity of laws, of the need for defending them, and the more will society be firmly based, happy prosperous. And if it should ever happen that enlightenment were harmful to the multitude, it could only be when the Government, in hostility with the interests of the people, should hold them in a forced position, or should reduce the lowest class to die of misery; for then there would be more sense in their defending themselves or becoming criminals.

(52) Conscription is a most dreadful and detestable law for families; but it makes for the safety of the State.

(53) Tragedy is the school of great men. It is the duty of sovereigns to encourage and spread it. There is no need to be a poet to judge it; a knowledge of men and affairs, elevation of mind, statesmanship, suffice. Tragedy warms the soul, uplifts the heart, can and must create heroes. In this respect France perhaps owes some of its great actions to Corneille. Were he alive I would make him a prince.

(54) Nobility is a chimera, men are too enlightened to believe that some of them are noble and some are not; they are all descended from the same stock the only distinction is that of talents and of services rendered to the state; our laws recognize no other.

(55) No social order can be founded upon an agrarian law. The principle of property and of transmission by a contract of sale, donation, or testamentary act, is a fundamental principle which does not invalidate equality. From this principle comes the convention of the transmitting from father to son the memory of services rendered to the State.

Wealth may sometimes be acquired by shameful and criminal methods. Titles acquired by services rendered to the State come always from a pure and honourable source. Their transmission to posterity is only justice.

Selected and translated by RICHARD ALDINGTON.

(THE NATION & THE ATHEN AEUM. October 25. 1924)

□□□

अग्रलेख

दगलबाज शिवाजी

"There is always a sacred veil to be drawn over the beginnings of all Governments."
- Edmund Burke.

प्रास्ताविक विचार

हिंदवी स्वराज्याच्या प्राणप्रतिष्ठेसाठीं शिवाजीनें केलेल्या नानाप्रकारच्या उपक्रमांची, यंदाच्या त्रिशतसांवत्सरिक उत्सवप्रसंगीं, विद्वान चिकित्सक संशोधक लेखकांकडून न्यायनिष्ठूर छाननी होईल आणि त्या उपक्रमांवर आजपर्यंत घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांचा पायाशुद्ध निर्णय लावला जाईल, अशी आम्हाला फार आशा होती. परंतु ती सर्व थैव व्यर्थ गेली. या उत्सवानिमित्त बाहेर पडलेल्या वाङ्मयाचा तो एकच एक स्तुतिपाठाचा एकेरी सूर, येथून तेथून एकजात काव्यकल्पनेच्या वायफळ भराऱ्या आणि वाचनापुरतीच नाटकी वीरश्री उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणारी ती शाब्दिक फापटपसाऱ्याची सरबत्ती इत्यादि प्रकार पाहून एकरकमी श्रीखंडी मेजवानीप्रमाणें हजारों चाणाक्ष वाचकांच्या तोंडास मिठ्ठी बसली असेल. म्हणून प्रस्तुत लेखांतील विचारांची पुदिनामिश्रित लवंग्या मिरचांची चटणी त्यांच्या सेवेला रुजू करीत आहों. भावनाप्रधान, नाटकी आणि भरंसाट गोडीळ वाङ्मयामुळें झालेल्या अजीर्णावर प्रबोधनाच्या सडेतोड विचारांची ही फणकेदार चटणी वाचकांना बरीच रुचकर लागेल, अशी आशा आहे.

पौराणिकी दृष्टीची अडथळा

शिवाजीचा काळ होऊन आज अडीचशें वर्षें झाली, तरी देखिल त्याच्या चारित्र्याला जगाची एकसुखी मान्यता अझून मिळालेली नाहीं. महाराष्ट्राला तो परमेश्वरावतार वाटत असला, तरी एकट्या हिंदूंशिवाय इतर सर्व जगाला तो दगलबाज, डोंगरांतला उंदीर, उपटशुंभ असाच वाटतो. पुण्यांत कै. शाहू महाराज करवीरकरांनीं शिवाजी मेमोरियलचा धाडशी प्रयोग केल्या दिवसापासून राज्यकर्त्या इंग्रेजी नोकरशाहीची शिवाजी विषयीं भाषा किंचित नरमलेली आहे. निदान ओठांवर तरी बरीच साखर चमकते, मग पोटांत काय असेल तें पोट जाणें ! परंतु शिवछत्रपतीची जगमान्यता अझून जवळजवळ साशंकावस्थेंतच आहे, असें कबूल केल्याशिवाय सुटकां नाहीं. याचें कारण काय? राष्ट्रवीरांची कीर्ती जगविश्रुत करण्याची कामगिरी वास्तवीक इतिहासकारांनीं करावयाची असते. परंतु आमचे मऱ्हाठी इतिहासकार अथपासून इतिपर्यंत एकजात पुराणिक. पौराणिकी साच्याशिवाय त्यांची विद्वत्ता कशांतहि

ठाकठीक बसायची नाहीं. प्रथम शिवाजीला ते परमेश्वराचा अवतार बनवतील, कौसल्येप्रमाणें जिजाबाईला दिल्लीपति मोंगलाच्या वधाचेचे डोहाळे पाडतील, तेव्हां कोठें त्यांना 'शिवसंभव' दिसायचा. थोडासा सत्याचा धागा, त्यावर यांच्या कल्पनेच्या कोलांट्या उड्या! ना त्यांत विवेक, ना चिकित्सा, ना साक्षेप. येथून तेथून भावनावशतेचा खरकटवाडा. शक्याशक्यतेचा विचार नाही, परिस्थिति-परीक्षणाची दृष्टी नाहीं, फार काय पण, मानवी स्वभाव ओळखण्याचीहि अक्कल नाहीं. या सर्व दोषामुळें आमच्या जुन्या बखरी आणि सध्यांचे इतिहासग्रंथ शिवाजीच्या जगमान्यतेच्या कामीं नालायक ठरलेले आहेत. आमच्या लाडक्या हीरोबद्दल कोणी वाईट बोलला तर त्याच्या विधानाला समर्पक प्रत्युत्तर देण्याऐवजीं आम्ही नुसत्या शिव्याश्रापांवरच आमच्या इतिहास-विषयक प्राविण्याचें प्रदर्शन करतो. नाहींतर आमचा हीरो ईश्वरावतारच असल्यामुळें त्याच्या सर्व बऱ्या वाईट कृत्यांना पुराणांच्या पोतड्यांतील राम कृष्णांच्या तत्सम कृत्यांचा पाठपुरावा दाखवून, 'या देवाच्या लीला, माणसांना कसल्या कळणार!' म्हणून शेरा ठोकून स्वस्थ बसतो. शिवाजीला कोणी दगलबाज म्हटले कीं आमच्या नाकाचा शेंडा फुरफुरूं लागतो. पण शिवाजी दगलबाज कसा नव्हे? कां असूं नये? याचा मात्र विवेकशुद्ध विचार आम्हाला कधीं सुचायचा नाहीं. रूढ पौराणिकी मताची पर्वा न करता हा विचार खुलासेवार आज चर्चेला घेतला आहे.

शिवाजीवर अहिन्दूंचे आरोप

तरी काय आहेत? याची यादी प्रथम घेऊं या. शिवाजीवर पहिला आणि ठळक आरोप म्हणजे राजद्रोहाचा. त्याने विजापूरच्या अदीलशाही विरुद्ध म्हणजे बण्ड उभारलें. कोणत्या तरी प्रस्थापित राजसत्तेला मूठमाती देऊन तेथें नवीन सत्ता स्थापणाऱ्या कोणत्याहि चक्रवर्तीची आणि सम्राटाची या आरोपांतून सुटका होणें शक्य नाहीं. इंग्रजांनीं तर मऱ्हाठी साम्राज्य घशांत घालतांना काय अशा मोठ्या हुतुतूच्या लढाया दिल्या, तर युद्धांतील विजयाच्या निर्णयावर त्यांची या आरोपांतून सुटका होते? त्यांनीं तर मराठ्यांच्या घरांत शेकडों कटांची पोखरण घालून, आज याला फोड, उद्यां त्याला बनव, परवां तिसऱ्यालाच चवथ्याच्या उरावर घाल, अशाच घालमेली केल्या ना? मग इंग्रेजांनीं मऱ्हाठ्यांचा राजद्रोह केला, अशी भाषा कां पुढें येत नाहीं? तर आज हिंदुस्थानांत इंग्रेजी राज्य जबरदस्त आहे. नवीन राज्यें कमविणारांवर राजद्रोहाचा आरोप करणाऱ्या मतिमंद मूर्खांनीं इतकें तरी लक्षांत ठेवावें कीं नवीन देऊळ बांधतांना जुन्या देवळाला आमूलाग्र उलथून पाडावेंच लागते. ब्रिटीश रक्ताच्या ब्रिटीशांनींच अमेरिकेंतून ब्रिटीश सत्तेची उचलबांगडी करून नवीन संयुक्त अमेरिकन संस्थानांची स्थापना केली. मग जॉर्ज वॉशिंगटन हा सुद्धां मोठा दगलबाज राजद्रोही मानला पाहिजे. नंबर २ :- शिवाजीनें अफजुलखानाचा 'खून' केला. जणूं काय अफजुलखान म्हणजे एकादा बाबला किंवा श्रद्धानंद : नंबर ३ :- शिवाजी आग्र्याच्या बादशाही कैदेंतून पळाला म्हणून तो दगलबाज. असले हे आरोप केवळ बुद्धिभ्रष्टता अगर जातिवंत दुष्टावा यांतूनच निर्माण होत असतांत. राजद्रोह दगलबाजी विश्वासघात इत्यादि आरोप करणारे शहाणे स्वत:ची भूमिका तर विसरतातच, पण हे आरोप कोणी कोणावर कोठें केव्हां आणि कां करावे याचा विवेकहि त्यांच्या गावीं नसतो. मुसलमानांनीं शिवाजी विरुद्ध हात बोटें चोळली तर त्यांत कांहीतरी वाजवीपणा आहे. कारण, शिवाजीनें दक्षिणेंतल्या मुसलमानी सत्तेच्या चांदताऱ्यालाच आचंद्रार्क अर्धचंद्र दिला! पण

इंग्रज म्हणजे न्यायाचा सागर

आणि हिस्टॉरिकल परस्पेकटिवचा आगर! त्यांनीं शिवाजीवर खुनाची आणि दगलबाजीची एवढी आग कां पाखडावी? असा एकसुद्धां इंग्रेज इतिहासकार आढळत नाहीं कीं ज्यानें अफजुलखानाच्या वधाचा पराचा पारवा करून शिवाजीवर शिव्यांची लाखोली वाहिलेली नाहीं. प्रतापगडच्या मुकाबल्यांत अफझुलखानानें आपल्या प्रतिज्ञेच्या संकेताप्रमाणें शिवाजीचाच कोथळा काढला असता, तर त्याविषयीं निस्पृहपणाची मिजास मारणाऱ्या इंग्रज इतिहासकारांनीं काय उद्गार काढले असते, याची कल्पना सुद्धां बरीच मनोरंजक होईल. इंग्रेज हा असा एक विलक्षण प्राणी आहे कीं त्याला इतरांच्या डोळ्यांतील कुसळ चटकन् दिसते, पण स्वत:च्या डोळ्यांतलें मुसळ मात्र मुळींच दिसत नाहीं. न्यायबुद्धीची याची घमेंड जगप्रसिद्धच आहे; परंतु त्यांत एक मख्खी आहे. आपमतलबासाठीं इंग्रेजी न्याय कधिं पृथ्वीइतका फुगेल, तर कधीं सुईच्या डोळ्यांतून सफाईंत निसटून टाचणीच्या टोकावर तांडवनृत्य करील. शिवाजी एक वेळ राहूं द्या; बोलून चालून तो हिंदू. पण नेपोलियन बोनापार्ट तर युरपियनच ना? त्याच्या चारित्र्याचें सार काढतांना विद्यमान सुप्रसिद्ध इतिहासकार एच. जी. वेल्स आपल्या 'औटलाईन्स ऑफ धी हिस्टरी ऑफ धी वर्ल्ड' नामक महाग्रंथांत काय अक्कल पाघळतात ती पहा :-

It would be difficult to find a human being less likely to arouse affection. One reads in vain through the monstrous accumulations of Napoleonic literature for a single record of self forgetfulness. Laughter is one great difference between man and lower animals, one method of our brotherhood, and there is not evidence that Napoleon ever laughed. Nor can we imagine another of the most beautiful of human expressions upon the face of this saturnine egotist, that expression of disinterested interest that one sees in the face of an artist or artisan 'lost', as we say, in this work. Out of his portraits he looks at us with a thin scorn upon his lips, the scorn of the criminal who believes that he can certainly cheat such fools as we are, and withal with a certain uneasiness in his eyes. That uneasiness haunts all his portraits. Are we really convinced he is quite right? Are his laurele straight? He had a vast contempt for man in general and men in particular, a contempt that took him at last to St. Helena, that same contempt that fills our jails with forgers, poisoners, and the like victims of self-conceit. There is no proof that this unbrotherly, unhumorous egotist was every sincerely loved by any human being. The Empress Josephine was unfaithful to him as he to her. His young Austrian wife would not accompany him to Elba. A certain polish countess followed him thiter, but not, it would seem for love, but on account of the son she had borne him. She wanted settlements. She stayed only two days with him. He has never even a dog to love him. He estranged most of his colleagues and fellow generals. He had no familiar friend. No one who knew him felt safe with him. In his intimacy, his unflinching self-concentration must have been a terrible bore. His personal habits were unpleasant; the moodiness of bad health came to him early. True it is that his soldiers, who, save for a rare melodramatic encounters, saw nothing of him, idolized their "Little Corporal". But it was not him they idolized, but a carefully fostered legend of an incredibly clever, recklessly brave little man, a little pet of a man, who was devoted to France and thein." - p.499.

लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठीं युरपस्थ राजेशाहीला नेस्तनाबूद करणाऱ्या सवाई शिकंदर नेपोलियन चक्रवर्तीला विसाव्या शतकांतले हे इंग्रज इतिहासपंडित जर बाबू चष्मावाल्याच्या वर्गांत

ढकलतात, तर १८ व्या व १९ व्या शतकांतल्या यांच्या व्यवसाय-पूर्वजांनीं शिवाजीला उनाडटप्पू दरोडेखोराच्या सदरांत घातले, तर त्यांत काय नवल? तरी बरें कीं इतरांवर घाणेरडे आरोप करणाऱ्या या आंग्ल चिकित्सकांच्या ब्रिटन राष्ट्राच्या साम्राज्यवर्धनाच्या खटपटी अगदींच कांहीं धुतल्या तांदळाच्या नव्हत. शिवाजीवरील खुनाच्या आरोपाचे खण्डन करणारे

विलायती व गावठी वकील

पाहिले तर त्यांची नंदीबैलांतच गणना करावी लागेल. याचा डिफेन्स आणि विधानें पाहिली तर रडूं येण्यापेक्षां हसूंच फार येतें. काय म्हणे, शिवाजीनें आत्मसंरक्षणासाठीं वाघनखाचा उपयोग केला. आणखी काय? तर प्रथम वार कोणी केला, यावरच वादविवादाची धुमश्चक्री. आणि अफजुलखानानें ज्या अर्थी, ज्या पक्षीं, ज्या अन्वयें, शिवाजीला प्रथम बगलेंत दाबून त्याच्या मस्तकावर प्रथम तलवार चालवून आगळीक केली. त्या अर्थी, त्या पक्षीं, त्या अन्वयें, शिवाजीनें आत्मरक्षणार्थ वाघनख चालविल्यामुळें, खुनाचा आरोप त्यावर सिद्ध होत नाहीं. बावलानें रिवॉल्वर प्रथम झाडलें, का शफी दिघ्यानें झाडलें, असल्याच क्षुद्र वादावर या विलायती व गावठी वकीलांची भिस्त. जणूं काय, अफजुलखानाच्या खुनाबद्दल फाजलखानानें फिर्याद दिली आहे, अदीलशाहीच्या शिफारसीनें इंग्रेजी सेशन कोर्टांत शिवाजीवर खटला चालूं आहे आणि हे विलायती गावठी बॅरीस्टर शिवाजीच्या तर्फे ब्रिटीश इंडियन पिनल कोडांतील कलमांवर आपल्या वकीलाईची कसरत करीत आहेत ! शिवाजी हा कोण, त्याचें ध्येय काय, कर्तव्यक्षेत्र कोणतें, त्याच्या कृत्यांची परीक्षा कोणत्या दृष्टीकोणानें केली पाहिजे, इत्यादि महत्वाच्या मुद्यांची आणि या वकीलांची फारकतच असल्यामुळें, त्यांनीं साध्या संसाऱ्याला लागूं पडणाऱ्या नीतिनियमांच्या कक्षेंत या राष्ट्रसंसाऱ्याला ओढावे, यांत त्यांच्या बुदिद्धमांद्याशिवाय विशेष कांहींहि निष्पन्न होत नाहीं. राष्ट्रससाऱ्यांना कर्तव्याकर्तव्याचीं जीं बिकट त्रांगडी सोडवावी लागतात, तीं ते कोणत्या भूमिकेवरून कशी सोडवितात. याचे परोक्ष ज्ञान या लौकिकी नीतिवतांना नसल्यामुळेंच, ते 'जन्माला आला हेला, कसा तरी जगून मेला' अशा साध्यासुध्या संसाऱ्याच्या भूमिकेवरून शिवाजीसारख्या राष्ट्रसंसाऱ्याच्या कर्माकर्माचें परीक्षण करण्याच्या पोरकट फंदांत पडतात. सतत पांच वर्षे युरपियन महायुद्ध मर्दुमकीनें खेळविणाऱ्या जर्मन कायझर वर खटला भरण्याच्या पाचकळ वल्गना असल्याच क्षुद्र बुद्धीची अवलाद होय. ही क्षुद्र बुद्धी ऊर्फ नीतीची चाड बाळगणारांनीं खुशाल साधू म्हणून मिरवावे. पण त्यांनीं स्वराज्यसंस्थापक राष्ट्रवीरांच्या चारित्र्याची चिकित्सा करूं नये. तें त्यांचे क्षेत्र नव्हे, तो त्यांचा अधिकार नव्हे.

वाकड्या दरांत वाकडी मेढ

ठोकणारेच पुरुषोत्तम राष्ट्रवीर होऊं शकतात. तें साधुसंतांचें आणि 'सत्य सदा बोलावें' वाल्यांचें तोंड नव्हे. साधुवृत्तीनें आणि संसारी नीतीनें राज्यें कमाविल्याचा दाखला इतिहासांत नाहीं. राज्याची प्राणप्रतिष्ठा म्हणजे टाळकुट्या साधुसंतांची भजन-प्रतिष्ठा नव्हे. त्यांतल्या त्यांत गुलाम बनलेल्या देशाची महिरलेली मनोवृत्ति चैतन्यपूर्ण करून परकीय सत्तेच्या मुडद्यावर स्वराज्याचा पाया उभारणारा वीर साधुवृत्तीचा असून भागतच नाहीं. असें आजपर्यंत कधिं कोठें घडलें नाहीं; पुढें कधिं कोठें घडणार नाहीं. 'एका गालावर कोणी चापड मारली तर लागलाच दुसरा गाल पुढें कर' या क्रिस्तधर्माज्ञेप्रमाणें युरपस्थ क्रिस्तीजन अक्षरश: वागते, तर त्यांना हिंदुस्थानचें साम्राज्य कधींच मटकावतां आलें नसतें.

महंमद गिझनी पासून तों थेट बाबर हुमायुनापर्यंतचे लोक जर नुसते माळा ओढणारे आणि नमाज पडणारे मुल्ला मौलवी असते, तर मोगल साम्राज्याची स्थापना होतीच ना. त्याचप्रमाणें सत्य नीति वचन इमान असल्या साधुवृत्तीच्या फाजील फंदांत रजपूत जर निष्कारण गुरफटले नसते, तर त्यांचाहि अध:पात इतक्या लवकर खास झाला नसता आणि शिवाजी जर दगलबाजांतला दगलबाज, लुच्चांतला लुच्चा, खटांतला सवाई खट आणि उद्धटांतला दिढी दुपटी उद्धट नसता, तर त्यालाहि मऱ्हाठी स्वराज्य यावज्जन्मांत स्थापन करतां आलें नसतें. नेहमीचा व्यवहार पाहिला तरी

सतीच्या घरीं बत्ती

आणि वेश्येच्या घरीं झुले हत्ती, हाच प्रकार चालूं असतो. सत्य न्याय समता प्रामाणिकपणा इत्यादि तत्वे पुराणांसाठींच जन्माला आलेलीं आहेत. लिहिण्या बोलण्यांत त्यांची फोडणी फार खमंग लागते. एखाद्या गोमाजीच्या चारित्र्यावर थोरपणाची सफेदी चढवून, त्याच्या चरित्राचे ग्रंथ 'विक्रीला लायक' ठरविण्याच्या कामीं, हीं तत्वें लेखक बखरकारांना शाई लेखणी इतकीच उपयुक्त असतात. परंतु, प्रत्यक्ष व्यवहारांत या तत्वांनीं आजवर एकाहि मनुष्याचा भाग्योदय केल्याचें उदाहरण आढळणार नाहीं. अमक्या तमक्यानें म्हणे ५ दिडक्यांवर भाजीविक्याचा धंदा आरंभून १५ वर्षांत तो लक्षाधीश झाला ! फलाण्यानें डोक्यावर टोप्यांचे शिप्तर घेऊन टोप्या विकतां विकतां, अमेक वर्षांत फेरीवाल्याचा म्हणे कोट्याधीश झाला ! गोम्यासोम्या म्हणे रस्त्यावर खडीच्या पाट्या वाहात होता; तो आज हिंदुस्थानांतल्या सगळ्या रेल्वेचा कंट्राक्टर होऊन, रोल्स रॉईसशिवाय पाऊल बाहेर टाकीत नाहीं ! दहा वर्षांपूर्वीं हातांत एक फुटका लोटा घेऊन नागडा उघडा भटकत आलेला मारवाडी म्हणे मोडतोड तांब्बा पित्तलवर आज अब्जाधिपति बनला ! आणि-आणि लोकांना दाखवायचे भासवायचें काय? तर हे सगळे नरमणि सत्यं वद धर्मं चर इत्यादि गुणांच्या भांडवलावर बडे भांडवलवाले बनले ! हे सारे वस्त्रगाळ नीतिमत्तेचे पुतळे. पाप म्हणून यांच्या गांवीं नाहींच. व्यवहाराच्या खाच खळग्यांवरून जातांना ना कधिं यांचा पाय पापाच्या पिसावर पडला, ना कधिं घातपाताच्या वळणावर अडला. यांनीं प्रत्येक कर्म देवाधर्माची जाणीव ठेऊन केलेलें. याचें इमान? आहा ! तें काय विचारावें? सगळे हरिश्चंद्राचे अवतार ! स्वप्नांत दिलेलीं वचनें सुद्धां जागे झाल्यावर फडशा पाडणारे ! पापभीरुत्वाच्या काचेच्या सीलबंद बरणींतल्या या साऱ्या धर्मवान् सत्यवान् नीतिवान् शीलवान् कापट्या! बिचाऱ्यांना पापाची नुसती झुळूक सुद्धां कधिं चाटून गेलेली नसायची. किटसन दिव्याची मॅन्टलेच ही ! आरपार उभा आडवा खालीं वर उजेडच उजेड आणि तेजच तेज. वाचकहो, असल्या गप्पा लुच्या गप्पिष्ठांनीं माराव्या, पोटभरू किंवा रिकामटेकड्या लेखकांनीं लिहून प्रसार कराव्या आणि बावळट श्रोत्या वाचकांनीं नंदीबैलाप्रमाणें माना हालवून मान्य कराव्या, यापेक्षां त्यांत विशेष कांहींच नसते. कोण गोमाजी द्रव्यप्राप्तीच्या शर्यतींत काय काय लपंडावांनीं भरारतो, याचा तपशील पुष्कळांना अवगत असतो. परंतु व्यवहाराची मायाच अशी मायावी आहे कीं त्या तपशीलांचा उच्चार कोणी फारसे करीतच नाहीं. त्यांत पुन्हां त्या गोम्यासोम्याला लक्ष्मी प्रसन्न झालेली ! मग काय, सर्वे गुणा: कांचन माश्रयन्ते. अर्थात् संपत्तीच्या झगझगाटाखालीं दडलेला पापांचा आणि घातपातांचा भगभगाट उकरण्याच्या अव्यापारेषू व्यापारांत पडण्याची लोक सहसा तसदी घेत नाहींत. वकीलांचे वाडे विद्वत्तेच्या विजयावर वसले जातात काय? स्मृतिग्रंथांत वकीलांच्या वृत्तीविषयीं घातलेले नीतिनिर्बंध जर अक्षरश: पाळले जाते आणि विद्यम

ान सरकारांनीं ठरविलेल्या वकीली फीच्या कोष्टकांतच जर त्यांचे द्रव्यप्राप्तीचे प्रमाण मर्यादित राहतें, तर वारावंदी बंडी, मांडपंचा आणि गांधी टोपी पलीकडे एकाहि वकीलाचें ऐश्वर्य फुगलें नसतें. नोकरी चाकरी किंवा अर्थोत्पादनाचा कसलाहि लौकिकी धंदा न करतां, फक्त 'देशभक्त' म्हणून व्याख्यानबाजी आणि लेखनबाजी करीत जगणाऱ्या अनेक ब्राम्हण लोकांनीं ठिकठिकाणीं मोठमोठे वाडे बांधले आहेत, आणि सावकाऱ्याहि सुरू केल्या आहेत. त्या काय साऱ्या 'वन्दे मातरम्' राष्ट्रगीत पारायणाच्या तात्कालीक फलश्रुत्याच मानायच्या कीं काय? आंगावर खादीच्या चिंध्या पांघरून देशासाठीं भिक्षा मागत गावोगाव व खेडोपाडीं भटकणाऱ्या सीावित भिक्षुकांच्या सौभाग्यवती गोटपाटल्यांत चमकतांना दिसतात, त्या काय खादीच्या आडव्या उभ्या ताण्याच्या तणावावर कीं काय? लिमिटेड कंपन्यांची आणि देशी बँकांची दिवाळी वाजवून, कफल्लक अवस्थेंत नादारीची सनद पटकविणाऱ्या 'थोर' माणसाच्या नशिबीं नादारोत्तर काळीं सुद्धां मोटारी बंगले शेतवाड्यांचें ऐश्वर्य तसेंच चिकटून राहिलेले आढळल्यास, तो देखिल नीतिमत्तेचा एक श्रुतिस्मृतिपुराणोक्त दिग्विजयच मानायचा काय? नीतिनियमांचीं पुराणें आणि लौकिकी व्यवहारांचीं गुप्त अर्धगुप्त वा उघडगुप्त धोरणें यांचा समन्वय लावण्याचें काम म्हणजे या जगांतला एक ब्रम्हघोटाळा होय. तात्पर्य, लौकिकी व्यवहार जसा दिसतो, तसा वास्तविक मुळींच नसतो, म्हणूनच बावळट माणूस बोलबोलतां सपशेल फसतो. जीवो जीवस्य जीवनम्. मोठ्या माशानें धाकट्या मासोळीला मटकावून जगावें. ज्ञान्यांनीं अज्ञान्यांचीं घरेंदारें लुटून आपले वाडे शृंगारावे. जबरदस्तांनीं कमकुवतांना जिंकून दास बनवावे. सत्य न्याय प्रेम अहिंसेची कास बळकट धरणाऱ्या नामर्द षंढांना युक्तिबाज दगलबाज बाजीरावांनीं हासत हासत चिरडून जमीनदोस्त करावे. ज्याच्या हातीं शिकार त्यानें पारधी म्हणून मिरवावे. हाच जेथें सृष्टींत चाललेल्या 'जगण्याच्या धडपडीं'चा आत्माराम, तेथें एका चोरानें दुसऱ्या चोरावर दगलबाजीचा आरोप करावा, ही तरी दगलबाजीच नव्हे काय?

दगलबाज नाहीं कोण?

दुनियाच जेथें जातिवंत दगलबाज, तेथें दगलबाजीशिवाय जगणारे प्राणी म्हणजे षंढ हिजडे नामर्द विद्वान आणि गुलाम हेच होत. या लोकांशिवाय, नेटका प्रपंच करून मरण्यापूर्वी वेळ सांपडलाच तर परमार्थ-विवेकाचा फेरफटका करणारे छोटे दगलबाज संसारी, रोजच्या संसारांतल्या जगण्याच्या धडपडींत जे जे उत्पात करतात, त्यांचा विचार केला म्हणजे उलट्या काळजाच्या रंडीबाज (वारांगनैव) राजकारणांतल्या बड्या दगलबाज दिग्गजांच्या उत्पातांचे प्रमाण सहज कळून येईल. साध्यासुध्या संसारांत एकमेकांच्या मुंड्या मुरगाळल्याशिवाय जर संसाऱ्यांना जगतांच येत नाहीं; कापड मोजतांना गजाला आणि माल तोलतांना तराजूला हिसका दिल्याशिवाय जर आमच्या व्यापारांतला अपमृत्यू टळत नाहीं; आणि खऱ्या खोट्याची भेसळ केल्याशिवाय, न्यायदेवतेनें दिलेली न्यायाची कांजी पिण्याची जर मनुष्याच्या जिभेला संवयच नाहीं; तर कोट्यवधि लोकांच्या संसाराच्या बरेवाईटपणाचा जिम्मा घेणाऱ्या राजकारणी संसाराच्या नायकाला शक्तीयुक्ती बुद्धीची ठेवण कसल्या मनोवृत्तीच्या साच्यांतून ओतून काढणें अगत्याचें असतें, याची कल्पनाच करावी. जित-नेतृत्वाची घडामोड घडविणारें राजकारण हेंच मुळीं जेथें हरामखोरीच्या सट्टेबाजीचें क्षेत्र, त्या क्षेत्रांत स्वदेशाच्या भवितव्येचे खेळ खेळणाऱ्या खेळाडूंनीं, इंद्रधनुष्याला हिचक्कर येईल अशा भरंसाट चित्रविचित्र रंगांत, हरामखोरीची आणि दगलबाजीची जुव्वेबाज रंगपंचमी खेळू नये, तर काय सत्यं वद धर्मं चर वाल्या बेदर्द गोसावड्यांप्रमाणें राखेच्या ढिगाराची

फाल्गुनी पौर्णिमा करावी? जगांत आजपर्यंत अशी एकहि राज्यसत्ता झालेली दाखवितां येणार नाहीं कीं जिचा पाया दगलबाजीवर उभारलेला नाहीं. सत्यव्रताची आणि न्यायाची मिजासच मारायची तर एका राष्ट्रानें दुसऱ्या राश्ट्राला, गोऱ्या लोकांनीं काळ्या लोकांना, आणि पाश्चिमात्य लोकांनीं पौर्वात्य लोकांना हव्या त्या उपायांनीं जिंकून गुलाम करायचे, हा तरी कोठल्या गावचा न्याय? माणसांनीं माणसांना ठेचून त्यांच्या गुलामगिरीवर स्वत:च्या नेतृत्वाची शेखी मिरविणें, हीच मुळी सृष्टीच्या नियमांची जेथें धडधडीत पायमल्ली, तेथें त्याच गुलामगिरांचे लोण सफाईंत परतविण्यासाठीं कोणी काट्यानेंच काटा काढला, तर त्यांत दगलबाजी ती कसली? जगाची रहाटीच जर उलट्या पावलांनीं चालत आहे, तर सुलटें चालण्यांत शहाणपणा कोणता?

करत्याची करणी आणि मारत्याची तलवार

हीच जगाच्या जगण्याच्या धडपडीची गुरुकिल्ली आहे. याच गुरुकिल्लीनें शिवाजीनें महाराष्ट्राच्या नशिबाला चिकटलेली इस्लामी गुलामगिरी उध्वस्त करून, आपल्या मातृभूमीला हिंदवी स्वराज्याचें स्वातंत्र्य दिलें. यांत चुकलें कोठें? दगलबाजी ती कसली? अत्याचार कसले? खून तरी कसले? आणि विश्वासघात तरी कोठें घुसले? खटास खट भेटे, तेव्हांच मनींचा संशय फिटे, हिंदू लोक आचंद्रार्क मुसलमानी सत्तेचे गुलाम राहणार काय? शिवाजीच्या या प्रश्नाला तत्कालीन् प्रस्थापित राज्यसत्तेनें 'होय होय होय' अशा मगरूरीच्या प्रतिध्वनीचें उत्तर दिलें. त्यावर शिवाजीनें 'कल्पांत करीन, पण ही मगरूरी टिकूं देणार नाही. हिंदु स्वतंत्र झालाच पाहिजे.' अशी धडाडीची उलट सलामी दिली. हिंदुस्थान आणि त्यावर राज्य-सत्ता म्हणे मुसलमानांची! या दगलबाज परिस्थितीचा नायनाट करण्यासाठीं शिवाजीला सवाई दिढी दुपटी दगलबाज बनल्याशिवाय गत्यंतरच नव्हते. प्रस्थापित मुसलमानी राज्यसत्तेचा विध्वंस हीच ज्यानें आपल्या कर्तव्याची दिशा ठरविली, ज्या कर्तव्यांत त्यानें आपल्या वैयक्तिक स्वार्थाचा आमूलाग्र संन्यास केला आणि ज्या कर्तव्यसिद्धीवर कोट्यवधि जीवांचा ऐहिक मोक्ष अवलंबून होता, त्या कर्तव्यासाठीं - त्या गुलामगिरीचा कण्ठ काडकन् फोडतांना, अफझुलखानचसा काय, पण शिर्के मोरे जाधवासारखे स्वजातीय कंटक आडवे येतांच, त्यांचेहि खून पाडणें, शिवाजीच्या राष्ट्रधर्माला आणि राजकारणी नीतीला मुळींच विसंगत नव्हते. फार काय, पण विजापुराहून अफझुलखान आला, त्याच प्रतिज्ञेनें व तयारीनें शिवाजीचा प्रत्यक्ष बाप शहाजी जरी आला असता, तरी हिंदवी स्वराज्यस्थापनेच्या महत्कर्तव्यासाठीं शिवाजीनें त्याचाहि कोथळा फाडून, आपल्या हातानें आपल्या मातोश्रीच्या कपाळाचे कुंकू पुसायला कमी केलें नसते. राष्ट्रोद्धाराच्या पवित्र कर्तव्यक्षेत्रांत ध्येयाच्या सिद्धीसाठीं 'आडवा आला कीं काप' हाच जेथें नीतीचा दण्डक आहे, तेथें 'मातृदेवा भव, पितृदेवो भव' या संसारी लोकांच्या आंबटवरणी नीतीचे नियम काय होत?

दगलबाजीशिवाय राज्यसत्ता नाहीं

आणि उलट्या काळजाशिवाय राजकारण नाहीं. स्वराज्यस्थापनेंसाठीं आणि परदेश जिंकून साम्राज्यवृद्धी करण्यासाठीं आजपर्यंत दगलबाज्या केल्या नाहींत कोणी? सर्वांनीं केल्या. कोणीहि नाकाला जीभ लावण्याचा खटाटोप करूं नये. स्वतंत्र अमेरिकन संस्थानांची प्राणप्रतिष्ठा, ब्रिटीश रक्ताच्या लोकांनीं ब्रिटीश सत्तेला उलथूनच केली ना? कोठें गेला तो रक्ताचा जिव्हाळा त्या वेळीं? आर्यांनीं जसा अनार्यांचा बीमोड करून हिंदुस्थानांत तंगड्या पसरल्या, तद्वत याच अमेरिकन वसाहतवाल्यांनीं

रेड इंडियनांच्या कत्तली व विध्वंस केला, तो शुद्ध युनिवर्सल ब्रदरहुड (विश्वबंधुत्वा)च्याच भावनेनें काय? पुर्तुगेजांचा प्रपितामह वास्को द गामा यानें आपल्या आश्रयदात्या झामोरीन नृपतीची व त्याच्या वकिलांची ठेवलेली 'रक्तपाती बडदास्त' आम्ही पामरानें काय वर्णन करावी! पुर्तुगेज, फ्रेंच, डच, इंग्रेज यांनीं हिंदुस्थानांत आपापले पाय रवितांना कसकसले अमानुष अत्याचार केले, त्यांचा इतिहास येथें पुनरुद्धृत करतां येणें शक्य नसलें, तरी त्या विषयीं एक अक्षरहि लिहून आमची लेखणी विटाळण्याचें आम्ही साफ नाकारतो. (वाचकांनीं श्री. सरदेसाई कृत ब्रिटीश रियासत, पूर्वार्ध, हा ग्रंथ वाचावा.) या सर्व अत्याचारांच्या कृतघ्नतेपुढें आणि क्रौर्यापुढें शिवाजीनें केलेला अफझुलखानाचा वध म्हणजे ढेकूण चिरडण्याइतकाच क्षुद्र ठरेल. शिवाजीवर किंवा सर्रास हिंदु नृपतींवर दगलबाजीचे आरोप करणाऱ्या इंग्रज इतिहासकारांना रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड डलहौसी इत्यादि अनेक राजकारणी महापुरुषांची कारस्थानें साजरी गोजरी वाटण्याचें आम्हाला तरी एवढेंच कारण दिसतें कीं त्यांनीं 'दगलबाजी' या उर्दू-मराठा शब्दाला 'डिप्लोमसी' हा एक गोंडस इंग्रेजी शब्द प्रचारांत आणलेला आहे. त्याच्या पोटांत स्वर्ग नरकासह सारें विश्व पचनीं पडलें तरी त्याला अजीर्ण म्हणून कधीं व्हायचेंच नाहीं.

डिपलोमसी ऊर्फ दगलबाजी

ही राज्यक्रांतीची जीवनदेवता आहे. हिच्या उपासनेनें स्वराष्ट्राच्या भाग्यसिंधूला अपरंपार भरती आणणाऱ्या सर्व डिपलोमॅटांची क्षुद्र लौकिकी नीतीच्या चव्हाट्यावर चिकित्सा करणें, चिकित्सकांच्या क्षुद्र मनाचें द्योतक होय. डिपलोमॅट ऊर्फ राजकारणी दगलबाजांना संसारी नीतीच्या दण्डकाखालीं खेचले, तर पृथ्वीवरील कोणत्याहि चक्रवर्ति नृपतीच्या आणि लोकशाहीध्रुव राज्यसत्तेच्या तोंडाला फासायला काळ्याशिवाय दुसरा रंगच उरणार नाहीं. अर्थात् स्वराज्य-संस्थापक आणि साम्राज्य-प्रसारक राष्ट्रवीरांच्या चारित्र्याकडे पहाण्याची

ही दृष्टीच चुकीची आहे

स्वदेशाच्या सौभाग्याचें आणि स्वातंत्र्याचें अत्युच्च आणि व्यापक ध्येयं साधण्यापलीकडे राष्ट्रवीरांना स्वत:चा स्वार्थ असा कांहींच नसतो. स्वार्थाचा संन्यास करून कोट्यवधी स्वदेश बांधवांच्या हितासाठीं झगडतांना, त्याच्या हातून घडतील त्या बऱ्या वाईट कृत्यांची परीक्षा संकुचित अशा संसारी नीतीच्या दुर्बिणींतून करणें, सपशेल चुकीचें आहे. वास्को द गामा, आफांन्सो आलबुकर्क इत्यादि पुर्तुगेज वीरांनीं स्वराज्य व स्वधर्म यांच्या प्रसारार्थ हिंदी लोकांवर अमानुष अत्याचार केले. डचांनीं कित्येक इंग्रेज लोकज्ञांनाहि जिवंत भाजून काढलें. फ्रेंचांनीं डच पुर्तुगेज आणि इंग्रजांशीं केलेल्या लढायांत व तहनाम्यांत शेंकडों वेळां विश्वासघात केले. (५७ च्या बंडांत तर शेकडों इंग्रेज लोकांनीं हिंदी लोकांवर कल्पनातीत अत्याचार केलें. रॉबर्ट क्लाईव्हनें वाटसन साहेबाची खोटी सही करून उमीचंदाला तर धडधडीत बनावट दस्तऐवजानें फसविलें. वॉरन हेस्टिंग्नें अयोध्येच्या बेगमांचा केलेला छळ व इतर अत्याचार जगप्रसिद्धच आहेत. लॉर्ड डलहौसीनें कलमांच्या फटकाऱ्यानें देशी राज्यें भराभर ब्रिटीश साम्राज्याच्या घशांत घातली. म्हणून काय या साऱ्या स्वराज्य व स्वधर्म सेवकांना क्षुद्र लेखायचे? हे अत्याचार त्यांनी काय स्वार्थासाठी केले? स्वार्थच मानायचा तर तो इतका महासागरासारखा आहे कीं त्यांत त्यांच्या दोषांचें प्रमाण म्हणजे दर्यामे खसखस! कोणत्याहि राजसत्तेच्या पायांतले दगडधोंडे माती उकरून पहा, त्यांत खून रक्तपात अत्याचार विश्वासघात यांशिवाय दुसरें कांहींच आढळणार नाहीं.

पर-राज्यांच्या मुंड्या मुरगाळल्याशिवाय स्व-राज्याची मान ताठ बनत नाहीं. परक्यांच्या घरादारांच्या होळ्या केल्याशिवाय आपल्या राजसत्तेच्या महात्म्याची दिवाळी साजरी होत नाहीं. बळी तो कानपिळी. कमदगलबाज ऊर्फ बेअक्कल लोकांनीं सवाईसोट्या दगलबाज लोकांच्या सत्तेखालीं निमूटपणें चेचले जावे, हा निसर्गाचा दण्डकच आहे. तात्पर्य, दगलबाजी हा यच्चावत् सर्व राज्यसंस्थापकांचा मुख्य सद्गुण आहे. हा सद्गुण ज्यांच्या आंगीं विशेष, तेच पुरुषोत्तम प्रत्येक देशाच्या नवमन्वंतराचे शककर्ते म्हणून इतिहासांत चिरंजीव होऊन बसले आहेत. विश्वासघात बेइमान खून अत्याचार जाळपोळ इत्यादि गोष्टी पौराणिकी ग्रंथांच्या किंवा शाब्दिक वादाच्या क्षेत्रांत अत्यंत अमानुष मानलेल्या असल्या, तरी राजकारणी क्षेत्रांत त्यांची सद्गुणांत गणना होत असते.

शांतीसाठीं महायुद्ध

ही शब्द योजनातरी किती परस्परविरोधी? रक्तपात टळावें म्हणून रक्तपात. चोऱ्या बंद व्हाव्या म्हणून घरादारांच्या होळ्या. राजावर प्रेम करावयास शिकविण्यासाठीं राजद्रोहाच्या खटल्यांचीं सत्रें. हीं वाक्ये सकृद्दर्शनी नागव्या विरोधाभासाची दिसतात. पण त्यांतच वास्तवीक राजकारणी दगलबाजीच्या सद्गुणांचे खरें बीज आहे. नदीच्या मुळाप्रमाणें आणि ऋषीच्या कुळाप्रमाणें कोणत्याहि राजसत्तेचें मूळ शोधण्यांत अर्थ नाहीं. या मुळांत कसकसलीं खतें पडलेलीं असतात, त्याचें पृथ:करण भल्यानें करू नये म्हणूनच राजकारणपटु आंग्लमुत्सद्दी एडमंड वर्क यानें 'सर्व राजसत्तांच्या उगमांवर पावित्र्याचा पडदा सोडून देणेंच श्रेयस्कर आहे.' असा इषारा दिलेला आहे.

राजकारणांत कितीहि घातपात आणि दगलबाजी असली, तरी अखेर तें विजयी व्हावें लागतें. तें विजयी झालें तरच त्या दगलबाजीवर आणि घातपातावर पडदा पडतो. इंग्रजींत एक सूत्र आहे :- One murder makes a villain, thousands a warrior. एक खून केला कीं माणूस खुनी ठरतो, आणि त्यानें हजार खून पाडले कीं तो वीर योद्धा म्हणून गणला जातो. या छोट्या सूत्रांत बडा वेदान्त आहे. स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं राजकारणी दगलबाजीनें झगडणाराला यशापयशाची पर्वा नसली, तरी त्याची हमी देतां येत नाहीं. बोलून चालून ती सट्टेबाजी. सरळ पडे दान, त्याची जगांत ताठ मान; दान पडे वाकडे, त्याच्या जिवावर साकडे. यंग टर्की नावाची एक पार्टी काढून राज्यक्रांति करूं पाहाणारा केमालपाशा सुरवातीला 'अपस्टॉर्ट अनार्किस्ट' उपटशुंभ बंडवाला म्हणूनच मानला गेला होता. पण त्याच्या शिवकंदर नशिबानें त्याच्या तलवारीला सरळ दान देतांच, आज त्याचा महिमा केवढा वाढला तो पहा आणि वाकडे दान पडलेल्या रिफांचा पुढारी अबदुल करीम याची काय अवस्था झाली ती पहा. दोघांचे उद्देश एकच. दोघेहि मर्द लढवय्ये. दोघेही पट्टीचे राजकारणी दगलबाज. पण यशापयशाच्या चढत्यापडत्या झोल्यांत एक 'जवानमर्द मुस्तफा' बनला आणि दुसरा बाबू चष्मेवाल्याच्या सदरांत पडला! एवढा मोठा शककर्ता चक्रवर्ति नेपोलियन. साऱ्या युरपांतले राजेशाहीचे मुकूट टाचेखालीं चिरडणारा लोकशाहीचा प्रणेता. पण अखेर स्वदेशद्रोह्यांच्या कारस्थानामुळें वाटरलूच्या समरांगणावर त्याचें हुकमी दान हुकतांच इंग्रेज जेत्यांनीं त्याची कशी विल्हेवाट लावली? इंग्रेजी राजनीतीचें खरें स्वरूप या एकाच गोष्टीवरून फार स्वच्छ कळून येते. हिंदूंची राजनीति पडत्या प्रतिस्पर्ध्याचा सन्मान राखते, तर प्रतिस्पर्धी पराभूत होतांच आंग्ल राजनीति त्याला रसातळाला नेते. भारतीय महायुद्ध संपल्यावर विजयी पांडवांनीं धारातीर्थीं पतन पावलेल्या कौरवांना श्रद्धापूर्वक तिलांजुली व पिंडदान केलें. इंग्रजांच्या सांस्कृतिक

इतिहासांत श्रद्धेची ही भावनाच नसल्यामुळें, ते कधीं आपल्या पराभूत प्रतिस्पर्ध्याला पिंडदान तर करणार नाहींतच, पण दुसरा कोणी तें करील तर तेंहि त्यांच्या प्रवृत्तीला परवडत नाहीं. नेपोलियन, जोन ऑफ आर्क, शिवाजी वगैरे थोरथोर राष्ट्रवीर वीरांगनाबद्दल आंग्लेतिहासकार जे इतक्या क्षुद्रतेचे आणि उपहासाचे उद्गार काढतात, त्याचें मूळ या त्यांच्या आनुवंशिक संस्कृतींत आहे. आजला प्रत्येक देशी संस्थानाकडे क्षुद्रतेच्या दृष्टीनें पहाण्याची जी एक प्रवृत्ति खुद्द हिंदु लोकांतच फैलावली आहे, ती सुद्धां या इंग्रेजी आनुवंशिक संस्कृतीच्या शाबरी सांसर्गाचाच परिणाम होय. आयर्लंडच्या भवितव्यतेंत क्रांति घडविणारा डि व्हॅलरा आणि इटलीच्या भाग्याची घटना करणारा मुसोलिनी यांच्याविषयीं नित्य बाहेर पडणारे आंग्लोद्गार विचारांत घेतल्यास, परोत्कर्षणहिष्णुता आणि इंग्रेजी मनोवृत्ति यांची छत्तिशी स्पष्ट सिद्ध होते. या छत्तिशींत शिवाजी दगलबाज ठरला तर त्यांतहि त्या राष्ट्रवीराचा सन्मानच होत आहे. कारण

शिवाजी विजयी दगलबाज होता

हिंदुस्थानांत एक वेळ दगलबाज आर्यांनीं कमलगलबाज अनार्यांना पादाक्रांत केले. त्यानंतर, हिंदु राज्यकर्त्यांची दाणादाण उडवून मोंगलानीं आपली दगलबाजी वरचढ ठरविली. पुर्तुगेज फ्रेंच डच व इंग्रेज यांमध्येंहि परस्पर दगलबाजीच्या शर्यती लागून, त्यांत अखेर इंग्रेजांचा घोडा पहिला आला. कांही वर्षें दख्खनच्या मुसलमानी शाह्या 'आम्ही पट्टीचे दगलबाज' म्हणून महाराष्ट्रभर आपल्या सत्तेचा धुमाकूळ घालीत होत्या. शिवाजीनें बोलबोलतां त्या सत्तेला उध्वस्त करून खुद्द दिल्लीच्या काळजाला हात घातला आणि मुसलमानांपेक्षां आम्ही

मऱ्हाठे दिढी दुपटी दगलबाज

आहोंत, याची जाहीर नौबद रायगडावरून ठोकली. पुढें मऱ्हाठशाही दगलबाजीचा धौशा पेशव्यांनीं थेट अटकेला नेऊन भिडविला. अखेर इंग्रेजांच्या मार्जार-तपश्चर्येवर नियतिदेवतेची बहाल मर्जी झाली. त्यांनीं मऱ्हाठे मोगल शीख रजपूत इत्यादि सर्व दगबाजोपदगलबाजांना आपल्या तंत्रशक्तीनें चीत करून, ब्रिटीश सत्तेच्या बिनमुखी स्थापनेनें, चालूं युगांत

इंग्रज म्हणजे दगलबाजाग्रणी

ऊर्फ मास्टर डिप्लोमॅटस् हा सिद्धांत बिनतोड प्रस्थापित केला. आज इंग्रेजांच्या दगलबाजीला जोड नाहीं आणि तोडहि नाहीं. आज तिला अवघे त्रिभुवन थोकडें पडलें आहे. सर्व जगांतलें राजकारण आज इंग्रेजी दगलबाजीच्या पाणपोयीवरच आपल्या उलट सुलट पेचांचें पाणी पीत असते या पाण्याला पाणी पाजण्याचें पाणी आज कोणांतही नसल्यामुळें, इंग्रजेतर सर्व राष्ट्रें पाण्यापेक्षा पातळ झालेली आहेत. आज पाश्चिमात्य इंग्रेज लोक ठरवतील ती पूर्व ठरत आहे. ब्रिटीश साम्राज्याचा हा विस्तार व दरारा प्रस्थापित करण्याच्या कामीं लक्षावधि इंग्रेजांनीं स्वार्थाचा होम केलेला असल्यामुळें, त्याच्या पायांत पडलेल्या अनंत अत्याचारांना व घातपातांना आज मानवी स्मृति कवडीचेंहि महत्व देत नाहीं.

यावर कित्येक अशी शंका काढतील कीं जीं कर्मे नीतिग्रंथात अकर्मे अथवा कुकर्मे म्हणून गणलीं जातात, तीं उघड माथ्यानें आचरून, नरपति हयपति छत्रपति चक्रवर्ति इत्यादि अत्युच्च पदाला पोहचणाऱ्या पुरुषांना थोर कां मानावें? केवळ ते जबरदस्त सत्ताधीश बनतात म्हणून कीं काय?

नीति न्याय सदाचार यांना लाथाडून मिळविलेल्या श्रेष्ठ पदाची महति जगानें काय म्हणून वानावी, आणि इतिहासानें ती मानावी? हव्या त्या अमानुष अत्याचारांवर व घातपातांवर केवळ राजकारणाची सफेदी चढतांच त्यांच्या क्रौर्याची आणि राक्षसीपणाची तीव्रता वितळून जाते, तर मानवतेची सुरक्षितपणा म्हणजे एक भयंकर धोक्याचा सौदाच म्हटला पाहिजे ! वाटेल तें कुकर्म राजकारणाचा शिक्का पडतांच चलनी नाण्याप्रमाणें जर जगाच्या बाजारांत बिनतक्रार चालतें, तर

नीतिशास्त्र म्हणजे नाटक का तमाशा?

सत्कर्म तें सत्कर्म आणि बदकर्म तें बदकर्म ! सकृद्दर्शनीं ही शंका वाजवी दिसते. परंतु - त्यांत एक 'परंतु' आहे आणि या 'परंतू' चें कोडें शेकडां ९९ प्रापंचिकांना उलगडत नसल्यामुळे, कर्म कोणतें आणि अकर्म कशाला म्हणावे, याचा समाधानकारक निर्णय त्यांना लावतां येत नाहीं. संसाराच्या रोजच्या क्षुद्र दलामलींत सुद्धां 'हें बरें का तें खर' 'असें करू का तसें करूं' आणि 'कसें करूं काय करूं' याचा माणसाला उलगडा होत नाहीं. मोठमोठ्या पंडितांचीहि निर्णयशक्ति पुष्कळ वेळां लजूर पडते. अशा वेळीं मोहग्रस्त माणूस वाटेल त्यावर वाटेल ते आरोप करून, आपल्या संशयी मनाचें कसें तरी समाधान करून घेतो. अहिंसा, सत्य, अरतेय, कायावाचामनाची शुद्धता आणि इंद्रिय-निग्रह हीं पांच सनातन नीतिधर्माचीं तत्वें खरीं; परंतु, त्यांच्याहि आचरणांत अपवादांचीं अनेक स्थळें आहेत. सामान्य नियम आणि अपवाद यांचा पायाशुद्ध आणि विवेकमान्य विचार नीतिशास्त्रानें मुळींच केलेला नाहीं, असें खास नव्हे. अहिंसा परमो धर्मः ही गोष्ट कितीहि खरी असली, तरी जगाच्या व्यवहारांत कर्तव्याची अशी अनेक क्षेत्रें आहेत कीं तेथें, हिंसा हाच परम धर्म ठरविणें प्राप्त असते; आणि नीतिशास्त्र त्यालाच आपली मान्यता देते. हा विषय थोडक्यांत सांगता येण्यासारखा नाहीं. त्यासाठीं वाचकांनीं स्वतंत्र स्वाध्यायच करणें अगत्याचें आहे. संसार-मग तो एका कुटुंबाचा असो, वा विशाळ राष्ट्राचा असो - त्यांत नित्य भेटणाऱ्या कर्माऽकर्माची त्रांगडी कशी सोडवावी, याचा बाल-बोध उलगडा अखिल मानवतेला व्हावा, एवढ्याच साठीं

श्रीमद्भगवद्गीताशास्त्र अवतरलें

आहे. सर्व उपनिषद्रूपीं कामधेनूंचें अमृतमय दुध घुसळून, श्रीकृष्ण भगवंतानें गीतारूपीं आत्म प्रबोधक नवनीत काढलें. कै. बाळ गंगाधर टिळक यांनीं अत्यंत कुशलतेनें त्या नवनीतांत आपल्या अलौकिक बुद्धीमत्तेची पत्रीची खडीसाखर मिसळून 'गीतारहस्य' नामक स्वादिष्ठ आणि खमंग असा षोडस रसी मावा तयार केला. त्यांतील 'कर्मजिज्ञासा' हें दुसरें प्रकरण वाचकांनीं मननपूर्वक वाचून, आमच्या पुढील विवेचनाची संगति राखावी, अशी प्रार्थना आहे.

शेक्सपियरच्या हॅमलेटला गीताशास्त्राचें पाठबळ नव्हते, म्हणून त्याच्या 'जगावें कां मरावें?' या शंकेचें पर्यवसान दुःखपर्यवसायी झालें. हिंदुजन गीतेशी बेइमान झाले, म्हणून आज ते साऱ्या जगाच्या पखालीचे बैल बनले आहेत. प्रत्येक राष्ट्रसंसाऱ्यापुढें 'जगावें का मरावें?' हाच प्रश्न नेहमीं पडत आलेला आहे आणि तो सोडविण्याच्या कुशलतेनेंच त्या त्या राष्ट्राच्या उन्नति अवनतीचा इतिहास रंगविलेला आहे. आज प्रत्येक गुलाम राष्ट्रापुढें हाच प्रश्न आहे आपल्यापुढें तोच आहे. शिवाजीपुढें तोच होता आणि अर्जुनापुढेंहि तोच होता. अर्जुनाला सुद्धां कर्म कोणतें आणि अकर्म कोणतें, हाच मोह पडला होता. त्याचें मन साधुत्वाच्या कल्पनेनें वितळूं लागलें होतें. आणि राजकारणपटु मुत्सद्याग्रणि श्रीकृष्णानें वेळींच त्याच्या भ्रमाचें निरसन

केलें नसतें, तर अर्जुनाच्या कपाळीं नामर्द षंडत्वाचा काळिमा कायमचा लागला असता. भारतीय महायुद्ध हिंदूहिंदूंतलें होते. एकाच राजघराण्यांतल्या दोन 'चुलत' तटांतलें होते. आप्तस्वकीयांतील रक्तपाताचा प्रसंग. कौरव किंवा पांडव यांपैकीं कोणातरी एकाचा विध्वंस झाल्याशिवाय भरतखंडाच्या राष्ट्रीय भवितव्यतेचा महत्वाचा प्रश्न सुटणारा नव्हता. अर्जुनाच्या समोर सारा गोतावळा युद्धासाठीं सज्ज उभा. भीष्म द्रोणासारखे पूज्य गुरुवर्यहि सामन्याला समोर. अहिंसा परमो धर्म:! मग यांच्यावर शस्त्र चालवावें कीं नाहीं? हा सारा गोतावळा ठार मारून मी मिळवणार काय? भारत-साम्राज्य? त्यापेक्षां संन्यास काय वाईट? युद्धांतील रक्तपात व अत्याचार हें कर्म का अकर्म? असल्या लौकिकी विचारांनीं अर्जुन भांबाऊन गेला. त्याला राजकारणी दगलबाजी म्हणजे मोठें पाप वाटूं लागलें. तो साध्या संसारी माणसाप्रमाणें महायुद्धाच्या उद्देशाकडे व त्यांतल्या अत्याचारांकडे पाहूं लागला. त्यामुळें नीति न्याय धर्म सत्य यांची विकृत रूपें त्याला दिसून, कर्तव्याकर्तव्याचा त्याला विवेकच उरला नाहीं. मिथ्या साधुत्वाच्या कल्पनेनें अर्जुनाच्या पौरुषत्वाला अविवेकाची लागत असलेली वाळवी झाडण्यासाठीं श्रीकृष्णाला कितीतरी प्रयत्न करावे लागले. नीति सांगितली, विवेक पढवला, अखेर दगधाटी सुद्धां केली, तेव्हां कोठे हे सव्यसाची धनंजय युद्धाला प्रवृत्त झाले. आता शिवाजीकडे पहा. ''हिंदवी स्वराज्य व्हावें हें श्रीच्या मनांत फार आहे'' या ध्येयाच्या सिद्धीसाठीं झगडतांना शिवाजीवर अनेक प्राणघातक व ध्येयविध्वंसक प्रसंग आले. परंतु, प्रत्येक मुकाबल्याला तो आपल्या कर्तव्याचा मार्ग स्पष्ट आखूनच त्याला स्वत: बेधडक तोंड देत गेला. शाहिस्तेखानावरील मुकाबला घ्या, अफझुलखानाच्या दगेबाजीवर केलेली मात घ्या, शहाजी राजाच्या सुटकेसाठीं केलेलं कारस्थान घ्या, काय वाटेल तो प्रसंग घ्या, 'यांत कर्तव्याची स्पष्ट कल्पना करून निधड्या छातीनें शिवाजी त्याचा फडशा पाडीत गेला. अर्जुनाप्रमाणें शिवाजी कधीं भांबावला नाहीं. कधीं संन्यास घ्यायला उठला नाहीं.

बगलबाज अर्जुन आणि दगलबाज शिवाजी

या तुलनेंत विचारांचें ब्रम्हांड आहे. भारतीय समरभूमीवरील अर्जुन आणि प्रतापगडावर अफझुलखानापुढें उभा ठाकलेला शिवाजी, यांची तुलना केली, तर अर्जुनापेक्षां शिवाजी शतपट श्रेष्ठ ठरतो. काकामामा आप्पाबाबा यांना कसें मारूं, या क्षुद्र कल्पनेला बळी पडून, विहित कर्तव्याला बगल मारून पळूं पाहणारा बगलबाज अर्जुन पहा आणि भेटीचे ढोंग करून दगा देण्यास आलेल्या दगलबाज अफझुलखानाला त्याच्याच युक्तीनें गारद करणारा कर्तव्यतत्पर सवाई दगलबाज शिवाजी पहा, म्हणजे कर्तव्याकर्तव्याचें कोडें थोडें तरी सुटेल. अफझुलखान ठार मारल्याशिवाय किंवा त्याच्या हातीं शिवाजी जिवंत किंवा मेलेला सांपडल्याशिवाय, त्या मुकाबल्याचा निर्णयच लागणार नव्हता. अर्थात् शिवाजी मारीन किंवा मरेन असा अटीतटीचा सामना देण्याच्या तयारीनेंच प्रतापगड चढला; आणि त्याच्या अलौकिक प्रसंगावधानानें त्यानें अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली. हिंदवी स्वराज्याच्या प्राणप्रतिष्ठेसाठीं स्वत:चा प्राण देणें अथवा अफझुलखानाचा प्राण घेणें, यापेक्षां तिसरा मार्गच शिवाजीपुढें नव्हता. अर्थात् तें कर्तव्य त्यानें मोठ्या कुशलतेनें पार पाडून, 'योग: कर्मसुकौशलम्' या गीतोक्तीप्रमाणें राजकारणी

दगलबाजांतील योगीराज

ही आपली कीर्ती जगजाहीर केली. श्रीकृष्णानें गीता सांगितली अर्जुनाला, पण ती प्रत्यक्ष आचरणांत

आणून महाराष्ट्राचा राष्ट्रधर्म भगवद्गीतेंत आहे, हें सप्रमाण सिद्ध केलें शिवाजीनें. गीतेचे पांग पांडवांनी फेडले नाहींत. ते शिवाजीनें फेडले. महाभारतीय इतिहासाला आपल्या बुद्धिप्रभावानें रंगवून चिरंजीव करणाऱ्या दगलबाज श्रीकृष्णाला अर्जुनापेक्षां दगलबाज शिवाजी हाच खरा शिष्य व अनुयायी लाभला, यांत मुळींच संशय नाहीं. अर्थात् ''यत्न योगेश्वर: कृष्ण:'' हा श्लोक या पुढें -

यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र शिवराय भूपति ।।

तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मातिर्मम ।।

असाच वाचला पाहिजे. बोला - दगलबाज शिवाजीचा जयजयकार.

□□□

टिपण

सत्य चिरडलें जात नाहीं

सत्याचा विजय झालाच पाहिजे. चालूं वर्षाच्या २ ऱ्या अंकांत (पृ. ५५ ते ६४) सातारचे भाऊराव पाटील यांचा परिचय म्हणून त्यांच्या चरित्राचा पूर्वार्ध प्रबोधनांत प्रसिद्ध झाला. त्यांत 'कोल्हापुरी राजकारणी गण्डांतर' आणि 'कोल्हापुरी पोलीसांचे अत्याचार' या दोन प्रकरणाबाबत, मुंबई सरकारच्या सूचनेवरून पुण्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट साहेब यांनीं आम्हाला भेटीस बोलावून, कोल्हापूरच्या माजी शाहू छत्रपतींची आम्ही अप्रतिष्ठा केल्याबाबद, आम्हाला ताकीदवजा इषारत दिली. त्याचीहि हकिकत खुलासेवार अंक ४ मध्यें (पृ. १३३-१४०) 'संपादकीय खुलासा' या मथळ्याखालीं वाचकांस श्रुत केली. मूळ लेख व त्यांतील तपशील आम्ही इतका काळजीपूर्वक आणि संपादकीय तोल सांभाळून लिहिला होता कीं फक्त मूळ संविधानकाकडेच अवधान ठेऊन, शक्य तोंवर भाऊराव प्रकरणांतील दोषी जिवंत अधिकाऱ्यांचा नामनिर्देश करण्याचें आम्ही मुद्दामच टाळलें होतें. आम्हाला डांबर प्रकरणाचा इतिहास कांहीं लिहावयाचा नव्हता; फक्त भाऊरावच्या चारित्र्याची उभारणी दाखवितांना, ती दुर्दैवी कोल्हापुरी कहाणी सत्याला धरून कथन करणें ओघानेंच क्रमप्राप्त होतें. आम्हांला कै. शाहू महाराजांची निष्कारण नालिस्तीहि करावयाची नव्हती. त्याच प्रमाणें केवळ दैवयोगानें कोल्हापुरांत कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् थोर पदावर अवचित चढलेल्या रावबहादुर आण्णासाहेब लठ्ठे यांच्या विषयींहि क्षुद्र भावना व्यक्त करणारे अगर त्यांची निंदा करणारे एक वाक्यहि त्या लेखांत वाचकांना आढळणार नाहीं. परंतु, भाऊराव चरित्र प्रसिद्ध होतांच कोल्हापूर-मुंबई-पुणें येथील जबाबदार राजकारणी यंत्रांमध्यें जी थोडीशी अज्ञात रूपाची विज्ञापना घडली, तिच्या कुळामुळाचा पत्ता जरी लागणें आज शक्य नसलें, तरी प्रबोधनानें प्रसिद्ध केलेल्या भाऊराव पाटलावरील 'कोल्हापुरी पोलीसांच्या अत्याचारा'चा तपशीलवार नांवनिशीवार स्पष्ट पुरावा नुकताच कोल्हापुर सिटी मॅजिस्ट्रेट नं. १ च्या कोर्टांत पुढें आला आहे. सात आठ वर्षांपूर्वीं कोल्हापूर जेलमधून पळालेला (किंवा पळूं दिलेला) दामू जोशी नुकतांच पकडला गेला. त्यानें दिलेल्या जबानींत पुष्कळ कोल्हापुरी गौप्यांचें स्फोट झालेले आहेत. त्या सर्व भानगडीशीं आम्हांला कांहींहि कर्तव्य नसल्यामुळें, फक्त भाऊराव पाटलाबद्दलच जेवढा खुलासा दामू जोशी यानें केला आहे, तेवढाच येथें 'विद्याविलास' (साप्ताहिक कोल्हापूर, अंक १४ वा, ता. ३-६-२७) वरून

उद्धृत करीत आहों. वाचकांनीं हा तपशील आमच्या मूळ लेखांशीं ताडून पाहिल्यास प्रबोधनानें निर्भेळ सत्य-कथनापेक्षां अन्य कोणताहि गुन्हा केलेला नव्हता, हें दिसून येईल.

''...त्यानंतर जैनबोर्डिंगमधील ऐतवडेचा भाऊ पाटील नांवाच्या मुलाला सी. आय्. डी. ऑफिसमध्यें पागे आणि फरन्यांडीस यांनीं बोलावून आणलें होतें. तो घाबरला व परसाकडेला जाण्याच्या निमित्तानें एक पोलीस बरोबर घेऊन बाहेर गेला व विहीर जवळ आहे, तेथें त्यानें उडी घेतली. त्यानंतर त्यानें आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न केला म्हणून ४ महिन्यांची शिक्षा दिली. तो जेलमध्यें आल्यानंतर फरन्यांडीस व पागे यांनीं त्याला व मला बोलावून सी.आय.डी. ऑफीसमध्यें म्हणजे कावळ्याचे बंगल्यांत नेलें. त्याला त्रास दिला व प्रो. लठ्ठे यांनीं डांबर लावावयास सांगितलें असें सांग. त्यानंतर मला सोडून द्यावयाचें आमिष दाखविलें व या मुलाला असें शिकीव असें सांगितलें. पुन: जेलमध्यें परत पाठवून दिलें व माझ्याच कोठडींत रहावयाची त्याची सोय केली. त्यावेळीं जेलर बाबा गोखले होते. त्यांनीं त्या जैनाच्या मुलाला त्रास द्यावयास सुरुवात केली. सी.आय.डी. ऑफीसमध्यें आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला; परंतु आतां जर त्रास द्याल तर डोकें आपटून प्राण देईन असें म्हणाला, म्हणून त्याला हातबेडी घालून गजाशीं बांधून ठेवलें. त्यावेळेस तो घाबरला व रडू लागला. त्यावेळीं मी सांगितलें की, रडूं नकोस, भिऊं नकोस. आपण महाराजांना अथवा एजंट साहेबांना भेटण्याची कांहीं तरी तजवीज करूं असें सांगितलें. ज्या वेळेस बाबा गोखले, फरन्यांडीस, पागे हे भेटतील त्यांचे म्हणण्याप्रमाणें कबूल करावयाचें व महाराजांच्या पुढें किंवा एजंट साहेबांच्या पुढें खरी हकीकत सांगण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें इन्फंट्रीच्या १।२ जमादार साहेबांबरोबर मी रेसिडेंटला निरोप कळविला. त्यावेळेस कर्नल वुडहाऊस रेसिडेंट होते. त्यांनी बोलावलें असतांना मला दरबारकडून परवानगी मिळाली नाहीं. भाऊ पाटलाला मात्र बोलावून नेलें. त्यावेळेला सुपीक डोक्याच्या या दोन माणसांनीं, एजंट साहेबांसमोर प्रो. लठ्ठे यांच्यावर फौजदारी केस केली होती. भाऊ पाटलाची रेसिडेंट साहेबानीं सर्व हकीकत ऐकून घेतली. त्या दिवशीं भाऊ पाटलाला सोडून दिलें. हें सगळें बनावट आहें असें समजून प्रो. लठ्ठे यांच्यावरची केस काढून टाकली...''

□□□

लेख

नांव शिवाजीचें घ्यावें । पुढें पाऊल टाकावें ।।

(ता. ३ मे १९२७ रोजीं जांबावली गोवा येथें श्रीशिवजयंति उत्सवप्रसंगी प्रबोधनकार श्रीयुत ठाकरे यांनीं दिलेल्या व्याख्यानांतील एक भाग, मराठा गायक समाजाची परिषद गोवे सरकारच्या हुकमावरून ऐन घटकेला बंद पाडण्यांत आल्यामुळें, गायक समाजांत साहजिक पसरलेल्या शोकपूर्ण निराशेला अनुलक्षून हे उद्गार आहेत, एवढा संदर्भ दर्शविला म्हणजे पुरें.
मोतीराम बी. जांबावलीकर, म्हापसे, गोवा)

''**मनुष्य** पुष्कळ योजना करतो. पण देवाच्याहि कांहीं निश्चित योजना असतात. कित्येक प्रसंगीं ओठाशीं पेला लागणार, तोंच ती चटकन् गळून पडतो आणि फुटतो. नजरेला स्पष्ट दिसणारें यश क्षणार्धांत धुक्याप्रमाणें वितळून नष्ट होतें. सुखाच्या आशेनें हात वर करावे तों त्यांना दु:खाची झाळ लागून ते पोळतात. आपण दैवाला आणि देवालाहि दोष देतो. निराशेनें खचतो. आपली हिंमत लंजूर होते. सर्वत्र अंधार पसरतो. करणार होतो काय, आणि झालें काय आणि पुढें होणार काय? या विचारानें मनाला सुद्धां दगडासारखी बधिरता येते. मानवी प्रवृत्ति अशीच असते. अशा तीव्र निराशेच्या घडीला शांतपणें विचार करावा कीं योजिलेली घटना बिघडविण्यांत परमेश्वराची योजना काय असावी? त्या परमदयाळू जगज्जननीची इच्छा काय असावी? तिचा न्याय काटेकोर. तिचें प्रेम महासागरासारखें सर्वव्यापी, अखंड उचंबळणारें, अनंत आणि सनातन. माझा नाश व्हावा, माझ्या लोकहितवादी मिशनचें वाटोळें व्हावें, अशी त्या माऊलीची इच्छा कशी असेल? नाहीं नाहीं, कदापि नाहीं. मजवर संकटें पाठऊन ती मला कसाला लावीत आहे. संकटांच्या आघातांनीं ती माझी पाठ कुरवाळीत आहे. क्लेशांच्या यांतनेंतून ती माझ्या जीवनाची शुद्धी करीत आहे. माझी मानवी योजना पालथी पाडून, दैवी योजनेसाठीं ती माझ्या कर्तव्याची भूमि आरपार नांगरून तिच्या सुपिकपणाची तयारी करीत आहे. हे जगज्जननी, मला संकटांतला तुझा गुप्त संदेश स्पष्ट कळूं दे. अशी आपण प्रार्थना करावी, म्हणजे आपली लजूर झालेली हिंमत खडबडून चैतन्ययुक्त होईल. निराशेचा पगडा जागच्या जागी चीत होईल. सभोंवार पसरलेल्या घनदाट अंधारांत पारमेश्वरी कृपेचा शोधनप्रकाश आपल्या हृदयावर चमकूं लागेल, आणि

आपल्या कर्तव्याच्या मार्गावर भरधांव धांवण्याचे सामर्थ्य आपल्या सर्व अवयवांत संचार करूं लागेल. मराठा गायक समाज माणुसकीसाठी धडपडत आहे. त्याला परमेश्वराच्या पावित्र्याची तहान लागली आहे. तो अंधारांतून प्रकाशांत येऊं पहात आहे. अखिल सृष्टीला वंद्य अशा स्त्रीवर्गाची होत असलेली बीभत्स विटंबना त्याला रसातळाला न्यावयाची आहे. बेशरम हिंदू समाजांतला स्त्रियांचा शरीरविक्रय कायमचा बंद पाडण्यासाठी त्याला देवाच्या दरबारांत न्याय पाहिजे. त्यासाठी तो तनमनधनेंचसें काय, पण रक्ताचीहि आहुती देण्यास सिद्ध झाला आहे. मग, त्याने काय व्यावहारीक संकटांनी हताश व्हावें? मुळीच नाही. भगवंतावर भार टाका. ''मग तो लागूं नेदी शीण । आड घाली सुदर्शन।।'' संकटांचा अग्नि गिळणाऱ्यांनाच यशप्राप्ती माळ घालीत असते. प्रयत्नांत खंड पाडू नका. यत्ने कृते अपि न सिध्यति कोऽत्र दोषः? प्रयत्न हाच परमेश्वर, शिवरायानें याच परमेश्वराची अनन्य भावाने सेवा केली, प्राणांतिक संकटांचे आघात ईश्वरी प्रसाद समजून आपल्या मस्तकावर विनतक्रार सोसले. अफझुलखानाच्या मुकाबल्याचा विचार करा. मिळविले तेवढे गमाऊन, वर प्राणाचीहि आहुती देण्याचा तो प्रसंग! टाळाटाळ किंवा चुकवाचुकव करायलाहि सवड नव्हती. अशा प्रसंगी शिवरायानें आपल्या जीवन-कर्तव्याच्या बऱ्या वाईटाचा सर्व भार त्या जगज्जननी माऊलीच्या चरणी टाकून, प्रतापगडाची वाट धरली. आशा निराशा दूर झुगारून, कर्तव्याला कर्तव्यनिष्ठेनंच मिठी मारली आणि प्रसंगावधान राखून त्या सर्वस्वभक्षक मुकाबल्याचा न भूतो न भविष्यति फडशा पाडला. शाहिस्तेखानावरील छापा, पन्हाळगडचा कोंडमारा, त्यांतून सफाईंत निसटण्याची कर्तव्यशैली, इत्यादि अनेक प्रसंगांचा बारकाईने आत्मत्वाच्या जाणिवेनें विचार करा, म्हणजे परमेश्वरी लीलेंत आपल्या उद्धाराच्या कामीं, संकटांचा प्रसाद किती अमृतमय असतो, याचें तुम्हाला प्रत्यंतर पटेल. संकटांचा शरवर्षाव होऊ लागला कीं खास खूणगांठ बांधावी कीं आपल्या जीवनावर भगवंताची कृपादृष्टी बिनचूक वळली. ब्रह्मपदीं नाचावयाचें तर लोखंडाचेच चणे खाणें प्राप्त आहे. श्रीकृष्ण परमात्म्यावर अढळ निष्ठा ठेऊन, प्रसंगावधानपूर्वक आपण आपापली कर्तव्यें कुशलतेनें पार पाडण्यासाठी झगडूं या. शिवरायाचें चरित्र रात्रंदिवस आठवूं या. त्यावरच वाचन मनन निदिध्यासाची प्रामाणिकपणें तपश्चर्या करूं या. शिवराय सर्वांचे शिव करीलच करील. नांव शिवाजीचें घ्यावें, पुढें पाऊल टाकावें.''

□□□

लेख

गोवेकरीण

(मराठा गायक, समाजाच्या खास निमंत्रणावरून गेल्या मे महिन्याच्या पहिला आठवडाभर मी गोव्याची सफर केली. श्रीयुत मोतीरामजी जांबावलीकर, राजाराम कांत, आनंदराव काकोडकर वगैरे मित्रांसह अनेक महत्वाच्या ठिकाणीं फिरून, भेटी घेऊन, चर्चा करून, वेश्या संस्थेचें प्रत्यक्ष निरीक्षण केलें, त्या निरीक्षणाचे मजवर झालेले परिणाम हप्त्याहप्त्यानें वाचकांना श्रुत करीत आहे.)

केशव सीताराम ठाकरे.

हप्ता १ ला

'गोवेकरीण' या शब्दाच्या उच्चारांतच त्याचा सारा इतिहास हवा त्याला न सांगतां चटकन् कळेल, इतका तो लोकमान्य आहे. हा इतिहास किती वर्षाचा जुना आहे. त्याची उत्पत्ति कोणी कधी कशी केली, या वाटाघाटांचे आज कांही प्रयोजन नाही. आणि या इतिहास संशोधनानें हा प्रश्न सुटेल, असेहि नाहीं. अस्पृश्यतेप्रमाणेच 'गोवेकरीण' हें एक हिंदु समाजाचे दुर्दैवी करट आहे. त्याचे भयंकर परिणाम अखिल हिंदु समाज डोळे उघडे ठेऊन पहात आहे. त्याला त्याची लाज वाटत नाहीं. अस्पृश्यतेचेंहि मण्डन करायला ज्या हिन्दु धर्माला आणि समाजाला मनाची नसली तरी जनाचीहि शरम वाटत नाहीं, त्यानें गोवेकरणीच्या संस्थेकडे मुर्दाड दृष्टीनें नुसते टकमक पहाण्यापलीकडे अधिक काय करावें? वेश्योद्धाराचा प्रश्नहि आज अगदीं नव्यानेंच पुढें आला आहे, अशांतला भाग नाही. अनेक इंग्रेजी व मराठी लेखकांनी गोवेकरणींच्या चारित्र्याचीं रसभरीत वर्णनें प्रसिद्ध करून, आपल्या विद्वत्तेची लहान मोठीं प्रदर्शनें थाटलेली पुष्कळांनी पाहिली असतील. परंतु, प्रत्यक्ष उद्धाराला मात्र हात कोणीच घातलेला नाहीं. नाहीं म्हणायला, मुंबईची सोशल सर्विस लीग गेलीं पांच सहा वर्षे मुंबई बेटांत कायावाचामनेंधनें प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. आणि त्या मानाने थोडें फार यशहि तिनें मिळविलें आहे. पण लीगचा प्रयत्न विषवृक्षाच्या वरवरच्या फांद्या पालवी छाटण्यासारखा आहे. मूळावरच घाव घालून हा वृक्षच उखडून टाकण्याचें काम तिच्या क्षेत्राबाहेर आणि आटोक्याबाहेरचें आहे. किल्ल्यावर बाहेरून भडीमार पुष्कळ केला, तरी आंतून दारूगोळ्याचें कोठारच पेटविल्याशिवाय तो जमीनदोस्त

होणें शक्य नाहीं विषगंगेच्या उगमापाशीच पाटबंधारा घातल्याशिवाय नुसत्या मुबई-महासागराजवळ केलेली धडपड फारशी यशस्वी होणार नाही, असा माझा प्रामाणिक समज आहे

गोमान्तक, का गोम अन्तक ?

गोवा प्रांताला गोमान्तक अशी एक दुसरी संज्ञा आहे. परंतु, त्या ठिकाणी वेश्यावृत्तीची चालूं असलेली पैदास, जोपासना, वृद्धी आणि व्यापार पाहिला कीं चित्त प्रक्षुब्ध होऊन, हिंदुत्वाची आणि हिंदु धर्माची लाज वाटूं लागते. गाई म्हशीप्रमाणें अज्ञान व तरूण स्त्रियांचा शरीरविक्रयासाठीं सुरू असलेला उघडा बाजार पाहून हा प्रदेश गोमान्तक का गोमाता-अन्तक ? अशा विचारांचे काहूर मनांत उसळलें. विद्यार्थी दशेपासून मनांत परिणत झालेला स्त्रीजातीबद्दल पावित्र्याचा आदर आणि कविजनांनीं स्त्रीवर्गाबद्दल उत्फुल्ल हृदयानें गायिलेल्या कौतुकपूर्ण कवनांतील नितांत रम्य कल्पनांचे परिणाम, या साऱ्या गोष्टी या गोमान्तकांत उकीरड्याच्या भावानें विकल्या जातात अं! वेश्यावृत्ति बरी का वाईट, हा प्रश्न घटकाभर बाजूला ठेवला, तरी वंशपरंपरेनें वेश्यावृत्ती चालविणारी अफाट लोकसंख्येची एक ठरावीक हिंदु 'जात' गोव्यांत निर्माण झालेली असावी, ही हिंदु समाजाला एक बदनामीची गोष्ट होय. गोमान्तक म्हणून मिरविणाऱ्या गोव्यांत बाजलेली ही भयंकर गोम सर्व प्रबुद्ध हिंदू भगिनी बांधवांना दिसत असूनहि, तिचा अंत करण्याची बुद्धी कोणालाहि होऊ नये; एकाहि भट भटेतर वृत्तपत्रांत या विषयी लोकमतजागृतीचा निकराचा प्रयत्न होऊ नये; एकाहि शुद्धि संघटनवाल्याचे लक्ष या हिंदु भगिनींच्या तनुविक्रयाकडे वळू नये; या गोष्टी मला तरी मनस्संतापकारक अशाच वाटतात. आजपर्यंत अनेक देभ वीरपीर लेक्चरबाजीसाठी गोव्याच्या सफरीवर गेले आणि आले. पण एकालाही हा 'गोवेकरणी' चा प्रश्न कधीं सुचला नाहीं का बोचला नाहीं. बरोबरच आहे. त्यांची सारी भरारी वरच्या वातावरणांत आणि स्वजातीय भटांच्या भातावरणांत ! व्याख्याने आख्यानें पुराणें प्रवचनें मानपान हारतुरे फंड इत्यादि महान् राष्ट्रकार्यांत ते गाडून पडायचे. इतकेंच नव्हे, तर आपल्या सारस्वत मित्रांसह देवळ्या देवांचीं देवस्थानें पहायला गले, तर तेथल्या गोवेकरणींच्या चार दोन आलाफी ऐकून, त्यावरहि अभिनंदनाचें प्रवचन झोडायला ते हटकून विसरायचे नाहीत.

ब्रिटीश हद्दीतील देभ व वृत्तपत्रें सोडलीं, तर पुढारपणाचा आणि संस्कृती-श्रेष्ठत्वाचा जन्मसिद्ध मक्ता घेतलेला अफाट सारस्वत ब्राम्हण समाज खुद्द गोव्याभर पसरलेला आहे. गोव्यांतील हिंदु चळवळींचा व वृत्तपत्रांचा सारा मक्ता त्यांच्याच हाती. त्यांनी तरी या प्रश्नाचा कांहीं उठाव करावा? हरा शिवा गोविंदा! तीं सुद्धां सगळी इकडच्याच भटी राजकारणाच्या खुराड्यांतलीं पिलें. गोव्यांतला सारस्वत म्हणजे इकडच्या चित्पावनांचा समगोत्री दादा ! एरवीं, मासळी बाजारांत इतर सर्व भटेतरांबरोबरच सरंगा पॉफ्रेट खेंगटासाठीं हे दादा जरी एकचित्त व एकवित्त दररोज जमत असले, तरी सामाजिक धार्मिक क्षेत्रांत दादा कैलासवासी तर इतर सारी दनिया पाताळवासी, हा भेद जाज्वल्य असायचाच. विशेषतः वेश्या संस्थेच्या (उत्पत्तीच्या कदाचित् नसला तरी) अस्तित्वाच्या मर्माच्या पुण्याईशीच गोमांतकस्थ सारस्वत भूदेवांचा बराच नाजूक असा धार्मिक संबंध येत असल्यामुळें, गोमांतकी बामणी पत्रांनीं या प्रश्नाची चर्चा करणें म्हणजे निष्कारण आपल्या पायांवर धोंडा उलथून घेऊन, स्वजातियांच्या रोषाला बळी पडण्यासारखें आहे. उलट, अलीकडे एका कलमास्त्रमंडित भूदेवानें मराठा गायक समाजाच्या आत्मोद्धाराला वाहून घेण्याचा चित्पावनी बहाणा करून, एकदोन अडाणी गायकांच्या कांहीं स्थावर

जंगम मिळकती ध चा मा करून गिळंकृत केल्याचा बोभाटा मात्र माझ्या कानीं आलेला आहे. इतकेच नव्हे, तर मराठा गायक समाजाच्या विद्यमान प्रबोधनाला जर आज अडथळा आणि त्रास कोणाकडून विशेष होत असेल, तर तो या मस्तवाल सारस्वत ब्राम्हणांकडूनच, अशा तऱ्हेच्या अनेक तक्रारी मला कित्येक खेड्यांतील गायक स्त्री पुरुषांकडून सांगण्यात आल्या.

व्यभिचार आणि तनुविक्रय.

व्यभिचार आणि तनुविक्रय (डिबॉचरी आणि प्रॉस्टिट्यूशन) या दोन गोष्टींत फार भेद आहे. अ च्या विवाहित पत्नीनें कांहीं तरी कारणांमुळे ब शी संलग्न असणें, याला व्यभिचार असें म्हणतात. हा नेहमीं गुप्तपणानें चालतो आणि खुनासारख्या भयंकर परिणामांत त्याचें पर्यवसान होईपर्यंत त्याच्या अस्तित्वाचाहि मागमूस कोणाला लागत नाहीं. हा कितीहि निंद्य असला तरी मानवी सृष्टीच्या अंतापर्यंत त्याचे निर्मूलन होणे दुरापास्त आहे. तनुविक्रयाची स्थिति फार निराळी आहे. जगांतील इतर सर्व खाद्यपेयादि भोग्य वस्तूंप्रमाणें स्त्रियांनी सार्वजनिक उपयोगासाठी आपल्या देहाचे विक्रयार्थ प्रदर्शन करणें आणि तनुविक्रीच्या किफायतीवर जगणें, या घाणेरड्या अवस्थेचा विचार जसजसा करावा, तसतशी कल्पनाहि मूर्छित होऊं लागते. संस्कृत मानवी समाजांत स्त्रीवर्गाबद्दल आदराच्या कांहीं विशेष भावना परिणत झालेल्या असतात. कित्येक रानटी समाजांतहि स्त्रियांच्या अब्रूविषयीं कडक निर्बंध पाळले जातात. समाजांत नेहमीं कनक आणि कांता या दोन मुख्य भानगडींतूनच खुनासारखे जे अत्याचार घडतात, त्यांपैकीं शेकडां ९५ ची उत्पत्ति बायकांच्या भानगडींत असते. तथापि, व्यभिचाराला विचार करण्यासारखीं कांहीं कारणे तरी आढळतात, पण राजरोस तनुविक्रयाचा धंदा करणाऱ्या बदमाश बायकांची उदरनिर्वाहाची सबब त्यांच्या घाणेरड्या धंद्याचे मंडन खास करूं शकत नाही. उदरनिर्वाहासाठी किंवा छानछोकींत आयुष्य जावें म्हणून तनुविक्रयाचा धंदा, ही कल्पनाच मुळी सारासार विचाराला पटणारी नव्हे. तनुविक्रयाशिवाय जगतांच येत नाही, किंवा छानछोकींत रहातां येत नाहीं, असें थोडेंच आहे? वेश्यांची संस्था असावी, मानव समाजाच्या सामान्य स्वास्थ्याला तिची जरूर आहे, असेंहि एक मत आहे. सुसंघटित कौटुंबिक व पद्धतशीर वैवाहिक सुखास आचवलेला बरा वाईट असा जो बहुसंख्य पुरुषवर्ग देशांत असतो, त्याच्यासाठीं, इतर सर्व सुखसाधनांप्रमाणेंच जर स्त्री-सखोपभोगाची सार्वजनिक सोय करून ठेवली नाहीं, तर त्यामुळें समाजांत बराच गोंधळ व बंडाळी माजून, कुटुंब व्यवस्थेचाहि नाश होईल. या मतांत सत्याचा बराच भाग आहे आणि त्याकडे दुर्लक्ष करूनहि भागणार नाहीं. परंतु, यांत दोन महत्वाचे आक्षेप आहेत. घर ना दार देवळीं बिऱ्हाड, अशा करतळ भिक्षा तरुतळ वास फटिंगांसाठी धर्मशाळा खानावळीप्रमाणें वेश्यांची जाहीर दुकानें असलाच पाहिजेत, हे मत ग्राह्य धरलें, तर तेथे निदान संघटित कुटुंब व्यवस्थेतील झोटींगांना तरी अज्जिबात मज्जाव असला पाहिजे. पण वस्तुस्थिति पाहिली तर वेश्यांच्या तनुविक्रयावा

फटिंगांपेक्षां झोटिंगांचीच गर्दी

फार दिसुन येते ! गरजवंत फटिंगांपेक्षां धनवंत झोटिंगांनींच वेश्यांची संस्था आजवर टिकवून चालविलेली आहे. दुसरा आक्षेप म्हणजे, वेश्यांच्या संस्थेची कितीहि आवश्यकता असली, तरी पुरवठ्याच्या इतर सर्व वस्तूंप्रमाणें सर्व समाजांना वेश्या स्त्रियांचा बिनबोभाट अखंड पुरवठा करणारी एक ठराविक जातच्या जात निर्माण व्हावी, अगर कोणी तरी ती निर्माण करून ठेवावी, हा काय पागलपणा

आहे? हिंदुस्थानांतल्या दुर्दैवी गोव्याशिवाय जगाच्या पाठीवर असा एकहि देश, शहर अथवा खेडें सापडणार नाहीं, की जेथें स्त्रियांच्या शरीरविक्रयावर पिढीजात धंदा करून जगणारी एक ठराविक जात कोणाला दाखविता येईल! जाहीर रीतीनें तनुविक्रय करणाऱ्या वेश्या आणि नवऱ्याला गुंगारा देऊन जबऱ्याला प्रेमाचा आंगारा लावणाऱ्या व्यभिचारिणी स्त्रिया जगांत सर्वत्र होत्या, आज आहेत व पुढेंहि राहतील. परंतु, अमूक एका जातींतीलच बायकांचा पिढीजात धंदा व्याभिचारिणीचा किंवा राजरोस तनुविक्रयाचा, असें गोव्यांतील गोवेकरणीशिवाय इतरत्र कोठें कोणीं पाहिले आहे काय? बे-कुटुंब उनाडटप्पूंच्या कामशांतीसाठीं तसल्याच धाडशी वृत्तीच्या स्त्रिया असतील त्या खुशाल दुकानें घालून बसतील. पण तेवढ्यासाठी एक विशिष्ट जात रूढीनें किंवा धर्मानें 'रिझर्व' करून ठेवणे, हा शुद्ध बदम ाशपणा आहे. महारणीनें रस्ते व उकीरडेच झाडावे, भंगणीनें शौचकूपच साफ करावें, मांगीणीने 'आवस' मागूनच उष्ट्यावर जगावे, या सनातन वेदोक्त दण्डकाप्रमाणें, गोवेकरणीच्या पोटीं जन्मणाऱ्या प्रत्येक मुलीनें आपला देह सार्वजनिक उपभोगासाठींच उत्पन्न झालेला आहे, असें बिनतक्रार मान्य करून, तनुविक्रयाच्या राजरोस धंद्याच्या दुकानांची परंपरा चालवावी, हा प्रकार हलकट हिंदु समाजाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि देशाच्या कोणत्याहि समाजांत दिसणार नाही.

'गोवेकरणींची जात.'

हिंदूंच्या वेदोक्त चातुर्वर्ण्याच्या चतुराईंत ज्या हजारों सुतक्या जातींची पैदास झालेली आहे त्यांतच 'गोवेकरीण' ही एक जातच निर्माण होऊन बसली आहे. अर्थात् इतर सर्व जातींच्या कपाळीं ज्या कसल्या तरी फिसाट कर्मांचा धर्म चिकटलेला असतो, त्या प्रमाणें 'तनविक्रय' हा एकच धर्म हिंदू समाजानें गोवेकरणीच्या नशिबावर वेदोक्ताचा खिळा ठोकून जाम ठोकलेला आहे. देवानें दिलेल्या बिनमोल स्त्रीदेहाची राजरोस मातीमोल विक्री करून, त्याच्या किफायतीवरच जगण्यांत गोवेकरणींना आनंद वाटतो किंवा त्याची त्यांना आवड आहे, अशांतला प्रकार मुळींच नाहीं. उलट, या गलिच्छ आणि अमानुष दुर्दैवाविरुद्ध त्यांच्यांत सक्रीय प्रतिकाराची भावना दिवसेंदिवस सोसाट्यानें बळावत चालली आहे. परंतु, ज्या प्रमाणे ब्रम्हदेवाच्या खास तोंडांतून जन्मलेल्या आचार विचारवंत ब्राम्हणांनासुद्धां विधवांच्या बाबतींत स्वतःच्या डोळ्यावर भाताचे पिंड बांधून, केवळ धर्माचा भान राखण्यासाठी त्या दुर्दैवी

विधवांची मान न्हाव्याच्या हातीं

देणेंच भाग पडते; त्याच प्रमाणें, प्रत्यक्ष परिस्थितीने हृदयांत भडकविलेला निषेधाचा आणि प्रतिकाराचा वणवा जागच्या जागीं दडपून, ''काय करावें? आमचा जन्म या साठींच! हाच आमचा धर्म'' म्हणून गोवेकरणींना आपल्या स्वतःच्या व तरूण मुलींच्या देहविक्रीच्या धंद्यांत पाऊल ठेवणेच भांग पडतें. सत्ता पोर्च्युगीजांची असो, नाही तर मत्ता ब्रिटिशांची असो, किती झाल्या तरी गोवेकरणी 'हिंदु' खाणींतल्याच! आणि असा कोणता हिंदु आहे कीं जात्या तो माणूस असूनहि हिंदु धर्मानें त्याला गाढव बनविलेला नाहीं? वेळीं एखादा निश्चयी हिंदु सामाजिक निर्बंधाची पर्वा करणार नाहीं, पण 'धर्म' म्हटला की त्याचें पाय लटपटलेच!

वेश्यावृत्तीला धर्माची मान्यता

ऊर्फ पोलीशी धाटणीची भिक्षुकी बळजवरी असेल, अशी माझी तरी निदान आजवर कल्पना नव्हती.

पण आमचा हिंदुधर्म म्हणजे भिक्षुकी डोंबाऱ्यांचे पातडें! त्यांत हव्या त्या शहाण्यानें हवीं तीं हाडकें लाकडें विनबोभाट ढकलावी, आणि तीं श्रुति स्मृति म्हणून हिंदु गाढवांच्या बाजारांत खुशाल विकावी! या प्रघातानुसार गोव्यांतील सारस्वत धर्ममार्तंडांनी 'शेंसविधि' नांवाचा एक वेदोक्त समारंभ खास गोवेकरीसाठींच रूढ करून ठेवलेला आहे. त्यांच्या मतें गोवेकरीण 'धन्यो गृहस्थाश्रमः' ला अनधिकारी असून, तिला विवाहाचाहि हक्क धर्मानें दिलेला नाहीं. तिला फक्त शेंसविधी एवढाच एक मंगल संस्कार! त्रैवर्णिकांच्या 'उपनयन विधी' प्रमाणें या 'शेसविधी' ने गोवेकरणीला वेश्यावृत्तीची दीक्षा देण्यांत येऊन, तिला सारस्वत भिक्षुकांकडून

अखंड सौभाग्याची सनद

प्राप्त होते. शेंसविधी झाल्याशिवाय कोणतीहि शहाणी हिंदुधर्माभिमानी गोवेकरीण आपल्या तरुण पोराचे पाऊल वाकडे पडूं देत नाहीं! शिवाय हा विधी सुद्धां मोठ्या थाटामाटाचा, गडगंज दक्षिणांपांतूचा आणि आडव्या तिडव्या भोजनाचा असल्यामुळें, गोव्यांतल्या सर्व धर्मसरंक्षक सारस्वत भिक्षुकांची धार्मिक नजर गांवांतल्या उमलत्या गोवेकरणीवर नेहमींच असते आणि द्वादशा प्रदोषाचे शिधे उकळतांना 'का गजराबाई, चंपू आतां बरीच वाढली. शेंसविधि कधीं उरकता?' असल्या कांचनभटी सूचनांचा त्यांचा लकडा सारखा सुरूंच असते. शेंसविधीचा धार्मिक पगडा गोवेकरणींवर इतका जबरदस्त बसलेला आहे कीं त्याच्या संस्काराशिवाय त्यांना पारलौकिक मोक्षाची आशाच वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर, वेश्याकर्मांत सौंदर्यनष्टा दंतभग्ना बनलेल्या म्हाताऱ्या व उताऱ्या गोवेकरणींना आपल्या हातून एखादे तरी शेंसविधीचे मंगलकार्य घडावे, म्हणून फार विवंचना लागते. बरें, गोवेकरणीच्या पोटीं एकजात एकरकमी मुलीच जन्माला घालण्याचे निसर्गानें कंत्राट थोडेच घेतलेलें असतें? पुत्रहि होतात, कन्याहि होतात. पुत्रजन्माचा योग म्हणजे मात्र त्यांना आकाशाचा वज्राघात वाटतो. जिला सगळे मुलगेच झालेले असतात, किंवा निसर्गानें गरबार बाळंतपणाचा जिला कधीं दाखलाच दाखविलेला नसतो, अशा बायका, केवळ आपल्या जन्माचें सार्थक व्हावें म्हणून, दसऱ्याच्या मुली दत्तक घेतात. मागून मिळाल्या नाहींत तर कित्येक वेळां त्या मुली विकतहि घेतात. त्यांना वाढवून त्यांचा शेंसविधी एकदा साजरा झाला, म्हणजे त्या म्हाताऱ्या उताऱ्या बायांना स्वर्गाचा पासपोर्ट मिळाल्यासारखा आनंद होतो. हे आनंददान देण्याच्या कामीं सारस्वत भूदेवांची धार्मिक दलाली कायावाचामनें सर्वतोपरी झगडत असते, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या शेंसविधीला ब्रिटीश हद्दीत सरकारी कायद्याची अथवा सामाजिक रूढीची मान्यता नाही. बारामास विवाहाचा सौदा जसा फक्त व्यंकोबाच्या गिरीवरच ठरतो, तसा हा शेंसविधी फक्त गाव क्षेत्रांतच सरकारी कायदा, धर्माचा वायदा आणि इष्कबाज लोकांचा फायदा यांनी लोकमान्य गणलेला आहे. हा विधी धर्माच्या नांवावर किंवा रुढीच्या आधारावर चालविणाऱ्या सारस्वतांत आज सुशिक्षित विवेकवादी आणि सुधारक विद्वानांचा भरणा भरपूर असूनहि, या शेंसविधीच्या हलकटपणापासून आपल्या जातभाई भिक्षुकांना परावृत्त करण्याचें धैर्य त्यांपैकीं एकानेंहि आजवर दाखविलेलें नाहीं. किंवा, वेश्यावृत्तीला आळा घालण्याचाहि त्यांनीं कधिं प्रयत्न केलेला नाहीं. उलट, गोव्यांतील कित्येक प्रसिद्ध देवस्थानांच्या कांहीं उत्सवांत चांगले चांगले सुशिक्षित म्हणविणारे सारस्वत 'मोरॉकीराँनो' पालुपदाचें एक शृंगारीक गाणें म्हणत वेश्यांच्या बरोबर रिंगण धरून, चौऱ्या हालवीत देवाच्या पालखीपुढें नाचतात. तात्पर्य, ''आमचा जन्म शरीर विक्रयासाठींच

झालेला आहे, शरीरविक्रय हाच आमचा धर्म आणि तो धर्म ज्या अर्थी आज पिढ्यान् पिढ्या चालत आलेला आहे, त्या अर्थी तो सोडणें, म्हणजे भयंकर पाप करून नरकाचें साधन करण्यासारखें होय.'' अशीच एकूण एक गोवेकरणीची समजूत होउन बसली आहे, आणि ही समजूत त्यांच्या मनांत कायम करण्याच्या कामीं सारस्वत भिक्षुकशाहीचेहि प्रयत्न जबाबदार आहेत, यांत मुळींच शंका नाहीं.

वेश्यावृत्तीचे जातीवर परिणाम

फार घाणेरडे होऊन बसले आहेत. अर्थोत्पादनाचा बोजा स्त्रियांवरच असल्यामुळें, मुख्य गोवेकरीण आणि तिच्या पोटच्या मुली यांचें कुटुंबांत वर्चस्व फार मोठें असते. तरुणांना अगर पुरुषांना कुटुंब व्यवस्थेंत कवडीचीहि किंमत नाही. आई बहिणीच्या थाटामाटाची व्यवस्था ठेवावी, आपणहि छानछोकींत रहावें, खाऊन पिऊन मजा करावी, गांवभर भटकावें, इतकेंच नव्हे तर-तर-तर ! (नमूद करण्यास शरम वाटते) भेटतील त्या गिऱ्हाईकांना शिफारसपूर्वक आपल्या घरचा पत्ता दाखवावा, असल्या

कुत्र्याच्या जिण्यानें पुरुष जगतात.

मला वाटतें कुत्रीं सुध्दां असल्या जिण्यानें खास जगत नाहींत. 'मराठा गायक मित्र' मासिकांत (भाद्रपत आश्विन १८४० अंक ६ - ७) येणें प्रमाणें वस्तुस्थिति वर्णिलेली आहे, ती अक्षरश: सत्य असल्याचें मला दिसून आलें :-

(१) कौटुंबिक मालकी व नेतृत्व मुख्यत्वें स्त्रियाकडें असतें आणि कुटुंबातील पुरुष स्त्रियांचे ताबेदार अगर सहाय्यक असतात.

(२) पुरुषवर्ग बहुधा निरक्षर, स्वाभिमानशून्य व बेजबाबदार असतो आणि स्त्रिया विवेकहीन, चैनी व शिरजोर असतात.

(३) कुटुंबांतील स्त्री पुरुष नेहमीं अविवाहित राहतात. (४) स्त्रियांचा कुटुंबांतील दर्जा पुरुषांपेक्षा श्रेष्ठ असतो. (५) कुटुंब पोषणाचा भरिभार स्त्रियांवरच असतो. (६) द्रव्यार्जनाचें शीघ्रफल दायी मुख्य साधन तनुविक्रय. (७) खऱ्या कौटुंबिक प्रेमाचा व सात्विक प्रेमाचा पूर्ण वषट्कार. (८) इतर ज्ञातींतील पुरुष गायक समाजांतील स्त्रिया उपभोग्य वस्तू अशा समजतात, तर खुद्द गायक ज्ञातींतील पुरुषांचीहि मनोवृत्ति कांहीं भिन्न नसते.

□□□

निवेदन

स्पष्ट विचार विनिमय करा

प्रबोधनांत जे जे लेख येतात आणि ते जे विचार अथवा जीं मतें प्रतिपादन होतात, त्यावर वाचकांनी मनमोकळेपणानें चर्चा करावी, शंकासमाधानार्थ पृच्छा करावी, एखादा सुद्दा अर्धवट असल्यास त्याची पूर्तता करावी, अशी माझी फार इच्छा असते. त्यासाठीं 'वाचकांचें पार्लमेंट' हें सदर मी काढलेलें आहे. पण हे बहुधा रिकामेंच असतें. असें होऊं नये. आस्तिनास्तिपक्षीं चर्चा झाली म्हणजे तत्वनिर्णयाचा, निदान शंकासमाधानाचा मांर्ग उभयपक्षीं बराच स्वच्छ होतो. त्याचप्रमाणें प्रबोधनाच्या प्रत्येक अंकाबद्दल वाचकांनीं आपापला सामान्य अथवा सूचक अभिप्राय कळवीत गेल्यास, मलाहि त्यांचा फार उपयोग होत जाईल. कोणत्याहि चळवळीकडे हंगामी फायद्या तोट्याच्या दृष्टीनें न पाहतां, गतेतिहास आणि वर्तमान परिस्थिति यांचा विवेकपूर्ण ताळमेळ घालून, भविष्य काळाच्या जीवनक्रमाला प्रबोधक असेच टिकाऊ विचार व्यक्त करण्याचें प्रबोधनाचें ध्येय आहे. त्याला वाचकांनींहि सहकार्याचें व सहविचारांचें पाठबळ देणें अगत्याचें नव्हे काय?

संपादक प्रबोधन.

□□□

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

भारत-इतिहास-संशोधक-मण्डळ

त्रैमासिक : वर्ष ६ वे, अंक १ ते ४ एकत्र. किंमत १२ आणे. भा. इ. सं. मं. पुणें शहर

ऐतिहासिक साहित्य व चर्चा वर्धनाच्या कामीं मण्डळाच्या त्रैमासिकानें कौतुकास्पद कामगिरी चालविली आहे. प्रस्तुत अंकांत २८ मराठी व २ अंग्रेजी निबंध असून, प्रत्येक मुद्देसूद, आटोपशीर आणि विद्वत्तादर्शक आहे. चिंतामणराव वैद्यांचा 'सहा हातांचा गणपति' आहे. ज्ञानेश्वरींतील षट्करी गणेशाच्या ध्यानाचा उलगडा छान करतो. पाण्डुरंग शर्मांच्या 'वारकऱ्यांच्या वसाहतींत' संत नामदेवाच्या चरित्रांत पुष्कळ नवीन तपशीलाची भर पडली आहे. धारचे ज्ञानवृद्ध वयोवृद्ध लेले मास्तरांचा 'हेमाद्री' आणि 'महाराष्ट्रीय संस्कृतीचा उत्तर हिंदुस्थानावर परिणाम' वाचून, वृद्धांतहि ज्ञानयोगाचें तारुण्य कसें मुसमुसूं शकतें, याचा दाखला पटतो. बेंद्रे यांची 'अकबरी नाणी' चित्रविचित्र आणि मनोवेधक बाहेत. शिवेश्वरकरांनी 'मोगल दरबारांतील पोर्च्युगति राजकारणें' संगतवार कथन केली आहेत. या दिशेनें अझून पुष्कळ प्रयत्न झाला पाहिजे. दत्तोपंत पोतदारांना 'शिवाजीचा तिसरा होन' सांपडला. श्री. गुजरांनीं तो मण्डळाला द्यावा आणि पोतदारांनी तो आतांतरी नीट जपून ठेवावा. दत्तोपंत आपट्यांचा 'पाणिपतचा फेर विचार' विचारार्ह आहे. दिवेकरांनीं मस्तानी विषयीं माहिती बरी दिली आहे आणखी साहित्य उकरून काढलें पाहिजे. वासुदेवराव मुंडल्यांनीं 'कांही जुनी ऐतिहासिक घराणी' व 'सातारकर छत्रपतींची डाकेची व्यवस्था' बाहेर आणली, ती मनोरंजक आहे. चाफेकरांनी 'चिपळोणकर यांचे जमाखर्च' चाळून घोळून मथळेबार नमूद केलेली विविध माहिती मऱ्हाठा-ब्रिटीश संधि-काळच्या मऱ्हाठी जीवनावर बराच प्रकाश पाडीत आहे. शोधन फार काळजीपूर्वक झालेलें असून, त्यांत चाफेकरांची 'ज्युडिशियल टॅलेन्ट' चांगली व्यक्त होत आहे. शेजवलकरांनीं 'ब्रिटीश राज्य संस्थापकांचे एतद्देशीय सहाय्यक' मुद्या पुराव्यानिशी चव्हाट्यावर मांडले आहेत. त्यावर केलेली चर्चा मननीय आहे. हा लेख स्वतंत्र लहान पुस्तकरूपानें निराळा छापवून १ आणा किंमतीने विकावा, अशी आमची शिफारस आहे, देशभक्तांपेक्षां देशद्रोह्यांचीच चरित्रें सध्या जनतेपुढें ठेवणें अगत्याचें आहे. यशवंतराव गुप्ते यांचें 'कऱ्हाड' व इतर २ इंग्रेजी लेख त्यांच्या शांत संशोधनी विद्वत्तेची किंमत वर्धमान करणारे आहेत.

भारत वर्ष

(हिंदुस्थानचे संक्षिप्त गॅझेटिअर) लेखक व प्रकाशक श्री. श्रीधर शामराव हणमंते वळसंगकर स्टेशनमास्तर उरळी, जी. आय. पी. जि. पुणें, किंमत दीड रुपया.

प्रस्तुत ग्रंथ म्हणजे एक छोटा ज्ञानकोशच होय. यांत वेदपूर्व कालापासून तो चालूं काळापर्यंत हिंदुस्थानचा इतिहास, भूगोल, राज्यव्यवस्था, स्थळवर्णने, निरनिराळ्या रियासती, वगैरे विविध माहिती थोडक्यांत पण समर्पक रीतीनें नमूद केलेली आहे. विषयांची पद्धतवार मांडणी, सरळ भाषाशैली आणि हवी ती माहिती चटकन् एकाच ग्रंथांत मुद्देसूद देण्यांत ग्रंथकाराने केलेले परिश्रम, विचारांत घेता, हे पुस्तक शाळाखात्यानें शिक्षणक्रमांत मंजूर करण्याच्या लायकीचे खास आहे. शाळा खात्याची मराठी ग्रंथोत्तेजनाची एकंदर वृत्ति पाहता, या पुस्तकाला शिक्षणक्रमांत जरी प्रवेश मिळाला नाहीं, तरी बक्षिस देण्याच्या यादीत या ग्रंथाची बडदास्त ठेवली जावी, अशी रास्त अपेक्षा करण्यासारखा हा ग्रंथ आहे. सार्वजनिक कामें करणाऱ्या सर्व लोकांना हा ग्रंथ डिरेक्टरी किंवा डिक्शनरीप्रमाणें संदर्भाच्या कामीं फार उपयुक्त आहे.

फुलोरा

(प्रकाशक-साहित्य सेवामण्डळ, कऱ्हाड, किंमत आठ आणे.)

कऱ्हाडच्या उत्साही वृद्धतरुण कवींनी स्थापिलेल्या 'साहित्य सेवा मंडळा' नें हा लहानसा कविता संग्रह प्रसिद्ध केला आहे. यांत २५।२६ कवी आणि कवयित्री यांच्या ७६ कविता आहेत. अशा प्रत्येक कविता-संग्रहावर जो आमचा एक नेहमींचा आक्षेप असतो, तो हा कीं, कवितांची निवड नीट कसोशीनें केली जात नाहीं. हल्ली कवींच्या विरुद्ध बरीच हाकाटी ऐकूं येते. 'कवींचा सुळसुळाट' फार झाला आहे. वाटेल त्या प ला प करणाऱ्या होतकरू कवीनें उठावें, एकाद्या मंडळाचा वा संघाचा सभासद व्हावें, व आपली अपरिपक्व कविता रसिकांच्या माथीं मारावीं, किंवा आपणच आपली असेल नसेल ती सारी कविता छापून काढावी, अशा तऱ्हेचें उद्गार सगळीकडे ऐकूं येतात. किंबहुना, अशीही भीती वाटते कीं कालांतरानें 'कवि' हा शब्द मराठींत निंदाव्यंजक म्हणून वापरला जाईल कीं काय? साहित्यसेवा करण्याची उत्सुकता आम्हामध्यें जितकी वाढेल तितकीं भाषाभिवृद्धीच्या दृष्टीनें श्रेयस्करच आहे. पण प्रत्येक साहित्यसेवकानें रसिकांच्या पुढें येतांना आधीं मागें आणि नंतर सभोंवती पाहावे, असें आम्हांस वाटतें. होतकरू कवीला आपण प्रसिद्ध व्हावे असें वाटणें साहजीक आहे. त्यांतून एखाद्या संग्रहांत आपली कविता छापून आली, असें पाहिल्यावर त्याला परमानंद होणें हेंही अस्वाभाविक नाहीं. तथापि, केवळ प्रसिद्धीच्या भरीं पडून रसिकांच्या सहानुभूतीचा आणि सहनशीलतेचा आपण अंत पाहतों कीं काय, याकडे मात्र प्रत्येकानें पूर्ण लक्ष्य पुरवलें पाहिजे. साहित्य सेवा मंडळाला स्वत:च्या सामर्थ्याची जाणीव आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. प्रस्तुत संग्रहांतील कांहीं कविता बऱ्या आहेत. विशेषत: 'बुध' 'गोविंदानुज' (ना. वि. कुळकर्णी), वा. म. जोशी (वासुदेव), बा. बा. घाटे, सदाशिव कृष्ण, सौ. सुलोचनाबाई गोखले यांच्या कविता सरस आहेत. त्यांतही 'गोविंदानुज' यांची 'मी व्हावें' ही कविता संबंध संग्रहांत उत्तम आहे. श्री. हर्षे आणि नवांगुळशास्त्री यांच्या कविता जुन्या तऱ्हेच्या आणि बोजड वाटतात. सोमणांची 'आनंदी व्हा' ही कविता बरी आहे. पांडुकुमारांची 'संक्रांत' ही कविता चांगली आहे. बाकीच्या कवितांत विशेष असें कांहीं नाहीं. श्री. जननीजनकज'

(नांवांत काय आहे?) यांची रचना अत्यंत क्लिष्ट असते. यामुळें यांच्या कवितेंत चमक असूनहि तिचा परिणाम होत नाहीं.

चहा? चरणचाकरा नच करा छळ-चक्करा

तुटोत तरि तंगड्या भंवति मारितां चक्करा

अशासारखी ओढून ताणून केलेली सर्व रचना वाटते. कै. आगरकरांच्या कै. मातोश्रींचें जें अर्धवट गाणें छापलें आहे तेंही साधेंभोळें. भाविक अतएव बरें आहे. मंडळाचे बहुतेक सभासद कवीच असावेत, अशी आमची कल्पना आहे. पुढचा संग्रह छापतांना आम्ही वर केलेल्या सूचनांचा ते योग्य विचार करतील अशी आम्हांस आशा आहे. अर्ध्याकच्या कळ्यांना वास येत नाहीं. त्यांना फुलोऱ्यांत गुंफण्याची तसदी घेऊ नये.

K.B.G.

(स्थलसंकोचारतव आणखी बऱ्याच शेलापागोट्यांचा आहेर पुढील अंकार टाकणें भाग पडलें आहे.)

□□□

निवेदन

साभार स्वीकार

पितळेची भांडी :- प्रबोधनाचे अभिमानी आर्यबंधू श्रीयुत बाबाजी अनाजी तारकर (मुंबई) यांजकडून कांहीं नित्योपयोगी पितळी भांड्यांचा एक नमुनेदार सेट नजर म्हणून आमच्याकडे आला आहे, त्याचा आम्ही प्रणिपातपूर्वक स्वीकार करतों. श्रीयुत तारकर यांनीं नवनव्या घाटाची व नव्या अभिरुचीची पितळ तांबे चांदी वगैरेची शेकडों तऱ्हेचीं लहान मोठी भांडी तयार करण्याचा कारखाना गेलीं ४० वर्षें चालविला आहे. उत्तम कारागिरी, टिकाऊ घडणी, अक्षय झिलई आणि व्यवहारांतील कमाल इमानीपणा यांत श्री. तारकर यांनीं बहुतेक सर्व हिंदी राजेरजवाड्यांकडून शाबासकी मिळविलीच आहे. आतां, मुंबई शहरांत त्यांनीं आपल्या दुकानाच्या दोन तीन नवीन शाखा उघडून, गरीबापासून श्रीमंतांपर्यंत सर्वोपयोगी लहानमोठीं भांडी चटकन् एकाच ठिकाणीं विकत मिळण्याची सोय केलेली आहे. त्याचा फायदा सर्वांनीं अगत्य घ्यावा, अशी आमची शिफारस आहे.

□□□

निवेदन

तात्पुरता खुलासा

प्रस्तुत अनपवृत्तपत्र मी 'राष्ट्रवीर' बेळगांव (ता. १२-७-२७) वरून नकल करून छापण्यास दिलें. इतक्यांत माझ्याकडेहि एक हस्तप्रत आलीं. तत्पूर्वी ता. ४-७-२७ च्या 'विजयी मराठा' पत्रांत

सातारा जिल्ह्यांतील कांहीं ब्राम्हणेतर सद्‌गृहस्थांच्या सहीचा 'प्रबोधनकार श्री. ठाकरे यांना अनावृत्त पत्र' म्हणून एक लेख आला आहे. सदर लेख श्री. ठाकरे यांचेकडेस पाठविल्यास ते आपल्या प्रबोधन मासिकांत छापतील व त्यांतच ते आपला खुलासाही प्रसिद्ध करतील.

एवढाच मजकूर आढळला. तेवढ्यावरून प्रथम मला कांहीं कल्पनाच होईना. आज सातारा जिल्ह्यांत खुद्द मराठ्यामराठ्यांतच जी दुही माजली आहे, तिच्या 'कळीचा नारद' मीच आहे, अशी पुष्कळांची गैरसमजूत आहे. रा. रा. केशवराव विचारे हे एक माझे मित्र त्या गैरसमजुतींत सकारण वा निष्कारण गुरफटलेले मला आढळून आलें आहे. गेल्या इलेक्शनमध्यें या दुहीचे जे डोले मिरवले, त्याचा या अनावृत्त पत्राशीं संबंध असावा काय? कांहीं तर्क चालेना. आतां राष्ट्रविरांत तें पत्र प्रगट झाल्यामुळें विषय समजला आणि विजयी मराठ्यानें हें अनावृत्त पत्र प्रसिद्ध कां केलें नाहीं, त्याचें रहस्यहि कळलें. विजयी मराठा आणि सातारचा भांडवलशाहीचा झब्बू डी. बी. कूपर यांचा हस्तिदंती ऋणानुबंध मला पूर्ण माहीत आहे. त्या ऋणानुबंधाचा मिंधेपणा श्रीपतराव शिंद्याना या अनावृत्त पत्र्याच्या बाबतींतच काय, पण गेल्या ३-३।। वर्षांत अनेक बाबतींत आडवा आलेला आहे. श्रीपतराव शिंदे कूपरला कांहींहि समजत असले, तरी कूपर त्यांना काय किंमतीनें लेखतो, हें मला माहीत आहे. शिंदे हे कूपरचे मिंधे नसते, तर त्यांच्या विजयी मराठ्यानें साताऱ्यास माजलेल्या दुहीची पाळेमुळें केव्हांच उखडून गतीला लावली असती, यांत मला मुळींच शंका येत नाहीं.

कूपरच्या नरकवाड्याचा त्याग करून, त्याच्या गजकर्णी सापळ्याला लाथ मारून, तीन वर्षांपूर्वी मी बाहेर पडलों. तेव्हां माझ्याकडे या बाबतींत विचारणा करणारीं अनेक निनांवी पत्रें जवळ जवळ सहा महिने एकसारखी येत होती. पण तीं 'निनांवी' असल्यामुळें आणि मीहि भयंकर संकटांत व आजारांत पडल्यामुळें तीं फाडूनच टाकीत असे. त्यानंतर सातारा जिल्ह्यांतील अनेक ब्राम्हण ब्राम्हणेतर पुढाऱ्यांनीं व मित्रांनींहि मला समक्ष भेटून खुलासा काढण्याचा प्रयत्न केला, पण मी तो केला नाहीं. एक दोन

वृत्तपत्रांतहि माझ्या सातारा-संबंधाचा उल्लेख किंचित् टायलीनें व्यक्त झालेला मी पाहिलेला आहे. अझूनहि मी माझ्या परिस्थितीशीं माझे जनसेवेचे कार्य रेटीत असल्यामुळें, मला या इतर भानगडींचा स्फोट करून, चित्ताची शांति व दुर्बळ शरिराची तकलादी ताकद दुखविण्याची इच्छा न होणें, अगदीं सहाजिक आहे. सातारा रोड सोडल्यापासून आजपर्यंत 'मी बरा कीं माझा व्यवसाय बरा' अशा धोरणानें घरांतच बसून असतो. कोणत्याहि सभेला जात नाही. बहुतेक चळवळीपासून मी अज्जीबात अलिप्त राहिलों आहे. प्रबोधन मासिक आणि ग्रंथमाला या पलीकडे मी कशाचाहि सध्या विचार करीत नाहीं. शिवाय, कूपरशाही कटांच्या कटकटीमुळें व्यक्तिश: माझ्या मनावर कितीहि जखमा लागलेल्या असल्या, तरी त्या कटकटीचें गजकर्ण सातारा जिल्हांतील मराठा बांधवांच्या दुहीपर्यंत फदफदत जाईल, अशी मला कल्पना नव्हती. ब्राम्हणेतर चळवळींत 'न हिंदुर्न यवन:' अशा कूपरनें हवा तो नंगा नाच करून, स्वत:च्या लोकमान्यतेची व राजमान्यतेची समसमान थप्पी बसविण्यासाठीं, वाटेल त्या दृश्य अदृश्य भानगडी केल्या, तरी त्याचा आदिअंत शोधण्याची जर सातारकर मराठ्यांनाच बुद्धी होई ना, त्यांच्या पैकींच बरेच लोक जर कूपरच्या चांदींत शेंबडांतल्या माशीप्रमाणें अडकलेले, तर मला त्रयस्थाला तरी हा कूपरशाहीचा बोजवारा चव्हाट्यावर आणून फोडण्याची जरूर काय? माझें दुर्दैव म्हणून भाऊ पाटलासारख्या भावनावश परंतु प्रेमळ मित्राच्या आग्रहावरून मी या जबरदस्त कूपरच्या कावेबाज कटांत स्वत: येऊन अडकलो ! यांत कोणी कोणाला दोष द्यायचा? येऊं नये ते अनुभव आले. पाहूं नये त्या गोष्टी पाहिल्या. करूं नये त्या केल्या. कल्पनेला शिवल्या नाहींत त्या प्रत्यक्ष अनुभवल्या. सार्वजनिक चळवळीबद्दल मनावर जो निराशेचा अंधार पडला आहे, त्याला कारण सातारा रोडवर भोगलेल्या चमत्कारीक आपत्तींचा आघातच होय. परंतु माझ्या मुग्धतेला केव्हां ना केव्हां तोंड फुटलेंच पाहिजे, ते वैयक्तिक विनयानें किंवा सहनशीलतेच्या बावळटपणानें मी फोडलें नाहीं, तर सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें कोणीतरी तें फोडणारच फोडणार, या विषयीं मी केव्हांहि बेसावध नव्हतो. सांपत्तिक दृष्ट्या समर्थ, ब्राम्हणेतरांच्या अजागळ दृष्टीनें लोकमान्य आणि सरकारी अधिकाऱ्यांशीं सदैव एकजीव राहून राजमान्य बनलेल्या कूपरसारख्या व्यक्तीच्या अंतर्बाह्य मालमसाल्याचा मी प्रत्यक्ष परिचयानें अनुभव घेतलेला आहे. हा अनुभव, त्या विषयी माझे ठोकताळे आणि त्यांचा आजच्या परिस्थितीशीं होणारा समन्वय, नीट पडताळून पहाण्यासाठीं गेल्या पाव तपाची मुग्धता जरूरच होती, हें सूज्ञ वाचकांस सांगणें नको. माझ्या मुग्धतेमुळें सातारा जिल्ह्यांत ठिकठिकाणीं तर्ककुतर्कांचें प्रमाण वाढत आहे, ब्राम्हणेतर चळवळींतहि भेदांचीं अनेक खिंडारें पडत आहेत आणि माझे अनेक कर्तबगार मराठे पुढारी-मित्र माझ्या जनसेवेविषयीं साशंक झाले आहेत, ही गोष्ट मला कबूल आहे.

१९२३ सालच्या सातारा जिल्ह्यांतील ब्राम्हणेतरी इलेक्षनचा मी 'चित्रगुप्त' होतो, ही गोष्ट खरी आहे; आणि आज कूपर पार्टी, जाधवपार्टी आणि आचरेकर-शिंदे-पार्टी, तशीच भाऊराव पार्टी, विचारेपार्टी इत्यादि पार्ट्यांचा जो सुळसुळाट सातारा जिल्ह्यांत उडाला आहे, त्याची विषारी बीजें कसकशी रुजलीं गेली त्याचाहि इतिहास त्याच वेळीं मी अभ्यासिलेला आहे. हा इतिहास प्रत्येक मराठा-पुढाऱ्याला माहीत आहे. पण कूपरच्या पैशाचीं जाळीं सर्व जिल्हाभर हालचाल करीत असल्यामुळें, गोऱ्या साहेबाला पाहून गावंढळ माणूस जसा भेदरतो, तसे हे मराठे पुढारी कूपरच्या संपत्तीपुढें आणि 'सरकारी वशिल्या'च्या दमधाटी पुढें फटाफट नांग्या टाकणारे आहेत, असें माझें स्पष्ट विधान आहे. राजमान्यतेच्या जोरावर

लोकमान्यतेचे खेळ, केवळ विरंगुळा म्हणून, खेळणाऱ्या कूपरच्या इंग्रेजी मनोवृत्तीचा थांग बऱ्याच मराठ्यांना लागत नसल्यामुळें ते त्याच्या गुळाच्या ढेपीवर घोंगावत आहेत. याचा परिणाम सातारा जिल्ह्यांतील ब्राम्हणेतर चळवळीवर फार विपरीत होऊन, सन १९२१-२२ सालची तिची धडाडी आज संपूर्ण ओहोटलेली आहे. राजमान्यतेचें भरभक्कम पाठबळ आणि दारूव्यापाराची गडगंज संपत्ति, या द्वयीच्या जोरावर कूपर आज साताऱ्याचा छत्रपति होऊन बसला आहे. अशा सर्वसमर्थार्शी अहंत कोणी करावी? चाणाक्य नीतींत मुरलेल्या ब्राम्हणांना जें आज शक्य नाहीं, तें गरीब व अडाणी मराठ्यांना कसचें साधणार? कूपर आज वाटेल ती घटना घडवील व घडलेली बिघडवील. 'अशक्य' असें त्याला आज कांहीं नाहीं. म्हणून, कूपर विरुद्ध धुसपुसणारे बुरखे मराठे जरी सातारा जिल्ह्याभर पसरलेले असले, तरी ब्राम्हणेतर चळवळीच्या हितासाठीं त्याला विरोध करण्याइतकें क्षात्रतेज जर एकाद्या मराठ्या मर्दांत असते, तर गेल्या इलेक्षनमध्यें कूपरच्या चांदीला एकसुद्धां व्होटर भाळला नसता खास. कूपरची चांदी आज वाटेल त्या विरोधकाची हवी तशी चांदी करण्यास समर्थ आहे. माझा ११ महिन्यांचा अनुभव बहुजन समाजाच्या व विशेषत: ब्राम्हणेतर समाजांच्या आत्मप्रबोधनार्थ प्रसिद्ध करण्याचे काम बरेंच धाडसाचें आहे. मात्र हें काम मला सारांशानें सांगतां येण्यासारखें नाहीं. त्यांत अनेक व्यक्तींचा परिचय, अनेक गप्तकटांचे स्फोट, अनेक डावपेचांचीं रहस्यें मला उघड करावी लागतील. एवढी गोष्ट अगदीं स्पष्ट आहे कीं यापुढें मी मुग्धता ठेवून, कुपरशाहीचा मुलाजा राखणें, जनहिताचा द्रोह करण्यासारखें होय. माझी खात्री आहे कीं हा गुलदस्तांतला इतिहास मी प्रगट करूं लागतांच, ब्राम्हणेतर चळवळींतील बऱ्याच आंधळ्या कोशिंबिरीचे खेळ चव्हाट्यसावर येतील, मराठ्यांच्या दुहींतील मर्म त्यांना उमगून त्यांच्या चुकलेल्या मार्गाची त्यांना ओळख पटेल, आणि कूपर सारखा सर्वसमर्थ राजसत्ता पाठबळी सातारचा छत्रपति माझ्या लेखणीचें टोक ठेचायला आपल्या शक्तियुक्तीची पराकाष्टा केल्याशिवाय खास राहणार नाहीं. कलेक्टर कमिशनर पासून थेट गव्हर्नरापर्यंत ज्याचा दांडगा वशिला, तो माझ्यासारख्या एका स्पष्टवक्त्या वृत्तपत्रकाराची काय चांदी आटवायला कमी करील?

लोकांच्या जाहीर आव्हाहनाप्रमाणें लोकहितवादासाठींच ११ महिन्यांचा माझा इतिहास तपशीलवार पुढील अंकापासून सुरूं होईल. तिकडे लोकांनीं आणि सरकारनेंहि विशेष लक्ष द्यावें. सरकारनें कां लक्ष द्यावें? तर ज्या कूपरला त्यांनीं मॅजिस्ट्रसीचे -न्यायदानाचे- अधिकार अर्पण केले आहेत, त्याला सत्यासत्याची व न्यायान्यायाची कितपत चाड आहे, याचेहि दाखले मी प्रसिद्ध करणार आहे. बेअब्रूचे थेर माजविणारांनीं लेखमाला पुरी होईपर्यंत प्राणायाम करावा. मग मी आहे, अब्रोफोबिस्ट आहेत, सरकारचीं कोर्टे आहेत, जनता आहे, तिचीहि न्यायकोर्टे आहेत. काय व्हायचें असेल तें होईल.

पुणे, ता. २१-७-२७ **केशव सीताराम ठाकरे.**

□□□

स्फुट विचार

गोव्यांतील मराठा गायक समाज

चालूं अंकापासून या समाजाच्या अंतर्बाह्य स्थितीची माहिती देणारी लेखमाला 'गोवेकरीण' या मथळ्याखालीं सुरू केलेली आहे. अलीकडे या समाजांतील सुबुद्ध तरुणांत विचारक्रांति होऊन, त्यांना आपल्या दुर्दैवी जातीच्या आत्मोद्धाराची तीव्र तळमळ लागलेली आहे. जाणून बुजून अथवा न कळत रूढ झालेल्या स्त्रियांच्या तनुविक्रयी पिढीजात धंद्याची त्यांना चिळस वाटूं लागली आहे. जन्मप्राप्ती दैवाधीन असली, तरी पौरुषत्वाचा पराक्रम कर्तव्याधीन खास आहे. या एकाच सनातन तत्वावर विश्वास ठेऊन, आपल्या जन्मदात्या समाजाच्या मनोवृत्तींत क्रांति घडविण्याची आणि त्याच्या कल्पनेंत भिडलेली - किंवा कोणीतरी भिडविलेली - वेश्यावृत्ति समूळ उखडण्याची विवंचना मराठा गायक समाजांतील बऱ्याच तरूण तरुणींत उचंबळत आहे. आत्मस्फूर्तीच्या चैतन्यानें व कर्तबगारीच्या जोरावर या समाजांतले अनेक स्त्रीपुरुष आज मोठ्या लौकिकाला आणि महत्पदाला चढलेले आहेत. बुद्धिमत्तेची चपळ चतुराई आणि ललितकलेच्या परिचयानें परिणत झालेली देहमनाची ग्रहणक्षमता, यांत हा समाज कोणालाहि हार जाणार नाहीं. कसलाहि गाजावाजा न करतां, केवळ स्वावलंबनाच्या एकाच धडकीनें अनेक गायक मराठे स्पृहणीय महतीला पोहचले, याचें कारण तरी हेंच. पण, ही प्रबुद्ध पुढारलेली मंडळी, आपल्या कुळामुळाचा कोणासहि पत्ता लागूं नये, इतक्या दक्षतेनें आपल्या गायक मायजातीशीं फटकून वागतात. आपण जसे स्वपराक्रमानें वर चढलों, अंतर्बाह्य उन्नत बनलो, प्रतिष्ठित इभ्रतदार अशा अनेक समाजांत मानमान्यतेनें वावरूं लागलो, तसे आपल्या जातिबंधु भगिनीनींहि उन्नत व प्रबुद्ध व्हावे यासाठीं मार्गदर्शकाचेहि पुण्यकार्य करावयास त्या 'बड्या' लोकांना बडी लाज वाटते. पुढारलेल्या या बांधवांच्या फटिंग तुसडेपणामुळें मागासलेल्या हजारों मराठा गायकांच्या प्रगतीचा मार्ग बराच कठीण होऊन बसला आहे. समाजोन्नतीच्या कामीं प्रत्यक्ष शारीरिक मेहनत आणि सांपत्तिक मदत अशी दोन भांडवलें लागतात. स्वत: कष्ट करायला, अगर गायकांच्या चळवळींत प्रत्यक्ष भाग घ्यायला, या 'बड्या' लोकांना जर लाज वाटत असेल, तर त्यांना आपल्या जन्मदात्या समाजाच्या उद्धारासाठीं सांपत्तिक मदतीचें गुप्तदान करणें फारसें कठीण नाहीं. पण तेवढेंहि त्यांना उरकत नाहीं, ही मोठी लज्जास्पद स्थिति होय. एकट्या मुंबई शहरांत लोकमान्य विद्वत्तेच्या आणि धनकनकसंपन्नतेच्या

शिखरावर पोचलेले निदान दहा बारा गायक मराठे जर एकवटून आपल्या मायजातीच्या आत्मोद्धाराला सांपत्तिक हातभार लावतील, तर या समाजाची आजची तिरस्करणीय हीन दशा तेव्हांच ओहटीला लागेल ! परंतु असें जोंपर्यंत होत नाहीं, तोंपर्यंत जातीला चिकटून राहून, जातीबरोबर माती खातखात, विचार व आचारक्रांतीची कामगिरी बजावणाऱ्या अल्पसंख्य तरूण पुढाऱ्यांना अनेक हालअपेष्टांच्या व प्राणांतिक संकटांच्या आगींत होरपळत प्रगतीचा मार्ग कंठावा लागत आहे. वेश्यावृत्ति-विध्वंसनाचा प्रश्न अस्पृश्यता-विध्वंसना इतकाच, किंबहुना अधिक बिकट आहे. शतकानुशतकांचे मनावर झालेले परिणाम व ते कायम टिकविणाऱ्यांचे 'वेदोक्त पुराणोक्त' प्रयत्न ठेचतांना या मूठभर समाजसुधारक तरुणांना आपला जीव मुठींत धरूनच कार्य करावें लागत आहे. गायक समाजांतल्या जागृतीमुळें ज्याच्या स्वार्थावर बिब्बा पडूं लागला आहे, त्यांच्याकडून या तरूण गायक समाज-सुधारकांवर नाना संकटांचीं भृगुचक्रें झुगारण्यांत येत आहेत. आपल्या समाजांत रूढ असलेला वेश्यावृत्तीचा बेशरम प्रघात बंद पडावा आणि इतर हिंदु समाजांप्रमाणें आपणांत विवाह सुरू होऊन, आपल्या वंशाला प्रतिष्ठित माणुसकीचें नागरिकत्व प्राप्त व्हावें, म्हणून कित्येक तरूण गायक सुधारकांनीं आपले लग्नें लावली आहेत व हा लग्नाचा प्रघात हळूं हळूं समाजमान्य करण्याचा नेटानें प्रयत्न चालविला आहे. या प्रघाताच्या विरोधकांनीं नुकतेच एका तरूण गायकाच्या विवाहावर बेकायदेशीरपणाचे घोरपड चढविली होती. परंतु ७-८ महिने कायदेबाजीची हिसकाहिसकी होऊन, अखेर हा तरूण निर्दोष सुटला. तात्पर्य, मराठा गायक समाज या विद्यमान आत्मोद्धाराचा प्रश्न, अखिल हिंदु समाजाच्या हिताच्याहि दृष्टीनें, जितका महत्वाचा तितकाच फार बिकट आहे; आणि या कार्मी उन्नतावस्थेला पोचलेल्या कर्तबगार गायक भगिनी बांधवांनीं आतां सत्वर पुढें यावें, अशी आमची त्यांना आग्रहाची जाहीर विनंती आहे.

समर्थ पांगारकर, कल्याण वाकसकर

ही एक अलौकिक गुरु शिष्याची दुक्कल नुकतीच गोसुत्र शेणाच्या प्रायश्चित्ती खातेऱ्यांतून अवतीर्ण झाल्याचें वृत्त आब्राम्हण मुसलमानांना श्रुत झालेलेंच आहे. गुरुशिष्याच्या बैलजोड्या आजवर पुष्कळांनीं पुष्कळ पाहिल्या असतील; पण हभप पांगारकर गुरूला हभप वाकसकरासारखा कल्याण शिसा आतांच लाभला. बिचाऱ्यांचा भक्तियोग आज फळला ! हभप पांगारकर हा मोठा शिकंदर नशिबाचा आधुनिवक संताळ्या आहे. 'वेष धरावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ।।' ही रामदासी उक्ती सध्याच्या कामदासी कलियुगांत जर कोंणी अक्षरश: आचरणांत आणली असेल तर फक्त पांगारकरानेंच. आधींच बेट्याला देवानें बावळट वक्रतुंडाची जन्मजात देणगी दिलेली. त्यांत बीएच्या विद्वत्तेची भर. जातीचा व हाडाचा भट. अलीकडच्या ग्रॅज्युएटांप्रमाणें पदवीधर होऊन, नोकरीसाठीं भयाभया करीत वणवणण्यापेक्षां या भटानें पुढचा मागचा पोक्त विचार करून, 'मुमुक्ष'पणाची तुळशीची माळ गळ्यांत लटकवली आणि तुकारामादि संतांच्या नांवा हे टाळ कुटण्यास प्रारंभ केला. बोचरे

काढलेला फेटा कसा बांधावा, बाराबंदी बंडीचे अगर हे दासी आंगरख्याचे बंद उलटे पालटे कसे बांधावे, जरा ढका लागतांच भररस्त्यांत सुटणारा काष्टा कसा मारावा, काष्टा सुटला तरी रस्त्यानें धोतरांत लडबडत कसे चालावे, व्याख्यानांत पुराणांत भजनांत भक्तिरसाचे हुंदके कसे द्यावे, पंढरीरायाचे प्रेम हृदयांत ड्रेनेजगटाराप्रमाणें तुडुंब भरून आलें म्हणजे भरसभेंत बाप मेल्यासारखा भोकाडा कसा पसरावा, एकदम समाधीच्या बेशुद्धीची बतावणी बेमालूम कशी करावी, इत्यादि हजार गोष्टींत पट्टीच्या नटांना सुद्धां या डांबरट भटाचा हात धरवणार नाहीं. ज्ञानेश्वरापासून तों आजपर्यंत ईट्टले माझे आऽऽई म्हणून नाचत गात, जवळजवळ एक लाख रुपयांची पुंजी कम वणारा जर कोणी संत अवतरला असेल, तर हा एकटा घालवेडा पांगारकर. कनक आणि कांता तुकारामासारख्या संतांनीं जरी विष्टेसमान मानली असली, तरी हा आंग्लपदवीधर 'संतांचा पायिक' कनकाची विष्टा अनेक हजारांच्या टोपल्यांनीं खात आलेला असून, वंशवेलवृद्धांचें याचें निष्काम कर्म अझून अव्याहत चालूंच आहे. या बुवानें ग्वालेर इंदोरसारख्या पुराणाळलेल्या संस्थानिकांपुढें आपल्या घसरत्या फेट्याचा आणि निसटत्या काष्ट्याचा भक्तिरंग रंगवून त्यांच्या हजारों रुपयांची विष्टा आजवर कसकशी चाटली, तें सर्वश्रुतच आहे. बीए झाल्यावर बुवा बनावें, म्हणजे विठोबाच्या नांवाच्या पांचजन्याने पंचप्राणाचीच काय, पण पंचपिढ्यांची पंचाईत कायमची कशी मिटवतां येते, हें पांगारकराच्या गोमुत्री चरित्रावरून बेकार पदवीधरांना शिकतां येण्यासारखें आहे. परंतु, कोणाहि शिष्याच्या हातांत संप्रदायाचा गंडा न बांधतां, त्याला गंडविणाऱ्या या गुंड सत्पुरुषाचा आणि हभप वाकसकर (बडोदे) यांचा घरोब्याचा लळा दुधांत शिजविलेल्या भाताइतका स्नेहाळ जमलेला असावा, अशी एकाहि इतिहाससंशोधकाची कल्पना नव्हती. वाकसकर हे एक बऱ्यापैकीं इतिहास-सेवक म्हणून लोकांना माहीत होते. पण त्यांच्या ठायीं हभप-पणा आहे, ते मोठे संतसेवक आहेत, त्यांचें घराणें पागारकराच्या लळ्याच्या घरोब्यांत आहे, हा मात्र पुष्कळांना बिकट ताम्रपटवाचना इतकाच चिकट चमत्कार वाटला. भटांना दूध पाजून त्यांच्या पायाचे गटारगंगाजळ पवित्र प्रसाद म्हणून घटघटा पिणारी कायस्थ प्रभूंतील पिढी आज घटकेला बी बियाण्यांसकट मेली असावी, या आमच्या कल्पनेला वाकसकरानीं खोटें पाडलें. वटोदर महात्म्य त्याच्या चिकाच्या प्रभावाइतकेंच चिकट चिरंजीव खरें !

भात खाऊन अवलक्षण!

हभप पांगारकराच्या तुळशीच्या माळेच्या पुण्याईनें या भटी सोद्यावर वाकसकर इतके फिदा झाले कीं त्याचा हात आपल्या घरीं भिजावा, पाण्यांत नाहीं तर दुधांत भिजावा, पण भिजावा, अशा भक्तिरसानें आपादमस्तक चिंब भिजून, त्यांनीं आपल्या गुरुमावली पांगारकराला 'फराळाला' बोलविले. मावली काय बिचारी ! ती नेहमीं समाधिमग्न. देहाचा पत्ता आत्म्याला नाहीं आणि आत्म्याचा ठाक परमात्म्याला नाहीं ! जनक राजर्षि एकपट विदेही तर हे भटर्षि लाखपट विदेही ! देहाचीं कर्मे देह करो,

आत्माराम तळीराम गार करण्यांत गर्क ! वाकसकर-कल्याणानें नैवेद्य दाखविला न् गुरुमावलांचें तोंड पोटभर जेवले. एक सच्छील पवित्र देशस्थ ब्रम्हमुखोत्पन्न संत ब्राम्हण एका ''संकर कायस्थ जात्योद्भव शूद्राधम परभू'' कडे जेवला ! नारायणराव पेशव्याला नऊ कलमी कतबा लिहून देणाऱ्या कायस्थाच्या घरीं संतमुकुटमणि ब्राम्हणवंश-कोहीनूर पुण्यपतनस्थ मुमुक्षु जेवला ! वाकसकरांना जीवन्मुक्ती मिळाली आणि गुरुमावलीनें भक्तीरसाच्या तंद्रींतच पोटावर हात फिरवून मोक्षाचा जोरदार ढेकर दिला. कांहीं दिवस हें 'निर्लेप फराळाचें' वृत्त बडोद्यांतच निर्लेप राहिलें. इतक्यांत एका जोशी नांवाच्या पंक्तिपठाणानें या ढेकराची वृत्तपत्रांत बोंब ठोकली. झालें. सर्व विश्व गडाडलें. गुरुमावली पांगारकराचा कासोटा फिटला. समाधी उतरली. फराळ का जेवण ? निर्लेप का निर्फोडणी? जेवलो तो मी का माझा बाप? हा गुरुमावलीला मोठा प्रश्न पडला. मोठा वाद माजला. खाल्लें तरी काय? रताळी का गडगटे? पाटवड्या का पांपलेट? कडबोळी का कोलंबी? भात का दिव्याची वात? विदेही महात्मा बिचारा ! तोंडानें गिळलें न् पोटांत रिचलें. काय होतें न् काय नाहीं? पोट जाणें ! पण झालें तें पाप झालें. नरकाचें साधन केलें पोटा ओठाचा कट होऊन त्यानें मला पवित्र ब्राम्हणाला महारा मांगाच्या विंटाळांत टाकले. पंढरीरायाऽऽऽ काय रे लेका माझ्यावर हा प्रसंग!कायस्थ परभाच्या घरचें अन्न न् ते माझ्या पोटाच्या मुन्सिपालटींत? तुकाब्बॉराया, आतां काय रे करूं? एनिमा घेऊं का वांती काढूं? धौतबस्ती घेऊं का सारी आतडीच धोब्याकडे पाठऊं? कोठा बाहेर काढून त्याला शुद्ध टर्कीश बाथ देऊं, का गंधकाच्या धुरींत चोवीस तास फ्युमिगेट करूं? करूं तरी काय? पांडुरंगे माझे आई । सुटला धीर झाली घाई ।। अरे अरे अरे ! आजपर्यंत मी मोठमोठ्या राजेरजवाड्यांना हात दाखविला पण आज या भरभाकडाचा भात खाऊन अवलक्षण झालें. मोरोपंताऽऽ बाबा धांव :-

शुक्राचार्योदरिं जैं कच शिरतां कचकचाट बहु झाला ।
वाकसकर सदनीचा गिळितां म्यां भात अनुभवा आला ।।

गुरुमावलीच्या घरोब्याच्या लळ्याला असल्या कळा येऊं लागतांच, शिष्योत्तम वाकसकरानीं हस्तांजुली जोडून खुलासा केला कीं गुरुराज, अहो मी भातसुद्धां दुधांतच उकडला होता. पण हे ओढाळ गुरू या मखलाशीला थोडेच भीक घालणार? दुधाचें आमंत्रण, दुधाचें स्नान, दुधाची ताटवाटी, दुधाचा पाट लोट्या, दुधाचा भात, दुधाची भाजी आमटी, प्यायला दूध, आचवायला दूध, भोजनोत्तर शौचविधीला दूध, असा जरी एकरकमी दुधाचा मारा वाकसकरानीं पांगारकरावर केला असता, तरी त्याला थोडाच दुधाचा घाम फुटणार ! ताबडतोब पांगारकरानें खुंटावरल्या वेदोनारायण न्हाव्याला बोलाऊन डोकें दाढी मिशी खांका भादरून घेतल्या आणि ताज्या गाईचें ताजें शेणमूत खाऊन प्रायश्चित्ताची जाहीर नोटीस प्रगट केली. वाकसकरानीं दुधाच्या सबबीचा कितीहि मुसळधार पाऊस पाडला, तरी गाईम्हशीच्या शेणमूतापेक्षां त्याची किंमत फुटक्या कवडीनेंहि 'वधारली' नाही ! स्वत:च्या ज्ञानाला, संस्कृतीला, घराण्याला, घरोब्याला, जातीला, प्रतिष्ठेला, चित्तपावनतेला, शुचिर्भूतपणाला, सर्वस्वाला वाकसकर कितीहि ताडमाड उंचीची किंमत देत असले, तरी त्यांच्या लळ्यांत लोळणाऱ्या घरोब्याच्या घर-उब्या गुरुमावलीनें न्हाव्याच्या वस्तऱ्यापुढें आणि शेणमुताच्या भुरक्यापुढें त्या सगळ्यांना खेटरा इतकीहि किंमत दिली नाहीं, एवढ्यावरून वाकसकरांना कांहीं अक्कल शिकतां आली तर पहावी.

यांत दोष कोणाचा?

या प्रकरणीं पांगारकरावर सर्वजण टीकांचा भडीमार करीत आहेत. निषेधाच्या सभा भरविण्याचाहि बूट दोन तीन ठिकाणच्या कायस्थांत शिजत आहे. वाकसकरांनीं पाण्याचा लवलेशहि न लावतां केवळ दुधांत भात शिजवून पाकशास्त्रांत जी अलौकिक संशोधनाची शास्त्रीय अक्कल पाघळली आहे, त्यांत या बुटाची बिरयाणी पडली, तर तेवढ्यानें कायस्थांच्या शूद्रत्वाच्या अथवा क्षुद्रत्वाच्या बदनामीचें परिमार्जन कितपत होईल, याची शंकाच आहे. आमच्या मतें यांत पांगारकराचा दोष मुळींच नाहीं. भट अखेर आपल्या अवलादीवरच जातो. खाल्ल्या घरचे वासे मोजणें हा भट जातीचा जन्मसिद्ध हक्कच आहे. टिळेमाळटाळवारी संत असो, नाहीं तर पळीपंचपात्री झोळीधारी पंत असो. भट आणि साप यांची करणी एकरकमी एकजिनसी एका गोत्राची ! इतिहास-संशोधनाची मिजास मारणाऱ्या वाकसकरांना 'सापाला दूध पाजलें तर तो वीष ओकतो' हा साधा सिद्धांत काय उमजूं नये? १८७८।७९ सालीं रा. रा. आत्माराम भिकाजी (कायस्थ प्रभु) मुनसफ कोर्ट इलीचपूर (वऱ्हाड) यांच्याकडे ब्राम्हणाकडून शिजविलेला सत्यनारायणाचा प्रसाद दिनकर नारायण विध्वंस आणि मोरो सखाराम बर्वे या चित्पावन वकीलांनीं न खातां फेकून दिला. त्यावरूंन सर्वत्र माठी चळवळ उडाली. हा इतिहासहि वाकसकरांच्या स्मरणांतून निसटला असेल, तर त्यांनीं इतिहास-संशोधनाचा भाडोत्री व्याप आतां बंद ठेऊन, चालूं आहे ती कारकुनीच धडपणें रेटावी, हें बरें. आज सुद्धां कायस्थ प्रभूकडे ब्राम्हणांनीं शिजविलेला सत्यनारायणी शिरा भटें खात नाहींत. उकीरड्यावर फेकून देतात. फार काय, पण कायस्थ प्रभूंच्या धार्मिक अडत्येगिरीवर स्वत:च्या उदरनिर्वाहाची सोय लाऊन जगणारीं भटें सुद्धां असला शिरा खात नाहींत. काळ कितीहि बदलला, तरी भट बदलत नाहीं. भटशाही मेली, तरी भटांचा आत्मवर्चस्वाचा तोरा मरत नाहीं, हे सनातन सिद्धांतह ज्यांच्या गळीं उतरत नाहीं, त्यांनी इतिहास-संशोधक म्हणून मिरवावे, हा पागलपणा नसेल, तर भटाळलेल्या सडक्या मनोवृत्तीचा नाचरा प्रकार तरी खास होय. भटांना काय! ते वाटेल तेथें, वाटेल तें, वाटेल त्या वेळीं अजीर्ण होईपर्यंत खातील. कायस्थ प्रभूंच्या घरीं किंवा हॉटेलांत कटलस पॅटिस खिम्यावर ताव झोडतील. व्हिस्की अंड्यांचा फडशा पाडतील. पण कायस्थ प्रभू त्याच भटांच्या घरीं कधीं काळीं जेवायला गेला, तर बायकोच्या किंवा बापाच्या 'ऑर्थोडॉक्सी'च्या सबबीवर त्याचें पान गाईच्या गोठ्यांत, नाहींतर संडासाजवळ वाढतील. त्यांचा त्यांत काय दोष? भटी धर्मच पडला तसा! रोटीबंद भटांच्या जातभाईंनी मटण मासळी महाग केली आणि बेटिबंदांच्या बेट्या मुसलमानांच्या भेटीला गेल्या, तरी भटांचें ब्राम्हण्य पांगारकराच्या क्षौरा इतकेच 'निर्लेप' असते, हें ज्या भटेतरांना अझूनहि नीट उमत नाहीं, ते हिंदुस्थानांत जगण्याच्या लायकीचे लोक खास नव्हत. भटाला काय? तो दुधांतला भात खाईल, भातांतलें दूध खाईल, दूधभात वाढणारा यजमानहि सहकुटुंब, सहपरिवार खाईल, आणि अखेर शेणभूत खातखात आपल्या जातींत जाऊन मिसळेल. पण भटांना दूधभात चारणाऱ्या लंबकर्ण चाणाक्यांना तरी कांहीं पोंच असावा कीं नाहीं? भट उपाशी मरत असला तरी त्याला अन्नपाणी देऊं नये, आणि आपल्यावर जरी उपासमारीची पाळी आली तरी भटकडचें अन्न ग्रहण करूं नये. मृत्यूच येत असेल तर महाराकडची सुकी भाकरी खावी, पण भटाच्या पंचपक्वान्नाकडे

थुंकूनहि बघू नये. असा इतिहासाचा खडखडीत इषारा आहे. अर्थात् पांगारकराला वाकसरानीं भात चारून निष्कारण अवलक्षण करून घेतलें. सबब या प्रकरणांत दोषी गुन्हेगार वाकसकर होत, आणि कोणाला निषेध करण्याची जर हुकीच आलेली असेल, तर या भटाळलेल्या कायस्थ मुर्दाडाचाच त्यांनीं निषेध केला पाहिजे. या प्रकरणीं कायस्थ प्रभू समाजाला अनेक वृत्तपत्रांनीं शेकडों सूचना केलेल्या आहेत. त्या सर्व पुनरुद्धृत करण्याइतकी जागा आमच्यापाशीं नाहीं. यदाकदाचित् तेवढी आम्ही खर्ची घातली तरीहि बेदरकार कायस्थांवर त्याचा कांहीं परिणाम होईल, अशी आम्हाला खात्री देववत नाहीं.

वाकसकरी दूधभाताचा सारांश

पांगारकरानें प्रायश्चित कां घेतलें? टाळ कुटून संतांच्या नांवांवर जगणारा हा संसारी जंत. बुवागिरीवरच त्याचा हजारी बाजारी संसार आजपर्यंत चाललेला आहे. वारकरी दीक्षा असली तरी 'एकमेका मुखीं भरविती कवळ' असल्या गोपाळकाल्यापेक्षां या संसारी भटाला शेणकाल्याचेंच महत्व विशेष वाटणें सहाजीक आहे. वाटेल तो धंदा केला तरी अखेर या भटाचें प्रेत वाकसकराच्या खांद्यावर जायचें नसून, तें ब्राम्हणांच्याच 'निर्लेप' खांद्यानें ओंकारेश्वरावर गेलें पाहिजे. वाकसकरांचा पांगारकरी लळा दुधांत शिजविलेल्या भाताइतका जरी 'बहोत घरोब्याचा' असला तरी त्याना आघाडीच्या मडक्याचाहि मान या जन्मांत लाभणें नाहीं. गुरुप्रेमाच्या उत्कट उमाळ्यानें यदाकदाचित् पांगारकराच्या प्रेताला वाकसकर शिवेलच, तर त्या प्रेताचें क्षौर करून, त्याला शेणमुताचें स्नान घालून, वाकसकरांना गचांडी मारून हुसकून देऊन, मगच भटलोक या भटी वारकऱ्याला शेवटचा अग्निसंस्कार लाभूं देतील. अर्थात् वारकरी पेशाच्या टाळानें सोनें कुटून संसार करणाऱ्या या विरक्त पांगारकर घालवेड्यानें आपल्या ब्राम्हण जातीची सनातन वेदोक्त मर्जी संपादण्यासाठीं, वाकसकराच्या निर्लेप दुधाळ मेजवानीला शेणमुतापेक्षांहि नीच व पापी ठरविली, यांत पांगारकरांच्या आजपर्यंतच्या चरित्राला, त्याच्या भटी संस्कृतीला, त्याच्या टाळकुट्या धंद्याच्या 'बिझिनेस एथिक्स'ला विसंगत असें कांहींच नाहीं. कायस्थ प्रभू समाज, किंवा त्यांतले वाकसकरासारखे स्वयंप्रतिष्ठित शहाणे, स्वत:ला कांहींहि समजत असले, तरी अखिल ब्राम्हण समाज त्यांना सामाजिक संस्कृतीच्या कोणत्या पायरीवर लेखतो, याची या प्रकरणीं चांगलीच साक्ष पटली गेली, यांत आम्हाला मोठा आनंद वाटतो. पेशवाईपासून पांगारकरापर्यंत भटांनी वेळोंवेळी कायस्थ प्रभूंना शेणासुतापेक्षां नीच ठरविण्याच्या हजारों घालमेली केल्या, तरी कायस्थांचा भटांविषयीं घरोब्याचा लळा लवमात्र कमी हात नाहीं. ही ज्ञानाची अत्युच्च परमावधि, संस्कृतीची कमाल कमावणि, का मेलेल्या मनोवृत्तीची मुर्दाड साक्ष? क्षत्रिय मराठ्यांच्या कौतुकास्पद आचरणाचा कित्ता वळवून, मागासलेल्या सर्व भटेतर समाजांनीं व अस्पृश्यांनीं एकजात सर्व भटांवर बहिष्कार घातला, तरी शहाण्या कायस्थांचीं मुंजी लग्नें लावायला आणि गर्भदानें साजरी करायला भटांची हातलावणी आहे तशीच कायम ! पंचपक्वान्नांच्या कायस्थी भोजनाला भटांनीं शेणसुतापेक्षां नीच ठरविलें, तरी देखिल दुधभाताच्या पाट्या त्यांच्या पोटांत रिचविण्यास धावणाऱ्या वाकसकरी धाटणीच्या कायस्थांना नांव

तरी काय द्यावें? अरे मतिमंदांनों तुमचा निर्लेप दुधाळ भात जर गाड्यावरी वांया जात असेल, तर तो भटांच्या मढ्यांवर न थापतां, उकीरड्यावर फेका. तेथले कृमिकीटक तुम्हाला खास आशीर्वाद देतील.

''श्राद्धपक्ष ब्राम्हणभोजन करणें त्याऐवजी दहावीस गाई मिळवून त्यांस अन्न घालावें. असा इकडे बेत केला आहे, सदरहू अन्वयेंच तिकडे असावें.''

- ग्रामण्य इतिहास पृ. ६०.

ही तुमच्या बापजाद्यांची आरोळी इतक्यांतच कशी विसरला? तुमच्या नसांत त्यांचेंच रक्त आहे कीं त्यालाहि तुम्ही बेइमान झाला? धार्मिक समजुती चुलींत धातल्या, तरी नेहमींच अजीर्णानें मरणाऱ्या ऐतखाऊ भटांच्या दुलदुलीत पोटांवर निर्लेप दुधभाताच्या पाट्या रचण्यापेक्षां, अन्नान्न करीत फिरणाऱ्या गोरगरीबांना साधा पाण्यांतला भात घासघासभर दिला, तर प्रतिष्ठित कायस्थ शहाण्यांनों, त्यांत तुमच्या मिजासखोर पगडीच्या झिळमिळ्या काळ्या पडतील काय? बडोद्याच्या श्रीमंत राजमान्य राजेश्री सकल गुणालंकृत वाकसकरी कायस्थांच्या घरांत दुधाचे हौद भरले असतील, तर त्यांनीं रस्त्यावरच्या कुत्र्या मांजरांना रोज कोजागरी घालावी. आम्ही पैज मारून सांगतो कीं पांगारकरांपेक्षां, किंवा कायस्थी इमानापेक्षां, तीं कुत्रीं मांजरे प्याल्या दुधाचें इमान विशेष सक्रीय दाखवितील.

ही कायस्थ स्त्रीवर्गाची बदनामी आहे

पांगारकराला चमचमित मेजवानी चारून, भटाळलेल्या वाकसकरांनी क्षौर शेणमुताची जी जाहीर बक्षिसी मिळविली, तिचे परिणाम वृत्तपत्री वादावर थांबणारे नाहींत. पांगारकरांचा आणि वाकसकराचा 'बहोत घरोबा' २५ वर्षांचा असो, नाहीं तर २५ मिनिटांचा असो; जेवण जेऊन त्याच्या पापनिरसनार्थ क्षौरपूर्वक शेणमुताचा प्रायश्चित्त विधी जेवणारानें करणें, म्हणजे यजमानाच्या घरांतील पाकनिष्पत्ती करणाऱ्या व पाहुण्याचा परामर्ष घेणाऱ्या पवित्र स्त्रीवर्गाची तीव्र मानखंडना व बदनामी करण्यासारखे आहे, याचा शहाण्या वाकसकरानीं कधिं विचार केला आहे काय? तुम्ही पुरुष मोठे अकलेचे कांदे असाल, विद्वत्तेत बृहस्पतीचे सावत्र बाप असाल, आणि वृत्तपत्री पत्रव्यवहाराची भांडणें लढविण्यांत चिटणीशी लेखणीचे औरस दांड असाल; परंतु तुमच्या कृतीमुळें स्त्रियांच्या भावना कशा व कितपत जखमी होतात, याचां तरी दाद घ्याल कीं नाही? 'आम्हा मोठ्या आदरानें, श्रमानें, कुशलतेने नाना प्रकारच्या उत्तमोत्तम पक्कान्नांनीं या अतिथाला संतुष्ट करण्याची पराकाष्टा केली; पण आमच्या हातच्या स्वयंपाकामुळें ह्या ब्राम्हणाचं पावित्र्य भ्रष्ट झाले. त्याला क्षौर करावें लागलें. अशा आम्ही हिणकस दर्जाच्या पातका बायका आहों आं?' अशा तऱ्हेचे कांहीच का विचार वाकसकरांच्या घरांतील सानथोर स्त्रियांत माजले नसतील? पांगारकर भटाच्या हलकट क्षौरविधानें त्या बिचाऱ्या सात्विक स्त्रियांना अपमानाचा कांहींच का चटका लागला नसेल? जातिसिध्द पतितत्वाच्या भटी आरोपांने त्यांच्या मस्तकांत संतापाचा कांहींच का हलकल्होळ उडाला नसेल? एका दांभिक संताळ्याला घरांतल्या यजमानानें मेजवानी चारून हें फुकटच्या फाकट विकत श्राद्ध घेतलें व आम्हा कायस्थ प्रभु स्त्रीवर्गाच्या

संस्कृतिहीनतेचा जगभर डंका पिटवला, म्हणून त्यांना मरणापेक्षांहि तीव्र दु:खाच्या डागण्या नसतील का लागल्या? वाकसकरांना आम्ही बजाऊन सांगतो कीं तुमच्या या पांगारकरी घरोब्याला लळ्यानें अखिल कायस्थ प्रभु स्त्रीसमाजाची तुम्हा निष्कारण बदनामी घडवून आणली आहे. पांगारकरांच्या पोटांत 'निर्लेप' कचऱ्याचे पेटारे रिचविण्याचा तुमच्या गुरुभक्तीचा महिमा एखाद्या खानावळींत किंवा क्लबांत साजरा झाला असता, तर आम्हांला एवढा निष्कर्ष काढण्याची कांहींच जरूर पडती न तुम्ही उघड्या माथ्याचे पुरुष जगाच्या उघड्या बाजारांत हवें तें केलें, करता, कराल, तर त्याची पर्वा कोणी करणार नाहीं. पण झाला प्रकार स्त्रीवर्गाच्या दृष्टीनें अत्यंत बेशरमपणाचा झाला, याविषयीं एकाहि बिचारी भगिनीचें आमच्याशीं दुमत होणार नाहीं. पुरुषी घमेडीच्या तोऱ्यामुळें तुम्हांला स्त्रियांच्या दुखविलेल्या भावनांचा विचार सुचणार नाहीं. पण लक्षांत ठेवा, या प्रकरणांत तुमच्या पोरकट वृत्तपत्री सबबीपेक्षां या भावनांना विशेष महत्व आहे. ग्रामण्यांच्या संतापजनक युद्धांचे निर्णय, अहो इतिहास-संशोधक, स्त्रियांच्या भावनांच्या निष्कर्षावरच आजपर्यंत विद्वान विवेकवाद्यांनीं दिलेले आहेत. सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत झालेल्या ग्रामण्याचा निकाल सुप्रसिद्ध रामशास्त्री प्रभुणे यांनी कसा दिला, त्याचा इतिहास तरी विचारांत घ्या-

''विचार करिता रामशास्त्री याणी उत्तर नानास दिल्हे कीं त्यांचे (कायस्थ प्रभूंचे) स्त्रियांनीं पाक केला असतां आपण जाऊन जेवावे त्याणी वाढावे त्यांत भेद नाहीं. ते आपण एकरूप.''

ग्रामण्य. पृ. ७५.

संस्कृति-निर्णयाच्या अनेक बाबींत पाकक्रियेला महत्व फार असते. पाकक्रिया मुख्यत: स्त्रीवर्गाच्या हातीं. अर्थात् पाकक्रियेवरून प्रायश्चित्ताचा प्रसंग म्हणजे सामाजिक संस्कृती-हीनत्वाचा पुरावा आणि स्त्रियांच्या पतितत्वाची पावती. ही पावती आणि पुरावा पाजी पांगारकरानें कायस्थ प्रभु जातींतील अखिल स्त्रीवर्गाच्या पदरांत वाकसकरांच्या पुण्याईनें टाकली आहे. त्याचा कडकडीत निषेध का. प्र. भगिनी वर्गाकडून सर्वत्र न होईल, तर ही बदनामी वर्तमान इतिहासांत वज्रलेप चिरंजीव राहून, भावी पिढ्यांना खिजविण्याचें कार्य सनातन करीत राहील. प्रस्तुत प्रकरणीं का. प्र. जातींतील पुरुषवर्ग जर हिजड्याप्रमाणें स्वस्थ बसेल, तर स्त्रियांनीं आपल्या बदनामाच्या प्रतिकारार्थ सत्यभोगाप्रमाणें खवळून उठले पाहिले. असेंहि न होईल, तर सारा कायस्थ प्रभू समाज म्हणजे मुडद्यांचा मेंढरवाडा असें कोणी स्पष्टाक्तीनें म्हटल्यास त्याच्या तोंडावर हात ठेवायचाच तर तो तरी कोणी मर्दानें उचलायचा?

कल्याणच्या राममारुती उत्सवांत हाच लफंगा संताळ्या नाचणार काय?

भाद्रपदांतील अविधवा नवमीला कल्याण येथें दरसाल श्रीराममारुती महाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव ९-१० दिवस साजरा होत असतो. शेकडों रुपयांच्या वर्गण्या जमा होतात. प्रसादाच्या

दिवशी हजारो लोक जेऊन जातात. या उत्सवाचें व राममारुती संस्थानाचे चालकच भटी पायतणांचे नाल बनलेल्या पांच सहा कायस्थ प्रभू आजागळांच्या हातीं आहे. भटी महात्म्याच्या उकडहंडीत शिजून उकडून निघालेल्या या शहाण्या कायस्थांना वाकसकराइतकाच पाजी पांगारकराचा मोठा लळा, कायस्थांच्या घरच्या पंचपक्वान्नी भोजनाला शेणामुतापेक्षां नीच ठरविणाऱ्या या संतकुलांगार पांगारकराला हे भटाळलेले कायस्थ प्रस्तुत उत्सवांत दरसाल मोठ्या अहमहमिकेनें नाचवीत असतात. त्याच प्रमाणें, प्रसादाच्या दिवशीं भटांच्या खास सोवळ्या पंगति जेऊन उठल्यावर, आणि त्यांची खरकटी पुण्य म्हणून स्वत:च्या हातांनी निपटल्या नंतर (कदाचित् भटांचें खरकटें उष्टेंहि प्रसाद म्हणून खाण्यांत येत असेल!) इतर भटेतर भक्तांच्या भोजनाची व्यवस्था लावण्याचा भटमान्य शिरस्ता या भट-नाल कायस्थांनीं कल्याणास पाडलेला आहे. संतांच्या उत्सवांत कसलाहि पंक्तिप्रपंच मानणें हा घमेंडखोर भटांचा आणि बावळट भटाळलेल्यांचा शुद्ध पागलपणा होय. जे श्रीराममारुती महाराज अभेदभावी संप्रदायाचे प्रणेते, त्यांच्याच पुण्यतिथीला उपरोक्त भटी वर्चस्वाची चिळस आणणारीं चाण्डाळ कर्मे उत्सवाच्या चालकांकडून बिनविरोध केली जावी, ही मोठी बेशरमपणाची गोष्ट होय. प्रस्तुत उत्सव ठिकठिकाणच्या हजारों भक्तांच्या वर्गणीवर चालत असतो. या भक्तजनांत सात अष्टमांश भरणा भटेतरांचा असूनहि, त्यांना चालकांच्या या भटी गुलामगिरीची आजपर्यंत चीड येऊं नये, ही स्वाभिमानशून्यतेची परमावधि नव्हे काय? शेणमुताच्या प्रायश्चित्तानें कायस्थ प्रभूंना चाण्डाळाप्रमाणें हीन लेखणाऱ्या पाजी पांगारकराचीं प्रवचनें पुराणें जर यंदा व पुढेंहि कल्याणच्या या उत्सवांत व्हायची असतील आणि प्रसादाच्या भडाऱ्यांतहि भटांच्या जन्मप्राप्त वर्चस्वाची चोचले पूर्वीप्रमाणेच चालणार असतील, तर स्वाभिमानी ब्राम्हणेतर भक्तांनी व विशेषत: आपल्या आयाबहिणींच्या संस्कृतीची थोडीतरी चाड असणाऱ्या सर्व कायस्थ प्रभूंनी या उत्सवाला एक कवडीहि वर्गणी देऊं नये. इतकेंच नव्हे, तर त्यांनीं सध्याच्या भटी पिंडाच्या कायस्थ चालकांना श्रीराममारुती संस्थानांतून लाथ मारून हुसकून बाहेर काढावे व कारभार आपल्या हातीं घ्यावा, अशी आमची आग्रहाची विनंती आहे.

लोकमताचे धिंडवडे

सध्याचा काळ गोंधळाचा (Chaotic) आहे. परिस्थितीचे बदल दर दिवशीं फार झपाट्यानें होत आहेत. पुढाऱ्यांची पगडी-पालट कुंभाराच्या चाकालाहि लाजवीत आहे. लोकशिक्षणाचें कार्य करणाऱ्या वृत्तपत्रांतील विचारांतहि भयंकर सरडेशाही माजली आहे. दररोज नवा विचार, नवा आचार, नवी धोरणें. पक्षपंथांच्या उत्पत्तीने तर डास चिलटांवर ताण केली आहे. कालची भाषा आज नाहीं. आजचें धोरण उद्यां नाहीं. परवां काय होणार तें कोणी सांगू शकत नाहीं. असल्या सरडाईमुळें लोकमत बावचळल्या सारखें बनललें आहे. तुफानांत सापडून सैरावैरा पळणाऱ्या लोकांच्या दुर्दशेप्रमाणें लोकमताचे सर्वत्र धिंडवडे उडत आहेत. बिचारी म्हणून पुढारी बनलेल्या शहाण्यांच्या आचारविचारांत जेथें ताळमेळ नाहीं, तेथें केवळ वृत्तपत्रें वाचून, किंवा सभांतील व्याख्यानें ऐकून, आचारविचारांची एकवाक्यता निश्चित करूं पहाणाऱ्या बहुजनसमाजांची काय त्रेधा तिरपीट उडत असेल, त्याची कल्पनाच केलेली बरी. ही

त्रेधा तिरपीट अक्षरशत्रू जनतेपेक्षां 'एज्यूकेटेड' म्हणून मिरविणाऱ्या अर्धवट शिक्षितांच्या बाबतींत बरीच दिसून येते. प्रत्येक चळवळींत कांही धावरे देखावे (Pasuing Phases) नेहमीच असतात. पण तेच देखावे सनातन मानून. त्यावर जनतेला विश्वास ठेवण्यास, अगर त्याप्रमाणें आचारविचाराची कायम बदलण्यास सांगणें, हा पुढाऱ्यांचा केवळ पाजीपणा होय. दीड दोन वर्षांपूर्वी जिकडे पहाल तिकडे 'हिंदु मुसलमानकी जय' जोरजोरानें ठणाणत होता. तुर्कस्थानांत केमालपाशानें खिलापतीला आमूलाग्र उखडून तिचा विध्वंस केला, तरी इकडे हिंदु मुसलमान 'खिलाफतकी जय' ओरडत होते. हिंदूंची व्याख्यानें मुसलमानांच्या मशिदींत आणि मुसलमानांचीं व्याख्यानें हिंदूंच्या देवळांत होत होती. तात्पर्य, हिंदु-मुसलमान-समरसता हा त्या वेळचा 'राष्ट्रीय' मंत्र आणि त्या प्रमाणें आचारविचाराच्या शिस्तवार शिक्षेची जनतेवर पुढाऱ्यांकडून जबरदस्ती होत होती. आज परिस्थितीचा रंग किंचित् बदलतांच हिंदूंनी मुसलमानांचें तोंड पाहूं नये, त्यांच्याशीं कसलाहि व्यवहार करू नये, ते आपले वैरी आहेत, अशा प्रकारच्या कडव्या बहिष्काराची भयंकर धामधूम सर्वत्र चालूं असून, त्या प्रमाणें जनतेच्या आचारविचारांवर पुढाऱ्यांचा मतशासनाचा दण्डक सुरूं आहे. पूर्वीची एकीची भाषा आज बहिष्काराच्या भाषेंत रूपांतर पावली आहे. अशा अवस्थेंत जनतेनेंच मनाला प्रश्न विचारला पाहिजे कीं ही पुढाऱ्यांची सरडाई आहे तरी काय? काल तसें बोलले, आज त्याच्या अगदी उलट असें बोलतात? जर कालचा यांची भाषा खरी नव्हती, तर आजची तरी खोटी कां नसावी? आणि आजचा विचार उद्यापर्यंत कायम टिकेल, याची तरी हमी कोण देणार? विशेष विचारवंत असतील तर तेव्हांच सारांश काढतील कीं पुढाऱ्यांच्या कालच्या, आजच्या किंवा उद्याच्या मतप्रतिपादनावर विश्वासून, जनतेनेंहि सरडाईचे थारेपालट करणे बरेंच धोक्याचें आहे. चालले आहेत ते सारे धावरे देखावे आहेत. त्यांत सनातन तत्व असें कांहींच नाहीं. सध्यां गोंधळाचा काळ आहे. निश्चित विचाराला कोठेंच थारा नाहीं. आत्मस्तोम ासाठीं धाधावलेले खरे खोटे पुढारी तापल्या तव्यावर आपल्या हंगामी मतांच्या भाकऱ्या भाजून घेत आहेत. अशा प्रसंगीं जनतेनें एक तर स्वस्थ तरी बसावें, पगडी पालट्या पुढाऱ्यांनाच फक्त हवे तसे खिदळू बागडूं द्यावे, त्यांच्या सरडाईच्या तोंडचलाखीला बळी पडू नये, अथवा प्रचलित सर्व पुढाऱ्यांना पेनशनींत काढून आपल्यांतील नव्या दमाच्या विचारवंतांना लोकमत-नियंत्रणाच्या झेंड्याजवळ उभे करण्याचा प्रयत्न धिटाईनें करावा. सध्यां चालूं असलेले लोकमताचे धिंडवडे शक्य तितक्या लवकर बंद पाडणें, हें जनतेचे कर्तव्यकर्म आहे आणि तें त्यांनें बजावणें जरूर आहे.

बायकांचे बण्ड

गेला जून महिना बायकांच्या बण्डाचा होता. या महिन्यांत सामंत-लेले हा सारस्वत-चित्पावन ब्राम्हण-पोटभेद-विध्वंसक विवाह झाला दुसरा तालचेरकर-आय्यर हा मराठा-मद्राशी ब्राम्हण जातिभेद विध्वंसक विवाह झाला. आणि तिसरा पाळदीकर-खान हा हिंदु-मुसलमान मिश्रविवाह झाला. पहिल्या दोन विवाहापेक्षां तिसऱ्या विवाहानें बरीच गडबड उडवून दिली. पुण्याच्या हिंदूच्या (म्हणजे फक्त

ब्राम्हणांच्या) नेहमीच्या स्वभावधर्मानुसार सभा, व्याख्यानें, निषेध वगैरे मामुली अललल डुर्रर पोटभर झालें. बाकी इतरत्र वृत्तपत्री गडगडाट झाले. मुमताजी लौकिकाच्या पत्रांनीं खूप पैसा कमविला. पुष्कळ धामधूम माजली. पण या मालिनी-खान प्रकरणांत धनवडे प्रकरणांतली मसालेदार मौज पुरेशी भटांना मात्र नीटशी वठवितां आली नाहीं, यांत मुळीच शंका नाही. हिंदु हिंदु म्हणून भटांनीं सभांचा आणि निषेधाचा मोठा मुसळधार पाऊस पाडला. वृद्ध हिंदूंच्या सभा, तरूण हिंदूंच्या सभा, पुरुषी हिंदूंच्या सभा, बायकी हिंदूंच्या सभा, पुरुषी बायकांच्या सभा, बायकी पुरुषांच्या सभा असा मोठ्ठाथोरला कोलाहल जरी पुण्यांत माजला आणि त्याचा प्रतिध्वनि, मामुली थाटाने, इतर सर्व ठिकाणच्या भटी पत्रांत दुमदुमला, तरी एक मोठी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. (आणि ती नेहमींच सर्वांनी लक्षांत ठेवावी) कीं हा सर्व सभा निषेध आरडाओरडीचा धुमाकूळ घालणारे अखिल कोणीहि हिंदू नसून, फक्त नेहमीचे सनदशीर चळवळी भटजी व त्यांच्या 'सार्वजनिकत्वा'ला आणि अलीकडे 'हिंदुत्वा'ला उचलून धरणाऱ्या दहापांच भटेतर मांजराच्या डावल्या ! हिंदू संघटणाच्या पुराणांना सध्यां केवढीहि भरती आलेली असली, तरी अखिल भटेतर हिंदूंचें पाठबळ मिळविण्याइतकी भटांनीं कोणती प्रेमाची तपश्चर्या केलेली आहे कीं त्यांच्या हव्या त्या सुराला सूर द्यायला भटेतरांनीं बिनशर्त धाऊन यावे? अर्थात् य हिंदु मुसलमान मिश्रविवाहाबद्दल सर्वत्र आणि विशेषत: पुण्यांत जी नारोशंकरी ठणाणली, तींत भटेतर जनतेनें व वृतपत्रांनी मुळींच कसलाहि भाग घेतला नाहीं, हें योग्यच झालें. उलट, बहुतेक सर्व जबाबदार भटेतर पत्रकारांनीं खान मालिनी विवाहाचें नि:संदिग्ध अभिनंदनच केलेले आहे. प्रस्तुत विवाह बराच गैर मुहुर्तावर लागला. 'हिंदु मुसलमानकी जय' 'खिलाफतकी जय' आरोळ्या ठोकीत जेव्हां चळवळ्ये भटजी मुसलमानांच्या गळ्यांत गळे घालून साऱ्या देशभर पिंगा घालीत फिरत होते, त्या वेळीं जर हा विवाह लागता, तर भटांची भाषा कशी असती, याची लोकांनीं कल्पना करून पहावी. ज्ञानप्रकाशनें-एका भटी पत्रानें- या विवाहाचें अभिनंदन केलें, म्हणून त्याचे अंक भटांनीं सभेंत जाळले, ज्ञानप्रकाशच्या अग्निप्रलय-प्रसंगीं सांपत्तिक देणग्या देणारांनीं आपल्या रकमा परत मागाव्या म्हणून ठराव पास झाले. वर्गणीदारांनीं व सार्वजनिक लायब्ऱ्यांनीं ज्ञानप्रकाशावर बहिष्कार घालावा आणि खान मालिनी बरोबरच त्यांचे अभिनंदन करणाऱ्या सर्व हिंदु पत्रकारांचा निषेध करावा असेंहि ठराव पास झाले. अंक जाळणें. बहिष्कार घालणें * किंवा निषेध करणें, एवढींच बायकी शस्त्रें इंग्रेज राज्यकर्त्यांच्या महाकृपेनें भटांच्या हातीं राहिली आहेत. नाहींतर अभिनंदन करणाऱ्या सर्व पत्रकारांचे खून पाडण्याचे ठरावसुद्धां सक्रीय पास करणारे घरच्या म्हातारीचे काळ भटांच्या जातींत नाहींत असें नाहीं. ज्यांना इतरांच्या मतस्वातंत्र्याची एवढीहि बूज राखतां येत नाहीं, त्या गावगुंडाच्या स्वराज्य-प्राप्तीच्या गप्पांवर लोकांनीं कितपत विश्वास ठेवावा, यांचा अगत्य विचार होणें जरूर आहे. खान मालिनी विवाहाचा निषेध करणाऱ्या भटी संघटनवाल्यांनीं संस्कृति, धर्म समाज वगैरे ठरावीक शब्दांवर वेदान्ती व्याख्यानें झोडण्यांत लेखन वक्तृत्वाच्या कसरति खूप मेहनतीनें केल्या आहेत. या कसरतींच्या कोल्हाटी उड्यांनी अर्धकच्च्या एज्यूकेटेडांचीहि बरीच दिशाभूल झालेली आहे; -आणि नेहमीं हव्या त्या चळवळींत हाच

* मागें कांहीं वर्षांपूर्वी कै. गणेशराव तेलंगाच्या संपादकत्वाखालीं बेळगांवच्या 'चिकित्सक' पत्रानें पुण्याच्या 'केसरी'ची (संपादक के. टिळक) ससेहोलपट केली असतां, 'चिकित्सकावर बहिष्कार' पुकारण्याचा पुणेरी भटांनीं केलेला अट्टाहास पुष्कळांच्या स्मरणांत असेलच.

प्रकार घडत असतो, त्यांत आम्हाला तरी आश्चर्य किंवा चमत्कार वाटणार नाही. विशेष तिरस्करणीय गोष्ट म्हणजे, उठल्या सुटल्या भटेतरी पत्रांवर व लेखकांवर अश्लीलाचा छाप मारण्यास धाधावलेल्या या भटा निषेधकांना मालिनीबाई विषयीं आपली निषेधवाणी व्यक्त करतांना, मालिनी ही 'बाई' आहे. या मुद्याचा सपशेल विसर पडलेला दिसतो. स्त्रीवर्गाविषयीं लेखणी वाणी जपून वापरा, सर्वांनाच आया बहिणी बायका असतात, इत्यादी पुराणांचीं प्रवचनें झोडणाऱ्या या 'ठरावीक' पुराणिकांची लेखणी वाणी प्रस्तुत प्रकरणीं अश्लीलत्वाच्या काठांवर नाचली, का थेट अश्लीलत्वाच्या नरक-कुंडांत पिचली, याचा विचारवंतांनीं विचार करावा. हाडीं मासीं खिळलेल्या रूढ कल्पनांना जबरदस्त धक्का देणाऱ्या प्रत्येक अभिनव विचार व आचार क्रांतीबद्दल याच घाणेरड्या रीतीनें लोकमत नियंत्रणाचें कार्य जोंपर्यंत वृत्तपत्रें व वक्ते करीत राहतील, तोपर्यंत हिंदु समाजानें आपल्या भविष्याबद्दल फारसा आशावाद पत्करूं नये, असेंच म्हणणें प्राप्त पडते. क्षुद्र स्वार्थासाठीं हिंदु मुसलमानांना उद्भवलेल्या 'टेंपरवारी' विषमतेच्या धांवत्या देखाव्यांना वाचकून, दोनहि समाज आपापल्या सवत्या सुभ्याचे तटबंदी खेळ कितीहि आदळआपटीनें खेळत असले, तरी त्यांवर त्यांना आपलें भविष्य कालीन् अस्तित्व मुळींच टिकवतां येणार नाहीं, इकडे दोनहि समाजातल्या विचारवंतांचे लक्ष जाईल तो सुदीन ! हे कार्य पुरुषांकडून घडलें नाही, तर 'बंड' करून बायका ते घडवितील. राष्ट्रहितासाठीं परुषांच्या नालायकीवर पांघरूण घालणें, हा स्त्रियांचा धर्मच आहे. 'बायकांचे बण्डा' विषयीं आम्ही आमचे स्पष्ट विचार मागेंच (प्रबोधन वर्ष ३ रें, अंक ४-५, १-६ डिसेंबर १९२३) व्यक्त केलेले आहेत. अर्थात् उपरोक्त तीनहि विवाहीत बायकांनी केलेल्या बण्डाचें आम्ही, निंदकांच्या निंदेची दिक्कत न बाळगतां, मन:पूर्वक अभिनंदन करतों.

नवीन शिव्यांचे शाप तरी द्या

एखादे भटेतरी वृत्तपत्र किंचित् स्पष्टोक्तीनें आणि बिनतोड विधानांनीं भिक्षुकशाहीच्या मारा करूं लागलें कीं त्याला 'शिवराळ पत्र' असें नांव भटी पत्रें देतात. प्रबोधन याच वर्गांत मोडतो आतां डॉ. आंबेडकर या विद्वानानें चालविलेल्या 'बहिष्कृत भारत' पत्राचा नुकतांच कांही भटी पत्रांनीं 'शिवराळीकरण विधी' उरकून घेतला. जणूं काय, बहिष्कृत भारत भटांच्या बऱ्यावाईट अभिप्रायावरच जगणार मरणार आहे! हें पत्र थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थ व्यक्त करणारी भाषा-प्रौढी, विधानकौशल्य, आणि विषय-प्रतिपादन, या बाबतींत डॉ. आंबेडकरांनीं इतक्या निपुणतेनें चालविलेले आहे कीं त्यांच्या तोडीला भटांचे एकहि पत्र भटांना बसवून दाखवितां येणार नाहीं. डॉ. आंबेडकर महाराच्या ऐवजीं जर चित्पावन भट असते, तर याच त्यांच्या वृत्तपत्री लेखनकुशलतेच्या भटांनीं पालख्या नाचविल्या असत्या! इतरांना शिवराळपणाची सर्टिफिकीटे देणाऱ्या या भटी पत्रांना स्वत:च्या पायाखालीं काय जळतें, हे न दिसण्याइतके ते जरी ऊर्ध्व-वदन झालेले असले, तरी आमची त्यांना एवढीच विनंती आहे कीं बाबांनो, शिव्याच द्यायच्या असल्या तर निदान नवीन शिव्या तरी द्या. जुन्या संग्रहावर आतां किती दिवस जगणार?

परिषदेची धामधूम!

कायस्थ प्रभूंत एक पगडी-शिलेदार हुजूर वर्ग आहे. श्रीमंतीच्या दिमाखावर हा वर्ग नेहमीं बहुसंख्य मजूर (म्हणजे पोटार्थी) वर्गावर पुढारपणाची सुकी ओली झब्बूरी मिरवूं पहात असतो. मजूर वर्ग या झब्बूंना पूर्ण ओळखून असल्यामुळें, तो त्यांच्या झब्बूपणाला नेहमींच फूटबॉली टाचा हाणीत असतो. अर्थात् एरवीं व्यवहारांत हे हुजूर झब्बू बहुसंख्य मजूर वर्गापासून सुतक्याप्रमाणें बहिष्कृत पडलेले असतात. मजुरांकडून आरत्या ओवाळून घेण्याची पर्वणी हुजूरांना ९।१० वर्षांनीं फक्त एखाद्या परिषदेंतच काय ती लाभते. एरवीं हे जातीची कांहीं दखल करीत नाहींत आणि जातींत यांना कुत्रासुद्धां विचारीत नाहीं. १९२० सालीं इंदोरला परिषदेचें एक नाटक झालें. खूप बडी मेजवानी झडली. समाजोन्नतीचे मोठमोठे टेंभे पेटले. जाडजाड ठराव पास झाले. बहुतेक साऱ्या झब्बूंच्या हुजुरी थाटाचे फलाटफरम्यावर प्रदर्शन झालें. या गोष्टीला ७ वर्षे झाल्यामुळें झब्बूशाहीला हपापलेल्या कांहीं हुजुरांना आतां पुन्हा परिषदेची खाज सुटली आहे. इंदोरकरांचा मोतीचूर आता पुरा जिरल्यामुळें, बडोदेशाही पुलाव्याच्या चमचमीत थाटासाठीं, बडोदकरांच्या नाकांत परिषदेबद्दल काड्या घालण्यास त्यांनीं सुरुवात केली आहे. बडोदा म्हणजे झब्बूंचे आगर! त्यांना झटकन् परिषदेची एखादी शिंक येणार नाहीं, असें नव्हे. परंतु, इंदोरच्या परिषदेनें परिषद ही काय गौडबंगाली चीज आहे, हे सर्व विचारवंतांच्या पूर्ण प्रचितीस आणल्यामुळें परिषदेच्या ढोंगधत्तुऱ्याला बळी पडायला अखिल कायस्थप्रभू जातींत या झब्बूंशिवाय एकहि ढब्बू सांपडणार नाहीं. हे परिषदेचा पाचकळ फार्स करणारांनीं लक्षांत ठेवावे. नाटकी परिषदा भरवून मजूर वर्गाच्या हातून आपल्या हुजुरातीच्या पगड्यांवर झब्बुगिरीचे तुरे रोवून घेण्याचे ते जुने दिवस आतां विसरा. म्हणे परिषद भरवा. जणूं काय परिषद भरली नाहीं तर जातीचा जीव जाईल! परिषदा भरवून आजपर्यंत काय समाजोन्नतीचे दिवे लावले, तर आतां बडोद्याचा पुलावा ठासून इलायतीत रोषनाई करणार? मूठभर लुच्या श्रीमंती झब्बूंनीं गरीब जातभाईंच्या डोक्यांवर आपल्या पालखीप्रस्तावनेच्या वराती फुकटाफाकट मिरवून घेण्याची जी सभ्य युक्ती, तिला 'परिषद' असे म्हणतात. तींत समाजहि नसतो आणि उन्नतीहि नसते. सगळाच चोरांचा बाजार.

(के. सी. ठाकरे)

गुजराथचा जलप्रलय

कोणाच्या स्थानीं मनीं स्वप्नींहि येणार नाहीं अशी विचित्र घटना घडविणें म्हणजे निसर्गाची सहजलीला आहे. पंचमहाभूतांना जिंकून आम्ही माणसांनी त्यांच्यावर केवढीहि कदरबाज सत्ता गाजविली आणि त्यांना गुलामांप्रमाणें राबविले, तरी या महाभूतांच्या सहज स्मित हास्यानें आमची ती सायन्टिफिक सत्तेची कदरबाजी एका क्षणांत कशी कालमडून उध्वस्त होते. हें गुजराथच्या चालूं जलप्रलयानें खासें प्रत्ययास आणले. जलप्रलयानें रेल्वे रस्ता उध्वस्त होणें, तार यंत्राचे खांब कोसळून पडणें, वगैरे प्रकार आपण आजवर पुष्कळ पाहिले व ऐकिले. महापुरांनीं नदीकाठची व खाडीकाठचीं खेडीं व गावें

वाहून धुवून गेलेलीहि आहेत पण मोठ्या आश्चर्याची गोष्ट कीं, अहमदाबाद बडोदा सारखी मोठमोठी राजधानीची नगरें जलप्रलयांत आकंठ बुडावी, हजारों माणसांची तेथें व आसपास सर्वत्र प्राणहानी व्हावी आणि या शहरांचा आणि बाह्य जगाचा संबंध तब्बल आठवडा अज्जीबात काटला जावा, ही वस्तुस्थिति जितकी शोचनीय व हृदयविदारक आहे, तितकीच संतापजनक आहे. आज आमचे सर्वसमर्थ इंग्रेज सरकार म्हणजे पंचमहाभूतांच्या सर्कशीचे रिंगमास्तर. हवा पाणी आणि जमीनीवरचा त्यांचा संचार व सत्ता शुक्रवारचे चणे फांकण्याइतकाच सहजशक्य आहे. परवां २३ जुलई रोजीं मुंबईस व्हॉईसरॉय आणि बादशहा यांचा प्रत्यक्ष संभाषण प्रयोग बिनतारी संदेशशक्तीनें सिद्ध होऊन, विलायत म्हणजे हिंदुस्थानच्या परसांतली भाजी ठरली. वायरलेस रिसीवरची एक छोटी पेटी घरांत ठेऊन अवघ्या भूमंडळावरच्या साऱ्या भानगडी घरबसल्या ऐकण्याच्या नव्या मनूचा हॉईसरॉयच्या हस्तें उद्घाटन विधि साजरा होत असतांनाच, निसर्गानें अहमदाबाद बडोद्याला जलप्रलयांत आकंड बुडवून, ३१ जुलईपर्यंत त्यांच्या हालहवालीचे सर्व मार्ग अक्षरश: काटछाट करावे, हा प्रकार आम्हांला तरी संतापजनक वाटतो. सरकारच्या मोठमोठ्या हवामानमापक ऑब्झरवेटऱ्या आहेत. तारी बिनतारी संदेश यंत्रांचीं जाळी सर्वत्र पसरलेली आहेत. हवेंत उड्डाण करून हवा तेथें संचार करणारें रायल एअर फोर्स (वैमानिक दळ) सिद्ध आहे. संकटांचा आगामी संशय येतांच मानवी जीविताच्या संरक्षणासाठींच निर्माण केलेले रेडक्रॉस सैनिकांचे भलें मोठें डिपार्टमेंटहि सरकारनें पोसले आहे कोणत्या ठिकाणीं कशी हवा बदलली किंवा पाऊस पडला तर कोणकोणत्या नद्यांचा कसकसे पूर लोंढे येतात, याचेहि गणिती ठाकताळ तात्काळ नजरेस आणणारीं खातीं सरकारनें पोसलेली आहेत. अशा परिस्थितीत अहमदाबाद बडोदे वगैरे ठिकाणीं भयंकर जलप्रलय व्हावा, हजारों लोक हताश स्थितींत अडकून पडावे किंवा वाहून जावे; गुराढोरांची व मालमत्तेची वाताहात लागावी; साऱ्या देशाला तिकडेच कांहीच निश्चित वृत्त कळूं नये; जलप्रलयांतील आपद्ग्रस्तांना बाहेरून कसलीहि मदत जाऊं शकू नये; एकट्या टैम्स ऑफ इंडियाच्या धाडशी बातमीदाराशिवाय इतर मार्गानें कसलेंहि वृत्त बाह्य जगाला मिळूं नये; आणि जलप्रलयाच्या आगामी सूचना प्रत्यक्ष कौन्सिलांत होत असतांहि, पंचमहाभूतांच्या रिंगमास्तर सरकारला हवेंतून अगर पाण्यांतून या दुर्दैवी गुजराथच्या सहाय्याने अचाट नवलाचें एकहि कार्य करतां येऊ नये, हा प्रकार तरी काय आहे? तोफखाने व मशिनगन्सच्या चौफेर हलकल्होळांत सांपडलेल्या वेढ्यातल्या सैनिकांना जर रसद व इतर हवीं तीं जीवरक्षणाचीं साधने विमान मार्गे पुरवितां येतात आणि त्यांच्या अवस्थेच्या बितं बातम्या काढतां येतात, तर गुजराथच्या जलप्रलयात सांपडलेल्या लक्षावधि लोकांना, सरकारने मनांतच आणलें असतें तर, वाटेल त्या बचावाच्या साधनांचा मुबलक पुरवठा करतां आलाच नसता, असें आम्हाला खास वाटत नाहीं. अंतराळाचा ठाव घेणारी विमाने वातावरणाला हुकमी 'मेघदूत' बनविणाऱ्या, वायरलेसा आणि मानवतेच्या दु:खनिवारणार्थ जीवाची कुरबानी करण्याच्या प्रतिज्ञेनें सदैव सिद्ध असलेल्या रेडक्रॉस सेना, अशा अनेकविध आधुनिक साधनांनी समृद्ध असणाऱ्या सरकारनेंच जर अशा जलप्रलयाच्या प्रसंगी कर्तव्यमूढतेचें प्रदर्शन केलें, तर सर्व बाजूंनी सदैव हतबल म्हणून जगांत प्रसिद्धी पावलेल्या गरीब हिंदी प्रजेने आपला त्राता म्हणून कोणाच्या तोंडाकडे पहावे वायरलेस विमानांच्या युगांत सरकारला टीचभर गुजरातच्या जलप्रलयांत जर आपल्या शक्तीयुक्तीच्या जोरावर

निसर्गाच्या लहरीला झटपट पायबंद लावता येत नाही तर या आधुनिक पंचतत्वनियंत्रक यंत्रांच्या मंत्रावर अवलंबून राहणें आणि त्यांच्या हडेलहप्पीवर हिंदुस्थानाच्या सुरक्षिततेचा गर्वभार वाहणें, बरेंच धाडसाचे आहे, असें म्हणणें प्राप्त पडतें. निसर्गानेंच किंचित वक्रदृष्टी करतांच, जर हीं आधुनिक सायंटिफिक साधने पत्याच्या किल्ल्याप्रमाणें कोलमडून पडतात, तर मानवतेनें आपल्या अभ्यूदयाची व जीवरक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर पेलून धरणें, मूर्खपणाचें ठरतें. निसर्ग बेफाम भडकला तर मानवी उपायांना धूळ चारील, हें तत्व जरी सनातन असलें, तरी 'यत्ने कृते अपि न सिद्धति कोऽत्र दोषः' एवढ्या सबबी पुरती तरी सरकारनें आपली जबाबदारी पार पाडली काय?

(१-८-२७)

मुर्दाड काळजांचे संघटन

हिन्दु संघटन हिन्दु संघटन म्हणून आज सर्वत्र जी बोंबाबोंब उडाली आहे, ती सारी धनवडी भटांची लफंगेगिरी आहे. असा आमचा स्पष्ट अनुभव आहे. त्यांत हिंदु समाजाची अगर हिंदुत्वाची कसलीहि कळकळ नसून, भटांच्या जातिवर्चस्वाची आणि भटी संघटनेचीच तळमळ विशेष आहे. या ना त्या चळवळीवरच जगणाऱ्या चळवळ्या भटांना सध्यां हें संघटनेचें खूळ सांपडलें आहे आणि पुष्कळ खुळ्या भटेतरांना त्यांनीं आपल्या खुळखुळ्यावर झुलवीत ठेवलें आहे. ब्राम्हण ब्राम्हणेतरांत आडवा उभा विस्तवहि जात नाहीं, अशा अवस्थेंत अखिल हिंदूंच्या संघटनांची भटांनीं बोंब मारीत गावोगाव जलसे नाचवावे, या पाजीपणावर विश्वास ठेवणाऱ्या भटेतरांच्या बावळटपणाची कमाल असो! तोंडानें केवढाहि लांबरुंद वेदांतांची पुराणं झोडली. तरी भट आपल्या पोटापुढें रेसभर सुद्धां सरकायचा नाहीं. तो वाटेल तीं सोंगेढोंगे करील, हवी ती पगडीपालट करील आणि प्रसंगी वाईट त्याच्या पायांवर लोळण घेईल, पण अखिल हिंदु समाजांवर आपल्या जातिवर्चस्वाची कुरघोडी कायम ठेवण्याच्या धडपडी, यापेक्षां त्यात विशेष कांहीं नाहीं. मुसलमानांविरुद्ध संघटण्ये भटजी कितीहि दात ओठ खात असले, आणि भटी तालीमखान्याच्या दांडपट्टी जाहीराती कितीहि फडकत असल्या, तरी वेळ येतांच बावळटपण माथेफिरू भटेतरांना ते मुसलमानांच्या तोंडावर सोडून आपण चटकन् नामानिराळे होत असतात. चिथावणी भटांची आणि कंबक्ती भटेतरांची, हाच आजपर्यंतच्या हिंदु मुसलमान दंग्यांचा इतिहास आहे. हिंदु संघटनाबद्दल आमचा मतभेद नाहीं. ते अगत्याचें आहे. त्याशिवाय हिंदूंचे अस्तित्व टिकणार नाहीं. या सर्व गोष्टी कितीहि खऱ्या असल्या, तरी भटांचा भिक्षुकशाही मुर्दाडपणा कायमचा उध्वस्त झाल्याशिवाय हिंदु संघटनाचा श्रीगणेशाच जेथें काढतां येणार नाहीं, तेथें आजच्या संघटनाच्या भटी हुल्लडींत भटेतरांनीं कसलाहि भाग घेणें फार धोक्याचें आहे, असा आमचा स्पष्ट इषारा आहे. शुद्धि संघटनाच्या बाबतींत ''सुबोध पत्रिका'' आणखी एक विचाराची दिशा दाखवीत आहे, तिकडेहि विचारवंतांचे लक्ष आम्ही वेधतों :-

''शुद्धि व संघटन ह्या चळवळीमुळें मुसलमान लोक बिथरले आहेत असें म्हणतात. पण वस्तुतः

शुध्दीच्या चळवळीचा हा दोष नसून ती करणारांचा तो दोष होय असें म्हणणें अधिक संयुक्तिक होईल. मुसलमानांनीं आपल्या धर्माचा प्रसार करणें यांत कांही वावगें नाही. आपल्या धर्माची उत्तम तत्त्वें जनतेपुढें ठेवून ती जनतेस पटविणें यांत आम्हाला कांही गैर दिसत नाही, परंतु परधर्माची निंदा करून स्वधर्माची थोरवी गाण्यांत येऊं लागली कीं अशा निंदेच्या द्वारें होणारा धर्मप्रसार घातास कारण होतो. मुसलमान भाईंचा हा अशा प्रकारचा प्रयत्न दोषार्ह आहे व म्हणूनच असेच प्रयत्न हिंदुंच्या हातून होऊ लागले कीं ते कमी दोषार्ह ठरत नाहींत. हीच गोष्ट शुद्धीच्या चळवळीला लागू करता येतें. ज्यांना ख्रिस्ती अगर मुसलमानी धर्म पसंत नाही, त्यांनी जो धर्म पसंत असेल त्याचा स्वीकार करावयास कोणाची हरकत असूं नये. म्हणजे आमच्या दृष्टीनें हा चळवळ केवळ धार्मिक स्वरूपाची असावी. ती आज तशी नाहीं व राजकारणांत लुबबुड करणारांनीं त्या चळवळीचा पुढाकार घेतल्यामुळें हा गोंधळ जास्त वाढला आहे. जोपर्यंत गजानन भास्कर वैद्यांसारख्या स्वयंसेवक वृत्तीच्या माणसाच्या हातांत शुद्धीची चळवळ होती तोपर्यंत तिचें आध्यात्मिक स्वरूप कायम होते पण त्यावेळीं प्रथम लोकमान्य टिळकांचीहि त्यांस सहानुभूति मिळाली नाहीं. आम्हांला तर असे वाटतें कीं कोणत्याहि कारणांमुळे कां होईना ती चळवळ बऱ्याच प्रमाणें मुसलमानांची चळवळ राजकीय झाल्यामुळे हिंदु व मुसलमान ह्यांच्यातील बेबनाव वाढत आहे.''

- ता. १०-७-१९२७

भाद्रपदी शिमगा जवळ आला

पुणें शहर म्हणजे भटी चळवळीचें आगार म्हणून सर्वश्रुतच आहे. येथें नेहमीं कांही ना कांही नवीन चळवळ जन्माला येतच असते. वेळीं एखाद्या कुझक्या डबक्यांत डांस उत्पन्न करायला निसर्ग विसरेल, पण नवीन चळवळ भानगड किंवा उपद्व्याप उपजविल्या खेरीज पुणेकर भटजींचा दिवस सुना जांयच्या नाहीं, असा पुणे शहराचा मोठा लौकीक आहे. इथे डोक्याने चालणारे भट फार. हातपाय लुले पडले, तरी यांचे डोके अखंड चालूंच असतें. मग, त्यांतून कोणत्या वेळीं काय घटनेची कल्पना बाहेर पडेल, त्याचा नेम नाहीं. महात्मा गांधीच्या विराट चळवळीनें मध्यंतरीं या पुणेकर जन्मसिद्ध देभ कंपूच्या कल्पकतेला बरीच बेरोजगारी केली होती. पण कल्पकताच ती ! तिनें अखेर म. गांधीला चारीमुंड्या चीत करून, आपल्या पुण्याचें वैशिष्ट्य शाबूत राखिले. आज तर काय? शुद्धि संघटनावर पुण्याचा भटी चौघडा साऱ्या महाराष्ट्रभर सारखा दणाणत आहे. पृथ्वीवर माती असेपर्यंत हिंदुस्थानांत जाती राहणार, आणि ब्राम्हण हा - सुष्ट असो वा दुष्ट असो, शहाणा असो वा मूर्ख असो, - तो जन्मसिद्ध श्रेष्ठतमच राहणार, असल्या दिव्य संदेशाचे शंखाचार्य 'हिंदु तितुका मेळवावा' या महत्वाकांक्षेनें हिंदूंच्या संघटनाची आकाश-मोट बांधण्याचा आटारेटा करीत आहेत. आतां हिंदु समाजाला कोणाची कसलीहि भीति बाळगिण्याचें कारण नाहीं. जातिभेद आणि तज्जन्य जातिद्वेष सनातन कायम ठेऊन, अखिल हिंदूंचे संघटन सिद्ध करून दाखविणाऱ्या पुणेरी परशुरामाची योग्यता लवकरच सृष्टिविधात्या ब्रम्हदेवाच्या अकलेलाहि ग्रहण लावील, यांत आतां एकाहि भटाळलेल्या बिनबुड्या भटेतरानें शंका बाळगूं नये. पण -

पण 'पुणें तेथें काय उणें?' अशी पृच्छा करणाऱ्यांना आम्ही हळूंच कानांत सांगण्याची परवानगी घेतो कीं प्रत्येक पुणेरी चळवळ महाराष्ट्राच्या आंगावर बिब्याप्रमाणें फदफदावी, असा एक ईश्वरी सनातन शाप आहे. महाराष्ट्रांत सामाजिक वैराचा आणि माणूसघाणेपणाचा जो कॉलरा गेलीं ३० वर्षे धुमाकूळ घालीत आहे, त्याचे जंतू पुण्यांतच प्रथम निपजलेले आहेत. उदाहरणार्थ, भाद्रपदी शिमगाच घ्या. हा देखिल प्रथमत: 'संघटनी' थापबाजीवरच अखिल महाराष्ट्रीयांच्या बोकांडी बसविण्यांत आला. 'गणाधीश जो ईश' त्याचें नांव पुढें करून, मुसलमानांच्या मोहरमला तोडीस तोड व जोडीस जोड म्हणून कै. टिळकांनीं गणपती मेळ्याची जी नवीन पुणेरी टूम काढली, तिच्या सबबींत सुद्धां आजच्याच 'हिंदु संघटना'ची कल्पना लोकांपुढें रंगवून नाचविण्यांत आली होती. खुद्द टिळकांसारख्या कर्तबगार व राजकारणपटूनें निर्माण केलेल्या चळवळीचें पर्यवसान आज भाद्रपदी शिमग्यांत का झाले, या प्रश्नाचा चिकित्सेनें विचार केल्यास, चालूं हिन्दु संघटनाच्या भटी धामधुमीवर भटेतर लोकांनीं अंधविश्वास टाकण्यापूर्वी दहा अंक मोजावे.

नुसते मुलामुलींचे साग्र संगीत मेळे नाचवून सामाजिक संघटना किंवा धर्मोन्नति, इतकेंच नव्हे तर साधीसुधी लोकमत-परिणतीहि होणें शक्य नाहीं हें गेल्या ३० वर्षांच्या अनुभवानें पटलें असूनहि, मेळ्यांच्या भाद्रपद शिमग्याचा आम्हांला तिटकारा येऊं नये, ही फार खेदाची गोष्ट आहे. धनवडी भटांच्या मेळ्यांतून आजपर्यंत स्त्रिवर्गाची जेवढी जाहीर विटंबना झालेली आहे, तेवढी दाणेआळींत किंवा व्हाईटलेन मध्येंहि होत नसेल. स्त्रियांबद्दल जर हिंदूंना खरोखरच कांही आदरभाव असता, आणि अश्लीलत्वाची चीड असती तर, या मेळ्यांचे इतिहास धनवडी भटांच्या रक्तपाताने कधींच रंगून निघाले असते! मेळ्यांचा मुखवटा जरी गणपतीचा असतो, तरी तीन त्रिकाळ बारा महिने, पक्ष भेदाचे जे शिमगे भटी पत्रांत चाललेले असतात, त्यांच्या जाहीर रंगी तालमीशिवाय या भाद्रपदी मेळ्यांच्या शिमग्यांत विशेष काय असते? असल्या घाणेरड्या परंपरा मेळ्यामार्फत देवभक्ती, देशभक्ती, समाजनीति अशा संघशक्ति अखिल हिंदु समाजांत चेतविण्याच्या वल्गना वेश्येच्या पातिव्रत्य-पुराणांइतक्याच त्याज्य व तिरस्करणीय समजून, विचारवंत हिंदूंनीं या भाद्रपदी शिमग्याला फाल्गुनी शिमग्याप्रमाणेंच निंद्य व त्याज्य लेखून उध्वस्त तरी केला पाहिजे, किंवा हा वार्षिक उत्सच चालूच ठेवायचा असेल तर, त्यांतलें धनवडी भटांचे वर्चस्व झुगारून देऊन, यंदाच्या खऱ्याखुऱ्या सार्वजनिक स्पिरीटने श्री शिवजयंत्युत्सव हातीं घेतांच, त्याचे शुद्ध स्वाभिमानी महत्त्व सरकारला पटून, युरप अमेरिकेपर्यंत शिवरायाचा शुद्ध कीर्तिनिनाद कसा दुमदुमला, याचा सर्वांग विचार करावा आणि त्या दिशेनें भाद्रपदी शिमग्यांत धनवडी भटांचा उकीरडा निपटून काढण्याचा काहिंतरी ठळक यत्न करावा, अशी आमची सर्व विवेकी हिंदू भगिनी बांधवांना हात जोडून प्रार्थना आहे.

□□□

निवेदन

साप्ताहिक लोकहितवादी सुरू झाला

गेल्या गणेश चतुर्थीपासून लोकहितवादी सुरूं झाला. प्रबोधनाच्या वर्गणीदारांकडे वन्दनांक व १ ला अंक नमुन्यादाखल रवाना झाले प्रबोधनाचे जे वर्गणीदार होऊं इच्छितील त्यांनीं ताबडतोब २।। रुपये पाठवून नांव नोंदावें. वर्ष वाटेल त्या अंकापासून सुरूं होते. प्रबोधन आणि लोकहितवादी यांची संयुक्त वर्गणी ५।। रुपये आहे. आतां २।। रुपये पाठवावे व प्रबोधनाचें ६ वें वर्ष सुरू झालें म्हणजे ३ रुपये पाठवावें. एरवीं फक्त प्रबोधनाची वर्गणी नेहमीप्रमाणें ४ च रुपये आहे.

केशव सीताराम ठाकरे.
संपादक प्रबोधन

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

स्वातंत्र्य-शार्दूल

(प्रकाशक साहित्य सेवा मंडळ, कऱ्हाड किंमत दिलेली नाहीं.)

स्वातंत्र्य - शार्दुल अर्थात छत्रपति श्री शिवाजी महाराज यांचें पद्यचारित्र, हा साहित्यसेवा मंडळ कऱ्हाड यांनीं महाराजांच्या त्रिशतसांवत्सरिक उत्सवानिमित्त प्रसिद्ध केलेला पद्यग्रंथ आहे. या ग्रंथात मंडळांतील बहुतेक सभासदांच्या लहान मोठ्या एकंदर ३३ कविता आहेत. त्यांतील फार थोड्या चांगल्या आहेत. २५।२६ कवींकडून निरनिराळ्या विषयांवर किंवा प्रसंगावर कविता लिहवून घेऊन, कशास कांहीं पत्ता नसलेले ते धागेदोरे एकत्र करण्यांत यांनीं मोठीशी साहित्यसेवा साधिली, असे कष्टाने म्हणवत नाहीं. असला हा न पेलणारा 'अव्यापारेषु व्यापार' न करतां या संग्रहांतलिच 'साक्षात्कार, डोहाळे,' यासारख्या निवडक ४।५ च कविता छापल्या असत्या, तरी शिवरायावरचे प्रेम प्रगट होऊन थोडी साहित्य सेवा साधल्याचेही श्रेय मंडळास खचित मिळाले असतें.

शिवरायाचें पद्यात्मक चरित्र लिहिण्याची मंडळाची कल्पना चांगली आहे. पण तो उद्योग 'झाला' पाहिजे, असा 'करवून' व्हायचा नाहीं, आणि साधायचा नाहीं. आम्ही तस असेंही ऐकलें आहे कीं, या मंडळाकडून नुकत्याच संपलेल्या पुण्याच्या साहित्य संमेलनांत असा ठराव आणण्यांत येणार होता कीं 'सबंध महाराष्ट्राचा इतिहास पद्यात्मक तयार करण्यांत यावा.' मग असा ठराव कां पुढें आला नाहीं कोणास ठाऊक? उघडच आहे. नुसता सगळा इतिहास जर पद्यांत आणायचा तर उद्यां जगाचा भूगोल किंवा पदार्थविज्ञानशास्त्र हे सुद्धां पद्यांत कां आणूं नयेत? असे विचारणारे वीर शाहीर तयार होतील. काव्याला अनुरूप अशा ऐतिहासिक प्रसंगावर काव्य लिहिणें निराळें व संबंध इतिहास पद्यांत लिहिणें अगदीं निराळें. पहिल्यांत प्रतिभेचें पाठबळ लागतें. दुसऱ्याला नुसती शब्दांची ओढाताण पुरते. साहित्यसेवा मंडळानें केलेला हा खटाटोप पाहून श्री. कोल्हटकर यांच्या 'साहित्य संमेलनाची तयारी' या लेखांतील बंडूनाना व पांडूतात्या यांची आठवण होते; व कौतुकानें असें म्हणावेंसें वाटतें कीं, 'एवढ्या थोड्या अवधींत एवढा मोठा ग्रंथ तयार केला, हें मंडळाला भूषणावह आहे.' साहित्य सेवामंडळाला आमची अशी नम्रसूचना आहे कीं त्यांनीं संबंध जगाचा इतिहास काव्यांत आणण्याच्या

व्यापांत न पडतां कांहीं तरी स्वतंत्र ल्याहावें.

पुस्तकावर किंमत दिलेली नाहीं. तथापि मागच्या बाजूस कव्हरवर असलेल्या जाहिरातींत 'प्रत पहिली १।। रु. प्रत दुसरी १। रु. प्रत तिसरी १ रु.' असें लिहिलें आहे. ही भानगड काय आहे समजत नाहीं. तथापि कुठलीही किंमत धरली तरी पुस्तकाच्या मानानें जास्त आहे, असें वाटतें.

नरवीर नेताजी पालकर

(ऐतिहासिक पोवाडा). प्रकाशक श्री शंकर दत्तात्रय जोशी, दादरकर बिल्डिंग्ज, लेडी जमशेटजी रोड, दादर, मुंबई नं. १४ किं. २ आणे.

प्रस्तुत काव्य प्रबोधनाच्या वाचकांना परिचित असलेल्या शाहीर वसंतविहार यांचें आहे, इतकें सांगितलें म्हणजे अधिक शिफारशीची जरूरच नाहीं. किं. २ आणे जरा अधिकच वाटते. रसिकांनीं अगत्य आश्रय द्यावा.

सुभाषित मराठी

लेखक व प्रकाशक :- श्री नारायण नरसिंह फडणीस. जळगांव, पूर्वखानदेश. किं. १ रुपाया.

सुभाषितें आजपर्यंत संस्कृताच्या बंदिखान्यात पडलेली होती. ती श्री. ना. न. फडणिस यांनीं मराठी भाषेच्या मैदानावर मोकळी आणून सोडली आहेत. प्रथम मराठी सुभाषित श्लोक, नंतर विवरण, शब्दार्थ व अलंकार, अशी योजना केलेली आहे. मराठी काव्य आणि भाषा यांच्या अभ्यासाला प्रस्तुत ग्रंथ अत्यंत उपयोगी आहे. लेखक, कवि वक्ते हरिदास प्रवचनकार यांनीं या पुस्तकाला अगत्य स्वाव्यायांत आणावे, अशी शिफारस आहे.

□□□

अग्रलेख

हिन्दु आणि मुसलमान, इंग्रेजांच्या हातीं दोघांचेहि कान

लेखांक १ ला

हिन्दु आणि मुसलमान या प्रश्नाला महायुद्धकालीन् ब्रिटन आणि जर्मन प्रश्नाइतकाच मुंगुस-सर्पाचा रंग चढलेला आहे. हिंदुस्थानासारख्या अवाढव्य खंडांत हिंदु-मुसलमान तंट्याची एखादी क्षुद्र कुरबूर कधिंमधीं ऐकू येत नसे, असें नाहीं. परंतु, आजच्या प्रमाणें या दोन भारतीय समाजांत आडवा विस्तव चुकून सुद्धां जाणार नाहीं, अशी परिस्थिति केव्हांहि नव्हती. खुद्द मोगल बादशाही सत्तेच्याहि अंमदानींत नव्हती. चालूं परिस्थितीचा सामान्यत्वें विचार केला, तर आहे तोच माथेफिरूपणा वाढत गेल्यास, त्यांत दोनहि समाजांचे अखेर अनहितच होणार आहे. लोकमताला वाजवी वळण लावणाऱ्या वृत्तपत्रांकडे नजर फेकावी, तों दोनहि पक्षांतले वीर महावीर या आगींत एकसारखे तेलच ओतीत आहेत. अशा अवस्थेंत लोकहितवादीचें प्रस्तुत लेखाचें बालदीभर पाणी हा भडकलेला ज्वालामुखी विझविण्यास शक्त होईल, असें मुळींच नाहीं. परंतु, आमचे हिंदु मुसलमान वाचक विचारवंत आहेत, ते प्रत्येक गोष्टीचा शहानिशा नेहमींच करीत असतात आणि तत्वाचा शोध लावण्यास आतुराचित्त असतात, हा आमचा आत्मविश्वास असल्यामुळेंच या हिंदु मुसलमान प्रश्नाचा जुना इतिहास त्यांच्या विचारार्थ प्रसिद्ध करण्याचें धारिष्ट करीत आहों.

ब्रिटन आणि जर्मन यांचें कितीहि वैर आलें, तरी त्याची मर्यादा राजकारणापुरतीच. हिंदु आणि मुसलमान यांच्या आजच्या शत्रुत्वाची कारणेंसुद्धा भारतीय राजकारणांतच आढळतील. ब्रिटन आणि जर्मन यांच्यांत रक्ताची जितकी सरमिसळ झालेली आहे व सध्यां होत आहे, तितकीच ती पूर्वी हिंदु आणि मुसलमानांत झालेली आहे व सध्यां होत आहे. आजच्या शत्रुत्वाच्या

कर्ता कर्म क्रियापदाचा प्रश्न

घटकाभर बाजूला ठेवला, तरी हिंदु-मुसलमान द्वैताला इतिहासाचा वास्तवीक काहीच दाखला नाहीं. वरवर पहाणाराला हा भिन्न संस्कृतीचा संग्राम आहे. असें दिसतें खरें; परंतु तोसुद्धां एक आभासच होय.

हें पहाण्यासाठी आपल्याला (१) हिंदु आणि मुसलमान हे रक्तानें भिन्न आहेत काय? (२) दोघांचा धर्म विषयक आचार-विचार-विनिमय पूर्वी कधिं झाला होता काय? (३) राजकारणाच्या क्षेत्रांत ते चुरशीनें वागले असल्यास, त्या चुरशीच्या मुळाशीं काय तत्व होतें? या ३ प्रश्नांचा इतिहासाच्या आधारानें शोध काढणें प्राप्त आहे.

हिंदुस्थानांतला मुसलमान हा रक्तानें आणि संस्कृतीनें हिंदु का मुसलमान? हा प्रश्न फार शांत डोक्यानें आणि हलक्या हातानें सोडविला पाहिजे. केवळ वर्तमान काळच्या शत्रुत्वाच्या भूमिकेवरून त्याकडे पाहाणें चुकीचें आहे. मुसलमानांना आज मक्का मदिनेचा, तुर्कस्थान अफगाणिस्थानचा किंवा इस्तंबूल इराणचा केवढाहि पान्हा फुटलेला असला, तरी तो फुकट आहे. या देशांशीं त्यांचा रक्ताचा अगर संस्कृतीचा कसलाहि संबंध मुळीच नाहीं. धर्माचा संबंध मानला तरी तो पाण्यासारखा पातळ असल्यामुळें, रक्तसंबंधाच्या घट्टपणाशीं त्याला तोड देतां येणें शक्य नाहीं.

पाण्यापेक्षां रक्त केव्हांहि घट्ट

व दाटच असते आणि ज्याअर्थी उपरोक्त देशांतील मुसलमानांचा रक्तसंबंध अनेक शतकांपूर्वीच तुटलेला आहे, त्या अर्थी केवळ पाणीवजा धर्माच्या अभिमानांत या दोघांच्या ऐक्याचें कसलेंच आकर्षण आज उरलेलें नाही. हें नीट ध्यानांत ठेवलें पाहिजे. मध्य आशियांतला मुसलमान किंवा टर्क धर्मानें इस्लाम असला, तरी केवळ धर्माच्या सबबीवर तो हिंदी मुसलमानाला फारसा जवळचा मुळीच नाहीं. शतकानुशतकें हिंदुस्थानांत वास्तव्य व जन्म झाल्यामुळें, कुलपरंपरा व आजूबाजूची परिस्थिती यांच्या परिणामानें एकजात हिंदी मुसलमान बहुतेक हिंदुच झालेला आहे. कितीहि मोठ्या खानदानीचा हिंदी मुसलमान असो, त्याच्या रक्तांत हिंदु रक्ताचा संपर्क मुळींच सांपडणार नाहीं, असें नाहीं. हिंदी मुसलमानांपैकीं रुपयाला १४।१५ आणे बाटलेल्या हिंदूंचेच वंशज आहेत. इतकेच नव्हे तर बाह्यात्कारी त्यांनीं मुस्लीमपणाचा कितीहि जामानिमा केला तरी त्यांच्याहि घरांत हिंदु आचार विचार, चाली, रूढी व रीतीभाती अझूनहि कमीजास्त प्रमाणांत दृष्टीस पडतात. हिंदुस्थानच्या इतिहासाकडे नजर फेकली, तर मध्यम व कनिष्ट वर्गचसा काय, पण उच्च दर्जाच्या मोंगल बादशहांचे वंशज म्हणविणाऱ्या, अगदी खानदानीच्या मुसलमानांच्या नसांतलें रक्त हिंदूच आहे, असें स्पष्ट कबूल करावें लागेल. या बाबतींत कोणी कितीहि नाकाला जीभ लावली, तरी Men are what their mothers made them (जशी माता तशी माणसे) या सनातन तत्वापुढे सत्य कितीसें दडून राहणार? मालिनी-खान विवाहावर हिंदु शहाण्यांनीं आज कितीहि डोकीं फोडली, तरी असले हिंदु-मुसलमान-विवाह पूर्वी हजारों झाले आणि आजहि होत आहेत. मुसलमानांचे पाणि ग्रहण करणाऱ्या हिंदुस्त्रियांनींच हिंदी राष्ट्राच्या संघटनेचा वैभवशाली इतिहास बनविलेला आहे. हिंदु आणि मुसलमान हे दोन समाज जर संस्कृतीच्या व रक्ताच्या बाबतींत सर्वस्वीं भिन्नजिनशी असते, तर ते इतक्या शतकें एका देशांत गुण्यागोविंदानें नांदूंच शकले नसते. रक्ताच्या सरमिसळीविषयी आज कोणाच्या आंगांवर कितीहि काटा-उभा रहात असला, तरी

रक्ताच्या संमीश्रणाचे परिणाम

पाहणारांनीं दिल्लीच्या मोगल व बादशाहीच्या तक्तावर मुसलमान बसले का हिंदु बसले, याचा शांतपणें विचार केला पाहिजे. अकबर बादशहाच्या जनानखान्यांत मुसलमान स्त्रियप्रमाणेंच अनेक विवाहबद्ध हिंदु स्त्रियाहि होत्या. त्यांचा दर्जा व सन्मान फार उच्च राखला जात असे. इतकेंच नव्हे तर त्यांना

आपल्या हिंदु धर्माचे सर्व आचार व विधी यथासांग आचरण्याची पूर्ण मुभा असे. अकबराची पट्टराणी मुसलमान नसून, राजा बिहारीमलची राजकन्या जोधबाई ही होय. याच हिंदु राजकन्येच्या पोटीं सुप्रसिद्ध जहांगीर बादशाहा जन्माला आला. जहांगीरची पट्टराणी बालमति. जोधपूरच्या राजा उदयसिंगाची राजकन्या. हिच्या पोटीं शहाजहान बादशहा जन्माला आला. याचा पुत्र सुप्रसिद्ध औरंगजेब बादशाहा हा जरि हिंदुद्वेष्टा होता, तरी त्यानेंहि एका रजपूत राजकन्येचें पाणिग्रहण केलेंच होतें. बादशहा पहिला बहादुरशहा हा तिचा मुलगा. अहमदशहा बादशहाची आई सुद्धां हिंदूच. तिचें नांव अदमबाई. ती

हिंदुस्थानची बादशाहीण-केसर-इ-हिंद

झाली, तेव्हां तिला कुडशिया बेगम हें नांव मिळालें. दिल्लीचा कुडशिया बाग तिचेच स्मारक आहे. दुसऱ्या अलमगीर बादशहाची आई अनुपबाई. २ ऱ्या बहादुरशहाची आई लालबाई. यावरून दिसून येईल कीं १७, १८ आणि १९ या तीन शतकांत दिल्लीच्या मोगल बादशाही तक्तावर बसलेल्या १२ बादशाहांपैकीं ६ बादशहा हिंदु मातांच्या उदरीं जन्मलेले होते. या हिंदु बादशाहिणींच्या अनेक कन्या हिंदुस्थानांतील अनेक खानदानी मुसलमान सरदारांना लग्न लावून दिल्या. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट हीच कीं जरी या हिंदु कन्या मुसलमान बादशहांच्या पट्टराण्या झाल्या, तरी त्यांच्यावर स्वधर्म त्यागाची बळजबरी केव्हांहि झालेली नव्हती. आजहि दिल्ली आग्रा फत्तेपूर येथील बादशाही राजवाड्यांत या राण्यांची नित्य पूजनाची हिंदु देवमंदिरें व तुळशी वृंदावनें पहावयास मिळतात. आणखी थोडी महत्वाची उदाहरणें पहा. मलिका जहान (विश्वसम्राज्ञी) ही जहांगीरची दुसरी एक पट्टराणी होती. ही सुद्धां हिंदूच जेसलमीरच्या रावळ भीमाची कन्या. अवरंगजेब बादशहाचा मुलगा मुअज्जीम ऊर्फ बहादुरशहा (पहिला) यानें राजा रूपसिंगाच्या राजकन्येशीं विवाह लावला होता. भातनेरच्या रणमल्ल राजाची मुलगी नैला ही सुलतान व्यामुद्दिन तघलकचा भाऊ, सालर रजब याची राणी. या नैलादेवीच्या पोटीं सुप्रसिद्ध फेरोजशहा तघलक बादशहा जन्माला आला. खुद्द ध्यासुद्दीनची आईसुद्धां हिंदुच. जाठ जातीची.

मातांचे गुणावगुण त्यांच्या पोटीं येणाऱ्या वेलिविस्तारावर चमकलेच पाहिजेत, हा शास्त्रज्ञांचा सिद्धांत विचारात घेतला, तर उपरोक्त अनेक थोर पुरुषांच्या - दिल्लीच्या बादशाही घराण्याच्या-शारीरिक व बौद्धिक कमावणीवर हिंदु संस्कृतीची किती जबरदस्त छाप बसली असली पाहिजे, याची विचारवंतांनीं कल्पना करावी. सर्व हिंदुस्थानभर दिल्लीच्या मुसलमानी सत्तेचा कडवा दरारा सतत तीन साडेतीन शतके सारखा धोशा गाजवीत असतांनाहि, हिंदु आणि मुसलमान समाज एका ठिकाणीं गुण्यागोविंदानें आणि सारख्याच वरचड दर्जानें वागले, याचें गूढ या हिंदु मातांच्या आत्मिक तेज-प्रसरणांतच सापडणार आहे. यावरून हिंदु मुसलमानांत सर्रास लग्नें लागल्याशिवाय द्वैताला मूठमाती मिळणार नाहीं, असा त्रयराशिकी सिद्धांत बांधण्याची कोणी निष्कारण तसदी घेण्याचें कारण नाहीं. येथें एवढेंच दाखवावयाचें आहे कीं हिंदी मुसलमानांना आज जो आपल्या इस्लामपणाचा एकांडा उमाळा फुटलेला आहे आणि त्याच्या जोरावर ते हिंदूंच्या उच्चाटनाचा आटारेटा करीत आहेत. तो गाळीव आत्मद्रोह होत आहे. किंबहुना वरील ऐतिहासिक सत्यांच्या आधारानें ''हिंदी मुसलमान आपल्या रक्ताशींच बेइमान होत आहेत'' असा कोणी सिद्धांत बांधल्यास तो मुळींच चुकीचा ठरणार नाहीं.

शिवाय, इतिहासांत जलालुद्दिन, मलिक खुसू, फत्तेउल्ला, इमादशहा असली जाडीजाडी नावें वाचली

कीं साधारण अकलेच्या माणसाचा असाच तर्क होतो कीं हे सारे खान उद्दीन आणि शहा थेट इराण अफगणिस्थान आशिया मायनरमधले खासे मुसलमान. पण हा किती भ्रम आहे? ही नांवेंसुद्धा बाटून मुसलमान बनलेल्या अस्सल हिंदूंचीच. १४ व्या शतकांतला बंगालच राज्यकर्ता जलालउद्दीन, हा बाट्या हिंदू. याचें मूळ नांव जितमल आणि बापाचें नाव राजा कंस पूर्वी. मलिका काफूर, अल्लाउद्दीन खिलजीचा 'कलिजा', मूळचा रजपूत. मलिक खुसरू, मुबारीक खिलजीचा हस्तक, मूळचा गुजराथी हिंदु. फिरोज तघलकचा वजीर मकबुलखान, मूळचा तेलंगी ब्राम्हण. गुजराथेंत मुसलमानी राज्याचा पाया घालणारा मुजफरखान, जातीचा हिंदु. लोदी घराण्यांतला सुलतान शिकंदर, हिंदूच. अहमदनगरची निजामशाही स्थापन करणारा निजामुल्मुल्क बाहिरी व त्याचा मुलगा अहंमद निजामशहा, हे दोघे बापलेक मूळचे अस्सल ब्राम्हण. यांची खरी नांवें अनुक्रमें भैरव भटजी व तिमाप्पा भैरजी. इमादशाहिचा संस्थापक फत्तेउल्ला इमादशहा हा मूळचा विजयनगरचा तेलंगी ब्राम्हण, जहांगीरचा प्रख्यात सेनापति महाबतखान, मूळचा हिंदु. संगराजिताचा मुलगा. अशी नुसती नावेंच दिली तर हवी तेवढी यादी लांबवितां येईल. वाचकांना शितावरून भाताची परीक्षा होईल, सबब येथेंच थांबतो. तात्पर्य, हिंदी मुसलमान - मग ते खानदानांचे असोत, वा मध्यम कनिष्ठ वर्गाचे असोत - त्यांच्या कुलपरंपरेचा शोध करीत गेल्यास, अगदी मुळांशी हिंदू माता किंवा हिंदु पिता यांचेंच दर्शन घडेल, असा इतिहासाचा पुरावा आहे. म्हणजे, हिंदी मुसलमानांना हिंदु जितक्या जिव्हाळ्याचे आहेत, तितके भारतेतर समानधर्मी मुसलमान नाहींत, ही गोष्ट त्यांना जितकी लवकर पटेल तितकी बरी.

मुसलमानांनीं जशा हिंदु स्त्रिया केल्या, तशा हिंदूंनीहि मुसलमानी स्त्रिया केल्याची अनेक उदाहरणें आहेत. मात्र मुसलमानी धर्म हिंदुधर्मासारखा निर्बंधखोर किंवा अटकबाज नसल्यामुळें, त्यांनी हिंदु स्त्रियांशीं उघड उघड लग्नें लावली. हिंदु हा नेहमींच जातीच्या भीतींत टरकत असल्यामुळें, त्यानें मुसलमान स्त्रीला, बाजीराव पेशव्याच्या मस्तानीप्रमाणें, रखेली म्हणूनच वागविले. राणी असो वा रखेली असो, हिंदु आणि मुसलमान यांचा रक्तसंमीश्रणाचा आरसपरस व्यवहार पूर्वी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झालेला आहे यांत मुळींच संशय नाहीं. त्यामुळें अनेक हिंदु आचारविचार मुसलमान समाजांत आजहि रूढ असलेले दिसतात. उदाहरणार्थ, विधवा-पुनर्विवाहाचा महंमद पैगंबरानें कोठेंहि निषेध दर्शविला नसतांहि, लखनो पाटणा कडील खानदानी मुसलमान घराण्यांत, हिंदूंच्या रूढीप्रमाणें, विधवा-पुनर्विवाहाला बंदी असलेली अझूनहि दिसून येते. त्याच प्रमाणें, बुरख्याची रूढी अहिंदु असूनहि, मुसलमानांचें अनुकरण म्हणून, काही शिष्ठ हिंदूंनीहि तिचा पुरस्कार केल्याचें सर्वांना दिसत आहे. महंमद गिझनीबरोबर आलेल्या कडव्या इस्लामी तडफेनें हिंदु संस्कृतीला आमूलाग्र मिळून पचविण्याचा कितीहि चंग बांधला, तरी बाबरनें दिल्लीच्या बादशाहीचा पाया घालतांच अवघ्या मुसलमानांना हिंदु संस्कृतीच्या वळणावळणानेंच वागणें भाग पडले आणि सामाजिक रीती भारतात व काय, पण खुद्द मुसलमानी धर्मांत व धार्मिक आचारांतहि हिंदुत्वाची फोडणी त्यांनीं दिली. मोहरमचा ताबूत हा याच वळणाचा एक दृश्य परिणाम आहे. आजच्या हिंदू पुढाऱ्यांनीं घंटा बडवून 'ताबुतावर बहिष्कार घाला म्हणून कितीहि कंठशोष केला, तरी हिंदु आणि मुसलमान या दोन संस्कृतीचा तेथें जो संगम झालेला आहे, त्याचा प्रवाह बदलणें अशक्य नसलें, तरी बरेच कठीण आहे. इस्लामी वाङ्मयाच्या प्रत्येक विद्वानाला हें माहीतच आहे कीं महमंद पैगंबरानें ज्योतिष्याचा तीव्र शब्दांत धि:कार केलेला आहे.

पण हिंदुस्थानांत रस्तोरस्तीं हिंदु पंचांग-पंडिताच्या जवळच मुसलमान रमलवाला हमखास बसलेला आढळतोच. हिंदु तिथी वार नक्षत्रें पहातात; मुसलमानांनाहि तोच नाद. हिंदु शकूनापशकुनाचे भोक्ते तर मुसलमानांतहि तेंच वेड. मुसलमानी निका (विवाह) म्हणजे कन्यादान आणि पाणिग्रहणाचा एक साधा विधी. परंतु 'हिंदूंच्या'सहवासानें त्यांच्यातहि उष्टी हळद, शबगस्त (रात्रीची वरात) आणि इतर हिंदु रीती पुष्कळ घुसल्या आहेत. तात्पर्य, हिंदु संस्कृतीचा गेल्या हजार वर्षांत हिंदी मुसलमानावर एवढा पगडा बनलेला आहे कीं शेंडी दाढीचें बाह्य आवरण दूर केलें तर हिंदु हा मुसलमान आणि मुसलमान हाच हिंदु असा एकजिनशीपणा शेकडा ९५ बाबतींत दिसून येईल.

काव्य वाङ्मय शास्त्र कला इत्यादि क्षेत्रांतहि हिंदुमध्यें मुसलमान समरस व एकतान झालेले आहेत. सन १७३२ मध्यें पर्शियन गद्य पद्य लिहिण्याची कला शिकविण्यासाठीं रणछोडदास नामक हिंदूला इराणांतल्या इस्लामी पंडितांनीं खास बोलावून नेलें. त्यानें लिहिलेला 'दकाईक-उल-इनशा' ग्रंथ आज गेले एक शतकावर लोकमान्य गणला गेला आहे. स्वामी भोपटराय यानें 'प्रबोध चंद्रोदय'चें पर्शियन भाषांतर केलें १७१६ त रामसिंगानें 'गुलशन अजायब' नामक उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. १७५६ त तनसुखरायानें लिहिलेला 'सफीनत-उष-शौक' उत्तर हिंदुस्थानी मुसलमानांत अझूनहि फार प्यार आहे. १७५० ते प्राणसुख यानें तयार केलेला 'इनशा रहत जात' (पर्शियन पत्रव्यवहार शिक्षक) सुप्रसिद्ध आहे. १६५२ त राय गोविंदनें लिहिलेला 'तअफतुल कुतुब' आजहि मुसलमानांत अत्यंत लोकप्रिय आहे. पंडित चंद्रभान यानें किती तरी पर्शियन ग्रंथ लिहिले आहेत. त्यांत गुलदस्त, तुआफत-उल-अनवार आणि चार चमन हे फार प्रसिद्ध आहेत. मुसलमानी दरबारांत हिंदु लेखक आणि कवि यांचा मोठा मानमरातब असे. कित्येक वेळां हिंदु कवयित्रीनेंहि इस्लामी वाङ्मयप्रेमी मण्डळांत नावलौकीक मिळविलेला आहे. १५५४ त माळव्यांत राज्य करणाऱ्या बाजबहाद्दराच्या दरबारांत रूपमति नावाची एक हिंदु कवयित्री फारच नाणावलेली होती. बाजबहाद्दर व रूपमति घोड्यावर बसून काव्यमग्न स्थितींत जंगलांत फिरत आहेत, असें एक जुनें चित्र फार प्रेक्षणीय आहे. उज्जैन येथील तलावाच्या मध्यभागीं दोघांच्या समाधी आहेत.

(पुढें चालूं)

□□□

गीत

दादा, मला हीच ओवाळणी घाल

निर्मळ स्नेहाचा लाविला मी दीप ।
अमंगल पाप जळो सारें ।।१।।
ओवाळणि माझी निष्काम भावाची ।
केवळ नावाची नाही दादा ।।२।।
हिंद माझी माता हिंद तुझी माता ।
एका उदरीं जन्मता भाऊ बहिण ।।३।।
जातीची मी अबला तूं आहेसी मर्द ।
संकटांनीं सर्द होसी का रे ।।४।।
संकटे म्हणजे ईश्वरी प्रसाद ।
देतो पडसाद इतिहास ।।५।।
शिवरायाचें दादा ! ठेवी तूं स्मरण ।
दिपावली मरण देशासाठीं ।।६।।
धर्मासाठीं त्यानें घेतली फकीरी ।
मानापमान जिकिरी मानिली नाही ।।७।।
हिंदुत्वाच्या साठीं छांती पोलादाची ।
क्षिति मरणाची बाळगिली नाही ।।८।।
मरणाचा निश्चय आहे सर्व जीवा ।
जन्मला तो जावा मृत्युपंथे ।।९।।
देशासाठी मेला चिरंजीव झाला ।
प्रभुबाजी जगला मरूनीया ।।१०।।
मुरारबाजीचे धड ते नाचले ।
महाराष्ट्रा जहाले भूषण ते ।।११।।

कोंडाण्याचा करी सिंहगड ताना ।
गाजविला बाणा क्षत्रियाचा ।।१२।।
नेताजीची दादा ठेवी आठवण ।
धर्माची साठवण फोलकट ।।१३।।
बाटविला तरी होई ना मुसलमान ।
हिंदुत्वाचा मान राखिला त्याने ।।१४।।
हिंदुत्व हे नव्हे बाटण्याचे काम ।
हृदिं आत्माराम 'हिंदु' म्हणे ।।१५।।
पाणी न भिजवी वायू न सुकवी ।
शस्त्रास्त्रे बरवी बोथटली ।।१६।।
बाटवा छाटवा काटवा फाटवा ।
हिंदु मीहि नवा हरघडीं ।।१७।।
मऱ्हाठ्यांचे राज्य अनीतीला मारी ।
स्त्रियांचा कैवारी राणा शिव ।।१८।।
परस्त्रीवरि हात टाकीतात गुंड ।
ना करी त्या दण्ड मर्द कोणी ।।१९।।
मुलाण्याची सून माता मानी शिव ।।
म्हणुनी झालें शिव स्वराज्याचें ।।२०।।
अपमान जेव्हां द्रौपदीचा झाला ।।
गेलें तें लयाला कुरुसाम्राज्य ।।२१।।
मर्दाने भिडावें मर्दाशी संगतीं ।।
व्यर्थ बायावरी हल्ला कां रे ।।२२।।
बायकांचे शाप विश्वा जाळितील ।।
देवहि गाळितील उष्ण अश्रू ।।२३।।
दादा, त्याची ठेवी नित्य आठवण ।।
मनीं साठवण बायकांच्या ।।२४।।
इतिहास सारा बायकांना ठावा ।।
दिवाळींत गावा भावासाठीं ।।२५।।
माझ्या भाऊराया भेटीला आलासी ।।
ओवाळणि घालिशी कसली आतां ।।२६।।
नको तुझी पदवी नको तुझें धन।।
पाहिजे मज मन मर्दाईचें ।।२७।।
मर्दुमकी नाही पदव्या रगड घेई ।।
ठेचूं त्याला पायीं कोणी असो ।।२८।।

बेलवाडी किल्ला लढवी सावित्री ।।
स्त्रीहृदयाची खात्री ठेवी ध्यानीं ।।२९।।
सत्तावनच्या सालीं लक्ष्मीचा आकांत ।।
झांशी झाली शांत पराक्रमें ।।३०।।
मर्दाची ना जिनें चालूं दिली टाप ।।
चारित्र्याची छाप चिरंजीव ।।३१।।
सावित्री लक्षुमी मर्द तेलिण ताई ।।
इतिहास गाई उमाळ्यानें ।।३२।।
ओवाळणीच्या दीपीं उजाळलें तेज ।।
चेतवी तूं ओज मर्दुमकीचें ।।३३।।
स्त्रियांच्या रक्षणा कुरवंडीन काया ।।
ओवाळणी राया हीच घाली ।।३४।।

□□□

स्फुट लेख

दिपवाळीच्या फटाकड्यांचा कडकडाट

हेंच आजच्या हिन्दु जनांच्या अस्तित्वाचें सारसर्वस्व. वाचा आणि लिहा. लिहा आणि वाचा. फार झालें तर बोला. हात पाय खंगले तरी डोकें पिकवून ठेवा. आचार झाला नाहीं तर न होवों, विचार सपाटून करा. फार झाले तर विचारांचा उच्चार करा. पण या पलीकडे श्वास सुद्धां सोडू नका. बीए व्हा, एमे व्हा, विलायत अमेरिकेंतल्या असतील नसतील त्या पदव्यांचे पदवीपति व्हा. पण त्या पलीकडे अधिक कशाचीहि अपेक्षा करू नका. वहीपूजन करा. लेखणी दौत पूजन करा, वाटेल तर गंधाक्षतांचा मळवट भरून स्वत:चें पूजन करा. कोणाचीहि त्याला आडकाठी नाही. धनत्रयोदशीच्या दिवशीं धण्यांत गूळ मिसळून खा, नाहीतर नर्कचतुर्दशीच्या पहाटें सर्वांगाला धणेगूळ फासून अव्यंग स्नान करा. जगांत कोणीहि तुमचा हात धरणार नाही, सरस्वतीच्या आव्हानाची तुम्हाला आज मुळींच आवश्यकता नाही. कारण ती आपला मोराचा पिसारा फडफडवीत रात्रंदिवस तुमच्यापुढें नृत्याचा थैमान घालीत आहेच. परंतु, तेवढ्यावरून, त्या तुमच्या पुस्तकी अंकलेच्या तांडवनृत्याला लक्ष्मी कधिं काळीं भाळेल, एवढी मात्र कल्पना डोक्यांत वावरूं देऊं नका. लक्ष्मीसरस्वतीचा सवतिमत्सर पुराणप्रसिद्धच आहे आणि बेकारी सुशिक्षित पदवीधरांच्या टोळ्या, हा त्याचा प्रत्यक्ष पुरावा आहे.

+++

हिंदुस्थानची ही खास हिन्दुस्थानी शक्ति आज खास विलायती बनलेली आहे. धनत्रयोदशीला हिला गूळधण्याचे नैवेद्य दाखवा, नाहीतर वहीपूजनाच्या दिवशीं तिच्यापुढें लोटांगणे घाला; ती आज विलायतेवर फिदा होऊन बसली आहे. पणत्या लावा, मशाली लावा, गॅसचा झगझगाट करा, नाहीतर विलायट्रीचा लखलखाट करा, या हिन्दुस्थानांत लक्ष्मी तुम्हाला कोठेहि आढळणार नाही. अखिल ज्ञानाचे जन्मसिद्ध जहागीरदार म्हणून फुशारक्या मारणाऱ्या 'विचारवंत' ब्राम्हणांजवळ ती नाही. आर्म्स ॲक्टला बळी पडलेल्या आणि 'चूक चाकू सुरी हीं हिन्दी माणसांची खेळणी नव्हत' या सूत्रांतलें सूत पिंजणाऱ्या क्षत्रियांपाशीं ती नाहीं. विलायती गोऱ्या व्यापाऱ्यांच्या कमिशन एजन्सीवर जगणाऱ्या वैश्यांपाशीं ती नाहीं आणि शूद्रांपाशीं ती जर कधींच नव्हती, तर आज तरी कुठून असेल?

हिंदुस्थानांत हिन्दी बादशाही सत्ता असताना 'सोन्याचा धूर' निघत असे, असें म्हणतात. हा धूर

कसा काय असतो, आणि त्यानें माणसाचे डोळे कसे तारवटतांत, याची आज आपण नुसती कल्पना तरी करावी, किंवा इंग्लंड अमेरिकेकडे पहावें, म्हणजे काम भागेल, सोन्याच्या धुराऐवजीं अखिल हिंदुस्थानांत आज विडीचा धूर निघत असला, तरी तोहि परदेशी तंबाकूचाच धूर आहे, हें विसरून चालणार नाही. सकाळच्या तोंड धुण्याच्या दंतमंजनापासून तों रात्रीं निजण्याच्या बिछान्यावरील ढेकूण-पिसवा विध्वंसक कटोल पावडर पर्यंत आमचें सर्व जीवन आम्ही परदेशी व्यापाऱ्यांना विकलेले आहे. तरीहि दिवाळीच्या नाटकी थाटानें लक्ष्मीपूजनाचा फार्स करतांना हिंदु व्यापाऱ्यांना शरमेचा चिमटा मुळीच बसत नाही.

+++

राष्ट्रांतील माणुसकी मेली किंवा कोणी मारली आणि भविष्याकडे डोळेझाक करून, स्वार्थावरच आडवे हात ठेवण्याची प्रवृत्ति बळावली, कीं लक्ष्मी तेथें टिकणंच शक्य नाही. जेथें माणुसकी तेथे लक्ष्मी, तेथें स्वराज्य आणि तेथें लक्ष्मी, तेथे स्वराज्य आणि तेथेंच स्वर्ग. मनुष्य लक्ष्मीच्या मागें लागतो; पण लक्ष्मी माणुसकीच्या मागे लागते. माणुसकीला पारखा झालेला देश मनुष्यांनीं कितीहि गजबजलेला असला तरी त्या मनुष्यांना लक्ष्मी 'माणसें,' मानीत नाहीं. हिंदुस्थानांत आज लक्ष्मी नाहीं, याचा सरळ अर्थ हाच कीं हिंदुस्थानांतल्या लोकांत आज माणुसकीचा कणसुद्धा उरलेला नाही. माणुसकीला मुकलेल्या माणसांनीं दिवाळीच्या ३=४ दिवसाच्या मामुली हंगामांत, एकमेकांविषयी नाटकी हस्तदंतीचे प्रेम दाखवावें आणि 'ऋण कृत्वा घृतं जिवंत्' वृत्तीनें 'कसा तरी सण साजरा केलाच पाहिजे' म्हणून दिव्याच्या ओळी नुसत्या लावाव्या, ही माणुसकीच्या ऱ्हासाची परमावधि होय.

+++

हिन्दु जनांत माणुसकी असती, तर त्यांचा हिन्दु धर्म, स्वत:ची पिल्लें खाणाऱ्या बोक्याप्रमाणें, मुर्दाड बनला नसता. धर्माच्या मुर्दाडपणावर जगणाऱ्या भिक्षुकांच्या टोळ्यांनीं देश गजबजला नसता. बीभत्स पौराणिक कल्पनांच्या पचनीं बहुजनसमाज पडला नसता. ब्राम्हणांविरुद्ध ब्राम्हणेतरांना जळफळण्याचा प्रसंग आला नसता. ब्राम्हण ब्राम्हणेतरांनीं आठ कोट स्वधर्मियांना 'अस्पृश्य' मानून विष्ठेसमान तिटकाऱ्यानें त्यांना मनुष्यत्वाचेहि हक्क नाकारले नसते. हिन्दु जनांत माणुसकी असती, तर कोट्यावधि बालविधवांची या देशाला कीडच लागती ना. हिंदु समाजांत माणुसकी शिल्लक असती तर वर्षाच्या १७ महिन्याचे व्याज उकळविणारा आणि गोरगरिबांना अडचणीच्या कैचींत पकडून गबर होणारा मारवाडी कधींच कोणाला दिसला नसता. हिन्दूंची माणुसकी जिवंत असती, तर शुद्धी संघटनाचा प्रश्नच उद्भवला नसता आणि मुसलमानांच्या सोटेबांजीपढें हिंदु नमला नसता. हिंदु आणि मासुसकी यांची फारकत झाली, म्हणूनच स्वराज्य गेलें, स्वधर्म पाजी बनला आणि स्वत्वाची लाज नष्ट झाल्यामुळें, हिन्दुमात्र परस्परांचा आणि स्वत:चा आत्मरिपू बनला. अशा आत्मरिपूंनी काय दिवाळी साजरी करावयाची? कशाची? कां?

+++

दिवाळी कोणी साजरी करावी? दिवाळी श्री शिवछत्रपतीनें साजरी केली. राजाराम छत्रपतीने जिजीला दसऱ्याचें सोनें लुटून, सातारच्या अजिंक्यताऱ्यावर दीपावलीचा दीपोत्सव केला. बाजीराव पेशव्यानें मऱ्हाटी भाल्याचा दरारा बंगालपर्यंत बसवून, बुंदेल खंडांत दिवाळी साजरी केली. यशापयश श्रीकृष्णार्पण समजून, तारुण्याच्या बेफाम भरारीनें दिल्लीच्या तक्तावर सदाशिवराव भाऊनें हाणलेल्या

घणाच्या घावांतून उडालेल्या ठिणग्यांनी दिवाळी साजरी केली. भीमथडी घोड्यावर ठोकलेली मांड तीन दिवसांत अटक गाठून अबदल्लीच्या कटकावर झेंडा नाचविणाऱ्या राघो भरारीनें महाराष्ट्राची दिवाळी पंजाबात साजरी केली. अक्षरशत्रू असूनहि, समशेरबहाद्दरीच्या जोडीनेंच मुत्सद्देगिरीचे पाणी खुद्द दिल्लीच्या बादशहाला पटवून, मऱ्हाठी स्वरज्याच्या दराऱ्याला मान्यता मिळविणाऱ्या पाटीलबुवा शिंद्यांनी खुद्द दिल्लींत मऱ्हाठी दिवाळी गाजविली. सभोंवार, गनिम बेफाम भडकलेला असतांहि रामराज्याच्या तोडीला तोड असें माळव्याचें राज्य कदरबाज चालवणाऱ्या देवी अहिल्याबाईनें आपल्या उज्वल स्त्रीधर्माची दीपावली लाऊन, तत्कालीन् सर्व हिंदी नरवीरांना भाऊबीजेची ओवाळणी केली. तो काळ गेला ! तो मनु मेला ! तीं माणसें निमाली! आणि- आणि त्यांनीं राष्ट्रदेवाच्या दीपावलीसाठीं आपल्या हृदयाच्या लांबणदिव्यांत जें उज्वल माणुसकीचें तेल भरलें होतें, ती एकनिष्ठेची पीळदार वात सरसावून ती अभेद भावनेच्या देदिप्यमान ज्योतीनें प्रज्वलीत केली होती, तो दिवाळीचा सारा थाट-देवा ! - नको तो विचार आणि त्याचें स्मरण! - साफ नष्ट झाला.

+++

दीपावलीचे राष्ट्रीय सुप्रसंग अनेक वेळां येतात आणि जातात. पण आमचा हृदय दीप स्नेहशून्य झाल्यामुळें, खरी दिवाळी आणि खोटी दिवाळी यांतील भेदच दिसेनासा झाला आहे. अंत:करणांत माणुसकीचा थेंबहि उरला नसल्यामुळें, आश्विन कार्तिकाच्या जंकशनवर येणारी दिवाळी आम्ही कशी तरी साजरी करून, लक्ष्मी पूजनाचा खोटा थाट नाटकी चाळ्यानें पार पाडतो. महाराष्ट्राला माणुसकी देणाऱ्या श्रीशिवरायाचें स्मारक प्रिन्स ऑफ वेल्सच्या हाताने पुण्यांत बसविलें गेले, त्या वेळचा पुण्याचा धिंगाणानीट स्मरण करा, म्हणजे खऱ्या दीपावलीला लाथाडण्याचीं बेमाणुसकीची दुष्कर्मे हिंदुजन कशी आचरतात, याचा स्पष्ट दाखला पटेल. तो खरा दीपावळीचा प्रसंग. ज्या ब्रिटीश इतिहासकारांनीं शिवरायाच्या विकृत चरित्रचित्रांनीं साऱ्या जगात लुटारू चोर उपटशुंभ म्हणून बदलौकीक गाजविलेला होता, त्याच ब्रिटीश साम्राज्याचा भावी अधिपति, आमच्या शिवरायाच्या मूर्तीपुढें टोपी काढून, त्याचा त्रिभुवननिनादित असा सन्मान करतो, हा योगायोग म्हणजे महाराष्ट्राची दिवाळीच नव्हे काय? अशा अभूतपूर्व सोन्याच्या दिवशीं या अलभ्य पण लभ्य झालेल्या दिवशीं या अमृतसिद्धीच्या घटकेला, पुणे शहराच्या पेशवाई पिशाच्चा हिंदु समाजाच्या माणुसकीची राखरांगोळी करणाऱ्या पिशाच्या, तूं सुतकी वृत्तीचें दप्रदर्शन करावे काय !

शिवराया प्रणिपात कराया ब्रिटानिया आली

या प्रबोधनकाराच्या उमाळ्याच्या उद्‌गारांवर तूं आग पाखडावी काय? 'ब्राम्हण-ब्राम्हणेतर' पत्र चालवून आणि आतां 'समाज-समता-संघ' काढणाऱ्या श्रीयुत देवराव नाईकाना सुद्धां या वचनाची चीड येऊन त्यांनी 'हिंदु मिशनरीं'त ठाकऱ्याचें जिवंतपणींच श्राद्ध घालावें काय? प्रबोधनकार ठाकऱ्यांचें महापातक कोणते? तर हे खालील उद्‌गार :-

''हा प्रसंगच असा आहे कीं या महायोगांत महाराष्ट्रांतल्या सर्व भेदांनीं मज्जन स्नान करून अभेद व्हावे. सर्व पंथांनी या प्रयत्नात द्वैताला मूठमाती देऊन अद्वैत व्हावे. ब्राम्हण ब्राम्हणेतरांनीं श्रीशिवरायाची शपथ घेऊन, खुल्या दिलानें, महाराष्ट्रीय म्हणून राष्ट्रसेवेसाठीं एकमेकांत समरस व्हावे. ब्राम्हणांना निरिच्छ भावनेने क्षत्रियांना 'या बसा' म्हणावे. क्षत्रियांनीं त्यांना वंदन करून त्यांचा मान

राखावा. दोघांनीं मिळून वैश्व जनांचा सत्कार करावा आणि सर्वत्रांनीं शूद्र अस्पृश्य बांधवांची जाहीर क्षमा मागून कृत पातकांना पश्चात्तापित आनंदाश्रूंच्या धबधब्याखालीं पार बुडवून टाकावे.'

याच कलमांतून निघालेले हे उद्गार, माझ्या प्रिय महाराष्ट्रा! कोणत्या मनोवृत्तीचे आहेत, हें तूंच सांग.

+++

हिंदु तरुणांची आज अशी तरी स्थिति दिसत आहे काय? राष्ट्रे तरुणांच्या हिंमतीवर जगतात आणि त्यांच्या महत्वाकांक्षेच्या अध:पाताबरोबरच नामशेष होतात. आज हिंदु तरुणांची काय स्थिति आहे? बेकारीनें अन्नाला मोताद झालेल्या तरुणांची मोजदाद केली, तर प्रत्येक घरांत निदान एकतरी हतबुद्ध तरूण भविष्याविषयीं उदासीन बसलेला खास आढळेल. एकट्या मुंबई शहरांत पोटानें मारलेल्या तरुणांची संख्या पाहिली तर कोणाहि विचारवंताच्या विचाराला धक्काच बसला पाहिजे. आज या दिङ्मूढ तरुणांची कोणी विचारपूस करीत नाही. त्यांच्या सुखदु:खांची कोणी चर्चा करीत नाही. त्यांच्या भवितव्यतेच्या मार्गावर पडलेला अंधार, निश्चित सहायाचा शोधन-प्रकाश पाडून, कोणी किंचितही कमी करीत नाहीं. पुढारी पेंढाऱ्यांना त्यांच्याकडे लक्ष देण्यास फुरसद नाही. धंदेवाईक राजकारणी कज्जेदलालांचे डोळे तर नेहमीच उरफटलेले. व्यापारी वर्ग आपल्या भांडवलशाही मत्ताबाजीचें सौभाग्यकुंकू सांभाळण्याच्या विवंचनेंत. बिचारें सरकार ! प्रजोत्पादनांत बेताल बहकलेल्या हिंदूंच्या वाढत्या लोकसंख्येपुढें त्यांनी तरी किती तोंडापोटाची भगदाडे भरावी! घरांत दारांत स्वर्गांत पाताळात दोन प्रहरच्या पोटाच्या किंकाळ्या ऐकून धावणारा एकहि परमेश्वर या अभागी हिंदुस्थानांत या उमलत्या तरूण पिढीला आज दिसत नाही. ज्या राष्ट्रात तरुणांच्या पोटाचें बण्ड एवढ्या कमाल निकरावर येऊन थडकलें आहे, त्या राष्ट्रांत हिन्दु जनांनीं दीपावली साजरी करावी, लक्ष्मीपूजनाचीं नाटकें नटवावी, आणि पानसुपाऱ्यांच्या थाटमाटांत बाल्वेलीचा फार्स वठवावा, हा मनाचा मुर्दाडपणा होय. राष्ट्राच्या दैवाचे उद्याचे कारागीर अन्नाला मोताद झाले असतांना, दिवाळ्या साजऱ्या करून, लक्ष्मीच्या मेहरबानीची याचना करणारे रूढीचे गुलाम, जगाच्या पाठीवर, हिंदुस्थानातल्या हिंदूंशिवाय दुसरे कोणी असतील काय?

+++

ऋण काढून सण करणें, शेजारणीची सरी पाहून आपल्या गळ्यांत दोरी बांधणे आणि कसलाहि भासकाभुसका विजय स्वप्नात जरी लाभला नाही तरी दिवाळ्या साजऱ्या करणें, हीं 'अचाट कर्मे' फक्त रूढींच्या गुलामांनाच चांगली सफाईंत साधतात. आज नरकचतुर्दशीच्या पहाटें स्नानें करून शुचिर्भूत होतील. उत्तमोत्तम वस्त्रआवरणें पांघरून मिष्टान्नाचें भोजन करतील. इष्टमित्रादि आप्तांना सप्रेम भेटतील. भेटीभवऱ्या पाठवितील, आणि आज आपण आनंदातिशयाच्या शिखरावर गेलो, अंतर्बाह्य शुद्ध झालो, आंतून बाहेरून मंगल झालो, अशा खोट्या कल्पनात मग्न राहतील. या वेळीं त्यांना अन्यायपीडित अस्पृश्य बांधवांची आठवण होणार नाही. ते हिंदुधर्मीय असतांनाहि, हिंदु देवळांत जाण्याची त्यांना बंदी करण्यांत आपण देवावरीं किती अन्याय करीत आहो, याची कोणी कल्पना करण्याचीहि तसदी घेणार नाही. सर्वत्र मंगल आहे, आनंद आहे अशा भावनेच्या झोपाळ्यावर हृदय झोके घेत असतांना, हिंदु समाजातील दोन कोटी साठ लक्ष निरक्षर बालविधवा भगिनींचा आक्रोश एकालाहि ऐकूं येणार नाहीं. मानवी संसारांत स्त्रियांचें प्राधान्य आदरपूर्वक कबूल करून, त्यांच्या जन्मजात सद्गुणांचे

कौतुक करण्यासाठींच दिवाळीचा सण सालोसाल येतो. हिंदु स्त्रियांची निरक्षरता, त्यांचें शोचनीय परावलंबन, भिकारड्या पौराणिक गोष्टीनीं त्यांच्या मनावर बसलेला भोळसट श्रद्धेचा पगडा, धर्माच्या व शास्त्राच्या नावाखालीं त्याचे निदर्यपणानें होत असलेले धिंडवडे, इत्यादि अमानुष व रानटी समाजालाहि न शोभणारे अमंगल प्रकार नष्ट करण्यासाठीं, घातुक रूढीवर हल्ला करण्यास कचरणाऱ्या हिंदूंनो, दिवाळीच्या मामुली मंगल स्नानानें ही सर्वत्र पसरलेली अमंगलें धुऊन जातील, असाच का तुमचा समज आहे? स्त्रियांच्या निरक्षरतेची व हतबलतेची बेडी अखिल हिंदु समाजाच्या पायांत पडल्यामुळें, पाणीदार विवाहित तरुणांना सुद्धा आपल्या उमलत्या आकांक्षांचे कोंब स्वत:च्या हातानें उखडावे लागतात. या दशेचा परिणाम राष्ट्राच्या जीवनावर काहीच का होत नसेल? सट्टेबाजीनें लागणाऱ्या बळजबरीच्या विवाहांतून निघणारे उदास संसाराचे भेसूर सूर तर तुम्हाला कधीच ऐकू येत नाहीत, मग केवळ अपघाताने वैधव्यांत पडलेल्या अपाप भगिनींचे आंतल्या आंत गुदमरणारे उम्हासे तुम्हांला कसचे भासणार! धनत्रयोदशीच्या दिवशीं चांदी सोन्याची पूजा बांधता, पण घरांतल्या, शेजारच्या, गावांतल्या, किंवा अखिल राष्ट्रांतल्या या बिनमोल मंगल लक्ष्मीला सादी कोपऱ्यांत केरसुणी प्रमाणे डांबून ठेवता! निगर्गट्ट पाषाणहृदयी हिंदु समाजा, मंगल स्नानोत्तर देवदर्शनाला देवळांत जातांच या राष्ट्रदेवतांची होणारी ही नानाविध पायमल्ली तुला देवाचें दर्शन खास होऊं देणार नाही. तरूण राष्ट्रभक्तांनो, तुमच्या भगिनींच्या सद्‌गुणराशीचा, त्यांच्या रत्नमोल जीविताची आणि राष्ट्रोद्धारार्थ अवश्य लागणाऱ्या त्यांच्या प्रेमळ व पवित्र सहायाची, वाजवी किंमत ठरविण्याचें सामर्थ्य जर तुमच्या आंगांत असेल, त्यांच्या अंत:करणांतून निघणारा एकेक श्वास किती ज्वालामुखींची राखरांगोळी करूं शकेल, याची थोडीफार कल्पना तुम्हाला करतां येत असेल, तर व्यापक दृष्टीनें, उदार मनानें आणि शुद्ध माणुसकीनें या भगिनींना भाऊबिजेची ओवाळणी काय घालावीं, याचा विचार तुमचा तुम्हीच ठरवा.

+++

बोलून चालून फटाकड्यांच्या कडकडाट! तेव्हां धुराच्या लोटांत ठसका खोकला लागायचाच. पण हा कडकडाट देशी आहे. परदेशी नाहीं. म्हणून सर्व स्वदेशाभिन्यांना मानवेल. अशी आशा आहे.

□□□

लेख

प्रबोधन-कार्यांतलीं विघ्नें

*"**दक्षिणा** हबकल्याशिवाय मंत्रच म्हणावयाचा नाही, हीच ज्या भटी पिंडाची ब्रम्हगाठ, त्यांनीं, अवघ्या महाराष्ट्रात एकट्या प्रबोधनकारानें होळकरांची बाजू उचलून धरलेली पहातांच, हजारों रुपयांच्या थैल्यांच्या काल्पनीक वासानें त्यांचीं घाणेंद्रिये कोंदाटून कां जाऊ नयेत?... आमच्यावरील (टेंपट्रेस) खटल्याच्या मुळांशीं काल्पनीक हजारों रुपयांच्या होळकरी हमेण्यांचें भटी भूतच नाचत आहे, हें चाणाक्ष वाचकांस तेव्हांच उमजून येईल. हमेण्यांच्या गटारगप्पांनीं भटीपत्रें व भटलोक कितीहि वायचटले, तरी आमच्या प्रॉमिसरी नोटांचीं पुडकी दसरीं बाळगणारे आमचे सावकार मित्र मात्र पोट धरधरून हासले. (पृ. १४) ... ...इंदोरी खजिना गुप्तपणें पचविण्याचा आमच्यावर आरोप करणाऱ्या कारस्थान्यांनीं वास्तविक असा विचार करायला पाहिजे होता कीं असल्या गढगंज गंगाजळांत आकंठ बुडालेला प्रबोधनकार क्रौन फोलियोचें एक मोडकें तोडकें ट्रेडल व टायपांच्या ५-६ केसी घेऊन आपल्या मासिकाचीं दोनदोन पानें छापीत कां बसला? त्याला सावरकरांचे व क्रेडिट सोसायट्यांचे हप्ते कां भरावे लागतात? (पृ. १६)"*

- प्रबोधन, वर्ष ४ थें. अंक १२ वा.

मनांत एक व जनांत एक ही प्रवृत्ति जनसेवकांत नसावी, हें माझें ठाम मत असल्यामुळें काही गोष्टींचा जाहीर खुलासा करून, प्रबोधन-कार्यांतील विघ्नांचा माझ्या आश्रयदात्यांना परिचय करून देणें आज भाग पडलें आहे. असें केल्यानें मजवर व्यावहारिक बावळटपणाचा आरोप आला तरी परवडला, पण अप्रामाणिकपणाचा दोष मला क्षणभरहि सहन होणार नाही. लोकमत-प्रबोधनाच्या व्यसनापायीं मी सर्वस्वाला किती व कसा सुकलों आहे, याची वाच्यता करून, आत्मश्लाघेच्या पातकाचा धनी मी होऊं इच्छित नाही. तथापि व्यवहाराच्या सरळ चार गोष्टी उघड करून, आश्रयदात्यांच्या तद्विषयक कल्पनांवर प्रकाश पाडणें माझें कर्तव्य आहे. 'मानसिक दास्याविरुद्ध बण्डा'चा उच्चार करतांनाच, प्रत्यक्ष आचार म्हणून सरकारी सेवावृत्तीची आकर्षक रौप्यश्रृंखला मी एका क्षणांत तोडिली. कायदेबाजी आणि

कज्जेदलाली यांविषयी माझे विचार प्रबोधनाच्या वाचकांना नव्याने सांगणें नको. माझें कोणी कितीहि नुकसान केलें, कितीहि निंदा केली अगर छळ केला, तरी वादी अथवा फिर्यादी नात्यानें कोर्टाची पायरी न चढण्याचा माझा कृतसंकल्प आहे. लुच्या लोकांनीं या निश्चयाचा गैर फायदा घेऊन मला आजपर्यंत दीड दोन हजार रुपयांची ठोकर दिलेली आहे. उलट्या पावलानें चालणाऱ्या जगांत माझी सरळ सुलट वृत्ति मूर्खपणाची ठरत आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. तथापि लोकसेवक या नात्यानें प्रतिपादन करीत असलेलीं माझीं मतें कायदेबाज कज्जेदलालांना चुकीची किंवा बेमाणुसकीची वाटत असल्यास, त्यांत दृष्टीचा विरोध विशेष असल्यामुळें, अपराधाचा वाटा केव्हांहि पदरांत घ्यायला माझी ना नाही. देणें घेणें सर्वांनाच असतें. पण तेवढ्यासाठीं कोर्टाची पायरी केव्हां चढावी आणि केव्हां चढूं नये याचाहि काही विवेक आहे. हा विवेक ज्यांच्या गांवीं नाही, ही माणुसकीची वृत्ति ज्यांना अजिबाद पारखी झालेली आहे, अशा मित्रांनीं एकदम शत्रुत्वाचा झगा पांघरून प्रबोधन कार्यांत विघ्नें उत्पन्न करण्याचे केलेले काही प्रयत्न वाचकांना आज श्रुत करीत आहे. या व्यवहारांत माझ्या वैयक्तिक संसाराचा संबंध मुळीच नाही, हें आधीच स्पष्टपणें सांगितलेलें बरें.

सातारच्या कूपरची कायदेबाजी

सातारा रोडवर छापखान्याचा धंदा ११ महिने झाला. त्याच्या भागिदारीची कामधेनु दूध देण्यास निदान दोन वर्षे तरी घेईल, तोपर्यंत माझा संसारखर्च चालण्यासाठीं कूपरच्या फॅक्टरीकडून दर महा १०० रुपये अलाऊन्स मला मिळाला आणि त्या बाबत सर्व इंग्रजी पत्रव्यवहार, जाहिरातखातें, चित्रकलाखातें, हीं मी एकतंत्री चालवावी, असें ठरले होतें. त्याप्रमाणें माझीं कामेंहि झालीं. याशिवाय १९२३ चे कूपरचे कौन्सिल इलेक्शन, मॅनिफेस्टो व इतर सर्व मतप्राप्तीची लेखन छपाईची कामें करण्याबाबत रोख रुपये ५०० ठरले होतें. परंतु अलाऊन्सच्या नांवावर किंवा कोणत्याहि सबबीवर स्वत:च्या संसारासाठीं ११ महिन्यांत मी कूपरच्या एका दीडकीलाहि स्पर्श केला नाहीं प्रबोधन पाक्षिकाच्या कंपोज छपाईचा वाजवी खर्च मी रोख भरीत होतों. त्यासाठीं लागणारा कागद मी मुंबईहून खरेदी करून नेलेला होता. सातारच्या छापखान्यांत प्रबोधन बिनखर्ची छापला जात असे अशी कोणाची समजूत असल्यास ती निव्वळ गैरसमजूत होय. इतकेंच नव्हे तर प्रबोधनानें सातारा प्रेसला रोख भरलेल्या रकमांपैकी १७ अंक - छपाईची वाजवी बिलें वजा जाता ८४ रुपये सातारा प्रेसकडून प्रबोधनाचें अझून येणें आहे. पुढें कूपरशाही कटकटीला कंटाळून मी जेव्हां तेथील व्यापाला कायमचा रामराम ठोकला, त्यावेळीं मी मुद्दाम मुंबईहून बोलाविलेल्या बी.कॉम्. ऑडिटरनें नामंजूर केलेल्या, किंवा इतर काही कारणांमुळें छापखाना किंवा फॅक्टरी यांच्या खातीं खर्ची न घालतां येणाऱ्या काही रकमा मला स्वत:च्या नांवावर चढवून घेणें भागच पडलें. त्यांची बेरीज ४५० रु. झाली. भाऊराव पाटलांच्या सांगण्यावरून केशवराव विचारे यांना हातउसने दिलेले ५० रुपये; (हे अझून परत यायचेच आहेत!) श्री. जाधवराव हे नामदार दिवाण होऊन सातारा येथें आले होते, त्यावेळीं मानपत्राच्या आणि दौऱ्याच्या भानगडींत पाडळी ते सातारा स्पेशल मोटरच्या फेऱ्यांचा खर्च अजमासे २५ रुपये; कीर्तनकार जलसेवाले यांना वेळोंवेळीं दिलेल्या १० ते १५ रुपयांच्या कित्येक बिदाग्या; अनाथ प्रेतसंस्कार; वगैरे अनंत भानगडीचें खर्च केवळ कारखाना व छापखाना यांच्या नांवासाठीं मला करावा

लागला, त्यानें ही रक्कम फुगली. छापखाना सोडतांना माझ्या ११ महिन्यांच्या अलौन्सची गोष्ट तर कोणी बोलेच ना, पण कारखान्यांतले वाटवाले कारभारी ''जाते बखत ठाकरे साबनें खाजगीके वास्ते जितनी रक्कम खर्च किये होगी उतनी सब वसूल किये बगर नही जानें देंगे'' अशी भाषा बडबडत असल्याचें माझ्या प्रत्यक्ष कानीं आलें. निष्कारण तंटे बखेडे होऊं नयेत आणि गोडीनें जुळलेला व्यवहार शांततेंत तुटावा मग त्यासाठीं माझे स्वत:चें कितीहि नुकसान झालें तरी पत्करलें, ही माझी प्रवृत्ति असल्यामुळें, माझ्या संरक्षणासाठीं मुद्दाम रात्रंदिवस आजुबाजूला बसलेल्या व हिशोब, चार्जशीट वगैरे तयार करण्यांत मदत करणाऱ्या, किनईचे डॉ. पाटणकर, पंत पराडकर, भाऊराव पाटील वगैरेच्या प्रतिबंधाला न जुमानता, मी ४५० रुपयांची प्रो नोट तयार करून एका पत्रासह भाऊराव पाटलांच्या हस्तें कपूरकडे पाठवून दिली. ''परस्पर व्यवहाराचा प्रस्तुत होत असलेला शेवट आणि त्याला घडलेलीं कारणें विचारांत घेता, येथून एक कवडीचाहि निमित्ताळा न राहता आलों तसा परत जावे असें मला वाटतें. म्हणून माझ्या नांवें फिरत असलेल्या ४५० रुपयांची ही प्रॉमिसरी नोट मी आपणास लिहून देत आहे. तिचा स्वीकार व्हावा.'' असा मजकूर या पत्रांत होता. कूपरचें माझ्या अलाउन्सचा कसलाहि विचार न करतां डोळे मिटून त्या नोटीचा स्वीकार केला. नोटीची मुदत १४ जून १९२७ ला पुरी होत होती. म्हणून फर्स्ट क्लास ऑनररी मॅजिस्ट्रेटच्या न्यायदानाची तागडी सरकारतर्फे हातीं धरणाऱ्या कूपर खानबहादुरांनी मागचा पुढचा, खऱ्या खोट्याचा, न्याय अन्यायाचा कसलाहि विचार न करतां, योग्य वा अयोग्य पण देणें मी नाकारीत नाहीं, सवडीनें देतो, या खास निरोपाला धाब्यावर बसवून, केवळ हातांत प्रॉमिसरी नोट एवढ्याच सबबीवर, १३ जून १९२७ रोजी कोरेगांव कोर्टांत दिवाणी फिर्याद दाखल केली. (मुकदमा नं. २२१) मुकदम्याची तारीख १९ ऑस्ट १९२७ होती. मी दोन दिवस आधीं सातारा येथें गेलो. त्यावेळीं कूपरतर्फे तडजोडीचा अट्टाहास करण्यांसाठीं अनेक प्रतिष्ठितांच्या आणि वकिलांच्या मजकडे येरझारा सुरू झाल्या. प्रस्तुत फिर्याद वकिलाच्या नजरचुकीनें लागली, कूपरची त्याला सम्मतीहि नाही, वगैरे अनेक बाष्कळ सबबी पुढें मांडून, तुम्ही कोर्टातच जाऊं नका, आम्ही सर्व व्यवस्था परस्पर मिटवून टाकतो, इत्यादि अत्याग्रहाचीं बोलणीं मी कोरेगांवच्या मोटारींत पाऊल ठेवला तरी चाललीच होतीं. कोर्टांत कूपरचे फक्त वकील आणि कारकून आले होते. मी वकील दिला नव्हता. कारण यापुढें कोणत्याहि प्रसंगीं वकीलाची दलाली पत्करावयाची नाही असा मी निश्चय केलेला आहे. देव आणि मानवांत जर भट दलाल नको, तर न्यायदेवता आणि मनुष्य यांत तरी वकील दलाल कशाला पाहिजे? मी आपली हकिकत तपशीलवार जज्जसाहेबांना श्रुत केली. त्यांना खऱ्या खोट्याचा तेव्हांच अंदाज लागला. समोरचे वकील जवळ जवळ नांवालाच उभे होते. देणें असतां घेण्याबद्दलच फिर्याद कां? देण्यांतून घेणें वजा करून बाकीची रक्कम प्रतिवादीला देणें तुम्हाला न्याय्य वाटत नाही काय? वगैरे अनेक प्रश्न समोरच्या वकिलांस जज्जसाहेबांनीं विचारले. परंतु ''ह्या सर्व बाबी कूपर व ठाकरे हे एकमेकांस भेटले तर तेव्हांच मिटल्या. अझूनहि तसें व्हावें अशी माझी स्वत:ची फार इच्छा आहे. पण ठाकरेच तडजोडीला नाकबूल आहेत.'' वा पलिकडे वकिलांनीं अधिक काहीच उद्‌गार काढले नाहींत. जज्जसाहेबांनीं सुद्धां तडजोडीच्या सूचना केल्या. मी उत्तर केलें, ''प्रॉमिसरी नोट माझी आहे. सही माझी आहे. पाठीमागचा पुढचा विचार करून मी ती दिली आहे. मी जन्टलमन म्हणवितो, वर्तमानपत्रकर्ता म्हणून लोकांच्यापुढें मला उभे रहावयाचे आहे. मी माझ्या सहीला खोटी पाडूं इच्छित नाही. मेहेरबानी

करून आपण मला सहा महिन्याच्या मुदतीची डिक्री द्यावी.''

जज्जसाहेब :- तुमच्या ११०० किंवा १६०० रु. येण्याबद्दल वादीवर तुम्ही फिर्याद कां केली नाही?

मी :- वादी किंवा फिर्यादी म्हणून कोर्टाची पायरी न चढण्याची मी शपथ घेतलेली आहे साहेब. आरोपी किंवा प्रतिवादी म्हणून कोर्टांत हजर राहणें इंग्रजी कायदा मला भागच पाडील.

जज्जसाहेब :- वादीच्या तडजोडीला न जुमानतां डिक्रीसाठीं हट्ट घेणारा प्रतिवादी आपणच पहिले दिसता.

नंतर ''प्रस्तुतची रक्कम मी नैतिकदृष्ट्या देणें लागत नाहीं. पण कायद्याच्या दृष्टीनें देणे लागतो.'' अशी कैफियत लिहून घेऊन जज्जसाहेबांनीं माझ्या आग्रहांप्रमाणें सहा महिन्याच्या मुदतीची डिक्री पास केली.

प्रस्तुत खटल्याची कायदेबाजी एकाद्या भटानें भाट्यानें अगर तीनशेंड्या शेट्यानें लढविली असती तर त्याला महत्व देण्याचे मला किवा कोणालाच काही कारण पडतें ना. परंतु कूपर म्हणजे सरकारचे खानबहादूर. त्यांच्या न्यायबुद्धीची लांबी रुंदी जाडी खोली पूर्ण अजमावून मागच माबाप सरकारनें त्यांना, दुसरा-तिसरा वर्ग नव्हें तर, पहिला वर्ग ऑनररी मॅजिस्ट्रेचीं वस्त्रें अर्पण केलेलीं. ब्राम्हणेतर पक्षाचे पुढारी. सातारा म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष. डि. लो. बोर्डांत वर्क्स कमिटीचे चेअरमन. जिल्हा स्कूल बोर्डाचे अध्यक्ष. सातारच्या अज्ञान महाराजांच्या गडगंज इस्टेटीचे पहिले ट्रस्टी. अर्धा तप कारकीर्दीचे एमेलसी. जिल्ह्यांतील दारू ताडी विक्रीचे धुरीण कंट्राक्टर. लाखो भांडवलाच्या लोखंडी नागरांचे बडे कारखानदार. इत्यादि इत्यादि वगैरे वगैरे महत्पदाच्या थोरवीनें थोरापेक्षां थोर अशा कूपरसारख्या जंटनमननें ही कायदेबाजी लढविण्यांत आपल्या मनाचा दाखविलेला हा क्षुद्रपणा पडद्याआड झाकून ठेवणें म्हणजे वृत्तपत्रकार या नात्यानें लोकांची आणि सरकारची दिशाभूल करण्यासारखें आहे.

दिवाणी किंवा फौजदारी कायदेबाजीच्या एका किंवा अनेक चापांत चेचल्याशिवाय मी चालविलेल्या प्रबोधन कार्याच्या नाड्या तोडण्यापलीकडे माझ्या प्रतिस्पर्ध्यांना दुसरा राजमार्गच उरलेला नाही. प्रबोधन कार्याच्या भक्तांची संख्या दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत आहे आणि त्या वृद्धीच्या वेगाला लोकहितवादी साप्ताहिकानें विशेष जोराची गति अलीकडे दिलेली आहे. ही गोष्ट जितकी सत्य आहे तितकीच, प्रबोधनाचें मिशन उलथून पाडण्याची धडपड करणारे काही प्रतिस्पर्धी ठिकठिकाणी आहेत हीहि गोष्ट खरी आहे. पण मी आनंदानें कबूल करितों कीं, त्या प्रतिस्पर्ध्यांच्या कारस्थानामुळेंच मला माझ्या कार्यांत, शारीरिक व सांपत्तिक दुर्बलतेचा मी जाहागीरदार असताहि, चैतन्याचा भरपूर पुरवठा होत असतो. कूपरशाही कायदेबार्जीतून मुदतीच्या आयुष्याची सनद घेऊन मोकळा होतो न होतो तों आतां हिंदु मिशनरी नव्हे -

हिंदु मशिनरी सोसायटी

आपल्या विद्यमान कार्यकर्त्यांच्या कज्जेदलाली लौकिकाची मान राखण्यासाठी माझ्याशीं कायदेबाजी लढविण्यास सजलेली आहे. कै. गजाननराव वैद्यांचा मृत्यु होतांच हिंदु मिशनरी सोसायटी कसल्या वृत्तीच्या लोकांच्या हातात गेलेली आहे, याचा परिचय प्रबोधनाच्या वाचकांना अनेक वेळां मी करून दिलेलाच आहे. तीन वर्षांपूर्वी अनेक मित्रांकडून व संस्थांकडून लहान मोठ्या रकमा कर्जाऊ काढून प्रबोधन मुद्रणालयाची मी उभारणी केली. त्यांत श्रीयुत आनंदराव जीवन नाखवा, श्रीयुत चंद्राजी शिवराम

मांडवीकर आणि हिंदु मिशनरी सोसायटी यांच्याकडून कांही कर्जाऊ मदत मला मिळालेली होती. आणि ती ४ थ्या वर्षाच्या पहिल्या अंकांत कृतज्ञतापूर्वक जाहीरहि केलेली होती. सोसायटीच्या गव्हर्निंग कौन्सिलचा मी एक जबाबदार मेंबर असतांहि गेल्या ३ वर्षात सोसायटींत अध्यक्षाच्या राजिनाम्यासारखे अनेक प्रसंग घडले तरी मला विद्यमान कार्यकर्त्यांच्या कंपूनें दोन बोटाची चिठ्ठीहि केव्हां पाठविली नाही. सोसायटीच्या कर्जाची जिवंत जाणीव रात्रंदिवस मला असल्यामुळें आणि प्रॉमिसरी नोटीची मुदतहि संपत आल्यामुळें मी ताबडतोब आगाऊ २०-२२ दिवस अध्यक्षाला पत्र पाठवून माझ्या कर्जाची जाणीव करून दिली आणि योग्य कारण दाखवून नवीन प्रो नोट करून देण्याबद्दल कौन्सिलची परवानगी मागितली. हें पत्र पोंहचतांच नवीन निवडलेले अध्यक्ष आनंदराव, नाखवा आणि सेक्रेटरी गोवंडे हे जागे झाले. त्यांनी चार डोक्यांचें कौन्सिल भरविलें आणि मला कौन्सिलला न बोलावितां, माझी बाजू न ऐकतां, एकदम हायकोर्टांत फिर्याद दाखल केली. असें झालें नसतें तरच मी आश्चर्य मानलें असतें. कोब्राशाही आणि कज्जेदलाली हाच सोसायटीच्या सध्यांच्या कार्यकर्त्यांचा पिंड असल्यामुळें त्यांना कोर्टांतल्या कायदेबाजी शिवाय मोक्षाची दुसरी जागा तरी कोणती? इष्टेटीच्या वाटपासाठीं श्रीमती कमलाबाई गजाननराव वैद्य यांच्या विरुद्ध ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टांत खटला झुंजवितांना पुण्यस्मरण गजाननराव वैद्याविषयीं अनेक बाष्कळ विधानें करणारे सुंदरराव वैद्य यांच्या कज्जेदलाली निपुणतेबद्दल हवा तो खात्री देईल. आनंदराव नाखवा म्हणजें सॉलिसिटरचे हेड क्लार्क. त्यांचा सारा जन्म हुकूमनामा, कैफियत, डिक्री, वारं, समन्स, यांतच रंगलेला. तीच त्यांची भाकरी आणि तीच त्यांची चाकरी. ते सोसायटीतर्फेच फिर्याद लावून स्वस्थ बसले नाहींत, तर ताबडतोब एकामागं एक अशी आपली स्वत:ची आणि मांडवीकराची अशा आणखी दोन फिर्यादी लावून माझ्या विरुद्ध कायदेबाजीचा तिरंगी सामना उभा केला आहे. उद्देश हाच कीं, एकत्रित सावकारी हल्ला करून कोणत्या ना कोणत्या उपायानें मला खालीं आदळायचें. सगळ्याचें घेणेंदारांनीं एकदम मागणीचा हल्ला केला तर मोठमोठ्या बँकांचे सुद्धां २४ तासात टिंपाड वाजतें. मग माझ्यासारख्या सर्वच दृष्टीनीं एकांड्या शिलेदाराची गोष्ट कशाला? तोंडानें जरी हे लोक ब्रदर ब्रदर म्हणून तोंडपाटीलकी करीत असले तरी यांची ब्रदरकी उर्फ माणुसकी कायदेबाजी आणि कज्जेदलालीच्या नरकांतच पावन होणारी आहे, हें सिद्ध व्हायला आतां कांहीं शिंगें उरलेली नाहीं. ज्या गोष्टी एकमेकांच्या सोयीनें आणि सवलतीनें सहज एखाद्या बैठकींत सुटल्या जातात, त्यासाठीं कायदेंबाजी आणि कज्जेदलालीचा अवलंब करणाऱ्या असल्या दीड शहाण्यांच्या हातीं हिंदुमिशनरी सोसायटी सांपडल्यामुळेंच तिला हिंदु मशिनरी सोसायटी, म्हणजे हिंदु लोकांच्या पिंडाला झोंबलेल्या बेमाणुसकीच्या यंत्रप्रसाराची सोसायटी असें नांव दिल्यास अत्यंत सार्थ ठरेल. आज हे शहाणे कितीहि मखलाशा करोत, परंतु प्रो नोटीच्या मुदतीची मी त्यांना जागृती दिली नसती तर हे घमेंडखोर ऐदी लोक तिच्या मुदतीवर खुशाल निजून राहिले असते. परंतु सोसायटीचा एक हितचिंतक या नात्यानें मला त्या लुच्चेगिरीचा आरोप पत्करावयाचा नव्हता. माझें घेणें बुडालें तरी पत्करलें. परंतु देणें बुडविल्याचा आरोप मजवर येऊं नये अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. त्या इच्छेला फाजील अर्थ लावून माझ्यावर कायदेबाजी लढविणारांच्या माणुसकीचा पुरावा त्यांना हायकोर्टांत मिळो, नाहींतर सोनापुरांत मिळो, मी माझ्या माणुसकीला जागलो, यांतच मी आनंद मानीत आहे.

वरील हकिकत वांचून प्रबोधनाच्या वाचकांनीं मथळ्यावरील बारीक टायपाच्या मजकुरांतील संगति

हुडकण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना विचारांचे बरेंच खाद्य मिळेल अशी आशा आहे.

पुणें, **सर्वांचा नम्र सेवक.**

१ नवंबर १९२७ **केशव सीताराम ठाकरे.**

□□□

निवेदन

कालपटलाच्या आड !

(१) प्रबोधनाचे तहहयात आश्रयदाते, बडोदा संस्थानचे नामांकित मुत्सद्दी दिवाणबहादुर वासुदेव माधव समर्थ, (२) सुप्रसिद्ध वाङ्मयसेवक सीताराम केशव दामले, (३) पुण्यांतील आरोग्य मण्डळाचे एकनिष्ठ समाजसेवक दत्तोपंत भट, (४) बडोद्याचे इतिहासभक्त रामराव नारायण प्रधान आणि (५) 'प्रतिनिधी' साप्ताहिकाचे विवेकवादी संपादक श्रीयुत सखाराम हरि गोलतकर, हीं लौकिकवान मंडळी, गेल्या पंधरवड्यांत कालपटलाच्या आड झाली. महाराष्ट्राच्या सेवेसाठी परमेश्वर त्यांना लवकरच पुनर्जन्म देवो.

□□□

निवेदन

जाहीर खुलासा

लेखनव्यवसायापासून ते थेट पत्रव्यवहारापर्यंत, छापखान्याच्या व्यवस्थेपासून ते वर्गणीदारांची लेबलें तयार करण्यापर्यंत, सर्व कामें मला एकट्याला करावी लागतात. त्यांतच देण्याघेण्याची काहीजतोडी विवंचना. प्रकृति नेहमी तोळ्यामाशावर नादुरस्त. हातार्शी चलाख व मेहनती मदतनीस कोणीच नाही. अशा अवस्थेमुळें पत्रांची उत्तरें पाठविण्यास किंवा सर्व कामें वेळच्यावेळीं करण्यास मजकडून बरीच दिरंगाई होत आहे. त्याची सर्व आश्रयदात्यांनीं क्षमा करावी. कोणाचा निष्कारण गैरसमज होऊं नये, म्हणून हा जाहीर खुलासा केला आहे.

केशव सीताराम ठाकरे.

संपादक-प्रबोधन व लोकहितवादी.

□□□

काव्य

विजयादशमीचा संदेश

(चाल. सबसे रामभजन करले.)

तूं तोड बन्धने सारी, सांगे सगळ्याना दसरा ।। धृ. ।।
सुखदुःखांच्या सर्व भावना गुलामगिरिचे पाश ।
कोण तुझ्याविण तयार करतो? तुझा तूंच परमेश ।। १ ।।
सांगे सगळ्याना दसरा ।।
बुद्धीचा चवचालपणा तव आखुनि घेतो सीमा ।
धर्माचें थोताण्ड त्यामधें तडफढ करिशि रिकामा ।। २ ।।
सांग कधिं कुठें मानव केला धर्मानें पैदा ।
देव धर्म हे मानवनिर्मित, मग कां उलट सौदा ।। ३ ।।
मनुष्य उघडाउघड बाप तो धर्माचा देवाचा ।
मानियला तर देव नाहितर धोण्डा कुचकामाचा ।। ४ ।।
'धर्म असा अन् देव तसा' ही चोरांची नीती ।
सीमा सगळ्या स्वयंनिर्मिता, कसली त्यांची भीती ।। ५ ।।
चौंढाळांची स्वार्थी बडबड अखेर बनले वेद ।
कितीक चरले त्यावर मुबलक जार चोर निर्वेध ।। ६ ।।
देवासाठी जीव टाकिती उलटे सुटले हिन्दू ।
माणुसकीची दाद न कोणा, द्वैताचे विषसिन्धू ।। ७ ।।
शोधित बसले देव अजागळ देश हातचा गेला ।
गुलाम मुर्खो धर्म कोणता? वाहि पखाली हेला ।। ८ ।।
'धर्मा येते ग्लानी तेव्हां देव घेइ अवतारा' ।
नामर्दाचा हाच तंबुरा छेडित बसले तारा ।। ९ ।।
'धारण करि तो धर्म' म्हणतसां तोण्डानें एका ।
ग्लानि येई तो धर्म कशाचा? कर्म तुझें तें लेका ।। १० ।।

उपनिषदांना देव न कळला, तुलाच कैसा फळला ।
पुराण-मदिरा ढोसुनि ढोसुनि विवेकगड ढासळला ।। ११ ।।
खुद्द स्वदेशीं गुलाम बनले भक्त तीस कोटी ।
पाहवते ज्या देव कशाचा? ती सैतानी कोटी ।। १२ ।।
सैतानाचा धर्म पाळतां, मोक्ष त्यास सैतानी ।
धर्म श्रेष्ट तर भरतखण्ड कां सडलें कटु द्वैतांनी ।। १३ ।।
देव धर्म हे भटी सांपळे घातक झाले देशा ।
मोडा तोडा उलथुनि पाडा उखडा त्यांच्या पाशा ।। १४ ।।
धर्मावाचुनि प्राण न जाई देवाविण नच अडते ।
आत्मशक्ति खंबीर तयाच्या त्रिभुवन पायां पडते ।। १५ ।।
संस्कृति रूढी जातिभेद या धर्माच्या अवलादी ।
माणुसघाण्या हिन्दू केला, बाप लेक प्रतिवादी ।। १६ ।।
गर्व सर्व हिन्दूना मोठा, जननाची पुण्याई ।
ब्रह्मदेवही उभाच चिरला ! काय धर्म-नवलाई ।। १७ ।।
रवि-चंद्राचे वंशज कोणी, कुणि शेषाचे लेक ।
ब्रह्ममुखांतुनि भटजी कोणा कूर्मी अलगज टेक ।। १८ ।।
उच्चनीचता हडळ माजवी भरतखण्डि जो धर्म ।
'शिवू नको हो दूर' म्हणे तो, फुटलें त्याचें कर्म ।। १९ ।।
पावित्र्याचा श्रेष्ठपणाचा भटांस मोठा तोरा ।
भटेतरांना नीच गणाया, काय हक्क या चोरां ।। २० ।।
विचारक्रांन्ति अखंड घडवी काळ बडा गारोडी ।
नित्य नवें तें हवें क्रान्तिला, जुन्यास लाभे तिरडी ।। २१ ।।
एकोणिस शतकांचि थेरडी मनुस्मृति कवटाळी ।
माणुसकीला लावी टाळी, भटजी तिज कंवटाळी ।। २२ ।।
नव्या मनूच्या नव्या स्मृतीचे नव्या हिमतीचे घोडे ।
बघ फुरफुरती झाडिति टापा, जुन्यास खेटर जोडे ।। २३ ।।
सिंन्धूपासुनि हिन्दु निघाला हिन्दु सिन्धु हा मोठा ।
भिक्षुकशाही विष-बिन्दूनें सिंन्धु ठरविला खोटा ।। २४ ।।
समाज हिन्दू अमृतसिन्धू बनला घाण उकिरडा ।
जाति रूंढिच्या बाष्कळ गप्पा, हाणा त्याना जोडा ।। २५ ।।
सीमा जोंवरि तोंवरि समता? बोल फोल तो समजा ।
सीमा तुडवा, चालतील ना मग काळाच्या गमजा ।। २६ ।।
सिन्धुसारखा हिन्दु सगळा एकजीव जर झाला ।
याच उकिरड्यावरती समजा स्वर्ग धावुनी आला ।। २७ ।।

'समतावाला गोकुळकाला' बरळे भटि भाला ।
गोकुळकाला जगां दाखवी भगवद्गीतावाला ।। २८ ।।
सीमा तोडा, प्रेमा जोडा, गुलामगिरीला तुडवा ।
माणुसकीचा धर्म साधण्या जातिभेद खल बुडवा ।। २९ ।।
मानित सीमा ते नर कसले? जिवंत प्रेतें सारी ।
या प्रेतांना स्वराज्य कसले? काळचक्र त्या मारी ।। ३० ।।
सिन्धुसारखा समर्थ व्हावा हिन्दू चौखण्डीं ।
रमाकान्त शाहीर डफावर हाणि थाप लोखण्डी ।। ३१ ।।

□□□

अज्ञातवासाची समाप्ती

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ।।
- श्रीकृष्ण.
लाभालाभ जयाजय सुखदुःखें हीं समान मानूनी ।
कर युद्ध सुप्रतापा! याणें बापा न पावसी पापा ।।
-मोरोपंत.
विजयादशमी सण विजयाचा वैभव शौर्याचा ।
चैतन्याची ज्योत भडकवी प्रताप आर्यांचा ।।
ज्या दिवसानें दक्षिण प्रांता महा राष्ट्र केलें।
शिवरायाचें निशाण भगवें अटकेला नेलें ।।

विजयादशमीच्या आचार-विचार-क्रान्तिकारक दिवशी, श्रीशिवरायाच्या पुण्यश्लोक चारित्र्याचे स्मरण करून, महाराष्ट्र मायभूमीला वन्दन करीत, प्रबोधन आज या क्रान्त्यंकाने आपल्या अज्ञातवासाची समाप्ती करीत आहे. पाण्डवानी याच दिवशी, विराट गृहातल्या आपल्या अज्ञातवासाची समाप्ती करून, शमीवृक्षाच्या ढोलीत लपवून ठेवलेल्या शस्त्रास्त्रांना हात घातला. सव्यसाची अर्जुनाच्या गाण्डीव धनुष्याचा ठणत्कार याच दिवशी अखिल भरतखण्डात कडाडला आणि त्याचा ध्वनि कानी पडताच कारस्थानी घमेण्डखोर कौरवकम्पू जिवंतपणीच मृत्यूच्या भयाने गडबडला. १३ वर्षे प्राणान्तिक वनवास आणि १३ वर्षे मानान्तिक अज्ञातवास भोगूनहि, पाण्डव कौरवांच्या छातीवर पाय देऊन उभे राहिले ते याच विजयादशमीच्या दिवशी. मनाला छळले आणि देहाला पिळले, कल्पनातीत कारस्थानांच्या चापात चेचले, भाताच्या शितासाठी आणि पाण्याच्या घोटासाठी क्षुद्रातिक्षुद्राच्या पायांवर सहकुटुंब पाडले, तरी पाण्डव हतबद्ध झाले नाहीत, हतवीर्य किंवा गतश्रेय झाले नाहीत, आणि मेले तर नाहीतच नाहीत. गाण्डीव धनुष्य पेलणाऱ्या आणि केवळ आपल्या नावाच्या दराऱ्याने वैऱ्यांच्या काळजाचे पाणी करणाऱ्या अर्जुनाच्या हातात हिजडेगिरीच्या बांगड्या भरण्याचा प्रसंग आला, पण अखेरीस याच विजयादशमीला त्याच हातानी गाण्डीव धनुष्याचा टणत्कार करून, ''पाण्डवांना धुळीस मिळवू पाहणाऱ्या सत्तामत्ताबाज गब्रूनो, पाण्डव सहकुटुंब सहशस्त्र हयात आहेत. आता याद राखून ठेवा.

भयंकर संकटांचा महासागर एकाच आचमनात अगस्तीप्रमाणें पचविणारे पाण्डव आज दिव्यमुक्त झाले. आता भीमाची गदा आणि अर्जुनाचे गाण्डीव यांचा पराक्रम नीट पहा.'' अशी हाक त्रिलोकात दुमदुमली. शिवशाहीच्या परम मंगल युगात मऱ्हाठ्यांचा भगवा झेण्डा याच विजयादशमीच्या सुमुहुर्तावर मुलुखगिरीच्या प्रस्थानासाठी थाटामाटाने बाहेर पडत असे. नवमतवादाच्या मुलुखगिरीसाठी क्रान्त्यंकाने सलामी देत प्रबोधनहि त्याच विजयादशमीच्या विजयी योगावर आपल्या विहित कर्तव्याच्या कर्मयोगास पुन्हा प्रारंभ करीत आहे. सज्जनांचा आशीर्वाद असावा.

तब्बल दोन वर्षे झाली ! प्रबोधन महाराष्ट्राच्या सेवेला मुकला होता, त्याला ठार मारून कायमची शान्ति देण्याचा अट्टहास पुष्कळ झाला; परन्तु प्रबोधनाचा क्रांतिकारक पिण्ड सहस्रावधि जखमानी घायाळ झाला, तरी तो शान्तीचे पाणिग्रहण करण्याइतका लेचापेचा नव्हे, हे आज विजयादशमीच्या क्रान्तिप्रधान दिवशी या खास क्रान्त्यंकाने जाहीर करण्याचे भाग्य त्याला लाभले आहे. प्रबोधन आश्रयदात्यांच्या सेवेला दोन वर्षे मुकला, पण अज्ञातवासाच्या अंध:कारमय खबदाडात सुद्धा माझ्या आश्रयदात्यांचा सहृदयतेची किरणे पत्रद्वारे आणि समक्ष भेटीने हरहमेश एकसारखी पडतच होती. भांडवल्या कायदेबाजानी कट करून प्रबोधन कार्याचा उभारलेला व्यावहारीक किल्ला सावकारी सुरंगाने जमीनदोस्त केला, तरी प्रबोधनाने आपल्या एकनिष्ठ प्रामाणिक सेवेने आश्रयदात्यांच्या प्रेमपूर्ण आदराचा काबीज केलेला किल्ला, प्रतिस्पर्ध्यांच्या अक्षौहिणी सेना वंशानुवंश घडपडल्या तरी, रेसभर सुद्धा डळमळणार नाही हा माझा आत्मविश्वास आहे. माझ्या हालअपेष्टांची कहाणी सांगण्याची इच्छा नाही. ती मी शनिमाहात्म्य ग्रंथात एकदा सांगितली आहे. पण त्याहि ग्रंथाच्या बोकांडी एक गलेलठ्ठ कायस्थ प्रभु शनि बसल्यामुळे, आश्रयदात्यांच्या सेवेला त्याच्या (छापून विक्रीस तयार झालेल्या) प्रति पाठविता आल्या नाहीत. हालअपेष्टा आणि संकटे प्रबोधनाच्या पाचवीलाच पुजलेली आहेत. संकटांचा घणमार अखण्ड चालू राहिल्यामुळेच प्रबोधनाच्या कामगिरीची हृदयस्पशी तीव्रता महाराष्ट्राच्या कौतुकास काबीज करून बसली आहे. विरोधकांच्या विरोधांच्या भट्टीत कारस्थानाचे दगडी कोळसे अखंड भटकत राहून, त्यात त्यानी प्रबोधनाला वरचेवर तावून सुलाखून काढण्याचा मनाचा मोठेपणा दाखविला. म्हणूनच महाराष्ट्राला प्रबोधनाच्या कामगिरीचा कल अजमावता आला, सुखदु:खांच्या लाटा उसळविण्याची कारवाई देव करतो, दैव करते, का काळ करतो, याची चिकित्सा करण्याची जरूर नाही. पण ज्या कारणाने हे अकल्पनीय कार्य घडत असेल, त्याला माझी हातपाय जोडून प्रार्थना आहे की माझ्या संकटांसारखी संकटे आणि हालअपेष्टा निदान माझ्या विरोधकांवर कधी आणू नकोस. एकमुक्तपणाचा किंवा उपासमारीचा मला खुशाल जहागिरदार बनव, पण माझ्याप्रमाणे भरल्या ताटावरून उठण्याचा प्रसंग माझ्या विरोधकांवर आणू नकोस. आपल्या करणीचे परिणाम कोठवर जातील, हेच ज्याना समजण्यापुरत्या विवेकाचा खडखडाट, असल्या मुर्दाड मैन्दांवर जीवनक्रान्तीचा कडकडाट करण्याइतका बेशरमपणा संकटानी अझून पत्करला नसावा, अशी माझी समजूत आहे. संकटांचे यथायोग्य आदरातिथ्य करण्याच्या कामी माझ्या इतका रसिक यजमान त्याना दुसरा कोठे आढळणार? संकटानो, सुस्वागतम् ! आचारक्रान्तीच्या प्रसादाच्या इच्छेने, विचारक्रान्तीची सुमने वाहून, जनता-जनार्दनाची एकनिष्ठ पूजा करण्यापलीकडे आता कसलीहि उपाधी जवळ नसणाऱ्या या फकीराच्या न देहमनाचे सताड मैदान तुमच्या थैमानासाठी खास राखून ठेवले आहे.

ढासळलेला किल्ला पुन्हा उभारण्याचे व्यावहारीक काम मोठे कठीण. 'प्रबोधन लवकर सुरू करा' अशा आग्रहाची शेकडो आश्रयदात्यांची पत्रे नित्य येत असत. परन्तु त्यांची सदिच्छा आणि माझी महत्वाकांक्षा एवढ्या भांडवलावर विसकटलेली घडी पुन्हा ठाकठीक बसणे केव्हाहि शक्यच नव्हते. एकाण्ड्या प्रयत्नांचे शेकडो डोंगर पालथे घातले, तरी हतबल स्थितीत कवडीमोल विरोधकाचा क्षद्र सुस्कारा सुद्धा बातबेताचे पत्त्याचे मनोरे भुर्रकन् उधळून टाकी. 'शनिमाहात्म्या'च्या उदाहरणात हाच अनुभव आला. परिस्थितीची बिलकूल पर्वा न करता, माझा लेखनव्यवसाय मी अखंड चालूच ठेविला, माझ्या बाजूला विवंचनेचे पाणी माझ्या बेदरकारीच्या रिफ्रिजरेटरमध्ये गोठून त्याचा खडकासारखा बर्फ झालेला असला, तरी 'प्रबोधन चालू झालाच पाहिजे' या विचाराची कळकळ ठिकठिकाणी उकळतच होती. तिच्या उष्णतेचा पारा भरपूर चढून, त्याचा स्फोट अखेर पुणे येथील श्रीदत्तात्रय छापखान्यात झाला. तेथे काही प्रबोधनाभिमानी मण्डळी आहेत. त्याना प्रबोधनाविषयी आत्मियत्वाचा जिव्हाळा तर आहेच, पण त्याच्याबद्दल महाराष्ट्रीय जनतेच्या आदराचाहि त्यांना चांगला अंदाज आहे. या छापखान्याचे मालक श्रीयुत नारायणराव प्रभाकर वैद्य यानी शुद्ध स्वयंप्रेरणेने प्रबोधनाची मुद्रणप्रकाशनादि सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेतल्यामुळेच, अज्ञातवासाची समाप्ती करून, प्रबोधन या खास क्रान्त्यंकापासून आश्रयदात्यांच्या सेवेचा पुनश्च हरि: ॐ करीत आहे. ''वैद्यो नारायणो हरि:'' असे एक वचन आहे. घायाळ प्रबोधनाच्या जखमांची धूपूस बांधाबांध करून, त्याला कार्यप्रवणतेपुरती शक्ती देणारा कोणीतरी सहृदय वैद्यच पाहिजे होता. प्राप्तकाळ घडीच्या यदृच्छेने यासाठी पुढे 'वैद्य'च आला, आणि तोहि 'नारायण' ! सत्व रज आणि तम या परस्पर विरोधी भिन्न त्रिगुणांचा अनसूयेच्या (असूयेचा अभाव) उदरी एकजिनसी समन्वय कसा करता येतो, हे प्रत्यक्ष दृश्य दाखविणाऱ्या दत्तात्रेयाचे नाव धारण करणाऱ्या श्रीदत्तात्रय छापखान्याच्या छत्राखाली नवमतवादप्रसाराचे क्रान्तिकारक कार्य प्रबोधनाला अभेदभावाने करण्याचे सामर्थ्य जनताजनार्दनाच्या आशीर्वादाने लाभो.

महाराष्ट्राचा नम्र सेवक

केशव सीताराम ठाकरे.

□□□

अग्रलेख

इतिहासाच्या दुर्बिणीतून

(अज्ञातवासाच्या काळात ठिकठिकाणचे प्रबोधनभक्त नेहमी मला भेटावयास येत असत. क्षेमसमाचाराचा प्रास्ताविक त्रोटक अध्याय संपल्यानंतर, कोणत्या ना कोणत्या विषयाची पृच्छा होऊन, त्यावर मला प्रवचन सांगावे लागे. गेल्या मकर संक्रान्तीला श्रीयुत तुकाराम विठ्ठल पुजारी १०-१२ प्रबोधनाभिमानी सातारकर मंडळींना घेऊन तीळगूळ देण्यास आले. इतरहि अनेक स्थानिक मित्र येऊन बसले होते. त्या वेळी गप्पागोष्टींच्या ऐवजी मी जे प्रवचन झोडले तेच या लेखाने वाचकांपुढें ठेवीत आहे. तीळगूळ घ्या, गोड बोला. - संपादक)

एक चमत्कारिक चमत्कार!

मानवांची प्रगति क्रान्तीच्या अखण्ड दणक्याने नित्य पुढेपुढे रेटली जात असते. जगाच्या इतिहासात आजपर्यंत अनन्त राज्यक्रान्त्या झाल्या आणि शेकडो राजवंश उत्पत्ति स्थिती लयाच्या तीनचाकी चरकात पिळून मळून इतिहासात केवळ नामशेष उरले. हिन्दुस्थानासारख्या राज्यक्रान्त्या जगातल्या कोणत्याहि राष्ट्रात केव्हाहि घडल्या नाहीत. राज्यक्रान्त्यांचे बदल-देखावे (ट्रान्स्फर सीन्स) जितके झटपट अचाट आणि जबरदस्त येथे झाले, तितके इतर राष्ट्रांच्या कल्पनेलाहि कधी शिवलेले दिसत नाही. परचक्रांच्या थैमानाला अवघ्या हिन्दुस्थानाएवढी विस्तीर्ण समरभूमी पृथ्वीच्या कोणत्याहि प्रदेशाने दिलेली नाही. येथे अनेक चक्रवर्ति झाले, सार्वभौम नृपति गाजले, आणि कल्पनेला दिङ्मूढ बनविणारी महायुद्धेहि झाली. विशेष लक्ष्यात घेण्याची गोष्ट म्हणजे येथील प्रत्येक राज्यक्रान्ति युद्धाच्या किंवा महायुद्धाच्या रक्तपाताने घडविलेली आहे. अनेक पिढ्यांच्या राजवंशांची पदच्युति किंवा अधोगति समरांगणावरील जयापजयाने ठरविलेली आहे. राज्यक्रान्तीच्या चकमकी नेहमी दोन लढाऊ आणि लष्करी प्रतिस्पर्ध्यात झडलेल्या आहेत. परंतु केवळ व्यापारी पेषाने हातात तागडी घेऊन आलेल्या यूरपस्थ क्रिस्ती इंग्रेज लोकानी, रक्ताचा एक थेंबहि न गाळता, किंवा नाव घेण्यासारखे एकादे युद्धहि न देता, केवळ परवान्यांच्या आणि तहनाम्यांच्या कागदी उलथापालथीवर, हिन्दुस्थानचे सार्वभौमत्व पटकविलेल्या राज्यक्रान्तीचा भारतीय इतिहास म्हणजे खरोखरच एक कल्पनारम्य परन्तु चमत्कारिक

चमत्कारच होय. या चमत्काराला जगाच्या इतिहासात तोड नाही, आणि हिन्दुस्थानाच्या इतिहासातहि तोड नाही.

रावबाजी गेले राणी आली.

इंग्रेजांच्या सार्वभौम क्रिस्ती राज्यसत्तेची पकड हिन्दुस्थानाच्या मानगुटीला बसण्यापूर्वी, डच पोर्चुगीज फ्रेन्च इत्यादि अनेक यूरपस्थ क्रिस्ती राष्ट्रातल्या धाडशी व्यापाऱ्यानी याच दिशेने आणि धोरणाने कसोशीचे प्रयत्न एक शतकभर चालविले होते. पण इंग्रेज बनियानी त्या सर्वांच्या तंगड्या त्यांच्याच तागड्यात अडकवून, हिन्दी लोकाबरोबरच, त्याना आपल्या राजकारणी दगलबाजी (डिपलोमसी)चे पाणी आकण्ठ पाजले. या सर्व इतिहासाची आमची आठवण सध्या बहुतेक बुझलेली आहे, निदान बुझत चालली आहे. कधीमधी एकादे इतिहासाचे चोपडे उघडले, म्हणजे त्याची आम्हाला किंचित्काळ थोडी कल्पना होते. या पलीकडे अधिक काही नाही. इंग्रेजी राजसत्तेच्या उत्पत्तीची आमची कल्पना सुद्धा राणीचे राज्य आणि राणीचा जाहीरनामा या दोन अद्भुत चमत्कारांच्या कुंपणापलीकडे जाईनाशीच झाली आहे. ईस्ट इंडिया ऊर्फ आंग्रेजी बनिया कुंफणीने १८५७ च्या भारतीय क्रान्तियुद्धापर्यंत हिन्दुस्थानात घातलेला बहुरूपी बहुरंगी धुमाकूळ विचारात घेण्याची आम्हाला फारशी जरूरच वाटत नाही. जरूर वाटावी, अशा तऱ्हेचे प्रयत्नच कोणी केलेले दिसत नाहीत. रावबाजी गेले आणि राणी आली, एवढेच आमचे इतिहासाचे सामान्य ज्ञान दिसते.

राणीचे राज्य म्हणजे पौराणिक रामराज्य

भावनाप्रधान हिन्दी लोकांच्या काव्यप्रिय कल्पनाशक्तीला गुंगवून सोडणारा आंग्रेजी चमत्कार म्हटला म्हणजे पाण्डवांच्या आणि मोगल बादशहांच्या पुरुषी सम्राट सिंहासनावर विकटोरिया नावाची एक गोरी बाई बादशाहीण म्हणून विराजमान् झाली! केवढा चमत्कार, काय नवल, किती आश्चर्य! उभ्या हिंदुस्थानात नव्या नवलाईची दिवाळी पिकली. सामाजिक धार्मिक, व्यावहारिक आणि राजकारणी यादवींच्या कटकटीना कंटाळलेल्या हिन्दी लोकांना, चिरकाल शांतीची ग्वाही, धर्ममतांचे बिनअटकाव स्वातंत्र्य आणि राज्यकारभारात निर्भेळ अभेदभाव इत्यादि शर्करावगुंठीत राणीचा जाहीरनामा म्हणजे स्वर्गीय सौख्याचा सनातन ताम्रपट असा वाटला. सातासमुद्रापलीकडचे गोरे लोक येतात काय, देशातली यादवी (?) चुटकीसरशी थोपवितात काय,

इंग्लंद देशांत लंदन राजधानी ।
तेथिल सिंहासनीं विराजीत ।।

असलेली बाई-राणी-हिन्दुस्थानची केसर-इ-हिन्द बादशाहीण होते काय, आणि आबादआबादीचा जाहीरनामा खेडोपाडी फैलावून सर्वांना आईच्या ममतेच्या भाषेने कुरवाळते काय ! असा दिव्य चम त्कार पूर्वी कधी कोणी केला नाही आणि पुढे कधी कोण करणार नाही ! जिकडे तिकडे आबादानी आणि शांति. पाठोपाठ ठिकठिकाणी पाठशाळा, न्यायकोर्ट, पोष्ट हाफिसे, तारायंत्र, रेलवे, इत्यादि आश्चर्यकारक सुधारणांचा फैलाव झाला. काठीला सोने बांधून रामेश्वराला बिनधोक जाण्याचे मन्वंतर उजाडले. त्यामुळे राणीच्या राज्यकारभारावर तमाम हिन्दी लोक इतके बेफाम दिलखूष झाले की अखंड शांतीच्या आश्वासनावर हत्यारजप्तीचा कायदा दयाळू राणी सरकारच्या गोऱ्या नोकरशाहीने पुकारताच, एकजात सगळ्या हिन्दी लोकानी आपापल्या घरातल्या भाला बर्ची बंदुक तलवारींचा, गावोगावच्या

मामलतदार कचेरीपुढे, आपण होऊन पर्वतप्राय खच पाडला. राणीचे राज्य म्हणजे पौराणिक राम राज्य असा भ्रम सर्वत्र बोकाळल्यामुळे, सर्वांना स्वर्ग अगदी दीड बोटावर आल्याचा भास झाला. विकटोरिया राणी म्हणजे जगदंबा पार्वतीचा अवतार. इंग्रेज लोक म्हणजे हिन्दुस्थानाच्या कल्याणासाठी परमेश्वराने मुद्दाम पाठविलेले देवदूत. सीतादेवीच्या वरप्रसादाने शंभर वर्षे हिन्दुस्थानचे राज्य करण्यासाठी जंबुद्वीपातून आलेले रामकालीन् वानरांचे वंशज. असल्या खोडसाळ कल्पनानी मोठमोठे हिन्दी मुत्सद्दी आणि पंडीतहि जेथे पछाडले गेले, तेथे निरक्षर अडाणी बहुजनसमाज राणीच्या तसबिरीपुढे नवस करून नारळ फोडू लागले, तर त्यात चमत्कार तो कसला? राज्यकारभाराचा आणि राजकारणाचा सर्व मक्ता उदारधी इंग्रेज बहादुराना पत्करल्यामुळे, हिन्दी लोकाना काही कामच उरले नाही. राणीच्या राज्याचे गोडवे गावे, पोटापाण्याचा उद्योग निर्वेध करावा, लोकसंख्या वाढवावी आणि आयुर्मर्यादा संपली की एक दिवस राम किंवा रहीम म्हटले कीं इहलोकचे कर्तव्य फिटले. होतो कोण, आहोत कोण आणि होणार कोण, या प्रश्नत्रयीला कोणाच्याच मस्तकात बिऱ्हाड मिळेनासे झाले.

झगडे वीर बागडे पीर बनले

व्हिकटोरिया राणीइतकी लांबलचक आयुष्याची एकहि राणी अथवा राजा खुद्द इंग्लंडच्या गादीवर कधी आढळला नाही. जगाचे राजकारण भावी राज्यक्रांत्यांची अंडी उबवीत स्वस्थ बसले असल्यामुळे, राणीची कारकीर्द पुष्कळ प्रमाणात अतिशय शांतताप्रधान गेली. हिन्दुस्थानावर राष्ट्रदृष्ट्या या शांतीचे फार घातक परिणाम झाले. युद्धांचे आणि चकमकींचे प्रसंग कायमचे मिटल्यामुळे आणि अवघे राष्ट्र 'चूक चाकू सुरी ही मुलांची खेळणी नव्हेत' असल्या नादानपणात रंगण्याइतके शस्त्रसंन्याशी बनल्यामुळें, सारा हिन्दुस्थान भ्याड नामर्दांचा पांजरपोळ बनला.

आम्ही स्वराज्याला नालायक

साऱ्या जगाला धाकात ठेवणारे पूर्वीचे हिन्दी झगडे वीर बाष्कळ बागडे पीर बनले. वीरप्रसू भरतखंड हमालखंड होऊन बसले. हीहि अवस्था पत्करली असती. परंतु इंग्रेजी अमलामुळे, 'आम्ही गचाळ, आम्ही नादान, राज्य इंग्रेजानीच करावे, काय त्यांची शस्त्रास्त्रे, काय लष्करी कदर, काय टापटीप केवढा तार पोष्टाचा बंदोबस्त, आमच्या हातून काय होणार? आम्ही स्वराज्याला नालायक. राज्य इंग्रजानीच करावे. असल्या विचारानी हिन्दी लोकांची मने आरपार सडली. जगातील अत्युत्कृष्ट सर्वस्वाचा गौरीशंकर म्हणजे इंग्रेज. ही भावना इतकी उंच वाढली व खोलवर रुजली की इंग्रजांपुढे सारी दुनिया फिकी पडू लागली. जेवढे म्हणून 'इंग्रेजी' तेवढे श्रेष्ठ (British therefore Best) बाकी सर्व कुचकामी! असल्या विचारांच्या फैलावामुळे व्यक्तिमात्रात आत्मद्रोहाच्या विषाचा विलक्षण प्रादुर्भाव झाला. राष्ट्रातली व्यक्तीन्व्यक्ती आत्मद्रोही बनल्यावर, राष्ट्रद्रोह आणि स्वजनद्रोहाच्या पापाचे मळे पिकविणे त्यांच्या हातचा मळ बनल्यास, आचंब्याला जागाच कोठे उरते? आणि मनोवृत्तीचा अस्सल हिन्दीपणा उखडून टाकून, तिच्यावर आंग्रेजीपणाच्या अभिमानाचे भाडोत्री बाण्डगूळ मनमुराद चढू दिल्यावर, स्वराष्ट्राच्या गतेतिहासात प्रतिबिंब पाहून आपल्या अस्सल अवलादीचे प्रत्यंतर पटवून घेण्याची बुद्धी कशी शिल्लक उरणार?

स्वराज्य माझा जन्म सिद्ध हक्क आहे

करणीचे काळ आपल्या करणीने काळाला चकवून भवितव्यता टाळण्याची कितीहि कसोशी

करीत राहिले तरी मानवी प्रगतीला कान्तीचे धडके अखंड देणाऱ्या काळाच्या करणीचा प्रभाव आता हिन्दुस्थानात हळूहळू पसरू लागला आहे. 'स्वराज्याला आम्ही नालायक, राज्य इंग्रेजानीच करावे.' ही भ्याड गुलामांची भाषा आता माजी पडून, त्या ऐवजी 'हिन्दुस्थानाला स्वराज्य' पाहिजे, क्रिस्ती इंग्रेजांची परकीय सत्ता आम्हाला नको.' असा त्रिभुवननिनादित जोरकस टाहो सर्वत्र ऐकू येत आहे. हा टाहो व्यक्त करण्याच्या भाषा आणि पद्धति प्रसंगानुसार कितीहि निरनिराळ्या रंगाढंगांच्या असल्या, तरी त्यात एकच गोष्ट ठळकपणे दिसून येते कीं हिन्दी मनावरील आंग्रेजी मायेचा मंत्र आता साफ उडाला आहे. दीडशे वर्षांची आंग्रेजी कदरीची पकड अज्जीबात ढिली पडली. या पुढे हिन्दी लोक इंग्रेजी नोकरशाहीच्या क्रिस्ती राज्यसत्तेखाली राहण्यास मुळीच कबूल नाहीत, त्याना स्व-राज्य पाहिजे. पर-राज्य नको. त्याना स्वतंत्र राष्ट्रातली माणुसकी पाहिजे; परसत्तेच्या चापाखालची सरदारकी नको.

आमचे स्वराज्य आम्ही का गमावले?

क्रिस्ती पाश्चात्यांचा हिन्दुस्थानात प्रवेश होण्यापूर्वी या देशात, इंग्रजी सत्तेप्रमाणे एकमुखी एकतंत्री राज्य नसले तरी, देशी राजे बादशहांची अनेक स्वराज्ये होती, उत्तर हिन्दुस्थानात मुसलमानी बादशाही सत्ता आणि रजपुतांचा दरारा अवघ्या जगाला धाकात ठेवीत होता, तर दक्षिणेत मऱ्हाठ्यांचे हिन्दवी स्वराज्य विन्ध्याद्रीच्या पायथ्यापासून तो थेट कन्याकुमारीपर्यंत आपल्या अजिंक्य भाल्याची फेक भिरकावीत होते. म्हणजे कोणत्या का स्वरूपाचे आणि तपशीलाचे असे ना, पण यूरपस्थ क्रिस्ती इग्रेजांचे राज्य फैलावण्यापूर्वी हिन्दुस्थानात देशी लोकांचे स्वराज्य होते. या हिन्दी राज्यसत्ता सुद्धा काही अगदीच लेच्यापेच्या होत्या असे नव्हे. चांगल्या संघटीत आणि जबरदस्त होत्या. तरीहि त्या इंग्रेज बहादुरानी मटकावल्या! आजच्या राजकारणपटु हिन्दी मुत्सद्यांच्या भावी हिन्दवी स्वराज्याच्या घटनेबद्दल काहीहि कल्पना असोत, आणि बहुजन समाजाची त्याविषयी स्वप्ने कशीहि असोत, अवघा हिन्दुस्थान आज जर स्वराज्योन्मुख बनलेला आहे, तर आमचे पूर्वीचे स्वराज्य आम्ही कां गमावले ? या प्रश्नांचा पायाशुद्ध अभ्यास होणे अगत्याचे आहे. आपल्या गुणदोषांची निर्भिड छाननी केल्याशिवाय कोणत्याहि सुधारणेचे पाऊल पुढे पडत नाही; पडणे शक्य नाही. दोषांवर पांघरूण घालण्याइतका आत्मघात दुसरा कशानेहि होत नाही. आमची मोठमोठी जबरदस्त हिन्दी स्वराज्ये जर पटापट क्रिस्ती बनियांच्या तागडीने मटकावली, तर ती आमच्या कोणत्या राष्ट्रीय दुर्गुणांमुळे? याचाच आता विशेष विचार करणे अगत्याचे आहे. माशाने माणिक गिळावे, तद्वत् क्रिस्ती आंग्ल बनियानी उभा हिन्दुस्थान आपल्या पचनी पाडला, तो कोणत्या साधनानी? कसकसल्या युक्त्यानी? कोणकोणत्या धोरणानी? याचा इतिहास तपशीलवार अभ्यासून, त्याचा आचारविचारात चांगला परिपाक उतरल्याखेरीज, आमच्या स्वराज्यसाधनाच्या खटपटी व्यर्थ होत. दुर्गुणांप्रमाणे सद्गुणांचाहि अतिरेक व्यक्तीच्या अथवा राष्ट्राच्या नाशाला कारण होतो. याहि दिशेने हिन्दी लोक स्वराज्यसंरक्षणाच्या कर्तव्यक्षेत्रात कोठे. कधी कसे व कां चुकले, याची पुराव्यानिशी सप्रमाण छाननी करताना, आमची मनोवृत्ति निर्भीड विवेचनाच्या आणि सत्य स्वीकाराच्या क्षेत्रात लवमात्र बाचकता कामा नये.

इतिहास जोपासनेची आमची अनास्था

येथे इतिहासाचा प्रश्न आला आणि हिन्दी लोक तर इतिहास-लेखनाच्या आणि जोपासनेच्या कामी भयंकर अनास्थेखोर! हिन्दुस्थानचा इतिहास मुद्देसूद आणि तपशीलवार लिहिणारा आस्थेवाईक

बखरकार आज पर्यंत कोणी निपजला नाही, सध्या कोठे कोणी दिसत नाही, उद्याचे कोणी काय सांगावे भरतखंड सर्व विद्यांचे माहेरघर म्हणून फार प्राचीन काळापासून त्रिखण्डविश्रुत खरे; परंतु त्याच्या राष्ट्रीय इतिहासाची शास्त्रशुद्ध जोपासना करणारा एकादा गिबन मात्र येथे निर्माण झाला नाही, ही आश्चर्याची गोष्ट आहे. येथे रामायण महाभारत किंवा भागवत यासारखे प्रचण्ड काव्यग्रंथ अनेक निर्माण झाले; पण इतिहास-लेखनाची आस्था येथे बऱ्याच प्रमाणात कमी आढळून येते. यूरपमध्ये इतिहासाला जे राष्ट्रीय महत्व देण्यात येते, त्याची पायाशुद्ध शास्त्रीय धाटणीवर जी जोपासना करण्यात येते, आणि प्रत्येक लहान मोठ्या प्रसंगाची व्यावहारीक उपयुक्ततावादाने छाननी करण्याची जी विवेचन-पद्धति इतिहास-शास्त्रज्ञांकडून पाळण्यात येते, त्यांची भारतीय विद्वानात पूर्वी कधी जाणीवच उत्पन्न झालेली दिसत नाही. ही जाणीव आधुनिक इतिहास-सेवकांत पाश्चात्य-सांसर्गाने थोडथोडी थरारू लागली आहे. मात्र महाभारत रामायण पुढे करून, काव्यद्वारे इतिहास-लेखनाचे श्रेय एकाद्या काल्पनीक व्यासाच्या वल्कलाना बांधून, प्राचीन भारतीयांच्या इतिहास-जोपासनेचे मण्डन करण्याचा प्रयत्न, दुधाची तहान ताकावर भागविण्याइतकाच क्षम्य ठरेल; परंतु तेवढ्याने आमच्या इतिहासविषयक अनास्थेचे खंडन होणे शक्य नाही.

वैयक्तिक प्रयत्नांची निष्फळता

आंग्लपूर्व भारतीय इतिहासाचा प्रश्न सोडला, तरी हिन्दवाई मोगलाई खलास होऊन सर्व हिन्दुस्थानभर लालबुंद आंग्लाईचा अंमल चालू झाल्या दिवसापासूनचा भारतीय इतिहास लिहून काढण्याचे परिश्रम एकाहि हिन्दी पंडिताने केल्याचे ऐकण्यात किंवा पाहाण्यात नाही. इंग्रजानी आपल्या राज्य कारभाराच्या सोयीसाठी पाडलेल्या प्रांतभेदपरत्वे ठिकठिकाणच्या प्रांतीय पंडितानी आपापल्या प्रांताच्या प्राचीन इतिहासाची त्रोटक त्रोटक जोपासना अलीकडे एकनिष्ठेने चालविलेली आहे. हे सर्व प्रयत्न बहुशः वैयक्तिकच असल्यामुळे, 'इतिहासग्रंथात अभिनंदनीय भर' टाकण्यापलीकडे, सर्वसामान्य भारतीय-रचनेच्या कामी त्या त्या चोपड्यांचा फारसा उपयोग होऊ शकत नाही. आंग्रेजी राज्यसत्तेचा भारतीय इतिहास लिहिण्याच्या साहित्य संग्रहाची ठिकठिकाणी पुष्कळच तयारी झालेली असली, तरी हे कार्य एकट्या दुकट्या व्यक्तीचे मात्र खास नव्हे. प. वा. सर डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर सन १८९७ च्या फेब्रुवारीच्या 'टाइम्स' मध्ये या कार्याच्या जबाबदारीविषयी येणेप्रमाणे लिहितात : ''ब्रिटीश सत्तेखालच्या हिन्दी लोकांच्या खऱ्या इतिहासाची अझून जुळवाजुळव व्हावयाची आहे. शेकडो ताकडेतुकडे दूरदूरच्या संग्रहातून आणून एकत्र जुळविले पाहिजेत. हे एकट्या व्यक्तीच्या श्रमाला पेलणारे काम नव्हे; आणि खर्चाचा विचार केला तर साध्यासुध्या माणसाच्या खिशाचा हा मगदूरच नव्हे.''

आमच्या गतेतिहासाच्या अनास्थेच्या पायात अनेक कारणांचे खत पडलेले आहे. इंग्रेजी अंमलामुळे आमच्या प्रवृत्ति विशेष आत्मद्रोही बनल्यामुळे, क्रिस्ती सत्तेखालचा आमचा विशिष्ट प्रान्तीय इतिहाससुद्धा जोपासण्याची आम्हाला पर्वा राहिली नाही. राज्यकारभाराचा आणि राजकारणी उलाढालींचा मक्ताहि जेथे आम्ही आमच्या दयाळू गोऱ्या राजकर्त्यांच्या खान्द्यावर ठेवून दिला, तेथे इतिहासलेखनाची नसती दलामल कोण शहाणा आपल्या डोक्यावर घेणार? माबाप सरकार आहे, त्यांची प्रान्तिक गॅझिटिअरे आहेत, इंग्लंडातले मोठमोठे मुत्सद्दी इकडे प्रवासाला येऊन बारीक सारीक माहिती मिळवीत आहेत, म ोठमोठे 'हिन्दुस्थानचे इतिहास' इंग्रेजी भाषेत लिहून छापताहेत, आम्ही आणि आमची मुलेबाळे त्यांचा

घोक्या मारून पिष्ठा पाडीत आहोत, ठीक आहे. यापेक्षा विशेष आणखी आम्ही ते काय करायचे? या प्रवृत्तिमुळे आमच्या देशाचा इतिहास म्हणजे इंग्रेज ह्मणेल ती पूर्व दिशा, अशा धाटणीवर रंगला गेला असल्यास, त्यात काही नवल नाही.

मऱ्हाठ्यांचा इतिहास म्हणजे विधवेने टाकलेले पोर

मऱ्हाठी भाषेच्या क्षेत्रात तर इतिहासविषयक जागृति अगदी काल परवाची. इंग्रेजी भाषेच्या क्षेत्रात ऐतिहासिक साहित्याचे पीक कितीहि उमाप पिकलले असले, तरी त्याचा मऱ्हाठी जनतेला काहीच उपयोग होऊ शकत नाही. मुंबई पुण्यासारख्या शहरांतून इंग्रेजी यसफ्यसवाल्या शिक्षितांचा भरणा कितीहि चिलट्या चढाईचा दिसला, तरी मुंबई इलाख्यात केवळ साक्षरतेची प्रभात नुकतीच कोठे झुंजुमंजु दिसू लागली आहे. शिक्षितांकडे पहावे तो त्यांच्या विद्यार्जनाचा सारा जोम स्वतःच्या पोटपाण्याच्या वंगणावर रोखलेला. खुद्द मऱ्हाठ्यांच्या इतिहासाच्या जुळवाजुळवीचा आणि जोपासनेचा मामला विधवेने टाकलेल्या पोराच्या दैवाचा; मग अखिल भरतखंडाच्या किंवा क्रिस्ती राजसत्तेच्या कालाच्या इतिहासलेखनाची महाराष्ट्रात कितपत तयारी असेल, याचा विचारच करायला नको. शाळा कॉलेजांतील भारतीय इतिहासाची पुस्तके पाहिली तर ती सारी जेत्यानी जितांसाठी लिहिलेली. सगळे ग्रंथकार इंग्रेज. बरे, काही ग्रंथकार हिन्दी पंडित असले तरी, राजकत्यांच्या राजकारणी धोरणांप्रमाणे, त्यानी ऐतिहासिक प्रसंगांच्या विवेचनाची घडण बनविल्याशिवाय, त्यांच्या ग्रंथाना शाळा कॉलेज प्रवेशाची मान्यतेची सुपारी मिळणेच शक्य नाही. अर्थात् याहि दिशेने ऐतिहासिक सत्यनिरूपणाचा आणि अध्ययनाचा मार्ग बराच घोक्याचा होऊन बसला आहे.

पाषाणहृदयी राजकारण

बऱ्याच इंग्रेज ग्रंथकारानी भारतीय इतिहासाची अनेक मोठमोठे ग्रंथ लिहून सेवा केल्यामुळे, आम्हा ऐदी बावळट हिंदी लोकाना मोठे कौतुक वाटते. काही थोडे अपवाद वगळले, तर बाकीचे सारे इंग्रेज-लिखित भारतीय इतिहासाचे ग्रंथ म्हणजे आंग्रेजी दगलबाजीचे समर्थन करणारे साळसूद सापळेच म्हटले तरी चालतील. इंग्लंड राष्ट्र आणि इंग्रेज प्राणी यांच्या स्वभावधर्माची भोळ्या हिन्दी लोकाना पूर्वी काहीच अटकळ नव्हती; आणि आजहि ती सर्वांना झाली असेल, असे मानण्याइतके धारीष्ट करवत नाही. इंग्रेज लोकांच्या आचारविचारांचा पिंड मुख्यत: राजकारणी परिमाणूंचा असतो. राजकारण (पॉलिटिक्स) हाच त्यांचा देह आणि तोच त्यांचा आत्मा. राजकारण जगातून गेले की इंग्रेजहि आपोआप नष्ट होणार. पॉलिटिक्सला शब्दकोशात दुसरा पर्यायशब्द द्यायचा असेल तरी खुशाल आंग्रेज आदमी हा द्यावा. आंग्रेज म्हणजे पॉलिटिक्स आणि पॉलिटिक्स म्हणजे आंग्रेज. राजकारणाशिवाय आंग्रेज व्यक्तीला अस्तित्वच नाही. 'रॅशनॅलिझम इन यूरप' नामक ग्रंथात प्रो. लेकी म्हणतात :- ''हवे ते करून वेळ मारून नेणे हाच राजकारणी प्राण्यांचा मुख्य उद्देश असतो.....कडकडीत राजकारणी बाणा आणि सत्याविषयी निर्हेतुक प्रेम या दोन गोष्टी एकाठिकाणी नांदणेच कधी शक्य नाही. ज्या राष्ट्रातल्या लोकांचा आचारविचारांचा पिंड मुख्यत्वे राजकारणाने बनलेला असतो, तेथे वाटेल ते करून कार्य साधण्याची प्रवृत्ति म्हणजे सत्याची कसोटी ठरविण्याचा मोह हटकून दृष्टीस पडतो.'' प्रो गोल्डविन् स्मिथ तर याच्याहि पुढे जाऊन म्हणतात कीं '' इतिहास म्हणजे गतकाळचे राजकारण आणि राजकारण म्हणजे चालू इतिहास. म्हणूनच राजकारणी पिंडाचे लोक वारंवार इतिहासाला राजकारणाची भडवेगिरी

करायला लावतात.'' (People reared on politics very often make 'history the prostitute of politics') [Freeman's Methods of Historical study. p. 8.] शिवाय, 'राजकारण पाषाणहृदयी असते' (Politics hath no conscience) हे आंग्रेजी सूत्र नीट छाननी करून पाहिले कीं इंग्रेज इतिहासकारांच्या हातून ऐतिहासिक सत्याची बडदास्त कशी काय राखिली जात असेल, याचा ठाव घ्यायला फारसे डोके खाजविण्याची मुळीच जरूर नाही.

तत्वज्ञानी हिंदुस्थान आणि राजकारणी इंग्लंड

सत्यशोधन- मग ते ऐतिहासिक असो वा कसलेहि असो- तात्विक (फिलॉसफिक) प्रवृत्तीशिवाय साधणे शक्य नाही. तत्त्वज्ञान्याचीं मुख्य धडपड सत्य हुडकुन काढण्यासाठी असते. प्रो. लेकी म्हणतात:- ''तात्विक प्रवृत्तीचा जोर झाला कीं, राजकारणाच्या गळ्याला नख लागलेच म्हणून समजावे.'' तत्त्वज्ञानप्रधान मनोवृत्ति आणि राजकारणी प्रवृत्ति यांचा संबंध विस्तव आणि पाण्यासारखा असतो. पहिली लोण्यासारखी मवाळ असते, तर दुसरी बोलून चालून पाषाणहृदयी. राजकारणी इंग्रजांपुढे एकजात सर्व हिन्दी राजसत्तांनी फटाफट नांग्या टाकल्या, याचे कारण हिन्दी लोकांचा पिण्ड तत्वज्ञानप्रधान आहे. इंग्रजांच्या पाषाणहृदयी राजकारणाने हिन्दी लोकांच्या नवनीत्या तात्विक प्रवृत्तीला तेव्हाच चेचून ठेचून गिळून फस्त केली. ज्या दिवशी इंग्लंड राष्ट्र राजकारण सोडून तत्वज्ञानाच्या भक्तीला लागेल, त्या दिवशी त्यांच्या राष्ट्रीय अधःपाताची सुरुवात होईल. परंतु असे जोपर्यंत झाले नाही किंवा होणार नाही तोपर्यंत त्यांच्या राजकारणी दगलबाजीपुढे तत्वज्ञानी जगाने सदैव लेंड्याच गाळणे प्राप्त आहे.

मदर इंडियाचा नंगा नाच

राजकारणी पिण्डाचा इंग्रज कोठेहि जावो, काहीहि व्यवसाय करो आणि कसलीहि भूमिका घेवो, तो आपल्या जन्मभूमीशी राजकारणी बेइमानी चुकून सुद्धा करणार नाहीं. इंग्रेज लेखकानी भारतीय इतिहास लिहिले तरी त्यातसुद्धा 'इंग्लंडच्या राजकारणी दगलबाजीचे समर्थन' हे मुख्य सूत्र ते केव्हाहि विसरले नाहीत. त्यांचे 'भारतीत इतिहास' भारतीयांकरिता मुळी लिहिलेच नाहीत. आपल्या इंग्लंड देशातल्या रहिवाश्यांच्या राजकारणी रुचीला पचेल अशा धोरणानेच भारतीय इतिहासातील नानाविध प्रसंगांची छाननी करण्याची त्यांची जन्मसिद्ध पिण्डप्रकृति असल्यामुळें, हिन्दुस्थानाविषयी शेकडो खोडसाळ कल्पना त्यांच्या ग्रंथांनी तिकडे फैलावण्याची कामगिरी मात्र चोख बजावली आहे. अंतःकरणात तात्विक ओलाव्याचा पिण्डसिद्ध खडखडाट असल्यामुळें, ऐतिहासिक सत्याची मान हवी तशी मुरगाळणे. त्यांच्या कलमाची सहज-लीला ! याचा मासलाच पाह इच्छिणारानी नुकतेच साऱ्या जगभर ठणाणलेल्या मिस मेयोकृत मदर इंडिया चोपड्याचा नंगा नाच विचारात घ्यावा म्हणजे झाले.

सत्यप्रिय इंग्रेजांची उणीव नाही

इंग्लंड राष्ट्र पिण्डाने जरी पाषाणहृदयी राजकारणी असले तरी तेथेहि सत्यप्रिय व तत्वप्रिय इंग्रेज स्त्रीपुरुषाचा भरणा काही कमी नाही. निर्भेळ सत्याच्या समर्थनासाठी आपल्या इंग्लंड राष्ट्राच्या राजकारणी दगलबाजांचा लेखन भाषणद्वारा कडकडीत निषेध करणाऱ्या अनेक इंग्रेज महात्म्यांच्या प्रिय इंग्रेजांची चरित्रानीहि इंग्लंडचा भूत आणि वर्तमान इतिहास पुष्कळ वेळा सालंकृत झालेला आहे. हिन्दुस्थानच्या

क्रिस्ती राज्यकारभारातल्या अनेक राजकारणी दगलबाज्या चव्हाट्यावर आणून फोडण्याचे कार्य करणारे अनेक इंग्रेज लेखक व मुत्सद्दी आजहि हिन्दी लोकांच्या कृतज्ञतेच्या देवघरात आदरपूर्वक पूजले जात आहेत. असल्या सत्यप्रिय इंग्रजानी क्रिस्ती सत्तेचा भारतीय इतिहास निर्भिडपणे लिहिण्याचेहि काही प्रयत्न केले; परंतु त्याबद्दल त्याना आपल्या राजकारणी जातभाईकडून कडकडीत प्रायश्चित्तांचा ताप भोगावा लागल्याचीहि उदाहरणे पुष्कळ आहेत. राजकारणी आंग्रेजी पिण्डाला नागव्या सत्याचा स्पर्श क्षणभरहि परवडायचा नाही !

उंटावरचे शहाणे आणि सत्यनिरूपणाचे बहाणे

इंग्लंडच्या थंड हवेत बसून हिदुस्थानच्या क्रिस्ती राज्यकारभाराची दलामल करणाऱ्या आणि इंग्रेजी राजकारणाचे समर्थन करण्यासाठीच भारतीय इतिहास लेखनाचा उपव्द्याप करणाऱ्या उंटावरच्या शहाण्यांपेक्षा क्रिस्ती हिंदुस्थान सरकारच्या दिवाणी आणि लष्करी नोकरीत असणाऱ्या गोऱ्या सिविल किंवा मिलिटरी इंग्रेजाना भारतीय क्रिस्ती सत्तेचा इतिहास विशेष सत्यतेने लिहिण्याची सोय आणि अधिकार निःसंशय असतो. कारण, भारतीय राज्यकारभाराची सगळी अंतर्बाह्य हस्तिदंती त्यांच्याच हातून खेळविली जात असल्यामुळे, खऱ्या खोट्याचा बिनचुक अंदाज त्यानाच मुद्देसूद असायचा. परंतु, केवळ सत्य प्रियतेच्या नादी लागून ऐतिहासिक सत्यकथनाचा प्रयत्न करणाऱ्या इंग्रेजी नोकरांची इंग्लंडच्या राजकारणाने वेळोवेळी केलेली थोबाडफोडी सर्वश्रुत असल्यामुळे, या फंदात फारसे कोणी पडण्याचे धैर्यच करीत नाहींत. या डोळे असून पहावयाचे नाही, कान असून ऐकायचे नाही, तोंड असून बोलायचे नाही आणि लेखणी असून लिहायचे नाही, हाच भारतीय क्रिस्ती राज्यकारभाराचा दण्डक काळ्या गोऱ्या नोकराच्या शपथविधीत असल्यामुळे, ऐतिहासिक सत्यकथनाच्या चावऱ्या कुत्र्याच्या गळ्याला कोण सुखासुखी मिठ्या मारणार? आपण बरे, आपली नोकरी बरी!

सत्यवक्त्या इंग्रेजांची मुस्कटदाबी

अशाहि परिस्थितीत, केवळ सत्य जगाच्या निदर्शनास आणण्याच्या उदात्त हेतूने, ईस्ट इंडिया कंपनीच्या काही गोऱ्या नोकरानी विशेष भारतीय प्रसंगांचे इतिहास निर्भीडपणे लिहून हिन्दुस्थानाची चिरस्मरणीय कामगिरी बजावलेली आहे. कॅपटन कनिंगहॅम याने पंजाबातील शास्त्र सत्तेचा नाश या नावाचा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. यात त्याने पुराव्यांसह सत्याची छाननी इतक्या स्पष्ट रीतीने केली कीं ग्रंथ प्रसिद्ध होताच ईस्ट इंडिया कंपनीने ताबडतोब या कॅपटन नोकराची खरमरीत खरडपट्टी काढून त्याला नोकरीवरून बडतर्फ केले. अर्थात या निस्पृह स्पष्टवक्त्या इंग्रेज गृहस्थाचे पुढचे आयुष्य किती हाल आपेष्टात गेले असेल, याची कल्पना करावी. या ग्रंथाची (हिस्टरी ऑफ धी शिख्स) दुसरी आवृत्ति मि. पीटर कॅनिंगहॅम् (ग्रंथकाराचा भाऊ याने प्रसिद्ध केली. तिच्या प्रस्तावनेत तो लिहितो:- ''या ग्रंथात कथन केलेल्या सत्याला ग्रंथकार बळी पडला. प्रस्तुत ग्रंथाचे महत्व कळण्यापुरती अक्कल जगाला येण्याच्या काळापूर्वीच लेखकाने तो लिहून काढण्याचे धारीष्ट केले आणि त्यासाठी दुःख भोगले. तथापि भावी पिढ्या त्याच्या स्मृतीचा सन्मान राखतील, अशी मला फार उमेद आहे..... ज्याला गिबन सत्य, नागवे सत्य, कधीच न बाचकणारे सत्य म्हणतो, तेच गंभीर इतिहासाचे मुख्य तत्व होय आणि जातिवंत बखरकाराची लेखणी त्याच तत्वाप्रमाणे हालली चालली पाहिजे. प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाचे मन आणि कलम या एकाच सत्य तत्वाने भारले गेले होते.'' दुसरा निस्पृह इंग्रज म्हणजे मेजर इवान्स

बेल. याने ईस्ट इंडिया कंपनीच्या हिन्दी राज्यकारभारातली सारी खेकटी छातिठोक चव्हाट्यावर आणून फोडल्यामुळे, त्यालाहि कॅपटन कनिंगहॅम्प्रमाणे शिक्षा भोगावी लागली. महाराष्ट्राला सुपरिचित अशा ग्रॅन्ट डफ् साहेबाची स्थिति जवळजवळ अशीच. सातारचा रेसिडंट असताना डफ साहेबाला मऱ्हाठशाहीचे महत्व निकट सान्निध्यामुळे विशेष पटले आणि त्याने ताबडतोब या महापराक्रमी रियासतीचा इतिहास लिहून काढण्याचा संकल्प केला. साहित्य व माहिती मिळविण्यासाठी त्याने आपल्या पगारावर तुळशीपत्र ठेवले. खेड्यापाड्यांतून पायी प्रवास केले. कागदपत्रांच्या भाषांतरासाठी ब्राम्हण पंडीत पगार देऊन ठेवले. टीचभर माहितीसाठी डफ वाटेल त्या लुच्चाला सुद्धा भोळसरपणे वाटेल तो पैसा देत असे. या बखरीच्या सबबीखाली घाटावरच्या अनेक लबाडानी डफला पैशाच्या बाबतीत हवा तसा नागवला. शेवटी अनेक वर्षे, दिवसा सरकारी नोकरी आणि रात्री जाग्रणे करून, ग्रॅण्ट डफने आपला सुप्रसिद्ध ''मऱ्हाठ्यांचा इतिहास'' लिहून पुरा केला व तो विलायतेस गेला. त्याला आशा होती की ज्या मऱ्हाठ्यांचे अवाढव्य राज्य केवळ कागदांच्या उलथापालथीवर गिळून बसले, ते ईस्ट इंडिया कंपनीचे डायरेक्टर्स हा इतिहास छापून काढण्याइतके तरी मनाचे उदार आणि रसिक असतील! डायरेक्टर बोर्डाने डफला स्पष्ट जबाब दिला की या ग्रंथाचे नाव बदला. मऱ्हाठ्यांचे आता काय उरले आहे? आणि त्यांचा कसला आला आहे इतिहास. 'हिदुस्थानातल्या इंग्रेजी अंमलाच्या सुरवातीचा इतिहास' अशा अर्थाचे नाव द्याल तर छपाईच्या खर्चाची सोय पाहू. नाहीतर ठेवा तुमचे पातडे तुमच्याजवळ. ग्रॅण्ट डफ काही वर्षे स्वस्थ बसला आणि थोडे पैसे जमवून त्याने तो महत्वाचा ग्रंथ स्वतःच छापून प्रसिद्ध केला.

क्रिस्ती मिशनऱ्यांचा धंदा

हिन्दुस्थानच्या इतिहासाशी चक्षुर्वैसत्यं इतका परिचित असणारा गोऱ्या लोकांचा दुसरा वर्ग म्हणजे क्रिस्ती मिशनऱ्यांचा. हेहि हिदुस्थानाबद्दल शेकडो ग्रंथ लिहून प्रसार करतात. पण त्यात त्यांचा मुख्य हेतू ऐतिहासिक सत्यनिरूपणाचा नसून, येनकेन प्रकारेण हिन्दी लोकांना बाटवून क्रिस्ती कळप फुगवायचा, राज्यकर्त्या इंग्रेजांच्या हरएक भल्याबुऱ्या कृत्यांचे समर्थन करावयाचे, इंग्रेज लोक आणि इंग्रेजी सुधारणा यांची अखंड टिमकी पिटायची, यापेक्षा अधिक काही त्याना धंदा नाही. क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, डलहौसीसारख्या कुप्रसिद्ध नाठाळांच्या दुष्कृत्यांवर सफेदा चढविण्याचे आणि प्रत्येक क्रिस्ती मुत्सद्यांच्या कृतीचे समर्थन करण्याचे काम मात्र मोठमोठ्या वजनदार गोऱ्या मिशनऱ्यांनी पुष्कळच केलेले आहे. हिन्दी लोकाबद्दल या येशू भक्ताना प्रेमाचा आणि आदराचा कळवळा कोठवर आहे, याचा अंदाज अझून शंकास्पदच आहे, तथापि आपल्य जातभाईच्या तागडीचे तलवारीत पर्यवसान करण्याच्या कामी या क्रिस्ती धर्ममार्तडाची मिशनरी चळवळ प्रारंभापासून पुष्कळच झटलेली आहे, याबद्दलचे दाखले यथावकाश योग्य ठिकाणी वाचकांच्या नजरेला पडतील.

सोयीस्कर सत्याची बेगडी मखलाशी

आंग्रेजी भारतीय राजसत्तेच्या उत्पत्तीचा इतिहास ताळेबंद उमजल्याशिवाय तिच्या वर्तमान स्थितीचा अंदाज समजणे कठीण जाईल. या इतिहासाच्या सत्यशोधनाच्या मार्गात अनेक अडचणी आहेत, धोकेहि आहेत. इंग्रेज चाणक्यानी लिहिलेल्या भारतीय इतिहासावर विश्वास ठेवण्यापूर्वी दहाच्या ऐवजी शंभर अंक मोजण्याचा प्रसंग. मऱ्हाठयांचे किंवा मोगलांचे सैन्य ४० हजार आणि त्याचा धुव्वा इंग्रजांचे

४०० शिपाई ४ तासात उडवितात! असल्या आंग्रेजी सत्यावर विश्वास ठेवायला आज मूर्खसुद्धा तयार नाहीत, तर चाणाक्षांची गोष्ट कशाला? इतिहास ग्रंथांची गोष्ट सोडून दिली आणि ई. इं. कंपनीच्या जुन्या रिकार्डाकडे मोर्चा वळविला, तरी तेथे सुद्धा आंग्रेजी राजकारणाने निर्भेळ सत्याऐवजी 'सोईस्कर सत्या'ची बेगडी मखलाशी मुबलक साठवून ठेवलेली. 'गिबनच्या तोडीचा इतिहासकार' म्हणून मेकॉले साहेबाने ज्या जेम्स मिलची (सुप्रसिद्ध जॉन स्टुअर्ट मिलचे वडील) हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया नामक ग्रंथलेखनाबद्दल मुक्त कंठाने स्तुति केली आहे, त्याने ''ईस्ट इंडिया कंपनीचे डायरेक्टर लोक आपल्याला प्रतिकूळ असणारे माहिती पुरावे दडपून नष्ट करण्याच्या कामात नेहमीच फार कुशलतेने वागत असत,'' असा स्पष्ट शेरा आपल्या ग्रंथात मारून ठेविला आहे. पीटर कनिंगहॅमने सुद्धा 'शिखांचा इतिहासा'च्या प्रस्तावनेत (२ री आवृत्ति-सन १८५३) स्पष्ट उद्धार काढले आहेत :- ''हिन्दुस्थानच्या अर्वाचीन इतिहासाचे (इंग्लंडचे) छापील साहित्य इतिहासकाराने भरंसा ठेवण्याच्या लायकीचे नाही. पार्लमेण्टाच्या दोनहि सभागृहानी (हौस ऑफ लॉर्डस आणि हौस ऑफ कॉमन्स) जनतेपुढे ठेवलेले कागदपत्र सुद्धा तितक्याच किंमतीचे. राजकारणी झगड्याबद्दल लोकमताला तात्पुरते चकवून वेळ मारून नेण्यासाठी कित्येक कागदात खोडाखोड बदलाबदल केलेली असे; तर लोकांची मने निष्कारण दुखविली जातील अशा फोलकट सबबीवर कित्येक मजकुरांचा (गळेदाब) संक्षेप करण्यात येत असे.''

पश्चात्तापच नाही तर प्रायश्चित्त कोठले?

बनिया कंपनीच्या 'सरकारी' रिकार्डाच्या महिम्याची-अशी वासलात लागल्यावर कंपनीच्या नोकरांचा खासगी पत्रव्यवहार किंवा रोजनिशा यांचा विचार शिल्लक उरतो. तेथेसुद्धा निराशेशिवाय विशेष काही हाताला लागत नाही. राजकारणी पिंडाचा इंग्रेज खासगी पत्रव्यवहारात किंवा रोजनिशीमध्ये आपल्या भारतीय उचापतींची कबुली अगर नुसता संदर्भ दाखवील, हे शक्यच नाही. केलेल्या सत्कर्माबद्दल उद्गार न काढला तरी दुष्कर्माबद्दल खासगी रोजनिशीत पश्चात्ताप किंवा खेद व्यक्त करणारे तत्वप्रिय लोक आढळतात. परंतु ही वृत्ति आंग्रेजी पिण्डाला पारखी आहे. पापाचा उच्चार करून पश्चात्तापाचे प्रायश्चित्त घेण्याची इंग्रजांच्या प्रोटेस्टंट क्रिस्ती धर्मात मुळी रुढीच नाही. ती रोमन कॅथलिक धर्मात मात्र आहे. म्हणूनच रोमन कॅथलिक असलेल्या स्पानियर्ड क्रिस्त्यानी अमेरिकेत मेक्सिको आणि पेरू सारखे देश पादाक्रांत केल्याचा इतिहास सत्याच्या निर्भेळ साहित्याने वॉशिंगटन एर्विंग आणि प्रेस्कॉट सारख्या बखरकाराना चुटकीसरसा सहज लिहिता आला. परंतु प्रोटेस्टंट इंग्रजानी हिन्दुस्थानचे सार्वभौमत्व कसकसल्या उचापतीनी गिळविले, याचा निर्भेळ सत्याचा इतिहास लिहिण्याचे काम मोठ्या मुष्किलीचे आहे. रोमन कॅथलिक धर्मात कन्फेशन (पातकोच्चार) नावाचा एक धर्मविधी आहे. या कनफेशनच्या दिवशी प्रत्येकजण आपापल्या पॅरीश (मोहल्या)च्या पाद्र्यापुढे गत सालात आपल्या हातून घडलेली पातके दुष्कृत्ये किंवा गुन्हे यांचा मोकळ्या मनाने पाढा वाचतो. अशा रीतीने पश्चात्ताप व्यक्त केल्यामुळे ती व्यक्ति त्या पातकाच्या पुनरावृत्तीच्या फंदात न पडता आत्मसुधारणेच्या मार्गाला लागते. पश्चात्ताप व्यक्त करणारी मंडळी बिलंद पातकी असत नाहीत, आणि सद्वसद्विवेक बुद्धीच्या बाबतीत त्यांना पाषाणहृदयीहि म्हणता येणार नाही, म्हणूनच मेक्सिको पेरू वगैरे अमेरिकन देश जिंकणाऱ्या स्पानिश जेत्यानी बऱ्यावाईट कृत्यांचे पुरावे जपून ठेवण्यात मुळीच कांकू केले नाही. मेक्सिको आणि पेरू देश जिंकण्याच्या कामी आपण काय काय दुष्कर्मे अथवा बदकर्मे केली त्यांची पश्चात्तापी कबुली पुष्कळ

स्पानियर्ड लोकानी वृद्धपणी आणि मृत्युशय्येवर असताना पाद्रीजवळ दिली. त्यामुळे मेक्सिको पेरु वगैरे देशांचा इतिहास लिहिण्याचे बखरकारांचे काम फार सरळ आणि सहज झाले. पण प्रोटेस्टंट इंग्रजांच्या धर्मात कनफेशनची संस्थाच नसल्यामुळे त्यांच्या वैयाक्तक किंवा राष्ट्रीय पापाचे माप आकाशातला बाप खाली उतरला तरी त्याला करता येणार नाही. मग बिचाऱ्या सत्यशोधक मानवी इतिहासकाराची गोष्ट कशाला? क्लैव आणि वॉरन हेस्टिंग्ज सारख्या महात्म्यांनी आपल्या बदकर्मांची नोंद थोडीच कोठे करून ठेविली आहे ! एवढ्या साठीच सुप्रसिद्ध आंग्ल स्पष्टवक्ता एडमण्ड बर्क याने सर्व सत्यशोधकाना इषारा देऊन ठवला आहे की 'There is always sacred veil to ce drawn over the beginings of all governments" (सर्व राजसत्तांच्या उगमांवर एक सोवळेपणाचा पडदाच सोडणे श्रेयस्कर आहे.) तत्वज्ञानी हिन्दी लोक ऋषीचे कूळ आणि नदीचे मूळ शोधू नये म्हणतात, तर राजकारणी इंग्रेज कोणत्याही राजसत्तेच्या मुळाला हात घालू नका म्हणतात.

सत्यशोधन म्हणजे राजद्रोही गुन्हा अं?

उपयुक्ततावादाच्या दृष्टीने हे 'नका' कितीहि योग्य असले, तरी, हिन्दुस्थानातल्या काय किंवा युरपातल्या काय, सत्यशोधकानी ऋषींचेही कूळ शोधले, नद्यांचे मूळ हुडकिले आणि राज्यसत्तांच्याही उत्पत्तीच्या नाभिकमळाचे देठ उखडले. असे त्यानी केले नसते तर चालु जगाचा जमाना म्हणजे आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ होऊन बसला असता. भारतीय क्रिस्ती राज्यसत्तेचा उगम शोधण्याचे काम नाईल नदीचा उगम शोधण्याइतके जरी कठीण असले तरी ते कधी ना कधी, कोणी ना कोणी केलेच पाहिजे. हिन्दुस्थानचे राज्य इंग्लंडच्या पचनी कसे पडले, याची चौकशी इंग्रजाना आता नको असली, तरी या इतिहासाची हिन्दी लोकानाच फार आवश्यकता आहे. सत्यशोधनाच्या दिशा बहुरंगी धुक्यानी कोंदाटल्या असल्या, तरी हिन्दी संशोधकानी बाचकता कामा नये. क्रिस्ती राजसत्तेच्या उत्पत्तीच्या मुळाशी अधिकाराने हात घालू शकणाऱ्या हिन्दी पंडितांची स्थिति फार धोक्याची होऊन बसलेली आहे. या इतिहासाच्या जाळ्याची गुंतागुंत सोडविण्याचा त्यांचा प्रत्येक प्रयत्न इंग्रेजी नोकरशाहीला राजद्रोही वाटतो. आचार विचार स्वातंत्र्याचे प्रणेते, आणि पुरस्कर्ते म्हणून आत्मस्तोमाचा चौघडा जगभर बडविणारे इंग्रेज लोक, ऐतिहासिक सिद्ध सत्याचा कडू काढा घेताना, कायदेबाजीचा थैमान किती बेफाम घालतात याचा इतिहास १८९७ सालापासून सर्व हिन्दी जनतेला चांगलाच परिचित आहे. या साली कै. बाळ गंगाधर टिळक 'केसरी'चे संपादक यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला. त्यात इंग्रेजी राजसत्तेला कडु लागणाऱ्या ऐतिहासिक सत्यांचा मुद्दाच आरोपात विशेष गृहित धरण्यांत आलेला होता. या खटल्यापासून राजद्रोहाच्या कलमाची व्याप्ती दिवसेंदिवस एवढी फुगत गेलेली आहे कीं हिन्दी मनुष्याने खरे बोलणे लिहिणे हा मोठा गुन्हा समजण्यांत येतो. अशा बिकट परिस्थितीत ब्रिटीश रियासतीचा इतिहास लिहिण्याच्या नसत्या फंदात सहसा कोणी पडला नाही तर त्यात आश्चर्य नाही. तथापि, अडचणी पेच घोके आणि संकटे यानी हा मार्ग फुलून निघालेला असला, तरी त्या दिशेने प्रयत्न न करणे, हा शुद्ध भ्याडपणा होय. सत्यशोधनाचा मार्ग असाच काटेरी असतो.

नादान सिद्धांतांची उत्पत्ति

अमूक सालात अमूक गोष्ट अशी घडली, इतके सांगून इतिहास पुरा होत नाही. घडलेल्या प्रत्येक

हकीकतीच्या उत्पत्ती स्थिति लयाची कारणमिमांसा करून, वर्तमान आणि भावी काळी तिचे कायकाय परिणाम कोठवर जातील, याचे मुद्देसूद बिनचुक निदान ठरविणे, हेच इतिहासकाराचे मुख्य कर्तव्य आहे. हे निदान ठरविण्याचे काम जे ते लोक जेव्हा हातात घेतात, तेव्हा जित राष्ट्राबद्दल हवे ते नादान सिद्धांत ठोकण्याचा मोह त्याना आवरत नाही. भारतीय इतिहासाबद्दल इंग्रेजी इतिहासकारांनी आणि मुत्सद्यानी, आपल्या राजकारणी दगलबाजीचे सर्वथैव मंडण करण्याच्या भरात असेच अनेक नादानपणाचे सिद्धांत सर्वत्र फैलावले आहेत. इतकेच नव्हे तर या नादान सिद्धांतांचे ग्रंथ हिन्दी लोकांकडून पाठशाळात घट्ट घोकून घेऊन, त्यांचा हासाभ्यासाची कसोटी ठरविण्याचा उपक्रम गेली शंभरावर वर्षे या देशात बिनतक्रार चालू राहिलेला शिवाजी सोळा वर्षांचा झाला नाही तोंच त्याने आडदांड लोकांची संगत धरून देशात पुंडाई आरंभिली. हा सिद्धांत याच खाणीतून पैदा झालेला आहे, आणि तो जातिवंत मऱ्हाठ्यांची पोरे गेली शंभर वर्षे शाळेत गुपचूप घोकीत आहेत. परंतु नुसती गावगुंडगिरी करून मऱ्हाठी स्वराज्यासारखे जबरदस्त साम्राज्य स्थापन होणे कधी तरी शक्य असेल काय? असला साधा प्रश्नसुद्धा कोणाच्या मेंदूला कधी शिवला नाही! तात्पर्य, अनेक खोडसाळ सिद्धांतांची निर्भीड छाननी करून सत्यप्रतिपादनाचे बिकट काम हिन्दी इतिहासकारानी बजावणे आता कर्मप्राप्तच आहे.

बेबंद नगरी आणि झोटींग पाच्छाई

हिन्दुस्थानाविषयी सामान्यत्वे क्रिस्ती लोकानी जे अनेक नादान सिद्धांत प्रचलित केलेले आहेत त्यापैकी पहिला म्हणजे 'इंग्रेजानी हिन्दुस्थानाची राज्यसूत्रे आपल्या हातात घेण्यापूर्वी अवघा हिन्दुस्थान बेबंद बंडाळीचा केवळ उकीरडा बनलेला होता.' हा ब्रिटीश आईल्सचे माजी कमाण्डर -इन-चीफ लॉर्ड वोल्सले यानी या हिंदी बेबंदशाहीचे चित्र याप्रमाणे रंगविले आहे:- My views are that India never existed as India at all until we went there. It was a conglo meration of fighting States, where Mahomedens were cutting the throats of Hindus; and everything that is worth having in India has ceen derived from English rule ..... All the happiness and greatness of India depends upon England, India would nerer have existed but for England. India was never a united country until she came under our rule. If left to herself, India would degenerate into a bear garden." (भावार्थ :- माझे असे मत आहे कीं आम्ही तेथे जाण्यापूर्वी हिन्दुस्थानाला (देश किंवा राष्ट्र म्हणून) काही अस्तित्वच नव्हते. नित्य एकमेकांशी लढणाऱ्या भांडकुदळ संस्थानांचा तो एक पांजरापोळ होता. मुसलमान हिंदूच्या माना कापीत होते आणि हिंदु मुसलमानांच्या उरावर बसत होते. हिंदुस्थानात उपभोग्य गोष्टींचा जो सुकाळ झालेला आहे, त्याची पुण्याई इंग्रेजी राज्यसत्तेची आहे. ....हिन्दुस्थानच्या सौख्यसर्वस्वाचे आणि श्रेष्ठपणाचे श्रेय इंग्लंडमुळेच त्यास लाभले आहे..... इंग्लंडने हात घातला नसता तर हिन्दुस्थान देशाचे कधीच तीनतेरा वाजले असते. आमच्या राज्यदण्डाखाली येण्यापूर्वी हिन्दुस्थानात 'एकी' ही चीजच कोणाला माहीत नव्हती. 'तुमचे नशीब तुमच्या बरोबर' असे ठरवून, हिदुस्थानातून आम्ही पाऊल काढले तर, उभा हिन्दुस्थान पिसाळलेल्या लांडग्यांचा सैतानखाना बनल्याशिवाय खास रहाणार नाही.) इत्यादि इत्यादि आणि वगैरे वगैरे ! इंग्लंडने जिंकून परतंत्र केलेल्या आयर्लण्डचे हे बडे लाटसाहेब रहिवाशी होते, हे लक्ष्यात ठेवण्यासारखे आहे. इंग्रेजी राज्य होण्यापूर्वी हिन्दुस्थानात बेबंद नगरी आणि झोटींग पाच्छाई

होती, असे विधान गाळीव मूर्खपणाचे आहे. वास्तवीक शिस्तवार सत्तेच्या संघटनाचे प्रयत्न चालले असतानाच, मोगल बादशाहीच्या पडत्या काळात, युरपातल्या निरनिराळ्या राष्ट्रातल्या क्रिस्ती बनियांची या देशात लडथड सुरू झाली; आणि जर कोठे काही बेबंदशाही दिसतच असेल, तर ती या युरपियन क्रिस्ती बनियांच्या लावालावीचा परिणाम होय, असे इतिहासाच्या पुराव्याने स्पष्ट सिद्ध होण्यासारखे आहे. हिन्दुस्थानातील विविध राज्यसत्तांमध्ये काही दोष नव्हते, असे कोणीच म्हणणार नाही. पण या युरपियन क्रिस्ती बनियांचा लांडा कारभार जर ठिकठिकाणी उसळला नसता, तर हिन्दुस्थानाने जगातल्या योग्य अशा आधिभौतिक सुधारणांचा पुरस्कार करून, राज्यव्यवस्थेच्या यंत्रांचीहि एकादी विशेष घटना खात्रीने परिणत करून दाखविली असती.

तलवारीची होती भाषा, तर गुंडाळता सगळा गाशा

हिन्दुस्थानाविषयी फैलावलेली दुसरी नादान कल्पना म्हणजे इंग्रेज लोकानी हिन्दुस्थानचे राज्य तलवारीच्या जोरावर कमाविले ही होय. ज्या रीतीने नॉर्मन्स लोकानी इंग्लंड जिंकले, इंग्लिशानी स्कॉटलंडच्या रहिवाश्याना इंग्लंडांकित केले, किंवा आयर्लण्डच्या पायात दास्यश्रृंखला ठोकल्या, त्याच रीतीने हिन्दुस्थान जिंकला गेला, अशी ही सिद्धान्त-सरणी आहे. ही किती खोटी आणि खोडसाळ आहे, हे प्रत्येक हिन्दी मनुष्याला पूर्ण माहीत आहे. हिन्दुस्थानची राज्यव्यवस्था कितीहि बेबंदशाहीची गृहीत धरली, तरी तलवारीच्या दिमाखावर दिल्लीसाठी लाळ घोटीत आलेल्या अनेक नादीरशहा आणि अबदालीना तिने आकंठ पाणी पाजून अटकेपार ससेहोलपटीचे प्रायश्चित्त द्यायला केव्हाहि कमी केलेले नाही. उत्तरेची मोगल बादशाही आणि दक्षिणेची हिन्दुपदपातशाही यांच्याशी इंग्रेज बनियानी तलवारीच्या भाषेतच जर व्यवहार बोलण्याचा कवी ब्र काढला असता, तर निभिषार्धात त्यांच्या वखारींसह त्याना आरबी समुद्राचा तळ पाहण्याची पर्वणी साधावी लागती. ज्याच्या हाती शिकार तो पारधी या न्यायाने जित राष्ट्राबद्दल जेत्या लोकानी हवे ते सिद्धांत ठोकले, तरी त्याना सगळे खून माफ असतात ! जबरदस्ताचे तोंड म्हणजे खंडाळ्याचा बोगदा ! हवी ती गाडी येवो, लाईन क्लियर! पण इतिहासकाराला सत्याशिवाय कोणाची पर्वा राखून भागत नाही. त्याने निस्पृह न्यायाधीशाप्रमाणे खऱ्या खोट्याचा न्याय समतोल विवेकाने दिला पाहिजे.

राज्यापहार नीतीने घडत नसतात

जगातील धर्मानी मान्य केलेल्या नीतींच्या कडक नियमांनुसार राज्यक्रान्त्या आणि राज्यापहार कधीच होत नसतात. मग ते राज्याप्रहार शस्त्रास्त्रांच्या शक्तीने केलेले असोत, नाहीतर फितवेगिरीच्या युक्तीने केलेले असोत. स्कॉटलंड आणि आयर्लण्ड गिळून, इंग्लंडने जे एक संयुक्त युनियन राष्ट्र बनविले आहे, त्या दोन देशांचा राज्यापहार इंग्लंडने काय बायबलाची पारायणे करून केला? १८व्या शतकाचा इंग्लंडचा इतिहास नामक ग्रंथात मि. लेकी स्कॉटलण्ड केवळ फितवेगिरीने इंग्लंडने गिळल्याचे सांगतात; * आणि प. वा. विल्यम टी. स्टेड आपल्या रिव्यू ऑफ रिव्यूज (सपटंबर १८९८) मध्ये आयर्लण्डच्या इंग्लंडशी झालेल्या एकीला-युनियनला-बेदरकार जबरी संभोगाची (फ्री रेप)उपमा देतात. रंगाधर्माने एक असलेल्या निकटच्या शेजारी राष्ट्राना गिळंकृत करण्याचे इंग्लंडचे मार्ग जर इतके कुप्रसिद्ध, तर सर्व

* मॉडर्न रिव्यू, कलकत्ता, मे १९०७, पृ. ४७० पहा.

दृष्टीनी विसंगत आणि विसदृश असणाऱ्या हिन्दुस्थानाला इंग्लंडने भर्तृहरीच्या नीतिशतकाच्या गायनाने प्रसन्न करून अंकित बनविले, असे विश्वासपूर्वक मानणाऱ्या मनुष्याच्या मस्तकात मेंदूच नसावा.

झाले माका ते केले तुका

जिंकलेल्या देशाना वागविण्याची इंग्लंडची हातोटी सुद्धा फार प्राचीन असून, ती त्याच्या पिण्डप्रधान राजकारणात अगदी एकजीव झालेली आहे. नॉर्मण्डीच्या विल्यम धी कॉंकररने इंग्लण्ड जिंकल्यावर इंग्रजाना जी वागणूक दिली, तिचाच कित्ता इंग्रेज लोक आपल्या जित राष्ट्रांच्या बाबतीत तंतोतंत गिरवीत आलेले आहेत. नॉर्मण्डीच्या विजयाचे प्रतोदप्रहार प्रत्येक जातिवंत इंग्रेजाच्या काला अझूनहि संतापाचे कढ कढवीत आहेत. थॉमस पेन आपल्या राईट्स ऑफ मॅन (मानवी हक्क) नामक ग्रंथात विल्यम धी कॉंकररला "the son of prostitute and the plunderer of the English nation" (छिनाल रांडेची अवलाद आणि इंग्लण्ड राष्ट्राचा लुटारू) अशी कचकचीत शिवी हासडतात. तत्वज्ञानी हिन्दुस्थानाने राजकारणी इंग्लंडच्या एकाहि क्लैवची, वॉरन हेस्टिंग्जची अथवा डलहौसीची अशा भाषेत चुकून सुद्धा कधी संभावना केलेली नाही, हे लक्ष्यात ठेवण्यासारखे आहे.

नाम इंग्लण्डका, काम स्कॉच आयरीशका

'परस्पर पावणे तेरा' ही राजकारणातली एक मुख्य मख्खी आहे आणि या बाबतीत इंग्लंडचे भाग्य मोठे स्पृहणीय दिसते. जितके देश इंग्लण्डने जिंकले, त्या त्या जित देशातल्या लोकानीच ब्रिटिश साम्राज आणि व्यापार सर्व जगभर फैलावण्यास इंग्लण्डला इमाने इतबारे सहाय केलेले आहे. हिन्दुस्थानची राजकीय सत्ता बळकविण्याचा मार्ग जरी क्लैव्ह आणि वॉरन होस्टिंग्ज सारख्या इंग्लिशमनानी आखला आणि दाखविला, तरी ज्या धोरणानी आणि युक्त्यानी हिन्दी राष्ट्र अखर इंग्लण्डच्या पोटात गडप झाले, त्यांच्या कर्तृत्वाची पुण्याई अनेक आयरिश आणि स्कॉच पठ्यानीच पटकावली. मारक्विस वेलस्ली आयर्लण्डचा आयरिश आणि त्याचा उजवा हात सर जॉन मालकम् स्कॉटलण्डचा स्कॉच. देशी संस्थानांची झटपट चटणी करणारा लॉर्ड डलहौसी हा सुद्धा स्कॉचच, इंग्लिशमन नव्हे. हिन्दुस्थानात इंग्रेजी राजसत्तेचा पाया घालण्याचे काम आयरिश वेलस्लीने केले आणि त्यावर स्कॉच डलहौसीने इमारत उभारली. नाम इंग्लण्डका और काम आयरिश स्कॉचमन्का, असा हा मामला आहे. इंग्लंडने जिंकलेल्या हिन्दुस्थानातले पुष्कळ हिन्दी बृहस्पति ब्रिटिश साम्राज्यवर्धनाचा अट्टहास करतात, त्याला मूळ कारण ही परंपराच आहे. अर्थात् ब्रह्मदेशच्या थिबाला चेचण्यासाठी, चिनातल्या हुंगचुंग पिंगपाँग चिन्याना माणुसकी शिकविण्यासाठी अथवा दक्षिण आफ्रिकेतल्या क्रूगरपंथी प्रिटोरियनाना ब्रिटिशाभिमानी बनविण्यासाठी, हिन्दुस्थानी सैनिकांच्या फलटणीवर फलटणी रवाना कां होतात, याचे आता कोणाला गूढ राहणार नाही. इंग्लण्ड मोठे भाग्यवान राष्ट्र आहे आणि त्याच्या भाग्यमंदिराच्या आत आणि बाहेर कलाकुसरीची कर्मे करण्याचा कर्मयोग त्याच्या जित अंकितांकडे परंपरेने आलेला आहे, एवढे मात्र स्पष्ट दिसून येते.

राजा आणि प्रजा एकजिनसी पाहिजे

क्रिस्ती आंग्ल राजसत्तेपूर्वी हिन्दुस्थानात अनेक देशी परदेशी राजे बादशाहांचा अंमल गाजला, परंतु मोगलासारखे विदेशी राज्यकर्तेसुद्धा तात्काळ हिन्दुस्थानचे रहिवाशी बनून येथेच राहिले आणि हिन्दी जनतेशी एकतान एकजीव झाले. हिन्दुस्थान हीच आपली जन्मभूमि आणि कर्मभूमि त्यानी केली.

मूळच्या इराण तुराण देशांचा कसलाहि संबंध संपर्क अथवा ऋणानुबंध त्यानी शिल्लक ठेविला नाही. या एकाच कारणामुळे दिल्लीच्या मोगल बादशाहीबद्दल कडवा आभिमान आणि गौरव आजदीनतागायत यच्चावत् हिन्दु मुसलमान जनतेच्या हृदयात जिवंत धमधमत आहे. हिन्दु विरुद्ध मुसलमान हा केवळ क्रिस्ती राजकारणी डाव इंग्रेजी राज्य कर्ते हिन्दुस्थानात कितीहि कुशलतेने खेळत असले तरी दिल्ली आग्र्याच्या अवशिष्ट बादशाही इमारतीपुढे प्रत्येक हिन्दु टपटपा अश्रू गाळून गत वैभवाला कृतज्ञतेचा मुजरा करतो, तर उत्तरेकडचा मुसलमान रायगडाच्या उकीरड्यापुढे गंहिवराने भरून आलेल्या मूक वृत्तीने दख्खनच्या शिवशाहीला आदराचा मुजरा करतो. क्रिस्ती आंग्रेजी राज्यसत्ता गेली दीडशे वर्षे हिन्दुस्थानावर आपल्या कदरबाज राजदण्डाची हुकमत चालवीत असूनहि, हिन्दी जनतेशी समरस होण्याचे भाग्य तिला अझून लाभलेले नाही. तिच्या विषयीचा परका भाव कमी न होता, उलट तो दिवसेंदिवस अधिकाधिक तणावला जात आहे. याचे कारण हिन्दुस्थानचे राज्य हिन्दुस्थानासाठी ती चालवीत नसून, ते इंग्लण्डच्या हितासाठी, किंबहुना ब्रिटिश साम्राज्याच्या टिकावासाठीच तिला टिकवून धरावयाचे आहे. 'इंग्लण्डचे हित' हा मध्यबिन्दु ठरवून, त्याच्या संरक्षणासाठी ब्रिटिश साम्राज्याचे कोळ्याचे जाळे पसरविण्यातच एकजात सर्व आंग्ल मुत्सद्यांचे 'राजकारणी' प्रयत्न आजपर्यंत खर्ची पडत आलेले आहेत. शिवाय, भारतीय आंग्ल सत्तेच्या उत्पत्तीची बनिया परंपरा नीट विचारात घेतली, तर तेथेहि हाच प्रकार स्पष्ट दिसून येतो. 'सिंध-सरदार' सर चार्लस नेपियरच्या शब्दात सांगायचे म्हणजे ''प्रत्येक देशातला राज्यकर्ता राजा अगर बादशहा त्या त्या देशाच्या हिताशी एकजीव झालेला असला पाहिजे. परंतु आमच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्स सारख्या शुद्ध बनिया शाहीला ते शक्यच नाही. दरसालच्या (हिन्दी व्यापारी उलाढालींचा) ताळतक्ता (बॅलन्सशीट) आपल्या अंमदानीच्या मुदतीत कसा काय आहे एवढे पाहण्यापलीकडे (हिन्दुस्थानच्या सुखदुःखाची) त्याना काय पर्वा असणार? ....फेरीवाल्या यहुद्याप्रमाणे थोडा नफा पुष्कळ व्यापार करून आपली तुंबडी कशी भरेल, या विवंचने पलीकडे, हिन्दुस्थानाचा मोठेपणा किंवा त्याचे हिताहित यांची त्याना कसलीच दरकार नाही..... गेली शंभर वर्षे त्यानी या (हिन्दुस्थानरूपी) गाईला मुबलक पिळून दूध काढले; पण तिला मूठभर चारा घातला असेल तर हराम !'' ज्या राज्याचा जन्मच शुद्ध वणिग्वृत्तीतून झालेला, त्याला 'घेशी तेव्हा देशी ऐसा अससी उदार' या पेक्षा अधिक एकजीवपणाची कसरत कसची साधणार?

हिन्दुस्थानातील इंग्रेजी राज्यसत्ता हा जगातल्या इतिहासात घडलेला अलौकिक चमत्कार आहे. त्याचा जसजसा तपशीलवार विचार करावा तसतशी कल्पना अनेक रम्य प्रमेयांच्या रंगात रंगपंचमी खेळू लागते. हिन्दूंच्या पुराणग्रंथांत लक्षावधि कल्पनातीत चमत्कारांची वर्णने आहेत. कासवाच्या पाठीवर मेरू पर्वताची रवि उभी ठेवून, शेषाच्या घुसळ दोरीने, देवदानवानी सागरमंथन केले आणि लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सुरा वगैरे चवदा रत्नांची पैदास केली. हा प्रकार घडला कसा ? पुष्कळाना ही कल्पित कादंबरी वाटते. कित्येक या समुद्रमंथनाला काव्यात ढकलतात. परंतु भारतीय आंग्ल क्रिस्ती सत्तेच्या उत्पत्ति स्थितीचा इतिहास जे कोणी निर्विकार चित्ताने अभ्यासतील, त्याना त्याच्या चमत्कारापुढे देवदैत्यांच्या सागरमंथनाचा चमत्कार दर्यामें खसखस वाटल्याशिवाय खास राहणार नाही. पुराणकार कितीहि सुपीक मेंदचे कवि अगर कादंबरीकार असले, तरी केवळ तागडीच्या जोरावर प्रचण्ड भरतखण्डाच्या एकमुखी राज्यसत्तेची तलवार पटकविण्यासारखा एकहि चमत्कार त्याना कल्पनेच्या

भरसाट उदरातून प्रसविता आला नाही ! पण तो आंग्रेज बहादुरानी या जड सृष्टीत प्रत्यक्ष घडवून दाखविला.

इंग्रेजी होण्यापूर्वी हिन्दुस्थानातले राजकारणी युग घटनेच्या प्राथमिक अवस्थेत होते. इंग्रजांची लुडबूड मध्ये न होता, त्या घटनेची उत्क्रांति तशीच बिनअटकाव पुढे गेली असती, तर आज हिन्दुस्थान कोणत्या स्थितीत असते, या प्रमेयावर माथे फोडण्याची मुळीच जरूर नाही. हा प्रश्नच अनाठायी आणि ऐदीपणाचा आहे. इंग्रजांचे हिन्दुस्थानावरील मा सार्वभौमत्व हा जसा एक कल्पनारम्य चमत्कार आहे, तसा तो हिन्दुस्थानाला कर्मन्यायाने प्राप्त झालेला ईश्वरी प्रसाद आहे, असा प्रस्तुत लेखकाचा आत्मविश्वासाचा अभिप्राय आहे. इंग्रेजी सत्तेच्या सानिध्यामुळेच हिन्दुस्थानाला अनेक राष्ट्रीय सद्गुणांचा परिचय होऊन, त्याला आपल्या भवितव्याबद्दल स्वयंनिर्णयाचा आचार विचार ठाकठीक ठरविण्याचे आत्मसामर्थ्य प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या टिकावासाठी अवश्यमेव लागणाऱ्या ज्या साहित्यसंग्रहाकडे आणि गुणवर्धनाकडे पूर्वी हिन्दुस्थान सपशेल पाठ फिरवून बसला होता, त्या साहित्याचा आणि गुणांचा कडु काढा इंग्रेजी सत्तेनेच हिन्दी जनतेच्या घशात ओतण्याची अमोल कामागरी बजावलेली आहे. हा हिन्द देश माझा किंवा वन्दे मातरम् सारखी राष्ट्राभिमान-द्योतक काव्ये जरी हिन्दी हृदयातून आज कितीहि उसाळ्याने आणि उमाळ्याने निपजत असली, तरी त्या उसाळ्यांचे आणि उमाळ्यांचे सर्व श्रेय हिन्दी-इंग्रेज-परिचयालाच देणे प्राप्त आहे. 'पेट्रिऑटिझम्' या इंग्रेजी शब्दाने देशाभिमान अथवा राष्ट्राभिमान यांच्या ज्या विशेष भावना आज हिन्दी लोकांच्या अंतःकरणात वावरू लागल्या आहेत, त्यांची इंग्रजपूर्व काळात हिन्दी लोकाना काहीहि जाणीव नव्हती. आज हिन्दवी स्वराज्याबद्दल किंवा निर्भेळ स्वातंत्र्याबद्दल हिन्दुस्थानात जे नवयुग उजाडले आहे, त्याच्या प्रबोधनाचे श्रेयसुद्धा इंग्रेजी शिक्षण आणि इंग्रेजी नोकरशाहीची घाशीरामी यानाच देणे प्राप्त आहे.

□□□

लेख

हिन्दवी नीळकण्ठीझम आणि रशियन कम्युनिझम

(लेखांक १ ला.)

देवीं दैत्यीं सागर-मंथन पैं केलें ।
त्यामाजी अवचीत हल ऊठलें ।।
तें त्वां असूरपणें प्राशन केलें ।
'नीळकण्ठ' नाम प्रसिद्ध झालें ।। - आरती

भुकेल्याला अन्न, तान्हेल्याला पाणी, आजाऱ्याला आरोग्य, भटाला दक्षणा, वेश्येला यजमान, इंग्रेजाला व्यापार आणि गुलाम राष्ट्राना स्वराज्य ज्याप्रमाणे अतिशय चित्ताकर्षक वाटते, त्याप्रमाणे सर्व भुकेबंगालाना बेंबीच्या देठापासून फुरफुरविणारे एक नवीन जंतरमंतर रशिया देशात उत्पन्न झाले आहे. त्याचे नाव बोलशेविझम ऊर्फ कम्युनिझम असे ठेवले आहे. सोशियालिझम, फासीझम असे आणखी याचे दोन सावत्र भाऊ युरपखण्डातील सर्व देशांत कमी अधिक प्रमाणात वावरत असतात. कम्युनिझमचा बावटा लाल रंगाचा असून, त्यावर हातोडा आणि विळा ही चिन्हे दर्शविलेली असतात. रंगांच्या गुणधर्मांच्या हिन्दवी कल्पना कितीहि भिन्न असल्या, तरी पाश्चिमात्य पाटलोण्यांचा परिचय झाल्यापासून, हिरवा रंग आलबेलीचा आणि तांबडा रंग धोक्याचा (डेंजरचा) ही कल्पना आमच्या समजूतीत आता कायमची मुरून बसली आहे. साध्या दुचाकी पासून तो आगगाडी आगबोटी मोटारीपर्यंत याच दोन रंगांच्या निशाण्यावरून आलबेल किंवा धोका अजमावण्याचा प्रघात राजमान्य आणि लोकमान्य होऊन बसला आहे. हिन्दी - विशेषतः हिन्दु-प्रवृत्ति तांबड्या रंगाला अशुभ किंवा धोक्याचा समजत नाही. असे नसते तर हिन्दु सवाष्ण बायकांच्या कपाळी कुंकवाचा लाल बावटा कायमचा चिकटलाच नसता. लाल रंगातला पाश्चिमात्य धोक्याचा अर्थ किंवा अनर्थ आमच्या जुन्या रंग-कल्पनेवर सफाईत आरोपिता येणारच नाही, असे मात्र नव्हे. हिन्दु सवाष्ण बायकांच्या कपाळावरचा लाल कुंकवाचा ठिपका जसा 'परनार विषाचा पेला' असा इषारा देणारा लाल बावटा, तसा तो जिच्या कपाळावर नाही अशी फटफटीत कपाळाची

विधवा म्हणजे

हिन्दु समाजातील बिनमालकी मालमत्ता

दर्शविणारा पांढरा बावटा. पूर्वी हिरव्या आणि तांबड्या रंगांबरोबर पांढऱ्या रंगाचेहि निशाण दाखविण्याचा रेलवेचा प्रघात असे. त्याचा अर्थ 'लाईन क्लियर आहे. डोळे मिटून भरधाव जा.' असा असे. कपाळी लाल कुंकू असणाऱ्या बाईपेक्षा, पांढऱ्या फटफटीत कपाळाच्या तरूण सकेशा हिन्दु विधवांकडे लोक विशेष निर्भयतेने डोळे टौकारून पाहातात, याचे कारण तरी पांढरा बावटाच होय. लाल टिकलीमुळे सभर्तृका बायकाकडे पाहणाराना 'डैंजर सिग्नल' ची चांगली ओळख झाल्यामुळेच, हिन्दु समाजाच्या बऱ्या वाईटाच्या जिम्मेदारी किल्ल्यांचा जुडगा कंबरेला लटकविणाऱ्या ब्रह्ममुखोत्पन्न भूदेवानी विकेशा विधवाना आरपार तांबड्या वस्त्रानी शाकारण्याचा प्रघात पाडला. या लाल शाकारणीने त्या हतभागिनींच्या विकारविलसिताचे बंधारण आणि संरक्षण कोठवर झाले, ते सांगणे कठीण असले, तरी हा

खास हिन्दु लाल बावटा

प्रत्यक्ष हिन्दु समाजालाच 'डैंजर'ची धमकी कशी आणि किती देत असतो, याची प्रत्यंतरे संघटण्या भटाना पदोपदी ठेचाळीत आहेत. म्हणजे असे म्हणायला आता काही हरकत नाही की पाश्चात्यांप्रमाणेच हिन्दी लोक सुद्धा लाल रंग धोक्याचा रंग मानण्यापुरते एकमत्ये बनले आहेत.

युरापियनांइतके क्रान्तिकारक बण्डखोर लोक जगाच्या पाठीवर तेच. खाणेपिणे भाषा पेहराव आचारविचारादि तपशिलांपासून तो थेट चंद्र मंगळावरच्या सफरीसाठी बेडर विमाने सज्ज करण्यापर्यंत, त्यांच्या क्रान्तींचे थारेपालट दर तासाला फटाफट बदलत असतात. अमूक गोष्ट 'अप टू डेट' आहे, या वाक्याचा अर्थ त्या गोष्टीला चालू घडीपर्यंत घडलेल्या क्रान्तीचे सर्व रंग आरपार चोपडले गेले आहेत. आचारविचारांप्रमाणे विकाराना आणि परिस्थितीच्या पालटाना सुद्धा रंगांच्या निशाण्यानी व्यक्त करण्याचा परिपाठ युरपियन क्रान्तिकारकानी बराच उचललेला आहे. आमच्या इकडे रंगानी विकार दर्शविण्याचा प्रघात नाही असे नाही. पण तो फक्त तत्वज्ञानाच्या क्षेत्रांत अडकून पडल्यामुळे, रोजच्या व्यवहारांत त्याची कोणी फारशी मातब्बरी मानीत नाहीत. पण युरपियन टाळकी जात्याच मोठी चवचाल आणि थेरबाज! जुन्या कपात नवा चहा, जुन्या ग्लासात ताजी व्हिस्की आणि जुन्या भाषेत नवा विचार त्याना वापरताच येत नाही.

'नित्य नवे, क्रान्तीला हवे'

त्यांच्या क्रान्तिकारक पिण्डाला २४ तास आयुष्याची वस्तुस्थिति सुद्धा जरठ जीर्ण वाटू लागते. ते कशाला काय नाव देऊन कसला धिंगाणा घालतील, याचा त्यांचा त्यानाच आजपर्यंत नेम लागलेला नाही, तर एकमार्गी एकसूत्री पामर हिन्दी लोकानी त्याचा काय कयास कसा बांधावा? लालबुंद गोऱ्या लोकांच्या राजसत्तेची तोंडबेटी सुखासमाधानाने चढवून घेताना हिन्दी घोड्याने जरा सुद्धा आदळ आपट केली नाही. थोडी सुद्धा मान हालविली नाही. एकदा सुद्धा टाप झाडली नाही, की फुरफूर कुरबूर केली नाही. गेली शंभरावर वर्षे मेंढपाळाने मेंढ्या हाकाव्या, तसे क्रान्तिकारक इंग्रेजानी येथील शांतिप्रधान हिन्दी लोकांवर राज्य केले.

चूक चाकू सुरी ही माणसांची खेळणी नव्हेत

असला वेदान्त सुद्धा हिन्दी लोकानी कोयनेलाच्या गोड गोळी प्रमाणे बिनतक्रार पचनी पाडला. असला हिन्दुस्थान, असला शांतिप्रधान हिन्दुस्थान, इतका मेंग्या हिन्दुस्थान आता क्रान्तिप्रधान लालबुंद कम्युनिष्ट हिन्दुस्थान बनत चालला, अशी जोरकस बोंब बरद्वानच्या जोरकस महाराजाने दोन वर्षापूर्वी ठोकली. त्यानी एका लाल संकटाचा पुकारा करून, छातिठोक जाहीर केले की, ''लाल संकट साऱ्या जगभर सैरावैरा बोकाळले आहे; आणि त्याच्या भिंगरीचा आस हिन्दुस्थानाच्या खोबणात गरगरा फिरत आहे.'' पूर्वी 'पिवळे संकट, पिवळे संकट' (यलो पेरील) असा अमेरिकेचा एक जोरदार शंखध्वनि मधून मधून ऐक येत असे. पण हे लाल संकट (रेड पेरील) म्हणजे काय लचांड आहे? अडाणी हिन्दी बहुजन समाजाला तर ही

रंगी बेरंगी संकटे काय आहेत

याची कल्पना होता होताच, आणखी एकाद्या हिरव्या निळ्या काळ्या संकटाचाहि फट्दिशी जन्म व्हायचा ! रंगावरून संकटांचा ढंग पारखण्याची कला हिन्दी मनोवृत्तीला अवगत नसली, तरी काटा कोठे बोचत आहे आणि कोण बोचीत आहे, हे न कळण्याइतकी हिन्दी जनता हतसंज्ञ खास झालेली नाही. रंगावरून संकटाचा दंगच हुडकायचा, तर लाल संकट आजचे नसून, ज्या दिवशी हिन्दुस्थानचा नकाशा इंग्रेजी राजसत्तेच्या लालबुन्द रंगाने रंगविला गेला, त्याच दिवशी ते उद्भवले, असे तरी कां म्हणू नये? दादाभाई नवरोजी, रमेशचंद्र दत्त, प्रफुल्लचंद्र राय इत्यादि अनेक अर्थशास्त्रज्ञांच्या अधिकारी भाषेत सांगायचे तर गेल्या शंभर दीडशे वर्षांत हिन्दुस्थान आरपार धुपला जाऊन पांढरा फटफटीत पडला आहे. (इंडिया ब्लेड व्हाईट) त्याचे लाल रक्त साफ धुतले जाऊन, अन्नान्न अवस्थेच्या पाण्डुरोगाने तो पांढरा फेक पडला आहे. असला पाण्डुरोगी हिन्दुस्थान हजारो मैलांवरच्या उपटशुंभ रशियन क्रान्तिकारकांच्या कम्युनिझमने अवचित लालबुन्द बनला, या हाका आरोळ्यांत कितपत तथ्य आणि सत्य आहे? अत्यंत प्राचीन काळापासून शेकडो रंगी बेरंगी क्रान्त्या आपल्या हृदयावर सहज लीलेने खेळवून, पुन्हा हिमालयाप्रमाणे ताठ उभा राहिलेला हिन्दुस्थान खरोखरच रशियन मांत्रिकांच्या पचनी पडला, कीं कम्युनिझमच्या नावाखाली सध्या येथे चाललेला राजकारणी धुमाकूळ म्हणजे आस्वलाच्या आधी दरवेशाची आरोळी? हिन्दुस्थानाच्या पिण्डीब्रह्माण्डी झोंबलेल्या पाण्डुरोगावर (क्रॉनिक अनीमिया) रशियन कम्युनिझम हा एकच शेवटला उपाय आहे, का खुद्द हिन्दुस्थानाच्या देशी बटव्यातच या रोगाची एकादी रामबाण जडीबुट्टी आहे? इत्यादि अनेक शंकोपशंकांची चिकित्सा करून पाण्डुरोगी हिन्दी प्रजाजन आणि त्यांचे लालबुंद गोरे सत्ताधारी यांच्या विवेकाचे प्रबोधन करण्याचा या लेखात प्रयत्न केलेला आहे.

पुराणांत समुद्र-मंथनाची एक मनोरंजक कथा कविकल्पनेने रंगविलेली आढळते. कासवाच्या पाठीवर मेरू पर्वताची रवि उभी करून, तिला शेषाची दोरी बांधून, एका बाजूला देव आणि दुसऱ्या बाजूला दैत्य मिळून दोघानी महासागर घुसळला आणि

लक्ष्मी को स्तुभ पारिजातक सुरा

इत्यादि चवदा रत्ने मंथून काढली. चालू घडीचा जगातील यच्चावत् सर्व राष्ट्रांच्या जीवनाचा

खळबळाट विचारात घेतला तर पौराणिक समुद्र-मंथनाची कथा आज प्रत्यक्ष आपल्या नजरेसमोर घडत असल्याची कबुली देणे भाग आहे. सकाळ सायंकाळची वृत्तपत्रे उघडताच, कोठे ना कोठे, काही ना काही, प्रचण्ड क्रान्ति अपघात बण्डे राज्यक्रान्त्या यांचा सुळसुळाट अखण्ड चाललेलाच आढळून येतो. समुद्र-मंथनच ते! एकदा रवीचा घुसळा सुरू झाला कीं त्याच्या रामरगाड्यापुढे काय टिकणार? सन १९१४ च्या युरपियन महायुद्धाने प्रथम या समुद्र-मंथनाचा श्रीगणेशा केला. ५ वर्षांच्या घुसळीतून अमेरिकेच्या परलोकवासी प्रेसिडेण्ट विल्सनने पुन्हा चवदाच रत्ने बाहेर काढून, या अर्वाचीन समुद्रमंथनाच्या पुराणाचा

'अभिनव अध्याय गोड हा'

करण्याची मध्यस्ति केली. तात्पुरता हा अध्याय संपल्याचा जगाला भासहि झाला. पण तेवढ्याने देवदैत्यांचे समाधान मात्र झाले नाही. 'पुराणातली वांगी पुराणात' ठेवून, त्यानी आपल्या घुसळणीचे काम जोराजोरांत चालूच ठेविले. सध्या ही घुसळणी अनेक सोयीस्कर सबबींच्या पांघरुणाखाली सर्व राष्ट्रांत इतक्या रंगात आली आहे की पुढच्या क्षणाच्या भवितव्याच्या क्रान्तीबद्दल प्रत्येक राष्ट्र बिनअंदाजी होऊन बसले आहे. जो तो आपापल्या टिकावाच्या उपायासाठी जबरदस्त तंगडझाड करीत आहे. मोठमोठ्या मुत्सद्यांच मेंदू झोपेत सुद्धा या मंथनाचे आडाखे सोडविण्यात गर्क आहेत. प्राचीन चवदा रत्नांचा उपभोग या भरतखण्डाने कसा काय घेतला, याच्या संशोधनाची दलामल कोणी केली नाही, तरी सध्या उभ्या हिन्दुस्थानात आमच्या गोऱ्या माबाप सरकारचा

चवदाव्या रत्नाचा धिंगाणा

सर्वत्र बेगुमान चालू झालेला आहे. दोन वर्षांपूर्वी बरद्वानी फोनोग्राफच्या प्लेटाने ज्या (रड) गाण्याचा सूर काढला, त्याच सुराची ही पुढची असुरी अथवा बेसुरी तान आहे. या तानेच्या कोळ्याच्या जाळ्यात बऱ्याच माशा लालबुन्दांच्या आरोपावरून पकडण्यात आल्या आहेत; आणखीही पकडापकड व दडपशाही 'मागील अंकावरून पुढे चालू' राहील, असा अंदाज आहे. बोलून चालून सागर-मंथनच हे! त्यात कोणकोण कसकसे घुसळून मसळून निघतील, त्याचा नियम कोणी सांगावा? ब्रिटीश नोकरशाहीचे म्हणणे असे की हिन्दुस्थान रशियाच्या कम्युनिष्ट मंत्राच्या पचनी पडला किंवा पडत आहे आणि तो मंत्र त्याला लोणच्याच्या कापटीप्रमाणे मटकावून, ब्रिटीशांच्या हिन्दी राज्यसत्तेला कुळामुळांसकट उखडणार! असल्या भयकर क्रान्तीचा पाया येथे बळावला आहे आणि त्यासाठी कायदा आणि शिस्त यांची कदर कडक ठेवणे अगत्याचे आहे. * देशी परदेशी वृत्तपत्र आणि विद्वानांकडे पहावे, तो त्यांचा कारभार सारा दुतोण्ड्या! आता पहावे तो मास्कोहून लक्षावधि रुपयांची गंगाभागीरथी सोसाट्याने फोफावत हिन्दुस्थानावर कोसळली म्हणतात; तर लगेच दुसऱ्या दिवशी 'रशियात भयंकर दुष्काळ, लाखो लोक मेले.' अशाहि बोंबा ठोकतात. एकदा पहावे तो म्हणे रशियातले कम्युनिष्टांचे राज्य

---

* Law and a plan, steadily upheld, are more necessary in revolutionary times than in ordinary humdrum times, cecause in revolutionary times society degenerates much more readily into a mere scramcle under the ascendency of the forcicle and cunning - The Outline of History, page 518. By H.G. Wells.

आहे; तर दुसरा ह्मणतो 'छे हो, काय ऐकता या गटारगप्पा. रशिया म्हणजे नुसती बेबंद नगरी आणि झोटींग पाच्छाई आहे. पूर्वीची झारशाही पत्करली, पण या उपटशंभु सोव्हियटांची (कम्युनिष्टांची) 'हम करे सो कायदा' 'सप्तग्रहशाही * नको.' कशास काही मेळ नाही. तात्पर्य, वृत्तपत्रांची दुतोण्डी कसरत आणि आमच्या माबाप नोकरशाहीची एकतोण्डी मसलत, या जात्याच्या दोन तळीमध्ये पाण्डुरोगी गरीब हिन्दी जनतेची होत आहे फसगत ! गेल्या २५ वर्षात हिन्दुस्थानाच्या प्रबोधनाचा पारा वाढत्या प्रमाणावर आहे, यात मुळीच शंका नाही. त्याच्या सर्व

चळवळींचा आत्मा म्हणजे माणुसकीने जगण्याची केवळ निसर्गसिद्ध धडपड असल्यामुळे, तिच्यावर कसलाहि दोषारोप कोणालाहि करता येणार नाही. जगाच्या इतिहासात कोणत्याहि काळी कोणत्याहि छोट्यामोठ्या नव्याजुन्या राष्ट्रापुढे पडले नाहीत, असले प्रचण्ड प्रमेयांच पर्वत हिन्दुस्थानाला वाटेआड करून, आपल्या माणुसकीचा मोक्ष शोधावयाचा आहे. जेथे सारी दुनियाच सागरमंथनाच्या धसळामुसळात चक्राकार घुसळला जात आहे, तेथे हिन्दुस्थानच्या भवितव्याला नामानिराळे एकलकोंडे राहताच कस येणार? प्राचीन सागरमंथनातील 'सुरा' ठासून ब्रिटीश नोकरशाही सत्तामदाच्या धुंदीने हिन्दुस्थानाला लालबुंद नजरेने दृष्टाळात असली, तरी या पाण्डुरोगा दुर्देवी भरतखण्डाला चवदा रत्नांपैकी 'धन्वंतरी' शिवाय दुसऱ्या कसल्याहि रत्नाची आवश्यकता नाही. इतर कोणतेहि रत्न त्याच्या उपयोगी पडणार नाही. प्रश्न एवढाच उरतो की हा धन्वंतरी निर्माण होणार कधी आणि कोठे? सध्या मात्र निरनिराळ्या मायावी वैदूंच्या, जाहीराती मुबलक फडकत असून, नानाविध परस्परविरोधी औषधयोजनेत हिन्दुस्थानाचे मनस्वी हाल होत आहेत. सगळे वैद्य डाकटर मंत्रतंत्रवाले यानी हात टेकल्यावर, हितचिंतकाना स्वतःच रोग्याच्या प्रकृतीचा अंदाज घेण्याचा प्रसंग येतो आणि पुष्कळ वेळा हे आत्मसंशोधनच रोगनिर्मूलनाचे यश घेते. तेव्हा आता आपण आपल्या हिंन्दुस्थानाच्या पिण्ड प्रकृतीचाच अंदाज काढला पाहिजे.

युरपातल्या प्रत्येक देशाने आपापल्या पिण्डप्रकृतीचे निदर्शक असे एकेक चित्र राष्ट्रीय चिन्ह म्हणून ठरविलेले आहे. इंग्लण्डचे चिन्ह म्हणचे बुलडॉग. फ्रान्सचे चिन्ह, तलवार घेऊन सरसावलेली कुमारी. पोर्च्युगालचे चिन्ह, लाथेच्या ठोकरीने राजेशाही मुकूट छिन्नविच्छिन्न करणारी तलवार-निशाणधारी एक तरुणी. जर्मनीचा गरूड, ऑस्ट्रिया-हंगेरी द्विदल गरूड, राशिया आस्वल, असे नाना प्रकार आहेत आणि या चिन्हावरून त्या त्या देशांतल्या लोकांची स्वभावप्रवृत्ति आणि पिण्डप्रकृति चटकन् कळून येते. उदाहरणार्थ बुलडॉग कुत्राच घ्या. हा फारसा भुंकत नाही. थोडा गुरगुरतो पण त्या गुरगुरण्याची भावना बरी का वाईट, चावरी का बावरी, प्रेमाचा का वैराची हे खुद्द पालकाना आणि परिचिताना सुद्धा उमगत नाही. चेहरा सदोदित उग्र. केव्हा कसा लचका काढील याचा नेम नाही. डसला की चावा सोडविण्याची मुष्कील. आधी अंदाजाशिवाय कोणाच्या मागे लागायचा नाही आणि एकदा पाठीस लागला तर लचका तोडल्याशिवाय राह्यचा नाही. ही इंग्लण्डचा बुलडॉगी प्रवृत्ति हिन्दुस्थानाला तरी विशेष पाल्हाळाने वर्णन

---

* सोव्हियट राज्याची सर्व सूत्रे एकतंत्री चालविणाऱ्या मुख्य मध्यवर्ति मण्डळात (१) स्टॅलीन् (२) झीनोव्हीव, (३) कामेनेव, (४) रायकोव, (५) ट्रॉट्स्की , (६) टॉम्स्की , आणि (७) बुखारीन असे सात अरेराव आहेत. ते ठरवितील तो कायदा आणि सांगतील तो वायदा सर्व रशियाने बिनतक्रार शिरसावंद्य मानलाच पाहिजे, असा कम्युनिष्टी कडवा दण्डक आहे.

करून सांगण्याची जरूर नाही. बुलडॉग, गरूड, आस्वल इत्यादि चिन्हे इंग्लण्ड, जर्मनी रशिया वगैरे देश मोठ्या स्वाभिमानाने धारण करतात. मोठमोठ्या मुत्सद्यांच्या भाषणांत, राजकारणी पत्रव्यवहारांत, वृत्तपत्रा लेखनांत ब्रिटीश 'जॉन बुल', जर्मन 'ईगल,' राशियन 'बेअर', असा उल्लेख नेहमी आदरपूर्वक केला जातो. त्यात द्रोह निंदा किंवा उपहास यांचा पुसट संशयहि कोणाला येत नाही. ही चिन्हे कविकल्पनेची अयाचित निष्पत्ति नव्हत. त्यांत इतिहास आहे. देशाभिमानाचे इतिहाससिद्ध मर्म आहे ह्मणूनच रशियाला आस्वल, जर्मनीला गरूड आणि इंग्लण्डला बुलडॉग म्हटले असता कोणाच्याहि नाकाला मिरच्या झोंबत नाहीत, किंवा राजद्रोह मित्रद्रोह देशद्रोह झाला असे कोणी मानीत नाही. युरपियन देशांच्या पिण्डप्रकृतीचा स्पष्ट नकाशा त्यांच्या या राष्ट्रीय चिन्हांत उमटलेला असल्यामुळे, कोणते तत्व त्यांच्या पचनी पडेल, त्याना मानवेल, अथवा मानवणार नाही, याचे गणित आपल्याला चटकन् सोडविता येते. पण असा प्रकार हिन्दुस्थानाच्या बाबतीत नाही. हिन्दुस्थान एक राष्ट्र नव्हे, एक देश तर नाहीच नाही, तर भिन्नभिन्न प्रकृतींच्या अनेक

राष्ट्रानी बनलेले खण्ड आहे. म्हणूनच त्याला भरतखण्ड असे प्राचीन काळापासूनचे सार्थ नाव आहे. या खण्डाची प्रकृति आणि प्रवृत्ति अमुक एक अशी ठरावीक नाही. सर्व प्रकृत्या आणि प्रवृत्त्या येथे सामावल्या आहेत.

हिन्दुस्थान एक बडा अजायबखाना आहे

जगात नाही ते येथे आहे आणि येथे नाही ते जगात नाही. सर्व भावनांचा हा महासागर. जगाच्या इतिहासात तोड सापडणार नाही, असे मोठमोठे भयंकर क्रान्त्यांचे पर्वत हिन्दुस्थानावर अनेक वेळा कोसळले; क्रान्तीच्या एकाद्या दुसऱ्या फटक्याने ग्रीक रोम इजिप्तसारख्या साम्राज्यांच्या संस्कृत्या फटाफट जमीनदोस्त झाल्या; पण शेकडो क्रांत्याना तोण्ड देऊन, हिन्दुस्थान अझून ताठ उभा आहेच आहे. या चमत्काराचे मर्म उमगल्याशिवाय त्याच्या पिण्डप्रकृतीचे निदर्शक चित्र अथवा चिन्ह ठरविता येणार नाही; आणि पिण्डप्रकृतीचा ताळेबंद निर्णय लावल्याशिवाय त्याच्या हाडीमासी भिनलेल्या पाण्डुरोगाच्या निर्दाळणाचा उपायहि सांगता येणार नाही. हा निर्णय लागलेला नाही, किंवा हिन्दवी प्रकृतीचे निश्चित चिन्ह ठरलेले नाही, असे मात्र नव्हे. फक्त त्याची पूर्ण जाणीव हिन्दी खण्डबांधवाना या पुढे जितकी स्पष्ट होईल, तितकी आज अगत्याची आहे.

अष्टपैलू माणसाप्रमाणे अष्टपैलू प्रकृतीचे राष्ट्रक्रान्तीच्या सागरमंथनात देवदैत्यांच्या बापाला आणि काळाच्या काकाला दाद देणार नाही. हिन्दुस्थान अष्टपैलूच काय, पण शतपैलू आहे. पाश्चिमात्य युरपियन राष्ट्रे आपापल्या एक रंगी एक जिनसी संस्कृतीच्या टिकावासाठी, ज्या निरनिराळ्या 'झम्'चे प्रयोग करून पृथ्वीवर नंदनवन थाटण्याच्या वल्गना करीत आहेत, ते सारे 'झम्' हिन्दुस्थानाला

उष्ट्या कल्पनांचा उकीरडा

होय. पुराणपुरुषाप्रमाणें या पोरकट पोरांचे हे पोरखेळ पाहून, हिन्दुस्थान बेदरकारीने गालातल्या गालात हासत आहे. रशियन बोलशेविझम ऊर्फ सपाट-समाज-पटु कम्युनिझम क्रान्तीची दिवटी पेटवून नाचू लागताच, एक जात युरपियन राष्ट्रांची केवढी पंचधांदल उडाली आहे, ती पहा. महायुद्धाच्या हंगामात, किंवा इनफ्लुएन्झासारख्या रोगराईच्या साथीचा प्रतिकार करण्यातहि जितकी धावपळ आणि धांदल केली नाही, त्याच्यापेक्षा शतपट प्रतिकाराच्या साहित्याची जमवाजमव करण्यात सर्वांचा बेदम

आटारेटा चालला आहे.

लाल रंगाच्या गंध कुंकवात बॉम्बची फॅक्टरी

पाहण्यापर्यंत ज्यांची नजर तारवटली आणि आतडी पिळवटली आहेत, त्या बिचाऱ्यांच्या मानसिक वेदनांची तीव्रता आपल्याला सहज होण्यासारखी आहे. प्रत्येकाला आपापल्या पापांची आणि टिकावाच्या वर्माची चांगली जाणीव असतेच. जो तो आपल्या कर्माला भीत आहे आणि वर्माच्या मर्माला जीव तोडून जपत आहे. पण हिन्दुस्थानाला त्याचे काय? कम्युनिझम बिनचुक आपल्या वर्मावर मर्मी घाव म्हणून आपल्याला आस्तित्वातून उखडील, अशी ज्यांना नाजुक काळजी असेल, त्या राष्ट्रानी खुशाल मनमुराद माथेफोड आणि तंगडझाड करावी. त्यांचे हातपाय धरण्याची किंवा त्यांच्या हातापाया पडण्याची हिन्दुस्थानाला मुळीच जरूर नाही. हिन्दुस्थानाने आपल्या

सर्व कर्म वर्म मर्माचा संन्यास

मागेच केला असून, कम्युनिझम सारखे शेकडो एक लहरी साप लीलेने हाताबोटांवर खेळवून, गळ्यात अडकवून, तो फणीवर बनलेला आहे. हिन्दुस्थानाच्या हिन्दु संस्कृतीला-आज ती बरी दिसो वा वाईट दिसो आमूलाग्र गिळण्यासाठी बौद्ध, जैन, ग्रीक, अफगाण, इराणी, दुराणी, इस्लामी, क्रिस्ती इत्यादि अनेक बोलशेव्हिक क्रान्त्यानी भरत खण्डावर झडपा घातल्या. पण त्या सर्वांना आत्मसात् करून हिन्दुस्थानाने पचनी पाडले. या सर्व प्रचण्ड बोलशेव्हिकी सागराना हिन्दुस्थान-अगस्तीने एकाच आचमनात गटायस्वाहा केले.

बौद्ध धर्माचा समाज-समता वाद

म्हणजे हिन्दबी कम्युनिझमची केवढी दाण्डगी क्रान्ति! पण ती सुद्धा या शतपैलू संस्कृतीच्या भरत खण्डाने चावून फस्त करून तिचा शिलकी चोथा चीन जपानकडे भिरकाऊन दिला. इस्लाम धर्म ह्मणजे समाजसमतेचा आणि विश्वकुटुंब वादाचा कडवा प्रचारक. अभिर फकिर एकाच ताटात जेवले पाहिजेत, असला त्याचा दाण्डगा दण्डक. मूर्तिपूजनाचा निषेध तोंडाने न बडबडता, प्रत्यक्ष मूर्तिभंगाने त्याने दणदणीत गाजविला; आणि अखेर कित्येक शतके हिन्दुस्थानची सार्वभौम बादशाहीहि हाती ठेऊन हिन्दुस्थान इस्लामीझममय करण्याचे जंगजंग पछाडले. पण अखेर त्याच इस्लामी कम्युनिझमला

ताबूताच्या प्रतिकपूजेची हिन्दु दीक्षा

देऊन, हिंदुस्थानाने आत्मसात् केले. इस्लामानंतर समाज-समतेचे गगन भेदी बिगूल फुकीत क्रिस्ती कम्युनिझमचा तुफानी फेरा आला. क्रिस्ती कम्युनिष्ट तर आज इस्लामी मोगलांप्रमाणे हिन्दुस्थानचे सार्वभौम सत्ताधारी आहेत. क्रिश्चन धर्माच्या आणि त्याच्या सपाट-समाज-पटु कम्युनिस्ट तत्वांचा प्रसार करण्यासाठी त्यांचे खास सरकारी 'एक्लोझियास्टिकल' धर्मखाते उघड माथ्याने क्रिश्चनमतप्रसाराचा आटारेटा चालवीतच आहे. इतके होऊनहि हिंदुस्थान, हिंदु लोक, हिंदु जातिभेद आणि सगळी इतर हिंदु लफडी जागच्या जागी कायम आहेत ! पोर्च्युगीज कम्युनिष्टानी सारा साष्टीप्रांत क्रिस्ती बनविला. सगळ्या साष्टीकर हिन्दूना अंतर्बाह्य 'क्रिच्चन साहेब' बनविले. त्यांच्या अन्नवस्त्र राहणीच्या कल्पना आरपार बदल पण अखेर रोटीव्यवहारात एकजिनसी बनलेले 'समदे क्रिच्चन साहेब' बेटीव्यवहाराचे सौदे ठरविताना

'मी बामन-किच्चन, तो कोली-किच्चन'

हा कट्टर 'हिन्दु' जातीभेद पाळतातच! येथेहि हिन्दु पिण्डप्रकृतीने क्रिस्ती कम्युनिझमला, ऊर्फ विश्व कुटुंबवादाला आपाटळूण-हॅट गिळून पचनी पाडले! सारांश, हिन्दुस्थानातील शेकडो धर्ममते म्हणजे बोलशेव्हिकांचे जबरदस्त कम्युनिष्टी हल्लेच होत. पण त्या सर्वांतली चांगली तत्वे हिन्द संस्कृतीने आत्मसात करून, त्यांचे शिलकी चोथे, प्रदर्शनादाखल नीट मांडून, हिन्दुस्थानाने आपल्या अनन्य अजायबखान्यात जोपासले आहेत. शांततावादी, रक्तपाती, अत्याचा अशा सर्व प्रकारच्या क्रान्तिकारकांच्या चळवळीना काळचक्राच्या सागरमंथनातून वेळोवेळी निर्माण झालेल्या सर्व हलाहल विषाना सफाईत पचनी पाडून हिन्दु प्रकृतीचा नीळकण्ठ आजहि हिमालयाप्रमाणे निर्भय समाधीत मग्नपणाने डोलत बसलेला आहे. असल्या हिन्दवी नीळकण्ठीझमला म्हणजे रशियन कुम्युनिझम क्रिस्तमस केकप्रमाणे मटकवणार! अशक्ताला रोगराईची भीति, कारकुण्ड्यला रिट्रेंचमेण्टची भीति, गिरणीमालकाना संपाची भीति, पुणेरी भटाना भटेतरी चळवळीची भीति, पादचारी लोकाना मोटारमावलीची भीति, तद्वत् सत्तामदाच्या धुंदीत अखिल मानवतेच्या माणुसकीवर जळवांप्रमाणे जगणाऱ्या, एकजिनसी पिण्डाच्या युरपियन राष्ट्रानी, समाजानी अथवा व्यक्तीनी खुशाल कम्युनिझची धास्ती धरावी; हिन्दवी नीळकण्ठीझम रशियन कम्युनिझमचा बाप होऊन बसला आहे.

पौराणिक सागरमंथनाने चवदा रत्ने निर्माण केली त्याच वेळी हिन्दुस्थानच्या पिण्डप्रकृतीच्या चिन्हाचेहि चित्र रेखाटले गेले. लक्ष्मी कौस्तुभ पारिजातकाच्या बरोबरच जेव्हा हलाहल विष निघाले, तेव्हा ते साऱ्या त्रिभुवनाला जाळू लागले. सध्या रशियन कम्युनिझममुळे पाश्चात्य देवदैत्यांची जशी दाणादाण उडाली आहे, तसा स्वर्ग मृत्यू पाताळात एकच हाहाकार उडाला. त्या भयंकर विषाला ठेवावे तरी कोठे आणि नष्ट तरी करावे कसे, असा बिकट पेच देव दैत्य घुसळ्यानाच पडला. कारण हलाहल विष हे त्यांच्याच मंथन कर्माचे फळ होते. आता काय करावे? सारे विश्व हवालदिल झाले. जिकडे तिकडे आगीआग जाळपोळ रडारड मरामर मातली. कोणाचा काहीच उपाय चालेना. अशा प्राणान्तिक काळघटकेला 'व्याघ्रांबर फणिवर धर'

श्रीशंकरजी पुढे सरसावले

त्यानी तो हलाहल विषाचा पेला पटकन् उचलून चटकन् पिऊन फस्त केला. त्रिभुवनावर ओढवलेले काळसंकट विरूपाक्षाने डोळ्याच्या एकाच उघडझापणीत कायमचे नष्ट केले. पण किती झाले तरी हलाहल विषच ते! ते आपला पराक्रम दाखविल्याशिवाय थोडेच राहणार? ते शंकरजीचा कण्ठ चरचर चरचर जाळीत त्यांच्या उदरात गेले. त्यामुळे महादेवाचा कण्ठ निळा पडला. तेव्हापासून नीळकण्ठ हे पुराणप्रसिद्ध नाव त्याना मिळाले. श्रीशंकराची ही नीळकण्ठी उर्फ शेकडो हलाहल विषासारख्या देशी परदेशी कम्युनिष्टी बोलशेव्हिकी क्रान्त्या आमूलाग्र पचनी पाडण्याची पुराणप्रसिद्ध पिण्डप्रकृति हेच आमचे

हिन्दवी नीळकण्ठीझम

होय. या नीळकण्ठीझम पुढे आजपर्यंत कोणाची मात्रा चालली नाही आणि पुढे चालणारहि नाही. प्रत्येक कम्युनिझममधले चांगले तत्व आत्मसात् करून, बाकीचा चोथा फेकून द्यायचा, या नीळकण्ठीशम मध्येच हिन्दूंच्या टिकावाचे मर्म आहे. बौद्धधर्माने अहिंसावाद पुकारताच त्यातले अहिंसा परमो धर्मः तत्व तेवढे नीळकण्ठीने पत्करले आणि बाकीचा सगळा लगदा दिला भिरकावून दूर!

विद्यमान् क्रिस्ती संस्कृतीच्या कम्युनिझमला सुद्धा या नीळकण्ठीने आरपार पचनी पाडलेच आहे. मुंबई कलकत्ता मद्रास सारख्या शहरातले हिन्दीलोक नखशिखांत हॅट पाटलोणे आंग्रेज बनलेले दिसले तरी हिन्दूंची

पंचा पत्रावळ पातळभाजी

आणि मुसलमानांचा पायजमा पाव पुलावा कायमच्या कायम ! अनेक कान्त्यांची हलाहल विषे प्राशन केल्यामुळे हिन्दुस्थानरूपी श्रीशंकराचा नाजूक कण्ठ ठिकठिकाणी भाजून करपून निळासावळा पडलेला असला, तरी तो नीळकण्ठ सध्या जगात चाललेल्या सागरमंथनाकडे 'कुछ पर्वा नही' दृष्टीनेच पहात स्वस्थ बसला आहे. सारांश, इंग्लण्डचा बुलडॉग, जर्मनीचा गरुड, राशियाचा अस्वल, त्याप्रमाणे

हिन्दुस्थानचा नीळकण्ठ शंकर

ही राष्ट्रीय पिण्डप्रकृति-दर्शक निशाणी आहे. हिन्दुस्थानात सर्व देवांपेक्षा शंकराची देवळे व शंकराचे उपासक काश्मिर ते रामेश्वर मुबलक कां सापडतात, याचेहि मर्म या नीळकण्ठीझम मध्येच आहे.

(दुसरा लेखांक ६ व्या वर्षाच्या १ ल्या अंकात येईल.)

□□□

लेख

क्रान्तीचे कुलपी बाँब

(संपादकीय)

बॉम्ब १ ला

देव देवता पळाल्या कोठे?

कोणत्याहि कार्याच्या प्रारंभी- मग ते बांब फेकण्याचे असो नाहीतर बोंब मारण्याचे असो कोणत्या तरी देवदेवतेचे नामस्मरणपूर्वक वन्दन करण्याचा हिन्दुजनांचा शिष्य संप्रदाय आहे. यापूर्वीच्या माझ्या प्रत्येक ग्रंथारंभी हा शिष्टाचार मी भक्तीपूर्वक इमाने इतबारे पाळलेला आहे. मी क्रान्तिप्रिय प्रागतिक असल्यामुळे जुने तितके सोने मानण्याची हिन्दु कला मला साफ अमान्य आहे. क्रान्तीच्या भरधाव वेगाच्या सोसाट्यात दररोजच काय, पण दर घडीला सृष्टीच्या रंगाढंगांत कल्पनातीत बदल होत असताना, प्रागतिक मनुष्याने मतांच्या ठरावीकपणाला चिकटून बसण्याइतका मनाचा दुबळेपणा दाखविणे, म्हणजे जगात जगण्याची आपली नालायकी सिद्ध करण्यासारखे आहे. कालयपर्यंत मी देवदेवतांचे अस्तित्व मानणारा होतो. आज मी देवविषयक सर्व भावनांच्या आणि कल्पनांच्या छाताडावर बांब फेकणारा लालबुंद क्रान्तिकारक बनलो आहे. अर्थात् निश्चित सत्यशोधनाचा बांब मी हातात घेताच, माझ्या भावनेच्या क्षेत्रातून देवदेवता लांब पळाव्या, यात काही नवल नाही. मनात जनात मसणात सरणात आज मला एकहि देवदेवता कोठे दिसत नाही. वास्तवीक मनुष्याच्या मानसिक क्षेत्रातच देवदेवतांचा सुळसुळाट फार. मी मनुष्य आहे आणि मला मनहि आहे, याची खात्री पटवून घ्यायला एकाद्या जेपीच्या सरटिफिकीटाची मला मुळीच जरूर नाही. शंका कुशंकांची अनेक वावटळे माझ्या मनक्षेत्रात अनेकदा उठली, तरी तेथला देवदेवतांचा थैमान कधी कमी पडला नाही. वावटळ उठले कीं तेवढ्यापुरते क्षेत्र साफ स्वच्छ व्हावे; वावटळ गेले कीं लागला देवदेवतांचा उकीरडा तेथे जमा व्हायला ! असा प्रकार कालपर्यंत अखंड चालू होता.

हिन्दुस्थानात माणसे नसती-निदान हिन्दु नसते तर कल्पनेच्या बाजारात देवाला फाटक्या पायतणावारी तरी कोणी विकत घेतला असता कीं नाही, याचीच मला शंका आहे. भगवंताचा बाजार थाटण्यासाठी देव देवता माणसांचा पाठलाग करतात कीं नाही, देवालाच माहीत. मात्र देवांचा पाठपुरावा करण्यासाठी माणसे आपल्या पाठपोटाची दामटी करताना शरमेला सुद्धा शरम कशी आणतात, याचे दाखले हिन्दूंच्या

स्वयंपाकघरापासून तो त्यांच्या सरणापर्यंत साखळीच्या दुव्यांप्रमाणे एकात एक अडकलेले कोट्यवधि दिसतील. देवासाठी माणसे का माणसांसाठी देव, या प्रश्नाचे उत्तर द्यायला देवाला तर तोंड नाहीच, पण माणसांच्या थोबाडीत भडकवली, तर बत्तिशी बरोबर सत्य बाहेर पडण्याचा पुष्कळ संभव आहे. माणसांचा बाप देव का देवांचा बाप माणूस? देव माणसांचा पाठराख्या का माणसे देवाचे बॉडीगार्ड? देव माणसांच्या अब्रूचा पालक का माणसे गब्रू देवाचे अब्रूपालक? देवाने माणूस निर्माण केला का माणसाने माणूस पैदा केला? केवळ देवाच्या मेहरबानीवर प्रजोत्पादन असते तर पुरुषाला स्त्री कशाला हवी? 'नवस सायासे कन्या पुत्र होती, मग कां (स्त्रियांना) करणे लागे पति?' इत्यादि हजारो विचारांचे भयंकर तुफान नुकतेच माझ्या मनक्षेत्रात होऊन, सत्यशोधनाचा खराटा इतका दाबून जोराने फिरला कीं प्रस्तुत क्रान्तीचे बांब हाती घेताना, मंगलाचरणाच्या नमस्कारासाठी एकाहि देव देवतेचा आज मला पत्ता लागत नाही. भावनेची दुर्बीण शक्य तितक्या श्रद्धेने ताणून मी सर्व कानेकोपरे धुंडाळून पाहिले, पण कोठेहि देवदेवताचा मागमूस नाही. काय करावे? कोणाला नमस्कार करावा? कोणम् वन्दे म्हणून गर्जना करावी? डोळे मिटून कोणाचे चिंतन करावे? कोणापुढे हात जोडावे? मोठी पंचाईत आली.

देव देवता पळाल्या कोठे?

एकाद्या रोगाची साथ येऊन मेल्या? का नुकत्याच बाहेर पडलेल्या पब्लिक सेफटी कायद्याने सर्वांच्या मोटा बांधून त्यांना हद्दपार केले? का त्यानी आपण होऊन राजीखुषीने अक्कलहुषारीने तळ्याविहिरीचा ठाव घेतला? झाले तरी काय? देव देवतांचे असे अचानक तळपट उडाल्यावर, आम्ही धर्मवान् श्रद्धावान् हिन्दूनी जगायचे कसे? नवस करायचे कोणाला? आणि केलेले फेडायचे कोणापुढे? जगायचे कोणासाठी आणि मरायचे कोणासाठी? प्लेगाची साथ येऊन गेल्यावर, गावातली घरे काही दिवस जशी निम ूषक होतात, तसे सारे हिन्दुस्थान निर्देव बनल्यास भटाभिक्षुकांची पोटे धर्मवान् हिन्दूनी कशाने तट्ट फ ुगवायची? बन्याच्या मुंजीत आणि चिंगीच्या लगनात पुण्याहवाचनासाठी कोणत्या देवाच्या नावाने वेदोक्त वा पुराणोक्त शंखध्वनि करायचा? संसाराच्या नानाविध आधीव्याधींच्या तापाच्या उष्णतेचा पारा 'नारमल' वर आणण्यासाठी कोणत्या देवाचा आंगारारूपी बर्फ आम्ही कपाळाच्या कवटीवर फासायचा? आज हिन्दुस्थानात देवांची आणि देवतांची गोचिड गर्दी आहे, ह्मणूनच आम्ही हिन्दुजन परमहंस वृत्तीने शेकडो राज्यक्रान्त्या निमूटपणे मान्य केल्या आणि आजहि गोऱ्या परदेशी राज्यकर्त्यांचे बूटप्रहार, श्रीविष्णूच्या वत्सलांच्छना प्रमाणे, आदरपूर्वक आमच्या छाताडावर सहज लीलेने धारण करीत असतो. देवांचा आह्माला पाठिंबा आणि आमचा देवाना पाठिंबा, या साट्यालोट्याबरोबरच आम्ही योगमुमुक्षु हिन्दु

गुलामगिरीच्या कोंड्याचा मांडा

डोळ्यातल्या खारट अश्रूंना गूळ साखरेची फोडणी देऊन सुखासमाधानाने खात असतो. देव आह्माला मानतात कीं नाही, देव जाणे ! पण आम्ही मात्र देवाना मानतो, म्हणूनच या हिन्दुस्थानरूपी बड्या हमालखान्यात आमच्या हमालीचे चीज करणारे रसिक राज्यकर्ते अनेक शतके आह्माला लाभत आले आहेत. देवांचेच तळपट उडाले, किंवा कोणी उडवले, तर श्रद्धावान् हिन्दु बाया बुवानी आपल्या दैवाच्या बऱ्या वाईट लीला कसल्या फोडणीच्या आमटीबरोबर भुरकून खाव्या? हव्या त्या नरकात हिन्दु सडून कुझून मेला, तरी देव मात्र कायम शिल्लक उरतो. पण देवच मेला, किंवा कोठे पळून गेला, तर धर्मवान् हिन्दूनी जगायचे कसे आणि कोठे?

बाँब २ रा

देवरोगाचा झपाटा

देव आहे कीं नाही, या प्रश्नावर आजवर पुष्कळ माथेफोड झाली, पण माथी फुटण्यापेक्षा अधिक कोणाच्याच पदरात काही पडलेले दिसत नाही. वास्तवीक खरा प्रश्न असा पाहिजे कीं

माणसाना देवाची जरूरची काय?

देवाने हे विश्व निर्माण केले, त्याचा तो पालन चालनकर्ता त्याच्या कृपेची सावली आपल्याला पाहिजेच पाहिजे. असल्या कल्पना केवळ मनाच्या निसर्गसिद्ध चवचालपणाच्या भावना होत. देवाच्या अस्तित्वाची भावना हाच मुळी एक जबरदस्त मानसिक रोग आहे, हा रोग माणसाच्या जन्माबरोबर जन्मत नसून, त्याच्या बुद्धीच्या जागृतीच्या सुरुवातीला त्याच्या हिंदु घराच्या वातावरणातच तो त्याला पछाडीत असतो. या रोगाचे जंतू मोठे हट्टी आणि मुर्दाड असतात. मलेरियाचे जंतू औषधोपचाराने आमूलाग्र ठार मारले जातात. प्लेगाचे जंतू ४ महिन्यात आपोआप मरतात. पण देव-रोगाचे जंतू मनाला एकटा चिकटले कीं माणूस सरणावर जळून खाक होईपर्यंत ते त्याला सोडीत नाहीत. देवरागाचे जंतू एकरंगी एकरूपी नसतात. ते बहुरंगी बहुरूपी असतात. त्यांची संख्यावर्धनाची शक्तीहि मोठी अचाट आहे. या रोगाचा चिकटा मनाला एकदा बसला कीं देवविषयक कल्पनांचे इतके जाडजूड पापुद्रे मनावर चढतात कीं मनच मनाला पारखे होऊन बसते. मनाचे मनपणच मरून जाते. मन म्हणजे मानवी जीवन-नौकेचे सुकाणू. तेच जर देवरोगाच्या वाळवीने पोखरून फडशा पाडले, तर ती नौका देव देव करीत कोठे कशी भडकत जाऊन, कोणत्या खडकावर हापटून फुटेल, याचा काय नेम?

मन रामीं रंगले । अवघे मनचि राम झाले ।।

ही अवस्था प्रथम दर्शन मोठी कौतुकास्पद वाटते. पण मन रामी रंगून आरपार राम झाल्यावर, खुद्द मनच बेपत्ता होते, किंवा किंचित् मवाळ भाषेत बोलायचे तर, मन रामाचे गुलाम होते, इकडे एकाहि टाळकुट्याचे लक्ष जात नाही. मनाचा निसर्ग धर्म रामाच्या पचनी पडल्यावर, मनाच्या विश्वासावर राहिलेली माणसाची जीवननौका व्यवहाराच्या वादळात हवी तशी भडकते आणि अखेर कोठे तरी आदळून फुटते. फुटलीच पाहिजे; कारण मनाचे गुणधर्म रामाच्या ठिकाणी असणे शक्य नाही. भलते चक्र भलत्या ठिकाणी लावल्यामुळे, घड्याळाच्या यंत्ररचनेलाहि जर राम म्हणावा लागतो, तर मनाच्या ठिकाणी राम ठेवल्याने मानवी जीवन पशूकोटी पलीकडे भ्रष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. देवरोगाने पछाडलेले आणि रामीं मन रंगलेले लोक- ज्याना हिन्दु लोक साधू संत स्वामी किंवा बुवा समजतात - मानवी व्यवहारापेक्षा भलतेच वेडेवाकडे अत्याचार करतात, याचे कारण हेच. कोणी नागवे फिरतात. कोणी कपडे फाडतात. धुळीत लोळतात. शेण विष्ठा खातात. वाटेल ते बडबडतात. सारांश मनुष्य प्राण्याला विसंगत अशी कृत्ये करतात. असल्या प्राण्याना वेड्यांच्या इस्पितळात ठेऊन, त्यांच्या मेंदूवर औषधयोजना करण्याऐवजी, बावळट हिन्दु त्यांचे स्तोम माजवितात. त्याला मठ बांधून देतात. त्याला देवाप्रमाणे पूजतात. त्याला नवस करतात. त्याला आरत्या ओवाळतात. त्याच्या प्रत्येक बीभत्स, वेडगळ किंवा बेमाणूसकीच्या कृत्याला चमत्कार समजतात आणि अखेर त्या मन मेलेल्या वेड्या पिरालाच देव मानून, त्याच्या कृपेसाठी आपल्या जिवाचे रान आणि अकलेचे शेण करतात. हिन्दु लोकांच्या गुरूबाजीचा उगम हा असा झालेला आहे. परंतु, देवरोगाच्या जंतूंनी सडलेल्या मेंदूच्या

भ्रष्टपणाचा हा सारा प्रकार आहे, याची एकाहि साक्षर नाक्षर हिन्दूला केव्हाच अटकळ होऊ नये, याचे कारण प्रत्येक हिन्दूचा पिण्डच मुळी या देवरोगाने पछाडलेला असतो.

बॉम्ब ३ रा

धर्माचा बाप मनुष्य

धर्मानें मनुष्य निर्माण केलेला नाहीं. मनुष्यानें धर्माला जन्म दिलेला आहे. अर्थात् धर्माचें कर्तृत्व मनुष्याची हातीं आहे. धर्माला वाटेल तें वळण देण्याचा अधिकार मनुष्याला आहे. धर्माला मनुष्यावर अरेरावी गाजवितां येत नाहीं. 'युगऱ्हासानुरूपत:' प्रत्येक नव्या काळाशी समगामी होण्याइतका लवचिकपणा जर धर्मांत नसेल, तर तो आणणें मनुष्याचें कर्तव्य आहे. आणि तो येत नसेल तर त्या धर्माला गचांडी देऊन त्या ऐवजीं (धर्मावाचून मनुष्य मरतच असेल तर) नवीन धर्माला जन्म देणें मनुष्याच्या अधिकारांतलें आहे. इसवी सनापूर्वीच्या हजार बाराशें वर्षातल्या कायद्यांची बळजबरी या २० व्या शतकांत धर्म जर मनुष्यावर करीत असेल, तर त्या शिरजोर धर्माला व त्याच्या पुरस्कर्त्यांना बेधडक फांसावर लटकवावे. मनुष्याच्या उफलत्या उत्क्रांत आकांक्षांशीं विरोध करणारा धर्म हा धर्म नसून अधर्मच होय. गुणकर्मदर्शक वर्धभेदावरून जन्मसिद्ध जातिभेदावर घसरलेला धर्म सैतानी धर्म होय. निवळ जन्माच्या अपघातावरून उच्चनीचतेची व स्पृश्यास्पृश्यतेची खेंकटीं माजविणारा धर्म गुलामांचा धर्म होय. सामाजीक संघशक्तीला आग लागली असतांहि डोळे मिटून स्वस्थ बसणारा धर्म पशूचा धर्म होय. आजचा हिंदुधर्म सैतानी आहे. त्याचें नियंत्रण सैतान करीत असतात आणि या सैतानांच्या सुलतानी कायद्यांना गुलाम हिंदू बिनतक्रार मान वाकवीत असतात. स्वतंत्र व्हावयाची इच्छा आणि पुनर्घटनेची धमक जर हिंदूंना असेल, तर प्रथम त्यानीं आपला हिंदुधर्म प्रगमनशील, मिलिटंट (संग्रामशील) आणि कट्टा मिशनरी स्पिरीटचा बनवावा. जुन्या पुराण्या श्रुतिस्मृतींच्या चिंध्यांच्या भांडवलावर अत:पर चालूं धकाधकीचा मामला भागणार नाहीं. धर्मांतच साम्राज्य-नेतृत्वाचे वारें सणाणल्याशिवाय नुसत्या स्वराज्याच्या वल्गनांनी काय होणार आहे? जन्मल्यापासून मरेपर्यंत धर्माच्या भल्या बुऱ्या अनुज्ञेप्रमाणें कमी जास्त श्वासोच्छ्वास करण्याची गुलामगिरी हाडींमासीं खिळलेल्या हिंदूंचा धर्मच जेव्हां मर्द, तापट व संग्रामशील बनेल, तेव्हांच त्याचें सामाजीक क्षेत्रउज्वल होऊन, राजकारणाच्या क्षेत्रांत तो आपल्या प्रतिस्पर्ध्यांशी सामना देण्यास तुल्यबली होईल. एरवीं कदापि नव्हे.

बॉम्ब ४ था

धर्म आणि गुलामगिरी

नीट बारकाईनें विचार केला तर जगाच्या गुलामगिरीचा नरक जिवंत ठेवणारें एखादें 'फॅड' जर कोणते असेलतर तें धर्म होय. धर्माच्या नावाखालीं जगानें गुलामाचा जेवढा व्यापार केला आहे, तितका एकाहि सत्ताबाज अरेरावानें केलेला नाहीं. धर्म माणसाला मोक्ष देतो, ही गोष्ट खरी खोटी धर्म जाणें. पण धर्मानें आजपर्यंत गुलामगिरींत जितकी जिवंत माणसें ठार मारलीं असतील, तितकीहि रोगराइनेंहि मेलीं नसतील. राजकारणी गुलामगिरी घराच्या ओसरीखालींच थबकते, पण धार्मिक गुलामगिरी नुकत्याच जन्मलेल्या पोराच्या नाळवारीला सुद्धां जाऊन भिडते. राजकारणी गुलामगिरीचा सांपळा फार झाले तर जित राष्ट्रांतल्या सर्व संपत्तीच्या स्वाहाकाराबरोबर तेथले दगड धोंडे माती सुद्धां पिळून मळून खाईल

पण धर्माच्या गुलामगिरीच्या चरकांत माणूस जिता असूनहि मेल्याप्रमाणें चिपाड कसा बनतो, हें हिंदु समाजाच्या वर्तमान चित्रावरून वाटेल त्यानें पाहून घ्यावे. जेत्यांचे राजकारण जितांच्या खिशांपर्यंत आपला बहाद्दर नांगर घुसडवीत नेईल, पण धर्माच्या गुलामगिरीची करवती भिंगरी माणसाच्या मनाच्या चिंधड्या उडविण्यास पुरी सवकलेली आहे. म्हणूनच जगांतल्या क्रांतीपूर्वकालीन् वाङ्मयाचा इतिहास पाहिला तर त्याचा पहिला निकराचा हल्ला भिक्षुकशाहीवर उर्फ धर्ममार्तंडब्रुव वर्गावरच चढविलेला आढळतो. मनुष्याला पाठीपेक्षां पोटाची काळजी फार. पाठीवर मारा पण पोटावर मारूं नका, असें प्रत्येकजण म्हणतो. तद्वतच गुलामगिरीचा मारा देहावर झाला तर खुशाल होवो, पण मनाला त्याचा वारा सुद्धां लागूं देता कामा नये. पण भिक्षुकशाहीचें पोट माणसांच्या मनाच्या सरणावरच जगणारें असल्यामुळें, राष्ट्राच्या गुलामगिरीच्या जबाबदारीचा मोठा भाग सरळ रेषेंत या धर्ममार्तंडांकडेच जातो. धर्म म्हणजेच गुलागिरी, किंबहुना गुलामगिरीलाच धर्म हा प्रतिशब्द योजला तर 'गुलाम हिंदुस्थान' या शब्दप्रयोगाऐवजी 'धार्मिक हिंदुस्थान' ही शब्दयोजना खुशाल करावी.

मानवी प्रगतीला धर्म जर आड येत असेल आणि त्याची पुनर्घटना होण्याइतकी लवचिकता जर त्यांत शिल्लक उरलेली नसेल, तर लोकहितवादासाठीं धर्मालाही भिक्षुकशाहीच्या मढ्याबरोबर बिनदिक्कत जाळून पोळून खाक केल्यास कांहीं हरकत नाहीं.

बॉम्ब ५ वा

'अहम् ब्रह्मास्मि' म्हणजे काय?

'अहं ब्रह्मास्मि' या संस्कृत शब्दद्वयाचा अर्थ 'मीच स्वतः ब्रह्म आहे' 'ब्रह्म' शब्दाचा अर्थ लावण्याच्या निमित्ताने, अनेक विद्वानानी आपल्या अकलेला तणावे देऊन, मोठमोठे ग्रंथ लिहिले आहेत. ब्रह्म आणि मायेच्या त्या तमाशेवजा ब्रह्मघोटाळ्यात आपल्या विवेकाला गिरक्या भिरक्या देण्याचे मुळीच प्रयोजन नाही. वेदांत्यांचे ते ब्रह्म-मायेचे जलसे त्यांच्याच जीवनाच्या कर्मकटकटी निपटण्यास नालायक ठरलेले आपण उघड्या डोळ्यानी पहातो, तर त्यात आपण पुन्हा तीच चिवडाचिवड करीत बसण्यात कोणता शहाणपणा? शिवाय, या पंडिताना ब्रह्माचा जर आद्यंत उमगला आणि मायेचा शेंडाबुडखा गवसला, तर त्यांच्या या सत्यशोधनाने जगाच्या- किंवा या चिमुकत्या हिंदुस्थानाच्या-आचार-विचार-क्रान्तीत काय भर टाकली? ज्यांना ब्रह्म उमगले आणि अहम् ब्रह्मास्मि हा साक्षात्कार प्रत्यक्ष पटला, ते मुसलमानांच्या आणि इंग्रेजांच्या गुलामगिरीतच कां सडून कुझून मेले? अहम् ब्रह्मास्मि बनलेल्या मंडळींच्या हातून, बाष्कळ वेदान्ती बडबडीपेक्षा त्यांच्या भगतगणाना कोणता मोक्ष लाभला? माणुसकीला साजेशोभेसा कोणता अचाट पराक्रम वेदांत्यानी आजपर्यंत गाजविला? किती धर्मक्रांत्या समाजक्रांत्या आणि अखेर राज्यक्रांत्या घडवून आणून, - जगाचा इतिहास चुलीत गेला! हिंदुस्थानाच्या इतिहासात आपले नाव अजरामर केले? नुसते भाराभर ग्रंथ आणि गाडाभर टीका लिहिल्याने काय होणार? आजच्या मुद्रण-सुकरतेच्या युगात हे कारकुंडे कर्म आज हवा तो रेम्याडोक्या फुंकरासरसा शतपटीने करून दाखवितो. ज्यांना ब्रह्म उमगले आणि अहम् ब्रह्मास्मि हा साक्षात्कार प्रत्ययाला आला, ते सारे लूत लागलेल्या कुत्र्याप्रमाणे, थोबाड-वटवटीचा शंखध्वनि करीत, पोटाशी पाय आवळून, परक्यांच्या गुलामगिरीत, फाटक्या कफनीच्या चिंध्यात, अन्नान्न करून कां मेले? ब्रह्मसाक्षात्काराचे मळे हिंदुस्थानातच विकायचे, कारण हिन्दुस्थान ही अध्यात्मभूमि आहे, असल्या वलाना करणाऱ्या

लोकांचा कान पकडून- शक्य असल्यास मुस्कटातहि भडकवून- असे विचारले पाहिजे की माणशी गाढवांनों, ब्रह्म म्हणजे हिंदुस्थानाच्या परसातली भाजी, तर हा देश शतकानुशतके परक्यांच्या लाथा खात गुलामगिरीत कां पिचत पडला आहे? ब्रह्मसाक्षात्कार झालेल्या आचार्य महंत परमहंस संतांचे थवेच्या थवे या देशात ढेकूण चिलटासारखे उमाप पिकूनहि येथील सर्व लोक अन्नाला मोताद व्हावे, ढुंगण झाकण्यापुरते त्यांना वस्त्रहि मिळू नये, सुशिक्षितांना हमालीहि मिळू नये, बायकांची अब्रू राखण्याइतकाहि मर्दुमकीचा थेंब पुरुषांच्या मनगटात शिल्लक उरू नये, असले कसले हे तुमचे पागल ब्रह्म? आणि कशाला मारता माकडांनो, अहम् ब्रह्मास्मीच्या बाता?

बॉम्ब ६ वा

क्रान्ति मर्दाची, शान्ति मुर्द्याची

मूठभर मीठ आणि पोटभर भाकरीला महाग झालेल्या आजच्या हिंदुस्थानाला स्वत:च्या पोटाच्या विश्वापलीकडे पहाण्याची शक्ति जरी नसली, तरी विश्वाच्या पोटांतील चमत्कार हुडकिण्यासाठी युरप अमेरिकेसारख्या समृद्ध देशांतील खगोलज्ञ लोक रात्रंदिवस परिश्रम करीत आहेत. केवळ अंतरीक्षांतील चमत्कारच नव्हे, तर या सृष्टीच्या निसर्ग धर्मांतील गूढ रहस्याना सुद्धा हुडकून काढून, त्यांचा मानवी सुखवर्धनासाठी उपयोग करण्यात संशोधक विद्वानांच्या पिढ्यान् पिढ्या खर्ची पडल्या आहेत, आणि सध्या पडत आहेत हिंदुस्थानात प्रोफेसर सर जगदीश चंद्र बोस यांनी वनस्पतींच्या जीवन-संवेदना विषयी लावलेले शोध, आणि युरोपात बिनतारी तारायंत्राने केलेली अचाट क्रान्ति, इत्यादि परिणाम नीट विचारात घेतले तर बुद्धिमान् मानवांच्या या सर्व धडपडी कशासाठी चालल्या आहेत? हा प्रश्न प्रामुख्याने आपल्यापुढे येतो. लक्षावधि मैल अंतरावर असणाऱ्या अंतराळातील सूर्य चंद्र शनि मंगळाचे खास फोटो काढून, त्यांवर काय काय भानगडी चालल्या असाव्या, त्या कोण करीत असाव्या, इत्यादि धाडशी प्रयोगापासून तों केवळ वातावरणाच्या लहरींतून पाताळवासी अमेरिकन मित्राशी बिनतारी टेलिफोनचे खास संभाषण करण्यापर्यंत, माणसानी निसर्गावर जी हातखंडा मोहीम चालविली आहे, तिची अखेर तरी कशात होणार? बॉम्ब हावित्झर टॉरपेडो ड्रेडनॉट विमाने वगैरे मानवसंहाराच्या साधनांचीहि मुबलक पैदास करण्यात माणसांचा आटारेटा रात्रंदिवस चालूच आहे. घरबसल्या चुटकी वाजविताच अनेक अक्षौहिणी सेना ठिकच्या ठिकाणी गारद करणारे मंत्र तंत्र वा यंत्र शोधून काढण्यातहि अनेक खंदे संशोधक आपली बुद्धी आणि आयुष्य खर्ची घालीत आहेत. या सर्व संशोधक महाभागाना विचारलें कीं 'ही सारी खटपट आणि धडपड तुम्ही कशासाठी चालविली आहे? तर ते झटकन् उत्तर देतात कीं,

''जगात शांति प्रस्थापित करण्यासाठी''

तलवार चालवून मानवी रक्तपाताच्या पुण्याईवर परदेशांना गुलागिरीत जखडून टाकणारे शहाणेसुद्धा आपल्या अत्याचारांचे मण्डण शांतीच्या सबबीनेच करतात. महायुद्धे कशासाठी? तर म्हणे जगात शांति प्रस्थापित करण्यासाठी. रक्तपात कशासाठी? तर रक्तपात थांबविण्यासाठी. काट्याने काटा काढता आला, तरी त्याने जखमा बऱ्या होत नसतात! म्हणजे विषप्रयोग करून विष उतरणारे देवदूतच हे म्हणायचे! रक्तपात अत्याचार मुस्कटदाबी इत्यादि साधनानी परदेशांवर राज्य करणाऱ्या उपटशुंभ राज्यकर्त्यांनी 'आम्ही हे सर्व शांतिसाठी करीत आहों' असल्या वल्गना करणे, म्हणजे घराला लागलेली आग पेट्रोलचे डबे ओतून विझविण्याचा प्रयत्न करण्याइतकेच बाष्कळपणाचे आहे. आज हिंदुस्थानात

ब्रिटीश नोकरशाहीची जी सोटेबारगिरी चालू आहे, तीसुद्धा ते म्हणतात ''पीस ॲण्ड ऑर्डर'' (शांति आणि शिस्त) साठीच. त्यांचा तो ''पीस'' ऊर्फ शांति जी चीज तरी काय असावी? शांतीची शांतता थंडीच्या कडाक्याप्रमाणे सर्वत्र फैलावली, म्हणजे काय होणार? काय रामेश्वर उठून काश्मिरला जाणार, सगळे भिकारी टाटा बनणार, हिन्दु लोक गोरे बनणार, साहेब लोक काळे अदमी बनणार, दारूचे अमृत होणार, पाण्याऐवजी दुधाचा पाऊस पडणार, टाकसाळीत मुक्तद्वार द्रव्य लुटले जाणार, बायांचे बुवा होणार? होणार तरी काय? शान्ति म्हणजे कायमची निवांती. मग कसली खटपट नाही, धडपड नाही, काही नाही. शांति मिळाली कीं मग जन्म तरी कसला आणि मृत्यु तरी कसला? शांतीचे स्थान म्हणजे मसणवटी. तेथे मात्र 'पीस' आणि 'ऑर्डर' नांदते खरी. 'हिंदुस्थानात पीस आणि ऑर्डर प्रस्थापित करावयाची आहे' या महावाक्याचा स्पष्टार्थ

''हिंदुस्थानाची मसणवटी बनवायची आहे''

असाच होतो. माणूस मेला म्हणजे त्याला शांति मिळते. फलाण्याला 'आत्म्याला शांति मिळो!' ही प्रार्थना कोणीहि जिता माणूस कोणाच्या जिवंतपणी करीत नाही. जिवंतपणा हा शांतीसाठी मुळीं नाहीच. अर्थात् शांतीसाठी धडपडणारी तडफडणारी राष्ट्रे आपल्या जीवाला कंटाळलेली आणि मृत्यूसाठी चवताळलेली असली पाहिजेत एक, अथवा लबाड बोलून भोळ्या भाबड्यांना फसविणारी सोनेरी टोळी असली पाहिजेत; या पेक्षा तिसरा कयासच संभवत नाही. चिरकालीक शांतीच मिळवायची तर जे काम सोमलाच्या एका पुडीने, किंवा तळ्याविहिरीतल्या एका बुडीनेहि सफाईत साधते, त्यासाठी चमत्कार शोधनाचा आटारेटा कशाला, जिनीवाची लीग ऑफ नेशन्स कशाला, हिदुस्थानांत रॉयल कमिशने कशाला आणि बिनचौकशी कैदेचे कायदे तरी कशाला? मध्यवर्ति दिल्लीच्या बुरुजावरून चौफेर हजार मैली हॉवित्झरचा मुल्खमैदानी मारा केला कीं चोवीस तासात अखिल भरतखंडात शांतीच शांति ! शांतिसूक्ते म्हणायला सुद्धा कोणी जिता जीव सापडणार नाही ! अशा शांत अवस्थेत शांतिसम्राट म्हणून दिल्लीच्या तक्तावर बसायला कोणाचे प्रेत तयार होईल, ते तरी कोणाच्या शांत थंडगार प्रेताने जाहीर करावे? आसेतु हिमाचल पीसच पीस आणि ऑर्डरच ऑर्डर!

शान्ति का क्रान्ति?

विधात्याने हे अनंत विश्व आणि ही नाना रत्नांनि वसुंधरा निर्माण केली, ती जर केवळ शांतीसाठीच असती, तर पृथ्वीला आणि अंतराळातल्या अगणित ग्रहताऱ्यांना नियमित गतियुक्त करून त्याना सूर्याभोवती वणवण भटकायला त्याने लावलेच असते कशाला? चंद्राची क्षयवृद्धी कशाला आणि समुद्राची भरती आहोटी तरी कशाला? तुफाने कशाला? धरणीकंप कशाला? चंद्र सूर्याची ग्रहणे कशाला? ज्वालामुखीचा अग्निप्रलय कशाला? आणि जन्ममृत्यु तरी कशाला? माणसांप्रमाणेच जर विश्वविधाता शांतीचा भोक्ता असता, शांति हेच त्याच्या विश्वनिर्मितीचे ध्येय असते, तर त्याने या विश्वाचा कायमचा एक जड ठोकळा रचून ठेवला असता कीं काम भागले असते! मग काय शांतीचा शांति! ना कोठे धडपड का ना कोठे काही गडबड. सर्व शांत निवांत! म्युझियममध्ये सृष्टीचे शेकडो देखावे हुबेहूब करून मांडलेले असतात. तसला प्रकार दिसला असता. म्यूझियममधला ज्वालामुखीचा देखावा साक्षात् अग्निप्रळयाचा दिसतो. पण तो काही म्यूझियमची इमारत जाळून खाक करीत नाही. केव्हाहि पाहिले तरी तोच धुराचा लोट, तोच अग्नीचा वर्षाव! प्रत्यक्ष त्याला हात लावला तरी हात

भाजत नाही, जळत नाही. मातीचे ढेकूळ ! थंडगार. अगदी शांत. तेथील प्रदर्शनात मोठमोठे सिंह वाघ सर्प ठेवलेले असतात. ते सुद्धा अगदी हुबेहूब जित्याप्रमाणे दिसतात. आता आपल्यावर झडप घालतील कीं काय असा भास होतो. पण जित्यांचा जिवंतपणा त्यात नसतो. ते थंडगार, शांत असतात. कारण ते मेलेले मुर्दे असतात. विश्वविधात्याने या अनंत सृष्टीच्या सनातन चालनेसाठी प्रत्येक अणुरेणूत जी एक वर्णनातीत प्राणज्योत उजळून ठेविली आहे, ती या मुर्द्यांत विझालेली असते. ती विझाली, किंवा कोणी विझविली, तेव्हा ते सिंह वाघ शांत झाले. त्यांचे मुर्दे पडले. ते मेले. त्याना 'पीस' मिळाला आणि मग त्यांच्या मुर्द्यांना ही प्रदर्शनांतील 'ऑर्डर' म्हणजे सुव्यवस्था लाभली.

शांति मुर्द्याची, क्रांति मर्दाची

जित्या मर्दाने क्रांति करावी, मेल्या मुर्द्याने शांति वरावी. क्रांति माणसाची, शांति मसणाची. हा निसर्गाचा सनातन धर्म आहे. विश्वरचनेचे ध्येय आहे. विश्वातली अगम्य प्राणज्योत क्रांतीसाठी धडधडत असते, शांतीसाठी नव्हे.

बाँब ७ वा

क्रांतिपूर्वीचे वाङ्मय

क्रांतीचा कडकडाट होण्यापूर्वीचे चैतन्याचें वारें आगदींच न्यारे असतें, हें वारें प्रथम गद्यपद्यात्मक वाङ्मयाच्या द्वारें व्यक्त होऊं लागतातंच, राष्ट्राच्या विचार क्षेत्रांत मोठमोठी तुफानें सुरूं होतात. शेंकडों वर्षे गर्वानें ताठ उभे असलेले सिद्धांताचे पर्वत आमूलाग्र भराभर उखडले जातात. देव देव म्हणून मिरवलेलें अनेक सत्ता बाजीचें मानवी दगड धोंडे या वाङ्मयाच्या सोसाट्यापुढें चकणाचूर होतात. धार्मिक सामाजिक व राजकीय स्थैर्याच्या सबबीवर अस्तित्वांत आलेल्या अनेक बंधनांचे बंद तटातट तुटतात. मनुष्यांच्या भावनांवर बाजलेली मानसिक गुलामगिरीच्या गंजाचीं दाट पुटें भडाभड कोंसळून खालीं पडतात. बहुजन समाजाच्या अज्ञानावर पोळांप्रमाणे चरणाऱ्या वर्चस्वबाज समाजांच्या प्रतिष्ठेला दिवसा ढवळ्या आगी लागतात. जुन्या पुराणया धर्ममतांच्या चर्पटपंजरीवर आपली धर्ममार्तंडगिरी टिकवू पाहणाऱ्याच्या बत्तिशा निखळून पडतात. क्रांतीपूर्वकालीन् वाङ्मयाच्या चैतन्याचा सोसाटाच इतका विलक्षण असतो कीं त्यापुढें राजकीय सत्तेच्या मुसंडीलाच ठोंकर खावी लागते; धर्मगुरूंची भगवीं वस्त्रें भडाड पेट घेतात आणि सामाजिक क्षेत्रांतल्या जीर्ण मतवाद्यांची व लफंग्या पुढाकाऱ्यांचीं कंबरडी लंजूर होऊन सांदीला पडतात. या सिद्धांतांना जगाच्या इतिहासांत अनेक पुराव्याचे दाखले आहेत. युरपियन राष्ट्रांच्या उलथापालथीचा गेल्या दोन अडीचशें वर्षांपासून तों परवाच्या महायुद्धापर्यंतचा इतिहास म्हणजे 'क्रांतिशिवाय तरणोपाय नाही' याचा सिद्धांताचा दर्शक आहे. राष्ट्राच्या भावी निकट पुनरुज्जीवनाला सहाय्यभूत होणारें क्रांतीपूर्वकालीन् वाङ्मय जात्याच बंधविमोचनाच्या महत्वाकांक्षेनें फुरफुरत असल्यामुळें दादोबांचे व्याकरणी नियम तें बेधडक लाथाडीत पुढें सरसावणारे असतें. त्याला कादंबरीचा नटवेपणा, नाटकांतला कृत्रिम शाब्दिक मर्दपणा, दरबारी भाषेचा चोंबडेपणा, लॉयल सुर्वंटांचा 'यस प्लीज' पणा, वर्तमान दे. भ. चा दांभिकपणा किंवा नान कापरेटरांचा (Non-co-operator) अनत्याचारी आततायीपणा बिलकूल मानवत नाहीं. शिष्ट - मग ते कोठच्याहि क्षेत्रांतले असोत - त्यांच्या शिष्टाईलाच जिवंत गाडण्याचा ज्या वाङमयाचा उद्देश, तें शिष्टांची काय पर्वा बाळगणार? जें बापाला बाप म्हणणार नाहीं ते चुलत्याला काका म्हणेल होय? क्रांतिपूर्वकालीन् वाङ्मय

म्हणजे राष्ट्राच्या काळजापर्यंत थेट जाऊन भिडणारा अनिरुद्ध शोधनप्रकाश ! कोण कोण दगडधोंडे देव बनले आहे, आणि कोण कोण टगे सभ्यपणाच्या बुरख्याखालीं वावरत ओत, हें त्यांस पूर्ण कळत असल्यामुळें, अनेक मानवी देवांना खेटारांची पाद्यपूजा व शेंकडों सभ्यांना भर चव्हाट्यावर पैजारांचा आहेर द्यायला त्याने मागें पुढें कां पहावें?

□□□

लेख

शिवशाहीची चिकित्सा

मुजरा १ ला

शिवशाहीची चिकित्सा हा विषय गेली १२-१५ वर्षे माझ्या विचारक्षेत्रात धुमाकूळ घालीत आहे. किंबहुना कै. बाळ गंगाधर टिळकानी शिवाजी उत्सवाची कल्पना काही विशेष धोरणाने काढल्या दिवसापासूनच माझे विचारयंत्र चिकित्सेच्या बाजूने विशेष गरगरू लागले. उत्सवाची कल्पना, त्याची उघड व गुप्त धोरणे, उत्सवाच कार्यक्रम, लोकांच्या व राज्यकर्त्यांच्या उत्सवाविषयी परस्परविरुद्ध भावना आणि उत्सवामुळे लोकांच्या मनावर होत चाललेले चमत्कारीक प्रत्यक्ष परिणाम, इत्यादि बाबींचाहि मी चिकित्सक दृष्टीने बराच विचार केलेला आहे. अनेक देशी परदेशी विद्वान् संशोधकांच्या चिकित्सेच्या चाळणीतून चाळून गाळून शिवाजीचा इतिहास आज अनेक निरनिराळ्या तपशीलानी महाराष्ट्रापुढे वावरत आहे. प्रत्येकजण शिवाजीला आपापल्या वैयक्तिक चष्म्यातून पाहून, शिवशाहीबद्दल भिन्नभिन्न सिद्धान्तांची पैदास करीत आहे. युरपस्थ परदेशी संशोधक शिवाजीकडे 'लुटारू' या एकच दृष्टीने पहात आहेत; तर आमचे देशी-विशेषतः महाराष्ट्रीय संशोधक शिवाजीला शक्य त्या भडक रंगांत रंगवून, त्याला थेट परमेश्वरकोटीच्या कोंदणात नेऊन बसवीत आहेत. परदेशी चिकित्सक एकरंगी, तर देशी संशोधक अनेकरंगी ! ज्याची जशी भावना, जसा संप्रदाय, जसा राजकारणी अगर समाजकारणी पंथ, अथवा जसे व्यावहारीक धोरण, त्याप्रमाणे जो तो शिवशाहीच्या उपलब्ध आणि अपुऱ्या ऐतिहासिक साहित्यांतून हवे तसे हवे ते सिद्धान्त काढीत आहे. पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना असली आणि विचार-स्वातंत्र्याच्या दृष्टीने कोणी कितीहि भिन्न दृष्टीकोणाचा आग्रह धरिला, तरी शिवाजीसारख्या राष्ट्रवीराला एकाद्या तुकोबाच्या टाळांचा टाळकरी किंवा केवळ यदृच्छेचा अगर ईश्वरी लालेचा परिणाम ठरविणे मूर्खपणाशिवाय अन्य क्षेत्रांत पडणे शक्य नाही. ''मल्लां वज्र गमे'' या कव्युक्तीप्रमाणे शिवाजी तत्कालीन व निरनिराळ्या भावनांच्या सद्य:कालीन् लोकाना कितीहि नानारंगी दिसला अगर भासला, तरी ऐतिहासिक चिकित्सेच्या न्यायनिष्ठूर दृष्टीला हा असला भावनाप्रधान प्रेमाचा प्रकार मुळीच मानवत नाही. शिवाजीने स्वराज्य स्थापन केले, आणि हिन्दु मऱ्हाठ्यांचा राजकारणी मगदूर वाढविला, एकढ्याच सबबीवर त्याला सर्वगुणसंपन्नत्वाचे सर्टिफिकीट देऊन, त्याला थेट देवकोटीला चढविणे, पुराणाच्या पचनी पडले, तरी इतिहासाला ते क्षणभरहि मान्य होणार नाही;

आणि नुसत्या भावनावशतेच्या भडक रंगांत रंगविलले शिवाजीचे चरित्र पुराण किंवा काव्य म्हणून श्रद्धाळू बुवाबायाना कितीहि 'चखोट' लागत असले, तरी राष्ट्राच्या घटनेच्या कामी त्याचा मुळीच काही उपयोग होऊ शकत नाही.

जसजसा काळ जात आहे, तसतसा शिवाजी आणि शिवशाहीविषयीच्या आदराचा पारा हळूहळू वरवर चढत आहे. नुसता आदर वाटणे-ही बाब कितीहि श्रेयस्कर असली, तरी त्या आदराचा पार्श्वभाग जर केवळ अंधश्रद्धेचा, उपयुक्ततावादाचा (Utilitarian Policy), अथवा भावनावशतेचा असेल, तर असला आदर न वाढला तरी पत्करला. शिवाजीविषयी आदराचे प्रकार अथवा पार्श्वभाग अनेक आहेत. इतर प्रांतीय लोक शिवाजीकडे 'महाराष्ट्रात मऱ्हाठ्यांचे स्वराज्य स्थापन करणारा शूर मऱ्हाठा वीर' एवढ्याच दृष्टीने पाहून, त्याच्या स्मृतीचा गौरव करतात. गेली २५ वर्षे हिन्दुस्थानात स्वराज्याची चळवळ सुरू असल्यामुळे तर या गौरवाचा भाव इतर प्रांतांत बराच वाढलेला आहे. त्यात आत्मभाव किंवा आत्मियत्वाचा चटका जवळ जवळ नाहीच. भावी हिन्दवी स्वराज्याच्या प्राप्तीसाठी मऱ्हाठ्यांची सहानुभूति कायम ठेवण्यासाठी शिवाजीचे नांव हे एक मोठे आकर्षण आहे. एरवी, काव्यकल्पतरू बंगाल्याना, हुल्लडखोर पंजाब्याना, तागडीतुकाप्पा गुजराथ्याना आणि जिव्हाचांचल्यपटु मद्राशाना शिवाजी आणि शिवशाहीबद्दल आत्मियत्वाच्या चटक्याचा आदर उत्पन्न होण्याहतकी काय सामुग्री त्यांना मिळाली आहे? मुळीच काही नाही. राजारामानंतरचा छत्रपति कोण ? तर बाजीराव; आणि पानपतचे युद्धात मऱ्हाठशाही बुडाली; असल्या मूर्खपणाच्या ऐतिहासिक माहितीवर उभारलेला परप्रांतियांचा शिवाजीविषयी आदर केवळ तकलादीच होय. कित्येक मऱ्हाठेतर लेखकानी हिंदी भाषेत लिहिलेले शिवाजीचे इतिहास पाहिले, की इंग्रेजी इतिहासकारांच्या ओंजळीने पाणी पिणाऱ्या या परप्रत्ययनेय शिवभाविकांच्या लवचिक मनोवृत्तीची कीव करावीशी वाटते. खुद्द मऱ्हाठ्यांकडे पाहिले, तर त्याना शिवाजी पुढे आज परमेश्वराचीहि किंमत वाटेनाशी झालेली आहे. आत्मियत्वाचा चटका मऱ्हाठ्यांच्या पुरता अगदी उतास गेलेला आढळतो. इतिहास संशोधन आणि चिकित्सेच्या क्षेत्रांत अनेक मऱ्हाठ्यानी अलीकडे कितीहि स्तुत्य कामगिरी केलेली असली, तरी पौराणिकी थाटाने लिहिल्या गेलेल्या बखरीतील भाकडकथांची भावनावशता मऱ्हाठ्यांच्या पिण्डी ते ब्रह्माण्डी दाट चिकटून बसलेली आहे. विचारांत घेण्यासारखा तिसरा वर्ग म्हणजे आमच्या इंग्रेजी राज्यकर्त्यांचा त्यांच्या बद्दल थोडा विशेष खुलासा करणे प्राप्त आहे.

सन १९१४ सालापर्यंत इंग्रेज लोक आणि त्यांची भारतीय नोकरशाही शि-वा-जी या तीन अक्षरांच्या नुसत्या उच्चाराने भयंकर भेदरून जात असे. शिवाजी शब्द उच्चारणारा, शिवाजीची तसबीर घरात ठेवणारा आणि ओसाड घराच्या भिंतीवर शिवाजीचे चित्र रेखाटणारा म्हणजे इंग्रजांचे राज्य गुप्त सुरूंगाने उध्वस्त करणारा 'गाय फॉक्स' असे या मतिमंद मुत्सद्याना वाटत असे. इतकेच नव्हे तर वरील महापातके करणाऱ्या सर्व 'गुप्त कटवाल्याना' ब्रिटिश इंडियन पिनल कोडाने तुरुंगाची आणि अंदमानाचीहि वाट दाखविण्यास कमी केलेले नाही.

१८५७ चा स्वराज्य-पुनरुज्जीवनाचा अखिल भारतीयांचा विराट प्रयत्न फसल्या दिवसापासून तो कै. टिळक चिपळूणकर आगरकर ही मऱ्हाठी त्रयी उदयास येईपर्यंतचा काळ मूर्छनेचा काळ होय. या काळात मऱ्हाठ्याना शिवाजी आठवला नाही, तानाजी उमगला नाही, की बाजीप्रभूचे स्मरण झाले नाही.

खावे प्याचे निजावे उठावे, उदरनिर्वाहाची थोडी खटपट करावी, 'देवी श्री विक्तुरिया सार्वभौमिनी'चे पोवाडे गावे, यापलीकडे कोणाची काहीच दिनचर्या नव्हती. राणीचे राज्य म्हणजे रामराज्य मानून ही सर्व भारतीय माकडे प्राप्त गुलामगिरीचे गोडवे गाण्यात गर्क होती. मूर्छनेच्या काळझोपेंतून मऱ्हाठ्याना गदगदा हालवून जागे करण्याची कामगिरी टिळक कंपूने केली. त्यांच्या महाराष्ट्र-जागृतीच्या अनेकांगी चळवळींत 'शिवाजी उत्सव' ही एक महत्वाची बाब होती. यद्यपि टिळककंपूच्या शिवाजीउत्सवाचे परिणाम हिन्दु संघटित करण्याच्या किंवा प्रत्यक्ष स्वराज्योत्पादनाच्या कामांत वांझोटे ठरले, तरी ब्रिटीश सत्ता या उत्सवामुळे उलथून पडते की काय, अशा पोरकट भीतीने इंग्रेजी नोकर शाहीने हिंदुस्थानात व विशेषतः महारष्ट्रात सोटेशाहीचे घातलेले धिंगाणे वर्तमान इतिहासात नमूद आहेत. टोणग्याला जशी तांबडी चिंधी, तसा जो शिवाजी शब्द ब्रिटिशाना हिन्दुस्थानात एक भयंकर बुजगावणे होऊन बसला होता, त्याच शिवाजीच्या स्मारकाच्या कोणाशिळेपुढे इंग्लंडच्या भावी नृपतीने टोपी कादून मुजरा केला! हा चमत्कार कशाने घडून आला? अंधश्रद्धाळू भाविक जन खास म्हणतील की 'हा शिवरायाचा पुण्यप्रभाव!' किंवा 'काळाची करणी'! त्या बिचाऱ्याना काळाची करणी हवी तेव्हां दिसते, पण करणीचे काळ मात्र केव्हाहि दिसत नाहीत! म्हणूनच आजच्या महाराष्ट्राची भारतीय राजकारणात कवडी किंमत होऊन बसली आहे, आणि समाज व धर्मकारणांत तोंडाच्या वटवटीपुढे या सरडोक्यांची मजल जात नाहीशी झालेली आहे.

सन १९१४ सालच्या पंचवार्षिक युरपियन महायुद्धाने सर्व जगाच्या आचारविचारांत क्रान्तीचे अनेक चमत्कार घडवून आणले. ब्रिटीश नोकरशाहीला शिवाजीविषयी अवचित फुटलेला आदराचा पान्हा, हा एक विचार करण्यासारखा मोठा चमत्कार आहे. या चमत्काराची निष्पत्ति अनेक देशी व परदेशी परिस्थितींच्या उपयुक्ततावादांत झालेली आहे. त्यात (१) महायुद्धाच्या यज्ञकुण्डात बलीदानासाठी अगत्य लागणाऱ्या मराठ्यांची सैन्य भरती; (२) ब्राह्मणेतर चळवळीला उचलून धरून, मागासलेल्या अफाट जनतेबद्दल सरकारला वाटत असलेल्या सहानुभूतीचे प्रदर्शन; (३) अखिल भरतखंडात फैलावलेल्या राजकारणी असंतोषावर स्वयंनिर्णयाच्या मृगनलाचा वर्षाव करून, भारतीय मुत्सद्यानाहि 'साम्राज्यनिष्ठे' चा पाझर फोडण्याची आंग्रेजी चतुराई, हे तीन महत्वाचे मुद्दे होते. या तीन मुद्यांचे किंचित् विस्ताराने स्पष्टीकरण केल्याशिवाय, शिवाजीविषयी ब्रिटीश नोकरशाहीच्या बदललेल्या दृष्टीकोणाचे मर्म सहसा कोणाच्या लक्षात येणार नाही.

(१) युरपियन महायुद्धाच्या जगड्व्याळपणाबद्दल प्रथम प्रथम ब्रिटीश मुत्सद्याना निश्चित अनुमान काहीच झाले नाही. ऑस्ट्रियाच्या राजपुत्राचा खून होतो काय आणि तब्बल पाच वर्षे साऱ्या जगाच्या लष्करी सामर्थ्याचा युरपच्या समरभूमीवर धिंगाणा माजतो काय! असा चमत्कार न भूतो न भविष्यति! खूनोत्पादक लढाईची ही चकमक फार फार तर ४-६ महिन्यात खलास होईल, अशीच सर्व ब्रिटीश बृहस्पतींची अटकळ होती. ब्रिटीशांचे लष्करी सामर्थ्य जरी प्रतिस्पर्ध्याच्या तयारीच्या मानाने अगदीच कुचकामी होते, तरी प्रत्यक्ष सामर्थ्यापेक्षा नुसत्या राजकारणी दमधाटीच्या आणि स्वयंमान्य दादागिरीच्या दगलबाजीवर ब्रिटीशांचा आजवर मोठा विश्वास! जो मुकाबला इतर । पाश्चात्य पौर्वात्य राष्ट्रे हजार सैनिकांच्या बलीदानाने साध्य करू शकतात, तोच मुकाबला आपण डावपेचांच्या पाचशे शब्दांच्या सरबत्तीने हासत खेळत सिद्ध करू शकतो, असा, स्पानिश आरमाडाच्या काकतालीय

-विजयापासून, ब्रिटीश राष्ट्राला मोठ्या घमेंडीचा आत्मविश्वास होता. युरपियन महायुद्धाचा वणवा जसजसा भडकू लागला, तसतसा हा आत्मविश्वास ठिकच्या ठिकाणी करपू लागला. युद्धमंत्री समरपटु लॉर्ड किचनेर यानी 'हे लहानसहान युद्ध नसून, जगड्व्याळ महायुद्ध आहे आणि ते कमीत कमी सहा वर्षाचा काळ गडप करील.' असा धोरणी भाकीताचा पुकारा करताच, युद्धासाठी सोने आणि सैन्य (Men and money) गोळा करण्याची धामधूम सुरू झाही. या दोन गोष्टींच्या उमाप पिकाचे ब्रिटिशांचे जहागिरी कुरण म्हणजे हिन्दुस्थान. एरवी हिन्दी आदमी या गोऱ्या राजकर्त्या नोकरशाहीला जरी क्षुद्र आणि शूद्र म्हणून लेखावा लागला, तरी इंग्लंडच्या अगर इंग्रजांच्या मानेला संकटाची तात लागली कीं त्याच क्षुद्र शूद्राला क्षत्रियत्वाच्या किंवा ब्राम्हणत्वाच्या पोवाड्याने हरभऱ्याच्या झाडावर चढविण्याची शक्कल अक्कल इंग्रजांच्या दगलबाजी कोठारात मुबलक उसळते. पैशाच्या बाबतीत देशी संस्थानिकांचे कान ब्रिटीश मुत्सद्यांच्या हातांत असल्यामुळे, तेवढ्यासाठी त्याना हिन्दी रयतेची फारशी पर्वा नव्हती. शिवाय नुसत्या पैशाने दत्त संकटाचे परिमार्जन होण्यासारखे नव्हते. पैशापेक्षा लढाऊ शिपायांची भरती जितकी अधिक होईल, तितकी ब्रिटिशाना पाहिजे होती. नेहमीच्या लष्करी शोभेच्या शीख आणि गुरख्या मूठभर फलटणी लढाईच्या पहिल्या दणक्यातच संगरस्वाहा झाल्या. साधारणतः शिकलेला व पांढरपेशश्या वर्ग सैन्यभरतीला कधीच अनुकूल नसणारा, झाला तरी निरूपयोगी ठरणार, हे सरकारला माहीत होते. विशेषतः ब्रिटीश नोकरशाहीची अंडीपिल्ली वेळोवेळी बाहेर काढणारा हा नित्य असंतुष्टांचा चाणाक्ष वर्ग असल्यामुळे, त्यांच्या हातांत बंदुका तोफा देण्याइतक्या लष्करी राजनिष्ठेपुरती आत्मविश्वासाची निष्ठा इग्रेजांच्या संग्रही असणेच शक्य नव्हते व आज नाही. राहता राहिला अशिक्षित खेडवळ शेतकरी वर्ग. त्यांतसुद्धा महाराष्ट्रातला शिवाजीचा जातभाई मराठा म्हणजे एका काळी साऱ्या हिन्दुस्थानात लष्करी सामर्थ्याचा धौशा घालणारा शेरका बच्चा ! दोन अडीचशे वर्षापूर्वी - नव्हे नव्हे, अवघ्या ५०-७५ वर्षापूर्वी, सन १८५७ पर्यंत-शिवाजीचा मराठा शेरका बच्चा किंवा शेरका बाप असला, तरी आज १९१४ साली त्याची अवस्था काय होती? तो मेंढरापेक्षाहि मेंढरू बनलेला! ब्रिटीशप्रणित आणि देवी श्रीविक्तुरिया-मंत्रित शांतिसूक्ताच्या प्रभावाने आसेतुहिमाचल भरतखंडात अखंड आणि निर्वेध राज्य चालविण्याच्या घमेंडीने, आर्म्स आक्टाने मराठ्यांच्या यशवंत तलवारी हिसकावून घेऊन, त्यांच्या जगविख्यात लष्करी पेशाची शेतकीच्या मातीत माती करण्यांत, आपल्या हातून केवढ मोठी राजकारणी घोडचूक झाली, याचा याचवेळी ब्रिटीश शहाण्याना पस्तावा वाटला. सोन्याची अंडी घालणाऱ्या कोंबडीला कापण्या इतकाच झालेला हा मूखेपणा होय. झाले ते झार पुढे काय? ब्रिटीश लोक असल्या अटकेवर अटकणारे नव्हते. मराठ्यांचा लष्करी पेशा जिवंत नसला तरी मराठे लोक जिवंत आहेत ना? पुष्कळ झाले. लष्करी पेशाचे काय ? पंधरा दिवसांच्या हडेलहप्पीत शिपायीबहाद्दर मराठा तेव्हाच तयार होईल. विशेषतः लष्कर भरतीसाठी लागणारा माणसाचा अशिक्षितपणा आणि आडमुठेपणा हे दोन गुण मराठ्यांच्या आंगी आयतेच आढळल्यामुळे, त्यांची मने लष्कर भरतीसाठी वळविण्याचे काम बरेच सोपे गेले. प्रश्न इतकाच उरला कीं संख्येने अवचट, शक्तीने दणकट, मनाने मळकट आणि अकलेने कळकट अशा या मराठा समाजांतील लोकांच्या भावना हालवायच्या कशा? मराठा एकदा भावनेच्या तडाक्यात सापडून फुरफुरू लागला कीं मग त्याच्या धिंगाण्याला जगाची जमीनसुद्धा अपुरी पडायची, ही मर्माची गोष्ट ब्रिटीश नोकरशाही ओळखून होती.

हे मर्माला डवचण्याचे काम तिने कसे केले, हे अजमावण्यासाठी, आपल्याला ब्राम्हणेतर नावाच्या चळवळीकडे थोडे वळणे प्राप्त आहे.

(२) पुढारलेल्या हिन्दु समाजांविरुद्ध मागासलेल्यांची आत्मोद्धाराची चळवळ, या दृष्टीने ब्राम्हणेतर चळवळीचा इतिहास फार जुना आहे. तिचे पर्यवसान सध्या ब्राम्हण जातीविरुद्ध ब्राम्हणेतर हिन्दु जाती असे झालेले आहे. या चळवळीत पुढारपणाचा भाग घेऊन, कै. शाहू छत्रपति करवीरकर यानी मागासलेल्या समाजांत आत्मोद्धाराची तीव्र जाणीव उत्पन्न करण्याची प्रशंसनीय कामगिरी बजावली. शाहू महाराजांच्या चळवळीचा परिणाम सातारा व पुणे जिल्हा येथे बराच जोरकस वठला. कारण हे दोनहि जिल्हे कोल्हापूर संस्थानच्या अगदी निकट शेजारचे, आणि त्यांत मराठ्यांची लोकसंख्या इतर सर्व जिल्ह्यांपेक्षा फार मोठी. मराठ्यांच्या अफाट लोकसंख्येमुळे, शाहू महाराजांच्या चळवळी केवळ मराठ्यांतच होत गेल्या, यात चमत्कारीक असे काहीच नाही. ब्राह्मणेतर चळवळ विशिष्ट जातिप्रधान तत्वावर चालविण्याची कल्पना शाहू महाराजाना जरी कधी शिवली नाही, तरी त्यांच्या साताराकरवीर-पुणे क्षेत्रांत मराठ्यांचाच भरणा भरपूर असल्यामुळे, आणि महाराजांच्या भोवती मदतगार म्हणून जमलेल्या लोकांत मराठा जातीय बाजारबुणग्यांचाच सुळसुळाट फार झाल्यामुळे, महाराजांच्या मरणोत्तर ब्राम्हणेतर चळवळ म्हणजे फक्त मराठे लोकांची चळवळ होऊन बसली आहे, आणि तिनेहि मराठेतर-ब्राम्हणेतर चळवळीचा प्रतिस्पर्धी निर्माण केला आहे.

सन १९१४ च्या महायुद्धापर्यंत ब्राम्हणेतर चळवळ फारशी जोरांत नव्हती. कै. टिळकांचा 'सार्वजनिक' शिवाजी उत्सव सरकारी अवकृपेच्या सावलीखाली पडलेला असल्यामुळे, चित्पावन ब्राम्हणांशिवाय इतर पांढरपेशे हिन्दु त्याच्यापासून बरेच फटकून असत. मराठ्यामध्ये सुद्धा शिवाजी उत्सव या वेळेपर्यंत मुळी येतच झाला नव्हता आणि कै. टिळकांच्या विविध चळवळीबद्दल चित्पावनेतर जनतेत फारसा विश्वास किंवा आदर नसल्यामुळे, त्यानी हाताळलेल्या कोणत्याहि कार्यक्रमाच्या फंदात कोणी सहसा पडावयाचे नाही, असा एक अलिखित निर्बंध सर्वत्र पाळला जात असे. त्यातल्यात्यात सावरकर प्रकरणाने शिवाजी उत्सवाचे पर्यवसान चिळस आणणाऱ्या अनन्वित अत्याचारांत केलेले असल्यामुळे, तर वेळी निखारे खावे पण शिवाजी ही अक्षरे आणि त्याचा उत्सव यापासून दूर रहावे, ही भेदरट परंतु राजनिष्ठेच्या मुखवट्याची प्रवृत्ति अखिल महाराष्ट्रात फार दृढ झालेली होती. अशा चमत्कारीक परिस्थितीत, कोल्हापूरच्या राजगादीचा मूळ पुरुष ह्मणून शिवाजीबद्दल कै. शाहू महाराजाना कितीहि आदर वाटत असला, तरी तत्कालीन् परिस्थितीच्या विपर्यस्त रंगाढंगामुळे, आणि आपल्या संशयातीत राजनिष्ठेवरच आपले छत्रपतित्व अवलंबून आहे. याची तीव्र चिंता अहर्निश डोळ्यांपुढे ठेवून, शाहू महाराजाना, शिवाजी उत्सवच काय, पण शिवाजीबद्दल कसलीहि चळवळ खुद्द आपल्या संस्थानात करण्याची छाती झाली नाही; मग संस्थानाबाहेरच्या क्षेत्रात तद्विषयक चळवळ करण्याची गोष्ट कशाला? उलट, मुंबई सरकारच्या भृकुटीमंगाच्या वळणाने कोल्हापूर संस्थानात शिवाजी उत्सव करणाऱ्या चळवळ्याना शाहू महाराजानी कायद्याच्या चापात चेचून ठेचून उच्चस्त करायला कमी केले नाही. तात्पर्य, युरपियन महायुद्ध सुरू होईपर्यंत, महाराष्ट्रात कोठेहि नजर टाकली तरी शि-वा-जी हा शब्द राजद्रोही, ब्रिटीश सत्ता उलथून पाडणारा, माणुसकीचे लांछन, घरादारावर नांगर फिरविणारा, वाटेल त्या भल्या बुऱ्या माणसाला गुप्तपोलीस खात्याच्या काळ्या यादीत दाखल करणारा, अशा शेकडो

भयंकर आरोपानी बरबटलेला दिसे.

महाराष्ट्रातील व विशेषतः सातारा पुणे जिल्ह्यातला मराठा समाज कोल्हापूरच्या शाहू छत्रपतीला पूज्य मानतो आणि महाराजांची राजनिष्ठा-किंबहुना ब्रिटिश साम्राज्यनिष्ठा-संशयातीत. अशा वेळी शिवाजीवरील कुत्सित संशयाचा बहिष्कार उठचला आणि शिवाजीचे आणि शिवशाहीचे जर आपणच स्तोमाचे तमाशे नाचविण्याला सुरुवात केली, तर छत्रपतिसह एकजात सर्व मराठा आनंदाने बेहोष होऊन नाचू लागेल; इतकेच नव्हे तर ब्रिटीश सरकारच्या शिवाजीनिष्ठेच्या रसिकतेबद्दल आदराचे प्रत्युत्तर म्हणून, तो साम्राज्यनिष्ठेच्या प्रदर्शनात सुशिक्षित पांढरपेशाना मागे सारील, असा दगलबाजी (डिप्लोमॅटिक) डाव ब्रिटिश नोकरशाहीने लढविला आणि तो त्यांच्या अंदाजापेक्षा - विशेष फलदायी ठरला, शाहू छत्रपतींच्या सल्ल्याने मराठे लोकात रंगरूट-भरतीची चळवळ जोरात सुरू झाली. मराठेका जय आणि

सकल लोक एक करावे ।

गनीम निवटूनि काढावे ।

ऐसे करता कीर्ती धावे । दिगंतरी ।।

ही रामदासी उक्ति मराठी अक्षरात सगळ्या आंग्ल दैनिकांत आणि खेडोपाडी मोठमोठ्या जाहीर सचित्र तक्त्यावर चमकू लागली. कोठेहि कान द्या शिवाजी महाराजकी जय हा जयघोष सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत घुमू लागला. मोठमोठे गोरे लष्करी हापसर टोपी काढकाढून, मोठमोठ्याने आरोळ्या मारमारून, शिवाजी महाराजकी जय च्या गर्जना करू लागले. इंग्रेजी बॅण्डमध्ये सुद्धा शिवशाहीच्या पोवाड्यांचे सूर निघू लागले. पुणे सातारा येथील रेल्वे स्टेशनावर आणि रंगरूटांच्या छावण्यात, स्कॉटिश हायलँडर्सच्या 'घागरा फलटणी' मराठ्यांच्या ढोलकी सनयीच्या तालसुरावर अस्सल देशी लढाईचे नाच नाचू लागले. शिवशाहीतील कल्पनारम्य प्रसंगांचे पोवाडे गाणारे मराठे शाहीर खेडोपाडी टोळधाडीप्रमाणे उसळले. ज्या अफजुलखानाच्या पोवाड्याबद्दल दक्षिणी मुसलमानांच्या नाकाला मिरच्या झोंबत असत आणि ज्या मिरचांचा कैवार मुंबई सरकार वारंवार घेत असे, तोच पोवाडा गोऱ्या हापसरांच्या टाळ्यांच्या कडकडाटात ठिकठिकाणी कडे तुणतुण्यावर दणाणू लागला. रामदासी श्लोकांचाहि आंग्रेज सरकारने आदरयुक्त पुरस्कार केल्यामुळे, पांढरपेशे व विशेषत: ब्राम्हण लोक यांच्याहि राजनिष्ठेला मनमुराद उकळी फुटली. सर्वत्र शिवाजीचा जयजयकार बेफाम उसळल्यामुळे, ब्राम्हण ब्राम्हणेतर, हिन्दु मुसलमान, मागासलेले पुढारलेले, वगैरे सर्व भेद तात्पुरते माजी पडले. राजनिष्ठ शाहू छत्रपतींच्या जोडीने राजद्रोही म्हणून काळ्या पाण्याची शिक्षा भोगून परतलेले केसरीकर्ते बाळ गंगाधर टिळक सुद्धां ब्रिटीश नोकरशाहीला रंगरूट-भरतीच्या कामी मनमन धने मदत करू लागले. गेली शंभर वर्षे ज्या मराठ्यांचे जीवन शेतीची, गोदीची किंवा गिरणीची हमाली बनलेले होते, त्यांची रक्तामासाची व राजकीय ऐश्वर्याची नातीगोती शिवाजीपर्यंत काय, पण थेट श्रीराम श्रीकृष्णापर्यंत माबाप इंग्रेजसरकारने नेऊन भिडविताच, आणि युद्धोत्तर काळी अनेक हक्कांची व आश्वासनांची त्यांच्यावर आशीवोद-वृष्टी करताच, लक्षावधि मराठे जवान घोंगडी विळा टाकून तलवार बंदुकीच्या खाकी पोशाखात घुसले. सरकारचा कार्यभाग सफाईस साधला.

(३) 'आम्ही सत्यासाठी आणि अन्यायाच्या प्रतिकारासाठी शस्त्र उचलले आहे. हिन्दुस्थान आमचे

दोस्तराष्ट्र आहे. स्वयंनिर्णय हीच युद्धोत्तर काळची भारतीय शासनपद्धति.' वगैरे शेकडो आमिषांचे तिळगुळाचे लाडू हिन्दी जनतेला चारून, ब्रिटीश नोकरशाहीने असंतोषाचे भारतीय धुके चुटकीसरसे नाहीसे केले; आणि महायुद्धाच्या कार्यक्रमाला उभ्या हिन्दुस्थानाचा एकमुखी एकसूत्री पाठिंबा मिळविला. मागासलेल्या ब्राम्हणेतर रयतेच्या आत्मोद्धाराच्या आशेने शाहू छत्रपतीचा कंपू, युद्धोत्तर स्वराज्यप्राप्तीच्या लालुचीने टिळकीय स्वराज्य कंपू, आणि युद्धकालात हमाली मजुरी व नोकरीची पैदास टका शेर भाजी टका शेर खाजा दराने भरारल्यामुळे पोटभरू पांढरपेशा कंपू, एकजात सर्व लोक 'शिवाजी' मंत्राने गुंगून जाऊन, कट्टे 'साम्राज्यानिष्ठ' बनले.

महायुद्धोत्तर काळी कोणाच्या हातात अभिवचनाचे किती खोबरे पडले, या प्रश्नाची आपल्याला येथे जरूर नाही. मात्र ब्रिटीश नोकरशाहीने जो 'मराठेका जय' आणि 'शिवाजीका जय' ध्वनि बेंबीच्या देठापासून काढला, त्याच्या मात्र मुळाला शाहू छत्रपतीनी घट्ट हात घातला. शाहूच्या जागी जर दुसरा कोणी अलबत्या गलबत्या असता, तर ब्रिटीश नोकरशाहीने त्याला आपल्या खावयाच्या दाताखाली तेव्हाच गुपचूप बसावयाला लावले असते. पण शिवाजीनिष्ठ शाहू आणि माधवराव शिंदे म्हणजे दोन जाडी प्रस्थे! त्यांच्या इच्छेविरुद्ध इंग्रेज सरकार जाणे शक्यच नाही. अर्थात् अखिल भारतीय शिवाजी स्मारकाच्या त्यांच्या योजनेला, कसे तरी तोंड कडू आंबट करून, हिन्दुस्थान सरकारला संमतीची मान हालवावी लागली. शिवाय, जहाल ब्राम्हणांच्या हातून शिवाजी उत्सवाचे खूळ निसटून, ते मवाळांपेक्षा मवाळ आणि राजनिष्ठेच्या कुंपणांतच चळवळींचा धिंगाणा घालण्यास लायक असलेल्या शाहूसंप्रदायी मराठ्यांच्या हातांत गेले, तरी ती सुद्धा ब्रिटीश नोकरशाहीच्या दृष्टीने एक इष्टापत्तीच असल्यामुळे, शिवाजस्मिारकाची कोणशिळा बसविण्याचा अवचट मान प्रिन्स ऑफ वेल्सला देण्यात, पार्लमेण्ट किंवा हिदुस्थान सरकार यांपैकी कोणीहि कां कू केले नाही. निर्भेळ स्वातंत्र्यवादी, चाणाक्ष आणि धोरणी दगलबाज (डिप्लोमॅट) अशा जहाल ब्राम्हणांच्या कक्षेतल्या शिवाजीपेक्षा, ब्रिटीश नोकरशाहीला माबाप मानून, तिच्या कृपादृष्टीच्या सावलीसावलीने आत्मोद्धाराच्या व समाजोद्धाराच्या तोंडाळ चळवळी करणाऱ्या शाहूसंप्रदायी ब्राम्हणेतरांचा म्हणजेच निर्भेळ मराठ्यांचा शिवाजी, नोकरशाहीला फारसा जाचक होणेच नाही. तात्पर्य, इंग्रेज सरकारला शिवाजीविषयी आदराचा जो पान्हा १९१४ सालापासून फुटलेला आहे, तो शुद्ध 'ताकापुरते रामायण' सांगणाऱ्या आजीबाईच्या उपयुक्ततावादाचा (युटिलिटॅरियन पॉलीसी) आहे, हे दृष्टीआड करून भागणार नाही.

शिवाजी जातीचा मराठा म्हणून मराठे लोकाना विशेष अभिमान वाटणे साहजिक आहे. परंतु सन १९१४ साली राज्यकर्त्या इंग्रजांची शिवाजीकडे पाहण्याची दृष्टी निवळेपर्यंत मात्र मराठ्यांचा हा अभिमान गाढ झोपी गेलेला होता. किंवा आपण असेहि म्हणू कीं झोपेचे ढोंग करून पडला होता. हा वेळपर्यंत उत्सव, इतिहास-संशोधन, इतिहास-लेखन किंवा शिवाजीविरुद्ध आक्षेपांचे खण्डन मण्डन करून, शिवाजीची स्मृति जागृत ठेवण्याची कामगिरी पुण्याच्या टिळक कंपू ब्राम्हण विद्वानानीच बजावलेली आहे, हे कृतज्ञतापूर्वक नमूद केले पाहिजे. मराठा समाज शिक्षणात मागासलेला असला, (आणि आजहि तो त्यात पुढारला आहे, असे म्हणता येणार नाही.) तरी शिवाजीसारख्या राष्ट्रपुरुषाची स्मृति यथामति उजळ करण्यासाठी स्वार्थत्यागपूर्वक झगडणाऱ्या ब्राम्हण विद्वानांच्या लहानमोठ्या विविध परिश्रमाना उत्तेजन देण्याइतकी मनाची आणि धनाची थोरवी असणारे रसिक आणि श्रीमंत

मराठे राजे किंवा गृहस्थ महाराष्ट्रात कोणी केव्हाच नव्हते, असे मात्र मुळीच म्हणता येणार नाही. परंतु, राजे झाले काय, किंवा विद्वान श्रीमंत गृहस्थ झाले काय, सर्व मराठ्यांची रसिकता आणि शिवप्रेमाची भरती ओहोटी सर्व समर्थ माबाप आंग्रेज सरकारच्या राजकारणी भल्याबुऱ्या कलावर विसंबून असल्यामुळे, शिवाजीविषयी माबाप सरकारने जेव्हा आपला शुभग्रह जाहीर केला, तेव्हाआणि तेव्हाच मात्र-शाहूसंप्रदायी मराठा समाज शिवाजीच्या भजनपूजनात मोकळ्या मनाने रंगू लागला.

शिक्षणाच्या क्षेत्रांत मराठा समाज आता घोडदौडीने मजला मारीत आहे. ग्रॅज्युएटांची संख्या दरसाल वाढत आहे. वृत्तपत्रांच्या आणि सर्वसामान्य वाङ्मयाच्या क्षेत्रातहि मराठ्यांच्या कलम-फलटणी चकम की झडवू लागल्या आहेत. इतिहास-संशोधनाच्या बाबतींतहि काही चोपडी पुस्तके बाहेर पडत आहेत. सामान्यतः असे म्हणण्यास हरकत नाही कीं ब्राम्हणेतर चळवळीप्रमाणे, या वाङ्मायिक क्षेत्रांत सुद्धा एका विवक्षित धाटणीचे निर्भेळ मराठशाही वाङ्मय तयार होण्याचा पुष्कळ अंदाज दिसतो. या मराठी वाङ्मयाचा मऱ्हाठी संस्कृतीवर किती बरा वाईट परिणाम होईल, हे आज निश्चित सांगता आले नाही, तरी या मराठी उपक्रमाची सुरुवात मात्र असावी तितकी समाधानकारक आणि भरंशाची (प्रॉमिसिंग) झालेली नाही. ऐतिहासिक चर्चेच्या क्षेत्रात, आणि विशेषतः शिवाजीविषयी, सर्व शिक्षित अशिक्षित मराठ्यांच्या भावना अलीकडे इतक्या नाजूक सुकुमार बनत चालल्या आहेत कीं त्याना उपमाच द्यायची तर भरितासाठी भाजलेल्या वांग्याचीच छान शोभेल. गेन्बा तुकारामी वारकऱ्याना पंढरीचा विठोबा जसा 'सर्व सुखाचे आगर' वाटतो, तसा या मराठ्यांना शिवाजी म्हणजे 'सर्व सद्‌गुणांचा सागर' वाटतो. त्याच्याविरुद्ध अथवा त्याविषयी मराठ्यांनी निश्चित केलेल्या कल्पनांविरुद्ध एक शब्द उच्चारलेला त्याना खपत नाहीसा झाला आहे. अशा मनस्थितीच्या लोकांकडून इतिहास-संशोधन आणि चर्चा कितपत झेपली जाईल, याचा तेव्हाच अंदाज बांधता येतो. तात्पर्य, प्राचीन किंवा अर्वाचीन युद्धक्षेत्रात मराठा आदमी कितीहि कणखर दणकट म्हणून ठरला गेला असला, तरी बुद्धिक्षेत्रात संशोधनी चर्चेच्या चकम कीत तो बोलबोलता रडीस येऊन चिडतो. इतिहास-संशोधनाच्या क्षेत्रात मराठा विद्वानांची मनोवृत्ति कमावणीच्या स्थितीपासून बरीच दूर असल्यामुळे, या विषयांतील वाङ्मयाची त्यांची सध्याची मराठी भरती पौराणिक ठशापलीकडे फारशी लोकसंमत होईल असे वाटत नाही. त्यातल्या त्यात ब्राह्मणेतर चळवळीच्या पुरस्कारार्थच इतिहासाचा उपयोग करण्याची भावना जोपर्यंत मराठा शिक्षितांच्या विविध हालचालीत विशेष वागेल, तोपर्यंत मराठ्यांनी लिहिलेल्या इतिहास-विषयक चोपड्यांचा विद्वज्जनांत काही मान राहणार नाही आणि सत्यशोधनाचे काहीच कार्य त्यांच्याकडून होणार नाही. शिवाजी विषयी 'गेन्बा तुकारामी' प्रेमा किंवा वजात्याभिमानी आदर म्हणजे सत्यशोधनाच्या लायकीचे सर्टिफिकीट ठरत नाही.

खरे पाहिले असता, ऐतिहासिक सत्यशोधनाची आणि निरूपणाची चिकित्सा भारतीय ज्ञानक्षेत्रात अगदी नवीन आहे, ती आम्ही यूरपस्थ प्रवाशी. बखरकार आणि चिकित्सकांपासून शिकलो आहो. घडले प्रसंग कळले उमगले तसे नमूद करण्याचा आमचा हव्यास फार प्राचीन आहे. तथापि त्यातसुद्धा प्रत्येक प्रसंगात काव्यमय कल्पनाचातुर्याची खुसखुशीत फोडणी घातल्याशिवाय मात्र आमच्या विद्वत्तेचे समाधान कधीच झालेले नाही. त्यामुळे वीतभर मारुती आणि त्यावर हातहातभर जाडीच्या शेंदराचे राठ कवच, असा प्रकार फार. प्राचीन ऐतिहासिक ग्रंथ म्हणून प्रसिद्ध असलेल्या रामायण महाभारताकडे

पहा. सर्वत्र नारीकेलपाकाच्या काव्याचा सुळसुळाट ! पुराण ग्रंथांनी तर आमची इतिहास-लेखनाची व चिकित्सेची नालायकी विशेष सिद्ध केलेली आहे. विशेषतः चमत्कार (miracles), दृष्टान्त (dreams), परमेश्वराचे वर (divine coons), आणिं अवतार (Incarnations) असल्या भाकड कल्पनांचा भयंकर पगडा हिन्दु मनोवृत्तीच्या पिण्डाला बहुतेक कायमचा चिकटलेला असल्यामुळे, आमची बुद्धिमत्ता सत्यशोधनाच्या चिकित्सेत हटकून बुळीबावळी किंवा खुळी बनत असते. काही तरी चमत्कार, कसला तरी दृष्टान्त, कोणत्या तरी देवाचा वर आणि कोणाचा तरी अवतार, एवढी सामुग्री कल्पनेच्या कण्ठाळीत जमविल्याखेरीज मधुकऱ्या बखरकाराला आजपर्यंत एकहि बखर लिहिता आली नाही. शिवाजीचा आजा मालोजी याला देवी प्रसन्न होते व भूमिगत द्रव्याचा अगणित गड्डा अचानक हुडकून देते. सगळा महाराष्ट्र म्हणजे 'पृथुमि' (बंगाल नव्हे, पंजाब नव्हे, मद्रास नव्हे !) गाईचे रूप घेऊन, संतमण्डळींच्या टाळघोषात, क्षिरसागरी शेषासनी पहुडलेल्या श्रीविष्णूकडे, त्राहि माम् त्राहि माम् म्हणून हंबरडा फोडीत जाते. श्रीविष्णू (अवतार घेण्याइतकी फुरसद नसल्यामुळे असेल कदाचित्!) श्रीशंकराकडे बोट दाखवितात. 'मी भोसले कुळात (हव्या त्या भोसल्याच्या कुळात नव्हे!) शहाजी-जिजाबाईंच्या पोटी अवतार घेऊन म्लेंच्छांचे निर्दाळण करीन' म्हणून शंकरजी वर देतात. अवघ्या महाराष्ट्रात तशी आकाशवाणी होते आणि ती शहाजी व जिजाबाई या जोडप्याला रेडियो प्रमाणे स्पष्ट ऐकू येते. भगव्या वस्त्राचा झोळीकुबडीवाला रामदास एके दिवशी शहाजीच्या स्वप्नात येऊन, त्याला श्रीशंकराचा वर स्वतः सांगतो व प्रसाद म्हणून एक नारळ शहाजीच्या हातात देतो. शहाजी जागा होऊन पहातो तो स्वामीमहाराज अदृश्य गुप्त, पण प्रसादाचा नारळ मात्र प्रत्यक्ष हातात! शहाजी व जिजाई (तुकाई जवळ नसावा असे दिसते!) तो नारळ फोडून खातात आणि त्याच दिवशी शिवाजीचा गर्भवास सुरू होतो. जिजाबाईला डोहाळे सुरू होतात आणि 'आणा माझी ती भवानी तलवार. आता मी त्या दुष्ट औरंग्याचा निःपात करतो. कुठे आहे तानाजी. कुठे आहे बाजी.' वगैरे आरडा ओरडा करते. कोणाला आवरता आवरत नाही. सगळे संतमण्डळ महाराष्ट्रभर 'शहाजी भोसल्याच्या जिजाऊच्या उदरी शिवाजी अवतार घेणार' असा जाहीर पुकारा करतात. असल्या भाकड कथांच्या सुळसुळाटानी आमच्या एकूण एक बखरी आरपार उफलल्या आहेत. बखरकारांची ही असला पुराणबाजी करमणुकीसाठी काही तरी वाचणाऱ्या वाचकांचे कितीहि मनोरंजन करीत असली, तरी त्यामुळे इतिहासाची लायकी कादंबरीच्या 'तात्पुरत्या' महत्वापलीकडे महाराष्ट्रात कधि गेलेली दिसत नाही. इतिहास आणि कादंबरी यातला भेद तर आम्हाला कधि उमगला नाहीच, पण अलीकडे 'ऐतिहासिक' कादंबऱ्यांचे पेव मोकाट फुटल्यामुळे तर या दिशेने सुधारणेचा मार्ग बराच बिकट झालेला आहे. वरच्यासारखे चमत्कार दृष्टांत आणि अवतार चांगल्या चांगल्या शहाण्यासुर्त्या विद्वानांच्याहि पचनी जेथे बिनधोक पडतात, तेथे अडाणी बहुजन समाज बखरीतला एकूण एक शब्द खरा मानून चालला, तर तेथे त्याचा दोष कोणता? शिक्षितांतच चिकित्सेचा खडखडाट! कां? कसे? ची कसोटी लावण्याची जिज्ञासाच मुळात थंडगार पडलेलां!

महाराष्ट्रातले सगळे संतमंडळ पंढरांचे वारकरी, विठ्ठलाचे म्हणजे विष्णूचे उपासक. मग त्यांच्या गाईसारख्या हंबरड्याला विष्णूच्या ऐवजी शंकर कां धावला? ब्रह्मा विष्णू आणि महेश म्हणजे सृष्टांच्या उत्पत्ति स्थिति लयाचे तीन मुख्य देव. 'यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति' तेव्हा तेव्हा 'अभ्युत्यानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्' अशी ग्वाही देणारा श्रीकृष्ण विष्णूचा अवतार. महाराष्ट्राचा धर्म (संतमंडळींचा

चिलट्या सुळसुळाट आणि त्यांच्या टाळ ढोलकांचा अखंड खणखणाट सर्वत्र फैलावला असताहि) मूर्छनाग्लानि-येऊन निपचित पडला होता, तर त्याला अवताराचे इंजेक्शन देऊन जगवायला सृष्टीसंरक्षक विष्णूच्या ऐवजी सृष्टीविध्वंसक शंकर कशाला धावला? धावला तर धावला, पण अवतारासाठी शहाजी भोसल्याची कुळीच कशाला शोधीत बसला? एकाद्या संताचा वंश का उद्धारला नाही ? सगळेच म हाराष्ट्रीय संत काही 'सडक सांताराम' नव्हते. शहाजीच्या जिजाईपेक्षा भगवद्भक्त 'संसारी' संतशिरोमणा तुकारामाच्या जिजाईचा कुसबा काय कमी पवित्र होता? संतांनी अवतारासाठी देवाच्या दारी धरणी धरायची आणि महाद्वारावर कपाळे झिजवायची, आणि देवाने मात्र, मुसलमानी पिराला नवस करणाऱ्या, आपल्या मुलाला पिराचे नाव सरफोजी ठेवणाऱ्या, मालोजी भोसल्याच्या कुळात अवतार घ्यावा, हा कोठल्या गावचा न्याय? जे रामदास स्वामी शिवाजीच्या अवताराची बातमी देण्यासाठी शहाजीला स्वप्नात भेटतात, नारळाच्या प्रसादाचा कल्पनातीत चमत्कार घडवितात, शिवाजी अवतरल्यावर त्याला हरएक प्रसंगी अचानक दर्शने देऊन त्याच्या संकट-निवारणार्थ आंगारे धुपारे करतात, त्याचे गुरु म्हणून मिरवितात, ठिकठिकाणी शिष्यांच्या मठांत शिवशाहीचे राजकारण शिजवितात, तेच रामदास स्वामी राज्याभिषेक प्रसंगी शिवाजीला शूद्र शूद्र म्हणून चिडविणाऱ्या महाराष्ट्रीय भटांच्या संघटण्या चळवळीच्या धामधुमीत तोंडाला कुलूप ठोकून कां कोठे दडून बसतात. ज्यानी गलोलाने ठार मारलेली घार सुद्धा चटकन् जिवंत केली, त्यांनी संभाजीपुढे लेंड्या गाळाव्या, या चमत्काराची मिमांसा काय? शिवजन्मापूर्वी शिवावताराची बांग आकाशवाणीने फोडण्याइतका जो परमेश्वर महाराष्ट्रावर अगदी 'दिल् कुरबान् फिदा' झालेला होता, तोच परमेश्वर आग्ऱ्याच्या औरंगझेबी चापात शिवाजी आपण होऊन चालला असता, त्याच्या कानात डेंजर सिग्नलचा शंख फुंकायला कां विसरला? असे शेकडो कां व कसे आमच्या पुराणविद् मनोवृत्तीला कधीच सुचत नाहीत. यदाकदाचित् शंका आलीच आणि तिचे समर्थन नीट झाले नाही, कीं ''ही सर्व देवाची लीला! आम्हा माणसाना कसची उमगणार?'' हा शेरा ठोकून तिकडे पाठ फिरवली की काम भागले!

'परमेश्वर अवतार घेतो' ही श्रीकृष्णाची गीतोक्त उक्ती तात्विक कल्पनेच्या क्षेत्रात कितीहि कल्पनारम्यं असली, तरी हिन्दु मनोवृत्तीवर-मग ती वृत्ति महापण्डिताची असो, नाहीतर महामूर्खाची असो-तिचा फार वाईट परिणाम होऊन बसला आहे. इतका वाईट की, हिन्दुस्थानाच्या वर्तमान अधःपाताचे मूळ शोधीत शोधीत गेल्यास, शोधकाला अवतार-कल्पनेवरच बिनचुक येऊन आदळावे लागेल. वरवर विचार करणाराला हे विधान चमत्कारीक वाटल्यास त्यात चमत्कारीक असे काहीच नाही. जगातले सर्व चराचर सृष्टीचे बरे वाईट व्यवहार काही ठराविक गणिती एटकावरच चालले आहेत. परिस्थितीप्रमाणे या व्यवहारांची घडी बिघडविणारे व पुन्हा बसविणारे वीर यदृच्छेने निर्माण होत असतात. त्यांची निर्मितीसुद्धा गणिती ठोकताळ्यावर किंवा चक्रनेमिक्रमानेच होत असते. धर्माला- (म्हणजे कशाला? ते मात्र कोणीच स्पष्ट सांगत नाही, सांगण्याची पात्रता नाही, सांगितले तरी कोणाला नीटसे पटत नाही !) धर्माला ग्लानी आली की परमेश्वराने अवतार घेतलाच पाहिजे आणि तो घेतोहि. तत्पूर्वी निरनिराळे खालच्या दर्जाचे 'लोअर ग्रेड' देव, त्या अवतारी पुरुषाचे संवगडी मदतनीस म्हणून आगाऊ कोठे तरी जन्म घेतात आणि अवताराच्या आगमनासाठी परिस्थितीची भूमिका तयार करून ठेवतात. असल्या कल्पना भारतरचनेच्या काळापासून हिन्दूच्या पिण्डाला झोंबल्या, त्यापुढे रामायणाने आणि

भागवताने खुंटा हालवून चांगल्या बळकट केल्या, आणि आज गेली दोन हजार वर्षे त्या आम च्या जीवनब्रम्हाण्डात आरपार रसरसलेल्या आहेत. वैयक्तिक आणि सामुदायिक आपत्तींच्या प्रसंगी ईश्वरावतारासाठी आकाशाकडे डोळे लावण्याचे डोहाळे आह्माला हरहमेश पडत असल्यामुळे, किंचित लोकविशेष कार्य करणारी व्यक्ती आम्हाला 'अवतारी' वाटू लागते. गुरूबाजी आणि बुवाबाजीचा उगम याच डोहाळ्यात सापडतो. कै. बाळ गंगाधर टिळकाना शंखचक्रगदापद्मयुक्त 'चतुर्भुज' विष्णू बनवून, त्यांना शेषशाही बनविणारी कल्पकता आणि शिवाजी+ टिळक+रामदास अशा तीन डोक्यांचा दत्तात्रय बनविणारी रसिकता, या दोनीहि याच डोहाळ्यांच्या डबक्यातल्या घाणेरड्या बेडक्या होत. जेथे डॉ. ॲनी बेझण्ट बाई सारखी पाश्चात्य संस्कृतीची 'मैत्रेयी' हिन्दुस्थान आणि हिन्दुधर्म यांच्या वातावरणात समरस होताच, जे. कृष्णमूर्ती आणि सौ. रुक्मिणी आरण्डेल या दोन व्यक्ति अनुक्रमे जगद्गुरू आणि - जगन्मातेचा खास अवतार म्हणून छातिठोक जाहीरनामे फडकविण्याचे धारीष्ट करते, त्या हिन्दुस्थानात अवतार-कल्पनेची महामाया हिन्दुस्थानी मनोवृत्तांता किती दाट आणि किती खोलवर भिनलेली असावी, याचा विचार विचारवंतानीच करावा.

घडणारी प्रत्येक लहान मोठी क्रान्ति ईश्वरी नेमाने घडते; ईश्वर स्वतः अवतार घेऊन हव्या त्या वाईट परिस्थितीचा उच्छेद करून, लोकव्यवहाराची घडी इस्तरीत ठाकठीक चोपून बसवितो; या भावनेमुळे हिन्दुलोक कट्टे दैववादी, पक्के परावलंबी आणि प्रयत्नपराङ्मुख बनले गेले आहेत. त्यांचे 'राष्ट्रीय' काव्य पाहिले तरी ''येरे शिवराया। महाराष्ट्र ताराया।।'' असल्या हतबल काकुळतीच्या प्रार्थनेतच किंचाळणारे! जरा कोठे कोणी विशेष कर्तबगारीचा पुरुष दिसला की त्याला या गचाळ अवतारवाद्यानी तीस कोटी पैकी कोणत्या ना कोणत्या देवाचा अवतार ठरविलाच. अवताराचा मुलामा चढविल्याशिवाय, हिन्दूंच्या उपमान् प्रवृत्तीची भूक कधीच शांत होत नसते. मनोवृत्तीच्या असल्या ठिसूळपणामुळे इतिहासात क्रान्ति घडविणाऱ्या क्रान्तिकारकांच्या चरित्राचा ठाव घेण्याची चिकित्सक बुद्धि हिन्दुजनांत जवळ जवळ नाहीच म्हटले तरी चालेल. म्हणूनच 'ऐतिहासिक कादंबऱ्या' लिहिताना त्यांची विचारशक्ती बेगुमान बागडते. स्वतःच्या कल्पनेच्या पोटी प्रसविलेल्या हव्या त्या प्रसंगाला ऐतिहासिक व्यक्तीच्या चरित्रांत घुसडताना आमची विवेकबुद्धि यत्किंचितहि मुरडत नाही. शिवाजी म्हणजे संत मण्डळींच्या भजनातिरेकाने प्रसन्न झालेल्या परमेश्वराचा अवतार ठरला की मग त्याच्या पणज्या आजापासून तो थेट त्याच्या तानाजी बाजी येसाजी संवगड्यापर्यंतची गोतावळी मंडळी छोट्या मोठ्या देवांचे अवतार, आणि त्याच्या चरित्रातील सर्व बरे वाईट भाग म्हणजे देवाची लीला मानण्या पलीकडे आम्हाला आचार विचारांचे काही कर्तव्यच उरत नाही. 'रामावतारापूर्वीच वाल्मिकाने रामायण लिहिले व त्यांतील सर्व तपशिलांप्रमाणेच प्रभु रामचंद्राला आपली चरित्रलीला नटवावी लागली' अशा सोवळ्या गप्पांवरहि अंधविश्वास ठेवणाऱ्या हिन्दूना, शिवाजी-अफजुलखान-मुकाबल्यात कृष्ण-पूतना-आख्यानापेक्षा विशेष काही दिसत नाही आणि भासतहि नाही. कां भासावे? शिवाजीच्या आंगांत देवी येऊन ती जर 'मला बत्तिस दातांचा बोकड बळी दे' म्हणून स्पष्ट सांगते, तर शिवाजी अफझुलखानाचा बळी घेतल्याशिवाय प्रतापगडावरून नुसता हात हालवीत कसा परतणार? देवीचा शब्द खोटा कसा पडणार? कधीचं नाही. तो खराच ठरणार; आणि ठरलाहि! सगळाच मुकाबला ईश्वरी सूत्राचा मामला ठरविल्यावर, शिवाजीव्यक्तीला कळसूत्री बाहुलीपेक्षा फुटक्या कवडीचीहि किंमत उरत नाही, इकडे मात्र एकाहि

शहाण्या देवभोळ्याची किंवा दैवपाळ्याची नजर जात नाही ! अफझुलखानाच्या वधाचा आगाऊ इषारा देणारी देवी 'आग्ऱ्याला जाशील तर औरंगझीबाच्या चापात अडकशील' असा इशारा शिवाजीला देताना कां बाचकली? याचा मात्र कोणाला विचार सुचत नाही. तात्पर्य, पुराणांतील अवतार-कल्पनेच्या कल्पनारम्य मोहाच्या पगड्यामुळे, भारतीय इतिहासांतील प्रत्येक लहान मोठा क्रान्तिकर्ता वीर आम्हाला परिस्थितीचा ठराविक परिणाम आहेसा वाटतो आणि त्यामुळे त्याच्या चरित्रातील आत्मोद्धारक व राष्ट्रोद्धारक तत्वांचा आमच्या आचारविचारांत परिपाक उतरविण्याची आमची बुद्धीची चिकित्सक प्रवृत्ति नादान बनते.

परिस्थिति वीराची माता, का वीर परिस्थितीचा पिता ? या वादाच्या किसण्या जगाच्या अंतापर्यंत चालू राहतील. वाद करावयाचा म्हणूनच वाद, हा प्रश्न प्रत्यक्ष वस्तुस्थितीहून केव्हाहि भिन्नच असणार. परिस्थिति वीर निर्माण करते, याला कल्पनेशिवाय दुसऱ्या कशाचाहि आधार नाही. परंतु वीर हवी ती कल्पनातीत परिस्थिति कशी निर्माण करतो, याचा दाखला सूर्यजयद्रथी मामल्याचा असतो. शिवाजीने स्वराज्यसाधनाचे काम हाती घेण्यापूर्वी महाराष्ट्रात परिस्थितीची तयारी झालेली होती, म्हणजे काय? कल्पनेच्या अनुमानापलीकडे निश्चित उत्तर नाही. शिवाजीच्या जन्मापूर्वीच संतमंडळीने राजकीय स्वातंत्र्याचे बीज पेरून ठेवले होते, एवढे वाक्य लिहून सिद्धान्त ठोकण्याचे काम फारच सोपे आहे; पण त्यालासुद्धा कल्पनेशिवाय आधार नाही. शिवाजीच्या जन्मापूर्वीच जर स्वराज्याच्या स्थापनेची जमीन नांगरून पोखरून चांगली भुसभुशीत तयार झालेली होती, राष्ट्रीय आकांक्षेचे सकस बीज सुद्धा यात उधळून पेरणीचे काम पुरे झाले होते, तर पुढच्या कार्यभागासाठी महाराष्ट्राला शिवाजीवाचून अडून बसण्याचे काय कारण होते? शिवाय, परिस्थितीने क्रान्तीची सगळी तयारी करून ठेवल्यावर, आयत्या बिळात नागोबा या न्यायाने शिवाजीने विशेष अधिक असे काय केले की त्यामुळे राष्ट्रवीर माणून आम्ही त्याच्या स्मृतीचा सन्मान राखावा? सर्व बाजूनी अनुकूळ परिस्थितीत हवा तो रेम्याडोक्या पराक्रमाची कसरत करील. त्यांत काय कठीण आहे? पण त्याला कोणी क्रान्तिकारक वीर म्हणत नाहीत. परिस्थितीचा कुसवा वीर प्रभू असता तर हे जग गुलामाचा पांजरपोळ का बनते? परिस्थितीच्या पायात कुलंगी कुत्र्याप्रमाणे शेपटीच गोडे घोळायला मर्दवीर कधी तरी इच्छील काय ? परिस्थितीच्या पायाचे आंगठे गुलामानी चुंबावे; ते मर्दाचे काम नव्हे. मर्द वीर बेशिस्त परिस्थितीला कर्तबगारीच्या हंटरचे तडाखे लगाऊन, सर्कशीतल्या खुनशी सिंहिणीप्रमाणे शिस्तवार कसरत करायला लावतो.) वेळी परिस्थिती तुफान होऊन गुरकाऊ लागली, तरी खरा वीर आपले पुढे टाकलेले पाऊल रेसभरहि मागे न घेता, कधी चुचकारून तर कधी दरडाऊन, तिला ठरलेल्या कसरतीची गोलांटी उडी मारायला लावतोच लावतो; पण तिच्या नजरेला भिडलेली नजर लवमात्राहि नरमवणार नाही.प्रतिकूळ परिस्थितीशी कुशलतेने झगडून, पैजेने निश्चित कान्ति घडवून आणणारा मर्दच क्रान्तिकारक पुरुषोत्तम म्हणून इतिहासात चिरंजीव होतो. भविष्य काळ त्याचेच पोवाडे गातो आणि त्याच्याच मर्द चरित्रांतील भयंकर दिव्यांचे 'स्पिरिट' मानव जातीच्या जीवनक्रमात 'हतिहासाच्या पुनरावृत्ती' चे चैतन्य अखंड सणाणत ठेवते.

परंतु शिवाजीविषयी मऱ्हाठ्यांचा आणि विशेषतः मराठ्यांचा आदराचा लोंढा इतका बेफाम उतास गेलेला आहे, कीं त्या बिचाऱ्याला 'परिस्थितीचा परिणाम' म्हणजे अनेक बाह्य शक्तीच्या व व्यक्तींच्या

हातातील 'कळसुत्री बाहुले' ठरवून, त्याच्या अस्सल -राष्ट्रवीरत्वाला तो हिणकस ठरवीत आहे. बखरकारानी त्याला शिवाचा अवतार बनवून देवकोटीत ढकलला आहे. के. न्यायमूर्ति रानड्यानी, त्याला संत मंडळीनी नांगरणी पेरणी केलल्या परिस्थितीच्या शेतावरचा आयतोबा बनविले आहे. कै. हरिभाऊ आपट्यांनी 'उषःकाल' कादंबरीच्याद्वारे त्याला रामदासी कुबडीचा दाण्डा बनविले आहे. ब्राह्मण लेखकानी ब्राह्मण रामदासाला मराठा शिवाजीच्या जीवननौकेचे सूत्रधार केल्यामुळे, स्वजात्यभिमानाने उफलेले निष्कारण इतिहासकार रा. रा. केळूसकर, रामदासाला मराठशाही गचांडी देऊन, शिवाजीच्या क्रान्तिकारक पिण्डाची पुण्याई संत तुकारामाच्या टाळ तंबोरीला अडकवून मोकळे होतात. आणि, कित्येक तेरडेशाही उपयुक्ततावादी हिन्दु, चालू राजकारणाचे हिन्दु विरुद्ध मुसलमानी ढोंगधत्तुर खेळविण्यासाठी, शिवाजीच्या नावाचा दुरूपयोग तर करतातच, परंतु 'शिवजन्मापूर्वीच इस्लामी सत्तेविरुद्ध अवघी महाराष्ट्र-जनता खवळून उठली होती.' असली खोडसाळ विधाने करायला शरमत नाहीत. तात्पर्य, शिवाजी आणि शिवशाही यांच्या उपलब्ध इतिहास-साहित्याची निर्विकार व निर्माड न्यायबुद्धीने चिकित्सा करण्याचा ठसठशीत प्रयत्न आजवर कोणीच न केल्यामुळे, शिवाजी आणि शिवशाही मेणाच्या गोळ्याप्रमाणे वाटेल त्याच्या हातात हवी तशी चेपली दाबली जात आहे.

शिवाजीने स्थापन केलेल्या 'हिन्दवी' स्वराज्याइतकी अत्यंत अल्पायुषि रियासत भारतीय इतिहासात विरळा. अवघ्या दीडशे वर्षांच्या अवधीत शिवशाहीची मऱ्हाठशाही आणि भटशाही अशी रूपांतरे होऊन ती रसातळाला जावी, हा एक चिंतनीय चमत्कार माहे. शिवाजीने अनन्य-सामान्य किंबहुना लोकोत्तर शक्तियुक्तीने मऱ्हाटी खराज्याचा गगनचुंबित मनोरा किंवा भारतव्यापी दरारा - स्थापन केला, तो त्याचा मृत्यू होताच ढासळू लागावा आणि पुढे केवळ एक शतकाच्या काळात, कसा तरी जगून, एकदम कायमचा नष्ट व्हावा, यावरून त्या स्वराज्य घटनेच्या पायातच काही तरी भयंकर गोम असली पाहिजे, यात मुळीच संशय राहात नाही. ''मऱ्हाठ्यांचा उदय म्हणजे सह्याद्रीवरील पेटलेल्या पाचोळ्याचा तात्पुरता भपकारा. तो जसा झटकन् पेटला, तसा पटकन् विझाला.'' हा ग्रॅण्ट डफने काढलेला निष्कर्ष बऱ्याच 'केवळ स्वाभिमानी' मऱ्हाठ्याना फार बोचला आणि अझूनहि डाचतो. परंतु, तो सिद्धांत ठोकणाऱ्या ब्रिटीश मुत्सद्याने ब्रिटीश सत्ता आणि मऱ्हाठी सत्ता यांच्या घटनेच्या तुलनात्मक चिकित्सेवरच आपला निर्भीड निष्कर्ष काढला होता, इकडे मऱ्हाठी विद्वानांचे जावे तितके लक्ष्य गेलेले दिसत नाही. या अवस्थेला दोन मुख्य कारणांचा संभव दिसतो. (१) शास्त्रीय दृष्टीने राजकारणाचा आम्ही कधी अभ्यास आणि व्यास केलेला नाही; आणि (२) कोणताहि गंभीर विषय गांभिर्याने हाताळण्यापेक्षा त्याकडे भावनाप्रधान दृष्टीने पाहाण्याची आमची पिण्डप्रकृति. आमची भावनाप्रधान मनोभूमिका धर्मप्रधान असल्यामुळे, राजकारणाची प्रमेये सुद्धा आम्ही धर्मभावनेने सोडवितो. अर्थात् अयोध्येच्या (खऱ्या खोट्या) श्रीरामचंद्रापासून तो थेट शिवाजीपर्यंत, सर्व राज्यसंस्थापनेच्या मुळांशी आम्हाला कोणी ना कोणी वसिष्टविश्वामित्र, एकादा माधवारण्य किंवा अनघडशहा फकीर किंवा तुकाराम रामदास, यांची प्राणप्रतिष्ठा केल्यावाचून, त्या राजसत्तेच्या सत्याची प्रचिति आम्हाला पटत नाही. सगळ्याच राज्यक्रांत्या 'ईश्वरी सूत्रावर' नेऊन भिडविल्यानंतर, व्यक्ति आणि नागरीक नात्याने कोणाला काही कर्तव्यच उरत नाही. सामान्यतः 'विशेष' धडाडी दाखविणारी एकादी व्यक्ती 'पुढे आली' की तिचे देव्हारे थाटून तोंडपाटिलकीच्या आरत्यांचा हलकल्होळ उडविला की आमच्या कर्तव्याची

भूक शांत होते. राजकारण कशाशी खातात, याची अणुरेणू इतकीहि अक्कल पदरी नसणारे हजारो शिक्षित पांढरपेशे दर दशकाला कोणा ना कोणा उपटसुंभाला 'हीरो' बनवून, त्याच्या 'पुढारपणाखाली' राजकारणीब्रुव धांगडधिंग्यांचे जलसे कसे खेळतात, हे चालू भारतीय इतिहासात नित्य दृष्टीस पडतच आहे. हा राजकारणी वाचाळपणा बऱ्याच वेळीं अतिप्रसंगी अत्याचारांत उमटतो. लोकांची शांतिप्रिय कल्पनाशक्ति क्षणभर खळबळते. त्या अतिप्रसंगी व्यक्तीचे नांव सर्वतोमुखी होते. कां कसेंची चिकित्सा आम्हाला अज्जीबात पारखीच असल्यामुळे, त्या व्यक्तीला आम्ही बेछुट 'अवतारी पुरुष ठरवून, त्याच्या अतिप्रसंगी अत्याचाराला किंवा हुल्लडीला 'इतिहासाच्या पुनरावृत्ती'चा मुलामा देऊन मोकळे होतो. तात्पर्य, शिवकालीन काय, किंवा वर्तमानकालीन् काय, राजकारणाच्या वारांगनैव रंगाढंगांची शास्त्रशुद्ध कल्पनाच आम्हाला नसल्यामुळे, आमच्या राजकारणी चळवळी म्हणजे पाण्याच्या बुडबुड्यापेक्षा विशेषस्मरणीय होत नाहीत.

□□□

निवेदन

राष्ट्रीय उत्सवाची चिकित्सा

('नवयुग' (दादर) साप्ताहिकात ता. २३ सपटेबर १९२८ रोजी प्रसिद्ध झालेला हा लेख किंचित फेरफार करून, येथे पुनरुध्दृत केला आहे. उत्सवाकरिता उत्सव करणे निराळे आणि काही दूरदर्शी ध्येय साधण्यासाठी सामाजिक किंवा राष्ट्रीय उत्सव करणे निराळे. अलीकडे हव्या त्या लुंग्यासुंग्या गोष्टीच्या मागे 'राष्ट्रीय' उपाधीची ब्याद चिकटविण्याचा पोरकट खेळ पुणेरी भटानी सुरू केलेला असून, गणपतीचा उत्सव 'राष्ट्रीय' आणि 'सार्वजनिक' दिमाखाने रूढ करण्याची बंडाळी सर्व महाराष्ट्रभर चालविली आहे. या बण्डाळीचे पर्यवसान कशात झाले, गणपति-उत्सव 'राष्ट्रीय' होणे कसे शक्य नाही, आणि चिकित्सेच्या सर्व शंकाकुशंकांच्या तलवारी-मान्यातून शीरसलामत यशवंत व लोकमान्य ठरलेला खरा राष्ट्रीय उत्सव कोणता, हे या लेखाच्या द्वारे महाराष्ट्रीय जनतेला दाखविण्याचा यत्न केला. उच्चाराप्रमाणे आचार वठविण्यासाठी मुंबई लोकहितवादी संघ, दादर, या संस्थेच्या विद्यमाने श्रीशिव-भवानी नवरात्र महोत्सव सार्वजनिक थाटाने दरसाल साजरा होत आहे. या उत्सवात 'हिन्दू तेवढा एक' मग तो स्पृश्य असो वा अस्पश्य असो, त्याने शिवभवानीच्या दरबारात एकजिनशी अभेदाने संघटित व्हावे आणि हे संघटनेचे लोण घरोघर पोचवावे, एवढाच बारीकसा उद्देश प्रधान ठेविला आहे. प्राचीन नवरात्रोत्सवाच्या पुनरुज्जीवनात एवढाच एक बारीकसा अस्सल संघटनेचा बीजमंत्र फुंकताच, अस्पृश्यता-विध्वंसनाचा मार्ग अत्यंत सुलभ आणि सहजसाध्य असल्याचा आत्मविश्वास लोकहितवादी संघाने गुदस्त सालापासून मुंबई लत्त्याच्या अखिल हिन्दू भगिनीबांधवाना सक्रीय पटवून दिला आहे. यंदा तर महाराष्ट्रात १०-१५ मोठमोठ्या शहरी ही नवरात्रोत्सवाची कल्पना जोमाने पुनरुज्जीवित झालेली आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. ही विचारक्रान्ति ज्या लेखाने घडून आली. तो लेख प्रबोधनवाचकांच्या अवलोकनार्थ प्रबोधनातच छापणे अगत्य आहे.

- प्रकाशक प्रबोधन)

सार्वजनिक गणपती उत्सवाची उत्पत्ति

सन १८९४ सालापूर्वी महाराष्ट्रात किंवा इतरत्र 'सार्वजनिक' चव्हाट्यावरील गणपतीचे उत्सव

मुळीच रूढ नव्हते. सन १८९३ साली हिंदु मुसलमानाचा पहिला दंगा काठेवाडात प्रभासपट्टण येथे झाला व त्याचा मोठा प्रतिध्वनि मुंबई, मालेगाव, आकोला, सोलापूर वगैरे ठिकाणी उमटून हिंदू मुसलमानांच्या तेढीचे बीजारोपण झाले. या वेळी मोहरमसारख्या मुसलमानी उत्सवात पुष्कळ हिंदु प्रामुख्याने भाग घेत असते. त्याना त्यापासून निवृत्त करून, हिंदुजनांचा सवता जलसा करण्यासाठी व मुसलमानांपासून हरएक बाबतीत हिंदूनी फटकून वागावे म्हणून, कै. बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची नवीन टूम काढली आणि आपल्या भटी हस्तकांच्या मदतीने व केसरी पत्राच्या त्या वेळच्या वजनाने एकदम अमलातहि आणली. सुरुवातीला या उत्सवावर धार्मिक भावनेच्या अवडंबराचा पुष्कळ जाडजूड शेंदूर थापण्यात आला खरा, परंतु मुख्य उद्देश जो मुसलमानांचा व इंग्रेजांचा द्वेष, त्याचे प्रदर्शन मेळ्यांच्या पदांतून आणि फार्सातून मोकळ्या मनाने व मुबलक होत असे. मुसलमानांचा किंवा इंग्रेजांचा द्वेष करावा, की करू नये, हा मुद्दा येथे अभिप्रेत नाही. मात्र या उत्सवाची उत्पत्ति तीव्र असूया, मत्सर व द्वेष या तीन घाणेरड्या विकारातून झालेली आहे, ही गोष्ट नाकबूल करण्यात अर्थ नाही. धर्मरक्षण, हिंदु-संघटन, राष्ट्रीयत्व-वर्धन वगैरे बाह्य सबबी नुसत्या नाटकी व तोंडपुज्या. त्या काळी केसरीचा शब्द म्हणजे वेदवाक्य मानणाऱ्या सुशिक्षित आशिक्षित नंदीबैलांचा भरणा महाराष्ट्रात फार. आणि बहुजनसमाज तर गाढ झोपी गेलेला. टिळकांच्या केसरीने गंगाजळ म्हणून गायकवाडवाड्याच्या मोरीतले पाणी जरी पाजले, तरी सर्व बिनतक्रार 'पवित्रं जान्हवी तोयम्' म्हणून पीत असत. अर्थात् मुसलमानांच्या हैदोस धुल्ल्याला गणपतीच्या मोर्यामोर्याची घवघवीत घसळामुसळी जोड मिळताच, सार्वजनिक गणेशोत्सवाच्या कल्पनेचा भटी मलेरिया गजकर्णाप्रमाणे हां हां म्हणता साऱ्या महाराष्ट्रभर पसरला. उत्सवाची उत्पत्तीच द्वेष मत्सराच्या खाणीची असल्यामुळे, त्यात लवकरच मुसलमान इंग्रजांच्या जोडीने, सुधारक लोक, शिकलेला किंवा शिकणारा स्त्रीवर्ग, ब्राह्मणेतर चळवळ्ये, कौन्सिलर, मवाळ पार्टी आणि भटी ऊर्फ टिळकी महात्म्याविरुद्ध असणारी प्रत्येक व्यक्ति आणि चळवळ यांच्या आईमाईचा मुक्तकंठ उद्धार उत्सवाच्या मेळ्यातून, खुद्द टिळकांच्या नाकासमोर होऊ लागला आणि उद्धारप्रविण कवींचा आणि मेळ्यांचा टिळकांच्या हस्ते पारितोषिकपूर्वक सत्कारहि होऊ लागला. अखेर हा भाद्रपदी शिनगा, खुद्द पुण्यातच इतका अतिरेकाला जाऊन पाचकळला की गेले काही वर्षापासून टिळकी धर्माच्या दण्डधारक मेळेवाल्यांवर व त्यांच्या काव्यकौमुदीवर पोलिसांचे पहारे बसणेच अगत्याचे झाले.

असूयेचा परीघ पुरा झाला

द्वेषासारख्या घाणेरड्या मनोवृत्तीतून बाहेर पडलेल्या या उत्सवाची वर्तुळ रेषा, साऱ्या महाराष्ट्रात बेकीची व जातिवैमनस्याची आग भडकवून, तीन तपानी अखेर आपल्या मूळ बिंदूवर येऊन कचकचीत फुटली. ज्या गायकवाडवाड्यात कै. टिळकांनी या उत्सवाच्या घाणेरड्या भटी कल्पनेला जन्म दिला, त्याच वाड्यात त्याच टिळकांचा एक मुलगा आत्मघात करून मरतो, व दुसरा येरवड्याच्या तुरुंगात बसतो, तेव्हांच टिळकांचा गणोबा प्राणप्रतिष्ठेची बोहणी स्वीकारतो ! हे दृश्य चिंतनीय आहे. असूयेचा सुटलेला त्रिधारी भटी परशुरामी बाण बिनचूक आपल्या जन्मदात्या बापाच्या कै. टिळकांच्या कुळाच्या मुळावर येऊन हापटला. वर्तुळाचा परीघ पुरा झाला.

गणपतीचे भटी महात्म्य

कै. टिळकांच्या व त्यांच्या केसरीच्या एरंडोपि द्रुमायते वजनाने हा उत्सव महाराष्ट्रात कितीहि फैलावला असला, तरी तो भटी कल्पनेची अवलाद आहे, हे ब्राह्मणेतर बहुजनसमाजाने आता तरी दृष्टिआड करून चालणार नाही. या उत्सवाने किती धर्महित साधले, काय समाजसुधारणा केल्या, कसली संघटणा साधली आणि काय मासल्याची राष्ट्रीय वृत्ति संवर्धन केली, हे महाराष्ट्रात गावोगाव अखंड धडाडणाऱ्या द्वैताच्या वणव्याने चांगलेच सिद्ध होत आहे. सार्वजनिक गणपति आपली आरती 'सुखहर्ता दुःखकर्ता' असल्या उलट्या निरांजनीनेच आज पर्यंत घेत आला, असेच दिसते. उत्सवाच्या प्राणप्रतिष्ठेच्या क्षणापासूनच हा 'विघ्नहर्ता' गणपति इतक्या वाढत्या प्रमाणात 'विघ्नकर्ता' होत गेला कीं अखेर या मंगलमूर्तीला आपल्या माहेर घरी, कै. टिळकांच्या वाड्यांत, अमंगळ मूर्ती म्हणूनच दहा दिवसाचा सुतकी उत्सव पहावा लागला. दोन दोन तीन तीन महिने रात्रभर जागणे करून गणेशभक्तीच्य तालमीचा पिठ्ठा पाडला, काव्य शक्तीची मगजफाट ओढाताण केली, उत्सवाच्या दहा दिवसा रात्री साऱ्या गावभर आणि महाराष्ट्रभर तीन तीन वर्षाच्या बचडाबचडीना खाकोटीला मारून तंगडतोड आणि नरडेफोड केली, आणि या सगळ्या नवविधा एकनिष्ठ भक्तीचा गणरायाने तीन तपानंतर प्रसाद काय दिला ! तर जन्माच्या मूल उत्पादकाच्या मुलांच्या संसारांत नारळाच्या करवंट्या! पण गणोबाला तरी दोष देण्यात अर्थ कसला! त्या बिचाऱ्याची मूळ बैठकच जेथे घाणेरड्या विकारानी माखलेली, तेथे त्याने त्यापेक्षा निराळा प्रसाद आणखी तो काय द्यायचा ? ''या टिळकाने गणपति चव्हाट्यावर मांडला व त्याचा हैदोसधुल्ला केला, याचा परिणाम ठीक होणार नाही'' हे त्या वेळच्या (सन १८९४-९५) कित्येक वृद्धांचे भाकीतच अखेर खरे ठरले.

गणपती का निवडला ?

सर्व लोकाना सारखा अभेदाने भाग घेता येईल, अशा सार्वजनिक उत्सवांची जरूरी असते, व तसा प्रघातहि सर्व राष्ट्रांत आहे. खुद्द महाराष्ट्रात व हिंदुस्थानातहि असे 'सार्वजनिक' उत्सव ठिकठिकाणी प्रांतपरत्वे अनेक होत आहेत. मग टिळकाना गणपति उत्सवच सार्वजनिक करण्याची अक्कल का सुचली? उत्तर अगदी सोपे आहे. जो तो आपापल्या पिंडाप्रमाणेच देवताची निवड करीत असतो. कितीहि विद्वान झाले, तरी टिळक भटजीच! त्यांच्या भटी पिंडाला भोजनप्रिय, विशाळ लंबोदर, एकवीस-मोदकांचा नैवेद्य खाणाऱ्या गणोबाशिवाय दुसरे कोणते देवत प्रिय असणार? आणि एका तोंडानें राष्ट्रसेवेची मंत्र-पुष्पांजली सुरू ठेवून, दुसऱ्या बाजूनें वेदांचा मान राखण्यासाठीं भटांना मंत्रपुष्पांजलीचे आटीव दूध व भटभोजने सर्रास रूढ केली. तात्पर्य, भोजनप्रिय भटांच्या पोटाच्या पुण्याईला साजेशोभेसे हे गणपतिदैवत आहे; आणि ज्या भटांच्या पोटात अवघ्या म हाराष्ट्राची अफाट मऱ्हाठशाही भुरक्यासरशी गडप झाली, त्यानी भोजनप्रिय विशाळ उदराचें गणपति दैवत आपल्या 'सार्वजनिक' गुंडगिरीसाठी शोधून काढले, यात त्यांच्या धोरणी भोजनप्रियतेचे कौतुक करावे, का रमणा-रसिकतेची पाठ थोपटावी, एवढाच काय का तो प्रश्न उरला तर उरेल. असल्या खादाड भटी कल्पनेच्या उदरी जन्मलेल्या या 'सार्वजनिक' उत्सवाला ब्राह्मणेतरानी डोळे मिटून डोक्यावर घेऊन नाचणे, म्हणजे भटांच्या खरकट्याच्या पाट्या वाहणारे आम्ही जन्मसिद्ध बैल आहोत, अशी बिनशर्त कबूली देण्यासारखे आहे. भटी महात्म्याच्या मोहीनीमुळे पूर्वी झाले

ते झाले. परंतु सध्याच्या जागृतीच्या लख्ख प्रकाशात स्वाभिमानी ब्राह्मणेतर या 'सार्वजनिक' गणेशोत्सवापासून अलिप्त राहतील तितके बरे.

गणपति दैवत राष्ट्र-प्रबोधक नव्हे

प्रत्येकजण आपापल्या पिंडप्रकृतीप्रमाणे दैवताची निवड करतो, हे जितके खरे आहे, तितकेच दैवताच्या गुणधर्माचा भक्ताच्या चारित्र्यावर परिणाम होत असतो, हेहि तितकेच सत्य आहे. आज महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रबोधनाला ज्या चैतन्याची जरूर आहे, ते चैतन्य गणपति दैवतापासून लाभणे शक्य आहे काय, याचाहि विचार झाला पाहिजे. 'गणानां गणपति हवामहे' वगैरे वैदिक सूत्रातल्या सूक्ष्म कल्पना पंडिताच्या बुद्धीचे कितीहि रंजन करीत असल्या, तरी सार्वजनिक प्रबोधनाच्या कामी गणपतीचे गणेशपुराण कुचकामी आहे. हें पुराण लोक मुळीच वाचीत नाहीत. ते प्रचारातच नाही, आणि त्याचा प्रचार यापुढे होणे शक्य नाहीं. गणपती म्हणजे काय? तर बुद्धिदाता आणि विघ्नहर्ता. यापलीकडे कसलीच कल्पना लोकात प्रचलित नाही. गेली ३६ वर्षे गणेशाची सार्वजनिक भक्ति करून महाराष्ट्राची किती विझे हरण झाली आणि त्याला किती खंडी बुद्धीची नवी जहागीर मिळाली, ते कोणत्याही जिवंत डोळस माणसाला दिसण्यासारखे आहे. ३५ वर्षात ज्या गणपतीला महाराष्ट्राच्या विघ्नांचा पर्वत वाढविण्यापलीकडे एकहि मंगल कार्य साधलें नाही, ज्याच्या उत्सवाची प्राणप्रतिष्ठा व फलश्रुति निर्विघ्न साघण्यासाठी माबाप सरकारच्या पोलिसांच्या पलटणींची गावोगाव जरूर पडते आणि ज्याच्या गूढ अध्यात्म रूपाची प्रचिती लोकाना मंत्रपुष्पांजळीच्या भटांच्या फक्त अटीव दुधाच्या लोट्यांत कडेलोट गोठलेली दरसाल दिसते, त्या गणपतीच्या उत्सवाची सार्वजनिक नालायकी फक्त पशू, मूर्ख आणि भट याशिवाय सर्वत्राना स्पष्ट दिसून येईल. तात्पर्य, गणपति हे स्फूर्तिदायक सार्वजनिक दैवत मुळीच नाही.

जुना खरा सार्वजनिक उत्सव कोणता?

आत्मप्रबोधक व राष्ट्रोद्धारक अशा सार्वजनिक स्वरूपाच्या उत्सवांची कल्पना महाराष्ट्रात फार जुनी आहे. या कल्पनेच्या पितृत्वाचा मान कै. टिळकानाच काही द्यायला नको. विजयनगरच्या साम्राज्यात आणि त्यानंतर शिवशाहींत ''नवरात्राचा दुर्गा महोत्सव'' हाच सार्वजनिक उत्सव सर्वत्र अभेद भावाने आणि दांडग्या थाटमाटाने सर्व महाराष्ट्रात साजरा होत असे. गणपतिपूजन सर्वत्र नमनापुरते रूढ होतेच. तथापि गणपति-भक्तीचे 'फॅड' दांडग्या प्रमाणावर जरी भट पेशव्यानीच सुरू केले, तरी केवळ छत्रपतीच्या नाटकी मुर्वतीसाठी त्यानीं नवरात्राचा उत्सव वाड्यात चालू ठेविलाच होता. गणेश दरवाजा, गणेश महाल, गणेश चौक इत्याहि पेशवाई स्मारकांच्या अभिमानी टिळकानी नवरात्राच्या खऱ्याखुऱ्या लोकमान्य उत्सवाला बगल मारून, पेशव्यांच्या रमण्या चिमण्या गणपतीचाच सार्वजनिकत्वाच्या थेरासाठी स्वीकार केला, यात त्यानी देशहितबुद्धिपेक्षां पेशव्यांविषयी आपली भटी निष्ठाच विशेष व्यक्त केली, असे आजचा भाद्रपदी शिमगाच सिद्ध करित आहे. पेशव्यांच्या गणेशनिष्ठेने छत्रपतीच्या सत्तेला कशी बोलबोलता गणेशटोपी घातली, हे आता नव्याने कोणाला सांगणेच नको. शिवरायाने किंवा दुसऱ्या कोणत्याहि छत्रपतीने गणपतीचे थेर माजविल्याचा दाखला इतिहासात नाही. असेल तर कोणी दाखवावा. छत्रपति जर लाडूखाऊ देवताच्या भजनाला लागते, तर त्यांना छत्रपतिपद प्राप्तच झाले नसते. शिवरायाने आपले सर्वस्व

श्रीतुळजाभवानीला अर्पण करून, स्वराज्याचा सुखसोहळा महाराष्ट्राला दाखविला. प्रतापगडावर तिचीच प्राणप्रतिष्ठा केली. त्यानी कोठे गणपतीचा सार्वजनिक दर्गा स्थापन केला नाही. शिवाजी महाराज शक्तीचे उपासक होते. ते शाक्त होते. त्याना महाराष्ट्रात शक्तीचा संप्रदाय स्फुरवून त्याला स्वतंत्र करावयाचे होते. म्हणून त्यानी प्राचीन क्षात्र परंपरेचा दुर्गापूजनाचाच नवरात्र महोत्सव स्वतः सुरू करून तमाम महाराष्ट्रात घरोघर त्याचे लोण नेऊन पोहचविले. समर्थ रामदासानी सुद्धा तुळजामातेचीच उपासना केली आणि सर्व मठात नवरात्राचा महोत्सव सार्वजनिक थाटाने चालू केला. शक्तीदायक अष्टभुजा तुळजादेवी अखिल महाराष्ट्राला जितकी जवळची वाटते, तितका भट पेशव्यांचा चतुर्भुज मोदकभक्षक भटी गणपति मुळीच वाटणे शक्य नाही. निदान ब्राम्हणेतरानी तरी तुळजादेवीच्या नवरात्राला डावलून गणपति-भक्तीचे प्रदर्शन करणे, म्हणजे श्रीशिवछत्रपतीच्या पुण्यस्मरण संप्रदायाशी बेइमानी करण्यासारखे आहे.

बंगालकडे नीट लक्ष्य द्या

जसा देव तसा त्याचा भक्त. कै. टिळकानी साऱ्या महाराष्ट्राला गणोबाचे टाळ कुटायला लावून, अखेर कसल्या मोक्षाचे खापर ब्राम्हण ब्राह्मणेतर आणि हिन्दुमुसलमान जनतेच्या पदरात पाडले, ते पहा; आणि कालीपूजक बंगालकडे पहा. काव्य, वाङ्मय, शास्त्र, समाजोद्धार, राजकारण, स्वयंसेवावृत्ती, स्वार्थत्याग, आत्मयज्ञ, इत्यादि वाटेल ती बाब घ्या, बंगाल आज अखिल भरतखंडात फर्स्टक्लास फर्स्ट आहे. बंगाली तरुण म्हणजे आज जळती ज्योत चमकत आहे. बंगालपुढे स्वराज्याचा दिमाख मिरविणारा महाराष्ट्र म्हणजे इंद्राच्या ऐरावतापुढे शामभटाच्या तटूप्रमाणे दिसत आहे. आणि तसा तो कां दिसू नये ? महाराष्ट्राने शिवरायाच्या कुळस्वामिनीच्या, महाराष्ट्राच्या स्वराज्यदायिनी दुर्गेचा शक्तिसंप्रदाय अज्जीबात लाथाडून, तो जर बाळंभटी रामभटी शामभटी गणोबालाच डोक्यावर घेऊन नाचू लागला, तर त्याला शामभटाच्या तटाणीच्या कंठाळीचे भटी भाग्य कां प्राप्त होऊ नये ? बंगालने आपल्या कालीमातेशी कधीहि प्रतारणा केली नाही. बंगाल कट्टा शाक्त राहिला म्हणूनच त्याची सर्वांगीण शाक्त आज शस्त्रास्त्रसंपन्न ब्रिटिश नोकरशाहीलाहि अहोरात्र जाग्रणे घडवीत आहे, ज्याची भक्ती करायची ते दैवत असेच चैतन्यदायक व समर्थ असावे कीं नुसत्या नामस्मरणाने देह थरथरून, आचार विचारांचा थैमान सुरू व्हावा. मोदकभक्षक गणपतीत असे काय चैतन्य आहे की त्याच्या सार्वजनिक उत्सवाच्या थाबड्या डोक्यावर नाचवून या शक्तीमुमुक्षु महाराष्ट्राचा उद्धार होणार ? निदान शिवरायाभिमानी ब्राम्हणेतरानी, केवळ भटी उपव्द्यापाच्या नकलेला बळी पडून, भटी भाद्रपदी शिमग्यात भाग घेणे, लज्जास्पद आहे. भटानी गुळचट बोलबोलून ब्राम्हणेतराना गणपति-उत्सवात गुळाचे गणपति आजपर्यंत बनविले, तितके आता पुरे झाले. यापुढे भटी गुलामगिरीचा नायनाट करण्याचे जाज्वल्य शस्त्र म्हणून पुण्यस्मरण शिवरायाच्या नवरात्रोत्सवाचे पुनरुज्जीवन करून, अखिल महाराष्ट्राला शक्त्युपासक शाक्त संप्रदायात रंगविणेच अगत्याचे आहे. ज्या वेळी

श्रीशिव भवानी नवरात्रोत्सव

अखिल महाराष्ट्राच्या कोना कोपऱ्यास दणदणाट करू लागेल, त्या वेळी महाराष्ट्राची चैतन्य-देवता ती श्रीतुळजामाता, शिवरायाचे जीवनदैवत ती प्रतापगडची भवानी भक्तांच्या हाकेला हाक दिल्याशिवाय खास राहणार नाही.

महिषासुरमर्दिनी काली-दुर्गामाता

महाराष्ट्रांतील अखिल ब्राह्मणेतर दुनिया फार प्राचीन काळापासून काली-दुर्गा-पूजक आहे. दुर्गा हे दैवत मोठे रौद्र व कडकडीत आहे. काही ब्राह्मण जातीसुद्धा दुर्गाभक्त आहेत. गणेशोत्सव-प्रसारक परशुरामपंथी चित्पावन तोंडाने कितीहि भार्गवी रौद्रपणा दाखवीत असले, तरी ॲकिलीसने ॲगामेम नॉनला उद्देशून म्हटल्याप्रमाणे, 'ते सारे तोंडाचे कुत्रे असून मनाने हरणासारखे भेकड आहेत.' ते कालीमातेच्या उपासनेच्या फंदात पडणार नाहीत. त्यांचा पिंड गाणपत्य आहे; मोदकभक्षक आहे; तुळजाभक्त मऱ्हाठ्यांप्रमाणे महिषासुरमर्दक नाही. बरिस्टर एस. सी. मुकरजी आपल्या ''हिन्दुजनांचा ऱ्हास आणि अधःपात'' नामक त्रिखंडविश्रुत ग्रंथात कालीदेवीचे माहात्म्य कसे रंगवितात ते वाचकानी नीट विचारात घ्यावे:-

''शक्तिपूजा म्हणजे काळ्या फत्तराच्या एका अक्राळविक्राळ देवीची, भरंसाट भेसूर प्रकाराने आज तुम्ही करीत असलेली पूजा नव्हे. तुमच्या सामाजिक घाशीरामीखाली दडपून पडलेल्या देशातील स्त्रीजातीच्या पवित्र हृदयात तुमच्या राष्ट्राची शक्ती धमधमत आहे. जुन्या चित्रकाराने शक्तीचे-काली देवीचे-जे चित्र रंगविले आहे, त्यातील तपशीलाच्या चिन्हांचा वास्तवीक अर्थ कोणालाच समजत नाही. प्राचीन चित्रकार आपल्या गूढ भावनाना चिन्हांच्या द्वारे व्यक्त करीत असत. कालीचे चित्र कसे आहे ? एक नग्न उग्र स्त्री, हातात नागवी तरवार, गर्द निळा रंग, गळ्यात माणसांच्या मुंडक्याच्या माळा, बेफाम थैमान घालीत आहे. ही तुमच्या काली देवीची मूर्ती. तिच्या पायाशी तुडवून लाथाडून पडला आहे तो कोण ? हे चिन्ह काय दर्शविते? काली देवीने लाथाडून लोळविलेला तो भिक्षुकशाहीचा दांभिक व लुच्या भट आहे. सत्याची नागवी तलवार परजीत, आपल्या वाजवी हक्कांसाठी, या भटाला चिरडून जमीनदोस्त करणेच काली देवीला प्राप्त आहे. विचार करा. सावध व्हा. नाहीतर, आज तुमच्या गुलामगिरीखाली दाबून गेलेली स्त्रीजात-हिंदुस्थानची शक्तीकालीदेवी संतापाने भडकून जाऊन, भरतभूमीवरून या दांभिक लबाड भिक्षुकशाहीचे तळपट उडविण्यासाठी खरोखरच नागवी तरवार प्रत्यक्ष परजीत, भयंकर थैमान घालायला सोडणार नाही. ददद तुमच्या अस्तित्वाला दडपीत चिरडीत नेणाऱ्या न्यायनिष्ठूर कर्मन्यायाची याद राखा. कर्मन्यायाचा कचकाच असा आहे कीं त्याला व्यक्तीची पर्वा नाही, कीं जातीची किंमत नाही. आडवा आला कीं काप, एवढेच त्याला माहीत. या पुराणप्राचीन जगतात आजपर्यंत शेकडो मानव वंश नामशेष झाले, सफई आस्तित्वातून उठले. कालीदेवीच्या गळ्यात जी नररुंडमाळा घातलेली आहे, ती विचारपूर्वक पहा. प्रत्येक मुंडके म्हणजे पृथ्वीतलावरून कर्मन्यायाने नष्ट झालेल्या एकेका मानववंशाची निशाणी आहे.''

कालीभवानीच्या उत्सवाचे महत्व

भटांचा गणपति चार हातांचा, तर ब्राम्हणेतराची काली दुर्गा आठ हातांची. गणपतीचे वाहन उंदीर. दुर्गेचे वाहन सिंह. गणपति मोदक-मर्दक, तर तुळजाभवानी महिषासुर-मर्दक. गणपति नुसत्या शाब्दिक 'शांतिरस्तु पुष्टिस्तुष्टिश्चास्तू'चा आशिर्वाद्या, तर आमच्या शिवरायाची भवानी हाकेला हाक देऊन बोलबोलता प्रतापगडाचा प्रताप आकाशपाताळात दुमदुमविणारी. भटांच्या गणपतीला पुराणाच्या पातड्याचा काल्पनीक आधार, आमच्या भवानीला ताजा तडफडीत शिवशाहीचा

ब्राम्हणेतरांच्या प्रत्यक्ष आतड्याच्या जिव्हाळ्याचा-इतिहास. गणपतीकडे पाहिले तर वेद दिसतील, ब्रम्ह दिसेल, माया दिसेल, ब्राह्मण दिसेल, मोदक दिसतील. तुळजाभवानीचे नाव उच्चारा की सबंध शिवशाहीचा स्वराज्यपट आणि त्यातले सर्व वीर व विरांगना आमच्या मनश्चक्षु पुढे जिवंत नाचू लागतील. विशेषतः 'गणपति-विसर्जन' आणि दुर्गेचे 'सीमोल्लंघन' या दोन कार्यक्रमात होणारे म नावरचे परिणाम नीट लक्ष्यात घ्या. स्पष्ट सांगायचे तर पहिल्यात उत्साहभंग विशेष. आठचार दिवस थाटमाटाने पूजलेली मूर्ती उचलून नेऊन पाण्यात फेकून देणे, मृत्यूप्रसंगाइतकेच चमत्कारीक. पण दुर्गेचा सीमोल्लंघन विधी साजरा करून घरी परतणाऱ्या प्रत्येक भक्ताला ओवाळणीचे स्वागत मिळते. 'सोने लुटून' परत येणे, या भावनेतला उत्साहाचा परमावधि गणपति विसर्जनात मुळीच आढळायचा नाही. असा हा आमचा खास जिव्हाळ्याचा १० दिवसाचा प्राचीन शिवपरंपरेचा भवानी महोत्सव डावलून, भटी पिंडाच्या टिळकी गणपतीला ब्राह्मणेतरानी डोक्यावर घेऊन नाचावे, यावरून भटी मध्यस्थीचे वीष भटेतर समाजांच्या किती पिंडी ब्रह्मांडी जाऊन भिनले आहे, याचा विचारवंतांनी विचार केला पाहिजे. गणपति हे अखिल हिंदूंचे दैवत धरले, तर प्रत्येकजण! त्याची आपापल्या घरात पूजा करीतच असतो. तेवढ्यासाठी त्याचे चव्हाट्यावर सार्वजनिक डोले मिरविण्याची जरूर नाही. केवळ भटांच्या भाद्रपदी शिमग्याला तोडीस तोड आणि जोडीस जोड देण्यासाठी गणपति आणि मेळे यांचा उपद्व्याप केला तरी का? अखेर आमच्या लोकमान्यांचा सार्वजनिक गणपति भटेतरांच्या बोडक्यावर आम्ही बसविलाच की नाहीं ? म्हणून भटलोक हिणवायला मागे पुढे पहाणार नाहीत. आणि आज पहातहि नाहीत.

उत्सव कसा साजरा करावा

बंगालला कालीउपासना आहे, पण इतिहास नाही. महाराष्ट्राला काली-उपासना आहे आणि जबरदस्त इतिहासहि आहे. कालीउपासना करून बंगाल आपला नवीन इतिहास घडवीत आहे. महाराष्ट्र आज उपासना आणि इतिहास या दोनहि महत्वाच्या गोष्टीना रामराम ठोकून, भटी गणपतीच्या फिसाटात भटी काष्ट्याच्या वळणाने आत्मघातालाच मोक्ष मानून त्यात रंगला आहे. ही भटी रंगभंगका लोटा आता लाथाडून, महाराष्ट्राने शक्तीपूजनाची कास धरली पाहिजे आणि भटी प्राबल्यामुळे मागे पडलल्या शिवरायाच्या सार्वजनिक नवरात्रोत्सवाचे पुनरुज्जीवन केले पाहिजे. आश्विन शुद्ध प्रतिपदेला अष्टभुजा महिषासुरमर्दिनी दुर्गादेवीच्या आणि बंगालच्या कालीमातेच्या प्रतिमाची यथाविधी प्राणप्रतिष्ठा करावी. आजूबाजूला शिवछत्रपति, संभाजी वगैरे सर्व छत्रपति; तानाजी, बाजीप्रभु, अहल्याबाई होळकर, सुभेदार मल्हारराव, गायकवाड, शिंदे, आदिकरून सर्वांच्या प्रतिमानी मखर व मंडप शृंगारावा. नव रात्रीत महाराष्ट्राच्या इतिहासाची पोवाडे, कथा, कीर्तने, भजने, जलसे, व्याख्याने, प्रवचने यांच्याद्वारे मनोवेधक व आत्मप्रबोधक उजळणी होईल, असा कार्यक्रम आखावा. सकाळ संध्याकाळ पूजा आणि आरती ठेवावी. या आणि इतर सर्व कार्यक्रमात आपल्या अस्पृश्य बांधवाना सर्रास भाग घेऊ द्यावा. इतकेच नव्हे तर त्याना विशेष महत्व देऊन, कीर्तनें करणाऱ्या व पोवाडे म्हणणाऱ्या अस्पृश्य कीर्तनकाराना व शाहीराना अग्रपूजेचा मान द्यावा. सर्वाना सहजगत्या स्वतः पूजा करता येईल, असा घटस्थापनेचा प्रचण्ड घट मखरात समोरच ठेवावा. दोन्ही बाजूला दोन रोहाची क्षेत्रे रुजवणीस लावावी. दोन समयांचा नंदादीप नऊरात्र अखंड तेवत

ठेवावा. दहाव्या दिवशी सर्व आबालवृद्ध कालीभक्तानी घरोघर मिष्टान्न भोजनोत्तर एकत्र जमून, जगदंबेच्या प्रतिमेची पालखी अनंत वाद्यांच्या गजरात महाठशाही थाटाच्या स्वारीने सीमोल्लंघनाला न्यावी. तेथें सुवर्ण पूजनोत्तर सोने लुटावे, आणि जगदंबेची पालखी वाजत गाजत मण्डपात परत आणावी. ठिकठिकाणच्या स्वाभिमानी ब्राम्हणेतरानी श्रीशिवरायाच्या परंपरेचा अभिमान बाळगून, हा महोत्सव सर्रास रूढ करण्याची खटपट केल्यास, गणेशोत्सवाची भटी गुलामगिरी आपोआप बंद पडून महाराष्ट्राला योग्य मार्ग दाखविल्याचे पुण्य त्याना लाभेल.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटे

(**क्षमस्व**. गेल्या दोन वर्षात अनेक कलमबहाद्दरानी आपापली पुस्तके 'अभिप्रायार्थ' प्रबोधनाकडे पाठविली. पण जेथे संपादकच खादीटोपीला महाग झाला, तेथे त्या मित्रांच्या शेलापागोट्याची बरदास्त कशी ठेवता येणार ? बरीच पुस्तके हरवली. जी काही हाताला लागली आता लागली, त्यांचा प्रबोधनाच्या रसिक वाचकांस परिचय करून देत आहे. सर्व कलमबहाद्दराना माझे प्रणिपात. --**सं.प्र.**)

सत्यशोधकांचा वेद : अथवा 'जेधे-जवळकरा'स उत्तर

ले.-श्री. खंडेराव गणपतराव कालेकर. प्र०- श्री. शंकर महादेव वालवलकर, नारायण आश्रम नं. ७ मुंबई नं १२. किं. ४ आणे. आकार क्रौन, पाने ४६.

पुस्तकाचे नामकरण आणि आतील विषयनिरूपण यांची तुलना केल्यास, नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा, या म्हणीची प्रत्येक वाचकास आठवण होईल. हे पुस्तक सत्यशोधकांचा 'वेद'च मानिले, तर त्याना अझून पुष्कळच शिकावयाचे आहे आणि 'वेद' कशाला म्हणतात याची लेखक-व्यासालाहि असावी तितकी कल्पना नाही, असे दोन विचार उद्भवतात. पुस्तकाचे नाव विषयानुरूप असावे लागते. जी. आय. पी. रेलवेच्या टाईमटेबल पुस्तकाला जर 'महाभारत' नाव दिले, तर कोणी कोणाचे कान कापीत नाही; पण या हास्यास्पद प्रकाराबद्दल समंजस लोक लेखक प्रकाशकाला दूषण देतात. एका साध्या टीकेच्या प्रत्युत्तराला 'वेद' ही संज्ञा देण्यात श्री. कालेकरानी विवेकाला रामराम ठोकला, असे म्हटले पाहिजे. संदेशकार कोल्हटकर यांनी व्यापारी धोरणाने 'जेधे-जवळकर' या अशाच भरंसाट जाहीरातवजा नावाचे जे एक पुस्तक लिहून प्रसिद्ध केले होते, त्यातील कित्येक विधानाना प्रस्तुत पुस्तकात 'उत्तरे' दिली आहेत, असे लेखक आणि प्रस्तावक श्री. बोले सांगतात. लेखनाला कोल्हटकरी चोपडे निमित्त झाले असले, तरी प्रस्तुतचा 'वेद' हा एक स्वतंत्र निबंधच आहे. आणि लेखकाला तो निमित्ताशिवाय प्रसिद्ध करता आला असता. श्री. कालेकर हे चांगले स्वाध्यायशील लेखक असून, त्यांची भाषापद्धति व्याकरणशुद्ध आणि डोलदार आहे. विषयप्रतिपादन कळकळीचे असल्यामुळे विवेचनात साहाजिकच जोम उमटला आहे. ब्राम्हणेतर आणि सत्यशोधक चळवळींच्या

उत्पत्ति स्थितीची मिमांसा ठिकठिकाणी उत्तम व परिणामकारक मुद्यांनी रेखाटलेली आहे. मुद्दे जसजसे आठवत किंवा आढळत गेले, तसतसे मांडल्यामुळे आणि विषयांचे मथळे कोठे कसे द्यावे याचा काहीच धरबंद न ठेविल्यामुळे, उत्तम विचारांचे हे पुस्तक विचारक्रान्तीच्या कामी कमजोर होऊन बसले आहे. आमची श्रीयुत कालेकराना आग्रहाची विनंती आहे की त्यानी हे पुस्तक नीट प्रकरणवार माण्डणीने पुन्हा ठाकठीक लिहून, त्याची 'सुधारून वाढविलेली आवृत्ति' काढावी.

मानसिक गुटिका

ले.-श्री. शं. वा. किर्लोस्कर, संपादक 'किर्लोस्कर खबर', किर्लोस्करवारी, जि. सातारा. किं० चार आणे.

आत्मसामर्थ्य हेच जगातले खरे सामर्थ्य होय. इतर सामर्थ्य कितीहि असली, दिसली आणि भासली, तरी त्यांचा मनुष्याला काही उपयोग होत नाही. जन्म मरण आणि आयुष्यातली सर्व सुखदुःखे आमची आम्हालाच भोगावी लागतात. वैद्य कितीहि कुशल आणि परोपकारी असला तरी तो आमची पोटदुखी स्वतः पत्करीत नाही. तर ज्या शारिरीक सत्वाच्या अगर तत्वाच्या अभावामुळे पोटदुखीचा आजार उद्भवला, त्या सत्वतत्वाना औषधोपचाराने सामर्थ्यसंपन्न करून रोगाचे निर्दाळण करतो. सर्व रोगांवर औषधे आहेत. पण आत्मसामर्थ्याला लंजूर करून माणसाला मर्दाचा नामर्द बनविणाऱ्या मानसिक रोगांवर औषध नव्हते. ते श्री. शंकररावजी किर्लोस्कर यांनी या 'मानसिक गुटिका' ने तयार केले आहे. या गुटिकांत अनेक देशी परदेशी वनस्पति आणि रसायने घातली असून, त्यांचा खलहि उत्तम प्रमाणशीर झालेला आहे. आत्मसामर्थ्याच्या लंजूरीवर आणि क्षयावर या मानसिक गुटिका, अनुपानाप्रमाणे नीट पथ्यपाणी सांभाळून अगत्य घ्याव्या, अशी प्रबोधनाची खास शिफारस आहे.

मुलांचे खेळ

(पूर्व खानदेश स्कूल बोर्डाची शारीर-शिक्षण-पुस्तक-माला. पुस्तक १ लें.) संग्राहक व प्रकाशक श्री. शि. स. शिर्के, बी. ए., ॲड. ऑफीसर, डिस्ट्रिक्ट स्कूलबोर्ड, जळगांव (पूर्व खानदेश).

या छोट्या पुस्तकात बालवर्गापासून तो ७ व्या यत्तेच्या मुलांपर्यंत निरनिराळ्या खेळांचे इतके मजेदार प्रकार दिले आहेत, की ''बालक व्हावें । मौजेंत पुन्हा खेळावें'' (कवि कुमार यशोद) असे आम्हाला वाटू लागते. परंतु ''रम्य तें बालपण देई देवा फिरुनि'' (कवि कोल्हटकर) या प्रार्थनेचा फोलपणा स्पष्ट दिसत असल्यामुळे, ''बाळपणीचा काळ सुखाचा आठवतो घडिघडी। फिरुन ये न कधि अशि ही घडी।।'' (देवल) यातच समाधान मानणे प्राप्त आहे. पडपड़ सावली, कुत्रा-तोबा, गणेश-तोबा, उलटा सूरमासा, चक्कीवाला, मोंगल व मराठे, अस्वलाची शिकार, इत्यादि ७३ मनोरंजक, शक्तिवर्धक आणि चापल्योत्तेजक खेळांचे प्रकार यात दिलेले आहेत. सर्व शाळांतून या खेळांचा प्रचार वर्गवारी सुरू ठेवणे अगत्याचे आहे. प्रत्येक पालकाने आपल्या लहान मुलांमुलीना या खेळांची दीक्षा द्यावी, अशी शिफारस आहे. पुस्तकावर किंमत दिलेली नाही. पुस्तक 'बिनमोल' आहे, पण ते विनामूल्य मिळत असावे, असे वाटत नाही. खुलासा व्हावा.

शेती-शेतकरी (पोवाडा)

कवि श्री. मार्तण्ड कृष्ण दाभाडे, साहित्य सरोज मण्डळ, औन्ध, जि. सातारा. किं० ४ आणे.

'ससा पुन्हा आपल्या बिळाकडेच परततो' अशी एक म्हण आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या भपक्याने पाठलाग केलेला हिन्दी ससा आता आपल्या बिळाच्या आसऱ्याकडे परतू पाहात आहे. गेली शंभरावर

वर्षे सुधारक, कलादंत, प्रजावत्सल आंग्रेज बहाद्दरांच्या सार्वभौम छत्राच्या सावलीखाली, हिन्दवी प्रजेचे पोट पाठीला चिकटण्या इतका ऐहिक मोक्ष अभेद भावाने सर्वांच्या वाट्याला लाभल्यामुळे, शेती आणि शेतकरी या जिव्हाळ्याच्या विषयाकडे राष्ट्राचे लक्ष्य वेधत चालले आहे. हा लक्ष्यवेध विशेष उत्कटत्वाने साधण्याची कामगिरी लेखक वक्ते प्रवचनकार कीर्तनकार गोंधळी यानी हाती घेतली पाहिजे. श्री. दाभाडे हे उमेदवान् कीर्तनकार आहेत. त्यानी देशकालवर्तमानाच्या तंबोऱ्याच्या तारा काळजीपूर्वक अजमावून,

नांगर हा रत्नाचा सागर प्रेमें हातिं धरा ।

खरें आमुचें स्वराज्य हेंची शेतकऱ्यांत शिरा।।

असा नव्या मन्वंतराचा नवीन झणत्कार या पोवाड्याच्या द्वारे काढला आहे. पोवाड्याचे कडवे आणि मधून मधून थोडे गद्य प्रवचन, अशी योजना केल्यामुळे, या पुस्तकाचे वाचन तर सहजरंजक होतेच, पण गोंधळ्याच्या एकसुरी गायनासारखा हा पोवाडा कंटाळवाणा न होता, उलट गद्य प्रवचनाच्या खमंग फोडणीने चांगला परिणामकारक होतो. श्री. मोहिनीराज शंकर मुळे, एम. ए. यानी विषयाची प्रस्तावना थोडक्यात मुद्देसूद केली आहे. ''शेती राष्ट्राची खरी चिरस्थायी संपत्ति आहे. शेतकरी राष्ट्राचा खरा अन्नदाता आहे. समृद्ध शेतीविना संपत्तिमान् असणारीं वा दिसणारीं राष्ट्रें खरोखर दरिद्रीच होत .... ज्या राष्ट्रामध्यें कृषिप्रवण शेतकरी नाहीं, तें राष्ट्र इतर रीतीने संपन्न असूनहि सदैव बुभुक्षितच रहावयाचें.'' या श्री. मुळे यांच्या प्रस्तवनेच्या मुळाचा पोवाड्यात कवीने उत्तम वेलविस्तार केलेला आहे. काव्यकौशल्यापेक्षा विचारक्रान्तीचा मुद्दा पोवाड्यांत प्रधान असल्यामुळे, कित्येक ठिकाणची बोजड आणि अवजड रचना क्षम्यच मानली पाहिजे. सामान्यतः पोवाडा उत्तम वठला आहे आणि सर्व प्रवचनकार कीर्तनकार जलसेवाले यानी त्याचा लोकजागृतीच्या कामी अवश्यमेव उपयोग करावा.

प्रस्तुत पुस्तक श्रीमन्त बाळासाहेब पंत प्रतिनिधी औन्ध यांना अर्पण केले आहे; आणि श्रीमंत पंतांचा प्रजाजन किंवा आश्रित या नात्याने, कवीने त्याना 'सर्व सदुद्यमांचे समर्थ प्रवर्तक' म्हटले, यात अपूर्व असे काहीच नाही. अर्पणपत्रिकेच्या मसुद्यासाठी शब्द कोशाच्या बरणीतून गोडगोड विशेषणांच्या कापट्या हुडकिण्याची प्रवृत्ति हिन्दु पिण्डलाच शोभून दिसते. पण गोडाळपणालाहि काही मर्यादा असली म्हणजे बरे वाटते. अस्पृश्यता-विध्वंसन हा एक राष्ट्रमान्य 'सदुद्यम'च आहे, आणि २९ व्या कडव्यात मार्तण्ड बुवांनी व्यक्त केलेले,

अस्पृश्याला काम कराया निजसदनी ठेवा ।

तनमन लावुनि करिल बापडा एकनिष्ठ सेवा ।।

स्वधर्म-बंधू असूनी कां हो विटाळ मानावा ।

परधर्मामधि गेल्यावरती खाना मग खावा ।।

हे विचार आणि त्यावरचे स्पष्टोक्तीचे केलेले प्रवचन, औन्धाच्या 'प्रजावत्सल प्रभू'ला कितपत आचारणात आणता आले असतील याची आम्हाला जबरदस्त शंका येते. विधवेशी पुनर्विवाह केला, एवढ्याच सबबीवर एका ब्राह्मण शाळामास्तराला बडतर्फ आणि हद्दपार करणाऱ्या जीर्णमतवादी औन्धाधिपति पंतांकडून अस्पृश्यता विध्वंसनासारखा 'सदुद्यम' कितपत 'प्रवर्तक' करण्यात येत असेल, याचे कोडे उलगडणे फारसे कठीण नाही. काळ कितीहि बदलला तरी संस्थानी हवेतल्या लोकांची अवास्तव स्तुतिपाठाची पिण्डप्रकृति बदलत नाही, हेच खरे.

विषयांतराचा हा सत्यान्वेशी चिमटा घेऊनहि, श्री. मार्तण्डबुवा यांच्या या विचारक्रान्तिकारक काव्याचे प्रबोधन मनापासून अभिनंदन करीत आहे.

देव-दर्शन

(एकांकी दृश्य). ले.-विश्वनाथ गोपाळ शेट्ये, बी. ए. एलेल्बी., पार्वतीवाडी, माहीम (मुंबई). किं० ३ आणे.

या एकांकी प्रहसनात अस्पृश्यांच्या देवालय-प्रवेशाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. म ाटुंग्याचा अस्पृश्य मुलामुलींचा 'कुमार विनय मेळा' (काय विलक्षण 'भारती जडासुधी' नाव हे!) हे प्रहसन ठिकठिकाणी नटवून दाखवीत असतो. यात तात्विक किंवा व्यावहारीक आक्षेपांचे खंडण-मंडन काहीच नसून, अखेर परमेश्वरी अवताराच्या जादुगिरीने देवालय-प्रवेशाचा प्रश्न सोडविण्याची खटपट पोरकट आणि अव्यवहार्य झाली आहे. गांवमामा व गांवगुंड ही प्रधान पात्रे वाटतात; आणि त्यांच्या रंगाढंगावरून लेखकाला 'गिरगावी जरनॅलिझम्' चे भूत चांगलेच भोवलेले दिसते. गिरगावी कलमकसायी एका रात्रीत प्रहसन आणि आठ दिवसात साग्रसंगीत पंचांकी नाटक कसे निर्माण करू शकतात, याचे गूढ हे प्रहसन सफाईत सोडवील. त्याचप्रमाणे हव्या त्या सार्वजनिक सबबीवर एकमेकांचे खासगी वैराचे वाभाडे कसे काढावे, ही 'पेटण्ट' गिरगावी श्रीयुती लीलाच तेवढी या चोपड्यात विशेष दिसते. श्री. शेट्यांसारख्या पदवीधर विद्वानाने आपली स्वाध्यायशील बुद्धिमत्ता अशी वारेमाफ उधळू नये, अशी विनंती आहे.

मिरा (एकांकी प्रहसन)

ले. - श्री. वि. रघुनाथ, एल. एम. एस., वांद्रा (मुंबई, सबर्बन डिस्ट्रिक्ट). किंमत आठ आणे.

प्रस्तुत प्रहसनाचा जन्म बऱ्याच विवेकी विचारमंथनातून झालेला आहे. यात श्री. शेट्यांच्या 'देवदर्शना'चा थिल्लरपणा लवमात्र नाही. दीड दोन तासांचा प्रयोग, उत्तम सात्विक तत्वांचा परिपोष करणारे आख्यान, दोन ते चार इतिहास प्रसिद्ध पात्रे, तीन चार उत्तम पदे, सर्वांना समजेल अशी बालबोध भाषा, इत्यादि तपशीलाची छोटी नाटकेच लोकमान्य व्हावी, या हेतूने लेखकाचा हा प्रयत्न आहे; आणि तो उत्तम साधला आहे. आख्यानाला सुप्रसिद्ध साध्वी मिराबाईचे चरित्र. पात्रे फक्त चारच:-मिरा, भोज (तिचा पति), भटजी आणि अकबर बादशहा. पदे चारच:-१ कबिराचे आणि ३ मिराबाईची. संभाषणे थोडक्यात बालबोध, स्वभावदर्शक आणि परिणामकारक. प्रस्तावना आणि नाट्यमार्गदर्शिका यांत लेखकाने केलेल्या सूचनांचा नाट्यसृष्टीतील विचारवंतानी अगत्य विचार करावा. प्रहसन उत्तेजन देण्यासारखे आहे.

साभार स्वीकार

(१) आत्मस्वरूप. विलेपार्ले टिळक विद्यालयाचे द्वैमासिक. (२) मराठा शिक्षण परिषद. सोलापूरच्या २०व्या बैठकीचा रिपोर्ट. अध्यक्ष नाम. भास्करराव जाधव यांचे भाषण महत्वाचे आणि मननीय आहे. (३) सावंता माळी आणि श्रीसंत परमानंद गोरा. ले. शिवनिरंजनबुवा.

सूचना :- प्रतिभेटीची पत्रे आणि अभिप्रायार्थ पुस्तके वगैरे संपादकाच्या नावाने दादरच्या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

□□□

निवेदन

कृतज्ञतेचे अश्रू

कृतज्ञतेच्या अश्रूत सुखदुःखाचे समसमान मिश्रण असते. संकटकाळीं आत्मस्फूर्तीने सहाय करणाऱ्या सज्जनांच्या मनाच्या भलेपणाची जाणीव एकीकडे आनंदाने हृदय फुलवीत असते, तर दुसरीकडे जीव क्षणोक्षणी करपविणाऱ्या संकटकाळच्या शेकडो आधीव्याधींच्या स्मृतीने आपले मन कांपत असते. प्रसंगांशिवाय पारख नाही. प्रबोधनाच्या पंचवार्षिक सेवेमुळे अखिल महाराष्ट्रात त्याच्या कार्याची अढळ अभिमानी भगिनीबांधवांची संख्या केवढी पसरलेली आहे, याची मला पूर्वी जाणीव होतीच; परन्तु गेल्या दोन वर्षांच्या कठोर आपत्तींच्या कलिकाळात ती जाणीव अनेकविध सहायांच्या रूपानी विशेष व्यक्त झालेली पहाण्याचे भाग्य मला लाभले. जितले सांगावे जनाला आणि हरले सांगावे मनाला. पुष्कळ महिने माझ्या व्यावहारीक ऱ्हासाची कहाणी ओठाआडच ठेवली होती. पण अखेर तिलाहि तोण्ड फुटले आणि ती कर्णोपकर्णी सर्वत्र प्रसृत होताच, प्रबोधनाच्या आश्रयदात्यानी सहानुभूतीच्या सन्देशांचा आणि उत्तेजनांचा माझ्यावर केवळ वर्षाव केला. ज्या कित्येकानी थोडी फार सांपत्तिक मदत केली, त्यांची नावे कृतज्ञतापूर्वक मी येथे नमूद करून ठेवीत आहे.

रा. ब. प्रभाकर विठ्ठल गुप्ते, श्री. मार्तण्ड सखाराम प्रधान; विनायक आत्माराम दिघे, ङ उ. ए; श्री. रेडे, ठाणे; श्री. बाबाजी अनाजी तारकर; श्री. गजानन सखाराम गुप्ते, इ. अ. ङ. उ. ए ; श्री. चावक, जहागीरदार आल्हणवाडी; श्री. तुकाराम भाऊ कोलते; श्री. शामराव रामभाऊ शेलार; श्री. विनायक नारायण चिटणीस; धुळे व चाळीसगाव येथील ब्राम्हणेतर मण्डळी श्री. रामचंद्र नरहर वैद्य; श्री. धोंडो हरी तांबट; रा. सा. रामचंद्र सदाशिव आठवले, इ.अ,

दिवाण साहेब, सांगली; रा. ब. व्ही. ए. गुप्ते, इ.अ नाशिक; श्री. गजानन जीवनराव राजे, श्री. तुकाराम विठ्ठल पुजारी व मित्रमण्डळ; शेट गोविंदराव यशवन्तराव शिन्दे; श्री. रघुनाथ शेकोजी बहिरट; श्री.आर. डी. कवळी, इ.अ

या सर्व सहाय्यकांच्या चरणांवर मी कृतज्ञतेने माझे मस्तक ठेवीत आहे. माझे मित्र श्री. नानासाहेब वैद्य, मालक श्री दत्तात्रय छापखाना, पुणे शहर, यांचे उपकार शब्दातीत आहेत. कारस्थानी सावकारशाहीने प्रबोधनाच्या दाबलेल्या गळ्याचा दाब त्यानी शुद्ध आत्मस्फूर्तीने दूर लोटून, प्रबोधन-कार्य माझे आहे

या भावनेने प्रबोधनाच्या पुनरुज्जीवनाची स्वतःच्या जबाबदारीवर पुनर्घटना करण्याचे मनावर घेतले नसते, तर, प्रिय वाचकहो ! आजचा हा क्रान्त्यंक आपल्या हाती पडणे शक्यच नव्हते. श्री. वैद्यांनी अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली आहे. त्यानी प्रबोधनाच्या उच्चाराचा मार्ग खुला केला आहे. त्यानी यासाठी फार सांपत्तिक स्वार्थत्याग केलेला आहे. त्याचीहि जाणीव माझ्या भगिनीबांधवानी ठेविली पाहिजे. त्यानी प्रबोधनाला आपलेपणाने वागविण्याचे आपले सिद्ध ब्रीद यापुढेहि चालवावे आणि नवीन वर्गणीदार मिळ. वून देऊन त्याच्या नवमतवादी कार्याला सक्रीय उत्तेजन द्यावे, म्हणजे माझ्यावरच उपकार केल्यासारखे होईल. सध्याहि माझ्या संसाराचा योगक्षेम अत्यंत संशयावस्थेत आहे. प्रबोधनाला जर भरपूर सांपत्तिक मदत होईल, तर त्यामुळे मलासुद्धा कोण्डाभाकरीची मदत देण्याचे श्रेय आपल्याला लागेल, अशी सर्व हितचिंतकाना माझी कळकळीची प्रार्थना आहे.

सर्वांचा नम्र सेवक

केशव सीताराम ठाकरे.

□□□

प्रबोधन वर्ष ६

एकूण अंक ६

पहिला अंक : नोव्हेंबर १९२९

सहावा अंक : मार्च १९३०

लेख

''इडा पिडा टळो । बळीचे राज्य येवो''

आज बलिप्रतिपदा. विक्रम शकाचा गुडी पाडवा. दीपावली सणाचा अत्यंत आनन्ददायी दिवस. जिकडे पहाल तिकडे सर्वत्र मंगल शुचिर्भूत उत्साही आणि प्रेमी भावना उत्कटत्वाने व्यक्त झालेल्या आढळतील. सूर्योदय होतो न होतो, तोंच प्रत्येक आर्यस्त्रीच्या तोण्डी

इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो

हा उद्‌गार विशेष तळमळीने आणि विशेष आदराने बाहेर पडलेला ऐकू येतो. दरसाल, शतकानुशतके, या एकाच ठराविक दिवशी प्रातःकाळी आमच्या माता भगिनी पत्न्या हा उच्चार पिढ्या न् पिढ्या करीत आल्या. आम्ही तो आलो. पण त्या उद्‌गारांचे महत्व अथवा वर्म शोधून पाहण्याचा प्रयत्न मात्र कोणी कधीच करीत नाही. बलिप्रतिपदेसाठी दिवाळी, का दिवाळीसाठी बलिप्रतिपदा? का, पंचांगी गुलामगिरीमुळे दिवाळीच्या सणात बलिप्रतिपदा निष्कारण येते, म्हणून

आई सवाशीण बाप गण

मामल्याने आपण तिची बडदास्त ठेवतो? कसलाच काही विचार नाही. पीछेसे आयी और आगे बढी या रूढीपेक्षा विशेष विचाराने मस्तकाला त्रास देण्याची फुरसद कोणालाच नसते. नर्कचतुर्दशी असो, बलिप्रतिपदा असो, किंवा भाऊबीज येवो, दिवाळीच्या तीनचार दिवसात मिष्टान्नांची चंगळ उडाली कीं झाले. या पलीकडे त्या त्या दिवसाचे तात्विक महत्व उमगून आचार विचारात क्रान्ति घडविण्याची शुद्धच कोणाला नसते. शारिरीक मिष्टान्न-लोलुपता सर्व जन भागवितात; पण मानसिक मिष्टान्न-लोलुपतेची पर्वा कोणीच करीत नाही.

यावर पुष्कळ वाचक म्हणतील कीं बलिप्रतिपदेत कसले कर्माचे गूढ? तर त्याचे वर्म शोधण्याची विशेष यातायात करायची? या दिवशी श्रीविष्णूने वामनाचा अवतार घेऊन बळीराजाला पाताळात चिणले. त्याची चिरकाल आठवण राहावी, म्हणून हा बलिप्रतिपदेचा सण हिन्दुजन साजरा करतात.

बळीला पाताळात चिणून नामशेष करण्यासाठी प्रत्यक्ष श्रीविष्णूला वामनरूपी ब्राम्हणाचा अवतार घ्यावा लागला. यावरून बळीराजा रावणासारखा राक्षसी क्रूरकर्मा असला पाहिजे खास. नाही तर दुर्जनांच्या निर्दाळणासाठी आणि सज्जनांच्या परित्राणासाठी अवतार घेण्याचे गीतोक्त कंत्राट घेणारा

परमेश्वर एरवी निष्कारण अवतार कशाला घेईल? अर्थात् बळीराजा मोठा दुर्जन बदकर्मा राक्षसच असला पाहिजे, असे मानल्याशिवाय श्रीविष्णूच्या वामनावताराचे समर्थनच होणे शक्य नाही. बरे, वामनाने बळीला चिरडून उध्वस्त केले, तर त्यात वामनविजयाचा डंका सणाने चिरंजीव करायचा, का बळीची प्रतिपदा साजरी करायची? येथे तर उलटा प्रकार चालू आहे. रावणाचे कन्दन केले म्हणून रामविजयाचा डंका सर्वत्र गाजतो; रावण-अमावास्या कोणी साजरी करीत नाही. पण येथे तर वामनाची आठवण चुकून सुद्धा कोणी करीत नाही. ज्याच्या त्याच्या तोण्डी बळीराजा! विशेष आश्चर्याची आणि विचाराची गोष्ट हीच कीं एकजात सगळा स्त्रीवर्ग 'इडापिडा टळो आणि बळीचे राज्य येवो' अशी मोठ्या आवेशाने गर्जना करतात! त्या सुद्धा

वामन वामनकी जय

करीत नाहीत. परमेश्वराच्या वैऱ्याचा जयजयकार करणाऱ्या, इतकेच नव्हे तर 'बळीचे राज्य येवो' असा सालोसाल अट्टाहास दर्शविणाऱ्या आमच्या माता भगिनी मुली आणि पत्न्या देवद्रोही आणि धर्मद्रोही कम्युनिष्ठच म्हणायच्या कीं काय? चालू ब्रिटीश अमदानीत ब्रिटीश सत्ताधाऱ्याना अप्रिय वाटणाऱ्या तत्वाचा व्यक्तीचा समूहाचा संघाचा किंवा राष्ट्राचा कोणी जर जयजयकार करील, तर चटकन् त्याच्या मानेला १२४-अबकडची घोरपड डसविण्यात येते. मग खास परमेश्वराने अवताराची यातायात करून ज्या बलीचा विध्वंस केला, त्या बळीचे राज्य येवो, बळीचे राज्य येवो, असा अट्टाहास करणाऱ्या बण्डखोर बायांचा देवद्रोह देवाला कसा परवडतो? वेळी दयासागर देवाने 'बायका' म्हणून आरोपीकडे दुर्लक्ष्य केले असले तरी देवाचे खास प्रतिनिधी, केवळ भूतलावरील देवच, अशा ब्रह्मवांत्युत्पन्न ब्राम्हणानी सुद्धा या बायकांच्या बण्डाला तोण्डबंध लावण्याची खटपट करू नये, हे तर जगातल्या आश्चर्यातले महदाश्चर्य होय. ब्राह्मणेतर स्त्रियानी बळीचा जयजयकार केला तर पुष्कळसा क्षम्य ठरेल. कारण बळीराजा क्षत्रिय अर्थात् ब्राह्मणेतर होता. पण ब्राह्मण स्त्रियानीहि ब्राह्मणावतार वामनाच्या शत्रूचा केलेला जयजयकार भूदेवांच्या श्रुतियंत्राला मानवतो तरी कसा? ज्याअर्थी अखिल हिन्दु स्त्रीवर्ग आज शतकानुशतके 'बळीचे राज्य येवो' असा अभेदाने एकमुखी टाहो फोडीत आहे, त्याअर्थी या बलिप्रतिपदेच्या कथेत भटी पुराणे सांगतात त्यापेक्षा निराळेच काही तरी माहात्म्य असले पाहिजे खास. त्याचे शोधन करण्यापूर्वी बळीराजाची कथा पुराणात सापडते तशी थोडक्यात येथे सांगणे अगत्याचे आहे.

पुराणात जेहत्ते काय सांगितले आहे? फार प्राचीन काळी या पृथ्वीवर ('पृथ्वी' म्हणजे फक्त तिकोनी हिन्दुस्थान. या पलीकडे आमची दृष्टी मुळीच कधी गेलेली नव्हती.) बली नावाचा एक महापराक्रमी सर्वगुणविद्यासंपन्न असा क्षत्रिय राजा होता. त्याच्या पराक्रमाचा शह प्रत्यक्ष इंद्राला लागला. इंद्राने श्रीविष्णूची प्रार्थना करून, बलीच्या शताश्व मेधात विघ्न आणण्याची विनंती केली; कारण, बली स्वतः ला त्रिभुवनाचा सम्राट मानून, शताश्वमेधाने खुद्द इंद्रालाच नेस्तनाबूद करून त्याचे सिंहासन घेणार होता. (इंद्रपद पटकविण्याची कल्पना आणि तिला होणारा इंद्राचा विरोध पुराणांत ठिकठिकाणी आढळतो. ब्रिटीशांना वाटते साऱ्या ज्ञात जगावर आपले ब्रिटीश साम्राज्य असावे. अमेरिकन जर्मनाना तसेच वाटते. ही जी साम्राज्यसत्तेची धडपड किंवा महत्वाकांक्षा तीच इन्द्रपदप्राप्तीच्या कल्पनेत त्या काळी होती.) बलीचे ९९ मेध पूर्ण होऊन १०० व्याला सुरुवात झाली होती. तोंच श्रीविष्णू

घेऊन, शताश्वमेधाचा संकल्प हाणून पाडण्यासाठी, बलीच्या यज्ञमण्डपात येऊन दाखल झाला.

श्रीविष्णूने 'ब्राह्मणाचे रूप' घेतले. यावरून तो स्वतः गुणकर्मतः किंवा जन्मतः ब्राह्मण नव्हता, असे दिसते. त्याच प्रमाणे क्षत्रियांच्या धार्मिक किंवा राजकीय श्रेष्ठत्वाचा खून पाडण्यासाठी भिक्षुकशाहीचा ब्राह्मणच काय तो वाकबगार, ही गोष्ट देवानासुद्धा फार प्राचीन काळापासून माहीत होती, म्हणायची.

हा वामन ब्राह्मण बटु अगदी बुटका, चिनी बायकांच्या पावलांप्रमाणे आखूड पावलांचा; मोहक चेहऱ्याचा आणि सुकुमार देहाचा होता. कारस्थानी प्राण्यांची शरीरे अशीच मोहक व सूक्ष्म असावी लागतात. अतिथि अभ्यागताना निरीच्छ करून सोडण्यात क्षत्रियांचा बाणा पुराणप्रसिद्धच आहे. (यामुळेच हिन्दुस्थानाचा अखेर ऱ्हास झाला.) त्यात बलीने यज्ञदीक्षा घेतलेली. मग तो या ब्राह्मण बटूला निरीच्छ केल्याशिवाय थोडाच सोडणार? ''हे ब्राह्मणा, तुझी काय इच्छा असेल ती सांग. मी ती अक्षरशः पूर्ण करीन.'' असे बलीराजाने विचारताच, वामन बटूने एक अगदी क्षुल्लक दिसणारी देणगी

''माझ्या तीन पावलांपुरती जमीन दे''

मागितली. अरेरे! काय पोचट ही मागणी! लक्ष्मी प्रसन्न झाली आणि मागितले काय? तर मला सोन्याचा सल्ला दे. ड्यूक ऑफ कॉनॉटची शिफारस आणि गव्हर्नरजवळ बचंभटाची मागणी काय? तर म्हणे चिंतूला बुधवार पेठ पोष्टात कोठेतरी चिटकवून द्या. बलीराजासारख्या सम्राटापाशी काय आखूड तीन पावलांपुरतीच जमीन मागायची? पण ब्राह्मणाचे मागणे असेच काहीतरी क्षुल्लक आणि विचित्र असायचे. पण सल्ला मागण्यातच दात्याच्या सर्वस्वावर हल्ला करून डल्ला मारण्याची भिक्षुकी लीला, आता जशी सर्वांच्या पूर्ण परिचयाची झालेली आहे, तशी ती श्रीविष्णूलाहि चांगलीच माहीत झालेली असावी, असे दिसते. म्हणूनच त्याने आपली ब्राह्मणी वेषाची भूमिका वठविताना तीन पावलापुरती जमीन मागितली. श्रीविष्णूला नटनायक पदवी याच ब्राह्मणी नाट्यप्रयोगाच्या कुशलतेवरून मिळालेली असावी, असे वाटते. मऱ्हाठशाहीचे शतसांवत्सरीक श्राद्ध घालणारे पुरोहित श्रीयुत नरसोपंत केळकर ज्यांना चित्पावन राजे म्हणून नित्य संबोधित असतात, त्या श्रीमन्त पेशव्यांच्या पूर्वजाने छत्रपति शाहू महाराजाजवळ 'केवळ छत्रपतींच्या जोड्याची सेवा'च मागितली. पण अखेर या चित्पावन राजानी छत्रपतींच्या वंशजाना जोडे मारमारून साताऱ्याच्या सिंहासनावरून कसे अलगज उखडून टाकले, याचा इतिहास लक्ष्यात घेतला, म्हणजे वामनाच्या क्षुद्र मागणीचे व्यापक मर्म चांगले पटायला अडचण पडणार नाही.

वामनाची मागणी ऐकून बलीराजाला आश्चर्य वाटले असेल. कदाचित् हासूहि आले असेल. त्याने या वेषधारी ब्राह्मण बटूची मागणी मान्य करताच, वामनाने आपला देह आक्राळविक्राळ वाढविला.*

---

* देह आक्राळविक्राळ वाढविणे, हा काही अमानुष किंवा गूढ चमत्कार नव्हे. ही एक काव्यालंकारी उपमा आहे आणि तिचे दाखले इतिहासात आणि रोजच्या व्यवहारात मुबलक आढळतात. फाटका मांडपंचा नेसलेला भीकमाग्या भट एकाद्या खेड्यात जातो आणि पंचांग सांगता सांगता चार पाच वर्षात तेथे घरदार बांधून सावकारीवर सुखवस्तु म्हणून कसा मिरवतो? फाटक्या चिंध्याचा तीनशेण्ड्या मारवाडी प्रथम भीक मागतो, नंतर मोडतोड तांबापित्तल करतो, आणि अखेर सातमजली घरात ढेरपोटाचा 'बडा शाहूकार' कसा बनतो? हिंग जिरे मिऱ्याचा व्यापार करायला गोरे टोपकर येतात काय आणि दोन अडीचशे वर्षात हिन्दुस्थानाचे सार्वभौमत्व पटकावतात काय! ही जी रंकाचा राव होण्याची स्थिति तीच या काव्यकल्पनेत अभिप्रेत आहे.

एका पावलाने सगळी पृथ्वी आणि दुसऱ्या पावलाने सारा स्वर्ग व्यापून

तिसरे पाऊल कोठे ठेऊ बोल?

म्हणून बलीला डुरकणी फोडून विचारले. बलीने तात्काळ आपले मस्तक पुढे करून म्हटले ठेव येथे. ताबडतोब बलीच्या मस्तकावर वामनाने पाय ठेऊन त्याला पाताळात चिणले. झाली. कथा संपली.

या कथेचे तात्पर्य काय? म्हणून भिक्षुकशाहीच्या पुराणिक भटास विचारले, तर तो पायताणाएवढी जीभ बाहेर काढून ब्राम्हणांच्या ब्रह्मसामर्थ्यावर मैलभर लांबीची मल्लीनाथी झोडील. ही कथा आहे तशीच खरी मानून चालले तर त्यात ब्राम्हण्याची प्रौढी कोणत्या मुद्यांच्या कोपऱ्यात लपून बसली आहे, ती उमगत नाही. वामनाने बलीला पाताळात दडपून काय मोठा पुरुषार्थ साधला? हां, बलीच्या सिंहासनावर स्वतः बसून त्याने 'ब्राम्हणी राज्य कैदवार एकापरीस एक मसलती' असे पृथ्वीचे राज्य चालविले असते, तर ते काहीतरी स्तुत्य ठरले असते. पण असे न करता, उलट आपण होऊन पाताळलोकी वामनाने बलीच्या दारांवर द्वारपाळगिरी (जेलरचे काम) पत्करली, क्षत्रियांच्या दरवाजातले जोडे पायतणे खेटरे राखण्यासाठीच एवढा मोठा अवतारांचा खटाटोप श्रीविष्णूने करावा? नुसत्या द्वारपाळाची नोकरीच या ब्राह्मणबटूला पाहिजे होती, तर साध्या लंगोटी इतक्या चिटोऱ्यावरच्या अर्जाने किंवा तोण्डी विनन्तीने काय बळीने ती त्याला दिली नसती? मेल्या जित्या भटानी वामनावताराचा केवढाहि डांगोरा पिटला, तरी या अवताराचे रहस्य कशात आहे, हेच मुळी समजत नाही. यात ब्राम्हणांच्या ब्राह्मण्याची थोरवी तर सिद्ध होत नाहीच नाही; उलट त्यांच्या बेअक्कलपणाचा दाखला मात्र उत्तम पटतो.

विधानासाठी अवतार-कल्पनेला मान्यता दिली, तर एवढ्या मोठ्या शेषशायी भगवंताने हा वामनावताराचा उपद्व्याप काय हेतूने केला? बलीच्या विरुद्ध बोंब ठोकण्यासाठी पृथ्वी गाईचे रूप धारण करून क्षीरसागराकडे धावल्याचा उल्लेख पुराणांत नाही. किंवा संत महंतांचे 'त्राहि माम्' शंखध्वनीचे डेप्यूटेशन परमेश्वराकडे गेल्याचा दाखला नाही. चालू घडीच्या कायदेबाज राजकारणी भाषेत बोलायचे तर बलीच्या राज्यसत्तेविरुद्ध लोकमताची एकमुखी मागणी झालेली नव्हती आणि तीव्र निषेधाच्या ठरावांची भेण्डोळी क्षीरसागराकडे भिरकावलीहि गेली नव्हती. मग परमेश्वराला आपल्या योगनिद्रेची झोपमोड करून हा भटी वेषाच्या वामनी अवताराचा नसता उद्योग सांगितला होता कोणी? नाही म्हणायला बळीविरुद्ध इन्द्रोजीपंताने रडवी कागाळी केली खरी. पण लोकमतापुढे इन्द्र कोणत्या झाडाचा पाला? त्याच्या सारख्या भेदरट झब्बूच्या कानचावणीला बळी पडून, बळीसारख्या लोकमान्य नृपतीचा बळी घेण्यासाठी परमेश्वराने अवताराचा उपद्व्याप करावा, ही गोष्ट जितकी नादानपणाची तितकीच बेशरमपणाची होय. इन्द्रासारख्या झब्बूंच्या चिथावणीने परमेश्वर जर असा बेताल भडकू लागला, हवा तेव्हा हवा तो रुद्राचा किंवा भटाचा अवतार घेऊ लागला, तर आमचे माबाप ब्रिटीश सरकार आणि शेषशायी विष्णू यात भेद तो कशाचा उरला?

परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ।।

ही अवताराच्या कंत्राटाची ईश्वरी बोली. यांपैकी कोणत्या महत्कृत्यासाठी देवाने हा वामनाचा ब्राह्मणी अवतार घेतला? बली हा जुलमी राजा (टायरण्ट) होता, त्याने प्रजेचा छळ माण्डला होता,

किंवा तो अधर्मी होता, असे एकहि पुराण सांगत नाही. उलटपक्षी त्याच्या सर्वगुणसंपन्नतेचीच सर्वत्र वाखाणणी केलेली आढळते. फार काय, पण ज्यावेळी श्रीविष्णूने, वामन रूपाने प्रगट झाल्यावर, आपल्या चतुर्भुजांतल्या आयुधाना ''जा बलीचा नाश करा.'' असा हुकूम फर्मावला, त्या वेळी त्यानीसुद्धा ''हे कृत्य केव्हाहि आम्ही करणार नाही आणि ते आह्माला शक्यहि नाही.'' असा खडखडीत जबाब दिला. इतकेच नव्हे तर आज हजारो वर्षे झाली, दर दिवाळीच्या प्रतिपदेला

इडापिडा टळो आणि बळीचे राज्य येवो

ही कळकळीची प्रार्थना यच्चावत् हिन्दु ललना करीत असतात. ज्याचे 'राज्य येवो, राज्य येवो' असा स्त्रियांच्या याचनेचा टाहो क्षीरसागरातल्या परमेश्वराच्या कानात आचंद्रार्क प्रत्यही आदळत आहे, त्या श्रीमान बळीला पाताळात दडपिण्याचे देवाला काय प्रयोजन झाले? यात काय साधूंचे परिपालन झाले? दुष्कृताचा विनाश झाला? का धर्मस्थापना झाली? झाले तरी काय? याचे उत्तर

का-ही-ना-ही

हेच द्यावे लागेल. साधूंच्या परिपालनाच्या सदराखाली इन्द्राचा पाठराखेपणा ढकलून, अवताराचे समर्थन करणे, निखालस पागलपणा होय. शताश्वमेघाने स्वर्ग-मृत्यू-पाताळादि त्रिभुवनाचे साम्राज्य मिळविण्याची बळीची महत्वाकांक्षा जर इंद्राच्या मुळावर येत होती, तर त्याने बळीशी मर्दाप्रमाणे उघड मैदानावर सामना द्यायचा होता. हा खरा पुरुषार्थी मार्ग टाकून, मजुरांच्या संपापुढे हात टेकलेले मुंबईचे गिरणीमालक जसे सरकारच्या बुटात घुसतात आणि पोलीसांच्या मदतीने संपाची फळी फोडण्याचा उपद्व्याप करतात, त्या प्रमाणे, बळीराजाच्या लोकप्रियतेच्या तेजाळ प्रभेपुढे हतप्रभ झालेला आणि, केवळ स्वतःच्या झब्बूशाहीच्या टिकावासाठी परमेश्वराला चिथविणारा इन्द्र, साधू कोटीत ढकलणाऱ्यांच्या खांद्यावर डोक्यांऐवजी मातीची मडकी लटकलेली असली पाहिजेत. बलीची साम्राज्यवर्धनाची महत्वाकांक्षाहि 'दुष्कृता'च्या दोषाखाली येणार नाही. ब्रिटीश साम्राज्य-वर्धनाचा आटारेटा आजहि फेफटनाक्या जपान-वामनाला डोळ्यातल्या वडसाप्रमाणे वाटत आहे. पण चुगलखोर इन्द्राप्रमाणे तो जर राष्ट्रसंघ-परमेश्वराकडे एकाद्या ब्राम्हणी कारवायीची चिथावणी करू लागला, आणि राष्ट्रसंघहि त्याच्या चिथावणीने नाचू लागला, तर त्यात त्या राष्ट्रसंघाचे महत्व आणि बोज तो काय राहणार?

तात्पर्य, कोणत्याहि दृष्टीने विचार केला तरी बळीराजाची पाताळ-चिळणी हा एक पुराणसिद्ध अन्याय; अवतार-कल्पनेचा पोरकटपणा; ईश्वराच्या न्यायबुद्धीचा किंबहुना त्याच्या अस्तित्वाचा फोलकटपणा आणि भटी कारस्थानाचा हलकटपणा, याशिवाय इतर कसल्याहि सुष्ट कल्पनेच्या आरोपाला कुपात्र ठरतो. बळीराजाची कथा जर सत्यसृष्टीची मानली, तर भरतखण्डाची राष्ट्रशक्ती-एकजात महिला वर्ग-परमेश्वराने केलेल्या पातकी अन्यायाचा त्रिभुवनभेदी निषेधच करीत आहे, असेच मानणे प्राप्त आहे. वामनावताराच्या अमानुष अत्याचाराची इडापिडा टळो, आणि बलवन्त बळीराजाचे राज्य येवो, हा आमच्या भारतीय राष्ट्रदेवतांचा टाहो, विचारवन्तांच्या विचारयंत्राला आणखीहि अनेक गर्तीचे फेरे देण्यास समर्थ आहे. विचार करणारांचीच जरूर विशेष आहे.

प्रथम दीन याचकाचे सूक्ष्म रूप धारण करून येणारे, ओसरी मिळताच आक्राळविक्राळ हातपाय पसरणारे आणि अखेर दोन पावलांत देहमनाची स्वर्ग-पृथ्वी पादाक्रान्त करून, तिसऱ्या पावलाच्या कचक्याने या बळी भरतखण्डाला गुलामगिरीच्या पाताळात चिणणारे अनेक वामन आमच्या बोकण्डी

बसले. पण पौराणिक बळीने केलेल्या घोडचुका, किंबहुना गाढवचुका, सुधारण्याची आम्ही कधीच खटपट न केल्यामुळे, शेकडो वामनानी आपल्या

वरचढ सत्तांच्या वामन-द्वादशा

भरतखण्डाच्या छातीवर पाय देऊन साजऱ्या केल्या आहेत. हिन्दुस्थानातील राज्यक्रान्त्या म्हणजे वामनावताराच्या पुनरावृत्त्याच होत. प्रत्येक राज्यक्रान्ती सूक्ष्मरूपधारी वामन याचकानेच घडवून आणली. वामन ब्राम्हणच असल्यामुळे, प्रत्येक क्रान्तिकारक जेता ब्राम्हणी ऊर्फ भटी मसाल्याच्या मनोवृत्तीने आणि भटी मसलतीनेच येथे जोरावल्याचे आणि थोरावल्याचे दाखले, म्हणजेच हिन्दुस्थानचा इतिहास होय. अशी एकहि राज्यक्रान्ति नाही की जिच्या कुळाशी वा मुळाशी एक तरी वामनप्रासादीक 'वामन' नाही. प्राचीन काळ सोडून दिला, आणि स्मरणशक्तीची फेक पोहचेल इतक्या काळापासूनचा इतिहास उडत्या नजरेने पाहिला, तरी हाच सिद्धान्त आपल्याला पटेल. नन्दकुळाचा विध्वंस करून 'नन्दान्तम् क्षत्रियकुलम्'ची ब्राम्हणी द्वाही फिरविणारा चाणक्य वामनी ब्राम्हणच. बौद्ध धर्मीय हिन्दी राज्यसत्तेच्या अमदानीत हर्षवर्धनाच्या धर्मपरिषदेचा मण्डप पेटवून, खुद्द राजाच्या खुनाचा कट करणारे वामनच. महंमद गझनीला सोरटी सोमनाथाच्या पहिल्या बोहाणीची 'युगत' दाखविणारे प्राणत्राणपरायण वामनच. मऱ्हाठशाहीतल्या वामनी लीला या चिमुकल्या लेखणीने किती वर्णाव्या! हस्तिनापुर हस्ताक्रान्त करण्याच्या कामी क्रिस्ती वामनानी सुद्धा आमच्या हस्तिदन्ती ब्राम्हणांच्या ब्रम्हतेजाचीच वामनी कारवायी शेकडो राजकारणी मुकाबल्यांत इरेला घातली आणि आज घालीत आहेत.

राजकारणी क्षेत्र सोडून समाज व धर्मकारणांच्या क्षेत्रांवर नजर फिरविली, तरी तेथेसुद्धा वामनी उलाढाल्याच हरहमेश घटकोघटकी आखूड पावलांच्या टाचाखाली बळीराजाची पाताळचिळणी करीत आहेत. हिन्दुस्थानाच्या सर्व शारिरीक, मानसिक, बौद्धिक, आर्थिक इत्यादि अनेक बळांचा महासागर या वामनी अगस्तीने स्वार्थ, सत्ताभिलाष आणि अहंमन्यता या तीन आचमनांत गट्ट करून, सुकाठाक पाडलेला आहे. आमच्या ऱ्हासाला आणि अधःपाताला कारण असलेल्या सामाजिक आणि धार्मिक जुलुमांची परवड अभ्यासणाऱ्या प्रत्येक निस्पृह स्त्रीपुरुषाला हाच निर्णय द्यावा लागेल, की भरतखण्डाची सारी राष्ट्रशक्ती भिक्षुकशाहीच्या टाचेखाली दडपली गेली आहे. हिन्दुस्थानाचा बळीराजा आज अनेक शतके भटी वर्चस्वाच्या वामनी दडपणाखाली हतप्रभ होऊन पडला आहे. परकीय सत्ताधाऱ्यांचा कसलाहि संबंध येत नसलेल्या सामाजिक आणि धार्मिक उत्क्रान्तीच्या प्रत्येक प्रयत्नात सुद्धा वामनी मनोवृत्तीचा 'बामनी' मुर्दाडपणाच बळीराजाची प्राणान्तिक गळेदाब करीत आहे.

शारदा बिल आणि पर्वतीचा सत्याग्रह

ही दोन चालू घडीचीच उदाहरणे घ्या, म्हणजे आमच्या विधानाची सत्यता तेव्हाच पटेल. ''जातिभेदाचा पुरस्कार करणारी सामाजिक क्षेत्रांतली भिक्षुकशाही म्हणजे हिन्दुस्थानाला जडलेली व्याधी होय. इतर अनेक गोष्टींपेक्षा या भिक्षुकशाहीनेच आमच्या प्रगतीला कुण्ठीत करून, राष्ट्रीय भावनांची कलमछाट केलेली आहे. भिक्षुकशाही ह्मणजे आमच्या वर्तमान दुर्दैवी अधःपाताची खाणच ह्मटली पाहिजे.'' भारतमहर्षि सर प्रफुल्लचन्द्र राय यांच्या या स्पष्टोक्तीत याच वामनी मनोवृत्तीचा कडकडीत निषेध सणाणत आहे. शतकानुशतके भटांच्या वामनी कढीत घुसळून मसळून शिजून भाजून पचपचीत बनलेल्या लक्षावधि गुलाम हिन्दूना भटी वर्चस्वाची नांगी दिसत भासत नसली, तरी

राष्ट्रोद्धाराचे ध्येय साधण्यापूर्वी

बळीचे राज्य येवो

हा राष्ट्रदेवतांचा टाहो यशवंत करण्यासाठी, शुद्ध विचारांचे राष्ट्रवीर पहिल्या धडाक्याला भिक्षुकशाही वर्चस्वाचाच मुर्दा कां पाडतात, याचे मर्म जवानमर्द मुस्तफा केमालपाशाने केलेल्या खिलाफतीच्या खिरापतीत वाटेल त्याने पाहून घ्यावे. राष्ट्रोद्धाराच्या प्राणप्रतिष्ठेलाच भिक्षुकशाहीचा बळी दिल्याबरोबर तुर्कस्थानाची सगळी इडापिडा टळली आणि आज तेथे बळीचे राज्य प्रस्थापित झाल्याचा मंगळ सोहळा सारी त्रिखण्ड दुनिया उघड्या डोळ्याने पाहात आहे.

भिक्षुकशाही म्हणजे ब्राह्मणब्रुव जातशाही असा पुष्कळ मूर्खांचा गैरसमज आहे. भिक्षुकशाहीचा जन्म जरी ब्राह्मण जातीच्या पोटी झालेला असला, तरी ही वामनी मनोवृत्ति आपल्या मातेच्या कृतघ्न पिण्डप्रकृतीला अनुसरून आज तिच्यावरच उलटलेली आहे. भिक्षुकशाही वामनी वृत्ति आज एकट्या ब्राह्मण जातींची जहागीर राहिली नसून, तिच्या विषाचा फैलाव अखिल भट भटेतर हिन्दु समाजांत मुबलक झालेला आहे. भिक्षुकशाहीच्या उच्चाटनाची भाषा ज्या वेळी आम्ही बोलतो, त्या वेळी ब्राह्मण जात आमच्या दृष्टीसमोर नसून, हिन्दु समाजात फैलावलेल्या

उलट्या काळजाच्या वामनी वृत्ती

वरच आमचा कटाक्ष विशेष असतो. या वृत्तीने सगळा हिन्दु समाज आरपार जहराळून सोडण्याच्या पातकाचे ओझे मात्र आपल्याच खांद्यावर आहे, ही जाणीव ब्राह्मणब्रुवानी ठेऊन, या वृत्तीचा आमूलाग्र उच्छेद करण्यासाठी कंबर कसल्यास, परंपरेच्या पापाचा पर्वत थोडातरी हलका होण्याचा संभव शंकास्पद नाही. भटी वामनी वृत्ति आज दरोबस्त भटेतर जातीतहि जोरदार धुमाकूळ घालताना आढळते. या वृत्तीने मनुस्मृतीच्या काळापासून आज दोन हजार वर्षे स्त्रीजातीची पाशवी विटंबना करण्यात माणुसकीच्या तोण्डाला काळोखी फासली आहे. 'जिस खानिसे पैदा हुवे राम कृष्ण हनुमान' अशा 'नरकी खाण' नारीच्या शारिरीक मानसिक बौद्धिक आणि सामाजिक उन्नतीवर धर्माच्या आणि रूढीच्या सबबीखाली या वामनी वृत्तीने इतके जोरकस वज्रप्रहार केलेले आहेत कीं हिन्दु समाजांत प्रजोत्पादनाच्या साधनापलीकडे स्त्रियाना कसलेहि महत्व अस्तित्व आणि स्वातंत्र्य नाही. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते' वगैरे वेदान्ती बडबड रगड असली, तरी व्यवहारात या राष्ट्रदेवतांची 'पायातली वहाण पायात' याच न्यायाने बडदास्त ठेवण्यात येते. राष्ट्रोद्धारासाठी, भरतण्डाच्या पुनरुज्जीवनासाठी, नरनारी रत्ने पैदा करणाऱ्या या रत्नखाणींच्या आचारविचार-स्वातंत्र्याचे वामनी भिक्षुकशाहीने कोळसे केले. ह्मणून त्या दरसाल बलिप्रतिपदेच्या दिवशी त्यांच्या सुप्त आत्मशक्तीला उद्देशून, एकस्वराचा टाहो फोडतात कीं भिक्षुकशाहीची इडापिडा टळो आणि भरतखण्डाला त्रिखण्डात अग्रेसरत्व मिळवून देणारी नरनारीरत्ने आमच्या उदरी जन्माला येऊन, त्यांच्या संघटीत आत्मशक्तीने बळीचे राज्य येवो.

□□□

लेख

जबरदस्ताचा टिकाव

(लेखांक १ ला)

नीतीच्या आणि तत्वज्ञानाच्या कोणी कितीहि गप्पा मारल्या आणि या जगात (काल्पनीक) स्वर्गाचे साम्राज्य स्थापन करण्याच्या बढाया मारल्या, तरी 'बळी तो कान पिळी' या सिद्धान्तानेच पूर्वी सगळ्या जगाचा संसार चालला, आज चालत आहे आणि पुढेहि तो असाच चालणार 'सत्य सदा बोलावे,' 'शिवी कोणा देऊ नये,' 'दिधले दुःख पराने उसने फेडू नयेचि सोसावे,' इत्यादि नीतींची सूत्रे बावळट ऐदी आणि आत्मद्रोही माणशी-गाढवांच्या सोयीसाठीच जन्मलेली आहेत, हे पुष्कळ हिन्दी शहाण्यासुर्त्यांच्या लक्ष्यातच येत नाही. जन्मापासून मृत्यूपर्यन्त आमच्या विचार-उच्चार-आचाराचे नियन्त्रण धर्माच्या आणि नीतीसूत्रांच्या भरंसाट आणि अविवेकी फिसाटाच्या कडी कोयण्ड्यात अडकलेले असल्यामुळे, वैयक्तिक आणि राष्ट्रीय संसारात टिकाव धरण्याची आमची कुप्रसिद्ध नालायकी अवघ्या जगाला श्रुत झालेली आहे. प्रत्येक गोष्ट, घटना अथवा परिस्थिति धर्माच्या आणि नीतीच्या चष्म्यातून पाहाण्याची दुष्ट खोड आमच्या पिण्डाला एवढी जबरदस्त जडलेली आहे कीं त्यामुळे अवघ्या ब्रह्माण्डात नीच गुलामगिरीपेक्षा दुसरा मोक्ष आमच्यासाठी शिल्लक उरलेला नाही. (१) बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडु नको। संसारामधि ऐस आपुला उगाच भटकत फिरू नको।। (२) सबसे राम भजन करलेना। एक दिन जाना रे भाई।। (३) तू तो राम सुमर। जग लढवा दे।। असल्या उपदेशांच्या पचनी पडलेल्या आणि पडणाऱ्या मानवी कीटकाना, परमेश्वराच्या बापाचा बाप खाली उतरला तरी, निकृष्ट गुलामगिरीशिवाय निराळा कसला मोक्ष देऊ शकेल? हिन्दुस्थानातला प्रत्येक धर्म आपल्या अनुयायाना परलोकच्या (संशयास्पद) जीवनाची काळजी घेण्याचा अट्टहास शिकवीत असतो. ''सध्या तुझे जीवन जरी उकीरड्याच्या मोलाचे असले, तरी त्याची काही खंति करू नकोस; पण मेल्यावर स्वर्गसुखाची चंगळ लाभण्यासाठी तू या अमूकतमूक धर्माज्ञेप्रमाणे वाग.'' एवढ्याच भाण्डवलावर येथील प्रत्येक धर्म आपापला कम्पू टिकवून स्वतः जगलेला आहे. बापाचा जिवन्तपणी छळ करून, तो मेल्यावर त्याच्या तेराव्याला बुन्दीचा बेत ठेवणाऱ्या हिन्दु पुत्राच्या भावनेची चिकित्सा करण्याची सवड, लाडू झोडण्याच्या गडबडीत, फारशी कोणाला होत नसली, तरी त्यातसुद्धा ही परलोकच्या जीवनाची (खरी खोटी) विवंचनाच प्रधान असते, हे निराळे सांगायला नको. 'दिसते तितके खोटे आणि दिसत नाही तेवढे खरे' असल्या उलट्या आणि खोट्या सिद्धान्तावर

चाललेली धार्मिक जीवनाची ओढाताण धर्मविध्वंसनाशिवाय अन्य उपायाने बन्द पडणेच शक्य नाही. धर्म आणि नीतीच्या खुळचट बन्धनानी आमरण गिरफदार होऊन पडलेल्या हिन्दी समाजाना आपल्या राष्ट्रात पूर्वी घडलेल्या, आज घडत असलेल्या आणि पुढे घडणाऱ्या कसल्याहि क्रान्तीबद्दल अन्दाज बान्धण्याचे सामर्थ्य राहिलेले नाही. यामुळेच, अनेक शतकांचा भरतखण्डाचा नानारंगी इतिहास त्याना केवळ पुराणे ऊर्फ कादंबऱ्या वाटतो. त्याच्याशी आपल्या जगण्या मरण्याचा, लायकी नालायकीचा आणि आत्मोद्धाराचा काही संबंध आहे, ही त्यांची भावनाच मुळी ठार मेलेली आहे. क्रान्ति कधी काकतालीय न्यायाने घडून येतच नाही. तिच्याहि कारणपरंपरेचे धागेदोरे असतातच. ते शोधून त्यावर विचार करावा, त्यांच्या गुणधर्मांची निर्भीड चिकित्सा करावी, स्वतःच्या आणि राष्ट्राच्या गुणदोषांची छाननी करावी आणि आपले सर्वांगीण जीवन माणुसकीला साजेशोभेसे तेजाळ व मर्द राहावे, यासाठीच इतिहास शास्त्र मानवी ज्ञानाच्या क्षेत्रात महत्वाचे पद पटकावून बसलेले आहे. आम्ही इतिहासाकडे पाठ फिरविली म्हणूनच आम्ही पोटाच्या पापाने आज बेजार झालो आहोत. इतिहासाच्या शोधनप्रकाशाने जेव्हा आम्ही आमच्या राष्ट्रीय जीवनाच्या भूत आणि वर्तमान स्थितीचा अन्दाज चिकित्सेने पडताळून पाहण्याचा हव्यास धरू, तेव्हाच आम्हाला आमच्या भावी स्थितीच्या बरे वाईटपणाची स्पष्ट अटकळ करता येईल. या दिशेने वाचकांना विचार करण्यास भूमिका मिळावी, म्हणून वरील मथळ्याचा एक ऐतिहासिक लेख खाली दिलेला आहे. हिन्दुस्थानातील आंग्रेजी सत्ता ही किती पद्धतशीर व शिस्तवार राजकारणी प्रयत्नांची सिद्धी आहे आणि या प्रयत्नांचे स्वरूप धर्मभोळ्या हिन्दी लोकांच्या धर्मप्रधान लंगड्यालुल्या नाटकी राजकारणापेक्षा किती भिन्न आणि कदरबाज आहे, हे या लेखावरून वाचकांना नीट कळून येईल.

- संपादक.

हिन्दुस्थान म्हणजे सुवर्णभूमि, सर्व समृद्धीचे माहेरघर, जगाच्या संस्कृतीला अखण्ड पुरवठा करणारी गंगा, कवींच्या काव्याना अनुपम साहित्य पुरविणारी स्फूर्तिकल्पलता, फिरस्त्यांची चमत्कार-भूमि, आणि पृथ्वीवरील दृश्य स्वर्ग! कल्पनेची फेक पोहचणार नाही इतक्या प्राचीन काळापासून हिन्दुस्थानचा हा लौकीक साऱ्या जगाच्या चित्तवृत्ति झुलवीत होता. हा लौकीक काल्पनिक नव्हे, काव्यप्रचुर नव्हे, किंवा भाडोत्री स्तुतिपाठाचा नव्हे. तो अक्षरशः सत्य आणि वास्तवीक होता. जगाच्या आधिभौतिक सुधारणेत आज अमेरिकेचे जे स्थान आहे, त्यापेक्षा शतपट उच्च स्थानावर भरतखण्ड एक वेळ उभा होता. रोमन साम्राज्यातले बादशाहा आणि विलासी नागरीक आपल्या ऐश्वर्याची झकाकी हिन्दुस्थानी वस्तूंच्या पुरवठ्यानी नटवीत असत. हिन्दुस्थानी मलमल, जरीच्या शाली, रेशमी वस्त्रे, काळे पांढरे हस्तिदंत, हिरे माणके, अत्तरे, कलाकुसरीची भांडी, सुवासिक पौष्टिक मसाले वगैरे अनंत वस्तूंच्या प्राप्तीसाठी सारे युरपखण्ड जीव टाकीत असे; आणि हव्या त्या भरंसाट किंमती देऊन त्या खरेदी करीत असे.

वैश्यवृत्तीच्या युरपियन राष्ट्रांना सर्व समृद्धीची कामधेनु असे हिन्दुस्थान म्हणजे एक मोठे आकर्षण होते. ध्यानी मनी स्वप्नी भाषणी आसनी शयनी भोजनी त्याना हिन्दुस्थानाशिवाय काही सुचेना. पहिल्यापासूनच त्यांना पूर्व दिशेचे मोठे आकर्षण असे आणि ११ व्या शतकात युरपियन क्रिस्त्यानी जेवढ्या धार्मिक स्वाऱ्या (क्रूसेड्स) केल्या, त्या सर्वांचा रोख नेहमी पूर्वेकडेच असे. पूर्वेकडे स्वाऱ्या केल्या म्हणजे आपली पातके धुवून आपल्याला मोक्ष मिळेल, ही त्यांची त्या वेळी भावना असे.

परंतु, १५ व्या शतकात ही भावना पालटून संपत्तीचा आर्थिक मोक्ष मिळविण्याची आशाळभूत दृष्टी त्याना आली आणि त्या दृष्टीने ते पूर्वेकडील सुवर्णभूमीकडे निश्चयाची टक लावून पाहू लागले. हिन्दुस्थानच्या सोन्याच्या धुराने अनेक धाडसी युरपियन व्यक्तींची बनियावृत्ति फुरफुरू लागली आणि त्यानी हिन्दुस्थानला पोहचण्याचा सोयीस्कर जलमार्ग शोधून काढण्यासाठी कंबरा कसल्या. खुष्कीच्या मार्गाने प्रयत्न करावा तर तो नेहमीच युद्धे दंगे लुटालूट दस्तुऱ्या वगैरेमुळे अत्यंत धोक्याचा. म्हणून समुद्राचा कमी धोक्याचा आणि विशेषतः कमी खर्चाचा जलमार्ग त्यांनी पसंत केला. त्या मध्ययुगीन् काळी इटलीची व्हेनिस आणि जिनोवा ही बंदरे पूर्वेकडील देशांशी फारच मोठ्या प्रमाणावर व्यापार करीत. अशी सोय फ्रान्स पोर्च्युगाल आणि इंग्लंण्डसारख्या देशांना नसल्यामुळे त्यांना त्यांचे वैषम्य बरेच डाचत असे. त्या वेळी युरप आतासारखा श्रीमंत आणि गबर नव्हता आणि एकहि नक्रिस्ती पौर्वात्य देश त्यांच्या पकडीत सापडून घायाळ झालेला नव्हता. अर्थात् कसेहि करून पूर्वेकडे आणि विशेषतः हिन्दुस्थानात आपल्या तागडीचा प्रवेश व्हावा, हिन्दुस्थानी माल थेट आपल्या बंदरात येऊन स्वस्त मिळावा आणि व्यापाराच्या द्वारे तिकडील सर्व प्रकारच्या समृद्धीने आपापल्या देशांची आर्थिक भरभराट व्हावी, या उद्देशाने युरपियन क्रिस्ती राष्ट्रे जलमार्गाने हिन्दुस्थान हुडकिण्याच्या अहमहमिकेने फुरफुरली. या त्यांच्या फुरफुरण्यात केवळ व्यापारवृद्धीपेक्षा दुसरा कसलाहि हेतु तिळमात्र नव्हता. क्रिश्चन धर्माचा प्रसार आणि राज्यप्राप्ती या कल्पना, हिन्दुस्थानात पाऊल पडल्यानंतरच निपजल्या.

वैश्यलोक आणि वैश्यवृत्ति हिन्दुस्थानात पूर्वी होती आणि आजहि नाही असे नाही. परंतु आमचा पिण्ड तत्वज्ञानी पडल्यामुळे, नित्य संतुष्टता ही आमच्या राष्ट्रीय उत्कर्षाच्या मार्गात मोठी पठाडी गोम आहे. त्यामुळे हिन्दवी साम्राज्यवृद्धीचा प्रश्न आमच्या कल्पनेलाहि कधी शिवला नाही. अशोकाच्या कारकीर्दीत बौद्ध धर्माचा प्रसार थेट अमेरिकेपर्यंत पसरल्याचे पुरावे आज उपलब्ध झाले आहेत. त्यावरून हिन्दवी साम्राज्याची वृद्धी साऱ्या ज्ञात जगावर पसरलेली होती, असा सिद्धांत काढणे म्हणजे इतिहास उलटासुलटा वाचण्यासारखे आहे. त्रिकोणी हिन्दुस्थानाच्या क्षेत्राबाहेर साम्राज्यवृद्धीचे लोण नेण्याचा प्रयत्न कोणी कधी केला नाही, कोणाला कधी सुचलाहि नाही; परंतु यदृच्छेने होत असलेल्या धर्मप्रचाराच्या पाठोपाठ किंवा पोटात, परदेश जिंकण्याची जेतृत्वबुद्धीसुद्धा आमच्यात कधी थरारलेली दिसत नाही. याचे कारण आमची नित्य संतुष्टवृत्ति आणि फाजील बोकाळलेली तत्वज्ञानप्रधान प्रवृत्ति! आजसुद्धा एकाद्या धनाढ्याने कोणाला भोजनाचे आमंत्रण दिले तरी ''आमच्या घरची मीठ भाकरी''चा उल्लेख तो मुद्दाम करतो. यात त्याची शालीनता असली, तर मनाच्या जेतृत्वबुद्धीची मलीनता विशेष स्पष्ट होते, हे त्या शहाण्याला उमगतच नाही. 'पाऊल ठेवीन ती जमीन माझी' ही जेतृत्वबुद्धी म्हणजे युरपखंडाच्या कट्ट्या राजकारणी पिण्डाचा-नित्य असंतुष्ट प्रवृत्तीचा-ट्रेडमार्क आहे, आणि त्याच्याच बळावर आज ब्रिटीश साम्राज्याचे गजकर्ण साऱ्या पृथ्वीच्या पाठपोटावर भरंसाट फदफदले आहे व नित्य पचरत चालले आहे.

दरिद्री युरपखंडाला व्यापारवृद्धीच्या यक्षिणीच्या कांडीने सर्वांगसमृद्ध करण्यासाठी, हिन्दुस्थानाला थेट पोहचण्याचा जलमार्ग शोधून काढण्याची पहिली धाडसी कल्पना स्पेनदेशीय स्पानियर्ड क्रिस्तॉफर कोलंबसाची. त्याने ही कल्पना अनेक युरपियन राष्ट्राधिपतीना श्रुत केली. परंतु जगाचा भूगोल आणि महासागर यांविषयी यूरपचे तत्कालीन ज्ञान तितकेच आकटोविकटो असल्यामुळे, कोलंबसाच्या कल्पनेची प्रथमतः सर्वानी टर उडविली. धाडसाशिवाय व्यापार नाही. अखेर निश्चयाच्या बळावर काही

धाडशी लोक आणि मजबूत जहाजे बरोबर घेऊन, कोलंबस हिन्दुस्थान शोधण्यासाठी जलप्रवासाच्या सफरीवर निघाला. त्याला हिन्दुस्थानाचा पत्ता लागला नाही, तरी त्याऐवजी अमेरिका खण्ड हुडकून काढून, या 'नवीन जगात' युरपियन क्रिस्ती राष्ट्राना आपापल्या वसाहतीच्या तंगड्या पसरण्याचे नवे सताड क्षेत्र मात्र दाखवून दिले. 'मी शोधून काढले ते हिन्दुस्थानच' अशा भ्रमात कोलंबस मेला. वास्तवीक, हिन्दुस्थानाला बिनचुक पोहचण्याचा जलमार्ग शोधून काढण्याची कामगिरी पोर्च्युगाल देशाच्या वास्को द गामानेच बजावलेली आहे.

हिन्दुस्थानात पोर्च्युगीज

कोलंबसाच्या धाडशी सफरीला अमेरिका खंडाची पहिलीच छनछनित बोहणी लाभल्यामुळे, पोर्च्युगाल देशातल्या धाडशी नाविकांच्या महत्वाकांक्षा जबरदस्त फुरफुरल्या. तत्वज्ञानी हिंदी लोक परमेश्वरप्राप्तीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात, तर राजकारणी युरपियन क्रिस्ती परमेश्वराला प्रयत्नांच्या मागे धावपळ करायला लावतात. प्रयत्न हाच त्यांचा परमेश्वर. त्यापुढे यशापयशाची त्याना दिक्कत वाटत नाही. ध्येय साधण्यासाठी ते राजकारणाचा धर्म बनवतील आणि धर्माला सुद्धा राजकारणाच्या रक्तपाताचा शेंदूर माखून त्याचा बजरंगबली करतील. पण पिढ्या न् पिढ्या ठराविक प्रयत्नांचा पिच्छा पुरविल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीत. निराशा आणि अपयशाची धास्ती या दोन विकाराना युरपियन क्रिस्त्यांच्या विचारात आजपर्यंत कधी बिऱ्हाडच मिळालेले दिसत नाही.

अशा पिण्डप्रकृतीचा पोर्च्युगीज धाडशी नाविक वास्को द गामा, आपल्यासारख्याच काही धाडशी सवंगड्यांसह, जलप्रवासाच्या कल्पनातीत संकटाना न डगमगता, आफ्रिकेतच्या केप ऑप गुड होप भुशीराला वळसा घालून, तारीख २२ मे सन १४९८ रोजी हिन्दुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत बंदरात येऊन दाखल झाला. या क्रान्तिकारक दिवसाचे राष्ट्रीय महत्व हिन्दी लोकाना अझूनपर्यंत कळलेले दिसत नाही. इतिहासाचा आत्मा हुडकिण्याचीच जेथे अनास्था, तेथे तत्वशोधनाची वेदना तरी कोणाला भासणार? कालिकत येथे झामोरीन नावाचा हिन्दु राजा राज्य करीत होता. त्याने हिन्दु जनांच्या पिण्डप्रधान आणि जगप्रसिद्ध चांगुलपणाने या गोऱ्या गोमट्या परदेशी पाहुण्यांचे मोठ्या थाटाने आगतस्वागत केले. त्याना मिष्टान्नांच्या मेजवान्या दिल्या. आज माझ्या पायांपाशी अदबीने हात जोडून बसलेले, मोठ्या मिन्नतवारीच्या गोड भाषेने व्यापाराची परवानगी मागणारे हे गोरे गोमटे परदेशी क्रिस्ती धाडशी पाहुणे, येत्या बारा वर्षांच्या आतच, माझ्या राज्याचे आणि राजघराण्याचे बारा वाजवून, मला जळत्या शहरातून आणि राजवाड्यातून जीव घेऊन पळायला लावतील, याची त्या भोळसट हिन्दु झामोरीन नृपतीला स्वप्नात सुद्धा कल्पना झाली नाही! अवघ्या दोन वर्षात ह्मणजे सन १५०० साली पोर्च्युगीजानी पेड्रो आलवारीज काब्राजच्या नेतृत्वाखाली कालिकत येथे व्यापारी वखार स्थापन केली. पुढच्या तीन वर्षात एक तटबंदी किल्ला उभारून, त्यावर लोकविश्रुत आलफान्सो आलवुकर्क याची कमांडर म्हणून नेमणूक केली. ओसरी दिलेले पोर्च्युगीज क्रिस्ती भटजी हातपाय पसरू लागले! आलबुकर्क गव्हर्नर होताच त्याने १५०६ त गोव्यावर झडप घालून तेथे आपल्या राष्ट्राचे निशाण लावले आणि १५१० मध्ये, ज्या कालिकत शहराने या परदेशी धाडशी बनियाना आश्रय दिला, त्याची लुटालूट जाळपोळ करून, खुद्द झामोरीनच्या राजवाड्याचीहि राखरांगोळी उडविली. केवळ व्यापाराच्या निमित्ताने येतात काय आणि आश्रयदात्याच्या घराला आग लावून, देश काबीज करण्याचे राजकारण

खेळतात काय? युरपियन क्रिस्त्यांच्या मनुस्मृतीचा नीतिमहिमा हा या मासल्याचा आहे.

पोर्च्युगीज इकडे येईपर्यंत बंदुकांची (Fire-arms) माहिती हिन्दी लोकाना नव्हती. इकडे तोफा होत्या, पण बंदुका नव्हत्या. लढाऊ शस्त्रास्त्रे करण्याच्या कामात त्या काळी पोर्च्युगीज सर्व युरपियन राष्ट्रांत अग्रेसर असत. शिवाजीने आपल्या सैन्यासाठी लाखो रुपयांच्या तलवारी बंदुका पोर्च्युगीज व्यापाऱ्यांपासूनच नेहमी खरेदी करण्याचा उपक्रम ठेविला होता. अशाच एका मोठ्या सौद्याच्या प्रसंगी पोर्च्युगीज व्यापाऱ्यानी सुप्रसिद्ध भवानी तलवार शिवाजीला नजर केली होती. ती हस्तगत झाल्यानंतर महिना दीड महिन्याच्या आत अफजुलखानी मुकाबल्यात शिवाजीची फत्ते झाली. तेव्हा हे शस्त्र मोठे विजयी, भाग्यशाली आणि चांगल्या पायगुणाचे, ह्मणून शिवाजीने त्याचे नाव भवानी असे ठेविले.

पोर्च्युगीजांच्या बंदुकांपुढे हिन्दी राजांची जुनी शस्त्रास्त्रे एकजात रद्द ठरली. हिंदी लोकांकडून अटकळ होताच, बंदुकांच्या जोरावर हे पोर्च्युगीज बनिये हवा तो प्रांत हुकमी जिंकीत गेले. हिन्दुस्थानात पाऊल ठेवल्या दिवसापासून एक शतकाच्या आत या पठ्ठ्यानी सारा हिन्दी महासागर थेट जपानपर्यंत आरपार घुसळून काढला आणि पूर्वेकडील अनेक महत्वाच्या प्रांतांवर त्यांचा बावटा फडफडू लागला. मंगलोर कोचीन सीलोन ओर्मझ दिव गोवा आणि नागापट्टण या ठिकाणचे तर ते राजेच बनले. ज्या व्यापाराच्या उद्देशाने ते येथे आले तो तर त्यानी सोळा आणे काबीज केला; इतका कीं आरबस्थान आणि इराणच्या आखातांच्या द्वारे होणारी पूर्वीची व्यापारी हालचाल त्यानी कायमची बंद पाडून, केप ऑफ गुड होपच्या जलमार्गाने हिन्दी मालाचे युरपमधले हे एकटे व्यापारी व अडत्ये बनले. मग काय? मागतील तो दाम, असा मामला होऊन बसला. व्यापाराच्या जोडीनेच, तागडीच्या पोटातून बाहेर पडलेल्या राजकारणी उलाढालीत, त्यांच्या बंदुकांची फैर देशामागून देश जिंकीत सुटलेली. मग त्याना स्वर्ग अगदी अध्या बोटावर येऊन ठेपलेला कां दिसू नये? प्रांत जिंकण्याच्या किंवा व्यापाराच्या दलामलीत पोर्च्युगीजानी वैयक्तिक आणि राष्ट्रीय नीतिमत्तेचे इतके भयंकर धिंडवडे केलेले आहेत, की त्यांची वर्णने वाचताना विद्यमान काळातल्या बिलंद दरोडेखोरानासुद्धा शरमेने मान खाली घालाव्या लागतील. यांच्या व्यापारी जिनसात गुलामांचाहि समावेश झालेला असे आणि आफ्रिकेतले गुलाम आणून त्यांचा साऱ्या आशियाभर ते विक्रा करीत असत. ''गोवानीज लोकात पुष्कळ वेळा नीग्रो रक्ताची छटा स्पष्ट दिसते, त्याला कारण हा आफ्रिकन गुलामांचा व्यापारच होय.'' (नेर्नकृत कोकणचा इतिहास पृ. ५४) हिन्दुस्थानच्या एकहाती व्यापारामध्ये अवघ्या शंभर वर्षांत पोर्च्युगाल देशाने इतकी अलोट संपत्ति मिळविली कीं तिच्या तेजाने सारा युरपखंड दिपून गेला.

केवळ व्यापारासाठी आलेल्या या गोऱ्या बनियांचे हिन्दी राजे रजवाडे एवढे आगत स्वागत कशाला करीत आणि त्यांच्या राजकारणी उचापतींकडे काना डोळा कां करीत? असे प्रश्न साहजिक उद्भवतात. हिन्दुस्थानात हरएक प्रकारचा माल मागणीपेक्षा जास्त तयार होत असे. युरपियन क्रिस्ती बनियांच्या आगमनापूर्वी हा माल आरबी व्यापारी आरबस्थान इराणच्या मार्गाने जरी युरपात नेऊन विकीत असत, तरी पुरवठ्याच्या प्रमाणात मागणीचा उठाव होत नसे. या उठावासाठी परदेशी बनियांचे तांडे आणि जहाजांचे काफिले जेव्हा बंदरोबंदरी दाखल झाले तेव्हा हिन्दी राजाना आनंद होणे अगदी साहजिक होते. पुष्कळसे राजे आणि त्यांच्या कुटुंबातली राण्या राजपुत्र वगैरे मंडळी स्वतः पुष्कळ व्यापार करीत असत. त्यानाहि आपापल्या अडकलेल्या भांडवलांच्या सुटकेचा मार्ग मोकळा झाला. मग त्यानी या परदेशी गोऱ्या गोमट्या तागडी तुकाप्पांचे थाटमाटाने आगत स्वागत कां करू नये? शिवाय, राज्यातला

व्यापार वाढला म्हणजे कस्टम ड्यूटीच्या द्वारेहि राजे लोकांची गंगाजळी तुडुंब भरली जाई. तात्पर्य, व्यापाराच्या वेसणीबरोबरच राजकारणी उचापतींचे डाव युरपियन क्रिस्ती बनिये मोठ्या धूर्ततेने खेळले, म्हणूनच हिन्दी राजे त्यांच्यापुढे कालवशात् फटाफट नांग्या टाकीत नामोहरम झाले.

पोर्च्युगीजांच्या सत्तेखालची हिन्दी प्रजा मुळीच सुखी किंवा भरभराटीत नसे. चरकात उसाची कांडी एकदा घुसडली जाऊ लागली ह्मणजे कोणते कमी पिळवटले आणि कोणते अधिक, हा जसा प्रश्नच उरत नाही, तद्वतच केवळ पैशाची लूट करण्यासाठीच सात समुद्र ओलांडून आलेल्या पोर्च्युगीज सत्ताधाऱ्यांच्या तागडी-तलवारीखाली सापडलेल्या हिंदी प्रजेची स्थिति होती. पोर्च्युगीजांबद्दल आभारांचे उद्गार काढायला एकच बाब इतिहासात दिसते. त्यानी हिन्दुस्थानातल्या अनेक मोठमोठ्या नृपतींच्या सैनिकाना बंदुका उडविण्याचे शास्त्र शिकवून, ड्रिल कवायत आणि युरपियन युद्धशास्त्रातील महत्वाची गमके, यात त्यांच्या फलटणीच्या फलटणी तरबेज केल्या. दुसरी आनंदाची आणि हिन्दी लोकांच्या दृष्टीने मोठ्या दैवाची गोष्ट म्हणजे पोर्च्युगीजांचे युरपमधले जवळचे शेजारी जे स्पेनदेशीय स्पानियर्ड लोक, त्यानी अमेरिकेतल्या पेरू व मेक्सिकोची वसाहत करताना, तेथल्या रहिवाशांची जशी सर्रास कत्तल केली, तसा प्रकार पोर्च्युगीजानी हिन्दुस्थानात केला नाही. दुर्दैवाने स्पानियर्ड कोलंबसाचे जहाज जर हिन्दुस्थानच्या किनाऱ्याला शिवते, तर या स्पॅनिश राजकारणाचे परिणाम या देशाला कसे भोवले असते, याची कल्पना मेक्सिकन व पेरूवियन लोकांच्या कत्तलीच्या इतिहासावरून करता येण्यासारखी आहे.

व्यापार आणि राजकारण या दुहेरी साधनानी पोर्च्युगीज लोक आणि त्यांचा पोर्च्युगाल देश सोन्याच्या सागरात बेफाम लोळू लागताच, त्यांच्या पौर्वात्य सत्तेला ओहटी लागली. आलफान्सो डी सोझा (पोर्च्युगीज हिन्दुस्थानचा गव्हर्नर, सन १५४५) म्हणतो, ''एका हातात येशूचा कुरूस आणि दुसऱ्या हातात तलवार घेऊन पोर्च्युगीज हिन्दुस्थानात घुसले, येथे सोन्याची चंगळ पाहून, खिशांत सोने कोंबण्यासाठी त्यानी कुरूस खाली ठेवला. सोन्याने भरलेले खिसे प्रमाणाबाहेर जड झाल्यामुळे त्याना सावरण्यासाठी दुसऱ्या हातातली तलवार त्यानी खाली ठेवली. (म्हणजे दोनहि हात खिशे सावरण्यात गुंतले.) त्यांच्या मागून जे दुसरे युरपियन व्यापारी आले, त्यानी याना या अवस्थेत पाहताच, झटकन उचकून (हिंदुस्थानाबाहेर) फेकून दिले.'' पोर्च्युगीजांच्या पाठोपाठ डच आले. त्यांच्या सर्व वसाहती बळकावल्या आणि जहाजे जाळली. सध्या हिन्दुस्थानात पोर्च्युगीजांच्या नावाचे कुंकू लावणारे फक्त एकटे गोवेच आहे. बाकी सर्व मामला खलास!

हिंदुस्थानात डच

डचलोक १६ व्या शतकाच्या अखेर अखेर येथे आले. या वेळेपर्यंत ते स्पेन देशाशी राजनिष्ठेने वागत असल्यामुळे, त्याना लिस्बन येथे हिंदी मालाची खरेदी करता येत असे. पुढे त्यानी स्पेनच्या सत्तेचे जूं झुगारून दिले आणि १५८० मध्ये स्पेन आणि पोर्च्युगीज वसाहती स्पेनच्या राज्यसत्तेखाली केंद्रित होताच, त्याना लिस्बनचा दरवाजा अज्जिबात बंद होऊन, हिंदी माल मिळण्याची पंचाईत झाली. स्पेनने डचांची सगळी जहाजे जप्त केली आणि त्यांच्या सर्व नावाड्यांना तुरुंगात टाकले. या नावाड्यांत एक डच कॅपटन कैदी होता. त्याने पोर्च्युगीज खलाशांकडून हिन्दुस्थान आणि पौर्वात्य देशांतल्या व्यापाराबद्दल पुष्कळ बातम्या काढलेल्या होत्या. डचलोक जात्या मोठे ऐदी आणि मंद प्रवृत्तीचे. बसल्या जागेवरून ऊठ म्हणता उठायचे नाहीत. या डच कॅपटनने हरप्रयत्नाने कैदेतून आपली सुटका करून घेतली आणि स्वदेशात येऊन,

त्याने आपल्या देशबांधवांत, हिंदुस्थानच्या व्यापारापासून पोर्च्युगालची केवढी विलक्षण सांपत्तिक भरभराट झाली, याची भडक चित्रे रंगवून, हिन्दुस्थानच्या व्यापारी सफरीबद्दल जागृति केली. ताबडतोब डचांनी आठ जहाजे सिद्ध करून, या कॅपटनच्या नेतृत्वाखाली हिन्दुस्थानच्या शोधार्थ रवाना केली. पैकी चार ईशान्य देशाच्या रोखाने गेली आणि चार केप ऑफ गुड होपच्या वळशाने गेली. गुडहोपच्या बाजूने गेलेली जहाजे १५९८ साली जावा बेटाला पोहचली; आणि त्यानी लागलीच हिन्दुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर ठिकठिकाणी व्यापाराला सुरुवात केली. सन १६६३ पर्यंत पुलीकत, सादरास, आग्रा, पाटणा, सुरत आणि अहमदाबाद वगैरे ठिकाणी त्यानी आपल्या वखारी स्थापन केल्या आणि संरक्षणासाठी किल्लेकोटहि बांधले. सन १६७५ त त्यानी चिनसुरा येथे आपली मुख्य वखार चालू केली.

जोपर्यंत हे डच बनिये केवळ आपल्या तागडीपुरतेच पहात होते, तोपर्यंत त्यानी अलोट संपत्ति मिळविली. साऱ्या बंगालभर त्यांचा व्यापार फार जोरात चालत असे. पण पोर्च्युगीजांचे उदाहरण पाहून, बनियेगिरीच्या तागडीबरोबर त्यानी राजकारणाच्या तलवारीला हात घालण्याचा उपद्व्याप डोक्यांत आणला. हिन्दुस्थानावर राज्य करण्याची त्याना हाव सुटली. यावेळी येथे बरेच स्थायिक बनून रुजलेल्या इंग्रेजाना हिन्दुस्थानातून कायमचे उखडण्याची त्यानी उमेद बाळगली. परंतु, इंग्रेज सगळ्या युरपियन एशियन लोकांच्या बारशाच्या घुगऱ्या जेवलेले! त्यानी डचांचा हा डाव तेव्हाच ओळखून, प्रत्यक्ष लढाईची दलामल न करता, चुटकीसरसे डचांच्या भारतीय अस्तित्वाचे मूळच उखडून टाकले. कसे ते पहा.

इंग्रेजांनी बंगालच्या देशी राजकारणात गौड बंगाली ढवळाढवळ करून, प्लासीच्या लढाईने आपल्या अस्तित्वाचा पाया घातला. या प्रसंगी त्यानी सुराज उद्दौल्याला पदच्युत करून, त्याचा निमकहराम नोकर मीरजाफर याला त्यानी आपला 'बडा गद्धा' म्हणून बंगालच्या सुभेदारीवर थापला होता. जाफरने इंग्रेजांच्या गुळचट थापाना बळी पडून, राज्यप्राप्तीच्या आशेने, आपल्या सुराज उद्दौला धन्याशी बेइमानी केली. पण सुभेदारी मिळताच त्याला इंग्रेजी बनिया कंपनीच्या नोकरशाहीचा सासुरवास असह्य होऊन तो तिच्या उच्चाटणाच्या कारस्थानी खटपटी करू लागला. काट्याने काटा काढण्यासाठी त्याने डच बनियांशी संधान बांधून, इंग्रेजांचा धुव्वा उडविण्यासाठी, बटेविया येथून डचसैन्य आणविण्याची खटपट केली. इंग्रेज बनिये आणि डचहि बनिये. दोघे एकाच युरप खंडाचे असले, तरी एकाच पिण्डाचे नव्हते. इंग्रेजांचे पाताळयंत्री राजकारण पाताळवासी अमेरिकन बृहस्पतीना सुद्धा जर आज पाणी पाजीत आहे, तर १८ व्या शतकातल्या बजरबट्टु डच लोकांच्या डावपेचांच्या उडत्या पाखरांची पिसे मोजायला ते थोडेच कमी करणार! मीर जाफरच्या संधानाप्रमाणे बटेविया येथून डचांची ७ जहाजे ११०० सोल्जर भरून आली. रॉबर्ट क्लैवने बिनचुक धोरण बांधून, ही जहाजे चिनसुऱ्याला पोहचण्यापूर्वी वाटेतच गाठून तोफांच्या भडिमाराने ठार बुडवून टाकली. इंग्रेजाना उखडण्याच्या कारस्थानात डचच स्वतः आरपार उखडले गेले, त्यांच्या व्यापाराला उतरती कळा लागली आणि इंग्रेजाना हाकलून हिन्दुस्थानची बादशाही भोगण्याची त्यांची महत्वाकांक्षा जागच्या जागी जिरली. अखेर १८०५ साली चिनसुरा मलाक्का वगैरे आपल्या सर्व व्यापारी ठाण्यांचे उदक इंग्रेज बहादरांच्या हातावर सोडून, एक सुमात्रा द्वीपकल्पाखेरीज, डचांचे अस्तित्व हिन्दुस्थान आणि पौर्वात्य देश येथून आमूलाग्र नाहीसे झाले. आजच्या घटकेला डच प्राणी औषधाला मिळण्याची पंचाईत! पण या डचानी हिन्दुस्थान जिंकण्याची एका काळी हाव धरली होती, हे पुष्कळ शिक्षित हिन्दी लोकाना माहीतहि नसेल.

□□□

अग्रलेख

राजर्षि शाहूमहाराजांची कामगिरी

(सत्यवादी-शाहू खास अंकात प्रसिद्ध झालेला श्री. ठाकरे यांचा लेख)

''झाले बहु होतिल बहु आहेतहि बहु परंतु या सम हा''

- मोरोपंत

कोल्हापूरचे छत्रपति आणि महाराष्ट्राचे राजर्षि शाहूमहाराज दिवंगत होऊन आज सहा वर्षे झाली. इतक्या अवधीत महाराष्ट्राच्या नानाविध चळवळीत, विशेषतः त्यानी पुरस्कारलेल्या ब्राह्मणेतर चळवळीत सरडेशाहीचे इतके रंग ढंग बोकाळले आहेत की, त्यामुळे महाराजांच्या धूरीणत्वाचे महत्व दिवसेदिवस सर्वत्राना पटू लागले आहे. त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर बहुजनसमाजाच्या आत्मोद्धाराच्या धडपडीवरील

सर्चलाईट विझाला

हे प्रबोधनाचे उद्‌गार आज अक्षरशः खरे ठरले. हा शोधनप्रकाशाचा झोत विझताच, आज ब्राह्मणेतर चळवळ ह्मणजे बाराभाईची खेती किंवा कुंभारवाड्यातली चिकणमाती होऊन बसली आहे. हवी त्याने हवी तशी तुडवून, तिचे हव्या त्या घाटा-थाटाचे गाडगे बनवावे, असा प्रकार चालला आहे. संभाजीच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रात जी बजबजपुरी मातली होती, तीच शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर अनुभवाला येत आहे. पूर्वीचा धनाजी जाधव नावाचा 'धनाजी' होता; पण धनासाठी त्याने धन्याची मान कापली नाही, का महाराष्ट्राशी बेइमानी केली नाही. हिंदवी स्वराज्याच्या पुनर्घटनेसाठी धनाजीने आपली मान छत्रपतीच्या चरणी अर्पण केली. आजहि ब्राह्मणेतर पक्षाच्या झेंड्यावर एक जाधवच आहेत; आणि ते साधेसुधे जाधव नसून 'भास्करराव' जाधव आहेत. दुर्दैव एवढेच कीं या भास्कराच्या किरणांचा प्रकाश कौन्सिल इलेक्शनच्या हंगामातच काय तो चमकतो; एरवी सर्वत्र अंधारच अंधार! ऐतिहासिक नावाची किंचित् आदलाबदल केली तर, विद्यमान भास्करराव जाधव 'धनाजी' म्हणून छान शोभतील आणि जिंजीकालीन धनाजीराव जाधव 'भास्करराव' म्हणून कोणीहि त्याच्या स्मृतीला मान वाकवून मुजरा करील. पूर्वीच्या धनाजी जाधवाने कायस्थ प्रभू खंडो बल्लाळाच्या हातात हात आणि खांद्याला खांदा भिडवून जिंजीचे राजकारण साताऱ्यात गाजविले. आजच्या भास्करराव जाधवाना भटांप्रमाणेच कायस्थ प्रभूंचा वासहि सहन होत नसल्यामुळे, त्यांच्या 'धनाजी' मनोवृत्तीच्या पोटी नुकताच बागड्यांचा

मराठेतर ब्राह्मणेतर पक्ष

जन्माला येऊन, त्यामुळे शाहूमहाराजांच्या मूळ तत्वाचे तीन तेरा झाले. काळ बदलला, परिस्थितीत फेर पडला, कर्तव्याचे क्षेत्र निराळे बनले, विचारात क्रांति झाली, तरी तत्वे कधी बदलत नसतात. पण सत्वसाधनासाठी तत्वालाहि मेणगोळीप्रमाणे हवा तो आकार देण्याइतकी सवलत, शाहूमहाराजांच्या मृत्यूने, त्यांच्या ध्वजधारकांना सापडताच, ब्राह्मणेतर चळवळीचा पुलावा सत्यशोधकी हंडीत हव्या त्या मसाल्याच्या फोडणीने बेदरकार शिजू लागला नसता, तर शाहू महाराजांच्या कामगिरीची आज कोणाला आठवणहि होती ना! शाहू महाराजांच्या निधनावर जसजसा काळ लोटला जात आहे, तसतसे त्यांच्या जीवनकार्याचे महत्व दुनियेला अधिकाधिक पटत आहे, त्यांचा सर्वांगीण श्रेष्ठपणा विशेष दृग्गोचर होत आहे आणि त्यांच्या करणीतला 'अद्‌भुतपणा' तर असामान्य जोराने जनतेची अंतःकरणे काबीज करीत आहे. शाहूमहाराजांच्या सर्वांगीण श्रेष्ठतेचा पहिला बलवत्तर निस्संदिग्ध पुरावा ह्मणजे त्यांचा मृत्यू होताच

भटांनी गावोगाव साखर पेढे वाटले

एकाद्या मनुष्याबद्दल भटांच्या द्वेषाची भट्टी भडकून ते आपले हात चोळू लागले, पाय आपटू लागले, दातओठ चावू लागले, शिव्याश्रापांचा वेदघोष करू लागले, भटेतरांतल्या 'मांजराच्या डावल्या' जमा करू लागले आणि वृत्तपत्री शिमग्याने पांढऱ्यावर काळे उमटवू लागले, ह्मणजे खुशाल डोळे मिटून सिद्धांत सांगावा कीं

हाच एकटा खरा लोकोत्तर पुरुषोत्तम

भटांनी शाहूमहाराजांचा इतका कडेलोट द्वेष केला की, त्यांच्या (शाहूमहाराजांच्या) लोकोत्तर श्रेष्ठपणाची भिंगरी रों रों करीत गगनाला जाऊन भिडली. भटद्वेषाची चढती कमान कमाल कळसाला गेली म्हणूनच शाहूमहाराजांची राजर्षींची भूमिका महाराष्ट्राच्या हृदय-मंदिरात अक्षय चिरंजीव होऊन बसली. भटवर्ग ही एक उपकारी जात आहे म्हणतात, ते काही खोटे नाही.

राजर्षींच्या कार्याला विशेष

विचार उत्पन्न झाला, त्याचा कोणी उच्चार केला कीं मग तो केव्हा तरी आचारात उमटल्याशिवाय रहात नाही. छिनाल परिस्थिति पुष्कळ वेळा प्रतिकूल होऊन उच्चाराचे नरडे दाबते, आचाराची भ्रूणहत्त्या करते आणि फास टाकून ऐन यशाच्या क्षणाला कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाना सपशेल धुळीला मिळविते. पण विचार कधी मरत नाही. तो अमर असतो. घराणीच्या घराणी नामशेष झाली, पिढ्यान्‌पिढ्यांची धडपड वांझोटी ठरली, शतकामागून शतके गेली, क्रांत्या मागून क्रांत्या झाल्या, तरी विचार कधी मरत नाही. जितका जास्त त्याला विरोध, तितका अधिक बजरंगबली तो बनला जातो. कधी ना कधी तो आचारात उमटायचाच. त्यात चूक व्हायची नाही. राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या लढाया पिढ्यान् पिढ्यांच्या विचारानीच अखेर लढल्या जातात आणि स्वातंत्र्याचा विचार आणि त्याचा कधीतरी झालेला जबरदस्त उच्चार अखेर आचारात उमटून, राष्ट्रीय क्रांतीचा इतिहास काळाकडून पोलादाच्या पात्याने लालभडक शाईने लिहिला जातो. शाहू महाराजांच्या चरित्राचा विशेष हाच कीं शिवाजीच्या वेळी उच्चारात व्यक्त झालेला एक जबरदस्त विचार त्यानी पावणे तीनशे वर्षानी प्रत्यक्ष आचारात उमटवून दाखविला. जी गोष्ट सावरता सावरता शिवाजी बेजार झाला, किंबहुना ज्या गोष्टीकडे त्यानें दुर्लक्ष केल्यामुळेच स्वराज्य

स्थापनेच्या पायातच स्वराज्य-घाताचे बी पडले, तीच नेमकी गोष्ट शाहू महाराजानी मुळासकट उचकून काढली. जेथे शिवाजी चुकला, प्रतापसिंहाचा नेम हुकला तेथेच शाहूनी आपल्या शक्तीयुक्तीचा हावित्झरी मारा करून आपले छत्रपतित्व अजरामर करून ठेविले. या हावित्झरी माऱ्यामुळे ज्यांच्या स्वार्थाचे गगनचुंबित मोठमोठे वाडे पेटून जमीनदोस्त झाले, त्या भटांनी शाहूमहाराजाना

स्वराज्यद्रोही छत्रपति

ही शंखासुरी पदवी दिली. पण त्यामुळे महाराजांच्या चारित्र्याला कमीपणा न येता, उलट ते विशेषच तेजाळ व यशवंत ठरले. भटांना सातारचे शाहूमहाराज परमेश्वराचे बाप वाटतात. कां? तर या दिल्लीबाज खुशालचेंडूने भटांना त्रिकाळ पंचपक्वान्नांच्या ढेकऱ्या मेजवान्यात आकंठ गाडले. उलटपक्षी कोल्हापूरच्या शाहूने भटांच्या पोटात आकंठ बुडालेल्या दीन दुनियेला हात देऊन बाहेर काढले. भटांच्या खरकट्याच्या दृष्टीने हा स्वराज्यद्रोह नव्हे तर काय? मी तर याला 'ब्रम्हहत्त्या' हेच नाव दिले असते. 'स्वराज्यद्रोही' ही (भटेतरांच्या दृष्टीने) शिवी, किंवा (भटांच्या दृष्टीने) पुराणोक्त आशीर्वाद बराच मवाळ ठरतो. त्याऐवजी 'ब्रम्हहत्यारी छत्रपति' ही शब्दयोजना बरीच मनुप्रासादिक ठरली असती. शाहूमहाराजांनी बहुजनसमाजाच्या आत्मोद्धाराचा प्रश्न हाती घेण्यापूर्वी ब्रह्ममुखोत्पन्न* भट म्हणजे अखिल भटेतरांचे राजकीय सामाजिक धार्मिक जीवन-नियंत्रणावरचे भूदेव म्हणून बिनतक्रार मिरवत होते. भट म्हणेल ती पूर्वदिशा सर्व भटेतर मिटल्या तोंडी मानीत होते. भटेतर राजाच्या राजवाड्यापासून तो थेट रायनाक महाराच्या झोपडीपर्यंत सर्व भटेतर मानवांचे जीवन भटाच्या बऱ्या वाईट शब्दांवर चालत असे. अशा सर्वसमर्थ सर्वव्यापी भटाब्राम्हणांचे वर्चस्वच शाहू महाराजानी जर आपल्या स्वयंनिर्णयी चळवळीने उध्वस्त केले, तर ती ब्रम्हहत्याच नव्हे काय? ब्रम्हहत्या म्हणजे ब्राम्हणहत्या नव्हे, हे शेंबड्या पोरालासुद्धा समजते; पण, शाहू महाराजांच्या चळवळीने जेथे भटाब्राम्हणांवर महारवाड्याप्रमाणे स्वतंत्र भटवाड्याच्या अलग राहणीचा प्रसंग ओढवू पहात आहे, तेथे 'ब्रम्ह' शब्दानें 'ब्राम्हण' जातीचा उल्लेख करण्याइतके गोमूत्री वैभव भटाना खास 'रिझर्व' करून द्यायला, भटेतरांच्या उदारबुद्धीचे दिवाळे खास निघालेले नाही.

शिवाजीने काय केले?

शिवाजीनें राजकीय स्वराज्य स्थापन करून महाराष्ट्राला माणुसकी दिली, म्हणून तो चिरंजीव झाला. दुरून डोंगर साजरे या न्यायाने हा स्वराज्यस्थापनेचा उपक्रम आम्हाला सहजगत्या चुटकीसरसा घडून आलेला चमत्कार अथवा ईश्वरी लीलेचा महिमा वाटतो. परंतु या कामी खर्ची पडलेल्या शिवाजीच्या धक्के चपाट्यांची आपल्याला असावी तितकी कल्पना होत नाही. शतपैलू दगलबाजीने (डिपलोमसी) आब्राम्हण चांडाळापर्यंत सर्वांच्या तोंडावर हात फिरवून, धर्माच्या सबबीवर भटाना आणि स्वराज्याच्या सबबीवर भटेतराना कसेबसे खुलवून, शिवाजीने स्वराज्यस्थापनेचा अट्टहास तडीस नेला. शिवाजीच्या वेळी सारा महाराष्ट्र स्वदेशाभिमानाने किंवा एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेने एकजात फुरफुरला होता, असे विधान बरेच धाडसाचे होईल. महाराष्ट्र व्यक्तिमाहात्म्याचा भोक्ता आहे, तत्वाचा चहाता नाही, व्यक्तीसाठी तत्वाचा खून करणे त्याच्या हातचा मळ आहे, हे चालू वाटेल त्या चळवळीत वाटेल

* ब्रह्ममुखोत्पन्न म्हणजेच ब्रम्हवांत्युत्पन्न. ब्राम्हण ऊर्फ भट जर ब्रम्हदेवाच्या तोंडातून उत्पन्न झाले म्हणतात, तर ते त्याच्या वांतीसरसेच बाहेर पडले असले पाहिजेत खास. मराठी भाषेत 'ब्रह्मवांत्युत्पन्न' शब्दाचा पिता प्रस्तुत लेखक होय.

त्याला दिसण्यासारखे आहे. प्रत्येक जातीच्या आणि व्यक्तीच्या वृत्तिस्थितीप्रमाणे तोंडावर साखर पेरून, स्वराज्यप्राप्तीसाठी शिवाजीने लोक संग्रहाची कौतुकास्पद दगलबाजी गाजवून जी लोकप्रियता संपादन केली, तिच्या जोरावरच-म्हणजे व्यक्तीमाहात्म्यावरच-तत्कालीन स्वराज्याचा उपक्रम सिद्धीला गेला. पण या उपक्रमाच्या ऐन यशवंत घटकेलाच महाराष्ट्राच्या

पिंडी ब्रम्हांडी झोंबलेले भटी भूत

झटकन् पिसाळले आणि त्याने शिवाजीच्या लोकसंग्रहात भट-भटेतर भेदाचा भडाग्नि भडकावला. दगाबाज भटाना दगलबाज शिवाजीने आंजारून गोंजारून जे महत्व दिले, ते अखेर त्याच्याच बोकांडी बसले. स्वराज्य स्थापन करून शिवाजीने यच्चावत् महाराष्ट्रीयाना जरी माणुसकी दिली, तरी त्याच राष्ट्रवीराच्या राज्याभिषेकाला हट्टाग्रही विरोधाची टक्कर देताना भटानी मात्र आपल्या माणुसकीचे निखारे केले. शिवाजीच्या मृत्यूनंतर तर हा भटी वेताळ इतका भडकला कीं, त्याने भोसल्याच्या राजकुलांत उलट सुलट कारस्थानांची पोखरण घालून, संभाजीसारखा तेखदार छत्रपति रसातळाला नेऊन, त्याच्या आत्मयज्ञाबरोबरच साऱ्या स्वराज्य-घटनेचा खानदेशी उन्हाळा केला. तात्पर्य, स्वराज्यसंस्थापक म्हणून शिवाजी महाराष्ट्राचा परमेश्वर असला, तरी शतकानुशतके हिंदु समाजांत विषमतेची महामारी फुलवीत बसणाऱ्या भटांच्या धार्मिक आणि सामाजिक झब्बुगिरीची मोहिनी त्याला टाळतां आली नाही.

शिवाजी पक्का भटाळलेला होता

त्याला मुसलमान फिरंगी इंग्रेजांचे डावपेच समजले, पण भटी हृदयाचे पाचपेच उमजले नाहीत. देशाला राजकीय स्वातंत्र्य त्याने दिले, पण सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या फासाच्या गाठीकडे त्याने अज्जीबात दुर्लक्ष्य केले. त्याचा परिणाम अखेर भिक्षुकशाहीकडून स्वराज्यघातात झाला. 'गो-ब्राम्हणप्रतिपालक' म्हणविण्यात शिवाजीला मोठे भूषण वाटत असे, पण हे भूषणच वास्तविक दूषण असल्याचा प्रत्यय त्याला राज्याभिषेकप्रसंगीच आला. भटांच्या ओंजळीने पाणी पिण्यात झालेली

शिवाजीची चूक प्रतापसिंहाने सुधारली

पण या तरूण हिमती छत्रपतीला भिक्षुकशाहीने परक्या इंग्रेजांच्या कच्छपी लागून पदच्युत करविले आणि मऱ्हाठी स्वराज्याचा अखेर मुर्दा पाडला. ब्राह्मणेतर हिंदूंच्या आत्मोद्धाराचा हा अखेरचा निर्वाणीचा थैमान जिवंत गाडल्यानंतर, सीतामाईच्या वरदानाची शंभर वर्षे राज्याची सनद घेतलेले रामसैनिक-वंशज विंग्रेजांची कारकीर्द सुरू झाली आणि या राज्याचे देवे गाण्यात चाणाक्ष भटवर्ग आरपार रंगला. खास व्हाईसरॉयच्या खलबतखान्यासून तों मेल्या माणसाला थेट स्वर्ग दाखविण्याच्या धार्मिक गलबतखान्यापर्यंत सर्वत्र

भट मुखत्यारांचा सुळसुळाट!

लक्षावधि भटेतर हिन्दुजनता ह्मणजे मेंढरे आणि मूठभर भट त्यांचे मेंढपाळ! हवी तशी ठोका का वाटेल तिकडे हाका, भट ह्मणजे सगळ्यांचा काका! वेळी कायदेबाज इंग्रेजांच्या राजद्रोहाच्या खटल्यांतील आरोपीला निर्दोष सुटण्याची पुष्कळ आशा, पण भटाने एकाद्या गोष्टीत 'ना' म्हटले की त्यात कोणाची मात्रा चालावयाची नाही. मग तो शाहू छत्रपति असो वा खेड्यातला धोंडजी पाटील असो. भट म्हणजे भूदेव आणि भटेतर हिन्दु ह्मणजे शेणामेणाचे निर्बुद्ध माणशी गोळे! ही परिस्थिति बदलण्याच्या कामी पुष्कळ ब्राह्मणेतर विवेकवाद्यानी आपल्या शक्ती युक्तीची पराकाष्ठा केली. या

नवमताग्रणीत ज्योतीराव गोविंदराव फुले या माळी सज्जनाचे नाव विशेष महत्वाचे आहे. ज्योतीराव मोठे विद्वान् नव्हते, पण त्यांच्या बोबड्या व भाबड्या बोलात ब्राह्मणेतर मागासलेल्या जनतेच्या धार्मिक व सामाजिक गुलामगिरीची जी प्राणान्तिक किंकाळी उमटली, तिच्याच पडसादाने

शाहूमहाराज खडबडून जागे झाले

तत्पूर्वी भिक्षुकशाहीच्या सैतानी लीलांचा उपसर्ग त्यानी बराच भोगला होता, आणि 'माझ्यासारख्या सर्वसत्ताधीश छत्रपतीला जर भटांची एवढी छळणूक तर गोरगरीब मागासलेल्या भटेतर दुनियेची हे किती गांजवणूक करीत असतील'? या तीव्र तिडकेने त्यानी आपल्या संस्थानी कुंपणाला लाथाडून महाराष्ट्राच्या अफाट क्षेत्रात अफाट पसरलेल्या दीन दुनियेच्या आत्मोद्धाराचा प्रश्न हाती घेऊन पद्धतशीर सोडवून दाखविला. जी गोष्ट शिवाजीला साधली नाही, जी साधायला गेला असता प्रतापसिंहाला बाधली, तीच शाहू छत्रपतीनी कमाल स्वार्थत्यागाने शक्य करूल दाखविली. आज मुर्दाड भिक्षुकशाहीच्या सर्वांगीण वर्चस्वाला बहुजनसमाजाने फुटबॉली टाच हाणून जो

धार्मिक सामाजिक स्वातंत्र्याचा स्वयंनिर्णय

रोजच्या व्यवहारात अंमलात आणला आहे, त्याचे सर्व श्रेय राजर्षि शाहू छत्रपतीना आहे. आपले जन्मसिद्ध सर्वांगीण श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी भटानी आपल्या जन्मेंद्रियाचा वारसा थेट ब्रम्हदेवाच्या तोंडाशी नेऊन भिडविला, परंतु शाहू महाराजानी ब्रम्हदेवाच्या तोंडातच ब्राम्हणेतर चळवळीची शिसवी खुंटी जाम ठोकून भटी वर्चस्वाची पैदास कायमची गतीला नेली. हिन्दु समाज म्हणजे

अनंत विषमतेचा भटी उकीरडा

ही जाणीव सामाजिक परिषद व काँग्रेस पुष्कळ वर्षे नुसत्या बडबडल्या, पण शाहू महाराजानी ब्राम्हणेतर चळवळीचा बॉम्ब फेकून त्याला लावलेली आग सबंध उकीरड्याची राखरांगोळी होईपर्यंत विझणे आता मुळीच शक्य नाही. शाहू महाराजांच्या चळवळी एकांगी नव्हत्या. त्या अनेकांगी होत्या. दुसरी महत्वाची कामगिरी म्हटली म्हणजे

अस्पृश्यतेचा विध्वंस

करण्याच्या कामी शाहू महाराजानी आपल्या राज्यात केलेला कायदा ही होय. संस्थानाबाहेर अस्पृश्योद्धारासाठी त्यानी तनमनधनाचा अद्‌भुत होम केलाच, पण कोल्हापुरात मात्र त्यानी अस्पृश्यता कायद्याने गाडली. महाराजांच्या आकस्मिक मृत्यूनंतर त्यांच्या चळवळीचे रंग कितीहि बदलले आणि धोरणे कशीहि भ्रष्ट झाली, तरी त्या पातकांचे धनि त्याचे नामधारी अनुयायी असून, महाराजांच्या चारित्र्यावर त्याची कसलीहि बरी वाईट जबाबदारी येऊ शकत नाही.

□□□

लेख

विचारक्रान्तीचे सागरमंथन

''आपल्याला ओक वृक्षाला तोडावयाचे असेल तर त्यावर गवताच्या काडीचे घाव घालून काय उपयोग? खडक फोडायचा तर तो पिसाच्या प्रहाराने फुटेल काय? तटबन्दी किल्ला बोरूच्या घावानी जमीनदोस्त होईल काय? आस्वल किंवा सिंह ठार मारावयाचा तर माशी हाकलण्याच्या लायकीच्या शस्त्राचा उपयोग होईल काय? मुळीच नाही. समाजात जुलूम जबरदस्तीच्या अशा भयंकर गोष्टी आहेत कीं त्यांची पाळेमुळे ओक झाडापेक्षाहि कठोर असतात. गारगोटीच्या किल्ल्यापेक्षाहि अभेद्य असतात. काही काही रूढ्या इतक्या क्रूर आणि बेशरम असतात कीं जंगली जनावरांची क्रूरता त्यांच्यापुढे कः पदार्थ! अशा वेळी आपण थरकार उडविणारे विचार आणि आगी आग भडकविणारे शब्दप्रहार यांचाच जोरकस मारा केला पाहिजे. कोणाची पर्वा न ठेवता मारे हलकल्होळ उडवून दिला पाहिजे.''

- विल्यम हॉविट

ब्राह्मण कायस्थप्रभु मिश्रविवाह

गेल्या महिन्यात दोन सुशिक्षित कायस्थप्रभु तरूण कुमारिकानी ब्राह्मण जातीय वरांचे पाणिग्रहण करण्यात मिश्रविवाहाचे जे नैतिक धैर्य दाखविले, त्याबद्दल प्रबोधन त्यांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करीत आहे. एक मिश्रविवाह कुमारी खोपकर (चां. का. प्रभु) आणि मिस्टर आय्यर (मद्राशी ब्राम्हण) यांचा संगमनेर (जि. अहमदनगर) येथील कोर्टात गौर कायद्याप्रमाणे रजिस्टर झाला. दुसरा नागपूर येथील आमचे परमस्नेही रावबहादुर रामभाऊ जयवंत बीए. एलेल्बी. एमेल्सी, यांची कन्या कुमारी कुसूम बीए. टीडी. (लण्डन) आणि होशंगाबाद येथील मध्यप्रांत ज्युडिशियल सर्वीसमधील श्रीयुत ए. आर. देशपाण्डे, बीए. एलेल्बी. (देशस्थ ब्राम्हण) यांचा ता. ६ ऑकटोबर १९२९ रोजी गौर कायद्याप्रमाणेच रजिस्टर झाला. या दोनहि नवदांपत्यांचा संसार सौख्यपूर्ण होवो आणि त्यांचे उदाहरण अनेक चां. का. प्रभु तरूण कुमारिकाना आणि पुनर्विवाहेच्छु तरूण विधवानाहि मार्गदर्शक व उत्तेजक होवो, असे आम्ही इच्छितो. शुभम् भूयात्.

हिन्दुसमाजाच्या वर्तमान अपकर्षाची शेकडो कारणे आहेत. त्यांच्या एकेका तपशिलाची चिकित्सा अनेक वर्षे अनेक जन अनेक उलटसुलट वळणानी करीत आले आहेत. प्रत्येक दोष आम्हाला अपकर्षाचे

मूळ कारण वाटतो, आणि त्यालाच प्राधान्य देऊन त्याच्या विध्वंसनासाठी प्रत्येक समाजसुधारकाच्या लेखण्या आणि जिभा आजपर्यंत शिणत आलेल्या आहेत. परंतु हजार रोगावर एक औषध, या न्यायाने जातिभेदाचा भिक्षुकशाही गारगोटी किल्ला उध्वस्त करायला मिश्रविवाह हा एकच हेमगर्भी कुलपी बॉम्ब आहे, हा सिद्धान्त पुष्कळाना पटतो, पण कृतीने वठत नाही. मिश्रविवाह हे आज हिन्दु प्राण्याना कितीहि मोठे दिव्य वाटत असले, तरी मिश्रविवाहाची फोडणी हिन्दु रक्ताला मुळीच परिचीत नाही, असे मात्र मुळीच नाही. जातिशुद्धतेच्या आणि रक्तसंकराच्या गप्पा जातिभेदाळू गचाळ हिन्दु कितीहि मारोत, हजार धान्यांचे त्यांचे जात-कडबोळे मिश्रविवाहाच्या कढईतूनच एकदा खरपूस तळून निघालेले आहे, याची साक्ष त्यांचे रक्त केव्हाहि देऊ शकते. शुद्धी संघटनाच्या भटी उलाढालीना आज कितीहि महामूर पूर आलेला दिसला, किंवा तो तसा असला, तरी रक्तसंमीश्रणाशिवाय खरी संघटना होणेच शक्य नाही, या सिद्धान्ताचे दिव्य हाताळण्याचे कार्य मोठमोठ्या मिशाळ मर्दाना स्त्रैणत्वाचा बाप्तिस्मा देते. सगळ्यांचीच अक्कल भिक्षुकशाही प्रासादीक श्रुतिस्मृतींच्या घरी गहाण पडलेली. मुलींच्या विवाहाची वयमर्यादा वाढविण्यासारखा क्षुल्लक आचारक्रान्तीचा प्रश्न निघाला पुरे कीं सारे हिन्दु लागले श्रुतिस्मृतींचे उकीरडे फुंकायला! तिऱ्हाइताला वाटायचे कीं ओहोहोहो! काय हो हे धर्मपालक हिन्दु! शिंक आली तरी नाक दाबून धरतील; पण श्रुतिस्मृतींच्या आज्ञेशिवाय कधि शिंकायचे सुद्धा नाहींत. विधवा पुनर्विवाह प्रौढ विवाह किंवा मिश्र विवाह यांची उपयुक्तता आणि हिन्दुसंघटनेच्या क्षेत्रात त्यांचे दूरवर पोहचणारे परिणाम शेकडो पाण्ढरपेश्या हिन्दूना पटलेले असले, तरी लग्नसराईचा खाटीकखाना सुरू झाला कीं सगळे माहात्मे डोळ्यांवर कातडे ओढून 'वाडवडलांचे बाळबन्दी वळाण' च घटवीत बसतात! विवेकबुद्धीला हडसून खडसून पटेल तो विचार आचारात उमटविण्याची धमक एकाहि शहाण्याच्या मनगटात आढळून येत नाही. हिन्दु समाजाचा हा मुर्दाडपणा आणि जातिशुद्धतेच्या त्यांच्या पाचकळ वल्गना विचारात घेतल्या म्हणजे कुमारी खोपकर आणि जयवन्त या दोन तरूणीनी दाखविलेल्या मिश्रविवाहाच्या धडाडीबद्दल त्यांचे करावे तितके कौतुक थोडेच.*

बायकानीच बण्ड केले पाहिजे

आमच्या माहितीप्रमाणे, हे दोन मिश्रविवाह जमेला धरून, कायस्थप्रभु समाजात सात मिश्रविवाह झाले. गुदस्त साली घाटकोपर मुकामी सुळे-बागवे विवाह झाला. या सात मिश्रविवाहांची जातवार नोन्द अशी आहे. २ कायस्थ-सारस्वत, २ कायस्थ मराठे १ कायस्थ-भंडारी, १ कायस्थ-मद्राशी, आणि १ कायस्थ-देशस्थ. कायस्थप्रभु कुमारिकानी मिश्रविवाहाच्या क्षेत्रात दाखविलेल्या धडाडीवरून या जातीच्या सामाजिक आत्मविकासीबद्दल कोणी ठळक अंदाज बांधील तर ती चूक होईल. पुढारलेपणाची आणि सुविद्यतेची या समाजाची वटवट कितीहि हस्तनक्षत्री असली, तरी ही जात भरंसाट भटाळलेली आहे. त्यामुळे समाजसुधारणेची सक्रीय धडाडी दाखविणाऱ्या अनेक स्त्रीपुरुषाना आणि कुटुंबाना रक्तपित्याप्रमाणे वागविण्यात या जातीचे लोक बरेच कुप्रसिद्धी पावलेले आहेत. प्रबोधनाच्या वाचकाना तरी या जातीचा हुण्ड्याची भाड खाण्याचा नाठाळणपणा विशेष पाल्हाळाने

---

* सन १९२३ सालच्या (वर्ष ३ रे, अंक ३-४-५ मध्ये) 'नरकासुरच मरत नाही! मंगलस्नाने कशाची करता?' आणि 'बायकांचे बण्ड' (२ अग्रलेखांक) या अग्रलेखांत या विषयाची स्पष्ट छाननी प्रबोधनाने केलेली आहे, तिकडे वाचकांनी पुन्हा एकदा नजर फिरवावी. - प्रकाशक प्रबोधन

सांगण्याची जरूरी नाही. मुलींचे प्रौढविवाह आणि त्यांची साक्षरता या दोन सुधारणा आत्मस्फूर्तीच्या नसून, हुण्ड्याच्या वरवण्टी ठेचणीच्या अप्रत्यक्ष क्रिया आहेत. तरूण विधवांच्या पुनर्विवाहाबद्दल हा समाज ५० वर्षांपूर्वी जितका पाषाणहृदयी होता, तितकाच तो आजहि आहे; आणि गेल्या १५ वर्षात झालेल्या चार पाच विधवाविवाहांबद्दल या समाजात जे अर्धसंमतीचे मौन दृष्टीस पडते, त्याचे श्रेय समाजाच्या आत्मविकासाला किंवा विचारक्रान्तीला देण्यापेक्षा, सक्रीय सुधारणा घडविणाऱ्या अल्पसंख्य सुधारकांच्या बण्डखोर व बेमुर्वत प्रवृत्तीलाच दिले पाहिजे. 'झक् मारते ती जात' एवढ्या निर्वाणीवर सुधारक आला कीं 'नंगेसे खुदा बेजार' म्हणीप्रमाणे जातगंगेची उद्दाम वृत्ति तेव्हाच गंगा-भागीरथी बनते. हुण्ड्याचा कडकडीत निषेध करण्यासाठी सन १९२२ साली मुंबई व उपनगरात हुण्डाविध्वंसक संघाने हुण्डेबाज माणशी गाढवांच्या वरातीपुढे प्रत्यक्ष गाढवे नाचविली, तरीहि ज्या समाजात हुण्ड्याची लाज निपजत नाही, त्या समाजाच्या आत्मविकासाची स्थिति किती जर्मनसिल्वरी असावी, याचा तेव्हाच कयास बांधता येतो. ठाण्याच्या एज्यूकेशन सोसायटीने ग्रॅज्युएटांची गिरणी धूमधडाक्याने चालविली आहे. शेकडो नारबा येथे बीए नारायण बनत आहेत. नारायण बनला कीं त्याला हुण्ड्याचा भाव येतो. इकडे मुलींच्या बापाना हुण्ड्याचे हंडे भरण्यासाठी कर्जाऊ पैसा द्यायला कोऑपरेटिव सोसायटीची पेढी दरवाजे सताड उघडे ठेऊन दादरला बसलीच आहे. ज्याला साधते तो या वाहत्या गंगेत हात धुवून घेतो. बाकीचे बसतात हात चोळीत. अशा अवस्थेत हुण्डारक्तपितीचे उच्चाटन होणार कसे? आणि सामाजिक आत्मविकासाच्या क्षेत्रात - जातीशः मरो, पण व्यक्तिशः - प्रयत्नांचे पाऊल पुढे पडणार कसे? यासाठी प्रत्येक विचारवन्त व्यक्तीने जात्यभिमानाला लाथाडून स्वतःच्या विवेकाच्या अभिमानाची चाड विशेष बाळगली पाहिजे. विवेकाने विचार सिद्ध केला की त्याला आचारात उमटविताना 'आडवा येईल त्याला काप' हेच धोरण ठेविले पाहिजे. लोकमताची चाड भ्याडानी बाळगावी. हिन्दुसमाजाचे लोकमत म्हणजे लिलावात विक्रीला नालायक ठरलेली एक बेभरंशाची चीज समजली पाहिजे. तरुणांपेक्षा तरुणीनीच सामाजिक सुधारणेची अनेक क्षेत्रे नैतिक धडाडीने काबीज करून, तरुणांच्या आजपर्यंतच्या दुटप्पी बुद्धिभ्रंशाची आणि विवेकव्यभिचाराची त्याना लाज आणली पाहिजे. हुण्ड्याच्या रक्तपित्या प्रघातामुळे कायस्थप्रभु समाजात शेकडो सुविद्य तरूण कुमारिकांची गळेदाब कुचंबणा होत आहे. शेकडो साक्षर तरूण विधवा घरोघर कोपऱ्यतल्या केरसुणीप्रमाणे जिवंतपणी मृत्यूचा अनुभव घेत आहेत. या सर्व तरुणीनी, आजूबाजूच्या सर्व कौटुंबिक गुलामगिरीच्या पाशाना त्वेषाने तोडून प्रधान, सासवडकर, कुळकर्णी, सुळे, शृंगारपुरे, खोपकर आणि जयवन्त या सात भगिनींच्या पावलांवर पाऊल ठेवून, मिश्रविवाहाचा धडाडीचा प्रयत्न करावा, अशी प्रबोधनाची खास शिफारस आहे. नुसती शिफारसच नव्हे, तर त्या कामी प्रबोधनकार ठाकरे त्याना शक्त्यनुसार वाटेल ते सहाय्य देण्यास तयार आहेत. केवळ कायस्थप्रभु जातीचाच प्रश्न नव्हे; वाटेल त्या हिन्दु भगिनीने त्यांच्या सहायाची व सल्ल्याची निःसंकोच मागणी करावी. सामाजिक बन्धनांविरुद्ध आणि अन्यायांविरुद्ध आता बायकानीच बण्ड केले पाहिजे. सत्यभामेनेच जातिभेद-नरकासुर ठार मारला पाहिजे. ते बन्सीबहाद्दर कृष्णाचे काम नव्हे.

सरकारी कायद्याचाच दण्डुका पाहिजे

हिन्दी लोक कोणतीहि सुधारणा आत्मस्फूर्तीने घडविण्याच्या पिण्डप्रकृतीचे नाहीत. पाठीत कायद्याचा

बडगा बसल्याशिवाय समाजसुधारणेचे एकहि कार्य त्यांच्या हातून घडल्याचा दाखला इतिहासात नाही. बेण्टिंगने सतीचा कायदा केला नसता, तर हा प्रघात चालू विसाव्या शतकातहि धर्मवान् हिन्दूनी 'नाइलाजास्तव' खात्रीने चालूच ठेविला असता. विधवा-केशवपनाविरुद्ध सर्वत्र त्वेषाची हाकाटी चालली असताहि, नाशिकच्या भटी कसायीखान्यात वेदशास्त्रसंपन्न न्हावीबुवाना दम टाकायला पळाची फुरसद मिळत नाही. जेजूरीच्या खण्डोबाला मुरळ्या वाहण्याची पद्धत बन्द व्हावी, म्हणून काही सुधारकानी व्याख्याने दिली व लेख लिहिले. ताबडतोब धर्मवान हिन्दूंच्या 'भावना दुखावल्या.' त्यांच्या खण्डोबाभक्तीला ऊर्ध्व लागला. सनातन धर्माची मान फासावर लटकली. अखेर मुंबई सरकारलाच या राजरोस कुण्ठणखान्याची चीड येऊन, त्यानी मुरळ्या-प्रतिबंधक कायदा अमलात आणला आणि सुरुवातीच्या एक दोन गुन्हेगाराना दहशत बसणारी शिक्षा ठोठावताच, खण्डोबा, त्याचे पिवळे भगत, सडक्या अंजिरासारख्या त्यांच्या नाजूक भावना, आणि त्यांचा सनातन्या धर्म सगळे हैवत खाऊन स्वस्थ बसले. कोणी फासावर गेला नाही, मेला नाही, खण्डोबा पळाला नाही आणि त्याच्या भण्डाऱ्याची हळदहि तांबडी पडली नाही. गोडगोड कविता, चटकदार प्रहसने, मनोरंजक कादंबऱ्या, सोज्वळ लोणेरी शब्दांचे लेख, किंवा चित्तचटकी गद्यपद्याळ नाटके यांचा मारा करून समाजसुधारणा घडवू पाहाणारे लोक एकतर लफंगे असले पाहिजेत, किंवा अजागळ असले पाहिजेत. सरकारी कायद्याच्या दण्डुक्याशिवाय सरळ श्वास सोडण्याचा हिन्दु पिण्डाचा मुळी स्वभावच नव्हे. मागासलेल्या लोकाना वाटते की आम्हाला 'शिशक्यान' मिळाले तर आमचा हात गगनाला पोहचेल. शिक्षण आवश्यक खरे, पण ते म्हणजे काही अल्लाउद्दीनाचा दिवा नव्हे कीं कळ दाबताच हवी ती घटना चुटकीसरशी घडणार? उच्च शिक्षणाच्या बरण्यात मुरंब्याच्या कापट्याप्रमाणे सुजल्या कुझलेल्या पांढरपेश्यानी केवळ शिक्षणाच्या जोरावर काय सुधारणेच्या पणत्या पेटवल्या, तर हे 'शिशक्यान' वाले मशाली पाजळणार? शंकरभक्तीत आरपार रंगलेला हिन्दु नन्दी राज्यकर्त्यांच्या कायदेशीर बडग्याशिवाय एक इंच कधी पुढे सरला नाही. विवाहमर्यादेचे शारदा बिल आता कायदा बनले. त्याविरुद्ध गुन्हा होताच एक दोन गुन्हेगारांचा हिन्दुपणा एकदा दणदणीत ठणकावला गेला कीं आपोआप प्रौढ विवाहाकडे सगळे हिन्दु बिनचुक आणि बिनबोभाट चालू लागतील. मुरळ्यांच्या राजरोस कुण्टणखान्याप्रमाणेच लग्नसराईत नवरा नवरी विकण्याचा भाडखाऊपणा हिन्दुसमाजात राजरोस चालू आहे. मुलाच्या विक्रीला हुण्डा असे ह्मणतात आणि मुलीच्या विक्रीला देज अशी संज्ञा आहे. हे दोनहि प्रकार निरनिराळ्या रूपाने नावाने कमीजास्त जहाल मवाळ प्रमाणात आब्राम्हण अस्पृश्यब्रुब सर्व हिन्दु जातीत चालू आहेत. गुजराथमध्ये कित्येक जातीतले लोक हयातभर कष्ट करून मिळविलेला पैका मुलीच्या बापाच्या पदरात बांधून उतार वयात ८-९ वर्षाच्या पोरीचा हात धरून संसाराचा ओनामा करतात. कोकणस्थ चित्पावन लोक मुंबई पुणे धुळ्यासारख्या शहरांची हवा खाऊन केवढेहि सुधारलेले असले तरी खुद्द कोकणात त्यांचे माण्डपंचेवाले जातभाई लिलावाच्या पद्धतीनें जास्त पैका देईल त्याला कन्यादान करण्याचा धंदा राजरोस चालवीत असतात. वाटेल त्या वयाच्या भुजंगनाथाला वाटेल तितक्या वेळा चतुर्भुज होण्याचा राजमार्ग म्हणजे कोकण. मराठ्यांत देज पूर्वीपासून बरेच बोकाळलेले आहे. पण घाटी मराठे शिक्षणात थोडे पुढे येऊ लागताच, पांढरपेश्यांची नक्कल म्हणून कीं काय कोण जाणे, त्यानी हुण्ड्याचा नवा शिष्टसंप्रदाय अलीकडे चालू केला आहे. ह्मणजे या समाजाला देज आणि हुण्डा

अशा दोन सुसरी दोन बाजूनी गिळू लागल्या आहेत. पाठारेप्रभु आणि कायस्थ प्रभु या दोन जातींचे माहात्म्य ह्मणजेच हुण्डा! या पेक्षा सामाजिक देशिक किंवा राष्ट्रीय महत्व त्याना कोणते आहे, हे एक गूढच आहे. तिकडे बंगाल्यात तर हुण्ड्याची हण्डेबाजी दरसाल अनेक स्नेहलतांच्या आत्मघातानी बंगाली भद्रांच्या अभद्रपणाचा डंका साऱ्या जगभर गाजवीत आहे. संयुक्त प्रांतातहि हुण्ड्याचा कायस्थी धिंगाणा बंगाल इतकाच नाठाळ आहे. तात्पर्य, हुण्डेबाजी अगर देजबाजी ही कानाडोळा करण्यासारखी क्षुल्लक बाब नसून, मुरळ्याबाजीसारखाच अखिल भारतीय भयंकर सामाजिक अन्याय आहे. हा अन्याय परिषदांतील ठरावांच्या मलमपट्टीने अगर लेखांच्या होमिओपाथिक गुळण्यानी नष्ट होईल, ही समजूत चुकीची आहे. कोणत्याहि सामाजिक दोषाबद्दल-मग तो वेश्या व्यवसायाइतका बेशरमपणाचा असला तरी-त्याची चीड किंवा खंत न येण्याइतकी हिन्दु मनोवृत्ति जातीने मुर्दाड आहे. हुंडेबाजीचा परिणाम समाज विध्वंसनावर कसकसा व कोठवर झालेला आहे, याची कल्पना समाजक्षेत्रात प्रत्यक्ष काम करणाऱ्या समाजसेवकांना जशी स्पष्ट असते, तशी व्याख्यानासाठी व्याख्याने आणि लेखासाठी लेख खरडणाऱ्या भाडोऱ्याना नसते. सरकार तर बोलून चालून परके! आमच्या घरात घुशी उंदरांनी काय कहर करून सोडला आहे, याची दाद घेण्यानी त्याना जरूर काय? आह्माला तर कायद्याच्या बडग्याच्या खुराकाशिवाय एक पाऊल पुढे टाकता येणे शक्य नाही. अर्थात् हुण्डेबाजी रसातळाला नेण्यासाठी कायदे कौन्सिलातच तिच्या उच्चाटनाचे बिल आणण्याशिवाय गत्यंतरच नाही. कायद्याच्या मागणीशिवाय हुण्ड्याविरुद्ध इतर कसलीहि मोहीम यशवंत होणार नाही या जाणीवेला नुकतीच एका परिषदेत स्पष्ट वाचा फुटली. सरकारने वाटेल तर एकादे हुण्डा-कमिशन बसवून, या घाणेरड्या भानगडीचा अंदाज काढावा आणि हुण्डाविध्वंसक कायदा अंमलात आणावा, अशी १९२२ सालीच प्रबोधनाने आरोळी ठोकली होती. पण हा विचार चांगला पिकण्यासाठी ७ वर्षांचा काळ पाहिजे होता. ता. ११ आकटोबर रोजी फत्तेपूर येथे अखिल भारतीय कान्यकुब्ज महासभेचे अधिवेशन पण्डित श्रीनारायण मिश्र यांच्या अध्यक्ष्यतेखाली भरले होते. पास झालेल्या अनेक ठरावांत हुण्डा घेण्याविरुद्ध कायदा करावा अशा आशयाचा एक ठराव पास झाला. 'सरकारने आमच्या धार्मिक बाबतीत हात घालू नये' या ठराविक सनातनी रडगाणेवाल्यानी पुष्कळ तंगडझाड केली. हे सनातनी माहात्मे कोणत्या बाबी धर्माच्या छपराखाली खेचीत नाहीत? गोव्यातल्या गोवेकरणीचा व्यभिचार सुद्धा गोमांतकीय खोबरेली भटाना धर्ममान्य वाटतो. साठ वर्षाच्या थेरड्याशी आठ वर्षाच्या पोरीची जन्मगाठ आवळताना एकाहि कोकण्या भटाचे काळीज कधी चरचरले नाही. आम्हा धर्मवान् हिन्दूंचे सारे जीवनच धार्मिक, मग सनातनी सैतानानी हुण्ड्यासारखा भाडखाऊ विषय धर्म सदरात कां खेचू नये? धर्माच्या मुद्यावर मोठा कडाक्याचा वाद झाला. अखेर २०५ विरुद्ध ७० मतानी ठराव पास झाला आणि असेम्ब्लीमधील प्रतिनिधी पण्डित द्वारकाप्रसाद यानी हुण्डाप्रतिबंधक बिल आणावे, असेहि ठरविण्यात आले. ही इतकी विचारक्रान्ति तर चांगलीच झाली. आचारक्रान्तीसाठी कायद्याचा दण्डुका निर्माण होईल तेव्हा होईल. तेहि एक मोठे दिव्यच असते. तोपर्यंत किती स्नेहलता अग्न्यर्पण किंवा जलार्पण होतील याचा नियम काही सांगता येणार नाही. कान्यकुब्ज परिषदेने घडविलेल्या या विचारक्रान्तीचा फायदा घेऊन, महाराष्ट्रातल्या कायदे कौन्सिलाच्या समाजसुधारक मेंबरानी हुण्डाविध्वंसक बिल आणण्याची तसदी घेतल्यास हिन्दु समाजावर मोठे उपकार होतील. मुंबई कायदे कौन्सिलात पुष्कळ हिन्दु मेंबर्स

आहेत. पण हे काम स्पष्ट स्पष्ट लोकअमान्यतेचे असल्यामुळे, त्यांपैकी कितीजण या बिलाचे श्रेय घेण्यास पुढे येतील, याची आम्हाला शंका आहे. आमची शंका खोटी ठरल्यास त्यात आम्हाला विशेष आनंदच होईल. तथापि जोशीवतनासारखा 'सनातन्यांच्या धर्मभावना दुखविणारा' पण रयतेचे कल्याण करणारा कायदा पास करून घेणाऱ्या रावबहादुर बोल्याना आमची जाहीर विनंती आहे कीं त्यानी हे हुण्डाविध्वंसनाचे श्रेय मिळविण्यासाठी कायदे कौन्सिलात बिल आणण्याची कंबर बांधावी.

खाण तशी माती

पळीपंचपात्र, पेशवाई, पर्वती, पुख्याच्या पत्रावळी, आणि पानपत अशा पाच पापानी प्रसिद्धी पावलेले पुणे! स्वर्गवासी मऱ्हाठी इतिहासाचार्य राजवाडे पुण्याविषयी ''पुणे हा एक मोठा शेतखाना आहे'' असे उद्गार काढीत असत. हा सिद्धान्त त्यानी ऐतिहासिक दृष्ट्या ठरविला, का आरोग्यशास्त्र दृष्ट्या काढला, हे समजणे कठीण आहे. तथापि त्यात पुष्कळच तथ्य आहे, यात संशय नाही. राजवाड्यां इतके पुढे न जाता, स्वानुभवपूर्वक आम्ही इतकेच म्हणू की ''पुणे हा एक शनिखाना आहे.'' पुण्याची नजर जेथेजेथे गेली, तेथेतेथे साडेसातीचा ज्वालामुखी फुटून सत्यानाशाचा कहरच गुदरला, असा मागील आणि चालू इतिहासाचा पुरावा आहे. पुणे शहराची कल्पना आणि स्थापना शनिवारीच घडलेली असावी, असा तर्क आहे. मऱ्हाठी साम्राज्याची राखरांगोळी करणाऱ्या शनिखान्याच्या आद्यशनीचा वाडासुद्धा शनिवारवाडा आणि त्याच्या पेठेचे नावसुद्धा शनिवारपेठच! पुण्याच्या पेशवाईचे पापड भाजून, सातारच्या छत्रपतीच्या सिंहासनाची राखरांगोळी करणाऱ्या बाळाजीपंत नातू शनीचे वास्तुमंदीरहि याच शनिवारपेठेत. इतर कोणत्याहि शहरात अगर गावात बहुशः न आढळणारे शनीचे देऊळ फक्त पुण्यातच अग्रमान पावलेले आहे. (वसईला एक शनीचे देऊळ आहे आणि ते रास्तच आहे. रावबाजीशनीच्या मर्दुमकीचे स्मारक म्हणून पुण्याचा प्रतिध्वनि वसईला उमटला, तर त्यात चूक ती कशी?) इतर ठिकाणचे ब्राह्मणब्रुब लोक, तात्याजी महिपतीच्या व्याख्येप्रमाणे, जरी गुरुग्रहाच्या गुणधर्माचे असले, तरी या शनिखान्यातला एकजात ब्राह्मण हमखास शनीचा अवतार असतो. इतकेच नव्हे, पण बाहेरचा कोणीहि शहाणा अथवा बावळा गुरू एकदा का पुण्याच्या शनीच्या कक्षेत आला की त्याला त्याने तात्काळ आपणासारिखा केलाच म्हणून समजावे. विशेष लक्ष्यात ठेवण्यासारखी गोष्ट, पुण्याच्या पेठांच्या नावांत सगळ्या वारांची नांवे आहेत, पण त्यात ब्राह्मणी गुणधर्माच्या गुरुवार पेठेचा अज्जीबात लोप झालेला आहे. पुण्यात सगळे वार आहेत, गंज आहे, भवानी आहे, वेताळहि आहे; पण गुरू मात्र कोठेच नाही. सगळे महत्व शनीला! इतक्या पराक्रमी आणि तात्काळ-परिणामी शनिखान्याचे स्थानमाहात्म्य सर्व ब्राह्मणेतर रहिवाश्यांवर थोडे फार पडल्याशिवाय कसे राहणार? आणि व्यवहाराच्या दृष्टीने विचार केला तर ज्या ब्राह्मणेतराना शनिखान्यातल्या शनीशी हरघडी काही ना काही व्यवहार पडायचाच, तेथे त्याना आपली मनोवृत्ति, जबरदस्ताचा टिकाव साधण्यासाठी, सवाईशनि बनविणे प्राप्तच आहे. कितीहि सरळ आणि सात्विक वृत्तीचा मनुष्य असो, तो शनिखान्यात गेला पुरे कीं त्याला शनीची बाधा झपाटल्याखेरीज राह्यचीच नाही. कोणतीहि लहान मोठी चळवळ घ्या किंवा चळवळ्या घ्या, तिकडे पुणेरी शनीची नजर जाताच, तिची आणि त्याची साडेसातीच्या चरकात गठली वळलीच पाहिजे. गेल्या काळच्या मेल्या गोष्टी सोडल्या, तरी गणपति उत्सव काढणारा हाच शनि, आणि त्याचा भाद्रपदी शिमगा बनविणारा हाच शनि महात्मा गांधीच्या चळवळीला हाच शनि भोवल

आणि अस्पृश्यांच्या आत्मोद्धाराच्या राशीला याचीच साडेसाती खपाटी बसली आहे. शुद्धीचे खानावळी ताक हाच शनि घुसळीत आहे, आणि संघटनाचे थालीपीठ हाच थापटीत बसला आहे. दृक्प्रत्ययाच्या पुण्याईवर ज्योतिषशास्त्रात ढवळाढवळ करणारा हाच; आणि अखिल जनतेच्या पितरपक्षातल्या खिरीवर स्वतःची एकांडी लोकमान्य दिवाळी साजरी करणारा हाच. नवमतवाद, मग तो इरसाल भटोत्पन्न असो वा भटोतरोत्पन्न असो, त्याच्या बोकांडी पुण्याचा शनि बसला नाही, असे कधीच घडले नाही. नवमतवादी सुधारकांचा पुण्याच्या शनिखान्याने आजपर्यंत जसा आणि जितका छळ केलेला आहे, तसा आणि तितका छळ शनीनेहि कोणाचा केलेला नसेल. पुण्यात बुधाच्या बुधवारपेठेला बरेच बाजारी महत्व असल्यामुळे, तेथल्या चळवळी बाहेरच्या लोकाना मोठ्या दणदणाटाच्या वाटतात. पण ती सुद्धा महाराष्ट्राच्या या शनिखान्याची एक महामाया आहे, हे पुष्कळ बावळटांच्या सहसा लवकर लक्ष्यात येत नाही. आकाशस्थ नवग्रहांत जसा शनि, तसे महाराष्ट्रात पुणे, एवढे म्हटले म्हणजे पुरे आहे. अशा लौकीकाच्या 'पुण्य-पतन' भूमीत अस्पृश्यब्रुब भगिनी बांबवानी नुकताच मंदीरप्रवेशासाठी सत्याग्रहाचा उपक्रम केला असता त्यांच्यावर स्पृश्यानी अत्याचार केल्याचे वृत्त सर्वश्रुतच झाले आहे. अत्याचाराचा तपशील ऐकून वाचून आम्हाला मुळीच आश्चर्य वाटले नाही. कारण, खाण तशी माती!

सत्याग्रहातले खरे तत्व

देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे हा काय साट्यालोट्याचा व्यवहार आहे, याविषयी आमचे विचार सर्वश्रुत झालेले आहेत. देव आणि धर्म या दोन गोष्टी हिन्दु क्षेत्रात सध्या इतक्या पाचकळल्या आहेत कीं त्यांच्या नावासाठी किंवा अभिमानासाठी होणारी प्रत्येक चळवळ म्हणजे अकलेचा आणि हिमतीचा निष्कारण अपव्यय होय, असे आमचे प्रामाणिक मत आहे. देव देवळातच असतो, देवळातला प्रत्येक घडीव अगर थापीव धोण्डा म्हणजेच देव आणि त्या देवाच्या दर्शनाशिवाय अस्पृश्यांचा जीव जात आहे, म्हणून ते आपल्या प्राणावर तुळशीपत्र ठेऊन सत्याग्रह करायला उठले, अशी या सत्याग्रहाची कोणी मिमांसा करील, तर तो त्याचा गाळीव ढोंगीपणा होय. व्यावहारीक उपयुक्ततेंसाठी अस्पृश्य जरी हीच भाषा बोलत असतील, तर ते त्यांचे खरे मत नव्हे. मंदीरप्रवेशाच्या आणि देवदर्शनाच्या सवलतीशिवाय ते आजपर्यंत जगले आणि पुढेहि जगतील. 'पर्वतीच्या पायरीवर माझा प्राण गेला तर माझा देह देवाच्या कारणी खर्ची पडला, यातच मी आनंद मानीन.' हे श्री. राजभोज यांचे उद्‌गार सुद्धा आम्हाला देवप्रेमाचे वाटत नसून उपयुक्ततावादाचे (युटिलिटॅरियन पॉलीसीचे) वाटतात. मुख्य प्रश्न हिन्दूंच्या सार्वजनिक हक्कांचा आहे. हिन्दु सार्वजनिक मंदिरात प्रवेशाचा, देवदर्शनाचा आणि देवपूजनाचा जितका आणि जेवढा हक्क स्पृश्यब्रूव हिन्दूना आहे, तितकाच आणि तेवढाच तो मानीव अस्पृश्य हिन्दूनाहि असलाच पाहिजे, हेच काय ते या वादातले मुख्य तत्व आहे; आणि त्याला सारासार विचार (कॉमन सेन्स) व प्रचलित कायदा यांचे पूर्ण पाठबळ आहे. अर्थात् आपल्या अडाणी व भोळ्या भावाच्या अनुयायांच्या समजुतीसाठी श्रीयुत राजभोज ज्या 'देवा'साठी अगर 'देवकारणा'साठी पर्वतीच्या पायऱ्यावर प्राणार्पण करण्यासाठी सजले आहेत, तो त्यांचा 'देव' म्हणजे हा हिन्दुत्वाचा हक्कच होय, यात शंका नको. जमनालाल बजाजसारख्या 'शेटजी'नी स्वतःच्या मालकीची देवमंदिरे अस्पृश्याना मोकळी ठेवण्यात अस्पृश्याच्या निःशंक हिन्दुत्वाच्या हक्कांचे होणारे समर्थन फारसे समाधानकारक नाही. 'खासगी मालकी'ची असली सवलत आज दिली काय आणि उद्या काढून घेतली काय, अस्पृश्याना त्याबद्दल

तक्रार करण्याची मुळीच सोय नाही. परंतु सार्वजनीक द्रव्यनिधीवर उभारलेल्या देवमंदीरावर यच्चावत् जनतेचा हक्क आपोआपच सिद्ध झालेला असतो. हा हक्क पूर्वी कोणी बजावला नाही, एवढ्याच सबबीवर तो हक्क केव्हाहि रद्द होऊ शकत नाही. अस्पृश्य समाज आता खडबडून जागा झाला आहे, त्याला आपले हिन्दुत्वाचे जन्मसिद्ध हक्क प्राप्त करून घेण्याची वाजवी तळमळ लागलेली आहे, अशा वेळी स्पृश्यत्वाची, राष्ट्रीयत्वाची, राष्ट्रीयसभेच्या तत्वनिष्ठेची, अस्पृश्योद्धाराची, वैष्णवी धर्माची घमेण्ड मारणाऱ्या हिन्दूनी आपल्याच धर्मबान्धवांवर, ते निःशस्त्र सत्याग्रहाच्या व्रताने बद्ध असता, पाशवी हल्ला चढवावा, ही गोष्ट हिन्दुत्वाच्याच काय, पण माणुसकीच्याहि ताण्डाला डांबर फासण्या इतकी बेशरमपणाची झाली. पुण्याच्या काळ्याकुट्ट इतिहासाची पुनरावृत्ति झाली. ही 'दख्खनची राणी' (क्वीन ऑफ धी डेक्कन) 'दख्खनची वेश्या' (प्रॉस्टिट्यूट ऑफ धी डेक्कन) ठरली. या पाशवी मनोवृत्तीचा निषेध करताना पायतणाना सुद्धा शरम वाटते. मग लेखणी लज्जेने मुरडली, तर त्यात नवल कशाचे?

पुण्याची पातकी परंपरा

काही ठराविक पुढाऱ्यांच्या उलट सुलट चिथावणीने सत्याग्रही अस्पृश्याना स्पृश्य हिन्दूनी प्राणान्तिक मार दिला. या गुंडगिरीच्या 'धार्मिक' दंगलीत गुंजाळी टाळकऱ्यांचा भरणा बराच होता, असे समजते. या सत्याग्रहामुळे बऱ्याच 'राष्ट्रीय' भटांचा अस्पृश्यविषयक कळवळा अभ्रकी लायकीचा असल्याचे पुन्हा एकदा हडसून खडसून सिद्ध झाले. सत्याग्रह्यांवर अत्याचार झाल्याचे हे पहिलेच घाणेरडे उदाहरण आहे. त्यातल्या त्यात हा हल्ला सर्व मतांच्या, सर्व पंथांच्या, सर्व जातींच्या आणि सर्व दर्जाच्या हजारो लोकांकडून अल्पसंख्य - पाच दहा - सत्याग्रह्यांवर झाल्यामुळे तर या अत्याचाराचा राक्षसीपणा अत्यंत धिःकारार्ह आहे. अत्याचाराबद्दल कोणाला कितीहि चीड आली, तरी त्याच्या मुळाशी पुण्याची प्राचीन पातकी परंपराच धमधमत आहे, हे लक्ष्यात घेऊनच घडलेल्या पाशवी प्रसंगाकडे पाहिले पाहिजे. ब्राम्हणेतरांच्या प्रत्येक सामाजिक आणि धार्मिक आत्मविकासाच्या आणि स्वयंनिर्णयाच्या प्रयत्नाला पुण्याच्या पेशवाई पिशाच्चाने प्राणान्तिक विरोध केलेला आहे. बिचाऱ्या अस्पृश्यांची गोष्ट कशाला? मोठमोठ्या राजकारणी महत्वाच्या पांढरपेश्या समाजांच्या पुढाऱ्यांचे या पुण्यात बलीदान झालेले आहे. दैवज्ञ सोनार जानवी घालतात, एवढ्या क्षुद्र आरोपावरून त्यांच्या पुढाऱ्यांच्या आंगावर उकळती तेले ओतून त्याना जाळून मारलेले आहे. त्यावेळी पर्वतीचा आजचा महिमा मोरोबादादांच्या वाड्यात गाजविला जात होता. या वाड्यात दैवज्ञांच्या वेदकर्माभिमानी पुढाऱ्यांचे हालहाल करून खून पाडण्यात आले. कायस्थ प्रभूंच्या पुढाऱ्यानाहि या दिव्यातून जावे लागलेले आहे. अशी एकहि ब्राम्हणेतर जात नाही कीं जिने आपल्या सामाजिक धार्मिक स्वयंनिर्णयाची रक्तपाती किंमत पुण्याच्या पातकी परंपरेला दिलेली नाही. पेशवाई ओंकारेश्वरावर जाऊन जरी शंभरावर वर्षे लोटली, तरी तिच्या परंपरेचे भूत पर्वतीच्या पायथ्याशी घुटमळत होते. त्याने दसऱ्याच्या मुहूर्तावर आपल्या अत्याचारी सैतानशाहीचे सीमोल्लंघन तर गाजविलेच. आता ही पुणेरी महामारी गरीब बिचाऱ्या अस्पृश्यांचा कोठे कसकसा बळी घेते कोण जाणे! कसाहि विचार केला तरी सत्याग्रही अस्पृश्याना अत्याचाराने वागविण्याचा पुण्याने घालून दिलेला पाशवी धडा अखिल हिन्दुस्थानाला भोवल्याशिवाय राहणार नाही. आज गरीब दुबळ्या अस्पृश्यानी सत्याग्रह केला. त्याना प्राणान्तिक मार देऊन आणखी वर त्यांची मानान्तिक कुचाळी करण्यात सैतानी भटाना आणि टाळकुट्याना आज जरी मोठा आसुरी आनंद होत

असला, तरी राजकारणाच्या क्षेत्रात सत्याग्रहाचे प्रसंग सर्वांवर येणार आहेत. त्यावेळी प्रतिस्पर्ध्यांनी आजच्या पर्वतिकर्माच्या प्रतिक्रियेचा सव्याज दामदुप्पट आहेर केल्यावर आपल्याला काय वाटेल, याचा सर्व हुल्लडबहाद्दरानी नीट विचार करावा. हिन्दुत्वाचे हक्क मिळविण्यासाठी अस्पृश्याना सत्याग्रह हे एकुलते एकच निर्वाणीचे शस्त्र आहे, असा सनातन्यानी किंवा टाळकुट्यानी आपला पोकळ ग्रह करून घेऊ नये. वाटेल ते हक्क टरारलेल्या मनगटाच्या ठोशाने मिळविण्याइतकी 'महारी मर्दुमकी' अस्पृश्यांत अझून जिवंत आहे. समजा, उद्या विचारक्रान्ति होऊन, सुभेदार घाडग्यांच्या कमाण्डरशिपखाली एकजात लष्करी महारबच्चा अस्तन्या वर सारून बुधवार चौकात उभा ठाकला, तर तीन तासात पुण्यातल्या साऱ्या टाळकुट्या सनातन्याना देहू आळंदीचा रस्ता सुधरावा लागेल. मग त्यावेळी 'सैतानी सरकार' चे बूट चघळायला मात्र धावाधाव करू नका. सत्याग्रहाचे व्रत घेतलेल्या अस्पृश्यांवर हवी तशी हातखैरी जिरवून घेणाऱ्या मर्दांनी आणि त्याना चिथाविणाऱ्या शहाण्यानी थोडा तरी विचार करायला पाहिजे होता. जात्याच तामसी आणि विशेषतः लष्करी कदरीत पिढ्यान् पिढ्या मुरलेल्या दणगट महारांवर-व्याघ्रवृत्तीच्या लोकांवर-आपण हात टाकीत आहोत, याची त्यानी जाणीव ठेवायला हवी होती. समजा, गैरअटकळ अत्याचार सहन न झाल्यामुळे, सत्याग्रही अस्पृश्यानी सत्याग्रहाचे व्रत झुगारून (कारण, सत्वगुणप्रधान सत्याग्रह हा त्यांच्या पिण्डाला परवडण्यासारखा नाहीच.) एकदम अस्तन्या वर सारल्या असत्या, तर बिनधोक धोंडे जोडे फेकून त्यांची टिंगल करणाऱ्या तमासगिरांपैकी किती जणानी त्यांच्या चढाईला तोण्ड दिले असते? भटांचा हात पंचपात्रपळीला आणि सनातन्यांचा हात टाळमाळेला कितीहि बाकबगार असला, तरी महारादि अस्पृश्यांचा हात पिढ्या न पिढ्या खंजीर सुरा तलवार बंदुकी वर घासता आहे. असल्या तामसवृत्ति लोकांच्या सत्याग्रही सात्विकपणाचे कौतुक न करता, त्यांच्या नैसर्गिक हक्कांची पायमल्ली करताना त्यांच्या आत्म्याला केलेल्या दंशाची प्रतिक्रिया कधी काळी थैमानास प्रवृत्त झाली, तर त्यात कोणालाहि आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

सत्याग्रह नामर्दानी करावा?

सत्याग्रहाचे तत्व सर्व प्रकारच्या पिण्डप्रकृतीच्या माणसाना एकसारखे मानवेल, असे मानणे चुकीचे आहे. सगळेच मुकाबले सत्याग्रहाने साधतील, ही कल्पनाहि बरीच धाडसाची आहे. सामान्यतः क्षात्रवृत्तीला पारखे असणाऱ्या भट भाट्यांसारख्या लोकानी सत्याग्रहाचा तेलंगभटी प्रयोग केला, तर त्यात काही बिघडणार नाही. कारण विरोधकाची रग जिरवायला त्यांच्यापाशी दुसरे कसलेच सामर्थ्य पिण्डतः नसते. तेलंग्या भट धरणे धरून बसला की यजमान कण्टाळून अखेर त्याच्या बोडक्यावर चवली पावली आदळतो आणि त्याची पीडा घालवतो. हा माझ्या सत्याग्रहाचा विजय झाला, अशी तेलंग्या खुशीत गाजरे खातो. गुजराथ्याना सत्याग्रहाचा मोठा भरंसा; आणि तो वाजवी आहे. मुंग्याना साखर चारणाऱ्या, ढेकणाला न चिरडता कुपीत घालून दूर अलगज नेऊन सोडणाऱ्या आणि नेहमी तूप शिरा चापणाऱ्या रणछोड-रायजीच्या भगताना एवढाच पराक्रमाचा मार्ग खुला आहे. पिढ्यान्पिढ्या अहिंसा परमो धर्मःचे जैनबौद्धी नेभळे तत्व उराशी बाळगणाऱ्या आत्मक्लेशातच मोक्षाची कुलाब्याची दाण्डी दिसणे अगदी निसर्गाला धरून आहे. कापल्या करांगळीतील चिमुकली रक्ताची चिळकाण्डी पाहून झीट येऊन पडणाऱ्या भट भाट्यांसारख्या महावीराना माणसाच्या मनगटातल्या ठोसाग्रहाची दाद कशी लागावी? भूतदयेच्या अखण्ड चिन्तनाने ज्यांच्या देह मनाचा तूप शिरा बनलेला असतो,

अशा मण्डळीना 'बळी तो कानपिळी' या व्यावहारीक सूत्रातले सत्य पटणे कठीण जाते. त्याना आत्मसामर्थ्याचा कितीहि मोठा भरंसा वाटत असला, तरी त्याची अखेर आत्मक्लेशाच्या परमावधीने मृत्यूतच होत असल्यामुळे, 'आप मरे सो डुब गयी दुनिया' या सिद्धान्ताकडे त्यांची दृष्टीच जात नाही. आत्मक्लेशानी जनहितवाद साधण्याचे तत्वज्ञान मोठे गोण्डस दिसते. पण जगाचा व्यावहारीक इतिहास घडविण्याच्या कामी या तत्वाचा केव्हाहि काडीमात्र उपयोग झालेला नाही. ठोशाला ठोसा, डोळ्याला डोळा आणि दाताला दात अशा अरसपरस सवालजबाबाची सलामी देणाऱ्या मर्दानीच प्रत्येक राष्ट्राचा इतिहास सालंकृत केलेला आहे. बचेंगे तो औरभि लढेंगे या दत्ताची शिंद्याच्या अंत्योद्गारातच मर्दाच्या मर्दुमकीचे रहस्य आहे. भूतदयेची आणि आत्मक्लेशाची तात्विक सूत्रे प्रत्येक धर्मात मुबलक असली, तरी जगाच्या व्यावहारीक, धकाधकीचा मामला या सूत्रांची 'शोभिवन्त वस्तू' पलीकडे मुळीच पर्वा करीत नाही. ब्रिटीश लोक आणि सगळी युरपियन राष्ट्रे यांचा धर्मपिता येशू क्रिस्त म्हणजे आत्मक्लेश-तत्वज्ञानाचा कट्टा पुरस्कर्ता सत्याग्रहासाठी तो सार्वजनिक चव्हाट्यावर फाशी गेला. 'तुझ्या कोणी मुस्कटात भडकावली, तर लागलाच दुसरा गाल पुढे कर' ही त्या महात्म्याची सक्रीय शिकवणूक. क्रिच्चन धर्माचा हा आत्मा. इतके असूनहि किती युरपियन क्रिस्ती राष्ट्रे या नीतीने आजपर्यंत वागली आणि आता वागतात? एकसुद्धा नाही. कां? तर ते पोकळ तत्वज्ञान व्यवहाराच्या क्षेत्रात नपूंसक होय. उलटपक्षी, हिन्दूंचे गीतोक्त तत्वज्ञान पहा. ''अर्जुना, हा माझा काका आणि तो माझा मामा, हा भिकारडा मोह दे झुगारून. युद्धक्षेत्रात पाऊल टाकल्यावर, बाप आडवा आला तर त्यालासुद्धा छाटून साफ करावा. मर्दाला मृत्यूची पर्वा कसली? ''षण्ढ नको होऊं तूं पार्था तुज तों नव्हेचि हें योग्य। उठ लण्डिपणा तुच्छ त्यागुनि गाण्डीवचाप घे वीरा।। मेल्या स्वर्गा जासी भोगिसी राज्यासि जिंकिल्या शत्रू। यालागि ऊठ सत्वर कौन्तेया करुनि युद्धनिश्चय तूं।।'' कोणीकडे ही क्षात्रधर्माची झणझणीत कानपिळणी आणि कोणीकडे नेभळ्या आत्मक्लेशाची सत्याग्रही शिकवणी? पण आज क्रिस्ती युरप गीतेचा अनुयायी बनला आहे आणि हिन्दु भरतखण्ड येशू क्रिस्ताचा आततायी आत्मत्याग चिवडीत बसला आहे. वेदान्ती ऐदी हिन्दूंच्या दृष्टीने युरपियन क्रिस्ती जरी वैश्य ठरत असले, तरी त्यांनी गीतेचे तत्वज्ञान सक्रीय पचनी पाडून आपला कडकडीत क्षात्रधर्म उभ्या हिन्दुस्थानाला शूद्र ठरवून सिद्ध केलेला आहे. शूद्रानी सत्याग्रहाची खुशाल वटवट करावी. खरा हाडाचा क्षत्रिय आत्मक्लेशाच्या नेभळ्या जैनबौद्धी सत्याग्रहाच्या भरीस पडून आपल्या प्राणांचा उकीरडा खास करणार नाही. मृत्यू कोणालाच टळत नाही. मग हातपाय पोटाशी आवळून आत्मक्लेशाने मरण्यापेक्षा, दोन टोले देता घेता कर्तव्याच्या क्षेत्रांत आलेला मृत्यू शतपटीने अभिनंदनीय होय. गीतेचा व्यवहारधर्म लाथाडून, जैन बौद्धांच्या भूतदयेच्या भुताटकीत हिन्दुस्थान गुरफटला, त्याच वेळी त्याच्या अधःपाताला सुरवात होऊन, तो सत्याग्रहाची नामर्द भाषा बरळू लागला. सत्याग्रह मेंढरानी करावा. सिंहव्याघ्राच्या बच्चानी ती भाषा बोलणे ह्मणजे आपल्या रक्ताशी बेइमान होण्यासारखे आहे.

पुणेरी भट नेमका जातीवर जातो

काळ कितीहि बदलला तरी पुण्याचा चित्पावनी मनोवृत्तीच्या भटाच्या मानाची वक्रता सरळ व्हायची नाही. विवेकवादी सुधारणेच्या त्याने कितीहि वल्गना केल्या, तरी त्याच्या मनाची पेशवाई ठेवण अखेर उलट्या काळजाच्या ग्रामण्यी तमाशात रंगल्याशिवाय राह्यचीच नाही, हा सिद्धांत अझून

बऱ्याच स्पृश्यास्पृश्य बावळटाना नीटसा पटत नाही. भिक्षुकी अड्ड्यातली 'देशदास' पदवी पटकविलेले 'पैसाफण्ड रानडे' ह्मणजे एक कट्टे अस्पृश्योद्धारक ह्मणून पुण्यास व इतरत्र मिरवतात. बावळट अस्पृश्य त्याना आपले उद्धारक ह्मणून भोपटकर माट्यांच्या पंक्तीला आजपर्यंत पूजीत आले. महाडच्या सत्याग्रहात अस्पृश्यांवर झालेल्या अत्याचारांबद्दल निषेध करणाऱ्या सभांतून रानड्यांची वाग्वैजयन्ति अस्पृश्यांच्या वतीने मुल्कमैदानी वकिली करीत होती. अस्पृश्य लोक जरी चित्राव-भोपटकर-माटे-रानडे कंपूवर भुरळले, तरी आमचा या आधुनिक पेशवाई टोळीवर मुळीच विश्वास नव्हता, आज नाही आणि पुढे असणारहि नाही. या कंपूबद्दल अस्पृश्यांच्या भोळसट भावनेची एकदा चांगली कानउघडणी करावी, आणि तीहि भटी पॉलिसीप्रमाणे कोणाच्या पाठीमागे गैरहजेरीत नव्हे, तर प्रत्यक्ष तोण्डावर समोरासमोर करावी, म्हणून महाड प्रकरणाचा निषेध करण्यासाठी पुणे लष्करात भरलेल्या अस्पृश्यांच्या एका सभेला आम्ही मुद्दाम गेलो होतो. भोपटकर अध्यक्ष असून 'देशदास' रानडे व चित्राव शास्त्री तेथे हजर होते. रानडे यानी निषेधाची कमाल स्पष्टोक्ती करून अस्पृश्याना डुलावयास लावले. त्यांच्या भाषणातला एक भाग मुद्दाम आज पुनर्रद्धृत करीत आहोत. रानडे म्हणाले ''आपण जन्माने अस्पृश्य असला तरी कर्माने मी ब्राम्हणांतला महारच आहे. सत्याग्रहासाठी महाडला पुन्हा चला, स्पृश्यांच्या अत्याचाराच्या स्थण्डिलावर पहिली मान माझी.'' (टाळ्यांचा कडकडाट.) या नंतर आम्ही भाषण करून, या भटी हस्तिदंतीवर चढविलेला हावित्झरी हल्ला चित्राव भोपटकर रानड्यांच्या कानांत अझून खास घुमत असला पाहिजे. प्रबोधनानेहि हेमगर्भाच्या वळश्यांत (वर्ष ५ वे अंक ८ वा, जून १९२७ पृ. २५१) या हावित्झरीचा सणसणीत टणत्कार काढल्याचे वाचकाना स्मरतच असेल. सध्या पर्वतीच्या सत्याग्रहाला उद्देशून, अस्पृश्यांसाठी जीव द्यायला तयार झालेले हे ब्राम्हणांतले महार म्हणविणारे रानडे 'सेवक - पुणे, मंगळवार तारीख २९.१०.२९' मथळ्याच्या हस्तपत्रिकेत काय उद्गार काढतात पहा :-

''कांही कारणांनीं अस्पृश्यता नाहींशी व्हावी अशी खटपट होऊं लागल्याबरोबर गैरफायदा घेऊन अस्पृश्य व त्यांचे कांहीं पुढारी म्हणविणारे ब्राम्हण गृहस्थ एकदम मंदीर-प्रवेशापर्यंत येऊन ठेपतात न ठेपतात तोंच रोटीबेटी व्यवहाराच्या गोष्टी कांही दुःशिक्षित अस्पृश्य बोलूं लागल्यामुळें या अस्पृश्यरूपी भस्मासुराला आतां गाडलेंच पाहिजे. नाहीतर काय होईल कोण जाणे.''

न करत्याचा वार शनिवार, या न्यायाने हव्या त्या प्रकरणातून निसटण्याची आणि वाटेल त्या नसत्या क्षुद्र कल्पनेला वावटळी हडळ बनविण्याची पुणेरी भटांची पेशवाई चतुराई धनवडे-प्रकरणाने एकदाच कायमची हडसून खडसून सिद्ध केलेली आहे. या वेळी ब्रह्मदेवाच्या सर्व औरस पुत्रानी अशी एक अजब विश्वामित्री सृष्टी पुण्यात निर्माण केली कीं जणू काय दिवसाच्या अखण्ड चोवीस तास एकजात ब्राह्मण स्त्रियांवर मराठे गुण्डांचे अत्याचार चालू आहेत, ब्राह्मणांचे वाडे भराभर पेटविले जात आहेत, ब्राह्मण प्राण्याना पुण्यात जगण्याची पंचाईत पडली आहे; आणि विशेष आश्चर्याची गोष्ट कीं या सगळ्या चित्पावनी उठाठेवीच्या परांजपे-केळकरी डेप्युटेशनला नेक नामदार गव्हर्नर साहेब सुस्वागतम्ची मुलाखत देतात! अस्पृश्यांच्या मंदीर-प्रवेशाचा जन्मसिद्ध हिन्दुत्वाचा हक्क अझून पर्वतीच्या टाळक्यावरच आहे, तोंच अस्पृश्य लोक स्पृश्यांच्या मुलींच्या हातमागणीची माथेफोड करू लागले, या रानड्यांच्या शंखध्वनीत विश्वामित्री धनवडीची दुसरी भटी आवृत्तीच स्पष्ट दृग्गोचर होत आहे. असल्या खोडसाळ कल्पनेची भुताटकी आपल्या मेंदूत उठवून ''या अस्पृश्यरूपी (अस्पृश्यतारूपी

नव्हे बरं का!) भस्मासुराला आतां गाडलेच पाहिजे'' असे उद्गार जर आता हे 'देशदास' काढीत आहेत, तर ते लवकरच अस्पृश्य-विध्वंसनाची नवीन चळवळ हाती घेणार, असा कयास बांधल्यास तो चुकीचा कसा? अस्पृश्यता-विध्वंसक अखेर अस्पृश्य-विध्वंसक बनला!

ब्राह्मणेतर पक्षातील जाधवी

ब्राम्हणेतर पक्षाचा विस्कळीतपणाबद्दल सन १९२३ सालापासून प्रबोधनाने कटु स्पष्टोक्तीच्या अनेक सूचना केल्या. पण तिकडे एकाहि पुढाऱ्याने अगर पक्षाच्या मुख-पुच्छ-पत्राने लक्ष्य देण्याची मेहरबानी केली नाही. नुसत्या वरवरच्या सारवणीने कार्यभाग साधण्याची वांझोटी खटपट तात्पुरती मोठ्या मुत्सद्देगिरीची ठरली, तरी अखेरीला कुंभाराची सून उकीरड्यावरच आली. ब्राह्मणेतर चळवळ म्हणजे बहुजनसमाजाच्या, विशेषतः मागासलेल्या शेकडो समाजांच्या आत्मविकासाची चळवळ, ही आमची अढळ श्रद्धा असल्यामुळेच, आजवर प्रबोधनाने शक्त्यनुसार तिचा कळकळीने पुरस्कार केला, आणि यापुढेहि या पवित्र कर्तव्यकर्मात तो अणूरेणू कसर करणार नाही. आमच्या स्पष्टोक्तीत कदरबाज शिस्त, पायाशुद्ध संघटना आणि वैयक्तिक महतीचा निषेध विशेष असतो. पण केवळ स्वतःची आणि स्वजातीची महति वाढविण्यास धाधावलेल्या ब्राह्मणेतरी पुढाऱ्यांना आमच्या स्पष्टोक्ती कधी काडेचिराइतीच्या काढ्याप्रमाणे, तर कधी एरण्डेलाच्या जुलाबाप्रमाणे वाटत असत. इतकेच नव्हे, तर शाहू महाराजांच्या शिदोरीवर शिरजोर बनलेल्या कित्येक मराठा पुढाऱ्यानी आमच्यावर मराठाद्वेषाचा आरोप करण्याचीहि क्षुद्र मनोवृत्ति व्यक्त केली. महाराष्ट्रातला ब्राह्मणेतर पक्ष झुलविणारे झब्बू कसकसल्या कच्च्या पक्क्या वृत्तीचें आहेत, याची स्पष्ट परीक्षा सातारच्या कूपरशाही छावणीत आम्ही जाऊन आदळलो, तेव्हाच झाली. मराठा-मराठेतर भेदाच्या यादवीचा ऊर्फ जाधवीचा पाया भास्करराव जाधवानीच प्रथम १९२३ सालच्या कौन्सिल-निवडणुकीच्या शिमग्यात घातला आणि या पापाचे मुद्यापुराव्याचे भरपूर माप ताबडतोब जाधवरावच्या पदरात प्रबोधनाने बांधले. (पहा प्रबोधन वर्ष ३ रे, अंक ५ वा, ता. १६ डिसेम्बर १९२३ पृ. ७७) या पापावर पांघरूण घालून, प्रबोधनाच्या स्पष्टोक्तीला खोटी पाडण्याचा जाधवी अट्टहास सगळ्या मराठा पत्रकारांनी रगड केला. पण अखेर त्याहि पापाला तोण्ड फुटून बागडे बोले प्रभृतींची मराठेतर ब्राम्हणेतर पार्टीची नौबद झडलीच. अशी आमची अनेक भाकिते पुढाऱ्यांच्या मगरूर वर्तनामुळे दुर्दैवाने खरी ठरत गेली आणि चालू घटकेला या पक्षातील यादवीची ऊर्फ जाधवीची घाण बिनअटकाव वेगाने सार्वजनिक चर्चेच्या उकीड्यावर दररोज येऊन पडत आहे. हा प्रकार आणखी काही दिवस चालू राहिला - आणि तो राहणारच - तर अनेक झब्बूंचे खरे अंतर्बाह्य रंगढंग चव्हाट्यावर उघडे पडून, या पक्षाच्या पायाशुद्ध पुनर्घटनेचा सुयोग आल्याशिवाय राहणार नाही.

जाधवीची मूळ कारणे

सार्वजनिक आत्मविकासाच्या क्षेत्रात व्यक्तींचे माहात्म्य वाढले आणि स्वार्थासाठी पुढाऱ्यापुढाऱ्यात शर्यत लागली कीं तेथे जाधवी उत्पन्न झालीच ह्मणून समजावे. आजची ब्राह्मणेतर पक्षातील जाधवी मतभिन्नतेने निपजलेली नाही. मतभिन्नता कितीहि माजली तर ध्येयाच्या निष्ठेला कोणी पारखा होत नाही. फक्त कार्य करण्याच्या पद्धतीबद्दल वाद माजतो, पण अखेर त्या वादाची अखेर ध्येयनिष्ठा सुटसुटीत सोडविते. एक काळ असा होता कीं त्या वेळी जाधव-जेधे-जवळकर हे तीन जबरदस्त 'ज'

कार म्हणजे ब्राम्हणेतर पक्षाचे अनुक्रमे ब्रह्मा-विष्णु-महेश म्हणून अजब अभेदाने अगदी एकवटलेले असत. १९२६ सालच्या पुणेरी धामधुमीत तर जेधे आणि जवळकर बाह्यतः इतके एकरंगी एकशिंगी दिसत कीं ही जोडी पाठमोरी पाहिली तर जेधे कोण आणि जवळकर कोण हे हुडकण्याचीहि पंचाईत पडे. टोप्या कोट धोतरे चढाव दोघांचे सारखे. जाधवराव खेरीज करून पूर्वीची सगळी जुनी कार्यकर्ती मण्डळी एकजात माजी पडून हा नवा 'ज'कारी दत्तावतार ब्राम्हणेतर पक्षाच्या धुरेवर येऊन उभा राहिला. या तिघांचे गुणधर्म परस्परविरोधी असल्यामुळे, ही त्रिगुणात्मक दत्तमूर्ती सध्याच्या कलियुगात कितपत टिकाव धरून राहील, याची आम्हाला जबरदस्त शंकाच होती; आणि केव्हा ना केव्हा तरी या आधुनिक दत्तावताराच्या भ्रमाचा भोपळा फुटणारच, ही आमची बालंबाल खात्री होती. पण प्रत्यक्षाप्रत्यक्ष सूचनांचा काहीच उपयोग न होऊन अखेर या ब्रम्हा-विष्णू-महेशात आज जाधवीची जोडाजोडी माजलेली आहे. हिच्या कारणपरंपरेत अनेक बाबी आहेत. तथापि खासगी वैरभाव, एकमेकानी एकमेकाना निष्कारण पुढे आणण्यासाठी केलेल्या धडपडी, आणि जवळकरांची अवचट श्रीमन्ती या तीनच गोष्टी सध्याच्या जाधवीत प्रधान दिसतात. यांपैकी तिसरे कलम म्हणजे सरकारपुढे आणि जनतेपुढे पडलेले एक मोठे गूढ कोडेच आहे. या कोड्याचा खुद्द जवळकरच जेव्हा नैतिक धैर्याने स्पष्ट खुलासा करतील, तेव्हा या जाधवीची तीव्रता झाली तर थोडीशी कमी होईल. केवळ सारवासारवीने अथवा वृत्तपत्री मुलाखतींच्या मखलाश्यानी या जाधवीचा अन्त होईल, अशी कोणी घमेण्ड मारीत असल्यास, त्याच्या आत्मद्रोही ढोंगीपणाचा ब्राम्हणेतर जनतेला न्यायनिष्ठूरतेने विचार करणेच भाग पडेल. आमची ब्राम्हणेतर पक्षाच्या सर्व जुन्या नव्या पुढाऱ्याना विनन्ती आहे की सर्वांनी आपल्या वैयक्तिक महतीचा आणि स्वार्थबुद्धीचा संन्यास करून, ध्येयाच्या एकनिष्ठ तळमळीने सध्याच्या क्षुद्र जाधवीला ताबडतोब पायबन्द लावावा.

न्याय द्यायचा कसा आणि कोणी?

मुंबई-पुण्याकडच्या ब्राम्हणेतर चळवळीच्या म्होरक्या म्होरक्यांतली जाधवी आता मोठ्या हमरीतुमरीवर येऊन, कायदेशीर-बेकायदेशीरपणाच्या भाषेलाहि आता बरेच तोण्ड फुटले आहे. एका बाजूला कायदेपण्डित अध्यक्ष जाधवराव आणि त्यांचा 'कैवारी' कम्पू आणि दुसऱ्या बाजूला जनरल सेक्रेटरीचा आणि बऱ्याच पुढाऱ्यांचा जेधे कम्पू. प्रत्येक कम्पू स्वतःला पठ्ठे बापूराव समजून, कायदेशीरपणाच्या डफावर सडकून थापबाजी गाजवीत आहे. या चुरशीच्या सामन्यात अनेक पुढारी पात्रांची अदलाबदल झालेली दिसत आहे. म्हणजे, पूर्वी जी पात्रे जाधवरावच्या पटक्याला दशाप्रमाणे चिकटलेली असायची, ती आज जेध्यांच्या झेण्ड्याखाली नाचत आहेत; आणि पूर्वी जेध्याना चिकटून राहिलेली बाण्डगुळे आज जाधवरावच्या भजनात दंग आहेत. मराठेतरांचा सवता सुभा उभारणाऱ्या बागडे बोले प्रभृतींचा ताण्डा जेध्यांच्या बाजूने नाचत असला, तरी त्यातसुद्धा त्यांचा हेतू शुद्ध असल्याची खात्री कोणाला देववणार नाही आणि त्यानाहि ती पटविता येणार नाही. कोणत्या तरी बाजूला तात्पुरते मिळून, मराठेतर सवत्या सुभ्याचा प्रसंग आणणाऱ्या व्यक्तीना नामोहरम करण्याची संधी वाया दवडण्या इतकी बागडे बोले प्रभृति मण्डळी खात्रीने अक्कलमन्द नाहीत. परंतु प्रत्येकजण आता कायद्याची भाषा बोलू लागला आहे. अध्यक्षाचे अधिकार किती आणि सेक्रेटरीचे किती? कौन्सिल बोर्डाचे किती आणि प्रान्तिक बोर्डाचे किती? यांबद्दल सगळाच अंधार आहे. गेली १५ वर्षे चळवळीचा धुडघूस

घातला, पण कॉन्स्टिट्यूशनचा पत्ता नाही, नियम नाहीत, काही नाहीत. वाटेल त्या हंबीरराव गंभीररावने उठावे, आणि परिषदेचे जलसे नाचवावे, असा पोरखेळ चालला आहे. नुकत्याच एका बोलेकमिटीने घटनेचा कसलासा मसुदा 'महत्प्रयासाने' तयार केला. तो पाहिला म्हणजे कॉन्स्टिट्यूशनबद्दल ब्राह्मणेतर पक्षाच्या पुढाऱ्यांच्या कल्पना किती कोत्या आणि अनाधुनिक आहेत, याची तेव्हाच अटकळ होते. आता तर कायद्याचाच वाद उपस्थित झाला आहे. आणि जेथे पक्षाची कायदेशीर कॉन्स्टिट्यूशनच ठरलेली नाही, तेथे जाधव कम्पू खरा की जेधे कम्पू खरा, या वादाचा न्याय कोणी आणि कसा द्यावयाचा? आम्ही तर इतकेहि ह्मणण्याचे धारिष्ट करतो की सध्याचा कायदेशीर-बेकायदेशीरपणाचा वाद जरी न्यायकोर्टात गेला, तरी तेथे सुद्धा कॉन्स्टिट्यूशनच्या अभावी, न्यायमूर्तीला दोनहि कम्पू पुढे हात जोडून, इतर वाजवी कामाकडे नजर वळविण्याचा प्रसंग आल्याशिवाय राहणार नाही.

धोक्याची सूचना

मुंबई पुण्याच्या बाजूला माजलेल्या जाधवीमुळे सबंध मुंबई इलाख्यातल्या आणि वऱ्हाड खानदेश मध्यप्रान्तातल्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यानी निष्कारण बावचळून जाण्यात काही अर्थ नाही. या जाधवीत बहुजनसमाजाच्या हिताहिताचा कसलाहि मुद्दा नसून, तिचा सर्व डोलारा वैयक्तिक मत्सराच्या पायावर उभारलेला आहे. मगरूर आणि शिरजोर बनलेल्या अयाचित झब्बूंची ही आपापसातील क्षुद्र लठ्ठालठ्ठी आहे. आज जेधे-जवळकर किंवा जेधे-जाधवराव कम्पू एकमेकांच्या उरावर बसत असल्याचा बहाणा करीत असले, तरी ते सजातीय मराठेच असल्यामुळे, केव्हा ना केव्हा एकत्र होतील आणि चालू जाधवीच्या दंगलीत वैयक्तिक सूडाच्या महत्वाकांक्षेने या नाहीतर त्या कम्पूच्या निशाणाखाली नाचणाऱ्या नाचऱ्या मराठेतराना नासक्या सुपारीप्रमाणे बाजूला पडण्याचा प्रसंग येईल, याची त्यानी खूणगाठ बांधून ठेवावी, अशी धोक्याची सूचना आम्ही आताच देऊन ठेवतो. इतर प्रान्तीय ब्राम्हणेतर चळवळीच्या पुढाऱ्यानी सुद्धा या जाधवीच्या आदिअंताचा निस्पृहपणे ठाव घेऊन, तिच्या उत्पत्तीला कारण झालेल्या पातकांपासून आपल्या चळवळीला अलिप्त ठेवण्याचा कसोशीचा प्रयत्न करावा, अशी आमची आग्रहाची विनंती आहे.

साहसे श्री वसति

हिन्दुस्थान परतंत्र. परिस्थिति प्रतिकूल. स्वदेशातल्या स्वदेशात हिन्दी आदमी निसर्गप्राप्त मिठाच्या खड्याला‍हि पारखा. राज्यहि परक्यांचे आणि व्यापारहि परक्यांच्याच हाती. अशा अवस्थेतहि श्रीच्या प्राप्तीसाठी साहसाचे अनेक लहान मोठे मार्ग अझून मोकळे आहेत. पण परिस्थितीच्या सहस्रमुखी दणक्यानी आम्हा मऱ्हाठ्यांची मनोवृत्ति इतकी हबकून महिरलेली आहे की साहस म्हणून काही चीज आहे, याची आम्हाला मुळी कल्पनाच उरलेली नाही. श्रीच्या प्राप्तीसाठी आम्ही तळमळतो, पण 'साहसे श्री वसति' ही मुख्य मुद्याची गोष्टच नेमकी आम्ही विसरतो. तरुणांच्या साहसाची भरारी फक्त युनिवर्सिटीच्या असतील नसतील तेवढ्या पदव्या पटकाविण्यात आणि अखेर कसल्या तरी पोटभरू नोकरीवर चिकटण्यापुरतीच आढळते. परप्रान्तांवर स्वाऱ्या शिकाऱ्यांचे साहस करून श्री संपादन करण्याचा मऱ्हाठ्यांचा पहिला इतिहाससिद्ध बाणा आज केवळ कादम्बरी होऊन बसला आहे. राजकारणी स्वाऱ्या शिकाऱ्यांचा मनु मागेच मेला असला तरी परप्रान्तांत वसाहती करून, आपल्या वैयक्तिक भाग्याची परासीमा गाठण्याचे साहसी मार्ग अनेक आहेत आणि अनेक मऱ्हाठेतर समाज

ते धडाडीने चोखाळीत असल्याचे आपण नित्य पाहात ऐकत आहोत. धोराजीचा बोऱ्हाजी सगळे हिन्दुस्थान काबीज करून, इजिप्त आफ्रिकेच्या कोनाकोपऱ्यातसुद्धा दुकान थाटून बसलेला आढळतो. जगातल्या प्रत्येक बंदरावर जसा थॉमस कुकचा एजण्ट हजर, तसा त्या ठिकाणी धाडसी पारशी बच्चाहि हजरच! कीर्द खतावणी पलीकडे विशेष विद्या नसलेले हजारो गुर्जरपुत्र आफ्रिकेभर व्यापाराची दलामल गेली कित्येक वर्षे करून, त्या त्या ठिकाणी स्थाईक होऊन बसले आहेत. गुजराथेची श्रीमन्ती केवळ स्थानिक गुजराथ्यांच्या व्यापारी उलाढाल्यांचीच आहे, असे नव्हे; तर तिची विशेष उज्वलता या परदेशी व्यापारी धाडसानेच टिकवून धरलेली आहे. मऱ्हाठ्यांमध्ये व्यापारी पिण्ड समाजशः नसला, तरी त्यांच्यात वसाहत प्रवृत्तीची धडाडी केव्हाहि नव्हती, असे कोण कबूल करील? महाराष्ट्राचा इतिहास म्हणजे मऱ्हाठ्यांच्या वसाहतीच्या साहसांचाच पुरावा नव्हे काय? महाराष्ट्र मऱ्हाठ्यांचा, असे आपण आज म्हणतो, पण मऱ्हाठे तरी महाराष्ट्रात एका काळचे वसाहतवालेच. महाराष्ट्राने मऱ्हाठे बनविले नसून, मऱ्हाठ्यानी महाराष्ट्राला (मऱ्हाष्ट्राला) जन्म दिलेला आहे. महाराष्ट्रामुळे मऱ्हाठे नसून, मऱ्हाठ्यांमुळेच महाराष्ट्र अस्तित्वात आला. देवगिरी पैठणकडच्या शेतकरी क्षत्रियानी मूळ देश सोडून वसाहतीचे धाडस केले, म्हणूनच त्याना मऱ्हाठी स्वराज्याची श्री बळकावता आली. परशुराम क्षेत्रातल्या कोकण्यानी कोकणाला राम राम ठोकून घाटमाथ्यावर वसाहतीचे साहस केले, म्हणूनच त्यांचा भाग्योदय झाला आणि म्हणूनच त्याना पेशवाई सत्तेचे वैभव लाभले. अशी अनेक उदाहरणे देता येतील. तात्पर्य, वसाहतीच्या साहसाला मऱ्हाठ्यांचा पिण्ड अगदीच पारखा नाही. मात्र, अनेक क्रान्त्यांच्या धसळामुसळीत हा पिण्ड बराच चेचला ठेचला गेल्यामुळे, साहसाच्या क्षेत्रात पाऊल टाकायला आजचा मऱ्हाठा बराच बाचकतो, हे कबूल करणे भाग आहे.

वसाहतीशिवाय भाग्योदय नाही

वसाहतीच्या साहसाला अमुक एक प्रकारची श्रुति-स्मृतिपुराणोक्त सबब आवश्यक आहे, असा कोठे नियम नाही. ध्येय उच्च असावे; परंतु उच्च असले काय, आणि मुळीच नसले काय, हा प्रश्न सुरुवातीला विचारात घेतला न घेतला सारखाच. मुख्य मुद्दा स्थलान्तराच्या साहसाचा होय. हे साहस नोकरी व्यापार एजण्टी अथवा नुसती भटकन्ती अशा वाटेल त्या सबबीवर करता येते. चालू काळचे सर्व जगाचे राजकारण वसाहतीच्या प्रश्नावरच विशेष डोके आपटीत असते. लोकसंख्येच्या वाढत्या व्यापाचा योगक्षेम कसा चालेल आणि त्यासाठी कोणत्या देशाचे भाग आपल्याला पादाक्रान्त करता येतील या स्थलान्तर-विवंचनेवरच चालू घडीचे राजकारण धडपडत आहे. स्थलान्तराची सबब कितीहि फोलकट व क्षुद्र असो, त्याची त्याला पर्वा नाही. पाऊल ठेवण्यापुरती जागा मिळाली ह्मणजे झाले. पुढचा कार्यभाग प्रत्येक वसाहत्या आपापल्या अकलेप्रमाणे बरावाईट पार पाडतो. स्थलान्तराच्या जोरावर वैयक्तिक व सामाजिक स्थित्यंतर घडवून आणण्यात तीनशेण्ड्या मारवाडी मऱ्हाठ्याच्या चांगला परिचयाचा आहे. मारवाड्याचे स्थलान्तर फुटक्या लोट्याच्या भाण्डवलावर होते; पण एखाद्या गावात अगर खेड्यात हा फुटका लोटा घुसला कीं पाचदहा वर्षात तो तेथल्या स्थायिक लोकांच्या हातात दिसतो आणि मारवाडी त्या गावचा नगरशेटी बनतो. 'महाराष्ट्र मऱ्हाठ्यांचा' ह्मणून आह्मी कितीहि मुल्कमैदानी वल्गना केल्या, तरी आमच्या नित्यनैमित्तिक जीवनाचे सर्व धागेदोरे एकजात परप्रांतीय वसाहतवालेच बळकावून बसले आहेत, हे कोणत्याहि गावच्या बाजारपेठेकडे सहज नजर टाकली असता दिसून

येईल. ना आमच्या हातात व्यापार राहिला, ना शेतकी राहिली. सर्वच बाबतीत जिणे परस्वाधीन झाल्यामुळे विद्यमान क्रान्तीच्या सागरमंथनात मऱ्हाठा गडी हतबुद्ध आणि हतप्रभ स्थितीत कवडीमोल होऊन बसला आहे. बेरोजगारीमुळे महत्वाकांक्षी तरूणांची हरएक क्षेत्रात मुस्कटदाबी होत आहे. परंतु स्थलान्तराच्या साहसाची कल्पना कोणालाच येत नाही. जो तो दैवाला देवाला आणि परिस्थितीला दोष देत, पोटाशी पाय आवळून स्वग्रामातल्या स्वग्रामात खितपत पडलेला आहे. हव्या त्या सबबीवर परदेशात घुसून त्याला आपल्या स्वयंनिर्णयाखाली अंकित करून टाकणाऱ्या महापराक्रमी ब्रिटीश जगद्गुरूंच्या साहसाचा नमुना आमच्या डोळ्यापुढे जागता ज्योत असताहि, 'स्थलान्तर-साहसे श्री वसति' या महत्त्वाच्या सिद्ध सूत्राकडे, एकवार वसाहत-साहसात गाजलेल्या, मऱ्हाठ्यांचे लक्ष्य जात नाही, हे एक मोठे आश्चर्य आहे. अशा स्थितीत ज्या अल्पसंख्य महाराष्ट्रीय मण्डळींनी स्थलान्तराचे धाडस केले आहे अशा मण्डळींच्या अभिनव जीवनक्रान्तीचा अनुकरणीय परिचय मऱ्हाठी तरूणांनी अगत्य करून घेतला पाहिजे. मऱ्हाठी मण्डळी - थोडथोडीच का होत ना - सर्व हिंदुस्थानभर विविध व्यवहाराच्या निमित्ताने अनेक मोठमोठ्या शहरी वसाहती करून राहिलेली आहेत. कित्येक व्यापारी, कित्येक सरकारी निमसरकारी अधिकारी आणि कित्येक फिरते गुमास्ते असे विविध व्यवसाय करून आपला चरितार्थ उत्तम रीतीने चालवीत आहेत. अशा वसाहतीमुळे स्थलान्तरित भिन्नजातीय अनेक महाराष्ट्रीय मंडळी कशा एकोप्याने आणि एकदिली सहकार्याने राहातात आणि 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' हे सूत्र अक्षरशः कसे अमलात आणतात हे प्रत्यक्ष दाखविण्याची संधि, कलकत्त्यास वसाहत करून राहिलेल्या मऱ्हाठा मंडळीनी यंदाच्या दिवाळीत महाराष्ट्र-वार्षिक नावाचा दिवाळी अंक प्रसिद्ध करून दिली आहे.

'महाराष्ट्र-वार्षिक'

परप्रान्तांत वसाहतीला गेलेल्या भगिनी बांधवानी आपल्या मायभूमीतील स्थायिक नातेवाईकाना दिवाळीच्या सणानिमित्त भेटीभवरी व नजराणे पाठविण्याचा प्रघात पुष्कळ आहे. परंतु या वार्षिकाने या प्रघाताला निराळेच अभिनन्दनीय वळण देण्यात आघाडी मारली आहे, आणि त्याचे श्रेय सम्पादक श्रीयुत केशवराव बाळकृष्ण वैद्य, बी. कॉम्. याना देणे रास्त आहे. प्रस्तुत वार्षिकाची कल्पनाच इतकी गोड आहे आणि त्याची रचना आणि माण्डणी इतक्या कुशलतेने साधली आहे कीं त्यापुढे दिवाळीची मामुली खाद्यपेये खात्रीने माजी ठरतील. भाग्योदयाच्या महत्वाकांक्षेने फुरफुरलेली आमची मऱ्हाठी मण्डळी महाराष्ट्र सोडून बाहेर पडली, त्यानी इतक्या वर्षांत 'किम कुर्वत?' या प्रश्नाला या महाराष्ट्र-वार्षिक संजयाने अति समर्पक व गोड उत्तर दिले आहे. या १५० पानी ग्रंथाच्या मुखपृष्ठावर अश्वारूढ शिवाजीची भव्य प्रतिमा मऱ्हाठ्यांच्या मऱ्हाठी बाण्याची ग्वाही देत आहे. आबालवृद्ध स्त्री पुरुषांचे ५५ लेख, ८ गृप फोटोग्राफ, ४ चित्रे, ४ नकाशे, कलकत्ता येथील ७ महाराष्ट्रीय संस्थांची माहिती, २ संस्थांचे अहवाल, महाराष्ट्राबाहेरील महाराष्ट्रीय संस्थांची यादी, आणि कलकत्त्यास वसाहत करून राहिलेल्या १०८ महाराष्ट्रीय बांधवांची नावे व पत्ते, इत्यादि तपशिलामुळे हा वार्षिक ग्रंथ अखिल महाराष्ट्राला कलकत्तेकर मऱ्हाठ्यानी दिलेल्या दिवाळीच्या चमचमीत मेजवानी सारखाच झाला आहे. लेखांची निवड चाणाक्षपणाची आहे. ८ वर्षाच्या मुलांमुलींपासून तो थेट डॉ. देवदत्त भाण्डारकरांपर्यंत, सर्व स्त्री पुरुषानी लिहिलेले निरनिराळ्या योग्य विषयांवरील लहान मोठे लेख वाचले ह्मणजे, ही

सर्व आमची कुटुंबीय मण्डळी आह्माला घरबसल्या भेटल्या इतकाच आनन्द होतो. बऱ्याच वर्षांनी भेटलेली लहान मोठी आप्तमण्डळी जशी आपापल्या परीने नवीन माहितीच्या, नवीन अनुभवाच्या गोष्टी सांगतात; आणि हितगुजाच्या बोलानी आपापल्या व्यवसायाची माहिती देतात; हीच कामगिरी या वार्षिकाने कौतुक करण्याइतकी बजावली आहे. कु. कमल, कुसुम आणि विमल फणसळकर या तीन छोट्या बहिणी; कुमार चंद्रशेखर पै, कुमार शरद दत्तात्रय मुल्हेरकर, कुमार भास्कर व रंगनाथ पै या मुलांची छोटेखानी गोड बडबड मधून मधून चालली आहे. सौ. गंगाबाई कत्री, सौ. शांताबाई सौकुर, सौ. ताराबाई मुलकी या तीन भगिनी कोकणी मराठीत गोष्टी सांगत आहेत. श्री. एस्. अनंतय्या 'नेलांथान्नु जांवच्या तेल्ला उत्पत्ती'वर तेलपुराणात रंगले आहेत. डॉ. भांडारकर 'बंगाली भाषेंतील महाराष्ट्र-पुराण' मोठ्या गांभीर्याने सांगत आहेत, तोच श्री. फणसळकर स्वानुभवाच्या जोरावर 'कोळशांच्या खाणी व तरुणांना उद्योग' दाखवीत आहेत. श्री. सोहनी अलीपूर वेधशाळेतील मनोरंजक माहिती देतात, तर दुसरीकडे एक ज्योतिषीबुवा 'इ.स. २०३० मधें काय स्थिती असेल?' याचे भाकीत वर्तवून ठेवतात. असे आमचे नाना व्यवसायी मऱ्हाठी भगिनी बांधव या वार्षिकाच्या तोण्डाने आम्हाला नाना प्रकारच्या अनुभवाच्या गोष्टी सांगून रंजवीत आहेत. कलकत्तेकर मऱ्हाठ्यांनी प्रस्तुत केलेला वार्षिकाचा उपक्रम इतर ठिकाणच्या वसाहत्या मऱ्हाठ्यांनी दर दिवाळीला अमलात आणल्यास स्थायिक आणि स्थलान्तरित मण्डळींचा स्नेहसंबंध दिवसेदिवस वाढत जाईल आणि अनेक स्थायिक मऱ्हाठ्यांना स्थलान्तराचे साहस करण्याची हिंमत येईल. महाराष्ट्र-वार्षिकाची किंमत फक्त १ रुपया असून तो ''महाराष्ट्र मण्डळ, ६१ अशुतोष मुकर्जी रोड, भवानीपूर, कलकत्ता'' येथून व्हीपीने मागवून प्रबोधनाच्या प्रत्येक वाचकाने अगत्य अध्ययनात आणावा, अशी आमची शिफारस आहे.

□□□

लेख

जबरदस्ताचा टिकाव

(लेखांक २ रा)

हिन्दुस्थानात आंग्रेज बहाद्दर

हिन्दुस्थानच्या व्यापारावर पोर्च्युगालात सोन्याचा धूर निघताना पाहून, ऐदी डच लोकांच्या तागड्या व तंगड्या फुरफुरल्या; मग राजकारणी पिण्डाचे आणि दर्यावरील चांचेगिरीत अग्रमान पावलेले, प्राचीन 'सी-किंग-रॉबर्स'चे वंशज आंग्रेज बहाद्दर स्वस्थ कसे बसणार? पण त्याना पोर्च्युगीजानी शोधून काढलेला जलमार्ग काही केल्या ठमगे ना; आणि हिन्दी व्यापाराची लिस्बनच्या पेठेत चाललेली चलती त्याना पहावे ना. ज्या इंग्रेजांची दर्यावरील लुटारूपणाची आणि धाडशी नाविकपणाची कीर्ती उभ्या युरपखंडाला भेदरवीत होती, त्या इंग्रेजाना काय हिन्दुस्थानाला जाण्याचा जलमार्ग गवसू नये? बडी शरमकी बात!

अखेर या शरमेची तिडीक ब्रिस्टल गावच्या रॉबर्ट थोर्न (Robert Thorne) नावाच्या व्यापाऱ्याच्या मस्तकात उठली. हा ब्रिस्टलचा मेयर असून मोठा व्यापारी होता. इंग्लंडचा राजा ८ वा हेनरी याजकडे 'हिन्दुस्थानला जाण्याचा जलमार्ग वायव्य दिशेने शोधण्याची खटपट' करण्याबद्दल रॉबर्ट थोर्नने अर्ज दाखल केला. इंग्लंण्डचा आणि हिन्दुस्थानचा इतिहास अध्ययन करणारानी ब्रिस्टलचे महत्व डावलून केव्हाहि भागणार नाही. पूर्व आणि पश्चिमेचा संबंध जुळवून, हिन्दुस्थानाच्या दैवाचा दुव्वा इंग्लंडच्या राष्ट्रीय इच्छेच्या साखळीत अडकविण्याच्या कल्पनेची जन्मभूमी ह्मणून ब्रिस्टलला कसे विसरून चालेल? हिन्दुस्थानला जाण्याचा आंग्रेजी जलमार्ग शोधण्याबद्दलचा अर्ज येथेच लिहून इंग्लंडच्या राजाकडे रवाना झाला. जलमार्ग शोधल्यानंतर हिन्दुस्थानात व्यापारी बस्तान बसविण्याची कल्पना ब्रिस्टलच्याच व्यापाऱ्यांची. योगायोगाचा चमत्कार म्हणजे हिन्दुस्थानचा पहिला अभिनव विवेकवादी मुत्सद्दी राजा राममोहन राय याच्या प्रातःस्मरणीय अस्थि ब्रिस्टल येथेच एका प्रशस्त समाधीखाली शांति घेत आहेत. पुढे मागे सुशिक्षित हिन्दी लोकांचे एक जत्रास्थान होण्याइतका ब्रिस्टलचा स्थानमहिमा खास आहे, यात संशय नाही.

वायव्य दिशेने हिन्दुस्थानचा जलमार्ग शोधण्याच्या खटपटी इंग्रेज नाविकानी अर्धशतकभर केल्या.

पण त्या सर्व फुकट गेल्या. हिन्दुस्थानाचा पत्ता त्याना लागला नाही. अखेर १५७८ साली पोर्च्युगीजांचे एक जहाज हिन्दी माल घेऊन लिस्बनला येत होते. इंग्रेजांचा सुप्रसिद्ध दर्याबहाद्दर सर फ्रान्सिस ड्रेक याने त्या व्यापारी जहाजावर (कोणत्याही प्रकारची आगळीक नसताना) अचानक हल्ला चढवून ते लुटले.* या लुटीत केप ऑफ गुड होपच्या मार्गाने हिन्दुस्थानच्या जलमार्गाचे ताळेबंद नकाशे त्याच्या हस्तगत झाले. त्या नकाशांच्या सहायाने सन १५९४ मध्ये सर जॉन लँकॅस्टर केप ऑफ गुड होपला वळसा घालून, जावा बेटाला पोहचला. पौर्वात्य देशांशी व्यापार करण्यासाठी तयार झालेल्या इंग्रेजी व्यापारी संघाला सन १६०० मध्ये एलीझाबेथ राणीने सनद दिली. तिचा मथळा "To the Governors and company of merchants of London, trading with the East Indies" असा होता.

इंग्लण्डच्या एलिझाबेथ राणीने पौर्वात्य हिन्दुस्थानाशी व्यापार करण्याची सनद ज्या इंग्रेजी व्यापारी संघाला दिली, त्याचे पहिले नाव Society of Adventurers - धाडशी लोकांची टोळी असे होते. ईस्ट इण्डिया कंपनी हे गोंडस नाव मागाहून देण्यात आले. या धाडशी लोकांच्या संघाच्या डायरेक्टरानी भवति न भवति करून, "not toemploy any gentleman in any place of charge." (जबाबदारीच्या कोणत्याहि जागेवर सभ्य माणूस कधी चुकून सुद्धा नेमावयाचा नाही) असा ठराव केला होता. याचे कारण स्पष्टच आहे. 'संघाच्या कारभारावर जे लोक नेमायचे ते आपल्याच धाडशी मातीचे (quality) असल्याबद्दल नीट खबरदारी घेतली पाहिजे. नाहीतर आपल्या धाडश्यांच्या टोळीत सभ्यांची सभ्य ढवळाढवळ सुरू झाल्याचा कोणाला संशय आला, तर धाडशी भांडवलवाले आपला हात आखडता घेतील, अगर टोळीच सोडून जातील.'** ईस्ट इंडिया कंपनीच्या घटनेतील या मूळ मख्खीचा आजपर्यंत फारसा कोणी विचार केलेला दिसत नाही. त्यामुळे या बनिया कंपनीचा एकंदर कारभार व कारवाया कसकशा धोरणांच्या झाल्या असतील, याविषयी हिन्दुस्थानात तरी बरेच अज्ञान राहिलेले आहे. ईस्ट इण्डिया कंपनीच्या हिन्दी कारभाराच्या शेवटच्या घटकेपर्यंत, जेवढे म्हणून लहान मोठे कारभारी होऊन गेले, तेवढे सारे एकजात मूळ उत्पादकांच्या मातीचे म्हणजे धाडशीच होते. ज्याला जण्टलमन् म्हणून म्हणता येईल, असा क्वचितच. धाडशी म्हटला कीं त्याला धाडसा पलीकडे सत्यासत्याची आणि नीतिमत्तेची मुळीच चाड नसायची; आणि त्याचे शिक्षण वगैरे संस्कृति अकटोबिकटो असली, तरी चालते. अचाट बुद्धी चालवावी आणि बळेच लक्ष्मी मिळवावी, एवढाच त्याचा धर्म आणि इतकाच त्याचा देव! सारांश, औषधालाहि सभ्य गृहस्थ आपल्या संघात नसावा अशा कराराने व्यापारी आणि राजकारणी साट्यालोट्यात हिन्दुस्थान पादाक्रांत करणारी ईस्ट इंडिया कंपनी म्हणजे 'धाडश्यांची

---

* Every thing is fair in love and war (प्रेमाच्या आणि युद्धाच्या बाबतीत वाटेल ते कर्म सोवळे ठरते.) असे एक इंग्रेजी नीतीचे सूत्र आहे. पण प्रेमाचे लव्हाळे किंवा युद्धाचे सोहाळे यांचा तिळमात्रहि मागमूस नसताना, या शांतिप्रिय व्यापारी जहाजावरचा ड्रेकचा (unprovoked) बिन आगळीकीचा हल्लासुद्धा इंग्रेज इतिहासकारांच्या स्तुतीला पात्र झाला. यावरून इंग्रेजी नीती म्हणजे एक (bottomless pit) बिनबुडाचा खळगाच म्हटली पाहिजे.

** "that they might be allowed to sort their business with men of their own quality, lest the suspicion of the employment of gentlemen being taking hold upon by the generalitic, do dryve a greate number of Adventurers to withdraw their contributions. " [Minutes, 3rd October 1690, quoted in Bruce's Aunals of the Hon'ble East India Company, Vol. 1. p. 128.]

टोळी.'+

हिन्दुस्थानच्या जमिनीवर पहिले पाऊल ठेवणारा इंग्रेज प्राणी म्हणजे कॅपटन हॉकिन्स (Captain Hawkins) हा होय. हेक्टर (Hector) नावाच्या जहाजातून हा इंग्लंडातून निघाला आणि सन १६०८ साली सुरत बंदरात येऊन दाखल झाला. इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याने 'थोर मोगल बादशहा'ला लिहिलेले पत्र हॉकिन्सने बरोबर आणले होते. सुरतेहून तो आग्र्याला गेला आणि 'थोर मोगल बादशहा' जहांगीर याची त्याने मुलाखत घेतली. जहांगीरने जेम्सच्या खलीत्याचा आदर करून, हॉकिन्सचेहि आदरातिथ्य मोठ्या थाटाने केले. इतकेच नव्हे तर जहांगीरने एका क्रिस्ती आर्मिनियन तरुणीने हॉकिन्सला विवाहदान केले. हॉकिन्स आग्र्याला फार दिवस टिकला नाही. कारण तेथे आधीच जेठा मारून बसलेल्या पोर्च्युगीज जेसुऐट पाद्र्यांनी त्याच्या विरुद्ध पुष्कळ कारस्थाने उभारली. ह्मणून तो सुरतेला परत आला. येथेसुद्धा पोर्च्युगीजांचीच सत्ता असल्यामुळे, तिला पायबंद लावण्यासाठी त्याने स्वदेशात जंतरमंतर रवाना केले. त्याप्रमाणे सन १६१२ त कॅपटन थॉमस बेस्ट चार लढाऊ जहाजे घेऊन सुरतेला आला, पोर्च्युगीज काफिल्यावर एकदम हल्ला चढवून त्यांचे आरमार पाडाव केले आणि सुरतेवर इंग्रेजी बावटा लावला. इंग्रेजानी पोर्च्युगीजाना सुरतेतून पिटाळून लावल्यामुळे, पौर्वात्य देशांत इंग्रेजांच्या राष्ट्रीय दर्जाचा दरारा चांगलाच लोकविश्रुत झाला.

६ फेब्रुवारी १६१३ रोजी जहांगीर बादशाहा आणि इंग्रेज बनिये यांच्यात तहनामा होऊन, सुरतेच्या वखारीची परवानगी आणि मोगल दरबारात वकील ठेवण्याची सवलत मिळाली. त्या अन्वये सर थॉमस रो हा पहिला इंग्रेजी वकील दरबारात दाखल झाला. यानेच इंग्लंड-हिन्दुस्थान व्यापाराचा पाया घातला.

दीर्घदृष्टी आणि दीर्घधोरणी इंग्रेज बनियाना एवढा चंचुप्रवेश मिळताच, त्याना मुसळप्रवेशाचे धाडस फारसे कठीण गेले नाही. हिन्दुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर महत्वाच्या अनेक ठिकाणी त्यानी आपल्या वखारी चालू केल्या. सन १६२८ त तर मद्रासच्या उत्तरेला ७० मैलांवर आर्मेगाव येथेसुद्धा एक वखार ठोकून, पूर्व किनाऱ्यावरील हालचालीचा मार्ग पायदाब केला. सन १६४० त कलकत्त्याच्या वखारीचाहि परवानगी मिळाली. या पूर्वी बंगालचा सगळा व्यापार पोर्च्युगीज बनियांच्या हाती होता. परंतु, त्यानी गुलामांचा व्यापार चालविल्यामुळे आणि बंगालचा नबाब आणि त्याचे अधिकारी यांच्याशी गुर्मीचे वर्तन केल्यामुळे, शहाजहान बादशाहा त्यांच्यावर फार खवळला होता. पोर्च्युगीजांच्या वाढत्या उर्मटपणाला आळा घालण्यासाठी त्याने आपले सैन्य पाठवून, त्यांची दाणादाण उडवून दिली, हुगळीची वसाहत उध्वस्त केली, त्यांची जहाजे जाळून पोळून फस्त केली आणि शेकडो पोर्च्युगीज कैद करून आग्र्याच्या

+ धाडश्यांच्या टोळीने कमाविलेले हिन्दुस्थानचे राज्य १८५८ साली महाराणी विकटोरियाने आपल्या कृपाछत्राखाली घेऊन, त्याचा कारभार पार्लमेण्टाकडे सुपूर्द केला. पार्लमेण्टात हाऊस ऑफ कॉमन्स आणि हाऊस ऑफ लॉर्ड्स अशा दोन बरगड्या आहेत. त्यांच्या फासळ्यात हिन्दुस्थानचे राज्यनियंत्रण लटकत असते. अर्थात् पार्लमेण्ट म्हणजे आम्हा हिन्दी लोकाना देवांचे देवघर वाटत असल्यास नवल नाही. परंतु परवा (आगष्ट १९२६) हौस ऑफ कॉमन्समध्ये इंग्लंडातील दगडी कोळशेवाल्यांच्या संपाबद्दल वादविवाद झाला, तेव्हा मजूरपक्षाचे पुढारी बाचाबाचीत चिडून म्हणाले कीं 'ही पार्लमेण्ट म्हणजे अ gang of merderers - खुनी लोकांची टोळी आहे.' हिन्दुस्थानचे राज्य कमविणारी 'धाडश्यांची टोळी' आणि सध्या राज्य चालविणारी 'खुनी लोकांची टोळी'! खासा कारभार! ही दोनहि नावे खुद्द इंग्रेजी गोऱ्या ओठांतूनच बाहेर पडली ह्मणून ठीक. एरवी जर का त्याना चुटपुटता काळ्या ओठांचा विटाळ लागता, तर त्याना वासुदेव बळवंतीचेच प्रायश्चित मिळते! कारण, गोरे हे सत्ताधीश आहेत आणि काळे सत्ताधीन आहेत.

- प्रबोधन मासिक (वर्ष ५, अंक २ रा, ऑगष्ट १९२६)

तुरुंगात डांबून टाकले. अशा रीतीने, सुंठीशिवाय खोकला जावा तसा, हा पोर्च्युगीजांचा काटा अनायासे दूर झाल्यामुळे, बंगाली व्यापारात डोके आणि हात खुपसायला इंग्रेजाना आयतीच संधी सापडली. त्यानी बादशाहाला अर्ज पाठविला व परवानगी मिळविली. परंतु, जकात जबरदस्त आणि जहाजे हुगळीपर्यंत न आणता, केडगिरी नजीकच्या पिपली बंदरातच ओरवा करण्याच्या परवानगीमुळे, त्यांची बरीच कुचंबणा होऊ लागली. हवे तसे हात पाय ताणता येईनात. परंतु साखरेचा खाणार, त्याला देव देणार!

सन १६४० मध्ये शहाजहान बादशाहाच्या राजवाड्यात एक भयंकर अपघात झाला. त्याची अत्यंत लाडकी राजकन्या वस्त्रे पेटून भाजली गेली. दरबारी हकीम आणि नस्तरवाले यानी शेकडो उपाय करून हात टेकले. बादशाहाने सुरतेच्या इंग्रेज बनियांकडे एकादा हुशार गोरा डाकटर ताबडतोब पाठविण्याबद्दल जासूद धाडला. त्यानी गाब्रियल बोटन (Mr. Gabriel Boughton) नावाचा मनुष्य पाठवला. त्याने फार कुशलतेने राजकन्येच्या जखमा उत्तम बऱ्या केल्या. जळीताचे डागसुद्धा शरीरावर दिसत नाहीसे केले. शहाजहान बादशाहा बेहद्द खूष झाला. तुमच्या परिश्रमाबद्दल मी काय पारितोषिक देऊ, ते सांगा, असा त्याने बोटनला सवाल टाकताच, त्या राष्ट्राभिमानी इंग्रेजाने येणे प्रमाणे मागणीची विनंती केली. (१) ईस्ट इंडिया कंपनीला जकातीशिवाय सर्व बंगालभर व्यापाराची, (२) ठिकठिकाणी वखारी स्थापन करण्याची, आणि (३) आमची गलबते हुगळी नदीच्या बंदरांपर्यंत आणण्याची परवानगी असावी. बादशाहाने ताबडतोब या सवलतींचे फर्मान बोटनच्या हवाली केले.

या एकाच गोष्टीवरून इंग्रेज क्रिस्त्यांचा राष्ट्राभिमान किती उज्वल आणि त्यांच्या हाडीमासी पिण्डात रसरसत असतो, याचे वाचकांना छान प्रत्यंतर पटेल. बोटनने वाटेल ती संपत्ति मागितली असती, तरी शहाजहानने तिचा त्याच्यावर नुसता मुसळधार वर्षाव केला असता. पण त्या राष्ट्राभिमानी इंग्रेजाने तसे काही न करता, अथवा स्वार्थाचाहि प्रश्न विचारात लवमात्र येऊ न देता, वरील मागण्या मागण्यात इंग्लंड राष्ट्राची केवढी भरीव सेवा केली, याचा प्रत्येक हिन्दी मनुष्याने विचार करावा. वरहि वरायास पाहिजे समज ही मोरोपंतोक्ती या ठिकाणी अक्षरशः प्रत्ययाला येते.

बादशाहाचे फर्मान घेऊन गाब्रियल बोटन तसाच तडक बंगाल्यात राजमहाल येथे गेला. शहाजहानचा दुसरा पुत्र शहाशुजा हा येथे बंगालचा व्हाईसरॉय नात्याने कारभार पहात होता. त्याला बोटनने बादशाही फर्मान नेऊन दाखविले. या वेळी शहाशुजाची एक राणी अत्यवस्थ आजारी पडलेली होती. बोटनने तिलाहि औषधोपचार करून बरी केली. प्रत्युपकार म्हणून शहाशुजाने फर्मानातील कलमे, सुव्यवस्थित आणि कायमच्या पायावर अंमलात आणण्यासाठी, हवी ती मदत कंपनीला देण्याचे आश्वासन दिले. अशा रीतीने बोटन वैदुबुवांच्या मलमपट्ट्यांच्या आणि विलायती टिंचरांच्या पुण्याईने बनिया कंपनीच्या तागडीला साऱ्या बंगालचे आंगण हवे तसे खेळाखिदळायला मोकळे झाले.

पश्चिम किनाऱ्यावर असाच एक योगायोग जुळून आला. सन १६६१ त इंग्लंडचा राजा २ रा चार्लस याचे लग्न पोर्च्युगीज राजकन्या कॅथराईन ऑफ ब्रॅगान्झा हिच्याशी झाले. या राजविवाहानिमित्त पोर्च्युगाल देशाने जावईबुवाना मुंबई बेट आंदण दिले. सन १६८८ त ते बेट ईस्ट इंडिया कंपनीला विकण्यात आले. आंग्रेज बनियांची तागडी मुंबईत घुसल्यापासून, मुंबई म्हणजे भरतखंडीय लंडन बनले आहे.

हिन्दुस्थानच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यांवर आंग्रेजी बनिया कंपनीला आपले हातपाय सताड पसरण्याची सोय झाल्यामुळे, त्यांच्या व्यापाराची कल्पनातीत भरभराट झाली. कंपनीतल्या लहान

मोठ्या हरएक कामगाराने इतका पैसा मलयी म्हणून मटकावला कीं त्यांच्या पुढच्या शंभर पिढ्याना दारिद्र्य ही चीज स्वप्नात सुद्धा दिसू नये. मग खुद्द कंपनीची व्यापारी किफायत इंग्लंडांत सोन्याच्या धुराचे किती अलोट लोट पाडीत असेल, याची कल्पनाच केलेली बरी. या घटकेपर्यंत हिन्दुस्थानात राजकीय सत्ता स्थापन करण्याची कल्पना या धोरणी आंग्रेज क्रिस्त्यांच्या डोक्यात उद्भवलेली नव्हती. मोगल दरबारातला त्यांचा वकील सर थॉमस रो हा चांगला समंजस आणि विवेकी माणूस होता. त्याने कंपनीच्या कारभाऱ्याना सक्त उपदेश केला होता कीं ''तुम्हाला पैसाच कमवायचा असेल तर दर्यावर्दीपणाने आणि शांततेच्या व्यापाराने हवा तेवढा मिळवा. इतर कसल्याहि भानगडीत पडू नका. हिन्दुस्थानात राहायचे तर काटकसरीने आणि शुद्ध व्यापारी पेषाने रहा. येथे आपापल्या बायका सुद्धा ठेऊ नका; त्यांची स्वदेशी रवानगी करा.'' रोचा हा सात्विक उपदेश कंपनीच्या कारभाऱ्यानी प्रथम काही दिवस पाळला. परंतु ३ एप्रिल १६६१ रोजी इंग्लंडच्या कटिशुळ्या आणि छंगीफंगी २ ऱ्या चार्लस राजाने आंग्रेजी बनिया कंपनीला वाटेल त्या अ-क्रिस्ती राजाशी अगर लोकांशी तह किंवा युद्ध करण्याच्या राजकीय सत्तेचा परवाना दिला. या परवान्याच्या मुळांशी कंपनीचे इंग्लंडातले धाडसी डायरेक्टरांची हिंदुस्थानी सोन्याने डोळे उरफटवणारी काही तरी कारवायी असली पाहिजे खास. या परवान्याने क्रिस्ती आणि अ-क्रिस्ती अशा भेदाची जी ठळक रेषा काढली, ती लक्ष्यात ठेवण्यासारखी आहे. अ-क्रिस्ती लोक येशू आणि बायबलावर विश्वास न ठेवणारे; ह्मणून त्या नीच लोकांच्या हक्कांचा मालमत्तेचा अथवा व्यक्तीचा कसलाहि मुलाजा क्रिस्ती गोऱ्यांनी केव्हांहि ठेऊ नये, हे या भेदरेषेचे रहस्य होते; आणि पुढील इतिहास पाहता येशूच्या आंग्रेजी भगतानी या रहस्याचा अंमल अ-क्रिस्ती भरतखंडावर सोळा आणे गाजवून घेतला!

तथापि, हिन्दुस्थानचे सार्वभौमत्व पटकविण्याची आद्य कल्पना इंग्रेजांची नव्हे. 'युरपियन लोकानी हिन्दी राजांच्या सत्तेखाली काय म्हणून दिवस कंठावे?' अशा प्रकारच्या अभिप्रायाची पहिली धुसफुशी सलामी फ्रेंचानी दिली. हिन्दुस्थान जिंकण्यापूर्वी दोन महत्वाच्या गोष्टींचा शोध प्रथम फ्रेंचानीच लावला. (१) युरपियन लष्कराच्या कदरबाज शिस्तीपुढे हिन्दी सैन्य तेव्हाच लेंड्या गाळते; आणि (२) युरपियनांच्या सैन्यात दाखल झालेले हिन्दी शिपायी या लष्करी शिस्तीत तेव्हाच वाकबगार होतात. पैकी १ ल्या सूत्राचा प्रयोग सन १७४६ साली फ्रेंचानी करून पाहिला. त्यानी अवघ्या १२०० सोजरांच्या फलटणीने कर्नाटकच्या नबाबाच्या सगळ्या सैन्याची ससेहोलपट केली.

फ्रेंच सरदार डुप्लीच्या भारतीय उलाढाल्या पाहूनच, हिंदी राजे आणि रयत यांच्यावर सार्वभौमत्व गाजविण्याची स्फूर्ति आंग्रेज बनिया बहाद्दराना झाली. डुप्ली याच धोरणाने चालला होता; पण त्याचे जातभाई त्याला नडले. ईस्ट इंडिया कंपनीने मात्र डुप्लीच्या धोरणाचा नकाशा आपल्यापुढे ठेऊन, त्यातला तपशील आस्थेने आणि निश्चयाने चोखाळण्याचा चंग बांधला. या कामाचे धूरीणत्व रॉबर्ट क्लॉईव या 'धाडशी' आंग्रेज तरुणाने आपल्या हाती घेतले. त्याने फ्रेंचांच्या प्रतिकारांची पर्वा केली नाही. शांतिसूक्ताचा आंग्ल मंत्र जिभेवर सदैव खेळता ठेऊन तो म्हणत असे कीं ''जोंपर्यंत एक सशस्त्र फ्रेंच शिपायी या दख्खनच्या भूमीवर उभा आहे, तोंपर्यंत दख्खनला शांति लाभणार नाही.'' जणू काय सारी दख्खन शांतीसाठी जीव टाकीत होती आणि या इंग्रेज शांतिमहात्म्यांच्या मध्यस्तीसाठी सुजून बसली होती! आंग्रेज बनियांच्या शांति-सूक्ताची परवड थेट रॉबर्ट क्लैवच्या जिभेपर्यंत जाऊन

भिडलेली आहे! एनकेन प्रकारेण फ्रेंचांचा काटा निघाल्यावरच 'धाडसी' क्लैव आणि बनिया कंपनीच्या उलाढालींच्या तंगड्या त्यांच्या तागड्याबरोबर सैरावैरा बोकाळू लागल्या.

हिन्दुस्थानात फ्रेंच

हिन्दुस्थानच्या व्यापाराने आपल्या देशाच्या घरावर सोन्याची कौले घालण्याच्या महत्वाकांक्षेने जी चार 'धाडसी' युरपियन राष्ट्रे इकडे धावली, त्यांत फ्रेंच लोक शेवटले. सन १६६४ त फ्रेंच दिवाण कोलबर्ट (Colbert) याने ''Compagnie des Indes'' नावाची एक फ्रेंच बनिया कंपनी उभारली. फ्रेंच नृपति १४ वा लुई याचे मन वळवून त्याने या कंपनीला पुष्कळ हक्क अधिकार आणि सवलती मिळवून दिल्या. ५० वर्षेपर्यंत हिन्दुस्थानच्या व्यापाराचा एकतंत्री (exclusive) अधिकार; सर्व प्रकारची जकात माफ आणि पहिली दहा वर्षे होईल तो तोटा सरकार भरणार; अशा त्या सवलती होत्या. १६६८ त फ्रेंचानी सुरतेला वखार उघडली. दुसऱ्या वर्षी मच्छलीपट्टणला सुरू केली. १६७४ त (म्हणजे शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या धामधुमीत) फ्रांकोइ मार्टिन (Francois martin) ने पाँडीचरी येथे वसाहत करून वखार चालू केली. मार्टीन १७०६ त मृत्यु होईपर्यंत पांडीचरीलाच राहत असे. हा मोठा दिलदार आणि उमद्या स्वभावाचा होता. सर्वांशी लीनतेने वागत असल्यामुळे, त्याने अनेक हिन्दी राजांशी जानीदोस्ती जमविलेली होती. याच्या मृत्यूनंतर डॉ. लेनॉइर (Dr. Lenoir) आला आणि त्याने मार्टीनचे सलोख्याचे धोरण पुढे चालविले. याच्या मागून मंश्शियर डुमा (M. Dumas) आला. याने पांडीचरीची सुधारणा करण्यात मनस्वी परिश्रम केले. इतके कीं जो कोणी हिन्दी राजा पांडीचरीला भेट देऊन जाई, त्याला पांडीचरी सोडून जाऊच नये असे वाटे. आज हिन्दी राजाना जसे आणि जितके पारीसचे वेड आहे, तसे आणि तितके वेड पांडीचरीने अनेक हिन्दी राजाना लावले होते. डुमाने कर्नाटकचा सुप्रसिद्ध नबाब दोस्त अल्लीखान याची जानीदोस्ती संपादन केली होती. हिन्दुस्थानात फ्रेंच राज्यसत्ता स्थापन करण्याचा मूळमंत्र डुमाचा. त्याच्या मागून आलेल्या डुप्लीने तो आचारात वठविण्याचा प्रयत्न केला. या वेळी मऱ्हाठे कर्नाटकासाठी दोस्त अल्लीशी भांडत होते. डुमाने दोस्त अल्ली आणि त्याचा जावई चंदासाहेब यांचा पक्ष घेतला. दोघांच्या भांडणात पडताना, स्वतःचे घर नीट बंदोबस्तात ठेवायला डुमा विसरला नाही. त्याने पांडीचरीची तटबंदी भक्कम करून, त्याने १२०० गोरे सैन्य आणि ४ ते ५००० काळे देशी सैन्य (यालाच शिपाई फलटण असे नाव मिळाले) उभे केले. हे सर्व सैन्य युरपियन कवाईतीत तरबेज करून युरपियन शस्त्रास्त्रानी सज्ज होते. डुमाच्या या कदरबाज तयारीपुढे दोस्त अल्लीकडून कर्नाटक घेण्याच्या कर्नाटकच्या स्वारीत मऱ्हाठ्यानी माघार खाल्ली. मऱ्हाठे म्हणजे त्या वेळी दिल्लीच्या मोगल बादशाहीला कर्दनकाळ बुजगावणे होऊन बसले होते. अशा मऱ्हाठ्यांचा फ्रेंच डुमाच्या सैन्याने धुव्वा उडविल्याची बातमी दिल्लीला गेली, त्या वेळी तैमूरलंगाच्या त्या शेळपट वंशजाने आनंदाने टाळ्या पिटल्या. त्याने ताबडतोब डुमाला नबाब ही पदवी आणि २००० स्वारांची मनसब पाठवून दिली. इतकेच नव्हे तर मोगल दरबारचा अधिकारी म्हणून डुमाला मान्यता मिळाली.

सन १७४१ च्या आकटोबरात डुमा स्वदेशी गेला आणि त्याच्या जागी जोसेफ फ्रांकोय डुप्ली (Joseph Francois Dupleix) याची पांडीचरीचा गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली. डुप्ली हा मोठा बुद्धिवान आणि अमर्याद महत्वाकांक्षेचा मनुष्य होता. नेपोलियनप्रमाणे लोकनायकाचे गुण त्याच्या

आंगी जन्मजातच होते. हिन्दुस्थानात क्रिस्ती साम्राज्य स्थापन करण्यासाठी धडपडणारा हाच पहिला युरपियन. डुपलीच्या अचाट बुद्धिप्रभावाचा त्याच्या स्वदेशबांधवात जर निष्कारण मत्सर व द्वेष उत्पन्न झाला नसता, तर डुपलीने हिन्दुस्थानात फ्रेंच सार्वभौमत्व खात्रीने स्थापन केले असते, याबद्दल बहुतेक इतिहासकारांची एकवाक्यता आहे. हिन्दुस्थान पादाक्रांत करण्याचे डुपलीचे डावपेच फ्रान्स राष्ट्राला मुळीच पसंत नव्हते. आपले फ्रेंच साम्राज्य शांतिपूर्ण असावे, त्यात निष्कारण वा सकारण युद्धाचे प्रसंग नसावे, ही फ्रान्सची पॉलिसी होती.

डुपलीने पांडीचरीचा कारभार हाती घेताच मोगल दरबारचा नबाब म्हणून आपली द्वाही फिरवली. थोड्याच दिवसात युरपमध्ये इंग्लंड आणि फ्रान्स या दोन देशांत युद्ध जुंपले. तेव्हा हिन्दुस्थानातहि आपल्या राष्ट्राच्या वतीने इंग्रेजांवर हल्ला करण्याची डुपलीने तयारी केली. गेली शंभर वर्षे इंग्रेज बनिये मद्रासला तळ देऊन बसले होते आणि तेथे त्यांचे व्यापारी बास्तान जबरदस्त होते. या प्रतिस्पर्ध्यांना येथून कायमचे उखडून, मद्रास काबीज करण्यासाठी, डुपलीने ताबडतोब लॉ बरडोनी (La Bourdonnais) नावाच्या फ्रेंच दर्याबहाद्दराला मद्रासवर जहाजे घेऊन जाण्याचा हुकूम फर्मावला. ला बरडोनीने मद्रासवर हल्ला करून फारच थोड्या श्रमाने त्याचा पाडाव केला व इंग्रेजाना पिटाळून लावले.

डुपली आणि ला बरडोनी यांचे फारसे सख्य नव्हते. किंबहुना ते एकमेकांचे हाडवैरी होते. आपल्या चढाईच्या धोरणाचा अनवरुद्दीन (कर्नाटकचा नबाब) ला संशय येत असावा, अशी डुपलीला शंका आली. म्हणून त्याने नबाबाला असे कळविले कीं, सर्व तटबंदी पाडून मद्रास तुमच्या स्वाधीन करण्याची माझी इच्छा आहे पण इकडे ला बरडोनी भलतेच त्रांगडे करून बसला. त्याने डुपलीला न विचारता इंग्रेजांपासून ६ लाख रुपयाची (४० हजार पौंड) खंडणी स्वतःच हबकून, मद्रास इंग्रेजांच्या परत हवाली करून, तो आपले आरमारासह परत फिरला. फ्रेंचानी मद्रासच्या बाबतीत केवळ थापबाजी करून आपल्याला फसविले, म्हणून अनवरुद्दीन चिडला आणि त्याने मद्रासवर स्वतः हल्ला चढविला. परंतु डुपलीच्या सुधारलेल्या युरपियन तोफखान्यापुढे या देशी नबाबाची काय डाळ शिजणार? ता. ४ नवंबर १७४६ रोजी डुपलीने नबाबाच्या हल्ल्याची दाणादाण उडवून दिली; आणि मद्रासवर फ्रेंचांचा बावटा चढविला. आता मात्र डुपलीने आपला बनियेगिरीचा मुखवटा पार फेकून देऊन, आपले खरे राजकारणी स्वरूप प्रगट केले. डुपलीचा हाडफोड्या मार खाऊन चिडलेल्या नबाबाने आपला हेतू साधण्यासाठी इंग्रेजांच्या गळ्यात दोस्तीची मिठी मारली. सन १७४८ त ॲडमिरल बॉस्कोवेन (Boscowen) च्या नेतृत्वाखाली इंग्रेजानी पांडीचरीवर हल्ला केला. डुपलीने तोहि सफाईत परतवून विजय मिळविला. युरपात फ्रान्स-इंग्लंडचे युद्ध सुरू असताना, हिन्दुस्थानात फ्रेंच सैन्याने इंग्रेजी सैन्याचा ससेहोलपटी पराभव केल्यामुळे, डुपलीचा आनंद गगनात मावेना. त्याने या फ्रेंच विजयाचे संदेश सर्वश्रुत करण्यासाठी आरकाट, हैदराबाद आणि थेट दिल्लीपर्यंत आपले बातमीदार भडाभड रवाना केले. हेतू एवढाच की 'पहा, तुह्माला इंग्रेज मोठे बहाद्दर वाटत होते, पण आह्मा फ्रेंच बहाद्दरांच्या पुढे आंग्रेज किस चिडीयेका नाम?' या गर्वोक्तीचा दरारा एकजात सगळ्या छोट्या मोठ्या हिंदी राजेरजवाड्यात खासखूस पटावा. हिन्दुस्थानच्या सर्व भागांतून डुपलीवर अभिनंदनाचा वर्षाव कोसळत असतानाच, युरपमध्ये फ्रान्स-इंग्लंडच्या युद्धाची समाप्ती होऊन, एलाशापेल (Aix-la-chapelle) चा तह झाल्याची बातमी हिन्दुस्थानात आली. परस्परांची ठाणी ज्याची त्याला परत मिळावी, या अटीप्रमाणे, उत्तम तटबंदीची सुधारणा केलेले मद्रास शहर डुपलीला

मुठीत नाक धरून इंग्रेजांच्या हवाली करणे भागच पडले. अशा रीतीने हिन्दुस्थानातून इंग्रेजांचा बीमोड करण्याच्या डुपलीच्या योजनेला मोठाच धक्का बसला!

युरपमध्ये इंग्लंड आणि फ्रान्स यांचा तहनामा झाला, तरी हिन्दुस्थानात मात्र इंग्रेजी आणि फ्रेंच बनिया कंपनीची सैन्ये मात्र, ज्या हिंदी राजाला आमच्या मदतीची जरूर लागेल त्याला ती देण्यासाठी, सदैव सशस्त्र खडी उभी होती. वास्तवीक यात एकाद्या हिन्दी राजाला मदत करण्याची सबब, हा केवळ दिखाऊपणा होता; आपल्या युरपियन प्रतिस्पर्ध्याला कोठे कसा कायमचा उखडता येईल, याची योग्य संधी शोधण्याचा इंग्रेज फ्रेंचांचा हा डाव होता. दाणे टाकून कोंबड्या झुंजविण्याच्या राजकारणाने, दोघांच्या भांडणात आपला स्वार्थ कसा सफाईत साधून घ्यावा, याचे युरपियन क्रिस्त्याना बाळकडूच मिळालेले आहे. आता फक्त हिंदी राजाराजात कलागत उत्पन्न होण्याचाच काय तो अवकाश, कीं इंग्रेज फ्रेंचांची 'परोपकारी' सैन्यदळे हाललीच!

अशी संधी लवकरच आली. तंजावरच्या शाहूजी राजाला चंदासाहेबाने पदच्युत करून हद्दपार केले होते. आपले राज्य परत मिळविण्याच्या खटपटीसाठी शाहूजीने इंग्रेजांची मदत मागितली. याबद्दल त्याना भली मोठी रक्कम आणि देवीकोटा शहराचे दान कबूल केले. शाहूजीच्या मदतीला इंग्रेज जाण्यापूर्वीच दख्खनच्या मऱ्हाठ्यांनी चंदासाहेबाला कैद करून, प्रतापसिंग नावाचा एक राजा तंजावरच्या गादीवर स्थापन केला होता. तंजावरची रयत प्रतापसिंगाच्या कारभारावर फार खूष होती. त्याना शाहूजी परत यावा, असे मुळीच वाटत नव्हते. आता कसे करावे? शिकार साधत नाही, आणि ठरलेली दक्षिणा दान मिळत नाही! भटाची जात एकपट लोभी तर इंग्रेजाची जात शतपट लोभी. नवरा मरो, नवरी मरो, भटाला दक्षिणेची गरज. शाहूजी जगो, नाहीतर प्रतापसिंग मरो, इंग्रेजाना पैसा मिळाला म्हणजे झाले! ह्मणून त्यानी एक युगत काढली. आगळीकीचे किंवा अन्यायाचे कसलेहि कारण नसताना, इंग्रेजानी एकदम देवीकोटा शहरावर तोफांचा भडीमार करून ते हस्तगत केले, शाहूजीला पेनशन देऊन गप्प बसविले आणि प्रतापसिंगाशी दोस्तीचा तहनामा ठोकला. झाले. अशा रीतीने एकाच धोंड्याने तीन पक्षी मारून, इंग्रेजानी आपला तळीराम गार केला.

कितीहि खटपटी केल्या तरी इंग्रेजांची सद्दी जोरावर असून, त्यांची सत्ताहि वाढत्या प्रमाणावर आहे, याचे दगलबाज (Diplomat) डुपलीला मोठे वैषम्य वाटू लागले. त्याने मऱ्हाठ्याना खंडणी भरून चंदासाहेबाची सुटका केली; आणि इंग्रेजांच्या पुठ्ठ्यात घुसलेल्या अनवरुद्दीनाला पदच्युत करून, चंदासाहेबाला कर्नाटकचा नबाब करण्याचा घाट घातला. डुमाचा जानीदोस्त दोस्त अल्ली आणि चंदासाहेब दोस्तअल्लीचा जावई. तेव्हा त्याचा कळवळा डुपलीशिवाय कोणाला येणार? फ्रेंचांच्या मदतीने चंदासाहेबाने ता. ३ ऑगष्ट १७४९ रोज अंबूरच्या लढाईत अनवरुद्दीनाचा पराभव करून ठार मारले. या लढाईच्या विजयात डुपलीला आणखी एका दोस्त पात्राचा लाभ झाला. हे पात्र म्हणजे मुझफरजंग. या राजपुत्राला त्याच्या नाझीरजंग चुलत्याने कैद करून ठेवले होते. हजार हिकमतीने तो तेथून निसटला आणि चंदासाहेबाला येऊन मिळाला. पुढे डुपलीच्या मैत्रीच्या बळावर त्याने दख्खनचा सुभेदार म्हणून आपल्या नावाची द्वाही फिरविली. दख्खनचा सुभेदार म्हणजे दिल्लीच्या मोगल बादशाहीचा हॉईसरॉय. याचा नुसता खलीता दिल्लीस गेला पुरे कीं दक्षिणेत हव्या त्या राजाला अथवा नबाबाला उलथा पालथा करण्याची कर्तुमकर्तुम शक्ती त्याच्या इच्छेत सामावलेली. असा त्याचा अधिकार. त्याच्यापुढे कर्नाटकची नबाबगिरीची किंमत काय?

सुभेदार ठरवील तो नबाब! असल्या अधिकाराचे पात्र डुपलीच्या बगलेत आल्यावर त्याच्या राजकारणी दगलबाजीला पालवी फुटू लागल्यास नवल नाही.

त्रिचन्नापल्ली! हे मोठे बळकट तटबंदी शहर अनवरुद्दीनाचा मुलगा महमद अल्ली याच्या ताब्यात होते. डुपलीची काकदृष्टी त्रिचन्नापल्लीकडे वळली. परंतु, त्रिचन्नापल्लीची काळदृष्टी डुपलीकडे टौकारून पहात होती, याची मात्र त्या बिचाऱ्याला कल्पनासुद्धा नसेल! डुपलीने चंदासाहेब आणि मुझफरजंग या दोघाना त्रिचन्नापल्लीवर हल्ला करण्यासाठी रवाना केले. त्यानी डुपलीच्या सूचनेला धाब्यावर बसवून, तंजावरावर चढाई केली. तंजावर तर त्यांच्या हाती लागले नाहीच, पण मुझफरजंगाचा चुलता नझीरजंग याने त्यांच्या सैन्याची दाणादाण उडवून, मुझफरजंगाला पकडून पुन्हा कैद केले, दख्खनचा सुभेदार म्हणून स्वतःची द्वाही फिरवली, आणि चंदासाहेबाला पदच्युत करून अनवरुद्दीनाचा मुलगा महमद अल्ली याला कर्नाटकचा नबाब केले. डुपलीची सगळी दोस्तप्यादी नझिरजंगाने एका तडाक्यात मात करून रसातळाला नेली. पण डुपली एवढ्याने धीर सोडणारा हिंदु किंवा मुसलमान थोडाच होता? तो युरपियन पाषाणहृदयी क्रिस्ती राजकारणी फ्रेंच! त्याने आपल्या गुप्त हस्तकांच्या द्वारे नझिरजंगाचा खून करविला. अर्थात् सगळे पारडे पुन्हा फिरले. मुझफरजंग दख्खनचा सुभेदार बनला आणि चंदासाहेब कर्नाटकाचा नबाब झाला.

डुपलीच्या डोक्यातून त्रिचन्नापल्लीचे वेड गेले नव्हते. ते तटबंदी शहर अझून महमद अल्लीच्या ताब्यात होतेच, आणि त्याच्या पाठीशी इंग्रेज बहाद्दर मदतीला सज्ज उभे होते. डुपलीने फ्रेंच सैन्याचा त्रिचन्नापल्लीला वेढा दिला. हल्ले सुरू झाले. परंतु जनरल लॉरेन्सने फ्रेंचांची आणि त्यांच्या दोस्तांची भंबेरी उडवून दिली. डुपलीने या स्वारीच्या तयारीसाठी पैसा श्रम किंवा सैन्य यांची कडेकोट तयारी केली असूनहि, ऐन वेळी त्याच्या दैवाने गोता दिला. लॉरेन्सच्या माऱ्यापुढे त्याची सगळी तयारी कवडीमोल ठरली. संकटांची परमावधि म्हणजे युरपमधून त्यास मदतीसाठी निघालेले ७०० सोजीरांचे एक जहाज वाटेतच समुद्रास्तृप्यन्तु झाले. डुपली पराभूत झाला. त्याच्या राजकारणी महत्वाकांक्षेचे कपाळ त्रिचन्नापल्लीच्या कठोर खडकावर आपटून फुटले.

फ्रेंच आणि इंग्रेज कंपन्या आणि त्यांचे युरपमधले सूत्रधार यानी साहजीकच असा निष्कर्ष काढला कीं जोंपर्यंत हिन्दुस्थानात फ्रेंचांचा गव्हर्नर ह्मणून डुपली वावरत आहे, तोंपर्यंत इंग्रज आणि फ्रेंच यांच्यात सलोखा व शांति नांदणे शक्य दिसत नाही. हिन्दुस्थानात डुपली काय धोरणाचा खेळ खेळत आहे याची फ्रेंच दिवाणाना स्पष्ट कल्पना होतीच. नव्हे हिन्दुस्थानात फ्रेंचांची राज्यसत्ता प्रस्थापित करण्यासाठी काय काय डावपेच कसकसे लढविले पाहिजेत, याची स्वतः डुपलीनेच दिवाणाना माहिती पुरविलेच होती. परंतु डुपलीचे धोरण दिवाणाना मुळीच पसंत नव्हते. ते त्याना लफंगेगिरीचे (villainous) दिसले. ताबडतोब सन १७५४ त डुपलीला स्वदेशी परत बोलावण्यात येऊन खूप त्याची खरडपट्टी काढण्यात आली. येणे प्रमाणे फ्रांको इंडियन एम्पायर स्थापन करण्याचे डुपलीचे स्वप्न अखेर स्वप्नच ठरले. काही दिवसानी डुपली दारिद्र्यग्रस्त स्थितीत मरण पावला.

डुपलीला परत बोलविल्यानंतर, हिन्दुस्थानच्या अंतस्थ भानगडीत केव्हाहि ढवळाढवळ करावयाची नाही, असे फ्रान्सने ठरविले. डुपलीच्या जागी मंशियर गोढेन (M. Godehen) हिन्दुस्थानात आला त्याने मद्रासच्या इंग्रेजी गव्हर्नर सॉण्डर्स (M. Saunders) शी सलोखा केला. या तहाने असे ठरले कीं

''फ्रेंच आणि इंग्रेज बनिया कंपन्यानी या पुढे कोणत्याहि हिंदी राजांच्या भांडणात किंवा भानगडीत ढवळाढवळ किंवा मध्यस्थी करावयाची नाही.'' फ्रेंचानी हा करार अक्षरशः पाळला. इंग्रेजानी मात्र त्याच्या उलट वागून तहाचा सन्मान केला. सन १७६९ त फ्रेंच बनिया कंपनी बुडाली. सध्या फक्त पांडीचरी आणि चंद्रनगर ही फ्रेंचांची दोनच ठाणी हिन्दुस्थानात अवशिष्ट उरली आहेत.

सारांश, पोर्च्युगीज डच इंग्रेज आणि फ्रेंच या चार युरपियन क्रिस्त्यांचा हिन्दुस्थानात जो झगडा झाला त्यात सर्वांना पाणी पाजून अखेर जबरदस्त आंग्रेज बहाद्दरच काय ते येथे टिकले. त्यांच्या टिकावाचे मर्म त्यांच्या अत्युत्कट राष्ट्रभक्तीत आहे. राष्ट्रसेवेपुढे देवाला आणि धर्माला त्यानी फाजील किंमत दिली नाही, म्हणूनच ते दिल्लीच्या सार्वभौमत्वाची देवकळा पावले.

भारतीय इतिहासातले काही निवडक प्रसंग विवेचनाला घेऊन, युरपियन क्रिस्ती बनियांच्या व्यापारी आणि राजकारणी उलाढालीत पोर्च्युगीज डच फ्रेंच हे नामोहरम होऊन, फक्त इंग्रेजच काय ते हिन्दुस्थानात टिकले आणि केवळ व्यापारी उचापति करता करता अखेर या देशाचे सार्वभौम राजे बनले. हा सर्वच प्रकार मोठा अपूर्व आणि कल्पनारम्य असल्यामुळे, पोर्च्युगीजादि युरपियन कां हरले आणि इंग्रेजच कां टिकले, या प्रश्नांची चिकित्सा नीट केली पहिजे. त्याशिवाय भारतीय सार्वभौमत्वासाठी झालेल्या इंग्रेजांच्या नानाविध खटपटींचा अर्थ आपल्या ध्यानात स्पष्ट येणार नाही. बळी तो कानपिळी असला, तरी हे युरपियन क्रिस्ती बनिये हिन्दुस्थानात बळी म्हणून मुळीच आले नाहीत. येऊच शकले नसते. त्यानी कळीच्या नारदाची भूमिका घेतल्यामुळेच, ते अखेर बळी बनून हिन्दुस्थानच्या राजकारणी जीवनात अपूर्व क्रांति करण्यास समर्थ बनले. ही विलायती कळ त्यानी येथे कसकशी खेळवली, तिचे बरे वाईट भाग कोणते, त्यांपासून आजच्या भारतीयांनी भावी आत्मोद्धारासाठी आणि राष्ट्रोद्धारासाठी कोणकोणत्या तत्वांचे शिक्षण घेतले पाहिजे, याची चर्चाच विशेष महत्वाची आहे.

'कॉलनायझिंग स्पिरीट' म्हणजे आपला देश सोडून परदेशात जाऊन तेथे वसाहत करण्याची प्रवृत्ति, हा युरपखंडातील सर्व लोकांचा मोठा जागताज्योत आणि वाखाणण्यासारखा सद्गुण आहे. आजची सर्व पाश्चात्य राष्ट्रे या वसाहत-प्रवृत्तीच्या पोटातूनच निर्माण झालेली आहेत. खुद्द इंग्लंड हे सुद्धा नॉर्मण्डीच्या नॉर्मन्स लोकांच्या वसाहतीनेच फुगलेले आहे आणि इंग्लंडच्या राजाबद्दल इंग्लिश लोकाना केवढाहि मोठा ईश्वरतुल्य आदर आणि अभिमान वाटत असला, तरी ते राजघराणेहि अस्सल इंग्रेजी नसून, ते युरपियन अन्य देशीय (परदेशी) घराण्यातल्या कितीक तरी राजे आणि राण्यानी बनविलेले आहे.*** सामान्यतः पाहिले तर वसाहत-प्रवृत्ति बहुतेक सर्व माणसांत असते. पक्ष्यांमध्ये तर ती विशेष दिसून येते. 'जिकडे भरला दरा, तोच गाव बरा' इतक्याच क्षुद्र भावनेने देश सोडून परदेशात जाणारे, किंवा हिन्दुस्थानच्या एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतात जाणारे पोटभरू मजूर आजहि येथे लक्षावधि आढळतात. मद्रासकडे पोट भरे ना, म्हणून शॉर्टहॅण्ड अकौन्टन्सीच्या झोळ्या खांद्यावर टाकून, मुंबईस आणि इतरत्र भटकणारे मद्राशी कारकुण्डेहि आन्दमान मादागास्करच काय, थेट उत्तर ध्रुवाच्या बर्फातहि धाव घ्यायला एका पायावर आज टोळधाडीप्रमाणे उभेच आहेत. मजुरांची पेठ म्हणून

*** "It is somewhat curious to observe, that although the people of England have been in the habit of talking about kings, it is always a foreign house of kings hating foreigners, yet governed by them." - Rights of Man by Thomas Paine.

हिन्दुस्थानचा बदलौकीक आज जगप्रसिद्धच आहे. केवळ पोट जाळण्यासाठी परदेशांत जाणाऱ्या मजूर मद्राशांच्या टोळधाडीची वसाहत-प्रवृत्ति अधमाधम मसाल्याची आहे. युरपियनांच्या कॉलनायझिंग स्पिरीटशी तिची तुलना अन्यायाची ठरेल. 'ठेवीन पाय ती जमीन माझी' माझ्या राष्ट्राच्या मालकीची, या महत्वाकांक्षेनेच, या जगज्जेतृत्वाच्या अहमहमिकेनेच, युरपियन धाडशी क्रिस्ती स्वदेश सोडून परदेशांत वसाहतीसाठी जातात. या महत्वाकांक्षेच्या सिद्धीसाठी ते वाटेल तो वेष पांघरतील, हवा तो धंदा करतील, पडतील ती संकटे सहन करतील; पण मूळ उद्देश प्राणान्तीहि सोडणार नाहीत. त्यातल्या त्यात आंग्रेज आदमी म्हणजे एक मोठे चमत्कारीक गिरमीटच म्हटले तरी चालेल. ते कोठेहि ठेवा, तेथे ते अखंड फिरत राहावयाचे. खिशात ठेवा, नाहीतर डोक्यावर चढवा, तेथे भोक पाडून भुसा बाहेर काढल्याशिवाय राहणार नाही. पाऊल ठेवीन ती जमीन माझी हे एकच बाळकडू प्रत्येक इंग्रेज प्यालेला असतो. तो एकाद्या ठिकाणी चिकटला कीं जाम! काळाच्या बापाला तेथून तो उखडवणार नाही. देशी लोकांत मिळून मिसळून त्यांच्याच भांडवलावर धाडशी इंग्रेज कोणत्याहि धंद्याची सुरुवात करतो; आणि एकदा त्याचे बास्तान नीट बसले कीं सगळ्याना झाडू मारून आपण सर्वसमर्थ बनतो. हिन्दुस्थानातल्या रेलवे कंपन्यांची प्राणप्रतिष्ठा अशीच झालेली आहे. इंग्रेजांमध्ये पगडी-पालट हा मोठा दगलबाज सद्गुण (डिपलोमॅटिक व्हर्चू) आहे. आजूबाजूच्या परिस्थितीशी जुळते मिळते घेऊन, वारा वाहील तशी शिडे फडफडविण्याच्या प्रवृत्तीमुळेच हिन्दुस्थानात इंग्रेज टिकला आणि डच पोर्च्युगीज फ्रेंचादि त्यांचे युरपियन राष्ट्रबांधव उखडले गेले. इंग्रेजांच्या टिकावाचे मर्म हेच.

भीकमाग्या पोटभरू आणि कारकुण्ड्या वृत्तीची वसाहत-प्रवृत्ती जशी अधमाधम, तशी विशिष्ट धर्ममतांची आग्रही वृत्ती सुद्धा वसाहतीच्या टिकावाला घातुक ठरते. पोर्च्युगीज मोठे धाडशी दर्यावर्दी आणि व्यापारी मारवाडी खरे, पण त्याना त्यांच्या क्रिस्ती धर्मप्रसाराचा आग्रह अखेर नडला. ते कमालीचे धर्मवेडे लोक. भेटतील सापडतील त्या लोकावर आपल्या धर्माचा शेंदूर थापण्याचा त्यांचा मोठा अट्टहास. त्यांचा पिंडच मूळ इंक्विझिशन**** वर वाढलेला. त्यानी गोव्यात इंक्विझिशन थापण्यापलीकडे विशेष शतकृत्य काहीच केले नाही गोव्यातील क्रिस्ती धर्माछळाचा इतिहास म्हणजे एक मोठे रक्तबंबाळ प्रकरण आहे आणि त्याची कडूजहर स्मृती जागृत करणारी स्मारके सर्व गोव्याभर पसरलेली आजहि दृष्टीस पडतात. पोर्च्युगीज जेथे जेथे गेले, तेथील लोकांच्या सहानुभूतीला आपल्या धर्मवेड्या अत्याचारांमुळे पारखे झाले. म्हणूनच त्याना आपला गाशा लवकर गुंडाळावा लागला. आंग्रेज बहाद्दर मोठे हिकमती! त्यानी क्रिस्ती धर्मप्रसाराची कामगिरी रगड केली. पण सगळी परस्पर पावणेतेरा धोरणारे! तोंडाने मात्र धर्मस्वातंत्र्याच्या पुराणांचा धबधबा अखंड सुरू.

डच आणि डेन्स बनियानी हिन्दुस्थानच्या राजकारणात काहीच ढवळाढवळ केली नाही. अर्थात्

**** युरपातल्या पोप पाद्री भिक्षुकांच्या म्होरकेपणाखाली भिक्षुकशाहीनें आपल्या मतांशीं विरोध करणाऱ्या नवमतवाद्यांना वाटाण्यांतल्या खड्याप्रमाणें निवडून काढून, कोणाच्या हातापायांत जडजड बेड्या ठोकून त्यांना अंधारकोठड्यांत फेकून दिले; कोणाला अन्नपाण्यावाचून ठार मारले, कोणाचे हातपाय 'रॅक्स' नामक ताटीवर ताणून बांधून, त्यांची हाडें अक्षरशः ठेचून त्यांचे पीठ केले; कोणाच्या जिभा कापल्या; कोणाचे डोळे काढले; कोणाची जिवंतपणी आंगाचीं कातडी सोलून काढली, तर कोणाला मोठमोठ्या शहरांच्या चौकांत होळ्या पेटवून लाखों तमासगिरांच्या समक्ष जिवंत जाळले.

- ठाकरेकृत भिक्षुकशाहीचे बण्ड (पृ. ४२)

त्यांच्याकडे पहाण्याची आपल्याला जरूर नाही. इंग्रेजाना पदोपदी जर कोणी अडविले असेल तर ते फ्रेंचानी, आणि हिन्दुस्थानात फ्रेंच साम्राज्य स्थापन करण्याची आद्य कल्पनाही फ्रेंच डोक्यातून बाहेर पडलेली. पण वसाहत-प्रवृत्तीसाठी जे एक नारदी स्पिरीट लागते, ते फ्रेंचांच्या आंगी नव्हते आणि म्हणूनच त्यांच्या वसाहती फारशा कोठे नाहीत. सामान्यतः फ्रेंचलोक बरेच प्रामाणिक असत; आणि वसाहती स्पिरीटला दांभिकपणा, लुच्चेगिरी आणि गळेकापूपणा या गोष्टींची आवश्यकता विशेष लागते, त्यामुळे फ्रेंचानी इंग्रेजांपुढे हात टेकले. तथापि फ्रान्स राष्ट्राला याबद्दल वाईट न वाटता, उलट मोठा अभिमान वाटतो. आमच्या राष्ट्राची संस्कृति आचार व विचार इतके प्रबुद्ध आणि शुद्ध नीतीच्या पायावर उभारलेले आहेत कीं आमच्या फ्रान्स राष्ट्राच्या हातून कोणाचाहि घातपात होणार नाही; उलटपक्षी आम्ही साऱ्या जगाला प्रगतीच्या मार्गावर जाण्यासाठी लागणाऱ्या सद्‌गुणांचा मुबलक पुरवठा करू; असे फ्रेंचांचे म्हणणे आहे. व्हिक्टर ह्यूगो या फ्रेंच तत्वज्ञ कादंबरीकाराने आपल्या फ्रान्स राष्ट्राबद्दल एक भाकीत करून ठेविले आहे. ते कितपत खरे खोटे ठरणार हा प्रश्न निराळा असला, तरी ह्यूगोचे विचार फार चिंतनीय आहेत. तो म्हणतो :-

''विसाव्या शतकात एक मोठे असामान्य राष्ट्र उदयास येईल. हे सर्व बाजूनी थोर व श्रेष्ठ असे असून, त्याची राजधानी पारीस येथे राहील. ते राष्ट्र अझून जरी अस्तित्वात आलेले नाही, तरी त्याची राजधानी मात्र तयार आहे. कल्पनांचा प्रसार हा पारीसचा मुख्य गुणधर्म आहे. सर्व जगात सत्याचा प्रसार करणे हे त्याचे अखण्ड कर्तव्य असून, ते नित्य बजावले जातच आहे. अंधारात प्रकाशांच्या ठिणग्या विखरून प्रकाश-पेरणीचे पारीसचेच कर्तव्य आहे. प्रगतीच्या अग्नीला फुंकारे मारून त्याला चेतविण्याचे काम पारीसच अखंड करीत आहे. साऱ्या जगाचे कोंनेकोपरे धुंडाळा, मानवी प्रगतीची अदृश्य परंतु पूर्ण उघडलेली शिडे तुम्हाला पारीसच्या कट्‌ट्यावरच आढळून येतील.''

१९ व्या शतकाच्या मध्यावर उत्तर हिन्दुस्थानात प्रवास करण्यासाठी आलेल्या बिशप हेबर नामक फिरस्त्याने, असे लिहून प्रसिद्ध केले आहे कीं ''हिन्दुस्थानात फ्रेंचांविषयी लोकमत चांगले आहे. पुष्कळ प्रसंगी त्यांची अरेरावी जरी लोकाना तापदायक वाटली, तरी सामान्यतः इंग्रेजी साहेब लोकांपेक्षा फ्रेंचांची वागणूक पुष्कळच मनमिळाऊ आणि लोकमान्य असे. पुष्कळ फ्रेंचांनी हिंदी पोषाख आणि चालीरीतींचा स्वीकार केला होता. इंग्रेज लोक मात्र जसे स्वतःच्या कुर्त्यात आणि प्रत्येकाशी गुर्मीने वागतात आणि त्यामुळे ते जातात तेथे लोकांच्या तिटकाऱ्याला पात्र होऊन, एकलकोंडे पडतात, तसा प्रकार फ्रेंचांचा नव्हता. इंग्रेजांच्या या मूर्खपणाच्या आडदांड राष्ट्रीय घमेंडीचे प्रकार हिन्दुस्थानात अझूनहि पुष्कळ घडत आहेत आणि माझी अशी खात्री आहे की त्यांचे वाईट परिणाम आम्हाला इकडे (युरपात) भोगावे लागत आहेत.... आम्ही हिन्दी लोकाना आमच्या समाजात मिळू मिसळून देण्याचा मार्ग अज्जीबात बंद केला आहे, आणि त्यांच्याशी बोलायचे झाले तरी आम्ही नेहमी मगरूरीच्या आणि अरेरावीच्या स्वरात त्यांच्याशी बोलतो.'' फ्रेंच लोक इंग्रेजांपेक्षा कितीहि सद्धर्तनी आणि सात्विक असले, आणि इंग्रेजांच्या ऐवजी त्यांच्या हाती हिन्दुस्थानचे सार्वभौमत्व गेले असते, तरी फार झाले तर दगडापेक्षा वीट मऊ, एवढीच बोंब मारण्याचा प्रसंग हिन्दुस्थानावर आला असता. इतक्या वर्षांत फ्रेंचांनी अलजीर्स प्रमाणे सारे हिन्दुस्थान फ्रेंचमय करून सोडले असते. आजहि अलजीर्सच्या वसाहतीत फ्रेंच काय कमी लोकमान्य आहेत? तेथील आरबांवर फ्रेंचांच्या संस्कृतीचा इतका भयंकर पगडा बसलेला आहे कीं

खाण्यापिण्यात आणि कपड्यालत्त्यात तर ते पूर्ण फ्रेंच बनले आहेतच, पण आणखी एका पिढीच्या अवधीत ते आपली मातृभाषा अज्जीबात विसरून फ्रेंच भाषेतच सर्व व्यवहार चालवू लागतील.

धर्मवेडामुळे पोर्च्युगीज आणि सात्विकपणामुळे फ्रेंच वाटेला लागले. मग इंग्रेज कोणत्या पुण्याईवर येथे शिरजोर झाले? कारस्थाने आणि उचापति यांत इंग्रेजांचा हात, भरतखंडात तर धरणारा कोणी नव्हताच, पण युरपातहि त्यावेळी कोणी धरू शकला नाही. इंग्रेजी कारस्थानांचा आदी अंत आजपर्यंत कोणाला कधी लागला नाही आणि एवढ्याच मख्खीवर त्यानी इतर युरपियनांचा काटा काढून आपली थप्पी येथे कायमची थापली. हिन्दुस्थानाचे राज्य आम्ही सत्य मार्गाने घेतले किंवा तलवारीच्या जोरावर जिंकले, म्हणून वर्तमान इंग्रेजी मुत्सद्यांनी कितीहि कंठशोष करून जगाला पटविण्याचा प्रयत्न केला, तरी दगलबाजीच्या जोडीने दगाबाजी करूनच, त्यानी दिल्लीचे प्रस्थान पैदा केले आहे, हे सत्य चिरडून नष्ट होण्यासारखे नाही. एका ब्रिटीश हापसराने कर्नाटिकस् (Carnaticus) या टोपण नावाखाली 'एशियाटिक जर्नल' (मार्च १८२१) च्या अंकात एक स्पष्टोक्तीचा लेख लिहिला आहे. त्यात तो म्हणतो, (भावार्थ) ''आमच्यात काही विशेष पराक्रम होता, आणि त्याच्या जोरावर आम्ही हिंदुस्थानचे राज्य जिंकले, या बोलण्यात काही अर्थ नाही. आशिया खंडातील लोकांच्या स्वभावातच जे दोष (weaknesses) होते, त्यांचा फायदा आम्ही करून घेतला, हे कबूल करणे भाग आहे. आम्ही आमच्या व्यापाराच्या संरक्षणासाठी किंवा आगळीकीच्या प्रतिकारासाठी झगडत असतानाच, रियासती मागून रियासती आपण होऊन आमच्याकडे लोळत येऊ लागल्या. जादूच्या प्रयोगाप्रमाणे राज्येच्या राज्ये आमच्यासाठी रिकामी होऊ लागली. या प्रकारामुळे असे खास नमूद करून ठेवायला हरकत नाही कीं हिंदी जनतेचा एक-विसांश भाग ज्या दिवशी आमच्या इतकाच धोरणी (Provident) आणि दगाबाज (Scheming) बनेल, त्या दिवशी, आम्ही येथे आलो त्या गतीनेच आम्हाला स्वदेशी पाळता पाय काढावा लागेल आणि पूर्वीच्याच क्षुद्र अस्तित्वात दिवस कंठावे लागतील.''

हिन्दी लोक आपल्या काही स्वाभाविक दोषांमुळे (weaknesses of character) क्रिस्ती इंग्रेजापुढे नामोहरम झाले. म्हणजे काय? ते दोष तरी कोणते? मनाचा मोकळेपणा किंवा भाबडेपणा, पुढाऱ्यावर किंवा मित्र म्हणविणारावर भक्तीपूर्ण विश्वास, आणि दुसऱ्यावर इमानाने विश्वास टाकणे, या सद्‌गुणामुळेच हिन्दी लोकांची मान कापली गेली. इंग्लंडच्या दगाबाज बनियांच्या कारस्थानाना ते बळी पडले. युरपचे पाषाणहृदयी राजकारण हिंदुस्थानात पाऊल ठेवीपर्यंत, ज्या गोष्टी भारतीय नीतिशास्त्रात सद्‌गुण म्हणून गणल्या जात होत्या, त्यांचे राष्ट्रीय दुर्गुणात पर्यवसान झाले. दुधाला विषाची स्थिति प्राप्त झाली. मनाचा सज्जनपणा कसायाच्या वृत्तीने लिलावास निघाला. हिंदी लोकांच्या वर निर्देश केलेल्या सद्‌गुणांमुळेच हिन्दुस्थान जिंकण्याचे इंग्रेजांचे कार्य सोपे आणि सुकर झाले, अशी कर्नल मॅलेसन् (Col. Malleson) या आंग्ल इतिहासकाराने आपल्या The Decisive Battles in India (भारतीय अटीतटीच्या लढाया) नामक ग्रंथात स्पष्ट कबुली दिलेली आहे. हिन्दुस्थानचे लोक देवभोळे. पापपुण्याच्या वजाबाकी बेरजेत सदा रंगलेले. शतकानुशतके राज्ये हाकली, तरी धर्माचा फाजील अभिमान सुटला नाही. हिन्दुंचे नीतिनैपुण्य तर विचारायलाच नको. किल्ल्याला शत्रुचा वेढा पडला आणि तोफांचा भडीमार सुरू झाला, तरी राजज्योतिषाने मुहूर्त काढून दिल्याशिवाय प्रतिकाराची सलामी सुटायची नाही. मिठावर हात ठेऊन शपथ दिली कीं एका क्षणात कट्टा शत्रुसुद्धा जानीदोस्त

व्हायचा. मग त्याला असेल नसेल ते दाखवून देऊन हे नीतिमंत हिन्दु नृपति खुशाल परांच्या गदेल्यावर लोळत पडायचे. आपल्यावरून जग ओळखावे, ही म्हण कितीहि गोंडस गोमटी असली, तरी ती गोऱ्या गोमट्या युरपियन क्रिस्त्यांच्या बाबतीत अक्षरशः लागू करण्यात, हिन्दी राजानी आणि लोकानी भयंकर घोडचूक केली, हाच इतिहासाचा सडेतोड निर्णय आहे. पृथ्वीराज चव्हाणाने पहिल्या सपाट्यालाच महमद घोरीचा शिरच्छेद केला असता, तर हिन्दुस्थानाचा इतिहास निराळ्याच रंगाने रंगला असता. पण 'आला शरण, न त्याला मरण' असल्या नीतिसूत्राच्या फाजील स्तोमात पृथ्वीराजाची हिंदु अक्कल पाघळली. त्याचा परिणाम त्याला त्याच महमद घोरीच्या हस्ते कंठस्नान पत्करून भोगावा लागला. इंग्रेजी बनियानी कारस्थाने लढवून देवभोळ्या हिंदी लोकाना बुचाडले, ही गोष्ट कितीहि सत्य असली, तरी तेवढ्यामुळे हिंदी लोकांच्या बे-धोरणी बावळटपणाचे समर्थन करणे चुकीचे आहे. आपण कोणत्या वृत्तीच्या लोकाशी काय व्यवहार करतो, याची छाननी करण्याचीहि अक्कल ज्या राष्ट्रातल्या राजांत आणि मुत्सद्यांत शिल्लक नव्हती, त्यांच्या हातातले राजदण्ड काळाने हिसकावून घेऊन ते इंग्रेजांच्या हाती देण्यात खरोखरच आपले कर्तव्य चोख बजावले, असा प्रस्तुत लेखकाचा स्पष्ट अभिप्राय आहे.

हिन्दी लोकांच्या ज्या सद्‌गुणांबद्दल प्राचीन चिनी फिरस्ता हुनशांग याने मुक्तकंठाने स्तुति केली, त्याच सद्‌गुणांचा परिणाम हिन्दी लोकांचा कंठ क्रिस्ती बनियानी मुक्त हस्ताने चिरण्यात झाला, हा सुद्धा भारतीय इतिहासातला एक चिंतनीय चमत्कार होय. या चमत्काराचा हिन्दु मुसलमान स्वराज्यवाद्यानी वास्तवीक जितका विचार करावयाला पाहिजे, तितका अझूनहि केलेला दिसत नाही. म्हणूनच आमची स्वराज्यवादी इंग्रेजी वृत्तपत्रे आणि चळवळी चालविण्यासाठी विलायतेच्या गोऱ्या लोकांची पार्सले आह्माला वरचेवर मागविण्याचा आणि अनेक 'धाडशी' व दगाबाज इंग्रेज प्राण्याना आकण्ठ पोसून पदरी बाळगिण्याचा मोह आम्हाला अझून सुटत नाही. ज्या आमच्या दिलदार मोकळ्या मनाच्या कुरणात चंचुप्रवेश करून आंग्रेजी क्रिस्त्यानी भरतखण्डाचे सार्वभौमत्व आमचे डोळे उघडे असताच हस्तगत केले, त्याच कुरणात विलायतेत बटाटे विकण्याचीहि लायकी नसलेले अनेक बेरोजगारी गोरे भडभुंजे मनमुराद बागडू देण्याची जोंपर्यंत हिन्दी लोकाची दुर्बुद्धी वाढत्या प्रमाणावर आहे, तोंपर्यंत त्यांच्या स्वराज्याच्या वल्गनाना जगात फुटक्या कवडीचेहि महत्व लाभणार नाही.

(पुढे चालू.)

□□□

लेख

हिन्दवी नीळकण्ठीझम आणि रशियन कम्युनिझम

(लेखांक २ रा)

शंकर आणि शंकरभक्ति आज कितीहि अतिरेकाला गेलेली असली आणि त्याविषयी लोकांच्या पुराणविद्ध कल्पना कितीहि भ्रष्ट अवस्थेत बागडत असल्या, तरी शंकर देवाची उत्पत्ति हिन्दवी पिण्डाच्या प्रकृतिसिद्ध रंगाढंगाचे यथातथ्य समर्थन करणारी आहे, यात शंका नाही. 'न देखे रवि ते देखे कवि' म्हणून कवींच्या काव्यकल्पनेच्या भरारीची कोणी कितीहि अवास्तव स्तुति केली, तरी कवि हा माणूसच असल्यामुळे, त्याच्या कल्पनेच्या वावडीची मजल त्याच्या पिण्डप्रधान विचारांच्या भरारी पलीकडे जाणेच शक्य नाही. हिन्दु कविकल्पनेने नीळकण्ठ शंकराचे जे स्वभावचित्र नानाविध काव्यपुराणांच्या द्वारे रंगविलेले आढळते, त्यात हिन्दु पिण्डप्रकृतीचा फोटोग्राफच यथातथ्य उमटलेला दृष्टीस पडतो. जसा पिण्ड तसे काव्य. हिन्दु मनोवृत्तीबद्दल खुद्द हिन्दु विवेकवाद्यानाच पुष्कळ वेळा मोठे गूढ पडते. तिच्या इंद्रधनुष्यी रंगाढंगाबद्दल त्याना मोठा आचंबा वाटतो. हिन्दुस्थानेतर अनेक देशातल्या एकरंगी एकशिंगी प्रकृतीशी हिन्दवी अनेकरंगी प्रवृत्तीची तुलना करताच त्याना मोठा चमत्कार वाटतो.

सगळ्याच रंगांचा गोकुळकाला

येथे उत्कट प्रमाणात दिसतो. फार काय पण परस्परविरुद्ध भावनांचे रंगसुद्धा येथे एकमेकात सरमिसळ मिसळलेले आढळतात. एकटा हिन्दुधर्मच घेतला तरी त्यातहि परमेश्वराच्या अस्तित्व-कल्पनेवर बुटाची लाथ हाणणाऱ्या नास्तिकापासून तों थेट नासक्या सुपारीला गणपती म्हणून पूजणाऱ्या शुद्ध भाविकापर्यंत सगळ्यांचा अभेदाने समावेश झालेला आहे. रांजणवाडीला सुक्या बोम्बलाचा स्पर्श करताना झीट येऊन पडणारे ब्राह्मण येथेच आणि

अण्डी मटण महाग करणारे ब्राम्हण

सुद्धा येथेच. कडवे सुधारक, रडवे दुर्धारक आणि पढवे उत्पादक. काय हव्या त्या प्रवृत्तीचा साठा या अजब अजायबखान्यात मांडीला मांडी ठोकून बसलेला आढळतो. असला विचित्र चमत्कार जगाच्या पाठीवर कोणत्याही देशात आणि धर्मात कोणाला आढळणार नाही. अफाट हिन्दुस्थानाची गोष्ट राहू द्या. नुसता आपला चिमुकला महाराष्ट्रच का घ्या ना! येथेहि हाच प्रकार.

महाराष्ट्र देशाच्या प्रवृत्तीची चिकित्साच करू म्हटले तर येथे सर्व बरे वाईट प्रकार अत्यंत उत्कटावस्थेत

आढळतात. महाराष्ट्राची प्रवृत्ति हिन्दुस्थानातल्या इतर सर्व प्रांतांपेक्षा फारच निराळ्या व विलक्षण मसाल्याची बनलेली आहे. हीत मानवी जीवनाचे अनेक भले बुरे रस उत्कटत्वाने परिणत झालेले आढळतात. निसर्गाकडे पाहिले तरी सुद्धा हाच प्रकार. बारा मास हिरव्या गार वनश्रीने थरारलेल्या प्रदेशालगतच खडकाळ वाळवंटाने कित्येक मैलपर्यंत आपले हातपाय सताड पसरलेले आढळतात. इकडे भर उन्हाळ्यात रोंरावत जाणाऱ्या नद्या सागरराजाच्या भेटीसाठी उत्सुकतम झाल्यामुळे उंचउंच कडेकपारांवरून धडाधड उड्या टाकीत कामोन्मत्त तरुणीप्रमाणे फोफावत चालल्या आहेत; तों पलीकडे कित्येक डोंगराळ झरे, लक्षाधीश श्रीमंतांच्या उधळ्या दत्तक पुत्रांप्रमाणे, पावसाळ्यात जलसमृद्धीचा खळखळाट करून दसरा दिवाळी होते न होते तोंच पाण्याच्या शुकशुकाटाने सुकेठाक पडून आहेत. उन्हाळ्याच्या ऐन कडाक्यात सबंध कोकण आणि घाट यांचे फुटाणे उडत असताना, महाबळेश्वरावर बर्फाची वृष्टि होत असते. इकडे कोकणात तांदूळ नागलीच्या आंबिलीवर दिवस काढणारे शरिराने दुबळे पण कुशाग्र बुद्धीचे कोकण्ये आढळतात, तर तिकडे वरघाटी वाडगा वाडगा भिजक्या हरभऱ्याची डाळ खाऊन लेजीम तालीम खेळणारे दणधाकट शरीराचे पण मंदबुद्धीचे घाटी सापडतात. स्वदेशाकरिता प्राण देणारे येथेच व स्वतःच्या प्राणासाठी स्वदेशाचा प्राण घेणारेहि येथेच. स्वराज्यसंस्थापक येथेच निर्माण झाले व स्वराज्यविध्वंसक अधमाधम येथेच उपटले. वर्णाश्रमवाद्याच्या ओसरीला ओसरी भिडवून नास्तिक रहातो, तर सरधोपटमार्गी इसमाच्या घरातच कृष्ण कारस्थाने करणारा खुशाल वावरतो. वडिलानी घालून दिलेल्या बाळबंदी वळणारा कित्ता जशशाचा तस्सा गिरवीत बसणाऱ्या गतानुगतिक देशस्थाच्या मांडीला मांडी भिडवून बसलेला आतल्या गाठीचा शुक्लयजुर्वेदी आढळतो, तर धन्याच्या पायातल्या पायतणासाठी जीव देणाऱ्या इमानी कायस्थाच्या शेजारीच कुटील कारस्थानांत साऱ्या हिंदुस्थानाला पुरून उरणारा विचित्रवीर्य चित्पावन उभा असतो. एकूण महाराष्ट्रासारखा सर्वरंगपरिपूर्ण देश केवळ हिंदुस्थानातच नव्हे, पण अवघ्या दुनियेत दुसरा सापडणार नाही, असे विधान केल्यास, अतिशयोक्तीच्या कलमाखाली खटला होण्याचा संभव बराच कमी आहे.

या असल्या भिन्नजिनसी पिण्डप्रकृतीच्या पोटीच नीळकण्ठ शंकर दैवत जन्माला आले असल्यामुळे, मातेच्या गुणधर्मांचा त्यात पूर्ण विकास झालेलाच आढळतो. शंकराची आरती, शिवलीलामृत किंवा इतर तद्विषयक पुराणग्रंथ नीट चिकित्सेने अभ्यासिले, तर इतक्या परस्परविरुद्ध रंगांच्या मिश्रणानी हिन्दु कविगण असले विचित्र चित्र रंगवूच शकला कसा, याचे खरोखर मोठे कौतुक वाटते. पण हे कौतुक किंवा आश्चर्य हिन्द्वेतराना; हिन्दु मनाला त्याचे काहीच वाटत नाही. कारण, या चित्रात त्याची पिण्डप्रकृति उमटविण्याखेरीज अधिक विशेष असे त्याने काहीच केलेले नाही.

शिवलिंगाच्या उत्पत्तीची कथा

कितीहि घाणेरडी बीभत्स आणि अनुच्चारणीय असली, किंवा पुष्कळाना भासली, तरी हिन्दु प्रकृतीला त्याचेहि काही वैषम्य अथवा विषाद वाटत नाही. कारण तो सुद्धा तिच्या मनोरचनेचा एक भागच आहे. उत्कृष्ट, निकृष्ट, उदात्त बीभत्स, सभ्य असभ्य, जहाल मवाळ, तापट भोळसट, स्त्रैण संन्याशी, ना धड नारी ना धड पुरूष, अशा सर्व भावनांचे बेमालूम एकीकरण करूनच हिन्दु प्रकृतीने आपल्या पिण्डाचे प्रतिक ऊर्फ ट्रेडमार्क म्हणून

निर्माण केला. हिन्दु कविकल्पनेने शंकराला लावलेली विशेषणे, त्याचे रंगविलेले स्वभाव आणि स्थिति-वर्णन, या गोष्टी सारांशाने पाहिल्या तरी आमच्या विधानाचे मर्म वाचकांना पटेल शंकरावर आरोपिलेले सर्व बरे वाईट गुण दोष हिन्दु प्रकृतीत - किंबहुना अखिल हिन्दवी प्रकृतीत- उत्कटच आढळून येतात. शंकर अर्धा पुरूष आणि अर्धा स्त्री आहे. पूर्वी एकदा पुरुषत्वाची - मर्दानी तेजाची - परमावधि केलेला हिंदुस्थान आज स्त्रैणपणाच्या कमालीत रंगलेला आहे. शंकर जन्माचा दरिद्री; पण 'दारिद्र्यदुःखदहना'साठी 'नमः शिवाय' प्रार्थना करणाऱ्या भक्ताना तो विष्णूची लक्ष्मी हुकमी दान देतो. हिन्दुस्थानाची रोजची दर माणशी प्राप्ती फक्त दीड आणा असली, तरी त्याच्या मस्तकावर व्यापाराचा लघुरुद्राभिषेक अखण्ड चालू ठेवणाऱ्या गोऱ्या बनियांच्या परदेशी गंगाजळ्या दरसाल उतास जाईपर्यंत तुडुंब भरतच आहेत. माणसाना दोन डोळे, शंकराला तीन डोळे. तिसरा डोळा उघडताच सारे विश्व जळून भस्म व्हायचे. पण या त्रितीय नेत्राच्या ज्वलज्जहालपणाची तिरमिरी शांत करण्यासाठी मस्तकावर थंडगार गंगेचा प्रवाह अखण्ड चालूच आहे. हव्या त्या नावडत्या परिस्थितीची क्रान्ति घडविण्यासाठी हिन्दुस्थान वाघाप्रमाणे कितीहि खवळला आणि गगनभेदी गर्जना करू लागला, तरी त्याच्या तत्वज्ञानाची धर्ममुखोत्पन्न गंगा तेव्हाच त्याच्या क्रान्तिकारक घडाडीचा भडका क्षणार्धात बर्फाप्रमाणे थण्डगार पाडते. 'व्याघ्रांबर फणिवरधर' शंकर 'सुंदर' असल्यामुळे, त्यावर कामलोलुपतेचा कोणी आरोप करील तर तो 'मदनारी' आहे. मदनारी असूनहि त्याच्या 'अर्धांगी पार्वती' आहे. गळ्यात 'सुमनाच्या माळा' धारण करणारा 'नररुण्डमालधर'ही आहे, आणि अबीर गुलालासारखी सुवासिक द्रव्ये मुबलक असूनहि 'विभूतीचे उधळण' करण्यात धन्यता मानणारा आहे. उत्तमोत्तम पक्वान्ने हवा तो खर्च करून तयार करायची, पण जेवताना मात्र ती पळस वडाच्या कवडीमोल पत्रावळीवर वाढून घेण्याची हिंदु अभिरुची या विभूतीच्या उधळणात चिकित्सकाला स्पष्ट दिसेल. शंकराची राहणी मसणवटीत. आजूबाजूला पिशाच्चगणांचा गराडा. बसायला बैलोबा नंदी या स्वारींचा केवढा मान! या शांकरीय 'नाईट' साहेबांच्या - सर नंदीबैलाच्या - पार्श्वभागाला प्रथम स्पर्श केल्याशिवाय खुद्दांच्या दर्शनाची सवलत कोणालाच नाहीं. हिन्दुस्थान शंकरभक्त असल्यामुळे, निसर्ग निर्मित बैलांच्या जोडीने माणशी नंदी बैलांची पैदास येथे नेहमीच मुबलक प्रमाणावर असते. कारण नंदीबैल 'कर्पूरगौरा'चा निस्सीम भक्त. जसे दैवत तसा भगत आणि भक्ति तसा मोक्ष, या न्यायाने शंकराच्या नीळकण्ठी संप्रदायाचा अतिरेक

हिन्दुस्थान बडा बैलवाडा

बनविण्यात उमटला तर त्यात नवल कशाचे? तात्पर्य, हिन्दुस्थानची नीळकण्ठी प्रकृति दिव्यांबरी आणि दिगंबरी अशी संमिश्र असल्यामुळे, अमूक एकादी एकरंगी एकजिनशी आणि एकडोळी संस्कृति अथवा प्रवृत्ति तिच्यावर मात करील, हे शक्यच नाही. पूर्वी असे कधी घडले नाही आणि पुढे कधी घडणें शक्य नाही. परसंस्कृतीची गोष्ट कशाला? स्वसंस्कृतीच्या क्षेत्रात एकादी बारीकशी सामाजिक किंवा धार्मिक उत्क्रांन्ति घडविण्याचे प्रयत्न हाणून पाडण्याच्या कामी पिशाच्चांचा वेताळी नंगा नाच घालताना नीळकण्ठी हिन्दु पागलपणाची परासीमा कशी गाठतात, हे नुकत्याच झडलेल्या शारदा बिलाच्या शांकरी शिमग्याने चांगलेच सिद्ध केले आहे.

जन्माने पारशी पण मनाने हिन्दु

अशा समाजसुधारक प. वा. मलबारी शेटजीने याच नीळकण्ठीझमची अनुभवसिद्ध विवंचना "Today the boldest Hindu Reformer admits that to attempt practical reform in his individual capacity is like cutting his own throat and courting the destruction of his innocent family." या उद्‌गारानी व्यक्त करून ठेवलेली आहे. या उद्‌गारांचा भावार्थ असा कीं, कोणी कितीहि धाडशी हिन्दु सुधारक असो, त्याने आपल्या वैयक्तिक जबाबदारीवर कोणतीहि सुधारणा घडवून आणणे म्हणजे आपल्या स्वतःचा गळा कापून घेऊन, आपल्या विनापराधी कुटुंबाचा सत्यानाश करून घेण्यासारखेच आहे, हे त्याला कबूल करणेच भाग आहे.

हिन्दुस्थानाची ही नीळकण्ठी प्रवृत्ति म्हणजे इंग्लण्डचे 'कॉनझर्वेटिझम' (संकुचित मनोवृत्ति) नव्हे. कॉनझर्वेटिझम विरोधाला किंवा दडपणाला माघार घेण्याइतके थोडे ठिसूळ आणि लवचिक तरी असते; पण हिन्दवी नीळकण्ठीझम कट्टर ताठर असून, जन्मसिद्ध सरडेशाहीने विरोधाला किंवा दडपणाला अनेकरंगी भुलभुलावणीने फसवून आंग चुकविते आणि पुन्हा वेळ येताच मूळ ताठरपणातच प्रगट होते. नीळकण्ठीझमला 'ऑर्थाडॉक्सी' (जीर्णमतवाद) हेहि नाव देता यायचे नाही. कारण जीर्णमतवाद काळाच्या कठोर दणक्यात, हळू हळू का होई ना पण नवमतवादाची कात पांघरतो. पण नीळकण्ठीझम ती कात पांघरूनहि आपल्या मूळ स्वभावाचा शांकरी पाशवीपणा सोडीत नाही. गेल्या ३० वर्षांचा नुसता महाराष्ट्राचा सामाजिक धार्मिक इतिहास पाहिला तरी पूर्वीची शेकडो जीर्ण मते आज बरीच बोथटून नव्या मताच्या पाण्याने धारदार बनलेली आढळतात. परंतु त्यातलीहि नीळकण्ठीझमची नांगी कमी पडलेली नाही. कैलासातल्या ऐश्वर्यात शंकर कितीहि रंगला तरी त्याची

मसणवटीची नीळकण्ठी राहणी

त्याला सुटता सुटत नाही. कोणत्याहि क्षेत्रातल्या दोषांबद्दल पूर्ण खात्री पटली तरी त्या दोषांचे विध्वंस करण्याच्या कामी हिन्दु प्रवृत्ति नेहमी मनाचा नाठाळपणा कां व्यक्त करते, याचे गूढ येथेच आहे. सामाजिक सुधारणेच्या तळमळीने विधवा पुनर्विवाहाचा प्रश्न जोराने प्रतिपादणाऱ्या प. वा. जस्टिस रानड्यांवर द्वितीय विवाहाचा प्रसंग येताच, विधवेच्या ऐवजी त्यानी कुमारिकेचे पाणिग्रहण करणे; आणि सगळे वेद वेदान्त ज्योतिष गीता आरपार पचविणाऱ्या प. वा. टिळकानी, केवळ लोकमताच्या भिक्षुकी बुजगावण्याला भिऊन, परदेशगमनाच्या पापासाठी गोमुत्री प्रायश्चित्त घेणे, या आचारविचाराच्या विलक्षण व्यभिचारात ही नीळकण्ठी मेखच प्रधान आहे. समजते उमजते पण प्रसंग पडला कीं

पहिले पाढे पढ पंचावन!

दोष किंवा अन्याय आढळताच त्याचा निःपात करण्याची खुनशी वृत्तीच जेथे ठार मेलेली, तेथे हवा तो अन्याय निमूटपणे सहन करण्यात हिन्दी लोक परमहंसासारखे निर्बुद्ध आणि निर्भाव कां? या प्रश्नातच त्याचे उत्तर आहे. असल्या वृत्तीच्या लोकांवर रशियन बोलशेविझम ऊर्फ कम्युनिझम परिणाम करील, किंवा करीत आहे, असे मानून चालणारे लोक एकतर स्वतःच मोठे लफंगे कारस्थानी असले पाहिजेत, अथवा बिन मेन्दूचे कवटीधारक असले पाहिजेत.

कम्युनिझमला विश्वकुटुंबवाद असे नाव एका हिन्दी पण्डिताने दिले आहे. इतकेच नव्हे, तर या

विश्वकुटुम्बवादाने रशियन समाजाच्या झालेल्या अलौकिक आत्मविकासाची (खरी खोटी) आकर्षक चित्रेहि दाखविण्यात येतात. गुलामगिरीने गांजलेल्या आणि परिस्थितीने नडलेल्या काही हिन्दी लोकांच्या मनावर त्यांच्या आकर्षणाचा थोडाफार परिणामहि होतो. मनावर परिणाम होऊन कल्पनासृष्टीत स्वर्गलोकाची उभारणी झाली, म्हणून स्वर्ग थोडाच हाती येत असतो? हिन्दवी नीळकण्ठीझमची भरारी केवळ विश्वकुटुम्बवादाच्याहि पलीकडे जाऊन, तिने विश्वात्मैक्य भावाचा गौरीशंकर काबीज केल्याला हजारो वर्षे लोटली. हिन्दूंचे औपनिषदिक तत्वज्ञान रशियाच्या कम्युनिष्टी विचारक्रान्तीच्या पुढे केव्हाच जाऊन बसले आहे. विश्वत्मैक्य वादापुढे विश्वकुटुंबवाद म्हणजे

ऐरावतापुढे तटाणीचा नाच

होय. पण उपयोग काय? तत्वज्ञानाच्या भरारीने आकाशाला गवसणी घातली, तरी प्रत्यक्ष व्यवहारात नीळकण्ठीझमची कुरघोडी कायम ती कायमच! सर्वाभूतीं परमेश्वर मानणारे हिन्दु कुत्र्या मांजरांचे मुके घेतात, अन्य धर्मियाना सुद्धा बुटासह देवळातल्या गाभाऱ्यात थेट देवमूर्ती पर्यंत नेऊन भिडवितात, भूतदयेच्या उत्कट उसळीने मरतुकड्या गाईचे गोरक्षण करतात, लूत लागून सडलेल्या कुतरड्यांसाठी पांजरपोळ पोसतात; पण हिन्दु धर्माभिमानी अस्पृश्य मनुष्य देवळाच्या पायरीवर चढला तर यांच्या देवाची आणि धर्माची मान कटकन् मणक्यापाशी मोडते! 'पापयोनयः स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः'च्या उद्धाराचा महामंत्र सांगणाऱ्या गीतेचे रहस्य प्रचण्ड बुद्धीने संशोधन करणाऱ्या प. वा. टिळकांचा हात अस्पृश्यता-विध्वंसनाच्या जाहीरनाम्यावर सही करताना नेमका आखडला.

कम्युनिझम म्हणे समतेची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी अवतरले आहे. स्तुत्य. आणि साऱ्या जगात हा समतेचा सन्देश सक्रीय दृढमूल करण्याचा बोलशेविकांचा हेतू आहे. अभिनन्दनीय. आज हिन्दुस्थानालाहि समतेचीच फार जरूर आहे. पण हा समतेचा महामंत्र शिकण्यासाठी त्याला रशियन उपटशुंभाचाच गुरूगण्डा मनगटावर चढवून घेण्याची जरूरी नाही. ज्या हिन्दु धर्माने विश्वात्म्यैक्यवादाचा त्रिभुवननिनादित डंका पिटला, त्याला काय समतेचीच जाणीव नेमकी नव्हती? सगळ्या उपनिषदाना घुसळून श्रीकृष्णाने जे गीता-नवनीत काढले, त्याचा मुख्य पाया तर 'समत्वम् योगमुच्यते' यावरच. आजचा बोलशेविकांचा कम्युनिष्टी समाज-समता-वाद म्हणजे गीतेच्या समत्व योगाची उष्टी नक्कलच म्हटल्यास काही हरकत नाही. रशियन बोलशेविझम् साऱ्या जगातल्या इम्पिरियालिझम् (झब्बूशाही) विरुद्ध टक्कर देण्यासाठी मस्तकांच्या कवट्याना कणखर बनवीत आहे; गीतेचाहि प्रकार थेट तोच. कौरवांच्या इम्पिरिआलिस्टिक सत्ताबाजीला नेस्तनाबूत करून अखिल जगात समतेचा योग प्रस्थापन करण्यासाठीच, अर्जुनाला गीतोपदेश करून, युद्धाला प्रवृत्त केले. केवळ समत्व योगाच्या प्रसारासाठी श्रीकृष्णाने केलेल्या आटारेट्याचे प्रचण्ड महाभारत बनले. या वरून श्रीकृष्ण हाच पहिला मोठा कम्युनिष्ट कसा नव्हे? समाज समतेसाठी श्रमणारी मण्डळी आणि त्यांचे प्रयत्न जर कम्युनिष्टी म्हणजे निंद्य मानायचे, तर हिन्दुस्थानातली सगळी संतसेना आणि सुधारक लोक रक्तपित्या इतकेच त्याज्य समजून फाशी द्यावे लागतील. समाज-समतेच्या आटारेट्यासाठी हिन्दु तत्वज्ञानाने इतके जंगजंग पछाडले आहेत, कीं त्यांपुढे बोलशेविकांची धडपड आणि वटवट दर्यामे खसखसच ठरेल. पण इतके होऊनहि हिन्दुस्थान आणि हिन्दु समाज म्हणजे विषमतेचा उकीरडा कायम तो कायमच. समत्व योगाची तुतारी फुंकणाऱ्या श्रीकृष्णालाच जेथे जन्मप्राप्त चातुर्वण्याची नीळकण्ठी भोवली, तेथे भागवत

धर्माच्या जोरावर अखिल हिन्दवी समाज भेदातीत करण्याचे हिन्दु मुसलमान सन्तांचे प्रयत्न वांझोटे कां न ठरावे?

चार वर्णांच्या चार लाख जाती

सहज लीलेने प्रसविणाऱ्या नीळकण्ठीझमचा पराक्रम नीट विचारात घेतला कीं, कम्युनिझमचा धौशा ह्मणजे वाहत्या वाऱ्याची एक लाट किंवा धावत्या काळाचा धावरा देखावा, यापेक्षा त्याची विशेष दख्खल करण्याचे काहीच कारण नाही. हिन्दवी नीळकण्ठीझमने मुके आंधळे पांगळे आणि थोटे बनवून ठेवलेल्या दुर्बळाना रशिया कसले मोठे साह्य करणार?

(पुढे चालू.)

□□□

लेख

हिन्दु विधवांचा प्रश्न

(पूर्वार्ध)

या प्रश्नाविषयी सुधारक मण्डळीनी गेली ५० वर्षे बरीच माथेफोड केली, परंतु तो सुटावा तसा मुळीच सुटलेला दिसत नाही. आज इस्लामी आणि क्रिस्ती संघटनांच्या सर्वश्रुत चढाईमुळे, हिन्दु संघटनवाल्यांचे लक्ष्य या प्रश्नाकडे बरेच वेधल्यासारखे दिसत आहे खरे, पण त्यांच्यात इतर अनेक उद्देशानी सामील झालेल्या जीर्णमतवादी लोकांचा भरणाच विशेष असल्यामुळे, या प्रश्नाची उडी केवळ शाब्दिक सहानुभूतीच्या ठरावीक कुंपणापलीकडे जाईल, असे आम्हाला मुळीच वाटत नाही. हिन्दु महासभेच्या छपराखाली जमा झालेल्या अनेक कार्यकर्त्यांची पूर्वपीठिका लक्ष्यात घेतली म्हणजे शुद्धी संघटनाच्या अनिवार्य आवश्यकतेला इष्टापत्ति मानून चाललेल्या त्यांच्या नवमतवादी विद्यमान आकाण्डताण्डवाचे कौतुक बऱ्याच सावधगिरीनेच केले पाहिजे. 'हिन्दु तितका टिकवावा' एवढ्याच क्षुद्र सबबीवर हिन्दु संघटनाच्या उलाढाली करणारानी, क्रिस्ती आणि विशेषतः इस्लामी मिशनऱ्यांच्या जाळ्यात हिन्दु विधवा सापडू नयेत, इतक्याच विवंचनेने हिन्दु विधवांच्या संगोपनाचा प्रयत्न केला, म्हणजे हिन्दु विधवांचा प्रश्न समाधानकारक सुटेल, असा मुळीच भरंसा देता येणार नाही. उपयुक्ततावादाच्या धोरणाने चालविलेल्या चळवळी तात्पुरत्या ठीक असतात. पण त्यामुळे त्या अखेर यशवन्त होतीलच, अशी हमी देणे घेणे धाडसाचे आहे. विधवा-उद्धाराच्या गेल्या अर्धशतकाच्या सुधारकांच्या तोण्डपाटिलक्या आणि आजच्या संघटनवाल्यांच्या खटपटी यांत फारसा भेद काहीच नाही. जी एकाची वासलाद लागली, तीच दुसऱ्याची लागून, हा प्रश्न आहे तसाच कायम भयंकर राहणार. इतकेच नव्हे तर तो दिवस न् दिवस विशेष भानगडीचा आणि बिकट होत जाणार. सामाजिक दोष विध्वंसनाच्या बाबतीत हिन्दू समाज म्हणजे जळत्या घरात झोपणारा आणि प्राण जाण्याच्या क्षणाला गोप्रदानाचे पुण्य शोधणारा परमहंसच म्हटला तरी चालेल. सुधारकांकडे पाहावे तों ते सारे एकजात पिचक्या पाठकण्याचे. विधवा-पुनर्विवाह-कायद्याचा वार्षिक स्मृतिदिन साजरा करावा, खूप मोठमोठी व्याख्याने द्यावी, आणि घरोघर चालते व्हावे, या पलीकडे कार्यक्रम नाही. लक्ष्यात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे असल्या सभाना विधुरांपेक्षा सपत्निकांची आणि विधवांपेक्षा सवाष्णींचीच गर्दी जास्त असते.

ज्यांच्या जीविताचा प्रश्न विशेष महत्वाचा, त्या साऱ्या विधवा घरोघर आपल्या कर्मप्राप्त केरसुणीच्या कोपऱ्यात! सुधारणेच्या मोठमोठ्या गप्पा मारणाऱ्यांच्याहि विधवा मुलींची आणि बहिणींची हीच अवस्था. विधवा-पुनर्विवाहाचे मण्डन करणारा श्रुति-स्मृति-पुराणोक्त उताऱ्यानी खच्चून भरलेला एक महाग्रंथ निर्माण करणाऱ्या एका महापण्डिताच्या भाचीने गुदस्त साली पोट पाडले. 'माझ्या पेनशनला कदाचित् बाध येईल' या भीतीने या राजनिष्ठ मानवी श्वानाने आपण होऊन पोलीसात वर्दी दिली. बाईला सक्त मजुरीची शिक्षा झाली. पांढरपेशा जातीतली बाई! तिने तुरुंगात आत्महत्त्या करून आपल्या कष्टमय जीविताचा अंत केला. शेण्डीवाल्या कर्मठाने हे बदकर्म केले असते, तर त्यात नवलाला जागाच नसती, पण विधवांच्या कैवारावर जीभ लेखणीची टोके झिजविण्यात चौपट बळ खर्च करणाऱ्याची ही कृति सुधारकब्रुवांच्या बेहिमतीपणाची चांगलीच खात्री पटविते.

श्रुति स्मृति पुराणादि पाचकळ पातड्यांच्या आधाराने विधवांविषयी आस्ति नास्ति चर्चा आजवर रगड झाली. वेद देवाचे सुस्कारे असोत. नाहीतर शिंका असोत. स्मृत्या मनु याज्ञवल्क्याच्या अखण्ड सवाष्णी असोत नाहीतर अखण्ड गंगाभागीरथ्या असोत. पुराणे कोणा जिवन्त प्राण्यांचे प्राण असोत नाहीतर त्यांच्या अकलेची घाण असो. अतःपर या जुनाट भाण्डवलावर नव्या काळचा जीवनसंसार चालणे मुळीच शक्य नाही. या सगळ्या जुन्या पातड्यांच्या भिक्षुकी पावित्र्यावर सर्रास थुंकून, शुद्ध माणुसकीच्या दृष्टीने विधवांचा प्रश्न सोडविण्याचे अट्टहासाचे प्रयत्न झाले पाहिजेत. आचार आणि विचाराच्या व्यभिचारात कुप्रसिद्ध ठरलेल्या मिशाळ मर्दांनी या प्रयत्नात कसूर केली किंवा कच खाल्ली, तर स्वावलंबनाच्या हिमतीने आणि आत्मोद्धाराच्या तिडिकेने स्त्रियानी - विशेषतः विधवानीच - या अट्टहासाला प्रवृत्त झाले पाहिजे. आत्मसंयमनाचा आणि वैराग्याचा नाटकी सफेदा लोकदृष्टीला कितीहि साजिरा गोजिरा दिसत असला, तरी प्रत्यक्ष व्यवहारात विधवांचे जिणे काय शिलामोलाचे होऊन बसले आहे, याची प्रदर्शने खुद्द विधवानीच धिटाईने चव्हाट्यावर आता उघडली पाहिजेत. स्वयंनिर्णयाची आणि व्यक्तिस्वातंत्र्याची फाल्गुनी हाकहाक करणारे हिन्दु लोक, गोठ्यातल्या गाईपेक्षा आणि ओसरीवरच्या कुत्र्यापेक्षाहि विधवाना किती क्षुद्र लेखतात आणि अमानुषपणे वागवितात, याची प्रत्यक्ष दृश्यचित्रे सिनेमाच्या द्वारे जगातल्या साऱ्या राष्ट्रांत दाखविली गेली पाहिजेत. सिनेमाचा प्रश्न मुर्दाड पुरुषांच्या हातातला असल्यामुळे, विधवाना त्या बाबतीत फारशी आशा नाही. तरीहि परिषदांच्या किंवा सामुदायिक विचारप्रदर्शनाच्या इतर अन्य मार्गानी त्यानी आपल्या शारिरिक मानसिक गुलामगिरीचा स्फोट स्वतः होऊन करण्याचा काळ आता आला आहे. आत्मोद्धाराचे शिखर गाठण्याच्या प्रयत्नांत स्पृश्यांच्या नाटकी सहानुभूतीचा आणि पिण्डसिद्ध हरामखोरीचा स्पष्ट अनुभव पटताच, अस्पृश्याना आता जशी कडकडीत स्वावलंबनाची कास धरून, सत्याग्रह हट्टाग्रहाचा निर्वाणीचा मार्ग चोखाळणे भागच पडले, त्याच मार्गाचा अवलंब विधवानी केल्याशिवाय त्यांच्या गुलामगिरीचा अणुरेणूहि कमी होणे शक्य नाही. ''आम्ही गायी जातीच्या । नाहीं आम्हा वाचा'' हा मारवाडी विनयच विधवांच्या कष्टप्रद जीवनाच्या मुळाशी आहे. विनयाचा हा आत्मघातकी उंबरठा धिटाईने ओलाण्डून, आपले निसर्गसिद्ध हक्क मिळविण्यासाठी विधवानीच आता चढाईचे धोरण ठेवले पाहिजे. आई बाप कुटुम्ब जात गोत इत्यादि अनेक चांदेरी सोनेरी तोण्डबेड्या सत्यभामेच्या कडव्या निश्चयाने तोडल्या पाहिजेत. नीति रीतींच्या आणि पाशवी रूढींच्या खुळचट आणि हलकट कल्पना लाथेखाली तुडवून, शुद्ध

माणुसकीच्या धर्माच्या रोखाने आत्मोद्धाराच्या खटपटीला हात घातला पाहिजे. पुरुषांप्रमाणेच

पुनर्विवाह माझा जन्मसिद्ध हक्क आहे

असा अट्टहास ज्या वेळी प्रत्येक विधवा आपल्या बापाला भावाला आणि पालकाला धिटाईने दाखवू लागतील, त्याच वेळी पुढल्या खोलीत विधवा मुलीला 'विविधवृत्त' वाचायला देऊन, स्वयंपाकाच्या मागल्या खोलीत चतुर्थीचे उद्यापन सोडणाऱ्या वयातीत शेण्डीबहाद्दर बापाना ताम्हणभर अक्कल आली तर येईल!

कोणत्याहि विधवेच्या आणि कोणत्याहि विधुराच्या आत्मसंयमनावर आणि चित्तशुद्धीवर प्रबोधनाचा तिळमात्र विश्वास नाही. त्यांच्या नीतिदाक्षिण्याची आणि वैराग्याची कोणी कितीहि घमेण्ड मारली, तरी त्याला उकीरडा फुंकणाऱ्या गर्दभाच्या सर्वश्रुत व्याख्यानापेक्षा विशेष किंमत काहीच नाही. आहार निद्रा भय आणि मैथुन या चार निसर्गधर्मावरच प्राणीमात्राचे जीवन सर्वस्वी अवलंबून आहे. यांपैकी एकाहि बाबीची मनाई कोणी कोणाला करण्याचा अधिकार नाही. माणुसकीच्या काटेतोल दृष्टीने जर सरकारी कायद्यांची रचना असती, तर आहार निद्रा भय मैथुनाचा प्रतिबंध 'सृष्टीविरुद्ध गुन्ह्या'च्या कलमात खात्रीने समाविष्ट झाला असता. प्रत्यक्ष जीव घेण्यापेक्षा, जीव सहज जाऊ शकेल इतक्या भीतीचा प्राणान्तिक छळ करून, खुनासारख्या गुन्ह्यांचा शोध लावण्यासाठी, आहार बन्द करणे, झोप घेऊ न देणे, किंवा (बर्फाच्या पेटीत मानेपर्यंत नागडे निजवून ठेवणे, असले) एकादे प्राणान्तिक असह्य भय दाखविणे, वगैरे क्रिया सत्यशोधक पोलीसमार्तण्ड आरोपीवर करून, गुन्ह्यांच्या खऱ्या ब्रम्हदेवाचा पत्ता लावतात, अशी बोलवा आहे. गुन्हा हुडकण्याच्या गुळवेल सत्वाची ही क्रिया जर खरी मानली, तर त्यावरून या चार निसर्गधर्मांचे खरे महत्व, श्रुतिस्मृतिप्रामाण्याच्या भारवाहकांपेक्षा, पोलीस खात्यालाच विशेष कळते, असे मानल्या खेरीज सुटकाच नाही. अर्थात् कोणत्याहि स्त्री पुरुषाला आहार निद्रा भयाच्या जोडीनेच

मैथुनाचा प्रतिबंध करण्याचा अधिकार

कोणालाहि नाही. या चार धर्मांचे प्रमाण प्रत्येक व्यक्ती आपापल्या प्रकृतीच्या कमजास्त मगदुराप्रमाणे हवे तितके फार थोडे ठरवील. पण त्यात कोणाचा कसलाहि प्रतिकार निसर्गधर्म मुळीच चालू देणार नाही. मैथुनाच्या बाबतीत देहाला प्रतिबन्ध झाला, तरी मनाने त्याची सिद्धी साधायला माणसांचा निसर्गधर्म कमी करीत नाही. उगाच नीतिमत्तेच्या परीटघडी गप्पा मारण्याची तसदी कोणी घेऊ नये. उलट, प्रत्यक्ष शारिरीक मैथुनापेक्षा, ही मानसिक मैथुनाची बळजबरी सर्वच दृष्टीने किती भयंकर असते, आणि मानसिक मैथुनाची परमावधीची लाट अखेर भ्रूण किंवा आत्महत्येच्या अमानुष अत्याचारात कशी फुटते, याचे दाखले गावोगाव, आळोआळी चाळोचाळी घरोघर आणि रस्तोरस्ती डोळे उघडे ठेऊन पाहाणाराला शेकड्यावारी दिसतील. पण आमचे रूढीवाले शहाणे, विधवांची डोकी भादरली कीं त्यांची मैथुन प्रवृत्ति निसर्गधर्माच्या लिष्टातून नष्ट झाली, असे मानण्याइतके मानसशास्त्रमार्तण्ड! पुरुषानी मात्र एक बायको मरताच दुसऱ्या

लग्नाचा साखरपुडा मसणवटीत

साजरा केला, तर वेद पेटत नाहीत, स्मृत्यांची होळी होत नाही, पुराणांचा प्राण जात नाही, समाजांतल्या एकाहि नीतिमंताच्या हृदयात विवेकाचा धरणीकम्प होत नाही. स्त्रियाना पुरुषांपेक्षा

आठपट काम म्हणून एकीकडे स्मृतिपुराणोक्त त्रयराशिकी बोम्बाबोम्ब करायची, आणि दुसरीकडे त्याच हातातोण्डानी विधवांच्या पुनर्विवाहाला वेदोक्त प्रतिबन्ध करायचा! एकपट कामवासनेच्या पुरुषाना जर डझनभर बायकांची सवलत, तर आठपट कामवासनेच्या स्त्रियाना कितीपट द्रौपदी बनता येईल, याचा या शहाण्याना व्यस्त प्रमाणात बिनचुक विसर पडतो. रूढी हवे ते शेण खात असली, आणि हव्या त्या सैतानी कदरीची असली, तरी निसर्गाचा धर्म कधी ना कधी रूढीला धाब्यावर बसविल्याशिवाय रहातच नाही. तरूण विधवांची पार्सले, जळत्या शेगड्याप्रमाणे, घरात बाळगणाऱ्या शेण्डीजानवीबहाद्दर बापानी आणि पालकानी निसर्ग धर्माच्या कदरीकडे कितीहि पाठ फिरवली, तरी आज ना उद्या त्या विधवांच्या पोटाचा प्रश्न (पोटापाण्याचा नव्हे!) आपण होऊन त्यांच्यापुढे दत्त उभा राहिल्याशिवाय राहणार नाही. पण्ढरपुरची गुपचुप वारी म्हणजे नीतिमत्तेच्या बढाईची एकतारी नव्हे!

विधवांविषयी दाद घ्या अगर नका घेऊ, काही बोला वा नका बोलू, त्यांच्या निसर्गधर्माच्या भानगडी काही गप्प बसत नाहीत. पुष्कळशा पडद्याआड दडल्या जातात, तर कित्येक वेळा त्या पोलीस कोर्टापर्यन्त लांबरुंद होतात. १५-२० वर्षांपूर्वीपर्यंत अपत्यहत्त्येच्या बाबतीत विधवांकडे बोटे दाखविली जात असत. पण अलीकडे तरूण कुमारिकानीहि आपल्या विधवा बहिणीशी

अपत्यहत्त्येचा चढाओढीचा सामना

देण्याची सुरुवात केली आहे. कुमारिकांच्या या कर्णकुन्तिपणाला हुण्ड्याचा रक्तपित्या प्रघातच मुख्यतः जबाबदार आहे. दारिद्र्य जसे घोडदौडीने वाढत आहे, (आणि पाण्ढरपेश्या कारकुण्ड्या जातीचा मोक्ष दारिद्र्यातच होत असतो.) तसतशी हुण्डा हबकण्याची पाशवी प्रवृत्ति लग्नाळू तरुणांत बेफाम वाढत आहे. अर्थात् गरीब आईबापांच्या तरण्याताठ्या कुमारिका मुलीना (विधवांप्रमाणेच) लग्नाच्या निराशेने वाकड्या पावलाची पायवाट चोखाळावी लागली, तर त्यात त्याना कोणत्या स्मृतीच्या कलमाखाली समाजाने किंवा सरकारने दोष द्यायचा? हुण्ड्यामुळे लग्नाच्या बाबतीत निराश झालेल्या कुमारिका, आणि पुनर्विवाहाची जबाबदारी कोणीच घेण्याची रूढी श्रुतिस्मृति प्रासादिक हिन्दु धर्माने प्रसविली नसल्यामुळे, घरांतल्या घरांत कुझणाऱ्या विधवा यांच्या जिण्याकडे खुद्द त्यांचे, आईबापांचे, नातेवाईकांचे, समाजाचे आणि सरकारचे दुर्लक्ष्य असल्यामुळे, आज त्या जिण्याचा ओघ हळुहळू नकळत क्रिश्चन इस्लामी मिशेन, पठाणांची पकड आणि सरतेशेवटी बुरखेबाज कुण्ठणखाने येथपर्यंत ओघळू लागला आहे. तोण्डावर उपरण्याचा पदर लाऊन नेत्रपल्लवी भाषेने कुजबुजण्याचे दिवस आता गेले. आता समाज-विध्वंसक दोषांची दुखणी सार्वजनिक चव्हाट्यांवर नागडी उघडी टांगण्याचा काळ आला आहे. कर्दनकाळ काळाने भयंकर परिस्थितीचा

डेंजर सिग्नलचा लाल बावटा

अखिल हिन्दु समाजाना दाखविला आहे. मनाची लाज मेली असली, तरी जगात जगण्यापुरती जनाची लाज शिल्लक असल्यास त्यानी विधवांच्या प्रश्नाकडे फिरवलेली पाठ वळवून, त्यांच्या पोटांकडे माणुसकीने पहावे. एकाद्या कुन्तीने कर्णाला जन्म दिला, एकादी कुमारी मुसलमान खाटकाच्या लव्हाळ्यात अडकली, एकाद्या विधवेची अपत्यहत्त्या उघडकीस येऊन तिला शिक्षा झाली आणि येरवड्याच्या किंवा डोंगरीच्या तुरुंगात फास घेऊन तिने आपले जिणे कायमचे मिटविले, किंवा दुसऱ्या एकाद्या विधवेने चाण्डाळ जनमताची पर्वा न करता, पोटचा गोळा देव मानून वाढविला, तर असल्या

गोष्टींबद्दल, घरचे खाऊन लष्करच्या भाकरी भाजणाऱ्यानी

चहाटळ चहाड्यांची चांभारचतुराई

करण्यापेक्षा, किंवा नीतिमत्तेच्या नाटकी अवसानाने त्या अभागी भगिनीच्या बदनामीची जाहीरात गावभर डंका वाजवून देण्याचा पुरुषी कुण्ठणपणा करण्यापेक्षा, हिन्दु स्त्रियांच्या अब्रुरक्षणाचे माणुसकीचे अन्य उपाय हिन्दु जातपुढाऱ्याना सुचू नयेत, ही आमची स्वराज्याची लायकी पाहून, इतर संस्कृत राष्ट्रानी आणि समाजानी आमच्यावर थुःत् तुमच्या जिनगानीवरचा प्रयोग केला, तर त्यात त्यांचा काय दोष?

केवळ विद्यादानाने कुमारिकांचे कर्णमातृत्व टळणार नाही. त्यासाठी हुण्ड्याचा मुर्दाच पाडला पाहिजे. मास्तरीण नर्शीण किंवा सुयीण बनवून विधवांचे जिणे सुधारणार नाही. त्यांचे पुनर्विवाहच लावले पाहिजेत. मास्तरीण नर्शीण किंवा सुयीण या धंद्यांची सबब म्हणजे विधवांच्या कामनिवृत्तीची विमापॉलिशी नव्हे. या धंद्यानी फार झाले तर त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय होते. पण बाह्य जगातल्या व्यवहारांत त्याना पदोपदी भेटणाऱ्या पुरुषी आकर्षणापासून त्यांच्या मनोव्यापाराची आयात निर्गत 'कण्ट्रोल' करण्याचे कोणते साधन या तीन धंद्याच्या अभ्यासक्रमात असते? या शिवाय ब्राम्हण कायस्थादि पाण्ढरपेश्या समाजांत स्त्रियांचा आणखी एक दुर्दैवी वर्ग आहे. करता सावरता पुरूष मेल्यानंतर मुलांबाळांसह किंवा एकेकट्या उपाशी मरणाऱ्या बायांचा हा वर्ग होय. या बाया प्रथमतः काही दिवस अब्रूच्या खोट्या भयाने कसे तरी दिवस कण्ठतात. पण पुढे पोटाची खाच भरण्यासाठी गिरणीचा रस्ता सुधारतात. ज्या पोराबाळवाल्या इभ्रतदार बायाना गिरणीतल्या नोकरीशी संलग्न असलेल्या अनेक भ्रष्टाचाराची चिळस येते, किंवा तितक्या काटकोन चौकोनात वाकडे पाऊल ठेवण्याची कुशलता सफाईत साधत नाही अथवा धीर होत नाही, त्या निर्वाणीला क्रिश्चन मिशनचा आश्रय घेतात. कित्येक तर

'ते गेले न् जग मेले'

अशा मगजफाट निर्धाराने पठाण किंवा इस्लाम मिशनचा दरवाजा आपण होऊन शोधीत जातात. हिन्दूंच्या तरूण विधवा, असहाय कुमारिका आणि पोरबाळवाल्या स्त्रिया याना फुस लावून बाटविण्याचे धन्दे क्रिस्ती आणि इस्लाम मिशने वाढत्या प्रमाणावर चालवीत आहेत. मागासलेल्या व अस्पृश्य जातीतल्या स्त्रियांचे एकट्या मुंबई शहरातले हे प्रमाण रोजी अजमासे २५ ते ३० असावे, असा एका सक्रीय समाजसेवकाचा अनुभव आहे. पांढरपेश्या मध्यम वर्गांवरहि त्यांची जोराची झडप आहे. अशा परिस्थितीत एकाद्या विधवेचे पाऊल, हलकट रूढीच्या दृष्टीने, वाकडे पडले, तर तिच्याबद्दल गावभर बोम्बाबोम्ब करणाऱ्या शहाण्यानी, आणि तिला घरातल्या घरात पाशवी क्रूरतेने ठेचणाऱ्या पालकानी, थोडे माणुसकीने वागण्याचा यत्न केला, तर शान्त विवेकाच्या शोधनप्रकाशात असल्या वाकड्या पावलासाठी सुद्धा एकादा सरळ राजमान्य रस्ता आढळणार नाही, इतके जगातल्य विचार-बाजाराचे तीनतेरा आजच उडालेले नाहीत.

मागासलेल्या अनेक जातींत पुनर्विवाहाचा प्रघात बराच असल्यामुळे, अपत्यहत्त्या किंवा विधवांचा छळ यांची उदाहरणे फार थोडी घडतात; आणि जी घडतात, त्यांच्या मुळांशी अब्रूपेक्षा निराळ्याच इतर भयंकर भानगडी असतात. पण पुढारलेपणाची मिजास मारणाऱ्या ब्राह्मण कायस्थादि पांढरपेश्या जातींत

विधवांच्या घरगुति आणि सामाजिक छळांचे मासले इतके घाणेरडे आणि गुप्त-अत्याचारी आढळून येतात कीं त्यापुढे मध्ययुगीन् युरोपातले इंक्विझिशनचे राजमान्य अत्याचार बरेच सौम्य ठरतील. मुक्या जनावरांप्रमाणे निर्बुद्धावस्थेत दिवस कण्ठणाऱ्या अनाडी विधवा तोण्डाबाहेर शब्द काढीत नाहीत, त्याना तसे करण्यास संधीच मिळत नाही, म्हणून ठीक आहे. पण जर का कधी काळी या भानगडी चव्हाट्यावर आल्या, तर मिशाना पीळ देत सुविद्यतेची आणि सुधारणेची घमेण्ड मारीत मिरविणारे दरोबस्त पांढरपेश्या जातीतले शेकडो वीरपीर येरवड्यात खडी फोडतानाच आढळतील. माटुंगा (मुंबई) येथील श्रद्धानन्द अनाथ महिलाश्रम या संस्थेचा एक नुकताच बाहेर पडलेला रिपोर्ट आमचे मित्र डॉ. एस्. एन्. खारकर (दादर) यांच्याकडे सहजगत्या पाहाण्यास मिळाला. त्यात या आश्रमाने वाचविलेल्या ६ अभागी तरुणींच्या हाल अपेष्टांच्या कहाण्या थोडक्यात दिलेल्या आहेत. या तरुणींची जातवारीः- १ ब्राह्मण, १ महार, २ मराठा, १ प्रभु आणि १ मद्राशी ब्राह्मण, अशी आहे. या कहाण्यांपैकी ब्राह्मण आणि कायस्थ प्रभु तरुणींची कर्मकथा मुद्दाम येथे उद्धृत करीत आहोत. त्यावरून आमच्या वरील विधानांच्या सत्यतेची वाचकाना बरीच अटकळ बांधता येईल भावार्थ :-

''एक ब्राह्मण मुलगी. आई लहानपणीच वारली. बापाने एक आंगवस्त्र ठेवले. थोरली बहीण विधवा होती. तिने बापाच्या घराला रामराम ठोकला आणि एका मुसलमानाबरोबर राहण्यास गेली. या मुलीचे लग्न १५ व्या वर्षी झाले. स्वभावाने साधी भोळी असल्यामुळे नवरा, सासुसासरा, बाप आणि त्याची रखेली यानी तिचा मनस्वी छळ केला. ते तिला उपाशी ठेवीत आणि ढोरासारखे मारीत. असल्या पाशवी छळाचा अतिरेक सहन होई ना, तेव्हा ती बिचारी दूरच्या एका नातेवाईकाकडे पळून गेली. त्याने तिला लगेच धुडकावून दिले. बिचारीला कोठेच कोणी थारा देई ना. एकटी कष्टी आणि भुकेने व्याकूळ होऊन, तिने एका रेलवे स्टेशनावरच्या पोर्टराजवळ अन्नाची याचना केली. तो मुसलमान होता. त्याने तिला अन्न आणि आसरा दिला आणि ती त्याच्या घरी एक महिनाभर राहिली. इतक्यात तिच्या भावाने शोध काढून तिला घरी परत आणले. लगेच उपासमार मारपीट आणि छळाची पुन्हा सुरुवात झाली. म्हणून ती त्या रेलवे पोर्टराच्या आश्रयासाठी पुन्हा एकदा पळून जात असता, वाटेत श्रद्धानन्द आश्रमाचा एजण्ट भेटला. त्याने तिला आश्रमात आणली. आता ती आश्रमात शिक्षण घेत आहे, आणि कृतज्ञ व समाधानी वृत्तीने राहून सुधारत आहे.''

''२५ वर्षाची कायस्थ प्रभू स्त्री. वयाच्या २० व्या वर्षी विधवा झाली. या उच्च जातीत (?) पुनर्विवाहाची सवलत नाही आणि नवऱ्यानेहि काही पैसा मागे ठेविला नाही. म्हणून ती आपल्या नातेवाईकांच्या आश्रयाला राहण्यास गेली. नातेवाईकांपैकी एका धूर्ताने तिच्या अनाथ व असहाय अवस्थेचा गैरफायदा घेऊन तिचे पोट फुगविले. या अधमाला आपले दृष्कृत्य कबूल करण्याचे नैतिक धैर्य कोठले असणार? अर्थात् त्या बिचारीचा छळ सुरू झाला. बाळंत होताच १३ व्या दिवशी नातेवाईकानी तिला आपल्या मुलासह घरातून हाकलून दिले. या वेळी तिची अवस्था किती भयंकर! बाळंतपणाचा प्राणान्तिक आजार, दुःखांच्या डागण्यानी मन व्याकूळ झालेले, पश्चात्तापाची परमावधि! आसपासच्या काही दयाळू शेजारी मण्डळीनी तिला जर श्रद्धानन्द आश्रमाची वाट दाखविली नसती तर इतर हजारो हतभागी हिन्दु भगिनींप्रमाणे तिच्या आणि तिच्या अर्भकाचा घात झाला असता. दोघेही आज आश्रमात आहेत. ती बाई पश्चात्तापपुनित होऊन मोठ्या कृतज्ञ भावनेने आश्रमातील कामकाज

करून समाधानाने राहात आहे. तिला शिक्षणहि देण्यात येत असते. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे, या बाईच्या अधःपाताला वास्तवीक जबाबदार असलेला नराधम कसल्याहि शिक्षेपासून बेछुट सुटतो; इतकेच नव्हे तर हिन्दु समाजात प्रतिष्ठित जण्टलमन म्हणून मिरवतो!''

बाकीच्या स्त्रियांच्या हकिकती तर यापेक्षाहि फार हृदयद्रावक आहेत. शितावरून भाताची परीक्षा या न्यायाने, श्रद्धानन्द आश्रमासारख्या नवीन निघालेल्या चिमुकल्या संस्थेने वाचविलेल्या स्त्रियांच्या कौटुम्बिक आणि सामाजिक छळांच्या हकिकती जर एवढ्या भयंकर, तर एकंदर हिन्दु समाजांत असल्या दुर्दैवी स्त्रियांच्या छळांच्या होळ्या किती रावणी धूम धडाक्याने पेटल्या असल्या पाहिजेत, याची वाचकाना पुष्कळच कल्पना करता येईल.

□□□

लेख

संकीर्ण समालोचन

आपल्या हक्काना जागले पाहिजे

परावलंबी हिन्दुस्थानातील व्यक्तिमात्राला विशेष हक्क अथवा अधिकार ते कसले असणार? इतर स्वतंत्र राष्ट्रांतील नागरीकांच्या हक्कांच्या मानाने आमच्या हक्कांची तुलना करण्यात काही अर्थच नाही. तथापि प्राप्त परिस्थितीतहि जे काही हक्क आम्हाला मिळाले आहेत, ते सांभाळून बजावण्याचीहि हिंमत शेकडा ९८ लोकांत दिसून येत नाही. ही मनाची दुर्बलता आमच्या कुप्रसिद्ध सहनशीलपणाचा परिणाम आहे. अन्याय झाला किंवा आपल्या लहान मोठ्या वाजवी हक्कांचे कोणी जाणते नेणतेपणाने अतिक्रमण केले, तर तेवढ्यासाठी शक्य तो प्रतिकार करून, हक्क सांभाळण्याची तिरमिरीच हिन्दु लोकांत दिसून येत नाही. मुंबईसारख्या बकाली शहरांत 'मला काय त्याचे' ही भ्याड प्रवृत्ति अनेक प्रसंगी दिसून येते. एकाद्या पारशावर कोणी हल्ला केला तर आजूबाजूचे सगळे पारशी धावून येतात. एकाद्या परदेशी पठाणाशी कोणी हिन्दु हुजत घालू लागला तर शेकडो स्वदेशी मुसलमान त्या पठाणाच्या पाठींब्यासाठी भराभर जमा होतात; पण त्या हिन्दुच्या मदतीला एकसुद्धा हिन्दु उभा राहात नाही. उलट, ''कशाला बरे त्या आडदाण्ड पठाणाशी या मूर्खाने हुजत घालावी?'' असा वेदान्त मोठ्याने बरळून तो मुर्दाडपणाने आपला रस्ता सुधारतो. रस्त्यात सायकलची टक्कर लागली तर पादचारित्वाचा आपला नागरिकी हक्क बजावण्यासाठी आणि नुकसान-भरपाईसाठी त्या सायकल्याला पोलीसकोर्ट दाखविण्याऐवजी, गचाळ हिन्दु दैवाला दोष देत लंगडत घरी जातो. यदाकदाचित् मध्ये पोलीस आलाच तर 'मला काही तक्रार करायची नाही' असा जबाब देऊन तेथून निसटण्याचीच धांदल पहिली करतो. आमच्या सहनशीलतेला इतकी लांबलचक शिंगे फुटलेली आहेत की रेलवेचे तिकीट-कलेक्टर तिसऱ्या वर्गाच्या शेकडो उतारूना शेळ्यामेण्ढ्याप्रमाणे हव्या तसल्या उठाबशा काढायला लावतात, कित्येकाना चोपहि देतात, तरी अजागळ हिन्दु एकदाहि हात उगारून त्या बेकायदेशीर अतिक्रमाचा प्रतिकार करीत नाहीत. हा प्रकार अशिक्षितांत आढळल्यास थोडा तरी क्षम्य मानता येईल, पण जेव्हा चांगले शिकले सवरलेले लोक सुद्धा रेलवेवरचा आणि इतर ठिकाणचा अन्याय डोळे मिटून सहन करतात, तेव्हा मात्र त्यांच्या बुद्धिमांद्याची तटस्थ मुसलमानानाहि कीव येते. टोल्याला टोला लगावण्याची गोष्ट

सोडून दिली, तरी गचडी किंवा अंधाराच्या डब्यांतून प्रवास करतानाहि उतारूंच्या वाजवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी, रेलवे अधिकाऱ्याना रेलवेचाच कायदा ठिकच्या ठिकाणी शिकविण्याची धमक हजारात एकादाच हिन्दु कधिकाळी दाखवितो. असले उदाहरण पाहून ऐकून तरी परमहंस हिन्दूंच्या थण्डगार पडलेल्या मनोवृत्तीत हक्क-संरक्षणाची थोडीतरी गरम तिरमिरी उत्पन्न होईल, या आशेने धुळे येथील प्रबोध साप्ताहिकाने नुकतीच 'रेलवे-वृत्त' मथळ्याखाली दिलेली प्रबोधक माहिती प्रबोधनाच्या वाचकांच्या सेवेला रुजू करीत आहोत.

गेल्या दहा वर्षात बनोशाचे श्री. पोपटलाला शहा यांनी निदान तरी दीडशे वेळां आगगाडीच्या डब्यांतील सांखळी ओढून गाडी थांबविली असेल. प्रत्येक वेळी अर्थात् ते प्रथम रेल्वे अधिकाऱ्यांकडे तक्रार करीत व तक्रार दूर न झाल्यासच या उपायाचा त्यांनी अवलंब केलेला आहे. त्यांनी कोणकोणत्या प्रसंगी सांखळी ओढिली हें लोकांच्या माहितीसाठी खालीं देत आहों

(१) डब्यांत असावयाच्या संख्येपेक्षां अधिक उतारूंची गर्दी झाल्यामुळें;

(२) गाडी स्टेशनावर प्लॅटफॉर्म पुढे येऊन उभी न राहतां बाजूस उभी राहिल्यामुळें;

(३) डब्यांत रात्रीं दिवा नसल्यामुळें;

(४) डब्यातील शौचकूप स्वच्छ नसल्याचें स्टेशनवरील अधिकाऱ्यांचे नजरेस आणिलें असतांहि ते स्वच्छ न केल्यामुळें;

(५) शौचकूपांतील नळास पाणी नसल्याचें नजरेस आणूनही पाण्याची व्यवस्था न झाल्यामुळें

(६) स्टेशनवर प्यावयास पाणी मिळण्याची व्यवस्था न झाल्यामुळें;

(७) स्त्रियांचे डब्यात पुरुष उतारू बसल्यामुळें;

(९) डब्यांतील गर्दीमुळें उतरण्याच्या स्टेशनवर उतरण्यास सवड न मिळतांच गाडी चालू झाल्यामुळें

(१०) माणसें बसत असतां ती सामानासुद्धां सर्व बसली नाहींत तोंच त्यांजकडे लक्ष न देतां व पूर्व सूचना न देतां मेल गाडी चालू झाल्यामुळें;

(११) दारू प्यायलेल्या व अश्लील वर्तन करणाऱ्या उतारूपासून इतरांस त्रास होत असतां त्यास डब्यांतून काढून न दिल्यामुळे;

(१२) विडी ओढणारांपासून त्रास होत असतां त्यांना काढून न दिल्यामुळे;

(१३) पठाण जागा अडवून निजला व इतरांस जागा देत नाही ही गोष्ट रेल्वे अधिकाऱ्यांच्या लक्षांत आणिली असतांहि त्यांनी लक्ष न दिल्यामुळे;

(१४) उतरण्याच्या स्टेशनावर डब्याचा दरवाजा कुलुप लावून बंद असून तो गार्ड अगर अन्य कोणीही येऊन उघडून न दिल्यामुळे;

(१५) चालू गाडीचे दार आपोआप उघडत असून ते घट्ट बंद होत नसल्यामुळे;

(१६) म्हातारा इसम, बाईमनुष्य अथवा मूल पाणी पिण्यासाठी अगर अन्य कारणाने खाली उतरले असतां गाडी चालू होऊन त्याची इतरापासून ताटातूट झाल्यामुळे;

भटी पुराणानी घेतलेला बळी

मूठभर शिकलेले लोक आणि त्यांतले किंचित थोडे सुधारक लोक सध्या जरी पुराणांच्या पातड्यांची पर्वा ठेवीत नसले, तरी पुराणांतला शब्द न् शब्द खरा मानून चालणाऱ्या आंधळ्या भाविकांची

संख्या हिन्दुस्थानात कल्पनातीत आहे. भटी पुराणांत ईश्वरप्राप्तीची जी अनेक खुळचट सोगेढोंगे रंगवून ठेवलेली आहेत, त्यांतले कित्येक प्रकार बीभत्स, अनैतिक, अनैसर्गिक असूनहि, कित्येक तर राक्षसी आणि आत्मघातकी आहेत. वृत्तपत्रांत नित्य येणाऱ्या पोलीस-खटल्यांच्या हकिकती नीट लक्ष्य देऊन पाहिल्या तर धर्माच्या आणि देवाच्या नावावर होणारे खून आणि आत्महत्त्या अलिकडे बऱ्याच उघडकीला येऊ लागल्या आहेत. एका बाईला पोर होत नव्हते म्हणून म्हणे तिने शेजारणीच्या मुलाला कापून त्याच्या प्रेतावर तिने उभ्याने स्नान केले. दुसरीने एका तिऱ्हाइताच्या मुलाची आपल्या कुळस्वामीच्या भरल्या माण्डापुढे बोकडासारखी कन्दुरी केली. तिसऱ्या एका बालीस्टराने आपली तरणीताठी बायको आणि अविवाहित बहीण गुरुमहाराजाना दान दिली आणि त्या हलकटाने 'स्त्रिया भोग्य वस्तु आहेत' या पुराणोक्त आधाराने त्यांचा स्वीकारहि केला. चवथ्या गधड्याने लग्न होताच आपली बायको गुरूमहाराजांच्या मठात 'सेवेला' ठेऊन, आपण लिम्बाचा पाला खाऊन धूम्राग्नि साधनात मग्न बसला. अशी शेकडो बेशरम उदाहरणे नित्य गावोगाव घडत आहेत. त्यांपैकी फारच थोडी उघडकीला येतात आणि वृत्तपत्रांच्या द्वारे लोकाना कळतात. कळली, तरी त्यावर विचार करणारी मण्डळी दोन नाहीतर चार. वृत्तपत्रकार नेहमी गढलेले स्वराज्यासारख्या महान विषयात! ते असल्या अत्याचारांची चार दोन ओळींच्या वर्तमानसारात संभावना करून मोकळे होतात. अत्याचार किंवा आत्महत्त्या करणारे महामूर्ख भटी पुराणानी घेतलेले बळी आहेत, ही गोष्ट एकहि पत्रकार कबूल करण्यास धजावत नाही. कारण सगळा भरणा पडला भटी आणि भटाळलेल्या पत्रकारांचा! राजकारणी प्रमेयांची उदाहरणे सुद्धा जे पुराणांच्या पुराव्यानी सोडविणारे, त्यानी पुराणांनी पाचकळविलेल्या अंधश्रद्धाळू जनतेच्या मनावरील पुराणमाहात्म्याचा पगडा उडविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आपल्या आणि आपल्या पत्राच्या अस्तित्वावर निखारे ओतण्यासारखेच आहे. भटलोक इतके अक्कलशून्य असतीलच कसे? शिवलीलामृतातील तिसऱ्या अध्यायाने पाचकळून जाऊन, ईश्वरप्राप्तीसाठी आत्महत्त्या करणाऱ्या एका मूर्खाची हकिकत तरवडी (नगर) येथील दीनमित्र (२७-११-१९२९) साप्ताहिकात करुंदा येथील श्री. पुरभाजी पाटील यानी छापली आहे, तिचा प्रबोधनाच्या वाचकानी शोधनपूर्वक विचार करावा. घरातल्या मण्डळीना आणि शेजारच्या धर्मभोळ्याना ही हकिकत मुद्दाम कळवावी, अशी विनंती आहेः-

''मौजे जांब (निजामस्टेट) येथील बिंबा नांवाच्या एका गृहस्थास, इष्ट वस्तु प्रयत्न न करतां देवानें द्यावी, अशी तीव्रतर इच्छा झाली. आतां इष्ट वस्तु मिळण्यासाठी देवास कसें प्रसन्न करावे, याच्या विचारांत तो गढला. एका भटाने त्याला शिवलीलामृत ग्रंथांतील तिसरा अध्याय कथन केला. अगदी निर्दोष निष्ठा ठेवली तर महादेव आपणास प्रसन्न होईल अशी त्याची खात्री झाली. कारण, शिवलीलामृतांत वर्णन केलेला प्रकार खोटा कोठून असायला? देवाच्या पराक्रमाचा हा ग्रंथ. यांत खोट्या गोष्टी नसायच्याच. लोकांत तितकी बळकट व निष्ठावंत भक्ति नाही, त्यांना असली कथा खोटी वाटते. तेव्हा बिंबानें पोत्रा या गांवच्या जुनाट शिवालयांत जाऊन मोठ्या अनन्यभावाने अनुष्ठान मांडले. रात्रंदिवस शिवाचें ध्यान केले; पण शिव कांही प्रसन्न होईना. बिंबास शंका आली की, आपण शिवाची भक्ति अनन्यभावाने करतो, असे महादेवास पटत नसावे. आपली भक्ति वरपांगी आहे, असे महादेवास वाटत असावे. तेव्हा बिंबा ता. ६-१०-१९२९ रोजी महादेवापुढे आपल्याच हाताने आपली मान कापून घेण्यास सिद्ध झाला. त्याला खात्रीने वाटले की, आतां महादेव प्रगट होऊन माझ्या

हातांतील तरवार हिसकावून घेईल! पण तसा रंग दिसेना. पुनः बिंबाला वाटले, आपण जीव देण्यास भितों. अर्थात् आपण कच्चा भक्त, ह्मणून देव प्रगट होत नसेल. असा क्षणमात्र विचार करून बिंबाने तरवारीचा हात मानेवर जोराने मारला. मानेतून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. बिंबा बेशुद्ध होऊन देवळांत पडला. ही बातमी पोलीसास समजतांच, त्यांनी या भाविक भक्तास उचलून दवाखान्यांत नेलें. तेथें तो तारीख २८।१०।२९ रोजीं मरण पावला. बिचारा बिंबा, खोट्या कथांच्या वर्णनावर विश्वास ठेवून प्राणास मुकला. ज्यानें स्वतःची मान स्वतःच कापली तो मनुष्य श्रद्धाहीन होता असें कसें म्हणता येईल? श्रद्धेच्या भलत्या आणि नियमबाह्य गोष्टी सांगून लोकांना चमत्काराची मीमांसा सांगणारे पढतशहाणे यापासून बोध घेतील काय? आणि ज्या पाषाण मूर्तीची टाळकीं इतरांनी फोडलीं तरी ज्यांनी मूर्तिभंजकांचा केसही वांकडा केला नाहीं, ज्या मूर्तीस कर्ताहता म्हणून तिच्यावर विश्वास ठेवणारेही यापासून शहाणे होतील काय?''

+ + +

राष्ट्रीय राजकारणातही जातिभेद?

राजकारण नेहमी दगलबाजच (डिपलोमॅटिक) असावे लागते. दगलबाजीशिवाय राजकारण टिकाऊ होणेच शक्य नाही. 'जबरदस्ताचा टिकाव' हेच दगलबाजी राजकारणाचे खरे मर्म आहे. या परता अन्य धर्म राजकारण मुळीच जुमानीत नाही. मग ही जबरदस्ती सत्व रज तम या त्रिगुणांपैकी असो, नाही तर आणखी एकाद्या नव्या चवथ्या पाचव्या गुणाची असो. जो दगलबाजीत जबरदस्त, तोच सध्याच्या राजकारणी क्षेत्रात टिकाव धरणार. 'सत्यं वद' 'धर्मे चर' वाले बाकीचे सगळे धर्मभेदी आणि जातभेदी गचाळ हिन्दु मुसलमान कोपरखळ्या खात कोपऱ्यांत कुरबुरत बसणार. लोकसंख्येच्या भरताडाच्या पुण्याईवर अधिकाराच्या जागा मागणारे लोक आणि भटोत्पन्नात्वाच्या पुण्याईवर भीक मागण्याचा हक्क सांगणारे भिक्षुक यांत कसलाहि भेद नाही. राजकारणात दगलबाजीने टिकाव धरण्यासाठी बौद्धिक जबरदस्तीचा जो योग साधावा लागतो, त्याकडे पाठ फिरवून, केवळ पोटाच्या सबबीवर एकाद्या व्यक्तीचा किंवा समाजाचा मुलाजा राखण्याइतके ब्रिटीश राजकारण जर 'हिन्दु' असते, तर ते या हिन्दुस्थानात दीड घटकाहि टिकले नसते. हिन्दी लोकाना आणि विशेषतः हिन्दु लोकाना जातिभेद हा कर्णाच्या जन्मप्राप्त कवचकुण्डलांप्रमाणे, आत्मसंरक्षणाचा मजबूत तटबन्दी किल्ला म्हणून केवढाहि रावणी विश्वास वाटत असला, आणि त्या किल्ल्याला देवाधर्माचा केवढाहि पोलादी पाठिंबा असला, तरी चालू काळच्या राजकारणी दलामलीत या किल्ल्याच्या महत्वाची किंमत फुटक्या कवडभचीहि नाही, हे जितके लवकर जातिभेदाळू हिन्दूंच्या लक्ष्यात येईल, तितके बरे. ब्रिटीशांच्या पाषाणहृदयी राजकारणाला मागासलेले आणि पुढारलेले या भेदाची बडदास्त ठेवण्याची संवेदना असणेच मुळी शक्य नाही. ब्राह्मण-ब्राह्मणेतर किंवा हिन्दु-मुसलमान यांसारख्या जाति-धर्म-भेदांचा चिखल चिवडण्याचीहि त्याला गरज नाही. ज्या ज्या वेळी हा चिखल ब्रिटीश राजकारण चिवडू तुडवू लागते, त्या त्या वेळी त्याच्या गिलाव्याने ते आपल्या आत्मसत्तेच्या कोटाच्या भिंतीच टिकावदार बांधून घेण्याची दगलबाज संधी साधते. हा उघडा सिद्धान्तहि जर आह्माला अझून उमगत नसेल, तर जगाच्या अन्तापर्यन्त आमच्या राष्ट्रस्वातंत्र्याच्या हाका आरोळ्याना सध्या मिळत आहे यापेक्षा अधिक किंमत मिळणे शक्य नाही. सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत जातिभेदाच्या मुद्यावर (जातिभेदाचा मुर्दा पडेपर्यन्त) हवे

तितके लढे लढविले, तरी त्यात फारसा दोष नाही; आणि योग्य सबबीवर ते लढविलेहि पाहिजेत. पण जेव्हा राष्ट्राच्या राजकारणाचा व्यापक प्रश्न पुढे येईल, तेव्हा क्षुद्र जातिभेदाच्या मुद्यावर निषेधाची किंवा बेविश्वासाची आदळआपट करणे, म्हणजे विद्यमान राजकारणी यंत्ररचनेबद्दल गाढ अज्ञान आणि जातिभेदाळू मनाची क्षुद्रता व्यक्त करण्यासारखे आहे. स्वराज्य स्वराज्य ह्मणून आम्ही कितीहि गगनभेदी हाकाटी केली, तरी सध्याच्या जगाच्या राजकारणी सागरमंथनात हिन्दूंचे स्वराज्य, मुसलमानांचे स्वराज्य किंवा भटाब्राह्मणांची पेशवाई अशी एकादी चीज पैदा होईल, असा भरंसा धरणारांची पात्रता समाजात राहण्याची नाही; त्यांची वेड्यांच्या इस्पितळातच रवानगी करणे स्वराज्यप्राप्तीच्या हिताचे ठरेल. आजच्या दगलबाज राजकारणात जो जबरदस्त त्याचाच टिकाव. समाजशः आणि व्यक्तिशः आत्मविकासाच्या वाजवी खटपटींची शिक्षणप्राप्तीसारखी सर्व क्षेत्रे आक्रमण करण्यास कोणास कोठेहि प्रतिबंध नाही. ती सर्व खुलीच आहेत. बुद्धिबळाच्या या पटावर मगदुर असेल त्याने बसावे आणि डाव जिंकावा. त्याचप्रमाणे डिपलोमसि ऊर्फ दगलबाजीचे क्षेत्रच असे चमत्कारीक एटकांचे आहे की तेथे एकमार्गी एकाण्ड्याचा क्षणभरसुद्धा टिकाव लागावयाचा नाही. बहुरूपी बहुरंगी राजकारणाच्या भानगडीत एकरूपी एकरंगी एकाण्ड्या कितीसा टिकणार? रंगपालटात सरडासुद्धा जेथे टेकीला यायचा, तेथे एकमार्गी आणि आग्रही वृत्ती खड्यासारखी उखडलीच जायची. अर्थात् राजकारणी दगलबाजीचे खेळ खेळून 'पुष्कळांचे पुष्कळ हित' साधणाऱ्यांच्या वर्तनात श्वानाच्या हाजीहाजीखोर वृत्तीपासून तो थेट कोल्हा वाघ सिंहाच्या स्वभावधर्मांपर्यंत सर्व प्रकृतींचा समावेश झालेला दिसल्यास त्यात गैरवाजवी काहीच नाही. जसा वारा तशी शिडे फडफडवून, कार्यभाग उरकण्याची कुशलता ज्याला नीट साधली, तोच सध्याच्या शतपैलू राजकारणाच्या क्षेत्रात जबरदस्त. एकमार्गी आग्रही वृत्तीचा-मग ती सत्याग्रहाची असो वा हट्टाग्रहाची असो-किंवा जातिभेदाच्या हिन्दु भावनेचा राजकारणात मुळीच टिकाव लागणार नाही.

ब्राम्हण गव्हर्नर? का हिन्दी गव्हर्नर?

वरील विचार सुचण्याचे कारण. मध्यप्रान्ताचे गोरे गव्हर्नर सर मॉण्टेग बटलर काही महिने रजेवर जात असल्यामुळे, त्यांच्या जागी नामदार तांबे यांची ॲक्टिंग गव्हर्नर ह्मणून झालेली नेमणूक होय. या नेमणुकीकडे व्यापक राजकारणाच्या दृष्टीने पाहून, सर्व ब्राह्मण ब्राम्हणेतर पत्रकारानी या 'हिन्दी' गव्हर्नराचे अभिनंदन करणे वास्तवीक जरूर होते. अशा वेळी नाम. तांबे जातीने ब्राम्हण, का मराठे, का महार असली गलिच्छ जातिभेदाची दृष्टी न ठेवता, 'एक हिन्दी (इण्डीयन) जण्टलमन' म्हणूनच या नेमणुकीकडे सर्वांनी पाहणे प्राप्त आणि रास्त होते. पण उठल्या सुटल्या ब्राम्हणेतराना राष्ट्रीयत्वची पोकळ पुराणे झोडणाऱ्या भटी पत्रकारानीच पहिल्या प्रथम 'ब्राह्मण गव्हर्नर, ब्राम्हण गव्हर्नर' अशी सडक्या जातिभेदाची घमेण्डखोर हाकाटी सुरू केल्यामुळे, आधीच ब्राम्हणांवर चिडलेल्या मराठा-ब्राम्हणेतर पत्रकारानी आणि पुढाऱ्यानी या निवडणुकीची भटी टिंगल कां न करावी? ब्राम्हणच जेथे असल्या व्यापक प्रश्नाची जातिमाहात्म्याच्या क्षुद्र बुद्धीने टिमकी वाजवू लागले, तेथे मराठा पत्रकारानी, किंबहुना सर्रास ब्राम्हणतेरानी नाम. तांब्यांच्या जन्मप्राप्त ब्राम्हण्यावर टीकास्त्र रोखून, त्यांच्या कर्मप्राप्त गव्हर्नरीची निन्दा केली, तर त्यातल्या क्षुद्र मनोवृत्तीच्या महापातकाची जबाबदारी भटी पत्रकारांच्याच टाळक्यांवर थापली पाहिजे. वाटेल त्या प्रसंगी जातिभेदाचे भूत निष्कारण नाचवून,

केवळ स्वजातिवर्चस्वाची मिजास मिरविण्यासाठी, व्यापक राष्ट्रीय भावनेलाहि चाणक्यी चिमटा घेण्यात भटांची वृत्ति किती नाठाळ आणि मुर्दाड असते, याची या एकाच गोष्टीवरून वाचकाना स्पष्ट अटकळ होईल. नाम. तांब्यांच्या ऐवजी एकाद्या भटेतराची निवडणूक झाली असती, तरीहि 'राष्ट्रीय' भटानी त्याची हवी तशी निन्दा कुचेष्टा करायला कमी केले नसते; मग, भटानी डिवचल्यामुळे ब्राम्हणेतर मराठ्यांनी नाम. तांब्यांच्या निवडणुकीविषयी आज वापरलेल्या भाषेबद्दल दोष द्यायला त्याना तोण्डच कोठे शिल्लक उरते? राष्ट्रीयत्वाच्या व्यापक भावनेला इतक क्षुद्र संकुचित रूप द्यायला, खास ब्रह्मदेवाच्या तोण्डातून उत्पन्न झालेल्या भटांनीच जर वेळोवेळी असला आचरटपणा केला, तर हातापायापासून निर्माण झालेल्या क्षत्रिय वैश्य शूद्रानी भटी माहात्म्याच्या प्रत्येक सुस्काऱ्याला टाचगुद्याचा आहेर करण्याचा शिरस्ता अखण्ड चालू ठेवल्यास त्यात चूक कोणाची?

स्वजातिवर्चस्वाचा भटी चिकटा

मागे प. वा. लॉर्ड सिंह बहार आणि बोरीसा प्रान्ताचे गव्हर्नर झाले, त्यावेळी ब्राह्मणेतरानी 'पहिला हिन्दी गव्हर्नर' म्हणून लॉर्ड सिंहाचे अभिनन्दन करण्यापलीकडे विशेष कसलाहि गाजावाजा केला नाही. बंगालच्या कायस्थानी सुद्धा जातीच्या सभा भरवून मानपत्रांचा भटी चवचालपणा केला नाही. प. वा. नामदार नारायणराव माधव समर्थ 'इण्डिया कौन्सिलचे पहिले हिन्दी सभासद' म्हणून विलायतेला गेले, त्यावेळी ब्राह्मणेतरानी आणि विशेषतः त्यांच्या जातभाई कायस्थ प्रभूनी कसल्याही थाटामाटाचाच, जातिश्रेष्ठतेच्या अहंकाराचा किंवा सभा मानपत्रांचा गाजावाजा केला नाही. 'एका हिन्दी गृहस्थाची नेमणूक' या व्यापक भावनेच्या रास्त अभिमानापलीकडे कोणी काहीच व्यक्त केले नाही. मुंबई ते पुण्यापर्यंतच्या कायस्थ प्रभूनी मनातच आणले असते, तर या नेमणुकांचे स्वजातिमाहात्म्याचे देव्हारे त्याना हव्या तितक्या दणक्याने नाचविता आले असते पण तसे काहीएक न होता, जातिभेदातीत नाम. समर्थ कर्तव्यपूर्तीसाठी एकाद्या साध्यासुध्या पॅसेंजराप्रमाणे विलायतेला निघून गेले. त्यांच्या मृत्यूने रिकाम्या पडलेल्या जागी रँगलर परांजप्यांची योजना होताच, महाराष्ट्रातल्या एकजात सगळ्या ब्राह्मणानी तब्बल महिनाभर गावोगाव त्यांच्या पालख्या कसकसल्या आढ्यतेच्या थाटामाटाने मिरवून, परांजप्यांचा भटी उदोउदो केला; भटी पत्रानी त्या पालख्यांच्या रसभरीत वर्णनानी शेकडो 'स्तंभ' कसे रंगवून सोडले आणि बोटीत पाय ठेवीपर्यंत परांजप्यांवर ब्राह्मणी मानपत्रांचा आणि हारतुऱ्यांचा केवढा ताजमहाली खच पडला, याची वाचकाना चांगलीच आठवण असेल. या दोन तीन ताज्या उदाहरणांवरून राष्ट्रीयत्वाची व्यापक भावना ब्राह्मण पाळतात की ब्राह्मणेतर पाळतात आणि जातिभेदाचे भूत भटें नाचवितात का भटेतर माजवितात, याचा स्पष्ट उलगडा तेव्हाच होतो. 'राष्ट्रीय' भटांची क्षुद्र मनोवृत्ति केव्हा कोठे भडकेल, याचा नेम नाही. कोकणी खेड्यातल्या हव्या त्या अप्रसिद्ध भटाच्या मृत्यूची, 'ते सार्वजनिक कार्यांत पडत असत' या सबबीवर, कालमभर बडदास्त ठेवणाऱ्या 'केसरी'ला नामदार समर्थांच्या मृत्यूनिमित्त वर्तमानसारातल्या अडीच ओळीशिवाय अधिक जागा न सापडण्याचे कारण, हीच जातिभेदाळू क्षुद्ध भटी वृत्ति!

□□□

लेख

जबरदस्ताचा टिकाव

(लेखांक ३ रा)

यानंतर असा एक प्रश्न उद्भवतो कीं युरपियन बनिये सुधारलेली हत्यारे वापरीत असत आणि त्यांचे गोरे सोजीरांचे सैन्य युरपियन कवायतीमुळे मोठे कदरबाज असे; या दोन लष्करी सामर्थ्यापुढे हिंदी राजेरजवाडे नामोहरम झाले कीं काय? किती झाले तरी हे गोरे पाहुणे मूठभर. त्यानी सात समुद्र ओलांडून येथे यावे आणि शतकानुशतकांच्या स्थायिक रियासतीना बोलबोलता मुळापासून उखडून मोकळे व्हावे, हा सर्व चमत्कार काय बंदुकांचा आणि कवायतीचा? सुरुवातीला या दोन विलायती कळी पाहून देशी लोक थोडे भेदरले खरे; पण त्यानी त्या क्रिस्ती बनियांकडून त्यांची कारीगार शस्त्रे विकत घेऊन, आपल्या सैन्यानासुद्धा युरपियन धर्तीची कवायत शिकविण्याचा उपक्रम सुरू केला. १७ व्या शतकातल्या शहाजी राजे (शिवछत्रपतीचे वडील) भोसल्यासारख्या राजकारण धुरंधरालासुद्धा क्रिस्ती बनियांच्या पराक्रमाची ही मख्खी माहीत होती. त्या दिशेने त्याने आपल्या सामर्थ्यवर्धनासाठी काय प्रयत्न केले, त्यांची मार्मिक चिकित्सा कै. राजवाडे येणे प्रमाणे करतात :-

''हत्यार चोख पाहिजे आणि तें प्रतिपक्षाच्या हत्याराहून श्रेष्ठतर पाहिजे, या बाबीची जाणीव शहाजीच्या ठाईं स्वकालीन् अनुभवाने अत्युत्कट बाणलेली होती. पूर्वेतिहासहि त्याला तेंच शिकवीत होता. कोणत्याहि राष्ट्राच्या संस्कृतीचा श्रेष्ठ कनिष्ठपणा त्या राष्ट्राच्या हत्याराच्या स्वरूपावरून ओळखतां येतो. फार काय सांगावें, हत्यार हे राष्ट्राच्या एकंदर संस्कृतीचें मापक आहे. जशी ज्या राष्ट्राची संस्कृति, तसें त्या राष्ट्राचे हत्यार..... लोखंडी बाणांहूनहि दूर पल्ल्याच्या हत्यारांचा, म्हणजे दारूनें उडणाऱ्या वेळूच्या कांडांचा शोध लावणाऱ्या आर्यांनी, केवळ लोखंडी तीराने लढणाऱ्या आर्यांचा पराभव करून आपलें रसायन-मिश्रण-ज्ञान जगाच्या अनुभवास आणिलें. त्याहिपुढें मजल मारून लोखंडी नळ्यांत दारू भरून अर्ध्या पाव कोसावरून शत्रूचा पाडाव करणाऱ्या मुसलमानांनी ख्रिस्ती हिन्दु वगैरे कनिष्ठ संस्कृतीच्या लोकांचा पराभव केला. पुढें युरपियन लोकांनीं नाना शास्त्रीय शोधांच्या द्वारें नेमकें काम करणाऱ्या व दूरवर पल्ल्यांच्या तोफा बंदुका वगैरे संगीन हत्यारांच्या जोरावर मुसलमानांची युरपांतील स्पेन वगैरे देशांतून हकालपट्टी केली व पृथ्वीवरील अमेरिका आफ्रिका व हिन्दुस्थान हे देश जिंकण्याची खात्रीपूर्वक हिंमत बांधिली. एवढी मोंगलांची अफाट व प्रबळ सत्ता, परंतु पोर्च्युगीज चांच्यानीं कितीदां तरी समुद्रावर त्यांची इज्जत घेतली. त्याच कालीं

कुस्तुंतुनियाच्या तुर्कांनी व्हेनिशियन लोकांपासून श्रेष्ठ बंदुका व तोफा आणि दारूगोळा तयार करण्याची सर्वश्रेष्ठ कला अर्धीमुर्धी व उष्टीमाष्टी किंचित् आपलीशी केली होती. त्या अर्धवट तुर्क कारागिरांना पदरीं ठेऊन दिल्लीचा मोंगल व दक्षिणेंतील शहा हत्यारें व दारूगोळा बनवून त्याच्या जोरावर देशांतील अर्धवट सुधारलेल्या टाळकुट्या हिंदूंना व परस्परांना भिवडवीत असत. हा सर्व चमत्कार शहाजी पहात होता. उत्तम कारागीर हत्यार कोठून पैदा होतें व कोण आणून देतें, ह्याचा अनुभव जुन्नरच्या घाटाखालील कोकणांत त्याला आला होता. दमण दीव वसई गोवा सुरत तेलीचरी इत्यादि स्थलींच्या टोपीवाल्यांकडून कारागीर हत्यारें पैदा करून निजामशाही आदीलशाही व मोंगलाई सैन्याहून शहाजी आपली फौज जास्त कर्तबगार ठेवूं लागला. अशा तऱ्हेनें पक्ष सैन्य व हत्यार शहाजीनें निर्माण केलें आणि त्यांच्या जोरावर प्रकट स्वराज्य, प्रच्छन्न स्वराज्य, मांडलीक स्वराज्य व निर्भेळ स्वतंत्र स्वराज्य उत्तरोत्तर स्थापित असतां, वेळोंवेळी येणाऱ्या विपत्तींत दम न सोडतां, पूर्वीच्याहून जास्त हुरुपानें पुढील कर्तव्य तो बजावीत राहिला. सैन्य व हत्यार यांच्यावरील त्याचा विश्वास मोठ्या विपत्तींतहि कधीं ओसरला नाहीं. शेवटीं या साधनांच्या जोरावर आपण विजयी होऊंच होऊं अशी त्याची बालंबाल खात्री होती व परिणामावरून पाहतां ही खात्री साधार होती.''

''येथे एक आनुषंगीक प्रश्न असा निघतो कीं, टोपीवाल्यांकडून कारीगार बंदुका तोफा व दारूगोळा जो शहाजी घेई, तो त्यानें महाराष्ट्रांत त्या बरहुकूम बनविण्याची व्यवस्था कां केली नाही? अथवा शहाजीचा मुलगा शिवाजी त्यानें तरी कां केली नाही? किंबहुना बाजीराव बल्लाळ, बाळाजी बाजीराव, नाना फडणीस ह्या गृहस्थांनी कां केली नाही? उत्तम हत्यारांकरितां दुसऱ्यांचे मिंधे राहण्याची लज्जा यांना कशी वाटली नाही? प्रश्नाला उत्तर एकच आहे व तें अगदी साधे आहे. तें हें कीं उत्तम रेखीव व नेमकें हत्यार बनविण्याची कला पैदा होण्यास शास्त्रीय ज्ञानाची जी पूर्वतयारी राष्ट्रांत व्हावी लागते, ती त्या कालीं महाराष्ट्रांत नव्हती. शहाजीच्या हयातीत युरपांत डकार्ट बेकन इत्यादि विचारवंत सृष्टपदार्थसंशोधनकार्याचे वाली ज्यारीनें पंचभूतांचा शोध लावण्यास लोकांना प्रोत्साहित करीत होते; आणि आपल्या इकडे एकनाथ तुकाराम दासोपंत निपटनिरंजन इत्यादि संत पंचभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारांत राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटींत होते. अश्यांना स्क्रू टांचणी बंदूक व तोफ यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यांत नवल कसचें? थोडक्यांत आगस्ट कोंट यांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे महाराष्ट्र त्या काळीं Metaphysical अवस्थेत होते आणि Positive अवस्थेंत येण्यास त्याला अद्याप पांचशें वर्षे अवकाश होता. म्हणजे शके २००० च्या सुमारास महाराष्ट्र Positive बनणार होतें. अशा अवस्थेंत आपल्याला बनविता येत नाहीत ती श्रेष्ठ हत्यारे दुसऱ्यांकडून विकत घेण्याखेरीज शहाजीला गत्यंतर नव्हतें. सध्यां महंमद आफ्रिडी चित्रळी अफगाण इराणी इत्यादि अर्ध सुधारलेल्या लोकांची जी अवस्था आहे, तीच आपली शहाजीच्या काळीं होती. उत्तम जर्मन फ्रेंच किंवा रशियन बंदुक घेऊन जो आफ्रिडी माणूस चोऱ्या दरवडे व हल्ले करतो, त्याहून शहाजीकालीन् मराठा जास्त सुधारलेला होता हें खरें. परंतु शस्त्राकरिंता तो युरपियनांचा आफ्रिडीच्या इतकाच परावलंबी होता. ह्या परावलंबित्वाचा अर्थ शहाजीच्या काली कोणाच्या लक्षांत कितपत आला असेल, तें सांगण्यास साधन नाही. परंतु विष जें आहे तें जाणून खा कीं नेणून खा, आपला अंमल केल्याशिवाय जसें राहात नाही, तसेंच ज्याचें हत्यार त्याचें राज्य हा नियम - कोणाला समजो कीं न समजो - आपलें कार्य केल्याशिवाय राहात नाही. अर्थात् मूळ हत्यार तयार करणारे जे फिरंगी

फ्रेंच डच किंवा इंग्रज वगैरे युरपियन त्यांना राज्य कमावून देण्याकरितां न जाणतेपणें शहाजी जीवापाड मेहनत करीत होता असा अर्थ झाला. आणि हा अर्थ शहाजी व त्याचे ब्राम्हण मुत्सद्दी यांच्या लक्ष्यांत यावा तसा नव्हे, तर मुळींच आला नाही. ज्या दिवशीं व्हास्कोनें कालीकतच्या चामुरीच्या थोबाडीत मारली, तोच हिन्दुस्थानचें साम्राज्य युरपियनांच्या हातांत जाऊं लागण्याचा पहिला दिवस होय. मूठभर फिरंगी लोकांनीं एका हिंदु राजाला पहिले छुट कुंठीत करावें असें त्यांच्याजवळ कोणतें बरें सामर्थ्य होते? काय त्यांना दहा तोंडें व वीस हात होते? कीं ते इजार नेसत होते व बायबल पढत होते म्हणून ते इतके प्रबळ झाले? तर अनेक शोधांच्या साहाय्यानें सिद्ध झालेली जी लांब पल्ल्याची कारीगार हत्यारें, त्यांत त्यांचें सामर्थ्य होते. हीं हत्यारें म्हणजे युरपियन शास्त्रीय संस्कृतीचा केवळ निष्कर्ष होत. त्या हत्यारांच्या जोरावर एक युरपियन हजार हिंदु-मुसलमानांना भारी होता. हा अर्थ शहाजीसारख्या धोरणी दूरदर्शी मतलबी व जागरूक सरदाराच्या लक्ष्यांत न यावा, अशीच तत्कालीन् महाराष्ट्राची स्थिति होती. तेव्हां दोषाचा वाटा शहाजीप्रमाणेच तत्कालीन् समाजावर पडतो, हें उघड आहे. सगळेच आंधळे, त्यांत एकालाच सुळावर चढविण्यांत मतलब काय? ह्या बाबतींत शहाजीच्या पंक्तीस अकबर शहाजहान मीरमुमला व औरंगजेब असे सारेच बसतात. तेव्हां हा तत्कालीन् भारतवर्षीय संस्कृतींतलाच सर्वसाधारण दोष होय, हें कबूल करावे लागतें.'' (राधामाधव-विलास-चंपूकाव्य-प्रस्तावना.)

हत्यारे जुनी असोत वा नवीन सुधारलेली असोत, केवळ त्यांच्या दिमाखावर मूठभर क्रिस्ती बनियानी चढाईच्या उघड धोरणाने हिन्दुस्थानच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवणेच त्याना शक्य नव्हते. हिन्दी रियासती कितीहि जुन्यापान्या शस्त्रास्त्रांच्या सामर्थ्यावर टिकल्या असल्या, तरी मूठभर पदरेशी गोऱ्यांच्या लष्करी चढाईचा मुलाजा चालू देण्याइतक्या त्या नादान आणि बेसावध खास नव्हत्या. अर्थात् 'हिन्दुस्थान आम्ही तलवारीच्या जोरावर जिंकले आणि तलवारीच्या जोरावरच आम्ही ते आचंद्रार्क टिकविणार' ही आधुनिक इंग्रेजी मुत्सद्यांची मुक्ताफळे, त्यांच्या दगलबाज राजकारणाला कितीहि शोभून दिसली, तरी ती ऐतिहासिक सत्याचा खून करणारी आहेत. मुसलमानांप्रमाणे इंग्रेजांनी तलवारीच्या जोरावर हिन्दुस्थान मुळी जिंकलेलेच नाही. इंग्रेजांच्या पराक्रमांच्या इतिहासात तलवारीला कोठेहि मोठेसे महत्त्वच नाही. तलवारीच्या पात्यावरच इंग्रेजांच्या राजकारणी वर्चस्वाची मदार असती, तर नेपोलियन बोनापार्टाच्या क्षात्र चारित्र्याचा कोंब त्यानी गर्भातल्या गर्भात ठेचला असता. वॉटरलूच्या युद्धात नेपोलियन हतप्रभ झाला, तो इंग्रेजी तलवारीने नव्हे. नेपोलियन इंग्रेजांच्या तलवारीला बळी पडला नाही, तो त्यांच्या राजकारणाला बळी पडला. तो त्यांच्या क्षात्र तेजाने दिपला नाही, तो इंग्रेजी राजकारणाने शिजवून तयार केलेल्या स्वतःच्या फ्रेंच सेनापतीच्या राष्ट्रद्रोहाला बळी पडला. गेले युरपियन महायुद्ध सुद्धा इंग्रेजानी तलवारीच्या जोरावर जिंकले नाही. ते त्यानी आपल्या राजकारणी बुद्धिबळावर जिंकले. इंग्रेज लोक क्षत्रिय नव्हत. ते वैश्य बनिये आहेत. शक्तीपेक्षा युक्तीवर त्यांची मोठी मदार. इंग्रेजी तलवार म्हणजे युक्ती, कारस्थानी जंतरमंतर. याच्याच प्रभावाने हिन्दुस्थानच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा होम झाला. इंग्रेज वैश्यांच्या युक्तीपुढे आज हरएक शक्ती फोल ठरत असताना, 'हिन्दुस्थान आम्ही तलवारीच्या जोरावर जिंकले' ही आंग्रेजोक्ती त्यांच्या आंग्लभाषा प्राविण्याचे आणि शेक्सपीरियन काव्यकल्पनापटुत्वाचे गोरे चिन्ह मानण्यापलीकडे, ऐतिहासिक पुराव्यांपुढे त्याला कसलीहि किंमत देता येत नाही. 'Justice for India' (हिन्दुस्थानासाठी न्यायाची मागणी) या मथळ्याखाली लॉर्ड पामर्स्टन (हिन्दुस्थानचे एक स्टेट सेक्रेटरी) याना A Plain Speaker - 'स्पष्टवक्ता'

(बहुतकरून हे डॉ. कान्ग्रीव्हच असावे) या सहीने एक लांबलचक अनावृत्त पत्र पाठविले होते. त्यात ''We conquered her (India) as the Spainiards conquered Mexico and Peru, with the same cupidity and eagerness for aggrandisement, with the same treachery, and almost with the same inhumanity. ..... assuredly we did not conquer India to make its people happy '' (भावार्थः- स्पॅनियर्ड लोकानी मेक्सिको आणि पेरू जिंकण्यासाठी आशाळभूतपणा, अरेरावी गाजविण्याची हाव, घातपात आणि राक्षसी वृत्ति इत्यादि ज्या साधनांचा उपयोग केला, तीच हिन्दुस्थान जिंकताना आम्ही वापरली. ..... तद्देशीय लोकाना सुखी करण्यासाठी हिन्दुस्थान देश आम्ही खास जिंकलेला नाही.) असा स्पष्ट खुलासा केलेला आहे.

हिन्दुस्थान तलवारीच्या जोरावर इंग्रेजानी जिंकला, या कल्पित कादंबरीवर किंवा बाजारगप्पेवर अंधविश्वास टाकणाऱ्यांच्या अकलेला सर जॉन मालकम यानी स्पष्ट खुलाशाची फोडणी देऊन ठेवलेली आहे. ते म्हणतात, ''जबरदस्तीच्या जोरावर हिन्दुस्थानच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवण्याच्या प्रयत्नाना प्रतिकाराची कचकचीत थप्पड मिळाल्याशिवाय केव्हाहि राहिली नसती. (पाश्चिमात्य गोरे) व्यापारी हिन्दी लोकाना निष्कपटी (Unpretending) आणि सरळ व्यवहारी असे भासल्यामुळेच त्याना येथे आसरा व उत्तेजन मिळाले. पण पुढे आपापल्या वसाहती व मालमत्ता लुटफाटीपासून संरक्षण करण्यासाठी जेव्हा त्या गोऱ्या व्यापाऱ्याना वेळोवेळी प्रतिकाराच्या अस्तन्या वर सारण्याचे प्रसंग येत गेले, तेव्हा तागडीच्या बहाद्दरीप्रमाणेच त्यांची तलवार-बहाद्दरी जबरदस्त असल्याचे पाहून, मोठमोठ्या हिंदी राजाना, मत्सर वाटण्यापेक्षा, त्यांच्याबद्दल कौतुकच वाटू लागले. याचा परिणाम असा झाला कीं हिंदी राजे त्यांच्याशी सलोखा करू लागले, आणि परस्परांच्या भांडणांत या गोऱ्या व्यापाऱ्यांची मदत मिळविण्यासाठी धडपडू लागले.'' (Political History of India, p. 2.)

हिन्दी लोकांच्या सहकार्याशिवाय क्रिस्ती बनियाना हिन्दुस्थानात आपली कसलीहि सत्ता स्थापन करता येणे शक्य नाही, हा सिद्धान्त प्रथम फ्रेंचांच्या डुपलीने शोधून काढला. डुपली मोठा कुशाग्र बुद्धीचा मनुष्य. पाश्चिमात्य राष्ट्रांतील लोकांप्रमाणे, हिन्दी लोकात राष्ट्रधर्म, राष्ट्राभिमान म्हणजे पेट्रिऑटिझम् या गुणाचा खडखडाट आहे, हे महत्वाचे मर्म डुपलीनेच प्रथम ओळखले. साऱ्या लोकांत समाजांत आणि जातींत बेकीचा महारोग जबरदस्त फैलावलेला. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. अशा अवस्थेत एक समाज दुसऱ्याच्या आंगावर छूः म्हणून घालायचे काम या परदेशी गोऱ्याना मुळीच कठीण गेले नाही. दोघांचा तंटा लावून दिल्याशिवाय तिसऱ्या त्रयस्थाला किंवा तटस्थाला आपली तुंबडी कशी भरता येणार? पण इतकाहि पोच हिंदी राजांच्या किंवा लोकांच्या टाळक्यांत चुकून सुद्धा उगवला नाही. बरे, बुद्धिमत्ता, शारिरीक शौर्य आणि धडाडी, यांत तरी कोणी हिन्दी कमजोर होता? तसेहि नव्हे. पण या त्यांच्या शिलकी भांडवलाचा क्रिस्ती बनियांनी निराळ्याच मार्गाने फायदा करून घेतला. त्यानी हिन्दी लोकाना सुधारलेल्या युरपियन पद्धतीचे लष्करी शिक्षण देऊन, त्यांच्या फलटणी नोकरीस ठेवल्या. हिन्दी लोकांवरच हिन्दी फलटणींची चढाई चढवून, हिन्दुस्थानातल्या रियासतींचा धुव्वा उडविण्याचा क्रिस्ती बनियांचा हा कावा, गोऱ्या टोळभैरवांच्या पुढारपणाखाली स्वराज्यसंपादनाचे डोंबारी खेळ खेळणाऱ्या सध्याच्या भेकड हिन्दु मुसलमानानी, विचार करण्याइतका मेंदू डोक्यात असेल तर, अगत्य विचारात घ्यावा.

कलकत्ता रिव्यू (Vol. VII सन १८४७ पृ. २२६) मधील एका लेखांत गोऱ्या क्रिस्ती बनियांच्या हिन्दी

उचापतीना पांढऱ्या मुंग्यांच्या पोखरणीची उपमा देऊन, शेवटी असा निष्कर्ष काढला आहे कीं "After all, however, there can be no question that in our early connection with India, there was much, from the contemplation of which, the moralist will shirk, and the Christian protest against, with abhorrence. "

(**भावार्थ** :- आमच्या सुरुवातीच्या हिन्दी उचापतींच्या भानगडी अशाच प्रकारच्या होत्या की त्यांची नुसती कल्पना केली तरी नीतिमंताना शिसारी येईल आणि खरा क्रिश्चन त्यांचा त्वेषाने निषेधच करील.) त्याचप्रमाणे विल्यम हॉविट (William Howitt, 'The English in India') ने सुद्धा या मुद्यावर खालील स्पष्टोद्गाराने स्वच्छ प्रकाश पाडला आहेः-

"In such colours does the modern philosophy of conquest and diplomacy disguise the worst transactions between one state and another, that it is not for plain men very readily to penetrate to the naked enormity beneath ... ... the mode by which the East India Company has possessed itself of Hindustan, as the most revolting and un-Christian that can possibly be conceived. ... ... if ever there was one system more Machiavelian-more appropriative of the show of justice where the basest injustice was attempted-more cold, cruel, haughty and unrelenting than another, it is the system by which the government of the different states of India has been wrested from the hands of their respective princes and collected into the grasp of the British power. ... Whenever we talk to other nations of British faith and integrity, they may well point to India in derisive scorns. ... The system which, for more than a century, was steadily at work to strip the native princes of their dominions, and that too under the most sacred pleas of right and expediency, is a system of torture more exquisite than regal or spiritual tyranny every before discovered; such as the world has nothing similar to show."

(**भावार्थ** :- ''देश जिंकण्याचे आणि दगलबाजीचे अर्वाचीन शास्त्र मोठे चमत्कारीक आहे. दोन राज्यांत होणाऱ्या अनेक घाणेरड्या व्यवहारांवर भडक रंगाचे पांघरूण घालण्यात या शास्त्राच्या हिकमती इतक्या पाताळयंत्री असतात, कीं साध्या माणसाला त्यांचा ठावठिकाणा कधीच उमगत नाही. विशेषतः हिन्दुस्थान बळकावण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीने केलेल्या दगलबाज्या इतक्या संतापदायक आणि क्रिस्ती धर्माच्या तोंडाला काळे फासणाऱ्या आहेत कीं त्याची कल्पनाच होणे शक्य नाही. उलट्या काळजाचा, क्रूरपणाचा, हट्टी आणि बेगुमान अशा भयंकर अन्यायांवर न्यायीपणाचा जाडजूड सफेदा चढविणारी एकादी दगलबाजी जगात जर कोठे पाहावयाची असेल, तर हिन्दुस्थानातल्या सर्व हिन्दी राजांच्या रियासती गिळंकृत करून बसलेल्या ब्रिटीश सत्तेकडे खुशाल बोट दाखवावे..... जेव्हा विश्वास आणि इमानाच्या बाबतीत आम्ही दुसऱ्या राष्ट्रांपुढे पुराणे झोडतो, तेव्हा त्यानी तिटकाऱ्याने हिन्दुस्थानाकडे बोट दाखवून, 'येथे तुमच्या पायाखाली काय जळत आहे?' असा प्रश्न केल्यास, त्याला आम्ही काय उत्तर देणार?..... देशी राजांचे प्रदेशच्या प्रदेश बुचाडण्यासाठी ही दगलबाजी सतत शंभर वर्षे खटपटीत होती. या खटपटीना आम्ही अधिकाराचे आणि हक्कांचे किती सोवळे मुखवटे चढविले, आणि वेळ मारून

नेण्याच्या काय काय हिकमती केल्या, त्यांची गणती नाही. जगातल्या आजपर्यंतच्या राजेशाही आणि भिक्षुकशाही छळांच्या तीव्रतेला या दगलबाजी पद्धतीच्या अत्याचारांनी मागे सारले. जगात याला दुसरी तोड नाही.''

सध्याचे इंग्रेज मुत्सद्दी आणि नोकरशाहीचे अरेराव तहांच्या, वचनांच्या आणि जाहीरनाम्यांच्या पवित्रपणाची नौबत कितीहि दांडग्या जोमाने ठोकीत असले, तरी हिन्दुस्थान पचनी पाडणाऱ्या त्यांच्या पणज्या निपणज्यानी, हिन्दी राजांशी केलेल्या मैत्रीच्या तहनाम्याना चिठोरी समजून, त्यांच्या विरुद्ध वर्तन करताना पुष्कळ वेळा लज्जेलाहि लाजविण्यात कसूर केली नाही. फायद्यासाठी तहनामा करणे किंवा केलेला कस्पटासमान लेखणे, आंग्रेज बनियांच्या हातचा मळ! फार दूर कशाला? सुप्रसिद्ध अरेरावाग्रणि लॉर्ड कर्झन यानी राणीच्या जाहीरनाम्याची 'कागदाचे चिठोरे' a scrap of paper म्हणून केलेली संभावना तर अगदी ताजी, काल परवाची! इंग्रेज बनियांच्या बाह्य भपक्याला आणि मिठ्ठास वाणीला भुरळून त्यांच्याशी मैत्रीचे तह करण्यातच हिन्दी राजेरजवाड्यांचा अखेर घात झाला. त्यामुळेच काही हिन्दी नृपति एकामागून एक त्यांच्या सिंहासनांवरून भराभर खाली खेचले गेले; आणि कित्येक इंग्रेजी बुटांचे नाल बनून, त्यांच्या अरेरावी राज्यपद्धतीचे मिंधे आणि बंदे प्रवर्तक बनले. इंग्रेज बनियांशी मैत्री काय किंवा शत्रुत्व काय, दोहोची फलश्रुति हिन्दी राजाना एकजिनसीच प्रत्ययाला आली. त्यांच्या मैत्रीचा एकाद्याने इन्कार केला कीं ताबडतोब त्या राजावर दुष्ट हेतूंचा आरोप ठेऊन, त्यावर स्वारी करून, त्याला पादाक्रान्त करण्यात येत असे. बरे, इंग्रेजांच्या मैत्रीच्या जाळ्यात तो सापडलाच तर दगलबाजीच्या उलटसुलट पेचात गुरफटून, आपली राजसत्ता, सन्मान आणि देश याना सफाईत मुकून, इंग्रेजांच्या नेत्रकटाक्षाच्या चढत्या उतरत्या भांजणीवर आयुष्य कंठीत पडायचा. केवळ तुरुंगातला कैदी किंवा सुवर्णपंजरातला राघू! विल्यम हॉविट ह्मणतो, ''हिन्दी राजांची राज्येच्या राज्ये फटाफट हिसकावून घेण्याची ही अत्याचारी हिकमत (system of torture) कशी अंमलात आणीत असत? मारवाडी* किंवा पठाण लोक (cunning men) प्रथम एकाद्याला कर्ज देतात, आणि त्याचा एकदा बोजा वाढला कीं एकदम अवचित मागणी करून, ऋणकोला हव्या त्या जबरदस्त अटीखाली पिळून मळून काढतात, त्याच 'पठाणी' पद्धतीचा हा प्रकार होता. ज्या क्षणाला इंग्रेज बनियांची अशी खात्री झाली कीं 'फोडा आणि झोडा' या तत्वाचा अंमल करण्याइतका आपल्या सत्तेचा पाय हिन्दुस्थानभूमीवर रुतला आहे, त्या क्षणाला, आपल्या धोरणांचे स्वरूप मात्र एकदम उघड न दाखविता, लांबरुंद गोडगोड आश्वासनांच्या सबबींवर (plausible manouvres) त्यानी त्याची सुरुवात केली. यात 'बळी तो कान पिळी' या प्राचीन सूत्राशिवाय दुसरी सबब काहीहि नसे; फक्त तिच्यावर प्रामाणिकपणाचा मुलामा मात्र चढविण्यात आलेला होता. या सूत्राची लोकमान्यता पूर्वीइतकी राहिली नाही, ह्मणून आंग्रेज बहाद्दरानी त्याचे पुनरुज्जीवन केले.'' इंग्रेजानी सिंधप्रांत घशात टाकला, याविषयी विवेचन करताना सर जॉन के Sir John Kaye 'कलकत्ता रिव्यू' मध्ये ह्मणतात, ''सिंधच्या अमीरांनी तहनामे मोडले, असे सांगण्यात येते. जणू काय तहनामे आणि वचने याना हरताळ फासण्याची मुखत्यारी सनद फक्त ब्रिटीश सरकारनेच मिळवून ठेवलेली आहे! (**स्पष्टार्थ** :- ब्रिटीशानी

---

* 'कनिंग्' या इंग्रेजी शब्दाचा भावार्थ स्पष्ट होण्यासाठी मारवाडी आणि पठाण या परिचित शब्दांची योजना केलेली आहे. या दोन लोकांचे सावकारी अत्याचार उभ्या हिन्दुस्थानात कुप्रसिद्ध आणि सर्वश्रुतच आहेत.

हवे तितके तहनामे हवे तेव्हा मोडले तरी हरकत नाही. इतरानी तसे कोणी केले कीं ते मात्र महापाप!) झालेले तहनामे मोडताच ताबडतोब प्रदेशाची जप्ती, असा निर्बंध अंमलात असता, तर आजच्या घडीला ब्रह्मपुत्रा आणि सिंधु नदांच्या दरम्यान इंग्रेजाना पाऊल ठेवायला बिघाभर सुद्धा जमीन उरली नसती.'' सन १८५७ च्या बंडाच्या कारणाची मिमांसा करताना कर्नल मॅलेसन याने दोनच इंग्रेजी शब्दात बॅड फेथ (बेइमान) असा निष्कर्ष काढला आहे. होय. आंग्रेजी बनिया कंपनीने अ-क्रिस्ती हिन्दी राजाना शपथेवर दिलेली वचने आणि करारमदार मोडण्यात केलेल्या बेइमानीमुळेच ५७ चे हिन्दी बण्ड झाले आणि क्रिस्ती बनियांच्या 'धाडश्यांच्या टोळी'च्या अरेरावी राज्यकारभाराची सत्ता ब्रिटीशांच्या व्हिकटोरिया राणीला आपल्या हाती घ्यावी लागली.

हिन्दी राजांनी अनेक युरपियन राष्ट्रांतल्या गोऱ्या लोकाना बडे हापसर म्हणून आपापल्या राज्यात नोकरी ठेवण्याचा गाढवपणा केला आणि अखेर तोच त्यांच्या समूळ उच्चाटनाला कारण झाला. हे गोरे हापसर आपल्या हिन्दी धन्यांच्या खाल्ल्या मिठाशी तर बेइमान झालेच, पण ऐन प्रसंगाला त्यांच्या सहाय्याला धाऊन न येता, उलट त्यांच्याविरुद्ध कारस्थाने लढवीत असत.

शेवटच्या रावबाजीने जनरल पोट नावाचा एक गोरा इंग्रज आपल्या देशी सैन्यावर कमाण्डर म्हणून नेमला होता. श्रीमंत पेशवे धनि आणि जनरल पोटसाहेब त्यांचा नोकर. प्रसंग येताच, खडकीच्या एलफिन्स्टनच्या छावणीवर हल्ला करण्याचा या हिन्दु धन्याने आपल्या गोऱ्या नोकराला समक्ष स्वतः हुकूम फर्मावला असता, पोट साहेबाने खाडकन् जबाब दिला ''खाविंद, मी हे काम साफ करणार नाही.''

श्रीमंत :- करणार नाही म्हणजे? तूं माझा नोकर आहेस. फर्मावला हुकूम तुला बजावलाच पाहिजे.

पोट :- श्रीमंतांच्या हुकुमाचा मी बंदा ताबेदार खरा. पण मी माझ्या देशबान्धवांवर शस्त्र धरणार नाही. निजामावर जायला सांगा, कर्नाटकच्या चढाईचा हुकूम द्या, वाटेल तर पोर्च्युगीज फ्रेंचांवर मोहिमीची आज्ञा करा. हुकुमाची ताबिली करायला बंदा तयार आहे. लक्ष्यात ठेवा, श्रीमंत, मी रक्ताचा इंग्रज आहे. मी माझ्या जातीविरुद्ध केव्हाहि काही करणार नाही. कोणताहि इंग्रज आपल्या इंग्लण्ड देशाशी केव्हांहि बेइमानी करणार नाही. एलफिन्स्टनच्या छावणीवर हल्ला करण्याचे मी साफ नाकारतो. कसूर माफ!

पोटचा हा राष्ट्राभिमान (पेट्रिऑटिझम्) मोठा चिंतनीय आहे. त्याच्यासाठी त्याने परकीय धन्याशी उघड उघड बेइमानी केली, पण स्वदेशाशी तो बेइमान झाला नाही. मुंबईच्या टोपकर बनिया कुंफणीने मऱ्हाठ्यांशी जे जे संग्राम केले, ते ते गोऱ्या लोकांच्या फलटणी घेऊन केले नाहीत. गोऱ्यांनी काळ्यांच्याच फलटणी उपयोगात आणून हिन्दी काळ्याना नामोहरम केले. परक्यांसाठी स्वकीयांवर उठण्याची हिन्दी लोकाना केव्हाच लाज वाटलेली नाही. ज्याची खावी भाकरी, त्याची करावी चाकरी, या पलीकडे हिन्दु लोकांची कसलीच भावना पूर्वी नव्हती व आजलाहि नाही. या भावनेला स्वामीनिष्ठा, राजनिष्ठा इत्यादि मुलाम्यांचे सफाईदार हात कितीहि दिले, तरी तिच्या मुळाशी साचलेली दुर्बळपणाची घाण, इतिहासाचार्य राजवाडे यानी चिकित्सापूर्वक न्यायनिष्ठूरतेने चव्हाट्यावर मांडली आहे. राजवाडे म्हणतात, ''पैशाला खोट न पडता, इतर कोणताहि अपमान सहन करावा, अशी वाणी लोकांची मनोरचना आहे..... दुसऱ्याच्या भानगडीत न पडतां व विकतश्राद्धे न घेतां, आपला संसार आपण करून स्वस्थ असावें, अशी सध्यांच्या तात्विक हिन्दूंची संन्यस्त मनोरचना आहे. ही मनोरचना लक्ष्यांत घेऊन, शेजारचें घर, शेजारची इस्टेट, शेजारचें संस्थान किंवा शेजारची बायको लुटण्याची, जर कोणा मतलबी व शिरजोर पुरुषाला इच्छा झाली, तर त्यानें लुटल्या

जाणाऱ्या इसमाच्या शेजाऱ्याला त्रास न देण्याची हमी घ्यावी म्हणजे त्याचें काम बिनबोभाट व यथासांग उरकेल. तात्विक हिन्दूंची ही संन्यस्त मनोरचना युरोपियन लोकांनी उत्तमोत्तम पारखली आहे. किंबहुना, ब्रिटीश सरकारच्या राज्यकर्तृत्वाची सर्व मदार ह्या एका पारखीवर आहे. हिन्दूंची ही संन्यस्त मनोरचना हिन्दु समाजाच्या सर्व जातींतून, वर्गांतून व पेशांतून दिसून येते. शिपाई लोकांचा वर्ग घ्या. हिन्दु शिपायांच्या तात्विक धर्माच्या आड आलें नाहीं, म्हणजें ज्याचे मीठ तो पोटाला खाईल त्याची चाकरी तो कुत्र्याप्रमाणें एकनिष्ठपणें करील; इतकेंच नव्हे तर, प्रत्यक्ष सोदर भावावरहि शस्त्र उपसावयाला मागेंपुढें पहाणार नाही. मात्र, त्याची भाकर त्याला बिनबोभाट मिळाली पाहिजे. हिन्दु कारकून वाटेल त्या पाश्चात्याची - मग तो फ्रेंच असो, फिरंगी असो, इंग्रज असो, किंवा मोंगल असो, - खर्डेघासी व कारभारीपणा करील, प्रसंगी स्वजनांच्या विरुद्धहि वागेल, फक्त त्याची ओलीकोरडी भाकर व तात्विक धर्म ही दोन त्याला बिनबोभाट मिळाली पाहिजेत. हिन्दु वाणी वाटेल त्या देशात - आफ्रिका, अरबस्तान, चीन, जपान, युरोप - जाऊन व हिन्दुस्थानात राहून वाटेल त्या परदेशस्थाची दलाली व मुकादमी करील, मात्र त्याचा धर्म व त्याचा नफा त्याला बिनबोभाट मिळाला पाहिजे. हीच कथा हिन्दु भिक्षुक, हिन्दु सटर फटर लेखक, हिन्दु शेतकरी, वगैरे सर्व लोकांची आहे. तात्विक धर्माच्या आड आले नाही, म्हणजे हिन्दूंच्या संन्यस्त मनोरचनेचा वाटेल त्या मतलबी लोकांनी फायदा घ्यावा. मनोरचना संन्यासप्रवण असल्यामुळें, स्वजातीयांच्या दुखदुःखाशी समानशील होऊन एकोप्यानें समाजकार्य, शिपाईगिरी, मुत्सद्दीपणा, व्यापारधंदा किंवा शेती करून, उरकण्याची बुद्धी सद्यस्क हिन्दूंना होत नाही व पोटाची खळी भरण्याकरितां - संन्यासप्रवण झाला तरी ती कशीतरी भरलीच पाहिजे - दुसऱ्याची गुलामगिरी पतकरणे प्राप्त होतें..... इंग्रज लोकांचा हिन्दुस्थानांतील स्वभाव दीर्घद्वेषी, खुनशी, संशयी, द्रव्यलोभी व सत्यापलापी आहे, असें त्यांच्या हिन्दुस्थानांतील तीनशें वर्षांच्या चरित्रावरून दिसून येते. Honi soit qui mal y pense (Evil to him who evil thinks = वाईट इच्छील त्याचे वाटोळे!) अशी त्यांची प्रतिज्ञाच आहे. तेव्हां, त्यांच्या समाजावर जर कोणास कांही कार्य घडवून आणावयाचे असेल, तर त्यानें आपली इच्छा ह्या स्वभावाला स्पर्श न होईल अशा बेताने तडीस नेली पाहिजे, किंवा विरोधभक्तीनें त्याला चिडवून सामर्थ्य असल्यास चेपीत व चापीत गेले पाहिजे.'' (ऐतिहासिक प्रस्तवना, पृ. ३६०-६१, चित्रशाळा आवृत्ति.)

पुष्कळ युरपियन देशानी परदेशी धाडशी लोक आपल्या नोकरीला ठेऊन, त्यांच्यापासून आपापल्या देशाचे हित साधल्याची उदाहरणे अनेक आहेत. स्विस स्कॉटिश आणि जर्मन धाडश्यांच्या सल्लामसलतीने आणि सहाय्याने पीटर धी ग्रेटने रशियाचे पुनरुज्जीवन केले आणि फ्रेडरीक धी ग्रेटने फ्रेंच सावकाराना नोकरीस ठेऊन रशियन राज्याची गंगाजळीची व्यवस्था ठाकठीक सुधारून घेतली. परंतु हीच पद्धत हिन्दी राजांच्या मात्र सपशेल आंगावर शेकली. बरोबरच आहे. रशियन प्रशियन झाले काय किंवा स्कॉच स्विस फ्रेंच झाले काय, सारे पडले युरपखंडीय गोरे. या गोऱ्यानी हिंदी काळ्या अदमीशी त्याच इमानाने वागावे, अशी कोणत्या बायबलात अनुज्ञा आहे? गोरा तो गोरा आणि काळा तो काळा**!

गोऱ्या आंग्रेजांची क्रिस्ती राज्यसत्ता हिन्दुस्थानात स्थापन होण्यास, हिन्दी राजांच्या दरबारात ब्रिटीश रेसिडंट नेमण्याची पद्धत अत्यंत कुप्रसिद्ध रीतीने कारण झालेली आहे. जुने वखरकार किंवा आधुनिक हिन्दी इतिहासकारी यानी या रेसिडेन्सी पद्धतीच्या मर्माचा ठाव घेण्याचा प्रयत्नच केलेला दिसत नाही. त्याचे त्याना महत्वच वाटत नाहीसे दिसते. हिन्दी राजांच्या दरबारात आणि राजघराण्यात कलागति

लाऊन तंटेबखेडे उत्पन्न करणे, हा एक रेसिडेण्टी नेमणुकीचा आंग्रेज बनियाचा उद्देश असे कॅपटन् ग्रॅण्ट डफ आपल्या सुप्रसिद्ध मऱ्हाठ्यांच्या इतिहासात ह्मणतो+ की ''मुंबई सरकारने मॉस्टिन साहेबाला पुण्यास एवढ्याच उद्देशाने रवाना केले होते की त्याने हरप्रयत्नानी पेशव्यांच्या घरात कलागति व तंटेबखेड्यांची पोखरण घालून, मऱ्हाठ्याना हैदर किंवा निजामअल्लीशी संगनमत करण्याची संधीच मिळू नये.'' दरबारी वकीलाचे वास्तविक कर्तव्य इतकेच की ज्या वेळी आपल्या रियासतीचा काही प्रश्न दरबारात निघेल, त्या वेळी योग्य तो खुलासा करून सलोखा राखावयाचा. पण आंग्रेजी रेसिडण्ट ह्मणजे स्वतःला मोठे तात्या पंतोजी समजून हिन्दी राजाच्या दरबारात वाटेल ती झब्बुगिरी गाजवित असत. अमूक कर, तमूक करू नको, अशी राजाला दमधाटी देत. त्याच्या खासगी व्यवहारातसुद्धा ढवळाढवळ करीत. त्याच्या खाण्या पिण्याची टीका टायली करीत. दरबाराविरुद्ध असलेल्या राजद्रोही लोकाना आसरा व मदत देत. इतके सगळे उपद्व्याप करून पुन्हा संभावितपणाचा डौल मिरवायला तयार! राज्यांच्या खासगी, घरगुती व दरबारी भानगडीबद्दल आपल्या सरकारात हवे ते रिपोर्ट करून, आपल्या मताला मान्यता हटकून मिळवीत. आंग्रेजी बनिया सरकारच्या कौन्सिलराना काय! रेसिडण्ट ह्मणजे सत्याचा पुतळा. तो ह्मणेल ती पूर्व दिशा. नवरा मरो नवरी मरो, भटाला जसे दक्षणेशी काम, तसे हिन्दी राजा मरो का त्याचे राज्य मरो, बनिया कंपनीच्या राजकारणी डावपेचाची तुंबडी भरली ह्मणजे झाले. बॅरिस्टर एम. डी. कवनाफ (M. D. Kavanagh, Esq. LL. D. Middle Temple, Bar-at-law) यानी सन १८८४ मध्ये "A few cases illustrating British Rule in India" (हिन्दी ब्रिटीश राज्याचे थोडे मासले) नावाच्या पुस्तकात या विधानाची स्पष्ट वाच्यता केलेली आहे. ते म्हणतातः-

(**भावार्थ**) ''आंग्रेजी बनिया कंपनीने हिन्दी राजांशी राजकारणी सलोखा जोडताना तहनामे केले. त्यात एक अट अशी असे. कोणीहि इंग्रज फ्रेंच अमेरिकन किंवा युरपियन माणसाला दरबारने स्वतंत्र व्यापार तर करू देऊच नये, पण आपल्या राज्याच्या हद्दीत नुसते राहूहि देऊ नये..... असली भरंसाट, आपमतलबी, अपूर्व आणि आंतर-राष्ट्रीय-द्वेष्टी अट हिन्दी राजांवर लादल्यामुळे, ब्रिटीश रेसिडण्टाना राजांच्या खासगी व्यवहांरात कलागतींची पोखरण घालायचा मार्ग मोकळा झाला. त्याला स्वकीयांच्या भेटी गाठी घेण्याचा मार्ग बंद झाला. क्षुद्र सबबीवरून त्यावर रेसिडण्ट हवी ती कुरघोडी करू लागला. इतकी कीं अखेर त्या राजांची स्थिति राजबंद्याची (स्टेट प्रिझनर) होऊन बसली. मग काय? कारस्थाने गुप्तकट

** गोरा इंग्रज 'स्पोर्टस्मनशिप'ची (दिलदारपणाची) नेहमी मोठी घमेंड मारतो. तो जर जर्नालिस्ट (वृत्तपत्रकार) असेल, तर या घमेंडीच्या वल्गनांची टिमकी बरीच तावातावाने वाजवितो; कारण जर्नालिस्ट हा स्पोर्टस्मनच असला पाहिजे, असे एक सूत्र आहे. पण हे स्पोर्टस्मनशिपचे स्पिरीट गोरा गोऱ्याशी केव्हाहि बिनतक्रार दाखवील; कारण दोघेहि गोऱ्या खाणीतले. पण काळ्या जर्नालिस्टशी वागताना, हिन्दुस्थानाला दत्तक आई मानून, फ्रेण्ड ऑफ इण्डियाच्या दांभिक बुरख्याखाली वावरणारे गोरे पोटभरू जर्नालिस्ट आपल्या काळ्याकुट्ट हृदयातली डांबर मनाच्या हलकट पिचकारीने कशी उडवितात, याचा प्रस्तुत लेखकाला चांगला अनुभव आलेला आहे.

+ Mr. Mostyn was sent to Poona by the Bombay Government, for the purpose of..... using every endeavour, by fomenting the domestic dissensions or otherwise to prevent the Mahrattas from joining Hyder or Nizam Ally. - History of the Mahrattas p. 340 (T. of I. Ed: Bombay 1873)

यांचा त्या राज्यात सुळसुळाट उठवून द्यायचा. राजावर बेइमानाचे, विश्वासघाताचे, खोटे बोलण्याचे हवे ते आरोप लादायचे. मात्र राजाला आपली बाजू मांडण्याची संधी किंवा सवलत कधीच द्यायची नाही. अशा या खेळात बरेच देशी लोक सामील करून घेऊन, (हा दाणे टाकून कोंबड्या झुंजवण्याचा खेळ) काही अपवाद वगळून, बरेच रेसिडण्ट अद्यापहि पुष्कळ खेळत असतात.'' सातारच्या छत्रपति प्रतापसिंहाला खाड्यात टाकण्यासाठी कुप्रसिद्ध नाठाळ रेसिडण्ट कर्नल ओव्हान्स याने केलेल्या हलकटपणाला जगाच्या इतिहासात तोड नाही. राजे लोकांच्या रोजच्या खाण्यापिण्याच्या किंवा करमणुकीच्या गोष्टींतसुद्धा नाक खुपसून, आपल्या दुष्ट हेतूंच्या सिद्धीसाठी त्या गोष्टींच्या परांचा कावळा करण्यात बनिया कंपनीचे रेसिडण्ट लोक आपल्या मनाचा हलकटपणा व्यक्त करण्यात किती तरबेज असत, याचा नमुना बॅरिस्टर कवनाफ यानी 'औध ब्ल्यू बुक'च्या एका उताऱ्याने दाखविला आहे. अयोध्येच्या रेसिडण्ट बहाद्दराने तेथील राजाची दिनचर्या अशी वर्णन केली आहेः- ''मे १७. आज सकाळी राजाने आपल्या हिजड्यांचे आणि दरबाऱ्यांचे मुजरे घेतले. काही कबुतरांच्या खेळात वेळ घालविला. मार्च ३०. कालची संध्याकाळ राजाने कलावंतिणीच्या नृत्यगायनात घालविली. मे ११. काल सायंकाळी दारूकाम उडवून त्याची मौज पहात बसला होता. आज सकाळी मोसाहेबअल्ली नावाच्या सारंग्याला आणि एका आफ्रिकन बाईला राजाने शाली रुमाल बक्षीस दिले. मे २३. राजाला मांजरे पाहिजेत म्हणून ती धरण्यासाठी सहा माणसांची नेमणूक केली. इत्यादि इत्यादि वगैरे वगैरे.'' असल्या क्षुद्र गोष्टींचा बोभाटा करून, हिन्दी राजांच्या राजेपंणाचीचशी काय, पण माणूस नात्याने जगण्याची नालायकी जाहीर करताना, या इंग्रेज रेसिडण्टाना स्वतःच्या माणुसकीच्या लज्जेचा पोचहि राहत नसे. जणू काय, सारंग्याना शाली देणे, कलावंतिणीची नाचगाणी ऐकणे किंवा मांजरे पकडणे, इतकीच आणि एवढीच कर्मे करून हिन्दीराजे जगत असत! बदनामी करण्याचा विडाच उचलल्यावर भांडवलाला तोटा नसतो.*** सातारच्या कर्नल ओव्हान्स रेसिडण्टाने, छत्रपतीवर पदच्युतीची आपत्ति आणण्यासाठी, खोटे गुप्तकट, खोट्या साक्षी, खोटे दस्तऐवज, बनावट साक्षीदार, बनावट राजमुद्रा, फितुऱ्या, लाचलुचपति, मारहाण, बिनचौकशी अटका इत्यादि अनंत अत्याचार करून, इंग्रेजी बनिया कंपनीच्या रेसिडण्टी पद्धतीचे उलटे काळीज जगाच्या वेशीवर नागडे उघडे टांगले. हिन्दी दरबारात आंग्रेजी रेसिडंट घुसला कीं त्या रियासतीला न्युमोनिया झालाच म्हणून समजावे, हाच गतेतिहासाचा पुरावा आहे.

रेसिडंटाच्या जोडीनेच दुसरे एक महापाप बनिया कुंफणीने हिन्दी राजेरजवाड्यांच्या बोकांडी बसवून, त्याना रसातळाला नेले. ते महापाप म्हणजे 'सबसिडियरी अलायन्स.' बनिया कुंफणीने आपले थोडे गोरे सैन्य हिन्दी राजांच्या दिमतीला द्यायचे आणि त्याबद्दल कुंफणीला राजाने रोकड रक्कम द्यायची. रोकड रकमेऐवजी राज्याचा काहीं भाग मुदतबंदीने इंग्रेजाना वापरायला देण्याचीहि वहिवाट आस्ते आस्ते सुरू झाली. असले भाग त्या त्या राजांकडे परत आल्याचे मात्र उदाहरण नाही. घशातले हाडूक काढताना

*** देशी राजांची बदनामी करण्याचा हा असला आंग्रेजी वाण नाही पण गुण ब्रिटीश खालसातल्या भटी वृत्तपत्रकारानी छान उचलला आहे. बेटे इंग्रेजी सत्तेचे बेशरम गुलाम, पण डौल आणतात केवढ्या तत्वज्ञानाचा! मुंबईच्या 'विविधवृत्त' पत्राच्या संपादकाने काही दिवसांपूर्वी सर तुकोजीराव होळकरानी इंदोरात कोटकोट रुपये खर्चून राजवाडे बांधल्याबद्दल कडकडून बायकी बोटे मोडली होती. परंतु व्हॉईसरॉयसाठी करोडो रुपये खर्चून दिल्लीस बांधायला सुरुवात झालेल्या महा राजवाड्याबद्दल शब्द काढायची त्याची छाती झाली नाही. स्वकीयांच्या पिकवी कंड्या, जबरदस्तापुढे गाळी लेण्ड्या!

तुझी मान मी दाढेखाली दाबली नाही हेच उपकार मान, म्हणून बगळ्याला दरडाविणाऱ्या लांडग्याचीच केवळ नीति! या गोऱ्या सैन्यावर सेनापति गोराच. तो करील ती पूर्वदिशा. खायाला घालावे मात्र हिन्दी राजानी आणि प्रसंगी मदत करायची का नाही, हे ठरवायचे कुंफणीनी! असा हा सबसिडियरी अलायन्सचा मामला असे. या मामल्याने देशी राज्यांचे स्वतंत्र अस्तित्व फटाफट नामशेष होत गेले आणि बोलबोलता, रणजितसिंगाच्या भाकिताप्रमाणे, सगळा हिन्दुस्थान लाल आंग्रेजी रंगाने भडक रंगून निघाला. सन १८३२ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी जी खास कमिटी नेमण्यात आली होती, तीत काही जबाबदार ब्रिटीश हापसरानी याच मुद्याचे समर्थन करणाऱ्या जबान्या दिलेल्या आहेत. डब्ल्यू. रसेल (W. Russell) हा गोरा इसम एक दोन वर्षे नव्हे, तर तब्बल २१ वर्षे निजामच्या हैदराबादेस रेसिडण्ट किंवा असिस्टंट रेसिडण्ट होता. ज्याने ज्याने या सबसिडियरी अलायन्सच्या पद्धतीचा स्वीकार केला त्या त्या संस्थानांच्या आणि रियासतींचा अखेर बिनचुक घातच झाला. या पद्धतीने निजाम महिरल्या स्थितीत मरू घातला आहे आणि पेशवाई तर आचके देऊन कधीच ओंकारेश्वरावर गेली, असा स्पष्ट अभिप्राय रसेल साहेबाने कमेटीपुढें दिला. ता. १२ ऑगस्ट सन १८१७ रोजी सर थामस मनरो (Sir Thomas Munro) याने लॉर्ड हेस्टिंग्जला लिहिलेल्या पत्रात :- ''सबसिडियरी पद्धतीचा असा अपरिहार्य परिणाम होत आहे की ज्याने तिचा पुरस्कार केला त्याचे राज्य ब्रिटीश सरकारच्या पूर्ण कबज्यात लवकर किंवा उशीरा बिनचूक आल्याशिवाय राहातच नाही..... ज्या ज्या राज्याच्या संरक्षणासाठी (?) आपले सबसिडियरी सैन्य ठेवण्यात आले आहे, त्या त्या ठिकाणी या परिणामाचा अंमल पूर्ण गाजून, त्या राज्यांचा अखेर नाशच झाला पाहिजे, यात मला मुळी शंका नाही.'' या गोऱ्या 'संरक्षणी' सैन्याने दक्षिणेत छत्रपति आणि पेशव्यांचे उच्चाटन करून, निजाम जरी कसाबसा तगला; तरी 'सोन्याची कुऱ्हाड' ह्मणून गाजलेला निजामाचा वऱ्हाड मुदतबंदीच्या सबबीच्या एरंडेलाने घसरत ब्रिटिशांच्या कायमच्या पचनी कसा पडला, मुदतीच्या मूळ सबबीच्या पुराव्याने वऱ्हाड परतवणीची मागणी करताच लॉर्ड रेडिंग व्हाईसरॉय निजामावर वाघाप्रमाणे कसा डुरकला आणि निजामाच्या राज्यकारभारावर नाना तऱ्हेचे आरोप घेऊन तेथे अनेक गोऱ्या अधिकाऱ्यांचे स्प्रिंग स्क्रू कसे दाबून बसविले, इत्यादि इतिहास ताजा तडफडीत असल्यामुळे, त्यावर अधिक लिहिण्याची जरुरीच नाही.

हिन्दी लोकानी आणि राजानी या परदेशी क्रिस्ती बनियाना, पुढचा मागचा विचार न करता, केवळ माणुसकीच्या दिलदारपणाने, ज्या ज्या सवलती दिल्या व मेजवान्या दाखविल्या, त्यांच्या पायावरच इंग्रेजांची क्रिस्ती राजसत्ता येथे उभारली गेली. जे. रसेल स्मिथ (J. Russell Smith) हा अमेरिकन लेखक म्हणतोः- कर्मवाम देणे आणि रेलवे सुरू करणे, ही देश काबीज करण्याची आधुनिक दोन सुधारलेली जंतरमंतरे आहेत. संरक्षणासाठी पोलीस आणि सैन्य ठेवण्यात येते. पण या दोघांच्या योजनेतला भेद (म्हणजे पोलीसाने काय संरक्षण करायचे आणि सैन्याने कसल्या संरक्षणासाठी धावून यायचे, यातला भेद) कधीच स्पष्ट दाखविण्यात येत नाही..... मदतनिसांच्या मुखवट्याने गेलेल्या देशजिंक्या (conquerers) लोकांच्या गळ्याला मिठ्या मारल्यामुळेच चीन देशाच्या आंगाचे लचके लचके तुटून पडले.'' (Industrial & Commercial Geography. Henry Holt & Co. 1913. New York.)

(पुढे चालू)

□□□

लेख

धावत्या काळाचे धावरे देखावे

विचारक्रान्तीचा राष्ट्रीय आठवडा

सालाबादाप्रमाणे नाताळाच्या सुट्टीचा आठवडा यंदा पंजाबात लाहोर येथे गाजला. राष्ट्रसभेचे अधिवेशन हा मध्यबिन्दु धरून, त्याच्या सभोवार नेहमीप्रमाणे अजमासे २५-३० निरनिराळ्या परिषदांच्या अधिवेशनानी भिन्नभिन्न विचारक्रान्तीच्या तोफखानी धूमधडाक्याने हा आठवडा बराच दणाणून सोडला. इतका कीं, सबंध आठवडाभर जगातल्या सर्व राष्ट्रांचे लक्ष्य लाहोरला खिळून राहिले होते आणि त्यांच्या वृत्तपत्राना लाहोरच्या विचारक्रान्तीच्या चर्चेशिवाय दुसरा विषय माहीत नव्हता, ''हिन्दुस्थानाचा विषय निघण्याची थातड कीं दिवाणखाना रिकामा'' असा ज्या हाऊस ऑफ कॉमन्सचा पूर्वापार लौकीक, त्याचे मोठमोठे अधिकारी हिन्दी राष्ट्रसभेच्या प्रत्येक सुसकाऱ्याच्या खास बातमीसाठी बिनतारी यंत्राना कान चिकटवून बसले होते. दर तासाला लाहोरास घडणाऱ्या विचारक्रान्तीच्या हरएक घटनेवर विलायती खुलासे आणि मुलाखती सारख्या प्रसिद्ध होत होत्या आणि त्यांच्या तारा येथे शेकड्यावारी धडकत होत्या. तात्पर्य, लाहोर आणि भारतेतर जग भारतीय विचारक्रान्तीच्या क्षेत्रात सबंध आठवडाभर अगदी एकजिनसी एकजीव झाले होते, असे म्हणावयास मुळीच हरकत नाही. असह्य गुलामगिरी आणि निर्भेळ स्वातंत्र्य या दोन आत्यन्तिक ध्रुवांच्या मध्यावरील संधिकाळात सध्या हिन्दुस्थान असल्यामुळे, राष्ट्रसभेच्या निर्णयाकडे सगळ्या देशाचे चित्त वेधून राहिले होते, यात अस्वाभाविक असे काहीच नाही. 'जगावे का मरावे?' याच प्रश्नाला हिन्दुस्थानात आज विशेष महत्त्व आले आहे. जगायचे तर स्वतंत्र स्वावलंबी स्वयंनिर्णयी राष्ट्र म्हणूनच जगण्यात माणुसकीचे ठरेल. बरे, मरणेच झाले तर कुत्र्याच्या मोताच्या गुलामी मोलाने मरण्यापेक्षा, मर्दाप्रमाणे स्वातंत्र्याच्या युद्धाचा अट्टहास करून तरी मेलेले काय वाईट? जातस्यहि ध्रुवोर्मृत्यू. इतक्या कडेलोटाच्या विचारसरणीवर तरुण भारताला अरेराव ब्रिटीश नोकरशाहीने आपल्या मदांध वर्तनाने आणून ठेविले आहे. विवेकाचा उपदेश करणाऱ्या नोकरशाहीचा परोपदेशे पाण्डित्याचा बुरखा काळानेच उचकून दूर झुगारून दिल्यामुळे, शासित शास्त्यात परस्पर विश्वास मुळीच राहिलेला नाही. गेल्या दीडशे वर्षांच्या ब्रिटीश अमदानीची फलश्रुति काय, तर साक्षर नाक्षर उभा हिन्दुस्थान पोटाच्या पापाने पिळून निघाला. अशा स्थितीत जनतेची वृत्ति सोक्ष नाही तर

मोक्ष इतक्या निकरावर येऊन भिडल्यास त्यात नवलाला जागाच नाही.

राष्ट्रसभेचा थैमान

भरतखण्डातील बुद्धिमान् राजकारणपटूंची संघटित संस्था या दृष्टीने राष्ट्रसभेचे महत्त्व निःसंशय अनामिक आहे. अखिल राष्ट्राच्या वतीने स्वकीय परकीय राजकारणांवर अखेरचा निर्णय देणरी आणि अभ्युदयाच्या मार्गावर शोधनप्रकाश पाडून राष्ट्राला प्रगमनशील बनविणारी राष्ट्रसभा ही एकच मध्यवर्ती संस्था आहे. हिन्दुस्थानाच्या सर्वांगीण गुलामगिरीची तिडीक यंदाच्या राष्ट्रसभेने जितक्या त्वेषाने, तडफेने आणि धिटाईने स्पष्ट शब्दात व्यक्त केली, तितका त्वेष, तडफ आणि धिटाई पूर्वीच्या एकाहि अधिवेशनात दिसून आली नाही. पण्डित जवाहरलाल नेहरूसारख्या कट्ट्या नवमतवादी तरुणाला अखिल राष्ट्राने आपल्या राष्ट्राधिपतीत्वाचा अनेक दृष्टीनी अक्षरशः अद्‌भुत असा मान देऊन, राष्ट्रसभेच्या जीवनात जी विलक्षण क्रान्ति घडवून आणली, तिचा परिणाम इतिहासात चिरंजीव होऊन राहील यात शंका नाही. गेल्या ४३ वर्षांची पद्धत म्हणजे राष्ट्रसभेच्या बादशाहीचा मान नेहमी एखाद्या वृद्ध बुद्धुकाला मिळायचा वृद्ध मण्डळी म्हणजे दहा दिशांचा अंदाज काढून सर्वांना रुचेल पचेल अशा बंदोबस्ताच्या भाषेने मुत्सद्देगिरीची इभ्रत सांभाळून, विद्वत्तेचा तोल सावरीत सावरीत, राष्ट्राच्या भावना व्यक्त करणारी मंडळी, अध्यक्षाच्या भाषणाचा ताजमहाल उभारण्यासाठी किती तरी कारागीर मंडळी खासगी रीतीने रात्रंदिवस खपत राहावयाची. मुद्यांची रचना, विधानांचा चाणाक्षपणा, इंग्रेजी भाषेच्या प्रभुत्वाची विवंचना आणि शब्द योजनेचा भरघोसपणा इत्यादि भानगडी खालीच घामटा निघायचा. पण यंदा त्या

जुन्या मनूचा मुर्दा पडला

अखिल भारतीय तरुणांचे प्रतिनिधी पं. जवाहरलाल नेहरू यानी आपल्या वर्णनीय स्वार्थत्यागाच्या जोरावर राष्ट्रसभेची बादशाही काबीज करून नव्या जोमाच्या तरुण युगान्तराची ध्वजा उंच फडकविली. भारतीय तरुणांचे विचारसामर्थ्य अध्यक्षात मूर्तिमन्त एकवटल्यामुळे, राष्ट्रसभेच्या भाषेत निःसंदिग्ध सडेतोडपणा आणि स्वातंत्र्यासाठी आत्यंतिक आत्मयज्ञाची धडाडी विशेष चमकली. राष्ट्राच्या गुलामगिरीचा मुलाजा एक क्षणभरसुद्धा चालू द्यावयाचा नाही इतक्या निकरावर राजकारणी क्रान्तीचा अट्टहास करायला सजलेल्या तरुण रणगाजींच्या विचार उच्च आचारात निर्भेळ स्वातंत्र्यवाद दणदणाट करू लागल्यामुळे, युरप अमेरिकेसारखी अरेराव खण्डे सुद्धा हिन्दुस्थानाच्या या नव्या रणरंगाकडे उत्सुकतेने आणि विवंचनेच्या दमछाटीने टकमक पाहात आहेत. दगलबाज राजकारणाचे बुरखेबाज ऊर्फ दगलबाज युग संपून पावड्याला पावडे ह्मणण्याचे (To call spade a spade) सडेतोड युग लाहोरास सुरू झाले. क्षुद्र काना मात्रा वेलांट्यांच्या बाष्कळ सबबीवर आणि 'चौकट' म्हणजे 'चौघांचा कट' (Conspiracy of four villains) असल्या पोरकट भाषांतराच्या मुत्सद्देगिरीवर राजद्रोह सिद्ध करण्यास धाधावलेल्या ब्रिटीश नोकरशाहीला

"Up up National Flag
Down with Union Jack."
राष्ट्रनिशाण वर वर चढवा
ब्रिटिश निशाणा पदतील तुडवा

ही हिन्दवी तरुणांची त्रिलोकभेदी रणगर्जना, कर्दनकाळाच्या जीवनभेदी काळहाकेप्रमाणे, बेंबीच्या देठापर्यन्त सणाणत गेलेली प्रत्यक्ष अनुभवण्याचा प्रसंग आला. मुत्सद्दी म्हणून मिरविणाऱ्या हिन्दी पोक्तांच्या दिवाणखानी उक्तींतून आजवर निष्कारण चमकणाऱ्या ब्रिटीशभक्तीला तरुणभारताच्या एकाच गर्जनेने अखेर कुप्रसिद्ध जालियांवाला बागेच्या शेजारीच मुक्तीचे थडगे लाभावे, ही काळाची करणी करणीच्या काळाना काळचक्राच्या न्यायनिष्ठूरपणाची साक्ष पटविण्याइतकीच दणदणीत वठली नाही, असे कसे म्हणता येईल? शर्ट कोट पाटलुणीच्या चुण्यासाठी जीव टाकीत, व्याकरणशुद्ध भाषेच्या पुष्पशय्येवर हिन्दवी राजकारणाला अलगज हाताळणाऱ्या पोक्तांच्या नटवेगिरीचा पडदा टरटरा फाडून, राष्ट्रसभेच्या मुखाने तरुण भारताने भारतीय तळमळीचा केलेला नागवा स्फोट, ब्रिटीश राजकारणाचे पोलादी हृदय वगळा वा न वगळा, अवघ्या संस्कृत जगाच्या सदसद्विवेक बुद्धीला हादरून सोडल्याशिवाय खास राहाणार नाही. पारतंत्र्याच्या वेदीवर बलिदान झालेल्या शेकडो भारतपुत्रांच्या रक्ताच्या चिळकांड्यानी लाहोर राष्ट्रसभेचा पार्श्वभाग लालीलाल रंगून निघाल्यामुळे लाहोरचे एकंदर वातावरण भावनावशतेने इतके फुरफुरलेले होते कीं, भावनावशता हीच जर स्वातंत्र्यप्राप्तीची यक्षिणीची कांडी असती तर, अध्यक्षाच्या एकाच शब्दोच्चाराने गुलाम हिन्दुस्थान एका क्षणात नंदनवन बनले असते. परंतु हाय! शब्दांत एवढे सामर्थ्य या कलीयुगात कोठचे? भावनांच्या भरारीने कल्पनेची वावडी आकाशाला भिडल्याचा जरी भास झाला, तरी जगातल्या व्यवहारातले धकाधकीचे मामले व्यवहाराच्या ठराविक सौद्यानेच पटवावे लागतात. स्वातंत्र्य पुकारणे ही गोष्ट फारशी कठीण नाही. पण, उच्चारलेला शब्द व्यवहारात वठविण्यासाठी लागणारी शक्ति हस्तगत करणे हे काम भावनापूर्ण व्याख्यानबाजीइतके खास सोपे नाही. लाहोर राष्ट्रसभेने स्पष्टोक्तीच्या बाबतीत केवढीहि ओव्हर बाउंडरी मारली असली आणि तरुण भारताचे हृद्गत व्यक्त करण्यात हे अधिवेशन कितीहि यशस्वी झाले असले, तरी भावनेच्या आणि (नोकरशाहीप्रमाणेच) खोट्या इज्जतीच्या भरी पडून, राजकारणाची प्रमेये सोडविण्याच्या व्यवहारपटुत्वात दाखविलेली डुक्करमुसंडी राष्ट्राच्या प्रगमनशीलतेला अनेक बाजूंनी घातक झाल्याशिवाय राहाणार नाही.

माथेफिरूपणाचे प्रयोग

राष्ट्रसभेने निर्भेळ स्वातंत्र्याच्या ध्येयाचा ठराव पसार केल्यामुळे गुलामगिरीला कंटाळलेल्या हिन्दुस्थानाला हायसे वाटणे साहजिकच आहे; पण या नुसत्या ठरावाने प्राप्त परिस्थितीत कसलाहि दृश्य परिणाम होणे नाही, हे मात्र कोणाच्याच लक्ष्यांत येत नाही. हिन्दुस्थानची जबाबदार स्वराज्यपद्धति (Constitution of Responsible Government) आजच्या घटकेला कोणत्या शक्य रीतीने अमलात आणता येईल, याची भवति न भवति करून हिन्दवी मुत्सद्यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेली नेहरू-घटनासुद्धा लाहोर राष्ट्रसभेने भावनेच्या भरात रद्द ठरविली. अर्थात् स्वराज्याचे, स्वातंत्र्याचे किंवा आणखी कसलेहि ध्येय उच्चाराने आज ठरविले असले तरी त्याच्या सिद्धीसाठी राज्य व्यवस्थेच्या घटनेचे कोणतेहि शस्त्र राष्ट्रसभेजवळ आज तयार नाही. नेहरू घटनेबद्दल दोन तीन पक्षवाल्यांचे काही थोडे आक्षेप असले, तरी सद्यःस्थितीत नेहरू-घटनेइतकी कमालशक्य अशी जबाबदार स्वराज्याची योजना अन्य नाही, असा निर्णय गेल्या कलकत्ता राष्ट्रसभेने दिलेला होता. आज तर घटना झुगारून निर्भेळ स्वातंत्र्याचे शिंग लाहोरने फुंकले. हा प्रकार प्लॅनशिवाय इमला उभारू पहाणाऱ्या इंजनेराच्या

मूर्खपणाइतकाच शहाणपणाचा आहे. स्वराज्यघटनेसारख्या महत्वाच्या गोष्टींही जर आम्ही इतक्या पोरकट माथेफिरूपणाने हाताळू लागलो, आणि शेंडी तुटो वा पारंबी तुटो इतक्या आततायीपणानें शुष्क स्वातंत्र्यवादाच्या दंगलीत हवी ती आदळआपट करू लागलो, तर हाच आमच्या राजकारणी अज्ञानाचा पुरावा आमच्याविरुद्ध गेल्याशिवाय राहाणार नाही.

हिन्दी लोकमत स्वातंत्र्यासाठी तळमळत आहे. तरुण भारत त्याच्या प्राप्तीसाठी हवे ते आत्मयज्ञ करण्यास सजला आहे. इकडे ब्रिटीश नोकरशाही आपल्या वर्चस्वबाजीच्या (Imperialism) टिकावासाठीं हिन्दुस्थानात राजद्रोहाच्या काल्पनीक भुताटकीचा दडपशाहीचा धिंगाणा घालीत आहे. राजद्रोहाची पैदास ब्रिटीश नोकरशाहीच्या वर्चस्वबाजीच्या विवंचनेत जितकी मुबलक होत आहे, तितकी वस्तुस्थितीत मुळीच आढळत नाही. तरीहि एनकेन प्रकारेण आपल्या गुलामगिरीच्या सापळ्यात सापडलेल्या हिन्दुस्थानाला कायदेबाजीच्या चापात चेचून राजनिष्ठ बनविण्याचा हा उपद्व्याप मूर्खपणाचा आणि अनैसर्गिक आहे, याची जाणीव असूनहि ब्रि. नोकरशाहीचा धिंगाणा दिवस न् दिवस वाढत्या प्रमाणावर चालूच आहे. अर्थात् याचा परिणाम तरुण भारताची मनोवृत्ति (mend or end) सोक्ष नाहीतर मोक्ष असल्या कडव्या निकरावर येऊन भिडणे, मुळीच अस्वाभाविक नाही. माथेफिरू दडपशाहीला माथेफिरू स्वातंत्र्यवादाच्या घोषणेचा स्पष्ट जबाब हा तोडगा बाह्यतः कितीहि समर्पक आणि आकर्षक दिसला, तरी तेवढ्याने भरतखण्डाच्या स्वयंनिर्णयी मोक्षाची किचकट राजकारणी प्रमेये चुटकीसरशी सोडविली जातील, असे मानणाऱ्याना आधुनिक आंतर्राष्ट्रीय राजकारणी प्रमेयांची काहीच कल्पना नाही, असे म्हटले पाहिजे. राजकारणाला वारांगनेची उपमा देण्याचा प्रघात आहे. आमच्या मते त्याला सरड्याची उपमा छान शोभेल. सर्वच कल्पनांत जर आज आमूलाग्र क्रांति झालेली आहे, तर राजकारणच तेवढे त्याला अपवाद कसे असू शकेल? अर्थात् जुन्या राजकारणी कल्पनांच्या भांडवलावर किंवा आधारावर चालू घडीच्या राजकारणाची प्रमेये सोडविण्याचे प्रयत्न फोल आहेत. भारतीय प्राचीन राजकारणाच्या डावपेचांपेक्षा सध्याचे आंतर्राष्ट्रीय राजकारण आमूलाग्र बदललेले आहे, म्हणून त्याचे वास्तवीक स्वरूप नीट लक्ष्यात न घेता, केवळ भावनेच्या भरात आततायीपणाने वर्तमान परिस्थितीचा सोक्षमोक्ष करू पाहाणे मूर्खपणाचे आहे. जगापासून अलग व तुटक राहून आणि विद्यमान आंतर्राष्ट्रीय राजकारणाकडे पाठ फिरवून, केवळ एकलकोण्डेपणाने हिन्दुस्थानाला किंवा कोणत्याहि राष्ट्राला अभ्युदयाचा मार्ग काढता येणे आज शक्य नाही. इतर राष्ट्रांच्या सहकार्याची अपेक्षा ठेवणेच भाग आहे. सर्व जगावर आपल्या संस्कृतीची छाप पाडून त्यांच्या सहकार्याची अपेक्षा आपण ठेवणार, तर जगाचा एक घटकावयव अथवा राष्ट्रसंघातील एक सभासद या नात्याने हिन्दुस्थानाला जगाची सांघिक सत्ता मानावीच लागणार. मात्र या सत्तेतला भेद नीट पाहिला पाहिजे ''सहकारी दोस्त'' म्हणून आपखुषीने मान्य केलेली सत्ता निराळी, आणि आज ब्रिटीश नोकरशाही आमच्यावर गाजवीत असलेली निरंकुश सत्ता निराळी. नोकरशाहीची सत्ता आणि तिने प्रचलित केलेली राज्यपद्धति संपुष्टात आणणे, हे आज आमचे आद्यकर्तव्य आहे. त्यासाठी योग्य त्या चळवळी जोरदार रीतीने आणि विशेषतः एकोप्याने चालविण्याशिवाय गत्यंतरच नाही. जित राष्ट्र म्हणून नव्हे, तर स्वयंनिर्णयी सहकारी दोस्त राष्ट्र या नात्याने हिन्दुस्थान जर ब्रिटीश साम्राज्यात राहील, तर त्यात त्याचा कसलाहि तोटा नसून, उलट फायदाच आहे. नोकरशाहीच्या मदांध वर्तनामुळे ''इंग्रेज'' हा शब्द आज आम्हाला तिटकाऱ्याचा वाटतो, ही गोष्ट कितीहि खरी असली,

तरी व्यापक राजकारणाच्या दूरदृष्टीने ब्रिटीश साम्राज्यात समाविष्ट झालेल्या राष्ट्रसंघापासून फटकून वागणे, हिन्दुस्थानाला केव्हाहि श्रेयस्कर होणार नाही. हिन्दुस्थानाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आंतर्राष्ट्रीय महत्त्वाचा आहे आणि आंतर्राष्ट्रीय राजकारणाचा दाब जसा आणि जितका वाढेल, किंवा आपणास वाढविता येईल, तसा आणि तितका तो प्रश्न सुटणार आहे. निर्भेळ स्वातंत्र्य (Independence) म्हणजे ब्रिटीश साम्राज्याबाहेर पडून, आणि इतर सर्व राष्ट्रांशी फटकून तुसडेपणाने अस्पृश्यांप्रमाणे वागण्याची कल्पना वरपांगी मोठी चित्ताकर्षक वाटते खरी, पण ती इष्ट नाही; आणि इष्ट आहे असे कोणी कितीहि भावनेच्या भरात कंठशोष करून सांगितले तरी ते शक्यहि नाही. ब्रिटीश साम्राज्याबाहेरील इतर जर्मन रशियन किंवा जपान ही राष्ट्रे आमच्याशी सहानुभूतीने वागतील, आमच्याशी सहकार्याने वागतील, स्वातंत्र्याचे युद्ध पुकारले गेले तर आमच्या पाठीशी ससैन्य सशस्त्र येऊन उभे राहतील, असल्या कल्पना कल्पनासृष्टीत कितीहि शक्य आणि रम्य दिसल्या तरी त्याना कल्पनेपेक्षा प्रत्यक्ष व्यवहारात काहीच मोल येणे शक्य नाही. ब्रिटीश साम्राज्याचा वाढता विस्तार पाहून त्याविरुद्ध धुसफुस करणारी ही इतर राष्ट्रे हिन्दुस्थानाला त्या साम्राज्यातून निराळे पाडण्याची यदाकदाचित् खटपट करतील, तर अखेर तीच हिन्दुस्थानाचे लचके तोडण्यास तयार होणार नाहीत, याची हमी कोण कशी घेणार? तात्पर्य, नोकरशाहीचा माथेफिरूपणा आणि राष्ट्रसभेचा माथेफिरूपणा या दोन आपत्तींच्या खडकाना सांभाळूनच हिन्दवी अभ्युदयाचे तारू शिताफीने हाकारण्याचा प्रसंग आज हिन्दी मुत्सद्यांपुढे येऊन पडला आहे.

राष्ट्राची तयारी आहे काय?

राष्ट्रसभा म्हणजे हिन्दुस्थानच्या राजकारणाला देशकालवर्तमानाप्रमाणे योग्य ते वळण लावणारी मध्यवर्ति सभा. अर्थात् तिची जबाबदारीहि तेवढीच मोठी. पण लाहोरच्या अधिवेशनाने व्यवहारपटुत्वापेक्षा भावनेला फाजील महत्त्व देऊन ही जबाबदारी हवेत उधळून लावली. शब्दसृष्टीला सहजशक्य अशा निर्भेळ स्वातंत्र्याचा पुकारा करून, लाहोरने आपल्या राजकारणी चाणाक्षपणाने दिवाळे फुंकले, असे दिलगिरीने म्हणणे प्राप्त आहे. एका झटक्याबरोबर नेहरू-घटना रद्द ठरविली, डोमिनियन स्टेटस, रौण्ड टेबल कॉन्फरन्सचा सवाल इत्यादि सर्व बाबी धिःकारून निर्भेळ स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधी यांची असहकारी शास्त्राची जुनी अपयशी ठरलेली शस्त्रे म्हणजे कौन्सिल बहिष्कार, करबंदी वगैरे अमलात आणण्याची योजना राष्ट्रसभेने हाती घेतली. या योजनेचे परिणाम काय होतील, हे आता नव्याने कोणाला सांगायला पाहिजे, असे नाही. असहकारवादाचा फोलपणा आणि त्याचे घातुक परिणाम हिन्दुस्थानाला चांगलेच भोवलेले आहेत. दक्षिण आफ्रिकेत किंवा बारडोलीसारख्या चिमुकल्या तालुक्यात असहकार आणि करबंदीची चळवळ यशस्वी झाली, म्हणजे ती हिन्दुस्थानासारख्या नानारंगी भिन्नजिनशी अवाढव्य खण्डात एकसमयावच्छेदे एकदम यशस्वी होईल, ही त्रयराशिकी कल्पना किती मूर्खपणाची आहे, हे ज्यांच्या नीटसे लक्ष्यात येत नाही आणि केवळ आततायीपणाने जे बरे वाईट होईल ते होईल, इतक्याच निकरावर ज्यांच्या मनोवृत्तीची धाव येऊन भिडली आहे त्यांच्या धिंगाण्यात हिन्दी राष्ट्राने सामील होणे आत्मघातकी पणाचे आहे. राष्ट्रसभेने म. गांधींच्या असहकारवादाचे कोदण्ड हाती घेऊन त्याच्या प्रत्यंचाचा कितीहि गगनभेदी टणत्कार केला, तरी ब्रिटीश नोकरशाही किंवा पार्लमेण्ट याना त्याची कसलीहि दरकार किंवा धास्ती वाटणे शक्य नाही. मूठभर माथेफिरू पुढाऱ्यांच्या चिथावणीने हवी ती बेशिस्त दंगल करणाऱ्या पेंढाऱ्याना नेस्तनाबूत करण्याचा यशस्वी प्रयोग त्यांनी

एकदा केलेला आहे. पूर्वीप्रमाणेच आताहि या असहकारवादाच्या योजनेने राष्ट्रपुढाऱ्यांत बेकीची फाटाफूट पडून, 'हे खरे का ते खरे' अशी जनतेची दिशाभूल होण्यास सुरुवातहि झाली आहे. आततायी प्रयोग करणारांच्या चळवळीत आदळआपटीचा गडगडाट विशेष असल्यामुळे, विवेकी मार्गानी राष्ट्रनियंत्रण करू पाहाणाऱ्या पुढाऱ्याना लोकद्वेषास पात्र करण्याचे कलम असहकारवाद्याना प्रथम हाती घ्यावे लागते. मागल्या चळवळीत लाला लजपतरायसारख्या थोर पुढाऱ्याला सुद्धा ''ट्रेटर'' (देशद्रोही) म्हणून शिव्या खाव्या लागलेल्या आहेत, हे आज फारच थोड्या लोकांच्या स्मरणात असेल. दंगलखोर चळवळी सुरुवातीला कितीहि जोमदार दणदणाटाच्या असल्या किंवा तशा दिसल्या, तरी त्यात जनतेच्या एकाग्र तळमळीचा लवलेशहि नसल्यामुळे, केवळ हंगामी हुल्लडीच्या पुण्याईवर त्या फार वेळ टिकत नाहीत. राष्ट्रसभेच्या अधिवेशनात लाख दीडलाख तमासगीर जमले आणि त्यानी हवा तो बरा वाईट ठराव केला, म्हणून तेवढ्यावरून तो अक्षरशः पाळण्याइतकी राष्ट्राची तयारी आहेच, असे मागील अनुभवावरून मानणे, म्हणजे प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा जाणून बुजून विपर्यास करण्यासारखे आहे. स्वातंत्र्याची तळमळ कितीकाना लागली आहे, त्याविषयी चळवळ करणारांची उत्पत्ति आणि स्थिति आज कशी काय आहे, शहरी चळवळी आणि खेड्यापाड्यांतली स्थिति यांचा अन्योन्य संबंध कसा काय आहे, इत्यादि माहिती ''शेतकऱ्यांचे स्वराज्य'' या आमच्या नवीन पुस्तकात स्पष्ट दिलेली असल्यामुळे, त्याची द्विरुक्ती येथे नको. म. गांधी हे एक संशयातीत संतपुरूष म्हणून शंभर वेळा आम्ही त्याना प्रणाम करू, परंतु हिन्दुस्थानातील जनतेच्या ज्या खात्रीवर ते पुन्हा असहकारवादाने स्वातंत्र्यप्राप्तीची अपेक्षा करीत आहेत, त्यात भावनावशतेपलीकडे कसलेहि राजकारण नसल्यामुळे, राष्ट्रसभेच्या या नव्या आततायी प्रयोगाला विवेकी पुढाऱ्यानी विरोध करणे कर्तव्यप्राप्त आहे.

जबाबदार राज्यपद्धति पाहिजे.

हिन्दुस्थानाला आज जर कशाची निकडीची जरूर असेल तर ती जबाबदार राज्ययंत्राची (Responsible Government). नुकतेच वेजवुड बेन यानी ''हिन्दुस्थानाला डोमिनियन स्टेटस (वसाहतीचा दर्जा) मागेच मिळालेला आहे'' असे उद्‌गार काढले. त्यांच्या भाषणाचा अर्थ नीट विचारात न घेता, अनेक देशी राजकारणी (?) पत्रकारानी या उद्‌गारांची टिंगल केली. बेनच्या उद्‌गारांत पूर्णसत्य नसले तरी अर्धसत्य खास आहे, इकडे कोणाचेच लक्ष्य गेलेले दिसत नाही. याचे कारण (महाराष्ट्रापुरतेच बोलायचे तर) एक दोन अपवाद सोडता, फारच थोडे वृत्तपत्रकार राजकारणाचे स्वाध्यायी म्हणून दाखविता येतील. महायुद्धाच्या समाप्तीनंतर सर्व राष्ट्रांचा आंतर्राष्ट्रीय बैठकीत जो तहनामा झाला, त्यावर हिन्दुस्थान सरकारच्या वतीने प. वा. लॉर्ड सिंह आणि बिकानेरचे महाराज यांच्या, हिन्दुस्थान खास प्रतिनिधी म्हणून, ज्या वेळी सह्या झाल्या, त्याच वेळी ब्रिटीश पार्लमेण्टने हिन्दुस्थानचा वसाहतीचा दर्जा निःसंदिग्ध मान्य केला. दक्षिण आफ्रिका, कानडा, आस्ट्रेलिया वगैरे डोमियिन्सच्या खुर्चीला खुर्ची भिडवून हिन्दुस्थानचे प्रतिनिधी आंतर्राष्ट्रीय बैठकीत बसताच आमचे डोमिनियन स्टेटस सिद्ध झालेले आहे. जुन्या कल्पनेप्रमाणे हिन्दुस्थान ही एक जर नुसती ''डिपेण्डन्सी'' (अंकीत राष्ट्र) असती, तर हिन्दुस्थान सरकारला या दोन हिन्दी प्रतिनिधींची सरकारी निवडणूक (नॉमिनेशन) करण्याची जरूरच नव्हती. जिनीवाच्या राष्ट्रसंघामध्येहि हिन्दुस्थानचा खास प्रतिनिधी आज हिन्दुस्थान सरकारच्या निवडणुकीने बसतच असतो. मग दक्षिण आफ्रिका कानडा ऑस्ट्रेलिया

प्रभृति डोमिनियन्समध्ये आणि हिन्दुस्थानमध्ये भेद काय आणि कसला? भेद हाच कीं या सर्व राष्ट्राना डोमिनियन स्टेटस मिळून, त्याची सार्थकता करणारी जबाबदार लोकसत्ताक राज्यपद्धति (Responsible Popular Government) मिळाली आहे आणि हिन्दुस्थानाला मात्र या पद्धतीचा लाभ मुळीच झालेला नाही. म्हणजे नाव शिलेदार आणि घोड्याचा बेपत्ता अशी आमची चमत्कारीक स्थिति आहे. अर्थात् आज आमच्या सर्व प्रयत्नांचे आणि चळवळींचे केन्द्रीकरण ही जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यासाठी खर्ची पडले पाहिजेत. जोंपर्यंत जबाबदार राज्यपद्धतीचे डोमिनियन स्टेटस आमच्या हस्तगत झालेले नाही, तोपर्यन्त ब्रिटीश साम्राज्यात राह्यचे कीं नाही, या प्रश्नाला कसलेहि महत्व नाही आणि निर्भेळ स्वातंत्र्याच्या हाका आरोळ्याना जगाच्या राष्ट्रसंघांच्या बाजारात फुटकी कवडीहि किंमत येणार नाही. जबाबदार राज्यपद्धतीचे डोमिनियन स्टेटस मिळाल्यावर, असल्या वसाहतीनी ब्रिटिश साम्राज्यात (British Common-wealth of Nations) राहणे किंवा न राहणे हा खुषीचा सौदा आहे, असा स्पष्ट खुलासा पार्लमेंटाने मागेच जाहीर केलेला आहे. असे असूनहि, जबाबदार राज्यपद्धति असलेल्या कानडा, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड वगैरे स्वतंत्र वसाहती ब्रिटीश राष्ट्रसंघांतच कां राहू इच्छितात? ब्रिटीश साम्राज्यापासून हव्या त्या वेळी विभक्त होण्याचा आपला हक्क निर्विवाद सिद्ध करून घेतल्यावरहि या वसाहती त्या साम्राज्यातच राहू इच्छितात, याची मख्खी काय आहे? काही दिवसांपूर्वी दक्षिण आफ्रिकेने तर ब्रिटीशांच्या युनियन जॅक निशाणाला उखडून त्या जागी आपले राष्ट्रीय निशाण उभारण्याचाहि समारंभ केला, तरी सुद्धा ब्रिटीश साम्राज्याशी विभक्तपणा जाहीर केला नाही. विभक्त पडण्याचा हक्क प्रस्थापित करून घेतल्यानंतर, ब्रिटीश साम्राज्याचा एक स्वयंनिर्णयी घटकावयव म्हणून, ब्रिटीश राष्ट्रसंघात दोस्तीच्या नात्याने राहण्यात कोणाची कसलीच मानहानी नाही; उलट सहकार्याचा फायदाच आहे, ही गोष्ट या वसाहतींच्या चांगली लक्ष्यात आलेली आहे. अर्थात् अशा प्रकारच्या स्वयंनिर्णयी वसाहतीचा दर्जा हिन्दुस्थानाला मिळाल्यास किंवा मिळविल्यास, निर्भेळ स्वातंत्र्याचा नुसता शाब्दिक पुकारा करण्यात कसलाहि शहाणपणा नाही, हे प्रत्येक विचारवंतास कबूल करणे भाग पडेल. असला दर्जा हिन्दुस्थानाला मिळवून देण्याची खटपट करणे, हेच आजच्या राष्ट्रपुढाऱ्यांचे कर्तव्य आहे. हिन्दुस्थानची आजची स्थिति धड ना डिपेण्डन्सी, धड ना डोमिनियन अशी विचित्र होऊन बसली आहे. भारतीय सनातनी भटांप्रमाणे सत्ताभिलाषी आणि जुन्याला चिकटून बसणारे ''कॉन्झरवेटीव'' ऊर्फ ''टोरी''. इंग्रेज लोक हिन्दुस्थानातला याच स्थितीत डांबून ठेवण्याचा अट्टाहास करीत आहेत. व्हाईसरॉय लॉर्ड आरविन, स्टेट सेक्रेटरी वेजवुड बेन आणि एकंदर मजूर सरकार (Labour Government) यानी प्रगमनशीलतेचे धोरण आखलेले आहे. त्यामुळे स्वयंनिर्णयी डोमिनियन स्टेटसची प्राप्ती हिन्दुस्थानाला करून देण्याचा मार्ग सध्या तरी बराच सुकर झालेला आहे. अशा वेळी जबाबदार स्वयंनिर्णयी राज्यपद्धतीची घटना एकोप्याने तयार करण्याच्या ऐवजी, आततायी भावनावशतेने निर्भेळ स्वातंत्र्यासाठी कौन्सिल-बहिष्कारासारखे माथेफिरूपणाचे प्रयोग राष्ट्रावर लादण्यास राष्ट्रसभेने आपल्या जबाबदारीची पायमल्ली केली, याबद्दल कोणाला हळहळ वाटणार नाही?

मारुतीजवळ पुत्रोत्पत्तीची मागणी

गांधी-नेहरूंची व्हाईसरॉयशी झालेली मुलाखत राष्ट्रसभेच्या आधीच एक दोन दिवस वांझोटी ठरल्यामुळे, राष्ट्रसभेच्या विचारविनिमयात एक विशेष प्रकारची निराशा आणि त्वेष साहजिकच दिसून

आला. पण यात दोष कोणाचा? स्वयंनिर्णयी डोमिनियन स्टेटस ताबडतोब द्या अशी गांधी नेहरूंची मागणी, तर ''ही गोष्ट माझ्या हातची नाही. आपले जे काही मागणे असेल ते राऊण्ड टेबल कॉन्फरन्समध्ये मांडा, म्हणजे तेथे त्याचा योग्य तो विचार होईल.'' हे व्हाईसरॉयचे म्हणणे. व्हाईसरॉयच्या म्हणण्यात बराच तथ्यांश आहे. जी गोष्ट खास पार्लमेण्टाच्याच हातची, जिच्या आश्वासनाबद्दल खुद्द स्टेट सेक्रेटरीला सुद्धा काही जबाबदारी किंवा जोखीम पत्करता यायची नाही, तीच गोष्ट तुम्ही केली पाहिजे, असा व्हाईसरॉयजवळ आग्रह धरणे म्हणजे मारुतीसारख्या ब्रम्हचाऱ्याजवळ पुत्रोत्पत्तीची मागणी करण्याइतकेच आचारटपणाचे ठरेल. ही गोष्ट गांधी-नेहरूना कळत नव्हती, अशातला प्रकार मुळीच नाही. पण त्यांच्यापुढे निराळीच अडचण होती. त्याना माहीत होते कीं तरुणपक्ष बराच प्रबळ झाला आहे. कलकत्ता राष्ट्रसभेने असे ठरविले होते कीं गेल्या ३१ दिसेंबरपर्यंत जर डोमिनियन स्टेटस न मिळाले, तर १ जानेवारीला स्वातंत्र्य पुकारायचे. (स्वातंत्र्य पुकारायचे म्हणजे काय, याचा तपशील मात्र कोठेच काही नाही!) तरुणपक्षाच्या भावनाप्रधान उच्छृंखलपणाला शिस्तीत ठेवण्याचे अगर तोंडबेडी ठोकण्याचे सामर्थ्य आपल्यापाशी नाही, ही गांधी नेहरूंची खात्री असल्यामुळे, त्यानी वारा वाहील तशी शिडे फडफडवून तरुणपक्षाच्या सोसाट्यापुढे आपले आसन टिकवून धरण्याचा प्रयत्न केला आणि त्यात ते फसले. गेल्या वर्षातील म. गांधींच्या वाग्लेखन खुलाशांचा मतितार्थ काढला तर तो सलोख्याने तण्टा मिटविण्याच्याच कलाचा होता, असे दिसते. ३१ दिसेंबरपर्यन्त ब्रिटीश पार्लमेण्टने हिन्दुस्थानाला डोमिनियन स्टेटस देण्याबद्दल जर काही ठळक संकेत (guesture) व्यक्त केला, तर कलकत्ता राष्ट्रसभेची धमकी आपण अमलात आणणार नाही, असा गांधींच्या विधानांचा सूर वाहात होता. त्यानंतर व्हाईसरॉयचा जाहीरनामा (announcement) बाहेर पडला, पार्लमेण्टमध्ये सहानुभूतीचा खुलासा झाला आणि हिन्दुस्थानच्या जबाबदार राज्यपद्धतीची घटना ठरविण्यासाठी राऊण्ड टेबल कॉन्फरन्सची योजनाहि मुक्रर झाली. या सर्व गोष्टी (Guesture) संकेताच्याहि बऱ्याच पुढे वास्तवीक गेल्या. पण भावनावश तरुणपक्षाच्या आकांडतांडवापुढे गांधींचे काय चालणार? जी गोष्ट करणे व्हाईसरॉयच्या हातातली नाही, तीच गोष्ट नेमकी करा, असा आग्रह धरणे आणि ज्या गोष्टी व्हाईसरॉय करू शकतो, त्याचे अवाक्षरहि न काढणे, असल्या वृत्तीने मुलाखत घेण्यांत गांधी नेहरूनी आपण तरुणांपेक्षा कमी मगजफाट नाही, एवढेच दाखविण्यापलीकडे काहीहि मिळविले नाही. राजकीय कैद्यांची मुक्तता आणि राजकीय खटले काढून घेण्याची आवश्यकता, या गोष्टी व्हाईसरॉयच्या मुखत्यारीतल्या खास होत्या; आणि सलोख्याचा पाया म्हणून त्या त्यानी - चर्चा झालीच असती तर - खास केल्याहि असत्या. आज याच गोष्टींची जरूर आहे. केवळ मतभिन्नतेच्या सबबीवर चांगल्या चांगल्या सुसंस्कृत नागरिकांवर राजद्रोहाची घोरपड बांधण्याचा नोकरशाहीचा अट्टहासच आज सगळ्या देशात असंतोषाचा वणवा पेटवीत सुटला आहे. राउण्ड टेबल परिषदेचे आमंत्रण स्वीकारायचे तर ते अविकल्प (unprejudiced) मनःस्थितीतच स्वीकारले गेले पाहिजे, याबद्दल कोणाचाच मतभेद असू शकणार नाही. या अविकल्प वृत्तीला राजकारणी कैद्यांची आणि खटल्यांची मुक्तता यांचाच पाया आज पाहिजे, अशी गांधी नेहरूंची मागणी झाली असती, आणि तिचा जर व्हाईसरॉयने इनकार केला असता, तर त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल (good faith) शंकाचशी काय, हवा तसला निषेध करणेहि न्यायाचे झाले असते. पण असे काही एक न करता, व्हाईसरॉयला अशक्य अशा गोष्टीबद्दल हट्टाग्रह धरण्यात

गांधी नेहरूंचे वर्तन गैरमुत्सद्दीपणाचे झाले, असेच म्हटले पाहिजे. कमी दुर्घट गोष्टी प्रथम हाताळून मग विशेष दुर्घट गोष्टी साधण्याचा प्रयत्न करणे, हाच विचारवंतांचा शिरस्ता व संप्रदाय असतो. तो गांधी-नेहरूसारख्या ज्ञानवृद्ध मुत्सद्यांनी, केवळ तरुणांच्या आदळआपटाला भिऊन, लाथाडावा हे खरोखर देशाचे दुर्दैव होय.

आधी घटना मग स्वराज्य

हिन्दुस्थानातील बेजबाबदार राज्यपद्धति समूळ उखडून, तिच्या जागी जबाबदार राज्यपद्धति निर्माण करण्याचे हिन्दुस्थानाचे वाजवी प्रयत्न राउण्ड टेबल परिषदेपुढे चर्चेला आलेच पाहिजेत. भारतेतर आणि ब्रिटीशेतर सर्व राष्ट्रांचे लक्ष्य हिन्दुस्थानाच्या न्याय्य मागण्यांकडे वेधून, त्यांच्या अभिप्रायांचा व सहानुभूतीचा पाठिंबा मिळविण्याच्या कामी असल्या परिषदांचा शक्य तितका उपयोग करून घेणे जरुरीचे आहे. याच धोरणारे राउण्ड टेबल परिषदेची मागणी ले. असेंब्ली व काँग्रेस यानीच प्रथम हिन्दुस्थानच्या वतीने केलेली होती. पार्लमेण्टाची सूत्रे जोवर टोरी टोळीच्या हाती होती; तोवर या या मागणीचा काहीच विचार झाला नाही, यात आश्चर्य मानण्यासारखे काहीच नाही. आता मजूर पक्ष अधिकारारूढ असल्यामुळे, आणि हिन्दुस्थानाच्या राष्ट्रीय आकांक्षांकडे पाहण्याची त्याची दृष्टी बरीच समभावी असल्यामुळे, राउण्ड टेबल परिषदेची ती मागणी आज मंजूर होत आहे; ही आनंदाची गोष्ट होय. हिन्दुस्थानाला टिकाऊ पायावरचे (Stable) स्वयंनिर्णयी जबाबदारीचे स्वराज्य (Self-determining Responsible Government) जर पाहिजे असेल, तर असल्या राउण्ड टेबल परिषदांसारखे अधिक उपयुक्त आणि कार्यक्षम असे दुसरे साधन सध्याच्या राजकारणी शस्त्रागारात नाही. अनेक भेद पक्ष पंथ, शेकडो धर्मभेद आणि लाखो जातिभेद यानी उफलून निघालेल्या हिन्दुस्थानाच्या जबाबदार राज्यपद्धतीची कोणतीहि घटना, मतैक्याच्या अभावी, निरूपयोगीच ठरणार. हिन्दु, मुसलमान, शीख, ब्राह्मण, बाह्मणेतर, मराठेतर, मागासलेले, जहाल, मवाळ, प्रागतिक, अधोगतिक, संस्थानी अशा निरनिराळ्या लोकसमूहानी एकजुटीने राहून राष्ट्राच्या अभ्युदयाचा कळकळीने प्रयत्न करावयाचा असेल, तर या सर्वांना सामान्यतः तरी मान्य अशीच राज्यघटना (Constitution) तयार करावी लागेल, आणि तिच्या कारभारात या सर्व समूहांचा काही ठरावीक प्रमाणात जर हात असेल, तरच ती टिकाऊ स्वरूपाची होईल. नेहरू-घटनेची लागलेली वासलाद नीट विचारात घेतली, तर केवळ हिन्दी मुत्सद्यांच्या परिश्रमाने तयार होणाऱ्या घटनेपेक्षा, हिन्दी आणि ब्रिटीश अशा मिश्र विचार-विनिमयाने तयार होणारी योजनाच हिन्दुस्थानाला मान्य करावी लागेल. शिफारसीवजा घटना आणि ठराव, राष्ट्रहिताकडे दूरदृष्टी ठेऊन, मान्य करण्याचा हिन्दुस्थानाचा मुळी पिण्डच नव्हे. राउण्ड टेबल परिषदेत मिश्र विचारविनिमयाने ठरणाऱ्या घटनेला पार्लमेण्टाची मंजुरी मिळाली म्हणजे ती हिन्दुस्थान बिनतक्रार मान्य करील. शिवाय, या रा. टे. परिषदेपुढे योग्य तऱ्हेची जी मुद्देसूद भाषणे हिन्दी व ब्रिटीश मुत्सद्दी करतील, त्यांचा सर्व जगावर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. यदाकदाचित् या परिषदेत मतैक्य झाले नाही, तरीहि तेथल्या विचार-संग्रहाचा मतितार्थ काढून, त्यावर त्रयस्थ म्हणून निश्चित अभिप्राय बनविण्याची संधी इतर सर्व राष्ट्रांना खास मिळेल. देशातल्या देशात हातपाय झाडण्यापेक्षा, आपले राष्ट्रीय दुखणे अशा परिषदेच्या मार्गाने जगाच्या चव्हाट्यावर टांगण्याची संधी आली असता, तिच्यावर बहिष्कार घातला तर जग या आमच्या कृतीचा असा बिनचूक अर्थ काढील की एकमताने मांडण्यासारखी

राज्यघटनेची कसलीच योजना आमच्याजवळ नाही; तयार करण्याची आमची पात्रता नाही; तसा प्रयत्न करण्याची आमची इच्छा नाही आणि ब्रिटीश सरकार जे आम्हाला (Dependency) अंकीत राष्ट्र म्हणून नोकरशाहीच्या चाबकाखाली वागवीत आहे, ते त्यांचे करणे परिस्थित्यनुरूप क्रमप्राप्त आणि रास्तच आहे. कधी काळी ब्रिटीश साम्राज्यापासून जर फटकून विभक्त व्हावयाचे असेल, तर बाकीच्या जगाची अशी आपण खात्री पटवून दिली पाहिजे कीं आमच्यां मागण्या न्याय्य व योग्य होत्या आणि ब्रिटीश पार्लमेण्टानेच अन्यायाने आणि लफंगेपणाने आमचा तेजोभंग अखंड चालविल्यामुळेच आम्ही हा मार्ग पत्करला. आपण सलोखा आणि तडजोड करण्यास तयार, पण ब्रिटीश पार्लमेण्ट उद्दाम आणि बेमुर्वतखोर, असे दृश्य जगाला खासखूस पटवून देण्याचे कार्य जर आम्ही पद्धतशीर केले, तर त्यातहि हिन्दुस्थानाचा अतोनात फायदाच आहे. आंतर्राष्ट्रीय सहानुभूतीला गदागदा हालविण्याचे भीम प्रयत्न केल्याशिवाय हिन्दुस्थानाच्या मानेला लागलेली बेजबाबदार नोकरशाही राज्यपद्धतीची ताट तुटणे शक्य नाही. अर्थात् या भीमप्रयत्नांच्या दिशेने आयती चालून आलेली राउण्ड टेबल परिषदेची संधी बहिष्काराच्या आततायी वृत्तीने लाथाडणारे लाथाझाडू लोक हिन्दुस्थानाच्या राजकारणी क्षेत्रात वावरण्यास नालायक होत.

कौन्सिल बहिष्काराचा मूर्खपणा

निर्भेळ स्वातंत्र्याचे साधन म्हणून कौन्सिल-बहिष्काराचा कोडगा तोडगा राष्ट्रसभेने पुन्हा एकवार अट्टहासाने हाती घेतला आहे. कोर्ट आणि शाळा-बहिष्काराच्या जंत्र्या अझून वासनातच ठेवलेल्या आहे. या तीनहि बहिष्कारांची घातुक फलश्रुति राष्ट्राने पूर्वी एकदा अनुभवली असल्यामुळे, बऱ्याच पुढाऱ्यानी कौन्सिल-बहिष्काराच्या आत्मघाताला कडकडीत विरोध करण्याचे निश्चित केले आहे, ही समाधानाची गोष्ट होय. शत्रूच्या गोटावर हल्ला करून त्याचा पाडाव करावयाचा, तर आतून आणि बाहेरून असा दुजोड हल्ला चढवावा लागतो. बाहेर कितीहि चळवळी केल्या, पण ज्या कायद्यांच्या जोरावर नोकरशाही हवे ते धिंगाणे या देशात घालण्यास समर्थ होऊ शकते, त्या कायदेखान्यातले सगळे देशी सैनिक आणि सेनानी परत बोलावून, गनिमाला सगळे मैदान मोकळे करून देणे, यात राजकारण तर नाहीच, पण सारासार विचारहि दिसत नाही. कायद्यांच्या शस्त्रागारात नोकरशाहीच्या सत्ताटिकावाची पूर्वी तयार झालेली अनेक शस्त्रे तोडून मोडून टाकण्याचे, निदान बोथट करून टाकण्याचे काम आमच्या कौन्सिल्या योद्ध्यानी आजवर मुळीच केले नाही. ते करणे जरुरीचे आहे. राजद्रोहाच्या कायद्यासारखी किती तरी जाज्वल्य शस्त्रे हिन्दुस्थानच्या विचार-स्वातंत्र्याची नरडी धूमधडाक्याने दाबीत सुटली आहे. मुडीमन कायदा अनेक उत्तमोत्तम ग्रंथांची मान मोडीत सैरावरा बोकाळत आहे. या व असल्या अनेक शस्त्रांची शस्त्रागारातून हकालपट्टी करणे तर दूरच राहिले, आणि आता म्हणे त्या शस्त्रागारावरच बहिष्कार घाला! म्हणजे अनेक वर्षांच्या झगड्यानी काबीज केलेला प्रदेश निष्कारण सोडून देण्याचा गैरमुत्सद्दीपणा करण्यासारखे आहे. ब्रिटीश नोकरशाहीच्या अरेरावीचा धिंगाणा कायदेबाजीच्याच जोरावर चालत असतो. मागे स्वराज्यपक्षवाल्यानी करवलीचा हंगामी रुसवा धरून, सुतक्याप्रमाणे असेंब्लीची गैरहजेरी पत्करल्या वेळीच मुडीमनचा मानमोडी कायदा पास झाला ना! अर्थात् बहिष्काराच्या आततायीपणाने कौन्सिल असेंब्ल्या ओस पाडून, नोकरशाहीला कायदेबाजीचे मैदान हव्या त्या धिंगाण्यासाठी सताड मोकळे करून देणे, या सारखा दुसरा मूर्खपणा नाही. याचे ताजे

उदाहरण घ्यावयाचे म्हणजे ना. हाजी यांचे 'कोस्टल ट्राफिक' (समुद्रकिनाऱ्यालगत जहाज वहातुकीच्या हिंदी व्यापाराच्या) बिलाचेच घ्या. हिन्दी किनाऱ्यावरची व्यापारी वाहातुकी आज एकजात इंग्रेजी व्यापारी बळकाऊन बसले आहेत. देशी कंपनी म्हणजे एकटी शिंद्या स्टीम नॅविगेशन कंपनी. इंग्रेजी कंपन्यांच्या एकमुखी चढाओढीपुढे बराच तोटा सोसून ही कंपनी फक्त मालाच्या वाहातुकीचा थोडासा व्यापार करते. उतारू ने आण करण्याची तिला परवानगी नाही. ना. हाजी यांच्या बिलाचा आशय हाच कीं हिन्दी किनाऱ्यांवर हिन्दी जहाजांचीच वहातुक असावी आणि त्याना सरकारने शक्य त्या सवलती द्याव्या. या बिलामुळे इंग्रेजी जहाज कंपन्यांच्या पोटावर साहजीकच बिब्बा पडणार, म्हणून इंग्लण्डात मोठी खळबळ उडाली आणि ना. हाजीशी काही तरी तडजोड करून या बिलातील तत्त्वे सलोख्याने जुळती मिळती करून घेण्यासाठी इंग्रेजी व्यापारी आणि त्यांचे असेंब्लीतील दोस्त यांची धडपड चालू झाली. खुद्द व्हाईसरॉय साहेब सुद्धा या धोरणाच्या दिशेने ना. हाजी यांची मुलाखत घेणार होते, म्हणून हे बिल लांबणीवर टाकण्यात आले. इतक्यात लाहोर राष्ट्रसभेचा कौन्सिलबहिष्काराचा पुकारा होताच, इंग्रेजी व्यापाऱ्याना जी स्थिती पाहिजे होती ती मिळाली. या नंतर व्हाईसरॉयच्या मुलाखतीत इंग्रेजी व्यापाऱ्याना सामोपचाराची भाषा बोलण्याची जरुरीच पडली नाही. कौन्सिल-बहिष्कार पडल्यावर ना. हाजीच्या बिलाला देशी पाठिंबा कोठून मिळणार? अर्थात् विरोधी मतैक्याच्या जोरावर एक तर सगळे बिलच्या बिल ढासळून पाडू, अथवा आपल्या हिताला बाध न येईल अशा बळकट उपसूचनांच्या बांब गोळ्यानी मूळ बिल हवे तसे खिळखिळे करू, या आत्मविश्वासाने इंग्रेजी व्यापाऱ्यानी सलोख्याऐवजी ताठर वृत्ती दाखविली, त्यात त्याना दोष कसा देता येईल? ना. हाजी यांच्या बिलाचे महत्त्व विचारात घेण्याइतकी हिन्दी जनतेची राजकारणी जागृति मुळीच झालेली नाही, ही गोष्ट कितीहि खरी असली, तरी ज्याना हे महत्त्व पटलेले असेल, त्यानी कौन्सिल-बहिष्काराच्या सुतकामुळे या बिलाच्या होणाऱ्या बऱ्या वाईट निकालाबद्दल राष्ट्रसभेच्या आततायी निर्णयाला दोष देणे जरुरीचे आहे. राष्ट्रसभेविषयी राष्ट्राने आदर बाळगणे आणि तिच्या आज्ञेला शिरसावंद्य मानणे, कितीहि अगत्याचे असले, तरी तिच्या विचारक्रान्तीचा ओघ जर वस्तुस्थितीच्या विपर्यासाकडे पाघळू लागला, तर राष्ट्रहिताच्या दूरदृष्टीने त्या विचारक्रान्तीला विरोध करणेच न्यायाचे होईल. राष्ट्रहितापुढे व्यक्तीमाहात्म्य किंवा निश्चयमाहात्म्य यांची पर्वा राखण्याची मुळीच आवश्यकता नाही. युद्धाचा रागरंग जसा बदलेल तसा आपल्या हालचालींचा रागरंग वळविण्यातच मुत्सद्यांच्या बुद्धिचातुर्याची खरी कसोटी असते. आम्हाला आशा आहे कीं कौन्सिल-बहिष्काराला आमचे पुढारी शक्य तो विरोध करतील.

भिक्षुकशाही-विध्वंसक संघ

राष्ट्रीय आत्मविकासाच्या मार्गात भिक्षुकशाही ही केवढी मोठी जबरदस्त धोंड आहे, इतकेच नव्हे तर, हिन्दुस्थानाच्या वर्तमान अधःपाताला ती किती प्रामुख्याने कारण झालेली आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव महाराष्ट्रातल्या ब्राह्मणेतर बहुजनसमाजाला जितका विशेष आणि तीव्र आहे, तितका इतर ठिकाणच्या लोकाना नाही. या अनुभवाच्या वेदना सर्वांनाच स्पष्ट बोलून लिहून दाखविता येत नाहीत. आमच्यासारखे भिक्षुकशाही-विध्वंसनेच्छू कडक भाषेत निषेधाची भाषा बोलून लिहून लोकमत-जागृतीचा प्रयत्न करू लागले कीं देशभक्तीच्या भटी पुंगीला गुंगलेले शेकडो ब्राम्हणेतर प्राणीसुद्धा आमच्यावर जातिद्वेषाचा आणि राष्ट्रद्रोहाचा आरोप करू लागतात. अशा प्रकारच्या आरोपाना भीक न घालता, भिक्षुकशाहीच्या

महारोगाची जनतेला जाणीव करून देण्याचे काम कितीहि लोक-अमान्य असले, तरी राष्ट्रहितासाठी ते कोणी तरी पत्करणेच प्राप्त असते. गेली १५ वर्षे आम्ही या राक्षसी आणि देशघातकी भिक्षुकशाही विरुद्ध जोराची मोहीम चालवून तिच्या विध्वंसनाचा अट्टहास केला. परंतु शेकडा ७५ ब्राह्मणेतर शहाणे भटी गारूडाच्या जाळ्यात अडकलेले असल्यामुळे, या चळवळीचा गाडा रेटण्याच्या कामी मिळावा तितका जोराचा पाठिंबा मिळाला नाही. भिक्षुकशाहीचे विध्वंसन हेच राष्ट्राच्या अभ्युदयाचे मंगल तोरण, ही कल्पनाच मुळी लोकांच्या गळी उतरविणे कठीण. ब्राम्हणांची सगळी जीवन यात्राच या संस्थेच्या टिकावावर असल्यामुळे, तिच्या विध्वंसनाला त्यांची सहानुभूति मिळणेच शक्य नाही. उलट तिच्या विध्वंसकालाच रसातळाला नेण्याचा ते अट्टहास करणार. ब्राह्मणेतरांत पुढारलेले अनेक समाज आहेत. पण त्यांचीहि मनोवृत्ति मागासलेल्या शेकडो समाजांप्रमाणे भिक्षुकशाहीच्या गुलामगिरीनेच शिजून भाजून निघालेली असल्यामुळे, त्यानाहि भिक्षुकशाही-विध्वंसनाचा प्रत्येक सुस्कारा भटद्वेषाचा, आणि म्हणूनच देशद्रोहाचा, वाटणे अगदी स्वाभाविक आहे. लोकमत-जागृतीची हत्यारे जी वृत्तपत्रे, ती सारी चाणाक्ष भटांच्या हाती. भटांचा गिल्ला एकदा सुरू झाला कीं मोठा तटबंदी किल्लासुद्धा जायबंदी व्हायचा. मग भिक्षुकशाही-विध्वंसक एकाद दुसऱ्या एकाण्ड्या शिलेदाराची त्या गिल्ल्याने काय वाताहात उडत असेल, याची कल्पना करणे फारसे कठीण नाही. शिवाय या भटी गिल्ल्याला कायस्थ प्रभूंसारख्या अनेक भटेतरी समाजांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष पाठिंबा मिळताच, असल्या सुधारकांच्या गळचेपीचा कार्यक्रम किती प्राणान्तिक वठतो, याचा अनुभव घेण्यासाठी आह्माला पुनर्जन्माचीहि यातायात करण्याची जरूर नाही. भारतमहर्षि प्रफुल्लचंद्र रॉयसारख्या असामान्य ज्ञानवृद्धानीसुद्धा ''भिक्षुकशाही ही हिन्दुस्थानाच्या काळजाला झोंबलेली एक महाव्याधी आहे'' असे कितीहि कण्ठरवाने ओरडून सांगितले, तरी देखील चांगल्या चांगल्या सुशिक्षित पुढारलेल्या भटेतर समाजांची जेथे खात्री पटत नाही, तेथे आमच्यासारख्या सामान्य सुधारकाने भिक्षुकशाही-विध्वंसनाचा एकाण्डा पण अट्टहासाचा कार्यक्रम अखण्ड चालविला तर त्याची या भटाळलेल्या महाराष्ट्रात केवढी ससेहोलपट होत असेल बरे? ठाकरे आणि प्रबोधन या दोन शब्दांचा उच्चार होताच, महाराष्ट्रातल्या भिक्षुकशाही आणि विशेषतः पेशवाई पत्रकारांच्या नाकांत झुरळ शिरल्याप्रमाणे ते शिव्या श्रापांचा थैथयाट कां करतात, याचेहि इंगीत अझून पुष्कळ शहाण्या भटेतरांच्या लक्ष्यात येत नाही. आमच्या लेखणीला जहरी विषारी आगलावी माथेफिरू पापी भ्रष्ट अशी कितीहि जरी विशेषणे भटी पत्रकारांनी दिलेली असली तरी ''भिक्षुकशाहीच्या आमूलाग्र विध्वंसनाशिवाय भरतखण्डाचा अभ्युदय होणे सुतराम् शक्य नाही'' हा आमच्या स्वाध्याय, निरीक्षण अनुभवाचा स्पष्ट सिद्धान्त डावलण्यास आम्ही मुळीच तयार होणार नाही. भटी गिल्ल्याला किंवा त्यांच्या सनातनी शिव्याश्रापाना भिऊन सुधारक जर सुधारणेच्या तत्त्वाला पराङ्मुख होते, तर आजचे जग माणसांऐवजी आस्वलानी गजबजलेले दिसते. भिक्षुकशाहीचे निर्दाळण झालेच पाहिजे, भरतखण्डाला जगविण्यासाठी भिक्षुकशाहीला ठार मारलीच पाहिजे, या आमच्यासारख्या एकाण्ड्या सुधारकांच्या अरण्यरुदानला सक्रीय मान्यता देण्याचा विचार आता चांगला पिकणीस लागत आहे, या समाधानात आमच्या सर्व हालअपेष्टांची भरपाई होण्याचा काळ आता सन्निध आला आहे. राष्ट्रभक्तीत आणि देशसेवेत कोणत्याहि 'देश' भटाला हार न जाणाऱ्या अनेक हिन्दु मुसलमान पारशी राष्ट्रपुढाऱ्यानी सुप्रसिद्ध सौ. कमळाबाई चट्टोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली 'ॲण्टी प्रीस्टक्रॅफ्ट लीग'

(भिक्षुकशाही-विध्वंसक संघ) स्थापन करण्याची जोराची तयारी चालविली आहे. या संघात सामील होऊ इच्छिणारानी जी. के. नरीमन, ॲण्टी-प्रीस्टक्रॅफ्ट लीग, c/o बॉम्बे क्रॉनिकल, फोर्ट, मुंबई, या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

हा राष्ट्रीय महत्त्वाचा प्रश्न आहे.

भिक्षुकशाहीचा विध्वंस हेच ब्राम्हणेतर चळवळीचे मुख्य ध्येय होते आणि काही वर्षेपर्यन्त कठोर भटापवादाना तोंड देऊन तिने या दिशेने मागासलेल्या बहुजनसमाजात बरीच जागृति केली. सध्या फक्त मध्यम बाण्डगुळ्या वर्गच काय तो भटी गुलामगिरीच्या पचनी पडलेला दिसत आहे. मागासलेला समाज या बाबतीत पुढारलेल्या अनेक समाजांपेक्षा बराच पुढारलेला आहे, आणि त्याचे सर्व श्रेय ब्राम्हणेतर चळवळीला देणे रास्त आहे. भिक्षुकशाही ही एकट्या हिन्दु समाजाची व्याधी नसून, तिच्या विषारी वर्चस्वाचा पगडा मुसलमान पारशी खोजे क्रिश्चन यहुदी वगैरे दरोबस्त हिन्दवी समाजांत गुलामगिरीचा धिंगाणा घालीत असतो. अर्थात् भिक्षुकशाहीच्या उच्चाटनाचा प्रश्न जातिभेदातील आणि शुद्ध राष्ट्रीय वृत्तीनेच हाताळणे अगत्याचे आहे, कारण तो राष्ट्रीय आहे आणि राष्ट्राच्या हितासाठी तो राष्ट्रीय भावेननेच सोडविला पाहिजे. भिक्षुकशाहीच्या आमूलाग्र उच्चाटनाशिवाय टर्कीचे स्वातंत्र्य टिकाऊ होणार नाही, या राष्ट्रीय विवंचनेनेच जबानमर्द केमालपाशा यानी सर्व सुधारणांचा श्रीगणेशा म्हणून प्रथम खिलाफतीची खिरापत केल्याचा दाखला ताजा तडफडीत आहे. खिलाफतीचा विध्वंस केला म्हणूनच टर्कीला सर्व अभिनव सुधारणांचा प्रयोग बिन अटकाव यशवन्त करून दाखविणे सोपे गेले. भिक्षुकशाही जिवन्त ठेऊन राष्ट्रसुधारणेचा कोणताहि लहान मोठा प्रयोग यशस्वी होणार नाही, हे तत्त्व टर्कीच्या उदाहरणाने स्पष्ट सिद्ध करून दाखविले आहे. पण असल्या चळवळीमुळे ज्यांच्या स्वार्थावर आणि हितांवर निखाऱ्यांची खैरात कोसळणे क्रमप्राप्त असते, ते भट मुल्ला लोक आणि त्यांचे जातभाई, तिच्या विरुद्ध भलभलती हाकाटी सुरू करून लोकांना चिथावण्याची कारवाई करतात. चळवळ्यांना लोकक्षोभाला बळी पाडण्याचे व्यूह रचतात. देवाच्या आणि धर्माच्या नावावर भोळसट जनसमूहाची दिशाभूल करून त्याना आपल्या विरोधी संघात सामील करून घेतात. आणि नाना प्रकारची कारस्थाने करून अखेर त्या चळवळीला ठार मारतात. अफगाणिस्थानचे माजी अमीर अम्मान्नुल्लाखान यांची येथेच चूक झाली. ते केमालपाशाची नुसती नक्कल करायला गेले, पण मुख्य मुद्याची गोष्ट अज्जीबात विसरले. अम्मान्नुलानी प्रथम मुल्लामौलवींच्या भिक्षुकशाहीचा विध्वंस न केल्यामुळे, त्यांच्या सर्व सुधारणा फोल झाल्या आणि अखेर त्याना आपल्या सिंहासनाला रामराम ठोकून देशोधडीला जावे लागले.

ब्राम्हणेतर चळवळीने सुरवातीला जबरदस्त एकोप्याची (united front) टक्कर भिक्षुकशाहीला दिली. पण या चळवळीच्या पुढाऱ्यांत फक्त एकरकमी मराठ्यांचाच भरणा जास्त झाल्यामुळे, आणि त्यानीहि काही विशेष गुप्त धोरणाने मराठेतर अनेक मागासलेल्या व पुढारलेल्या समाजांचा पाठिंबा न मिळविण्याचा उद्दामपणा दाखविल्यामुळे, थोड्याच वर्षांत या चळवळीचे प्रस्थान गाळीव जातिवर्चस्वावर घसरत गेले. आजला तर मुंबई इलाख्यातील ब्राम्हणेतर चळवळ म्हणजे वरघाटी मराठे झब्बूंची जातिवर्चस्वाची जहागीर होऊन बसली आहे. अशा परिस्थितीत भिक्षुकशाही-विध्वंसनाच्या कार्याची सहानुभूति असणाऱ्या, परंतु मराठशाही ब्राम्हणेतर-नामधारी चळवळीत भाग घेण्यास संकोचणाऱ्या

अनेक पुढारलेल्या मराठेतर समाजाना मुंबईच्या ॲण्टी-प्रीस्टक्रॅफ्ट लीगमध्ये भाग घेण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. त्याचा हे समाज पूर्ण फायदा घेऊन, हिन्दुस्थानाच्या काळजाला झोंबलेली भिक्षुकशाहीची महाव्याधी रसातळाला नेण्याची एकोप्याने खटपट करतील, अशी आशा आहे.

फर्ग्युसन कॉलेजातली घाशीरामी

सामान्यतः हिन्दुस्थानाला आणि प्रामुख्याने महाराष्ट्राला ललामभूत अशी जर कोणती शिक्षणविषयक संस्था असेल, तर ती पुण्याची डेक्कन एज्युकेशन सोसायटी हीच होय. संस्थेला स्वार्थत्यागपूर्वक आमरण वाहून घेऊन तिच्या अंतर्बाह्य प्रगतीसाठी झटणाऱ्या लाईफ-मेम्बरांच्या हातीच तिचा सर्व कारभार, अशी या सोसायटीची अनन्यसामान्य घटना असल्यामुळे, अनेक विद्वान् मंडळी सरकारी निमसरकारी विद्यालयांतल्या लठ्ठ लठ्ठ पगारांचा मोह सोडून, आत्मियत्वाच्या जिव्हाळ्याने या सोसायटीला येऊन मिळत असत. सरकारी शाळा कॉलेजे वगळली, तर इतर सार्वजनिक सोसायट्यांचा कारभार, शिक्षण विषयक प्रत्यक्ष काम न करणाऱ्या गव्हर्निंग बॉडीच्या हाती असतो. या बॉडीने फण्ड जमवावा, इमारती बांधाव्या, अंतर्व्यवस्थेच्या हव्या त्या साहित्याची सोय लावावी, आणि शिक्षकाना ठराविक तनखा देऊन त्यांच्याकडून नोकरांच्या भावनेने काम घ्यावे, अशी वहिवाट सर्वत्र आहे. डे. ए. सोसायटीलाहि एक गव्ह. बॉडी आहे. पण ती सोसायटीची अंतर्बाह्य सुधारणा, फण्डाची जमवाजमव इ. कामात प्रत्यक्ष भाग घेत नाही. ही सर्व कामे सोसायटीचे लाईफ मेंबर्सच करीत असतात. गव्ह. बॉडी फक्त ला. मेम्बरांच्या कारभारावर नुसते लक्ष्य देऊन त्याना बऱ्या वाईटाचा सल्ला देत असे. यातच वास्तवीक या सोसायटीचे वैशिष्ट्य आजवर दिसून येत असे. सामान्यतः सर्व प्रकारचे आद्य (Initial) अधिकार ला. मेंबर्सच्या बॉडीकडे आणि त्यांचा बरा वाईटपणा ठरविण्याचा ''व्हेटो''चा अखेरचा अधिकार गव्ह. बॉडीकडे, असा घटनेचा निर्बंध असला, तरी स्वयंसेवेच्या स्पिरीटने प्रत्यक्ष कारभार करणाऱ्या ला. मेंबरांच्या कोणत्याहि कार्याविरुद्ध गव्ह. बॉडीच्या शिलेदारानी आजवर नकाराचा (व्हेटोचा) सोटा हाणल्याचे उदाहरण फारसे दाखविता येणार नाही. परंतु गेल्या सहामाहीच्या सुरुवातीला गव्ह. बॉडीने जी एक चमत्कारीक अरेरावी धोरणाची गोष्ट अमलात आणण्याचे धाडस केले, त्यामुळे या संस्थेची घटना (Constitution) आमूलाग्र बदलली, धाब्यावर बसविली, किंवा तिच्या सरळ अर्थाचा अनर्थ झाला, यापैकीं एक तरी कल्पना गृहीत धरणे भाग आहे. घडलेल्या प्रकारावरून सोसायटीच्या भावी जीवनावर वाईट परिणाम होण्याचा बराच संभव असल्यामुळे, केवळ सार्वजनिक हितवादाच्या विवंचनेनेच आम्ही या प्रश्नाची चर्चा हाती घेत आहोत.

प्रिन्सिपॉल कानिटकरानी राजिनामा दिल्यावर, दुसरा प्रिन्सिपॉल निवडण्याचे काम घटनेप्रमाणे लाईफ मेंबरांच्या बॉडीनेच करावयाचे. ते तिने करून, १७ मताने प्रो. जोग यांची निवडणूक गव्ह. बॉडीच्या संमतीसाठी पाठविली. गव्ह. बॉडीने काही विशेष विकल्पाना वंगून १० मते मिळालेल्या प्रो. महाजनींची नेमणूक केली आणि लाईफ मेंबरांच्या निर्णयाला रद्दीत काढले. प्रो. महाजनी आणि प्रो. जोग यांमध्ये सरस नीरस किंवा बरा वाईट कोण, याची चर्चा करणे अप्रस्तुत आणि अस्थानी आहे. प्रश्न तत्त्वाचा आहे, व्यक्तीच्या सरस नीरसपणाच्या तपशीलाचा नाही. शिवाय असली गैरवाजवी चर्चा करणे, म्हणजे समानदर्जा (Equality of status) चे सोसायटीने मूलभूत तत्त्व लाथाडण्याइतकेच अविचाराचे होईल. गव्ह. बॉडीच्या शिलेदाराना प्रो. जोगापेक्षा रँग्लर महाजनी - सोसायटीच्या प्रगतीच्या दृष्टीने किंवा

इतर अन्य कारणाने - जर विशेष लायक वाटले, तर त्यानी ही गोष्ट लाईफ मेंबराना एकाद्या खासगी बैठकीत नीट समजावून देण्याचा प्रयत्न करणे इष्ट आणि अगत्याचे होते. असे झाले असते तर लाइफ मेंबरांनी पुन्हा निवडणूक करून गव्ह. बॉडीच्या वाजवी सल्ल्याचा मान राखण्यासाठी रँग्लर महाजनीना निवडून देऊन आपल्या घटनाप्राप्त अधिकाराचा बोज खात्रीने सांभाळला असता. पण असा काहीहि प्रयत्न न करता, गव्ह. बॉडीने ला. मेंबरांच्या बॉडीच्या बहुमताचा ठराव धुडकावून देऊन, आपल्याच अधिकारात कमी मतांच्या महाजनींची नेमणूक कायम केली. आपल्या अधिकाराचे गव्ह. बॉडीने निष्कारण अतिक्रमण केले म्हणून ला. मेंबरानी निषेध व्यक्त केला, पण त्याचा काहीच उपयोग न होता, उलट गव्ह. बॉडीने त्याना एका उद्दामपणाच्या पत्राची चपराक लगावल्याचे आम्हाला कळते.

या विचित्र घाशीरामी प्रकारामुळे, डे. ए. सोसायटीचा जो विशेष (unique character) होता, तोच अज्जीबात लयाला गेला, असे आमचे मत आहे. आता ही संस्था आणि इतर सरकारी व सार्वजनिक संस्था यांत कसलाच भेद उरला नाही. लाईफ मेंबरानी शिक्षणापासून तों सोसायटीच्या वाढत्या व्यापाची भूक शमविण्यासाठी फण्डाची भीक मागण्यापर्यंतची हवी ती दगदग करायची आणि त्याना अधिकार काय? तर पूज्य. म्हणजे गव्ह. बॉडीच्या प्रस्तुत निर्णयामुळे सगळ्या लॉईफ मेंबरांची आजची अवस्था (Hewers of wood & drawers of water) असल्या हमालीपेक्षा मुळीच अधिक नाही. या अवस्थेचा प्रतिकार करण्याइतके कणखर पाठकण्याचे मेंबर कोण कोण आहेत हे लवकरच दिसून येईल. ही अवस्था रँग्लर महाजनी याना, लॉईफ मेंबरांच्या आपल्या बॉडीचा जर काही अभिमान असता तर, खात्रीने टाळता आली असती. माझ्या सहकारी मित्रांच्या निवडणुकीशिवाय मी प्रिन्सिपॉल होऊच इच्छित नाही, इतका स्वाभिमान जर त्यानी दाखविला असता, तर फेर-निवडणुकीत त्यांच्या सहकारी मित्रांनी त्याना एकमताने खास निवडून आणले असते, परंतु ज्या लाइफमेंबरपैकी ते एक सन्मान्य मेंबर आहेत त्यांच्या बॉडीला सर्वाधिकारच्युतीची हमाली लाभत असता, गव्ह. बॉडीच्या शिलेदारी मताने आपण प्रिन्सिपॉलशिपवर आरूढ होणे, यात रँ. महाजनीनी विवेकापुढे अविवेकाकडेच आपले गणिती प्राविण्य घसरू दिले, याचे आम्हाला फार वाईट वाटते. विशेष दुःखाची गोष्ट म्हटली म्हणजे सोसायटीच्या पन्नास वर्षाच्या ज्युबिलीच्या प्रसंगी अशा प्रकारचा खेदजनक खेळखंडोबा सोसायटीच्या कारभारात उडावा आणि ज्या लाइफमेंबर्सनी आपल्या हाडाची काडे करून फर्ग्युसन कॉलेजच्या प्रांगणाला कौतुकास्पद नंदनवनाची स्थिति आणली, त्यांच्या अधिकारांचे शुद्ध हमालीत पर्यवसान व्हावे!

डे. ए. सोसायटीत आणि फर्ग्युसन कॉलेजात माजलेल्या सावळागोंधळाबद्दल तपशीलवार स्फोट करणारी लेखमाला पुढील अंकापासून सुरू होणार असल्यामुळे आजची ही सलामी येथेच पुरे!

□□□

लेख

जबरदस्ताचा टिकाव

(लेखांक ४ था)

ज्या दिवशी दिलदार व मोकळ्या मनाच्या मोगल बादशाहाने युरपियन क्रिस्ती बनियाना हिन्दुस्थानात व्यापाराची परवानगी दिली, त्याच दिवशी या देशाच्या व्यापारधंद्याचे आणि राजकीय स्वातंत्र्याचे नशीब फुटले, असे म्हणावे लागते. बादशाहाला तरी दोष कसा देता येणार? तो बोलून चालून दिलदार आशियाखंडस्थ. त्याला या युरपखंडस्थ हत्तींचे खायचे आणि दाखवायचे दात वेगवेगळे आहेत, याची काय कल्पना असणार? त्याने या क्रिस्त्याना ज्या प्रकारच्या सवलती दिल्या, तसल्या जगातल्या एकाहि क्रिस्ती नृपतीने क्रिस्ती किंवा अ-क्रिस्ती लोकाना आज पर्यंत कधीच दिलेल्या नाहीत. परंतु त्या सवलतींचा या क्रिस्त्यानी काय उपकार फेडला? तर बनियेगिरीच्या साळसूद मुखवट्याखाली, तागड्या खडबडवीत, त्यानी हिन्दुस्थान पादाक्रान्त करण्याची कारस्थाने शिजविली! बनिया कंपनीचे वारस सध्याचे ब्रिटीश सरकार आज हिन्दुस्थानात सार्वभौम बळी म्हणून कितीहि कानपिळी असले, तरी त्यांची आदिमाता जी ईस्ट इंडिया कंपनी तिने अनंत कारस्थानांच्या आणि कृतघ्नतेच्या कळसुत्रानेच इंग्रेजी सत्तेचा पाया हिन्दुस्थानात घातलेला आहे, हे ऐतिहासिक सत्य त्रिकालबाधित आहे. काळ हा अनंत आहे आणि त्याची करणी अगम्य आहे. काळाच्या करणीने इंग्रेजांची करणी पुढेमागे त्यांच्यावर जशीच्या तशी उलटवून, मोगल मऱ्हाठे शिखांच्या सत्तेप्रमाणेच ब्रिटीश सार्वभौमत्वाचा पाया या हिन्दभूमीतून चिऱ्या चुन्यासकट आरपार उखडून काढला, तरी इंग्रेज क्रिस्ती बनिये कळी होते म्हणूनच येथे बळी झाले हे इतिहाससिद्ध तत्त्व सर्वभक्षक काळाच्या बापालाहि उखडता येणे शक्य नाही.

इंग्रेजी सत्तेचे गजकर्ण हिन्दुस्थानच्या आंगावर फदफदले, त्याची सुरुवात मद्रासकडून, मुंबईहून करत बंगाल्यातून, या प्रश्नाची शहानिशा आजपर्यंत एकाहि भारतीय बखरनविसाने केल्याचे आढळात नाही. सर आलफ्रेड ल्याल (Sir Alfred Lyall) आपल्या Rise of the British Dominion in India ग्रंथात म्हणतात कीं ''बंगालची बाजू मवाळ आणि असंरक्षित आढळल्यामुळेच हिन्दुस्थानात घुसण्याचा आमचा मार्ग सुकर झाला.'' मात्र, बंगाल्यात इंग्रेज घुसले ते मोठ्याशा तलवार-बहाद्दरीने घुसले, अशातला प्रश्न नाही. त्यांच्या बंगालप्रवेशाला गाब्रियल ब्रोटनच्या मलमपट्ट्यांची पुण्याईच उपयोगी पडलेली आहे. इंग्रेजांचा गोरा पाय प्रथम सुरतेला लागला. नंतर मुंबई व मद्रास येथे बस्तान बसवून,

ते बंगाल्यात घुसले. इतर प्रांतांपेक्षा बंगाल त्याना विशेष सुपीक आणि व्यापारी खटपटीना विशेष फायदेशीर आढळल्यामुळेच, त्यानी मोगल बादशहाच्या मेहरबानीची याचना करून, तेथे प्रवेशाची परवानगी मिळविली. या परवानगीमुळेच त्यांचा पाय बंगाल्यात कायमचा रुतला. जॉब कारनाक (Job Charnock) याने कलकत्ता शहराची स्थापना केली, ती काय सहजलीला किंवा अनमानधपका म्हणून? मुळीच नव्हे. अर्ध्या शतकावर व्यापारी उचापतींचा पूर्ण अनुभव घेऊन, केवळ व्यापारी केंद्र म्हणून नव्हे, तर लष्करी डावपेचांच्या दृष्टीने आडाख्याचे केंद्र म्हणूनच कलकत्ता शहराची त्याने स्थापना केली. राजकारणी इंग्रेज प्राणी कोणतीहि गोष्ट पुढचा पाचपेच नीट बांधून चौकस धोरणानेच करीत असतो. त्याच्या जागरूक वृत्तीचे हे मर्म तत्त्वज्ञानी म्हणूनच बावळट अशा हिन्दी लोकांच्या पूर्वी ध्यानात आले नाही व आजहि येत नाही, म्हणूनच त्यांच्या स्वराज्यविषयक चळवळी आंधळ्या कोशिंबिरीपलीकडे अधिक महत्वाच्या ठरत नाहीत.

दिल्लीची मोगल बादशाही इतर बाबतीत कितीहि समर्थ आणि पराक्रमी असली, तरी आरमाराच्या बाबतीत तिने नाव घेण्यासारखी काहीच व्यवस्था ठेवलेली नव्हती. हिन्दुस्थानचे साम्राज्य चालविले, परंतु हिन्दुस्थान हे द्वीपकल्प आहे, त्याच्या तीनही बाजूला समुद्र आहे ही साधी भूगोलज्ञानाची गोष्ट त्यांच्या विचाराला कधीच बोचली नाही. त्यांचे सारे लक्ष्य खैबरघाटाच्या बिळाकडे! त्यानी जमिनीवरच्या संकटांचा मगदुर बाळगिला, पण पाण्यातून उद्‌भवणाऱ्या नायट्याच्या नायनाटाची कसलीच दरकार ठेविली नाही. प्रतिस्पर्धी म्हणजे तलवार घेऊनच यायचा, एवढीच त्यांची कल्पना. अर्थात् जलमार्गाने येणारा तागडीतुकाप्पा गोरा आदमी अंतःकरणातहि गोराच असेल, अशा कल्पनेची भुरळ त्याना पडली, हा मानवी हिन्दी स्वभावाचा क्षम्य असा दोष मानण्यापलीकडे, आज कोणाला काहीच करता येणे शक्य नाही. पश्चिम किनाऱ्यावर मऱ्हाठ्यांचे आरमार जबरदस्त असल्यामुळे, आंग्रेज बनियांच्या तागड्यांच्या धडपडी बऱ्याच दाबात राहिल्या होत्या. पण पूर्व किनाऱ्यावरील अवघा बंगाल उघडाच असल्यामुळे, क्रिस्ती पोर्च्युगीज चांच्यानी कितीदा तरी बंगालच्या किनाऱ्यावरील रयतेवर दरोडे घालून लूटमार केली. या सगळ्या इतिहासाचे नीट अवगाहन करूनच जॉब कारनाक आणि त्याच्या साथीदारानी, पूर्वेकडील व्यापाराची मध्यवर्ति पेठ म्हणून कलकत्ता शहराच्या स्थापनेची कोणशिळा बसविण्याचा धोरणी अट्टहास केला, हे उघडच दिसते. हिन्दुस्थानची महालक्ष्मी त्या काळी बंगालमध्येच केंद्रित झालेली असल्यामुळे, तेथेच इंग्रेजाना नेमका प्रवेश मिळाला, यात त्यांच्या दैवाचा भाग विशेष दिसतो.

वणिग्वृत्तीचा माणूस मोठ्या गोडबोल्या आणि गायतोंड्या असावा लागतो. त्याच्या तोंडात साखरेचे मळे जितके पिकलेले असतील, तितकी त्याची लोकमान्यता अधिक गुळचट चिकट पसरत जाते. आंग्रेज आदमी तर पिण्डाने जगातल्या वणिग्वृत्तीचा काढा. व्यापाऱ्यांचा जगद्‌गुरू. कलकत्त्याच्या नवीन वसाहतीत जे हिन्दी लोक राहावयास आले, त्यांच्याशी इंग्रेज बनिये गुळचट रीतीने आणि समतोल न्यायाने वागत असत. यामुळे आजूबाजूचे पुष्कळ बंगाली लोक रोजगारासाठी बनिया कंपनीच्या या नव्या छत्राखाली भराभर जमा झाले. मनुष्य हा मोठा क्रान्तिप्रिय प्राणी आहे. त्याला नेहमी बदल फेरफार स्थलांतर यांची आवड मोठी. कलकत्त्याच्या या नव्या वसाहतीत इंग्रेजाची हिन्दुस्थानावर राज्य करण्याच्या हिकमतीचे पहिले प्रयोग केले. आधुनिक आंग्रेजी राज्यकारभाराच्या सुधारणेपुढे,

त्यांचे पहिले वहिले राज्यकारभार आज कितीहि क्षुद्र आणि नालायक दिसले, तरी आजूबाजूच्या देशी कारभाराच्या मानाने इंग्रेजी कारभाराची तऱ्हा आणि शिस्त हिन्दी लोकांच्या तात्काळ आदरास पात्र झाली. (Dr. Wilson, Early Annals of the English in Bengal, Vol. I, p. 117.) येथे हे लक्ष्यात ठेविले पाहिजे कीं बंगालमधील इंग्रेजांचे धोरण हे सुद्धा त्यानी आपल्या पूर्वीच्या सुरती लौकिकाच्या कटु अनुभवाने केलेल्या सुधारणेचाच परिणाम होता. सुरतेच्या वसाहतीत बनिया कंपनीच्या इंग्रेज गुंडांनी भयंकर अत्याचारांचा बदलौकीक कमावलेला होता. रेवरंड फिलिप आंडर्सन (Rev. Philip Anderson) The English in Western India नामक ग्रंथांत या सुरती बदलौकिकाची मनोरंजक माहिती देतात. ''इंग्रेजी धाडशी लोकांची संख्या वसाहतीत जसजशी वाढू लागली, तसतसा इंग्रेजांच्या नावाला काळीमा लावण्याचा प्रकार बंद न पडता वाढतच गेला. कित्येकांनी तर अत्याचारांचा आणि फसवणुकीचा कहर उडविला. इंग्रेज लोक म्हणजे गोभक्षक, आग्यावेताळ, हलकट (पशु) गुंड, आणि (त्यानी विलायतेहून आपल्या बरोबर आणलेल्या) चावऱ्या मास्टिफ कुत्र्यांपेक्षाहि भयंकर; धिंगामस्तीच्या कामात पक्का इबलीस; जन्मदात्या बापाला ठकवणारा; कोणावर केव्हा गोळ्या झाडील, भाल्याची फेक भिरकावील, बोडक्यात मालाचा गठ्ठा आदळील किंवा रुपयांची थैलीच कचकन आपटील याचा काही नेम नाही; हीच इंग्रेजाविषयी हिंदु मुसलमानांची कल्पना होती..... क्रिस्ती धर्माबद्दल सुद्धा हिन्दी लोकांचे ग्रह फार वाईट झालेले असत. "Christian religion, devil religion christian much drunk, christian much do wrong, much beat, much abuse others.' क्रिश्चन धर्म सैतानी धर्म. क्रिस्ती लोक खूप दारू ढोसतात. क्रिस्ती लोक फार अत्याचार करतात, फार मारतात, दुसऱ्याला फार शिव्या देतात. असल्या कागाळ्या सगळ्या सुरतभर ज्याच्या त्याच्या तोंडी ऐकू येत असत. टेरी अशी स्पष्ट कबुली देतो कीं हिन्दी लोक मात्र व्यवहाराला फार चोख. ठरलेला सौदा आणि दिलेले वचन जेव्हाच्या तेव्हा फडशा पाडीत. एकाद्या वस्तूची त्याने किंमत सांगितली आणि गिऱ्हाइकाने ती त्यापेक्षा थोड्या किंमतीत मागितली तर तो उसळून उत्तर देई की ''जास्त किंमत सांगून तुम्हाला ठकवायला, मला तू क्रिस्ती बनिया समजतोस की काय?''

यावरून वाचकाना असे वाटण्याचा संभव आहे कीं सुरतेचे इंग्रेज बनिये चोर होते आणि बंगालकडे गेलेले साव होते. मुळीच नाही. सगळे एका माळेचे मणि आणि एकाच पराची पाखरे. डॉ. सी. आर. विल्सन (Dr. C. R. Wilson) म्हणतात ''बंगाल मधील इंग्रेजलोक भांडणे आणि कलागति पेटविण्याच्या कामी काही कमी डांबिस नव्हते ज्याला त्याला पैशाची हाव सुटलेली आणि कंपनीच्या बड्या अधिकाऱ्यानी खालच्या नोकरांत चहाड्या चुगल्या सांगण्याची दिलेली मुभा, यांचा परिणाम भांडणात आणि कलागतीत होत असे. आपल्या नोकरानी आपल्याला नित्य कोणाच्या न् कोणाच्या चहाड्या चुगल्या येऊन सांगितल्या कीं धनिसाहेब मोठे खूष. "A company of base, quarrelling people and foul dealers,' - 'हलकट, भांडकुदळ लोकांची आणि गळेकापू व्यापाऱ्यांची टोळी' असे जुना व्हॉईसरॉय शाईस्ताखान याने आमच्या कंपनीचे केलेले वर्णन सार्थ नाही असे कोण म्हणेल? या थोर सरदाराला हा आक्षेप घ्यायला मुळीच काही सबब नव्हती, असे एका तरी आधुनिक विद्वानाला छाती ठोक सांगता येईल काय? सर हेनरी यूल (Sir Henry Yule) या विद्वान् पंडिताने सर्व जुने कागदपत्र चाळून, बंगाल्यातील कंपनीच्या नोकरांच्या नैतिक आणि सामाजिक वर्तनाबद्दल काढलेले सिद्धांत

खरोखरच खेददायक (Certainly a dismal one) आहेत. अशा परिस्थितीत कंपनीच्या नोकरांत एलफिन्स्टन, मनरो, मालकम, हेनरी, जॉन लॉरेन्स, मार्टिन आणि हेबर असली चांगली मंडळी * कधि काळी निपजतील असे भविष्य करायला मुळीच कोठे काही जागा नव्हती.'' (Early Annals of the English in Bengal, Vol. I, p. 66.)

बनिया कंपनीच्या नोकरांचा हा बदलौकीक आणि गुंडगिरीचा डंका विलायतेस डायरेक्टर बोर्डाच्या कानांपर्यंत पोहचत नव्हता असे नव्हे. बोर्डाचे कान हवे तितके लांब खास होते. परंतु कानानी आपले काम कितीहि चोख बजावले, तरी त्यांतल्या संदेशाची अंमलबजावणी करायला इंग्रेजांच्या पाषाणहृदयी राजकारणाला संवेदना शिल्लक असेल तर! कंपनीच्या डायरेक्टरानी आपल्या नोकरशाहीला सत्यंवद धर्मंचर असल्या पुराणांचा उपदेश मात्र सपाटून चालू ठेविला होता. न्यायनीतीच्या वाचाळ पुराणांच्या बाबतीत इंग्रेजांचे तोंड आजपर्यंत कोणीहि धरू शकला नाही. हिवाळ्यात त्यांची टेम्सनदी थिजून दगडासारखी टणक बनली, तरी राजकारणी आंग्रेजी हृदयाच्या फत्तरातून शांतिरस्तु पुष्टीरस्तूचे नीतिपाठ हव्या त्या हंगामात धबधब्याच्या प्रवाहाला मागे सारतात. डॉ. सी. आर. विल्सन म्हणतात ''कलकत्त्यास आपली सांपत्तिक भरभराट कशी वाढविता येईल, याविषयी डायरेक्टर लोकानी छान अटकळ बांधून ठेवलेली होती. वसाहतीची लोकसंख्या वाढली कीं त्या मानाने वसूल (रेव्हेन्यू) वाढत जाईल आणि सरकारी न्याय व शहरातले आरोग्य आणि संरक्षणाचा बंदोबस्त ही उत्तम असतील, तर पुष्कळ लोक वसाहतीत राहण्याला धावत येतील. न्यायनीति ही भरभराटीचे मूळ आहे, हे तत्त्व डायरेक्टर कोर्टाने वारंवार प्रतिपादिले आहे. 'प्रत्येक तक्रारीला तुमचे कान उघडे ठेवा आणि जुलूम जबरीची एकहि आरोळी तुमच्या सडकेवर कोणी मारणार नाही, असा बंदोबस्त राखा. तुमचे आडत्ये, त्यांच्या हाताखालचे गुमास्ते, किंवा कंपनीचे कोणतेहि नोकर, मालकी अधिकाराने लोकांचा छळ करणार नाहीत आणि त्याना कसलाहि त्रास देणार नाहीत, याची नीट काळजी घ्या. शहराच्या निरनिराळ्या भागांत फिरून पहाणी करा आणि जेथे न्यायदानाची जरूर असेल, तेथे कोणाजवळून कवडीहि न घेता किंवा विलंब न लावता न्याय देण्याची तरतूद ठेवा. आपली शहरे वाढवून आपल्या वसुलाची वृद्धी करण्याचा हाच एक उत्तम मार्ग होय.' (Vol. II. Part 1. P. Ixix), आठराव्या शतकाच्या सुरुवातीला बंगालमध्ये आंग्रेज बनियानी नीतिमंत साधुत्वाचा हा जो पांढराफेक मुखवटा चढवला, त्याने खुळ्या बंगाल्यांची चांगलीच भुलभुलावणी केली. आंग्रेज धाडश्यांच्या खऱ्या स्वरूपाची त्याना अटकळ बांधता आली नाहीं. ते त्यांच्या बाहेरच्या भपक्यावरच भुरळले; आणि त्यांच्यावर नितांत विश्वास टाकून स्वस्थ बसले. बंगाल्यातील क्रिस्ती सत्तेचा उदय या विश्वासातूनच झालेला आहे.

राजकारणी सत्तेचा इंग्रेजांचा पाय बंगाल्यात चांगला रुतल्यावर, ती सत्ता कायम टिकविणे त्याना फारसे कठीण गेले नाही. याचे कारण, गव्हर्नर वेरील्स्ट (Verelst) याने विलायतेस आपल्या अधिकाऱ्याना पाठविलेल्या पत्रात, स्पष्ट आढळते. तो लिहितोः-

''मोगल साम्राज्य सर्व बाजूनी अगदी दरिद्री कंगाल बनले आहे आणि यातच आपल्या सुरक्षिततेची मोठी मख्खी आहे. नादीरशहाच्या स्वारीने त्याच्या सांपत्तिक आणि राजकीय सामर्थ्याला पहिला

* ही मंडळी सुद्धा अगदी धुतल्या तांदळाच्या नीतीची आणि सज्जन होती, असे नव्हे. फरक एवढाच कीं इतर इंग्रेज गुंडांप्रमाणे त्यानी अत्याचार वगैरे केले नाहीत. फक्त बनिया कंपनीचे गिरमिटी राजकारण यानी बिनबोभाट पार पाडले.

सणसणीत तडाखा दिलेला आहे.... ..... निरनिराळ्या देशी रियासती द्रव्याच्या बाबतीत कंगाल बनलेल्या आहेत. त्यामुळे ठाकठिकीचे सैन्य बाळगून पोसणे किंवा एकादी लढाई काही काळ टिकाव धरून लढविणे, या गोष्टी त्याना हाताळताना पंचाईत पडणे अगदी क्रमप्राप्त आहे. अशा अवस्थेत महत्वाकांक्षेने फुरफुरून किंवा जरूर पडली म्हणून, त्याना लढाईच्या किंवा स्वारीच्या मुकाबल्याला तोंड देण्याचा प्रसंग येऊन बितला कीं मग ते सैन्याची जमवाजमव कशीबशी, उतावळेपणाने, पुढचा मागचा काही एक विचार न करता, बनेल त्या डुक्करमुसंडीने करतात. पहिल्याच छाप्यात जे असेल नसेल ते साहित्य व सामर्थ्य बेदरकारपणे खर्ची घालतात. दुसऱ्या छाप्याला बहुतेक सगळाच खडखडाट असतो. आणि मग ताबडतोब तहनाम्याच्या तडजोडीवर येतात. कारण, पगार न मिळाल्यामुळे सैन्य सोडून जाणाऱ्या किंवा राजद्रोही उचापति करणाऱ्या शिपायांच्या रोषापेक्षा, उघड पराभव फारसा भयंकर नसतो.

''या परिस्थितीमुळे, सभ्यगृहस्थहो! या असंख्य एशियाटिक सैन्यांवर आम्ही एकसारखी मात कां करीत आहोत, याचे मर्म आपल्या ध्यानी येईल. तुमच्या मूठभर (गोऱ्या) शिपायांपुढे हे (काळे) शिपाई वावटळीप्रमाणे पळून जातात. कवायत, शिस्त आणि एकसारखे जयावर जय मिळवून अजिंक्य म्हणून गाजलेल्या आपल्या सैन्यावर कोणी धटिंगण आततायीपणाने चाल करून येण्याचा माथेफिरूपणा करील, तर प्रथम तो धडकीने गांगरून जाईल, अथवा पुढे आलाच, तर (आम्ही त्याची ससेहोलपट करून) त्याच्यावर खात्रीने जय मिळवूंच मिळवू, असा आमचा आज दरारा प्रस्थापित झालेला आहे.

''आमच्या सत्तेच्या सुरक्षितपणाचे दुसरे जबर कारण म्हणजे आसपासच्या देशी रियासतींत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाही. प्रत्येकाची तत्त्वे निराळी, दृष्टी निराळी आणि हिताहिताच्या कल्पना बेसूर! अर्थात् कोणतेहि कार्य एकजुटीने त्याना केव्हाहि करता येणे शक्य नाही. हल्लीच्या बऱ्याचशा हिन्दुस्थानी राजांच्या गाद्या जन्मसिद्ध हक्काच्या नाहीत. (म्हणजे त्या लढाईने किंवा जबरदस्तीने जिंकलेल्या आहेत.) त्यामुळे, ज्यांची राज्ये आपण बळकावली, ते राजे आपल्याविरुद्ध कधि उठतील कीं काय, या विवंचनेतच ते परस्परांविषयी नेहमी शंका व मत्सर यात निमग्न असतात.... किंचित वाकडे असलेल्या अगर वैरी असलेल्या शेजाऱ्या त्रयस्थ राजाला चिथावणीने उठवून, हिन्दी राजांची प्रत्येक एकोप्याची संघटना गर्भातल्या गर्भात ठेचून,** आमच्या सदैव जागरूक राज्यसत्तेला हिन्दुस्थानचे ताळतंत्र समतोल राखणे केव्हाहि सोपेच जाईल.'' (Talboys Wheelers Early Records of British India, pp. 376-378.)

इंग्रेज लोक देवाधर्मची कितीशी पर्वा बाळगतात, ते आता सर्वश्रुतच आहे. तथापि, हिन्दुस्थानचे साम्राज्य ईश्वरी ईच्छेने आमच्या पायांशी लोळत आले, आह्मी काही काळ्याबेऱ्या खटपटी केल्या नाहीत, ठिकठिकाणच्या लोकाना आमची शासनपद्धती पसंत पडली आणि ते आपण होऊन आमच्या सत्तेच्या छायेखाली धावा घेत आले, नाहीतर आह्माला आमच्या तागड्या टाकून तलवारीची दलामल

** याचाच 'फोडा आणि झोडा' ची पॉलिसी म्हणतात. परंतु ''फोडा आणि झोडाची पॉलिसी सरकार आज आचरीत नाही व मागे कधी त्यानी आचरली नाही'' असे मुंबई सरकारचे गृहमंत्री मिस्टर हॉटसन मोठ्या दिमाखाने नाकाला जीभ लावून कौन्सिलमध्ये सांगतात! कौन्सिलातली बडबड 'प्रिव्हिलेज्ड' (संरक्षित) असल्यामुळे, तेथल्या शेणसड्याचा पुरावा आम्हाला गृहीत धरण्याची परवानगी नाही, हे कितीहि खरे असले, तरी शेणसडा घालणारानी माणुसकीला स्मरून सत्याची अगदीच गळेदाब करणे बरे नव्हे.

पत्करण्याची जरूर काय? अशा प्रकारच्या साळसूद विचारसरणीची पुराणे पुष्कळ इंग्रेज मुत्सद्दी बखरकार व तत्त्ववेत्ते झोडतात. विशेषतः व्यापारापलीकडे राज्यसंपादनाची आह्माला तिळमात्र इच्छा नव्हती, हे तत्त्व विशेष जोराने प्रतिपादण्याची त्यांची खोड अझूनहि जिवंत आहे. या पुराणातली वांगी कर्नल मिल नावाच्या एका धाडश्याने आपल्या गुप्त पत्रात सावडून ठेवलेली आहेत. बंगाल बहार आणि ओरिसा या तीन प्रांतांवर जर्मनीच्या बादशाहाचे निशाण कसे फडकवितां येईल, या योजनेचे एक पत्र सन १७४६ साली फ्रान्सिस ऑफ लोरेन (Francis of Lorraine) ला पाठविले. त्यातील मजकूर :-

''मोगल साम्राज्यात सोने आणि चांदी यांचा महामूर पूर वाहात आहे. हे साम्राज्य नेहमीच बेताकद आणि बेबचावाचे असते. आरमारी सामर्थ्य जवळ असणाऱ्या एकाहि युरपियन राजाला बंगाल जिंकण्याचा प्रयत्न करण्याची आजपर्यंत बुद्धी होऊ नये, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. एका दणक्यात इतकी अलोट संपत्ति हस्तगत होईल कीं तिच्यापुढे ब्राझील आणि पेरूच्या खाणी म्हणजे दर्यामे खसखस. मोगलांची शासनपद्धती वाईट, त्यांचे सैन्य भिकार आणि आरमार तर त्याना नाहीच. राज्यात नेहमी बण्डांचा सुळसुळाट. त्यांची बंदरे आणि नद्या परकीयाना मुक्तद्वार मोकळ्या आहेत. स्पॅनियर्ड लोकानी अमेरिकेतल्या नागड्या इंडियनांचा जितक्या सहज रीतीने धुव्वा उडविला, तितक्याच सुलभ रीतीने हा देश जिंकता येईल किंवा खंडणीखाली ठेवता येईल. अल्लीवर्दीखान नावाच्या एका बंडखोराने मोगल बादशाहीतून बंगाल बहार आणि ओरीसा हे तीन प्रांत हिसकावून घेतलेले आहेत. खानाच्या खजिन्यात ३० कोट रुपये रोकड शिल्लक आहेत. त्याचा वार्षिक महसूल २० लाखापेक्षा खास कमी नाही. हे प्रांत समुद्राच्या बाजूने उघडे आहेत. तीन जहाजे आणि पंधराशे किंवा दोन हजार लष्कर या कामी पुरेसे आहे. लुटीची प्राप्ती आणि व्यापाराची व्याप्ती यांच्या आशेने ब्रिटीश लोकसुद्धा आपल्याला सामील होतील. ईस्ट इंडिया कंपनीला मात्र याची दाद देता कामा नये. कंपनी म्हटली कीं तेथे गौप्य फारसे राहात नाही. विशेषतः इंग्रेजी कंपनी सध्या आपल्याच भानगडीत इतकी व्यग्र झालेली आहे, कीं ती एकाद्या बाबतीत चिकाटीने राहीलच, असा भरंसा देता येत नाही.''

(Bolfs considerations of the affairs of Bengal App.)

□□□

लेख

राजकारणी कल्पनांची उत्क्रान्ति

ब्रिटीश राजवटीमुळे आणि विशेषतः इंग्रेजी भाषेच्या माध्यमामुळे, शेकडो नव्यानव्या राजकारणी कल्पना व शब्दप्रयोग हरहमेश आमच्या विचारांत खळबळ उडवीत आहेत. हव्या त्या नवीन शोधाचे आणि कल्पनांचे मूळ वेदांच्या पोटातून काढून दाखविण्याची आम्हाला मोठी खोड. त्यामुळे कोणत्याहि उत्क्रान्तीच्या उत्पत्ति स्थिति लयाचा इतिहास पद्धतशीर अभ्यासून, त्याप्रमाणे आपल्या आचार विचारांत योग्य तो बदल करण्याचे चैतन्यच आम्ही गमावून बसलो आहो. आहे ते सगळे वेदांत आहे, नवीन असे काही निर्माण होणेच शक्य नाही, स्वर्ग पृथ्वी पाताळ ही तीन जगें म्हणजे व्यासाचे उच्छिष्ट, इत्यादि सूत्रे दिसतात मोठी छान, पण त्यानीच कापली आरपार आमची मान. आचार विचारांत बदल करा, असे कोणी म्हटले कीं आमच्या कपाळाची शीर उठते, मनोवृत्तीचा इतका ताठरपणा असूनहि आम्ही नित्य बदलतच आहोत, मग निष्कारण आक्षेपांची ही परवड कशाला? प्रश्न सरळ आहे आणि त्याचे उत्तरहि तितकेच सोपे आणि सरळ आहे, भूत वर्तमानाचा अनुभव जमेला धरून, भविष्यत्काली विशेष ठरावीक महत्वाकांक्षा रंगारूपाला आणायच्याच, अशा धोरणानी आपल्या आचारविचारांत आत्मस्फूर्तीने बदल केल्याचा दाखला भारतीय लोकांच्या जीवनात कोठेहि आढळत नाही. जो काही बदल झाला, होत आहे आणि होणार, तो परिस्थितीच्या लाथेच्या कमी अधिक दणक्यानेच. साप सुद्धा कांही ठरावीक मुदतीने आपली कात टाकतो; पण जुनाट कल्पनांचा आमच्या पिण्डाला बरबटलेला चिकटा आम्हा भारतीयाना टाकता टाकवत नाही. जुने तेच सोने समजण्याच्या दुर्बुद्धीमुळे नव्याच किंवा कशाचाहि विचारपूर्वक स्वाध्याय करण्याची आम्ही कधीच पर्वा केली नाही आणि करीतहि नाही. या मुळेच निरनिराळ्या समाजमतांचा, धर्मकल्पनांचा आणि राजकारणी दृष्टीचा हेकेखोरपणा अखिल भरतखण्डाच्या जीवनात असंतोष, गैरविश्वास, बेकी, वैरभाव यांचे वावटळी तुफान माजवून राहिला आहे.

हिन्दुस्थानाच्या वर्तमान सर्वांगीण गुलामगिरीचे मूळ याच आमच्या सनातनी ताठरपणात आढळते. गुलामगिरीचे पाश तोडून निर्भेळ स्वातंत्र्यासाठी आज सर्व हाकाटी चालू आहे. आजवर शेकडो प्रयत्न झाले, पण गुलामगिरीच्या सरगाठी न सुटता, उलट त्या अधिकाधिक घट्टच बसत चालल्या

आहेत. स्वातंत्र्यसिद्धीचा प्रश्न एकट्या राजकारणी प्रमेयांच्या सोडवणुकीचा नसला, तरी त्यालाच विशेष प्राधान्य आहे. गाठ पडली आहे कट्टया राजकारणी ब्रिटीशांच्या पॉलिटिक्सशी. त्यांच्या नित्य-उत्क्रान्त पॉलिटिक्सशी झगडा द्यावयाचा, तर आमची राजकारणी शस्त्रास्त्रे कोणत्या दर्जाची व सामर्थ्याची आहेत; त्यांत काय बदल केला पाहिजे आणि कोणती नवीन भर घातली पाहिजे. विशेषतः भारतीय जनतेची पिण्डप्रकृति या लढ्यात टिकाव धरण्याइतकी खंबीर खबरदार आहे कीं नाही याचा विचारवंताना विचार करता यावा, या हेतूने हा लेख वाचकांच्या सेवेला रुजू होत आहे. सध्या स्वराज्य जबाबदार स्वराज्य, लोकशाही, वसाहतीचा दर्जा इत्यादि अनेक संमिश्र कल्पनांचे शब्द नित्य आमच्या कानावर पडत आहेत. * आहेत आणि आम्ही कोणत्या भावनानी आणि अर्थानी राजकारणाकडे आजपर्यन्त पाहात आलो व आता या विलायती पॉलिटिक्सशी झगडा देताना आमच्या आचार विचार सरणीत किती व कसा बदल केला पाहिजे, याची इतिहासाला धरून चिकित्सा करावयाची आहे.

Politics without History has no root;
History without Politics has no fruit.

- Sir J. R. Seeley.

इतिहासाशिवाय राजकारणाला आणि राजकारणाशिवाय इतिहासाला महत्त्व नाही. सर्व गोष्टी सनातन व स्थिर मानून चालणाऱ्या भारतीयाना, राजकारण प्रवाही आहे, नित्य बदलते आहे, याची कल्पना नसल्यास ती आता करून घेणे प्राप्त आहे. राजकारणाच्या नित्य बदलत्या रंगाढंगाची नोन्द इतिहास ठेवतो, म्हणून इतिहासाला एवढे महत्त्व. राजकारणाच्या प्रगतीचा तपशीलवार नकाशा पुढील पिढीला बिनचुक मिळावा, या विवंचनेने इतिहास जतन करण्याची बुद्धीच आम्हाला नसल्यामुळे, प्राचीन इतिहासाचे पौराणिक धेडगुजरी धिरडे आमच्या पूर्वजानी करून ठेवले. याचा साहाजिकच असा परिणाम होऊन बसला आहे कीं इतिहासापरी इतिहास नाही आणि राजकारणाचा पत्ता नाही. धर्म, नीति, समाज, राजकारण, या सर्वांची एकच चिकी गुडदाणी. ज्याला जशी साधेल तशी त्याने फोडावी आणि त्यातला हवा तो सिद्धान्त चघळीत बसावा.

राजकारण हा शब्द इंग्रेजी पॉलिटिक्स शब्दाचा पर्यायशब्द म्हणून सर्रास वापरला जात असला, तरी 'पॉलिटिक्स' शब्दातल्या सर्व भावना मऱ्हाठी 'राजकारण' शब्दात यथातथ्य व्यक्त केल्या जात नाहीत. आमच्या राजकारणाच्या कल्पना स्थिर आणि अप्रवाही असल्यामुळे, पाश्चात्य राष्ट्रांतल्या नित्यप्रवाही पॉलिटिक्सपेक्षा त्या बऱ्याच भिन्न, किंबहुना बऱ्याच अप्रगमनशील अथवा मागासलेल्या म्हटल्या तरी चालेल. ब्रिटिशांच्या निकट सहवासामुळे, प्रजासत्ताक लोकशाहीच्या शब्दांची कसरत आमच्या लिहिण्याबोलण्यात केवढीहि होत असली, तरी त्याविषयी आमच्या विचारांतच संदिग्धपणाचा गोंधळ भरपूर असल्यामुळे, आचारक्षमतेची पावले हटकून चुकीचीच पडतात. हिन्दुस्थानात 'जबाबदार लोकशाही स्वराज्य' स्थापन व्हावे, या उद्देशाने सध्या मोठमोठ्या चळवळी कितीहि चालू असल्या, तरी 'जबाबदार' 'लोकशाही' आणि 'स्वराज्य' या शब्दांच्या कल्पनाच हिन्दवी पिण्डाला अपरिचित असल्यामुळे, आमच्या आचारातला अनिश्चितपणा कोणतीहि चळवळ यशस्वी होऊ देत नाही.

---

* उपलब्ध झालेल्या अंकात वाक्य दिसत नाही.

अनेक राजकीय क्रान्त्यांच्या अनुभवामुळे पाश्चात्य लोकांची पिण्डप्रकृति आणि मनोवृत्ति जशी आणि जितकी कमावली जावून, लोकशाहीचा अर्थ समजण्याइतकी आचार-विचारक्षम बनली आहे, तशी आणि तितकी आमची मुळीच नाही. आमच्याकडे राजकीय क्रान्त्या झाल्या नाहीत, असा प्रश्न मुळीच नाही. पुष्कळ झाल्या. पण त्या सर्व एकरंगी एकरूपीच झाल्या. म्हणजे एक राजा जायचा आणि त्याच्या जागी दुसरा कोणीतरी राजाच यायचा. त्याचे घराणे वंशपरंपरेच्या जन्मप्राप्त पुण्याईवर काही वर्षे टिकले कीं पुन्हा क्रान्ति व्हायची आणि दुसऱ्या एकाद्या बलिष्टाचे राजघराणे चालू व्हायचे यापलीकडे भारतीय राजकीय क्रान्त्यांचे स्वरूप केव्हाहि निराळे आढळत नाही.

राजेशाहीपेक्षा अन्य कोणत्याहि सत्तेचा हिन्दी लोकाना केव्हाहि परिचय झालेला नाही आणि आमच्या राजकारणी भावनांची भरारी राजेशाहीच्या व्यक्तीमाहात्म्यापलीकडे गेल्याचे भारतीय इतिहासावरून दिसून येत नाही. 'खेडेगावच्या पंचायती आणि आलुती बलुती म्हणजे लोकशाही पार्लमेण्टाचे छोटे नमुनेच होत,' अशा प्रकारची विधाने पुष्कळ मोठमोठ्या विद्वानांच्या लेखन व्याख्यानांत ऐकू येतात. शिवाजीच्या अष्टप्रधान मण्डळाला सुद्धा ब्रिटीश पार्लमेण्टरी साच्यात बसविण्याचे धाडस आम्ही करतो. पण असल्या विधानांचा रोख हिन्दवासियांच्या मनावर चालू राजकीय कल्पनांची क्रान्ति बिंबविण्याच्या प्रयत्नांतील उपयुक्ततावादाचा एक भाग असल्यामुळे, ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने त्याना काहीच महत्त्व देता येणे शक्य नाही. 'ना विष्णुः पृथिवीपतिः' या एकाच सूत्राने आमच्या सर्व राजकारणी भावना व महत्त्वाकांक्षा ज्या एकदा बद्ध झालेल्या आहेत, त्यांच्या गाठी, अनेक भिन्नभिन्न संस्कारांच्या करवति त्यांवर फिरल्या तरी, तुटता तुटता नाहीत आणि विचार क्रान्तीच्या नुसत्या शाब्दिक हलकल्होळाने सुटता सुटत नाहीत. गादी रायगडला असो, कर्नाटकात जिंजीला असो, दिल्लीला असो, नाहीतर सातासमुद्रांपलीकडच्या 'इंग्लंद देशात लंदन राजधानी'त असो, कोणीतरी एकादा जिता माणूस राजा किंवा राणी म्हणून त्या गादीवर आरूढ झाला; मग तो राजा हिन्दु मुसलमान इंग्रेज किंवा शिद्दी कोणी का असेना; त्याच्या एकमुखी राजसत्तेला बिनतक्रार संमति द्यायची, त्याला परमेश्वराचा अवतार मानावयाचा, यापलीकडे हिन्दी लोकाना राजकारणाची आणखी निराळी कसलीच कल्पना पूर्वी नव्हती. हाच त्यांचा पिण्ड आणि तेच त्यांचे ब्रह्माण्ड. राजा बरा असला तर त्याच्या स्तुतिपाठाची पुराणे जन्माला यायची; पण तो जर वाईट असला तर कर्माला हात लावण्यापलीकडे हिन्दी लोकानी कधीच काही विशेष केल्याचा दाखला नाही. आईने मारले, पावसाने भिजविले आणि राजाने लुटले, तर जायचे कोठे? या लौकिकी म्हणीच्या कुम्पणापलीकडे भारतीय जनतेच्या राजकारणी महत्वाकांक्षेची उडी कधीच गेलेली नाही. जुलमी राजाची अमदानी कर्माला दोष देत रडत चरफडत कंठावी आणि कोणी एकाद्या सवाई सोट्याने त्या राजाला उखडून रसातळाला नेले कीं त्या नव्या जबरदस्ताला ईश्वरावतार मानून त्याच्या आरत्या कराव्या, हेच आणि इतकेच राजकारण हिन्दवी पिण्डाला माहीत आहे. यथा राजा तथा प्रजा. राजकारणात लोकमत म्हणून काही चीज आहे, किंवा ती आपण धिटाईने राजकारणाच्या बाजारात माण्डली तर तिला काही टक्के किंमत येण्याचा संभव आहे, असल्या कल्पनाच जेथे आम्हाला मूळच्या सारख्या, तेथे राजकारणात म्हणजे एकमुखी राजसत्तेच्या कारभारात लोकमताच्या जोरावर एकादी विशेष क्रान्ति अथवा बदल घडवून आणण्याची बुद्धी कोठली? राजा कालस्य कारणम्. तो करील ती पूर्व दिशा. असल्या नैराश्यवादी राजकारणी

भावनेच्या हिन्दी लोकाना, सध्याच्या प्रागतिक पोलीटिकल युगात, प्रजासत्ताक राज्यपद्धतीची मूलभूत तत्त्वे सुद्धा विचारात ठरविताना तोल सावरता येत नाही, मग आचारात वठविण्याची गोष्ट कशाला?

कोणीहि सत्ताधारी राजा येवो, त्याला ईश्वरावतार समजून त्याच्याशी निष्ठेने राहावयाचे, मग तो माणसांची शिकार करणारा महंमद तघलक असो, प्रजेच्या तक्रारी स्वतः ऐकण्यासाठी राजवाड्याच्या तटाला घण्टा बांधणारा जहांगीर असो, गोब्राम्हणप्रतिपालक म्हणून मिरविण्यात धन्यता मिरविणारा शिवाजी असो नाहीतर अखण्ड शांतीच्या ग्वाहीवर आपखुषीच्या शस्त्रसंन्यासाची दीक्षा देणारी व्हिकटोरिया मावली राणी असो. त्याची स्तुति हवी तेवढी करा, पण निन्दा? महापाप, केवळ नरकाचे साधन! असल्या वृत्तीमुळे, जुलुमांचा प्रतिकार तर राहू द्याच, पण नुसता शाब्दिक निषेध व्यक्त करण्याचीहि कोणाला छाती नसे. अर्थात् हवे ते जुलूम निमूटपणे सहन करण्याची हिन्दी लोकाना सवयच पडून गेलेली आहे. युरपियन उत्क्रान्त पॉलिटिक्सच्या सहवासाने आणि उत्तेजनाने प्रजासत्ताक मतस्वातंत्र्याची सवलत बरीच लाभली असताहि, राजेशाहीने दृढमूल केलेल्या व्यक्तिमाहात्म्याच्या किंवा व्यक्तीपूजेच्या गुलामगिरीचा चिकटा आमच्या मनोवृत्तीवर अझून आहे तसाच कायम आहे.

ब्रिटीशपूर्व सर्व हिन्दवी राजवटी व रियासती राजेशाही (मॉनर्की) सत्ताप्रधानच होत्या. जावळीचे मोरे, सावंतवाडीचे भोसले, जंजिऱ्याचा शिद्दी असल्या छोट्या छोट्या स्वतंत्र सत्ताधाऱ्यांपासून तों थेट दिल्लीच्या मोगल बादशाहापर्यंत कोणतीहि सत्ता घ्या, तिच्यात निरंकुश राजसत्तेशिवाय दुसरे कसलेहि तत्व आढळणार नाही. आमचे राज-कारण म्हणजे राजा करील ते कारण आणि बांधील ते तोरण! अर्थात् निरतिशय राजनिष्ठा हेच भाण्डवल प्रजेने तळहाताच्या फोडाप्रमाणे नित्य संगोपन करून, बऱ्या वाईट राज्यकारभाराला संतुष्ट चित्ताने तोण्ड देऊन राहणे प्राप्त असे. स्वतःच्या वैयक्तिक हिम्मतीवर क्रान्ति घडवून राजगादी पटकविणारा शिवाजीसारखा पराक्रमी पुरुष, प्रथम जरी कर्मयोगी राजा म्हणून, जनतेच्या निष्ठेचा स्वामी बनत असे, तरी त्याच्या मृत्यूनंतर वारस हक्काने, म्हणजे केवळ जन्माच्या अपघाताच्या पुण्याईने, राजा बनणाऱ्या प्रत्येक जन्मयोगी प्राण्याला विष्णूचा अवतार मानण्याशिवाय प्रजेला गत्यंतरच नसे. मग हा जन्मयोगी प्राणी सूर्यापोटी शनैश्चर किंवा सिंहापोटी अजागळ जरी असला, तरी त्याच्य हाती राजदण्ड जाण्याने राज्याचे वाटोळे होण्याची प्रजेची जरी खात्री असली, तरी त्याच्या राज्याभिषेकाविरुद्ध किंवा जुलुमी राज्यपद्धतीविरुद्ध ब्र काढण्याची एकालाहि छाती होत नसे आणि आजहि होत नाही. विद्यमान कित्येक देशी संस्थानातील रावणी दावणी वृत्तीच्या तापट बावळट जन्मयोगी 'महाराजां'बद्दल त्या त्या संस्थानातील रहिवाशांच्या मनोवृत्तीची पाहाणी केली कीं या विधानाची सत्यता आजहि स्पष्ट समजून येईल. कोणीतरी एक राजा, त्याच्याविषयी प्रजेची निस्संदिग्ध राजनिष्ठा, त्याचा अंमल वाढविण्यासाठी होणाऱ्या स्वाऱ्यांच्या लढायात प्रजेने एकनिष्ठपणाने प्राण-धनाला अर्पण करायचे, राजाच्या सुखाने आनंदावे आणि त्याच्या वैयक्तिक दुःखाने आपणहि सकारण निष्कारण दुःखी व्हावे, यापलीकडच्या राजकारणाच्या कसल्याहि इतर भानगडीत प्रजेचा संबंध येत नसे.

उत्क्रान्त युरपियन पॉलिटिक्सच्या मानाने भारतीय राजकारण राजेशाही-व्यक्तीमाहात्म्यापेक्षा विशेष उत्क्रान्त झालेले नाही. आज तर आमच्या डोळ्यांवर लोकशाही कल्पनांचा चष्मा चढला आहे. इतकेच नव्हे तर ब्रिटीश नोकरशाहीची सत्ता उलथून पाडून, तिच्या ठिकाणी हिन्दवी लोकशाहीचे जबाबदार

स्व-राज्य स्थापन करण्यासाठी भरतखण्ड जिवापाड श्रमसाहसाला तयार झाले आहे. या नव्या भूमिकेवर उभे राहून, हिन्दवी राजकारणाकडे पाहणाराला शिवाजीपासून प्रतापसिंहापर्यंतचे छत्रपति, बाबरापासून औरंगझीबापर्यंतचे बादशाहा आणि मोरोपंत पिंगळ्यापासून रावबाजी पर्यंतचे पेशवे, हे सारे नादान राजेशाही झब्बू म्हणून आमच्या तिटकाऱ्यालाहि पात्र होतील.

पण इतिहास म्हणतो, ही तुमची तुलनेची दृष्टी चुकीची आहे. लोकशाहीच्या नव्या तपशिलांपुढे राजेशाहीचा एकमुखी सत्तेचा जुना कारभार कितीहि क्षुद्र ठरत असला, तरी राजेशाहीचा इतिहास अभ्यासताना, तिच्या गुण-दोषाच्या ठराविक मर्यादेतच चिकित्सेने तत्व शोधनाचा प्रयत्न केला पाहिजे. साम्राज्य, स्वराज्य, स्वकीय, परकीय, इत्यादि शब्दांच्या भावना चालू विसाव्या शतकात बऱ्याच बदलल्या आहेत; कारण राजकारण हे नेहमी आपोआप उत्क्रान्त होत असते. अर्थात् २० व्या शतकातला चष्मा चढवून, १७ व्या शतकातल्या स्वराज्य साम्राज्य इत्यादींच्या भावनांची परीक्षा करणे चुकीचे ठरेल. ज्या काळची भावना ती त्या काळच्या तराजूतच तोलून तिची किंमत ठरविली पाहिजे.

ब्रिटिश साम्राज्याचा आजचा वेलविस्तार आणि त्याचे कदरबाज नियंत्रण करणारी राज्यपद्धति विचारात घेतली, म्हणजे 'मऱ्हाठी साम्राज्य' किंवा 'हिन्दवी स्वराज्य' हे शब्द रूढ करणारांच्या कल्पना किती कोत्या आटोपशीर अल्पसंतुष्ट आणि बिनअंदाजी असतील, याचा तेव्हाच खुलासा होतो. 'स्वराज्य' शब्दाच्या व्याप्तीचीहि आमची कल्पना बरीच संकुचित आणि एकलकोण्डी असे आणि आजहि आहे, 'मऱ्हाठी स्वराज्य' म्हणजे मऱ्हाठ्यांचे राजेशाही राज्य. या राज्याच्या सीमेपलीकडच्या लोकांविषयी-मग तेथे जरी आमचे खास नातलग असले तरी-आम्हाला यत्किंचितहि आत्मियत्वाच्या जिव्हाळ्याचा पाझर कधि फुटायचा नाही. फार काय, पण आमच्या स्वराज्यापेक्षा तेथे विशेष सुराज्य असले, लोकांची आबादानी व राज्यव्यवस्था बरीच चांगली असली, तरीहि आमचा बरा वाईट राजा आणि त्याची बरी वाईट राज्यपद्धति यांचा त्याग करून, त्या परकी राजाच्या (मग तो खरोखरच परकी असो, वा स्वकीय स्वदेशी असो) छत्राचा अभिलाष आमच्या कल्पनेला चुकूनसुद्धा शिवायचा नाही. स्वराज्य म्हणजे यदृच्छेने आमच्यावर राज्य करणाऱ्या राजाचे राज्य. फार फार तर, महाराष्ट्रावर मऱ्हाठी राजाचे जे राज्य ते आमचे स्वराज्य, हीच आणि इतकीच आमची स्वराज्याची व्याख्या आणि कल्पना. या व्याख्येप्रमाणे मुसलमानांचे स्वराज्य, शिखांचे स्वराज्य, रजपुतांचे स्वराज्य अशी अनेक स्वराज्ये या अफाट भरतखण्डात सर्वत्र पसरलेली असत; आणि कित्येक तर देशी आणि पुष्कळांशी एकधर्मी असूनहि एकमेकाना परकीय मानीत असत.

स्वराज्याची कल्पनाच इतकी कोती आणि संकुचित ठरल्यावर, राजनिष्ठेचे स्वरूप श्वाननिष्ठेच्या मसाल्याचे बनले तर त्यात नवल कशाचे? याची उदाहरणे मऱ्हाठ्यांच्या इतिहासात मुबलक आढळतात. स्वराज्यस्थापनेच्या कामी मुसलमानांपेक्षा खास स्वाजातीय मराठे सरदारांच्याच विरोधाला तोंड देता देता शिवाजीचा बारा आणे घामटा निघाला. कारण त्या सर्वांची राजनिष्ठा अदिलशाही निजामशाही वगैरे इस्लामी शाह्याना कायावाचामने वाटिलेली! तेथून ती कशी ढळवावी? शिवाजीचा उपक्रम कितीहि स्वाभिमानपोषक असला, तरी निष्ठा-आणि विशेषतः राजनिष्ठा-ही काही थुंकी नव्हे, तर ती हव्या त्या बोटावर हवी तशी नाचविता येईल! राजनिष्ठेच्या आणि राज्यनिष्ठेच्या भावनाच इतक्या कोत्या असल्यामुळे, वडील घराणे विजापुराभिमानी, तर धाकटे घराणे शिवाभिमानी, असले शेकडो हास्यास्पद

मासले मऱ्हाठशाहीच्या इतिहासात दिसून येतात. चान्द्रश्रेणी कायस्थ प्रभु मण्डळीनी शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेच्या कामी ''पेशजी व हाली या जातीने फार मर्दुम्य करून राज्य मेळविले. स्वामीकरिता खराब जाले मारले गेले.'' हे सर्वश्रुतच आहे. महाराष्ट्रातील कायस्थ मण्डळी शिवाजीच्या बाजूला, आणि त्यांची शेकडो आप्तसंबंधी नातलग घराणी जंजिऱ्यास हबशी (आबिसीनियन) शिद्याच्या बाजूला, असा एक मनोरंजक मुकाबला येथे विचारात घेण्यासारखा आहे. जंजिरा काबीज करण्याची शिवाजीची मोठी महत्वाकांक्षा ती पार पाडण्यासाठी त्याने आपल्या संग्रहीच्या कायस्थांमार्फत जंजिरेकर कायस्थांकडे सूत्र बांधले जातीला जात तेव्हाच वळेल, हेच या सूत्रातले सूत आणि खरोखरच त्यावेळी जंजिरेकर कायस्थानी मनातच आणले असते, कोत्या राजनिष्ठेला डावलून मऱ्हाठी स्व-राज्य स्थापनेची व्यापक निष्ठा प्रज्वलीत केली असती, तर या * नावसुद्धा कोणाच्या स्मरणात उरले नसते! पण या विसाव्या शतकातल्या त्यांच्या कारकुण्ड्या वंशजाना नहिन्दुर्नयवन अशा कापडिया सारख्या पारशी दिवाणाकडून राजद्रोहाची तप्तमुद्रा कपाळावर ठोकून घेण्याचा कर्मयोग भोगावयाचा होता म्हणून म्हणा, अथवा हिन्दु पिण्डाला साजेशोभेसा त्यांच्या राजनिष्ठेचा चिकटा त्यांच्या मनावर विशेष घट्ट बसल्यामुळे म्हणा, जंजिरेकर कायस्थानी शिवाजीला एकमुखी विरोध करून, आपला स्वामी जो हबसाणी शिद्दी त्याच्या विषयीची राजनिष्ठा सतीच्या पातिव्रत्य व्रताप्रमाणे निःसंदिग्ध व्यक्त केली. आजसुद्धा जंजिरेकर कायस्थांची शिद्दी-राज्यनिष्ठा पूर्वीप्रमाणे शंभर नंबरी नसली, तरी शिद्दी नबाबाच्या राजघराण्याबद्दलची त्यांची राजनिष्ठा शिवकालाइतकीच तीक्ष्ण आणि जागरूक आहे.

युरपियन पॉलिटिक्समध्ये राजा आणि राज-कारण नव्हते व आज नाही, अशातला प्रश्न नाही. त्याना सुद्धा सोटेबारगिरीच्या दण्डुकेशाही पासूनच्या सर्व अवस्थांमधून जावे लागलेले आहे. पण त्यानी आपले पॉलिटिक्स हिन्दी लोकांप्रमाणे डबक्यातली साठवण न बनविता, त्याला नदीप्रमाणे नित्य वाहाते राखले. म्हणूनच त्याना प्रत्येक राजकीय क्रान्तीच्या प्रसंगी काही ना काही नवीन लोकसत्ताक कल्पनेला मूर्तस्वरूप देऊन, आज लोकमतानुवर्ति पार्लमेण्टरी राज्यपद्धतीपर्यंतची उत्क्रान्ति साध्य करता आली. आजहि अनेक युरपियन राष्ट्रांत राजा हीच चीज दृष्टीस पडते. पण तो केवळ ठराविक नैवेद्याचा धनि. यापेक्षा प्रत्यक्ष राज्यकारभारात त्याला कसलेहि महत्व नाही किंवा त्याची ढवळाढवळ चालत नाही. आम्हालाहि यथाक्रम या सर्व अवस्थांमधून प्रवास करणे भागच आहे. फरक इतकाच कीं युरपियन पॉलिटिक्स प्रवाही राखल्यामुळे ते अल्पकाळात बहुगुणी बनले आणि भारतीय राजकारण अप्रवाही ठेवण्याच्या आमच्या ताठरपणामुळे, आज आम्ही राजेशाहीच्या माहात्म्यावरच ठेचाळून उभे राहिलो आहोत.

हिन्दुस्थानातील बरेच संस्थानिक आपल्या जन्मदत्त पुण्याईच्या जोरावर स्वतःस परमेश्वराचा अंश मानून, आपापल्या संस्थानाचा कारभार बऱ्या वाईट राजेशाही थाटाने हाकीत असतात. पण या त्यांच्या भावनेत चूक कोणाची? शतकानुशतके राजाला विष्णूचा अवतार मानून त्याच्या दैवी स्तोमाच्या आरत्या करणारे बडवे आम्हीच. मग त्या ऐदी आयतोबानी स्वतःस परमेश्वर कां मानू नये? बरे, संस्थानी लोकांकडे पहावे तर तेहि गुलालगोटे याच भावनेच्या गुलालाने ठेचून भरलेले! राजाचसा

* उपलब्ध झालेल्या अंकात वाक्य दिसत नाही.

काय पण त्याच्या 'पिरमातला, पिरतांतला अन् इसवासातला' कोणी का खराराबहाद्दर मोतद्दार किंवा श्वानरक्षक डॉगबॉय असो, त्यालासुद्धा देवा इतकाच मान देण्यापर्यंत त्यांच्या राजनिष्ठेचे ओघळ पाघळतात. खालसात सगळाच निर्गुण निराकार परमेश्वराचा नोकरशाही अंमल असल्यामुळे, राजनिष्ठेचे ओघळ संस्थानी स्वरूपाचे नसले, तरी पिण्डाची भावना एकरंगी एकशिंगीच असल्यामुळे, तुंबलेल्या राजनिष्ठेचा पाट प्रसंगविशेषी फुटलाच, तर तो चातुर्मासातल्या गटाराना लाजविल्याशिवाय रहात नाही.

खालसातली राजकारणी उत्क्रान्ति आज लोकशाहीच्या उंबरठ्या जवळ जवळ येऊन भिडली आहे आणि संस्थानी राजकारण तीनशे वर्षापूर्वी ज्या एकमुखी परमेश्वरी राजसत्तेच्या चाकोरीत होते तेथेच गिरक्या भिरक्या मारीत आहे. अखिल हिन्दुस्थानाच्या राजकारणी उत्क्रान्तीच्या मार्गात ही जीर्णमतवादी देशी संस्थाने म्हणजे एक पायओढी पीडाच होऊन बसली आहेत. हिन्दुस्थानाच्या सर्वांगावर ठिकठिकाणी फदफदलेली ही गजकर्णे आहेत, असा सात वर्षांपूर्वी प्रबोधनाने स्पष्ट बोलून दाखविलेला निष्कर्षच आज विशेष प्रत्ययाने सिद्ध होत आहे.* आज प्रत्येक संस्थानिक आपल्या सत्तासंन्यासाच्या दत्तभूताला आरपार भेदरलेला आहे. देवाचे अवतार म्हणून हवी तशी एकमुखी सत्ता गाजविण्यास सोकावलेले हे बोके, खालसातल्या लोकशाहीच्या घरटात आपल्या सोवळ्या राजेशाही सत्तेचे पीठ पडू नये म्हणून नोकरशाहीच्या छोट्या बड्या पित्त्यांपुढे बुलडॉगी नर्तन करू लागले आहेत. इंग्लण्डच्या राजाप्रमाणे खास तैनातीच्या मखरात बसून, संस्थानाचा सर्व कारभार प्रजेच्या हवाली करायलाहि जे नाखूष, त्यांची पोलादी हातानी वासलाद लावण्याचा प्रसंग भावी लोकशाहीला येणार, असा रंग दिसतो. पण खालसातली राजकारणी उत्क्रान्ति, राजनिष्ठेच्या नसली तरी, व्यक्तिनिष्ठेच्या-विभूतिपूजेच्या-कुंपणापलीकडे गेलेली नसल्यामुळे, या संस्थानिक देवांच्या आणखी तीन पिढ्या राजनिष्ठ श्वानांच्या तत्वनिष्ठ विरोधाच्या पुण्याईवर अलगज जगतील, ही त्यानी खात्री बाळगावी.

राजेशाही कितीहि चांगली असली, तरी लोकमताच्या दृष्टीने ती बेजबाबदारच. बेजबाबदारी गुरकेबाज असते. अर्थात् भारतीय राजकारण गुरकेबाज ठरते. असल्या गुरकेबाज उघड्या माथ्याच्या राजकारणाला युरपियनांच्या बुरखेबाज खोलहृदयी पॉलिटिक्सशी टक्कर देऊन अगर त्याच्याशी समरस होऊन जगण्याचा दुसरा मार्ग खुला नाही. बुरखेबाज पॉलिटिक्स कोणतीहि परिस्थिति नाजूक कदरीने हाताळताना किंवा लाथाळताना लिहिला बोलला जाणारा प्रत्येक शब्द तोळ्यामाशावर तोलून झेलून लिहीत बोलत असते. भारतीय राजकारण म्हणजे सोनाराची फुंकणी आणि लोहाराचा भाता. हवा त्याने हवा तसा फुंकावा. जबाबदारीचा प्रश्नच नाही. त्यामुळे खुद्द महाराज किंवा त्यांचे बडे अधिकारी तोण्डाने काहीहि बरळले बोलले, तरी दस्तऐवजी अक्षरांशिवाय त्यांच्या केवळ बडबडीला अगर वचनाना राजकारणी महत्व काहीच येत नसे व कोणी देतहि नसे. युरपियन पॉलिटिक्सची उत्क्रान्ति इतकी कदरबाज झालेली आहे कीं, कोणीहि माणूस कितीहि भला बुरा असला तरी त्याने या पॉलिटिक्सच्या क्षेत्रात पाऊल टाकताच प्रथम त्याची वाचा बंद पडते. काही बोललाच तर एकंदर पोलिटिकल यंत्ररचना त्याला जेवढी गति व मति देईल, तेवढेच मोजके शब्द तो बोलतो. केवळ

* "As at present constituted, the Native States are but spots of leprosy on the body of India, and none but we shall be too glad to see the whole map of India coloured in red, before it changes to some other colour designatory of responsible dominion government evolved on clear lines of republicanism." - Native States - A Problem Prabodhan, 1st March 1924, Vol. III, No. 10, page 148.

फोनोग्राफची प्लेट. वाचाळपणाला खीळ पडल्यामुळे तिकडची हिंमत मेन्दूच्या हिंमतीत मिळून, त्याची विचारशक्ति दुप्पट जोराने काम करते. यामुळे अगदी साध्या भेटीगाठीच्या प्रसंगावर सुद्धा कल्पनातीत अर्थ बसवून, त्यातून आश्चर्यकारक पोलिटिकल प्रमेये निर्माण करण्यात युरपियन पॉलिटिक्स पौराणिक समुद्रमंथनाच्या चमत्कारालाहि मागे सारण्यात तरबेज बनलेले आहे. भारतीय राजकारण म्हणजे सगळा उघडा बाजार. आव जाव घर तुमारा, कृतीपेक्षा तोण्डाची वटवट फार. सावजाला आधी उठवून मग शिकारीचा साज चढायचा. प्रतिस्पर्ध्याच्या हालचालींचा रोख अंदाजून चढाईचे धोरण ठरविण्याची आणि शठंप्रति शाठ्यंचे तडाखे लगावून त्याला एकदम चकभुल करण्याची गुप्त कारवाई हिन्दी राजकारणाला जवळ जवळ पारखीच म्हटली तरी चालेल. मऱ्हाठशाहीच्या काळात देशी रियासतींचे अनेक राजकारणी तहनाम्यांचे व भेटीगाठींचे मुकाबले घडत असत. परंतु त्यावर आजचे पॉलिटिक्स जसे आणि जितके अर्थ बसवून, हव्या त्या अनुकूळ प्रतिकूळ प्रमेयांची प्रसूति करते, तितका दगलबाज तरबेजपणा हिन्दी राजकारणाने एकदाहि दाखविलेला नाही. याला उदाहरण घ्यायचे तर महादजी शिंद्यानी मोगल बादशाहाच्या दरबारातून वझिरातीची वस्त्रे आणून श्रीमंत पेशव्याना अर्पण केली, तो प्रसंग पहा. दिल्लीच्या मोगल बादशाहीच्या वझिरातीची महावस्त्रे सवाई माधवराव पेशव्याने आभारपूर्वक स्वीकारताच, मऱ्हाठी साम्राज्य किंवा स्वराज्य मोगल बादशाहीच्या साम्राज्यात आपोआप मिळून मिसळून गेले, त्याचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट झाले, ते मोगल साम्राज्याचा एक भाग बनले, मोगल बादशाहाने महाराष्ट्राचा 'डोमिनियन स्टेटस' (वसाहतीचा दर्जा) मान्य केला, अशा कसल्याहि भावना, पेशवे किंवा मोगल बादशाहा यांच्या कल्पनेलाहि शिवल्या नाहीत. पेशवे मूळचे छत्रपतीचे वझीर. या वझीरला परक्या मोगल बादशाहाने आपल्या वझीरातीची महावस्त्रे अर्पण केली आणि पेशव्यानी ती बिनदिक्कत स्वीकारली. तर पेशवे कोणाचे वझीर झाले? छत्रपतीचे का मोगल बादशाहाचे? या वेळी मऱ्हाठी स्वराज्याचे धनि सातारकर छत्रपति केवळ कुंकवाला आधार अशा निर्माल्यवत् स्थितीत होते आणि स्वराज्याचा सर्व कारभार पेशवे मुखत्यारीने चालवीत होते. मग, मोगल बादशाहाची वझिरी पत्करून, पेशव्यानी छत्रपतींच्या स्वामीत्वाला रामदासी रामराम ठोकला कीं काय? नाही. त्या वेळी असल्या राजकारणी उचापतीना आताच्या इतके नाजूक कायदेबाज स्वरूप आलेले नव्हते. म्हणून बादशाही वझीरातीच्या महावस्त्राना केवळ मानसन्मानापेक्षा विशेष महत्व बादशाहाहि देत नव्हता आणि पेशव्यानेहि दिले नाही. युरपियन पॉलिटिक्सच्या सध्याच्या कायदेबाज आणि दगलबाज युगात या वझीरी वस्त्रदानावर कल्पनातीत भानगडींचे अर्थ बसविले गेले असते आणि ते अर्थ अक्षरशः अमलात आणण्याचे शक्य ते प्रयत्नहि झाले असते. असले प्रयत्न मुळीच झाले नाहीत असे नव्हे. पुष्कळ झाले. देशी रियासती ब्रिटीश बनिया कंपनीने बालाजीच्या कावलीप्रमाणे मटकावताना याच धोरणांचा स्वीकार केला होता.

आमच्या प्राचीन राजकारणाचे आणि इतिहासाचे पौराणिक पिठले होऊन बसलेले. अलीकडचा ज्ञात इतिहास एकजात राजेशाहीचा. त्यातच अवतारकल्पनेची राक्षसी आमच्या पिण्डाला आरपार झोंबलेली. अशा स्थितीत आमच्या राजकारणी उत्क्रान्तीच्या हरएक प्रयत्नात व्यक्तिमाहात्म्य आणि विभूतिपूजा यांचेच प्राबल्य जास्त दिसून येते. राजेशाहीच्या शतकानुशतकाच्या अखण्ड अमलामुळे लोकशाहीच्या मूलतत्वांची रूपरेषासुद्धा आम्हाला आकलन करता येत नाही. उघड उघड ही नवी कल्पना, तेव्हा

सुरुवातीला थोडा गोंधळ हा उडणारच, आणि तो नित्य उडत आहेच. इतर लोकसत्ताक राष्ट्रांतील राजकारणी उत्क्रान्तीच्या विकासावस्थेचे नकाशे पाहून, त्याप्रमाणे आंधळी नक्कल करणे चुकीचे आहे. प्रत्येक राष्ट्र आपापल्या संस्कृति प्रकृतीला परवडेल अशाच रंगाढंगात लोकसत्तेचा विकास घडवून आणण्यास समर्थ असते. अंधानुकरण किंवा नक्कल श्रेयस्कर होत नाही. राजेशाही प्रकृतीवर लोकशाही तत्वांचे कलम करण्याचे काम जनतेच्या आत्मविकासाने साधावयाचे असते, मूठभर शहाण्या पुढाऱ्यानी अट्टहासाने जनतेच्या अपरिपक्व प्रकृतीवर बांधावयाचे नसते.

राजकारणी उत्क्रान्तीच्या आमच्या सर्व चळवळी 'आधी कळस मग पाया'च्या धर्तीवर जनतेच्या बोकाण्डी बसविण्यात येत असतात. व्यक्तिमाहात्म्याच्या पुंगीवर जनता नुसती डुलत डुलत ठेऊन लोकशाही आत्मविकास करू पाहणारे पुढारी आत्मवंचक होत. लोकलबोर्डे, म्युनिसिपालट्या, कौन्सिले यांत प्रतिनिधी निवडून देण्याचा जनतेला जो अधिकार मिळाला आहे, त्या अधिकाराचा योग्य उपयोग कसा करावा, त्यात लोकसत्तेच्या मूलतत्त्वांचा काय ओनामा आहे, प्रतिनिधीची निवड करताना त्याचे नुसते तोण्ड न पाहाता लोकशाहीच्या कोणत्या तत्वाची त्याची लायकी अंदाजायची, या दिशेने जनतेचा कसलाहि आत्मविकास न करता, निवडणुकीचे जलसे निर्भेळ व्यक्तिमाहात्म्याच्या झगझगाटावरच नाचविले जातात. हा लोकशाहीचा श्रीगणेशाहि नव्हे. फार तर याला झब्बूशाहीचा नमस्सिद्धं म्हणा. राजेशाहीने आमच्या हाडीमासी भिनविलेली झब्बूशाही या निवडणुकीत जनतेला घाबरवून, लोकशाहीच्या शुद्ध तत्वाला तिला किती मुर्दाडपणाने पारखी करते, याची उदाहरणे म्हणजे साऱ्या निवडणुकी होत. खालसातले आत्मवंचनेत झब्बूच जेथे जनतेच्या अज्ञानावर आत्मवर्चस्वाचे नंगा नाच नाचून, लोकशाहीच्या उत्क्रान्तीचे शत्रू बनतात तेथे पुराणप्रसिद्ध राजेशाहीला लालचटलेला एकादा खास राजा, त्याचा भाऊ किंवा त्यांच्या मलिद्यावर पुढारी बनलेला एकादा संस्थानी पोळ खालसातल्या निवडणुकीच्या रिंगणांत शर्यतीसाठी सुटल्यावर, लोकसत्ता * राजकारणी उत्क्रान्तीच्या मार्गात ते केवढे भयंकर संकट असेल, याची कल्पना करण्याइतका पूर्वानुभव जनतेला पुष्कळ आहे.

□□□

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही.

लेख

फर्ग्युसन कॉलेजातील खेळखण्डोबा

(लेखांक १ ला)

गेल्या शतकाच्या अखेर अखेर महाराष्ट्रात एका नवीन चैतन्याची लाट उसळली. इंग्रेज बहाद्दरांच्या रामराज्यात कसलाच राम नाही, आत्मोद्धारासाठी आपणच आपली मनगटे घासली पाहिजेत, स्वावलंबनाशिवाय तरणोपाय नाही, या कल्पनेच्या क्रान्तीची चकमक झडली. मूर्छनेचा काळ जाऊन प्रबोधनाची पहाट उजाडली. सचित्र असो वा विचित्र असो, कोणतीहि नवी कल्पना निपजविण्याइतका पुण्याचा कुसवा हा वेळ पावे तों चांगला दणकट होता. प्राप्त कान्तीच्या चकमकीत ज्या अनेक घोसदार ठिणग्या उडाल्या, त्यापैकीच एक डेक्कन एज्यूकेशन सोसायटीच्या स्थापनेत मूर्त उमटली, (सन १८८४). तत्पूर्वी या ठिगणीने सन १८८० साली न्यू इंग्लिश स्कूलच्या रूपाने आपल्या आस्तित्वाची साक्ष पटविली होतीच. पण तिने आपला विकास सोसायटीत करून घेताच, सन १८८५ साली फर्ग्युसन कॉलेजला जन्म दिला.

या संस्थांचे मूळ उत्पादक वास्तवीक दोघेच-आगरकर आणि टिळक. सन १८७९ साली डेक्कन कॉलेजात सहाध्यायी असताना, या दोघांच्या विचारविनिमयाचे मूर्तस्वरूप न्यू इं. स्कूलच्या रूपाने व्यक्त झाले. सरकारी नोकरी सोडून विष्णुशास्त्री चिपळूणकर कोणत्या तरी खाजगी शाळेत नोकरी धरणार आणि तसली न मिळाली तर स्वतःची नवीन शाळा काढणार, अशी बातमी या दोघाना लागल्यामुळे, त्यानी आपण होऊन चिपळूणकराना आपल्या नव्या कल्पनेत सामील होण्याचा यशस्वी प्रयत्न केला, आणि त्याना म्होरकेपणाचा मान दिला. आगरकर आणि टिळक हे दोघेहि समतोल होते, तथापि त्यानी आखलेल्या कार्यक्रमात टिळकापेक्षा आगरकरांची महति आणि धडाडी विशेष होती आणि ही गोष्ट चिपळूणकरांच्या जाणिवेत चांगली स्पष्ट आलीहि होती. त्यानी आपले धाकटे बंधू लक्ष्मणराव याना ता. १३ सपटम्बर १८७९ रोजी जे एक पत्र पाठविले, त्यात या जाणिवेची छटा स्पष्ट दिसतेः-

"The memorable 1st of October is approaching. I shall enjoy the pleasure of kicking off my chains that day. Mr. Agarkar (going for M.A.) Mr. Tilak (going for LLB), Mr. Bhagwat and Mr. Karandikar (appearing for B.A.) have tendered proposals for joining me in the

enterprize. This they have done of their own accord. "

(नरसोपंत केळकरांच्या नेहमीच्या सहजसाध्य हातोटीला अनुसरून, या पत्राचे मऱ्हाठी भाषांतर आपल्या टिळक चरित्रात देताना, मूळपत्रातला आगरकर-टिळक हा नावाचा अनुक्रम उलटा करून, टिळक आगरकर असा छापला आहे. नामानुक्रमाच्या नंबर-बदलीने चरित्र नायकाची महति वाढविण्याची ही नरसोपन्ती जुक्ती त्यांच्या विनोदप्रवृत्तीला सरज्याच्या नयीप्रमाणे शोभते खरी!) सन १८८० साली न्यू इं. स्कूलची स्थापना झाली त्या वेळी आगरकर स्कूलला प्रत्यक्ष मिळाले नव्हते, ही गोष्ट खरी. पण याचे कारण नरसोपन्तानीच समर्पक दिले आहे कीं ''एम. ए. त नापास झाल्याने आगरकरांचा अभ्यास आणखी एक वर्षाचा शिल्लक राहिला होता, व थोडक्याकरता पदवी बुडवून शाळेला येऊन मिळण्यात आगरकरापेक्षाहि शाळेचेच नुकसान अधिक. त्यानी वर्षभर मागे राहावे असा सल्ला त्याना मिळाला, व तो सर्व प्रकारे योग्यच होता.'' तात्पर्य, न्यू इं. स्कूलच्या प्राणप्रतिष्ठेवर टिळकांची जितकी छाप होती, त्याहून काकणभर सरस आगरकरांची होती, यात मुळीच संशय नाही. लोकांच्या दृष्टीने कोणीतरी एकादा विशेष अनुभवी माणूस, बासनातल्या पैठणीप्रमाणे, पुढे करायला हवा, एवढ्याच दृष्टीने आगरकर टिळकानी चिपळूणकरांच्या पाठीवर म्होरक्येपणाचा खोगीर चढवला होता. पण एका वर्षाच्या आतच या फुरफुरत्या बेफाम घोड्याला कदरबाज काटेरी लगाम चढवून ठरावीक कार्याच्या तबेल्यात ठाणबंद ठेवावे लागले. शाळेची शिस्त आणि अंतर्बाह्य व्यवस्था या सर्व दृष्टीनी चिपळूणकरांच्या हातात वाजवीपेक्षा फाजील कारभार असता कामा नये, म्हणून वामन शिवराम आपट्यांची सुपरिंटेंडण्टच्या जागेवर नेमणूक करून, चिपळूणकराना फक्त नावाचे हेडमास्तर केले.

सोसायटीच्या जन्मापासून आजपर्यंतचा इतिहास नुसता कोणी वरवर नजरेने पाहिला तरी त्यात टिळकपक्ष आणि आगरकरपक्ष हा भेदभाव कमी अधिक प्रमाणात अव्याहत चाललेला दिसून येतोच येतो. एका विशेष धाटणीच्या प्रबोधक शिक्षणप्रसाराच्या ध्येयाने आगरकर टिळक एका ठिकाणी एकवटले, तरी देशकालवर्तमानाकडे पाहण्याची दोघांची दृष्टी अगदीच भिन्न होती. आगरकराना सामाजिक सुधारणेचा ध्यास, तर टिळकांचा फक्त राजकारण प्रबोधनावर अढळ विश्वास. वास्तवीक ही दोनहि कार्ये परस्परानुषंगी. परंतु अर्धा भाग सोन्याचा आणि अर्धा भाग चांदीचा अशा पुतळ्याच्या मागे पुढे उभे राहून पुतळा चांदीचा का सोन्याचा, या वादाची * घालणाऱ्या, एका कल्पित गोष्टीतल्या, शिलेदारांप्रमाणे दोघांची स्थिति होती. शिक्षणाचा संबंध राजकारणापेक्षा समाजसुधारणेशी विशेष निकटचा आणि जिव्हाळ्याचा असल्यामुळे, राजकारणी टिळकांपेक्षा समाज सुधारक आगरकरांची छाप सोसायटीच्या कारभारावर साहाजिकच विशेष पडली. सोसायटीच्या जीवनाला धक्का लागू नये म्हणून मतभेदाची ही तीव्रता सो. च्या कारभारात जरी बुरख्याबुरख्यातून भिरभिरत असे, तरी सार्वजनिक कार्यक्षेत्रात तिचा स्फोट दर आठवड्याला प्रथम प्रथम केसरी मध्येच आणि नंतर सुधारक आणि केसरीच्या तोण्डाने स्पष्ट व्यक्त होतच होता. पुढे, गोपाळराव गोखले सोसायटीत आल्यामुळे, टिळकांच्या राजकारणी कार्यशैलीला आगरकरांपेक्षाहि एक जबरदस्त प्रतिस्पर्धी निर्माण झाला. आगरकर-टिळक पक्षभेदाची रेषा जनतेलाहि विशेष ठळक दिसू लागली. सोसायटीतील

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही.

टिळकांच्या महत्वाचा पारा भराभर खाली उतरू लागला. अखेर प्रतिपक्ष्याच्या चढत्या भांजणीपुढे आपल्या राजकारणी अपूर्णांकाची एकदेशी टाप चालणे शक्य नाही, असे पाहून महत्वाकांक्षी टिळकानी सोसायटीला राजीनाम्याचा रामराम ठोकला. शिक्षणप्रसारातील राजकारणी हट्टाग्रहाची सांप्रदायीक लडथड अशा रीतीने दूर होताच, सोसायटीच्या ध्येयाला विशेष स्थिरता आली आणि कार्यक्षमतेचा मार्गहि बराच निष्कण्टक आणि सरळ झाला. ओल्या मातीवरची पावले बुजत नाहीत म्हणतात, तद्वत सो. च्या कारभारातील टिळकी हट्टीपणा जरी दूर झाला, कार्यकर्त्यांच्या एकोप्याने सोसायटीची भरभराट वाढली, आणि डेक्कन एज्यूकेशन सोसायटी म्हणजे आगरकर-गोखल्यांची परंपरा हा नावलौकीक सर्वश्रुत झाला, तरी आगरकरपक्ष आणि टिळकपक्ष या भेदाची सुकी राठ गोष्पदे कायमच्या कायमच राहिली. या गोष्पदाना 'नियोलिथिक स्टोन्स' पेक्षा अधिक महत्व अलीकडे कोणीहि देत नव्हता. पण, त्यात पाणी ढकलून जुना गिलावा ओला करण्याचा अव्यापार काही अजागळानी सुरू केल्यामुळेच, पुन्हा वर डोके काढणाऱ्या टिळकी हट्टाग्रहाच्या 'शुनः कपाले लगुडप्रहार' करणे प्राप्त आहे.

विद्यमान कारभारात कानिटकरपक्ष आणि नाईकपक्ष असे दोन पक्ष असल्याचे सर्वांना माहीत आहे. कानीटकरपक्ष आगरकरी अभिमानाचा असला, तरी खुद्द आगरकरांच्या तत्वनिष्ठेच्या तिखटपणात हा अगदीच पाणचट आहे. या पक्षातले कोटपाटलोण्ये स्वतःला समाजसुधारक समजतात खरे, पण दोन चार अपवादाखेरीज बाकीचे बहुतेक पिचक्या पाठकण्याचे आहेत. गोखले आगरकरांच्या तत्वनिष्ठेची तडफ यांच्यात नाही. दुसरा शेण्डीगंधवाला नाईकांचा धोतऱ्या पक्ष पाहिला, तर तो जीर्णाभिमानी खरा, पण त्यातहि टिळकांचा तात्विक प्रामाणिकपणाचा खडखडाटच. विशेष मनोरंजक गोष्ट म्हणजे धड ना सुधारक धड ना दुर्धारक अशी काही 'पश्चिम-परत' त्रिशंकु वटवाघुळे नाईकपक्षाने उदार मनाने आपल्या पंखाखाली पाळली आहेत, एरवी पाहिली तर ही वटवाघुळे मोठी सुधारक बाण्याची दिसतात; पण कुटुंबलज्जेसाठी किंवा लोकलज्जेसाठी, कै. टिळकाप्रमाणे, गोमुत्रप्राशनाची संधी कधीच दवडायची नाहीत. कानीटकरपक्ष संख्येने मोठा आणि सरधोपट, नाईकपक्ष हाताच्या बोटांइतका क्षुद्र, परंतु टिळकी हिकमतीत प्रविण. अशी वास्तवीक स्थिति असताना बहुसंख्य कानीटकरपक्षाला चारीमुण्ड्या चीत करून, अल्पसंख्य शेण्डीवाला नाईकपक्ष आज फर्ग्युसन कॉलेजात शिरजोर होतो; आगरकर-गोखले-पार्टीवर टिळकांची बाळंभट्टी चौखूर उधळते; यातले रहस्य काय आहे?

यातले रहस्य नाईकपक्षाच्या टिळकी हिकमतीत आहे. हिकमतीपुढे मताधिक्याचे तट्टू कितीसे बिनधोक चरणार? आतापर्यंत केवळ 'कुंकवाचे सौभाग्य' भोगणारी गव्हर्निंग बॉडी, फक्त देखरेख आणि सल्ला मसलतीपेक्षा हातात विशेष कसलीहि सत्ता नसताना, ज्या अर्थी घटनेला धाब्यावर बसवून एकदम हव्या त्या गोष्टी स्वतःच अमलात आणण्यास सजली किंवा धजली, त्या अर्थी गव्ह. बॉडीचे टिळकपक्षाशी सूत आहे, असे लोकाना वाटणे साहजिक आहे. गव्ह. बॉडी नाईक-पार्टीच्या शेण्डीगंधाला भाळली असली, तरी टिळकपक्षाच्या नुसत्या वाऱ्यालाहि उभे राहण्याच्या धीराचे डोके गव्ह. बॉडीच्या एकाहि मेम्बराच्या खांद्यावर नाही. हरएक बाबतीत नोकरशाहीच्या भ्रुकुटिचलनाच्या रोखाने कायावाचामनाची कसरत करणाऱ्या एकरकमी भेदरट आणि कमकुवत लोकांचीच स्थापना गव्ह. बॉडीत झालेली आहे. लोकनायक म्हणवून घेण्याइतके तडफदार बाण्याचे आणि विशेषतः शिक्षणकार्यज्ञ (Educationist) गृहस्थ सध्याच्या गव्ह. बॉडीमध्ये कोणीच नाहीत. एकजात सगळे

शालशिष्ठ शिलेदार! अशा या मवाळातल्या मवाळानी बहुसंख्य कानीटकरी आगरकरपक्षाला बेछुट दडपून, अल्पसंख्य नाईकी टिळकपक्षाला अधिकारारूढ करावे, यातील गोम काय आहे? गव्ह. बॉडीच्या अधिकारलालसेशिवाय यात निराळी गोम काहीच नाही. आजवर ही बॉडी बुदबळी राजाप्रमाणे शोभेच्या देव्हाऱ्यात सावडलेली असे. लाईफ मेम्बरांच्या बॉडीने केलेल्या अगर ठरविलेल्या बऱ्या वाईट कृत्याला 'होय' 'नाही'ची मान हालविण्यापेक्षा बिचाऱ्यांच्या हाती खरी 'एक्झिक्युटिव' सत्ता घटनेनेच ठेवलेली नव्हती व नाही अर्थात् गव्हर्निंग बॉडी या शब्दांचे साफल्य ठरविण्यासाठी असतील नसतील ते तात्या पन्तोजीचे अधिकार अमलात आणण्याची ग. बॉडीने ही विलायती दगलबाजी (Diplomacy) लढवून, सोसायटीवर निष्कारण आपत्तीचा एक वज्रप्रहार केला आहे.

लाईफ मेम्बरांमध्ये आगरकर-गोखले परंपरेच्या कानीटकरपक्षाची मण्डळी जास्त असल्यामुळे, टिळक-परंपरेच्या अल्पसंख्य नाईकपार्टीला आपल्या मनाप्रमाणे हवे ते करता येत नाही. अशा निर्जीव व लंगड्या पार्टीला जर आपण आपल्या कृपेच्या कुबड्यानी सावरून धरले, तर साहाजिकच हा सोवळापक्ष आपल्या कह्यात राहील, केसरीसारखी टिळकपंथी पत्रेहि आपल्या बाजूने कयाकीर्तने करू लागतील, आणि त्यामुळे जी गव्ह. बॉडी लोकाना कधी दिसत भासत नाही, तिच्या अस्तित्वाचा गाजावाजा होईल, या स्वार्थी भावनेपेक्षा गव्ह. बॉडीच्या आक्षेपित अरेरावीत दुसरे काय आहे? याचा प्रत्यक्ष परिणाम मात्र असा होणार आहे कीं कोणतीहि चांगली नवमतवादी गोष्ट या प्रागतिक म्हणून गाजलेल्या सोसायटीत होणे या पुढे दुरापास्त आहे. फर्ग्युसन कॉलेजाच्या विस्तीर्ण प्रांगणात नव्यानव्या 'अपटूडेट' शिक्षणसाहित्याची जी आकर्षक दृश्ये आज प्रेक्षकाना कुतुहलबद्ध करीत आहेत, त्याचे सर्व श्रेय गोखले-आगरकरी ला. मेम्बरांच्या 'मॉडर्निझम्'ला जसे देता येईल, तसे ते 'कान्झरवेटिव' टिळकपरंपरेच्या टोरी टोळीला खास देता येणार नाही. सोसायटीच्या प्रगमनशीलतेचा गाडा उभा राहिला काय, किंवा शेपटीकडे भरधाव पळत सुटला काय, गव्ह. बॉडीला त्याचे काय? सोसायटीच्या उभारणीत त्यांच्या घामाचा एक थेंबसुद्धा जर कधी पडलेला नाही, तर त्यांच्या आतड्याना पीळ तरी कां पडावा? बोलून चालून गव्ह. बॉडी म्हणजे प्रतिष्ठित शिलेदारांची इंद्रसभा. त्यानी सोसायटीसाठी आजपर्यंत काय केले आहे? जोमदार कानीटकरपक्ष बडवून निःसत्व केला, आणि दगलबाज (किंबहुना दगाबाजच!) टिळक टोरीपक्ष कह्यात ठेवला, म्हणजे आयत्या पिठावर रेघा ओढण्यास आज फुरफुरलेली गव्ह. बॉडी सांगेल ती पूर्वदिशा असा प्रसंग आलाच. बाहेर कोठे पुढारीपणाची हौस फिटत नव्हती, ती फिटविण्याची गव्ह. बॉडीची ही जुगत आज जरी त्याना मोठी साजिरी गोजिरी दिसत असली, तरी त्याना एवढेच सुचवावे वाटते कीं सत्ताभिलाषाचे ''घी देखा, लेकीन बडगा नहि देखा.'' सोसायटीचे लाईफ मेम्बर जर गव्ह. बॉडीतील मेम्बरांच्याच शिलेदारी मातीचे * असते, तर फर्ग्युसन कॉलेजची स्थिति कोणत्या टिळकी 'राष्ट्रीय' शाळेपेक्षा अधिक भिकारडी * नसती, 'यंव रे यंव, आपण कशशी केली?'' अशा पोकळ किंबहुना पोरकट विजयानंदात गव्ह. बॉडीचे मेम्बर आज फुशारकी मिरवीत असतील. पण या मवाळाग्रणीना टिळक संप्रदायाच्या दगाबाज दगलबाजीची असावी तितकी स्पष्ट कल्पना नाही. याना आपल्या 'विलायती दगलबाजी'ची केवढीहि घमेण्ड वाटत असली, तरी पुणेरी टोरी टोळीची 'देश

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही.

दगलबाजी' त्यांच्या 'विलायती' अकलेचा अभेद्य दिसणारा कोट तडाड फोडून, सोसायटीचीहि शकले पाडण्यास कमी करणार नाही, हे त्याना 'याच देह याच डोळा' पाहाण्याचा कुप्रसंग न येवो म्हणजे मिळवली! टिळकी संप्रदाय जेथे वरचढ झाला, तेथे हव्या त्या वज्रघटनेचे अखेर तीनतेरा मातेरेच होत आल्याचे दाखले, साऱ्या महाराष्ट्रभर रिंगणीच्या पेवा प्रमाणे पसरलेले प्रत्येक शाबूत डोळ्याच्या जित्या माणसाला खास दिसतील. गव्ह. बॉडीचा चष्मा चुकीच्या नंबराचा तर नाही ना?

फर्ग्युसन कॉलेजातला बहुसंख्य 'लिबरल कानिटकरपक्ष काय, किंवा अल्पसंख्य 'टोरी नाईकपक्ष काय, बहुजनसमाजाच्या दृष्टीने दोघेही भटजीच. परंतु लिबरलांच्या संख्याधिकत्वामुळे, पुढे मागे ही भटी कोण्डी फोडून सोसायटीत ब्राम्हणेतरांचे 'लेबर गव्हर्नमेण्ट' (मजुर सरकार) तिचे आद्य हेतू अक्षरशः सफल करण्यासाठी केव्हा ना केव्हा घुसण्याची किंवा घुसविण्याची जनतेला बरीच आशा होती. पण आता 'लेबर' तर दूरच राहिले, पण 'लिबरलां'चीहि तंगडीछाट करून, गव्ह. बॉडीने 'टोरी'ला शिरजोर बनवले! याचे अनेक दुष्परिणाम सोसायटीवर होतील. डे. ए. सोसायटी म्हणजे भटांचा भटवाडा, ही लोकांची खात्री असली, तरी एक अनन्यसामान्य स्वदेशी संस्था या दृष्टीने ते तिच्याकडे बऱ्याच सहानुभूतीने पाहात असत. या सहानुभूतीला सोसायटी आता लवकरच पारखी होऊन, ब्राम्हणेतर वादाच्या शरसंघानी मोर्च्याला तिला तोंड देणे भाग पडेल. झाल्या केल्या गोष्टींची सगळी रकटी सार्वजनिक चर्चेच्या धोबीघाटावर हवी तशी आडवी तिडवी आपटली धोपटली जातील. त्यावेळी सोसायटीच्या कारभाऱ्याना खरे ब्रम्हाण्ड आठवेल, या आगाऊ सूचनेचा हेमगर्भ त्यानी आधीच चाटून ठेवलेला बरा.

गव्ह. बॉडीच्या आक्षेपित अरेरावीचा दुसरा दुष्परिणाम म्हणजे सोसायटीच्या लाईफ मेम्बराना लाईफ मेम्बर म्हणून आता फुटक्या कवडीची किंमत उरलेली नाही. सगळे लाईफ मेम्बर आज वाईफ मेम्बर होऊन बसले. गव्ह. बॉडी नवरा आणि या साऱ्याजणी त्याच्या बायका. चुलीपुरती अक्कल चालवून, पदवीदार सरज्याची नथणी फलकावीत, शिक्षणाची फुंकणी फूं फूं फुकावी आणि आयुष्य कण्ठावे. केवळ पायातली वहाण! सोसायटीचे उदात्त हेतू तडीला न्यायचे काम लाईफ मेम्बरांशिवाय पूर्वी कोणी हातात घेतले नाही, आज घेत नाही व आता पुढे कोणी घेणार नाही; आणि आता लाईफ मेंबरानाहि तशी, लायकीच उरलेली नाही. बायका ठरल्या म्हणून बाजारहाट करता येत नाही, आणि नवरा तर घराबाहेर पडायचा नाही. अर्थात् चुलीला अक्षता! शाळा कॉलेजात मुलाना शिकवून त्यांच्या फोनोग्राफी परीक्षा पास करवून घेणे, इतकेच आणि एवढेच आपले कर्तव्य आहे, असे एकहि प्रामाणिक आणि तत्वनिष्ठ लाईफ मेम्बर समजत नाही. ढोरांप्रमाणे पोरेच हाकायची तर त्यासाठी इतरत्र मिळणाऱ्या भरपूर द्रव्य प्राप्तीला लाथ मारून, 'पोटापुरते देइ, मागणे लइ नाही लइ नाही' अशा शर्तीवर लाईफ मेम्बर होण्याची जरूरच काय? तुपाच्या आशेनेच कोणी झाला तरी उष्टे खाणार. स्वदेशी शिक्षण संस्था, सांघिक लोकशाहीची स्वतंत्रता आणि आपुलकीच्या भावनेने संस्थेची भरभराट साधण्याची मोकळीक, हेच या ला. मेम्बरांच्या उष्ट्यातले तूप, ते तूपच जर गव्ह. बॉडी आपल्या राखीव किंवा रेखीव मिश्याना चोपडू लागली, तर हिन्दु 'वाईफ' प्रमाणे कपाळाच्या कुंकवाला दुव्वा देत, या असल्या बिनतुप्या खरकट्यात संतोष मानून दिवस कण्ठणाऱ्या किती सजणी लाईफ मेम्बरांच्या झनानखान्यात राहतात, ते आता लवकरच कळून येईल.

सन १८८३ सालच्या रिपोर्टात लाईफ मेम्बरमण्डळीच्या ध्येयासंबंधी वामन शिवराम आपट्यानी काढलेले उद्‌गार या घटकेला विचार करण्यासारखे आहेत. ते ह्मणालेः- "We have undertaken this work of popular Education with the firmest conviction and belief that of all agents of human civilization, Education is the only one that brings about material, moral and religious regeneration of fallen countries and raises them up to the level of most advanced nations by slow and peaceful revolutions. And in order that it should be so, it must be ultimately in the hands of the people themselves." हे शिक्षण कोणत्या प्रकारचे असावे, याबद्दल सोसायटीच्या रिपोर्टात पुष्कळ ठिकाणी उल्लेख आहेत. उदाहरणार्थ सन १८८५ सालच्या रिपोर्टात, श्रीमंत सयाजीराव गायकवाडाना दिलेल्या मानपत्रात (Address) खालीलप्रमाणे उद्‌गार आहेत :- "One of the main objects of this Society is to initiate a system of National Education, imparted in ways adapted to the wants and necessities of the people, and to cover, in time, at least the whole of the Maharashtra with a network of Schools of its own..... Fully convinced of the many advantages resulting from the existence of private Societies working side by side with Government machinery, we have ventured to found this Society - the first organised attempt, we believe, made by the Natives of India, at least on this side of the Country, to take higher education in their own hands." सोसायटीचा मूळ उद्देश 'स्वस्त आणि सोईस्कर शिक्षण देणे' (cheapening and facilitating Education) हा असल्याचे सर्वश्रुतच आहे. या शब्दांचा अर्थ अनेक तऱ्हानी निरनिराळ्या वेळी रिपोर्टात मांडला गेला आहे. प्रि. सेलबीनी श्रीमंत सयाजीरावांचे आभार मानताना म्हटले आहे कीं "The object of the D. E. Society being to diffuse education among the masses, the Society must set the highest value upon everything which tends to make the masses look up to it with respect."

स्वावलंबी, करारी व कदरबाज नागरीक बनविण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या या संस्थेच्या ध्येयाविषयी आज तरी कोठेहि दुमत नाही. अझून ध्येय पूर्ण सिद्धीला गेले नसले तरी प्रयत्नांची दिशा चुकलेली नाही. आजकाल 'राष्ट्रीय' देशभक्षकानी 'राष्ट्रीय शिक्षण' म्हणून चालविलेला डोंबाऱ्याचा खेळ दृष्टी आड करून, नीट विवेकाने पाहिले तर, डे. ए. सोसायटीच्या संस्थापकाना खरे राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय, याची जाणीव तर होतीच होती; पण त्याहिपेक्षा महत्वाची गोष्ट म्हणजे राष्ट्रीय शिक्षणाच्या उपलब्ध सर्व पद्धतींची चाणाक्षपणानी छाननी करून, त्यातले उत्तमोत्तम भाग यथावकाश महाराष्ट्रभर प्रसृत करण्याची - शिक्षणाचे लोण जनतेच्या खालच्या थरापर्यंत नेऊन भिडविण्याची - त्यांची धडपड होती. आजपर्यंतच्या सर्व लाईफ मेंबर मंडळीनी याच दिशेने प्रयत्नांची शिकस्त चालविली आहे. युनिवर्सिटीच्या असतील नसतील तेवढ्या परीक्षा पास होण्यातच माणुसकीचा मोक्ष आहे, असे या मंडळीना केव्हाहि वाटलेले नाही. यामुळे राष्ट्रीय शिक्षणाची सर्व उपलब्ध 'अपटूडेट' सामुग्री त्यानी हळूहळू जमवीत आणली आहे. उत्तम लेबॉरेटरी (प्रयोगशाळा), उत्तम लायब्ररी, उत्तम व्यायामशाळा, सोयीस्कर वसतिगृहे या सर्व योजना लाईफ मेंबरानी हाडे मोडून, पैसा जमवून, यशस्वी केल्या आहेत. फर्ग्युसन कॉलेजची लायब्ररी आज मुंबई इलाख्यात पहिला नंबर खास पटकावील, इतकी

अपटूडेट साहित्यानी श्रृंगारलेली आहे. अर्थात् या सर्व आधुनिक शिक्षणोपकरणाच्या उत्कर्षाचे श्रेय या निःस्वार्थी लाईफ मेंबरांच्या परिश्रमालाच दिले पाहिजे. शिराळशेटी गव्ह. बॉडीचा या उत्कर्षात रतिभर सुद्धा भाग नाही. ला. मेम्बरानी गावोगाव बूटफाड करून लाखो रुपये जमा केले, त्याचे कारण तरी हेच कीं जनतेला या मण्डळींच्या निःस्वार्थ शिक्षणसेवेची पूर्ण जाणीव व आदर असल्यामुळे, लोकानी त्याना पैशाची वाण कधीच पडू दिली नाही. सोसायटीचा सर्व कारभार याच निःस्वार्थी लाईफ मेम्बरांच्या जबाबदार हाती असल्यामुळे, आपल्या पैशाचा चुकून सुद्धा दुरूपयोग होणार नाही, ही लोकांची खात्री होती, आणि ही खात्री अस्थानी ठेवली गेली नाही, हेहि या ला. मेम्बरानी आपल्या दृश्य कामगिरीने सिद्ध करून दाखविले आहे. जन्मभर सरकारची नोकरी करून अखेर लठ्ठलठ्ठ पेनशनच्या गोळ्यांवर जगणाऱ्या किंवा इतर व्यवसायांवर स्वतःची तुंबडी गडगंज भरून, फावल्या वेळात देशसेवेचा दिवाणखानी खल खलणाऱ्या आणि वर्षातून दोनचारदा बॉडीच्या मीटिंगला हजर राहून सुलतानशाही यस-नो-ची अरेरावी गाजविणाऱ्या गव्ह. बॉडीच्या झब्बूंवर जनतेने एवढा विश्वास टाकल्याचे एकहि उदाहरण दिसत नाही. गेल्या नवंबरच्या घाशीरामीने सोसायटीला जनतेच्या या विश्वासाला रामराम ठोकण्याची आपत्ति ओढवली आहे. कारण ज्या लाईफ मेंबरांवर जनतेचा सिद्ध विश्वास, त्यानाच गव्ह. बॉडीने हमाल बनविले आणि गव्ह. बॉडीच्या झब्बूंवर तर जनतेचा विश्वास पूज्य. हमालीचा पट्टा गळ्यात अडकवून भीक मागायला फिरण्याइतके ला. मेंबर पोकळडोक्ये असतील असे वाटत नाही. बरे, 'करून करून भागले न् देवपूजेला लागले'ल्या गव्ह. बॉडीचे झब्बू या बिनव्याजी दगदगीचा व्याप पत्करण्याइतके मूर्ख खात्रीने नाहीत. यदाकदाचित् तात्पुरत्या तिरमिरीचे अवसान आलेच, तर जनतेच्या विश्वासाच्या बाबतीत स्वयंभू पूज्यत्व पावलेल्या या सुलतानानी कोणाच्या ओसरीवर पाय ठेवावा? तात्पर्य, या सुलतानानी अधिकारमदाच्या दर्पात लाईफ मेंबरांच्या हक्कांवर वरवंटा फिरवून, सोसायटीच्या प्रगतीच्या टाळक्यावरहि पाटा भिरकावला, यात मुळीच शंका नाही.

सोसायटीवर ही गव्ह. बॉडी कशी आली, तिच्याबद्दल सोसायटीची मूळपासून प्रवृत्ति कशी आहे, लाईफ मेम्बरांच्या पक्षात कोणकोण कायकाय मसाल्याचे लोक आहेत, या सुंदोपसुंदानी कायकाय बोजवारे केव्हा केले, ब्राम्हणेतर समाजांपैकी लोक या सोसायटीत कां नाहीत, त्यामुळे गव्ह. बॉडीवर एकजात भटजीच कां? इत्यादि अनेक जिव्हाळ्याचे मुद्दे पुढील लेखांकावर टाकणे बरे.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांना शेलापागोटें

अमृतनाक

(कवि चांगदेव) प्रकाशक श्री. शंकर भाऊराव जावळे, चिटणीस ''चैतन्यग्रंथमाला,'' कावाराणा बिल्डिंग, मुंबई १२. किंमत २ आणे.

कलबुर्ग्याचा महार अमृतनाक याने मलिक बादशाहाची चुकलेली बिब्बी मोठ्या धाडसाच्या शिताफीने शोधून परत आणली. त्याबद्दल बादशाहाकडून त्याला बावन हक्कांची वतनदारी बक्षीस मिळाली, या इतिहासावर या काव्याची उभारणी कवीने केलेली आहे.

कवि स्वतः महार समाजातील एक पदवीधर असल्यामुळे, काव्यात आत्मियत्वाचा चटका चांगला वठला आहे.

धन्य धन्य ते विचार धन्यचि महार झुंजार ।
नवखंडामधिं अखंड गर्जे त्यांचा जोहार ।।

हे या पोवाड्याचे ध्रुपद असून, मंगलाचरणाची पहिली सलामीहि चांगली स्वाभिमानदर्शक वठली आहेः-

मोंगलशाही मऱ्हाठशाही भट-इंग्रजशाही ।
सोमकुलाच्या संग्रामांची सांगतील ग्वाही ।।
महारपद तें कोठें दाविल उभें गांवठाण ।
सत्ताविस गड सांगतीलही मर्दांचा मान ।।
शिरकरटीमधिं रक्ततेल तें आतड्याची वात ।
लावुनि फिरतें इमान त्यांचे ह्याच उजेडांत । ।
कधी कितीही जमोत शत्रू मग गादीभवती ।
संग्रामी 'जोहारगीत' ते गात गात लढती ।।
महार ऐसा परतंत्रींही - गादीचा बंदा ।
अखंड सेवी तिज तो मग त्या कुणि निंदा वंदा ।।

परगादीचा सेवक तरि तो राष्ट्राचा वीर ।
राष्ट्रनाद तो आजहि गर्जे मंगल ''जोहार'' ।।
राष्ट्रीयत्वा लोक विसरले 'रामराम' म्हणती ।
राष्ट्राचा 'जोहार' जगी या महार चालविती ।।

प्रस्तुत पोवाड्याची १७ कडवी असून, त्यात अमृतनाकाचा इतिहास उत्तम रंगविला आहे. कवि श्री. चांगदेव यांची प्रतिभा आणि मराठी भाषेवरील प्रभुत्व वाखाणण्यासारखे आहे. (केवळ जन्माच्या पुण्याईवर) काव्य-वाङ्मय-क्षेत्राची मालकीहि पटकावून बसणाऱ्या चातुर्वर्ण्या स्पृश्यांच्या 'दिसते पिवळे म्हणून' सोन्यापेक्षा, ज्ञानपरिसाचा स्पर्श होताच, हीन दीन - नव्हे, नीच - लेखला गेलेला अस्पृश्य सुद्धा किती कसदार सु-वर्ण बनतो, हे या छोटेखानी काव्यावरून खासे पटते.

मानवी प्रार्थना

(कवि व प्रकाशक श्री. वि. शा. आजनकार, आजनकार वाडी, नरखेड, जि. नागपूर, मध्यप्रांत.) किंमत १ आणा.

३ इंच x २।। इंच आकाराच्या, २५ पानी, छोट्या, सुंदर छपाईच्या पुस्तकात ३२ अभंग आहेत. ईश्वर भक्त भक्ती दांभिकपणा इत्यादि मामुली टाळकुट्या विषयांवर विवेकाचा किंचित् प्रकाश पाडण्याचा हा प्रयत्न आहे. ईश्वराचे अस्तित्व मानणाऱ्यांनी अगत्य वाचावा.

बालबोध गीतापाठ

(ले. - भास्कर विष्णू गुळवणी) प्र. - वासुदेव विष्णू गुळवणी, मु. पो. ऐतवडे बुद्रुक (जि. सातारा.) किंमत ८ आणे.

''गीता'' म्हटली कीं पुष्कळाना अझून काहीतरी अगडबंब प्रकरण आहे, असे वाटते. विद्वानानाच गीता समजणार, तो तत्वज्ञानाचा प्रदेश, साधारण बुद्धीच्या माणसाला तेथे पाऊल ठेवण्याची पंचाईत, ठेवले तरी समजण्याची मारामार, वन्दनापुरती गीता. अशीच सर्वसाधारण माणसांची कल्पना. गीता हे अगडबंब प्रकरण तर खरेच, पण त्याच्या त्या अगडबंबपणाची धास्ती दूर करून, त्यातले तत्वज्ञान सरळ सोप्या घरगुती भाषेत हळूवारपणाने सांगून, साध्याभोळ्या माणसाच्या नित्य संसारातहि आत्मशक्तीच्या विकासाला गीता किती आणि कशी उपयोगी पडेल, याचे बाल-बोध पाठ देण्याचे काम कोणीतरी केले पाहिजे होते. हे काम श्री. गुळवणी यानी चांगले सफाईत पार पाडले आहे. बाळाना सुद्धा चांगला बोध होईल अशा बाल-बोध भाषेत गीता पाठ शिकविण्याची कठीण कामगिरी पार पाडल्याबद्दल श्री. गुळवणी अभिनंदनास पात्र आहेत. पुस्तकाच्या दुसऱ्या भागात मूळ संस्कृत गीताहि दिल्यामुळे, पुस्तकाचा संग्राह्यपणा विशेष वाढला आहे.

श्री. गुळवणी सध्या विद्यार्थी दशेत आहेत. वाढत्या वयाच्या वाढत्या अनुभवाने विचारशक्तीचा जसजसा विकास होत जाईल, तसतसा त्यांचा हा गीतापाठ अधिकाधिक बालबोध वठेल, अशी आम्हाला आशा आहे. प्रत्येक घरात या पुस्तकाला आवडीचे स्थान मिळाले पाहिजे.

पर्वति सत्याग्रह व सनातनी ऊर्फ सैतानी स्पृश्य

ले. व प्र. श्री. सीताराम बाबाजी लांडगे, ६३५ गंज पेठ, पुणे शहर नं. २. प्रस्तावना लेखक श्री. विठ्ठल रामजी शिन्दे, किं. २ आणे.

मराठा व तत्सम मागासलेल्या वर्गातली फारच थोडी मंडळी सविद्य होऊन नुकतीच कोठे लेखण्या हालवू लागली आहेत. वृत्तपत्रे, पुस्तके वगैरे लिहून प्रसिद्ध करण्याचा त्यांचा आत्मविश्वास सध्या अगदीच बाल्यावस्थेत आहे. ही वृत्तपत्रांची अथवा लहान मोठ्या पुस्तकांची संख्या आज कितीहि वाढती असली, तरी या प्रयत्नांकडे कौतुकापेक्षा चिकित्सेच्या अन्य दृष्टीने पाहणे चुकीचे आहे. निदान आम्ही तरी नेहमी याच कौतुकाने त्यांकडे पाहात असतो. मराठा व तत्सम स्पृश्यांची जर ही स्थिती, तर सर्वच बाजूनी पददलित अशा अस्पृश्यांच्या लेखन प्रयत्नांकडे केवढ्या सहृदयतेने पाहाणे प्राप्त आहे, याचा अंदाज वाचकाना सहजच येईल.

पर्वति सत्याग्रहाच्या सबबीखाली स्पृश्य सनातन्या गुंडानी अस्पृश्यांवर जो अत्याचार केला, त्याच्या तिडका या पुस्तकात श्री. लांडगे यानी व्यक्त केल्या आहेत, त्या तिडकाच असल्यामुळे, काय बोलावे आणि काय लिहावे, याचा गोंधळ उडणे क्रमप्राप्तच आहे. १० व्या पानापासून, म्हणजे पर्वति सत्याग्रहाच्या विवेचनाला सुरुवात झाल्यावर, लेखकाने अस्पृश्यांच्या हृत्गताची मांडणी मुद्देसूद केली असली, तरी पहिल्या १० पानांत हिन्दु धर्माचा बरावाईटपणा ठरविण्याची दलामल निष्कारण केली आहे. हिन्दु धर्म हा एकदा सैतानाचा नरक ठरल्यानंतर त्याच्यासाठी प्राण देण्याची वटवट मूर्खपणाची आहे. परधर्मांत जाणे न जाणे, या गोष्टीचाही अस्पृश्यता-विध्वंसनाशी काही संबंध नाही, असे आमचे स्पष्ट मत आहे. 'धर्म' हे 'गुलामगिरी' ला दिलेले भुलभुलावणीचे गोंडस नांव आहे. धर्म हीच गुलामगिरी. जगातल्या कोणत्याहि गुलामगिरीचा नायनाट करावयाचा, तर प्रथम धर्माचाच मुरदा पाडला पाहिजे. मग धर्मान्तराचा, म्हणजे चुलीतून बईलात जाण्याचा, प्रश्नच उरत नाही. परंतु ही मुद्याची गोष्ट जेथे मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या गळी उतरत नाही, तेथे बिचाऱ्या अजाण अस्पृश्यांनी एकाच तोण्डाने धर्माचा सैतानीपणा सिद्ध करता करता, त्याच्यासाठी जीव देण्याचीहि प्रतिज्ञा बरळत सुटावी, याचे हासू येते. देव आणि धर्म या दोन महामाऱ्या जोंपर्यंत आमच्या पिण्डाला झोंबल्या आहेत, तोंपर्यंत आमच्या माणुसकीचा ब्रम्हाण्डातहि पत्ता लागणे मुष्कीलीचे आहे. या दोन नरकांचे स्वराज्य म्हणजे आमचा आत्मोद्धार होईल, अशीच जर अस्पृश्यांची भावना असेल, तर सत्याग्रह करून ते आपल्या जिवाचा हकनाहक उकीरडा करून घेत आहेत, असे आम्ही त्याना स्पष्ट सांगतो.

श्री. विठ्ठल रामजी शिन्दे यांची प्रस्तावना, त्यांच्या तपश्चर्येला आणि विद्वत्तेला शोभेशी, अतएव वाचनीय व मननीय आहे. अस्पृश्यांपेक्षा स्पृश्य गब्रूनीच या पुस्तकातील विचार वाचणे अगत्याचे आहे.

वासंती

(काव्यसंग्रह) संपादक - श्री. वि. स. सुखटणकर, प्रकाशक - पुरुषोत्तम अनंत कोलवाळकर, पार्वति बिल्डिंग, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई नं. २. किं. १ रुपाया.

''मुलांसाठी आधुनिक कवींच्या निवडक कवितांचा'' हा ''संग्रह'' आकर्षक स्वरूपात संपादकाने संपादला आहे. बहुतेक सर्व आधुनिक कवींच्या काव्यांतील मुलांमुलीना रुचतील पचतील अशा उद्बोधक कवितांची निवड आणि त्यांच्या आर्याची आणि संदर्भांची स्पष्टता करणाऱ्या संपादकीय टीपा, यामुळे 'वासंती'चा परिमळ विशेष आल्हादकारक झाला आहे. श्रीयुत प्रल्हाद केशव अत्रे B. A. B. T. T. D. (London) 'केशवकुमार' यांच्या प्रस्तावनेने वासंतीच्या परिमळाचा पार्श्वभाग चांगलाच उठावदार रंगविला आहे. जुन्या नव्या कवींच्या काव्यांतली विचारक्रान्ति, सरकारी शाळा खात्याची अरसिक वृत्ति आणि

मऱ्हाठी जनतेची परप्रत्ययनेय ऐदी प्रवृत्ति, इतक्या स्पष्टतेने पण विनोदाने, अणकुचीदार चिकित्सेने पण गांभीर्याने, आणि निषेधाच्या चटक्याने पण काव्यशैलीच्या शब्दचातुर्याने रंगविणारा मऱ्हाठी भाषेचा हा प्रस्तावना - निबंध 'केशवकुमारां'च्या विद्वत्तेला प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णु करणारा असाच वठला आहे. प्रत्येक प्रगमनशील आईबापानी आपल्या बचड्याना 'वासंती'चा सचित्र खाऊ अगत्य मागवून द्यावा.

राधाराधन

पंचांकी गद्य नाटक. ले. व प्र. 'संगीत संभाजी' नाटककर्ते रा. रा. आत्माराम मोरेश्वर पाठारे, मु. चेंदणी, ठाणे. किं. १। रुपाया.

गेल्या शतकातल्या शेवटल्या दशकात साग्र संगीत नाटकानी मऱ्हाठी रंगभूमी गाजत वाजत असता 'संगीत संभाजी' नाटकाने एका काळी लोकप्रियतेस पात्र झालेल्या वृद्ध लेखकाने हे 'आजचे एक सामाजिक चित्र' म्हणजे वेश्यागमनाची फलश्रुति आपल्या बालबोध लेखनशैलीने रंगविले आहे. आवडा राधा इत्यादि वेश्यांची भाषणे, मराठीच्या बरोबरच कोकणी तर्जुम्यात दिल्यामुळे, नाट्यप्रयोगात रंग भरण्याचा बराच संभव आहे. सरळ व साहाजिक शब्द योजनेने निरनिराळ्या पात्रांचा स्वभावपरिपोष करण्यात रा. पाठारे यांच्या लेखणीची कुशलता चांगली प्रख्या पावलेली आहे. परंतु कालौघाप्रमाणे बदलण्याची हिकमत वयमानानुसार त्यांच्या आंगी नसल्यामुळे, जुन्या साच्याची त्यांची नाटके नव्या मनूच्या नित्य बदलत्या अभिरुचीपुढे रंगभूमीला जाऊन भिडण्याची शर्यत जिंकू शकत नाहीत. ''आज ३२-३४ वर्षे प्रसिद्ध असलेल्या या उत्कृष्ट नाटककर्त्यांची आणखीं बरीचशी नाटकें रंगभूमीवर दिसण्याची अपेक्षा पुष्कळ नाट्यप्रेमी जनांनीं केली असेल, पण ती पूर्ण कां झाली नाही?'' याबद्दल आश्चर्य व्यक्त करणाऱ्या प्रस्तावना-लेखक श्री. अधिकाऱ्यानी कालव्यातित्याचा मुद्दा विचारात घेणे जरूर होते. प्रस्तुत नाटकात समाजस्थितीचे रा. पाठारे यांचे निरीक्षण अत्यंत सूक्ष्म आणि चिकित्सक असून, ते यथातथ्य वठविण्याच्या कामी त्यांच्या कलमकुंचलीची कुशलता वाखाणण्यासारखीच आहे. नाटक कितीहि 'वाचनीय' असले तरी सध्याच्या मऱ्हाठी रंगभूमीच्या रंगाढंगाच्या घुसळामुसळीत ते कितपत 'प्रेक्षणीय' वठेल, याचा अभिप्राय आमच्यापेक्षा एकादा दर्दी नाटकीच विशेष अधिकाराने देऊ शकेल.

भाऊबिजेची ओवाळणी

भाग २ रा. सं. मु. व. प्र.:- श्रीयुत नारायण बळवंत चव्हाण. प्रो. ज्ञानमित्र, ४८३ शनवार पेठ, पुणे शहर.

'श्रीउद्योगदेवता प्रसन्न' असलेल्या 'ज्ञानमित्र पुस्तकमालेचे पन्नासावे पुष्प. 'आर्य भगिनींना खऱ्या बंधुप्रेमाची जाणीव' करून देण्यासाठी ही ओवाळणी ऊर्फ निबंध गोष्टी कवितांच्या संग्रहाचे पुस्तक श्री. चव्हाण प्रसिद्ध करीत असतात. भारत कवि-मंडळातील वासुदेवसुत कारेकर यांची 'ओवाळणी काय घालूं तुला!' ही कविता टाकाऊ आहे. सरस्वती-तनयाची 'धन्य माता' साधारण बरी आहे. काव्यशेखर कवीचा 'पारिजातक' चांगला सुवासिक आहे. श्रीमती कुमारी मयुरतनयेने 'मेसॉपोटेमियांत रणांगणावर असलेल्या डॉक्टर बंधूस' पाठविलेली 'भाऊबिजेची भेट' काव्य दृष्ट्या नसली, तरी विचारांच्या दृष्टीने गोंधळाची आहे. कवयित्री जर कुमारी तर, ''बालके प्रतिक्षा करिती । कधि मामा येई म्हणती ।। नेणता बाळ मधुराजा । म्हणे अप्पा मामा माझा'' या उद्गारांची वासलाद कशी लागते? कवितेत काव्य नसले, तरी एक उद्गार आम्हाला फारच चमत्कारीक, पण विद्यमान मऱ्हाठी स्त्रीवर्गाच्या 'श्रीमती'

पणाचा वाटला. तो हाः- ''रणभूमिवास तुज घडला। मग मोद मनाला कसला!'' अरेरे! रणभूमीवर गेलेल्या आणि जाणाऱ्या मऱ्हाठी मर्दांच्या आयांची आणि बहिणींची असलीच भ्याड वृत्ति असेल, तर महाराष्ट्राच्या उद्धाराची प्रभात फाकायला अझून एक शतकाचा अवकाश आहे, असेच म्हणणे भाग पडते. श्रीमती सौ. शान्ताबाई चव्हाण यांच्या ''आर्य स्त्रीचें आदर्श शिक्षण'' या लेखात पुरुषी ढवळाढवळ बरीच झालेली दिसते. किंबहुना हा सबंध लेख लेखिकेने दत्तक घेतला असावा, अगर मुद्दाम कोणीतरी दिलेला असावा. ''युरोपांत तर स्त्री-पुरुषांच्या झगड्यांना प्रारंभही झाला आहे..... इंग्लंडमध्ये पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या असल्याने त्या सर्वांना विवाहीत होण्याची संधि मोठ्या भगीरथ प्रयत्नानेंही मिळत नाही..... पाश्चात्य लोक शास्त्रीय ज्ञानांत कितीहि सुधारले तरी त्यांचे सर्व अनुभव घेण्याचे कार्य चालू आहे व कोणत्याच विषयांत निश्चित अशीं मतें झालेली नाहींत. परंतु हजारों वर्षांच्या (ओहोहो!) अनुभवानें ठरविलेल्या, आपल्या आर्यस्त्रीच्या ध्येयाच्या कल्पना खरोखरीच निश्चित व अत्यंत सुखावह अशा आहेत. (मग हिन्दुस्थान असा गुलाम कां?) लवकरच असा वेळ येईल कीं, पाश्चात्य स्त्रियांची सुधारणा उलट फिरेल.'' इत्यादि विचारांवरून लेखिकेला अझून पुष्कळ शिकावयाचे आणि पाहावयाचे आहे. बाकीच्या गोष्टी व चुटके वेळ घालविण्यासाठी (To kill time) एकदाच वाचण्याच्या लायकीच्या आहेत.

पुष्पपराग

दादर कविमित्र मण्डळाचे ४ थे पुस्तक. प्र. लक्ष्मण गणेश सुळे, अध्यक्ष दा. क. मण्डळ. किं. ८ आणे.

आधुनिक कवींच्या काव्यसंग्रहाचा पुष्पपराग 'सुगंधित शीतल' आहे. निवड रसिकतेची असल्यामुळे, रसिकांचा आश्रय फोल ठरविणार नाही.

शेतकऱ्यांच्या गोष्टी

पुस्तक १ ले. पोकळ ऐट. ले. व प्र. कृष्णराव भाऊराव बाबर, हेड मास्तर शाळा नं. १ भिलवडी, जि. सातारा. किं. एक आणा.

नैतिक सुधारणेचा विशेष हेतू सरळ व सोप्या भाषेत पटविणाऱ्या लघुकथा-लेखनाचा श्री. बाबर मास्तरांचा प्रयत्न दिवस न् दिवस विशेष यशवन्त होत आहे. या शेतकऱ्यांच्या गोष्टी शेतकऱ्यांच्याच भाषेत सांगितल्यामुळे, त्या परिणामकारक वठल्या आहेत. श्री. बाबरांची ही एक आणा माला लक्षावधि प्रतीनी खेड्यापाड्यांत पसरेल, तर शेतकऱ्यांच्या शिक्षणाचे मोठेच कार्य घडून येईल. ब्राम्हणेतर पार्टीच्या झब्बुशाही खेळखंडोबापेक्षा, श्री. बाबरांचे हे मूकयत्नच शेतकऱ्यांच्या उद्धाराला विशेष हातभार लावतील. प्रत्येक शेतकऱ्याच्या झोपडीत या गोष्टी बिनचुक गेल्या पाहिजेत.

स्वैरालाप

कवि लक्ष्मीधर प्र. श्रीधर सखाराम पण्डित, शास्त्री हॉल, यमुना चाळ, ग्रॅण्टरोड, मुंबई. किं. ६ आणे.

कवि लक्ष्मीधर हे एक झाकले माणिक दिसतात. आधुनिक कवींच्या बाजारात हे जरी कधि चमकलेले दिसत नाहीत, तरी त्यांची काव्यशक्ति प्रासादिक दिसते. प्रस्तुत स्वैरालापात यांच्या निरनिराळ्या विषयावरच्या २७ कविता संग्रहित केल्या आहेत. व्याकरणशुद्ध भाषा, रसाळ रचना,

विषयांची चाणाक्ष निवड यामुळे हे स्वैरालाप मऱ्हाठी काव्यरसिकाना चित्ताकर्षकच वाटतील.

THE KAYASTHAS

A Peep into the Origin, Status and History of:- Part 1. Edited by Mr. Gopi Nath Sinha Varma, B.A. L.T. Published by The Verman Co. Bareilly. U. P. [Crown pp. 275, Price Rs. 2-8-0.]

Mr. Sinha has already made a name for himself as a well balanced historical researcher, and the present work stands to his credit as an unquestioned success. It is well known what an amount of silly labour the priestcraft of Bengal and U.P. is accustomed to put in to lower down the Kayasthas in all walks of life and public estimation. But the Kayasthas there are more than a match to their notorious opponents. In 10 chapters, Mr. Sinha brings out in bold relief all the details of the History of Kayasthas, proving with balanced arguments supported by self-evident scriptutal authorities, their royal blue blood and cultural supremacy. The Bombay Kayasthas will find this book very interesting and inspiring. To know our past, especially a luminant chivalrous past, is more than what we could ordinarily pay for cementing the citadel of our self-confidence. We strongly recommend this to their notice and trust they will not make Mr. Sinha feel that his was indeed a thankless task. The book will go a great way in making all-India Kayasthas understand each other more clearly than heretofore.

''अभिप्राय द्या'' अशी विनंती करणाऱ्या व्यवसाय बंधूंचीच तेवढी येथे बडदास्त ठेवण्यात येत आहे.

क्रान्ति साप्ताहिकाचा खास लेनीन अंक

प्र. श्री. खण्डेराव आत्माराम देसाई, वाडेकर बिल्डिंग, मुंबई ४. किं. १ आणा.

क्रान्ति हे सुप्रसिद्ध 'लाल बावटा' ऊर्फ गिरणी कामगार युनियनचे अधिकृत मुखपत्र असून, त्याने गेले वर्षभर गिरणी कामगारांच्या संघटनेचे आपले कर्तव्यकर्म चोख बजावले आहे. एकादे मत किंवा तत्व कितीहि लोकअमान्य किंवा राजअमान्य असो, त्यावर प्रत्ययाची निर्भेळ निष्ठा ठेऊन कार्य करणाऱ्या मण्डळींची योग्यता फार मोठी असते. मान्यामान्यतेचा प्रश्न प्रवाही अर्थात् नित्य बदलता असल्यामुळे, त्याला सिद्धान्ताची किंमत देणे चुकीचे आहे. 'क्रान्ति' पत्र चालविणारी मण्डळी कम्युनिष्टीक मनाची आहेत, आणि या मतानुसार ते प्रत्ययाचे सिद्धान्त सांगून जनशिक्षणाचे कार्य प्रामाणिकपणाने करीत आहेत. प्रस्तुतचा सचित्र 'लेनीन अंक' अनेक दृष्टीनी वाचण्यासारखाच वठला आहे आणि कम्युनिझम ही काय भानगड आहे? लेनीन हा कोण होता? त्याने रशियाची राज्यक्रान्ति कशी घडवून आणली? इत्यादि प्रश्नांची ज्या विचारवंताना जिज्ञासा असेल त्यानी हा लेनीन अंक अगत्य वाचावा.

सरस्वती

(व. ३ रे, अंक १ ला) संपादिक कुमारी गंगुबाई पाटील, १९४७-४८ कडोलकरगल्ली बेळगांव. वार्षिक वर्गणी मनीऑर्डरीने रु. १-३-०.

स्त्रियानी स्त्रियांसाठी स्त्रियांच्या हिताहिताचा निर्भेळ स्त्रियांच्या दृष्टीने विचार करणारी नियतकालिके महाराष्ट्रात मुळीच नाहीत म्हटले तरी चालेल. 'गृहलक्ष्मी'सारखी जी एक दोन होती किंवा आहेत, त्यांत पुरुष लेखणीची लुडबूड फार. कुमारी गंगुबाई पाटील यांच्या 'सरस्वती'ने या कृत्रिमपणाला चांगली कलमबेडी ठोकली आहे. ''स्त्रियांसाठीं व मुलींसाठीं खास स्त्रियानी व मुलीनी चालविलेले हे 'सुंदर मासिक' कौतुकास्पद कामगिरी करीत आहे. चिरायु भव!

दूत-औद्योगिक व प्रापंचिक मासिक

सं. व प्र. श्री. चिन्तामण रामचंद्र टिकेकर, ३३-३४ नवी पेठ, सोलापूर. वा. वर्गणी ट. ह. सह २।। रुपये.

या मासिकाने आपले 'औद्योगिक व प्रापंचिक' हे नाव अक्षरशः सार्थ केले आहे. सत्यशोधन, स्पष्टोक्ती आणि निस्पृहपणा यांत या मासिकाला तोड नाही. आश्रय देण्यासारखे आहे.

□□□

लेख

ब्लॅकहोलची कादंबरी

(एक ऐतिहासिक सत्यशोधन)

सिराज-उद-दौल्याच्या कलकत्त्याच्या स्वारीत ब्लॅकहोल ऊर्फ अंधारकोठडीचा अमानुष अत्याचार झाल्याचा मोठा गवगवा इंग्रेज इतिहासकारानी केलेला आहे. सवड सापडेल तेथे हिन्दी राजेरजवाड्यांची आणि लोकांची नालस्ती करण्यासाठी, वाटेल त्या दृष्टपणाचे आरोप त्यांच्यावर करून, त्यांची चरित्रचित्रे काळ्याकुट्ट भेसूर रंगांत रंगविण्याचा मोह क्रिस्ती बखरकाराना फार. त्यासाठी ते नीतिनियमांची कणिक हवी तशी तिंबवून ताणतील. स्वतःच्या डोळ्यांतील मुसळ लपवून, दुसऱ्याच्या डोळ्यांतील खऱ्याखोट्या कुसळाचे मुसळ करून दाखविण्यात राजकारणी इंग्रेज प्राण्यांची कुशलता जगजाहीर आहे. त्यांच्या राजकारणी कारस्थानांची भूक शमण्यासाठी, त्यानी कितीहि अमानुष अत्याचारांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या केल्या, तरी त्या त्यांच्या 'युटिलिटॅरियन पॉलिसी'च्या (उपयुक्ततावादाच्या) पचनी तेव्हाच पडतात. पण त्याच पॉलिसीने, शिवाजीने अफझुलखानाचा किंवा मोऱ्यांचा काटा काढला, तर त्याची नीतीच्या चरकात गाळणी पिळणी करताना, आंग्रेज बखरकार, मुत्सद्दी आणि तत्ववेत्ते, आकाशातल्या बापाचे औरसपुत्र बनतात. ब्लॅकहोल ट्रॅजेडी ऊर्फ कलकत्त्याच्या अंधारकोठडीचा अत्याचार म्हणजे हिन्दी माणसाच्या कमाल राक्षसी मनोवृत्तीचा, जगातील अत्याचारांच्या यादीतील पहिला व शेवटचा, भयंकरतम नमुना म्हणून आजपर्यंत इतिहासात मोठा डंका वाजत आहे. या अत्याचाराची तिखटमीठ चोपडलेली लालभडक वर्णने रेखाटण्यात मेकॉलेसारख्या जाड्या प्रस्थापासून तों थेट एकाद्या टिंपाड गोऱ्या कलमकसायापर्यंत सर्वांनी जिवापाड कलमबहाद्दरी केलेली आहे. ही तिखटमिठाची वर्णने नुसती वाचूनच आंगावर शहारे येतात; मग प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या वर्णनाने रक्ताचा आईस्क्रीम बनला, तर त्यात नवल कसचे? ब्लॅकहोलच्या खऱ्याखोट्या हकीकतीबद्दल इतके अजरामर आकाण्डताण्डव करणाऱ्या आंग्रेज बहाद्दराना, सन १९१७ साली पंजाबातल्या ब्रिटीश नोकरशाहीने जालियांवाला बागेत केलेल्या निःशस्त्र आणि निरुपद्रवी पंजाबी आबालवृद्ध स्त्रीपुरुषांच्या कत्तलीची 'पासिंग शो' (धावत्या काळाचा धावरा देखावा अथवा घटकाभर गंमत) यापेक्षा अधिक महत्व वाटू नये; आणि 'जाऊ द्या हो, होऊ नये ते झाले. प्रामाणिक चूक (ऑनेस्ट मिस्टेक) ती. आता त्यावर पडदा सोडा फरगेट ॲण्ड फरगिव.' अशी हिन्दी जनतेची तोंडपुसणी करण्यासाठी ड्यूक ऑफ कॅनॉट सारख्या

भारदस्त बादशाही प्याद्याची मध्यस्ति त्यानी वापरावी, ही इंग्रेजी राजकारणी मनोवृत्तीची मेख लक्ष्यात ठेवण्यासारखीच आहे. राजकारण म्हटले कीं त्यात ब्लॅकहोल यायचे, जालियनवाला बाग उद्‌भवायचा, आंबोयनाची कत्तल व्हायची आणि गॉय फॉक्स सुद्धा नाचायचे; मग ते राजकारण हिन्दी असो, युरपियन असो, नाहीतर अमेरिकन असो. इतिहासाला असले प्रसंग नेहमीच नमूद करण्याचा सराव पडल्यामुळे, ब्लॅकहोलच्या कहाणीने तो रडत नाही आणि जालियन वाला बागेच्या कत्तलीने हासत नाही. न्यायाधिशाप्रमाणे निर्विकार चित्ताने तो खऱ्या खोट्याचा सडेतोड निर्णय देत असतो. माणसे मात्र 'मी हासे लोकाला आणि शेंबूड माझ्या नाकाला' असला आचरटपणा फार करतात.

इतिहास-संशोधनाने, ब्लॅकहोलचा अत्याचार घडलाच असेल किंवा नाही, याबद्दल जबरदस्त संशय उत्पन्न झाला आहे. यदाकदाचित् तो घडला, असे जरी सिद्ध झाले, तरी त्यातसुद्धा नबाबाकडे दोष येण्याचे मुळीच कारण नाही. राज्यकर्ता नात्याने बण्डखोर लोकांची पाळेमुळे उखडून टाकणे आणि त्याना देहान्त प्रायश्चित देणे, त्याचे कर्तव्यच होते. आजहि 'कायद्याने प्रस्थापित झालेल्या ब्रिटिश राज्यसत्तेविरुद्ध' केवळ एक शब्द-संदिग्ध किंवा असंदिग्ध, प्रत्यक्ष किंवा पर्यायाने, जाणून अगर नेणून कोणी लिहिला अगर बोलला, तर त्यालासुद्धा फाशीची अगर जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा देताना, ब्रिटिश न्यायाला दहा अंक मोजण्याची जरूरी वाटत नाही. मग शुद्ध लढाईच्या धामधुमीत, लष्करी कायद्याने, नबाबाला आपल्या शत्रूंच्या निःपातासाठी ब्लॅकहोलसारखा हुकूम फर्माविणे भाग पडले असले, तर त्यासाठी व्यवहारीक ऐदी विद्वानानी व्यवहारिकांसाठी लिहिलेल्या नीतिनियमांच्या जोरावर नबाबाच्या राज्यपद्धतीला दोष देणे, म्हणजे राजकारणाबद्दल गाढ अज्ञान प्रगट करण्यासारखे आहे. चालू विसाव्या शतकात-सुधारणेच्या सु-वर्ण युगात-सन १९२१ साली, मोपला बण्डाचे मोपला कैदी मालगाडीच्या डब्यात गुराढोराप्रमाणे कोंबून त्यांचा झालेला ब्लॅकहोल जर 'ऑनेस्ट मिस्टेक' (प्रामाणिक चूक) सफेद्याने क्षम्य मानला जातो, जिवंत मानवी साक्षीदारांच्या स्मृतिपटलावर त्याची पुसट रेषासुद्धा शिल्लक उरत नाही, तर आठराव्या शतकाच्या मध्यावर अंधाऱ्यायुगात घडलेल्या अंधारकोठडीच्या खऱ्याखोट्या अत्याचाराबद्दल आदळआपट करण्यात विशेष शहाणपणा तो कोणता? काहीहि असो. इतिहास-शोधन ब्लॅकहोलच्या अत्याचाराला कल्पित किंवा जल्पित कादंबरी ठरवीत आहे. कशी? त्याचा या लेखात आस्तिनास्ति पुराव्यानी विचार करू.

ब्लॅकहोलची बोंब मारणारा हॉलबेल

ब्लॅकहोलचा अत्याचार सिराज-उद-दौल्याने केला, अशी बोंब प्रथमतः मि. जॉन झेफानिया हॉलवेल (Mr. John Zephania Holwell) याने मारली आणि तिच्या प्रतिध्वनीने इतर सर्व इंग्रेज आणि हिन्दी बखरकारानी आपापली वर्णने भडक रंगांत रंगविली. हॉलवेलचा जन्म सन १७११ त आयर्लण्डातील डबलीन शहरी झाला. त्याने वैद्यकीचा अभ्यास केला आणि १७३२ मध्ये तो 'सर्जन्स मेट' (शस्त्रवैद्याचा महतनीस) म्हणून एका इंडियामन बरोबर कलकत्त्याला आला. काही वर्षे येथे वैद्यकीचा धंदा केल्यावर, तो कलकत्त्याचा 'जमीनदार' झाला. जमीनदार म्हणजे कलेक्टर आणि जज्ज. नंतर तो बनिया कंपनीच्या कौन्सिलचा मेंबरहि झाला. जेव्हा सिराजने कलकत्त्यावर हल्ला केला, तेव्हा इतरांबरोबर हॉलवेलला त्याने कैद केले; पण लागलीच त्याला सोडूनहि दिले. कलकत्त्याहून निसटताच, हॉलवेल फुल्टा येथे पळून जाऊन राहिलेल्या आपल्या जातभाईना जाऊन मिळाला. नंतर

तेथून कंपनीच्या कारभाराचे कागदपत्र (डिसपॅचीस) बरोबर घेऊन सिरेन (Syren) नावाच्या एकशिडी गलबतातून विलायतेला रवाना झाला. या जलप्रवासाच्या अवधीत त्याने विल्यम डेव्हीस याला २८ फेब्रुवारी सन १७५७ तारखेचे एक ३२-पानी पत्र खरडले. त्यात त्याने ब्लॅकहोलच्या अत्याचाराची बोंब प्रथम मारली.

इंग्रेज लेखकांची माहिती

हॉलवेलने ब्लॅकहोलच्या अत्याचाराचा पुकारा करताच त्याचा अनुवाद इंग्रेज बखरकारानी केला. कित्येकानी हॉलवेलचीच री ओढली, तर काहीनी स्वतंत्र संशोधनाने त्यात कित्येक शंकाहि काढल्या. परंतु मूळ कथानकात त्यामुळे फारसा फरक कोणीहि केलेला दिसत नाही.

ता. २० जून १७५६ रविवारी रोजी नबाबाचे सैन्य हल्ला चढवून किल्ल्यात घुसले, पण त्यानी वेढ्यात सापडलेल्या परकीयाना मुळीच काही त्रास दिला नाही. गव्हर्नर ड्रेक ता. १९ जुलई १७५६ रोजी आपल्या कहाणीत नोंद करतो की., ''नबाबाने आपल्या सर्व कामगारांचे मुजरे घेण्यासाठी एक छोटासा दरबार भरविला..... त्याच्या समोर कैद्याना आणण्यात आले. त्यानी त्याच्या क्षमेची याचना केली. नंतर नबाब दुसऱ्या एका जागेकडे गेला. तेथे हात बांधलेल्या (हातकाड्या घातलेल्या) हॉलवेलला त्याच्यासमोर आणण्यात आले..... अशा रीतीनें आमच्या वसाहतीचे मूळ उघडले गेले आणि कलकत्त्याचा नाश झाला.'' मि. एस. सी. हिल म्हणतो, ''देशी शिपायानी युरपियनांच्या सर्व मौल्यवान चीजवस्तू लुटून नेल्या, पण त्यांची कोणत्याहि प्रकारे छळणूक केली नाही. मुसलमान मौलवी परमेश्वराची प्रार्थना गाण्यात गर्क होते. काही युरपियन सोजीर दारू ढोसून तर्र आणि बेफाम बनले होते आणि त्यानी देशी लोकांवर हल्ले केले होते. देशी लोकांनी नबाबाकडे तक्रार केली. गैरवर्तणूक करणाऱ्या सोजराना कोठे कोंडून ठेवण्याची वहिवाट आहे, याची त्याने चौकशी केली. तेव्हा 'ब्लॅकहोल नावाच्या अंधारकोठडीत' असे त्याला सांगण्यात आले. इतके बेफान झालेले गोरे सोजीर रात्रभर असेच मोकळे सोडणे फार धोक्याचे आहे, असे नबाबाच्या काही हापसरानी सुचविल्यावरून, 'त्या सर्वांना त्या कोठडीत बंद करून ठेवा' असा नबाबाने हुकूम सोडला. गोऱ्या लोकानी देशी लोकांचे भयंकर नुकसान केलेले होते. वेढा लढविताना नाही नाही तरी ७ हजार लोकांचे बळी त्यानी घेतले होते. यामुळे संतापून गेलेल्या देशी हापसरानी, नबाबाचा हुकूम कसलाहि भेद न मानता, सगळ्या गोऱ्या गुंडांसाठी सारखाच अंमलात आणण्याचे ठरविले आणि ज्या कोठडीत एक किंवा दोन सोजीर राहतील अशा औरस चौरस १८ फुटांच्या जागेत, त्यानी १४६ गोऱ्याना कोंबून बंद केले. वर्षाच्या कडक उन्हाळ्याची ती रात्र. बिचाऱ्या कैद्यांच्या प्राणान्तिक वेदना सुरू झाल्या. एकमेकाना ते तुडवू लागले. सर्वांची मस्तके वेडाने भणाणली. पाणी पाणी असा एकच हलकल्होळ उडाला. या कोठडीला आग लाऊन द्या आणि आमचा एकदाच सोक्षमोक्ष करा, म्हणून पहारेकऱ्यांच्या त्यानी विनवण्या केल्या. अखेर शिव्याहि दिल्या. देशी शिपाई हा सर्व प्रकार तमाशाप्रमाणे पाहण्यात किती राक्षसी आनंद अनुभवित होते, याचे हॉलवेलच्या कहाणीत उत्तम शब्दचित्र पहावयास मिळते. भारतीय ब्रिटिशांच्या इतिहासात इतका मेसूर करुणास्पद प्रसंग यासारखा दुसरा नाही. सायंकाळच्या ७ वाजल्यापासून तों दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजेपर्यंत हा राक्षसी कोंडमारा अखंड चालू होता. कारण, ज्या देशी हापसरांची हृदयेहि दयेने पाझरली, त्यानासुद्धा (या दुर्दैवी कैद्यांच्या सुटकेची रदबदली करण्यासाठी)

नबाबाला अर्ध्या झोपेतून जागे करण्याची हिंमत होई ना. (सकाळी नबाब जेव्हा जागा झाला, तेव्हा सुटकेचा हुकूम मिळाला.) त्या वेळी १४६ पैकी अवघे २३ कैदी जेमतेम जिवंत बाहेर पडले. त्यांची अवस्था अतिशय भयंकर होती.''

इंग्रेज लेखकांची माहिती या प्रकारची आहे. लेखकाच्या कमी जास्त मगदुराप्रमाणे शब्दचित्र रंगविण्यांत कुशलतेची कितीहि चढती उतरती भांजणी असली, तरी मजकुराची ठेवण सर्वांची सारखीच. ब्लॅकहोल म्हणजे साक्षात यमपुरी, यापेक्षा अधिक किंवा कमी वर्णन नाही. आश्चर्याची गोष्ट एवढीच कीं या वर्णनात ठळक शक्यशक्यतेचाहि विचार करण्याची कोणाला शुद्ध राहिलेली दिसत नाही. बंगाली भाषेत 'सिराज-उद-दौला' नावाचा एक जुना ग्रंथ आहे. त्यात ब्लॅकहोलची कहाणी म्हणजे शुद्ध कल्पित कादंबरी ठरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातली विधाने खोडून टाकण्याचे एकाहि इंग्रेज लेखकाने श्रम घेतलेले नाहीत. ट्रॅवल्स ऑफ ए हिन्दु (एका हिन्दूचे प्रवास) नामक उत्कृष्ट ग्रंथाचे विद्वान लेखक डॉ. भोळानाथ चंदर सन १८९५ सालच्या कलकत्ता युनिव्हर्सिटी मॅगॅझिन् मध्ये लिहितातः- ''ब्लॅकहोल कहाणीविषयी मला बराच संशय आहे. त्या कोठडीत सापडलेल्या हॉलवेल नामक माणसाने या कहाणीचा प्रथम जगभर पुकारा केला. परंतु, डाळींबात जसे त्याचे दाणे ठेचून भरतात, किंवा जहाजाच्या ठराविक जागेत जशी धान्याची पोती रेचून ठेचून चिळतात, तशी जरी ठेचाठेच केली असे गृहित धरले, तरी औरस चौरस १८ फूट जागेत १४६ माणसे चिणता येणे शक्यच कसे होईल, हाच माझ्यापुढे मोठा प्रश्न आहे. येथे भूमितिशास्त्र गणिताला खोटे पाडीत असल्यामुळे, ही सगळी कहाणी म्हणजे नुसती गटारगप्प मानण्यापलीकडे गत्यंतरच नाही. या गटारगप्पेसाठी केवढा हळहळाट आणि आरडा ओरडा!''

ब्लॅकहोलच्या लांबीरुंदीविषयी सुद्धा अनिश्चित मतभेद आहेत. कॅप्टन ग्रॅण्ट याने फुल्टा येथे ता. १३ जुलई १७५६ रोजी कलकत्त्याच्या नाशाबद्दल जी हकीकत लिहून ठेवली आहे, तींत तो म्हणतो, ''जितके लोक कैद करण्याच्या लायकीचे नव्हते, तितक्याना ब्लॅकहोल कोठडीत रात्री ठेविले. ही कोठडी औरस चौरस १६ फुटांची होती. त्यात युरपियन पोर्च्युगीज आर्मिनियन वगैरे मिळून २०० लोक होते. त्यापैकी बरेचसे जखमी झालेले होते. या अरुंद कोठडीत एकावर एक याप्रमाणे ते कोंबले गेल्यामुळे, उष्णतेने इतके गुदमरून गेले कीं सकाळपर्यंत त्यातले जेमतेम १० जण जिवंत राहिले.'' (Old Fort William in Bengal, by Dr. C. R. Wilson, Vol. II p. 59) कॅपटन ग्रॅण्टचे वर्णन इतर इंग्रेज लेखकांच्या तपशीलाहून बरेच भिन्न आहे. डॉ. सी. आर. विल्सन आणखी निराळीच माहिती देतोः- ''ब्लॅकहोलची मर्यादा १८ फूट x १४ फूट १० इंच होती. म्हणजे १४६ माणसाना २६७ औरस चौरस फूट, किंवा प्रत्येक माणसाला जेमतेम २ औ. चौ. फूट जागा होती.'' (कित्ता. Vol. II p. 245) एवढ्या जागेत १४६ माणसे मुळी कोंबलीच कशी जातील, याचा डॉ. विल्सनने कधी विचारच केलेला दिसत नाही. बसला काय किंवा उभा राहिला काय, एका माणसाला निदान औरस चौरस ३ फूट जागा पाहिजेच पाहिजे. या हिशोबाने, ब्लॅकहोल अत्याचार खरा मानला तरी, त्या कोठडीत फार झाले तर ८९ कैदी कोंबता आले असते.

ब्लॅकहोलचे सत्यशोधन

परंतु ब्लॅकहोलचा अत्याचार मुळातच कधी झालेला नाही, याविषयी पुराव्यांचा तुटवडा नाही.

सय्यद गुलाम हुसेन कृत 'सीर-उल-मुख्तरीन्' सारख्या तत्कालीन मुसलमानी बखरीत या प्रकरणाचा नामनिर्देश नाही. फुल्टा येथे पळून गेलेल्या इंग्रेजांच्या प्रोसिडिंग बुकात, अगर मद्रास कौन्सिलातील त्यांच्या वादविवादांच्या रिपोर्टात, त्याबद्दल अवाक्षर नाही. कलकत्त्याच्या पाडावानंतर रॉबर्ट क्लाईव्ह आणि वाटसन यानी नबाब सिराजला पाठविलेल्या अनेक पत्रांत अगर अलीनगरच्या तहनाम्यात या गोष्टीचा कोठे कसलाच संदर्भ दर्शविलेला नाही. सिराजला पदच्युत कां केला, याची माहिती डायरेक्टर कोर्टाला कळवितांना, क्लाईव्हने लिहिलेल्या पत्रात ब्लॅकहोलचे नावसुद्धा नाही. सिराजला उखडून, त्याच्या जागी थापलेल्या मिर जाफराकडून इंग्रेज बनियानी जो तहनामा ऊर्फ कारस्थानी जंतरमंतराचा खर्डा खरडून घेतला, त्यात नुकसान-भरपाईची अनेक कलमे घुसडली होती. पण तेथे सुद्धा, ब्लॅकहोलमध्ये मेलेल्या मुर्द्यांच्या वारसांसाठी नुकसान-भरपाईचा एक शब्दहि नमूद करण्यात आला नाही. बरे, ब्लॅकहोलची बोंब प्रथम मारणाऱ्या हॉलवेल ने ४ ऑगस्ट १७६० रोजी सिलेक्ट कमिटीपुढे आपली साक्षीची माहिती (नोट) वाचून दाखविली, त्यातसुद्धा या ब्लॅकहोल अत्याचाराचा नुसता उडता किंवा धावता संदर्भ कोठेच नसावा, हे किती आश्चर्य? ब्लॅकहोलची बाजारगप्प पिकविणारा हॉलवेलच आपल्या साक्षीत त्या गप्पेबद्दल गप्प बसतो, याचा अर्थ काय? गप्प पसरल्यानंतर, अत्याचारात सामील असणाऱ्यांना शिक्षा ठोठावण्यासाठी, सुप्रसिद्ध इंग्रेज इतिहासकार रॉबर्ट ऑर्मे (Robert Orme) याच्या शिफारशीवरून मद्रासहून बंगालकडे क्लैवची रवानगी करण्यात आली. पण तेथे गेल्यावर क्लैवने धरपकडीचा किंवा शिक्षा ठोठावण्याचा काहीच प्रकार केला नाही. यावरून ब्लॅकहोलच्या अत्याचाराची बोंबाबोंब म्हणजे कल्पित कादंबरी उर्फ गटारगप्प, हेच सिद्ध होते.

गटारगप्पीदास हॉलवेल

विशेष लक्ष्यात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे, ब्लॅकहोलच्या अत्याचाराची कल्पित कहाणी प्रसवणाऱ्या हॉलवेलच्या सत्यप्रीतीबद्दल त्यावेळी बरीच शंका सर्वत्र होती. खुद्द त्याचे देशभाई आणि धर्मभाई गोरे लोक सुद्धा त्याला 'गटारगप्पीदास' (a teller of specious fibs) असे समजत असत. अशा माणसाच्या गप्पेवर अवलंबून, ब्लॅकहोलच्या अत्याचारावर इंग्रेजी बखरकारानी टीकास्त्राचे आकाण्डताण्डव करावे, ही मोठी आश्चर्याची गोष्ट होय. परंतु, इंग्रेज हाच जेथे मुळी आश्चर्याचा महासागर, तेथे त्याच्या भारतीय वर्चस्वबाजीच्या आद्य खटपटीत आचंब्यांची आणि आश्चर्यांची रत्ने मुबलक कां आढळू नयेत? हॉलवेल हा नुसता गटारगप्पीदास असता, तरीहि त्याच्याविषयी विशेष तिटकारा बाळगण्याचे कोणालाच काही कारण पडले नसते. पण या गोऱ्या बाळाचे गुण त्याच्याहि पलीकडचे होते. वर निर्देश केलेल्या आपल्या ३२ पानी हालवेलस्मृतीने ब्लॅकहोलची गटारगप्प विलायतेत पसरवून, हा हिंदुस्थानात आला, त्यावेळी आंग्रेज बनियांच्या विश्वासघाताच्या आणि कारस्थानाच्या महाकृपेने सिराजचा खून होऊन मीर जाफराची मूर्ती बंगालच्या मसनदीवर थापली गेली होती. सिराजच्या उच्चाटनाच्या पुण्य कर्मात हॉलवेलचीहि हातलावणी बरीच असल्यामुळे, मीर जाफर त्याला विसरला नाही. त्याने हॉलवेलला एक लाख रुपये बक्षीस दिले. पण हॉलवेलला त्याचे काय! त्याने मीर जाफरचाहि गळा कापायला कमी केले नाही. कृतघ्नता म्हणजे हॉलवेलची सहजलीला! आणि त्या काळी कृतज्ञ क्रिस्ती म्हणजे सशाच्या शिंगा इतकाच दुर्मिळ असे, असे विधान करण्याइतका पुरावा इतिहासात पुष्कळ मिळतो. प्रतिष्ठा, प्रामाणिकपणा आणि सत्यप्रियता हे शब्द आंग्रेज क्रिस्त्यांच्या शब्दकोशात हा वेळ पावेतो

बिऱ्हाडाला आलेच नव्हते म्हटले तरी चालेल. सिराजला उखडून मीर जाफरला गादीवर बसविला. आता त्यालाहि उलथून मीर कासिमला बंगालचा सुभेदार बनविण्यासाठी हॉलवेलने मीर कासिमपासून दोन लाख रुपयांची लाच खावून, आपला पुरस्कर्ता मीर जाफर याच्याविरुद्ध नाही नाही त्या खोट्या कंड्या पिकवण्यास आणि त्याला सगळीकडे बदनाम करण्यास कमी केले नाही, असा हौस ऑफ कॉमन्स कमिटीच्या सन १७७२ च्या रिपोर्टात स्पष्ट उल्लेख आहे. याच साली, ''ईस्ट इंडिया कंपनीचा हेतू, अवस्था आणि व्यवस्था'' मथळ्याच्या रिपोर्टाच्या ९ व्या पुरवणीत हॉलवेलने पुरविलेली माहिती पाहिली कीं हा नीच माणूस कोणत्या राक्षसी मनोवृत्तीचा होता, याची अटकळ तेव्हाच होते. मीर जाफरला बगालच्या सुभेदारीवरून कां उखडावे, (कारण सिराज-उद-दौल्लाचा खून केल्यापासून बंगालची सुभादारी म्हणजे या आंग्रेजी बनियांचा पोरखेळच बनली होती.) याची कारणे देणारा जो लांबलचक लेख या गोऱ्या गटारगप्पीदासानें खरडला होता, त्यात खालील मजकूर होता :-

''नबाब जाफर अल्लीखान हा कमालीचा जुलमी, लोभी आणि ऐदी स्वभावाचा होता. काहीहि कारण नसताना त्याने सर्व दर्जाच्या अगणित लोकाना ठार मारले. त्या सगळ्यांची नावे आणि हकिकती नमूद करायला बरीच फुरसद पाहिजे. तथापि काही महत्वाची नावे येथे देतो. (१) गसेटा बेगम, नबाब शहामतजंगाची विधवा. (२) ओमना बेगम, नबाब सिराज-उद-दौल्यांची आई. (३) मुझद्दौला, पादशाहा कूलीखानाचा मुलगा, शहामतजंगाचा दत्तक. (४) लतफें निसा बेगम, नबाब सिराजची विधवा. (५) तिची लहान मुलगी. हे सर्व पाच हतभागी जीव १७६० च्या जूनच्या सुमारास एका रात्री डाका येथे ठार मारले गेले. जाफर अल्ली सुभेदारीवर आल्या दिवसापासून ते येथे तुरुंगात डांबून टाकलेले होते. अलीवर्दीखान, शहामतजंग आणि सिराज-उद-दौला या नबाबांच्या कुटुंबांतील या शिलकी वारसांची कत्तल करून टाकण्याचा परवाना डाक्याचा नाईब जसरतखान याला पाठविण्यात आला. त्याने हे अघोर कृत्य करण्याचे साफ नाकारले. असा नकार आल्यास, स्वतःच ही कत्तल उरकण्याचा हुकूम परवाना घेऊन जाणाऱ्या इसमास आधीच देऊन ठेवलेला होता. त्या निरोप्याने या सर्व मंडळीना कैदेतून मध्यरात्री बाहेर काढले, नदीच्या काठावर नेले आणि तेथे सगळ्यांची कत्तल करून, त्यांची प्रेते नदीत फेकून दिली. या ५ मंडळीबरोबर दासी म्हणून २० दुसऱ्या बाया होत्या, त्यांचीहि सर्रास कत्तल करण्यात आली.''

हॉलवेलची कल्पकता भयंकर अत्याचारांची नाटके रंगविण्यात बरीच सुपीक कुसव्याची होती, असे म्हणायला काही हरकत नाही. वरील कहाणी म्हणजे गटारगप्पेचा एक घाणेरडा नमुना होय. १ ऑक्टोबर १७६५ रोजी क्लाईव्हने विलायतेच्या डायरेक्टर कोर्टाला जो एक महत्वाचा खलिता पाठविला, त्याच्या ताज्या कलमात क्लाईव्ह म्हणतो :-

''२६. मयत नबाब मीर जाफर याच्याविषयी सत्याला आणि न्यायाला स्मरून आपणास माहिती द्यायची, तर आम्हाला असे स्पष्ट कळविणे भाग आहे कीं हॉलवेलने आपल्या पत्रात (Address to the Proprietors of East India Stock.) पान ४० वर नबाबावर केलेला आसुरी कत्तलीचा आरोप सपशेल खोटा आणि खोडसाळपणाचा आहे. ही त्या भल्या नबाबाची केवळ बदनामी आहे. त्या कत्तलीत मारली गेली म्हणून बोभाटा झालेल्या मंडळीपैकी दोन अपवादाशिवाय बाकी सर्व मंडळी आज हयात आहेत.''

लाखलाख रुपयांचे मलिदे चारणाऱ्या जाफर अल्ली सारख्या आपल्या पुरस्कर्त्याची इतकी बदनामी करायला ज्या हॉलवेलला शरम वाटली नाही, त्याने ब्लॅकहोलची कादंबरी रचून सिराज-उद-दौल्याच्या कीर्तीला डांबर फासण्याचा यत्न केला, तर त्यात नवल नाही. सिराजच्या कलकत्त्याच्या वेढ्यात हॉलवेलची हड्डी थोडी तरी नरम झालेलीच होती. मग त्याचा सूड हा कृतघ्न गोरा गप्पीदास कां उगवून घेणार नाहीं?

विधानासाठी आपण असेहि गृहीत धरले कीं ब्लॅकहोलचा अत्याचार खरोखरच घडला. तरी सुद्धां त्याची जबाबदारी सिराजवर येऊन पडतेच कशी? ही अंधार कोठडी सिराजने काही बांधलेली नव्हती. ती आंग्रेज बनिया बहाद्दरानीच बांधून ठेवलेली होती आणि तीहि कैद्यांसाठीच. जेम्स मील इतिहासकार (Vol. III, 5th Ed. p. 117) कलकत्त्याच्या वेढ्याची माहिती देताना म्हणतोः-

''सुभेदार सिराज-उद-दौल्ला स्वभावाने जरी दयाळु नव्हता, तरी या प्रसंगी त्याची प्रवृत्ति क्रूर असल्याचे मुळीच दिसून येत नाही. हॉलवेलला हातात बेड्या ठोकून जेव्हा त्याच्यापुढे आणला, तेव्हा त्याने सर्वांच्या बेड्या काढण्याचा ताबडतोब हुकूम केला. शूर शिपायाला उचित अशा सरदारी बाण्याने सिराजने सर्व कैद्याना ''तुमच्या केसाला सुद्धा धक्का लावण्याची माझी इच्छा नाही व कोणी तसे करणार नाही'' असे स्पष्ट आश्वासन दिले. संध्याकाळ झाल्यावर, या मोकळ्या कैद्यांचा बंदोबस्त रात्री ठेवावा कसा हा पहारेकऱ्यांपुढें मोठा प्रश्न पडला. पुष्कळ तपास केला, पण सोयीस्कर जागाच सापडे ना. अखेर जी अंधार कोठडी इंग्रेज बनियेच कैदी ठेवण्यासाठी वापरीत असत, तिचा त्याना सुगावा लागला. विशेष चौकशीच्या भानगडीत न पडता, पहारेकऱ्यानी सगळे गोरे कैदी या कोठडीत कोंबले. ही कोठडी लहान, कोंदट आणि घाणेरडी होती. हिलाच ब्लॅकहोल हे नाव असे. (विशेष लक्ष्यात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे) कैदी ठेवण्यासाठी नेहमीची हीच जागा म्हणून इंग्रेजानीच या ब्लॅकहोलची सुभेदाराच्या हाफसराना शिफारस केली होती.''

''कलकत्ता रिव्यू'' मासिकाच्या एप्रिल १८९२ च्या अंकात मि. एच. बीव्हरीज यानी ''मुर्शिदाबाद येथील जुनी स्थळे'' म्हणून एक निबंध प्रसिद्ध केलेला आहे. त्यात ते म्हणतात :- ''ब्लॅकहोलबद्दल विशेष चर्चा करण्यात, किंवा त्याच्या (खऱ्या खोट्या) अत्याचाराबद्दल सिराज-उद-दौल्याला दोष देण्यात फारसा अर्थ नाही. १ ऑगस्ट १८५७ रोजी अमृतसर जिल्ह्यात असाच एक प्रकार घडलेला आहे. त्याविषयी ''दि क्रिसिस इन दि पंजाब'' ग्रंथात (पृ. १६२) ग्रंथकार मि. कूपर अशी माहिती देतो. किल्ल्यावरच्या एका वाटोळ्या मनोऱ्यात शेकडो देशी (बण्डखोर) शिपायी कोण्डून ठेवण्यात आले होते. (दुसरे दिवशी थोडथोडे शिपायी बाहेर काढून गोळ्या घालून ठार मारण्याचा धडाका सुरू झाला.) अशा रीतीने २३७ शिपायी ठार मारल्यावर, बाकीचे शिपायी बाहेर येत नाहींत, अशी बातमी आली. म्हणून दरवाजे उघडून पाहतात तों काय! सगळा मुर्द्यांचा खच! हॉलवेलच्या ब्लॅकहोलची पुनरावृत्ति झाली..... धडकी, थकवा, उष्णता आणि गुदमरणी यानी जीव गेलेली ४५ प्रेते ओढून बाहेर काढली.''

ब्लॅकहोलच्या खऱ्याखोट्या अंधारकोठडीचा गोऱ्या लोकानी ५७ च्या बण्डात अमृतसरच्या गोल मनोऱ्याने देशी शिपायांचा चक्रवाढी सूड उगवला म्हणायचा!

मि. एस. सी. हिल (Bengal in 1756-57) म्हणतात कीं, ''ब्लॅकहोलचे नाव लोकांच्या तोंडी

विनाकारण झाले असावे. कारण कलकत्त्याच्या लोकांच्या गप्पा विचारात घेतल्या तर ब्लॅकहोल आणि फोर्ट विल्यम या दोन नावांचा ते नेहमीच गोंधळ करीत असत.''

हा गोंधळच ब्लॅकहोलच्या कादंबरीच्या मुळाशी असला पाहिजे. सिराजने कलकत्त्याला वेढा देताच, पुष्कळ गोरे लोक जहाजात बसून फुल्टा येथे पळाले. जखमी झालेले किंवा इतर काही कारणाने पळून न जाऊ शकलेले, कैदी झाले. त्याना फोर्ट विल्यम किल्यात कोण्डून ठेवण्यात आले. मेलेल्या १२३ लोकांच्या नावनिशीचा पत्ताच लागत नाही. एस. सी. हिल म्हणतात कीं, ''ब्लॅकहोलमध्यें मेलेल्या १२३ पैकी ५६ लोकांच्या नावांचा फक्त पत्ता लागतो.'' बाकीच्या ६७ लोकांचा कां लागू नये? अर्थात् याचे एकच अनुमान निघते ते हेच की सिराजने वेढा दिला त्यावेळी किल्ल्यावर १२३ क्रिस्ती गोराच मुळी शिल्लक नसला पाहिजे.

या सर्व विवेचनावरून एवढाच निष्कर्ष निघतो कीं ब्लॅकहोलचा अत्याचार म्हणजे लुच्च्या युरपिअन लोकानी आपले दुष्ट हेतू साधण्यासाठी ठोकलेली गटारगप्प अथवा कल्पित कादंबरीच होय. ५६ लोक मेलेच असतील तर ते अंधार कोठडीच्या गुदमरणीने नसून, इतर काही आजारानी आणि जखमानीच मेले असले पाहिजेत. कारण वेढा पडण्यापूर्वीच सर्व धट्टेकट्टे गोरे लोक लुळ्या पांगळ्या थोट्या अशा दुर्बळाना पाठीमागे ठेवूनच पळाले होते.

कादंबरी म्हणून ब्लॅकहोलची कहाणी गटारगप्पेत जमा होऊन आज एक तपावर वर्षे लोटली. हा इतिहास सपशेल खोटा असा सर्व काळ्या गोऱ्या इतिहासकारानी एकमताचा निर्णयहि दिला. तरीसुद्धा हिन्दी लोकांच्या क्रौर्याची निष्कारण आठवण करून देणारे ब्लॅकहोल मेमोरियल कलकत्त्यास अझून उभेच राहिलेले आहे! याचा कोणी एकादा बंगाली एमेल्सी किंवा हिन्दी एमेले विचार करील काय?

□□□

टिपण

लहान मुलामुलींच्या विवाहास प्रतिबंध करणारा कायदा ऊर्फ 'शारदा कायदा' कायद्याच्या ठरावाचा खुलासा!

शारदाबिल या नांवानें सामान्यतः माहीत असलेलें बिल कायद्याच्या रूपांत पास झालें आहे व त्या कायद्यास गव्हर्नर-जनरल यांची मंजुरी आक्टोबरच्या १ ल्या तारखेस मिळाली आहे. हा कायदा, सन १९३० च्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेस ब्रिटिश हिंदुस्थानांत, बालविवाह प्रतिबंधक आक्ट (सन १९२९) या त्याच्या योग्य सरनाम्यानें कायद्याच्या रूपानें अंमलांत येईल.

प्रथमतः सदरहू कायद्याचा मसुदा हिंदु व त्यासारख्या जाती यांसच फक्त लागू असावा असा इरादा होता; परंतु सिलेक्ट कमिटीच्या शिफारशी व लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमधील या मसुद्यावरील चर्चा यांचा परिणाम म्हणून ह्या मसुद्याची व्याप्ति वाढवून तो सर्व वर्गांच्या लोकांस लागू करण्याचें ठरलें. सबब आतां पास करण्यांत आल्याप्रमाणेंच हा आक्ट ब्रिटिश हिंदुस्थानांतील सर्व वर्गांच्या व जातींच्या लोकांस लागू आहे व बालविवाहांत जे भाग घेतील त्या इसमांस शिक्षा करण्याबाबत या आक्टांत ठराव करण्यांत आला आहे. नेहमीच्या कायद्याप्रमाणे, एखाद्या नवऱ्यानें आपली बायको १३ वर्षे वयाहून कमी वयाची असतांना तिच्याशीं संभोग करणें हा गुन्हा आहे. नवीन कायद्याप्रमाणें, बालविवाह करणें हाच गुन्हा ठरतो मग अल्पवयी बायकोशी संभोग करण्यांत येवो किंवा न येवो. बालविवाहाच्या बाबतींत (केवळ नवराच नव्हे तर) सदरहू विवाहाच्या समारंभात भाग घेणारे कित्येक इसमहि गुन्हेगार ठरतात. तथापि या कायद्याअन्वयें योग्यरीतीनें विधिपूर्वक केलेला बालविवाह कोणत्याहि प्रकारें बेकायेदशीर ठरविण्यांत येत नाहीं. सबब बालविवाह म्हणजे काय, बालविवाह घडवून आणणाऱ्या किंवा त्यांत भाग घेणाऱ्या कोणकोणत्या इसमांस शिक्षा होते व शिक्षेचें स्वरूप काय असतें - ह्या गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे.

'बाल' म्हणजे काय?

या कायद्यांत ''बाल'' या शब्दाचा अर्थ, जर पुरुष असेल तर अठरा वर्षे वयाखालील पुरुष व जर स्त्री असेल तर चौदा वर्षे वयाखालील स्त्री असा आहे. सबब 'बालविवाह' म्हणजे (अ) ज्या विवाहांत नवरा व बायको दोघेहि अनुक्रमें १८ व १४ वर्षे वयाखालील असतील तो विवाह किंवा (ब) ज्या विवाहांत बायको १४ वर्षे वयाखालील असून नवरा १८ वर्षे वयाच्या वर असेल तो विवाह किंवा

(क) ज्या विवाहांत बायको १४ वर्षे वयाच्यावर असून नवरा १८ वयाखालील तो विवाह, असा आहे.

बालविवाहांत भाग घेणाऱ्या इसमांस काय शिक्षा ठरविली आहे?

ज्या इसमांस बालविवाहाच्या बाबतीत शिक्षा ठरविली आहे त्यांचे पुढीलप्रमाणे तीन वर्ग होतात, ते असेः-

(१) बालमुलींशीं जे विवाह करतील ते प्रौढ पुरुष.

(२) बालविवाहांतील विधि जे प्रत्यक्ष करतील, चालवितील किंवा तो विवाह ज्यांच्या देखरेखीखाली होईल ते इसम.

(३) बालविवाह जे घडवून आणतील किंवा तो होण्यास परवानगी देतील किंवा तो विधिपूर्वक केला जाण्यास प्रतिबंध करण्याच्या कामीं जे हयगयीनें कसून करतील असे आईबाप व पालक.

(१) पहिल्या सदराखाली, बालमुलींशीं विवाह करणाऱ्या प्रौढ पुरुषांस ठरविलेल्या शिक्षेचे पुढीलप्रमाणे दोन भाग पडतात, ते असेः-

(अ) जर १८ व २१ वर्षे वयाच्या दरम्यानच्या वयाचा कोणताहि प्रौढ पुरुष बालविवाह करील म्हणजे १४ वर्षे वयाखालील मुलींशीं विवाह करील, तर त्यास पराकाष्ठा १००० रुपयेपर्यंत दंडाचीच फक्त शिक्षा होईल. कोणत्याहि परिस्थितींत त्यास तुरुंगात पाठविण्यांत येणार नाही. म्हणजे असे की बालविवाह केल्याबद्दल शिक्षा म्हणून त्यास करण्यांत आलेल्या दंडाची रक्कम देण्याचे जर तो नाकारील, तर त्यास तुरुंगांत पाठविण्यांत येणार नसून फक्त दंडाची रक्कमच त्याजकडून वसूल करून घेण्यांत येईल.

(ब) जर २१ वर्षे वयावरील प्रौढ इसम बालमुलींशी विवाह करील, तर तो पराकाष्ठा एक महिनापर्यंत साध्या कैदेची शिक्षा दिली जाण्यास किंवा पराकाष्ठा १००० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा दिली जाण्यास किंवा ह्या दोन्ही शिक्षा दिल्या जाण्यास पात्र होईल.

प्रौढ वयाची कोणतीहि स्त्री बालमुलाशी विवाह करील तर तिला कोणतीहि शिक्षा ठरविण्यांत आलेली नाही. म्हणजे असें कीं, जर १८ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाची एखादी स्त्री १८ वर्षे वयाहून कमी वयाच्या मुलाशीं विवाह करील तर तिला शिक्षा होणार नाहीं.

(३) दुसऱ्या सदराखाली, बालविवाहाचा विधि जे प्रत्यक्ष करतील असे उपाध्याय किंवा इतर एक किंवा अनेक इसम यांजकरितां ठरविलेली शिक्षा म्हणजे पराकाष्ठा एक महिनापर्यंत साध्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा २००० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा किंवा ह्या दोन्ही शिक्षा अशी आहे.

(३) तिसऱ्या सदराखालीं, बालविवाह घडवून आणणाऱ्या किंवा तो विधिपूर्वक होऊं देण्यास परवानगी देणाऱ्या किंवा तो होण्यास प्रतिबंध न करणाऱ्या आईबापांस व पालकांस शिक्षा ठरविण्यांत आली आहे. ही शिक्षा म्हणजे पराकाष्ठा एक महिनापर्यंत साध्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा १००० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा किंवा ह्या दोन्ही शिक्षा, अशी आहे. तथापि या कायद्यांत, आया व स्त्री-पालक ह्यांस कैदेची शिक्षा देण्यांत येणार नसून फक्त दंडाचीच शिक्षा देण्यांत येईल असें ठरविण्यांत आले आहे.

वरील सर्व हकीकत वांचून शिक्षेसंबंधी पुढील मुद्दे लक्ष्यांत ठेवावे, ते असेः-

(१) १८ व २१ वर्षे या दरम्यानच्या वयाच्या प्रौढ पुरुषांनीं बालमुलींशीं विवाह केला असतां,

म्हणजे १४ वर्षे वयाखालील मुलींशी विवाह केला असतां, त्यांस कोणतीहि कैदेची शिक्षा देण्यांत येणार नसून पराकाष्ठा १००० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा करण्यांत येईल.

(२) पुढील बाबतीत म्हणजे (अ) २१ वर्षे वयावरील प्रौढपुरुषांनीं बालमुलींशीं विवाह केल्यास त्यांच्या बाबतीत (ब) बालविवाहास विधि प्रत्यक्ष करणारे उपाध्याय किंवा इतर इसम यांचे बाबतींत व (क) बालविवाहास परवानगी देणारे किंवा तो घडवून आणणारे बाप किंवा पुरुषपालक यांचे बाबतींत, जी शिक्षा ठरविण्यांत आली आहे ती म्हणजे पराकाष्ठा १००० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा किंवा ह्या दोन्ही शिक्षा, अशी आहे.

(३) बालविवाहांस परवानगी दिल्याबद्दल किंवा तो घडवून आणिल्याबद्दल आयांस किंवा स्त्रीपालकांस कोणतीहि कैदेची शिक्षा देण्यांत येणार नाहीं तर केवळ पराकाष्ठा १००० रुपयांपर्यंत दंडाचीच शिक्षा देण्यांत येईल.

(४) प्रौढ स्त्रियांनीं बालमुलांशीं विवाह केल्यास म्हणजे १८ वर्षे वयाखालील मुलांशीं विवाह केल्यास त्या प्रौढ स्त्रियांस कोणतीहि शिक्षा नाही.

या कायद्याअन्वयें गुन्हे झाल्यास त्यांचा इन्साफ करण्याबाबत काम कशा रीतीनें चालवावें यासंबंधीहि याच कायद्यांत विषेश तरतूद करण्यांत आली आहे, ती अशीः-

(१) बालविवाहाबाबतच्या गुन्ह्यांचा इन्साफ, प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट किंवा जिल्हा माजिस्ट्रेट यांच्या कोर्टांनींच फक्त हातीं घेतला पाहिजे.

(२) बालविवाह विधिपूर्वक घडल्यापासून एक वर्षाचे आंत जर फिर्याद दाखल करण्यांत येईल तरच फक्त अशा गुन्ह्यांचा इन्साफ करण्याचें काम हाती घेण्यांत येईल. जर बालविवाह विधिपूर्वक झाल्यापासून एक वर्षानंतर त्याबद्दल फिर्याद दाखल करण्यांत येईल, तर कोर्टानें ती काढून टाकिली पाहिजे.

(३) ज्या कोर्टापुढें बालविवाहाविरुद्ध फिर्याद दाखल करण्यांत आली असेल त्या कोर्टानें, ती फिर्याद तें कोर्ट काढून टाकील तो प्रसंग खेरीज करून एऱ्हवीं, दरेक बाबतींत प्राथमिक चौकशी आपण स्वतः केली पाहिजे किंवा आपल्या ताब्यांतील पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटास अशा प्रकारची चौकशी करण्याबद्दल फर्माविले पाहिजे. जर अशा प्राथमिक चौकशीनंतर फिर्याद खरी असल्याचें आढळून येईल तरच फक्त त्या कोर्टानें ती फिर्याद काढून टाकिली पाहिजे.

(४) प्रेसिडेन्सी किंवा डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटास, जेव्हां जेव्हां त्यांजकडे अशाप्रकारची फिर्याद करण्यांत येईल तेव्हां तेव्हां, १०० रुपयांहून ज्यास्त नाहीं इतक्या रकमेचे तारण फिर्यादीकडून मागण्याचा अधिकार आहे. या तारण मागण्याचा हेतु पोकळ फिर्यादी केल्याजाण्यास प्रतिबंध व्हावा हा आहे.

प्रबोधनाच्या वाचकानी या महत्वाच्या कायद्याची निरक्षर, अडाणी व हेकट अशा ब्राह्मणेतर बांधवाना नीट माहिती करून द्यावी. कोणी बालविवाह लावीत असेल तर त्याची चौकशी करून, त्याला समज द्यावी ऐकलेच नाही, तर पोलीस पाटलास वर्दी देऊन तालुक्याच्या मामलतदाराकडे अर्ज पाठवावा.

- सं. प्रबोधन. (३०-३-३०)

□□□

लेख

फर्ग्युसन कॉलेजातील खेळखण्डोबा

(लेखांक २ रा)

डेक्कन एज्युकेशन सोसायटीवर गव्हर्निंग बॉडीचे शिराळशेटी बाण्डगूळ कसे चढले, याचा इतिहास जितका महत्त्वाचा आहे, तितकाच तो चालू घडीला मनोरंजक आणि प्रबोधक आहे. सोसायटीची स्थापना झाली, त्या वेळी (१) लाईफ मेंबरांचे बोर्ड आणि (२) पेट्रन व फेलोज यांचे प्रतिनिधी आणि लाईफ मेंबर मिळून बनलेले कौन्सिल, या दोन संघांच्या देखरेखीखाली सर्व कारभार उत्तम व्यवस्थेने व शिस्तीने चालत होता. लाईफ मेंबरांच्या बोर्डात ला. में. शिवाय इतर कोणाचाहि समावेश होत नसे आणि त्यांच्या कारभारावर इतर कोणाचा कसलाहि अधिकार चालत नसे. या बोर्डाला योग्य ती सल्ला मसलत व मदत देण्यासाठीच निर्माण झालेल्या कौन्सिलात (१) सगळे लाईफ मेंबर्स आणि त्यांच्या संख्ये इतकेच (२) पेट्रन्स व फेलोज (सांपत्तिक मदत करणारे) यांच्या प्रतिनिधींचा समावेश होत असे. अशा या संयुक्त संघटनेच्या कौन्सिलाच्या कारभारातील एक दोन गोष्टी विशेष लक्ष्यात ठेवण्यासारख्या आहेत. कौन्सिलच्या सभेच्या वेळीं हजर न राहू शकणाऱ्या मेंबरालाहि अजेण्डा (कार्यक्रमा) वरील प्रत्येक मुद्यावर आपले मत लेखी कळविण्याचा अधिकार असे व आजहि तो आहेच. त्याचप्रमाणे कौन्सिलचे सभासद या नात्याने प्रत्येक लाईफ मेंबराला समक्ष अगर लेखी मतदानाचा जरी पूर्ण अधिकार असे व आहे, तरी पेट्रन्स व फेलोज यांच्या मतांचा मान राखण्यासाठी, आणि प्रासंगिक संख्याधिकत्वाच्या किंवा कसल्याहि मुद्यावर त्यांच्या मतस्वातंत्र्याची गळेदाब होऊ नये म्हणून, लाईफ मेंबरानी आपल्या मतदानाचा हक्क आजपर्यंत एकदाहि बजावलेला नाही. अशा या दोन परस्पर ऋणानुबंधी व सहकारी व्यवस्थापक मण्डळांच्या देखरेखीखाली सोसायटीचा अंतर्बाह्य कारभार उत्तम प्रकारे चाललेला होता.

सोसायटीची स्थापना होईपर्यंत, सरकारी हातलावणीशिवाय सार्वजनिक शिक्षणाचे कार्य होणेच शक्य नाहीं; या कामी आमच्या लोकाना स्वतंत्रपणे काही कार्य कारण्याची अक्कलच नाही; अशा प्रकारचे पुष्कळ गैरसमज जनतेत पसरलेले असत. परंतु सरकारी मदतीची यत्किंचितहि पर्वा न करिता, डे. ए. सोसायटीच्या स्वालंबनी उत्पादकानी व चालकानी जेव्हा स्वतंत्र लोकशाही शिक्षण संस्थेची ध्वजा उभारली आणि सार्वजनिक मध्यम व उच्च शिक्षणाचा कार्यक्रम हाताळण्यास सुरुवात

केली, तेव्हा सारे हिन्दुस्थान तर आश्चर्यचकित झालेच झाले, पण रयतेच्या जननापासून सरणापर्यंत प्रत्येक हालचालीवर सत्तेची कुरघोडी करण्यातच राज्यकर्तृत्वाचा टेंभा मिरवण्यास सोकावलेल्या माबाप सरकारलासुद्धा या स्वतंत्र बाण्याच्या लोकशाही सवतीबद्दल

मनात मत्सर न् जनात कौतुक

व्यक्त करण्यापलीकडे गत्यंतरच उरले नाही. त्यागवृत्ति स्वयंसेवकांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या डे. ए. सोसायटीच्या शिक्षणकार्याने, सरकारी शाळा कॉलेजांचा महागडा दिखाऊ डोलारा तेव्हाच उघडा पडला. या डोलाऱ्यावर लाखो रुपयांचा शेणसडा पाडून विनाकारण आपले हासे करून घेण्यापेक्षा, डेक्कन कॉलेजसारख्या सरकारी शिक्षणसंस्थासुद्धा सोसायटीच्या ताब्यात देऊन, आपण हॅट झाडून बाजूला पडावे, अशाहि खटपटी करण्याचा प्रसंग डे. ए. सोसायटीच्या सर्वांगीण प्रगतीने सरकारावर आणल्याशिवाय सोडला नाही, ही गोष्ट विशेष लक्ष्यात ठेवण्यासारखी आहे. कोणत्याहि बाबतीत नामानिराळे राहाण्याचा सरकारने कितीहि रंगीबेरंगी बहाणा केला, तरी लोकानी स्वतंत्रपणे चालविलेल्या संस्थांच्या कारभारात प्रत्यक्षाप्रत्यक्ष चंचुप्रवेश केल्याशिवाय सरकारला चैन पडत नाही, ही गोष्ट आता सर्वांच्या चिरपरिचयाचीच होऊन बसली आहे. असली

चंचुप्रवेशाची संधी प्लेगाने दिली

पुण्यातल्या प्लेगाच्या धामधुमी म्हणजे महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासाचा एक भाग होऊन बसल्या आहेत. प्लेगप्रतिबंधक सोजरांचा धुमाकूळ आणि रॅण्डचा खून इत्यादि भानगडींचा इतिहास लक्ष्यात आणला म्हणजे त्यावेळी पुण्यातल्या रहिवाश्यांची माथी कसकसल्या संतापानी भडकून गेली होती, याची कथा सांगण्याची जरूर नाही. मोठमोठ्या विचारी, सुविद्य आणि हाडाने मवाळ अशा मंडळींचीहि डोकी ताळ्यावर राहिली नव्हती, मग लवंग्या जहाल मंडळींची आणि अप्रबुद्ध जनतेची गोष्ट किती सांगावी! विलायतेच्या थंड हवेत असतानाहि, नामदार गोखल्यासारख्या समतोल प्रवृत्तीच्या थण्ड्या माणसाचे डोकेसुद्धा सवाईटिळक बिथरल्याशिवाय राहिले नाही. प्लेगप्रतिबंधाच्या पांघरुणाखाली पुण्यात भडकलेला

सोजरांचा सैतानी धुमाकूळ

विलायती वृत्तपत्रांत सात्विक त्वेषाने प्रगट करताना, पुढेमागे आपले म्हणणे आपल्याला ताळेबंद सिद्ध करता येईल कीं नाही, याचाहि पाचपेच पाहण्याइतका व्यावहारीक विवेक नाम. गोखल्याना आयत्यावेळी राहिला नाही. हाती पडेल त्या भल्याबुऱ्या माहितीच्या जोरावर त्यानी विलायती वृत्तपत्रांचे रकाने हादरून सोडले. गोखल्यांच्या कलमबहाद्दरीमुळे पुण्यातल्या सोजरी अत्याचारांचे भीषण वृत्त वाचून विलायती लोकमत सरकारविरुद्ध अतिशय क्षुब्ध झाले. विलायत सरकारने मुंबई सरकारकडे चौकशी करता, आल्बेलीचा जबाब ठासून गेला. गोखल्यांच्या आरोपात फाजील तिखट मीठ असल्याचा गवगवा झाला. मुंबई सरकार त्यांच्यावर क्रुद्ध झाले आणि विलायतेहून

मुंबईला परत ये म्हणजे दाखवतो इंगा

अशा तयारीत बसले. गोखल्यानी ज्या तिरमिरीने पुण्याच्या सोजरी अत्याचाराबद्दल ही भरंसाट कलमबहाद्दरी केली, तिच्या शुद्धतेबद्दल आजहि जरी कोणी संशय घेऊ शकणार नाही, तरी त्या भरंसाटपणाबद्दलची सर्व जबाबदारी पुण्याचे त्यांचे स्नेही आणि त्या स्नेह्याविषयी गोखल्यांची आंधळी

निष्ठा यावरच लादणें न्यायाचे आहे. गोखले म्हणजे सीधा थण्डा माणूस. कोणावर किती विश्वास ठेवावा, याचा धरबंध नाही. आणि जेथे आपले खास बैठकीतले जानीदोस्तच स्वदस्तूरच्या पत्रानी सोजरांच्या पुणेरी अत्याचारांची लाल भडक वर्णने दर टपालाला त्याना मुद्दाम पुरवीत गेले, तेथें त्यानी तात्विक संतापाच्या भरात त्या तपशीलांचा स्फोट विलायती वृत्तपत्रांतून केला, तेथे गोखल्यांचा काय अपराध? विद्वान विवेकी आणि विशेषतः विश्वासू अशा जानीदोस्तावरच विश्वास ठेवायचा नाही, तर मग या जगात ठेवायचा कोणावर? आणि प्रत्येक जिवंत माणसावर अविश्वास ठेवून, चक्षुर्वैसत्यम्च्या नादी मनुष्य लागला तर त्याचा जगाच्या व्यवहारात कितपत टिकाव लागेल? चक्षूर्वैसत्यम्चा कासोटा धरला तरी सुद्धा मोटें चोर पकडणे बऱ्याच वेळा साधते, पण खाटें जार पकडणे मुळीच शक्य नसते. अन्यायी अत्याचारांची विश्वासनीय ब्रुव साग्रसंगीत माहीती पुणेकर मित्रानी पुरवली आणि गोखल्यानी तिचा जोरदार स्फोट केला, यात त्यांचा काय दोष? पण अखेर गोखल्यावर उलटली. विलायतेहून परत येताच मुंबईच्या बंदरावरच मुंबई सरकारने त्याना जाब विचारला. गोखल्यानी आपल्या 'विश्वासू' जानीदोस्ताजवळ पुराव्यांची मागणी केली. त्यानी चटकन् कानावर हात ठेवले, आणि गोखल्याना तोंडघशी पाडले. खाटें जार पकडे ना आणि मोटें चोर सापडे ना! अर्थात् सर्व पापाचे माप स्वतःच्या पदरात घेऊन गोखल्यानी मुंबई सरकारची माफी मागीतली.

चोराऐवजी संन्याशी सुळावर चढला

माफी प्रकरणामुळे गोखल्यांच्या सार्वजनिक जीवनाची बरीच अप्रतिष्ठा झाली; परंतु या अप्रतिष्ठेला मूळ कारण असलेले त्यांचे स्नेही मात्र अझून प्रतिष्ठित म्हणून पुण्यातल्या संभावितांची यादी फुगवीत जिवंत आहेत.

साध्या पुटकुळीचे माकड-खांडूक बनविण्यास अग्रेसर म्हणून प्रख्यात पावलेल्या टिळकपंथी टोळानी हे गोखल्यांचे माफी प्रकरण त्यावेळी यल्लमाच्या थाबडीप्रमाणे इतके जोरजोराने नाचविले कीं सारा महाराष्ट्र गोखल्यांच्या सार्वजनिक हितवादाकडे साशंकच काय पण दुष्ट दृष्टीने पाहू लागला. आगरकरपंथी एका बड्या धेण्डाची नाचक्की म्हणजे टिळकपंथीयाना पुत्रप्राप्तीचा आनंद! त्यातल्या त्यात डे. ए. सोसायटीचा संबंध असलेल्या नाम. गोखल्यासारख्याच्या नालिस्तीचा कपिलाषष्टीचा हा योग! मग पराचा कावळा करण्यासाठी टिळकपंथीयानी धाबळ्यानी कंबरा कसल्या तर त्यात नवल कशाचे? टिळकपंथेतर कोणाहि सानथोर माणसाने माफी मागितली कीं पुण्याच्या 'केसरी'ला त्याची हुर्रेवडी उडवून त्याला माणसातून उठविण्याची मोठी सुरसुरी येते. जणू काय, स्वतःची चूक पटल्यावर, किंवा एकादी चूक निष्कारण पदरी पडल्यावर, माफी मागणे, म्हणजे नरकाचे साधन, अशी या केसरी कम्पूची वेदोक्त समजूत आहेसे वाटते. पण इतिहास पाहिला तर

माफीचा संप्रदाय टिळकीच आहे

कोल्हापूर प्रकरणातल्या १०१ दिवसांच्या शिक्षेनंतर माफीच्या सबबीवरच टिळकानी आपली स्वतः ची व आगरकरांची सुटका करून घेतली. पहिल्या राजद्रोहाच्या खटल्यात सुद्धा माफीवर प्रकरण तुटत असल्यास तोडण्याचा ''दरबारी'' प्रयत्न झालेला होताच. तो साधला नाही म्हणून खटला चालून शिक्षा झाली. तरीहि अखेर एका माफी पत्रकावर बिनशर्त सही करूनच टिळकानी आपली मुक्तता करून घेतली आणि १९०७-०८ सालच्या राजद्रोहाच्या खटल्यात शिक्षा ठोठावताना जस्टिस दावर यानी या

गोष्टीचा मुद्दाम उल्लेख केला होता. याच साली स्वदेशी व बॉम्ब चळवळीच्या दडपशाहीत टिळकांचे कल्याणशिष्य रा. नरसोपंत केळकर याना पकडून जेव्हा ठाण्याच्या तुरुंगात अटकेत ठेवले, त्यावेळी सरकारपुढे घालीन लोटांगण करूनच

नरसोपंत माफी मागून सुटले.

पण या बाळंभट्टी आणि नरसोपंती माफ्यांचा मुळीच उच्चार न करता, गोखल्यांच्या आणि इतरांच्या माफीचा गवगवा करण्यातच धन्यता मानणाऱ्या केसरी कंपूची धन्य आहे, यापेक्षा अधिक काय लिहावे? नरसोपंताच्या माफीला ''लोकाग्रहास्तव माफी'' असाहि शाब्दिक भुलभुलावणीचा शेंदूर फासण्यास या कम्पूने कमी केलेले नाही. माफी म्हणजे नरकाचे साधन, माणुसकीतून उठल्याचे आणि सार्वजनिक सेवेच्या नालयकीचे चिन्ह, असा सिद्धान्त ठोकल्यावर ''सरकारग्रहास्तव आणि लोकाग्रहास्तव'' अशा माफीच्या देशस्थी कोकणस्थी जाती निर्माण करणे, पुणेरी ब्रम्हदेवांच्या लेखणी वाणीची सहज लीला असली, तरी विचारवंतांच्या दृष्टीने ही केसरी प्रासादिक शाब्दिक जादुगिरी चिळस आणण्याइतकीच निंद्य होय. माफी म्हणजे माफी. मग त्यात,

गरीबाचे पोटासाठी, श्रीमंताचे औषधासाठी

हा पाचकळ भेद कशाला? सामान्यतः सध्याच्या राजकीय परिस्थितीत किंवा सार्वजनिक हितवादाच्या क्षेत्रात माफी मागून मोकळा होणारा धोरणी मनुष्य मुखग्रक्षालनात्पूर्वमचाच विधी उरकण्यापलीकडे फारसे काहीच करीत नाही. टिळक नरसोपंत याच धोरणाने वागले, गोखल्यानी तेच केले आणि इतरहि तेच करतात आणि करतील. मग असल्या मुखप्रक्षालनात्पूर्व विधीत लेखणी वाणी बुचकळून, इतरांची मनमुराद टिंगल करणारानी यापुढे जनाची नाही तर नाही, पण मनाची तरी थोडी लाज बाळगून, आपल्या पायाखाली नेहमी काय जळत असते, याचा माणुसकीने विचार करावा.

पुण्यातील अत्याचाराबद्दल नाम. गोखल्यानी विलायतेत जे ज्वलज्जहाल लेख प्रसिद्ध केले, त्यांची माहिती व तपशील प्रो. राजवाडे यानी त्याना पुरविली होती, ही गोष्ट पडद्याबाहेर विधीयुक्त जरी कधीच आलेली नाही, तरी पुण्यास ही भानगड पुष्कळाना चांगली माहीत आहे. निदान असली बोलवा पुण्यास अनेकांच्या तोंडून आम्ही ऐकलेली आहे; आणि रॅण्डचा खून झाल्यानंतरच्या चळवळीत डे. ए. सोसायटीच्या मेंबराबद्दल सरकारला जी चमत्कारीक घाण येऊ लागली तिचा साकल्याने विचार केला तर, या बोलव्यात अगदीच तत्यार्थ नाहीं, असे मानता यावयाचे नाही. असे म्हणतात कीं नाम. गोखल्यावर आक्षिप्त लेखाबाबद जेव्हा

बाप दाखव, नाही तर श्राद्ध घाल

असा प्रसंग आला, तेव्हा प्रो. राजवाडे यानी कच खाल्ली; ''माझी पत्रे खाजगी असल्यामुळे ती पुराव्यासाठी पुढे मांडण्याची परवानगी मी देऊ शकत नाही'' अशी सबब पुढे करून, प्रो. राजवाड्यानी नाम. गोखल्याना तोंडघशी पाडले. ''अगदी सीधा माणूस'' अशी प्रो. राजवाड्यांची कीर्ती आहे आणि ती या हकीकतीवरून बरीच सिद्ध होते. वरील ''दंतकथा'' खरी का खोटी या वादात शिरण्यात काहीच अर्थ नाही. कारण ''मन जाणे पापा, आणि आई जाणे मुलाच्या बापा'' नियमाप्रमाणे, गोखल्यांच्या मृत्यूनंतर या वादाची सालटी सोलणे फुकट आहे. मात्र लोकवार्ता खरी मानली, तर प्रो. राजवाड्यांच्या संजयगिरीवर विश्वासून नाम. गोखल्यांचा निष्कारण बदलौकीक झाला,

आणि प्रो. राजवाडे मात्र धुतल्या तांदळाप्रमाणे जसेच्या तसे सरळ राजमार्गी संभावीतच राहिले, असा त्याचा निष्कर्ष निघाल्याशिवाय रहात नाही. मोठ्या नवलाची गोष्ट कीं हेच प्रो. राजवाडे आज डे. ए. सोसायटीच्या गव्हर्निंग बॉडीमध्ये एक अष्टपैलू प्यादे म्हणून गोखले पार्टीच्या लाईफ मेंबरावर, दोर तोडून पळालेल्या चावऱ्या झिपऱ्याप्रमाणे तुटून पडत आहेत.

माफी प्रकरणामुळे गोखल्यापुरते सरकारचे समाधान झाले खरे; पण गोखल्याशिवाय सोसायटीच्या दुसऱ्याहि काही लाईफ मेंबरानी, तत्कालीन् वातवरणानुसार, अनेक भरंसाट लेख व कविता छापून प्रसिद्ध केल्या होत्या व कित्येकानी जहाल व्याख्यानेहि झोडली होती. याचा परिणाम साहजीकच असा झाला कीं सोसायटीचे लाईफ मेंबर अराजनिष्ट व राजकीय अत्याचारप्रवर्तक असावे, असा सरकारला संशय आला. सगळे रोग पत्करतात, पण संशयाचा रोग जडला कीं फार वाईट. त्यातल्या त्यात सर्वस्वी परकीय अशा देशावर केवळ दण्डुक्याच्या पुण्याईवर राज्य करणाऱ्या परदेशी सरकारच्या नाकपुड्या संशयाच्या नुसत्या वासानेच झडून सणसणू लागतात. आधीच डे. ए. सोसायटीसारख्या लोकशाही शिक्षणसंस्थेने सरकारी शिक्षणखात्याच्या नखऱ्यात चांगलाच गरम मसाला घातलेला असल्यामुळे, या सोसायटीचे शल्य विधवेच्या सलाप्रमाणें सरकारच्या पोटात खुपतच होते. अशात सोसायटीच्या दोन चार लाईफ मेम्बरांकडून वाग्लेखनी जहालपणाचे पाप घडलेले. मग ''कायदा आणि शिस्त'' राखण्याची स्वयंभू जबाबदारी बाळगणाऱ्या सरकारचा सोसायटीविरुद्ध तडफडाट कां उडणार नाही? आधीच उल्हास त्यात आयताच आला फाल्गुन मास! सोसायटीची पाळेमुळे खणून तिला रसातळाला न्यावी; किंवा सरकारी कदरबाज शिस्तीची तोण्डबेडी पायबेडी ठोकून तिला आपल्या पोलादी हुकमतीखाली जखडून टाकावी, अशी सरकारची खटपट सुरू झाली आणि त्याप्रमाणे सरकार आणि सोसायटी यांच्यात पत्रव्यवहार सुरू झाला. हा पत्रव्यवहार बराच मनोरंजक व बोधप्रद असावा, असा आमचा कयास आहे. सोसायटीच्या दप्तरी तो समग्र आहे किंवा नाही, याची आम्हाला बरीच शंका वाटते. यदाकदाचित् असलाच तर तो आमच्या दृष्टीगोचर होण्याची मारामार, मग हाती लागण्याची गोष्ट कशाला? ते शक्यच नाहीं, तथापि सोसायटीच्या प्रसिद्ध रिपोर्टात जे थोडे बहुत संदर्भ आणि उतारे आढळतात, त्यावरून सरकार आणि सोसायटी यात झालेल्या तडजोडीची अटकळ पुष्कळ करता येण्यासारखी आहे. या तडजोडीच्या धडपडीतूनच

''अष्टभुजा'' गव्हर्निंग बॉडीचा जन्म

झालेला आहे. लाईफ मेम्बरांचे बोर्ड आणि कौन्सिल यांचे काही अधिकार खच्ची करून, ते नवीनच एका गव्हर्निंग बॉडीकडे दिले जाऊन, या वादाची समाप्ति झाली. कौन्सिलमध्ये लाईफ मेम्बरांचाच भरणा जास्त, अर्थात् सोसायटीचा कारभार त्यांच्याच तंत्राने चालणार, अशी सरकारली भीती; आणि सोसायटीच्या बऱ्या वाईटाशी ज्यांचा यकिंचितहि प्रत्यक्ष संबंध नाही, अशी मण्डळी नव्या गव्हर्निंग बॉडीमध्ये घुसडली तर त्यावर सोसायटीचा अलबत अविश्वासच राहाणार. या स्पष्ट अडचणीच्या भवति न भवतीवर * अखेर असा निर्णय लागला कीं कौन्सिलचे पाच प्रतिनिधी आणि लाईफ मेंबर्सचे तीन प्रतिनिधी, अशा आठ माणसांची ही गव्हर्निंग बॉडी असावी आणि तिला सोसायटीची शिस्त राखण्याचे

* उपलब्ध झालेल्या अंकात शब्द दिसत नाही.

अधिकार असावे. लाईफ मेंबरचे सर्व अधिकार काढून घेऊन त्याना कळसूत्री बाहुली बनवावी, हा सरकारचा डावपेच होता; आणि गव्हर्निंग बॉडीकडे शक्य तितके कमी अधिकार जाऊन, कौन्सिल व लाईफ मेंबरांचे बोर्ड यांचा केवळ नावापुरताच अधिकार-संन्यास जाऊन दोघांचा बोज राखावा, ही सोसायटीची धडपड होती. या द्वंद्वाच्या झटापटीचा परिणाम मात्र एवढाच होऊन बसला कीं सोसायटीच्या कॉन्स्टिट्यूशन (नियमावली) मध्ये संशयाची आणि संदिग्धार्याची बरीच बिळे निर्माण झाली. तरी सुद्धा सामान्यतः सर्व आद्य अधिकार (इनिशियल राईट्स) लाईफ मेंबरांच्या बोर्डाकडे आणि व्हेटोचे (नकार घण्टेचे) अधिकार गव्ह. बॉडीकडे, अशी व्यवस्था अंमलात आली. सोसायटीच्या कॉन्स्टिट्यूशनचा आजहि जो कोणी निःपक्षपात दृष्टीने अभ्यास करील, त्याला, कौन्सिलचे बरेचसे अधिकार आणि ला. में. बोर्डाचे सर्वच अधिकार काढून घेण्याचा सरकारचा डाव सपशेल तोण्डघशी पडला, हे समजायला फारसे डोके खाजविण्याची जरूरच पडणार नाही. पण सध्याच्या उलट्या डोळ्याच्या गव्ह. बॉडीला सरकारचा हा डाव कॉन्स्टिट्यूशनमध्ये जिवंत वावरत असल्याचा भ्रम झाल्यामुळेच, तिला मूलतःच नसलेल्या सत्तेचा थैमान घालण्याचा मोह सध्या आवरेनासा झाला आहे. नेमणुकांच्या बाबतीत गव्ह. बॉडी नकार घण्टेचा व्हेटोचा अधिकार बजावण्यास कितीहि समर्थ असली, तरी लाईफ मेंबरांच्या बोर्डाचा नेमणुकीचा आद्य अधिकार तिच्या हातात सुतराम् नाही, हे नियमावली आणि तद्विषयक उपलब्ध पत्रव्यवहार वाचणाराला सहज स्पष्ट उमगण्यासारखे आहे. पण चाणक्य नीतीच्या भटी परंपरेचे पुनरुज्जीवन करण्यास धाधावलेल्या उंटावरच्या शहाण्याना हे कसे कळणार?

गव्ह. बॉडीवर ला. मेंबरापेक्षा ''बाहेरच्या'' मंडळींचे मताधिक्य आहे; तरीसुद्धा ''बाहेरची'' मण्डळी कौन्सिलपैकीच असल्यामुळे ''आपलीच'' आहेत, अर्थात् सर्व जुने आद्य अधिकार व व्यवस्था पर्यायाने आपल्याच हाती राहणार, या स्पष्ट कल्पनेनेच सोसायटीने या नव्या गव्ह. बॉडीचे बाण्डगूळ पत्करले. शिवाय सोसायटी

जगवावी का ठार मारावी

असा बिकट पेचाचा तो प्रसंग होता. ज्या लाईफ मेंबरानी रक्ताचे पाणी करून पोटच्या पोराप्रमाणे सोसायटीला वाढविले, ते तिचा खून कसा करतील? ते शक्यच नव्हते. अर्थात् सोसायटी ठार बुडवण्यापेक्षा गव्ह. बॉडीच्या शिस्तीच्या दण्डकाचे नामधारी नियंत्रण पत्करून, ला. मेंबरानी सोसायटी जगविण्याचे श्रेय घेतले, यात त्यांच्या मनाचा मोठेपणाच व्यक्त होतो.

या भानगडीपूर्वी सात आठ वर्षे टिळकानी सोसायटी सोडली होती. त्याना सुद्धा या गव्ह. बॉडीची ही बाण्डगुळी योजना सहन झाली नाही आणि त्यानी तिची ''सासूबाई'' ''अष्टभुजा देवी'' वगैरे शब्दांत संभावना करून, सोसायटीच्या गलधटपणाची केसरीच्या रकान्यातून मनमुराद टिंगल केली. पण आजच्या (ग्राम) केसरीला या गोष्टीची दाद असल्याचे दिसत नाही. सोसायटीतल्या टिळकपक्षाला सध्याच्या गव्ह. बॉडीच्या महाकृपेनेच सत्ता प्राप्तीचे रेडियम दिवस दिसल्यामुळे, या अष्टभुजा सासुबाईच्या काकडमाकड आरत्या करण्यात केसरीला मोठी धन्यता वाटत आहे.

गोखलेपंथी लाईफ मेंबर्स नेहमी तडजोडीच्या धोरणाचे आणि मूळपासून गव्ह. बॉडीला डॉ. सर भाण्डारकरासारखा विद्वान्, शिक्षणकार्यज्ञ, अनुभवी आणि सर्वमान्य चेअरमन लाभलेला; त्यामुळे सोसायटीच्या कारभाराचा गाडा बिनखटका जवळ जवळ ४०-४२ वर्षे चालला. ला. मेंबर्सचे व गव्ह.

बॉडीचे कधीच वाकडे आले नाही. सोसायटीमध्ये राजकीय असंतोष, अत्याचार, किंवा राजद्रोह असल्या प्रकारांचा प्रादुर्भाव होऊ नये, एवढी कदरीची शिस्त सांभाळण्यापुरतीच गव्ह. बॉडीची वास्तवीक योजना होती. लाईफ मेंबराकडे पाहिले तरीहि सगळा भरणा गोखलेपंथी मवाळांचा. ते राजकीयच काय पण सामाजिक असंतोषाच्या फंदात पडण्यापूर्वी दहा अंक मोजणारे. परंतु सोसायटीतले काही लोक पुण्यातल्या सोजरी अत्याचारामुळे चिडून जाऊत जरी टिळकी जहालपणाच्या शेंदराने बजरंगबली बनले, तरी ते काही त्यांचे खरे रूप नव्हतेच. सर्वांचीच माथी जेथे भडकली, तेथे काही फर्ग्युसनी मवाळ तात्पुरते जहाल न बनायला ते काय अप्रबुद्ध पशू होते? पण हा सर्व एका विशेष वातावरणाचा परिणाम असल्यामुळे, गव्ह. बॉडीच्या राजकीय असंतोष-प्रतिबंधक शिस्तीला विरोध करण्याचे ला. मेम्बराना काहीच कारण नव्हते. तशात, डॉ. सर भाण्डारकर यांचे धोरण विवेकी व सामोपचारी. ''प्रत्यक्ष कार्य करणारी ही मण्डळी (ला. मेंबर्स). त्यांना त्यांच्या अडचणी नीट कळतात. त्यात तुमच्या आमच्यासारख्या (गव्ह. बॉडी मेम्बर्स) वर्ष सहा महिन्यानी एकदा डोके खाजविणारानी होय नाही म्हणण्यात काय शहाणपणा?' हे त्यांचे नेहमीचे सूत्र. त्यामुळे गव्ह. बॉडीविरुद्ध ला. मेंबरांची तक्रार तर नसेच नसे; पण उलट जबाबदारीची जाणीव मात्र अधिक पडत असे. असें असताना, सध्याच्याच गव्ह. बॉडी सासूबाईला आपल्या सत्तेची उसनी ऐट आणून गेल्या नवंबरातला आततायीपणा करण्याची अवदसा कां आठवली, याचा विचार पुढील लेखांवर टाकणे भाग आहे.

□□□

प्रबोधन

PRABODHAN :—A Fortnightly Journal devoted to the Social, Religious and Moral Regeneration of the Hindu Society.

उचित जागृत प्राप्त वराभिबोधन.

Vol. I. वर्ष १ ले. | दादर:—मुंबई तारीख १६ ऑक्टोबर १९२१. श्रीशिवराज शक १४८. | No. 1. अंक १ ला.

INDIAN RATIONALISTIC SOCIETY

[Registered under Act XXI of 1860]

Constitution non-political, non-sectarian: **propagates** knowledge on the basis of Science, Truth, Rational and free thinking: **membership on application.** Its monthly journal **"Bulletin"** Yearly sub. **Rs. 3.** Other publications:—(1) **Reprint "Bulletin"** (June—Dec. 1919) **Price Re. 1.** (2) **"K. M. Chatterjee and His Times"** being history of Social and political evolution by N. Chatterjee. **Price Rs. 2.** Well reviewed in the Indian Daily News, The Bengalee, The new Empire. (3) **"The Decline and Fall of the Hindus"** (Sir P. C. Roy forewarded calling it 'the book on India's regeneration') by S. C. Mookerjee. **Price Re. 1.** Well reviewed in the London Times Literary Supplement of may 20th 1921 and in the Inquirer as also in the "Modern Review," the "Servants of India," "Epiphany", "The Times of Assam", "The Indian Daily News", "The Indian Messenger", "The Maha-Bodhi".

Apply to the Secretary, I. R. Society (P.)
6, Ballygunje Circular Road, Calcutta.

DRINK & ENJOY YOUR BREAKFAST WITH MANOHAR COMPANY'S

डॉक्टर व वैद्य यांनी शिफारस केलेले

हेंच तें

सर्वोत्तम चहा करणारें

रामदास—पंचपदी.

महाराष्ट्राच्या संदर्भात काही चर्चा सुरू असल्यास 'पुरोगामी महाराष्ट्र' हा शब्दप्रयोग हमखास केला जातो. हा पुरोगामी महाराष्ट्र आभाळातून पडला नाही. त्याला पुरोगामी बनवण्याच्या प्रक्रियेत काही विचारवंतांची आयुष्ये खर्ची पडली आहेत. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परंपरेत असणारे अखेरचे नाव म्हणजे अर्थातच केशव सीताराम ठाकरे हे होय. ठाकरे यांनी ज्या माध्यमातून हे कार्य केले त्याचे नाव 'प्रबोधन'. म्हणून तर ठाकरे यांची प्रबोधनकार ठाकरे अशी ओळखच निर्माण झाली. 'प्रबोधन' या नियतकालिकाचा पहिला अंक मुंबईहून १६ ऑक्टोबर १९२१ या दिवशी प्रसिद्ध झाला. म्हणजेच २०२०-२१ हे 'प्रबोधन'चे शताब्दी वर्ष होय. या शताब्दीच्या निमित्ताने सचिन परब यांनी संपादित केलेला 'प्रबोधन'मधील प्रबोधनकार' हा त्रिखंडात्मक ग्रंथ वाचकांना सुपूर्द करण्यात 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'स कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभत आहे.

डॉ. सदानंद मोरे

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ